व्यावहारिक ज्ञानकोश

भाग चौथा

संपादक,
गणेश रंगो भिडे.

व्यावहारिक ज्ञानकोश

भाग चौथा

पक्वान्न ते मानवी शरीर

अल्पं मानवजीवितं, बहुविधा विद्याः कलाः शोभनाः
तासामध्ययनं सुयत्नसुलभं, यत्नावकाशः कुतः ।
तस्मात्सद्गृहिणो यदिष्टमुचितं ज्ञातव्यसारं मतं
तत्सर्वं **व्यवहारकोश**कथितं संघेन संपादितम् ॥

१ आक्टोबर १९३९

किंमत १० रुपये

प्रकाशकः—ग. रं. भिडे, मॅनेजिंग डायरेक्टर, व्यावहारिक ज्ञानकोश मंडळ, लि., कोल्हापूर.
मुद्रकः— कृ. ह. सहस्रबुद्धे, प्रोप्रायटर श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर

मुख्य संपादक

गणेश रंगो भिडे

या भागांतील कांहीं प्रमुख लेखक

प्रो. शं. वा. दांडेकर, M. A.

प्रो. वि. भि. कोलते, M. A.

श्री. वि. वा. पत्की, M. A.

डॉ. रा. चिं. श्रीखंडे, M. B. B. S.

श्री. भा. शा. कबनूरकर, B. A., B. T.

प्रो. कुंभारे, श्री. जोशी, इ. भा. इ. सं. मंडळाचे सदस्य

रा. के. रा. कुलकर्णी

ॲ. शं. गो. दाभोळकर, B. A., LL. B.

रा. द. न. मोकाशी, ॲडव्होकेट.

प्रो. वा. पु. पटवर्धन, M. A.

संपादकीय—

हा चौथा भाग आपल्या हातीं आनंदानें देत आहें. आतां पांचवा भाग आपल्या स्वाधीन केला कीं मी आपल्या ऋणांतून मुक्त होईन.

व्यावहारिक ज्ञानकोशाची सहा वर्षांपूर्वी मनांत असलेली कल्पना आणि आज तयार झालेले चार भाग यांची मी मनामध्यें जेव्हां तुलना करून पाहतों त्यावेळीं बरेंच समाधान वाटतें. मला वाटतें, कीं कोणतीहि कल्पना अगदीं पूर्णत्वानें प्रत्यक्षांत उतरविणें जवळ जवळ अशक्यच आहे. कारण प्रत्यक्ष कार्य करतांना अनाहूत अडचणी (सर्व तऱ्हेच्या) अकल्पित ठिकाणाहून निर्माण होतात. कित्येक वेळां चालत्या गाड्याला थांबवून किंवा किंचित् मार्ग बदलून आधीं त्या अडचणी दूर करण्यांतच सर्व शक्ति खर्चावी लागते, आणि यामुळें अगदीं स्पष्ट दिसत असतांनाही कांहीं दोष राहून जातात.

प्रस्तुत ज्ञानकोशाची व्याप्ति 'व्यावहारिक' या विशेषणानें मर्यादित केली असली तरी 'व्यावहारिक' या विशेषणाचा अर्थ काय घ्यायचा याबद्दलच व्यक्तीव्यक्तींत मतभिन्नता आढळून आली आहे. स्वतः मी या शब्दाचा काय अर्थ घेतों हें आतांपर्यंत छापलेल्या १५३५ पृष्ठांमधून अगदीं लेखींच सांगितलें आहे. तेव्हां त्याबद्दल पुन्हां लिहिण्याची गरज नाहीं. पण कार्याविषयीं आरंभीं माझ्या ज्या कांहीं अपेक्षा होत्या तशाच कोशाच्या ग्राहकांच्याहि कांहीं असणारच. तेव्हां ग्राहकांना विनंति कीं एखादा विषय राहिला किंवा यावा असें वाटत असल्यास त्यांनीं मोकळ्या मनानें मला तसें कळवावें. तसेंच माहितीच्या बाबतींतहि कांहीं उणीव किंवा चुका राहिल्या असल्यास कळवाव्या. त्याबद्दल मी ऋणी राहीन.

छापतांना शुद्धलेखनाच्या किंवा माहितीच्या राहिलेल्या चुका पांचव्या भागाच्या अखेरीस पुरवणी जोडून दुरुस्त करणार आहें. याशिवाय पहिल्या भागांत राहिलेलीं चरित्रें व देशांची माहितीहि शेवटीं देणार आहें. तसेंच आतांपर्यंत छापलेल्या विषयांच्या माहितींत कांहीं नवी भर पडली असेल तर तीहि पुरवणींत आपल्याला आढळून येईल. विषयसूची पांचव्या भागाच्या शेवटीं येईलच.

आतां विनंति एकच. कोशाच्या प्रती थोड्या शिल्लक राहिलेल्या आहेत. पण त्या सर्व खपल्याशिवाय या कार्याला आर्थिक यश मिळालें असें म्हणतां येणार नाहीं. तरी आजच्या ग्राहकांनीं या बाबतींतहि सहाय्य करावें अशी विनंति करून पांचव्या भागाच्या तयारीला लागतों.

आपला नम्र,

ग. रं. भिडे

संपादक



पक्वान्नः-या शब्दाचा अर्थ शिजलेलें अन्न (पक्व+अन्न) असा होत असला तरी व्यवहारांत या साध्या अर्थानें हा शब्द घेत नाहींत. कोणताहि गोड खाद्यपदार्थ या सदराखालीं तो येतो. मात्र साखर हा पदार्थ जरी गोड असला आणि तो खाद्य पदार्थ असला तरी नुसत्या साखरेला कोणी पक्वान्न म्हणत नाहींत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. लाडू, श्रीखंड-पुरी, पुरणपोळी इत्यादींनाच पक्वान्न म्हणतात. सणावारीं, विशेष प्रसंगीं, पाहुणचारार्थ पक्वान्न करण्याची पद्धति आपल्याकडे रूढ आहे. या कोशांत अशीं अनेक पक्वानें कशीं तयार करतात याची माहिती स्वतंत्र रीतीनें दिली आहे.

पक्षघातः-शरीराची एक बाजू लटकी पडणें यास पक्षघात म्हणतात. 'हेमि प्लेजिया' असें यास इंग्रजी वैद्यकांत नांव आहे. मेंदूचा ताबा शरीरांतील सर्व स्नायूंवर असतो व मज्जातंतुमार्गांनीं हा ताबा चालविला जातो. कोणत्याहि कारणानें हा ताबा नष्ट झाल्यास स्नायु लुले किंवा लटके पडतात (Paralysis). मेंदूच्या डाव्या व उजव्या बाजूचा ताबा शरीरांच्या अनुक्रमें उजव्या व डाव्या बाजूवर असतो. कारण एका बाजूचे मज्जातंतू दुसऱ्या बाजूस जाऊन खालीं उतरत असतात. या परिक्रमणस्थानाच्यावर मेंदूच्या ज्या बाजूस अपाय अगर विकृति झाली असेल त्याच्या उलट बाजूच्या अंगाचे स्नायु लटके होतात. मेंदूंतील रक्तवाहिनी फुटणें अगर रक्तवाहिनींत कांहीं गोठलेला रक्तांश वगैरे अडकून रक्ताभिसरणास प्रतिबंध होणें, या कारणांनीं पक्षघात एकदम येत असतो. हळूहळू उत्पन्न होणारा, पक्षघाताचा दुसरा एक प्रकार आहे व त्याचीं कारणें म्हणजे, मेंदूवर कोणत्याहि कारणानें (आवाळूसारख्या वाढीनें इ.) दाब पडणें, मेंदूंत सूज व दाह होऊन करट होणें, रक्तांत कांहीं विकृति उत्पन्न होणें, किंवा मज्जासंस्थेचेच विकार होणें हीं संभवतात.

हा विकार जास्त प्रमाणांत झालेला असल्यास पूर्णपणें बरा होणें दुःसाध्य आहे. कांहीं तरी मार लागून झालेला पक्षघात बरा होण्याचा संभव जास्त असतो. रक्तवाहिनींच्या विकारांनीं उद्भवलेला पक्षघात कष्टसाध्य गणलेला आहे. पक्षघाताच्या पहिल्या झटक्यानंतर १-२ वर्षांत दुसरा झटका बहुधा येत असतो व त्यांत रोगी दगावण्याचा संभव असतो. पक्षघात बरा होतो तेव्हां आधीं पायांत शक्ति येते व नंतर अनुक्रमानें हातांत येते असा साधारण नियम आहे. याच्याविरुद्ध घडणें हें लक्षण वाईट होय. मूत्रपिंडाचा विकार किंवा अशक्तता आणणारे इतर रोग कांहीं असल्यास पक्षघात बरा होणें कठीण असतें.

उपाय-पक्षघाताच्या झटक्याच्या वेळीं रोग्यास पूर्ण विश्रांति द्यावी. रक्तदाब वाढलेला असल्यास तो कमी

करण्याचे उपाय करावेत. ज्या कारणानें पक्षघात झाला असेल तें शोधून काढून त्याचें निराकरण करणें जरूर आहे. यासाठीं तज्ज्ञ डॉक्टराचा सल्ला अवश्य होय. लटके पडलेल्या स्नायूंवर मर्दन करणें, विद्युल्लहरींनीं संचालन करणें वगैरे उपाय त्वरित सुरू करावेत म्हणजे स्नायूंचें पोषण नीट होऊन ते वाळून जात नाहींत व त्यांत पुनः चलनवलनशक्ति येण्याचा संभव असतो. तसेंच लटके पडलेले अवयव **संकोच पावूं नयेत** म्हणून फळयांनीं बांधावेत.

आयुर्वेदिक उपाय—उडीद, कवचबीज, चिकणामूल, रोहिस गवत, रास्ना, आस्कंद, एरंडमूळ, यांचा काढा सैंधव व हिंग प्राशन करावा व एकांगवीर, योगराज गुग्गुळ हीं औषधें घ्यावीत. नारायणतेल, कौशिक तेल यांनीं अंग मर्दन करावें.



पक्षीः—पक्षी म्हणजे उष्ण रक्ताचे, पिसारे असलेले, अंडीं घालणारे व उडणारे द्विपाद. पक्षी उडतांना आपल्या उराच्या हाडानें हवा कापीत जातो. होडीचा पुढचा भाग जसा असतो तसेंच म्हणजे त्या आकाराचें हें हाड असतें. पक्ष्याच्या हृदयाच्या चार पाकळ्या—भाग—किंवा कप्पे—असतात. सस्तन प्राण्यांप्रमाणेंच पक्षीहि पृष्ठवंशी (Vertebrates) असतात. सस्तन प्राणी व पक्षी यांचे पूर्वज (Common ancestry among reptiles) गुणविकासवादाप्रमाणें सरपटणाऱ्या प्राण्यांमधीलच असले तरी या दोन्ही वर्गांचा संबंध नाहीं.

पक्षी व सस्तन प्राणी यांचा गुणविकास भिन्न प्रकारें झाला आहे. प्राणिशास्त्रानें मनुष्य प्राण्याची गणना सस्तन प्राण्यांत केली नसती तर पक्षी व सस्तन प्राणी या दोन वर्गांत श्रेष्ठ कोण हें ठरविणें कठीण झालें असतें. सस्तन प्राणी हे बुद्धीचा विकास व हृदयाची रचना या बाबतींत श्रेष्ठ आहेत तर पक्षी हे श्वासोश्वास करण्याची शक्ति व संचारशक्ति या बाबतींत श्रेष्ठ आहेत. सस्तन प्राण्यांत आई व मूल यांचा मुलाच्या जन्माआधीं कमिअधिक कालावधीचा संबंध असतो; परंतु सर्व पक्षी अंडज असतात. सरपटणाऱ्या प्राण्यांहून पक्ष्यांचें वैशिष्ट्य पुढील बाबतींत दिसून येतें. (१) पक्ष्यांना खवल्यांच्याऐवजीं पिसारे असतात. (२) त्यांचा मेंदू अधिक मोठा असून त्याची रचना अधिक गुंतागुंतीची असते. (३) पक्ष्यांच्या हृदयांतून शरीराकडे फक्त शुद्ध रक्तच वाहतें. (४) पक्ष्यांच्या पायाच्या पुढच्या भागीं (हातास) जास्तींत जास्त तीन बोटें व सर्व मिळून चार बोटें असतात. पोपटासारख्या पक्ष्यास पुढें दोन व मागें दोन याप्रमाणें बोटें असतात. (५) पक्षी उष्ण रक्ताचे असतात. सरपटणाऱ्या प्राण्यांपैकीं कांहींना पूर्वी पंख असत व तेहि (कांहीं) द्विपाद असत असें संशोधनावरून आढळून आलें आहे.

उडणाऱ्या पक्ष्यांच्या सुमारें १०००० जाती आहेत असें शास्त्रज्ञांचें मत आहे. यांचें वर्गीकरण करणें कठीण आहे. कारण अनेक पक्ष्यांत अगदीं किरकोळ स्वरूपाचे पण वर्गीकरणाच्या दृष्टीनें महत्त्वाचे असे फरक आहेत. भौगोलिक परिस्थितीमुळें अनेक जातीचे पक्षी एकाच प्रदेशांत राहात असले आणि परिस्थितीनुसार आहार, निवासस्थान व संवयी या जरी सारख्या असल्या तरी त्यांचे परस्पराशीं रक्ताचे संबंध ठरविण्यास मदत होण्यास जें एक प्रकारचें साम्य असावें लागतें तें असत नाहीं. उदाहरणार्थ चिमण्या व कबूतरें यांमध्यें जरी वरवरचें साम्य दिसत असलें तरी त्यांचा निकटचा संबंध नाहीं.

उडणाऱ्या पक्ष्यांच्या संवयी व राहणी, खाद्य, उडण्याची पद्धती व शारीरिक रचना इत्यादि गोष्टी

लक्षांत घेऊन एकूण अकरा जाती किंवा वर्ग पाडले आहेत. सामान्यतः पक्षी उडतांना खालीं, वर, मागें, पुढें व वक्रमार्गानें हालचाल करतात. पक्षी उडतांना खालच्या बाजूनें पंखांची जी फडफड करतो त्यामुळेंच तो वर राहतो. हीच क्रिया भरारी मारण्याच्या कामींहि उपयोगीं पडते. पाठीमागें जी पंख फडफडण्याची क्रिया होते तीमुळें पक्ष्याला गति मिळते. पंख खालीं रेटण्याच्या क्रियेपेक्षां पंख वर उचलण्याच्या क्रियेला सापेक्षतेनें कमी वेळ लागतो व अर्थातच शक्तीहि कमीच लागते, कारण पंख खालीं मारण्यांत हवेला खालीं दाबावें लागतें म्हणजेच प्रतिकार अधिक होतो.

बहुतेक पक्षी अतिशय उद्योगी असतात. पक्ष्यांच्या अंगीं असणाऱ्या उष्णतामानावरून ही गोष्ट सिद्ध होते. पक्ष्यांचें उष्णतामान कित्येक वेळीं ११३° फॅरनहीट पर्यंत वाढतें. हें उष्णतामान मनुष्याच्या उष्णतामानापेक्षां अर्थात्च अधिक आहे. मनुष्यापेक्षां पक्ष्यांच्या हृदयाचे ठोकेहि अधिक म्हणजे मिनिटाला १२० इतके पडतात व तो उडत असतांना तर त्याहून अधिक पडतात. कावळ्याचा वेग ताशीं २५ मैल असतो तर पाकोळी ताशीं १०० मैलाच्या वेगानें उडूं शकते. शास्त्रज्ञांनीं सामान्यतः पक्ष्याचा वेग दर मिनिटाला १ मैल इतका दिला आहे. पक्ष्यांच्या उडण्याच्या पद्धतींतहि वैचित्र्य आहे. चंडोलासारखा पक्षी भराऱ्या मारीत जातो तर बहिरी ससाणा घिरट्या घालीत उडतो. घारहि घिरट्या घालते. कांहीं पक्षी खालीं उतरतांना तिरकस—घसरत आल्यासारखे (Gliding) उतरतात तर कांहीं अगदीं सरळ उभ्या रेषेंत उतरतात. ज्या पक्ष्यांचे पंख मोठे असतात ते हवेंत तरंगत राहतात; त्यांना सारखे पंख मारावे लागत नाहींत. कांहीं पक्षी हवेच्या प्रवाहाचा फायदा घेऊन फक्त हवेंत तरंगण्यापुरतेच पंख हालवून संचार करूं शकतात. कांहीं पक्षी असे असतात कीं ते सहसा आकाशांत उडतच नाहींत. त्यांचें राहणें नेहमीं जमिनीवरच असतें. उदाः कोंबडी, मोर, शहामृग. अशा पक्ष्यांना आपण स्थलचर म्हणूं. पण हे पक्षी जरी जमिनीवरच प्रायः राहात असले तरी जमिनीवरहि वेगानें चालण्यास त्यांना आपल्या पंखाचा उपयोग होतो ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आणि जरुरीप्रमाणें ते आपापल्या कुवतीप्रमाणें कमिअधिक प्रमाणांत आकाशांत उडतात. कांहीं पक्षी पाण्यांत सुंदर रीतीनें व झपझप पोहत जातात. अशा पक्ष्यांपैकीं पेन्ग्विन (Penguin) हा पक्षी प्रख्यात आहे. खंड्यासारखे पक्षी मासे टिपण्यासाठीं पाण्यांत झपकन् सुरकांडी मारून मासा पकडून पाण्यावर येतात व परत आकाशांत उडून जातात. गॅनेट पक्षी तर पाण्यांतून पाणबुडीसारखा संचार करूं शकतो.

पक्ष्यांचे पंखहि निरनिराळ्या आकाराचे व प्रकारचे असतात. या पंखांचीं पिसें मऊ व रंगीबेरंगी असतात. पक्ष्यांच्या शेपटींतहि अनेक प्रकार असतात. कांहीं साफ व सरळ असतात तर कांहीं दुभागलेल्या असतात. यांतहि अनेक मनोरंजक प्रकार असतात. पक्ष्यांना शेपटीचा उपयोग सुकाणूसारखा दिशा बदलण्याच्या कामीं होतो. याशिवाय त्यांच्या सौंदर्यांत भर पडते ती वेगळीच. पक्ष्यांना पंखांच्या फडफडण्याची श्वासोश्वासास मदत होते. या पंख फडफडण्यामुळें फुप्फूसांतील हवा बाहेर काढण्यास साहाय्य होतें. पक्ष्यांचीं फुप्फुसें फासळ्यांना शिकटून असतात, व खरोखरींच प्रसरण पावण्यासारखीं नसतात. किड्यांच्याप्रमाणेंच पक्ष्यांच्या बाबतींतहि हवा बाहेर सोडणें हें सक्रिय (Active) असून हवा फुप्फुसांत घेणें हें निष्क्रिय (Passive) आहे. सस्तन प्राण्यांच्या बाबतींत या उलट परिस्थिती असते.हवेच्या पिशव्याहि फुप्फुसालाच लागून असतात. या पिशव्यांचा हवेच्या सांठवणासारखा (Reservoirs) उपयोग होतो. या पिशव्या फुप्फुसाची कार्यक्षमता वाढवितात व शरीराच्या उच्च उष्णतामानाचें नियमन करण्याला त्यांची मदत होते; कारण " अंतर्गत स्वेदस्रावाचें क्षेत्र " (Area of internal perspiration) म्हणून त्यांचा उपयोग होतो. पुष्कळ पक्षी पाणी फार पितात. हे पक्षी जरूरीपेक्षां जें जास्त पाणी पितात तें पाणी हवेच्या पिशव्यांच्या बाजूवर निघून जातें. पक्ष्यांच्या शरीरांत घर्म—पिंड अथवा स्वेद-पिंड (Sweat glands) नसतात. त्यांचें मूत्रहि पाण्यापेक्षां घट्ट असतें.

इमारतींच्या खबदाडींत, झाडांच्या ढोलींत, उंच फांद्यावर, नदीकाठीं कांठ पोखरून पोखरलेल्या पोकळींत, झाडांच्या फांद्यांना लोंबतीं व विशेषतः कांहीं पक्षी एखाद्या तळ्याकांठीं झाडांच्या फांद्यावर पारंब्यासारखीं लोंबतीं घरटीं बांधतात. घरटीं बांधण्याचें कौशल्य उपजतच त्यांच्या अंगीं असतें. घरट्यांतहि लहान मोठें, वर्तुळाकार, लंबट, अर्धवर्तुळाकार, दूध भोपळ्यासारखीं लांब व वर निमुळती आणि खालीं

मोठीं अशीं घरटीं पक्षी बांधतात. चिमण्यांसारखे लहान व कमजोर पक्षी आपलीं घरटीं साधारणतः इमारतीच्या खबदाडींतच बांधतात. हीं घरटीं काटक्या, कापूस व मऊ तंतु, वाळलेलीं पानें यांचीं बनवितात. कावळ्याचें घरटें ओबडधोबड असतें. सर्वसाधारणतः वाळलेल्या काटक्या, तंतू, कापूस, वाळलेलीं पानें व इतर कांहीं मऊ पदार्थ यांचीं पक्षी घरटीं बांधतात. एखादें असें घरटें काढून पाहिल्यास पक्ष्यांच्या बुद्धिमत्तेची साक्ष पटते. याचप्रमाणें योग्यकालपर्यंत अंडीं उबविणें, गाणें, नाचणें व अन्न मिळविणें या गोष्टी उपजतच पक्ष्यांना कळत असतात.

पक्ष्यांच्या स्नायूंची शक्ति जशी अतिशय विकसित झालेली असते तशी त्यांची दृष्टि व कर्णेंद्रियें हीं तीक्ष्ण असतात. त्यांचा मेंदूहि मोठा असतो. बहुतेक सर्व पक्ष्यांच्या बाबतींत घ्राणेंद्रियाचा विकास अगदींच थोडा झालेला असतो. घुबड मात्र या नियमाला अपवाद ठरतें. चवहि बेताचीच असते. पक्ष्यांच्या शरीराच्या कातडीपेक्षां त्यांच्या चोंचीच्या तळाजवळ नाकपुड्याशीं मेणाहून मऊ त्वगींद्रिय असतें व तें जास्त तीक्ष्ण असतें. पक्ष्यांच्या कानाची पाळ बाहेर दिसत नाहीं. कान व कानाची पाळ पिसांनीं झांकून गेलेली असते. अत्यंत सूक्ष्म आवाजहि पक्षी ऐकूं शकतात. सर्व इंद्रियांत पक्ष्यांचे चक्षुरिंद्रिय अधिक विकसित असतें. कमिअधिक अंतरावरील कोणतीहि वस्तु झटकन टिपण्याची शक्ति (Focus of vision) पक्ष्यांमध्यें इतर प्राण्यांपेक्षां अधिक प्रमाणांत असते. मेंदूहि मोठा व विकसित असल्यामुळें त्यांची बुद्धिहि बऱ्याच प्रमाणांत चलाख असते. तसेंच कांहीं प्राण्यांत अनुकरणशक्तिहि फार मोठ्या प्रमाणांत असते. उदा: आपल्याकडील पोपट किंवा अमेरिकेंतील सेक्रेटरी नांवाचा पक्षी.

पक्ष्याचें पिलूं अंडाशयांत असतांना रजोगोल प्रथम फार लहान असतो. परंतु अंडाशयाला मिळणाऱ्या रक्ताच्या पुरवठ्यामधून तो पिवळ्या बलकाच्या स्वरूपांत सत्त्वमय द्रव्याचा सांठा करतो. हा बलक मग बराच मोठा होतो व त्याभोवतीं बळकट आवरण (कवच) तयार होतें. परिपक्व अंडाशयाच्या एका टोकाला संवर्धनशील अशा जिवंत पदार्थाचा गोल (Disc of formative living matter) असतो; व त्याबरोबर जीवकणांतील जीवस्थान असतें. हा गोल निव्वळ पुष्टिकारक पिवळ्या बलकाच्यावर घड्याळाच्या उलट्या कांचेसारखा असतो. या गोलानें अंडाशयाचा त्याग करण्यापूर्वी किंवा अंडवाहक नलिकेच्या वरच्या भागांत रजोगोलाशीं नराच्या शुक्रजंतूंचा संयोग होऊन गर्भ राहतो. अंडवाहक नलिकेमधून (Oviduct) जातांना त्याच्याभोंवतीं निरनिराळीं कवचें तयार होतात; शिवाय टिश्यूपेपरसारख्या कवचानें तो परिवृत्त असतो. या सर्वांवर चुनखडीच्या द्रव्याचें कवच (Carborate of lime) असतें. प्रत्येक पक्ष्याची प्रत्येकवेळीं अंडीं घालण्याची शक्ति (संख्येच्या दृष्टीनें) निरनिराळी असते. तसेच आकार लहान मोठे असतात. त्याचप्रमाणें सामान्यतः सर्वच अंड्यांचीं कवचें रंगानें पांढरीं असलीं तरी त्यांवर निरनिराळ्या रंगाचे ठिपके व रेषा असतात. कांहीं पक्षी स्वतःच अंडीं उबवितात तर कांहीं आपलीं अंडीं दुसऱ्या एखाद्या पक्ष्याच्या घरट्यांत त्याच्या नकळत नेऊन ठेवून अंडीं उबविण्याचें आपलें कर्तव्य टाळतात. अर्थात् अशा वेळीं दुसऱ्या पक्ष्याचीं अंडीं आपल्यासारखींच असतील ही खात्री असल्यामुळेंच ही लबाडी हे पक्षी करतात.

उंदरासारखे सस्तन प्राणी, उपद्रवी किडे, गोगलगाई, इतर कृमीकीटक यांच्या बेसुमार वाढीला आळा घालण्याचें काम पक्षी करतात. गिधाडासारखे पक्षी मृत पशूंचें मांस खाऊन घाणीचा उपद्रव किती कमी करतात हें सर्वांना माहीत आहेच. कांहीं पक्षी निव्वळ मांसाहारी आहेत तर कांहीं केवळ फलाहारी (अधिक योग्य शब्द म्हणजे शाकाहारी) आहेत हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. कांहीं दोन्ही प्रकारचेंहि अन्न खातात. कांहीं पक्षी अन्नपचनाला मदत व्हावी म्हणून लहान लहान खडेहि खातात. यामुळें अन्ननलिकेंत घर्षण होऊन खाल्लेल्या अन्नाच्या कणांचा रद्दा होण्यास मदत होते. पक्ष्याच्या खाद्यानुसार किंवा त्याच्या गरजेनुसार त्याची चोंच बनविलेली असते. कांहींच्या चोंची अणकुचीदार मांस फोडण्यासाठीं वांकड्या व किडे धरण्यासाठीं लांब असतात. पक्ष्यांना दांत नसतात. कांहीं पक्ष्यांची आयुर्मर्यादा १२० वर्षांपर्यंत असते.

कांहीं पक्ष्यांची ऐटदार चाल, कांहींचा पिसारा, कांहींची शीळ, कांहींचें गायन, कांहींचा लाडिकपणा व धिटाई मनुष्याचें लक्ष नेहमीं वेधून घेतात. कांहीं पक्षी केवळ वसंत ऋतूंतच दिसतात. कांहींचा आवाज

फक्त पावसाळ्यांतच ऐकूं येतो तर कांहीं केवळ विशिष्ट प्रदेशांत व हवामानांत आणि अरण्यांतच आढळतात. मनुष्याला हिवाळ्यांत कपडे पेहरून थंडीपासून संरक्षण करतां येतें, आपल्या प्रदेशांत जें अन्न मिळत नाहीं तें दुसरीकडून आणतां येतें, पण पक्ष्यांना ही गोष्ट शक्य नसल्यामुळें हवामानाप्रमाणें, परिस्थितीप्रमाणें व अन्नाच्या पुरवठ्याप्रमाणें नुसते प्रांतांतरच नव्हे तर देशांतरहि कांहीं काल करावें लागतें. या स्थानांतरानें निरनिराळ्या वेळीं पक्षी दिसतात व त्या त्या वेळीं सृष्टिसौंदर्यांत भर घालीत असतात.

पचनक्रिया :–आपण खाल्लेल्या अन्नावर निरनिराळ्या पाचक रसांचे परिणाम घडून त्यांतील उपयुक्त घटकांचें आंतड्यांत शोषण होणें व निरुपयोगी भाग विसर्जन करणें या क्रियांचा अंतर्भाव पचनक्रियेंत होतो. तोंडांत अन्नाचा घांस येतांच त्याचें दांतांनीं चर्वण सुरू होते व त्याच वेळीं लाला ग्रंथींतून येणारी लाळ त्यांत मिसळते. लाळेंत 'टायलिन' (Ptyslin) नामक एक फर्मेंट असतें त्याची क्रिया अन्नांतील पिष्टमय (Starch) पदार्थावर घडून स्टार्चची 'माल्टोज' नामक एक प्रकारची शर्करा बनते. येथूनच पचनक्रियेस प्रारंभ होतो. याच दृष्टीनें अन्नाचें नीट चर्वण होणें पचनक्रियेस आवश्यक आहे.

अन्न जठरांत आल्यानंतर त्यांत जाठर रस (Gastric juice) मिसळतो. या पाचक द्रव्यांत हायड्रोक्लोरिक आम्ल '२% प्रमाणांत असतें. त्याचप्रमाणें 'पेप्सिन' व 'रेनिन' हीं फर्मेंट्स असतात. पेप्सिन् (Pepsin) च्या योगानें नायट्रोजनयुक्त अन्नघटकांवर परिणाम होऊन त्याचे पेप्टोन (Peptone) व अमायनो ॲसिड (Amino acid)मध्यें रूपांतर होऊन शोषले जाण्यासारख्या स्थितीस हे आणले जातात. रेनिन(Rennin)-मुळें दुधाचें दह्यांत रूपांतर होतें. नंतर अन्न ड्यूओडिनम्मध्यें व तेथून लहान आंतड्यांत जातें. ड्युओडिनमध्यें पित्त (Bile) व स्वादुपिंडरसांत (Pancreatic juice) हे अन्नांत येऊन मिसळतात. स्वादुपिंडरसांत अन्नाच्या तिनी घटकांवर (पिष्टमय, स्निग्ध व सेन्द्रिय) परिणाम घडविणारीं फर्मेंट्स आहेत; व अशींच फर्मेंट्स लहान आंतड्यांतून निघणाऱ्या आंत्ररसांतहि असतात. पित्ताच्या योगें स्निग्ध-पदार्थांच्या पचनास साहाय्य होतें. म्हणजे त्यांचे इमल्शन (पायस) किंवा संमिश्रण बनतें. अशा प्रकारें अन्नांतील घटकांवर अनेक पाचक रसांचे परिणाम घडून तें पचविलें जातें.

पटकीः–२९८ पृष्ठावरील 'कॉलरा' हा लेख पाहा.

पटवर्धन, डॉ. माधव त्र्यंबक (१८९४–):– एक महाराष्ट्रीय विद्वान. यांचें घराणें पुण्याचें असून प्रा. माधवरावांचा जन्म २१ जानेवारी १८९४ला बडोद्यास झाला. तेथेंच त्यांचें सर्व शिक्षण होऊन १९१८ मध्यें एम्. ए. (फारसी व इंग्रजी) ची पदवी त्यांना; मिळाली. प्रा. माधवरावांनीं १९१८ ते १९२५ पर्यंत डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन कॉलेजमध्यें फारसीचे प्रोफेसर म्हणून काम केलें. पुढें तेथें अंतस्थ भांडणें सुरू झाल्यामुळें त्यांचें व इतरांचें जमेनासें झालें. आणि त्यामुळें, त्यांनीं १९२५ मध्यें आपल्या आजीव सभासदत्त्वाचा राजीनामा दिला.



डॉ. मा. त्र्यं. पटवर्धन

यानंतर १९२८ च्या जूनपर्यंत अमळनेर व पुणें येथें प्रा. माधवराव शिक्षक म्हणून कामगारी करीत होते. याच्यापुढें मात्र त्यांची नेमणूक कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत फारसीचे व्याख्याते म्हणून झाली. तेव्हांपासून आतांपर्यंत ते कोल्हापुरासच आहेत.

डॉ. पटवर्धन जरी अध्यापनाचा व्यवसाय करीत असले तरी त्यांचा १९११ पासून कविता करण्याचा व्यासंग चालू होताच. कवी 'माधव ज्यूलियन' या नांवानें यांचीं विरहतरंग, सुधारक, उमरखय्यामकृत रुबाया, द्राक्षकन्या, गज्जलांजली स्वप्नरंजन, तुटलेले दुवे हीं त्यांच्या काव्यांचीं पुस्तकें प्रकाशित झालीं. काव्याशिवाय कोशक्षेत्रांतहि त्यांनीं प्रवेश करून १९२५ त 'फारसी–मराठी' कोश लिहून मराठीमध्यें कोशवाङ्मयाच्या विभागांत एका उत्तम पुस्तकाची भर घातली. या कोशाप्रमाणेंच त्यांचा नांवाजण्यासारखा दुसरा ग्रंथ छंदोरचना हा. याची पहिली आवृत्ति १९२७ या सालीं काढली. त्यानंतर १९३७ मध्यें नवीन पुष्कळ माहितीची भर घालून छंदोरचनेची दुसरी आवृत्ति काढली.

या पुस्तकामुळें प्रा. माधवरावांना मुंबई विद्यापीठाची D. Litt ही पदवी (१९३९) मिळाली व त्यांची कीर्ति चोहोंकडे पसरली. वरील पुस्तकाशिवाय त्यांनीं 'भाषाशुद्धि विवेक (१९३८)' व नकुलालंकार व पद्य प्रकाश [शालेय आवृत्ति] (१९३९) हीं पुस्तकें लिहिलीं.

रा. पटवर्धन यांची काव्य निर्मिती, मराठी भाषेचा अभिमान व तिच्यासाठीं ते करीत असलेल्या चळवळी ध्यानांत घेऊन, लोकांनीं बडोद्यास भरलेल्या (१९३४) साहित्य संमेलनांतर्गत काव्यसंमेलनाचें अध्यक्षपद व नाशिकच्या कविसंमेलनाचें अध्यक्षपद समर्पण करून, त्यांचा गौरव केला. १९३६ त भरलेल्या जळगांवच्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. यांची प्रसिद्धि कवि, टीकाकार, प्रबंधकार, कोशकार या नात्यानें महाराष्ट्रभर झाली आहे.

पटवर्धन, विनायक नारायण (स. १८९८–):– प्रिन्सिपॉल, गांधर्व महाविद्यालय पुणें. यांचा मिरज येथें १८९८सालीं जन्म झाला. गाण्याकडे कल असल्यामुळें यांनीं श्रीमंत मिरजकर सरकारांची १६ रु. ची शिष्यवृत्ती मिळवून मुंबईस कै. पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांनीं स्थापन केलेल्या 'गांधर्व महाविद्यालयांत' नांव दाखल केलें. यावेळीं ते नऊ वर्षांचे होते. १९१४ त हे 'संगीत–प्रवीण' या पदवीच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. यापुढें पटवर्धनांनीं १९१४ ते १९१७ पर्यंतच मिरजेस राहून संगीताचा व्यासंग वाढविला. लाहोर, नागपूर, नाशिक व मुंबई येथील (कै. वि. दि. पलुसकर यांच्या गांधर्व महाविद्यालयाच्या) शाखांतून त्यांनीं १९१७ ते १९२२ पर्यंत शिक्षकाचें काम केलें. यानंतर १९२२ ते १९३२ पर्यंत हे गंधर्व नाटक मंडळींत प्रमुख भूमिका करीत. कै. पं. विष्णु दिगंबर पलुसकर याचें संगीत-प्रचाराचें कार्य पुढें चालविण्यासाठीं पुण्यास गांधर्व महाविद्यालयाची स्थापना श्री. पटवर्धनबुवानीं मे १९३२ मध्यें केली. सध्यां तेथें हिंदुस्थानांतील सर्व भागांतून गायन शिकण्यास विद्यार्थी येतात. शिक्षण क्रमास उपयोगीं पडणारीं सर्व पुस्तकें त्यांनीं स्वतःच तयार केलीं आहेत. हे महाराष्ट्रांत व उत्तर हिंदुस्थानांत व्याख्यान व गायन अशा दोन्ही साधनांनीं प्रचार करतात. संगीताचें मराठीकरण करणें शक्य आहे असें त्यांचें मत आहे व त्याप्रीत्यर्थ त्यांचे एकसारखे प्रयत्न चालू आहेत.



विनायकबुवा पटवर्धन

पटेल, वल्लभभाई (१८७३–३१–१०):–बार्डोलीचा लढा यशस्वी करून दाखविणारे एक गुजराथी भारतीय पुढारी. यांचा जन्म नडियादजवळील 'करमसद' गांवीं झाला. नडियादच्या हायस्कूलमधून मॅट्रिकच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. नंतर डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा दिल्यावर ते गोध्रा येथें वकिली करूं लागले. बॅरिस्टर होण्यासाठीं परदेशाला जाण्याची यांनीं तयारी केली; पण त्यांचेऐवजीं त्यांचे वडील बंधू विठ्ठलभाई गेल्यानें यांचें जाणें राहिलें. विठ्ठलभाई परदेशाहून आल्यावर सहा वर्षांनीं हे इंग्लंडला गेले. तेथें ते पहिल्या वर्गांत पहिले आले. नंतर हिंदुस्थानला परत येऊन त्यांनीं आपली बॅरिस्टरी सुरू केली. १९१६ पासून म. गांधींचे सहकारी या नात्यानें त्यांच्या सार्वजनिक जीवनाला प्रारंभ झाला. असहकारितेच्या कालांत वल्लभभाईनीं वकिलीचा त्याग करून खेडा जिल्ह्यांतील सत्याग्रहांत म. गांधीच्याबरोबर भाग घेतला. यानंतर नागपूरचें 'राष्ट्रीय निशाण प्रकरण' उद्भवलें. बार्डोलीची करबंदीची चळवळ करून त्यांनीं आपलें अलोट धैर्य प्रगट केलें. या चळवळीनें त्यांची प्रसिद्धी चोहोंकडे झाली. असहकारितेची चळवळ बंद झाल्यावर व म. गांधींच्या तुरुंगवासानंतर अहमदाबाद म्युनिसिपालिटीचें अध्यक्षस्थान १९२७–२८ मध्यें यांना मिळालें. तसेंच १९३१ च्या, कराचीला भरलेल्या, राष्ट्रीय सभेची माळ यांच्या गळयांत पडली. कायदेभंगाच्या चळवळींत यांना दोन वेळ कारावास भोगावा लागला. वीर नरीमन, डॉ. खरे व बार्डोलीची करबंदी या प्रकरणांनें त्यांची कर्तव्यतत्परता व निधडी वृत्ती चांगलीच प्रगट झाली. कॉंग्रेसच्या वर्किंग कमेटीचे ते अध्यक्षहि होते. हे कट्टे नाफेरवादी असून म. गांधीचे उजवे हात

आहेत. सध्यां कॉंग्रेसमध्यें ज्यांच्या अनुमतीनें सूत्रें हालविलीं जातात त्यांपैकीं हे एक होत.

पटेल, विठ्ठलभाई (१८७१–१९३७):–एक विख्यात हिंदी पुढारी. यांचा जन्म गुजराथेंतील खेडा जिल्ह्यांतील करमसद गांवीं ता. १८ फेब्रुवारी १८७१ रोजीं झाला. यांच्या वडिलांचें नांव जव्हेरभाई. त्यांचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण करमसद व नडियाद येथें झालें. १९०४ सालीं ते बॅरिस्टर होण्यासाठीं इंग्लंडला गेले व १९०८ सालीं बॅरिस्टर होऊन परतले. परत आल्यावर लवकरच त्यांची पत्नि वारली. तेव्हांपासून त्यांनीं देशसेवेला स्वतःस वाहून घेतलें व अहमदाबादेस वकिलीस प्रारंभ केला.

१९२२ सालीं ते मुंबई म्युनिसिपालिटीचे सभासद म्हणून निवडून आले व लौकरच त्यांना मेयॉर म्हणून निवडण्यांत आलें (१९२४–२५). याच वेळीं ते मुंबई कायदे मंडळाचे सभासद म्हणून निवडून आले. नंतर स्वराज्यपक्षानें निवडणुकी लढवून मध्यवर्ती असेंब्लींत (दिल्ली) अनेक जागा मिळवल्या. विठ्ठलभाई पटेल हेहि या पक्षातर्फे असेंब्लींत निवडून आले व २४ ऑगस्ट १९२५ रोजीं असेंब्लीचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून निवडून आले. यानंतर ते पुन्हां १९२७ (जानेवारी) मध्यें असेंब्लीचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. १९३० च्या लाहोरच्या कॉंग्रेसच्या ठरावाप्रमाणें त्यांनीं आपल्या जागेचा राजिनामा दिला. लौकरच त्यांना कायदेभंगाबाबत शिक्षा झाली. पण त्यांची प्रकृती बिघडल्यामुळें त्यांना शिक्षेची मुदत भरण्यापूर्वीच सोडण्यांत आलें. पुढें विठ्ठलभाई पटेल व्हिएन्नास औषधोपचारार्थ गेले. नंतर राउंडटेबल कॉन्फरन्सचे वेळीं इंग्लंडमध्यें राहून त्यांनीं राष्ट्रीय पुढाऱ्यांना मदत केली. पण गांधीजींबरोबर ते हिंदुस्थानास परत येतांच त्यांना वट हुकुमाखालीं पकडण्यांत आलें; पण पुन्हां प्रकृतीसाठीं लौकरच सोडण्यांत आलें. कांहीं दिवस व्हिएन्नास राहून ते अमेरिकेस प्रचारार्थ गेले. नंतर डी व्हॅलेराच्या आमंत्रणावरून ते डब्लिनलाहि त्याची भेट घेण्यासाठीं गेले होते, पुढें प्रकृतीच्या निमित्तानें ते व्हिएन्नास व नंतर जिनेव्हास गेले व जिनेव्हानजीकच २२ आक्टोबर १९३७ रोजीं ते मरण पावले.

१९१८ च्या मुंबईच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे ते स्वागताध्यक्ष होते. एव्हांपासूनच त्यांचा राजकारणांत प्रामुख्यानें प्रवेश झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. पटेल वास्तविक लोकमान्य टिळकांच्या पंथाचे, पण पुढें त्यांनीं गांधींचा मार्ग स्वीकारला. मुंबईचे मेयॉर असतांना लॉर्ड रीडिंग (त्यावेळचे व्हाइसरॉय) यांना मानपत्र देण्याचा ठराव पास झाला असतांहि मेयॉर म्हणून मानपत्र देण्याचें त्यांनीं नाकारलें. प्रत्येक व्हाइसरॉयला मानपत्र देणें म्हणजे सार्वजनिक पैशाचा अपव्यय होय असें त्यांचें या बाबतींत म्हणणें होतें.

'पब्लिक सेफ्टी बिल' असेंब्लींत न येऊं देण्यासंबंधीं जी त्यांनीं बाणेदार वृत्ति दाखविली त्यामुळें अध्यक्षाच्या महत्त्वाच्या हक्काचा निर्णय लागला. होममेंबर व खुद्द व्हाइसरॉय यांच्याकडून झालेल्या टीकेलाहि त्यांनीं धाब्यावर बसविलें. अशा रीतीनें एक बाणेदार राष्ट्रीय पुढारी म्हणून पटेलांची कीर्ति आहे.

पडवळ (कोशिंबीर):–**साहित्य**–पडवळ, हरभऱ्याची अगर मुगाची डाळ, मोहरी, मीठ, तिखट व खोबरें. **कृति**–पडवळाचे बारीक तुकडे करून फडक्यांत घालून पाट्याखालीं दडपून ठेवावेत. नंतर त्याच्यांतलें पाणी निथळल्यावर त्याच्यांत डाळ घालून ठेवावी. कांहीं वेळानें तिखट, मीठ घालून थोडीशी मोहरीची पूड घालावी अगर पाण्यांत वाटून मोहरी लावावी व घट्ट दह्यांत कालवून नंतर तुपाची फोडणी द्यावी.

(भाजी):–**साहित्य**–पडवळ, तिखट, मीठ, गूळ, खोबरें, कोथिंबीर, गोडें तेल व फोडणीचें सामान. **कृति**–प्रथम कोंवळें पडवळ घेऊन तें धुऊन त्याच्या वाटोळ्या चकत्या चिराव्या. नंतर पातेल्यांत तेलाची फोडणी करून त्यांत त्या टाकाव्या व फोडी हलवून त्याच्यावर पाण्याचें झांकण ठेवावें. शिजल्यावर तिखट, मीठ वगैरे घालून मंदाग्नीवर शिजवून उतरून ठेवावी.

(भरली भाजी):–**साहित्य**–पडवळ, हरभऱ्याच्या डाळीचें पीठ, मीठ, तिखट, ओलें खोबरें, कोथिंबीर, तेल व फोडणीचें सामान. **कृति**–पडवळ धुऊन त्याचे बोटाएवढे तुकडे करावेत व त्याच्या चार फाका कराव्या. नंतर हरभऱ्याच्या डाळीचें पीठ घेऊन त्याच्यांत वरील सर्व मसाला घालून किंचित् गोडें कच्चें तेल घालावें व तें एकत्र कालवावें. पिठांत पाणी मुळींच घालूं नये व फार ओलसर करूं नये. नंतर तें पडवळाच्या फोडींत घट्ट भरावें. पातेल्यांत जास्त तेलाची हिंग, मोहऱ्या, हळद घालून फोडणी करून त्याच्यांत ह्या फोडी टाकाव्या. ही भाजी मंदाग्नीवर शिजवावी; ह्याच्या तोंडीं पाण्याचें झांकण ठेवावें; चांगली शिजल्यावर कढत कढत वाढावी.

पडसें: बहुधा पडसें व थंडी यांचे एकत्र संबंधामुळें यास थंडीपडसें असेंहि म्हणतात. थंडगार हवा हेंच प्रायः याचें प्रारंभींचें कारण होय. तथापि पडसें उत्पन्न करणारे विशिष्ट सूक्ष्मजंतु असतात ते नाकांत शिरल्यानें पडसें उद्भवतें. कोंदट हवा, पडसें आलेल्या मनुष्याशीं संसर्ग, त्याचें शिंकणें, खोकणें, बोलणें इत्यादि क्रियांनीं त्याच्या नाकातोंडांतून हे जंतू हवेंत पसरणें अगर दुसऱ्याच्या नाकातोंडांत शिरणें इत्यादि प्रकारांनीं पडसें प्रसार पावतें. कित्येक मोठ्या आजारांत पूर्वचिन्ह म्हणून पडसें येतें. याकरितां क्षुल्लक म्हणून पडशाची हेळसांड करूं नये. पडशाचे जंतु घसा, मेणक्या, श्वासनलिका, फुप्फुसें या भागांत शिरून त्याचे दाह विकार उत्पन्न करतात. वेळींच योग्य उपाय केल्यास बहुधा हे टाळतां येतील.

लक्षणें-थंडी वाजणें, शिंका येणें, अंग मोडून येणें, कपाळ दुखणें, ओठ, नाकपुड्या या अगदीं कोरड्या कोरड्या व बाळल्यासारख्या वाटणें हीं पूर्वलक्षणें कांहीं काल दृष्टोत्पत्तीस येऊन नंतर नाकांतून पाण्यासारखा स्राव वाहण्यास आरंभ होतो. हाच स्राव नंतर पांढुरका किंवा पिवळा शेंबूड या रूपानें येऊं लागतो. घसा वाळतो व डोळ्यांतूनहि पाणी येतें. ज्वरांश वाटूं लागणें, भूक मंद होणें, जिभेवर राप येणें, तृषा वाढणें व नाडीची गति जलद होणें हीं लक्षणेंहि आढळतात. पुष्कळदां, नाकपुड्याच्या द्वारांभोंवती व ओठावर लाल पुरळ (Herpes) उठतो या लक्षणानंतर पडसें थांबतें, किंवा वाढावयाचें असल्यास न्यूमोनिया (फुप्फुसदाह), ब्रॉंकायुटिस् (श्वासनलिकादाह) ह्यांत त्याचें पर्यवसान होतें.


उपाय-पाय गरम पाण्यांत बराच वेळ धरावेत. मोठ्या मनुष्यानें १० ग्रेन डोव्हर्स पॉवडर हें औषध व कपभर दूध किंवा कांजी घेऊन झोंपावें. डोव्हर्स पॉवडरऐवजीं पुढील औषधहि तितकें उपयोगीं पडेल. स्पिरिट् इथरीस नायट्रोसी २० थेंब, लायकर आमोनाय् अॅसेटॅटिस ६० थेंब, कापूरपाणी (अॅक्वा कॅंफोरी) १ औंस हें औषध निजण्यापूर्वीं घ्यावें. स्पिरिट् कॅम्फर १० ते १५ थेंब साखरेंतून दर तीन तासांनीं कांहीं वेळां घेतल्यानेंहि आराम वाटतो. पडशानें अशक्तपणा येतो म्हणून आहार चांगला असावा.


पडसें येऊं नये या दृष्टीनें मोकळ्या हवेंत भरपूर व्यायाम घेणें, सशक्त माणसानें शक्य तर थंड पाण्यानें स्नान करणें, कोंदट हवेंत न राहाणें व ज्यास पडसें आलें असेल त्यांपासून दूर राहाणें या गोष्टी अवश्य कराव्यात. जरूर तेथें चांगला डॉक्टरी सल्ला घेण्यास हयगय करूं नये. तुळशीचा काढा घ्यावा.


पणजी:-पोर्तुगीज हिंदुस्थानची राजधानी. हिंदुस्थानांत पोर्तुगीज सरकारचीं दीव, दमण व गोवें हीं तीन ठिकाणें आहेत. त्यांपैकीं सर्वांत गोवा भाग प्रमुख होय. हें शहर पश्चिम किनाऱ्यावर मांडवी नदीच्या मुखाजवळ वसलेलें आहे. हें एक उत्तम बंदर असून येथूनच गोवा प्रांताशीं व्यापार चालतो. गांव टुमदार व हवेशीर तर आहेच; पण भोंवतालचें अप्रतिम सौंदर्य पाहून अतिशय आनंद वाटतो. या शहराचा आकार वर्तुळाकृति आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. मध्यभागीं एक टेकडी असून तिच्या सभोंवतीं व वर लोकांनीं वस्ती केलेली आहे. टेकडीच्या उत्तरेकडील व मांडवी नदीच्या दक्षिणेकडील भागाची वसाहत आट्यापाट्याच्या पटांगणासारखी दिसते. गांवची लोकसंख्या १२-१३ हजारपर्यंत असून तींत हिंदू व ख्रिश्चन वर्ग हे प्रमुख होत. युरोपियन व इतर वर्ग यांची येथें वस्ती आहे, पण ती फारच थोडी. येथील जमीन तांबडी. लिसेव, प्रसूतिगृह, बालिकाश्रम, आल्बुकेर्क वास्को दगामा, हायकोर्ट, लायब्ररी, जुन्या गोव्यांतील चर्चें, मार्केट, लिसेवजवळचें चर्च हीं ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. गांवांतले रस्ते रुंद असून प्रमुख रस्ता वृक्षाच्छादित व डांबराचा केलेला आहे. येथील लोकांची रहदारी मोटारी व बोटी किंवा वाफारे, तऱ्या यांनीं दिवसभर चालते. गांवाजवळचा विस्तीर्ण व अथांग जलप्रवाह, त्या पलीकडील विपुल नैसर्गिक सौंदर्य, साध्या पण भव्य इमारती व समुद्रावरचा गार वारा आल्यानें सदा लाभणारें आनंदी वातावरण तसेंच स्वच्छता यामुळें हें शहर अनेकवार पाहिलें तरी तें वरचेवर पाहावेंसें वाटतें.

पत्ते:-आधुनिक काळांत पत्ते माहित नाहींत अशा व्यक्ति सांपडणें क्वचितच. पत्ते जाड कागद अगर पेस्टबोर्ड यांचे बनवितात. पत्त्याचा जोड बावन्न पानांचा असतो. त्यांत काळे रंग दोन-किलावर (Clubs) व इस्पिक (Spades) व तांबडे दोन-चौकट (Diamonds) व बदाम (Hearts); प्रत्येक रंगाचीं पानें तेरा असून, राजा, (King), राणी (Queen), गुलाम (Knave or Jack)


गोमंतक

















१. मांगरीश (मंगेश) मंदीर, मंगेशी. २. नागेश. ३. रामनाथ, कवळें. ४. मांडवीच्या मुखाशीं बेती गांवाजवळ असलेलें एक दीपगृह. ५. दूधसागर धबधबा. ६. या फोटोवरून गोमंतकाच्या वनराईची कल्पना येईल. ७. आग्वादचा किल्ला, पणजी. पणजी ते मडगांव रस्त्यावरच १-२-३ हीं ठिकाणें आहेत. दूधसागर धबधबा रेल्वेनें जातांना वाटेंत लागतो.

फोटो—ग. रं. भिडे

दश्शी, नव्वी, अठ्ठी, सत्ती, छक्की, पंची, चौरी, तिर्री, दुर्री व एक्का (Ace) असा त्यांचा क्रम असतो. पुष्कळ खेळांत एक्क्याचें पान सर्वांत जाडें समजण्यांत येतें; त्यांचे खालोखाल राजा, राणी व गुलाम यांना मान असतो. Poker सारख्या खेळांत आणखी एक पान घेतात; त्यास Joker म्हणतात.

या खेळाची उत्पत्ति कोठें झाली याबद्दल मतभेद आहेत; तथापि प्राचीन इजिप्शीयन, ज्यू वगैरे लोकांना व पौर्वात्य देशांतील अनेक लोकांना हा खेळ माहित असल्याचे अनेक ऐतिहासिक पुरावे दाखवितां येतात. या खेळाचा जन्म आशियांतच झाला असून चौदाव्या शतकांत त्याचा प्रवेश युरोपांत झाला असावा असें मानण्यास भरपूर ऐतिहासिक पुरावा आहे. या खेळाचा प्रसार करण्याचें श्रेय धर्मयुद्धांत (Crusades) भाग घेतलेल्या अनेक धर्मवीरांना व मूर लोकांना दिलें पाहिजे.

पत्त्यांतील राजा, राणी व गुलाम या रंगीत चित्रांवर आधारलेलीं अशीं अनेक व्यंगचित्रें राजकीय सामाजिक वगैरे अनेक क्षेत्रांतून कार्य करणाऱ्या मोठमोठ्या व्यक्तींची चेष्टा करण्यासाठीं हरघडीं काढण्यांत येतात. विशेषतः राजकीय बाबतींतच, अशा चित्रांचा संग्रह एवढा मोठा आहे कीं व्यंगचित्रांचा एक मोठा ग्रन्थ तयार करत येईल.

पत्त्यांचे अनेक डाव आहेत. त्यांपैकीं Bridge, Auction-Bridge, Casino, Cribbage, Draw-Poker, Euchre, Solitaire, Whist हे डाव विशेष महत्त्वाचे मानतात.

पत्रलेखनः—पत्र या मराठींतील शब्दासाठीं इंग्रजी भाषेंत दोन समानार्थी शब्द आहेत. एक लेटर (letter) व दुसरा एपिस्टल् (epistle). पण लेटर व एपिस्टल् या दोन शब्दांच्या अर्थांत थोडा फरक आहे. दोन्हीं पत्रें खरींच. पण 'लेटर' या शब्दानें व्यक्तिगत व खासगी पत्र असा अर्थ व्यक्त होतो. एपिस्टलमध्यें एक प्रकारचा मोकळेपणा आणि एक प्रकारें प्रकट भाषणच असतें. प्रत्यक्ष संभाषण अशक्य म्हणून आपण लेटर लिहितों; पण एपिस्टलमध्यें एक प्रकारचा वाचकवर्ग दृष्टिसमोर असतो व अशा पत्राला अमरत्व लाभावें हा हेतूहि पत्रलेखकाच्या दृष्टिसमोर असतो. यापैकीं दुसऱ्या प्रकारच्या पत्रप्रकाराप्रमाणेंच अगदीं अलीकडे म्हणजे वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणारीं पत्रें—अनावृत्त पत्रें (open letters) हीं होत. अनावृत्त पत्रें आपण वारंवार वृत्तपत्रांतून वाचतों. क्वचित 'एपिस्टल' या पत्रप्रकाराचें स्वरूप आपल्या दृष्टोत्पतीस येतें. श्री. न. चिं. केळकर यांचीं अनेक लोकप्रिय प्रवासवर्णनें पत्ररूपानेंच प्रसिद्ध झालेलीं असून त्यांना एक प्रकारचें वाङ्मयीन महत्त्व आहे आणि म्हणूनच पत्रें लिहितांना जरी तीं खाजगी व्यक्तींना उद्देशून लिहिलीं असलीं तरी त्यांना प्रकट स्वरूप प्राप्त झालें आहे. हीं पत्रें 'एपिस्टल्स' याच पत्रप्रकारांत घालावीं लागतील. जवाहरलाल नेहरूनीं आपल्या मुलीस लिहिलेलीं पत्रेंहि याच प्रकारांत समाविष्ट केलीं पाहिजेत.

आतां प्रत्यक्ष पत्रलेखनाकडे वळूं. व्यावहारिक व्यावसायिक व सार्वजनिक पत्रलेखन असे पत्रलेखनाचे तीन भाग पाडतां येतील.या सर्व प्रकारच्या पत्रलेखनाचें महत्त्व केवढें आहे हें पुढील इंग्लिश उताऱ्यावरून लक्षांत येईल. " A person and his business house are judged by what he writes–a letter may get–or may cost you the job you have–may open the doors of society or slam them shut in your face. A well' written letter will make money, collect debts, make friends, but a poor one may cost you, everything you own."

कुठल्याहि पत्राला कांहींना कांहीं तरी हेतु असतोच. पत्रलेखकाला प्रत्यक्ष दुसऱ्याशीं संभाषण करतां येत नाहीं म्हणून तर तो पत्र लिहितो. म्हणजे प्रत्यक्ष संभाषणाची जागाच पत्रानें घेतलेली असते अथार्त् संभाषणाची लांबी रुंदी, संभाषणांतील खेळकरपणा, विनोद, भारदस्तपणा इत्यादि ज्याप्रमाणें संभाषण होणाऱ्या दोन व्यक्तींमधील कमी अधिक परिचयावर अवलंबून असतात त्याचप्रमाणें पत्रापत्रांतहि निरनिराळे भेद व विविधता राहील हें उघड आहे. तेव्हां पत्र लिहितांना पहिली आणि अत्यंत महत्त्वाची गोष्ट लक्षांत घ्यावयाची ती ही कीं, ज्या व्यक्तीस पत्र लिहावयाचें त्या व्यक्तीचा व आपला परिचय कितपत आहे? आणि मुळींच परिचय नसलेल्या व्यक्तींनासुद्धां पत्रें लिहावयाचा प्रसंग प्रत्येकावर केव्हां ना केव्हां तरी येतोच. शिवाय खासगी गोष्टी आणि व्यावसायिक गोष्टी यांत फरक असतोच कीं नाहीं? म्हणजे पत्रांत दोन जाती पडल्याच. जाती हा शब्द जरा चमत्कारिक वाटला तर भेद किंवा प्रकार असा दुसरा कोणताहि शब्द

वापरण्यास हरकत नाहीं. पण हे दोन भेद वा प्रकार मात्र पूर्णपणें ओळखले पाहिजेत. कारण खासगी पत्रव्यवहारांत क्वचित् पाल्हाळिकपणा किंवा गैरमुद्देशीर मजकूर खपून जाईल. पण व्यवसायात्मक पत्रांत मात्र हे दोन्ही दोष दिसले कीं मूर्खपणा पदरीं यायचा हें अगदीं निश्चित. कित्येक वेळीं सामान्य व्यवहार आणि व्यवसाय यांच्या मर्यादा ओळखूं न आल्यानें जरूर ते मुद्दे पत्र लिहितांना सुचतच नाहींत. मग पत्रांत ते येणार तरी कुठून? साधी चिठ्ठी लिहितांनासुद्धां या गोष्टी जरूर पाहिल्या पाहिजेत. कित्येक वेळीं एकाच पत्राचा मजकूर दोन व्यक्तींना व्यवहारात्मक व व्यवसायात्मक असा असूं शकतो. एखाद्या व्यक्तीच्या आजाराबद्दल डॉक्टरला पत्र लिहिलें असेल तर पत्रलेखकाला जरी तें सामान्य व्यवहारात्मक वाटलें तरी डॉक्टर मात्र त्या पत्राकडे व्यवसाय याच दृष्टीनें पाहील. अर्थात् अशा पत्रांतून डॉक्टरला जरूर ती माहिती त्या पत्रांतून मिळेल अशा प्रकारची काळजी घेतली गेली पाहिजे.

व्यावसायिक पत्रांचा उद्देश केवळ व्यापार हाच असल्यानें व्यापारी पत्रांचेहि कांहीं ठराविक प्रकार ठरून गेले आहेत. अनावृत्त पत्रें हीं कोणीं कोणालाहि व कोणत्याहि विषयावर लिहूं शकतो. अशा प्रकारच्या पत्रांना गोडशी सुरवात, मुद्देसूद मांडणी व विचारसरणी आणि शेवटीं सही याशिवाय कांहीं तंत्रें नाहींत. एपिस्टल्स् या पत्रप्रकारांचेंहि कांहीं विशिष्ट असें तंत्र नाहीं. प्रतिभावान् लेखक या बाबतींत स्वतंत्र मार्ग आखतात. मात्र व्यावहारिक व व्यावसायिक पत्रांच्या बाबतींत कांहीं सर्वसामान्य व सर्वमान्य अशीं तंत्रें आहेत. तीं तंत्रे पाळणें हा शिष्टाचार होय.

पत्राचे पुढें दिल्याप्रमाणें ७ प्रमुख भाग आहेत:— १ मथळा (Heading), २ पत्रांतील पत्ता (अर्थात् स्वतःचा) ३ सुरवात ४ पत्राचा मजकूर ५ समारोप ६ सही ७ पत्रावरील पत्ता. **मथळा**—सर्वच खाजगी पत्रांवर (कागद) मथळा असतो असें नाहीं. पण लिहावयाचा किंवा छापावयाचाच झाला तर वरच्या डाव्या कोपऱ्यांत स्वतःचें नांव व उजव्या कोपऱ्यांत राहण्याचें ठिकाण देण्याची पद्धत आहे. व्यावसायिक पत्रांत वर मध्यंतरीं कंपनीचे, दुकानाचें नांव (मोठ्या अक्षरांत), याखालीं उजव्या कोपऱ्यांत कचेरीचा पत्ता, जरूर असल्यास डाव्या बाजूस अधिकारीवर्गाचीं नांवें, वर डाव्या किंवा उजव्या कोपऱ्यांत टेलिफोन नंबर व तारेच्या पत्त्याचा उल्लेख याप्रमाणें मांडणी असते. दिनांक रेषा (Date line) छापण्याची पद्धत नाहीं. **पत्रांतील पत्ता**—जरूर असल्याशिवाय पूर्ण पत्ता खाजगी पत्रांतून देण्याची पद्धत नाहीं. पण व्यावसायिक पत्रव्यवहारांत याची नेहमींच आवश्यकता असते. **सुरवात**—खाजगी पत्रांतून पत्राला सुरवात करतांना नमस्कार (Salutation) लिहिण्याची निरनिराळी पद्धत आहे. कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार वगैरे जुने प्रकार आतां मागें पडले आहेत. कारण खरोखरी त्यांत कांहीं अर्थ नसतो नुसते 'सप्रेम नमस्कार' (बरोबरीच्यास) व आदर व्यक्त करावयाचा 'सविनय नमस्कार' एवढें लिहिणेंच चांगलें. 'विनंति विशेष' वगैरे लिहिण्यानें कांहीं विशेष साधेल असें नाहीं. याऐवजीं 'स. न. वि. वि.' एवढेंच लिहून 'सप्रेम नमस्कार' किंवा 'सविनय नमस्कार' हे दोन्हीहि अर्थ साधण्याची पद्धत सर्वत्र दिसते. पण प्रथम सुचविलेले प्रघातच चांगले. आपल्यापेक्षां लहान व्यक्तीस (मानानें वा वयानें) पत्र लिहितांना 'अनेक आशीर्वाद' अशी सुरवात करण्याची पद्धति खरोखरी सुंदर आहे. अधिक जवळच्या माणसांना उद्देशून 'प्रिय' हें विशेषण लावलें जातें व तें योग्यच आहे. पण 'प्रिय रा. भाऊ' अथवा 'प्रिय कु. शांता' यापैकीं रा. व कु. अगदीं अस्थानीं म्हणून उपयोजूं नयेत. हा मायना लिहून झाल्यावर पत्रांतील मजकुरास सुरवात होते. मात्र मायन्याच्या पुढें लगेच पत्राचा मजकूर लिहूं नये. स्वतंत्र परिच्छेद पाडून पत्राचा मजकूर लिहावा. **पत्राचा मजकूर**—जी गोष्ट वा हकीकत पत्रांत लिहावयाची असेल ती मुद्देसूद व गोड भाषेंत लिहावी. पत्रांत किती परिच्छेदक असावेत याबद्दल कांहीं नियम नाहींत. कारण खासगी पत्र म्हणजे कांहीं व्यापारी पत्र नव्हे कीं एक दोन परिच्छेदकांतच पत्र पुरें करण्याचा सर्वसामान्य नियम मानला जावा. खासगी पत्रांत अनेक विषय निघूं शकतील आणि कदाचित् त्यांतील विषयांचा परस्पराशीं कांहीं संबंधहि नसेल. अर्थात् सर्वसाधारण लेखनाचे जे नियम तेच याबाबतींत पाळावे. **समारोप**—कळावें ही विनंति किंवा 'विज्ञापना' असें लिहून किंवा 'सेवेसी श्रुत होय' असें लिहून पत्र पुरें करण्याचा पूर्वीचा प्रघात आतां मागें पडत असून

जरूर त्या ठिकाणींच त्यांचा उपयोग केला जातो. कारण पत्र लिहिल्यानंतर हडसून खडसून पुन्हां 'कळावें' म्हणून स्मरण देण्यांत फारसें स्वारस्य नाहीं. हें जरी खरें तरी ज्याला पत्र लिहावयाचें तो व ज्यानें पत्र लिहिलें तो यांच्यांतील नातें, प्रेमसंबंध वा परिचय यावर या गोष्टी अवलंबून असतात. पण पुष्कळ वेळां 'ही विनंती' असें लिहायची कांहीं गरजच राहात नाहीं. **सही**—व्यावसायिक पत्रव्यवहारांत एक ठरीव ठशाचीच सही नेहमीं करणें आवश्यक असतें. खाजगी व्यवहारांत सही करतांना आपली पूर्ण सही करण्याची कांहीं गरज तसते. आपण विशेषतः ज्या नांवानें ओळखले जातों त्याच नांवानें आपला उल्लेख करणें चांगलें. सौभाग्यवती स्त्रियांनीं किंवा कुमारिकांनींहि आपल्या नांवामागें सही करतांना 'सौ.' अथवा 'कु.' लिहिण्याची आवश्यकता नाहीं. पण परिचय नसलेल्या व्यक्तीशीं पत्रव्यवहार करतांना सही करून त्या खालीं कंसांत आपलें पूर्ण नांव लिहावें. उदा.

निशा गोडबोले	सरोजिनि सुखात्मे
(कु. निशा गोविंद गोडबोले)	(सौ. सरोजिनी श्रीकांत सुखात्मे)

सही करण्यापूर्वी 'आपला,' 'तुझा' 'आपला स्नेहांकित,' 'आपला कृपाकांक्षी,' 'आपला चाहता' याप्रमाणें स्वतःच्या संबंधाचा उल्लेख करून मग सही करतात. आतां हा उल्लेख कोणत्या शब्दांत करावयाचा हेंहि परस्परांच्या परिचयावर व संबंधावरच अवलंबून राहील. **पत्रावरील पत्ता**—कार्डाच्या वा पाकिटाच्या उजव्या बाजूस खालच्या अर्धांत जरूर तेवढाच द्यावा. आपलें स्वतःचें नांव व पत्ता डाव्या बाजूस वरच्या कोपऱ्यांत देण्याची पद्धती विशेष रूढ आहे.

पोस्टाचीं कार्डे वापरण्याऐवजीं त्याच आकाराचीं कोरीं कार्डे घेऊन पोस्टकार्डाएवढेंच त्यास तिकिट लावलें तरी चालतें. पाकिटेंहि स्वतंत्र वापरलीं तरी चालतात. आपल्यास जरूर वाटल्यास स्वतःचें नांव व पत्ता त्यांवर आपण छापून घ्यावा. पत्राला कागद कोणता वापरावा व पाकीटाचा कागद कसा असावा हा ज्याच्या त्याच्या आवडीचा प्रश्न होय.

पदार्थविज्ञान (Physics):—Fiziks या ग्रीक शब्दावरून इंग्रजींतील फिजिक्स हा शब्द बनलेला आहे. वर दिलेल्या ग्रीक शब्दाचा अर्थ निसर्ग असा आहे. या सृष्टींतील सर्व जड पदार्थांचा अभ्यास पदार्थविज्ञानशास्त्र करतें. ज्या पदार्थांचें मूळ स्वरूप अजीबात बदलतें म्हणजे त्यांत रासायनिक बदल (chemical change) होतो अशा पदार्थांचा अभ्यास अर्थात् रसायनशास्त्र करतें. उदा. पाणी. पाणी उकळून त्याची वाफ होते व वाफेचें पुन्हां पाणी होतें ही गोष्ट सर्वांना माहीत आहे यावरून कोणी असें म्हणेल कीं पाण्यासंबंधीं विशेष चिकित्सा रसायनशास्त्र करेल; पण वस्तुस्थिति अशी आहे कीं पाण्याच्या मूळ तत्त्वांत कांहींच फरक झालेला नसल्यामुळें हा प्रश्न पदार्थविज्ञानशास्त्रच विचारांत घेतें. पण पाण्यांतील मूळ तत्त्वें स्वतंत्र काढलीं तर त्यामध्यें मूळ पाण्यापेक्षां कितीतरी फरक पडतो. हा फरक झाला म्हणजे रासायनिक क्रिया झाली आणि म्हणून या ठिकाणीं हा प्रश्न रसायनशास्त्र विचारांत घेतें.

पदार्थविज्ञान शास्त्राचे पुढीलप्रमाणें भाग पडतात:— १ यंत्रशास्त्र (Mechanics or dynamics), २ नाद (Sound), ३ प्रकाश (Light), ४ विद्युत् (Electricity), ५ लोहचुंबकधर्म (Magnetism), ६ उष्णता (Heat), या प्रत्येक भागांत कोणत्या गोष्टींचा समावेश होतो तें पुढें दिलें आहे.

यंत्रशास्त्र—१ शक्ति (गतिजन्य व बीजरूप (Kinetic & Potential) गुरुत्वाकर्षण-(अ) पडणाऱ्या वस्तू (falling bodies), (ब) गुरुत्वाकर्षणाचा मध्यबिंदु (Centre of gravity); (क) विशिष्ट गुरुत्व (Specific gravity), ३ लंबक (Pendulum), ४ यांत्रिक शक्ति (Machnical power)—(अ) उच्चालक, (lever), (ब) चक्र आणि कणा (wheel and axle), (क) उतार (inclined plane), (ड) स्क्रू (Screw); (ब) कप्पी (Pulley), (म) पाचर (Wedge) **नाद**—१ प्रक्षेपण (Transmission), २ वेग (velocity), ३ ध्वनिलहरीचा वेग (Wave motion), ४ आघात (beat), ५ ध्वनिलहरींची अंतिम मर्यादा (Pitch), ६ गुण (quality), **प्रकाश**—१ प्रकाशाचीं साधनें, (अ) सूर्य; (ब) रासायनिक क्रिया (chemical action); (क) यांत्रिक क्रिया (Mechanical action) २ परावर्तन(Reflection), वक्रीभवन (Refraction), ४ विकिरण (Diffusion), ५ प्रवाहप्रतिबंधन (पोलरायझेजन), प्रकाशभ्रंश (Abberation), ७ सूर्यकिरणांचा रसायनकार्योत्पादक धर्म (Activism), ८ वर्णपट (spectrum

analysis), ९ इंद्रधनुष्य (Rainbow), १० रंग (.Colour), ११ आरसा, १२ मृगजळ १३ आरोरा बोरिआलिस (Aurora borealis), १४ कॅथोड किरण, १५ एक्स रे, १६ विद्युल्लता, १७ 'एन्' किरण इत्यादि. **वीज अथवा विद्युत्**–वीज म्हणज काय व ती कशी तयार करितात? २ विजेचे प्रकार ३ विजेचा प्रवाह कसा चालतो? ४ घर्षण व विद्युत् (frictional electricity), विद्युत् प्रकाश, उष्णता व औषधी उपयोग, ६ विद्युत्विलेपन (electro-plating) ७ विद्युत् चालक शक्ति (electromotive power), इत्यादि. लोहचुंबकधर्म (Magnetism) १ तात्त्विक (Theoritical), २ प्रकार–नैसर्गिक, कृत्रिम व विद्युत्जन्य, ३ लोहचुंबक (Magnet)-आर्मेचर ४ चुंबक सुई (Magnetic needle), ५ मूलतत्त्वें आणि तंत्र. **उष्णता** (Heat),–१ **उष्णतेचीं साधनें**, (अ) नैसर्गिक (ब) कृत्रिम २ उष्णता प्रसार (अ) वहन (conduction), (ब) प्रापण (convection), व (क) विसर्जन (Radiation) ३ प्रत्यक्ष उपयोग ४ उष्णतेचे परिणाम.

पदार्थ (Matter)–या सृष्टींतील कुठलाहि पदार्थ स्थाणुरूप (Solid), द्रवरूप (Liquid) किंवा वायुरूप (Gaseous) स्थितींत सांपडतो. पदार्थाचे अंगीं पुढें दिलेले गुणधर्म (एक किंवा अनेक) असतात. १ सच्छिद्रता (Porosity); २ दार्ढ्य (Density); ३ लवचीकपणा (Elasticity); ४ कठीणपणा (Hardness); ५ चिवटपणा (Tenacity); ६ विभाज्यता (Divisibility);७मऊपणा (Ductility) ८ चिकटून राहण्याचा गुणधर्म (Cohesion); ९ पृष्ठाकर्षण (Adhesion); १० अभेद्यत्व (Impenetrability); ११ ठोकले असतां वाढण्याचा धर्म अथवा घनवर्धनीयता (Malleability). हे पदार्थाचे गुणधर्म मानतात.

अनेक अणूंचा (Molecules) पदार्थ (Matter) बनलेला असतो. पदार्थांतील, विशिष्ट गुणधर्म राखून, लहानांतील लहान असा जो कण असतो त्यास अणु (Molecule) म्हणतात. पदार्थाच्या अंगीं असणाऱ्या विभाज्यता (तुकडे पडणें) या गुणधर्मास शेवटीं कोठें तरी मर्यादा ही आहेच अशी तत्त्वज्ञांची फार प्राचीन कालापासून निश्चित कल्पना (Theory) आहे; शेवटच्या या काल्पनिक अणूस 'ॲटम' (Atom) असें नांव त्यांनीं दिलें आहे. जॉन डाल्टन (इ. स. १७६६–१८४४) या शास्त्रज्ञास हें पदार्थ-विज्ञानविषयक तत्त्व (Physical Theory) चांगल्या तऱ्हेनें माहीत होतें व त्यानें रसायन–शास्त्रांत, त्याचा अनेक ठिकाणीं उपयोग केला आहे. त्यानें 'बहुगणित प्रमाण' (Law of Multiple Proportion) हा नियम शोधून काढला. या नियमाचें स्वरूप परमाणु तत्त्वावरून (Doctrine of atom) सहज कळूं शकतें.

तथापि आधुनिक कालांतील वैज्ञानिक शोधांवरून अणू हे पदार्थाचे शेवटचे कण नाहींत, त्यांचेहि भाग विद्युत्–पद्धतीनें करतां येतात व शेवटीं इलेक्ट्रॉन्स (electrons) व प्रोटॉन्स (Protors) हेच अखेरचे अभेद्य कण होत, असें सिद्ध झालें आहे. अर्थात् यावरून परमाणु–वादाच्या (Atomic Theory) उपयुक्ततेस कांहीं बाध येत नाहीं. कांहीं अणूमध्यें एकच परमाणु व कांहीं मध्यें अनेक परमाणु असतात. अशा तऱ्हेनें साखरेचा अणु हा सोन्याच्या अणूपेक्षां अधिक गुंतागुंतीचा (Complicated) असतो. पदार्थांतील यांत्रिक अगर भौतिक फेरफारांवरून अणूचे आणखी भाग पडूं शकत नाहींत; पण रासायनिक अगर विद्युत्-क्रियेच्या साहाय्यानें तात्काळ भाग पाडतां येतात. असे भाग पडले कीं त्या ठिकाणीं नवी जुळवाजुळव होते.

पदार्थ हा अखंड नसून तो अनेक सुट्या सुट्या (Discrete) कणांचा बनविलेला असतो या कल्पनेवर अणुवाद आधारलेला आहे. ही कल्पना प्रयोगांनीं खरी ठरण्यापूर्वीपासूनच अनेक वर्षें रूढ होती.

पन्हें:–८० पृष्ठावरील 'आंबा' लेख पाहा.

पपई:–पपईच्या दोन मुख्य जाती. एक गुजराथी व दुसरी वॉशिंग्टन. गुजराथी झाडाच्या पानांचे दांडे हिरवे असून वॉशिंग्टनचे दांडे जांभळे असतात. दुसऱ्या जातीच्या झाडाचीं फळें पहिल्याच्या फळापेक्षां अधिक गोड असतात. कांहीं नर झाडांना तोडल्यावर तीं पुनः वाढून त्यांस मादी फुलें लागतात व फळें येतात. अथवा कांहीं नर झाडें तशींच वाढूं दिल्यास पुढें पुढें त्यांस मादी फुलें येऊं लागतात. एका झाडाला १००–२०० पर्यंत फळें येतात. यापैकीं कांहीं फळें लांब, गोल व अंडाकृति असतात. यांतील लांब फळें गोडीस चांगलीं असतात. हिरव्या पपई-पासून 'पेपीन' नांवाचें एक द्रव्य तयार करतात. फळांवर बारीक काडीनें रेघोट्या ओढल्यावर फळा-

मधून चीक येतो. हा चीक भांड्यांत घेऊन वाळविल्यावर त्याची पांढरी किंवा तांबूस पूड तयार होते. ही पूडच पेपीन होय. औषधासाठीं पेपीनचा उपयोग होतो.

पपई–(औषधी गुणधर्म)–ही कृमिनाशक असून हिचा गुण प्लीहेवर चांगला येतो. तसेंच ती क्षुधाप्रदीपक व गजकर्ण, नायटे व खरूज यांचा नायनाट करणारी आहे. पपईचा एक चमचा चीक व तितकीच साखर एकत्र करून घोटावें. साखरेच्या ऐवजीं मध घातला तरी चालेल. घोटल्यानंतर त्यांत छटाक पाणी घालून रोज सकाळीं एक वेळ घ्यावें. असें सात दिवस केल्यानें प्लीहेची वाढ न होतां ती पुष्कळच कमी होते. पपईचा खीस शिजवून त्याचें पोटीस प्लीहेवर बांधल्यानेंही प्लीहेस फायदा होतो. रोज नियमानें पपई खात गेल्यास चांगली भूक लागते व अन्न पचतें. गजकर्ण, नायटे व खरूज यांस पपईचा चीक लावल्यास तीं लस वाहून जाऊन साफ बरी होतात. पपई उष्ण असल्यामुळें गर्भिणीनीं ती खाऊं नये; कारण गर्भपात होण्याचा संभव असतो. आर्तव साफ होण्यासाठीं पपई खावी म्हणजे विटाळ साफ होतो.

(कोशिंबीर)–कच्ची पपई, मीठ, मिरची, कोथिंबीर, खोबरें, लिंबू, फोडणी. **कृति**–पपई धुऊन घेऊन तिची साल काढावी व पपई खिसावी. नंतर खोबरें खवणून घ्यावें. कोथिंबीर बारीक चिरून घ्यावी. नंतर वरील सर्व जिन्नस खिसाच्या अदमासानें घेऊन त्याच्यांत घालून लिंबू पिळावा. नंतर मिरच्याच्या तुकड्यांची गोडें तेल घालून हिंगाची खमंग फोडणी घालावी. ह्याच्यांत आवडत असल्यास भिजलेली मुगाची डाळ घालावी.

(भाजी)–कच्ची पपई, मीठ, तिखट, गूळ, कोथिंबीर, खोबरें व फोडणीचें सर्व साहित्य. **कृति**–पपई धुऊन चिरावी. खोबरें खवणून व कोथिंबीर धुऊन चिरावी. नंतर पातेल्यांत तेल घालून, हिंगाची चांगली फोडणी तयार करावी व त्यांत फोडी टाकाव्या. थोडें पाणी घालून वर पाण्याचें झांकण ठेवावें. शिजल्यावर वरील सर्व जिन्नस घालून मंदाग्नीवर शिजवावें. खोबरें व कोथिंबीर मग घालावी. आवडत असल्यास मोड आलेले पावटे घालावेत.

(ताकांतली भाजी)–**साहित्य**–पपई, ताक, मिरची, मीठ, साखर, कोथिंबीर, भुईमुगाच्या दाण्याचें कूट, तुपाची फोडणी. **कृति**–पपई धुऊन चिरून हळद घालून शिजत ठेवावी. फोडी चांगल्या शिजल्या कीं मीठ, तिखट वगैरे जिन्नस अदमासें घालून नंतर ताक घेऊन त्याच्यांत दाण्याचें कूट कालवून तें घालावें. शेरभर भाजी तयार करावयाची असल्यास वाटीभर आंबट ताक पुरेसें होईल. सर्व जिन्नस घातल्यावर मंदाग्नीवर भाजी चांगली शिजवावी.नंतर हिंग मोहऱ्या घालून तुपाची फोडणी द्यावी.

(वड्या)–**साहित्य**–हिरवी पपई, साखर, खोबरें, वेलदोडे, केशर, जायफळ. **माप**–पपईच्या खिसाच्या दीडपट साखर, त्याच्या निम्मे वेलदोडे,केशर अदमासें. **कृति**–पपई खिसून घ्यावी. वेलदोडे, केशर व जायफळ यांची बारीक पूड करावी नंतर साखरेचा घट्ट पाक करून त्यांत खीस व खोबरें घालावें आणि ढवळावें. वडी बनण्यासारखा गोळा झाल्यावर थाळ्याला तूप लावून त्यावर तो थापावा. निवाल्यावर वड्या कापाव्या. ह्याच्यांत खोबरें घातलें नाहीं तरी चालतें.

(वड्या)–**साहित्य**–पिकलेली पपई, साखर, खोबरें व वेलदोडें, बदाम, बेदाणे. **माप**–पपईच्या गराएवढीच साखर, तितकें खोबरें व वेलदोडें अदमासानें. **कृति**–पपईची साल काढून ती चिरून घ्यावी, खोबरें बारीक खवणावें. नंतर साखर, पपईचा गर व खोबरें एके ठिकाणीं मिळून कल्हईच्या पातेल्यांत घालून चुलीवर ठेवून घोटावें. मंदाग्नीच असूं द्यावा. नंतर वडी बनेलशी वाटल्यावर त्याच्यांत वेलदोडे, बेदाणे, बदाम वगैरे घालून घोटून थाळ्याला तूप लावून त्यावर तो गोळा थापावा. निवल्यावर वड्या कापाव्यात.

प्रकार २ रा–**साहित्य**–पपई, साखर, पिस्ते व वेलदोडे. **माप**–पपईच्या खिसाइतकीच साखर, पिस्ते व वेलदोडे अजमासें. **कृति**–पाडाला आलेली पपई सोलून ती खिसावी. साखरेचा कच्चा पाक करून त्यांत खीस टाकावा व ढवळावें. नंतर त्याच्यांत पिस्ते वेलदोडे घालून पाक सुकेपर्यंत परतून उतरावें. मग थाळ्याला तूप लावून त्यावर सारखा थापावा व वड्या कापाव्यात.

शिक्रण–**साहित्य**–पपई, दूध, साखर, व वेलदोडे. **कृति**–पपईच्या साली काढून तिच्या बारीक फोडी कराव्यात. नंतर त्यांत दूध, साखर व वेलदोडे घालून कालवावें म्हणजे शिक्रण तयार होते.

पपनसः–हें लिंबवर्गातील एक झाड आहे. ह्याचें झाड मोसंबीप्रमाणेंच पण अधिक विस्ताराचें व मोठें असतें. फळें असोल्या नाराळाएवढीं मोठीं असून वाटोळीं व पिवळट रंगाचीं असतात. फळाची साल जाड असते व आंत मगजाच्या कुड्यांनीं भरलेल्या फोडी असतात. संत्र्याप्रमाणें ह्या फोडी निराळ्या करतां येतात. याच्या कुड्या लिंबाप्रमाणेंच पण मोठ्या आकाराच्या असतात. फळाचें वजन ४ ते ५ पौंड असून त्याचा व्यास ६ ते ८ इंच असतो. झाडाची उंची २५–३० फूट असते. या झाडाच्या दोन जाती आहेत. एक पांढऱ्या दाण्याची व दुसरी तांबड्या दाण्याची. दुसरी जात दिसण्यांत चांगली असल्यानें लोकांना अधिक आवडते. कित्येक फळांत बिया मुळीं नसतातच. पपनसचें झाड कोणत्याही प्रदेशांत होतें. पण समुद्रकांठाला ह्याची लागवड मोठ्या प्रमाणावर होते. बाजारांत पपनसचीं फळें फारशीं खपत नसल्या-मुळें पपनसच्या बागा कोणी करीत नाहींत. बहुतेक-जण याचीं झाडें परसूं किंवा अंगण यांतच लावतात. अलिकडे ह्या झाडाची अभिवृद्धि गुटी कलमापासून करतात. पण अद्याप बियापासूनच मोठ्या प्रमाणांत याची निपज होते. रोपें किंवा कलमें लाविल्यावर दर सहा महिन्यांनीं प्रत्येक झाडास ३ घमेलीं शेणखत, २ घमेलीं मुताची माती, ३ पौंड हाडाचें खत व थोडी राख याप्रमाणें खत घालावें. बियापासून केलेल्या झाडास १० वर्षांनीं फळें येतात व कलमा-च्याला मात्र ५–६ वर्षांत फळें लागूं लागतात, याचें झाड ४०–५० वर्षें जगतें. एका झाडाला ५० ते ७५ फळें लागतात.

पपनस (कोशिंबीर)-**साहित्य**–पिकलेला पप-नस, साखर, मीठ, काळ्या मिऱ्याची पूड. **कृति**–पपनस सोलून त्याच्या पाकळ्या कराव्यात. मग त्याच्यांत किंचित् मीठ, थोडी मिऱ्याची पूड घालून तें कालवून वर साखर भुरभुरावी.

पपरिआ–साहित्य-हरभऱ्याच्या डाळीचें पीठ, तिखट, मीठ, ओवा व तांदळाची पिठी व दूध. **कृति**–डाळीच्या पिठांत तिखट, मीठ, ओवा वगैरे पदार्थ घालून दुधांत भिजवावेत. पुरीच्या कणकेइतकें घट्ट भिजवावें. मग त्या पुरीप्रमाणें लाटून तेलांत तळाव्या.

पपियाः–एक पक्षी. सातभाई पक्षाकडून आपलीं अंडीं उबवणारा, एकसारखे 'पपिया पपिया' म्हणून ओरडणारा. मैनेयेवढ्या आकाराचा व लांब शेपटीचा. याला हा पपिया पपिया म्हणून ओरडत असल्यानें 'पपिया' हेंच नांव पडलें. पपियाचे डोळे व पाय पिवळ्या रंगाचे. पंखाचा रंग पिंगटकरडा असून त्यावर पांढरे पट्टे असतात. याच्या ओरडण्यानें त्याचें अस्तित्व प्रगट होतें. हा सहसा दृष्टीला पडत नाहीं. वडपिंपळांचीं फळें व कीटक यांवरच पपिया पोट भरतो. हा पक्षी आपलीं निळीं अंडीं सातभाई पक्षाच्या घरट्यांत घालतो. अंडीं उबवण्याची क्रिया व पुढें पिलें बाहेर आल्यावर त्यांना चारा घालण्याचें काम सातभाईच करतो. पपियाचीं पिलें जरी रंगानें वेगळीं असलीं तरी पण पोषणाचें काम बिनबोभाट चालतें. या पक्षाची 'काळा पपिया' नांवाची आणखी एक जात आहे. या पक्षाच्या डोक्यावर तुरा असतो. या तुऱ्याचा व डोक्याचा रंग करडा असून त्याच्या पोटाचा रंग पांढरा असतो. याला पांढरे पट्टे असलेलें शेपूट व पंखें असतात. काळा पपिया हा एका ठिकाणीं राहाणारा नसून तो पावसाळ्यांत उत्तर हिंदुस्थानांत जातो व इतर वेळीं दक्षिणेकडे येतो.

परदेशीं–पैसे पाठविणें:–हिंदुस्थानांतून परदेशीं पैसे पाठविण्याचे निरनिराळे मार्ग आहेत. विलायतेस पैसे पाठवावयाचे असल्यास आपणांस प्रथम एखाद्या एक्चेंज बँकेकडे गेलें पाहिजे. विलायती चलनांत आप-णांस जितके पौंड पाठावयाचे असतील तितक्या पौंडाची रुपयांमध्यें किंमत करून ती आपणांस बँकेच्या हवालीं केली पाहिजे. अर्थात् पौंडाची रुपयांमध्यें किंमत दर-रोज तीच असते असें नाहीं. आपल्या देशांत रुपया व आणा यांची परस्पर किंमत ठरून गेलेली आहे. कायद्यानें एका रुपयास सोळा आण्यापेक्षां जास्त किंमत आपणांस देतां अगर घेतां यावयाची नाहीं; तथापि परदेशी चलनाशीं आपल्या चलनाच्या असलेल्या संबंधांत कायद्याचें नियंत्रण घालतां येत नाहीं. त्यांची परस्परांतील किंमत इतर जिनसांप्रमाणें मागणी व पुर-वठा यांवर अवलंबून असते. पौंडास जर वाजवीपेक्षां जास्त किंमत असेल तर आपणांस पौंडाची खरेदी करतांना जास्त रुपये द्यावे लागतील. रुपया व पौंड यांचा दर कायद्यानें ठरून गेला आहे हें जरी खरें असलें तरी बाजारभाव कायदेशीर दराइतकाच असतो असें नाहीं. उलट बाजारांतल्या तेजीमंदीप्रमाणें पौंडाचा भाव कायदेशीर दराच्या आजूबाजूस फिरत असतो;

तथापि ही दराची फिरण्याची कक्षा कांहीं विशिष्ट अंतरापर्यंतच असते. तशी ती नसल्यास देशादेशांमध्यें प्रत्यक्ष सोनेंरुपें पाठविलें जातें. असो, बाजारभावाप्रमाणें आपण रुपये दिले म्हणजे एक्स्चेंज बँक आपणांस विलायतेंतील एकाद्या बँकेवर आपण विकत घेतलेल्या पौंडापर्यंतची एक हुंडी आपणांस देते. आपण ही हुंडी ज्या परदेशीय गृहस्थास आपणांस पैसे द्यावयाचे आहेत त्याला पाठवितों. तो मनुष्य मिळालेली हुंडी ज्या बँकेवर ती काढली आहे तिच्या पुढें सादर करून तीवरील पैसे मिळवितो.

आपल्या रुपयाचा दर पौंडामध्यें ठरलेला आहे तसा इतर देशाच्या चलनामध्यें ठरलेला नाहीं आणि तसा ठरविणेंही शक्य नाहीं. त्याचबरोबर इतर देशांशीं आपला व्यापाराच्या अगर पैशाच्या देवघेवीच्या बाबतींत प्रत्यक्ष संबंध जडलेला नाहीं. अगदींच संबंध नाहीं असें नाहीं. उदा० अलीकडे अमेरिका, जपान वगैरे देशांशीं आपला संबंध जास्त येऊं लागला आहे. परदेशाबरोबरीच्या व्यापारी संबंधाचा फायदा आपणांस मुंबई, कलकत्ता वगैरे ठिकाणींच घेतां येतो. आपणांस येथून अमेरिकेस पैसे पाठवावयाचे असल्यास मुंबईसारख्या ठिकाणीं नाणेबदल करणारे अगर परदेशीं चलन विकणारे व्यापारी असतात, त्यांच्याकडून आपणांस अमेरिकेचें चलन विकत मिळतें. त्याची प्रत्यक्ष खरेदी करून तें अमेरिकेस पोष्टानें पाठवितां येतें.

सर्वच देशांचें चलन मुंबईसारख्या ठिकाणीं आपणांस विकत मिळतें असें नाहीं. ज्या ज्या देशाचें चलन विकत मिळणें अशक्य असतें अशा देशांस पैसा पाठवावयाचा असल्यास आपणांस एक्सचेंज बँकांकडेच गेलें पाहिजे. या बँका इंग्रजी पौंडाबरोबरचा इतर देशांचा चलनाचा दर पाहून त्याप्रमाणें आपणांस रुपयांत भाव आकारतील.

आपण एकादे वेळीं जर पृथ्वीपर्यटनास निघालों तर आपण ज्या ज्या देशांत प्रवास करूं त्या त्या देशाचें चलन आपणांस मिळवावें लागेल. यासाठींसुद्धां आपणास एक्सचेंज बँकेकडेच जाणें प्राप्त आहे. या बँकेला आपणास कोणकोणत्या देशाचें किती किती चलन लागेल हें सांगितलें म्हणजे आपणास बँकेनें ठरविलेल्या दराप्रमाणें येथें रुपये भरावे लागतात. रुपये भरतांच बँक आपणास एक फिरतें पत्र (Circular letter of credit) देते. हें पत्र बेऊन आपणास प्रत्येक देशांत पैसा मिळूं शकेल. या पत्राचीं निरनिराळीं पानें असतात. प्रत्येक पानावर निरनिराळ्या देशांतल्या बँकांना पत्राच्या मालकास ठराविक रकमेपर्यंत आपापल्या देशांतील चलन देण्यास लिहिलेला मजकूर असतो. प्रवास करणारा मनुष्य निरनिराळ्या देशीं पोहोंचण्यापूर्वी आपल्या देशांतील बँक इतर देशांतील बँकांना आधींच सर्व प्रकार कळवून देऊं करविलेल्या रकमेच्या किंमती स्वतः भरण्याचें आश्वासन देते. त्यामुळें प्रवाशास कोणताच त्रास पडत नाहीं.

परमानंद, भाई-( ):—एक महान् हिंदी पुढारी व देशभक्त. लहानपणापासून आर्यसमाजाच्या कार्याचें महत्त्व त्यांना पटलें होतें. तेव्हां एम्. ए. होतांच अवघ्या ७५ रु. पगारावर दयानंद अँग्लो—व्हर्नाक्युलर कॉलेजमध्यें त्यांनीं प्राध्यापकाची नोकरी पत्करली. त्या संस्थेचे ते आजीव सदस्य झाले. अध्यापनाबरोबर, प्रचारकार्यासाठींहि त्यांना फिरावें लागे. त्याप्रमाणें १९०५ सालीं दक्षिण आफ्रिकेंत जाऊन त्यांनीं आर्यधर्म व आर्यसंस्कृती याचा जारीनें प्रचार केला. नंतर त्यांनीं इंग्लडांत जाऊन हिंदुस्थानचा खरा इतिहास लिहिण्याच्या उद्देशानें साधनसामुग्री गोळा केली. इ. स. १९०८ सालीं ते परत हिंदुस्थानांत आले व पुन्हां कॉलेजच्या कामास लागले. १९०८ च्या उन्हाळ्यांत त्यांनीं ब्रह्मदेशांत दौरा काढून हिंदुधर्म, हिंदुसंस्कृती व हिंदूंचा इतिहास यांवर अनेक व्याख्यानें देऊन जनतेंत नवचैतन्य निर्माण केलें. हीच गोष्ट त्यांनीं १९०९च्या उन्हाळ्यांत दक्षिण आफ्रिकेंत जाऊन केली. आफ्रिकेंतून परत आल्यावर त्यांनीं 'हिंदुस्थानचा इतिहास' हें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें. या पुस्तकांत, कलकत्त्याची अंधारकोठडी, अठराशेंसत्तावन्न सालचें बंड वगैरे ऐतिहासिक गोष्टींवर अगदींच निराळा प्रकाश पाडला असल्यानें जनतेंत खळबळ उडाली. सरकारनें तें पुस्तक लागलीच जप्त केलें. पुढें लवकरच एका राजकीय खटल्यांत भाई परमानंदांना पकडण्यांत येऊन त्यांना तीन वर्षांची सजा झाली. इ. स.१९१० सालीं त्यांना हिंदुस्थान सोडावें लागलें. इ. स. १९१३ पर्यंत ते हिंदुस्थानबाहेर होते. या अवधींत दक्षिण अमेरिका वगैरे भागांत राहून त्यांनीं तेथील लोकांना हिंदूंची प्राचीन परंपरा व संस्कृती कायम टिकविण्याचा

उपदेश करून त्यांच्यामध्यें हिंदु संस्कृतीबद्दल दृढतर अभिमान जागृत केला. याच सुमारास युनायटेड् स्टेटस्‌मध्यें जाऊन मानसशास्त्राचा अभ्यास करून त्यांनीं डॉक्टरेटची पदवीहि मिळविली. ते हिंदुस्थानांत परत आल्यावर एक वर्षानें महायुद्ध सुरूं होतांच त्यांनीं राजकीय चळवळ जोरांत सुरूं केली. सरकारचा रोष त्यांच्यावर पूर्वीपासून होताच. अशांत १९१५ सालीं लाहोरास एक राजकीय खटला (Ghaddar Conspiracy Case of Lahore) निघाला. त्यांत त्यांना पकडण्यांत आलें व स्पेशल कमिशनमार्फत त्यांची चवकशी होऊन त्यांना फांशीची शिक्षा सांगण्यांत आली; पण लॉर्ड हार्डिंज यांनीं ती शिक्षा बदलून काळ्या पाण्याची शिक्षा दिली. त्यांना अंदमानमध्यें पाठविण्यांत आलें. इ. स. १९२० च्या मार्चमध्यें त्यांनीं अन्नसत्याग्रह सुरू केला; तेव्हां दीनबंधु सी. एफ्. अँड्रयूज यांच्या मध्यस्थीनें त्यांची सुटका झाली. अंदमानांतून त्यांनीं आपल्या पत्नीला उद्देशून लिहिलेलीं पत्रें वाचलीं म्हणजे त्यांच्या विशाल अंतःकरणाची, असामान्य बुद्धिमत्तेची व उज्वल देशाभिमानाची खात्री पटते.

तुरुंगांतून सुटतांच त्यांनीं महात्मा गांधींनीं सुरूं केलेल्या असहकारितेच्या चळवळींत भाग घेतला. लाहोर येथें स्थापन झालेल्या राष्ट्रीय शाळेंत प्राध्यापक म्हणून त्यांनीं काम केलें; पण कालांतरानें असहकारितेच्या चळवळीबरोबर ही संस्थाहि मागें पडून शेवटीं बंदहि पडली. तसेंच काँग्रेसची मुसलमानधार्जिणी व हिंदुहितविरोधी वृत्ति दिसून येतांच भाई परमानंदांनीं हिंदुसंघटनेच्या कार्यास हात घातला. हिंदुसंघटनेवर त्यांनीं अनेक पुस्तकें लिहिलीं आहेत. तीं प्रत्येक हिंदूनें भगवद्गीतेबरोबर वाचण्यासारखीं आहेत. हिंदूंच्या हक्कांचें संरक्षण व्हावें म्हणून ते मध्यवर्ती कायदेमंडळांत शिरले. काँग्रेसचा मोठा विरोध असतांहि ते प्रचंड बहुमतानें निवडून आले. ब्रिटिश सरकारनें दिलेल्या जातीय निवाड्याविरुद्ध (Communal Award) त्यांनीं मोठी चळवळ सुरू केली. या बाबतींत १९३३ सालीं कायदेमंडळांत त्यांनीं केलेलें विस्तृत भाषण व इंग्लंडमध्यें जॉइंट पार्लमेंट कमेटीपुढें दिलेला पुरावा हिंदु संस्कृतिरक्षणाच्या दृष्टीनें इतिहासांत अमर झाला आहे. इ. स. १९३४ चे एप्रिलमध्यें अजमीर येथें झालेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. त्यांनीं जातीय निवाड्याविरुद्ध, सर्व हिंदुस्थानभर दौरा काढून, मोठी चळवळ सुरूं केली. कौन्सिल–प्रवेश व हिंदूंचे हित–संरक्षणार्थ फेडरेशन–स्वीकार यांचा जोरानें पुरस्कार केला. पुढील तीन वर्षेंहि हिंदुमहासभेचे तेच अध्यक्ष राहिले व त्यांनीं हिंदुमहासभा प्रभावी करून दाखविली. यानंतरचें त्यांचें महत्त्वाचें कार्य म्हणजे सर्व्हंट ऑफ इंडिया या सोसायटीचे धर्तीवर त्यांनीं दिल्ली येथें हिंदु–सेवा–आश्रम स्थापन केला. या संस्थेमार्फत हिंदी भाषेंत हिंदू व इंग्रजींत Hindu Out-look हीं वर्तमानपत्रें प्रसिद्ध होतात.

समाजसुधारक या दृष्टीनेंहि भाई परमानंदांची कामगिरी मोठी आहे. जातपात–तोडक मंडळ त्यांनींच स्थापन केलें. व्यवहारी मुत्सद्दी या दृष्टीनें पाहिलें तर त्यांची योग्यता याहूनहि अधिक आहे. मुसलमानांच्या पॅन्–इस्लामिझम वगैरेसारख्या चळवळी वेळीं ओळखून त्यांनीं त्यांस हिंदुसंघटनेनें बरोबर शह दिला आहे. "हिंदुस्थान हा देश, मुख्यतः हिंदूंचा आहे; हिंदू हें राष्ट्र आहे, इतर सर्व अल्पसंख्यांक जाती आहेत." हें त्यांच्या भाषणांचें व लेखनांचें सार आहे.

परवर:–हीं फळ अत्यंत हलकीं असून रुचकर आहेत. तसेंच तीं खाल्लीं असतां कोणचाहि दोष उत्पन्न करीत नाहींत. या कारणानें काशीकडे पुष्कळ लंघनें झालीं असतां पहिल्या प्रथम अन्न देण्याचे पूर्वीं हींच शिजवून खाण्यास देतात. पडसें, ताप, अजीर्ण वगैरे विकारांत लंघनाची जरूर असेल तेव्हां परवरें उकडून नुसतीं खावीं. भुकेचें काम होऊन शरीरांत कोणचाही विकार वाढत नाहीं. उत्तर हिंदुस्थानांत ही अत्यंत पथ्याची भाजी म्हणून गणली गेली आहे.

(भाजी):–परवरें, मीठ, तिखट, खोबरें, कोथिंबीर व फोडणीचें साहित्य व तूप. **कृति**–परवरें धुऊन चिरावींत. हिंग घालून तुपाची फोडणी करावी व तींत परवरें टाकून तीं चांगलीं परतवावींत. परतवून मऊ झाल्यावर त्यांच्या मानानें तिखट, मीठ वगैरे घालावें. ही परवराची भाजी पावशेर खाल्ली तर तोळाभर रक्त येतें असें गुजराथेंत म्हणतात. अशक्त माणसें व बाळंतिणी यांस मुद्दाम खाणेस देतात.

परशुराम:—जमदग्नि व रेणुका यांचा मुलगा. हा धनुर्विद्या व इतर सर्व विद्यांत निष्णात होता. याचा जन्म वैशाख शु॥ ३ ला झाला. उपनयनानंतर यास, कश्यपानें मंत्रोपदेश केला. शिवाय यानें शंकराला प्रसन्न करून घेऊन धनुर्वेद, शस्त्रास्त्रविद्या, मंत्रप्रयोग इत्यादींचें ज्ञान मिळविलें. बापाची मातृघाताची आज्ञा पार पाडून यानें बापाला प्रसन्न करून घेतलें व त्याजकडून पुनः आईस जिवंत करविलें व 'अजिंक्य होशील नि इच्छामरणी बनशील' असा वर मिळविला. याला ४०–४१ अस्त्रें येत असल्याचा ग्रंथांत उल्लेख आहे. जमदग्नीस ठार केल्याबद्दल कार्तवीर्यास यानें ठार केलें. कार्तवीर्याच्या वधाबद्दल निरनिराळ्या ग्रंथांत निरनिराळीं कारणें दिलीं आहेत. क्षत्रियांचीं व याचीं अनेकवार भांडणें होऊन उभयतांत अनेक युद्धें झालीं. हीं युद्धें एकवीस वेळ झालीं. जरी यानें अनेकवार निःक्षत्रिय पृथ्वी केली असल्याबद्दल उल्लेख आहेत तरी पण याच्या तडाख्यांतून अनेक क्षत्रिय शिल्लक राहिल्याबद्दलही कांहीं पुराणांत लिहिलें आहे. यानें सर्व पृथ्वी कश्यपाला दान दिली. परशुरामानें शूर्पारक प्रांत निर्माण केला व तेथें तो राहूं लागला. हा शूर्पारक प्रांत निर्माण केल्याच्या कथा कित्येक ग्रंथांतून वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत. परशुराम चिरंजीव असल्यानें तो वरचेवर प्रगट होतो. सीतेच्या लग्नसमयीं हा रामाबरोबर लढण्यास आला होता. भीष्मानें याच्याकडे विद्या संपादन केली. कर्णानें याच्यापाशीं विद्या संपादण्याचा यत्न केला. मुंबईचा वाळकेश्वर यानेंच स्थापन केला, असें म्हणतात. याच्या नांवावर 'परशुराम–सूत्र' नांवाचा एक तंत्रग्रंथ प्रसिद्ध आहे. याच्या नांवाचा शक सध्यां मलबारांत चालू आहे. याचें वर्ष सौर. याचा सिंहमासापासून आरंभ होतो. ह्या शकाचें हजाराचें एक चक्र असतें. सध्यां चौथें चक्र सुरू आहे.

परसोजी भोसले (मृत्यु स. १७०९):—पहिला सेनासाहेब सुभा. हा मुधोजी भोसल्याचा मुलगा होय. हा प्रथम शिवाजीच्या सैन्यांत नोकरी करूं लागला व पुढें हळूहळू बराच प्रसिद्धीस आला.

प्रतापराव गुजराप्रमाणें ह्यानें वऱ्हाड व गोंडवण प्रांतांत स्वाऱ्या करून तिकडे मराठ्यांचा अंमल बसविण्याचा प्रयत्न केला. राजारामास यानें फार मदत केली, व वऱ्हाड गोंडवणांत आपला अंमल बसविला. त्यामुळें राजारामानें इ. स. १६९९ त त्यास 'सेनासाहेब सुभा' हा किताब व सरंजाम देऊन वरील प्रांतांतील चौथाई व सरदेशमुखी वसुलीचें काम देऊन तशी सनद दिली. परसोजीनंतर हा वऱ्हाडांत भाम येथें येऊन राहिला.

सन १७०७ मध्यें शाहू मोंगलांच्या कैदेंतून सुटून आल्यावर त्यास जे मराठे सरदार मिळाले त्यांत परसोजी हा प्रथम मिळाला. परसोजीचा भाऊ बापूजी यास ताराबाईनें आपणाकडे वळवून घेऊन परसोजीसहि वळविण्यासाठीं त्यास शाहूकडे पाठविलें. शेवटीं शाहू खरा असें ठरल्यावर परसोजी व बापूजी त्यास एका ताटांत घेऊन जेवले तेव्हां कोणासच शंका न राहून सर्व मराठे सरदार शाहूस मिळून त्याचें काम सुकर झालें.

शाहूस परसोजीनें फार मदत केली म्हणून तो यशस्वी झाल्यावर स. १७०७ मध्यें त्यानें परसोजीस "सेनासाहेब सुभा" हें पद व वऱ्हाड, गोंडवण प्रांताचा अंमल कायम करून त्यास वंशपरंपरेची नवीन सनद दिली.

वरील सनदेप्रमाणें वऱ्हाडांत येऊन परसोजीनें कारभार केला. तो त्यानंतर साताऱ्यास गेला व तेथून परत येत असतां कृष्णा व वेण्णा यांच्या संगमावर माहुलीजवळ स. १७०९ मध्यें मरण पावला. तेथें याची समाधि आहे, व तिचे पूजेअर्चेकरितां कान्होजीनें शाहूपासून इनाम जमीन देवविली आहे.

परांजपे, डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम (१८७६–):- लखनौ युनिव्हर्सिटीचे माजी व्हाइस चॅन्सेलर व इंडिया कौन्सिलचे माजी सभासद. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांत मुरडी येथें १६ फेब्रु. १८७६ त झाला. मराठा हायस्कूल मुंबई, फर्ग्युसन कॉलेज पुणें, सेंट जॉन्स कॉलेजचे (केंब्रीजचे) फेलो; पॅरिस व गटिंगेन; हिंदुस्थानांतील सर्व विश्वविद्यालयीन परीक्षांतून पहिले आले. हिंदुस्थान सरकारचे स्कॉलर म्हणून विलायतेला गेले. केंब्रीजला पहिल्या आलेल्या दोन सीनियर रँग्लरांपैकीं एक. त्यांचें सारें शिक्षण १८९९ पर्यंत पुरें झालें. यांनीं फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसर व प्रिन्सिपॉल या नात्यानें १९०२ पासून १९२४ पर्यंत काम केलें. मुंबई इलाख्यांतील सामाजिक, राजकीय व शैक्षणिक चळवळींतून यांनीं प्रमुखपणें भाग घेतला. १९१६–१९२० पर्यंत स्त्रियांच्या विश्वविद्यालयाचे चॅन्सेलर होते. मुंबई

कायदेमंडळांत १९१३ त प्रवेश. मुंबई विश्वविद्यालयांतील मुंबई कायदेमंडळांतील प्रतिनिधित्व १९१६–१९२६ पर्यंत यांचेकडे होतें. १९१६ त यांना, कैसर–



रँग्लर र. पु. परांजपे

इ–हिंद हें सुवर्ण पदक मिळालें. मुंबई सरकारचे मंत्री १९२१ पासून १९२७ पर्यंत होते. ऑक्झिलिअरी व टेरिटोरिअल फोर्सेस कमिटी इंडियन टॅक्सेशन इन्क्वायरी कमिटी यांवर १९२४–२५ मध्यें काम केलें. १९२७ ला इंडिया ऑफिसमध्यें नेमणूक झाल्यानें मुंबई सरकारच्या मंत्रीपदाचा राजिनामा दिला. १९३२ ला हिंदुस्थानांत आले. नंतर यांनीं लखनौ युनिव्हर्सिटीच्या व्हाईस चॅन्सेलरचें काम सहा वर्षे केलें. सध्यां ते पुण्यास आहेत.

परांजपे, शिवराम-महादेव (१८६४–१९२९):– उपरोधी लेखक व वक्ता; ग्रंथकार. यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यांतील महाड या तालुक्याच्या गांवीं १८६४ मध्यें झाला. हे १८८४ त प्रवेशपरीक्षेंत उतरले, इतकेंच नव्हे तर यांनीं संस्कृतची 'जगन्नाथ शंकरशेट' ही शिष्यवृत्तीही मिळविली. यानंतर शिवरामपंत, १८९० सालीं डेक्कन कॉलेजमधून बी. ए. व १८९२ मध्यें एम्. ए. ही झाले. या परीक्षांतून त्यांनीं 'भगवानदास' व 'झाला वेदांत' हीं पारितोषिकेंदेखील मिळविलीं.

शिक्षणक्रम आटोपल्यावर १८९७ पर्यंत त्यांनीं पुण्याच्या 'भावे स्कूल' व 'महाराष्ट्र कॉलेज' या दोन संस्थांत नोकरी केली. पुढें सरकारनें 'महाराष्ट्र कॉलेज' बंद केल्यानंतर परांजप्यांनीं १८९८ या वर्षी 'काळ' पत्राला जन्म दिला. हें पत्र १९१० पर्यंत चालू होतें. या पत्रावरूनच शिवरामपंतांना 'काळकर्ते' परांजपे म्हणून लोक ओळखूं लागले व सध्यांही त्या नांवानेंच लोकांना त्यांची ओळख पटते.

१९०८ सालीं शिवरामपंतांवर राजद्रोहाचा खटला झाला. त्यांत त्यांस १९ महिन्यांची शिक्षा भोगावी लागली. १९१० त सुटून आल्यावर चळवळींत त्यांनीं विशेषसा भाग घेतला नाहीं. १९२० पर्यंत त्यांच्याकडून वाङ्मयात्मक कार्य बरेंच झालें. पुढें परांजप्यांनीं 'स्वराज्य' पत्र काढलें. पण या पत्राला 'काळ' पत्राचें महत्त्व शेवटपर्यंत आलें नाहीं. शेवटीं परांजप्यांनीं राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें व आपलें सारें लक्ष वाङ्मयनिर्मितीकडे लावलें. त्यांनीं केलेली वाङ्मयसेवा लोकांना पसंत पडली व याचाच परिणाम म्हणजे १९२८ ला बेळगांवीं भरलेल्या साहित्य संमेलनाचें 'अध्यक्षस्थान' त्यांस दिलें. या स्थानावरून परांजप्यांनीं केलेलें भाषण हें अखेरचेंच होय. यानंतर ते मधुमेहानें आजारी पडले व त्यांतच त्यांचा अंत झाला.

शिवरामपंतांचें खालील लिखाण प्रसिद्ध आहे:—

निबंध–(१) काळांतील निवडक निबंध भाग १ ते १०. (२) साहित्यसंग्रह भाग १–२. (३) 'स्वराज्यां'-तील निवडक निबंध. **नाटकें**–(१) सं. कादंबरी, (२) मानाजीराव, (३) पहिला पांडव. **कादंबऱ्या**–(१) गोविंदाची गोष्ट; (२) विंध्याचल. **संकीर्ण**–(१) रामायणाविषयीं कांहीं विचार; (२) अर्थशास्त्र; (३) मराठ्यांच्या लढायांचा इतिहास, इ.

परांजप्यांनीं, काव्य, नाटक, कादंबरी, कथा इत्यादि क्षेत्रांत, आपली लेखणी चालविली; पण त्यांच्या सर्व वाङ्मयांत काळांतील निबंधच सर्वांस अधिक आवडतात. त्यांची भाषा देशाभिमानप्रेरित, प्रौढ व पल्लेदार वाक्यांनीं सजलेली असे. त्यांच्या लेखांत तत्त्व थोडेंच असे पण तें मोहकपणें रंगवून वाचकांस वाचावयास लावीत. त्यांनीं आपल्या लिखाणांत स्वातंत्र्याची महती उत्तमपणें सिद्ध केली. त्यांचीं सामाजिक मतें जुन्या पद्धतीचीं होतीं.

पराशर:–वशिष्ठाचा नातू. वशिष्ठानें याचें पालनपोषण केलें. त्यासच हा बाप समजत असे व नेहमीं 'बाबा, बाबा' म्हणून त्याच्यामागें लागे. वशिष्ठाला 'बाबा' म्हणून हांक मारली कीं, पराशराची आई अदृश्यन्तीच्या

डोळ्यांस साहजिकच पाणी येत असे. हिनें त्याला अनेकवार वशिष्ठाला 'बाबा न म्हणतां आजोबा म्हण' म्हणून सांगितलें. पण लहान असल्यामुळें याचा अर्थ त्यास कळत नसे. पराशराला समजूं लागल्यावर यास त्याच्या बापाच्या वधाची हकीकत आईनें समजून सांगितली. त्याबरोबर पराशराच्या डोक्यांत सारा प्रकाश पडून हा अतिशय रागावला. रागाच्या सपाट्यांत हा जगाचा नाश करण्यास प्रवृत्त झाला. पण वशिष्ठानें त्यास त्यापासून परावृत्त केलें. तथापि राक्षसांविषयींचा राग याच्या मनांतून जाईना. पराशरानें राक्षसांच्या वधासाठीं राक्षससत्र आरंभिलें. पण राक्षसांच्या संरक्षणास अत्रि, पुलह, पुलस्त्य, ऋतु, महाक्रतु इत्यादि मोठे मुनि आले. पुलस्त्यानें वशिष्ठांच्या मदतीनें पराशराची समजूत काढून त्यास आपल्या बेतापासून निवृत्त केलें. पराशरानें आपला बेत रहीत केल्यावर पुलस्त्यानें त्यास 'सकलशास्त्रपारंगत व पुराणवक्ता होशील' असे दोन वर दिले. पराशरानें राक्षससत्राकरितां सिद्ध केलेला अग्नि हिमालयाच्या उत्तरेस एका अरण्यांत टाकिला. तो अग्नि अद्यापिहि पर्वदिवशीं राक्षस, पाषाण व वृक्ष भक्षण करितांना दिसतो असें म्हणतात. एकदां पराशर तीर्थयात्रेस गेला असतां यमुनेवर सत्यवती त्यास दिसली. तिच्या अंगाला माशासारखा वास येत होता. पराशर कामुक होऊन तिची प्रेमयाचना करूं लागला. तेव्हां भोंवतालच्या ऋषींचा अडथळा होऊं नये म्हणून त्यानें धुकें उत्पन्न केलें. तिनें कन्याभाव दूषित होईल अशी शंका काढली. त्याचें निराकरण करून तिच्या अंगाचा दुर्गंध घालविला व एक योजनपर्यंत अंगाचा सुगंध येईल, अशी व्यवस्था केली. यापासून तिला वेदव्यास नांवाचा मुलगा झाला. यमुनेच्या द्वीपांत जन्म झाला म्हणून व्यासाला द्वैपायन म्हणूं लागले.

महाभारतांत याच्या धर्मविषयक मतांचा सन्मानानें उल्लेख आला आहे. यानें युधिष्ठिराला रुद्राचें माहात्म्य कथन केलें आहे. हा परिक्षिताच्या प्रायोपवेशनसमयीं गंगातटाकीं आला होता. त्याचप्रमाणें हा इंद्रसभेंत असल्याचा उल्लेख आहे. याच्या वंशांत वसिष्ठ, मित्रावरुण आणि कुंडिन या तीन प्रवरांचे गौरपराशर, नीलपराशर, कृष्णपराशर, श्वेतपराशर, श्यामपराशर व धूम्रपराशर असे सहा भेद झाले होते. याला गौरवीति असेंहि नांव आहे. पराशरानें जनकाला केलेल्या तत्त्वज्ञानाच्या उपदेशाचा अनुवाद भीष्मानें धर्मराजाला सांगितला आहे. त्यालाच 'पराशरगीता' म्हणतात. सारस्वतानें पराशराला व पराशरानें मैत्रेयाला पुराण सांगितलें. हा इतिहासपुराणज्ञ होता. पण भागवतांत सांख्यायन ऋषीनें भागवतपुराण पराशर व बृहस्पति यांस सांगितलें. पुढें तें पराशरानें मैत्रेयाला सांगितलें असें सांगितलें आहे.

परीक्षित:—अर्जुनाचा नातू व अभिमन्यु व उत्तरा यांचा मुलगा. अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रानें गर्भामध्यें हा होरपळूं लागला म्हणून रक्षण करणारा कोणी भेटतो कां हें तो गर्भांत असतांना व जन्मल्यावर इकडे तिकडे पाहूं लागला. यावरून त्याचें नांव परीक्षित असें ठेविलें. युधिष्ठिरानें छत्तीस वर्षें राज्य केल्यावर यास गादीवर बसविलें. यावेळीं याचें वय छत्तीस वर्षांचें होतें. याच्या पत्नीचें नांव भद्रवती असें होतें. कोणी इरावती किंवा माद्रवती अशीं नांवें असल्याबद्दल उल्लेख करतात. परीक्षिताला जनमेजय, श्रुतसेन, उग्रसेन व भीमसेन असे चार मुलगे झाले. यानें कृपाचार्यांस गुरु करून भागीरथीच्या तीरावर तीन अश्वमेध यज्ञ केले. हा कलीचें पारिपत्य करण्यासाठीं गेला असतां कलीच यास शरण आला. तेव्हां कलीला जुगार, मद्य, व्यभिचार, हिंसा व सुवर्ण या ठिकाणीं राहण्यास जागा देऊन त्यास राज्याबाहेर हाकून दिलें. मृगयेसाठीं हा एकदां गेला असतां यास फार तहान लागली. ती भागविण्याकरितां राजा शमीक ऋषीच्या आश्रमांत गेला व पिण्यास पाणी मागूं लागला. यावेळीं शमीक ध्यानमग्न असल्यानें राजाची विनंति त्यास कळली नाहीं. पण राजाला वाटलें हा उद्दामपणेंच आपल्याशीं वागतो आहे. या गैरसमजुतीमुळें राजास ऋषीचा राग आला. या रागांतच राजानें ऋषीच्या गळ्यांत एक मेलेला साप अडकविला व परत निघून गेला. बापाचा अपमान राजानें केला म्हणून ऋषीच्या मुलानें परीक्षिताला 'आजपासून सातवे दिवशीं साप चाऊन मरशील' असा शाप दिला. ऋषीनें राजास दिलेला शाप शिष्याकडून कळविला. शापामुळें राजाला वाईट वाटलें. पुढें त्यानें सुरक्षितपणासाठीं एकखांबी व सात मजली वाडा पाण्यांत बांधला. त्यांत मंत्र जाणणारे लोकांसह राजा जाऊन राहिला. तेथें शुकाचार्यांकडून समग्र भागवत ऐकलें. सातवे दिवशीं राजा एक फळ खात असतां त्यांतून एक लाल अंग

व डोळे असलेली आळी निघाली. ती आळी राजाला चावली व परीक्षित मरण पावला. यानें साठ वर्षे राज्य केलें. मरणसमयीं याचें वय शहाण्णव वर्षांचें होतें.

पलुस्कर, विष्णु दिगंबर (१८७२-१९३१):–महाराष्ट्रांतील एक विख्यात गायनाचार्य. यांचा जन्म इ. स. १८७२ सालीं कुरुंदवाड येथें झाला. त्यांचे वडील कीर्तनाच्या पेशांतले होते. फटाकड्यांच्या भडक्यामुळें यांच्या डोळ्यांस लहानपणीं मोठी कायम इजा झाली व त्यामुळें त्यांना शालेय शिक्षणास कायमचें मुकावें लागलें.

लहानपणींच श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांच्या शिफारसीनें कै. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्या शिष्यमंडळींत त्यांचा प्रवेश झाला. गुरुजींची बारा वर्षें अत्यंत निष्ठापूर्वक सेवा करून त्यांनीं संगीत विद्या उत्तम रीतीनें हस्तगत केली. श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांचा त्यांच्या घराण्यावर पूर्वीपासून लोभ होता; त्यांत विष्णुबुवा गायन शिकूं लागल्यापासून भर पडली.


इ. स. १८९६ सालीं मिरजेस एक संगीताचा सरकारी समारंभ झाला. त्यांत आपल्या गुरुजीस बोलावण्यांत आलें नाहीं ही गोष्ट विष्णुबुवाच्या मनास फार लागली. तेव्हांपासून संगीताला समाजांत सन्मानाचें स्थान मिळवून देण्याची महत्त्वाकांक्षा त्यांनीं मनांत धरली व त्याप्रमाणें त्यांनीं संगीताचें महत्त्व समाजांत बरेंच वाढविलें, ही गोष्ट कोणीहि कबूल करील. या महत्त्वाकांक्षेचा उदय होतांच त्यांनीं गुरुगृह सोडलें व सर्व हिंदुस्थानभर १८९६ ते १९०१ मध्यें प्रवास केला. प्रारंभीं ते आपल्या गाण्यांच्या बैठकी करीत; पण पुढें पुढें त्यांनीं नाटकाप्रमाणें थिएटरांतून तिकिटें लावून जलसे करण्यास सुरवात केली. इ. स. १९०१ सालीं लाहोर येथें गांधर्व–महाविद्यालय ही संस्था स्थापन करून संगीताला समाजांत सन्मानाचें स्थान प्राप्त करून देण्याच्या महत्त्वाकांक्षेला पहिलें मूर्त स्वरूप आणून दिलें. त्यांच्या प्रयत्नामुळें मोठमोठ्या सार्वजनिक समारंभांतून गायन–वादनांच्या कार्यक्रमाचा अवश्य समावेश होऊं लागला.

काँग्रेसचें अधिवेशन सुरू होण्यापूर्वी राष्ट्रगीतें म्हणण्यांत येत; तीं बहुधा विष्णुबुवाच म्हणत असा अनेक वर्षांचा पायंडा पडला होता. इ. स. १९१० सालीं ह्यांनीं मुंबईस गांधर्व महाविद्यालय सुरू केलें. त्यासाठीं सँढर्स्ट रोडवर एक मोठी इमारत बांधली; पण त्या इमारतीच्या कर्जामुळें व इतर कांहीं अडचणींमुळें त्यांना १९२३ सालीं मुंबईचें विद्यालय बंद करावें लागलें. तेव्हांपासून ते नाशिकला राहूं लागले.

गायनविद्येचा प्रसार समाजांत झपाट्यानें व मोठ्या प्रमाणांत व्हावा यासाठीं संगीत लेखनाच्या (Notation) साह्यानें त्यांनीं गायनवादनाचीं अनेक पुस्तकें तयार केलीं. बुवांचा शिष्यगण मोठा आहे. त्यांत श्री. वामनराव पाध्ये, विनायकराव पटवर्धन, नारायणराव व्यास, ओंकारनाथ वगैरे शिष्यांचा प्रामुख्यानें उल्लेख करण्यासारखा आहे.

त्यांच्यावर १९२३ सालीं ओढवलेल्या प्रसंगामुळें त्यांच्या ठिकाणीं भाविकपणा व वैराग्यशीलता दिवसेंदिवस वाढत गेली. ते तुळशीदासांच्या रामायणाचीं पारायणें व प्रवचनें करूं लागले व रामभक्तीच्या चिजा मराठी व हिंदींतून मोठ्या भक्तिभावानें म्हणून संगीताचा उपयोग आध्यात्मिक विकासाकडेहि कसा करतां येतो याचे प्रात्यक्षिक पाठ देत असत. १९२९–३० सालीं ते नेपाळास जाऊन आले. तेथून आल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडली व रक्तक्षयाच्या विकारानें वयाच्या साठाव्या वर्षीं ते मिरज येथें मरण पावले.

पवार, शिवराम गणपत (१८६७–):–यांचा जन्म राहुरीस ता. ३० मे १८६७ ला झाला. यांचीं ट्रेनिंगचीं तीन वर्षें पुरीं झालीं असून सध्यां त्यांनीं पेन्शन घेतलें आहे. अहमदनगरच्या डिस्ट्रिक्ट स्कूल-बोर्डाचे ते एक सभासद आहेत. यांनीं इंग्रजीचें शिक्षण कोणत्याहि शिक्षकाची मदत न घेतां स्वतःच घेतलें. या अर्ध्या कच्च्या झालेल्या (भाषेच्या) ज्ञानाच्या सहाय्यानें त्यांनीं उच्चतर गणिताचें ज्ञान संपादन केलें. तें इतकें उत्तम मिळविलें कीं, त्या विषयावर त्यांनीं मराठी भाषेमध्यें ग्रंथ लिहून, भारतीय ज्योतिर्गणितांत



शि. ग. पवार

जे विषय नाहींत ते उत्तम रीतीनें आणिले. भारतीय ज्योतिर्गणिताची उभारणी श्रुति आणि स्मृति म्हणजे ऐकलेल्या व स्मरणांत असलेल्या सिद्धांतांनीं झालेली आहे. त्यांत बुद्धिगम्य सिद्धांतांची फारच उणीव आहे. ती भरून काढण्याचा योग्य व उत्तम प्रयत्न यांनीं केलेला आहे. यांचें म्हणणें असें आहे कीं, "देशाची बुद्धिमत्ता वाढल्याशिवाय देश उर्जितावस्थेला येणार नाहीं, आणि गणित विषयाशिवाय बुद्धिविकास होणार नाहीं. पदार्थविज्ञान, यंत्रशास्त्र वगैरे शास्त्रें गणित विषयाशिवाय निर्जीव आहेत. तेव्हां देशाची सुस्थिति प्राप्त करून घेण्याकरितां गणित शास्त्राचें ज्ञान वाढविलें पाहिजे. आणि तें मातृभाषेंतूनच वाढेल." हे रैवत पक्षाचे पुरस्कर्ते असून त्याचें सत्यत्व धारवाड व इन्दूर येथील प्रचंड सभांतून त्यांनीं सिद्ध केलें. रैवत पक्षाचें शके १८५१ सालचें पंचांगही त्यांच्याकडून छापलें गेलें. श्री. पवारांनीं गणितावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं कांहीं प्रकाशित असून कांहीं अजून छापावयाचे आहेत. **छापलेले ग्रंथ**–१ करणकौमुदी, २ रेवती योगतारेचा शोध, ३ भूमितीचीं मूलतत्त्वें, ४ सूर्येंदुस्थानमान, ५ जन्मपत्रिका–प्रवर्तन, ६ लग्नसाधनसारण्या, ७ पंचांगकृति–विज्ञान. **न छापलेले ग्रंथ**–१ पंचांग कल्पतरु, २ ग्रहस्थान विज्ञान, ३ उपराग विज्ञान, ४ सूर्य–सिद्धांत अष्टमोध्याय, ५ ग्रहगति–सिद्धांत.

पॅराफिनः–हायड्रोकार्बनच्या एका मोठ्या वर्गास उद्देशून हा शब्द योजतात. पेट्रोलियम् एक प्रकारचे दगडी कोळसे (Coals) व Shale oils यांपासून तयार झालेल्या घन (Solid) स्फटिकाकार (Crystalline) व शुद्ध केलें असतां श्वेतवर्ण धारण करणाऱ्या पदार्थसमूहास उद्देशून हा शब्द सामान्यतः योजतात. इ. स. १८५० सालीं लास्गोच्या जेम्स यंग या गृहस्थानें हा पदार्थ प्रथम व्यापारी धोरणानें (.Scale) तयार केला. त्याला हा डर्बीशायर येथील खाणीमध्यें दाट तेलाच्या स्वरूपांत प्रथम आढळून आला. आल्फ्रेटन (Alfreton) येथें या कार्याची मुहूर्तमेढ रोवण्यांत आली. तथापि लौकरच दक्षिण स्कॉटलंडमध्यें या कार्याचें केंद्र नेण्यांत आलें. या ठिकाणीं Crude Shale oils पासून मोठ्या प्रमाणांत पॅराफिनचा लाभ झाला. पेट्रोलियमपासून पॅराफिन मिळतें, तें अवघें शेकडा दोन या प्रमाणांत. कुजलेल्या झाडाच्या सर्पणापासून (Peat) फारच थोड्या प्रमाणांत पॅराफिन् तयार होतें; लांकडापासूनहि पॅराफिन काढतां येतें. जर्मनीमध्यें उदी रंगाच्या दगडी कोळशापासून (Brown Coal) पॅराफिन हें द्रव्य मोठ्या प्रमाणांत तयार करतां येतें. ही गोष्ट विध्वंसक (Destructive) ऊर्ध्वपातनक्रियेनें (Distillation) साध्य होते.

पॅलेस्टाइनः-अरब व ज्यू यांच्या भांडणांमुळें जगाचें लक्षच आज पॅलेस्टाइनकडे वेधलें असलें तरी खिस्ती धर्माचा संस्थापक एशू खिस्त याची जन्मभूमि म्हणून जगांतील खिस्ती धर्माचे सर्व लोक पॅलेस्टाइनला 'पवित्र देश' अथवा 'पवित्र भूमि' (Holy Land) म्हणून मानतात. दोन हजार वर्षांपूर्वी येथील बेथलेम या शहरीं एशू खिस्ताचा जन्म झाला. याच 'पवित्र भूमींत' त्यानें आपला धर्म स्थापिला, तो लोकांना शिकविला व त्यावेळच्या जगभर त्याचा प्रसार केला. एथील जेरूशलेम या शहरीं त्याचें पवित्र थडगें आहे. ज्यू लोकांची जगप्रसिद्ध 'प्रार्थनेची भिंत' अथवा 'शोक भिंत' (The waling wall or The wall of Prayer) याच शहरीं आहे. येथें याच भिंतीचे पवित्र स्थानीं एका काळीं हजारों ज्यूंची कत्तल करण्यांत आली होती. याच शहरीं मुसलमान–अरबांना पवित्र वाटणारी 'डोम ऑफ् रॉक्' (Dome of Rock) नांवाची प्रसिद्ध मशीद आहे. याप्रमाणें पॅलेस्टाइन म्हणजे खिस्ती, ज्यू व मुसलमान लोकांचें पूजास्थान अथवा देवालयच आहे म्हटलें तरी चालेल.

पॅलेस्टाइनला इतिहासांतील अगदीं पहिलें नांव 'पेलेशेट' असें आहे. डेव्हिड व सॉलोमन या बायबलप्रसिद्ध राजांनीं येथेंच इसवी सनापूर्वी राज्य केलें. इझरेल व ज्यूडा हीं पवित्र राज्यें याच पॅलेस्टाइनचीं होत. ॲसीरिया व बॅबिलोनिया यांची रणभूमी व सुप्रसिद्ध धर्मयुद्धाची (Causades) समरभूमी म्हणूनहि पॅलेस्टाइन प्रसिद्ध आहे. या निरनिराळ्या कालीं पॅलेस्टाइनची हद्द कमी अधिक झालेली आढळते व पॅलेस्टाइन ही संज्ञा कित्येक वेळीं अगदीं संकुचित अर्थानेंहि योजिलेली दिसून येते. महायुद्धानंतरच ही परिस्थिति बदलून आज पॅलेस्टाइनला पॅलेस्टाइन अशी भौगोलिक संज्ञा व राजकीय स्वरूप प्राप्त झालें आहे.

स्थान–पॅलेस्टाइन हा देश भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर व आशिया खंडाच्या पश्चिमेकडील निम-ओसाड देशांच्या मध्यभागीं वसलेला आहे. उत्तर अक्षांश ३२° व पूर्व रेखांश ३५½° हे या देशाच्या मध्य भागांतून जातात. याच्या उत्तरेस सिरिया, पूर्वेस जॉर्डन नदी व त्यापलीकडील वालुकामय प्रदेश, दक्षिणेस सिनाईचें वाळवंट व पश्चिमेस भूमध्य समुद्र आहे.

आकार व आकारमान–अर्वाचीन पॅलेस्टाइनचा आकार शेतकऱ्यानें नांगरलेल्या शेतांतील एखाद्या सरीप्रमाणें आहे. ही सरी दक्षिणोत्तर पसरलेली असून तिचा उंच भाग मध्यभागीं व उतार पूर्वेस व पश्चिमेस आहे. या प्रदेशाची लांबी सुमारें १४० मैल असून उत्तरेस कमींत कमी रुंदी २३ मैल व दक्षिणेस भूमध्यसमुद्रापासून वाळवंटासुद्धां सुमारें १०० मैल आहे. एखादा मनुष्य मोटारींतून उत्तरेहून सकाळीं निघाल्यास दुपारचे आंत दक्षिणमर्यादेपर्यंत सहज येऊन पोचतो; तर जाफा बंदरांतून पूर्वेस जॉर्डन नदीस पोंचण्यास अवघे तीन तास पुरे होतात. इतका हा देश लहान आहे. याचें ब्रिटिशांचे देखरेखीखालील (Mandate) जॉर्डन नदीचें पश्चिम विभागचें क्षेत्रफळ ९००० चौ. मैल असून जॉर्डनच्या पूर्वेच्या ओसाड प्रदेशाचा यांत समावेश केल्यास सर्व देशाचें क्षेत्रफळ १८००० चौ. मैल आहे. म्हणजे हा देश इंग्लडच्या एकतृतियांशाएवढा, व वेल्सपेक्षां किंचित् मोठा आहे. लोकसंख्या सुमारें तेरा लक्ष म्हणजे मुंबई शहरापेक्षां थोडी अधिक आहे.

स्वाभाविक रचना–पॅलेस्टाइन हें एक पर्वतमय २००० फूट उंचीचें पठार आहे. याचा मध्यभाग उत्तरेकडे असलेल्या लेबॅनॉन नामक पर्वताच्या रांगांचा बनला असून त्यांतील माउंट हरमॉन या अत्युच्च शिखराची उंची ९००० फूट आहे. यावर हिंवाळ्यांत बर्फ पडतें. दक्षिणार्धांतील रांगेस ज्यूडिया पर्वताची रांग असें नांव असून त्याची सरासरी उंची ४००० फूट आहे. या रांगांच्या पश्चिमेकडील भाग क्रमाक्रमानें भूमध्य समुद्रास लागून असणाऱ्या किनारपट्टीकडे सखल होत गेला असून किनाऱ्यालगत असणाऱ्या मैदानापूर्वी बऱ्याच टेकड्यांचा प्रदेश निर्माण झाला आहे. पठाराचें खडक चुनखडीचे बनलेले असल्यानें पर्वतांवरील नद्यांच्या पाण्यानें चुनखडीचा भाग शिजून जाऊन कठीण भाग टेकड्यांच्या रूपानें शिल्लक राहिलेला आहे. पॅलेस्टाइनचा दोनतृतियांश भाग याच बाजूला आहे. पठाराच्या पूर्व बाजूचा उतार अगदीं आकुंचित असून या भागांत अनेक उंच कडे व खोल दऱ्या प्रामुख्यानें आढळतात. पॅलेस्टाइनमधील जगप्रसिद्ध जॉर्डन नदीचें खोरें याच कड्यांच्या व दऱ्यांच्या पूर्वेस आहे. जॉर्डन ही नदी माउंट हेरॉनच्या उतरणीवर सुमारें ३००० फूट उंचीवर उगम पावून हुलेह व गॅलिलीच्या सरोवरांतून दक्षिणेकडे वहात जाऊन समुद्रसपाटीखालीं १२९२ फूट असलेल्या मृतसमुद्रास मिळते. खिस्ती लोक या नदीस फार पवित्र मानतात. त्यांची ती जणुं काय गंगाच होय.

पॅलेस्टाइनचें दक्षिणोत्तर पसरलेले पांच स्वाभाविक विभाग पडतात. (१) पश्चिमेकडील किनारपट्टी, (२) ६०० फुटाचें त्यालगतचें मैदान, (३) मध्य डोंगराळ पठार, (४) जॉर्डनचें सखल खोरें व (५) सिरियाकडील ओसाड टेकड्यांचा प्रदेश.

किनारा दीडशें मैलाहून लांब असला तरी तो दंतूर नाहीं; अगदीं नाकासारखा सरळ आहे. यामुळें मोठीं व पुष्कळ बंदरें नाहींत. जाफा व हैफा हींच काय तीं दोन विशेष महत्त्वाचीं आहेत.

हवामान–स्वाभाविक रचनेप्रमाणेंच पश्चिमेकडून पूर्वेकडे हवामानाप्रमाणें चार विभाग पडत असले तरी सर्व विभागांत उष्ण व कोरडे उन्हाळे व दमट, थंड पावसाळी हिंवाळे असे दोन ऋतू स्पष्टपणें आढळतात. किनाऱ्यालगतचे मैदानांत हवा समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यामुळें समशीतोष्ण आहे तर मध्यभागच्या उंचवट्यावर उन्हाळे कडक व हिंवाळे थंड असतात व हवा विषम असते. जेरूशलेमसारख्या शहरीं उन्हाळ्यांतील दिवसाच्या कमाल व किमान उष्णतामानांत २३° फॅ. इतका फरक पडतो; तर हिंवाळ्यांत तोच १४.५° फॅ. इतका होतो. डिसेंबर ते मार्चपर्यंत हा भाग पाऊस व थंडगार वारे यांमुळें अतिशय थंड असतो. वरचेवर बर्फ पडतें; पण फार वेळ व फार दिवस टिकत नाहीं. पावसाची सरासरी २५ इंच असली तरी एकसारखा तीन चार दिवस असा पाऊस कधींच पडत नाहीं. पावसाचें प्रमाण पश्चिमेकडून पूर्वेकडे कमीकमी होत जातें; कारण सर्व पाऊस भूमध्य समुद्रावरून वाहणाऱ्या नैर्ऋत्य प्रतिव्यापारी वाऱ्यांमुळेंच पडतो.



एक शेतकऱ्याची मुलगी.

वसंत ऋतू सुरू होतांच सर्व देश जादूची कांडी फिरविल्याप्रमाणें हिरवागार दिसूं लागतो. सर्व ठिकाणीं गवत उगवतें व टेकड्या फुलांनीं गजबजून जातात. पण मेचा उन्हाळा सुरू होतांच फुलें सूर्याच्या प्रखर उष्णतेनें जळून जातात, गवत वाळून जातें व सर्व देश वैराण दिसूं लागतो. फक्त जेथें कालव्याच्या अगर विहिरीच्या पाण्यावर पिकें अगर गवत जगविलें असेल तोच काय तो भाग सर्व वर्षभर हिरवा दिसतो.

ज्या ठिकाणीं माती सोइस्कर असेल व जेथें भांडवल उभारणें शक्य असेल तेथें अलिकडे ज्यू लोकांनीं सुधारलेल्या पद्धतीनें नांगरून व पेरून शेती करण्यास सुरवात केली असली तरी त्याचें प्रमाण अद्याप फारच थोडें आहे. बहुधा सर्व शेती बायबलकालीन लाकडी नांगरानें शेत नांगरून व खुर्प्यानें धान्य कापूनच—म्हणजे अगदीं प्राचीन व मागासलल्या पद्धतीवरच केली जाते. नोव्हेंबरमध्यें पाऊस सुरूं होतांच शेतकरी आपलें गाढव, उंट, खेंचर अगर बैल घेऊन शेतावर जातो व जमीन नांगरून त्यांत गहूं, जव, सातू, घेवडा यापैकीं एखादें धान्य पेरतो. जमीन कठीण असल्यानें पाऊस पडल्याशिवाय नांगरणें शक्य नसतें. नांगरास एक अथवा दोनच गाढवें अथवा बैल असतात. यामुळें सऱ्याहि उथळच पडतात. माती तेलकट तांबूस रंगाची असून ती फार खोलहि असत नाहीं. म्हणून खोल सऱ्या काढणें शक्य होत नाहीं. पुनः एकदां नांगरून धान्य मातींत मध्यंतरीं जरूर तर मिसळावें लागतें. पिकास कालव्याच्या पाटाचें अगर विहिरीचें पाणी पाजवितात. विहिरीचें पाणी विहिरीस रहाटगाडगें लावून वर काढतात. रहाटास लाकडाच्या बादल्या दोरीनें बांधून त्यांची माळ विहिरींत सोडतात. रहाट उंटाकडून अथवा गाढवाकडून फिरवितात. धान्य पिकून मळणीस आलें कीं, दातेरी कोयत्यानें अथवा खुर्प्यानें तें कापतात व खळयावर नेऊन टाकतात. खळयावर खांबास बैल अथवा गाढव शेजारीं शेजारीं उभा करून त्यांस खांबाभोंवतीं फिरवितात. बैलांच्या व गाढवांच्या खुरांस लोखंडी नाल असतात, त्यामुळें धान्य कणसांपासून लौकरच वेगळें होऊन पडतें. भुस्कटासकट असलेलें हें धान्य नंतर वाऱ्याची झुळुक येतांच वारवितात व मग धान्य गहूं, जव, सातु, जें असेल तें—घरीं खाण्यास नेतात. पावसाचें मान कमी असल्यानें शेतकऱ्यांस फार कष्ट करावे लागतात. तसेंच जमीन विशेष सुपीक नसल्यानें खत घालून न पेरतां जमीन तशीच कांहीं काळपर्यंत सोडून, जमीनीचा कस वाढवावा लागतो. सर्व जनावरांच्या शेणाचा उपयोग वाळवून खत म्हणून करतात. इजिप्शिअन सिगारेटला उपयुक्त अशा तंबाखूचीहि लागवड अलिकडे मोठ्या प्रमाणांत केली जाते. पॅलेस्टाइनचीं मुख्य पिकें गहूं, द्विदल धान्यें, तीळ, मका, वाटाणे, तंबाखू व फळें हीं आहेत. ऑलिव्ह झाडांचे फळांपासून तेल व मारगराइन काढतात व साबण तयार करतात.

लोक व त्यांची राहाणी—पॅलेस्टाइन हा देश युरोप, आफ्रिका व आशिया म्हणजे जुन्या जगाच्या मध्यभागीं असल्यानें येथें अनेक जातींचें, धर्मांचें, पंथाचें व अनेक भाषा बोलणारे लोक आढळतात. हे सर्व कॉकेशिअन जातिवंशाचे व पांढऱ्या कातडीचे असले तरी त्यांच्या रक्तांत बरीच भेसळ झाल्याचें दिसून

येतें. यांत अरब, तुर्क, ग्रीक, सरकॅशिअन, खुर्द, इजिप्शिअन व सिरीयन जाति मुख्यतः प्रामुख्यानें दिसून येतात. यांच्यांत सर्वांत जास्त संख्या मुसलमान लोकांची असून त्या खालोखाल ख्रिश्चन व सर्वांत कमी ज्यूंची आहे. ज्यू लोकांनीं १८८० पासून येथें वसाहत करण्यास सुरवात केली व आज त्यांची संख्या सुमारें चार लाखांवर गेली आहे. १९३७ सालीं ज्यूंच्या वसाहतीस येणाऱ्या संख्येवर नियंत्रण घातलें असून आतां दरवर्षीं बारा हजारांपेक्षां अधिक ज्यू पॅलेस्टाइनमध्यें घ्यावयाचे नाहींत असें ठरलें आहे.

साधारणतः पॅलेस्टाइनमधील लोक पांढऱ्या रंगाचे, उंच सडपातळ बांध्याचे, उभट चेहऱ्याचे, सरळ लांब नाकाचे, निळया व भुऱ्या डोळयांचे व बळकट शरीराचे आहेत.

(१) शहरांतून राहणारे लहानमोठे व्यापारी, धंदेवाईक, वकील, डॉक्टर, शिक्षक, पेढीवाले व धर्मोपदेशक (२) खेड्यांतून राहणारे शेतकरी व धनगर व (३) भटक्या वृत्तीनें जॉर्डन नदीच्या खोऱ्यांत व त्याच्या पूर्वेच्या प्रदेशांत राहणारे बेडॉइन नांवाचे लोक असे पॅलेस्टाइनच्या लोकांचे तीन भाग पाडतां येतील. शहरांतील धंद्याच्या वाढीमुळें, तेथें मिळणाऱ्या संरक्षणामुळें व खेड्यांतील जमीनी व्यक्तीच्या मालकीच्या झाल्यानें खेड्यांतील लोकसंख्या दिवसेंदिवस घटत असून शहरांची वाढत आहे. तथापि खेड्यांतील राहणी अगदीं नमुनेदार आढळते. ती अशी:—

घरें—शेतकऱ्याचें घर म्हणजे एक मोठी खोली. याच खोलींत घरांतील सर्व माणसें व जनावरें राहतात. खोलीची तीनचतुर्थांश जागा माणसांस व बाकीची जनावरांस उपयोगांत आणतात. जनावरांपेक्षां माणसांची जागा थोडी उंच असते. उंचवट्यावर दगड विपुल असतात. म्हणून तेथील घरांच्या भिंती दगडांच्या केलेल्या असतात. पण खालीं मैदानावर दगड कमी व माती अधिक म्हणून तेथील घरांच्या भिंती चिखलाच्या बांधतात. उंचवट्यावरील चुनखडीमध्यें इमारती लाकडाचीं झाडें येत नाहींत; पण तीं मैदानांवर येतात म्हणून तेथील घरांच्या पश्चिम बाजू पश्चिमेकडून येणाऱ्या पावसापासून सुरक्षित राहाव्यात म्हणून लाकडी कुडांच्या बांधतात व छपरावर लाकडी तुळया घालून त्यावरून चिखल माखून माळवदें तयार करितात. हिवाळयांतील पावसाच्या अखेरीस हीं माळवदें



ज्यू पुराणिक

गवतानें हिरवींगार होतात व हें गवत खातांना माळवदावर पुष्कळदां बकरीं दिसतात. उंचवट्यावरील छपरें दगडांचीं व चुन्याचीं बांधावीं लागल्यानें तीं सपाट असूं शकत नाहींत. तीं मशिदीच्या गोल घुमटांसारखींच बांधावीं लागतात व यांस पुष्कळ दगड व चुना लागल्यानें हे घुमट फार वजनदार असतात. अर्थात् त्यांना तोलण्यास त्यांच्या खालच्या भिंतीहि जाड असाव्या लागतात. म्हणून येथील घरांच्या भिंती कमींत कमी तीन फूट तरी रुंदीच्या असतात. या जाडीमुळें साहजीकच या ओसाड प्रदेशांत लुटारू टोळयांपासून संरक्षण होतें. उन्हाळयांत आंतील बाजू थंड व हिवाळयांत ऊबदार राहूं शकते. घर लुटारू टोळयांपासून संरक्षण व्हावें या दृष्टीनेंच बांधलेलें असल्यानें यास धुराडें अथवा खिडक्या असत नाहींत. खिडकी असलीच तर ती इतकी उंच असते कीं शत्रूला त्या उंच खिडकीवाटे खोलींत गोळी झाडतां येत नाहीं. याचाच उपयोग धुराड्यासारखा होऊं शकतो. यांतूनच काय येईल तेवढी हवा व उजेड मिळावयाचा. यांना तावदानें असत नाहींत. अगदीं गरीबाच्या घराचे दरवाजेसुद्धां संरक्षणार्थ अगदीं बळ-

कट व जाड लाकडाचे केलेले असतात. वरील परिस्थितीमुळें घर इतकें अंधारें, अडचणीचें व धुरानें भरलेलें असतें कीं, एखाद्याला तेथें राहावेंसेंसुद्धां वाटणार नाहीं व म्हणूनच हे लोक सदासर्वकाळ घरांत राहात नाहींत व निजतहि नाहींत. जरूर तेव्हांच व तेवढाच त्याचा उपयोग करतात. घराचा घुमट बांधून झाला कीं तो ज्या चार भिंतींवर आधारलेला असतो त्या तशाच वरपर्यंत घुमटाच्या उंचीपर्यंत बांधतात व घुमट व भिंतीच्यामधील खोल जागा दगडामातींनीं भरून काढून सपाट करतात व येथें उन्हाळ्याच्या रात्रीं निजतात व थंडगार हवेच्या दिवशीं बसतात.यावर कधीं कधीं द्राक्षांचे वेलींचा मांडव घालतात व राहण्यास एक खोलीच तयार करतात. येथेंच खरोखर हे लोक वर्षांतील बरेच दिवस व बराच वेळ राहतात. येथें येण्यास घराचे बाहेरूनच एक कायमचा जिना केलेला असतो. या छपरावर कुटुंबास लागणाऱ्या जिनसांची साठवण केलेली असल्यानें वर येण्यास शिडीचाच उपयोग अधिक श्रेयस्कर ठरवितात. कारण ती जरूर तेव्हां लावतां येते. व काढतांहि येते, व शत्रूपासून माणसांचें, धान्याचें, जळणाचें, सर्वांचेंच संरक्षणहि होतें. पावसाळ्यांत या घरांतून राहणें अनदीं जिवावर येतें. जनावेरें जरी बाहेर गवतावर चरत असलीं तरी घराचीं छपरें गळत असतात व सारें घर पाण्यानें ओलें झालेलें असतें. पण ही स्थिति सहसा एकदोन दिवसांपलीकडे टिकत नाहीं. शेतकऱ्याच्या घरांतील सामान म्हणजे गवताच्या अगर वेताच्या बसावयाच्या चटया, स्वयंपाकाचीं जेवणाचीं भांडीं, तवे व कढया, पाणी साठविण्याचीं रांजणें, तेल, मध, लोण्याच्या बरण्या, गवत मातीच्या केलेल्या धान्याच्या कणगी, दळण्याचें जातें, व दगडाची चूल.

अन्न- सकाळीं न्याहारी चपाती व खजूर अगर अंजीर अगर द्राक्षें, दुपारीं थोडीं अधिक चपाती, थोडी कॉफी, एखादे वेळीं कोकराचें भाजलेलें मांस. रात्रीचें जेवण मात्र गरमगरम मांस, भाज्या व भात अगर डाळ यांनीं युक्त असतें. चपातीबरोबर ऑलिव्हचें तेल, कधीं मध व लोणीहि खातात. पावसाळ्याखेरीज इतर ऋतूंत स्वयंपाक उघड्यावरच करतात. मिळेल तेथें लाकूड व चिपाडांवर स्वयंपाक करतात. जेथें हें मिळत नाहीं तेथें शेण वाळवून त्याच्या विस्तवावर करतात.

बहुतेक सर्व मोठ्या खेड्यांतून पाहुण्यांची जेवणाखाणाची व राहाण्याची चांगली सोय केलेली असते. पाहुण्याचें आदरातिथ्य करण्यांत येथील लोक जगप्रसिद्ध आहेत. खेड्याचा मुख्य जो शेख तो पाहुण्यांच्या खोलीची व तेथील साधनसामुग्रीची, खाण्यापिण्याची वगैरे व्यवस्था पाहातो. खेड्यांतील एखाद्या मुख्य घराच्या वरच्या मजल्यावर ही खोली असते. येथें प्रवासी पाहुणा येतो, जेवतो, राहतो व जातो. त्याच्या जनावराची—घोडें, उंट अगर खेंचर—खाण्यापिण्याची चांगली व्यवस्था करण्यांत येते. पाहुणा उच्च दर्जाचा असेल तर त्यास भाजलेलें कोकराचें मांस अगर कोंबडीचीं पिलें, गोड, दाट व काळी कॉफी व ताजीं व सुकीं फळें देतात. कमी दर्जाच्या लोकांस चपाती, ऑलिव्ह फळें, अंडीं, इतर फळें व कॉफी देतात. याप्रमाणें स्वागताची ही अब्राहमपासूनची पद्धत अद्याप जशीच्या तशी येथें चालू आहे.

पोषाख—शेतकऱ्याचे पोषाखांत डोक्यावर खांद्यावर लोंबत सोडलेले पांढरें अगर काळें एक वार लांबीरुंदीचें, डोक्यावर काळ्या लोकरीच्या गोल वेटोळ्यानें घट्ट बसविलेलें फडकें, सैलसा पांढऱ्या अगर काळ्या लोकरीचा पायघोळ अंगरखा, कमरेभोंवतीं बांधलेला लोकरीच्या दोरीचा जाड कमरपट्टा, सैल विजार अथवा धोतर व पायांत बूट हीं प्रामुख्यानें दिसून येतात. हिवाळ्यांत एकापेक्षां अधिक व लोकरीचें कपडे वापरतात. वाहतुकीचा धंदा करणारे लोक फक्त डोळे उघडे ठेवून तोंडाभोंवतीं डोक्यावरचेंच फडकें लपेटून घेतात. त्यामुळें नाकांतोंडात धूळ जात नाहीं. स्त्रिया कमरेपर्यंतचा जाड, लांबरुंद असा एक परकर, त्यावर कोटवजा मनगटापर्यंत अस्तन्यांचा ब्लाउज, व त्यावरून पुरुषांसारखेंच पण किंचित् मोठें असें डोक्यावरून गुडघ्यापर्यंत सहज पोचणारें फडकें व पायांत बूट अथवा जोडे वापरतात. मोठ्या मुलांचा पोषाख पुरुषांप्रमाणेंच असतो. फक्त कधीं कधीं त्यांस तुर्की टोपी घालतात. धनगराच्या खांद्यावर बंदूक, काठी व कांखेला एक पिशवी असते. बहुतेक अरब दाढी राखतात. स्त्रियांना चांदीचे दागिने घालण्याची फार मोठी हौस असते. मुख्य दागिने म्हणजे पायांतील वाळे व हातांवरील तोरड्या हे होत. स्त्रियांच्या कमीअधिक दागिन्यांवरून त्यांच्या नवऱ्याची गरीबीश्रीमंती ओळखली जाते. ज्यू लोक व शहरांतील अरब लोक युरोपिअन पद्धतीचा पोषाख करतात.

चालीरीति—हवा अति उष्ण व धोक्याची असल्यानें अरब लोकांत एक चमत्कारिक चाल अस्तित्वांत आलेली आढळते. हे लोक नमस्कार करतांना व आदर दर्शवितांना युरोपिअनांप्रमाणें डोक्याचें वस्त्र काढीत नाहींत. तसें करणें धोक्याचें असतें. म्हणून हे लोक पायांतील जोडे अगर बूट काढतात व आदर दर्शवितात व असें करणें सोपें जावें म्हणून बुटांना जोड्याप्रमाणें टांचा असत नाहींत. पुरुषाचें बूट बहुधा तांबड्या रंगाचे व स्त्रियांचे पिवळसर रंगाचे असतात. अरब लोक मुलग्यास मुलीपेक्षां अधिक मानतात. मुलगा म्हणजे जीव कीं प्राण. कारण तोच पुढें कुटुंबाचें संरक्षण करणारा व संपत्ती मिळविणारा व वाढविणारा असतो ही भावना. मुलगी काय खाणार पिणार व लग्न झाल्यावर कुटुंबाला मुकणार. बोलून चालून ती दुसऱ्याचीच. या समजुतीमुळें कित्येक लोक आपल्या मुलांस दृष्ट लागूं नये म्हणून मुलीचाच पोषाख घालतात व गळयांत निळया रंगाच्या दृष्टीच्या मण्यांची माळहि पण घालतात.

मुलांना लहानपणापासूनच आपल्या आईबापांना त्यांच्या शेतकामांत मदत करण्यास शिकवितात; म्हणून तीं फार खेळहि खेळत नाहींत. खेळलींच तर गोफणी मारण्याचें, खेंचरावर बसणें, लांडग्यापासून कळपांचें संरक्षण करणें, असले खेळ म्हणजे मोठेपणीं त्यांना कराव्या लागणाऱ्या कामांची एक प्रकारची तालीम देणारेच खेळ तीं खेळतात. मुली आयांना दळण्यास, पाणी आणण्यास व स्वयंपाक करण्यास मदत करतात.

भटक्या वृत्तीनें राहणाऱ्या बेडॉइन लोकांचा जीवनक्रम स्थायिक लोकांच्या जीवनक्रमाहून बराच निराळा असतो. हे लोक साधारणतः शंभर शंभरांच्या टोळया अगर जमाती करून राहतात. यांचा मुख्य धंदा लुटालुटीचा. पण कित्येक लोक वाळवंटाच्या कडेवर असलेल्या देशांशीं थोडाफार व्यापार करून व कांहीं मेंढ्या, बकरीं, गुरें व उंट यांचे कळप बाळगूनहि राहतात. मात्र ते स्थायिक असे कोठेंच रहात नाहींत. ते नेहमीं लोकरीच्या कापडाच्या तंबूंत रहातात. एकेका टोळीचें सुमारें वीसपंचवीस तंबू असतात व एकेका तंबूंत साधारणतः पांच सहा माणसें राहतात. ते सर्व शेख नामक आपल्या पुढाऱ्याच्या हुकमतींत वागतात. जमातींतील वयोवृद्ध व लढवय्यांच्या संरक्षणाखालीं हे लोक पंधरवड्यास आपला मुक्काम बदलतात. असा मुक्काम बदलत बदलत पावसाळयांत वाळवंटाचें पूर्वभागीं व उन्हाळयांत पुनः टेकड्या, व दऱ्याखोऱ्यांतून लुटालूट करीत परत फिरतात. यांची टोळधाड बहुधा मे अगर जूनमध्यें मध्यभागच्या टेकड्यांवरील खेड्यांवर यावयाचीच. कारण याच वेळीं शेतकऱ्यांनीं आपलीं धान्यें मळणी करून घर भरून ठेवलेलीं असतात. कित्येक वेळीं खळयांतच धान्य लुटून नेतात. हे आपलें सर्व सामानसुमान उंटाच्या पाठीवर लादतात व मुक्काम करीत जातात. लुटालूट मात्र घोड्यावरून करतात. लुटारू बंदुकांचा उपयोग करतात. पावसाळयांत लुटालूट बंद असली म्हणजे कळपांतील मेंढरें, गाई व उंट यांवरच आपल्या सर्व गरजा हे भागवितात. त्यांचें दूध पितात, मांस खातात व लोकरीचें विणून कापड तयार करतात. टोळयाटोळयांमध्येंहि कधीं कधीं मारामारी होते. ब्रिटिशांच्या मँडेटरी अंमलापासून हे लोक आतां हळूं हळूं आपली भटकी वृत्ती सोडून स्थायिक होऊं लागले आहेत.

धर्म—पॅलेस्टाइनमध्यें अरब सुमारें दोनतृतीयांश व ज्यू व ख्रिश्चन सुमारें एकतृतीयांश आहे. अरबांचा धर्म इस्लाम असून ते महमंद पैगंबराचे अनुयायी आहेत. ज्यू व ख्रिश्चन रोमन कॅथॉलिक पंथाचे आहेत. या दोघांचे धर्म व पंथ वेगवेगळे असल्यानें बहुधा ते शहराच्या व खेड्यांच्या निरनिराळया भागांत राहतात. तरीहि त्यांच्यांत अनेक वेळ तंटे होतात. जो तो आपआपल्या धर्मगुरूंकडून आपआपलीं धर्मकृत्यें करतो. प्रार्थनामंदिरें व मशिदी दर खेड्यांत व शहरांत आहेत.

शिक्षण—एकोणिसाव्या शतकापर्यंत सर्व शिक्षण धर्मगुरूच देत. विसाव्या शतकांत तुर्की सरकारनें आपल्या शाळा मुसलमानांकरतां स्थापिल्या. पण त्या ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या शाळांपेक्षां कमी होत्या व शिक्षणहि हलक्या दर्जाचें होतें. सर्वांत चांगल्या शाळा ज्यू लोकांच्या असून त्यांचा सुशिक्षितांत पहिला नंबर आहे. अगदीं अलिकडे एक अमेरिकन कॉलेज व जोसेफ युनिव्हर्सिटी स्थापन झालीं असून उच्च शिक्षणाची सोय झाली आहे. वकील, डॉक्टर, शिक्षक युरोपांतहि जाऊन शिकून येतात व यांत ज्यूंचा भरणा अधिक दिसून येतो. अमेरिकन व युरोपिअन मिशनरी संस्थांनीं दवाखाने व शिक्षणसंस्था स्थापून लोकांना आरोग्यशास्त्राचें व वैद्यक शास्त्राचेंहि शिक्षण दिलें आहे. शहरांतून इंग्रजी शिकविलें जातें व तेथें लोक अरबी

व इंग्रजी अशा दोन्ही भाषा बोलतात. पण खेड्यांतून अरबी भाषेचाच उपयोग करतात.

राज्यव्यवस्था–महायुद्धानंतर पॅलेस्टाईन प्रांत निराळा करून त्याची देखरेख राष्ट्रसंघानें ब्रिटिशांचेकडे दिली. या व्यवस्थेप्रमाणें एक हायकमिशनर व कमांडर–इन्–चीफ हे राज्यव्यवस्था पहातात. १९२२ सालीं बावीस लोकांचें एक कौन्सील स्थापण्यांत आलें असून त्यांतील बारा सभासद लोकनियुक्त असतात. ज्यू लोकांचें एक लोकनियुक्त मंडळ असून या मंडळांतील सभासद ते वरील कौन्सिलांत पाठवितात. परंतु, पॅलेस्टाइनमधील ज्यूंची संख्या सारखी वाढत असल्यानें व पॅलेस्टाइन आपल्या हातचें एक दिवस जाईल अशी अरबांना भीति वाटत असल्यानें अरबांस ही व्यवस्था पसंत नाहीं व ती बदलून आपणांस हवी तशी स्वतंत्र राज्यव्यवस्थेची मागणी त्यांनीं सारखी चालविलेली आहे. यामुळें पॅलेस्टाइनमध्यें बरीच राजकीय अस्वस्थता माजली आहे. ज्यू–पॅलेस्टाइन, अरब–पॅलेस्टाइन व ब्रिटिशांच्या देखरेखीखालचा मुलूख असे पॅलेस्टाइनचे तीन राजकीय विभाग करण्याचीहि एक योजना ब्रिटिश रॉयल कमिशननें पुढें आणलेली आहे.



जेरुशलेमचें विहंगम दृश्य. मध्यें प्रख्यात चर्च आहे.

दळणवळण व व्यापार–एकावेळीं पॅलेस्टाइनमध्यें दळणवळण मोठ्या कष्टानें करावें लागे. पण तुर्कांनीं महायुद्धकालीं रेलवे बांधण्यास सुरवात केली व तीच योजना पुढें लढाईनंतर ब्रिटिशांनीं पूर्ण केली. पॅलेस्टाइनमधून रेलवेनें आज आशिया मायनर, ईजिप्त व अरबस्थानला जातां येतें. दक्षिणभागीं हिंदुस्थान-आस्ट्रेलियाकडे जाणारीं विमानें थांबण्याकरतां विमान गृहें बांधलीं असून वैमानिक दळणवळणाचा फायदा–टपालाच्या योगानें–पॅलेस्टाइनला मिळत आहे. सर्व देशभर सडका बांधल्या असून मोटारीनें सिरीया, जॉर्डेनियावर मेसोपोटेमियाला जातां येतें. भूमध्यसमुद्रावरील सर्व बंदरांशीं हैफा व जाफा या बंदरांच्या द्वारें दळणवळण ठेवतां येतें व मृतसमुद्र व गॅलिलीच्या सरोवरावर मोटारबोटीनें वहातूक सुरू आहे. ब्रिटिशांनीं ब्रिटिश पोस्ट पद्धतीवर पोष्ट, तार व टेलिफोन खातीं उघडलीं असून इजिप्तमार्फत ब्रिटन व समुद्रावरील जहाजांशीं बिनतारायंत्रांनींहि दळणवळण ठेवतां येतें. सर्व पोस्ट ऑफिसांतून लोकांच्याकरतां टेलिफोनची सोय केलेली आहे.

जाफाचीं नारिंगें, साबण, दारू, सातू, क्षार व फळें हीं परदेशीं विशेषतः ईजिप्त, ग्रेट ब्रिटन, सिरीया व अमेरिका या देशांना रवाना होतात. आयात मालांत सुती कापड, साखर, पेट्रोल, कोळसा, रवा, लोखंडी व पोलादी सामान व यंत्रें, इमारतीचें लाकूड, सिगारेट व सीमेंट यांचा मुख्यतः समावेश होतो व हा माल ग्रेटब्रिटन, जर्मनी व ईजिप्त या देशांकडून पुरवला जातो.

त्रोटक इतिहास-प्राचीन–फार प्राचीन कालीं पॅलेस्टाइनला कॅनान व फिलिशिया अथवा पेलेशेट असें म्हणत. पॅट्रिआर्कांच्या कालीं पॅलेस्टाइन स्वतंत्र टोळयांच्याच ताब्यांत होता. परंतु खि. पू. अकराव्या शतकांत साउल राजानें तें एकत्रित करून तेथें राज्य स्थापन केलें. तेंच पुढें क्रमानें डेव्हिड व सॉलोमन यांचेकडे आलें. खि. पू. दहाव्या शतकांत उत्तरेस इझरेल व दक्षिणेस ज्यूडाह असे त्याचे दोन भाग पडले. खि. पू. ७२२ सालीं इझरेलचा असिरियानें पराभव केला व खि. पू. ५८६ त बॅबिलोनियानें ज्यूडाह जिंकून घेतला. यानंतर शिकंदर, खि. पू. ३१२ सालीं टॉलेमी, खि. पू. १९८ च्या सुमारास



उमरची मशीद, जेरुशलेम.

सैन्यानें पॅलेस्टाइनचा ताबा घेतला व युद्ध संपतांच हळूहळू व्यवस्था व शिस्त पुन्हां स्थापन झाली. १९२२ सालीं राष्ट्रसंघानें पॅलेस्टाइन ब्रिटिशांच्या देखरेखीखालीं दिला. पण अरबांची समजूत आपला देश ज्यू लोकांचें राज्य बनणार अशी झाल्यानें १९२३ पासून त्यांनीं ज्यूंच्या आयातीवर नियंत्रण घालण्याकरतां हरताळ, बहिष्कार व डेप्यूटेशन असे अनेक उपाय योजले. पण विशेष उपयोग झाला नाहीं. ज्यू लोकांनीं आपली संघटना करून एक स्थानिक लोकसभा स्थापन केली व तिचे मार्फत कौन्सीलचे सभासद निवडून दिले. अरबांनींहि आपली एकजूट केली.

अँटीओकास, खि. पू. १९३ च्या सुमारास जोनाथन व खि. पू. ६३ च्या सुमारास पँपे असे राजे होऊन गेले. खिस्ताचे वेळीं पॅलेस्टाइनचे गॅलीली, सॅमॅरिया, ज्युडिया व पेरेइया असे चार भाग असून ते रोमन साम्राज्याच्या आधिपत्याखालीं होते. इ. स. ३९५ मध्यें रोमन साम्राज्याची जी विभागणी झाली त्यांत पॅलेस्टाइन पूर्वेकडच्या राजाच्या ताब्यांत गेलें व पुढें सातव्या शतकामध्यें मुसलमानांच्या हातांत पडलें. या शतकांत मुसलमानांनीं खिश्चनांचा छळ फार केला. खिस्ती देवालयें व मठ जाळण्यांत आले. इ. स. ९९६ त हकीमबि–अम्रिल्ला यानें खिस्ताच्या कबरीचा नायनाट केला. १०७२ त तुर्कांनीं पॅलेस्टाइनवर स्वारी केली. यानंतर तेराव्या शतकापर्यंत तुर्कांचे तावडींतून पॅलेस्टाइन ही पवित्रभूमी सोडवून घेण्याकरतां धर्मयुद्धें झालीं. पण पॅलेस्टाइनची सुटका झाली नाहीं. पॅलेस्टाइन तुर्कांच्याच ताब्यांत राहिलें.

अर्वाचीन–इ.स.१५१६ ते १८३१ पर्यंत पॅलेस्टाइन तुर्कांच्याच ताब्यांत राहिलें; पण त्या सालीं एकरचा शेख व इजिप्तचा सुलतान यांच्यांत बेबनाव होऊन पॅलेस्टाइन इजिप्तच्या ताब्यांत गेलें. पण १८४० त तुर्कांनीं इंग्लंड, फ्रान्स व ऑस्ट्रियाच्या मदतीनें तें पुन्हां परत मिळविलें व तें महायुद्ध संपेतोंपर्यंत त्यांचेचकडे राहिलें. १९१७ सालीं डिसेंबर महिन्यांत ब्रिटिश

याचा परिणाम उभयतांच्या चकमकींत झाला. १९३६ मध्यें तर हें भांडण इतकें विकोपास गेलें कीं ब्रिटिशांना सैन्याची कुमक मागवावी लागली. अरबांनीं १७५ दिवसपर्यंत संप पुकारला व पॅलेस्टाइनच्या प्रश्नाचा विचार करण्याकरतां आर्म्सबीगोरचें अध्यक्षत्वाखालीं नोव्हेंबर १९३६ ला रॉयल कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशननें ज्यूंच्या आयातीवर थोडें नियंत्रण घातलें, पण त्यामुळें अरबांचें समाधान झालें नाहीं. जुलै १९३७ ला पॅलेस्टाइनचें ज्युयिश पॅलेस्टाइन, अरब पॅलेस्टाइन व ब्रिटिश मॅंडेटरी पॅलेस्टाइन असे तीन भाग पाडण्याची योजना ब्रिटिशांनीं जाहीर केली. पण ती ज्यू व अरब या दोघांसहि पसंत पडली नाहीं. म्हणून तंटयास पुन्हां सुरवात झाली असून तो अद्याप मिटलेला नाहीं.

पॅव्हलोव्हा, ॲना (Pavlova Anna) (१८८५–१९३१):–जगप्रसिद्ध रशियन नर्तिका. हिचा जन्म रशियांत झाला. सेंट पिटर्सबर्ग येथील इंपिरीयल ऑपेरा हाऊसमध्यें ती प्रथम उदयोन्मुख नर्तिका म्हणून चमकली व पुढें झपाट्यानें तिनें सर्व जगांत लोकप्रियता मिळविली. नर्तनकलेंत तिनें मिळविलेलें प्राविण्य अनुपम होतें. युनायटेड स्टेट्सला तिनें अनेक वेळां भेटी दिल्या व प्रत्येक वेळेला तिला मिळालेला सन्मान वाढत्या प्रमाणांत होता. तिच्या नर्तन–

प्रकारांतील अत्यंत लोकप्रिय प्रकार म्हणजे हंस–नृत्य (Swan dance) होय.

पाऊस:-पृथ्वीवरील महासागर, सागर, सरोवर इत्यादि जलसंचयांवर सूर्याची उष्णता पडून पाण्याची वाफ होते व ती अदृश्य स्वरूपांत पृथ्वीवरील वातावरणांत मिसळते. उष्णतेचें प्रमाण जितकें अधिक तितकें वाफेचें हवेंतील प्रमाण अधिक असतें. हवा जितकी जास्त उष्ण असेल तितकी ती जास्त बाष्प सामावूं शकते. उष्ण हवा विरल असते म्हणून तिच्यांतील कण दूरदूर असतात व ते अधिकाधिक बाष्पकण सामावूं शकतात. पण थंड हवा घन असते म्हणून घन हवेंत वाफेच्या दूर दूर राहणाऱ्या अणूंना पुरेशी जागा मिळत नाहीं. वाफेचे अणु दूरदूर सारण्यास जो उष्णतेचा पुरवठा लागतो तो मिळत नाहीं. म्हणून थंड हवेपेक्षां उष्ण हवेंत जास्त बाष्प राहूं शकतें. तथापि अति उष्ण हवेंतसुद्धां बाष्प सामावून धरण्यास कांहीं मर्यादा असतेच. हवा कमाल मर्यादेपर्यंत बाष्पानें भरली (Saturated) व थोडीशी थंड झाली कीं तिच्यांतील बाष्प द्रवरूप होतें, तें हवेंतील असंख्य धूलिकणांना बिलगतें व त्याचे अति सूक्ष्म थेंब बनून ते मेघांच्या रूपानें आकाशांत वाऱ्याबरोबर भ्रमण करितात. पुढें हे सूक्ष्म थेंब एकमेकांत मिसळून मोठे होतात व ते हवेंत तोलेनासे झाले म्हणजे पाऊस, गारा, बर्फ इत्यादि रूपानें खालीं पडतात. सूर्याच्या उष्णतेमुळें याप्रमाणें बाष्पीभवनाची व घनीभवनाची क्रिया सतत चालते म्हणून पृथ्वीवर नेहमीं पाऊस पडतो.

पावसाचें एकूण तीन प्रकार मानतात. एक आरोह पर्जन्य (Convectional rains), दुसरा प्रतिरोध पर्जन्य (Relief rains) व तिसरा आवर्त पर्जन्य (Cyclonic rains). आरोह पर्जन्य विषुववृत्तावर आढळतो. सूर्याच्या प्रखर उष्णतेमुळें तेथील हवा अत्यंत तापते व पुष्कळ बाष्प सामावून धरते. ती हलकी असल्यानें वर जाते व वर उंच असलेल्या थंड प्रदेशांत प्रसरण पावून थंड होते व तिच्यांतील बाष्प पावसाच्या रूपानें जमिनीवर पडतें. असें दररोज घडतें, म्हणून आरोह पर्जन्य बारमास पडतो. प्रतिरोध पर्जन्य बाष्पयुक्त वारे वाटेंत पर्वतासारख्या उंच प्रदेशांस अडल्यानें पडतो. वारे समुद्रावरून बाष्प आणतात व उंचवट्यांस अडल्यानें वरवर जाऊं लागतात. वर हवा थंड असते म्हणून तेथें वाफेचें घनीभवन होऊन पाऊस पडतो. जितका पर्वत अधिक उंच तितका पाऊसहि अधिक पडतो. एखाद्या विवक्षित स्थळीं कांहीं कारणानें हवेचा दाब कमी होतो व भोवतालच्या जागेचा दाब जास्त असला म्हणजे या कमी दाबाच्या भागाकडे चारी बाजूंनीं जोरानें वारे वाहूं लागतात. यामुळें येथील हवा भोंवऱ्यासारखी फिरून वरवर जाऊं लागते. हवा वर जातांच तिच्यांतील बाष्पाचें घनीभवन होतें व पाऊस पडतो. यास आवर्त पर्जन्य म्हणतात.

पृथ्वीवर सर्वच ठिकाणीं सारखा पाऊस पडत नाहीं. यास हवेचा कमीअधिक दाब, उंचसखल प्रदेश, समुद्रसान्निध्य, पृथ्वीवरील कमी अधिक उष्णतामान, हवेंतील कमीअधिक बाष्प अशीं अनेक कारणें आहेत. विषुववृत्तापासून ध्रुवाकडे जसजसें जावें तसतसें पावसाचें प्रमाण एकंदरींत कमी कमी होत जातें, एखाद्या खंडाच्या किनाऱ्यापासून जसजसें मध्य भागाकडे जावें तसतसें पावसाचें प्रमाण एकंदर कमी कमी होत जातें. पण उंच प्रदेश किनाऱ्यापासून लांब मध्यभागीं असेल तर तेथें पाऊस अधिक पडतो. ४०° उत्तर अक्षांश व ३५° दक्षिण अक्षांश यांमधील प्रदेशांतील वारे पूर्व-किनाऱ्यावर पाऊस आणतात तर ४०° ते ६५° अक्षांशाचें दरम्यान पश्चिमेकडून अगर नैर्ऋत्येकडून येणारे वारे पश्चिम किनाऱ्यावर पाऊस आणतात. हा पाऊस क्रमाक्रमानें मध्य भागाकडे कमी कमी होत जातो. उष्ण कटिबंधांतील प्रदेशांत आरोह व अवरोध पर्जन्य पडतो तर या कटिबंधाच्या बाहेरील प्रदेशांत बहुधा किनाऱ्यालगत आवर्तामुळें पाऊस पडतो.


पावसाचा कालहि पृथ्वीवर सर्व ठिकाणीं एक नसतो. मद्रास इलाख्यासारख्या भागांत वर्षांतून दोनदां पाऊस पडतो तर इंग्लंड, जपान व विषुववृत्तावरील कॉंगो व अमेझॉनच्या खोऱ्यांत तो बाराहि महिने पडतो. तसेंच इटलीसारख्या देशांत पाऊस हिवाळ्यांत पडतो तर सहारासारख्या कांहीं भागांत वर्षांतून एक इंचहि पडत नाहीं.

पावसाचें महत्त्व फार मोठें आहे. तो सृष्टीला जीवन देणारा आहे. पावसाशिवाय वनस्पतींची वाढ अशक्य व म्हणून पाऊस नसेल तर वनस्पति येणार नाहींत, प्राणी जगणार नाहींत व पृथ्वी ओसाड, निर्जन बनेल. पावसाचें हें महत्त्व जाणूनच प्राचीन काळीं पर्जन्य ही

एक देवता मानून तिची आराधना करीत. वेदकालीं पर्जन्यदेवता स्वतंत्र होती. पुराणकालीं इंद्र हीच पावसाची अधिष्ठात्री देवता मानलेली आढळते.

पाकशास्त्र:–मनुष्यप्राण्यांखेरीज सृष्टींतील इतर सर्व प्राणी कच्चें अन्नच खातात. कच्चें अन्न अनेक उपायांनीं शिजवून, मसाले वगैरे घालून, पचण्यास, खाण्यास योग्य करण्याची शक्ति केवळ मनुष्यमात्रामध्येंच आहे. कच्चें अन्न पाहिल्यावर तें तेव्हांच जाऊन खाण्याची इच्छा मनुष्यांत होत नाहीं, परंतु एखाद्या शिजत असलेल्या पदार्थांचा खमंग सुवास सुटतांच, वासानेंच भूक वाढते. शिवाय अन्न योग्य प्रकारें शिजविल्यावर त्याचें पचनहि नीट होतें. शरीरसंवर्धनाला लागणाऱ्या अन्नाचें योग्य प्रमाणांत मिश्रण करण्याचें पाकक्रिया हें साधन आहे. त्यामुळें जगांतील इतर कोणत्याहि शास्त्रांपेक्षां पाकशास्त्राचें महत्व अखिल मानवजातीला अतिशय आहे. अशा ह्या आत्यंतिक महत्वाच्या शास्त्राची मालकी सर्वस्वीं स्त्रियांकडेच आहे,हें पाहिल्यावर उत्तम अन्न शिजविणें, वेगवेगळाल्या अन्नांच्या घटकांचें ज्ञान असणें, धान्यांचें, फळफळावळीचे गुणधर्म माहित असणें वगैरे गोष्टींचें पूर्ण ज्ञान पाकशास्त्रांत कुशल होऊं इच्छिणाऱ्या गृहिणीला माहित असावें लागतें. प्रत्येक स्त्रीला स्वयंपाक करतां येणें हें एक तिचें प्रमुख कर्तव्य आहे असें हिंदु समाजांत समजलें जातें; परंतु नुसता कसा तरी स्वयंपाक करणें म्हणजे ती कला उत्तम येणें असा अर्थ नव्हे. तर स्वयंपाक चांगला करतां आला पाहिजे. घरांतील माणसें कामावरून थकून भागून आल्यावर साधें पण रुचकर जेवण असल्यावर पंचपक्वान्नाच्या जेवणापेक्षांहि तें अधिक वाटतें. त्याचप्रमाणें नुसते रुचकर पदार्थ करतां आले म्हणजे पाकशास्त्राचें पूर्ण ज्ञान झालें असें म्हणतां यावयाचें नाहीं. तर पाण्यांत शिजविण्याचें महत्व, वाफेवर एखादा पदार्थ शिजविण्याचें महत्व, भाजणें, व तळणें यांचें महत्व पदार्थांच्या गुणधर्मांवर कसें आहे याचें ज्ञान, वेगवेगळाल्या धान्यांचे गुणधर्म, विवक्षित ऋतूंत विवक्षित फळभाज्या, अगर धान्यें खाण्याची आवश्यकता वगैरे क्षुल्लक दिसणाऱ्या परंतु शरीरसंवर्धनाला अत्यंत आवश्यक अशा गोष्टींचें ज्ञान प्रत्येक गृहिणीला असणें हितावह आहे.

पाकोळी:–जमावानें राहणारा पक्षी. याचा रंग कमरेजवळ थोडा पांढरा पण इतर सर्व ठिकाणीं काळा



पाकोळी.

असतो. पाकोळी चिमणीयेवढी असते. तिच्या पायाचीं चारी बोटें पुढच्या बाजूला असल्याकारणानें तिला झाडावर अथवा जमिनीवर बसतां येत नाहीं. ती भिंतीला चिकटून बसते. उडतेवेळेस पाकोळी आपले सर्व पंख हालवीत नसून ती पंखांचीं टोकेंच फडफडत सारा दिवस फिरत असते. हवेंत उडणाऱ्या किड्यांवर झडप घालून ही आपली भूक भागविते. पाकोळी लहान पेल्याच्या आकाराचें घरटें बांधते. हिची लाळ चिकट असल्यानें पाकोळीला आपलें घरटें गवताच्या काड्या एकमेकांस चिकटवून बांधतां येतें. हीं घरटीं कमानी, पूल, घुमट, दरवाजे इत्यादि जागीं ५०–६० पर्यंत बांधतात. या घरट्यांतून एक पाकोळी दर खेपेस शुभ्र पांढऱ्या रंगाचीं तीन अंडीं घालते.

पांगारकर, लक्ष्मण रामचंद्र (१८७२–):–लेखक, वक्ता व प्रवचनकार. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील चिपळूण या तालुक्याच्या गांवीं १८७२ मध्यें ३१ जुलैला झाला. हे लहान असतांनाच वडील वारल्यामुळें यांच्या चुलत्यानें पौड गांवीं यांचा सांभाळ केला. तेथेंच मराठी ५|६ इयत्ता झाल्यावर इंग्रजी शिक्षणासाठीं हें पुण्यास येऊन राहिले व तेथें त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूलमध्यें ६ जून १८८६ला नांव घातलें. १८९१ सालांत याच हायस्कूलमधून ते प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण झाले. घरची गरीबी असल्यामुळें यापुढील शिक्षण घ्यावें कां बंद ठेवावें हा प्रश्न यावेळीं त्यांच्यापुढें उभा राहिला पण मनाचा ओढा पुढील शिक्षणाकडे असल्यानें फर्ग्युसन कॉलेजांत शेवटीं एकदांचें

नांव दाखल केलें व इंग्रजी–संस्कृत घेऊन यांनीं १८९९त बी. ए. ची पदवी मिळविली.

कॉलेजचें शिक्षण संपल्यावर यांनीं १९०६ अखेर संगमनेर, पुणें, मुंबई, पंढरपूर व उमरावती या ठिकाणीं शिक्षकाची नोकरी केली. स्वभाव शोधक व देवाधर्माकडे चित्त असल्याकारणानें त्या त्या ठिकाणच्या क्षेत्रांचा परिचय करून घ्यावा, जुन्या कवींच्या पोथ्या मिळाल्यास त्या जमवाव्या, साधु, संत, सज्जन, सत्पुरुषांच्या गांठी घ्याव्यात असा त्यांचा नेहमीं कार्यक्रम चाले. या कालांतच त्यांस मोरोपंत, तुकाराम, मुक्तेश्वर, एकनाथ यांच्या चरित्रास उपयोगीं पडणारी माहिती मिळाली. याशिवाय दादोबाचें आत्मचरित्रही हस्तलिखित स्वरूपांत पाहण्यास मिळालें.



ल रा. पांगारकर.

यानंतर पांगारकरांनीं १९०७मध्यें 'मुमुक्षु' सुरू केला. या 'मुमुक्षू'च्या सहाय्यानें त्यांनीं लोकांचें लक्ष परमार्थाकडे वळविलें. तसेंच त्यांनीं, कांहीं थोडे ग्रंथ सोडले तर, बहुतेक ग्रंथांना उजेडांत आणण्यास त्याची मदत घेतली. निरंजन माधव व मध्वमुनीश्वर यांची कविता व परमार्थविचार माला, रहस्यनिरीक्षण हीं पुस्तकें त्याचीं उदाहरणें होत. हें कार्य १९१६ पर्यंत चालू होतें. पांगारकरांना स्वतंत्रता लाभून अभ्यास करण्यास याच पत्रामुळें अवसर मिळाला.

ठिकठिकाणीं यांनीं केलेलीं प्रवचनें, प्रसिद्धलेले ग्रंथ व प्रवासांत जोडलेले प्रेमळ मित्र यांच्याकरवीं आतां पर्यंत त्यांची खूपच कीर्ति पसरली होती. यांचा लौकिक ऐकून डॉ. तांबे यांच्याकडून श्रीमंत तुकोजीराव होळकर यांच्या घराण्याशीं पांगारकरांचा दाट परिचय झाला. तसाच जत घराण्याशींही १९३६ पासून झालेला आहे.

जीं पुस्तकें लिहिलीं त्यांत पुढील प्रमुख होत. यांनीं आतांपर्यंत ज्ञानेश्वर, तुकाराम, मुक्तेश्वर, एकनाथ, यांचीं चरित्रें व भक्तिमार्गप्रदीप 'मुमुक्षू'तील निवडक निबंध भाग १ ते ३, निबंध मालेचें स्वरूप व कार्य, निरंजन माधवाची कविता व मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १–२ आणि स्वतःचें आत्मचरित्र.

ग्रंथांची भाषा प्रेमळ, चिकित्सक व धर्मप्रेम वाढवणारी अशी आहे.

पाचकः–**साहित्य**–आलें, लिंबू, हिंग, सैंधव, पादेलोण. **माप**–आल्याचा रस वाटीभर, दोन वाट्या लिंबाचा रस, अर्धा तोळा हिंग, पादेलोण सुपारी एवढें. सैंधव अदमासानें घ्यावें. **कृति**–प्रथम लिंबें व आलें धुवावें. आलें व लिंबें स्वच्छ फडक्यानें पुसून कोरडीं करून ठेवावींत. आल्याचा रस, वाटून फडक्यांत घालून पिळून घ्यावा. लिंबाचा रस काढून घ्यावा. मग तीं दोन्हीं मिश्रणें एके ठिकाणीं करून त्याच्यांत सैंधव वगैरे सामान घालून स्वच्छ कोरड्या बाटलींत घालून ठेवावें. ह्याचा उपयोग अजीर्ण, पोटांत दुखणें, पोटांत वात धरणें, पित्त, करपट ढेकरा येणें इत्यादि विकारांवर होतो.

(प्रकार २ रा) **साहित्य**–आलें- लिंबू व साखर, **माप**–आल्याचा कीस एक वाटी, अडीच वाट्या साखर, लिंबाचा रस अर्धी वाटी. **कृति**–आलें स्वच्छ धुऊन पुसून खिसावें. लिंबाचा रस काढावा. नंतर चुलीवर मोदकपात्र पाणी घालून ठेवावें. त्याच्या चाळणीवर पांढरें स्वच्छ फडकें पसरून त्यावर खीस पसरून त्याला वाफ द्यावी. आलें मऊ झालें कीं खालीं उतरावें. मग साखरेचा पाक पक्का करून त्याच्यांत आलें घालावें. आलें व साखर मिळून आल्यावर त्याच्यांत लिंबाचा रस गाळून दोन कढ द्यावेत व उतरावें निवाल्यावर बरणींत ठेवावें. बिनरेषेचें आलें घ्यावें. याचा उपयोग अग्निमांद्य, घेऱ्या येणें व पित्त नष्ट करणेचे कामीं होतो.

पांचगणीः–थंड हवेचें ठिकाण. सातारा जिल्ह्यांतल्या वाई तालुक्यांत हें गांव आहे. समुद्रसपाटीपासून या गांवची उंची ४३७८ फूट असून या ठिकाणीं युरोपियन व पारशी मुलांच्यासाठीं हायस्कुलें व वसतिगृहें आहेत. हिंदु मुलांच्यासाठीं श्रीयुत पंडित यांनीं एक हायस्कूल व वसतिगृह चालविलें आहे. पांचगणीला कॉफीची लागवड चांगलीच होते. वांईहून महाबळेश्वरला जातांना वाटेंत हें गांव लागतें.

पांचवीः—जन्मापासून पांचव्या दिवशीं करावयाचा एक विधी. कोणी हा पांचव्या व सहाव्या दिवशीं करतात. कांहींच्या घरीं ७ व्या दिवशींच हा संस्कार करतात व त्यास सातवी असें म्हणतात. हा विधी बाळबाळंतीण खुशाल राहावींत म्हणून करतात. या दिवशीं कित्येकांच्या घरीं मुलाला व बाळंतिणीला न्हायला घालतात. कित्येक घालीत नाहींत. बाळंतिणीच्या खोलींतील जमीन शेणानें सारवतात.नंतर बाजल्याजवळ एक पाट मांडतात कित्येक त्यावर सूप ठेवून त्यावर रेशमी फडक्यांत अथवा खणांत कुंकवाचीं पांचबोटें ओढून कोयता गुंडाळून ठेवतात. नारळ असतोच. पांचवीचा पुडा, सुईदोरा, बिब्बा, कात्री, कोरा कागद, दौत टांक, जिवती, कांटे टोचलेले पांच गगघटे इत्यादि वस्तु मांडतात. मागें असणाऱ्या भिंतीवर एक उलटी व दुसरी सुलटी अशा काळ्या रंगाच्या दोन बाहुल्या काढतात. तशाच चौकटीच्या उभय बाजूंनाही काढतात. कांहीं कुटुंबांत बाजल्याचे खूर काळ्या फडक्यांनीं बांधून टाकतात. रात्रीं घुगऱ्या व फळें करतात. सुइणीला वडम वाढून द्यावयाचें असतें. एका शिपतरांत शिगार भात भरून त्यावर कणकेच्या आरतींत दिवा लावावयाचा असतो. या दिव्यानें बाळबाळंतिणीला ओवाळून तें शिपतर सुईण आपल्या घरीं घेऊन जाते. ओवाळण्यापूर्वी पाटावरच्या वस्तू, व काढलेल्या बाहुल्या यांची पूजा करावी लागते. नंतर मंडळी जेवतात. निजते वेळीं बाळंतिणीच्या दारांत कोणीतरी एकानें निजावयाचें असतें. शांतीपाठाचा अंगारा लावतात.

पाटणाः—बिहार प्रांताची राजधानी व पूर्वीचें पाटलीपुत्र शहर. हें शहर गंगानदीच्या उजव्या तीरावर गंगा व शोण या नद्यांच्या संगमापासून १२ मैल अंतरावर वसलेलें आहे. या गांवाचा ग्रीक लोक 'पालीबोध' असा उल्लेख करतात. कुसुमपूर असेंहि या गांवचें आणखी एक नांव (पूर्वींपैकीं) आहे. हें शहर पुराण—वस्तु—संशोधनाच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचें असून येथें शिशुनाग, नंद, मौर्य, गुप्त, हर्ष व मुसलमान यांची सत्ता होती. या ठिकाणीं १८६४त म्युनिसिपालिटी स्थापन झालेली आहे. पाटण्याची लोकसंख्या १,५९,६९० आहे. या ठिकाणीं विश्वविद्यालय स्थापलें गेलें आहे.

पाटवड्याः—(१ ला प्रकार) **साहित्य**—पाणी, तिखट, मीठ, कोथिंबीर, खोबरें, जिरें, धणे, हरभऱ्याच्या डाळीचें पीठ, लवंगांची पूड व तेल. **माप**—एक शेर पाणी, अच्छेर डाळीचें पीठ, पाव भकलाचें खोबरें,



पाटणा—राजवाडा

५—७ लवंगा, एक भार धणे, कोथिंबीर, तिखट, मीठ व जिरें अदमासें. **कृति**—वरील सर्व मसाला पातेल्यांत तूप अगर तेल (गोडें) घालून परतून घ्यावा व पिठाशिवाय सर्व पदार्थ बारीक वाटावेत. नंतर पातेल्यांत पाणी घालून मसाला घालावा व उकळी फुटल्यावर पीठ घालून पळीनें ढवळावें. एक कढ आला म्हणजे खालीं उतरून निखाऱ्यावर ठेवून वर झांकण ठेवावें. तें शिजून चांगली वाफ आली म्हणजे परातीस किंवा पाटास तुपाचा हात लावून त्याजवर तें शिजवलेलें पीठ ओतून वर स्वच्छ व ओलें फडकें घालून लाटण्यानें सारखें एक इंच जाड होईल असें लाटावें. त्यावर ओलें खोबरें बारीक खवणून सगळीकडे पसरून दाबावें. मग तेलाची फोडणी करून त्यावर ओतावी. निवाल्यावर वड्या कापून ठेवाव्या.

(प्रकार २ रा) **साहित्य**—हरभऱ्याच्या डाळीचें पीठ, तिखट, मीठ, कोथिंबीर खोबरें, जिरें. **कृति**—हरभऱ्याच्या डाळीचें पीठ एका पातेल्यांत घेऊन त्यांत तिखट, मीठ, जिऱ्याची पूड, कोथिंबीर व खोबरें घालून व त्यांत पाणी घालून तें आंबोळीच्या पिठाइतकें दाट कालवावें. हिंग, मोहरी, हळद घालून तेलाची फोडणीही त्याच्यांतच घालावी. नंतर तें कालवलेलें पीठ एका थाळ्यांत ओतून शेगडींत अगदीं थोडे निखारे घालून ठेवावे. त्याच्यावर एक ताट झांकून चांगले रसरशीत निखारे त्यावर पसरावे. कांहीं वेळानें आंतील पीठ चांगलें शिजून तयार होतें.

शिजल्यावर खालीं उतरून ठेवून निवाल्यावर वड्या कापाव्या. ह्याच्यांत डाळीच्या पिठाच्याऐवजीं डाळ भिजत घालून ती वाटावी व त्याच्या वड्या बनवाव्यात. पिठापेक्षां ह्या जास्त चांगल्या लागतात.

पाठक, श्रीधरशास्त्री (१८७८–):–खानदेश-मधील एक जाडा संस्कृत पंडित, वक्ता, लेखक व संशोधक. पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील 'पारोळें' नांवाच्या गांवीं १८७८ मध्यें यांचा जन्म झाला. यांचें संस्कृत शिक्षण इंदूर–राजकीय पाठशाला व बनारस–गव्हर्नमेंट क्वीन्स कॉलेजमध्यें झालें. या ठिकाणीं त्यांनीं न्याय, व्याकरण, मीमांसा, धर्मशास्त्र, अद्वैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत, वेदान्त व शुक्ल यजुर्वेद माध्यंदिन शाखा यांचें शिक्षण घेतलें. याच विषयाचे प्राध्यापक म्हणून डेक्कन कॉलेज पुणें व एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई या संस्थांत काम केलें.

शिक्षणाव्यतिरिक्त त्यांनीं ग्रंथलेखन, ग्रंथसंपादन, संशोधन, व्याख्यानें, धर्मकारण वगैरे गोष्टींत लक्ष घातलें आहे. त्यांनीं वेदशास्त्रोत्तेजक सभा, भांडारकर इन्स्टिट्यूट पुणें व प्रयाग अशा वेगवेगळ्या ठिकाणीं भरलेल्या हिंदुसभा व सर्वधर्मपरिषद् धुळें इत्यादि गांवीं भरलेल्या सभांतून व्याख्यानें दिलीं.

ग्रंथलेखन, भाषांतर ग्रंथसंपादन व संशोधन यांमध्यें त्यांच्याकडून खालीलप्रमाणें कार्य केलें गेलें आहेः–पारस्कर गृह्यसूत्र व शुक्लयजुर्वेदसंहिता हे ग्रंथ मराठींत भाषांतरले. ईश, केन, कठ व मुंड या उपनिषदांवर शांकर व रामानुजीय भाष्यांची बालबोधिनी संस्कृत टीका लिहिली. यांचें वल्लभाचार्यांचें ब्रह्मसूत्र, अणुभाष्याची संस्कृत बालबोधिनी टीका व सविस्तर प्रस्तावना बॉम्बे संस्कृत सेरीज व भांडारकर इन्स्टीट्यूट पुणें या संस्थांनीं प्रसिद्धलीं. अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ, पातंजल महाभाष्य व कात्यायन वार्तिक या ग्रंथांवरहि यांनीं लेखन केलें. याखेरीज सांख्यकारिका व इतरहि अनेक निबंध यांच्या संशोधनात्मक कार्याचें स्वरूप दर्शवितात. कौशितकी ब्राह्मण व मुकुंदराजकृत महाभाषा हे दोन ग्रंथ यांनीं संपादले आहेत. १९३४ पासून धुळ्याला वेदशास्त्र शिक्षणाची संस्था स्थापून तिच्या मार्फत प. जी. सरस्वती पाठशाला काढली. तिच्यांत हे कांहीं विषय शिकवितात.

यांची शैक्षणिक, धार्मिक, ग्रांथिक सेवा व विद्वत्ता ध्यानांत घेऊन सरकारनें यांना इ. सन १९३३ मध्यें 'महामहोपाध्याय' ही पदवी दिली. तसेंच श्रीशंकराचार्य यांनीं १९२३ मध्यें व अयोध्येच्या संस्कृत समितीनें १९३८ मध्यें अनुक्रमें वेदान्तवागीश आणि वेदान्तभूषण अशा स्वतंत्र पदव्या यांना दिल्या.

पाडवा:–शालिवाहन शक वर्षाचा पहिला दिवस. या दिवशीं घरोघरीं गुढ्या उभारतात म्हणून या दिवसाला पुष्कळ लोक पाडवा न म्हणतां 'गुढी–पाडवा' असें म्हणतात. गुढी पाडवा म्हणण्यांत आणखी एक सोय होते ती अशी कीं विक्रमसंवताचें वर्ष कार्तिक शुद्ध प्रतिपदेला सुरू होतें, त्या दिवसालादेखील पाडवाच म्हणतात. म्हणून पाडवा कोणता? चैत्री पाडवा कां कार्तिकी पाडवा? हें कळण्यासाठीं गुढी–पाडवा असा शब्दप्रयोग करतात. वास्तविक हा दिवस मूळचा धार्मिक सण नसून एक आनंदाचा दिवस होय. यालाच पुढें बऱ्याच वर्षांनीं धार्मिक स्वरूप प्राप्त झालें. शालीवाहन राजानें, येथें राज्य करणाऱ्या शक लोकांचा पराजय करून त्यांस देशपार केलें. तेव्हां राजानें व लोकांनीं या प्रसंगाची चिरकाल आठवण राहावी म्हणून हा सण साजरा करण्याची प्रथा पाडली. पुढें वर्षगणनाहि (शक) याच चैत्र प्रतिपदेपासून करण्याची रूढी पडल्यानें त्यास धार्मिक स्वरूप प्राप्त झालें. महाराष्ट्रांत व कर्नाटकांत शालिवाहन शक चालू असल्यामुळें या दोन प्रांतांतील वर्षारंभाचा पहिला दिवस गुढीपाडव्याला समजतात. या दिवशीं सकाळीं लौकर उठून लोक स्नानें करतात व नवीन कपडे अंगांत घालतात. नंतर एक मोठी चिव्याची काठी घेऊन ती धुतात व तिच्या टोकाला रेशमी, सुती किंवा जरीचें जसें शक्य असेल तसें एक वस्त्र (खण, लुगडें, वा शाल्) घेऊन व त्याच्याच जोडीला तांब्याचें अथवा पितळेचें वा चांदीचें भांडें घेऊन, त्याबरोबर साखरेच्या पुतळ्यांची माळ, कडुलिंबाचे ढाळे व फुलांची माळ बांधतात. मग गुढी उभारण्याची जागा सारवून व रांगोळी घालून चांगली करतात आणि तिच्यावर ही गुढी उभारतात. आवडीप्रमाणें या दिवशीं घरांत एखादें पक्वान्न करतात व मोठ्या आनंदानें भोजन करतात. भोजनापूर्वी गुढीची पूजा करून तिला नैवेद्य दाखविल्यावर कडुलिंबाचा पुष्पयुक्त पाला, हिंग, काजू, फुटाण्याची डाळ, मीठ यांसह केलेली चटणी प्रसाद म्हणून खातात, व संध्याकाळीं चारच्या पुढें गुढीस नैवेद्य दाखवून ती उतरतात. जेवणाअगोदर पंचांगश्रवण करावयाचें असतें. गुढीची देवता इंद्र मानतात.

पाँडेचरी:–हिंदुस्थानांतील फ्रान्सच्या वसाहतीची राजधानी. हें शहर पूर्वकिनाऱ्यावर असून तें उत्तर अक्षांश ११° ५६′ आणि पूर्व रेखांश ७९° ४९′ यावर कुडालोरच्या उत्तरेस १२ मैलांवर वसलेलें आहे. येथील लोकसंख्या ४६,२०० आहे. पाँडेचरीची स्थापना फ्रेंचांनीं १६७४ मध्यें केली. फ्रेंच व इंग्लीश यांच्यांमध्यें हद्दीसंबंधीं कांहीं कटकटी उत्पन्न झाल्या तर त्यांचा निवाडा अर्काटचा कलेक्टर करतो. स्थापनेपासून १८१६ पर्यंत या शहरावर डच व इंग्लिश लोक यांनीं अनेकवार हल्ले केले होते. पहिले हल्ले डचांचे. पुढें इंग्लीशांचे हल्ले झाले त्यामध्यें कांहीं काल हें शहर इंग्लिशांच्या ताब्यांत होतें. पण इंग्लिश व फ्रेंच यांमध्यें १८१६ त तह झाला. त्या तहाप्रमाणें १८१६ पासून हें शहर पुनः फ्रेंचांच्या ताब्यांत मिळालें. पाँडेचरी जरी समुद्राच्या कांठाला वसली आहे तथापि हें कांहीं चांगल्यापैकीं बंदर नाहीं. किनाऱ्यापासून एक मैलावर जहाजें नांगरावीं लागतात, व तेथून पडावांत बसून शहरांत प्रवेश करावा लागतो. येथील मुख्य धंदा विणकाम हा आहे. सिंगापुरला हिंदुस्थानांत विकत घेतलेला माल या ठिकाणाहून गुजराथी व्यापारी धाडतात. या ठिकाणीं कापडाच्या चार गिरण्या आहेत. येथें १८८० त म्युनिसिपालिटी स्थापली गेली असून शहरांत एक कॉलेज आहे. त्यांत फ्रेंच बी. ए. पर्यंत शिक्षण दिलें जातें. पाँडेचरीचे रस्ते उत्कृष्ट आहेत. एकंदरींत हिंदुस्थानांतील चांगल्या गांवांत त्याची गणना व्हावयास कोणतीच हरकत नाहीं.

पाणमांजर:–हा एक मासेभक्षक जलचर प्राणी आहे. याची लांबी, सामान्यतः दोन फूट असून शेपूट १८ इंच लांब असते. या प्राण्याचा आकार पुष्कळसा मांजरासारखा असल्यानें त्यास पाणमांजर (otter) असें म्हणतात. त्याच्या अंगावर बरीच जाड व पिंगट वर्णाची अशी मऊ मऊ लोंकर (fur) असते. या लोकरीला व्यापारी दृष्ट्या फार महत्त्व आहे; विशेषतः अमेरिकेंत या लोंकरीला चांगलीच किंमत येते. या प्राण्याच्या पायांचीं नखें अंगभूत कातड्यानें जोडलेली (well-footed) असतात व शेपटीला चेपरा आलेला असतो. शेपटीच्या साह्यानें या प्राण्याला उत्तम पोहतां येतें. हा माशांचा फन्ना उडवितो; नदीच्या कांठीं लहान लहान भुयारें करून त्यांत हे प्राणी रहातात; पण समुद्रकांठींहि त्यांचें वास्तव्य असल्याचें आढळून येतें. शिंपायुक्त प्राणी, (Mollusks) कवचजीवी प्राणी (Crustaceans) व मासे हें या प्राण्याचें अन्न



पाणमांजर


होय. या प्राण्याची मादी मार्च अगर एप्रिलमध्यें विते व तिला एकाच वेळीं ३ ते ५ पिलें होतात. या प्राण्यांची शिकार करतात. हे प्राणी युरोप, आशिया व अमेरिका या ठिकाणीं सांपडतात.

पांडुरोग:–रक्ताच्या घटकांत बदल झाल्या कारणानें व विशेषतः ऑक्सिजनवाहक हीमोग्लोबिन् (Hoemoglobin) हें रक्तद्रव्य कमी झाल्यानें मनुष्य फिकट पांडुरका दिसूं लागतो. म्हणूनच पांडुरोग अशी संज्ञा अशा रक्तविकारास देतात. पांडुरोग उत्पन्न करणारीं अनेक कारणें आहेत. उदाहरणार्थ–तरुण

स्त्रियांत कित्येकदां रक्त कमी होऊन पांडुरकेपणा येतो त्यास 'क्लोरोसिस (Chlorosis) म्हणतात. हळुहळू वाढणारा अशक्तपणा, हृदयदौर्बल्यानें छातींत धडधड होणें, घेरी येणें, पचनक्रिया बिघडणें, निरुत्साह वाटणें, स्वभाव तापसिक बनणें, आर्तव कमी-अधिक व अनियमित होणें, व क्वचित् वारंवार ज्वर येणें हीं लक्षणें क्लोरोसिसमध्यें असतात. पर्निशस ॲनिमिया (Pernicious anaemia) नांवाचा एक रोग आहे हा मनुष्यास मध्यम वयांत होतो. त्यांत यकृत्, प्लीहा हे अवयव सुजतात. अपचन असतें; अशक्तपणा, छातींत धडधड, दम लागणें, ग्लानि येणें हीं रक्तक्षयाचीं लक्षणें असतात; पण त्याशिवाय, निरुत्साह, पोट दुखणें, जुलाब होणें, तोंड येणें व हळूंहळूं मज्जा व स्नायू यांची शक्ति कमी होऊन पायहात लुले होणें, इ. इ. लक्षणें उद्भवून रोगी दगावतो. याशिवाय उपदंश, शिशाचें विष, क्षय, कॅन्सर, जठर व आंतडें यांचे विकार, कांहीं हृदयविकार, मूत्रपिंड-विकार, यकृताचे विकार, रक्तस्राव, मुलास जास्त काल स्तनपान करविणें, मोठा ज्वर येऊन गेल्यावर आलेला अशक्तपणा किंवा शरीरांत कोठें तरी पू बनणें या योगानें अंगांत रक्तसंचय कमी होऊन पांडुरोग होऊं शकतो. **उपाय**--रक्ताची तपासणी तज्ज्ञाकडून करवून घेऊन, विकाराचें कारण शोधलें पाहिजे व त्याचें योग्य उपायांनीं निराकरण केलें पाहिजे. भरपूर विश्रांति, शुद्ध हवा, सात्त्विक आहार इत्यादि आवश्यक होत. लोहक्षार, कॉडलिव्हर ऑईल, यकृतापासून, रक्तापासून वगैरे बनविलेलीं औषधें (उदा. कँपोलोन, हिमोग्लोबिन, सायरप इ.) यांचा उपयोग चांगला होतो.

पाणकोंबडी:—बांबूच्या बेटांत किंवा ताडमाडांच्या झाडांत राहणारा पण सहसा दृष्टीस न पडणारा अंडज पक्षी. हा पक्षी आकारानें कोंबडीपेक्षां लहान दिसतो. पिसांचा रंग काळसर पण तोंड, छाती, गळा या अवयवांचा रंग पांढरा. शेपटीखालीं तांबूस ठिपका असतो. चालतांना घायाळप्रमाणें शेपटी वर करून चालण्याची यास संवय असल्यानें, हा ठिपका, आपोआप दिसतो. पाणकोंबडी किडे, छोटे मासे खाऊन आपली भूक भागविते. मादी बांबूच्या बेटांत अथवा ताडमाडांच्या झाडांत ४ अंडीं घालते. या अंड्यांचा रंग तांबूस पांढरा असतो. हिचीं पिलें अंड्यांतून बाहेर पडल्याबरोबर चालूं लागतात. या पक्ष्याला कोणाच्या दृष्टीस पडणें आवडत नाहीं. तसा प्रसंग आलाच तर हा एकाद्या झुडपांत लपतो. पावसाळ्याच्या सुमारास हे पक्षी फार गोंगाट करतात. पाणकोंबडी नेहमीं पाण्याच्या कांठीं (तळी, नदी इ.) राहते. ही पाण्यावर तरंगते व पोहते. शिवाय पाण्यांत बुडूनहि तिला पोहतां येतें.

पाणघोडा (Hippopotamus):-हा एक डुकराच्या जातीचा गोस्तन (Mammal) मोठा प्राणी आहे.



पाणघोडा.

तो वनस्पती खाऊन रहातो. पाणघोड्याच्या, सामान्यतः. दोन जाती आहेत व दोन्हीहि उष्णकटिबंधांत (Tropics) सांपडतात. याचें शरीर बरेंच स्थूल असून त्याची रूपरेखा मोठ्या डुकराप्रमाणें असते. याचें डोकें विशेष मोठें असून तोंड आ करून वासलेलें असतें. त्यांत मोठाले सुळके व छेदक दांत असतात. मुसकटाच्या (Muzzle) किंचित् वर नाकाचीं भोकें असतात. हा प्राणी पोहण्यांत पटाईत असतो. पोहतांना फक्त नाकाचीं भोंकें व डोळे पाण्याबाहेर ठेवून तो मोठ्या लीलेनें अंतर कापीत झपाट्यानें सरकत असतो. याच्या अंगाची कातडी जाड असून, मुसकट, डोकें, मान व शेपटी यांवर राठ केंस असतात; इतर भागांवर अजिबात केंस नसून ते तुळतुळीत असतात.

हा प्राणी हत्तीच्या खालोखाल अवजड व स्थूल असतो. याची लांबी १४ फूट असून खांद्यापर्यंत उंची ४ फूट असूं शकते. जवान पाणघोड्याचें वजन चार ते पांच टन असूं शकतें. याचा वर्ण स्लेट पाटी-सारखा काळा असतो. पांढऱ्या वर्णाचे व वर काळे ठिपके असलेले पाणघोडेहि कित्येक ठिकाणीं सांपडतात.

पाणघोडे पूर्वी ईजिप्त ते केपकॉलनी या टापूमध्यें सांपडत असत; पण हल्लीं ते मध्य आफ्रिकेंतच आढळतात. या प्राण्याच्या संबयी विचित्र आहेत. हा पाण्याखालीं झोंप घेतो व प्रत्येक चार पांच मिनिटांनीं हवा घेण्यासाठीं पाण्याच्या पृष्ठभागावर येतो; शिकारी त्याच्या टेहळणीवर असले तर तो दहादहा मिनिटें पाण्यांत दडी मारून बसूं शकतो. त्याला जमिनीवर चांगलेंसें चालतां येत नाहीं; ही अडचण तो पाण्यांत चांगल्या तऱ्हेनें पोहून भरून काढतो. रात्रीच्या वेळीं नदीपार होऊन जवळच्या शेतांत जाऊन पिकांची नासाडी करून परत पहाटेच्या सुमारास सुरक्षित स्वस्थानीं येतो. पिकाची नासाडी कोणी व कशी केली असावी या चिंतेनें बिचाऱ्या शेतकऱ्यांना ग्रासून टाकल्याचीं अनेक उदाहरणें देतां येतील. हा प्राणी एरवीं भित्रा व मनुष्याच्या वाटेस न येणारा असा आहे; पण त्याला त्रास दिला तर त्याच्यासारखा भयंकर शत्रु नाहीं. यास माणसाळतां येतें. तो ३० वर्षे जगूं शकतो. त्याचें नैसर्गिक आयुर्मान याहून जास्त आहे. यांच्या कातड्याचे चाबूक, छत्रीच्या मुठी, हातांत धरण्याच्या काठ्या वगैरे अनेक उपयोगी पदार्थ करतां येतात. याच्या सुळक्यांपासून पूर्वी कृत्रिम दांत करीत असत. याचें मांस खाण्यास चांगलें असतें व याची चरबी जवळजवळ २०० पौंड वजनाची भरते. याच प्राण्याची लहान जात लिबेरिया, गिनी कोस्ट, वगैरे भागांत सांपडते.

पाणबगळा:—लांब पायाचा व पिवळ्या डोळ्याचा तसाच सामुदायिक वस्ती करणारा पक्षी. याचे पाय काटकुटीसारखे उंच व बारीक. तसेंच अंग प्रमाणांपेक्षां मोठें असून चोंच लांब असते. यामुळें हा पक्षी कुरूप दिसतो. याचे अंगावरील रंगसुद्धां एकमेकास शोभणारे किंवा उठावदार नाहींत. चोचीचा रंग आरंभीं निळा, मध्यभागीं पिवळा व शेवटाला काळा असतो. याचे डोळे लहान पण पिवळ्या रंगाचे असतात. मानेला मुरवून हा बसतो त्यामुळें मान आखूड असल्यासारखी वाटते. वरचीं पंखें मातकट रंगाचीं तर खालचीं पिसें पांढऱ्या रंगाचीं. पिसाच्या मध्याच्या खालीं एक पिवळीशी रेघ असते. पिसाप्रमाणेंच याचा गळा, हनुवटी व छातीच्या वरचा भाग पांढरा असतो व त्यावर पिंगट रंगाची छटा मारते. त्याचप्रमाणें याच्या पायांचा व पावलांचा रंग हिरवट असतो. अंडीं घालण्याच्या सुमारास याच्या पाठीचा रंग तांबूस दिसतो.

बगळा आपला निर्वाह पाण्यांतले किडे, छोटे मासे, बेडूक व खेकडे यांवर करतो. हा पाण्यांत निश्चल उभा राहतो त्यावेळीं लाकडाच्या ओंड्यासारखा दिसतो. आणि यामुळें त्याच्याजवळ बेडूक वगैरे प्राणी येतात. मग हा त्यांना पकडून एकदम गिळून टाकतो. याचें एक वैशिष्ट्य दिसून येतें तें हे कीं, रात्रीच्या वेळीं एका खेड्यांत जितके बगळे असतील तितके सर्व एकाच झाडावर वस्ती करतात.

पाण्याच्या कांठाला, साळयाचें घरटें असलेल्या झुडपांत हा प्राणी आपलें अव्यवस्थित काटक्या कुटक्याचें घरटें करतो. त्यांत, फिक्या पिवळ्या रंगाचीं चार अंडीं, मादी घालते.

पाणिनि:—हा पाणिपुत्र पाणिन ऋषीचा मुलगा. याच्या आईचें नांव दाक्षी. याचें गांव शालातूर. याच्या गुरूचें नांव वर्ष. हा प्रथम जडबुद्धि होता. त्यामुळें इतर मित्र याची थट्टा करीत. तेव्हां कंटाळून हा हिमालयावर गेला व तपश्चर्या केली. तेथें शंकरापासून याला एक व्याकरण प्राप्त झालें. तें सध्यांचें पाणिनीय व्याकरण होय. वररुचि, व्याडि वगैरे याचे सहाध्यायी होत. शेषानें पाणिनीला विद्या दिली, असाहि निर्देश आहे. कात्यायन, कणाद वगैरेंबरोबर पाणिनीचा उल्लेख आहे. विश्वामित्राच्या कुलांतील गोत्रकारांत एक पाणिनि आहे. हे सर्व एक असण्याचा संभव आहे.

याचें व्याकरण आठ अध्याय असल्यामुळें अष्टाध्यायी या नांवानें प्रसिद्ध आहे. याशिवाय गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन हेहि ग्रंथ याचेच होत. शिक्षा याच्या एकाद्या अनुयायानें लिहिली असावी. शिवाय पाताळविजय (जांबवतीविजय) नांवाचें एक नाटकहि याच्या नांवावर मोडतें. याच्या अष्टाध्यायीचें महत्त्व अपूर्व आहे. हा ग्रंथ अत्यंत प्राचीन असूनहि क्लिष्ट पण थोडक्यांत आहे. कात्यायन, पतंजली व काशिकाकार यांनीं त्यावर विस्तृत ग्रंथ करून ते पूर्ण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वत्र अबाधित प्रसार असल्यामुळें हें व्याकरण ज्याला परिचित नाहीं त्याला पदोपदीं अडचण भासते. इतका याचा संस्कृत वाङ्मयाशीं तादात्म्यसंबंध आहे.

याचे गणपाठादि ग्रंथ नित्य पठण—पाठनांत नसल्यामुळें व त्यांवर भाष्यवार्तिकादिकांनीं विशेष लक्ष न टाकिल्यामुळें शुद्ध स्वरुपांत राहिलेले नाहींत.

शेवटीं पाणिनीला सिंहानें मारिलें असा उल्लेख आहे; पण त्याला दुजोरा नाहीं.

आजपर्यंत पाणिनीच्या कालनिर्णयाचे प्रयत्न पुष्कळ लोकांनीं केले आहेत. त्यांपैकीं कै. वि. का. राजवाडे व त्र्यं. गु. काळे यांचे प्रयत्न विशेष ध्यानांत घेण्यासारखे आहेत. कै. राजवाडे यांनीं इ. स. पू. १२००–९०० असा काळ ठरविला आहे; पण कै. काळे यांनीं पिंगल हा पाणिनीचा भाऊ होता व तो जनमेजयाच्या सर्पसत्रांत सदस्य होता; जनमेजय व वैशंपायन यांचा पाणिनीनें निर्देश केला आहे; यावरून हा त्यानंतर थोड्याच दिवसांत झाला असावा असा तर्क केला आहे. पण यामुळें पाणिनीचा काळ इ. स. पू. ७०० पर्यंत नक्की मागें गेला, असें शास्त्रज्ञ मानतात.

पाणी:–पाणी हें ऑक्सीजन व हैड्रोजन यांचा संयुग आहे. पाण्याची घटना, एकीकरण व विघटन या दोहों-पद्धतीनें सिद्ध करून दाखवितां येते. त्यावरून शास्त्रज्ञांनीं त्याची व्यापविशिष्ट व वजनविशिष्ट घटना निश्चित ठरविली आहे. पाण्याची व्यापविशिष्ट घटना: एक भाग ऑक्सीजन, दोन भाग हायड्रोजन बरोबर संयुक्त होऊन, दोन भाग पाणी बनतें.

वजनविशिष्ट घटना: हैड्रोजनचा वजनी एक भाग ऑक्सीजनच्या वजनी आठ भागांबरोबर संयुक्त होऊन पाणी बनतें.

शुद्ध पाणी पारदर्शक रंगहीन व बेचव असते. पाण्याची खोली फार असेल तर तें निळया रंगाचें दिसतें. तें ०° सें. अंशावर थिजतें. हवेचा दाब सामान्य असतांना १००° सें. अंशावर उकळूं लागतें. अनेक शास्त्रीय बाबींत पाणी प्रमाणभूत पदार्थ मानलें गेलें आहे. पाण्यांत पुष्कळ पदार्थ विरघळतात. पण त्यांत विरणाऱ्या अनेक पदार्थांची विद्रुति वेगवेगळी आहे. पाण्यांत न विरघळणारे पदार्थहि पुष्कळ आहेत. पाणी हें वनस्पतींचें व प्राण्यांचें जीवन आहे. पाण्यांत विरणाऱ्या ऑक्सीजनवरच माशांचें जीवन अवलंबून आहे.

पृथ्वीवरील पाण्याची वाफ होण्याचें कार्य सतत चालूं आहे. वाफ आकाशांत मेघांच्या रूपानें राहते व हवामानाच्या वेगवेगळया परिस्थितींत पाऊस, हिम व दंव या रूपानें जमिनीवर पडते.

नद्या, तळीं, विहिरी, समुद्र इत्यादींचें पाणी शुद्ध असत नाहीं. तें तसें नसण्याचें कारण पाण्यामध्यें असलेली पदार्थ विरण्याची शक्ति ही होय. शुद्ध पाणी म्हणजे ज्या पाण्यांत कोणताहि पदार्थ कोणत्याहि स्वरूपांत विरलेला सांपडत नाहीं तें. आपण पितो त्या पाण्याला जी एक प्रकारची चव असते ती त्यांतील विरलेल्या क्षारामुळें आलेली असते. वेगवेगळ्या विहिरींचे, ओढ्याचें अगर नद्यांचे पाण्याची रुची वेगवेगळी असते. याचें कारण त्यांतील भिन्न भिन्न लवणें हें होय. पण त्याची मुख्य चव त्यांत विरलेल्या वायूमुळें आलेली असते. हे वायू म्हणजे हवेंतील ऑक्सिजन, नैट्रोजन, कार्बन–डाय–ऑक्साईड हे होत. पाणी उकळतांच हे वायू त्यांतून निघून जातात व पाणी बेचव लागूं लागतें.

कांहीं जमिनींतील क्षार पाण्यांत मुरतात. त्यामुळें अशा पाण्यांत साबणाला चांगला फेस येत नाहीं. अशा पाण्याला ' कठीण पाणी (Hard water) ' म्हणतात ज्या पाण्यांत साबणाला चांगला फेस येतो त्या पाण्याला ' मृदु पाणी (Soft water) ' म्हणतात. समुद्राच्या पाण्याला चांगला फेस येत नसला तरी त्या पाण्याला ' कठीण पाणी ' असें म्हणत नाहींत.

पाण्यांत तरंगतीं व विरलेलीं अशुद्ध द्रव्यें असतात. अतिशुद्ध पाणी मिळणें कठीण आहे. पिण्याच्या कामीं अतिशुद्ध पाण्याची जरुरीहि नाहीं. प्रकृतीस विघातक असे कोणतेहि पदार्थ पाण्यांत नसले म्हणजे तें पाणी आरोग्याचे दृष्टीनें शुद्ध मानावें. पाण्यांत हवेचे घटक, साधें मीठ अगर दुसरीं निरुपद्रवी लवणें विरलीं असलीं तरी तें पाणी पिण्याला योग्यच आहे. परंतु पाण्यांत विष्टा, मैलमोरीचें पाणी गेल्यास, त्यांत विषमज्वर, पटकी, आमांश यांचे जंतु, जंतांचीं अंडीं इत्यादि आढळतात. अशा प्रकारचें दूषित पाणी सतत पीत गेल्यास त्याचा शरीरावर शीघ्र अगर मंदगतीनें परिणाम होतोच होतो. म्हणून पाणी शुद्ध करून पिणेंच श्रेयस्कर. पाणी शुद्ध करण्याच्या अनेक रीति आहेत. त्यांतील कांहीं रीति पाणी मोठ्या प्रमाणावर शुद्ध करण्यास उपयुक्त आहेत व कांहीं घरगुती उपयोगाच्या आहेत. त्याचप्रमाणें कांहीं रीति नैसर्गिक व कांहीं कृत्रिम आहेत. पाणी सांठविणें, हवेंतील ऑक्सिजनशीं तें मिसळणें व गाळ सांचणें या नैसर्गिक रीति होत. उत्पातन (Distillation), उकळणें, गाळणें (फिल्टर करणें) व रासायनिक पदार्थ मिसळणें ह्या कृत्रिम रीति होत.

पातोळे–साहित्य–वाळूक (कांकडी), गूळ, मीठ, तांदळाचें पीठ, कणीक, हळदीचीं ओलीं पानें. **माप**–वाळकाच्या सव्वापट गूळ, किंचित् मीठ, तांदळाच्या पिठाच्या निम्मी कणीक. **कृति**–वाळूक खिसून झाल्यावर तो खिस थोडासा पिळून त्यांतलें पाणी काढावें. पिळून काढलेलें पाणी टाकून देऊं नये. नंतर तो खीस पातेल्यांत घालून त्यांत मीठ घालून शिजवावा. खीस शिजून मऊ झाल्यावर त्याच्यांत गूळ घालून पुनः दोन कढ द्यावे. निवाल्यावर त्याच्यांत तांदळाचें व गव्हाचें पीठ आंबोळयाच्या पिठाप्रमाणें दाट होईपर्यंत घालावें. चुलीवर मोदकपात्रांत पाणी घालून ठेवावें. हळदीचीं पानें धुऊन पुसून ठेवावींत. नंतर हळदीचें एक पान उताणें घेवून त्यावर पीठ लावावें. पुनः त्याच्यावर दुसरें पान पालथें ठेऊन त्याच्या अर्ध्या भागास पीठ लावावें व तें दुमडून टाकावें. मोदकपात्राच्या चाळणींत मधोमध एक लहानसा गंज ठेवून त्याच्या सभोंवतीं हीं पानें उभीं करून ठेवावीं व वर झांकण लावावें. चांगलें शिजल्यावर काढावें व हळदीचीं पानें सोडवून वाटण्यास द्यावें. तांदळाचें व गव्हाचें पीठ फार बारीक दळूं नये. कणीक न घालतां नुसत्या तांदळाच्या पिठाचेहि पातोळे करतां येतात.

पादत्राणें:–पायांचें संरक्षण करण्याचें साधन. अगदीं रानटी अवस्थेंतून सुधारणेच्या मार्गावर लागल्यावर कपड्यानंतर शरीरसंरक्षणासाठीं ज्या कांहीं वस्तू मनुष्यानें तयार केल्या, त्यांमध्यें पादत्राणांचा वरचा क्रमांक असला पाहिजे असें कांहींचें म्हणणें आहे; आणि खरोखरी यांत अशक्य असें कांहीं वाटत नाहीं; कारण त्यावेळीं कांहीं आजच्यासारखे खडीचे किंवा डांबरी रस्ते नव्हते. खडकाळ प्रदेशावरून इकडून तिकडे हिंडावें लागत असे. अशा वेळीं जरी ईश्वरानें आपल्या पायाचा तळवा घट्ट चरबीचा व कातडीचा केला असला आणि जरी त्यामुळें साधारण खडकाळ जमिनीवरून चालतांना मुळींच त्रास होत नसला तरी अणकुचीदार खड्यांवरून जातांना त्रास होतोच; अर्थात् आपल्या पायाचें अशा त्रासापासून संरक्षण करण्यासाठीं मनुष्यानें जी कांहीं योजना केली ती योजनाच–तें साधन–आजच्या विविध पादत्राणांचा 'मूळपुरुष' म्हटलें तरी चालेल.

त्या फार पूर्वीच्या कालांत अगदीं ओबडधोबड प्रकारचींच पादत्राणें असलीं तर नवल काय? अगदीं आज पृथ्वीवरील निरनिराळया देशांतील पादत्राणांच्या निरनिराळया तऱ्हा पाहिल्या तर त्यांत वेताच्या वाहाणा पाहायला मिळतील. यावरून आरंभीं मनुष्यानें आपल्या पादत्राणासाठीं कोणत्या साधनांचा उपयोग करून घेतला असेल याची कल्पना येते. यानंतरची पायरी म्हणजे लांकडाचा उपयोग. जाड लाकडी ठोकळे खोदून–पोखरून आपल्या पायाला बसते करणें. या प्रकारचे लाकडी स्लिपर्स आजहि फ्रान्स, हॉलंड वगैरे देशांत पाहावयास मिळतात. यानंतरची पायरी म्हणजे कापड व जनावरांची जाड कातडी यांचा उपयोग. कातड्यांचा उपयोग मात्र आज शेकडों वर्षें मनुष्य आपल्या पादत्राणांसाठीं करून घेत आहे. अडीच हजार वर्षांपूर्वीं आज आपण महाराष्ट्रीय लोक ज्या-प्रकारच्या वाहणा वापरतों जवळजवळ त्याच प्रकारच्या वाहणा त्यावेळीं इजिप्शियन लोक वापरीत असत याचा पुरावाहि आज उपलब्ध आहे.

एकदां एक गोष्ट साध्य झाल्यावर मनुष्यप्राणी कधीं स्वस्थ, बसला आहे कां?, त्याची आकांक्षा दांडगी, श्रम करावयाची तयारी, आणि या जोडीला सौंदर्य दृष्टि. मग काय विचारतां? लाकडाच्या त्यानें सुबक खडावा केल्या, स्त्रियांच्यासाठीं जाड कापडी जोडे, स्लिपर्स, बूट तयार केले. कातड्याच्या वाहणा, जोडे, बूट आणि किती तरी वस्तु तयार केल्या. मनुष्य जशी कपड्यांत, दागिन्यांत 'फॅशन' करीत आला तसाच या पादत्राणांच्या बाबतींतहि त्यानें ऐट केली आहे. पादत्राणांचे आकार नी प्रकार किती म्हणून सांगावे! एकेक प्रकार पाहिला म्हणजे हसूंच येईल. आपली श्रीमंती दाखविण्याचें एक साधन म्हणूनहि अनेकांनीं आपल्या पादत्राणांना, मखमलीचें कापड, पिसें, जरीची कुसर इत्यादि प्रकारांनीं सजविलें आहे व आजहि तीच गोष्ट चालू आहे.

परिस्थितीप्रमाणें या पादत्राणांमध्यें निरनिराळे प्रकार आवश्यक आहेत. थंड प्रदेशांतील मनुष्याला आपल्या इकडील वाहणांपेक्षां बुटांचाच उपयोग अधिक होईल हें उघड आहे. आपण वापरतों त्या बुटांपेक्षां सैन्यांतील मनुष्याचा बूट दिसायला किंचित् ओबडधोबड पण टिकायला अधिक भक्कम हवा. यानंतर घोडेस्वाराचा बूटहि थोड्या निराळया प्रकारचा केल्याशिवाय कसें चालेल? सारांश गरजेप्रमाणें निरनिराळया देशांत प्रकार असतात, पण कांहीं पाद-

त्राणें शेकडों वर्षें अगदीं एका विशिष्ट देशाचींच म्हणून चालूं आहेत. आपल्याइकडील रजपुती चढाव याच प्रकाराचे द्योतक आहेत. आतां अलीकडे मात्र हे प्रादेशिक भेद अनेक कारणांमुळें कमी होऊं लागले आहेत. उदा०. बूट, स्लिपर्स इ.

पादत्राणांच्या बाबतींतल्या कांहीं मजेशीर रूढीही सर्व देशांत प्रचलित आहेत. इंग्लंडमध्यें लग्न होतांच चर्चमधून 'मधुचंद्रा'ला निघालेल्या जोडप्याच्या गाडीमागें जुने जोडे फेकण्याची किंवा बांधण्याची चाल अद्याप रूढ आहे.

सोबत दिलेल्या चित्रांत कांहीं ओळखीचीं व कांहीं बिन ओळखीचीं पादत्राणें दाखविलीं आहेत.

पाध्ये, वामन हणमंतः–(१८९९—) एक प्रसिद्ध गायक. यांचें प्राथमिक शिक्षण कोल्हापुरास झालें. इ. स. १९०८ सालीं मुंबई गांधर्व महाविद्यालयांत प्रवेश केला. इ. स. १९१९ पर्यंत कै. पंडित विष्णुबुवा दिगंबर पलुस्कर यांचे देखरेखीखालीं त्यांचें संगीत शिक्षण पुरें झालें.

नागपूर गांधर्व महाविद्यालयाचे ते एक वर्ष चालक होते. त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत गुरुजींबरोबर जाऊन आपलें संगीतविषयक ज्ञान बरेंच भक्कम केलें व आपल्या विद्येची छापहि ठिकठिकाणीं पाडली. इ. स. १९२० सालीं त्यांनीं कोल्हापूर येथें येऊन गांधर्व महाविद्यालयाची स्थापना करून आपल्या विद्येचें ज्ञान जबाबदारीनें देण्यास सुरवात केली. इ. स. १९२१ सालीं मुंबई गां. म. विद्यालयांत गव्हर्नर नामदार सर जॉर्ज लॉईड यांच्या हस्तें त्यांना संगीत–प्रवीण ही पदवी व सुवर्णपदक मिळालें. त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत व बंगालमध्येंहि दौरे काढून आपल्या गायनाची छाप पाडली आहे. त्यांच्या गायनांत स्वराचा सच्चेपणा व तानेची तयारी हीं अंगें विशेष आहेत. कै. विष्णुबुवांच्या प्रमुख शिष्यगणांत वामनरावांचें नांव गोवलें पाहिजे.

पानसुपारीः–सत्कार्याच्या शेवटीं पानसुपारी देऊन आपला आदर प्रगट करण्याचा आवश्यक कार्यक्रम. हा कार्यक्रम भोजन, व्याख्यान किंवा एखादा उत्सव याच्या शेवटीं शेवटीं करावयाचा असतो. लग्न, मुंज अशा कार्यांत याचें महत्त्व असून पाडवा, दसरा दिवाळी सारख्या सणांत देखील पानसुपारी करतात. एखाद्या इमारतीची वास्तुशांति असो किंवा वाढदिवसाचा समारंभ असो अथवा शिवाजी उत्सवासारखा एखादा उत्सव असो त्याची पूर्तता पानसुपारी दिल्याविना होत नाहीं.


बैठकीच्या पानसुपारीला मोठें स्वच्छसें तबक, कोंवळीं कोंवळीं पानें, पत्री, जायफळ, खोबऱ्याच्या फांकी, लवंग, वेलदोडे, कात किंवा कातगोळ्या सुपारी–मग ती दगडी, भरडी किंवा चिकणी कसलीहि असो–चुना, जर्दा अथवा तंबाखू, ओढण्यासाठीं विड्या वा सिगारेट इतक्या वस्तू लागतात.

पहिल्या एका माणसानें सबंध सुपारी, दुसऱ्यानें दोन पानें, तिसऱ्यानें अत्तर, चौथ्यानें गुलाबपाणी, पांचव्यानें साखर देऊन शेवटीं हारतुरे देऊन पानसुपारीचा कार्यक्रम पार पाडण्याची पद्धत लग्न–मुंजीसारख्या प्रसंगीं असते.

महत्त्वाची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल किंवा मोठी पदवी मिळाल्यामुळें अथवा लोकप्रिय मनुष्य व्यवसायानिमित्त कायमचें स्थानांतर करणार असल्यास पुष्कळ वेळां लोक अगर नातेवाईक वा इष्टमित्र यांच्याकडून त्या व्यक्तीचा गौरवसमारंभ करण्यांत येतो. अशा वेळीं प्रारंभीं गुणवर्णनपर भाषणें करून नंतर त्यास हारतुरा देऊन अल्पोपहार देण्यांत येतो. मग शेवटीं पानसुपारी, तीही बैठकीच्या पानसुपारीप्रमाणें देतात. विड्याच्या दोन पानांवर कातरलेली वा फोडलेली थोडी सुपारी ठेवून दिली कीं 'पानसुपारी' तयार होते. सार्वजनिक समारंभाचे वेळीं हीच पद्धत अनुसरतात. यानंतर अत्तरगुलाब वा फुलांचे गजरे किंवा नुसतीं फुलें व प्रमुख मंडळींना हारतुरे देण्याची पद्धत आहे.

पानिपतः–हिंदुस्थानांतील अनेक राज्यांच्या उलथापालथीस कारणीभूत असणाऱ्या लढायांचें दिल्लीजवळचें ठिकाण. याची ख्याती जरी सध्यां रणभूमि म्हणून असली तरी तें एक क्षेत्रहि आहे. मुसलमानांच्या वेळीं याचें महत्त्व बरेंच वाढलें होतें. बाबरास दिल्लीचें सिंहासन इब्राहिम लोदीपासून १५२५ त पानिपतास लढाई करून घ्यावें लागलें. त्यानंतर १५५६ मध्यें हिमूचा पराजय या ठिकाणीं करून आपलें आसन स्थिर करणें भाग पडलें. १७६१ त येथेंच मराठे व अब्दाली यांच्यामध्यें भयंकर लढाई होऊन तींत मराठ्यांना आपल्या दोन लाख सजातीयांना मुकावें लागलें. हें गांव, पांडवांनीं जीं पांच गांवें मागितलीं होतीं त्यांपैकीं एक होय. या ठिकाणींच

पादत्राणें—



१ ग्रीक, २ पंधराव्या शतकांतील युरोपमधील स्लिपर्स, ३ जुन्या इजिप्शियन वाहाणा, ४ जपानी खडावा, ५ 'पॉलेन' बूट, ६ चौदाव्या शतकांतील इटलींतील वाहाणा, ७ स्लिपर्स (आजचे), ८ रजपुती चढाव, ९ चपलाचा एक प्रकार, १० इंग्लंडमधील स्त्रियांचा शू १८ वें शतक, ११ सतराव्या शतकांतील शू, १२ प्रचलित शू, १३ कोल्हापुरी वाहणा, १४ पंप-शू, १५ आजच्या युरोपियन स्त्रीचा शू, १६ फ्रेंच सबॉट, १७ बर्फातून चालण्याकरितां वेताचा शू (कॅनडा), १८ रोमन खडावा, १९ व २१ वहाणा, २० खडावा, २२ पुणेरी जोडा.

कौरव–पांडवांमध्यें झालेलें प्रसिद्ध 'भारतीय युद्ध' ३१८० इ. स. पूर्वी झालें असें कै. चिं. वि. वैद्य यांचें मत आहे.

पापडः–(१ ला प्रकार) **साहित्य**–उडदाची निवडलेली स्वच्छ डाळ, पांढरें मिरें, पापडखार, हिंग, तिखट, मीठ, कोहाळ्याचें पाणी. **माप**–सव्वा शेर उडदाची डाळ, अर्धें कोळवें पांढरें मिरें, दोन तोळे पापडखार, चार तोळे हिंग, अर्धें कोळवें तिखट, एक कोळवें मीठ, कोहाळ्याचें पाणी पीठ भिजण्यापुरतें. **कृति**–पिठीची पावशेर डाळ वेगळी दळून घ्यावी. नंतर बाकीच्या डाळींत हिंग, मिरें व पापडखार घालून ती डाळ दळावी. मिरच्या दळतांना घालाव्यात अगर मग पूड मिसळावी. ह्याला पांढऱ्या मिरच्यांचें तिखट घालावें म्हणजे पापड पांढरे होतात. पांढऱ्या मिरच्या करण्याची पद्धत–मिरच्या एका टोपलींत घालून त्यावर आधण आलेलें पाणी ओतावयाचें. पाणी निथळून गेलें कीं त्या उन्हांत सुट्या करून वाळत टाकावयाच्या. वाळल्या कीं पांढऱ्या होतात. नंतर दळलेल्या पिठांत मीठ घालून तें कोहाळ्याच्या पाण्यांत घट्ट भिजवावें व डब्यांत केळीचें पान घालून तें पीठ चार दिवस तसेंच ठेवून द्यावें. चार दिवसांनंतर तें तेलाचा हात लावून पाट्यावर खूप कुटावें. कुटल्यानंतर तें पीठ दोन्ही हातांनीं ओढून त्याच्या दोन बोटें जाडीच्या लोळ्या कराव्यात व अनसाची दोरी घेऊन त्याच्या अदमासें एक तोळा वजनाच्या गोळ्या पाडाव्या. ती गोळी पोळपाटावर पिठी घेऊन सारखी लाटून पापड करावा. पापड लाटून झाल्यावर ते उन्हांत वाळवावेत. निवाल्यावर ते डब्यांत भरावेत. खाण्याच्या वेळीं ते निखाऱ्यावर भाजावेत अथवा तेलांत तळावेत.

(प्रकार २ रा) **साहित्य**–उडदाची डाळ, भेंड्या बाकीचें सर्व साहित्य पहिल्याप्रमाणें. **माप**–एक शेर उडदाची डाळ, दहा भेंड्या, दहा तोळे मीठ, दहा तोळे पापडखार, चार तोळे हिंग, अर्धा पावशेर पांढरें मिरें व पांढरें तिखट अदमासें. **कृति**–उडदाची डाळ एका पातेल्यांत पाणी घालून त्यांत घालावी व हातानें चोळून स्वच्छ धुवावी. म्हणजे वरील सर्व सालें जाऊन डाळ पांढरी स्वच्छ होते. मग ती उन्हांत न वाळवतां सावलींत वाळवावी. दळतांना हिंग व मिरें घालावें. पापडखार भाजून घ्यावा. भेंड्या चिरून कोहाळ्याच्या पाण्यांत शिजवाव्यात व तें पाणी गाळून घ्यावें. पिठांत तिखट, मीठ, पापडखार मिसळून तें कोहाळ्याच्या पाण्यांत भिजवावें. पाणी गार झाल्यावर भिजवण्यास घ्यावें. पीठ घट्ट भिजवून चार दिवस तसेंच ठेवावें व पहिल्या प्रकारांत सांगितल्याप्रमाणें कुटून पापड लाटावेत व तळून अगर भाजून उपयोगांत आणावेत. हा पापड जास्त हलका होतो.

(पोह्याचे) **साहित्य**–पोहे, मिरच्या, पापडखार, ताक, मीठ व हिंग. **माप**–एक शेर पोहे, दोन तोळे पापडखार, वाटीभर मीठ, हिंग २ तोळे, मिरच्या (अदमासें), ताक (पोहे भिजतील इतकें). **कृति**–प्रथम शेरभर पोहे दळून घ्यावे. दुसरे एक चिपटें पोहे घेऊन ते रात्रीं ताकांत भिजत घालावेत. मीठ व मिरच्या कुटून घ्याव्या. हिंगाची पूड करून ठेवावी. पापडखार भाजून त्याची पूड करून ठेवावी. नंतर पोहे, पहारेला तेलाचा हात लावून, कुटावेत म्हणजे ते चिकटणार नाहींत. पोहे बारीक कुटल्यावर त्याच्यांत दळलेलें पीठ तें लाटण्यायोग्य होईल इतकें मिसळून त्याच्यांत वरील सर्व सामान घालून पुन्हां बारीक कुटावें. नंतर सारख्या आकाराच्या गोळ्या करून पोहे दळलेली पिठी घेऊन त्यावर एकसारखा पातळ असा पापड लाटावा. पापड उन्हांत वाळवावेत. हे पापड तळून खावयास जास्त चांगले लागतात. तळतांना उलथणें व झारा ह्यांनीं तो पापड पसरावा म्हणजे तो पसरून मोठा होतो. हे सालपापडीप्रमाणें हलके होतात.

(प्रकार २ रा) **साहित्य**–पोहे, तिखट, मीठ, हिंग, पापडखार. **माप**–एक शेर पोहे, चार तोळे हिंग, चार डाव तिखट, पापडखार चार तोळे, मीठ अदमासें. **कृति**–प्रथम पोहे थोडे भाजून बारीक दळावे. निम्मे पोहे वेगळे दळून ठेवावे व उरलेल्या पोह्यांत तिखट वगैरे वर लिहिलेला मसाला घालून दळावे दळून तयार झालेल्या पिठाइतकेंच पाणी घेऊन त्याच्यांत मीठ घालून तें आधण तयार करावें. हें पीठ एकदम भिजवून ठेवूं नये. दर खेपेस थोडें पीठ, तितकेंच उकळत असलेलें पाणी घालून तें भिजवून चांगलें कुटून त्याच्या गोळ्या करून तो पापड सारखा लाटून घ्यावा. सर्व पापड लाटल्यावर उन्हांत वाळवावेत.

पामर्स्टन, हेन्री जॉन टेंपल (१७८४–१८६५):–एक ब्रिटिश मुत्सद्दी. इ. स. १८०७ सालीं लोकसभेंत त्यानें प्रथम प्रवेश केला. लवकरच त्याला आरमारा.

वरील मुख्याधिकाऱ्याची जागा (Lord of the Admiralty) मिळाली. इ. स. १८०९ सालीं तो युद्ध–चिटणीस झाला. या जागेवर तो इ. स. १८२८ पर्यंत होता. इ. स. १८१९ पासून तो प्रधानमंडळांतहि होता.

हुजुरपक्षीय (Tory) म्हणून पर्सिव्हल व लिव्हरपूल यांच्या हाताखालीं व त्यांच्यानंतर लगलीच येणाऱ्या मुख्य प्रधानांच्या हाताखालीं त्यानें काम केलें; परंतु कॅनिंगच्या मृत्यूनंतर त्याचा कल उदारमतवाद्यांकडे (Whigs) झुकला. इ. स. १८३० सालीं लॉर्ड ग्रेच्या हातांखालीं त्याला परराष्ट्रीय सेक्रेटरी करण्यांत आलें. इ. स. १८३४–३५ एवढा काल वगळून इ. स. १८४१ पर्यंत तो या जागेवर होता; इ. स. १८४६ सालीं पुन्हां या जागेवर आला. इ. स. १८५१ सालीं त्यानें एका कामांत आपल्या सहकाऱ्यांचा व राणीचा सल्ला न घेतां आपलें स्वतंत्र धोरण आंखल्यानें त्यास पदच्युत व्हावें लागलें. तो इ. स. १८५३–५५ पर्यंत होम सेक्रेटरी (गृह–चिटणीस) होता. क्रीमियन वॉरसंबंधीं इंग्लिश जनतेंत पुढें पुढें अनास्था उत्पन्न झाली. या संधीचा फायदा घेऊन तो मुख्य प्रधान झाला. इ. स. १८५८ सालीं त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला, पण इ. स. १८५९ सालीं पुन्हां तो मुख्य मंत्री झाला. तेव्हांपासून शेवटपर्यंत (इ. स. १८६५) तो मुख्य प्रधानकीच्या जागेवर होता.

ब्रिटनच्या हक्कांसंबंधीं पामर्स्टन हा अत्यंत जागरूक असे. आपले हक्क सांगतांना त्यानें पार्लमेंट सभेंत व परराष्ट्रीय परिषदेंत आवेशयुक्त भाषणें केलीं. इ. स. १८३० सालीं बेल्जियम् व हॉलंड वेगळे झालें; यास पामर्स्टन याचें धोरणच पुष्कळ अंशीं कारणीभूत होतें. रशियाचा डोळा कॉन्स्टँटिनोपलवर आहे हें ओळखून त्यानें तंबी देऊन रशियाला गप्प बसविलें. फ्रान्सच्या हालचालीवरहि त्याची सूक्ष्म पाळत होती. आपल्या सहकाऱ्यांच्या सल्ल्याचा त्यानें अनेक वेळां अव्हेर केला; परराष्ट्रीय मंत्र्यालाहि त्यानें अनेक वेळां दुखविलें; पण हें सर्व ब्रिटिश साम्राज्याच्या हितासाठीं केलें, त्यामुळें तो लोकप्रिय झाला.

पायथागोरस (खि. पू. ५८४ ते ५१०):–एक महान् ग्रीक तत्त्ववेत्ता व गणीति. जीवनासंबंधीं, व्यवस्थितपणें माहिती मिळत नाहीं. याचा जन्म सॅमोस (Samos) येथें झाला असावा. त्याचें अध्ययन व प्रवास खूप झाला असावा असें त्यानें लिहिलेल्या पुस्तकांवरून वाटतें. खि. पू. ५३० सालीं इटलीच्या खालच्या बाजूस असलेल्या क्रोटोना (Crotona) नामक एका ग्रीक नगरींत त्यानें एक संस्था स्थापन केली. या संस्थेस त्याच्या नांवावरूनच पायथागोरियन असें नांव ठेवण्यांत आलें. या संस्थेचे सदस्य आत्मसंयमन, साधी रहाणी व आत्मचिंतन यांत गढून गेले होते. आत्मा हा एका शरिरांतून दुसऱ्या शरिरांत प्रवेश करतो अशी त्याची दृढ समजूत होती. या संस्थेनें गणित शास्त्रांत परिश्रमपूर्वक मोठे शोध लावले. युक्लिडचा सत्तेचाळीसावा सिद्धांत पायथागोरस यानेंच शोधून काढला असून त्या सिद्धांतास त्याचेंच नांव देण्यांत येतें.


पायथागोरसनें काढलेली संस्था लोकप्रिय असली तरी तिजवर सरकारी रोष होता. देशांत लोकांकडून बंडाची उठावणी होतांच या संस्थेच्या अनेक सदस्यांना पकडून ठार मारण्यांत आलें. पायथागोरस मात्र सरकारच्या तावडींतून सुटला; पण त्याचें पुढील आयुष्य कष्टांतच गेलें व त्यांतच त्याचा अंत झाला.

पायोऱ्हियाः–दांतांच्या हिरड्यांतून पू येणें या विकारास पायोऱ्हिया ॲल्व्हिओलॅरिस् (Pyorrohoea Alveolaris) म्हणतात. दांतांवर घाण (Tartar सांठूं दिल्यास हिरड्या दांतांपासून दूर सरूं लागतात आणि दांत व हिरड्या यांच्या दरम्यान पोकळी उत्पन्न होऊन त्यांतून रक्तमिश्रित पू सांचून राहतो व वाहतो. अर्थात्‌च त्यामुळें श्वासास दुर्गंध येतो. ही घाण अन्नपाण्याबरोबर पोटांत जाऊं लागते व त्या विषाचे परिणाम प्रकृतिवर घडतात. पचनक्रिया बिघडते. दांत ढिले व दुखरे होऊन चर्वण चांगलें करतां येत नाहीं. कामावर लक्ष लागत नाहीं, वृत्ति उदासीन किंवा चिंताकुल बनते. इतरहि कित्येक मानसिक विकारांचें मूळ पायोऱ्हियांत आढळतें. कपाळदुखी, अंगांत कळा किंवा मुंग्या येणें, घेरी येणें, जड वाटणें, घोट्याभोंवतीं जाड सूज येणें इत्यादि लक्षणेंहि उद्‌भवतात. सांधे धरणें, डोळ्याचे विकार होणें (Iritis), आंतड्याचे कांहीं विकार किंवा रक्तक्षय होणें यांतहि पायोऱ्हियाचें पर्यवसान पुष्कळदां घडतें. एकूण हा विकार क्षुल्लक गणतां येत नाहीं. **उपाय**–किडक्या दांतांचीं मुळें राहिलीं असल्यासदेखील वरील लक्षणें घडूं शकतात. तीं हुडकून काढून

टाकलीं पाहिजेत. पुष्कळदां खरें कारण न उमगल्यानें नुसत्या लक्षणांवरून केलेले उपचार निष्फळ ठरतात. दांतांवर सांचलेले टार्टर वारंवार कुशल दंतवैद्याकडून काढवून घ्यावें लागतें. हिरड्यास कॉपरसल्फेट, आयोडिन्, हायड्रोजन पेरॉक्साइड् हीं औषधें जंतुनाशक म्हणून लावून दांत स्वच्छ ठेवावेत. दांत समूळ उपटून टाकल्यावांचून मात्र पायोऱ्हिया पूर्ण बरा कधींच होत नाहीं. पण घट्ट व बळकट दांत काढून टाकल्यानेंहि व चांगले कृत्रिम दांत न घेतां आल्यानेंहि जास्तच अपाय घडतो. म्हणून विचारपूर्वकच दांत काढणें हा उपाय करावा.

आयुर्वेदिक उपाय—मंजिष्ट रक्तचंदन, बाळंतलिंबाची साल, वावडिंग, खडीसाखर, बकुळीची साल यांच्या दंतमंजनानें रोज ३ वेळ दांत स्वच्छ करावेत व त्रिफळेच्या काढ्यानें २ वेळां गुळण्या कराव्यात.

पारवाः—कबूतराप्रमाणें दिसणारा पारव्या रंगाचा पक्षी. याच्या शरीराची ठेवण, शब्द व इतर संवयी या सर्व कबूतराप्रमाणेंच फक्त हा पक्षी रंगानें पारवा असतो; व दुसरें वैशिष्ट्य म्हणजे पारवा माणसाळत नाहीं.शिवाय तो उंच इमारतीवर किंवा विहिरीच्या खबदाडांत राहतो. या प्राण्याला सर्द हवा लागते.



पारवा.

पारसनीस, दत्तात्रय बळवंतः- (१८७०–१९२६)—इतिहाससंशोधक. यांचा जन्म सातारा येथें २७ नोव्हेंबर १८७० रोजीं झाला. यांचें मराठी व इंग्रजी शिक्षण साताऱ्यास झालें. हायस्कूलमध्यें असतांनाच वाचनाचा व लेखनाचा नाद लागल्यामुळें त्यांचें आपल्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होत गेलें व मॅट्रिकपर्यंत शिक्षण होऊन १८९० च्या सुमारास त्यांनीं शिक्षणास रामराम ठोकला.

अर्धवट शिक्षण टाकून सार्वजनिक जीवनाला वाहून घेतलें व लौकरच त्यांचा मोठमोठ्या लोकांशीं परिचय झाला. १८८७ सालच्या ऑक्टोबरमध्यें 'महाराष्ट्र कोकीळ' या नांवाचें मासिक त्यांनीं सुरू केलें व चरित्रें, काव्यें, ऐतिहासिक आख्यायिका इत्यादि अनेक उपांगांनीं थोडेच दिवसांत तें मासिक लोकप्रिय झालें. या मासिकांत ऐतिहासिक आख्यायिका देतांना माहिती उत्तम असावी म्हणून त्या त्या ठिकाणची प्रत्यक्ष माहिती व ऐतिहासिक कागदपत्र मिळविण्याचा उद्योग त्यांनीं आरंभला. १८९२ सालीं छापखान्याच्या गैरसोयीमुळें हें मासिक बंद पडलें. लौकरच 'झांशीच्या लक्ष्मी बाईसाहेब यांचें चरित्र' या त्यांच्या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर त्यांचें लक्ष अितिहासाकडे अधिक वेधलें. हें चरित्र लिहीत असतांना हिंदुस्थानांत मिळणारीं इंग्रजी पुस्तकें व सरकारी रिपोर्ट यांचा तर त्यांनीं उपयोग केलाच. पण इंग्लंडहूनहि १८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धासंबंधींचें प्रकाशित वाङ्मय त्यांनीं आणविलें व या युद्धांत जीं जीं शहरें गोंविलीं होतीं त्या त्या ठिकाणीं जाऊनहि बरीच माहिती गोळा केली. लक्ष्मीबाईच्या चरित्राची साधनासामग्री गोळा करीत असतांनाच मध्यहिंदुस्थानांत बुंदेलखंड व छत्रसाल यांसंबंधींहि पुष्कळ माहिती मिळाली.

पुढें सरदार, जहागीरदार व संस्थानिक यांच्याकडे असलेले कागदपत्रहि त्यांना मिळूं शकले व त्यांचा त्यांनीं उत्तमपणें संग्रह केला व त्यांच्या आधारें त्यांनीं ब्रह्मेंद्रस्वामीचें चरित्र, बायजाबाई शिंदे यांचें चरित्र, बाळाजी बाजीराव यांची रोजनिशी, अयोध्येचा नबाब इत्यादि पुस्तकें लिहिलीं. १९०३ सालीं सातवे एडवर्ड बादशाहा यांच्या राज्याभिषेकानिमित्त राज्यारोहणाचा समारंभ झाला. त्यावेळीं त्यांनीं स्वतः दिल्ली पाहून मिळविलेलीं साधनें व इतर ग्रंथांतील टाचणें एकत्र करून "दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ" या पुस्तकांत दिल्लीचा सुंदर इतिहास व इतर माहिती दिली आहे. ऐतिहासिक कागदपत्रांच्या प्रकाशनासाठीं 'इतिहास-संग्रह' या नांवाचें मासिक त्यांनीं १९०८ ते १९१६ पर्यंत चालविलें होतें. यांनीं जमविलेला चित्रसंग्रह सातारा येथें इमारत बांधून तींत ठेवला आहे.

पारा (Mercury):- हा एक मूल धातु (Element) आहे. याचें अणु वजन २०० आहे व दार्ढ्य (Specific gravity) नेहमींच्या उष्णमानांत १३·५९ आहे. याचा द्रवबिंदु (Melting Point) ३९·५° सेंटीग्रेड इतका असतो. ३५७° सेंटीग्रेड इतक्या उष्णतेनें तो

जळतो. उष्णतामानाच्या वाढीनें त्याचा व्याप अधिक प्रमाणांत वाढत जातो.; त्यामुळें याचें दार्ढ्यहि इतर पदार्थांच्या मानानें अधिक जलदीनें बदलत जातें. पारा हा उष्णता व विद्युत् यांचा वाईट ग्राहक (Bad conductor) आहे. Electrical conductivity चें एक नमुनेदार प्रमाण (Standard) म्हणून हा समजला जातो. हें प्रमाण १·०० इतकें आहे. तांब्याचें या बाबतींत प्रमाण ५५·८६ इतकें आहे.

उष्णतामान नेहमींचें (Normal) असतां पाऱ्यावर हवा, ऑक्सिजन किंवा कॅर्बोनिक ॲसिड गॅसचा कांहींच परिणाम होत नाहीं; मात्र ज्वलनबिंदू जवळ (Boiling point) तो प्राणवायूशीं संयोग (oxidize) करूं लागतो.

नैट्रिक ॲसिडमध्यें व उष्ण गंधकाच्या ॲसिडमध्यें तो ताबडतोब विरघळतो; पण हायड्रोक्लोरिक ॲसिड अगर कमी शक्तीच्या सल्फ्यूरिक ॲसिडचा (Dilute Sulphuric acid) त्याच्यावर नेहमींच्या उष्णतामानांत, कांहींच परिणाम होत नाहीं. उष्णतेच्या साह्यावांचून दुसऱ्या धातूंत मिसळून जाण्याचा एक महत्त्वाचा गुणधर्म पाऱ्यांत आहे. या नवीन तयार झालेल्या पदार्थास Amalgam असें म्हणतात. अशापैकीं कांहीं Amalgam व्यापारदृष्ट्या महत्त्वाचे आहेत. याचा रंग रुपेरी पांढरा असून सामान्य उष्णतामानांत, द्रवरूपानें राहणारा हा एकमेव धातु आहे. तो गोठून घन होऊं शकतो; अशा घनस्थितींत तो इतर धातूप्रमाणें हातोडीनें फोडतां येतो, व मळून त्याचा गोळा करतां येतो. त्याचें द्रवस्वरूपांतून घनस्वरूपांत रूपांतर झालें असतां, त्याचा आठ बाजू असलेला स्फटिक (Crystal) तयार होतो.

फार प्राचीन काळापासून पारा हा धातु सर्वांच्या परिचयाचा आहे. इ. स. पूर्वी ७०० वर्षांमागें स्पेनमध्यें याच्या खाणी होत्या व त्याचा ग्रीक लोक, मोठ्या प्रमाणांत उपयोग करीत असत. मध्ययुगीन कालांत, रसायनशास्त्रज्ञांनीं (Alchemist) या धातूंची शुद्धि (Distillation) करण्याकडे बरेंच लक्ष दिलें; सर्व धातूंचा तो अर्क असावा असा त्यांचा तर्क होता व तो खरा ठरविण्याच्या दृष्टीनें मध्ययुगीन शास्त्रज्ञांचे प्रयोग चालले होते; अठराव्या शतकाच्या मध्यानंतर पारा हा धातूंचा अर्क नसून हाहि एक स्वतंत्र धातू आहे ही गोष्ट शास्त्रज्ञांना कळली.

पृथ्वीच्या कवचींत (Crust) पारा हा चकचकीत कणाकणांनीं सांपडतो; कित्येक वेळां तो द्रव्य स्वरूपांतच व पुष्कळ प्रमाणांत सांठलेला असा आढळतो. कित्येक वेळां अनेक बारड्या भरून तो वर काढतां येईल इतक्या प्रमाणांत एकत्र सांठलेला आढळतो. तो फ्रान्समध्यें लिमोगेस या ठिकाणीं विपुल प्रमाणांत सांपडतो.

पारायणः–आरंभापासून अखेरपर्यंत, एका ग्रंथाचें, पुरें केलेलें एक वाचन. पूर्वी व आतांहि महत्त्वाच्या ग्रंथांचीं पारायणें करण्याची प्रथा रूढ आहे. तथापि पूर्वीच्या पद्धतीनें सध्यां कोणीहि पारायण करीत नाहीं. कारण तसें करणें सध्यां फारच त्रासदायक झालेलें आहे. पूर्वी मात्र या पारायणांनीं आपलें महत्त्व चांगलेंच प्रस्थापित केलें. आपल्याला मूळ स्वरूपांत असलेले वेद सध्यां जशाच्या तशा स्वरूपांत टिकवून ठेवण्याचें श्रेय पारायण पद्धतीसच द्यावें लागेल. पूर्वीचे ग्रंथ पद्यात्मक असल्यानें पारायणानें ते तोंडपाठच होत. पूर्वीच्या तोंडपाठ करण्याच्या तऱ्हा तीन आहेत. त्या वर्ग, घन व जटा ह्या होत. सध्यां क्वचितच पारायणें झालेलीं (पूर्वीची दृष्टी ठेवून) दिसून येतात. अलिकडे पारायणाला ' सांप्रदायिक पद्धतीनें केलेल्या धार्मिक ग्रंथाचें वाचन' असा अर्थ आला आहे. प्रायः महाराष्ट्रांतील मनुष्य संस्कृत, मराठी व हिंदी या तीन भाषेंतीलच ग्रंथ घेतो. संस्कृतमधल्या वेद, भागवत, महाभारत, रामायण, गीता या ग्रंथांना तो मान लाधला आहे. गुरुचरित्र, पांडवप्रताप, हरिविजय, भक्तिविजय, शिवलीलामृत, जैमिनी-अश्वमेध तसेंच ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकारामाचा गाथा व दासबोध हे मराठी ग्रंथ पारायणास मुमुक्षु निवडतो. हिंदीमधला तुळसीदासाचें रामायण हा एकच ग्रंथ पारायणार्ह ठरला गेला. कुलसंप्रदायाप्रमाणें कांहीं सप्तशतीचे पाठ, नवनाथभक्तिसार, शनिस्तोत्र, हनुमानस्तोत्र, महिम्न स्तोत्र, श्रीमत् आद्य शंकराचार्य यांचीं वैराग्यस्तोत्रें, देवीस्तोत्र यांतून एखाद्याचें पारायण करितो. सर्व ग्रंथांचे पारायणकाल एकच नाहींत. त्यापैकीं कांहींचे चातुर्मासांत, कांहींचे नवरात्रांत, कांहींचे व्रताच्या मुदतींत, तर कांहींचे विशिष्ट दिवशीं येत असतात. हीं पारायणें देवाचा साक्षात्कार व्हावा, अरिष्ट निवारावें, त्रिविध तापाचा उपशम व्हावा, द्रव्य मिळावें म्हणून केलीं जातात. कित्येक वेळां तीं १ पासून १०८ वेळां देखील करतात. महाभारत, भागवत, वेद, रामायण यांसारख्या प्रचंड

ग्रंथांचीं पारायणें एकदांच केलीं जातात. सात दिवसांत जें पारायण पुरें केलें जातें त्यास पारायण न म्हणतां सप्ताह म्हणतात.

पार्नेल, चार्लस स्टुअर्ट (१८४६–९१):–एक थोर आयरिश देशभक्त. तो एक जमिनदार व प्रॉटेस्टंट होता. स्वभावानें एकलकोंडा व लाजाळू असूनहि त्याचें आपल्या पक्षावर इतकें जबरदस्त वजन होतें कीं त्यामुळें लोकसभा (House of Commons) खिळखिळी होऊन गेली. यानें केल्याप्रमाणें पद्धतशीर अडवणूक इंग्लंडच्या पार्लमेंटनें यापूर्वी कधींहि अनुभवली नव्हती.

डब्लिनमध्यें स्वतंत्र पार्लमेंट स्थापन करणें ही पार्नेलची महत्त्वाकांक्षा होती. त्यावेळीं आयर्लंडमध्यें शेतकरी वर्गाचीं अनेक गाऱ्हाणीं होतीं व तो वर्ग सरकारविरुद्ध चळवळ करूं लागला होता. या प्रकारामुळें, "स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं एक बळकट संघटना" होईल अशी पार्नेल यास उमेद होती. इ. स. १८३२ सालीं त्याच्यावर फोनी पार्क येथें झालेल्या खुनांत सामील असल्याबद्दल आरोप ठेवण्यांत आला. त्याची जाहीररीत्या चौकशी होऊन तो निर्दोषी सुटला. पार्नेलच्या इतिहासांत हा खटला अत्यंत महत्त्वाचा आहे. या खटल्यांतून सुखरूपपणें बाहेर पडतो न पडतो तोंच त्यावर एक घटस्फोटाचें कौटाळ आलें. या प्रकरणामुळें त्याचे अनेक सहकारीहि त्यास सोडून गेले व पार्लमेंटांतील आयरिश पक्षाच्या नेतृत्वपदासहि त्यास मुकावें लागलें. या मनःसंतापांत पार्नेल आजारी पडून इ. स. १८९१ आक्टोबर ६ रोजीं मृत्यू पावला.

पार्लमेंटः–ग्रेटब्रिटन व आयर्लंड यांचें कायदेमंडळ. हें राजा, लॉर्डांची सभा व कॉमन्स सभा यांचें बनलेलें आहे. लॉर्ड्स दोन प्रकारचे–एक गृहस्थ पेशाचे, (Lords Temporal) व दुसरे भिक्षुकी पेशाचे (Spiritual) असतात. राजा मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानेंच राज्यकारभार हाकतो. त्यामुळें पार्लमेंट हें वस्तुतः लॉर्डांची सभा व कॉमन्स सभा यांचेंच कायदेमंडळ राहतें. लॉर्डांची अथवा उमरावांची सभा ही दोहोंत अधिक जुनी; परंतु कॉमन्स सभा ही क्रमानें विकास होत होत महत्त्वाची होऊन बसली आहे, व सध्यां ह्या सभेला उमरावांच्या सभेहून अधिक महत्त्व प्राप्त झालें आहे. या सभेची राष्ट्राच्या तिजोरीवर सत्ता चालते व कर्ज उभारण्याचा अधिकार पण या सभेला आहे. ब्रिटिश पार्लमेंट सॅक्सन कालच्या Witenagemot या जनरल कॉन्सील अथवा शाहण्या माणसांची सभा या सभेंत बीजरूपानें सांपडतें. या कॉन्सिलला 'एडवर्ड दी कन्फेसर'च्या कारकीर्दीत पार्लमेंट हें नांव देण्यांत आलें; पण त्यावेळीं हें कॉन्सिल प्रातिनिधिक नव्हतें. नॉर्मनांनीं इंग्लंड जिंकल्यानंतर Witenagemot रद्द होऊन त्याऐवजीं 'ग्रेट कॉन्सिल ऑफ दी रेल्म' नांवाची संस्था स्थापण्यांत येऊन ती प्रथमच १०७० सालीं बोलावण्यांत आली. प्रत्येक कौंटींतील जमिनदारांचे बारा प्रतिनिधी त्यांत उपस्थित होते. प्रथमतः तिचे अधिकार व कर्तव्यें मर्यादितच होतीं. खरें सांगावयाचें म्हणजे ही संस्था केवळ नामधारी होऊन राहिली होती. प्लँटेजेनेट राजा दुसरा हेनरी याच्या कारकीर्दीत (११५४–८९) हे कॉन्सिल निममितपणें बोलावलें जात असे; सरदार मंडळींत शायरमधील नाइट्स् (Knights)चा समावेश झाल्यामुळें कॉमन्ससभेच्या घटनेचीं बीजें त्यांत दिसूं लागलीं. १२१५ सालीं घटनेंत महत्त्वाचें पाऊल पुढें पडलें. 'मॅगना–चॅर्टा'नामक संज्ञेनें कॉन्सिलची घटना स्पष्टपणें रेखाटली जाऊन त्याचे कर लादण्याविषयींचे अधिकार प्रथमतःच औपचारिकरीत्या मानण्यांत आले. मोठे सरदार (Barons) व लहान सरदार असा फरक करण्यांत आला. मोठ्या सरदारांना खास आमंत्रणानें (Special writs) पाचारण्यांत येई तर लहान सरदारांना शेरीफामार्फत सामान्य निमंत्रण–पत्रिकांनीं बोलावण्यांत येई. एव्हांपासून पार्लमेंट् प्रातिनिधीक होऊं लागलें. यापुढें ऐंशीं वर्षें लोक व राजा यांच्या दरम्यान चॅर्टासंबंधीं झगडा झाला. या झगड्यांत, सिमन डी मॉटफोर्ट यानें नोबल्स् व शायरचे नाइट्स यांच्याशिवाय प्रत्येक शहराचे दोन याप्रमाणें १२६५ सभासद पार्लमेंटकरितां बोलावले; याप्रमाणें कॉमन्स सभेचा पाया घालण्यांत आला. स्टॅटयूट ऑफ वेस्टमिनिस्टरमध्यें 'पार्लमेंट' हा शब्द प्रथमतःच वापरण्यांत आला. १३२२ सालीं वेल्श प्रतिनिधी घेण्यांत आले. यानंतर वीस वर्षांनीं विभागणी होऊन दोन सभा विकसित झाल्या. धर्मोपाध्याय व सरदारलोक (Baronage) यांचें वरिष्ठ कायदेमंडळ व नाइट् किताबाचे सरदार व ग्रामप्रतिनिधी (Burgesses) यांची कॉमन्स सभा बनली. ही कॉमन्स सभा सेंट स्टेफेनच्या प्रार्थनामंदिरांत

भरत असे. सदर सभेचा पहिला अध्यक्ष पीटर डी लॅमेअर (Peter de la mare) याची निवडणूक १३७७ सालीं झाली. दोन्ही सभांतील कामाकाजाची नोंद ठेवण्यांत येऊन सन १५०९ पासून पार्लमेंटचे कायदे छापण्यांत येऊं लागले. स्टुअर्ट अंमलाच्या प्रारंभापासून राजा व प्रजा यांच्या दरम्यानचा दीर्घकालीन झगडा सुरू झाला. त्याचें पर्यवसान १६८८ सालच्या राजक्रान्तींत होऊन, दुसऱ्या जेम्सला देशत्याग करावा लागला, व राजाचे मुख्य अधिकार लोकप्रतिनिधींना मिळाले. सतरावें शतक संपण्यापूर्वीच तिसऱ्या विल्यमनें कॉमन्स-सभेंत मताधिक्य असलेल्या पक्षांतून आपले प्रधान निवडून पक्षाधिनिष्ठ सरकारला सुरवात केली होती. पहिल्या जॉर्जला इंग्रजीचा गंधहि नव्हता, दुसऱ्या जॉर्जला बेताचेंच इंग्रजी येत होतें व या उभयतांना ब्रिटिश राजकारणाविषयीं आस्था तितकीच होती; त्यामुळें एका मुख्य मंत्र्याच्या नेतृत्वाखालील मंत्रीमंडळाची प्रथा अठराव्या शतकांत रूढ झाली.

स्कॉटलंडची पार्लमेंट इंग्लंडच्या पार्लमेंटमध्यें सन १७०७ मध्यें विलीन झाली. १८०१ मध्यें आयर्लंडशीं झालेल्या संयोगामुळें पुढील योजना करणें भाग पडलें. कॉमन्स सभा ही अत्यंत अप्रातिनिधिक झालेली होती. त्यांतील प्रतिनिधींची विभागणी अत्यंत विषम होती. बर्मिंगहॅम व मॅन्चेस्टर यांच्यासारख्या शहरांच्या वांट्याला मुळींच सभासद नव्हते. मोठमोठे जमिनदार व उमरावांच्या सभेंतील सभासद यांच्या मालकीचे कांहीं गांव होते (Pocket Buroughs) यांच्या तर्फे ते आपले प्रतिनिधी निवडीत. १७८५ सालीं निवडणुकीच्या सुधारणा करण्याकरितां पिटनें ठराव आणला; परंतु १८३२ च्या रिफॉर्म ॲक्टापर्यंत कांहीं फरक झाला नाहीं. इंग्लिश लोकांच्या जीवनांत उद्योगधंद्याच्या वाढीमुळें फरक पडला; मोठमोठीं शहरें उदयास येऊं लागलीं व मध्यम वर्गाची संख्येच्या व महत्त्वाच्या दृष्टीनें वाढ झाली. १८३२ च्या कायद्यानें बडे जमिनदार व महाजन (Aristocracy) यांच्याकडील असला अधिकाराचा मक्ता नष्ट केला व मध्यम वर्गाला मतदानाचा अधिकार देऊन राजकारणांतील गुरुत्वाकर्षणाचें केंद्र बदललें. १८६७ च्या रिफॉर्म ॲक्ट या सुधारणा कायद्यानें मतदानाचा हक्क अधिक व्यापक केला. १८८४ सालीं शेतीवर काम करणाऱ्या मजुरानांहि मतदानाचा हक्क देण्यांत आला. या वेळीं कॉमन्स सभेची सत्ता प्रबल होऊन बसली होती; परंतु उमरावांच्या सभेंत अनेक प्रश्नावर मतभेद माजले होते. विशेषत: आयर्लंडच्या होमरूलच्या प्रश्नावर बरेंच मतभेदाचें वादळ माजलें, याचें पर्यवसान १९११ सालचा पार्लमेंट ॲक्ट पास होण्यांत झालें. या कायद्यानें दोन्ही सभागृहांमधील परस्पर संबंधांत संपूर्ण फरक घडवून आणला. हा कायदा उमरावांनीं मोठ्या नाखुषीनें मान्य केला. त्यांना उदारमतवादी लोकांमधून नवीन सरदार करण्याची धमकी देण्यांत आली म्हणूनच त्यांनीं या कायद्यास कशीबशी संमति दिली. या कायद्यानें उमरावांच्या सभेचा 'मनी बिल' नाकारण्याचा हक्क काढून घेतला व एखादें बिल कॉमन्स सभेंत त्रिवार पास झालें असतां उमरावांच्या सभेनें तें फेटाळून लावलें तरी त्याला कायद्याचें स्वरूप येतें असें ठरवून या कायद्यानें उमरावांच्या सभेचा बिल फेटाळण्याचा हक्क निरुपयोगी केला. लोकसत्ताक राज्यपद्धतींतील विकासाच्या दृष्टीनें १९१८ चें Representation of the People Acts नांवाचे कायदे पसार झाले. त्यांनीं तीस वर्षांवरील वयाच्या स्त्रियांना मतदानाचे हक्क दिले; मतदारांची संख्या दोन कोटीपेक्षां जास्त इतकी वाढविली व स्त्रियांना कॉमन्स सभेंत बसण्याचा हक्क दिला. या कायद्यानें सभासदांची संख्या ७०७ पर्यंत वाढविली. सध्यां उमरावांच्या बायकांना स्वतःच्या हक्कानें उमरावांच्या सभेंत बसतां येत नाहीं. सांप्रत उमरावांच्या सभेंत तीन्ही आर्चबिशप धरून कांहीं बिशप्स, वंशपरंपरा चालत आलेले व नवे पीअर्स व लॉ लॉर्ड्स अशांचा समावेश होतो. लॉ लॉर्ड्स हे आपल्या हयातीपर्यंत सरदार असतात, त्यांना न्यायदानाचें काम करावें लागतें; कारण उमरावांची सभा अद्याप अंतिम न्यायालय आहे. पार्लमेंटची पहिली निवडून आलेली स्त्री–सभासद Countess Markiewiez या होत. कॉमन्ससभेंत बसणारी पहिली स्त्री सभासद लेडी ॲस्टर या होत. त्या १९१९ सालीं प्रथम निवडून आल्या. १९२९ सालीं १४ स्त्री–सभासद होते व १९२९ सालच्या मजूर सरकारांत प्रथमतःच स्त्रियांचा मंत्रीमंडळांत समावेश झाला. १९११ पासून कॉमन्स सभेच्या सभासदांना वार्षिक ४०० पौंड पगार मिळूं लागला.

पार्वती:–हिमालय व मेना यांची कन्या. नारदाच्या सांगण्यावरून हिमालयानें ही शंकरास दिली. एकदां

ग्रंथांचीं पारायणें एकदांच केलीं जातात. सात दिवसांत जें पारायण पुरें केलें जातें त्यास पारायण न म्हणतां सप्ताह म्हणतात.

पार्नेल, चार्लस स्टुअर्ट (१८४६–९१):–एक थोर आयरिश देशभक्त. तो एक जमिनदार व प्रॉटेस्टंट होता. स्वभावानें एकलकोंडा व लाजाळू असूनहि त्याचें आपल्या पक्षावर इतकें जबरदस्त वजन होतें कीं त्यामुळें लोकसभा (House of Commons) खिळखिळी होऊन गेली. यानें केल्याप्रमाणें पद्धतशीर अडवणूक इंग्लंडच्या पार्लमेंटनें यापूर्वीं कधींहि अनुभवली नव्हती.

डब्लिनमध्यें स्वतंत्र पार्लमेंट स्थापन करणें ही पार्नेलची महत्त्वाकांक्षा होती. त्यावेळीं आयर्लंडमध्यें शेतकरी वर्गाचीं अनेक गाऱ्हाणीं होतीं व तो वर्ग सरकारविरुद्ध चळवळ करूं लागला होता. या प्रकारामुळें, "स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं एक बळकट संघटना" होईल अशी पार्नेल यास उमेद होती. इ. स. १८३२ सालीं त्याच्यावर फोनी पार्क येथें झालेल्या खुनांत सामील असल्याबद्दल आरोप ठेवण्यांत आला. त्याची जाहीररीत्या चौकशी होऊन तो निर्दोषी सुटला. पार्नेलच्या इतिहासांत हा खटला अत्यंत महत्त्वाचा आहे. या खटल्यांतून सुखरूपपणें बाहेर पडतो न पडतो तोंच त्यावर एक घटस्फोटाचें कौटाळ आलें. या प्रकरणामुळें त्याचे अनेक सहकारीहि त्यास सोडून गेले व पार्लमेंटांतील आयरिश पक्षाच्या नेतृत्वपदासहि त्यास मुकावें लागलें. या मनःसंतापांत पार्नेल आजारी पडून इ. स. १८९१ आक्टोबर ६ रोजीं मृत्यू पावला.

पार्लमेंटः–ग्रेटब्रिटन व आयर्लंड यांचें कायदेमंडळ. हें राजा, लॉर्डांची सभा व कॉमन्स सभा यांचें बनलेलें आहे. लॉर्ड्स दोन प्रकारचे–एक गृहस्थ पेशाचे, (Lords Temporal) व दुसरे भिक्षुकी पेशाचे (Spiritual) असतात. राजा मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानेंच राज्यकारभार हाकतो. त्यामुळें पार्लमेंट हें वस्तुतः लॉर्डांची सभा व कॉमन्स सभा यांचेंच कायदेमंडळ राहतें. लॉर्डांची अथवा उमरावांची सभा ही दोहोंत अधिक जुनी; परंतु कॉमन्स सभा ही क्रमानें विकास होत होत महत्त्वाची होऊन बसली आहे, व सध्यां ह्या सभेला उमरावांच्या सभेहून अधिक महत्त्व प्राप्त झालें आहे. या सभेची राष्ट्राच्या तिजोरीवर सत्ता चालते व कर्ज उभारण्याचा अधिकार पण या सभेला आहे. ब्रिटिश पार्लमेंट सॅक्सन कालच्या Witenagemot या जनरल कॉन्सील अथवा शाहण्या माणसांची सभा या सभेंत बीजरूपानें सांपडतें. या कॉन्सिलला 'एडवर्ड दी कन्‌फेसर'च्या कारकीर्दीत पार्लमेंट हें नांव देण्यांत आलें; पण त्यावेळीं हें कॉन्सिल प्रातिनिधिक नव्हतें. नॉर्मनांनीं इंग्लंड जिंकल्यानंतर Witenagemot रद्द होऊन त्याऐवजीं 'ग्रेट कॉन्सिल ऑफ दी रेल्म' नांवाची संस्था स्थापण्यांत येऊन ती प्रथमच १०७० सालीं बोलावण्यांत आली. प्रत्येक कौंटींतील जमिनदारांचे बारा प्रतिनिधी त्यांत उपस्थित होते. प्रथमतः तिचे अधिकार व कर्तव्यें मर्यादितच होतीं. खरें सांगावयाचें म्हणजे ही संस्था केवळ नामधारी होऊन राहिली होती. प्लँटेजेनेट राजा दुसरा हेनरी याच्या कारकीर्दींत (११५४–८९) हे कॉन्सिल निममितपणें बोलावलें जात असे; सरदार मंडळींत शायरमधील नाइट्स् (Knights)चा समावेश झाल्यामुळें कॉमन्ससभेच्या घटनेचीं बीजें त्यांत दिसूं लागलीं. १२१५ सालीं घटनेंत महत्त्वाचें पाऊल पुढें पडलें. 'मॅगना–चॅर्टा'नामक संज्ञेनें कॉन्सिलची घटना स्पष्टपणें रेखाटली जाऊन त्याचे कर लादण्याविषयींचे अधिकार प्रथमतःच औपचारिकरीत्या मानण्यांत आले. मोठे सरदार (Barons) व लहान सरदार असा फरक करण्यांत आला. मोठ्या सरदारांना खास आमंत्रणानें (Special writs) पाचारण्यांत येई तर लहान सरदारांना शेरीफामार्फत सामान्य निमंत्रण–पत्रिकांनीं बोलावण्यांत येई. एव्हांपासून पार्लमेंट् प्रातिनिधीक होऊं लागलें. यापुढें ऐंशीं वर्षें लोक व राजा यांच्या दरम्यान चॅर्टासंबंधीं झगडा झाला. या झगड्यांत, सिमन डी मॉटफोर्ट यानें नोबल्स् व शायरचे नाइट्स यांच्याशिवाय प्रत्येक शहराचे दोन याप्रमाणें १२६५ सभासद पार्लमेंटकरितां बोलावले; याप्रमाणें कॉमन्स सभेचा पाया घालण्यांत आला. स्टॅटयूट ऑफ वेस्टमिनिस्टरमध्यें 'पार्लमेंट' हा शब्द प्रथमतःच वापरण्यांत आला. १३२२ सालीं वेल्श प्रतिनिधी घेण्यांत आले. यानंतर वीस वर्षांनीं विभागणी होऊन दोन सभा विकसित झाल्या. धर्मोपाध्याय व सरदारलोक (Baronage) यांचें वरिष्ठ कायदेमंडळ व नाइट् किताबाचे सरदार व ग्रामप्रतिनिधी (Burgesses) यांची कॉमन्स सभा बनली. ही कॉमन्स सभा सेंट स्टेफेनच्या प्रार्थनामंदिरांत

भरत असे. सदर सभेचा पहिला अध्यक्ष पीटर डी लॅमेअर (Peter de la mare) याची निवडणूक १३७७ सालीं झाली. दोन्ही सभांतील कामाकाजाची नोंद ठेवण्यांत येऊन सन १५०९ पासून पार्लमेंटचे कायदे छापण्यांत येऊं लागले. स्टुअर्ट अंमलाच्या प्रारंभापासून राजा व प्रजा यांच्या दरम्यानचा दीर्घकालीन झगडा सुरू झाला. त्याचें पर्यवसान १६८८ सालच्या राजक्रान्तींत होऊन, दुसऱ्या जेम्सला देशत्याग करावा लागला, व राजाचे मुख्य अधिकार लोकप्रतिनिधींना मिळाले. सतरावें शतक संपण्यापूर्वीच तिसऱ्या विल्यमनें कॉमन्स-सभेंत मताधिक्य असलेल्या पक्षांतून आपले प्रधान निवडून पक्षाधिनिष्ठ सरकारला सुरवात केली होती. पहिल्या जॉर्जला इंग्रजीचा गंधहि नव्हता, दुसऱ्या जॉर्जला बेताचेंच इंग्रजी येत होतें व या उभयतांना ब्रिटिश राजकारणाविषयीं आस्था तितकीच होती; त्यामुळें एका मुख्य मंत्र्याच्या नेतृत्वाखालील मंत्रीमंडळाची प्रथा अठराव्या शतकांत रूढ झाली.

स्कॉटलंडची पार्लमेंट इंग्लंडच्या पार्लमेंटमध्यें सन १७०७ मध्यें विलीन झाली. १८०१ मध्यें आयर्लंडशीं झालेल्या संयोगामुळें पुढील योजना करणें भाग पडलें. कॉमन्स सभा ही अत्यंत अप्रातिनिधिक झालेली होती. त्यांतील प्रतिनिधींची विभागणी अत्यंत विषम होती. बर्मिंगहॅम व मॅन्चेस्टर यांच्यासारख्या शहरांच्या वांट्याला मुळींच सभासद नव्हते. मोठमोठे जमिनदार व उमरावांच्या सभेंतील सभासद यांच्या मालकीचे कांहीं गांव होते (Pocket Buroughs) यांच्या तर्फे ते आपले प्रतिनिधी निवडीत. १७८५ सालीं निवडणुकीच्या सुधारणा करण्याकरितां पिटनें ठराव आणला; परंतु १८३२ च्या रिफॉर्म ॲक्टापर्यंत कांहीं फरक झाला नाहीं. इंग्लिश लोकांच्या जीवनांत उद्योगधंद्याच्या वाढीमुळें फरक पडला; मोठमोठीं शहरें उदयास येऊं लागलीं व मध्यम वर्गाची संख्येच्या व महत्त्वाच्या दृष्टीनें वाढ झाली. १८३२ च्या कायद्यानें बडे जमिनदार व महाजन (Aristocracy) यांच्याकडील असला अधिकाराचा मक्ता नष्ट केला व मध्यम वर्गाला मतदानाचा अधिकार देऊन राजकारणांतील गुरुत्वाकर्षणाचें केंद्र बदललें. १८६७ च्या रिफॉर्म ॲक्ट या सुधारणा कायद्यानें मतदानाचा हक्क अधिक व्यापक केला. १८८४ सालीं शेतीवर काम करणाऱ्या मजुरानांहि मतदानाचा हक्क देण्यांत आला. या वेळीं कॉमन्स सभेची सत्ता प्रबल होऊन बसली होती; परंतु उमरावांच्या सभेंत अनेक प्रश्नावर मतभेद माजले होते. विशेषत: आयर्लंडच्या होमरूलच्या प्रश्नावर बरेंच मतभेदाचें वादळ माजलें, याचें पर्यवसान १९११ सालचा पार्लमेंट ॲक्ट पास होण्यांत झालें. या कायद्यानें दोन्ही सभागृहांमधील परस्पर संबंधांत संपूर्ण फरक घडवून आणला. हा कायदा उमरावांनीं मोठ्या नाखुषीनें मान्य केला. त्यांना उदारमतवादी लोकांमधून नवीन सरदार करण्याची धमकी देण्यांत आली म्हणूनच त्यांनीं या कायद्यास कशीबशी संमति दिली. या कायद्यानें उमरावांच्या सभेचा 'मनी बिल' नाकारण्याचा हक्क काढून घेतला व एखादें बिल कॉमन्स सभेंत त्रिवार पास झालें असतां उमरावांच्या सभेनें तें फेटाळून लावलें तरी त्याला कायद्याचें स्वरूप येतें असें ठरवून या कायद्यानें उमरावांच्या सभेचा बिल फेटाळण्याचा हक्क निरुपयोगी केला. लोकसत्ताक राज्यपद्धतींतील विकासाच्या दृष्टीनें १९१८ चें Representation of the People Acts नांवाचे कायदे पसार झाले. त्यांनीं तीस वर्षांवरील वयाच्या स्त्रियांना मतदानाचे हक्क दिले; मतदारांची संख्या दोन कोटीपेक्षां जास्त इतकी वाढविली व स्त्रियांना कॉमन्स सभेंत बसण्याचा हक्क दिला. या कायद्यानें सभासदांची संख्या ७०७ पर्यंत वाढविली. सध्यां उमरावांच्या बायकांना स्वत:च्या हक्कानें उमरावांच्या सभेंत बसतां येत नाहीं. सांप्रत उमरावांच्या सभेंत तीन्ही आर्चबिशप धरून कांहीं बिशप्स, वंशपरंपरा चालत आलेले व नवे पीअर्स व लॉ लॉर्ड्स अशांचा समावेश होतो. लॉ लॉर्ड्स हे आपल्या हयातीपर्यंत सरदार असतात, त्यांना न्यायदानाचें काम करावें लागतें; कारण उमरावांची सभा अद्याप अंतिम न्यायालय आहे. पार्लमेंटची पहिली निवडून आलेली स्त्री-सभासद Countess Markiewiez या होत. कॉमन्ससभेंत बसणारी पहिली स्त्री सभासद लेडी ॲस्टर या होत. त्या १९१९ सालीं प्रथम निवडून आल्या. १९२९ सालीं १४ स्त्री-सभासद होते व १९२९ सालच्या मजूर सरकारांत प्रथमत:च स्त्रियांचा मंत्रीमंडळांत समावेश झाला. १९११ पासून कॉमन्स सभेच्या सभासदांना वार्षिक ४०० पौंड पगार मिळूं लागला.

पार्वती:–हिमालय व नेना यांची कन्या. नारदाच्या सांगण्यावरून हिमालयानें ही शंकरास दिली. एकदां

ही व शंकर क्रीडा करीत असतां हिनें शंकराचे नेत्र झांकिले. तेव्हां सोम, सूर्य व अग्नि हे शिवनेत्रांत रहात असल्यामुळें सगळीकडे अंधार पडून क्षय सुरू झाला. तेव्हां ऋषींच्या सांगण्यावरून यांनीं क्रीडा थांबविली. नंतर हिनें शंकराच्या सांगण्यावरून अरुणाचलावर तपश्चर्या केली. गौतमानें हिला अरुणाचलाचें माहात्म्य सांगितलें. पूर्वी ही काळी असून अनरकेश्वर तीर्थांत स्नान करून तेथील लिंगापुढें दीपदान केल्यामुळें गौरवर्ण झाली. हिनें गौरीव्रत निर्माण केलें व त्याचा महिमा धर्मराजास सांगितला. एकदां ही कल्पवृक्षाखालीं बसून हिनें सुंदर स्त्रीची इच्छा केल्या मुळें अशोकसुंदरी उत्पन्न झाली. तिला पार्वतीनें आपली कन्या मानून 'तूं सोमवंशांतील नहुषाची पत्नी होशील,' असा वर दिला. हिच्या अंगच्या मळापासून गजानन व शंकरापासून कार्तिकेय हे पुत्र झाले. शिवाय बाण व वीरभद्र यांना हिनें पुत्र मानिलें होतें. हिनें दुष्टांचा संहार करण्याकरितां देवांच्या विनंतीवरून अनेक अवतार घेतले व त्यांवरून हिला अनेक नांवें पडलेलीं आहेत.

पालक (भाजी):–**साहित्य**–पालक, मसुराची डाळ, तिखट, मीठ, गूळ, तेल व फोडणीचें सामान. **कृति**–प्रथम पालक निवडून घ्यावा व धुवावा. नंतर बारीक चिरावा. पालकच्या दोन पेंढ्यांना अर्धी वाटी मसुराची डाळ घालावी. मसुराची डाळ व पालक एकदम शिजत ठेवावा. शिजल्यावर तिखट, मीठ व किंचित् गूळ घालावा. गूळ घातला नाहीं तरी चालतो. पुनः शिजल्यावर भाजी उतरून ठेवावी; आणि मग तेलाची फोडणी द्यावी.

पॉल म्यूनि (१८९७–):–जगविख्यात सिनेमानट. याचा २२सप्टेंबर १८९७सालीं ऑस्ट्रियांत एका ज्यू घराण्यांत जन्म झाला. याचें खरें नांव म्यूनि वीसेन् फ्रुंड असें आहे. यानें वयाच्या चौदाव्या वर्षीच रंगभूमीवर पदार्पण केलें व विसाव्या वर्षापर्यंत निरनिराळीं लहानसान कामें केलीं. नंतर यिडिश आर्ट थिएटर या न्यूयॉर्कमधील रंगभूमीवर नट म्हणून चमकला. बोलपट निघण्यास सुरवात झाल्यावर हा सिनेमा नट म्हणून जगापुढें आला व अवघ्या ७-८ वर्षांच्या अवधींतच त्यानें आपला स्वतःचा असा प्रेक्षकवर्ग निर्माण केला आहे. याचा पहिला चित्रपट व बोलपट The Valiant हा होय. यानंतर I am a Fugitive from a chain gang. The world changes, Scarface, Good Earth, Emile Zola. इ० प्रख्यात बोलपट निघाले आहेत. I am a Fugitive from a chain gang या बोलपटापासून त्यानें आपल्या अभिनयानें आपल्या प्रेक्षकांचीं मनें काबीज केलीं. आपल्या भूमिकेशीं समरस होऊन अगदीं सहजरीत्या अभिनय करण्यांत याचा हात कोणीहि धरूं शकणार नाहीं. याची आपल्या आवाजावरहि कमालीची हुकमत आहे. प्रत्येक भूमिकेची एक विशिष्ट लकब (Mannerism) त्याच्या प्रत्येक बोलपटांत आढळून येते. वर दिलेल्या बोलपटांपैकीं शेवटचे दोन बोलपट फार लोकप्रिय झाले आहेत.


पॉल म्यूनि

पॉल, सेंट (–६२ खि. पू.):–येशू ख्रिस्ताचा एक प्रेषित (Apostle). याचा जन्म सिसिलीमध्यें, टार्सस येथें झाला. येशू ख्रिस्ताचा जन्म व याचा जन्म जवळ जवळ एकाच वेळीं झाला. याचें मूळ नांव सॉल् (Saul) असें होतें. सॉलचें रूपांतर पॉलमध्यें कां झालें हें समजत नाहीं; मात्र धर्मोपदेशक (Missionary) म्हणून प्रथमच काम करीत असतां हा फरक झालेला दिसून येतो. तो ज्यू (A Jew of Dispersion) होता; तथापि ज्यूहून त्याचे ठिकाणीं निराळीच वृत्ति होती. त्याच्या विचारांची पार्श्वभूमिका जंटाइल (Gentile) नांवाच्या तत्त्व–चिकित्सकाकडून बनविलेली होती. त्याची जन्मभूमि ही एक मोठी नगरी असून तेथें मालांची निर्यात मोठ्या प्रमाणांत चाले. या नगरींत केसांचें कापड मोठ्या प्रमाणांत तयार करण्याचे कारखाने होते. या केसाच्या कापडाचा उपयोग तंबू तयार करण्याकडे होई. पॉल हा तंबू तयार करण्याची कला शिकला व या कलेच्या जोरावरच त्यास

पुढें धर्मोपदेशक म्हणूनहि धर्मप्रचार करतां आला. त्याची जन्मभूमि टार्सस (Tarsus) ही होती. येथें विश्वविद्यालय होतें. यामुळें पॉलला ग्रीस साहित्याची आवड व शुष्क पांडित्याबद्दल तिटकारा उत्पन्न झाला.

पॉलला आपली जन्मभूमि प्रिय असली तरी त्याला प्रियतम अशी नगरी दुसरीकडेच होती. ती नगरी म्हणजे जेरुसलेम ही होय. 'ज्यू धर्मद्रष्टा' (Rabbi) ही पदवी मिळविण्यासाठीं तो जेरुसलेम येथें गेला. तेथें त्यानें कांहीं दिवस गॅमेलिएल (Gamaliel) नांवाच्या आचार्यांची शिकवणी धरली; पण त्या पंडिताचें सहिष्णु तत्त्वज्ञान त्यास पचेना. येशू खिस्तास नुकतेंच फांशी देण्यांत आलें होतें व खिश्चन धर्माची हळूहळू प्रगति होऊं लागली होती. पॉलनें खिश्चन धर्माची पिछेहाट करण्याचें धोरण स्वीकारलें व त्याप्रमाणें तो प्रयत्नहि करूं लागला; पण दमास्कस (Damascus) येथें त्याला येशूचा साक्षात्कार झाला व ज्या धर्माचा तो नाश करण्याचा आतांपर्यंत प्रयत्न करीत होता त्या धर्माचा तो एक कट्टा पुरस्कर्ता बनला. येशू, हा खिस्तदेव आहे, अशी त्याची खात्री झाली.

अर्थात् हें धर्मपरिवर्तन चुटकीसरशीं झालें नाहीं. अरबस्थानांत तीन वर्षें सतत निदिध्यास केल्यावर मग हें धर्मपरिवर्तन झालें.

पॉलला आपल्या धर्माबद्दल (ज्यू धर्माबद्दल) पूर्ण समाधान असें कधींच वाटलें नव्हतें; आणि दमास्कस येथें येशूचा साक्षात्कार झाल्यावर तर त्याच्या ज्यू धर्मावरील श्रद्धेला जोराचा धक्काच बसला. ज्यू धर्मातील वचनांनीं, त्याला 'पापाची जाणीव' (Sense of Sin) करून दिली होती; पण 'पावित्र्य निर्मिति' करण्यास तीं असमर्थ होतीं. परंतु जगांतील पाप नाहींसें करण्यासाठीं येशूचें 'आत्मबलिदान' त्यास अधिकाधिक स्फूर्तिदायक होऊं लागलें. त्याच्या सदसद्विवेक बुद्धीचें समाधान तर झालेंच; शिवाय मोक्षाप्रत मार्ग दाखविल्याबद्दल येशूसंबंधीं अत्यंत कृतज्ञता वाटूं लागली. येशू खिस्ताचें हें महत्त्व जगाला पटवून देण्याची त्यास तळमळ लागली. येशू खिस्ताच्या धर्मशिकवणुकींत तो इतका समरस होऊन गेला कीं, तो थोड्याच अवधींत, येशू खिस्ताशीं अगदीं एकरूप होऊन गेला व येशूचें अवतारकार्य त्याच्या रूपानें पृथ्वीतलावर पुढें चालूं लागलें. पुढें खिश्चन धर्मावर व्याख्यानें देतांना धार्मिक भुकेचें समाधान (Justification), खिस्ताशीं एकरूपता व बायबलचें विश्वव्यापित्व (Universality) या तीन मुद्यांवर त्यानें विशेष जोर दिला.

अरबस्थान सोडल्यावर त्यानें जेरुसलेम येथें प्रवेश केला. पण पूर्वीं खिश्चन धर्माचा नाश करण्याचा चंग बांधलेला गृहस्थ आतां खिस्तानुयायी होऊन त्या धर्माचा प्रचार करीत आहे या गोष्टींत कांहीं तरी कावा असावा असें खिस्तानुयायांना वाटून ते त्याच्यावर विश्वास ठेवण्यास तयार होईनात. अशा वेळीं बार्नबस (Barnabas) या येशू खिस्ताच्या शिष्यानें पॉलला साह्य करून, 'त्याचें मतपरिवर्तन' प्रामाणिक असल्याचें खिस्तानुयायांना पटवून दिलें.

पॉल हा खिश्चन धर्माचा पुरस्कर्ता झाला हें समजतांच त्यास ज्यू धर्मातील अनेक विरोधक निर्माण झाले. त्यांनीं त्याचें पुनः मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला व त्यांत यश येत नाहीं अशी खात्री होतांच त्याचा छळ आरंभला; पण पॉलनें सर्व प्रकारचा छळ सोसून आपलें कार्य नेटानें पुढें चालविलें. ॲंटिऑक (Antioch) येथें बार्नबस यानें खिश्चन धर्माचा मोठ्या प्रमाणांत प्रसार केला. त्यास पॉल येऊन मिळाल्यानें धर्मप्रसाराच्या कार्यास एक मोठीच मदत मिळाली. सिसिलीला संपूर्ण वळसा घालून एक मोठा दौरा काढण्यांत आला व त्यांत पॉलला चांगलेंच यश आलें. या दौऱ्यांत त्याला अनेक अडचणींना तोंड द्यावें लागलें; पण त्यानें धीर सोडला नाहीं.

पहिल्या दौऱ्यापेक्षां दुसऱ्या दौऱ्यांत त्यास अधिक यश मिळालें. या दौऱ्यांत त्यानें युरोपांतील बहुतेक देश घेतले होते व ग्रीस देशांतील अथेन्स वगैरे मुख्य शहरांत तर विशेष कामगिरी केली होती. तिसऱ्या दौऱ्यांत वरील भाग घेण्यांत आले होतेच; पण विशेष लक्ष यूफेसस (Euphesus) कडे देण्यांत आलें.

आतां रोममध्यें बायबलच्या शिकवणुकीचा प्रसार करायचा असें पॉलच्या मनानें ठरविलें; त्याप्रमाणें त्याची महत्त्वाकांक्षा सिद्धीस गेली; पण अगदीं अनपेक्षित मार्गानें. तो प्रकार असा—

तिसऱ्या दौऱ्याच्या शेवटीं, ज्यू लोकांच्या सांगण्यावरून त्यास पकडण्यांत आलें. त्याला शत्रूंच्या स्वाधीन करण्याचें घाटत असतां पॉलनें सीझरकडे अपील केलें. त्यावरून त्याची रोमकडे चौकशीसाठीं रवानगी झाली.

तेथें तो विनाचौकशी दोन वर्षें होता. या दोन वर्षांच्या अवधींत त्यानें ठिकठिकाणीं स्थापन केलेल्या चर्चसंस्थांशीं पत्रव्यवहार सुरू ठेवला. त्यानें लिहिलेलीं पत्रें (Epistles) अमर होऊन राहिलीं आहेत.

येशू ख्रिस्ताप्रमाणें सेंट पॉललाहि फांशी जावें लागलें. पॉलला येशू ख्रिस्ताचा दुसरा अवतार म्हणून समजण्यांत येतें.

पावती:—पैसे दिल्याबद्दलची पोंच. कायद्यानें पावतीची अवश्यकता आहे असें नाहीं. मात्र पैसे दिल्याबद्दलची पावती घेणें हें पैसे देणाराच्या हिताचें असतें. पावती म्हणजे पैसे दिल्याचा सकृत्दर्शनीं पुरावा होय. धनको पावती देण्याचें नाकारील व ऋणको धनकोनें पावती दिल्याशिवाय पैसे देण्याचें नाकारील व अशा परिस्थितींत धनको ऋणकोवर पैसे वसूल करण्याकरतां दावा आणील तर कोर्ट धनकोची अयोग्य वर्तणूक विचारांत घेऊन दाव्याचा खर्च धनकोवर बसवूं शकेल. पावती सकृत्दर्शनीं पैसे दिल्याचा पुरावा असला तरी ज्यानें पावती दिली त्याला आपण पावती दिली असली तरी आपणाला पैसे मिळाले नाहींत अथवा पावती देण्यांत चूक झाली आहे असें दाखविण्याची मुभा आहे. धनकोच्या विरुद्ध पावती हा निर्णायक (Conclusive) पुरावा होत नाहीं; पावतींत स्पष्टपणें असंदिग्ध भाषेंत नमूद केलेल्या गोष्टीविरुद्ध द्यावयाचा पुरावाहि तसाच भक्कम पाहिजे.

पाश्चर, लुई (१८२२–१८९५):-जंतु-मीमांसेचा (जर्मस्-थिअरी) उत्पादक. मोठा रसायनशास्त्रज्ञ, वैद्यक, आरोग्य व औषधि या शास्त्रांबद्दल संशोधनात्मक प्रयोग करणारा. लुई पाश्चर याचा जन्म १८२२ मध्यें डोल येथें झाला. पॅरीस येथें रसायनशास्त्राचें शिक्षण घेतल्यावर १८६७ सालीं तो सॉरबॉन येथें प्रोफेसर झाला व त्यानें रसायनशास्त्राचें संशोधन सुरू केलें. रसायनशास्त्राबद्दल त्याची ख्याति असून रसायनाशिवाय इतर शास्त्रांचेंही तो संशोधन करी आणि रसायनशास्त्राकडे तो द्यावें तितकें लक्ष देत नसे याबद्दल त्याच्या सहाध्यापकांना वाईट वाटे.

त्याचा महत्त्वाचा शोध म्हणजे डोळ्यांनीं न दिसणाऱ्या अतिसूक्ष्म जंतूंना जीव असतो हा होय. त्याचा दुसरा शोध म्हणजे सर्व अतिसूक्ष्म कणांना व्याप असतो हा होय.

एखादा पदार्थ आंबतो हें आपण व्यवहारांत नेहमींच पहातों. ही जी आंबण्याची क्रिया ती रासायनिक आहे असें लायबिगचें म्हणणें होतें. पाश्चरचें म्हणणें असें कीं ही क्रिया मायक्रोबना जीवन असल्यानें होते. (या दोघांचेंहि म्हणणें बरोबर आहे हें निरनिराळ्या प्रयोगांनीं सिद्ध झालें आहे.) पाश्चरच्या मतानें दूध नासण्याचें कारण मायक्रोब हेच होत; आणि दारूपासून शिरकाहि मायक्रोबमुळेंच होतो. ते जंतु नाहींसे केले कीं, पदार्थ नासावयाचा नाहीं. या पद्धतीला पाश्चरायझेशन म्हणतात. दारू न बिघडावी यासाठीं या शोधाचा उपयोग झाला.

त्याचप्रमाणें रेशमांच्या किड्यांचा शत्रु हुडकून काढून त्यानें रेशमाच्या व्यापाराला मदत केली. रेशमाच्या किड्यांवरून त्याचें लक्ष पक्ष्यांतील कॉलरा रोगाचें कारण शोधण्याकडे लागलें. त्यावेळीं तो ५८ वर्षांचा होता, तरी त्यानें संशोधन चालूं ठेवून हाहि शोध लावला.

पशूंना होणारा काळपुळीचा रोगहि मायक्रोबमुळेंच होतो हें त्यानें सिद्ध केलें. माणसालाहि हा रोग होतो आणि माणूस हाहि एक प्राणीच असल्यानें हा रोग माणसालाहि मायक्रोबमुळेंच होतो हें स्पष्ट झालें. "हायड्रोफोबिया" या भयंकर रोगाचेंहि कारण अतिसूक्ष्म जंतुच होत. ह्यावरून सर्व रोग त्या त्या रोगाच्या सूक्ष्म जंतूनेंच होतात ही आपली "रोगमीमांसा" त्यानें लोकांपुढें मांडली. पण केवळ रोगाचें कारण शोधूनच पाश्चर थांबला नाहीं; तर त्यानें उपाययोजनाही शोधून काढली आणि ती म्हणजे त्या रोगांची लस टोचणें ही होय. या जंतुमीमांसेवरूनच लिस्टरनें आधुनिक शस्त्रक्रियाशास्त्र बनविलें.

हा जंतु-मीमांसेचा जनक, बॅक्टरीआलॉजीचा उत्पादक व रोगांचीं कारणें हुडकून काढून पर्यायानें मानवी जीवित सुखी करणारा प्रख्यात संशोधक, लुई पाश्चर १८९५ सालीं मरण पावला.

पाश्चात्य तत्त्वज्ञान:—(व्याव. ज्ञानकोशाच्या तिसऱ्या भागांतील तत्त्वज्ञान (पृ. ९२७-९३३) या सदराखालीं तत्त्वज्ञानाची प्रस्तावना वाचली आहेच. आतां त्यापुढें तत्त्वज्ञान मिळविण्याकरितां कोणत्या पद्धतीचा अवलंब करावा हाही एक वादग्रस्त प्रश्न आहे. कांहींच्या मतें, त्याला पद्धति लागूच नाहीं; कारण तत्त्व हें शोधायचें नसून तें अंतःप्रवृत्तीनें उमजा-

यत्रें असतें व हें काम सांगून होणारें नव्हे. त्याला अंतःप्रवृत्तीच पाहिजे. या प्रकारच्या मताला गूढवाद (Mysticism) म्हणतात. या वादांत तथ्य आहे तें असें कीं, तत्त्वज्ञान हें पढवून तयार करण्याजोगी गोष्ट नव्हे. तें ज्याचें त्याचें स्वतंत्र असतें. जगांतील जे नामांकित तत्त्वज्ञ होऊन गेले ते स्वयंस्फूर्तीनेंच झाले, हें खरें असलें तरी सामान्य माणसानें कोणत्या मार्गानें जावें हें साधारणपणें सांगतां येईल. ज्ञानाचे साधारणपणें दोन मार्ग आहेत. एक अंतःसाक्षात्कारानें कांहीं सत्यें निश्चित ठरवून, त्यांतून तर्कपद्धतीनें इतर निष्कर्ष काढीत जाणें; दुसरी पद्धत, शास्त्रीय ज्ञानाचे बाबतींत आचरली जाते; ती म्हणजे इंद्रियानुभवापासून सुरवात करून त्या अनुभवाची छाननी करून त्यांतून समन्वयानुमानानें (Inductively) सत्य ठरविणें. ही शास्त्रीय ज्ञानाची पद्धति तत्त्वज्ञानालाही लावतां येण्याजोगी आहे. ती आधुनिक असून शिवाय सोपी आहे. तत्त्वज्ञान अनंत असल्यामुळें त्याला कोठूनही सुरवात करतां येईल. सृष्टि, मानव व देव या तिघांची सांगड घालणें हें तत्त्वज्ञानाचें मुख्य काम. साधारणपणें, माणसाची दृष्टि प्रथम बहिर्मुख म्हणजे बाह्य जगाकडे, नंतर अंतर्मुख म्हणजे आत्म्याकडे, व शेवटीं उपरिमुख म्हणजे ध्येयाकडे वळते व याच क्रमानें तत्त्वज्ञानांतर्गत विषयांचा विचार करणें सुलभ होईल. **तत्त्वज्ञानाचे विभाग**–अशा तऱ्हेनें तत्त्वज्ञानांतर्गत विषयांचे खालील-प्रमाणें विभाग पडतील:–**१ विश्वशास्त्र** (Cosmoloy):-पोटभाग–(१) दिक्, काल व पृथ्वी. (२) जीवनाची उत्पत्ति. (३) जीवनविकास. (४) सृष्टिप्रयोजन. (५) ईश्वराचें अस्तित्व. (६) हें जग अव्यंग व आनंद-मय आहे काय? **२ सत्ताशास्त्र** (Ontology) पोट-भाग–(१) द्वैत. (२) अद्वैत. (३) अनेकत्व. **३ आत्म्यासंबंधींचें तत्त्वज्ञान** (Philosophy of mind.) पोटभाग:–(१) आत्मा म्हणजे काय? (२) आत्म्याचें अमरत्व. (३) शरीर व मन यांतील संबंध. (४) आत्मस्वातंत्र्य. **४ ज्ञानशास्त्र** (Epistemology):–बुद्धिवाद, अनुभववाद, जीवन मूल्यवाद, वास्तववाद, मूलप्रवृत्तिवाद वगैरे. **५. नैतिक व सौंदर्यविषयक मूल्यें.**

विश्वशास्त्र–(दिक्, काल व पृथ्वी)-बाह्य जगा-संबंधीं विचार सुरू केल्यास प्रथमच प्रश्न उद्भवतो तो असा कीं अंतरिक्षांतील अनंत कोटी ब्रह्मांडामध्यें जें अंतर आहे तें खरें कीं खोटें, कँट, ब्रॅडले इत्यादि-कांचे मतें दिक् (Space), काल हीं मानवी मनानें ज्ञानसंपादनार्थ वस्तूंवर मारलेले छाप (Forms अथवा Categories) आहेत. परस्परविरोधी विधानें करतां येणें अगर अनवस्था प्रसंग ओढवणें हें खोटेंपणाचें लक्षण आहे. दिक्, काल यांच्याबाबत तीं मर्यादित आहेत व अमर्यादही आहेत अशा प्रकारचीं परस्पर-विरोधी विधानें करतां येतात, म्हणून त्यांना मुळांत खरेपणा नाहीं. परंतु उलटपक्षीं असें वाटतें कीं अंतरिक्षांतील सर्व ब्रह्मांडें जरी प्रचंड असलीं तरी अनंत दिक् व काल यांच्यामध्यें तीं वाळूच्या कणां-प्रमाणें आहेत व तीं लुप्त झालीं तरी दिक्काल कायमच राहणार. पृथ्वी, सूर्य चंद्र इत्यादि ग्रह व तारे हे त्या अनंत दिक्कालाचे छोटेसे विभाग होत, अशा प्रकारची विचारसरणी प्रो. आइन्स्टीन्, प्रो. एडिंग्टन व प्रो. अलेक्झांडर वगैरेनीं प्रतिपादन केली आहे. त्यांच्या मताप्रमाणें, तीन-अंगीं (Three-dimensional) आकाश हें मूळ नसून दिक्काल हें एकच अबाधित व अव्याहत तत्त्व (Space-time continnum) आहे व त्याला चार अंगें आहेत. लांबी, रुंदी, खोली व काल हीं तीं चार अंगें होत. आइन्स्टीनच्या मतें, या अव्याहत तत्त्वाला मध्यें मध्यें पोंक अगर वळसे अगर उंचवटे पडतात. तेच अंतरिक्षांतील ग्रह व तारे; म्हणून त्यांचे ठिकाणीं गुरुत्वाकर्षण सुरू होतें. प्रो. अलेक्झांडरच्या मतें, दिक् व काल यांचा संबंध जड शरीर व त्यांतील चैतन्य मन यांचे संबंधासारखा आहे. काल हा आकाशाचें चैतन्य होय. फ्रान्समधील तत्त्वज्ञ बर्ग्सन (Bergson) हा तर कालाला अग्रस्थान देतो. त्याच्या मतें, काल हीच एक चिरकालिक व सतत चालू असलेली वस्तु आहे व म्हणून काल हाच जगाचें म्हणजे जीवनाचें आदितत्त्व आहे. अशा प्रकारें, दिक् व काल यांना सत्यस्वरूप असल्याचें मानलें जातें. तीं केवळ मनाचे खेळ आहेत असें मानण्याचें कारण नाहीं. दिक् व आकाश हीं आतां समानार्थीच समजलीं जातात. दिक् हें आकाश व्यापित आहे असें मानावेंच लागतें; कारण प्रकाशाला जाण्याकरितां आधार पाहिजे. मात्र, प्रकाश सर्व दिशांनीं सारख्याच वेगानें जातो असें प्रयोगान्तीं सिद्ध झाल्यामुळें आकाशाला गुणधर्म कांहींच नाहींत असें म्हणावें लागतें. प्रकाशाला आधारभूत असलेलें आदितत्त्व

पेंढारकर, व्यंकटेश बळवंत ऊर्फ **बापूराव** (–१९३७):—महाराष्ट्रांतील एक नामवंत संगीत नट. यांचें मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालें होतें. यांचीं पूर्वायुष्याची बरींच वर्षें जमखिंडीला गेलीं. संगीत-कलेकडे त्यांचा नैसर्गिक ओढा होता. जमखिंडी-कडील अनुकूल परिस्थिति होती, तिचा फायदा घेऊन त्यांनीं संगीतकलेंत बरेचसें नैपुण्य मिळविलें. संगीताबरोबर नाट्यहि आलें. तेथें वर्षांतून वेळोवेळीं होणाऱ्या स्थानिक नाट्यमंडळाच्या नाटकांत ते कामें करूं लागले. इ. स. १९१५ सालीं कै. केशवराव भोसले यांच्या नजरेंत ते आले. केशवरावांनीं त्यांना ताबडतोब आपल्या नाटक कंपनींत घेतलें. इ. स. १९२० पर्यंत त्यांनीं मानापमान, राक्षसी महत्त्वाकांक्षा, हाच मुलाचा बाप, मृच्छकटिक, संन्याशाचा संसार वगैरे नाटकांत प्रमुख स्त्रीभूमिका यशस्वी रीतीनें केल्या.

इ. स. १९२१ च्या ऑक्टोबरमध्यें केशवराव काल-वश झाल्यावर ललित कलादर्श नाटक मंडळीची मालकी पेंढारकरांकडेच प्रामुख्यानें आली. त्यांचे दुसरे भागी-दार रा. चाफेकर हे त्यांना १९२४ सालीं सोडून गेले. इ. स. १९२१ ते १९३० पर्यंत पेंढारकरांनीं आपल्या कंपनीच्या साह्यानें नाट्यकलेची सेवा चांगल्या तऱ्हेनें तर केलीच; पण नाट्यकलेला, ठराविक चाकोरींतून बाहेर काढून कांहींतरी नवें व आकर्षक असें दृश्य तरुण पिढीसमोर मांडण्याचा प्रयत्न यशस्वीपणें केला. हें करतांना त्यांना आर्थिक परिस्थितीशीं झगडत रहावें लागलें, व त्यांतच त्यांचा शेवट झाला; पण त्यांनीं केलेल्या कामगिरीला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें आहे. मुंबईची नवीन पिढी त्यांच्या कलेची भक्त बनली. वास्तविक पाहतां आदर्श नटाला आवश्यक असे कांहींच गुण त्यांच्या अंगीं नव्हते; तथापि कामांतील जिवंतपणा, अनुरूप वस्त्रभूषा, रंगभूषा, नाविन्यपूर्ण उप-क्रम वगैरे गुणांमुळें त्यांचीं नाटकें रंगत असत. तसेंच गायनाचार्य वझेबुवांजवळ गायनकलेचा अधिक खोल अभ्यास करून त्यांनीं आपल्या गायनानें कै. केशवरावांच्या गाण्यांचा भास उत्तम रीतीनें निर्माण केला. यामुळेंहि त्यांच्या लोकप्रियतेंत भर पडली. पेंढारकरांचीं लोकप्रिय नाटकें म्हणजे 'सत्तेचे गुलाम,' 'श्री,' 'करग्रहण,' 'सज्जन,' 'शिक्का कट्यार,' 'सोन्याचा कळस,' 'स्वयंसेवक,' 'कृष्णार्जुन' युद्ध हीं होत. सत्तेचे गुलाम नाटकांतील त्यांचीं वैकुंठाची भूमिका व कृष्णार्जुन युद्धांतील नारदाची भूमिका या चिरस्मरणीय होऊन बसल्या आहेत.

बोलपटाच्या आगमनानें इतर नाटक कंपन्यांप्रमाणें ललितकलादर्श मंडळीवरहि आर्थिक आघात झाला. तथापि पेंढारकर हे दुर्दम्य आशावादी होते. त्यांनीं नाटक कंपनी अखेरपर्यंत चालू ठेविली होती. शेवटीं ग्वाल्हेर येथें त्यांचा मुक्काम असतां २१ मार्च १९३७ सालीं ते कालवश झाले. 'विजयाचीं लग्नें' या बोल-पटांत त्यांनीं काम केलें आहे; पण तें यशस्वी झालें नाहीं.

पेन, थॉमस (इ. स. १७३७-१८०९):—एक नामांकित अँग्लो अमेरिकन लेखक. याचा जन्म इ. स. १७३७, २९ जानेवारीला थेटफोर्ड (नार्फोक) येथें झाला. याचा बाप एक लहानसा शेतकरी होता. प्रारंभीं थॉमसनें अनेक धंदे केले, पण एकांतहि त्यास यावें तसें यश मिळालें नाहीं. इ. स. १७७४ सालीं बेंजामिन् फ्रँकलिन या महान् व्यक्तीशीं त्याचा लंडन-मध्यें परिचय झाला. बेंजामिन् फ्रँकलीन् याच्या सल्ल्यावरूनच त्यानें अमेरिकेकडे प्रयाण केलें.

इ. स. १७७६ सालीं त्यानें फिलाडेल्फिया येथून 'व्यवहारज्ञान' (Commonsense) या नांवाची एक पुस्तिका काढून अमेरिकन स्वातंत्र्यासंबंधीं आपले विचार जोरदार भाषेंत व्यक्त केले. या पुस्तिकेचा वसाहतवाल्यांचे मनावर फार मोठा परिणाम झाला. थॉमसला युनायटेड स्टेट्स्मधील सैन्यांत जबाबदारीची जागाहि मिळाली; पण त्यानें आपल्या लिखाणांतून कांहीं गुप्त राजकीय माहितीचा स्फोट केला. या हलगर्जीपणामुळें त्यास नोकरीवरून कमी करण्यांत आलें.

इ. सन १७८७ सालीं पेन हा इंग्लंडला परत आला व त्यानें बर्कच्या 'फ्रेंच राज्यक्रांतीवर विचार' या लेखास प्रत्युत्तर म्हणून 'मनुष्याचे हक्क' (Rights of man) या नांवाचा एक निबंध प्रसिद्ध केला. या प्रसिद्धीकरणानें जनतेंत बरीच खळबळ उडाली व इ. स. १७९२ सालीं पेनवर अनेक आरोप करण्यांत आले; पण पेननें इंग्लंड सोडून फ्रान्सचा किनारा गांठला. तेथें त्याचें मोठ्या प्रमाणांत स्वागत करण्यांत आलें. तेथें रॉबेसपियर (Robespyerre) या पुढाऱ्याशीं त्यानें विश्वासघात केल्याच्या आरोपा-वरून त्यास तुरुंगांत टाकण्यांत आलें. थोडक्यांत

चुकलें–तो फांशींच जायचा; पण इ. स. १७९४ सालीं त्याचीं तुरुंगांतून सुटका झाली. पुढील वर्षीं तो अमेरिकेंत गेला. The Age of Reason या पुस्तकाचा पहिला खंड त्यानें तुरुंगांत जाण्यापूर्वींच लिहिला होता. दुसरा भाग इ स. १७९५ सालीं त्यानें प्रसिद्ध केला. या दोन्ही भागांत प्रचलित ख्रिश्चन धर्मावर प्रखर टीका होती. पेन हा इ. स. १८०९ जून ८ रोजीं ख्रिस्तवासी झाला. पेन हा एक अमेरिकन स्वातंत्र्याचा निस्सीम भक्त होता. त्याच्या जोरकस लिखाणांचा अमेरिकन देशभक्तांवर चांगलाच परिणाम होऊन त्यांना स्वातंत्र्ययुद्धासाठीं एकत्र होण्याची स्फूर्ति मिळाली.

पेन, सर वुइल्यम (१६२१–७०):–एक इंग्लिश खलाशी. याचा जन्म ब्रिस्टोलमध्यें झाला. याचे वडीलहि खलाशीं होते. इ. स. १६४४ सालीं पार्लमेंटच्या बाजूनें नाविक दलावर हा एक मुख्य होता. इ. सन १६५१–५३ सालीं राजपुत्र रूपर्ट याचा पाठलाग करण्याच्या कामीं याची नेमणूक झाली होती. डच लोकांशी झालेल्या युद्धांत त्यानें बहुमोल कामगिरी केली; त्याची कामगिरी ब्लेकच्या तोडीची होती. इ. सन १६५४ सालीं त्याला वेस्ट इंडीजकडे सॅन् डोमिन्गो (San Domingo) घेण्यासाठीं पाठविण्यांत आलें; पण सॅन् डोमिन्गोऐवजीं जॅमेका (Jamaica) त्याच्या हातीं पडलें. परत आल्यावर पेनला कांहीं दिवस तुरुंगवास पत्करावा लागला. त्याच्या तुरुंगवासाचें कारण उपलब्ध नाहीं; परंतु लवकरच त्याची तुरुंगांतून सुटका झाली. दुसऱ्या चार्लसला परत गादीवर आणण्यासाठीं त्यानें मॉंटेगला साह्य केलें.

पेरी, कमांडर मॅथ्यू कालब्रेथ (१७९४–१८५८):–हा अमेरिकन आरमारी अधिकारी ओलिव्हर हॅझार्ड पेरीचा भाऊ. तो १८०९ सालीं आरमारांत शिरला. १८१२ च्या युद्धांत नोकरी केली. १८१९ सालीं केन (Cyane) जहाजावर एक्झीक्यूटिव्ह ऑफीसर होता, व याप्रमाणें त्यानें पहिल्या निग्रो वसाहतवाल्यांना लायबेरियाला पोहोंचण्याला मदत केली. १८३२ च्या सुमारास तो कमांडर झाला व 'Concord' हें जहाज त्याच्या ताब्यांत देण्यांत आलें; त्यानें भूमध्य समुद्रावर आपलें काम केलें. १८३३ नंतरच्या दहा वर्षांत त्याची ब्रुकलिन नेव्ही यार्डमध्यें नेमणूक झाली. या मुदतींत संयुक्त प्रान्ताच्या आरमारांतील पहिली आगबोट 'फल्टन' ही बांधली जात असतांना देखरेख केली. त्या जहाजाचा तो अधिपती झाला व १८३७ सालीं कॅप्टन झाला. १८४७ सालीं तो कमांडर (रिअर ॲडमिरलच्या खालचा व कप्तानाच्या वरचा अधिकारी) झाला. गल्फ ऑफ मेक्सिकोमध्यें आरमाराच्या एका तुकडीचें त्यानें आधिपत्य स्वीकारलें. १८५३ सालीं तो आपलीं जहाजें घेऊन जपानला प्रेसिडेंट फिलमोरचें पत्र मिकॅडोला देण्याकरितां गेला, व त्याच्या पुढील वर्षीं जपानशीं तह करण्याकरितां परतला. या तहानें जपानचें जगापासून फटकून राहाण्याचें शेकडों वर्षांचें धोरण संपुष्टांत आलें. जपानांत त्यानें केलेली कामगिरी संयुक्त संस्थानें व जपान यांच्या दृष्टीनेंच केवळ नव्हे तर जगाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची आहे. १९०१ सालीं जपानांत कुरिहाम्स येथें त्याचा एक भव्य पुतळा उभारला गेला. पेरीची जपानी भाषेंत बरींच चरित्रें आहेत.

पेरू:–फळझाड. हें प्रत्येकाच्या परिचयाचें असतेंच. कित्येक ह्यास 'जांब' या नांवानें ओळखतात. पेरूचें झाड १५।२० फुटांपर्यंत वाढणारें असून तें झुडपाप्रमाणें दिसतें. फांद्या पसरट वाढणाऱ्या असून त्यावर मोठें झाड झाल्यास पुष्कळ फळें लागतात. याच्या फळांचा आकार एकच प्रकारचा नसतो. कांहीं पेरू लाडवाप्रमाणें वाटोळे, कांहीं कमंडलूच्या आकाराचे तर कांहीं भोंवऱ्याप्रमाणें असतात. पिकल्यानंतर या फळाचा रंग पिवळा होतो व त्याचें वजन १५।२० तोळ्यांपर्यंत असतें. दीड ते दोन पौंड वजनाचे पेरूहि पाहण्यास मिळतात.

पेरूची अभिवृद्धि करण्याची चाल बियांपासून आहे. पण शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार झाल्यामुळें बहुतेक लोक यांचीं कलमें करूनच लावतात. बियांपासून केलेल्या रोपाचें फळ मूळ झाडाप्रमाणेंच निपजेल याची खात्री नसते व शिवाय अशा झाडास फळें लागण्यासही एकदोन वर्षें जास्त लागतात. कलमें करण्याचीं तीं 'गुटी' पद्धतीप्रमाणें किंवा आंब्याचीं कलमें करितात त्या 'भेटकलमांच्या पद्धतीप्रमाणें कलमी झाडास दुसऱ्या वर्षांपासूनच फळ लागण्यास सुरवात होते.


पेरूस जमीन सकस पाहिजे असें नाहीं. उलट हलकी जमीन पेरूच्या लागवडीस चांगली. फक्त जमिनींतून पाण्याचा चांगला निचरा होत असला म्हणजे झालें.

पेरूच्या अनेक जाती आहेत. त्यांतील मुख्यः बिन बियांचा, नाशीक, धारवाड, लखनौ, कोथरूड, सिंध–हैद्राबाद ह्या आहेत. नाशीक जातीचा पेरू लांबट कमंडलू आकाराचा असतो. धारवाडी पेरू वाटोळा पण खालीं थोडासा लांबट, लखनौ पेरू मोठा, कमी बियांचा व साधारण वाटोळा असतो. कोथरूड जातींत अनेक आकाराचे पेरू सांपडतात. त्यांत कठीण बी असतें. सिंध हैद्राबादी पेरू वाटोळा, मोठा व कमी बियांचा असतो. कांहीं पेरू आंतून गुलाबी, लाल रंगाचे असतात.


हीं झाडें १५ ते २० वर्षांपर्यंत जगतात. त्यानंतर नवीन लागवड करावी. पेरूच्या झाडांना रोग फार कमी असतो; पण कांहीं ठिकाणीं खरजेप्रमाणें फळांवर काळ्या पुटकुळ्या आलेल्या आढळतात. ह्या रोगावर 'बोर्डो मिश्रण' हें गुणकारी औषध आहे.

पेरूचा कायरस-साहित्य–पेरू, दाणे, तीळ मिरच्या, मीठ, चिंच, गूळ, मेथी, पाणी, फोडणीचें सामान. **माप**–दोन मोठे पेरू, मूठभर दाणे, तितकेच तीळ, ४।५ ओल्या मिरच्या, सुपारीएवढीचिंच, लिंबाएवढा गूळ, मेथी चहाचा अर्धा चमचा, दोन वाट्या पाणी. **कृति**-पेरूच्या लहान फोडी चिरून त्यांतल्या बिया काढून टाकाव्यात. दाणे व तीळ भाजून कुटून घ्यावें. मिरच्याचे बारीक तुकडे करावेत. पातेल्यांत तेलाची फोडणी करून मिरच्यांचे तुकडे घालवेत व पेरूच्या फोडी घालाव्यात. नंतर वरील सर्व जिन्नस घालून ते शिजवावेत. पेरूच्या फोडी नरम झाल्या व तें सर्व सामान मिळून आलें कीं खालीं उतरावें. मेथी तळून त्याची पूड करून शिजत असतांना, आवडत असल्यास घालावी. पाण्याच्याऐवजीं नारळाचें दूध घातल्यास कायरस जास्त रुचकर लागतो.

पेशावरः–सीमा प्रांताची राजधानी व याच नांवाच्या जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. काबूलपासून १९० मैल व लाहोरहून २७६ मैल दूर असलेलें हें शहर बार नदीजवळ वसलें आहे. खैबर खिंडीच्या पश्चिमेला १०½ मैलांवरचें हें शहर अफगाणिस्थानांतून निर्यात होणाऱ्या व



पेशावर प्रांतांतील एक शेतकरी


१ पेशावरचा किल्ला. २ इस्लामी कॉलेज. ३ खैबर खिंड.

हिंदुस्थानांत येणाऱ्या वस्तूंचें व्यापाराचें केंद्र बनलें आहे. येथूनच अफगाणिस्थानांतील कच्चें रेशीम, फळें, रुपेरी व सोनेरी फिती, जर, रेशीम, साखर व कापसापासून होणारे वेगवेगळे पदार्थ रवाना होतात.

दुसऱ्या शतकांत हें शहर बुद्धधर्मियांचें एक प्रमुख ठिकाण असून पांचव्या व सातव्या शतकापर्यंत हें एक चिनी यात्रिकरूंचें महत्त्वाचें क्षेत्र होतें. आठव्या शतकांत या जिल्ह्यांत अफगाण लोक प्रथमतः आले. त्यांवेळीं हें स्थान पक्कें असें कोणाच्याच ताब्यांत नव्हतें. महमुदानें ११ व्या शतकांत जहांगीर व त्याचे वंशज यांच्या ताब्यांत असणाऱ्या या सीमा-प्रांतावर स्वाऱ्या करण्यास प्रारंभ केला. ब्रिटिशांच्या ताब्यांत हें शहर १८४८ पासून आहे. या गांवची लोकसंख्या १२१८६६ आहे. पुराणकाळीं या शहरास 'पुरुषपूर' म्हणत असत.

पेस्टॉलॉझी, जोहान हेनरीच (Pestolozi, Johan Heinrich):– (१७४९–१८२७) हा एक स्विस शिक्षक होऊन गेला. त्यानें शेतांत गळिताचें पीक (Madder Farm) केलें होतें व अनाथांच्याकरितां कँटन अरगॉव (Canton Aargau) मधील न्यूहॉफ (Neuhof) येथें एक शाळा उघडली. तेथें

असतां त्यानें दोन पुस्तकें लिहिलीं: (१) The Evening Hours of a Hermit (1770) (२) Leonard and Gertude ही अत्यंत यशस्वी नीतिकथा (१७७१). १७९८–९९ सालीं त्यानें ल्यूसर्न (Lucerne) सरोवराच्या कांठीं स्टँझ (Stanz) येथें फ्रेंचांनीं स्विट्झर्लंडवर स्वारी केल्यामुळें निराश्रित झालेल्या अनाथ मुलांकरितां शाळा चालविली. १७९९ पासून १८२५ पर्यंत त्यानें प्रथम बरथाऊड (Berthoud) येथें व नंतर व्हेरडून (Yverdun) येथें एक शाळा चालविली. तेथें त्यानें आपलीं शिक्षणविषयक तत्त्वें व्यवहारांत आणलीं. त्याचें तत्त्व असें होतें कीं सूक्ष्म निरीक्षणानें सहजासहजीं जिज्ञासा जागृत होते, जिज्ञासेनें गोडी निर्माण होते, व गोडीमुळें ज्ञान अनायासें मिळतें. हें आपलें तत्त्व त्यानें 'How Gertrude teaches her children' (1801) या आपल्या ग्रंथांत विस्तृत रीतीनें मांडलें आहे.

पैठण:–एकनाथ महाराजांचें राहण्याचें गांव व समाधीचें ठिकाण. हैद्राबाद संस्थानमधल्या औरंगाबाद जिल्ह्यांतील दक्षिणेकडच्या तालुक्याचें गांव. हें गांव गोदावरीच्या उत्तर तीरावर वसलें असून येथील लोकसंख्या ७००० पर्यंत आहे. या गांवाला पूर्वी प्रतिष्ठान असें म्हणत. याला २००० वर्षांचा इतिहास आहे. प्रतिष्ठान ही खि. पू. १३८–१७० पर्यंत पुळुमायी या आंध्र राजाची राजधानी होती. येथें शालिवाहन राजाचा जन्म व १४व्या शतकांत मानभावी धर्माची स्थापना झाली. येथें एकनाथ महाराजांचें संस्थान आहे. याठिकाणीं सुतार कामें केलेलीं पुष्कळ देवालयें बघण्यासारखीं आहेत. व्यापार व सुती नि रेशमी लुगडीं तयार करण्याचें एक प्रसिद्ध ठिकाण या नात्यानेंच याचा लौकिक पसरला आहे. महावस्त्रापैकीं पैठणी ही एक होय. ही मूळची येथेंच होत असे.

पैसा:–आजपर्यंत कित्येक निरनिराळया व नानाविध वस्तूंचा पैसा म्हणून उपयोग केला आहे. गुरें, ढोरें, जनावरांचीं चामडीं, धान्य, फळें, कापड, तेल, मांस, अंडीं, कवड्या, तंबाखू, हातऱ्या, पिसें, दगड, मीठ, निरनिराळे धातु वगैरे अनेकविध वस्तूंचा पैशाच्या कामीं आजवर उपयोग झाला आहे व थोडा खोल विचार केला असतां असें दिसून येतें कीं एखाद्या विवक्षित समाजाच्या परिस्थितींत कोणता जिन्नस पैसा म्हणून जास्त उपयुक्त ठरेल हें त्या त्या समाजाच्या सोईवर अवलंबून असतें व त्याप्रमाणें सोइस्कर पडेल अशी वस्तु घेतली तरी तिच्यामध्यें थोड्याबहुत प्रमाणांत कां होईना पण विनिमयसाधन व मोलाचें परिमाण होण्याचे पैशाचे मुख्य दोन गुण असतातच. सामाजिक प्रगतीच्या इतिहासाचें थोडेसें परिशीलन केलें असतां आपणांस असें दिसून येईल कीं समाजाच्या प्रारंभींच्या मृगयावृत्ति स्थितिमध्यें शिकार करून मिळविलेल्या वस्तु म्हणजे मारलेल्या जनावरांचीं कातडीं वगैरे साहजिकपणेंच मोलवान व उपयुक्त म्हणून सर्वांकडून मानल्या जातात व म्हणून प्रत्येकाला त्या हव्याशा वाटणेंही साहजिक असतें. यामुळें त्यांचा विनिमय म्हणून उपयोग होणें यांत कांहींच आश्चर्य नाहीं. त्याचप्रमाणें सामाजिक प्रगतीची पुढली पायरी गोपालवृत्ति, यामध्यें गुरेंढोरें यांचा उपयोग विनिमयाचें साधन म्हणून साहजिकच होऊं लागला. त्याच्यापुढली पायरी कृषिवृत्ति. हिच्यामध्यें निरनिराळीं धान्यें, तंबाखू, चहाचे तुकडे, कोकोचीं फळें वगैरे वस्तूंचा असा उपयोग लोक करूं लागले. व सध्यांच्या आपल्या उद्योगवृत्ति समाजांत आपण निरनिराळया धातूंचा मुख्यत्वेंकरून पैशाचे कामीं उपयोग केलेला पहातोंच आहोंत. तसेंच एखाद्या विविक्षित देशाच्या भौगोलिक परिस्थित्यनुरूप व तेथील लोकांच्या आवडीनिवडीनुसार, शंख, शिंपले, कवड्या, कांचेचे मणी वगैरे वस्तूंचाही पैसा म्हणून उपयोग होत आला आहे. यावरून मानवी समाजाच्या निरनिराळया स्थित्यंतराबरोबरच त्यांच्या वापरण्यांत येणाऱ्या पैशाचींही विविध स्थित्यंतरें होत आलीं आहेत असें स्थूलमानानें म्हणावयास हरकत नाहीं.

परंतु सध्यां तरी आपणांस कांहीं विविक्षित धातूंचाच पैशाचे कामीं मुख्यत्वेंकरून सर्वत्र उपयोग करीत असल्याचें दिसून येतें. तेव्हां इतर सर्व धातू वगैरे मागें पडून या विविक्षित धातूंनाच जास्त महत्त्व कां आलें आहे व असें महत्त्व येण्यास त्याच्यांत असे विशिष्ट गुणधर्म कोणते आहेत हें आपण पाहूं या.

पैसा म्हणून व्यवहारांत चालवयाच्या पदार्थांच्या अंगीं विशेषेंकरून खालीं वर्णन केल्याप्रमाणें सात गुण तरी असावयास पाहिजेत असें सर्वसाधारणपणें मानण्यांत येतें. त्यांपैकीं पहिला गुण म्हणजे **उपयुक्तता व मोल** (Utility and Value). निरनिराळया वस्तूंच्या

मोलाचें परिमाण म्हणून उपयोग होणें हें एक पैशाचें मुख्य कार्य आहे. अर्थात् हें कार्य पार पाडण्यासाठीं त्याला स्वतःचें असें कांहीं तरी मोल असलेंच पाहिजे. म्हणजेच त्याचे अंगीं सर्वांच्या दृष्टीनें कांहीं तरी उपयुक्तता असली पाहिजे. परस्परांशीं अनोळखी असलेले दोन गृहस्थ एकमेकांशीं देवघेव करावयास लागल्यास त्यांचा व्यवहार त्यांचेजवळ असलेल्या विनिमयसाधनांच्या सर्वमान्य उपयुक्ततेवर व मोलावरच अवलंबून राहील. कारण ते परस्परांस अनभिज्ञ असल्यामुळें कोणाच्या शब्दावर किती विश्वास ठेवावा याची त्यांना प्रथमतः तरी अडचणच पडेल. विनिमयसाधनांतील मुख्य गोष्ट म्हणजे तें सर्व लोकांनीं सर्व प्रसंगीं सररहा स्वीकारलें पाहिजे व निदान सुरवातीला तरी लोकांनीं एखाद्या वस्तूचा 'पैसा' म्हणून स्वीकार करण्याला तिच्यामध्यें उपयुक्तता व मोल हे गुण असल्याशिवाय सहसा भागणार नाहीं. आजपर्यंत जे नानाविध पदार्थ पैसा म्हणून प्रचारांत आले ते सर्व त्या त्या वेळीं व त्या त्या परिस्थितींत उपयुक्त व मौल्यवान म्हणून समजले जात व म्हणूनच लोक ते पैसा म्हणून स्वीकारीत. **सुवाह्यता** (Portability) अगर नेआण करण्याचा सोइस्करपणा हा पैशामध्यें असावा लागणारा दुसरा गुण होय. एखाद्या वस्तूंत नुसती उपयुक्तता व मोल असून भागणार नाहीं. तर ती कोणीकडेही सहजासहजीं नेतां आणतां आली पाहिजे. म्हणजे आकाराला व वजनाला शक्य तितकी कमी भरून मोलानें मात्र शक्य तितकी जास्त असेल अशी वस्तूच पैशाच्या कामीं जास्त सयुक्तिक ठरेल. पूर्वीच्या काळीं लोखंडाचाही पैसा म्हणून उपयोग केला जात असे. पण सोनें, चांदी, यांच्या मानानें हा दुसरा गुण लोखंडाच्या अंगीं अगदींच कमी प्रमाणांत असलेनें लोखंड मागें पडलें व हे दोन धातु पैसा म्हणून लोकप्रिय झाले.

तिसरा गुण म्हणजे **अविनाशता** (Indestructibility) पैसा हा व्यवहारांत एकाकडून दुसऱ्याकडे असा सारखा फिरत राहणार. शिवाय संपत्ति म्हणून तो सांठवूनही ठेविला जातो. म्हणून तो सहजासहजीं झिजणारा अगर लौकर नाश पावणारा असा असतां कामा नये. अंडीं, मासे, धान्य, फळें वगैरे जिन्नस पैसा होण्याच्या कामीं या दृष्टीनें निरुपयोगी आहेत.

सुविभाज्यता-(Divisibitily)-हाही एक आवश्यक गुण आहे. निरनिराळ्या कमीजास्त मोलाच्या पदार्थांची अदलाबदल करून त्यांचा मोबदला देण्याकरितां पैसा म्हणून वापरलेल्या जिनसांचे जरूरीप्रमाणें लहानमोठे तुकडे, त्यांतील उपयुक्तता कमी न होऊं देतां, पाडतां आले पाहिजेत. गाई, बैल, शेळ्या वगैरेंच्या बाबतींत असे तुकडे पाडणें अशक्य असतें. हिरे, माणकें वगैरेचे बाबतींतही तुकडे पाडले तर त्यांची उपयुक्तता व मोल प्रमाणाबाहेर कमी होतें. म्हणून असे पदार्थही पैशाच्या कामीं निरुपयोगी ठरतात. शिवाय असे तुकडे पाडले तर ते सारख्याच नमुन्याचे झाले पाहिजेत व त्यांचे मोलही तुकड्यांच्या कमीजास्त प्रमाणांत सारखेंच कमीजास्त होत राहिलें पाहिजे. उदाहरणार्थ सोन्याचे कितीही तुकडे पाडले तरी ते सारख्याच नमुन्याचे निघतात, व तुकड्याच्या लहानमोठ्या प्रमाणांत त्यांचें मोलही कमीअधिक होतें. उलट एखादा हिरा घेऊन त्याचे तुकडे पाडले तर त्याच्या तुकड्यांचें मोल हें प्रमाणशीर कमी अधिक होत नाहीं. म्हणून **सजातीयता** (Homogeneity) हा पांचवा गुणही पैसा म्हणून उपयोजिल्या जाणाऱ्या वस्तूमध्यें आवश्यक आहे. सहावा गुण म्हणजे **अभिज्ञेयता** (Cognizability). पैसा म्हणून वापरली जाणारी वस्तू कोणालाही सहजासहजीं ओळखतां आली पाहिजे. तसें नसेल तर प्रत्येक वेळीं देवघेव करतांना पैसा पारखून घेण्यास वगैरे त्रास पडावयाचा व अडाणी माणसास फसविण्यास धूर्त लोकांस चांगलीच संधि प्राप्त होईल. हिरे, माणकें वगैरेंच्या बाबतींत ही अडचण फारच प्रामुख्यानें भासते. कारण त्यांची पारख करावयास चांगले अनुभविक तज्ञ लागतात. सर्वसाधारण माणसास सहजासहजीं त्यांची पारख सहसा होत नाहीं. सरते शेवटीं मोलाचा **कायमपणा** (Stability of value) हाही गुण पैसा म्हणून योजिल्या जाणाऱ्या वस्तूंत असल्या कारणानें पैसा हा मोलाचें परिमाण म्हणून कार्य करतो, व आपण इतर सर्व पदार्थांचें मोल पैशानें मोजतो. तेव्हां पैशाचें स्वतःचें मोल नेहमीं न बदलणारें असें असलें पाहिजे. नाहीं तर हें परिमाण अगर मापच जर नेहमीं बदलूं लागलें तर इतर सर्व वस्तूंचें मोलही त्याबरोबर प्रत्येक वेळीं बदलूं लागेल तर व्यवहारांत घोटाळे उत्पन्न होतील.

वरील सातही गुण ज्या वस्तूमध्यें एकसमयावच्छेदें-करून असतील अगर निदान शक्य तितक्या अधिकांत अधिक प्रमाणांत असतील अशी वस्तूच पैसा म्हणून उपयोग होण्यास योग्य ठरेल व इतर सर्व वस्तूंपेक्षां धातूमध्यें हे गुण जास्त प्रमाणांत वसत असल्यामुळें व त्यांतल्या त्यांत सोन्याचांदीमध्यें या गुणांचें प्रमाण सर्वांत अधिक असल्यामुळें हे धातु पैसा म्हणून वापरलें जाण्यास अधिक योग्य म्हणून प्रचारांत आले व इतर धातु व वस्तु मागें पडल्या. तांबें, निकल, ब्राँझ वगैरे धातूंचाही बहुतेक देशांत पैशाचे कामीं उपयोग होतो. परंतु फक्त किरकोळ व लहानसान व्यवहारांतच त्याचा बहुशः उपयोग केला जातो. मोठमोठ्या व्यवहारामध्यें व देवघेवीमध्यें त्यांचा उपयोग फारसा केला जात नाहीं. कारण या धातूंचें मोल सोनें, चांदी यांच्या मोलापेक्षां फारच कमी आहे व पैशाची नेआण मोठ्या प्रमाणावर करावयाची झाल्यास यांच्यापेक्षां सोनें चांदी हे धातूच कमी वजनांत व लहान आकारांत अधिक मोलाची हालचाल करण्याचे दृष्टीनें जास्त सोईस्कर ठरतात.

धातूंचा विनिमयाचे कामीं जेव्हां उपयोग होण्याला प्रथम सुरवात झाली तेव्हां लहान मोठे तुकडे, कांड्या, वळीं, इत्यादि स्वरूपांतच त्यांची देवघेव होत असे. अमूक एका वस्तूची किंमत अमूक इतक्या वजनाचें सोनें अगर रुपें अशी ठरली म्हणजे तेवढें सोनें अगर रुपें तोलून घ्यावयाचें अगर द्यावयाचें. परंतु तें कित-पत खरें आहे अगर त्यांत दुसरी कसली मिसळ वगैरे आहे किंवा काय,. हें ठरविण्याकरितां तें कसाला लावून पहावें लागे. तेव्हां प्रत्येक देवघेवीच्या वेळीं उत्पन्न होणारी ही अडचण दूर करण्यासाठीं मनुष्यानें 'नाण्या'ची क्लृप्ति शोधून काढली व हल्लीं आपण जो धात्वात्मक पैशाचा उपयोग करतो तो या नाण्याच्या रूपानेंच होय. 'नाणें' या शब्दाची स्थूल मानानें व्याख्या करावयाची झाल्यास 'ज्या धातूंच्या तुकड्यांच्या पृष्ठभागावर उठविलेल्या ठशांच्या खरेपणावरून व खात्रीलायखपणावरून त्याच्या वजनाबद्दल, कसाबद्दल व मोलाबद्दल खात्री पटते अशा धातूंच्या तुकड्यांना नाणीं म्हणतात' अशी करतां येईल. यावरून असें दिसून येईल कीं, नुसते धातूंचे तुकडे अगर कांहीं तरी ठसे असलेले धातूंचे तुकडे (उदाहरणार्थ पदकें, बिल्ले इ.) यांना कांहीं नाणीं म्हणतां येणार नाहीं तर ज्याच्यावरील ठसे पाहिल्याबरोबर पहाणाऱ्याला त्यांचें मोल ताबडतोब समजतें व ज्या तुकड्यांचें वजन व कस हीं अमूक ठराविकच असलींच पाहिजेत हें निश्चितपणें सांगतां येईल, अशा धातूंच्या तुकड्यांना नाणीं ही संज्ञा देतां येते.

अमूक एका वेळीं 'नाणीं' प्रथम प्रचारांत आलीं असें निश्चितपणें जरी सांगतां येणें शक्य नाहीं तरी निदान अडीच तीन हजार वर्षांपूर्वींदेखील नाणीं प्रचारांत होतीं असें ऐतिहासिक पुराव्यावरून सिद्ध होतें. आपल्याकडील याज्ञवल्क्यस्मृति, कौटिलिय अर्थ-शास्त्र इत्यादि जुन्या ग्रंथांतून नाण्यांचा उल्लेख केलेला आढळून येतो. तसेंच इतर देशांतही इसवी सनापूर्वी अनेक शतकांपासून नाणीं प्रचारांत होतीं असेंही दिसून येतें.

सध्यां नाणीं पाडण्याचें कार्य देशांतील सरकारच्या हातांतच फक्त राखून ठेवण्यांत आलेलें आहे. व इतर खासगी व्यक्तींनीं नाणीं पाडणें हा सर्व देशांतील कायद्याप्रमाणें गुन्हा करणाऱ्यास कडक शिक्षा करण्यांत येते. परंतु सुरवातीला खासगी व्यक्तींना देखील नाणीं पाडलेलीं, सरकारनें पाडलेलीं वगैरे अनेक प्रकारचीं पाडण्याची मुभा असे व अशा तऱ्हेनें खासगी व्यक्तींनीं नाणीं प्रचारांत असत. अगदीं अलिकडील उदाहरण घेतलें तरी शिवाजी महाराजांच्या काळीं अनेक तऱ्हेच्या मोहरा, होन व निदान शंभर निरनिराळ्या प्रकारचे तरी रुपये अस्तित्वांत होते असें ऐतिहासिक कागद-पत्रांवरून दिसून येतें. प्रत्येक नाण्याचा आकार, भाव व वजन त्यांतील धातूंची शुद्धता वगैरे वेगवेगळीं असत. त्यामुळें निरनिराळीं नाणीं वटविण्याचे वेळीं अडाणी माणसाची बरीच पंचाईत होई व सराफ वगैरे लोकांना बट्टा वगैरे रूपानें नफा मिळविण्याची चांगलीच संधी असे. तसेंच बनावट नाणीं करणाऱ्यां-नाही चांगलेंच फावे. परंतु पुढें नाणें पाडणेचें कार्य हें देशांतील सरकारनें सर्वस्वीं आपले हातांत राखून ठेवलेमुळें अशा प्रकारांना आळा बसूं लागला व विवक्षित प्रकारचीं व एकजातीय नाणीं मिळूं लागल्यानें लोकांचा त्रासही पुष्कळच कमी झाला. तसेंच नाणीं पाडण्याच्या कलेमध्यें व यंत्रसामुग्रीमध्यें पुष्कळच परिणति झाल्यामुळें कौशल्यपूर्ण, सौंदर्य-प्रधान व कलायुक्त अशीं नाणीं पाडतां येऊं लागलीं, व साहजिकच खोटीं नाणीं पाडणाऱ्यांच्या धंद्यालाही

आळा बसला. आणि लोकांना आपापले आर्थिक व्यवहार करण्याच्या कामीं सोईस्कर व खात्रीलायख अशीं विनिमयसाधनें अगर पैसा मिळूं लागून उद्योगधंद्यांची व एकंदरींत मानव जातीची सामाजिक प्रगति होण्याला पुष्कळच मदत झाली.

आपणांस नेहमींच्या संवईनें व सरावानें जितका अतिपरिचित तितकाच आपल्या जीवनास अत्यावश्यक होऊन राहिलेल्या पैशाचा इतिहास हा थोडक्यांत असा आहे व प्रारंभाला मनुष्याच्या देवघेवींचे व्यवहार सोइस्करपणें व सुलभतेनें व्हावेत म्हणून उपयोगांत आणलें गेलेलें केवळ एक विनिमय–साधन हें हल्लीं मनुष्याच्या आर्थिक जीवनाचा जणूं काय प्राणच होऊन राहिलेलें व अखिल मानव जातीच्या आयुष्यांत असामान्य सत्ता गाजवूं लागलेलें पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाहीं.

पो, एडगर ॲलन (Poe-Edgar Allan) (१८०९–१८४९:–हा अमेरिकन कवि, टीकाकार व कथालेखक ब्रोस्टन येथें ता. १९ जानेवारी १८०९ रोजीं जन्मला. त्याचा बाप डेव्हिड पो हा आयरिश वशांतला होता. डेव्हिडनें वकिली सोडून रंगभूमी पतकरली व इलिझाबेथ अर्नोल्डनामक एका इंग्लिश नटीशीं विवाह केला. एडगर ॲलन तीन वर्षांचा असतांच त्याचे आईबाप निवर्तले होते. त्याला व्हर्जिनिया येथील जॉन ॲलन नांवाच्या तंबाखूच्या व्यापाऱ्यानें दत्तक घेतलें होतें. तो व्यापारी १८१५ सालीं लंडनला गेला तेव्हां त्यानें एडगर ॲलनला स्टोक न्यूइंगटन (Stoke Newington) येथील मॅनर स्कूल (Manor School)मध्यें पाठविलें.



एडगर ॲलन–पो.

१८२० सालीं रिचमांडला परत आल्यावर पो प्रथम एका खासगी शाळेंत शिकला व नंतर व्हर्जीनीयाच्या नव्या युनिव्हर्सिटींत शिकला. तेथूनच तो १८२६ सालीं भाषा विषयांत असामान्य प्राविण्य दाखवून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला. त्यानें पुढें संयुक्त संस्थानच्या सेन्यांत नांव दाखल केलें व सार्जंट मेजर झाला. १८३० सालीं त्याची कॅडेट् म्हणून नेमणूक झाली परंतु १८३१ सालीं त्याच्या शिरजोरपणाच्या वर्तनाबद्दल त्याला कामावरून दूर करण्यांत आलें. यापुढें त्याला स्वावलंबनानेंच जगावें लागलें. त्याला काबाडकष्ट करावे लागले. त्यांतल्या त्यांत त्याची विधवा आत्या मिसेस क्लेम हिची त्याच्यावर ममता असल्यामुळें तिची त्याला मदत झाली. तिची व्हर्जिनिया नांवाची एक सुंदर मुलगी होती. तिज बरोबर पोनें १८३६ सालीं विवाह केला, विवाहाचे वेळीं ती मुलगी पुरती चौदा वर्षांचीहि नव्हती. पोनें पंधरा वर्षांचा असतांच कविता लिहिण्यास सुरवात केली होती. त्यानें १८२७ व १८२९ सालीं आपल्या कवितांचीं पुस्तकें प्रसिद्धिली. १८३१ मध्यें त्याचें कवितांचें तिसरें पुस्तक प्रसिद्ध झालें; त्यांत The Sleeper, The City in the Sea, The Valley of unrest, Lenore व Israfel या कविता आहेत. त्याची पहिली कथा A Ms Found in a Bottle. ही होय. या कथेला The Baltimore Saturday Visitor नें १८३३ सालीं जाहीर केलेलें बक्षीस मिळालें. त्याच्या Romance of the Sea व The Narrative of Arthur Gordon Pym या कथा १८३८ सालीं व Tales of Glrotesque व Arbesgne या १८४० सालीं प्रसिद्ध झाल्या.

रिचमंड येथील सदर्न लिटररी मेसेंजरमध्यें व इतर नियतकालिकांत त्यानें लिहिलेल्या टीकालेखांनीं टीकाकार म्हणून मान्यता मिळवून दिली. वाङ्मयीन टीका विवेचकपद्धतीनें करणारा हा पहिला अमेरिकन टीकाकार असें म्हणतां येईल. (इलिझाबेथ ब्राउनिंग टेनिसन, डिकन्स, हॉथॉर्न, हॉवेल वगैरेच्या लिखाणाचें रसग्रहण करणारा हा पहिला अमेरिकन लेखक.

पो हा आधुनिक गुप्तपोलिसांच्या कथांचा आद्यप्रवर्तक होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याच्या गुप्तपोलीसांच्या कथा पुढीलप्रमाणें:–The Adventures of one Hans Pfaal and The Baloon Hoax, He anticipated Jules Verne, As in The Gold Bug, The Murders in the Rue Morgue, The Mystery of Marie Roger, The purloind setter.

त्याच्या (Tales of fantasy) पैकीं पुढें दिलेल्या कथा उत्कृष्ट आहेत. The Fall of the House

of Usher, The Pit and Pendulum, The bask of Amountilleds व The Assignation.

पोपला कीर्तीचा लाभ फार उशीरा मिळाला. १८४५ सालीं प्रसिद्धिलेल्या Raven या त्याच्या पुस्तकानें त्याला कीर्ति मिळवून दिली. त्या वेळीं त्याच्या आयुष्यांतील दुःखपूर्ण प्रसंग होता. तो लवकरच आला. त्याची तरुण पत्नी ता. ३० जानेवारी १८४७ रोजीं न्यूयॉर्क जवळील फोर्ड हॅम येथें एका लहान झोपडींत निवर्तली. तिच्या मृत्युसमयीं त्याच्या घरीं दारिद्याची अवकळा आली होती.

यापुढील कालांत पोनें पुढील ग्रंथ प्रकाशिले. The Bells, Ulalume, For Annie, Annabel Lee.

पोचे शेवटचे दिवस दुःखांतच गेले. पो ता. ७ आक्टोबर १८४९ रोजीं बाल्टिमोर येथें वारला. वेस्टमिनिस्टर चर्चमधील जुन्या स्मशानांत त्याचें दफन झालें.

पो ह्याचा स्वभाव एकान्तप्रिय होता; परंतु समाजाशीं त्याचें वर्तन सभ्यपणाचें होई. स्वभाव मानी असल्यामुळें त्याला मदत करूं इच्छिणाऱ्यापुढें पेच पडे. त्याचें आपल्या पत्नीवर प्रेम होतें. पण दारू व अफू यांचें त्याला व्यसन होतें. त्याचे ग्रंथ मौलिक व उत्कृष्ट आहेत. रचना सौष्ठव व नादमाधुर्य हे गुण त्याच्या काव्यांत उत्कटतेनें आढळतात. त्याच्या कथा तंत्रदृष्ट्या निर्दोष आहेत. अमेरिकन कलावन्त लेखकांच्या प्रथमश्रेणींत त्याला मानाचें स्थान प्राप्त झालें आहे. त्याच्या लिखाणाचे महत्त्व बहुतेक देशांत—विशेषतः फ्रेंच लेखकांना—जास्त पटलेलें दिसतें. त्याच्यावरहि शेले, बायरन, इलिझाबेथ ब्राऊनिंग यांच्या लिखाणाचा परिणाम झालेला दिसतो.

पोटगीः-पोटगी म्हणजे एकानें दुसऱ्याकरितां करावयाची अन्नवस्त्र व राहण्याची जागा यांची तरतूद. अशा प्रकारची तरतूद करण्याची जबाबदारी बहुधा पोष्याशीं असलेल्या नात्याच्या संबंधांतून उत्पन्न होते. मातापितरांनीं अल्पवयवी मुलांचे, मुलांनीं आपल्या वृद्ध मातापितरांचे, पतीनें पत्नीचे पोषण करण्याची जबाबदारी सर्वत्र मानिली गेली आहे. पुढें हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें व मुसलमानी धर्माप्रमाणें पोष्य वर्ग कोणता, त्याला अन्नवस्त्रादि पुरवण्याची जबाबदारी कोणावर, केव्हां, कशी व कितपत पडते याचा विचार केला आहे.

हिंदु व्यवहार धर्मशास्त्राप्रमाणें पोष्यपोषक संबंध दोन प्रकारानें निर्माण होतो :

(१) पोषकाच्या पोष्याशीं असलेल्या नात्याच्या संबंधांतूनच केवळ उत्पन्न होणारी जबाबदारी; ही जबाबदारी पोषकाच्या ताब्यांत मिळकत असण्यावर अवलंबून नसते. (२) मिळकतीवर अवलंबून असलेली जबाबदारी.

(१) आपली धर्मपत्नी, अज्ञान मुलगे, अविवाहित मुली व वृद्धमातापितरें यांचें पोषण करणें हें प्रत्येक हिंदु गृहस्थाचे कायदेशीर कर्तव्य आहे. ही त्याची वैयक्तिक जबाबदारी आहे. दुसऱ्या कोणाहि नातेवाईकाचें पोषण करण्याची वैयक्तिक जबाबदारी हिंदूवर कायद्यानें पडत नाहीं; मग तो नातेवाईक त्याचा पितामह, त्याची बहिण, सावत्र आई, सून अगर भावजय यापैकीं कोणी कां असेना.

(२) हिंदु मिताक्षराप्रमाणें एकत्र कुटुंबाच्या कर्त्यावर कुटुंबांतील सहभागीदार व त्यांची बायकामुलें यांचें पोषण करण्याची कायदेशीर जबाबदारी पडते. कोणीहि सहभागीदार मृत्यु पावल्यास त्याच्या विधवेचें व मुलांचें कर्त्यानें संगोपन केलें पाहिजे.ही जबाबदारी कर्ता कुटुंबाची मिळकत वहिवाटीत असतो म्हणूनच त्याजवर पडते. दायभाग एकत्र कुटुंबाच्या बाबतींत हेंच तत्त्व लागूं पडते; परंतु दायभाग एकत्र कुटुंबांत पितापुत्रांची सह भागीदारी नसते; त्यामुळें पित्यावर सज्ञान मुलाचें पोषण करण्याची जबाबदारी नसते; शिवाय दायभाग एकत्र कुटुंबांतील सहभागीदाराच्या मृत्यूनंतर त्याच्या मिळकतीचा वारसा त्याच्या विधवेकडे जातो; त्यामुळें ती विधवा पोष्यवर्गांत पडत नाहीं.

हिंदु वारसानें वारसाहक्कानें आपल्या हातीं येणाऱ्या मिळकतींतून त्या मिळकतीच्या आपल्या पूर्वीच्या मालकाच्या पोष्यवर्गाला पोषिलें पाहिजे. हिंदु गृहस्थावर आपली बहीण, सावत्र आई, भावजय, सून वगैरेंना पोसण्याची कायदेशीर जबाबदारी नसते हें वर सांगितलेंच आहे; परंतु या नातेवाईकांच्या चरितार्थाची सोय करण्याची नैतिक जबाबदारी त्याचेवर पडतेच पडते. या नैतिक जबाबदारीचें रूपान्तर त्याचे वारसावरच्या कायदेशीर जबाबदारींत होतें.

पित्यानें आपल्या अनौरस पुत्राला पोटगी दिली पाहिजे. त्याचे पश्चात् तो मृत्युसमयीं एकत्रांत रहात असेल तर त्याचे सहभागीदारावर ती जबाबदारी

पडते; तो विभक्त स्थितींत मरण पावला असेल तर त्याचे वारसावर ती जबाबदारी पडते. मिताक्षरेप्रमाणें अशा पुत्राला आजीव पोटगी मिळते. दायमागाप्रमाणें तो सज्ञान होईपर्यंतच मिळते; त्याचे पश्चात् त्याचे पुत्रांना त्याच्या पित्याकडून अगर पित्याचे वारसा- कडून पोटगी मागण्याचा हक्क नाहीं.

मुसलमानी कायद्याप्रमाणें पित्यानें आपल्या अज्ञान पुत्राचें संरक्षण केलेंच पाहिजे; त्याचप्रमाणें मुलींचे त्याच्या विवाहापर्यंत संरक्षण केलें पाहिजे. पित्याची परिस्थिति गरीबीची असून तो परिश्रम करून पैसे मिळविण्यास अपात्र असेल व माता श्रीमान असेल तर तिनें मुलांचे पालनपोषण केलें पाहिजे. माता व पिता हीं दोघेंही गरीब असतील तर पितामहावर जबाबदारी पडते (तो समर्थ असेल तर).

सुस्थितीत असलेल्या पुत्रांवर आपल्या गरीब माता पितरांचें संरक्षण करण्याची जबाबदारी आहे.

आपल्या आज्ञाधारक व विनीत पत्नीचें संरक्षण करणें पतीचें कर्तव्य आहे.

पोटशूळ:–पोटांत भयंकर शूल होण्याचीं अनेक कारणें असूं शकतात. असा शूल जर पूर्वचिन्हें विशेष कोण तींही नसतांना एकदम उत्पन्न झाला असेल तर त्याचें खरें कारण हुडकून काढून त्यावर योग्य उपचार करणें, उत्तम निष्णात डॉक्टरासहि कित्येकदां कठिण होऊन बसतें. पोटांत अवयव अनेक असल्याकारणानें कोणत्या अवयवांत बिघाड झाला आहे याविषयीं नक्की अनु- मान बांधणें अशक्यप्राय होतें, हें पुढें दिलेल्या, पोट- शूलांच्या कांहीं कारणांवरून लक्षांत येईल.

पोटशूल व त्यामुळें शक्तिपात (Collapse) हीं दोन्हीं साहचर्यानें आढळलीं तर खालील विकृति असण्याचा संभव असतो—

(१) पोटांतील कोणतादि अवयव अगर गुल्म (Cyst) फुटणें अगर सच्छिद्र होणें. (२) पेरिटोनिअम् नांवाचें जें आंत्रावरण असतें त्याचा दाह व सूज उत्पन्न होणें. (३) आंतड्याच्या मार्गांत एकदम अड- थळा उत्पन्न होणें. यांत अंतर्गल, आंतड्यास पीळ बसणें, अगर आंतडेंच आंतड्यांत जाणें आणि आंत्रपुच्छदाह(Aphendicitis ॲफेंडिसायटिस्) या विकृतींचा अंत र्भाव होतो. (४) सगर्भ, अगर इतर गुल्मादि कारणांनीं मोठाझालेला, गर्भाशय चलित होणें. (५) आंतड्यांच्या मोठ्या धमनींत रक्त गोठणें अगर कांहीं अडकून रक्ताभिसरण थांबणें. (६) स्वादु- पिंडदाह (Pancreatitis) अगर अधिवृणपिंडदाह (Adrenalitis) होणें.

नुसताच पोटशूल असेल व त्याबरोबर शक्तिपात नसेल तर पुढील कारणें लक्षांत वागविलीं पाहिजेतः— (७) कॉलिक (Colic) होणें. यांत आंतड्याची तिडिक, मूत्रपिंडाची तिडिक व पित्ताशयाची तिडीक इतक्यांचा अंतर्भाव होऊं शकेल. (८) कांहीं प्रकारचा आंत्रपुच्छदाह, हलता किंवा तरता मूत्रपिंड (Floating kidney). स्प्लीनच्या रक्तवाहिनींत प्रतिबंध होणें हीं कारणेंहि असूं शकतील.

(९) पोटांतील अवयवांच्या मज्जारेषांत विकृति होणें. पोटशूलांत जी कळ असते ती कोठें, कशी, केव्हां व कितीशी उत्पन्न होते यासंबंधीं चौकशी केली पाहिजे. पोटशूलाबरोबरच वांति व बद्धकोष्ठता हीं लक्षणें–अस- ल्यास **आंत्रावरणदाह** अगर **आंत्रप्रतिबंध** (In- testinal obstruction) झाला आहे असें समजावें.

लहानपणीं पोटशूळाचें कारण आंतड्याचें कॉलिक, किंवा आंतड्यांत आंतडे शिरून अडकणें (Intussus- ception) हें प्रायः असतें. तरुणपणीं अॅपेंडिसाय- टिस् असण्याचा संभव असतो. किंवा अंतर्गळ, जठर- व्रण (Gastric ulcer) असूं शकेल; म्हातारपणीं कॅन्सर असण्याचा संभव असतो व मध्यवयस्क स्त्रियांत पित्तखड्याचें कॉलिक (Biliary Colic) जास्त संभ- वनीय असतें. तरुण स्त्रियांत पोटशूळाचें कारण म्हणजे जठरव्रण असणें अधिक संभवतें व जरा जास्त प्रौढ वायकांत **गर्भाशयाबाहेरची** (ectopic) **गर्भधारणा** फुटल्यानें पोटशूल उद्भवूं शकतो हें विसरतां नये. नाडीचें मान जर मिनिटास ९० ते १०० च्या आंत असेल तर पोटशूलाचें कारण कोणत्याही भयंकर स्वरू- पाचें नाहीं असें साधारणपणें खात्रीलायक समजावयास हरकत नाहीं. कॅन्सर व क्षय यांमध्यें अत्यंत क्षीणता येते. **वृद्धपणीं कॅन्सर** व **लहानपणीं** पोटांतील **क्षय- विकार** हीं कारणें बहुधा असतात.

उपाय–पोटशूळ उद्भवल्यास तज्ज्ञ डॉक्टराकडून ताबडतोब उपचार केले पाहिजेत. पोटांतील अवयव फुटलेला वगैरे असल्यास **लागलीच** शस्त्रक्रियाहि करून कारणाचें निराकरण करणें जरूर असतें. शस्त्रक्रिया करण्यांत विलंब झाल्यास जीव बचावण्याचा संभव तितक्या मानानें कमी कमी होत जातो हें लक्षांत

ठेवलें पाहिजे. तिन्ही प्रकारच्या कालिक्‌मध्यें कळ व **अत्यंत तीव्र** स्वरूपांत उद्भवलेली असून, वांति होते. नाडीमान १०० च्यावर क्वचितच चढतें व अंगाचें उष्णतामानहि नेहमींचेंच असतें. दाबल्यानें कळ कमी होते. **आंतड्याची तिडीक** बेंबीमोंवतीं उद्भवते. पोटांत वायु साठलेला असतो. कित्येकदां रेचहि होत असतात. पण (Lead Colic) शिसें धातूच्या विषानें होणाऱ्या पोटशूलाच्या विकारांत बद्धकोष्ठता मुख्यतः असून नाडी मंद चालते व हिरड्यांवर निळ्या रेषा असतात. **पित्तखडा** पित्ताशयाच्या नलिकेंतून जाऊं लागला म्हणजे जी भयंकर कळ असते तिला 'बिलिअरि' किंवा 'हेपॅटिक कॉलिक्' म्हणतात. ही कळ उजव्या बावळ्याकडे **वर** चढते. कांहीं तासांनीं अगर एक-दोन दिवसांनीं तिडिक थांबते पण कावीळ (Jaundice) उद्भवते. **मुतखडा** मूत्रपिंडाच्या नलिकेंतून मूत्राशयाकडे येत असतांना जी अत्यंत तीव्र कळ उठते तीस Renal Colic अशी संज्ञा आहे. ह्या कळीचें लक्षण असें आहे कीं, ती खालीं त्याच बाजूच्या मांडीकडे व त्याच बाजूच्या वृषणग्रंथीकडे जात असते. ती वृषण-ग्रंथिहिवर ओढल्यासारखी आकसून राहते. ही कळ १-२ दिवसपर्यंत टिकते व त्यावेळीं लघवी पुष्कळदां करावीशी वाटते. केव्हां केव्हां लघवी रक्तमय होते व लघवी करतांना दुखतेंहि. लघवींतून मुतखडा केव्हां केव्हां पडतो असेंहि चौकशीअंतीं कळतें.

वर वर्णन केलेल्या तिनी प्रकारच्या कॉलिक्‌मध्यें उपचार करावयाचे ते असेः—दुखणाऱ्या भागास चांगला शेक द्यावा. सोसेल तितक्या उष्ण पाण्यांत रोग्यास बसविल्यानें कळ कमी होते. त्याचप्रमाणें दुखणाऱ्या जागीं टरपेल, बेलाडोना, अफू किंवा क्लोरो-फॉर्म लावून उपयोग करावा. कळ असह्यच असल्यास मॉर्फिन् $\frac{1}{6}$ ग्रेन व अॅट्रोपिन् $\frac{1}{60}$ ग्रेन असें मिश्र इंजेक्शन देणें आवश्यक असतें. रोग्यास कढत पाणी पिववेल तितकें प्यावयास द्यावें. आंतड्याची तिडीक असल्यानें १ औंस एरंडेल व अफूचा अर्क २० थेंब असें देऊन नंतर मॅग्नेशिआ ४ ड्राम द्यावा.

पित्तखड्याच्या कळीवर (Biliary Colic) मॉर्फिन्‌ अॅट्रोपिन्‌चें वर लिहिलेलें इंजेक्शनच उपयोगी आहे. केव्हां केव्हां क्लोरोफॉर्मची भूलहि द्यावी लागते. अॅड्रेनॅलिन क्लोराइड (१:१०००) द्रावाचें १५ थेंब इंजेक्शन दिल्यानेंहि पित्ताशयनलिका शिथिल होऊन कळ थांबते. ६ औंस इतकें ऑलिव्ह तेल प्यावयास दिल्यानें पित्तखडा लवकर उतरतो असें कोणी कोणी म्हणतात. १ ड्राम खाण्याचा सोडा कढत पाण्यांत टाकून तें पाणी प्याल्यानें बराच उपयोग होतो. पित्त-खड्याची विकृति होण्याची ज्यांना वारंवार भीति असते त्यांनीं नेहमीं अल्क जातीय क्षार व सोडा सॅलिसिलस् घेत राहिलें पाहिजे व त्याबरोबर टरपेलच्या १० थेंबांच्या कॅपसूल गोळ्या घेणेंहि हितावह आहे.

मूतखड्याच्या शूलावर (Reanl Colic) क्लोरो-फार्म हुंगावयास देणें किंवा मूत्रपिंड चांगले कार्यक्षम असतील तर मॉर्फिआचें इंजेक्शन देणें आवश्यक आहे. पोटांत पोटॅश सायट्रस व स्पिरिट अॅमोनाय् अॅरोमॅटिकस्‌चें मिश्रण द्यावें. शूल राहिल्यानंतर आहारांत योग्य तो बदल करून मुतखडा बनण्याची प्रवृत्तिच कमी होईल असें पथ्य संभाळावें लागतें व पोटॅश सायट्रस सोडा वगैरे अल्कक्षार घेऊन व पाणी जास्त प्रमाणांत पिऊन खडे विरघळून जाण्यास मदत करणें जरूर असतें.

वर वर्णन केलेल्या तीव्र स्वरूपाच्या पोटशूलाहून निराळे असे **सौम्य प्रकारचे** व **पुष्कळ दिवस कमीअधिक प्रमाणांत त्रास देणारे** असेहि **पोट-शूळ** संभवतात व त्यांचीं कारणेंहि अॅपेंडिसायटिस्, सौम्य आंत्रप्रतिबंध, पोटांत हळूहळू वाढून इतर अवयवांवर दाब पाडणारे गुल्म किंवा गोळे(Tumours), सौम्य आंत्रावरणदाह, आंतड्यांतील अपचन, बद्ध-कोष्ठता व पोटांतील अवयवांची शिथिलता, स्वादुपिंड-विकार इ. इ. असू शकतात. त्यांचेंहि योग्य निदान होऊन चांगल्या उपचारांनीं विकृतीचें कारण नाहींसें केलें पाहिजे.

पोतदार, प्रो० दत्तो वामन, (१८९०–):– उत्तम वक्ते, मार्मिक टीकाकार व इतिहाससंशोधक. यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यापैकीं महाड तालुक्यांतल्या 'बीरवाडी' गांवीं ५ ऑगस्ट १८९० ला झाला. यांचें बहुतेक आतांपर्यंतचें आयुष्य पुण्यासच गेलें. प्रो. पोतदारांचें मराठी व इंग्रजी (मॅट्रिकपर्यंतचें) शिक्षण पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयांत (१९०६ पावेतों) झालें. फर्ग्युसन कॉलेजमधून त्यांनीं १९१० मध्यें बी. ए. ची पदवी (इतिहास) घेतली. नंतर एल्. एल्. बी. होण्यासाठीं नांव घातलें पण तो बेत रहीत झाला.

यानंतर व्यवसायामुळें श्री. पोतदारांचा संबंध शिक्षणप्रसारक मंडळी पुणें यांच्याशीं १९१२ पासून

१९३५ पर्यंत आला. या मुदतींत त्यांनीं नूतन मराठी विद्यालय व सर परशुराम भाऊ कॉलेज या संस्थांमध्यें शिक्षकापासून मराठी व इतिहास या विषयाचे प्रोफेसर होण्यापर्यंत विविध प्रकारचीं कामें केलीं. शेवटीं १९३६ मध्यें ते सेवानिवृत्त झाले.



पोतदार.

शैक्षणिक कार्य चालू असतांनाच भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणें, भांडारकर प्राच्य संशोधक मंडळ पुणें, महिला विद्यापीठ पुणें, नागरी प्रचारिणी सभा काशी, अखिल भारतीय इतिहास परिषद, महाराष्ट्र युनिव्हर्सिटी असोसिएशन, पुणें या व इतरहि अनेक संस्थांशीं त्यांचा संबंध आला.

प्रो. दत्तोपंत पोतदारांचा वरील संस्थांशीं संबंध आल्यामुळें त्यांच्या हातून मोठाले लेख चाळीसवर लिहिले गेले. तसेंच संशोधनपर टिपणें व निबंध ६०–७० व भाषणें २५०–३०० पर्यंत केलीं गेलीं. याशिवाय 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार', 'मराठे व इंग्रज (समालोचन)', 'मराठी व इतिहास संशोधन' हीं स्वतंत्र पुस्तकें व 'वक्तृत्व', 'साहित्य-सोपान' 'मुलांस उपदेश' (१०–१२) हीं शालेय पुस्तकें आणि देवदास, संत मालिका नि ज्ञानप्रदीप हीं प्राचीन साहित्यावरचीं पुस्तकें लिहून झालीं. या पुस्तकांप्रमाणेंच त्यांनीं शिलालेख, ताम्रपट, नाणीं, शस्त्रें, वस्त्रें, पोथ्या कागद व अवशेष वगैरेंचा शोध करून त्यांना भा. इ. सं. मंडळांच्या हवालीं केलें.

यांच्या लेखांचा व व्याख्यानांचा 'विविध–दर्शन' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला असून त्यांनीं आजपर्यंत अनेक परिषदांचीं अध्यक्षस्थानें विराजित केलीं त्यांपैकीं नगरचें साहित्य संमेलन (१९३९), बडोदें येथील महाराष्ट्र साहित्य संमेलनांपैकीं इतिहास विभाग (१९३४) अखिल भारतीय इतिहास परिषद (मराठी इतिहास-विभाग) हीं मुख्य होत.

पोप, अलेक्झँडर (१६८८–१७४४):– हा इंग्रज कवि व उपरोधी लेखक (Satirist) ता. २१ मे १६८८ रोजीं लंडन येथें जन्मला. तेथें त्याच्या बापाचें तागाच्या कापडाचें दुकान होतें. त्याच्या बापाचा व्यापारधंदा भरभराटीनें चालला होता. पोप हा रोमन कॅथॉलिक पंथांत वाढला होता, त्यामुळें एका अव्वल दर्जाच्या शाळेंत त्याला प्रवेश नाकारण्यांत आला. परंतु त्याची वृत्ति अभ्यासू असल्यामुळें त्यानें आपल्या अपुऱ्या शालेय शिक्षणाची भरपाई घरीं ग्रंथ वाचून केली. कोणता तरी धंदा करावा म्हटलें तर त्या मार्गांतहि त्याचा धर्म आडवा आला. शिवाय तो प्रकृतीनें केवळ अशक्तच नव्हे तर अगदीं कुरूप असल्यामुळें धंदेवाईक जीवनाची यातायात त्याला झेपण्यासारखीहि नव्हती. त्याला वाङ्मयाची मोठी आवड. त्यांत त्याच्या बापाचा पेशा पडला स्वतंत्र. आर्थिक परिस्थितीहि चांगल्यापैकीं. त्याचा बाप विंडसर फॉरेस्ट नजीक एक मिळकत खरेदी करून तेथें राहण्यास गेला. या परिस्थितीचा फायदा पोपला आपला आवडता वाङ्मयव्यासंग करण्याला भरपूर मिळाला. असें सांगतात कीं तो बारा वर्षांचा असतांना ड्रायडनशीं संभाषण करण्याचा त्याला योग आला व त्या संभाषणानें त्याच्या भावी आयुष्याची दिशा ठरून गेली. पद्यलेखनांत त्यानें लहान वयांतच कमालीचें प्राविण्य दाखविलें होतें. त्याच्या वयाला अवघीं सोळा वर्षें होण्यापूर्वींच त्यानें हजारों ओळी लिहिलेल्या होत्या. पण या लिखाणापैकीं बहुतेक त्यानें नाहींसें केलें. फक्त The Thebavd of Statius व The Pastorals यांचें भाषांतर तेवढें राखलें.

त्याच्या वयाच्या चोविसाव्या वर्षी तो आपल्या काळचा प्रमुख कवि म्हणून गणिला गेला होता. कवि म्हणून त्याची कीर्ति १७११ साली प्रकाशित झालेल्या Essay on Criticism या उपदेशपर कवितेनें प्रस्थापित झाली. ही कविता वाङ्मयीन अभिरुची व शैली (Literary taste and style) या विषयांवर आहे. १७१२ सालीं तत्कालीन शिष्टांच्या जीवनावर Rape of the Lock नांवाचें त्याचें औपचारिक काव्य प्रकाशित झालें. या उत्कृष्ट काव्यानें त्याच्या कीर्तींत भर घातली व त्याला स्विफ्ट, ॲडिसन, यांच्यासारख्या साहित्यसेवक मित्रांचा लाभ करून दिला. पोप स्क्रिबलरस लिटररी क्लबचा सभासद झाला. त्या क्लबचा स्विफ्ट हा अध्यक्ष होता.

होमरचे (Ryhming pentameters) या छंदांत भाषांतर करणें हें पोपच्या जीवितांतील या पुढचें प्रमुख कार्य होऊन राहिलें. १७१५ मध्यें इलियडचा पहिला भाग प्रसिद्ध झाला; व ओडिसीचा (Odyssey) दुसरा भाग १७२५ मध्यें प्रसिद्ध झाला. या भाषांतराचें स्वागत प्रचंड प्रमाणावर झालें; परंतु त्यांत होमरच्या मूळच्या काव्यांतील ओज (Spirit) नाहीं. पोपला या भाषांतराच्या कार्याबद्दल सुमारें ५०००० पौंड मोबदला मिळाला. या पैशांमुळें पोपला संपूर्ण आर्थिक स्वास्थ्य लाभलें. १७१८ सालीं त्यानें टेम्स नदीच्या काठीं ट्विकेनहॅम येथें एक उद्यानगृह (Villa) विकत घेतलें व तेथें तो आपल्या मातेसह राहूं लागला. आपल्या आयुष्याचीं शेवटचीं २६ वर्षें त्यानें याच स्थळीं घालविलीं. तो ता. ३० मे १७४४ रोजीं वारला.

पोप होमरचे भाषान्तर करण्यांत गुंतला होता त्या मुदतींतच त्यानें पुढील दोन प्रभावी काव्यें प्रकाशिलीं. "The Elegy to the Memory of an Unfortunate Lady" व "The Epistle of Elosva to Abelard" त्यानें शेक्सपीयरची एक आवृत्ति संपादून प्रसिद्धिली. पण या पुस्तकावर ल्यूइस थिओबाल्ड नामक एका गृहस्थानें प्रतिकूल टीका केली. हा गृहस्थ साहित्यिक नव्हता, परंतु त्याचे शेक्सपीयरविषयक ज्ञान पोपहून अधिक होतें. या टीकेनें पोप इतका चिडला कीं त्यानें Dunciad हें आपलें जें उपरोधिक काव्य १७२८ मध्यें प्रसिद्धिलें, त्यांत थिओबाल्डला नायक केलें. वाङ्मयक्षेत्रांत लुडबुडणाऱ्या ढोंगी लुंग्यासुंग्यांवर खरमरीत टीका करण्याची कल्पना पोपच्या मनांत पुष्कळ दिवस घोळतच होती. ती कल्पना प्रथम स्विफ्टनें सुचविली होती. या काव्याचे तीन विभाग होते. चौदा वर्षांनीं चौथा विभाग प्रसिद्ध झाला.

पोपनें आपल्या आयुष्याचीं शेवटचीं वर्षें तात्त्विक व टीकात्मक कविता लिहिण्यांत घालविलीं. या कवितांत Essay on Man ही प्रभावी आहे. ही कविता १७३३ सालीं प्रसिद्ध झाली. तिच्यांत बॉलिंग्ब्रोकच्या तत्त्वज्ञानाचें विवरण आहे.

पोपचा स्वभाव भांडखोर होता हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. ॲडिसननें टिकेलनें (Tickell) केलेलें होमरचें भाषान्तर उत्कृष्ट आहे असे म्हणतांच त्याजबरोबर तो भांडला. लेडी मेरी वर्ट्ले मॉंटेग या बाईशीं भांडण केलें. त्याची शरीर प्रकृतीच अत्यंत अशक्त, त्यामुळें तो अत्यंत चिरचिरा झाला होता. त्याचा स्विफ्टशीं मात्र आमरण स्नेह होता. कवि या नात्यानें त्याला कोणतें स्थान द्यावें हा प्रश्न वादग्रस्त आहे. त्याची काव्यरचना तंत्रदृष्ट्या निर्दोष आहे; पण तींत भावनेची उत्कटता नाहीं. निसर्गाविषयीं जिव्हाळ्याची भावना नाहीं. त्याच्या काव्यांतील उत्कृष्ट स्थळें भाषासौंदर्याच्या दृष्टीनें रमणीय आहेत; पण त्यांत काव्यगुण कमी.

पोर्तुगालः—पंधराव्या शतकांत दर्यावर्दीपणांत, व्यापारांत व व्यापाराकरितां आशिया आफ्रिकेंतील देशांत वसाहती करणाऱ्या धाडसी म्हणून प्रसिद्ध असलेल्या लोकांचें पोर्तुगाल हें राष्ट्र आहे. १४९८ मध्यें हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकोट बंदरीं अगदीं प्रथम येऊन धडकणारा शूर खलाशी वास्को–ड–गामा हा याच पोर्तुगालचा. या पोर्तुगालनें यावेळीं हिंदुस्थानला यावयाचा मार्ग शोधून काढला नसता तर हिंदुस्थानचा इतिहास कदाचित् अजीबात बदलता.


स्थान—युरोपखंडाच्या नैर्ऋत्य भागीं असलेल्या आयबेरियन नांवाच्या द्वीपकल्पाचा पोर्तुगाल हा पश्चिम भाग आहे. याच्या उत्तरेस व पूर्वेस स्पेन देश असून दक्षिणेस व पश्चिमेस अटलांटिक महासागर आहे. पश्चिम रेखांश ८ व उत्तर अक्षांश ४० या देशाच्या मध्यांतून गेलेले आहेत.


आकार व आकारमान—पोर्तुगालचा आकार एखाद्या लंबट चौकोनी पट्टीप्रमाणें अथवा किंचित् फरकानें एखाद्या समांतरभुज चौकोनाप्रमाणें आहे. याची जास्तींत जास्त दक्षिणोत्तर लांबी ३५८ मैल असून रुंदी १४१ मैल आहे. अटलांटिक महासागरांतील अझोझ व मादेरा हीं बेटें पोर्तुगालच्या लोकसत्ताक राज्यांत मोडत असल्यानें त्यांसुद्धां क्षेत्रफळ ३५४९० चौ. मैल आहे. लोकसंख्या ७,३१०,००० (१९३५) आहे. मुंबई इलाख्याच्या निम्मा अगर जोधपूर संस्थानाएवढा पोर्तुगाल आहे असें म्हटलें तरी चालेल.

किनारा—देशाच्या लांबीरुंदीच्या मानानें किनारा बराच लांब आहे; परंतु फारसा दतुर नाहीं. शिवाय मोठ्या बोटींच्या वाहतुकीस किनारा उथळ असल्यामुळें निरुपयोगी आहे. याच दोषामुळें पोर्तुगीज लोक पूर्वी कुशल खलाशी झाले हें लक्षांत ठेवण्यासारखें

आहे. नद्यांच्या मुखांत व आखातांत बरींच बंदरें आहेत. त्यांपैकीं लिस्बन–राजधानी आपोर्टो व सेतुबाल हीं प्रमुख होत.

स्वाभाविक रचना–पोर्तुगाल हा स्पेनप्रमाणेंच एक डोंगराळ देश आहे. देशाच्या मध्यांतून पर्वताच्या रांगा पूर्व-पश्चिम गेल्या आहेत. या देशाची सरासरी उंची १००० फूट आहे. किनाऱ्याजवळचा अगदीं अरुंद प्रदेश सखल आहे. स्पेनमधून निघणाऱ्या अनेक नद्या महत्त्वाच्या आहेत. सीरा-ड-एस्ट्रेला ही पोर्तुगालमधील सर्वांत उंच पर्वताची रांग आहे. याच्या अत्युच्च शिखराची उंची ७५२४ फूट आहे उत्तरेकडील पर्वत ज्वालामुखी असून यांत उन्हाळीं व औषधी पाण्याचे झरे आहेत. देशांत कुठेंहि गेलें असतां पर्वतांचीं शिखरें व पायथ्याशीं हिरवींगार दऱ्या खोरीं दिसतात. पोर्तुगाल इतका विविध व विपुल वनस्पतींनीं, फुलांनीं व नैसर्गिक सौंदर्यानें नटलेला देश जगांतहि असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. याच कारणानें युरोपांतील पुष्कळ लोक हिवाळ्यांत पोर्तुगालमध्यें मजा मारण्यास जात असत; पण सृष्टि-सौंदर्य असलें तरी आधुनिक सुखसोई, आरोग्य व सुधारणा या बाबतींत हा देश युरोपांतील इतर देशांच्या मागें राहिल्यानें लोक अलीकडे दक्षिण फ्रान्स, इटली व स्वित्सर्लंड या देशांकडे वळले आहेत.





(१) पोर्तुगाल–सी व्हेला नांवाचें रोमन शिल्पकलेच्या पद्धतीचें कोइंब्रा शहरांतील चर्च.

(२) लिस्बन या शहरांतील प्राका डोम पेड्रो हा भाग.

पोर्तुगालमध्यें खनिज संपत्ती विपुल आहे. पण सरकारची असहकारी बेफिकीरवृत्ती, स्वस्त सुलभ व जलद वहातुकीचा अभाव, कोळशाची वाण, भांडवल व मजुरी यांचा तुटवडा यामुळें जितके जिन्नस खाणी चालवून बाहेर काढावयास पाहिजेत तितके काढले जात नाहींत. सर्वांत महत्त्वाची धातू वोल्फ्रॅम ही असून शिवाय तांबें, शिसें, लोखंड, मंगल अथवा मँगेनीज्, गंधक, जस्त, थोडें सोनें व संगमरवर यांच्या खाणी आहेत. कोळसा फार थोडा सांपडतो व म्हणून परदेशाहून तो बराच आयात करावा लागतो.

हवामान—समुद्रसान्निध्य व उंचीमुळें पोर्तुगालची हवा समशीतोष्ण व सम आहे. फेब्रुवारीच्या आरंभाला आल्हाददायक वसंतऋतु सुरू होऊन उन्हाळा निघून गेला तरी उष्णतामान ६०° ते ७०° च्या पुढें कधींच जात नाहीं. या दिवसांत आराम देणारे गार वारे, शांत, स्वच्छ, निळें आकाश, ऊबदार समुद्रकिनारे व दऱ्या फुलांफळांनीं इतक्या भरलेल्या असतात कीं निसर्ग आनंदानें सौंदर्य व सौख्य यांचाच पाऊस पडतो कीं काय असें वाटतें. समद्रापासून लांब असलेल्या ठिकाणीं मात्र कधीं कधीं उष्णतामान १००° पर्यंत पोंचतें व सखलप्रदेशांतील सर्व वनस्पति करपून जाऊन ते भाग उदास वैराण दिसूं लागतात. आक्टोबर येतांच ही परिस्थिती बदलते. पावसास सुरवात होते व पुन्हां सृष्टी हिरव्यागार सौंदर्यानें नटलेली दिसूं लागते. पर्वतांच्या शिखरावर बर्फ पडलें व तें सर्व हिवाळाभर टिकलें तरी उंचवट्यावर कोठेंहि हिवाळे थंडगार असत नाहींत व ५६° चे खालीं पारा कधींच उतरत नाहीं. याला कारण समुद्रसान्निध्य व त्यावरून वाहणारे ऊबदार पश्चिम अथवा नैर्ऋत्य वारे. एकंदरींत हवा सर्वत्र व सर्वदा निरोगी व आल्हाददायक असते. लिस्बनचें सरासरी उष्णतामान ५६° असतें.

पोर्तुगालमध्यें पाऊस सर्वत्र पडतो. तो बहुधा हिवाळ्यांत नोव्हेंबरपासून वसंतऋतूचें आरंभापर्यंत म्हणजे फेब्रुवारीपर्यंत असतो. पाऊस उत्तरेस व पश्चिमेस अधिक व दक्षिणेस पूर्वेस कमी कमी पडत जातो. कांहीं उंचस्थलीं त्याची मजल २०० इंचापर्यंत जाते, तर अपोर्टो येथें ५० इंच, मध्यभागीं कोइंब्रा येथें ३५ इंच व दक्षिणेस २० इंचहि पडतो. पाऊस नेहमीं नियमित, जोराचा व दीर्घकाल पडणारा असतो. किनाऱ्यानें अतिशय दाट धुकें असतें. त्यामुळें जहाजांना प्रवासांत बरीच अडचण पडते. पावसाळ्यांत दऱ्याखोऱ्यांतून दलदल सांचते. वादळें अगदीं क्वचित् होतात.

वनस्पति व प्राणी-पोर्तुगालच्या हवामानाच्या वैचित्र्यामुळें जपान, नॉर्वे, स्वीडन, ऑस्ट्रेलिया, मेक्सिको इत्यादि लांब लांबच्या देशांतून आढळणारी वनस्पतिहि येथें होते. यांत ओक, फर, चेस्टनट्, पॉपलर, मॅग्नोलिया, बर्च, मिर्टल, ताड, माड, खजूर, सायप्रस, युकॅलिप्टस, घायपात, बुचाचीं झाडें, मॅपल व सर्व प्रकारचीं फुलझाडें फळझाडें असें फार मोठें वैचित्र्य आढळतें. यामुळें जंगलाचें उत्पन्न चांगलें येतें. १९ टक्के भागांवर अरण्य आहे. बुचाच्या व ओक झाडांची लागवड करतात. सुमारें ८ लक्ष एकर जमीनीवर बुचांची झाडें असून दरसाल सोळा कोटी पौंड कच्च्या बुचांची निर्यात होते. दक्षिणेस ओकचीं जंगलें असून त्याच्या फळावर डुकरांची जोपासना करतात. उत्तरभागीं गुरें व घोडे व डोंगराळ भागांत मेंढ्या व शेळ्या पोसतात. पोर्तुगालमध्यें घोड्यापेक्षां बैल फार आहेत. शेतीचें, औताचें व वाहतुकीचें काम बैलांकडूनच करून घेतात. यांचीं शिंगें म्हशीच्या शिंगांप्रमाणें फार लांब असतात. जंगलांतून लांडगे व अस्वलेंहि आहेत.

उद्योगधंदे—शेती, बागाइती, गुरें व घोडे यांची पैदास, मेंढरें, बकरीं व डुकरें यांची जोपासना किनाऱ्यानें व नद्यांतून मासेमारी व खाणी चालविणें हे पोर्तुगीजांचे मुख्य धंदे होत. यांवर अवलंबून असणारे व यांपासूनच उत्पन्न होणाऱ्या धंद्यापैकीं सर्वांत मोठा धंदा म्हणजे दारू गाळण्याचा. सर्व शेतकऱ्यांचे द्राक्षांचे मळे असतात. एप्रिल मेच्या सुमारास द्राक्षांचा मोसम सुरू होतांच शेतकरी, त्याचीं बायकामुलें मळ्यावर जातात, द्राक्षें तोडतात, बैलांच्या वडराच्या गाड्यासारख्या जाड चाकाच्या गाड्यांतून दारू गाळण्याच्या कारखान्यांत आणतात व आनंदानें गाणीं म्हणत, नाच करीत तीं तुडवून त्यांचा रस काढून दारू तयार करतात. नखशिखान्त द्राक्षांच्या डागांनीं स्त्री-पुरुष भरलेले असतात. अपोर्टोची पोर्ट-नामक दारू जगप्रसिद्ध आहे. सुमारें पांच लाख एकर जमीनींत द्राक्षाची लागवड केलेली असते व दरसाल त्यांपासून पंधरा कोटी गॅलन दारू तयार करतात. दुसरा धंदा ऑलिव्ह तेलाचा. आठ लाख एकर जमीन ऑलिव्ह झाडाच्या लागवडीस दिलेली असून दरसाल सव्वाकोटी गॅलन ऑलिव्ह तेल तयार करतात. तिसरा धंदा सार्डाईन, ट्यूनी व कॉड जातीचें मासे धरणें, ते वाळविणें, डब्यांत भरणें व ते परदेशी रवाना करणें हा होय.

कोळशाच्या कमतरतेमुळें पोर्तुगालमध्यें म्हणण्यासारखे कारखाने नाहींत. जे कांहीं थोडेबहुत आहेत ते अपोर्टो व लिस्बन या ठिकाणींच आढळून येतात. यांत जहाजें बांधणें, कापूस, लोकर, रेशीम, ताग यांचें कापड विणणें, कातडी सामान, चिनीमातीचीं भांडीं,



पोर्तुगाल—

व्हिआना डी कॉस्टेलो या गांवची एका शेतकऱ्याची स्त्री.

सिगारेट, टोप्या बनविणें, साबण, निरनिराळ्या नक्षीची व आकाराचीं ॲजूलेजॉस कौलें, मूरिशपद्धतीचीं धातूचीं भांडीं इत्यादि प्रामुख्यानें आढळतात. स्त्रिया विणकाम व भरतकाम उत्कृष्ट करतात.

पोर्तुगीज स्त्री आपलें स्वतःचें घरकाम, धुणेंपाणी, विणकाम करून आपल्या नवऱ्याच्या प्रत्येक कामांत मदत करते हा फार मोठा गुण आहे. शरीरानें ती अगदीं बळकट असते. ती कामाचा कंटाळा कधींहि करत नाहीं. शांत वृत्तीनें हंसतमुखानें व धिमेपणानें ती सर्वत्र व सर्व काळ काम करतांना आढळते. तिला कामाची इतकी ओढ व हौस असते कीं, जर कां घरीं देशांत काम मिळालें नाहीं तर ती स्वदेश सोडून कामधंद्याकरतां ब्राझीलसारख्या देशांतहि जाऊन राहण्यास मागेंपुढें पहात नाहीं. स्त्रिया डोक्यावरून मोठ मोठालीं ओझीं वाहून नेतात.

लोक व त्यांची राहाणी—पोर्तुगीज लोक मूळचे इबेरिअन जातीचे होते. पण पोर्तुगालवर निरनिराळ्या काळीं फोयेनिशिअन, कारथेथिअन, ग्रीक, रोमन, गोथिक व मूरिश अथवा अरब लोकांनीं स्वाऱ्या केल्यामुळें व हे लोक येथें राहूं लागल्यामुळें पोर्तुगीजांशीं त्यांनीं रोटीभेटी व्यवहार केले. यामुळें पोर्तुगीज लोकांच्या रक्तांत पुष्कळ लोकांच्या रक्ताची भेसळ झालेली आहे. उत्तरेकडील शेतकऱ्यांत गॅलिशिअन, ऑस्ट्रियन व स्पॅनियार्ड बीजाचे लोक आहेत, मध्यभागीं कार्थेजिअन व रोमन लोकांचें वर्चस्व दिसतें तर दक्षिणेस मूर अथवा बर्बर, अरब लोकांची छाप अधिक दिसून येते. पंधराव्या शतकांत देशांतील पुष्कळ लोकांनीं वसाहती करण्याकरतां शेती करण्याकरतां आफ्रिकेहून नीग्रो गुलाम आणले. यांच्याहि रक्ताची भेसळ फिरंग्यांत होऊन मध्य व दक्षिण पोर्तुगालमध्यें निग्रॉइड पोर्तुगीजांची संख्याहि फार झाली. साऱ्या युरोखंडांत पोर्तुगीज लोकांसारखी अनेक जातीच्या रक्ताच्या भेसळीची दुसरी जात नाहीं. मात्र दुसऱ्या इतर भेसळ जातींपेक्षां ही जात जास्त हुंशार आहे.

एकूण दोन प्रकारचे लोक आढळून येतात. एक शरीरानें बळकट व गिड्डे, रंगानें काळे, तोंडावर धाडसी व निश्चित स्वभावदर्शक खुणा असलेले, काळ्या डोळ्यांचे व केसांचे असून दुसरे अगदीं आधुनिक पद्धतीचे, रेखीव अवयवांचे, पाणीदार निळ्या डोळ्यांचे उभट लांबट चेहऱ्याचे, सतेज, तकतकीत तैलयुक्त चेहऱ्याचे. दोन्हीही प्रकारचे लोक जात्या बळकट, काटक व मजबूत बांध्याचे असून माफक व व्यवस्थित सवयींचे आहेत. दुसऱ्या प्रकारचे लोक दिसण्यांत स्पॅनियर्ड लोकांसारखे असले तरी स्पॅनियार्डचे गुण त्यांचें अंगीं नाहींत. दोघांचाहि पोषाख भपकेदार व छानछोकीचा असला तरी ते उद्योगी व मेहनती आहेत. श्रीमंतांपेक्षां शेतकरी व पुरुषांपेक्षां स्त्रिया जास्त धिप्पाड व सुरेख दिसतात.

चालीरीती—अरब अथवा मूरिश चालीरीतींचा पगडा पोर्तुगीजांच्या राहणींत सर्वत्र आढळतो. टोप्यांचा

हिरवा रंग बायकांनीं अंगावर दागिनें असतील नसतील तेवढें सर्व घालणें, काळसर भाजलेली भाकरी व बकरीच्या दुधाचा खवा खाणें, डोक्यावर घागरी घेऊन बायकांनीं पाणी आणणें, याचेंच अनुकरण करणारे नाच नाचणें, बैलांकडून धान्य मळून घेणें, मनुष्याला बोलावतांना स्वतःकडेच बोट करून खुणावणें, सोळा सोळा अगर अठरा अठरा पोलकीं घालून लठ्ठ दिसण्याची कोळ्यांच्या स्त्रियांची हौस, यावरून हा पगडा किती जबरदस्त बसलेला आहे हें उघड दिसून येतें. घरांचें बांधकाम, नक्षीकाम, घरांच्या भिंतीस आंतून व बाहेरून कौलांचा गिलावा करणें, धातूंच्या भांड्यावर नक्षी काढणें यांतहि मूरिश छाप दिसून येते. एकदां तर अरबांचे प्रस्थ इतकें माजलें कीं मोझारेबिक ही एक स्वतंत्र जातच निर्माण झाली. ती रक्तानें पोर्तुगीज व धर्मानें ख्रिस्ती असे; भाषा व चालीरीति मात्र अरबी वापरी. अद्यापिहि कांहीं मोझारेबिक लोक सुंता करतात.

अरबांचा पगडा जसा त्यांच्या अंगच्या गुणामुळें पोर्तुगीजांवर पडला तसा नीग्रोंचाहि त्यांच्या संख्येमुळें पडला. हा पगडा पोर्तुगीजांशीं त्यांची भेसळ झाल्यानें चेहऱ्यांत उत्पन्न झालेल्या विद्रूपतेंत, अनैतिक वागणुकींत, बौद्धिक ऱ्हासांत, आळशी स्वभावांत अगदीं स्पष्टपणें दिसून येतो.

लोक जनावरांचे फार शोकी आहेत. बैलांच्या टकरा लावणें त्यांस फार आवडतें. गाणीं म्हणणें, पोवाडे गाणें व तेहि जुने मूरलोकांचे, टिपऱ्याचा नाच नाचणें यांकडे लोकांचें फार लक्ष आहे. चेटक्या, पऱ्या, मंत्र, जादूटोणे यांवर त्यांचा फार भरंवसा आहे.

पोषाख–राष्ट्रीय असा एक पोषाख नसून त्यांत विविधता फार आढळून येते. शेतकरी गवतापासून तयार केलेला कोट, गोल वासुदेव टोपीच्या आकाराची टोपी, अंगांत शर्ट व पायांत विजार व बूट घालतो. कोळी गोल टोपी, सदरा, लांब पायघोळ झगा व विजार घालतो. त्याची बायकोहि तशाच तऱ्हेचा पोषाख करते; पण अंगांत पोलकें व डोक्यास पारशी स्त्रियांप्रमाणें एक पांढरें फडकें गुंडाळते. स्त्रिया डोकीवरून एक वार लांबरुंदीचें पांढरें फडकें पांघरतात, परकर नेसतात अगर विजार घालतात, कमरेपर्यंत येणारें पोलकें व त्यावरून घट्ट असा कोट व पायांत वाद्यांनीं बांधलेल्या खडावा घालतात. कोळ्यांच्या बायकांस सोळा ते अठरापर्यंत पोलकीं घालून रुबाबदार दिसण्याची हौस फार असते. त्या डोक्यांत फुलें घालतात, छातीवर पोलक्यास नक्षी काढतात, कमरेस फिती गुंडाळतात व आपली श्रीमंती दर्शवितात. मुलें व मुली स्त्रीपुरुषांप्रमाणेंच पोषाख करतात.

धर्म–१९१० सालीं लोकसत्ताक राज्यस्थापनेपर्यंत राजाचा धर्म रोमन कॅथॉलिक होता. पण इतर धर्मभेदास व पंथास मोकळीक असे. ब्रागा, लिजबोय व इव्होरा असे देशाचे तीन धार्मिक प्रांत केले होते व त्याचें उत्पन्न ६५००० हजार पौंड येई. हल्लीं धार्मिक स्वातंत्र्य आहे. देशाचा असा कोणताहि एक धर्म नाहीं. रोमन कॅथॉलिक पंथाचे लोक पन्नास लाख आहेत. बाकीचे निरनिराळ्या पंथाचे आहेत. दरसाल पोर्तुगालमधून बरेच लोक ब्राझीलला वसाहत करण्याकरितां जातात. यामुळें व अन्य कारणानें पोर्तुगालमध्यें पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या अधिक आहे. बालमृत्यूचीही संख्या अधिक आढळते.

शिक्षण–प्राथमिक शिक्षण सक्तीचें असून १९११ पासून त्याचा अम्मल जारीनें करण्यांत येत आहे. सुमारें साडेपांच हजार प्राथमिक शाळा, तीसएक दुय्यम शाळा व लिस्बन, कोयिंब्रा व अपोर्टो अशीं तीन विश्वविद्यालयें आहेत. विश्वविद्यालयांतून युरोपांतील इतर विश्वविद्यालयांप्रमाणेंच अभ्यासक्रम ठेवण्यांत आला आहे. लिस्बन व कोयिंब्रा येथें शिक्षकांच्या ट्रेनिंगची व्यवस्था केलेली आहे. लिस्बन येथें एक टेक्नीकल स्कूल, संगीताचीं विद्यालयें, लष्करी व नाविक शाळा, एंजिनीअरिंग व व्यापारी शिक्षणसंस्था आहेत. सक्तीचें शिक्षण केलेलें असूनहि अद्याप अशिक्षितांचें प्रमाण फार मोठें आहे. फक्त शेकडा २० लोकांसच वाचतां येतें.

लष्करी शिक्षण सक्तीचें आहे. प्रत्येक १७ ते ४५ वर्षांचे मनुष्यास कमींत कमी दहा वर्षें प्रत्यक्ष लष्करांत नोकरी करावी लागते, दहा वर्षें त्यांस राखीव सैन्यांत ठेवतात व पांच वर्षें परदेशांतील लष्करांत काम करावें लागतें. पंधरा ते तीस आठवडेपर्यंत नवशिक्यांनां लष्करी शिक्षण घ्यावें लागतें. शांततेच्या काळीं चार हजार लष्करी अधिकारी व सुमारें तीस हजार खडें सैन्य असतें. नाविक दलांत सुमारें सहा हजार अधिकारी, चार क्रूझर्स, दहा टॉरपेडो बोटी, तीन सब-

मरीन्स व जुन्या पद्धतीच्या तोफा असलेल्या बोटी. इतर राष्ट्रांच्या मानानें पोर्तुगालचे लष्कर व नाविक दल अगदींच कमी आहे.

राज्यव्यवस्था—१९१० आक्टोबरपर्यंत येथें राजसत्ता होती. पण त्या महिन्यांत लोकांनीं लोकसत्ताक राज्याची घोषणा केली व एक तात्पुरतें सरकार निवडण्यांत आलें. २० ऑगष्ट १९११ रोजीं घटना स्वीकारण्यांत आली. या घटनेप्रमाणें सर्व सत्ता पार्लमेंटचे ताब्यांत गेलीं. पार्लमेंटची दोन मंडळे आहेत एक नॅशनल कौन्सिल व दुसरें अपर चेंबर. पहिल्यांत लोकांनीं प्रत्यक्ष निवडून दिलेले १६४ सभासद असतात. त्यांची मुदत तीन वर्षें असते. दुसऱ्यांत म्युनिसिपल कौन्सीलरनीं निवडून दिलेले ७१ सभासद असतात व त्यांची मुदत सहा वर्षांची असते पण दर तीन वर्षांनीं निम्मे सभासद नवे घ्यावयाचे असतात. दोन्हीहि मंडळें एक प्रेसिडेंट निवडतात. त्याची मुदत चार वर्षें असते. तोच राज्याचीं सर्व सूत्रें स्वतः नेमलेल्या अकरा प्रधानांच्या मंडळाच्या साहाय्यानें हालवितो. प्रत्येक प्रधानाकडे मुलकी, न्याय, वसूल, शिक्षण, लष्कर इत्यादि खातीं सोंपविलेलीं असतात व तो त्या त्या खात्याचा मुख्य असतो. प्रेसिडेंटला पुन्हां निवडणुकीस उभें राहतां येत नाहीं. राज्य यंत्रांत सिव्हिलसर्व्हेंटांचा वाजवीपेक्षां जास्त भरणा केलेला आढळतो.

सरकारनें २१–५–१९११ पासून एस्क्यूडो नांवाचें चार शिलिंग ५$\frac{3}{4}$ किंमतीचे सोन्याचें नाणें सुरू केलें आहे. दहा, पांच व दोन एस्क्यूडोची, सोन्याचीं १$\frac{1}{2}$, $\frac{1}{4}$ व $\frac{1}{10}$ एस्क्यूडो किंमतींची चांदीची व जस्त ब्रॉंझचीं हलक्या दर्जाचीं नाणी पाडलेली आहेत. मेट्रिक पद्धतीची वजनें मापें प्रचलित आहेत.

व्यापार—पोर्तुगालचा व्यापार इंग्लंड, जर्मनी, ब्राझील व अमेरिकेचीं संयुक्त संस्थानें यांजबरोबर चालतो. दारू, बुचें, कच्चें तांबें, ऑलिव्ह तेल, फळें, घोडे, मासे व डुकरें हे जिन्नस निर्यात होतात व कोळसा, कापूस, सर्व प्रकारचें कापड व लोखंडी सामान, यंत्रे इत्यादि आयात होतात.

भाषा व वाङ्मय—पोर्तुगीज भाषा मूळ रोमन अथवा लॅटिन भाषेपासूनच बनलेली आहे. रोमन सैनिक व वसाहतवाले जी. भाषा बोलतात तीच ही भाषा आहे. रोमनमधील अव्वल दर्जाची लॅटिन भाषा मात्र कोणास येत नाहीं. स्पॅनिश भाषेशीं तिचें बरेंच साम्य आहे. फक्त शब्दावरील जोर व उच्चार यांतच काय तो फरक आहे.

प्राचीन कालापासून पोर्तुगालमध्यें गुणदृष्ट्या फार चांगल्या प्रकारचें वाङ्मय निर्माण होत होतें. त्याचा आरंभ अकराव्या शतकांत झाला असून त्यांत अरब व रानटी लोकांवर मिळविलेल्या विजयांवर भावगीतें व पोवाडे रचलेले आहेत. बाराव्या व तेराव्या शतकांतील वाङ्मयांत मुख्यतः ईश्वरभक्तिपर विषयावर ग्रंथनिर्मिती झालेली आढळते व ते सर्व ग्रंथ लॅटिन भाषेंत आहेत. वाङ्मयाचा उत्कर्षकाल सोळाव्या शतकांत होता. तेव्हां कॅमॉज कवीचें महाकाव्य ऑस ल्युसिआडास प्रसिद्ध झालें. पोर्तुगीज वाङ्मयांतील हें सर्वोत्कृष्ट काव्य म्हणून प्रसिद्ध आहे. एकोणिसाव्या शतकांत अल्मीडा गॅरेट हा कवी व हर्क्युलॅनो हा इतिहासकार प्रसिद्धीला आले. ग्युएरा जंक्वेरो हा आधुनिक कवी असून त्याच्याच काव्यामुळें पोर्तुगालची राजसत्ता नष्ट झाली असें कांहींचें मत आहे. पोर्तुगीज वाङ्मयावर परकीयांची बरीच छाप पडलेली दिसून येते. काव्य, कादंबऱ्या व प्रवासवर्णनें यांची वाङ्मयांत जितकी भर आहे तितकी नाट्य, इतिहास व शास्त्रीय वाङ्मय यांची नाहीं.

त्रोटक इतिहास—प्राचीन—पोर्तुगालमध्यें अगदीं पहिल्या वसाहती फोएनिशिअन व कार्थेजिअन लोकांनी केल्या. यानंतर टेगच्या मुखास ग्रीक व नंतर रोमन लोकांचें साम्राज्य आलें. पांचव्या शतकांत व्हिसिगोथ व आठव्या शतकांत मूर लोकांनीं देश उध्वस्त करून टाकला. अरबांच्या अमलांत पोर्तुगालचीं दोन शतकें-पर्यंत बरीच भरभराट झाली. यानंतर अरबांचीं व पोर्तुगीजांचीं युद्धें सुरू झालीं, व स्पेनच्या फर्डिनांडनें अरबांचा पाडाव करून त्याच्या मुलानें—चौथ्या अल्फांझोनें—१०९५त हेन्रीला पोर्तुगालचें कौंट केलें.

मध्ययुगीनः—हेन्रीचा मुलगा पहिला अलफांझो यानें कॅस्टाइलच्या राजाचा पराभव करून, मूर लोकांना हकलून दिलें व आपण पोर्तुगालचा राजा झाला. यानें कायदे व राज्यकारभाराच्या व्यवस्थेची स्थापना केली. पहिल्या सँकोपासून डेनिसपर्यंत (११८५ ते १३२५) पोपशीं धार्मिक मतभेद झाले व कित्येकदां पोपनें राज्याचा ताबा घेतला. पण डेनिस त्यांस हार गेला नाहीं. त्यानें आपल्या कारकीर्दींत

व्यापार, शेती, कारखाने व नौकानयनाची वाढ व भरभराट करून पोर्तुगालचें वर्चस्व वाढविलें. यानंतर पेट्रोच्या कारकीर्दीपर्यंत विशेष असें कांहीं घडून आलें नाहीं. पण त्यानें १४१५ त आफ्रिकेच्या किनाऱ्यावर वसाहत केली व पोर्तुगीज सफरींना सुरवात केली. यानंतर दुसऱ्या जॉनच्या कारकीर्दींत सरदारांशीं सत्तेकरितां भांडणांस जोराची सुरवात झाली. बार्थोलोम्युओ, वास्को-ड-गामा व कॅब्राल यांनीं अनुक्रमें दक्षिण आफ्रिका, हिंदुस्थान व ब्राझीलपर्यंत सफरी केल्या व ब्राझील पोर्तुगालचें ताब्यांत आला. सोळाव्या शतकांत दुसऱ्या जानच्या कारकीर्दींत पोर्तुगालचा उत्कर्ष शिखरास पोचला व हिंदुस्थानशीं होणारा व्यापार भरभराटीस आला. व्यापारामुळें संपत्तीची वाढ झाली, सोनें विपुल येऊं लागलें. हिंदुस्थान—युरोपमधील व्यापाराच्या मक्त्यामुळें देशाचीं अंतर्गत व्यापार ओहटीस लागला. राजांना शहाण्या लोकांचा सल्ला मिळेनासा झाला. ज्यू लोकांना हद्दपार करण्यांत आलें. तिसरा जॉन लढाईत मेला व पोर्तुगाल स्पॅनिश लोकांच्या ताब्यांत गेला. १६४० त सरदारांनीं बंड केलें व पोर्तुगालचें स्वातंत्र्य परत मिळविलें व चौथा जॉन राजा झाला. १६६८ त सहाव्या अल्फांझोनें स्पेनला आपलें स्वातंत्र्य मान्य करावयास लावलें.

अर्वाचीन-पांचव्या जॉननंतर पहिला जोसेफ व मागाहून मरिया राज्यावर आली. सरदारांचे हातीं बरींच सत्ता हिचें कारकीर्दींत गेली. १७९२ त ती आजारी पडल्यानें तिचा मुलगा गादीवर आला व त्याचा इंग्लंडशीं संबंध असल्यानें त्याला नेपोलियन-विरुद्ध लढावें लागलें. ज्युनोनें पोर्तुगालचा ताबा घेतला व राजाला ब्राझीलला मुलांबाळांसह पळून जावें लागलें. वेलिंग्टनच्या नेतृत्वाखालीं फ्रेंचाचा पराभव झाला व सहावा जॉन राज्यावर आला. तो ब्राझीललाच रहात होता. १८२० मध्यें क्रांति होऊन राजाला ब्राझीलहून बोलाविण्यांत आलें. पण १८२२ मध्यें ब्राझीलनें स्वातंत्र्य पुकारलें व पेड्रोला बादशहा केलें. जॉन मेल्यावर पेड्रो पोर्तुगालला आला. लोकांना नव्या सुधारणा दिल्या व राज्य आपल्या मुलीस देण्याचें ठरविलें. पण ते लोकांस आवडलें नाहीं. १८३४ व १८४२ सालीं क्रांत्या होऊन १८२६ च्या सुधारणाप्रमाणें राज्य चालावें असें ठरलें. मरिया १८५३ मध्यें मरण पावली. तिचेनंतर पांचवा पेड्रो व त्याचा मुलगा पहिला कार्लो हे राज्यावर आले. १९०८सालीं कार्लोचा खून झाला. त्याचा मुलगा दुसरा मॅन्युअल यानें १९१० पर्यंत राज्य केलें. या सालीं त्यास राज्यत्याग करावा लागला व लोकसत्ताक राज्य स्थापन झालें. मॅन्युअल इंग्लंडला पळून गेला व तेथें राहूं लागला. त्याच्या बाजूच्या लोकांनीं लोकसत्ताक राज्यकर्त्यांस बराच त्रास दिला. १९१५ मध्यें प्रधान व लष्कर यांचा बेबनाव होऊन नवें प्रधानमंडळ अस्तित्वांत आलें. निवडणुकीच्या बाबतींत मतभेद होऊन पुन्हां क्रांति झाली व आगस्टमध्यें बर्नार्डिनो मेकॅडो अध्यक्ष झाला. १९१६ ते १९१८ पर्यंत पुन्हां दोन वेळ क्रांती होऊन डॉ. पायेशाचा खून झाला. महायुद्धकालीं पोर्तुगीजांनीं आफ्रिकेंतील वसाहतीचे संरक्षणार्थ जर्मनीबरोबर युद्ध केलें. जर्मनीचीं जहाजें पकडून आपल्या बंदरांत आणून ठेवलीं व इंग्रजांस मदत केली. पोर्तुगालला जर्मनीपासून युद्ध संपतांच नुकसानभरपाई व कियांगो हें शहर मिळालें. १९२१ ते १९२५ या कालांत तीनदां क्रांति झाली व पोर्तुगालची सांपत्तिक परिस्थिति खालावली.

पोर्तुगालमध्यें शिक्षणाची वाढ व्हावयास पाहिजे. तसें झालें म्हणजे लोकांस नैसर्गिक संपत्तीचा पुरेपूर उपयोग करून घेतां येईल व मग खेड्यांतील परिस्थिती सुधारून देशाची भरभराट होईल. लोकांना भरपूर अन्नाची व ज्ञानाची फार जरूरी आहे. हिंदुस्थानांतील दीव, दमण व गोमंतक हे भाग पोर्तुगीजांच्या अंमलाखालीं आहेत त्याचप्रमाणें आफ्रिकेंतही वसाहती आहेत.

लढाऊ सैन्य असें पोर्तुगालचें फार कमी आहे १९३८ साल अखेर ३,१६४ आफिसर्स व २५००० सैनिक एवढें खडे लष्कर होतें. आरमारहि फारच लहान आहे. लढाऊ विमानें १९३८ अखेर फक्त १०० पर्यंतच होतीं.

पोर्सलेन (Porcelain):-हीं एक प्रकारचीं सुंदर भांडीं (Pottery) आहेत. हीं पांढऱ्या शुभ्र पदार्थाचीं केलेलीं असतात. यावर कठीण पारदर्शक झिलईचें (Glaze) रोंगण (Coating) दिलेलें असतें. प्राचीन काळापासून हीं भांडीं चीन देशांत प्रथम तयार करण्यांत आलीं; यावरून या भांड्यांस 'चायना' (China) असेंहि म्हणतात. इ. स. १३६८-१६४४ या काळांत मिंग घराणें चालू असतां हीं भांडीं चीनमध्यें पूर्णावस्थेस जाऊन पोचलीं होतीं.

जपानमध्येंहि हीं भांडीं कित्येक शतकें तयार करण्यांत येत आहेत. युरोपमध्यें मात्र सतराव्या शतकापर्यंत हीं भांडीं तयार करण्याची कला लोकांस माहीत नव्हती. अमेरिकेंतील फिलाडेल्फियामध्यें इ. स. १८२५ सालीं हीं भांडीं प्रथम तयार करण्यांत आलीं.

पोरस (खि. पू. ३२७):—हा मध्य पंजाबचा राजा होता. सिकंदरची हिंदुस्थानावर स्वारी आली तेव्हां हा राज्य करीत होता. तक्षशिलेचा आम्भी ऊर्फ आम्फिस व इतर क्षुद्र राजे आपण होऊन सिकंदरच्या स्वाधीन झाले. पण हा तसा राजा नव्हता. सिकंदर झेलम नदी उतरून आल्यावर त्यानें याला नजराणा घेऊन येण्याचा निरोप धाडला. पण यानें 'सेना घेऊन येतों' म्हणून उलट कळविलें. याची सेनाहि मोठी व व्यवस्थित होती. याच्या सैन्याचे मोर्चे झेलमच्या किनाऱ्यावर लागले. सिकंदरनें सर्व धोरण पाहून अनीतीचा अवलंब केला. एका अंधाऱ्या रात्रीं पाऊस पडत असतां आपल्या छावणीपासून १६ मैलांवर झेलम ओलांडली. रात्रींची वेळ असल्यामुळें पोरसचें सैन्य गैरसावध होतें. तरी याला बातमी कळतांच यानें आपल्या मुलाला दोन हजार सैन्यासह सिकंदरला अडविण्यास पाठविलें, पण सिकंदरच्या सैन्यानें त्याचा सहज पराभव केला. पांचशे ठार झाले व बाकीचे पळाले. पोरसला हें कळतांच हा आपल्या विशाल सैन्यासह पुढें झाला व तुंबळ युद्ध झालें. पण शेवटीं सिकंदरचा जय झाला व हजारों लोकांसह याला कैद करण्यांत आलें. कैद केल्यावर जेव्हां याला सिकंदराच्या पुढें उभें केलें, तेव्हां सिकंदर म्हणाला, 'तुझ्याशीं आम्ही कसें वागावें ?' पोरसनें निर्भयपणें उत्तर दिलें, 'राजे राजाशीं वागतात तसें.' या उत्तरानें सिकंदराचा पोरसाबद्दल अत्यंत अनुकूल ग्रह झाला. सिकंदरनें यालाच पुनः जिंकलेल्या राज्याचा अधिकारी नेमले व इतरहि भोंवतालचीं राज्यें याच्या अधिकारांत दिलीं. यामुळें या दोघा पुरुषांची मैत्री दृढ झाली व सिकंदराला एक मोठा सहाय्यक मिळाला. सिकंदर हिंदुस्थानांतून परत जातांना त्यानें यास व्यास नदीपासून झेलम नदीपर्यंतच्या प्रदेशाचा क्षेत्रप नेमलें. हा मोठा लोकप्रिय होता. याचा पुढें खून झाला.

पोलंडः—युरोपांतील स्वतंत्र राष्ट्र. आजच्या पोलंडच्या अस्तित्वाचें व स्वातंत्र्याचें कारण गेलें महायुद्ध होय. अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत पोलंड वैभवाच्या शिखरावर होतें. त्यावेळीं त्याचा विस्तार आजच्या दुप्पट होता. घरच्या सरदारांचीं सत्तेकरितां भांडणें व शेजाऱ्यांची लांडगेतोड यामुळें पोलंडच्या स्वातंत्र्याचे दिवस भरले. १७७२, १७९३ व १७९४-९५ मध्यें पोलंडचे तुकडे होऊन तो ऑस्ट्रिया, जर्मनी व रशिया यांच्या भक्ष्यस्थानीं पडला, पण महायुद्धांत जर्मनीचा पाडाव झाल्यानें व रशियामध्यें कम्यूनिस्ट पार्टीचा उदय झाल्यानें, दोस्त राष्ट्रांच्या सहाय्यानें पोल लोकांनीं स्वदेशाची घडी कशी तरी बसवून पूर्वीच्या निम्मा का होईना स्वतंत्र देश निर्माण केला. याचें बरेंच श्रेय जनरल पिल्सुडस्की व जॅन पॅडेऱ्यूस्की यांस आहे. यांच्याच श्रमामुळें १९२१ सालीं पोलंड संपूर्ण लोकसत्ताक राज्य बनलें.

स्थान—पोलंड मध्ययुरोपांत आहे. हें उत्तरअक्षांश ४८ ते ५६ व पूर्वरेखांश १६ ते २० यांत वसलेलें आहे. याच्या उत्तरेस बाल्टिक समुद्र, स्वतंत्र डॅन्झिग शहर, पूर्व प्रशिया व लिथुआनिया, पूर्वेस रशिया व यूक्रेन, दक्षिणेस पूर्वीचा झेकोस्लाव्हिया व रुमानिया व पश्चिमेस जर्मनी हीं राष्ट्रें आहेत. पश्चिमेस व पूर्वेस नैसर्गिक मर्यादा कांहींच नसल्यानें सरहद्दीच्या संरक्षणार्थ पोल सैन्याला नेहमीं सुसज्ज राहावें लागतें.

पोलंडला समुद्रकिनारा नाहीं; पण व्हर्सायच्या तहानें पोलंडच्या वायव्येस असलेली सुमारें पन्नास मैल रुंदीची जर्मनीची किनारपट्टी पोलंडला देण्यांत आली. यामुळें पोलंडला बाल्टिक समुद्रांत जाण्यास वाव मिळाला. या किनारपट्टीस 'डॅन्झिग कॉरिडॉर' असें म्हणतात. ही किनारपट्टी व डॅन्झिग हें शहर परत आपल्या ताब्यांत मिळालें पाहिजे म्हणून हर हिटलरनें धाकदपटशा दाखवून त्यालाहि जेव्हां पोलंडनें भीक घातली नाहीं तेव्हां त्याचसाठीं हिटलरनें ऑगस्ट १९३९ महिन्याच्या शेवटच्या १–२ दिवसांत पोलंडविरुद्ध लढाई सुरू केली. या किनारपट्टीवर राष्ट्रसंघाची सत्ता चालते. डॅन्झिग हेंहि राष्ट्रसंघाच्याच ताब्यांत असलें तरी तें एका स्वतंत्र कमिशनरच्या हातीं होतें. पण कांहीं व्यापारी हक्क पोलंडकडे असल्यामुळें या शहराच्या रक्षणार्थ पोलंड दर आठवड्यास हजारो रुपये खर्च करीत आलें आहे. डॅन्झिगच्या वायव्येस १९३२ सालीं ग्डिनिया नांवाचें स्वतंत्र बंदर पोलंडनें बांधलें आहे. पोलंडचा सर्व व्यापार या दोन बंदरांतूनच चालतो. व्हिश्चुला ही

प्रमुख व राष्ट्रीय नदी मानतात. याशिवाय वर्टा, नोस्टर, नीमेन, वीपर व मेमेल या नद्या आहेत. या सर्व उथळ असून त्यांना पूर आले म्हणजे त्यांच्या गाळानें जमीन सुपीक बनते.

पोलंडची आज लोकसंख्या ३४,५००,००० इतकी असून बजेट १९३८–३९ सालचें १००,०००,००० पौंड इतकें होतें. हें बजेट म्हणजे न्यूयॉर्क कॉर्पोरेशनच्या बजेट एवढेंच आहे. प्रत्येक पोलचें वार्षिक उत्पन्न प्रत्येक इंग्लिश मनुष्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या ३४ टक्के इतकें आहे. पोलंडचें आजचें लष्कर १८,००० ऑफिसर्स व २४८,११० सैनिक यांचें आहे. एकूण लढाईसाठीं सज्ज असें १२००००० सैन्य तयार आहे. २० ते ५० वर्षांपर्यंतचा प्रत्येक मनुष्य सैनिक होण्याच्या लायकीचा समजला जातो. याशिवाय अबकारी व सरहद्दीवरील सैन्य २६, ३०६ लोकांचें आहे. ७ ० लढाऊ विमानें व १००० पायलट व १२०० ऑफिसर्स आहेत. आरमार ८,५०० टनांचे (Tonnage) असून त्यांत क्रूझर्स व पाणबुड्या आहेत. दोन वर्षें लष्करी नोकरी सक्तीची आहे.

हवामान–उत्तरेस हवा बरीच थंड असते, गॅलिशियांत उत्तरेकडील थंड वारे वाहतात. हिंवाळ्यांत बर्फ फार थोडें पडतें. उत्तर भाग मात्र डिसेंबर ते मार्च पर्यंत बर्फाच्छादित असतो. पश्चिम व दक्षिण भागीं उत्तर व पूर्व भागापेक्षां हवा आल्हाददायक व उत्साहवर्धक असते.

वनस्पती व प्राणी–पोलंडमध्यें सर्व प्रकारची वनस्पती विपुल आहे. दक्षिणेस कार्पेथियनच्या उतारावर ओक, अॅश, एल्म, पॉपलर, रेडवुड, व्हाइटवुड इत्यादींचे वृक्ष असून मध्यभागीं पाइनचीं जंगलें आहेत. दक्षिणेकडील पठारावर कुरणें पुष्कळ असून त्यावर गुरांची व मेंढरांची जोपासना करतात. पोलंडमध्यें दर चार माणसांस एक गाय असें प्रमाण पडतें. अरण्यांतील इमारतीचें लाकूड ही पोलंडची राष्ट्रीय संपत्ती मानतात. अरण्यांतून गवे, रानडुकरें, हरणें, लांडगे, पिंगट अस्वलें हे प्राणी असून सर्वत्र घोडे, गाई व डुकरें हीं जनावरें आहेत.

खनिज संपत्ति–गॅलिशिया प्रांतांत खनिज संपत्ती विपुल आहे. येथें पेट्रोलियम व मिठाच्या खाणी आहेत. याच प्रांतांतील ' सॉल्ट सिटी ' हें शहर प्रख्यात आहे. सायलेशियाच्या उत्तर भागांत, कोळसा, लोखंड व जस्त यांच्या पुष्कळ खाणी आहेत. तसेच रुपें, शिसें व तांबेंहि थोडें सांपडतें. हा सायलेशिया प्रांत पूर्वी जर्मनीच्या ताब्यांत होता. तो राष्ट्रसंघानें पोलंडला दिलेला आहे.

उद्योगधंदे–पोलंड हा देश अति प्राचीन काळापासून शेतिप्रधान आहे. शेंकडा ६॥ लोक शेतींत गुंतलेले आहेत. जमिनीपैकीं शेंकडा ४८·५ इतकी जमीन शेतीकडे, १७·२ इतकी कुरणें व २४·४ इतकी अरण्यें व जंगलांनीं युक्त आहे. सर्वांत मोठें पीक राय अथवा जवाचें असून गहूं, सातू, बाजरी, मका हीं धान्यें, बीट, बटाटे, तंबाखू हे जिन्नस व गवताचा व्यापारहि चालतो. हॉपन बटाट्यापासून दारू गाळणें, बीटपासून साखर; ताग व अंबाडी यांपासून कापड व कॅन्व्हस तयार करतात. दरसाल तीन कोटी बुशेल इतके बटाटे व तीन लाख टन साखर पोलंडमध्यें उत्पन्न होते. याशिवाय इमारतीचें लाकूड, लाकडाचे इतर जिन्नस, बूटपॉलिश, कातडी सामान इत्यादींचे कारखाने आहेत. पोलंडचा व्यापार मुख्यतः इंग्लंड, जर्मनी व रशियाशीं चालतो. जस्त, कापड, दूधदुभत्याचे पदार्थ व पेट्रोल, इमारतीचें लाकूड, कोळसा हे जिन्नस निर्यात होतात व यंत्रें, कापूस, रासायनिक द्रव्यें व लोंकर हे जिन्नस आयात होतात.

लोक व त्यांची राहाणी–पोल लोक मूळचे स्लाव जातीचे आहेत. शुद्ध पोल लोक फक्त व्हिस्चुला व पोसेन या नद्यांच्या मध्यभागच्या प्रदेशांत आढळून येतात. पूर्वेकडे व पश्चिमेकडे नैसर्गिक अडथळे नसल्यानें पश्चिमेकडून जर्मन व पूर्वेकडून रशियन लोकांच्या चढाईमुळें पोल लोकांत जर्मन, रशियन, रुथेनिअन, लिथुॲनिअन व ज्यू लोकांच्या रक्तांचें मिश्रण झाल्याचें दिसतें. त्यांची राहणी, पोषाख व भाषा हीं निरनिराळ्या ठिकाणीं भिन्नभिन्न असल्याचें आढळतें. इतरापेक्षां जर्मन संस्कृतीची छाप त्यांचेवर अधिक बसल्याचें दिसून येतें.

पोल मनुष्य दिसण्यांत चपळ, अंगानें किंचित् गिड्डा व सडपातळ, उभट चेहऱ्याचा, लांब सरळ नाकाचा, पाणीदार निळसर डोळ्याचा, गोऱ्या रंगाचा व उद्योगी वृत्तीचा आहे असें त्याजकडे पाहतांच दिसून येतें. सर्व प्रकारच्या कला व सर्व प्रकारच्या शास्त्रांकडे त्यांचा कल असून देशांत प्रसिद्ध कवि, चितारी, लेखक, शास्त्रज्ञ, गवई व तत्त्ववेत्ते होऊन


(१)


(२)

पोलंड– १ पोलिश खेडें. २ नॉव (Nowe) शहरांतील प्रख्यात चर्च.

गेले आहेत. सर्व बाबतींत स्त्रिया पुरुषांशीं स्पर्धा करूं शकतात. लोकांचे अंगांत चिकाटी, काबाडकष्ट करण्याची वृत्ती व कलाकौशल्याची आवड असे फार मोठे गुण आहेत.

पोल लोकांचे पाय खड्डयांत ओढण्याची आणखी एक परिस्थिति पोलंडांत आहे. ती म्हणजे तेथील अल्पसंख्यांकांचा प्रश्न. या अल्पसंख्यांकांत सुमारें पन्नास लाख रुथेनिअन्स, पंचवीस लाख ज्यू, पंधरा लाख रशिअन, सहासात लाख जर्मन व पन्नास हजार लुथिॲनिअन आहेत. पोलंड आपणांस आपले राजकीय हक्क देत नाहीं, राज्ययंत्रांत आपलें प्रमाण फार अल्प आहे, बहुसंख्यांकांच्या मतामुळें आपले हक्क भरडले जात

आहेत वगैरे त्यांच्या अनेक तक्रारी आहेत. यांसही पोल लोकांना स्वतंत्र तोंड द्यावें लागलें. पोलिश लोकांनीं अत्यंत कौशल्यानें अल्पसंख्यकांचे प्रश्न सोडविण्यास सुरवात केली आहे. त्यांचेकरतां स्वतंत्र शाळा, स्वतंत्र भाषा व राजकीय यंत्रांत अधिकाधिक हात व हक्क देऊन तक्रारी कमी करून, राष्ट्रीय प्रगती झपाट्यानें चालविली आहे, ती इतकी कीं, गेल्या वीस वर्षांतील त्यांची शैक्षणिक प्रगती व्यापाराची वाढ व लष्करी तयारी पाहून युरोपखंडांतील बाकीचीं राष्ट्रें पोलंडबरोबर सख्य करून, तह करून, औद्योगिक योजनांचे करार करून बरोबरीच्या नात्यानें वागूं लागलीं आहेत. एका काळीं जर्मन व रशियन राक्षसांनीं पालथा घालून तुडविलेला पोलंड, आज ताठ उभा राहून, छाती पुढें करून त्याच जर्मन राष्ट्राशीं दोन हात करण्यास तयार झाला आहे.

धर्म–पोलंडमधील बहुसंख्यांकांचा धर्म रोमन कॅथॉलिक आहे. राष्ट्रीय चर्च असें येथें नाहीं. सर्व धर्मीयांस सारखेंच वागविण्यांत येतें. शेकडा ६९·२ रोमन कॅथॉलिक पंथाचे, १२ ग्रीक कॅथॉलिक, ११ ज्यू व बाकीचे प्रॉटेस्टंट पंथाचे आहेत. सर्व धार्मिक चालीरीति रोमन कॅथॉलिकपंथीयांच्याप्रमाणेंच आहेत.

शिक्षण–येथें प्राथमिक शिक्षण मोफत सक्तीचें आहे. क्रॅको, पोझेन, लब्लिन्, वॉरसा व लेंबर्ग या शहरीं प्रत्येकीं एकेक याप्रमाणें पांच विश्वविद्यालयें आहेत. यांत २५ हजाराचे वर विद्यार्थी असून त्यांपैकीं पांच हजाराहून अधिक विद्यार्थिनी आहेत. शिक्षकांकरतां सुमारें पावणेदोनशे ट्रेनिंग कॉलेजें असून सुमारे पांचशे शास्त्रीय शिक्षणाच्या शाळा आहेत. क्राको येथें मुख्य शास्त्रीय शिक्षणाची संस्था असून दोन शेतकी कॉलेजें, एक फॉरेस्ट स्कूल, एक मायनिंग कॉलेज, दोन गुरांच्या वैद्यक शिक्षणाचीं कॉलेजेंहि आहेत. प्राथमिक शाळांतून सुमारें बारा लाख मुलें व दुय्यम शाळांतून सुमारें दोन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

राज्यव्यवस्था–पोलंडच्या आजच्या लोकसत्ताक राज्याची स्थापना ८ एप्रिल १९२१ रोजीं झाली. या घटनेप्रमाणें सैनिक व सरकारी नोकरांखेरीज सर्वांना मतदानाचा हक्क देण्यांत आला. मुख्य राष्ट्रीय सभेस सेजम् अथवा पार्लमेंट असें म्हणतात. याचें सीनेट अथवा वरिष्ठ मंडळ व डायेट अथवा कनिष्ठ मंडळ असे दोन विभाग आहेत. देशाचे मतदानदृष्ट्या ६४ प्रांत केले असून त्यांतून वरिष्ठ मंडळांत १११ सभासद व कनिष्ठ मंडळांत ४४४ सभासद लोक निवडून देतात. पार्लमेंटचा मुख्य अध्यक्ष असतो. त्यास मदत करण्यास एक प्रधानमंडळ असतें. प्रत्येक प्रधानाकडे एक एक खातें सोंपविलेलें असतें. अध्यक्षाची जागा सात वर्षांची असते. कोणाहि ४१ वर्षांच्या अगर त्याहून मोठ्या पोल गृहस्थास अध्यक्ष होतां येतें. त्याला तह करणें, शांततेचे काळांत सैन्याचे मुख्य म्हणून त्याचें नियंत्रण करणें, पार्लमेंट बोलावणें, उघडणें, बैठक पुढें ढकलणें व सभागृह बंद करणें हे हक्क आहेत.

जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याकरतां व चलनाला स्थैर्य आणण्याकरतां १९२४ च्या मार्चमध्यें एम् ग्रब्स्की या मुख्य प्रधानानें सोन्याचे लोटी (Zloty) नांवाचें नाणें व सरकारी नोटांचें चलन सुरूं केलें. ४३·३८ लोटीची किंमत एक पौंड होते. रुबल हेंहि सोन्याचें नाणें चालू आहे. सरकार दरबारांत मेट्रिक पद्धतीचीं मापें व खासगी उपयोगांत पोलिश मापें प्रचलित आहेत.

भाषा व वाङ्मय–पोल लोकांची भाषा पोलिश आहे. हिचें रोमन अथवा लॅटिन भाषेपेक्षां रशियन भाषेशीं अधिक सम्य आहे. इंडोयुरोपिअन भाषेंपैकीं स्लाव्हिक शाखेशीं इचें बरेंच साम्य आहे. दोन कोटी लोक ही भाषा बोलतात. बाकीचे जर्मन व रशियन भाषा बोलतात.

वाङ्मय–पोलंडचें जुनें वाङ्मय लॅटिन भाषेंत लिहिलें आहे. मार्गरेट राणीचा स्तोत्रसंग्रह हा पोलिश भाषेंतील पहिला ग्रंथ (१४ वें शतक). झारोजपाटकचें बायबल हें पोलिश वाङ्मयाचें दुसरें स्मारक (१४५५). १९१५ सालीं पोलिश भाषेंमधील पुस्तकें प्रथम छापलीं गेलीं. १५४८ ते १६०६ या काळास पोल लोक सुवर्णयुग म्हणतात. या कालांत प्रॉटेस्टंट धर्माचा काव्यांतून व चरित्रांतून बराच प्रसार झाला. जॉन कोचानोस्की १५३०–८४ यास पोलिश कविराज म्हणत. कारण याचें सर्व कुटुंब वाङ्मयभक्त होतें. मार्टिन कोमर यानें (१५१२–८९) पोलंडचा इतिहास व वर्णन लिहिलें. हा इतिहास फार महत्वाचा आहे. सतराव्या शतकापासून पोलिश वाङ्मयास उतरती कळा लागली. जेसुइट लोकांनीं क्षुद्र प्रकारचा



पोलंड– पूर्व गॅलिशियांतील एका शेतकऱ्याची मुलगी.

अभ्यासक्रम सुरू केल्यामुळें मिश्र भाषेच्या काळास सुरवात झाली. १८व्या शतकापासून राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाली; पण त्याचा परिणाम इष्ट असा वाङ्मयावर झाला नाहीं. जुलिअन उर्सिन हा फार लोकप्रिय कवि होऊन गेला. लिंडे यानें एक पोलिश कोश तयार केला आहे. या काळांत फ्रेंच भाषेचें वर्चस्व झाल्यानें पोलिश भाषेची स्थिति समाधानकारक झाली. फ्रीडो यानें आनंदपर्यवसायी नाटकें लिहिलीं, मॅटेकी यानें पोलिश वाङ्मयाचा इतिहास व पोलिश व्याकरण लिहिलें आहे. एलिझा ओर्झेस्को ही लोकप्रिय अर्वाचीन लेखिका आहे. हेनरिक रीएन किएविझ या ऐतिहासिक कादंबरीकाराची कीर्ती सर्व युरोपभर झाली आहे.


त्रोटक इतिहास–पोल लोकांचें पहिलें ऐतिहासिक नांव पोलानी असें आहे. हे व्हिस्चुला आणि ओडर यांचे मध्यें राहत असत. पहिल्या मियेसीझलॉचे (९६२–९९२) कारकीर्दीपर्यंत देशाचे लहानलहान भाग होते. हा पियस्ट घराण्यांतील होता. त्यानें आपला धर्म सोडून ख्रिश्चन धर्म स्वीकारला. पुढील राजांच्या कारकीर्दीत जर्मनी, प्रशियन, ट्युटॉनिक व रशियन लोकांशीं युद्धें झालीं. १२४० व १२४१ सालीं मोंगलांनीं स्वाऱ्या केल्यानें देश डबघाईस आला. देशांतहि सरदारांसरदारांमध्यें लढाया सुरू झाल्या. पण पहिल्या लॅडिसलनें (१३०६–१३३३) सर्व देश एकत्रित करून राज्य केलें. पियस्ट घराण्याचा शेवटचा राजा कॅसिमीर याचे कारकीर्दींत तर पोलंडची फार मोठी भरभराट झाली. त्याच्यानंतर हंगेरीचा राजा लुइ, कॅसीमीरचा पुतण्या गादीवर आला. १३८४ त त्याची मुलगी राणी झाली. तिनें लुथिआनियाचें राजपुत्राशीं–जॅगेल्लोशीं–लग्न केलें व जॅगेलॉन घराण्याची स्थापना केली. हें घराणें १३८६ पासून १५७२ पर्यंत अस्तित्वांत होतें व या काळांत पोलंडची कमालीची प्रगती होऊन पोलंड एक बलिष्ठ राष्ट्र बनलें. सिगिस्मंड हा या घराण्यांतील पहिला पुरुष होता. त्यानें पोलंडचें

वैभव कळसास नेऊन पोचविलें. १५७२ त जॅगॅलॉन घराण्यांत पुरुष वारस कोणी राहिला नाहीं. म्हणून राजसत्ता निवडणुकीच्या तत्त्वाप्रमाणें तिसऱ्या सिगिस्मंडकडे आली. त्याच्यानंतर चौथा लॅडिसलॅस (१६३२-१६४८), जॉन कॅसिमीर (१६४८–६९), तिसरा जॉन सोब्रियेस्की हे राजे राज्यावर आले. याच्यानंतर पहिला ऑगस्टस व रशियाचा बारावा चार्ल्स यांची लढाई झाली. तिसऱ्या ऑगस्टसच्या कारकीर्दींत (१७३३–१७६३) तर आपापसांतील भांडणांमुळें देश अगदीं हातटेकीस आला.

यानंतरचा राजा स्टॅनिलस ऑगस्टस (१७६४–९५) अगदीं निसत्त्वी असल्यानें पोलंडची विभागणी पहिल्यांदा झाली. प्रशिया, रशिया व ऑस्ट्रियानें पोलंडचे अनुक्रमें १३४१५ चौ. मैलाचा पश्चिम प्रशिया, २७००० चौ. मैलाचा गॅलिशिया व लोडोमेरिआ व ४२००० चौ. मैलाचा लिथुआनिया असे भाग हरण केले. राहिलेला पोलंडहि रशियाच्या नियंत्रणाखालीं आला. १७९३ त आणखी पुनः विभागणी होऊन रशियाला ९७००० चौ. मैल व प्रशियाला २२५०० चौ. मैलाएवढाले प्रांत मिळाले. कोस्सिअस्कोचे नेतृत्वाखालीं देशभक्तांनीं उचल खाल्ली; पण त्याचा रशियन व प्रशियनांनीं पराजय केला व १७९४ सालीं १८००० चौ. मैल, ऑस्ट्रीयाला ४५००० चौ. मैल रशियाला, २१००० चौ. मैलाचें क्षेत्र प्रशियाला द्यावें लागलें. पोलंडचा राजा रशियन दरबारचा पेन्शर बनला. पोल लोकांनीं नेपोलिअनशीं संगनमत केलें व आपलें स्वातंत्र्य तो आपणास मिळवून देईल म्हणून त्यांनीं त्याला अफाट सैन्याची पुरवणी केली; पण नेपोलिअन कांहींहि करूं शकला नाहीं. उलट १८१२ च्या रशियाच्या स्वारींत वॉरसॉची सरदारकीहि नष्ट पावली. फ्रेंच राज्यक्रांतीच्या दुसऱ्या दिवशीं पोल लोकांनीं रशियन राजाच्याविरुद्ध बंड केलें व त्यामुळें सर्वच पोलंड रशियाच्या आयता घशांत पडला.

महायुद्धकालीं पोलंडचा ऑस्ट्रिया, प्रशिया व रशियांतील बराच भाग उध्वस्त झाला. ३०० शहरें व २० हजार खेडीं नाश पावलीं. पोलिश लोकांनीं चिकाटीनें दोस्त राष्ट्रास मदत केली म्हणून शांततापरिषदेनें पोलंडचा हल्लीं असलेला भाग त्यास परत देवविला व पोलंड हें स्वतंत्र राष्ट्र निर्माण केलें. १९२० सालीं नवी राज्यघटना अस्तित्वांत आली. पोलंडनें फ्रान्स व इतर लहान लहान देशांशीं तह करून राजकीय स्थिरता मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. पण १९३४ सालीं जर्मनीशीं दशवार्षिक मुदतीचा व्यापारविषयक तह करून एकमेकांनीं एकमेकांवर चढाई करावयाची नाहीं असें ठरविल्यानें फ्रान्स व इतर राष्ट्रांबरोबर केलेल्या तहांत कांहीं अर्थ नाहीं असें कांहींचें मत झालें. पण १९३५ पासून हर हिटलरनें (जर्मनीचा डिक्टेटर) डॅन्झिगचा प्रश्न उकरून काढून पोलंडशीं मित्रत्वाचे संबंध दुरावले. १९३५ सालींच पोलंड या धोक्याबद्दल वेळींच जागें झालें व तेव्हांपासून पोलंडनें सैन्याची व स्वसंरक्षणाची सिद्धता केली आणि केवळ यामुळेंच हिटलर प्रथम पोलंडकडे वळला नाहीं. पण १९३९ च्या मे पासून हिटलरनें डॅन्झिगची मागणी जोरजोरानें करण्यास सुरवात केली व इंग्लंड व फ्रान्स या पोलंडच्या मित्रराष्ट्रांच्या मुख्य प्रधानांच्या वाटाघाटीनें हा प्रश्न सोडविण्याच्या विनंतीला हिटलरनें धुडकावून लावलें आणि अखेर युद्ध सुरू झालें. ७ सप्टेंबर १९३९ लाच वॉर्सा या पोलंडच्या राजधानीवर वारंवार बॉम्बफेक झाल्यानें पोलंडनें आपली राजधानी बदलली. ३ सप्टेंबरला इंग्लंडनें व त्याच वेळीं फ्रान्सनें पोलंडच्या बाजूनें जर्मनीविरुद्ध युद्धांत उघड भाग घेतला आहे. आतां युद्धाला सुरवात झाल्यानंतर काय काय घडामोडी होऊन रशिया, इटली, अमेरिका व खुद्द युरोपांतील इतर लहान राष्ट्रें कोणत्या बाजू घेतील व या युद्धाला केवढें भयानक स्वरूप येईल याची कल्पना करतां येणार नाहीं.

पोलाद:--पोलाद म्हणजे कार्बनयुक्त असें विशिष्ट गुणधर्म असलेलें लोखंड; परंतु त्यांतील कार्बनचें प्रमाण रॉट आयर्न (Wrought iron) पासून कास्ट (Cast Iron) पर्यंत वाढत जातें. रॉट आयर्नमध्यें कार्बन शेकडा ०·२ आढळतो; तर कास्ट आयर्नमध्यें त्याचें प्रमाण शेकडा ५ प्रमाणें असूं शकेल. या दोन टोकांच्या दरम्यान पोलादाचें स्वरूप निश्चयानें अनिश्चित असतें. लोह व कार्बन या दोन महत्त्वाच्या घटकांशिवाय पोलादामध्यें सिलिकॉन (सिक नांवाचें अधातु मूलद्रव्य), फॉस्फरस (स्फुर नांवाचें अधातुरूप मूलतत्त्व) मँगनीज ('मंगल' हें मूलद्रव्य) व सल्फर (गंधक) हीं द्रव्येंहि आढळून येतात. हत्यारें व स्प्रिंग्ज यांसारख्या अनेक वस्तू बनविण्याच्या कामीं कठीण पोलादाचा




पोलंड–(१) लोविझ या शहरांतील रस्त्यावरून चाललेली शेतकऱ्यांच्या मुलींची एक वार्षिक मिरवणूक. या मुलींचे कपडे व त्यांनीं हातीं घेतलेलीं निशाणें यांचे मनोहारी विविधरंग हें या मिरवणुकाचें वैशिष्ट्य मानतात. (२) विवाहाच्या वेळचें नृत्य. चित्राच्या मध्यभागीं केवळ फुलांचें शिरस्त्राण घातलेली वधू आहे. (३) क्राको या शहराशेजारचे हे दोन तरुण शेतकरी आहेत. या चित्रावरून पोलिश लोकांचा बांधा व पोषाख यांची कल्पना येईल.

उपयोग करण्यांत येतो; त्यांतील कार्बनचें प्रमाण शेकडा ०·४ पासून १·३ पर्यंत बदलत असतें. कार्बनचें प्रमाण जितकें अधिक तितका कठीणपणा, कणखरपणा व धारणाशक्ति अधिक, जितका कठीणपणा अधिक तितका तितका लवचिकपणा कमी. १ मृदु (mild) पोलादांत कार्बनचें प्रमाण ०·१ पासून ०·४ पर्यंत असतें; तापवून लाल झालेल्या मृदु पोलदाला वाटेल तो आकार देतां येतो. मृदु पोलाद चकचकीत असतें व त्याचा रंग करडा असतो. तें कणाकणांचें बनलेलें असतें. त्याचें विशिष्ट गुरुत्व ७·६ पासून ७·८ पर्यंत असतें.

पोलो:- (इतिहास) सध्यां सर्वत्र लोकप्रिय झालेला पोलोचा खेळ प्रथम कोणत्या देशांत जन्म पावला व पुढें त्याचा जगभर कसा प्रसार झाला, हा मनोरंजक इतिहास अर्ल किम्बर्ले यांनीं संपादन केलेल्या पोलो नामक एका पुस्तकांत दिला आहे.

या पुस्तकावरून असें दिसतें कीं, पोलोच्या खेळाचा जन्म प्रथम पर्शियामध्यें झाला. पर्शियन वाङ्मयामध्यें पोलोच्या खेळाचे जे उल्लेख आले आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं, ख्रिस्तपूर्व ५२५ वर्षांपूर्वीं पोलोचा खेळ पर्शियामध्यें प्रचलित होता. यावरून या खेळाचें प्राचीनत्व दिसून येईल. ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकापासून तर पोलोच्या खेळाबाबतचे अनेक ऐतिहासिक उल्लेख उपलब्ध आहेत.

अकराव्या शतकांत होऊन गेलेल्या प्रसिद्ध कवि फिर्दोसीनें आपल्या शाहनामा या विख्यात ग्रंथांत आंतरराष्ट्रीय पोलो–सामन्याचें वर्णन दिलें आहे. तेंच पोलोच्या सामन्याचें पहिलें उपलब्ध लिखित वर्णन होय! या सामन्यांतील नायक हा एका राजाचा बाप होता. ख्रिस्तपूर्व सात शतकें इतक्या कालापूर्वीपासून हा राजा ही पर्शियन इतिहासांतील एक प्रसिद्ध व्यक्ति म्हणून सर्वश्रुत आहे.



१ खेळाडू, २ घोडा, ३ चेंडू (पोलो बॉल , ४ पटांगणाच्या सीमा दाखविणारा कठडा, ५ पोलो स्टिक, ६ गोल (लोण)

पोलोचा जन्म जरी अशा रीतीनें पर्शियामध्यें झाला, तरी त्याचें संवर्धन मात्र आशियामध्यें झालें आहे. पोलो हें नांवच मुळीं तिबेटीयन शब्दापासून या खेळास प्राप्त झालें आहे. तिबेटीयन भाषेंत पोलो या शब्दाचा अर्थ चेंडू असा आहे.


दमास्कसच्या रहिवाशांच्या मुंडक्या पोलोच्या खेळासाठीं चेंडूसारख्या उपयोग करून तेमूरनें त्या प्रजाजनांवर सूड उगविल्याची कथा इतिहासांत नमूद आहे. हिंदुस्थानांत अकबर बादशहाला पोलोच्या खेळाची फार आवड होती असें म्हणतात. रात्रीच्या वेळीं विद्युत् कंदुक घेऊन अकबर पोलो खेळत असे असें म्हणतात.

पोलो, मार्को (१२५४–१३२४):—हा व्हेनीशीयन प्रवासी थोर व्यापारी कुलांत जन्मला. तो आपला बाप व चुलता यांचेबरोबर १२७१ मध्यें चीनला गेला. त्या देशाला त्याचे वडील व चुलता १२६० सालीं जाऊन आलेच होते. इराण, पश्चिम आशीया, तार्तरी हे देश ओलांडून गोबीच्या शेवटीं १२५७ सालीं शांगटू या शहरांत आले. प्रवासांत त्यानें जो प्रदेश पाहिला तो युरोपीयनांना आधुनिक कालापर्यंत अज्ञात होता. शांगटू (Shang-tu) येथें ते बड्या खानाला (The Great Khan) भेटले; खानाला मार्कोबद्दल विशेष प्रेम वाटून त्यानें त्याला पदव्या दिल्या व दरबारी अधिकाराची जागाहि दिली.

तीन वर्षेंपर्यंत मार्को यांगचौ (Yanchow) या शहराचा सुभेदार (Governor) होता. हिंदुस्थान व चीनचे दुसरे भाग इकडे वेगवेगळ्या प्रकारच्या राजकीय कामगिरीवर (on political missions) त्याची नेमणूक झाली. पोलोनें युरोपला परत जाण्याची आपली इच्छा दर्शविली, परंतु खान त्यांना जाऊं देईना. परंतु १२९२ सालीं एका मोगल राजकन्येला इराणच्या शहाची नवरी म्हणून इराणांत पोहोचविण्याकरितां वकील व लवाजमा जाणार होता; त्याजबरोबर जाण्याची पोलोमंडळीना परवानगी मिळाली. इच्छित स्थळीं जावयाला त्यांना दोन वर्षें लागलीं. त्या मुदतींत बरोबरच्या परिवारांतील पुष्कळशीं माणसें मृत्युमुखीं पडलीं. व्हेनीसच्या या प्रवाशांनीं काळजी घेतल्यामुळेंच ती राजकन्या सुखरूपपणें इराणला पोहोंचली. तिला नियोजित वराच्या स्वाधीन करण्यांत आलें. पोलो मंडळी व्हेनीसला १२९५ पर्यंत पोहोंचले नाहींत. पुढें तीन वर्षांनीं जेनोआच्या लोकांबरोबर (Genoese) लढत असतां मार्को शत्रूच्या हातीं सांपडला. त्याला कैद करण्यांत आलें. कैदेंत असतां त्यानें पिसा येथील रस्टिसियानो (Rusticiano) या आपल्याबरोबरच्या एका कैद्याला आपली हकीगत फ्रेंच भाषेंत सांगितली. त्यानें ती मार्को पोलोचें पुस्तक म्हणून पुढें प्रसिद्ध केली. या पुस्तकाचीं अनेक भाषांतून भाषांतरें झालीं आहेत.

पोहणें:—एक उत्कृष्ट व्यायाम प्रकार. कोणतेंहि कृत्रिम साधन न घेतां हा व्यायाम घेतां येतो. पोहतांना पाण्यांत शरीराच्या सर्व अवयवांस व्यायाम मिळतो. सर्व अवयवांस व्यायाम मिळणारा असा हा एकच व्यायाम आहे. हातानें व छातीनें पाणी कापावें लागतें यामुळें हाताचे स्नायू भरदार बनतात व छाती तयार होते. आगबोटींत पंख्याचे (Propellor) जें बोटीला गति देण्याचें काम असतें तें काम पाय करतात व त्यामुळें पायांचें स्नायूहि बळकट बनतात. शिवाय पाय पोटाकडे घेणें व पुन्हां ताणणें या क्रियेनें कमरेसहि चांगला व्यायाम मिळतो. पोहण्यानें सर्व अवयव सारख्या प्रमाणांत तयार होत जातात, हें या व्यायामाचें वैशिष्ट्य आहे.

साष्टांग नमस्कार घातल्यानंतर म्हणजे जमिनीवर डोकें टेकलें असतांना आपलें शरीर जसें असतें त्यापेक्षां मान वर व हात पुढें जोडलेले हा पोहण्यांतील पहिला पवित्रा समजावा. नंतर हाताचे तळवे पालथे घालून पोटाकडे खालीं पाण्यांत तिरकस हात ओढावेत व छातीखालून समोर काढून घेऊन पुन्हां पहिल्या-



पोहण्याच्या निरनिराळ्या पद्धती

१ सुरकांडी. २ समोर हात याप्रमाणें जुळवावेत. ३ उडी मारल्यानंतर मांडी घालून बैठी उडी घेतली आहे या उडीमुळें पाणी पुष्कळ उडतें. ४-५-६ हात मारीत पोहण्याची क्रिया दाखविली आहे. ५ या चित्रांत दाखविल्याप्रमाणें ज्यावेळीं तोंड पाण्यावर येतें त्यावेळीं श्वास घ्यावा. वरीलप्रमाणें पोहतांना आपल्या हातांनीं पाणी कसें रेटावें व तोंड कसें असूं द्यावें हें ७-८-९ या आकृतींत दाखविलें आहे. आकृती २ मध्यें दाखविल्याप्रमाणें हात ठेवल्यानंतर ते पाण्यांत कसे मारावे हें १० व्या आकृतींत दाखविलें असून ११ व्या आकृतींत वरच्या कृतीनंतर पुन्हां हात जुळवून मारण्याच्या तयारींत असतां शरीर पाण्यांत कसें असतें हें दाखविलें आहे. १२ उताणे पोहणें. १३ पाण्यांत तोंड घालून पोहणें.

सारखे समोर आणावेत म्हणजे हाताचें एक पूर्ण वलय होतें. अशा रीतीनें हात पोटाकडे खेचत असतांना पाय मागें ढुंगणाकडे ओढावेत व छातीखालून हात पुढें काढण्याच्या वेळेस दोन्ही पाय जोरानें खालच्या बाजूस एकदम ताणावेत. यामुळें पाणी मागें जोरानें रेटलें जाऊन शरीर जोरानें पुढें ढकललें जातें. ही पोहण्याची अगदीं साधी रीत होय. हात मारून पोहण्याची एक पद्धती आहे. या पद्धतीला 'अमेरिकन क्रॉल' असें इंग्लिशमध्यें म्हणतात. या पद्धतीप्रमाणें पोहतांना पाणी लवकर कापलें जातें व पोहण्याचा वेग वाढतो. पण या पद्धतीचा उपयोग फक्त पाण्यावर हात काढतां येणें शक्य असेल त्याच वेळीं होतो. या पद्धतींत एक हात खांद्याभोंवतीं मागून (वरून) पुढें जोरानें टाकावयाचा म्हणजे त्याच वेळीं सहजच दुसऱ्या

बाजूचा हात मागें जातो. या वेळीं कोणी दोन्ही पाय एकदम मारतात किंवा एक एकच मारतात. अर्थात् यामुळें वेगांत थोडा फरक पडतोच. पाण्यांतून पोहतांना पहिली पद्धत केव्हांही चांगली.

आपल्याइकडे नद्या व मोठ्या विहिरींतूनच पोहण्याची पद्धत ज्यास्त आहे. पण ज्यांना समुद्रांत पोहण्याची सोय असेल त्यांनीं समुद्रांत पोहतांना नेहमीं एक काळजी घ्यावी लागते ती म्हणजे लाटेची. समुद्राची लाट समोरून आली कीं तिचें पाणी नाकातोंडांत शिरूं नये याची खबरदारी घ्यावी; नाहीं तर आधींच पाणी खारट आणि त्यांत नाकातोंडांत पाणी शिरून ठसका लागला म्हणजे गलितधैर्य होऊन घाबरून बुडी मिळायला फारसा वेळ लागायचा नाहीं. अशा वेळीं डोकें खालीं करून डोक्यावरून लाट जाऊं देणें चांगलें. समुद्रांत आंघोळ केल्यानंतर अंग तडतडतें व चिकट होतें आणि कपडे घालूं नयेसे वाटतात. अशा वेळीं जमल्यास शक्य तों लौकर गोड्या पाण्यानें अंघोळ करावी. गोड्या पण ऊन पाण्यानें आंघोळ केल्यास अंग नरम पडतें व ताजेतवानें वाटतें. समुद्राच्या पाण्यांत आंघोळ केल्यास कातडीवर कांहीं वाईट परिणाम होतो असें अनेकांना वाटतें; पण त्यांत फारसें तथ्य नाहीं. मात्र वारंवार आंघोळ केल्यानें थोडासा काळसरपणा चढतो; पण तो टिकाऊ स्वरूपाचा असतो असें मात्र नव्हे. तरी पण ज्यांना काळजी घ्यावयाची असेल त्यांनीं तोंडास कोल्ड-क्रीम लावावें म्हणजे झालें. स्त्रियांचे केस भिजूं नयेत म्हणून पोहतांना डोक्यास घालण्यासाठीं रबरी टोप्या मिळतात. कानांत पाणी जाण्याची ज्यांना फार भीति वाटत असेल त्यांनीं कान–बंद (ear-stops) मिळतात ते वापरावेत. समुद्राच्या पाण्यांत आंघोळ केल्यास गोडें पाणी व बोरॅक्स यांच्या मिश्रणानें केस (डोकें) स्वच्छ धुवून काढावें. डोळ्यांच्या संरक्षणासाठीं चष्मे (गॉगल्स) मिळतात. हे चष्मे वापरल्यानंतरहि जास्त काळजी म्हणून अस्वलाची चरबी थापून गॉगल्समध्यें मुळींच पाणी शिरणार नाहीं अशी काळजी घेतां येते. स्त्रियांनीं हा व्यायाम अवश्य घ्यावा.

पोहण्याचा वेग जास्तींत जास्त किती असूं शकतो याची कल्पना शर्यतींचे निकाल पाहिले असतां येऊं शकेल. १९२७ मध्यें झालेल्या पोहण्याच्या शर्यतींत (अमेरिका) जॉनी वीसमुलर यानें १०० यार्ड अंतर (३०० फूट) फक्त ५१ सेकंदांत पोहून जागतिक रेकॉर्ड केलें. १८ मैल लांबीची डोव्हरची सामुद्रधुनी (सरळरेषेनें, पण पाण्याच्या प्रवाहामुळें हें अंतर ४० मैल होतें) १९२७ सालीं एका जर्मन यंत्रशास्त्रज्ञानें १० तास ४५ मिनिटांत पोहून दाखविलें होतें. हीच सामुद्रधुनी एका अमेरिकन स्त्रीनें–जर्ट्रुड एडर–१९२६ च्या ऑगस्टमध्यें १४ तास ३४ मिनिटांत पोहून दाखविली होती ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

पोहे:-**कृति**–प्रथम भात निवडून घ्यावें. चुलीवर पातेल्यांत पाणी ठेवावें. पाण्याला उकळी फुटली कीं, भात घालून पांच मिनिटें झाल्यानंतर विस्तव विझवून टाकून पातेल्यावर झांकण ठेवून द्यावें. नंतर दुसरे दिवशीं भात रोळींत घालून निथळत ठेवावें. चुलीवर मडकें ठेवून त्याच्यांत थोडें भात घालून भाजावें. भात चुरुंचुरुं वाजावयास लागलें कीं भाजलें असें समजावें. नंतर तें ऊन असतांनाच पोहे चांगले पातळ होईपर्यंत कुटावेत.

(**कोळाचे**) **साहित्य**–पोहे, नारळ, चिंच, साखर, हिरव्या मिरच्या, कोथिंबीर व फोडणी. **माप**–चिपटें पोहे, एक नारळ, सुपारीएवढी चिंच, दोन चहाचे चमचे साखर, थोडी हळद, दोन तीन ओल्या मिरच्या, मीठ अजमासानें. **कृति**–नारळाचें दूध काढावें. कल्हईच्या वाटींत चिंच भिजत घालून तिचा कोळ काढावा. पोहे धुऊन कल्हईच्या पातेल्यांत घालावे. नंतर त्यांत नारळाचें दूध व सर्व सामान घालावें. मिरच्या वाटून लावाव्या. मग हिंगाची तेल घालून फोडणी द्यावी. हा पदार्थ मधल्या वेळच्या फराळाला चांगला असतो.

(कांद्याचे पोहे) **साहित्य**–पोहे, डाळें, चुरमुरे, दाणे, नारळ, कांदे, कोथिंबीर, मिरच्या, मीठ, साखर, लिंबू व फोडणी. **माप**–पावशेर पोहे, तितकेंच डाळें व चुरमुरे दोन्ही मिळून घ्यावे. अर्धी वाटी भुईमुगाचे दाणे, अर्धा नारळ, दोन कांदे, चार पांच ओल्या मिरच्या, चहाचा सपाट चमचा साखर, मीठ कोथिंबर, लिंबू अजमासानें. **कृति**–पोहे, डाळें, चुरमुरे निवडून घ्यावे. दाणे भाजून घ्यावे. कोथिंबीर मिरची बारीक चिरून घ्यावी. खोबरें खवणावें. नंतर हे सगळे जिन्नस एके ठिकाणीं मिसळून फोडणी द्यावी. लिंबू आयत्या वेळेस पिळावा.

(डाळीचे) **साहित्य**–हरभऱ्याची डाळ, पोहे, नारळ, कोथिंबीर, चिंच, गूळ, तिखट, मीठ. **माप**–दोन मुठी हरभऱ्याची डाळ, एक शेर पोहे, एक नारळ, चिंच-गूळ-तिखट-मीठ अजमासानें. **कृति**–डाळ भिजत घालावी. पातळ पोहे घेऊन ते तुपांत तळावेत. नारळ खवणून ठेवावा. चुलीवर कल्हईच्या पातेल्यांत फोडणी करून त्यांत भिजत घातलेली डाळ धुऊन फोडणीस टाकावी. तिच्यांत पावशेर पाणी घालून ती मऊ शिजवावी. मग त्यांत पोह्याचे अजमासानें चिंच, गूळ, मीठ वगैरे सर्व जिन्नस घालून अंगाबरोबर रस राहिला कीं उतरून पोहे घालावेत. वर खवणलेलें खोबरें घालून सारखें ढवळून फराळास द्यावे. हे पोहे जास्त वेळ चांगले राहत नाहींत म्हणून फराळाचे पूर्वीं थोडाच वेळ करावेत.

(बटाटे) **साहित्य**–पोहे, नारळ, साखर, तिखट, मीठ, कोथिंबीर, बटाटे, जिरें, फोडणीचें सामान. **माप**–एक मापटें पोहे, अर्धा नारळ, दोन बटाटे, चहाचा चमचाभर जिऱ्याची पूड, तिखट–मीठ–कोथिंबीर अजमासानें. **कृति**–बटाटे व कोथिंबीर चिरून घ्यावी. खोबरें खवणून ठेवावें. तेलाची खमंग फोडणी करून त्यांत बटाटे टाकावेत. बटाटे मऊ झाले कीं पोहे धुऊन त्यांत घालून त्याच्यांत तिखट–मीठ वगैरे सर्व सामान घालून मंदाग्नीवर शिजवावें. कोथिंबीर व खोबरें पोहे तयार झाल्यानंतर घालून ठेवावें. त्याच्यांत कांदा, वांगीं, दोडका, मटार, वाटाणा, ह्यापैकीं आपल्यास हवें असेल तें घालावें. कृति बटाट्याप्रमाणेंच.

पोळाः–या सणाला कांहीं ठिकाणीं 'बेंदूर' असेंहि म्हणतात. शेतीप्रधान असा आपला देश असल्यामुळें शेती करण्यास जनावरांची आवश्यकता आपल्याकडे फार आहे. जनावरांत गाई, म्हशी, वासरें, घोडीं, बैल व रेडे या सर्वांचा समावेश होतो. या सर्व जनावनारांत शेतीच्या दृष्टीनें बैलाला अतिशय महत्व आहे म्हणून सर्व जनावरांत ज्याला प्रामुख्य लाभलें आहे अशा प्राण्याचेंच नांव या सणाला आपल्या पूर्वजांनीं दिलें. कांहीं कांहीं ठिकाणीं बैलाला 'पोळ' म्हणतात. म्हणून पोळांचा जो सण त्यास पोळा म्हणतात.

महाराष्ट्रांत व कर्नाटकांत हा सण साजरा करितात. तथापि तो सर्वत्र एकाच दिवशीं होत नसतो. प्रथम पावसाळा कोंकणांत सुरू होऊन नंतर सोलापूर, नगर, वऱ्हाड इकडे सुरू होतो. त्यामुळें पावसाळ्यांतील शेतीचीं कामें आधीं कोंकणांतील होतात. नंतर इतर ठिकाणचीं. त्यामुळें कोंकणांत हा सण ज्येष्ठी पौर्णिमेला मूळ नक्षत्रावर करतात. तर सोलापूर, पुणें व कर्नाटक या भागांत तो भाद्रपद अमावास्येला साजरा होतो. सातारा जिल्ह्यांत हा सण आषाढी पौर्णिमेच्या सुमारास पाळतात.

या सणाच्या आधल्या दिवशीं गाईबैलांच्या पायांवर ऊन पाणी ओतून त्यांची पूजा करितात. त्यांच्या खांद्यांना तेल हळद लावून ते चांगले मळतात. जोंधळ्याची किंवा बाजरीची खिचडी अथवा गव्हाची खीर जनावरांना खाऊ घालतात. सणा दिवशीं सकाळीं त्यांना आंबील व गोडें तेल नळ्यांतून पाजतात. त्याचप्रमाणें अंडींदेखील खाऊं घालतात. नंतर बैलांची व इतर जनावरांचीं शिंगें रंगवून त्यांच्या अंगावर हातांचे छाप किंवा पट्टे काढतात. त्यांना मग रंगीत गोंडे, बाशिंगें, झेंडूच्या माळा, तोडे, झुली यांनीं सजवून सर्व बैल एकत्र करून मोठ्या हौसेनें वाजतगाजत त्यांची गांवाबाहेर किंवा गांवांतहि मिरवणूक काढतात. कांहीं भागांत त्यांच्या पैजादेखील लावतात. सार्वजनिक ठिकाणीं चिखलाचा एक बैल करून त्याला नटवतात व त्या ठिकाणीं हंड्या झुंबरें लावून आरास करतात. अशा जागीं यात्रा भरते. त्या दिवशीं खेळ, कुस्त्या व तमाशे करून गांवकरी आपला दिवस आनंदांत घालवतात. बेंदराच्या दिवशीं घरोघर कुंभाराकडून मातीचे बैल विकत आणतात व त्यांची पूजा करून त्यांच्याबद्दलची भक्ती प्रगटवितात; व घरीं गोडधोड पदार्थ करून खातात. कांहीं ठिकाणीं या दिवशीं गुरांचीं प्रदर्शनें भरवून चांगल्या जनावरांना पदकें, बक्षिसें व प्रशंसापत्रकें देऊन जनावरांची निगा उत्तम राखण्याबद्दल शेतकऱ्यांना प्रोत्साहन देतात. तसेंच व्याख्यानांतून जनावरांच्या संगोपनाची माहितीहि दिली जाते.

पौरस्त्य व पाश्चात्य न्यायदानपद्धतिः–न्यायदान हें राजकीय सत्तेचें एक आवश्यक अंग असल्यानें न्यायदानाचा उगम हा राजसत्तेच्या उगमाबरोबरच झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. नवीन भाषा बरीचशी रूढ झाल्यानंतर ज्याप्रमाणें त्या भाषेचें व्याकरण जन्मास येतें त्याचप्रमाणें न्यायदानाचें प्रत्यक्ष कार्य बराच वेळ झाल्यानंतर न्यायदानाचें शास्त्र उदय

पावतें व व्याकरणानें ज्याप्रमाणें पूर्वी प्रचारांत असलेल्या वाक्प्रकारांची, शब्दांची व भाषेच्या इतर भागांची वर्गवारी लावण्यांत येऊन भाषेला नियमित व व्यवस्थित स्वरूप येतें तसें पूर्वी अस्तित्वांत असलेल्या न्यायदानाच्या विस्कळित व विविध प्रकारांना सूत्रबद्ध स्वरूप देणें हा या शास्त्राचा मुख्य उद्देश आहे. मानवी समाजांत न्यायदानाच्या अनेक पद्धति आहेत. त्या सर्व पद्धतींचें अवलोकन व त्यांचा विचार करून त्यावरून कांहीं सर्वव्यापी सिद्धांत बांधतां येतील कीं काय याचा विचार करणाऱ्या पंडितांच्या श्रमाचें फळ म्हणजे सध्यां अभ्यासलें जाणारें न्यायदानशास्त्र असें म्हणतां येईल.

ऑस्टीननें या शास्त्राची व्याख्या व व्याप्ति सांगतांना म्हटलें आहे कीं सर्वसाधारण (General or universal) न्यायदानशास्त्राची व्याप्ति सर्व प्रचलित व जुन्या न्यायदानपद्धतींत सर्वसाधारणपणें येणाऱ्या विषयांचा व त्यामुळें मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचाच अभ्यास करणें हें या शास्त्राचें ध्येय आहे. अशा विचारामुळें जीं तत्त्वें आढळून येतील त्यांचा सर्व मानववंशांत ज्या मूलभूत गोष्टी साधारणपणें आढळतात, त्यांचेशीं कसा संबंध पोहोंचतो व कसा मेळ घालतां येतो तें पाहणें हें शास्त्राचें अंतिम उद्दिष्ट आहे. हॉलंड, सामंड, पोलक, व्हीनो ग्रेडॉफ, ड्युज्यूई काकुरेक, साव्हीन्यी, बेनथाम, ग्रे इत्यादि अनेक नव्याजुन्या पंडितांनीं या शास्त्रावर ग्रंथ लिहिले आहेत. कायद्यांचा शास्त्रोक्त अभ्यास करणारांस हें शास्त्र अभ्यासणें आवश्यक आहे.

पौर्वात्य (हिंदु) न्यायदानशास्त्र—ऑस्टीननें कल्पिलेल्या प्रकारचा विचार हिंदुस्थानांतील प्राचीन पंडितांनीं प्रत्यक्षपणें फारसा केलेला नाहीं; पण अभ्यासकांना उद्बोधक होणाऱ्या अनेक गोष्टी आपल्या प्राचीन धर्मशास्त्रावरील व व्यवहारशास्त्रावरील ग्रंथांतून सांपतात. व्यवहारमयूख, मनुस्मृती, मिताक्षरा इत्यादि उपलब्ध हिंदु कायद्यांच्या ग्रंथांतून प्रत्यक्ष न्यायदानाचे नियमांचा उल्लेख तर आहेच; पण सध्यां न्यायदानशास्त्राचे असे गणले जाणारे पुष्कळ सिद्धांतहि वेगवेगळया ठिकाणीं सांपडतात. फक्त न्यायदानशास्त्रावर स्वतंत्र असा प्राचीन ग्रंथ अद्यापि उपलब्ध झालेला नाहीं. डॉ. प्रीयनाथ सेन या बंगाली पंडितांनीं पुष्कळ परिश्रमपूर्वक तयार केलेला 'हिंदु न्यायदानशास्त्र' (Hindu Jurisprudence) हा एक उपयुक्त ग्रंथ आहे.

हिंदु कायद्याचीं प्राचीन पुस्तकें 'धर्मशास्त्र' या नांवाखालीं लिहिलीं गेलीं असल्यानें या पुस्तकांतून निव्वळ कायद्याबरोबरच नीतिशास्त्राची, आचारशास्त्राची व धार्मिक विधी करण्यासंबंधीं नियमांचीहि सांगड घालण्यांत आली आहे; कारण आपल्याकडे कायदेशीर व्यवहारासच विविध प्रकारचे विधींचा जोड देण्याची प्रवृत्ती होती व समाजांतील सर्वसाधारण जीवनक्रमावर धार्मिक आचाराची व विचाराची छटा पूर्णपणें पसरलेली असे. पाश्चात्य देशांप्रमाणें आमचे देशांतहि न्याय हा दैवी देणगीचा भाग असून 'खऱ्याला मरण नाहीं' अशा प्रकारची भावना होती. न्यायी परमेश्वर सत्पक्षाला साहाय्य करतो या समजुतीमुळें प्राचीन काळीं दिव्य करून आपल्या म्हणण्याची सत्यता प्रस्थापित करण्याचीहि कल्पना न्यायदानाचे कामीं रूढ असे. द्वंद्वयुद्धांत हरेल, दिव्य करण्याचें टाळेल, दिव्य करतांना ज्याला त्रास होईल त्याचा पक्ष खोटा या तत्त्वावरहि न्यायदान मानवी सुधारणेच्या एका कालखंडांत सर्वसामान्यतः होत होतें असें दिसून येतें. आपल्याकडील असें सर्वांत महत्त्वाचें दिव्य म्हणजे सीतामाईनीं केलेलें अग्निदिव्य.

यानंतर राजानें न्यायदान करण्याची प्रथा सुरू झाली असावी. दरबार भरवून दरबारांत न्यायदान करावें, असें न्यायदानाचें काम चालले असतां राजानें साध्या पोषाखांत सभेंत येऊन बसावें; राजाला न्यायदानाचे कामीं मदत करण्यास, न्यायाधीश, अमात्य, मंत्री, ब्राह्मण, कुलगुरु व सन्मान्य नागरिक यांनीही सभेंत हजर असावें. प्राद्‌विवाक म्हणजे न्यायाधीश कसा असावा इत्यादि गोष्टींबद्दल बृहस्पति, मनु, याज्ञवल्क्य, नारद, कात्यायन, व्यास इत्यादि स्मृतिकारांचीं वचनें निळकंठभट्टाचे 'व्यवहार—मयूखांत' ग्रथित केलीं आहेत. 'व्यवहार' म्हणजे न्यायनिर्णयाचें काम. हें काम चालविण्यांतील हेतु 'अज्ञात असलेलें अन्यायाचें वर्तन' वादीप्रतिवादी यांपैकीं कोणाकडून झालें तें ठरविणें हा असतो. या कामीं वादीप्रतिवादी यांचा साक्षीपुरावा व ताबा यांचा विचार करून व उभय पक्षांकडील तक्रारी ऐकून करण्याचा असतो असें वर्णन या ग्रंथांत आहे.

न्यायाधीश किंवा प्राद्‌विवाक हा सौम्य भाषण करणारा शांत वृत्तीचा व निःपक्षपाती असावा व त्यानें

वादीप्रतिवादी व साक्षीदार यांना प्रश्न करून व त्यांचा उलट तपास करून खरें काय तें शोधून काढावें असें वचन आहे. यावरून प्रचलित कायद्याचें कोर्टांतून चालणाऱ्या कामाच्या पद्धतींत व प्राचीन हिंदु पद्धतींत फारसा फरक नसावा असें दिसतें. विशेषतः 'नियुक्त' केलेल्या नागरिकांची व सभ्यांचे असे सभेची व ज्युरीची तुलना केली तर प्राचीन व अर्वाचीन न्यायदान पद्धतीचे स्वरूपांत पुष्कळच साम्य होतें असें म्हणतां येईल.

मनूनें 'व्यवहाराचे' अठरा प्रकार सांगितले आहेत. ते असे (१) ऋणाचें अदान (कर्ज परत न करणें), (२) निक्षेप (ठेव) (३) अस्वामिविक्रय (मालक नसणाऱ्यानें विक्री करणें, (४) सम्भूय समुत्थान (भागीदारी) (५) दत्तस्यापकर्षः (दान दिलेली वस्तु परत घेणें), (६) वेतनस्य अदानम् (वेतन न देणें), (७) संविदस्य व्यतिक्रमः (कराराचा भंग), (८) क्रयविक्रयानुशय (विकत दिलेघेतलेसंबंधीं करारांचा भंग), (९) स्वामीपाल्ययोः विवादः (कळपावर देखरेख करणारा नोकर व कळपाचा मालक यांच्यामधील तंटे), (१०) सीमाविवादधर्मः (हद्दीसंबंधींचे तंटे), (११) पारूष्य (शारीरिक इजा करण्यासंबंधीं), (१२) दण्डवाचिक (शिवीगाळी) (१३) स्तेय (चोरी), (१४) साहस (दरोडेखोरीसारखे अत्याचाराचे प्रकार), (१५) स्त्रीसंग्रहण (स्त्रीला पळवून अथवा जबरीनें काढून नेणें), १६ स्त्रीपुंधर्म नवरा बायको यांचे परस्परांसंबंधीं कर्तव्याचे बाबतींतील तंटे (१७) विभाग (वाटणीसंबंधीचे तंटे),(१८) द्यूत व आव्हय यासंबंधीं वाद (जुगार व झुंजी यासंबंधीं तंटे) या अठरा प्रकारांत व त्यांच्या पोटविभागांत सर्व तऱ्हेच्या व्यवहारांचा म्हणजे कज्ज्यांचा समावेश होतो असें बृहस्पति इत्यादि स्मृतिकारांनाहि मान्य आहे.

वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः।
एतच्चतुर्विधं प्राहुः साक्षात् धर्मस्य लक्षणम् ॥

या मनूचे वचनांत हिंदुधर्मशास्त्राच्या उगमाचे चार प्रकार सांगितले आहेत. वेद, स्मृति, सदाचार व आपल्या आत्म्याला प्रिय वाटणाऱ्या गोष्टी या चार प्रकारें धर्माचें लक्षण आहे. याज्ञवल्क्यांनीं व्यवहार म्हणजे न्यायदानाचें काम—स्मृत्याचारव्यपेतेन मार्गेणाधर्षितः परैः॥ निवेदयति चेत् राज्ञे व्यवहारपदं हि तत् ॥ या वचनांत व्यवहाराचा (न्यायदानाच्या कामाचा) उगम कसा होतो तें सांगितलें आहे. स्मृतींनीं व प्रस्थापित झालेल्या रूढींनीं घालून दिलेल्या नियमांचें उल्लंघन करून इतरांनीं पीडा केली अशी तक्रार राजाकडे जेव्हां एखादा नेतो तेव्हां 'व्यवहाराचा' आरंभ होतो म्हणजे कोर्टांत खटला दाखल होतो.

धर्माची म्हणजे कायद्याची स्थापना दंडावर शिक्षेवर अवलंबून असते असें मनूनें सांगून आधुनिक पंडितांचें शिकवणीचें नाविन्य नष्ट केलें आहे असें म्हणतां येईल.

दण्डः शास्ति प्रजा सर्वाः दण्ड एवाभिरक्षति।
दण्डः सुप्तेषु जागर्ति दण्डं धर्मं विदुर्बुधाः ॥२॥

वचनानें दंड किंवा धर्म हा राजापेक्षां मोठा असून त्याचें पालन करणें राजाचें कर्तव्य आहे असें मनूनीं सांगितलें आहे. तर ऑस्टीनचें न्यायदानशास्त्र म्हणतें कीं कायदा हा राजाची आज्ञा आहे एवढाच फरक या दोन कल्पनांमध्यें आहे. पण कायद्याचा आधार 'दण्ड' किंवा राजसत्तेकडून होणारें शिक्षेचें भय हें सांगणें दोघांचेंहि आहे. मालकी, क्रयविक्रय, करार इत्यादिचे पुष्कळसे प्राचीन हिंदु शास्त्रांतील कल्पनांचें व आधुनिक कल्पनांचें साम्य आहे ही गोष्ट येथें नमूद करण्यापलिकडे अधिक विस्तार न करणेंच बरें.

पाश्चात्य न्यायदान—शास्त्र (Jurisprudence)—या शास्त्राची व्याप्ती फार मोठी आहे. नीतिशास्त्र व दिवाणी फौजदारी कायदे यांचे दरम्यान या शास्त्राची साधारपणें जागा ठरते. या शास्त्राचा विचार तीन प्रकारें केलेला आहे. एक प्रकार म्हणजे ऐतिसिक दृष्ट्या कायद्यांची उत्पत्ति व वाढ यांचा विचार करणें; दुसरा प्रकार प्रचलित कायद्यांचा अभ्यास करून त्यांचे बुडाशीं कांहीं मूलभूत तत्त्वें आहेत कीं काय हें पृथक्करणाच्या पद्धतीनें (analytical) पाहणें; व तिसरा प्रकार कायद्याची सुधारणा कशी व्हावी याचा विचार करणें (Science of Legislation)

कायद्याची सर्वमान्य व्याख्या कोणती याविषयीं एकमत नाहीं; पण आधुनिक न्यायशास्त्रवेत्त्यांनीं कायदे म्हणजे 'राज्यकर्त्यांनीं न्यायदानाचे कारणाकरितां केलेले नियम' अशी व्याख्या केली आहे. पाश्चात्त्य न्यायशास्त्राची व कायदेकानूंची उभारणी रोमन लोकांचे न्यायदानपद्धतीवर झाली आहे.

प्रयोगसिद्ध शास्त्राप्रमाणें या शास्त्रासंबंधीं विचार होऊंच शकत नसल्यामुळें या शास्त्राचे प्रत्येक सिद्धांताचे बाबतींत पुष्कळच मतवैचित्र्य दिसून येतें. यामुळें कोणताहि सिद्धान्त ठामपणें मांडणें या शास्त्रांतील पंडितांना शक्य नाहीं.

न्यायदानाचें काम फारच पवित्र आहे असा आपला सर्वसाधारण समज आहे; पण खरोखर न्यायाची उभारणी ईश्वरी पावित्र्याचे पायावर झालेली नसून त्यांत वास्तविक पाहतां राज्य करणाराचे सोईचा प्रश्न असतो. माणसें जमाव करून राहणारे प्राणी आहेत व राज्यें हीं एका विशिष्ट ध्येयाच्या पूर्ततेकरितां स्थापन झालीं आहेत असें या शास्त्राचें मत आहे. तें ध्येय द्विविध असतें. अंतर्गत शांतता व सुरक्षितता हा या ध्येयाचा एक भाग असून परचक्रापासून बचाव हा या ध्येयाचा दुसरा भाग आहे. हीं दोन्ही कामें पार पाडण्याकरतां जेव्हां माणसें एकत्रित जमतात तेव्हां राज्याची स्थापना होते असें हें शास्त्र सांगतें. या ध्येयाची पूर्तता फक्त सामर्थ्यानें अथवा पाशवी शक्तीनेंच होऊं शकते. ज्या व्यक्तीचें अथवा गटाचें सामर्थ्य जास्त, त्यांनाच हें ध्येय पुरें करतां येतें. यावरून राज्य करण्याचें कार्य हें सामर्थ्यावरच अवलंबून आहे हें उघडच दिसतें. जर एखादी व्यक्ति किंवा पक्ष कोणत्याहि कारणामुळें राज्यकर्त्यापेक्षां अधिक बलवान् झाला तर राज्यकर्त्यांना राज्य चालविणें अशक्य होईल; अथवा राज्यकारभार या बलिष्ठ व्यक्तीचे अथवा गटाचे मताप्रमाणें हांकावाच लागेल. अखेर राज्य कोणीं चालवावें हें अनुयायांच्या संख्येवरच अवलंबून राहतें. प्रत्यक्ष राज्यकर्ते हे नेहमीं संख्येनें प्रजेपेक्षां कमी असतात व वास्तविक सामर्थ्य प्रजेचेंच असतें, असें बेन्‌थॅमनें म्हटलें आहे; पण प्रजा राज्यकर्त्यांच्या आज्ञा कां मान्य करते याला निरनिराळीं कारणें आहेत असें तत्त्ववेत्ते सांगत आले आहेत. प्रजा राज्यकर्त्यांचें शासन कां मानतें यासंबंधीं वेगवेगळ्या पंडितांनीं मांडलेल्या प्रमेयांत आद्यसमाजकरार (Social contract) हें एक आहे, हें फ्रेंचराज्यक्रान्तीच्या पूर्वी रूसो या फ्रेंच तत्त्ववेत्त्यानें मांडलें आहे. रूसो म्हणतो कीं, "प्रजेनें आपलें सर्वस्व राज्यकर्त्यांचे हवालीं करतांना त्यांचेशीं असा एक गर्भित करार केलेला असतो कीं राजसत्तेचा उपयोग प्रजेचे हिताकरतांच केला जाईल; या अटीवरच प्रजा राज्यकर्त्यांचें वर्चस्व स्वीकारण्यास कबूल झालेली असते, व हा करार पाळणें उभय पक्षांवर बंधनकारक असतें."

दुसरा पक्ष म्हणजे राजसत्तेचा उगम दैवी संकल्पांत आहे असें सांगणाऱ्यांचा. या पक्षांतील पंडित इंग्लंडांतील पहिल्या जेम्स राजाचे वेळेपासून फ्रेंच राज्यक्रांतीचे वेळेपर्यंत होते. त्यांनीं राजाला ईश्वरी शक्तीच्या बलावर राज्य करतां येतें असें प्रतिपादन केलें. बेकन हा या पक्षांतला प्रमुख पंडित मानला जातो. 'ना विष्णुः पृथिवीपतिः' या वचनांत हीच कल्पना दिसते.

तिसरा पक्ष प्रजेला संवयीमुळें राज्यकर्त्यांचें वर्चस्व स्वीकारावें लागतें, असें सांगतो. इतर आधुनिक पंडितहि प्रजा व राजा यांच्यासंबंधाची उपपत्ती वेगवेगळ्या प्रकारें लावतात. कोणी म्हणतात कीं राजनिष्ठा ही प्रत्येक माणसाची उपजत बुद्धि आहे. तर कोणी म्हणतात कीं ती भयामुळें उत्पन्न झालेली आहे. या सर्व सिद्धान्तांतून न्यायदानशास्त्रज्ञांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं न्यायदान हें राजसत्ताधारी संस्थेचें मुख्य कर्तव्य असून त्याची उभारणी प्रजेपैकीं प्रत्येक व्यक्तीचे मनांत राजसत्ताधारी शक्तीबद्दल वाटत असणाऱ्या भीतीवर झालेली आहे. जगांत प्रत्येकाला सर्व चांगल्या वस्तू आपल्याच एकट्याच्या मालकीच्या असाव्यात असें वाटत असतें व या सार्वत्रिक लोभामुळें समाजाचें अंतर्गत स्वास्थ्य नष्ट होऊन समाजांत अंदाधुंदी माजेल व कलह निर्माण होईल, या आपत्तींतून समाजांतील व्यक्तींचें राजसत्तेच्या सामर्थ्यानें संरक्षण करण्याकरतां न्यायदानाचा उगम झाला आहे असें बहुतेक सर्व पंडितांचें मत आहे.

न्यायदानाचें सामाजिक जीवनांतील स्थान काय हें पाहिलें म्हणजे वास्तविक पाहतां कायदेकानू नसतांनादेखील सामाजिक स्वास्थ्य प्राप्त होऊं शकेल हें कबूल करणें भाग पडतें; पण ही गोष्ट जरी तात्त्विक दृष्ट्या शक्य वाटली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत कायदेकानू असणें जरूर पडतें, याचीं कारणें अनेक आहेत. पहिलें कारण असें कीं, अगोदरच ठरलेल्या नियमांनुसार न्यायदान झाल्यानें सर्वांनाच निःशंकपणें व्यवहार करतां येतात. दुसरें असें कीं न्यायदानाचे कामीं उपयोगांत आणण्याचे नियम ठरलेले असले कीं, न्यायाधीशाच्या हातूनहि चुका होण्याचा संभव कमी होतो; तिसरें कारण असें कीं न्यायदान करणाऱ्याला उघडपणें पक्षपाती होणें अशक्य होतें. इत्यादि अनेक कारणांमुळें

न्यायदान हें ठराविक नियमांनुसारच होणें सामाजिक स्वस्थतेच्या व समाजहिताच्या दृष्टीनें अवश्य आहे. अखेरच्या न्यायमंदिरांतील न्यायाधिशानें न्यायदान करणें ही गोष्ट शेवटीं त्याचे सचोटीवर व त्यानें घेतलेल्या शपथेवर अवलंबून राहतें; कारण अखेरच्या कोर्टाचा निकाल कोणालाच फिरवितां येत नाहीं. म्हणून न्यायदानाचें काम नेहमीं उघडपणें सर्वांसमक्ष व्हावें असा कायद्याचा रोख आहे. यामुळें न्यायाधिशास मनाची नसली तरी जनाची तरी लाज वाटून त्याचेकडून न्यायदान कायद्यास अनुसरूनच होईल असा रोमन लोकांचा समज असून त्यास अनुसरूनच सध्यां जगभर न्यायमंदिरांतील न्यायदानाचें कामकाज सार्वजनिकपणेंच व्हावें असा सर्वसाधारण नियम केलेला आहे. आपणाकडेहि प्राचीन काळापासून न्यायदानाचें काम सभेंत अगर दरबारांत करण्याची जी प्रथा आहे तिचा उगम या तऱ्हेच्या विचारसरणींतच असावा.

कायदा आणि नीतिशास्त्र यांचे संबंध परस्पर कसे असतात याबद्दल फारच मतवैचित्र्य दिसून येतें. कांहीं पंडितांचें असें म्हणणें आहे कीं, नीतितत्त्वें असतांना कायदे म्हणून वेगळे नियम कांहीं असण्याची जरूरीच नाहीं; दुसरे पंडित असें म्हणतात कीं कायदा व नीति यांचा परस्पर कांहींच संबंध नाहीं व नसावा. पंडितांचा तिसरा एक वर्ग आहे त्यांचें मत असें कीं कायदा ही नीतितत्त्वाची ओबडधोबड प्रतिकृति आहे. या पंडितांचे मतें कायद्याचें उद्दिष्ट न्यायदान हें आहे. सर्वोत्कृष्ट न्यायदान मानवी प्राण्याला शक्यच नाहीं; कारण सर्वसाक्षी परमेश्वरच फक्त वास्तवीक किंवा खरा न्याय करूं शकेल. मानवी न्याय ही ईश्वरी न्यायाची निव्वळ थट्टाच नसली तरी अत्यंत हीन दर्जाची नक्कल आहे. गढूळ पाण्यांत ज्याप्रमाणें एखाद्या वस्तूची विपर्यस्त अपूर्ण पडछाया पडते त्याप्रमाणें मानवी मनांत या दैवी न्यायाची अपरिपक्व व अपूर्ण छायाच फक्त पडली आहे. त्यांचे मतें खरा न्याय हा 'परमेश्वराचे अंगुलीनें मनुष्याचे अंतःकरणावर कोरलेल्या नियमांनुसार व्हावयास पाहिजे' या मताचा पुरस्कार ॲरिस्टॉटलनें केलेला आहे. आधुनिक पंडितांचें मत याहून वेगळें आहे. त्यांचे मतें कायद्याची सर्वसाधारण रचना नीतिशास्त्राचे अनुरोधानें होणें जरूर आहे. कारण तसें असलें म्हणजे सर्वसाधारण मनुष्याला कायद्याशीं विरोध करण्याची फारशी इच्छा होऊं शकणार नाहीं. परंतु कायदे करण्याचा मुख्य उद्देश समाजस्वाथ्य हा असल्यानें सर्व नीतितत्त्वांचा कायद्यांत समावेश व्हायलाच पाहिजे असें प्रतिपादन करणें चुकीचें आहे. समाजस्वास्थ्याचे दृष्टीनें ज्या नीतिनियमांची अम्मलबजावणी करणें शक्य व हितकारक असेल तेवढ्याच नीतितत्वांचा उपयोग कायदे करण्याच्या कामीं होऊं शकतो. नीतितत्त्वें हें साहित्य असून त्या साहित्यापासून कायदा ही प्रतिमा उत्पन्न करावयाची असते. शिवाय पुष्कळ कायदे असे आहेत कीं त्यांचा नीतिअनीतीशीं कांहीं संबंधच असत नाहीं. उ.–रस्त्याचे डाव्या बाजूनेंच सर्व गाड्या चालाव्यात या कायद्याचें उल्लंघन करणाऱ्याकडून कोणत्याहि नीतितत्त्वाचा भंग होत नाहीं; पण या नियमाची समाजांतील स्वास्थ्याचे दृष्टीनें ज़रूरी आहेच.


कायदेशीर हक्क व मालकी या कल्पना सर्व आधुनिक कायद्यांच्या मुळाशीं आहेत. या दोन्ही कल्पनांचे उगमाबद्दल फारच तीव्र मतभेद आहेत. 'कायदेशीर हक्क' (Legal rights) याची व्याख्या कायद्यानें मान्य केलेला व संरक्षण केलेला मानवी हितसंबंधाचा भाग असा करतां येईल. कायदेशीर हक्क धारण करणारासंबंधीं ज्याचेवर कायदेशीर हक्काचे बंधन असेल त्यानें करावयाचें कर्तव्य. कायदेशीर कर्तव्याची हक्काला पुरवणी असलीच पाहिजे. कायदेशीर कर्तव्याचे पालन करण्यांत चुकणें म्हणजे कायद्याचें उल्लंघन (Legal wrong) होय. हें कर्तव्य व हक्क यांचे संबंध कांहीसे नवराबायकोच्या संबंधासारखे आहेत असें विनोदानें म्हणतां येईल. बायको असल्याशिवाय ज्याप्रमाणें कोणी नवरा होऊंच शकत नाहीं त्याप्रमाणें कर्तव्य असल्याशिवाय हक्क असूं शकत नाहीं. निर्जन बेटावर एकटाच वस्ती करून राहणाऱ्या रॉबिनसन् क्रूसोला हक्कच नाहींत. मालकी हक्क म्हणजे विशिष्ट वस्तूसंबंधींचें विवक्षित व्यक्तीचे इतर सर्वांना वगळून उपभोगण्याचे कायदेशीर हक्क होत. या व्याख्येंतील वस्तू हा बाह्य पदार्थ असूं शकेल किंवा फक्त कायद्याच्या नजरेलाच दिसणारा पदार्थ असूं शकेल. उदाहरणार्थ अब्रू, किंवा एखाद्या लेखकाचा स्वतःच्या ग्रंथासंबंधीं हक्क (Copyright).

'व्यक्ति' या शब्दांत प्रत्येक मनुष्याचा समावेश तरी करतां येतोच; पण कांहीं देशांतील कायद्याप्रमाणें व्यक्ति या शब्दांत पुष्कळ व्यक्तींच्या समुदायाचा व

कांहीं पदार्थांचाहि समावेश होतो. उदाहरणार्थ कायद्याच्या दृष्टीनें कायद्यानें मान्य केलेला भागीदारांचा गट (Limited company) ही एक सर्व भागीदारांहून निराळी व्यक्ति आहे; म्हणजे असें कीं एकाद्या कंपनीचे चाळीस भागीदार असले तर कायद्याच्या दृष्टीनें एकंदर एकेचाळीस व्यक्ति मानल्या जातात. चाळीस भागीदार या चाळीस व्यक्ति; व एकेचाळीसावी व्यक्ति म्हणजे या चाळीस भागीदारांची मिळून झालेली कंपनी. या एकेचाळीसाव्या व्यक्तीचें अस्तित्व फक्त कायद्याचे दृष्टीनेंच असतें. यासंबंधीं कायद्याचा भाग बराच मनोरंजक वाटण्यासारखा आहे. ही कायद्यांतली व्यक्ति (Juristic person) कायद्यामुळेंच जन्माला येते व हिचें अस्तित्व कायद्यानें ठरवून दिलेल्या नियमांवर अवलंबून असतें. समजा कीं एकाद्या चाळीस भागीदारांचे कंपनीचे सर्व भागीदार मरण पावले तरी एकीचाळीसावी व्यक्ती आपोआपच मरण पावली असें कायदा मानीत नाहीं; सर्व भागीदार जरी गेले तरी कायदा आपलें अपत्य जिवंत आहे असेंच मानतो. त्याचप्रमाणें आपल्या हिंदु शास्त्रांतील कायद्याप्रमाणें प्रत्येक देवळांतील देव ही एक कायदेशीर व्यक्ति आहे; म्हणजे आमच्या कायद्यानें देवावर दिवाणी दावा मांडतां येतो. त्याचप्रमाणें कांहीं कायदेशीर व्यक्ति अमर आहेत. उदाहारणार्थ ॲडव्होकेट जनरल.

दिवाणी व फौजदारी कायदे–न्यायदानाचे कामाची विभागणी दिवाणी व फौजदारी अशी करण्यांत येते. फौजदारी कचेऱ्यांतील न्यायदानाचा उद्देश गुन्हेगारास शासन करणें हा असून दिवाणी कचेऱ्यांतील न्यायदानाचा हेतु हक्कस्थापना,अम्मलबजावणी,नुकसान भरपाई असल्या प्रकारचा असतो. दिवाणी कामांतूनहि पुष्कळ वेळां गुन्हेगारास शिक्षा करण्याच्या स्वरूपाचीं कामें चालतात. या दोन प्रकारचे न्यायदानांत मूलतः कांहींच फरक नाहीं; पण फौजदारी कामांतील मुख्य हेतु ज्या माणसाला एखाद्या गुन्हेगाराच्या कृत्यामुळें हानी सोसावी लागली, त्यास नुकसानभरपाई करून देण्याचा नसून गुन्हेगारास शासन करणें हा असतो. या शासन करण्याचे प्रकाराविषयीं चार मतें प्रचलित आहेत. पहिलें मत गुन्हेगारास शासन करून त्यास व इतरांस दहशत बसविणें हा शिक्षेचा उद्देश असा आहे. दुसरें मत गुन्हेगारास कारागृहांत ठेवून त्यास गुन्हेगारी करण्यास शिक्षेची मुदत संपेपर्यंत असमर्थ करणें हा शिक्षा देण्याचा हेतु होय असें आहे. तिसरें मत शिक्षा देण्याचा हेतु गुन्हेगाराची सुधारणा करणें हा असावा असें आहे. या मताचें प्रतिपादन करणारे लोक गुन्हे करण्याची प्रवृत्ति हा एक मानसिक रोग आहे असें प्रतिपादन करितात; त्यांचे मतें सर्व तऱ्हेचे गुन्हेगार उपचारानें सुधारतां.

न्यायालयांतील कामाची वर्गवारी



येतील असें आहे व कारागृहाचें रुग्णालयांत रूपान्तर व्हावें अशी त्यांची खटपट आहे. फांशीची शिक्षा रद्द व्हावी अशी हे लोक खटपट करीत आहेत. चौथें मत शिक्षा हे गुन्ह्याचें प्रायश्चित्त आहे असें आहे. या लोकांच्या मतें शिक्षेचें प्रायश्चित्त केल्यावर गुन्हेगार दोषमुक्त झाला असें आहे. या मताप्रमाणें पूर्वी जर एकाद्यानें दुसऱ्याचा हात तोडला तर आरोपीचा हात तोडण्याची त्यास शिक्षा देणें असें शिक्षेचे प्रकार असत.

दिवाणी कोर्टांतील न्यायदान—या प्रकारचे न्यायदानाचे कामांत मुख्य प्रश्न तक्रार करणारा वादी व त्याचे हक्काचा असतो. हे हक्क दोन प्रकारचे समजण्यांत येतात—एक प्रधान हक्क (Primary right), व दुसरा असल्या प्रधान हक्काचा भंग झाल्यामुळें उत्पन्न होणारा अनुशासित हक्क (Sanctioning right). दिवाणी न्यायदानांत या हक्कांचे दोन दृष्टिकोनामुळें दोन भेद पडले आहेत. एकंदरींत मागील तक्त्याप्रमाणें न्यायालयांतील कामाची वर्गवारी करतां येईल.

न्यायालयें हीं न्यायदानाचें काम, आपलें प्राथमिक कर्तव्य, म्हणून करतातच; पण याशिवाय त्यांना कांहीं दुसरीं कामेंही करावीं लागतात. हीं कामें—(१) हक्कशाबितीचा अर्ज (Petition of rights). हें इंग्लिश कोर्टांतील काम आहे. या कामांत सरकारवर करारभंगासारख्या बाबतींत काम चालविण्यांत येतें व अखेरनिकाल साध्या दाव्याप्रमाणें अंमलबजावणीबद्दल न होतां, फक्त खरी बाजू कोणाची तें न्यायालयांतून ठरविणेंत येतें. (२) हक्क ठरविणें व जाहीर करणें (Declaration of Rights) जेव्हां एखाद्या माणसास आपल्या हक्कासंबंधीं साशंकता वाटते तेव्हां तो नुसता हक्क ठरवून देणेची मागणी करतो व असल्या कामांतून कोर्ट फक्त हक्क असल्यास तसें जाहीर करतें. (३) व्यवस्था करणें. अज्ञान अथवा असमर्थ इसमांची (व केव्हां केव्हां विवादांतील मिळकतीची) प्रत्यक्ष व्यवस्था कोर्ट आपल्याकडे घेऊन त्या मिळकतीची व्यवस्था राखतें. (४) हक्कांची घोषणा व त्यास अनुसरून होणारी हक्काची तबदीली(Transfer) उदा. नादारी—घोषणा, मृत्युपत्राचे अभावीं मिळकतीची वहिवाट चालविण्यासंबंधीं देण्यांत येणारें सर्टिफिकेट.

यावरून न्यायदानाची विविधता लक्षांत येईल. न्यायाचे खासगी अगर वैयक्तिक (Private) व सार्वजनिक (Public) असे भागहि करण्यांत

येतात. ‘ खासगी ’ न्यायाप्रमाणें जर माणसें चाललीं तर न्यायालयांतील न्यायाचा उपयोग करणेचें कारणच उरत नाहीं; म्हणूनच खासगी न्याय व्यक्तींनीं पाळणेचा असतो, व त्यांनीं तसें न केलें तरच आजाऱ्यास औषध देतात त्याप्रमाणें, सार्वजनिक न्याय हा व्यक्तीचे घशांत ढकलावा लागतो, असें म्हटलें आहे.

‘ मालकी ’ यासंबंधीं कायद्यानें ठरविलेले नियम: मालकीचे (१) उगम (२) तबदीली व (३) नाश या स्वरूपाचे असतात. (Liability) जबाबदारी, (Disability) नालायखी, (३) कर्तव्य (Duty) हीं कायद्यानें योजलेलीं त्रिविध बंधनें आहेत व त्यांना अनुषंगिक तीन प्रकार आहेत; त्यांना अनुक्रमें—(१) स्वतंत्रता अथवा मोकळीक (Liberty) (२) अधिकार अथवा समर्थता (Power) व (३) कायदेशीर हक्क (Legal Rights) असें म्हणतात.

पाश्चात्य पंडितांनीं प्रत्यक्ष अमलांत असणाऱ्या कायद्यांचे त्यांचे उत्पत्तीचे दृष्टीनें चार प्रकार सांगितले आहेत. (१) प्रत्यक्ष प्रचारांत आणलेले कायदे. उदा. पार्लमेंटानें अथवा तसल्या इतर संस्थांनीं जारी केलेले नियम. (२) वहिवाटीमुळें अमलांत असलेला कायदा म्हणजे रूढी. या रूढि दोन प्रकारच्या असतात. एक सार्वत्रिक रूढ असलेली व दुसरी विशिष्ट ठिकाणींच रूढ असलेली. सार्वत्रिक रूढीचा कायदा हा, रूढी प्राचीन काळापासून अमलांत असली व ती प्रत्यक्षपणें अमलांत असलेल्या कायद्यास अगर नीतिनियमांस सुटून नसेल तरच कायद्यानें ग्राह्य मानली जाते. (३) इंग्लंडांत रूढ असलेला तिसरा कायद्यांचा प्रकार म्हणजे न्यायदानाचे कमीं वेगवेगळ्या कामांतून न्यायमूर्तींनीं लागू केलेले नियम. (४) कायद्यानें बांधल्या जाणाऱ्या व्यक्तींनीं करारानें स्वतावर बंधनकारक केलेले नियम. कांहीं पंडितांचे मतें आणखी एक पांचवा प्रकार म्हणजे न्यायशास्त्रप्रवीण पंडितांनीं ग्रंथांतून व्यक्त केलेलीं मतें हा आहे. शिवाय इंग्लंडमध्यें पूर्वी फक्त सर्वसाधारण कायदा (Common Law) व साधारण कायद्याच्या अंमलबजावणीपासून येणाऱ्या अन्यायप्रकारांना दुरुस्त करणारा विशिष्ट तऱ्हेचा कायदा असाहि एक भेद प्रचारांत आला. या विशिष्ट स्वरूपाच्या कायद्यास इक्विटी (Equity) म्हणतात. इक्विटीचीं तत्त्वें हीं कायद्यापेक्षां थोडीशीं वेगळीं

असत. सर्वसाधारण कायद्याचे नियम हे फारच कडक काटेकोरपणानें अंमलांत आणले जात व त्यामुळें पुष्कळ वेळां कांहींतरी विपरीत परिणामहि होत असत; त्यांना आळा घालण्याकरतां या स्वतंत्र स्वरूपाच्या कायद्याचा उगम झाला. या कायद्याचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे विश्वस्त मालकीचा कायदा (Trust). या विश्वास—तत्त्वावर आधारलेल्या कायद्यामुळें पुष्कळशा अन्याय्य प्रकारांना आळा बसला.

कायदेशीर क्लृप्त्या (Legal fictions), **निर्णायक अनुमानें** (Conclusive presumptions):-ज्याप्रमाणें सर्वसाधारण कायद्याचे कडकपणामुळें होणाऱ्या अन्यायी प्रकारांना आळा घालण्याकरतां इक्विटीच्या नियमांचा उगम झाला त्याचप्रमाणें कायदेशीर क्लृप्त्यांनींहि पुष्कळ वेळां व्यवहाराची व कायद्याची होणारी फारकत टाळण्यांत आली. (कांहींचे मतें अशी फारकत घडवून आणली.) असल्या क्लृप्त्यांपैकीं दत्तकाचा कायदा हा एक भाग आहे. अ चा मुलगा ब नें दत्तक घेतला कीं जरी तो मुलगा जन्मानें अ चा मुलगा असला तरी दत्तकानंतर कायदा त्यास अ चा मुलगा म्हणून ओळखत नाहीं; तर तो ब चाच मुलगा असें कायदा समजतो. अशाच पुष्कळ क्लृप्त्या इंग्रजी कायद्यांत आहेत.

निर्णायक अनुमानें—हीं अनुमानें कायद्यानें सर्व न्यायदानाचे कामीं उपयोगांत आणलींच पाहिजेत असा निर्बंध करून घातलेलीं असतात. अशा अनुमानांचे दोन तीन प्रकार इंग्रजी कायद्यांत आहेत. अनुमानांच्या एका प्रकारास नैसर्गिक (Natural) अनुमानें म्हणतात. या प्रकारच्या अनुमानांच्या बाबतींत पुरावा देऊन तीं खोटीं पाडतां येतात. दुसरा अनुमानांचा प्रकार म्हणजे कायद्यानें ठरविलेलीं अनुमानें. यांचे बाबतींत वस्तुस्थितीचा विचार करण्याची मुभा न्यायदान करणाऱ्यास कायद्यानें दिलेली नसते; पण यांपैकीं कांहीं अनुमानें विरुद्ध पुराव्यानें नाशाबीद करतां येतात. उदा. प्रत्येक आरोपी मनुष्य हा दोषी ठरेपर्यंत निरपराधी समजला पाहिजे. हें अनुमान त्या आरोपीच्या गुन्हेगारीचा पुरावा देऊन खोटें पाडण्यास कायद्यानें परवानगी असते. पण असाहि एक लहानसा अनुमानांचा वर्ग आहे कीं त्यांतील अनुमानें खोटीं पाडण्याची मुभादेखील कायद्यानें ठेवलेलीच नाहीं. उदा. विवाहित स्त्रीला नवऱ्याचे हयातींत, अथवा, मृत्यूनंतर अथवा काडीमोडीनंतर दोनशेऐंशी दिवसांत झालेलें प्रत्येक मूल तिच्या नवऱ्याचेंच मूल असें निर्विवादपणें मानावें असा कायदा आहे. या नियमाला एकच अपवाद तो हा कीं मुलाच्या जन्मापूर्वीं जेव्हां त्या गर्भाची धारणा झाली असण्याचा संभव असेल त्यावेळीं जर नवऱ्याला बायकोची भेट घेणेंचें अशक्य होतें असें दाखविलें तरच फक्त हें अनुमान काढण्याचें कारण नाहीं. असलीं अनुमानें ठरवून देण्यांत कायद्याचा मुख्य उद्देश, जर असा नियम घातला नाहीं तर अनास्था प्रसंग होतो, तो टाळण्याचा असतो.

अशा प्रकारें कायदा हा केव्हां प्रत्यक्ष व्यवहाराहून भिन्न असतो व त्यामुळें कायद्यास कांहीं नांवें ठेवूं शकतात. चार्लस डिकन्सच्या पिकविक् पेपर्समध्यें "कायदा गाढव आहे." असे उद्‌गार एका पात्राचे तोंडीं घातले आहेत याचें कारण हेंच आहे.

हिंदुस्थानांत इंग्रजी अंमलापासून पाश्चात्य न्यायदान पद्धतीचाच पुरस्कार झालेला आहे.

पौषः—हिंदूंच्या कालमापनपद्धतीप्रमाणें येणारा वर्षांतील हा दहावा महिना आहे. हा महिना इंग्रजी डिसेंबर महिन्याच्या सुमारास व शिशिर ऋतूच्या आरंभीं येतो. पौष मासांतील पौर्णिमा पुष्य नक्षत्रानें युक्त असते म्हणून चांद्रमानाप्रमाणें या महिन्यास 'पौष' असें म्हणतात. चांद्रमानाप्रमाणें महिन्यास नांवें देण्यापूर्वीं प्राचीनकाळीं यास 'सहस्य' असें नांव होतें. या महिन्यांत लग्न, मुंजी वगैरे शुभ कार्यें करीत नाहींत; पण घराच्या पायाचा दगड बसविणेस हा महिना उत्तम मानला आहे. याला धनुर्मास मानीत असून सूर्योदयापूर्वीं ब्राह्मणास भोजन घातल्यास न कळत केलेल्या पापाचें क्षालन होतें असें शास्त्र आहे.

या महिन्यांत मकर नांवाच्या नक्षत्रराशींत सूर्य प्रवेश करीत असल्यानें 'मकरसंक्रमण' हा मोठा सण लोक साजरा करतात. मकरसंक्रमण पौष मासांत जानेवारीच्या ११ पासून १४ तारखेच्या दरम्यान होत असतें. इंग्रजी कालमानपद्धतीप्रमाणें तें २३ डिसेंबरला होतें. हिंदु कालमापनपद्धति चांद्रमास व चांद्र वर्षावर व इंग्रजी कालमान पद्धति सौरवर्षावर अवलंबून असल्यानें हा फरक येतो. या दिवसापासून—संक्रमणदिवसापासून अथवा संक्रांतीपासून—उत्तरायण सुरू होतें. आर्यलोक एका काळीं उत्तरध्रुवावर राहात होते.

तेव्हां तेथें सहा महिन्यांचा दिवस व सहा महिन्यांची रात्र असे. मकरसंक्रमणाचे दिवशीं ही रात्र संपून सूर्यनारायण प्रथमच दर्शन देत असल्यानें सर्वांस अत्यानंद होई व उत्सव करण्यांत येई. तोच उत्सव हल्लीं आम्ही मकरसंक्रमणाच्या दिवशीं संक्रांत म्हणून करतों. हा संक्रांतीचा खरा इतिहास असतां पंचांगकर्त्यांनीं संक्रमणाची संक्रातिदेवी ठरवून, ती संकरासुराचा त्या दिवशीं नाश करते अशी कथा रचून, एखाद्या वाहनावर बसून एका दिशेहून दुसऱ्या दिशेस जात असते असें सांगून निरनिराळें संक्रांतिफल वर्तविलेलें असतें.


या संक्रातीच्या आदल्या दिवसास भोगी नांव असून त्या दिवशीं स्त्रिया वस्त्रालंकारांनीं मंडित होऊन सौभाग्यद्रव्यें देतात व खिचडी, बाजरीची तीळमिश्रित भाकरी व लोणी वगैरे पदार्थ देवास अर्पण करतात. संक्रातीच्या शुभ प्रसंगीं प्रेमवृद्धि व्हावी म्हणून हळदकुंकू व तिळगूळ देण्याची चाल प्रचलित आहे. संक्रमणाच्या दिवशीं समुद्रस्नान, गंगास्नान, तीळतर्पण, श्राद्ध, दान हे विधीहि सांगितलेले आहेत. यावेळीं हिंदुस्थानांत वाहणारे वारे बदलतात. ते आतां ईशान्येकडून वाहूं लागतात. हवेमध्येंहि यामुळें फरक पडतो. पाऊस थांबल्यानें कापणी व मळणी उरकून शेतकरी आनंदांत असतात. घरीं गूळ अगर साखर व तीळ पूर्वींच आलेले असतात. म्हणून तिळगूळ वाटण्याची चाल रूढ झाली आहे. उत्तरायणाचा प्रारंभ झाल्यापासून सृष्टी रमणीय स्वरूप धारण करते. फुलें, फुलपाखरें, निरभ्र आकाश व त्यांतील तारांगण, पुष्पपर्णांनीं विनम्र झालेले वृक्ष, व लता, अमृततुल्य कौमुदी, प्रसन्न चंद्रमा, शांत असा रत्नाकर, मंद मंद वाहणारे झरे व नद्या यांमुळें मन प्रसन्न होतें व ईश्वराचें तेजोमय सान्निध्य भासूं लागतें. दिवस अधिकाधिक लांब होत जातो. यात्रादि कार्यास अधिक काल मिळूं शकतो. म्हणून प्रयागस्नान, शाकंभरी नवरात्र, सिद्धरामेश्वरयात्रा, माघस्नानारंभ, सूर्यकिरणोत्सव, निवृत्तीनाथयात्रा, विशालतीर्थयात्रा इत्यादि यात्रा व उत्सव या महिन्यांत येतात. संक्रमण उत्तरायणाचा हा काल जसा हिंदूंचा सणाचा व यात्रेचा काल आहे तसाच तो इतरत्र देशांतहि आहे. खिश्चनांचा खिस्मस व वर्षारंभ याच महिन्यांत येतो. तिळगुळाप्रमाणें खिश्चन लोक मनुकांचे पक्वान्न (Plum Cake) एकमेकांकडे पाठवितात. रोमन लोकांत या संक्रमण दिवशीं अंजीर, खजूर व मध आप्तेष्टांकडे पाठविण्याची चाल होती. शुभेच्छादर्शक पत्रेंहि ते आप्तेष्टांस पाठवितात. यावरून उत्तरायणाचा काल म्हणजेच पौष महिना पवित्र मानून त्याप्रीत्यर्थ उत्सव साजरे करण्याची चाल सर्वत्र असल्याचें दिसून येतें.

पंचकन्याः—पूर्वींचे लोक पापाचा नाश व्हावा म्हणून प्रतिदिवशीं सकाळीं उठल्याबरोबर सीता, मंदोदरी, अहिल्या, तारा व द्रौपदी या पांच पुण्यस्त्रियांचीं नांवें घेत असत. या स्त्रियांपैकीं सीता रामाची, मंदोदरी रावणाची, अहिल्या गौतमाची, तारा वालीची व द्रौपदी पांडवांची स्त्री होय. वरील पांच स्त्रियांचें पतीसंबंधींचें नैष्ठिक वर्तन अतिशय चांगलें असल्यामुळें रोज त्यांचें आदरपूर्वक स्मरण करून त्यांचे सद्गुण आठवावेत व त्यांच्याप्रमाणें स्त्रियांनीं होण्याचा प्रयत्न करावा, असा त्यांच्या प्रातःस्मरणाचा अर्थ आहे. लोक म्हणतात तो श्लोक असा—

अहिल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा।
पंचकन्या स्मरेन्नित्यं महापातकनाशनम्॥

पंचगव्यः—गोमय, गोमूत्र, गोदुग्ध, गोघृत व गोदधि या पांच पदार्थांच्या मिश्रणाला पंचगव्य म्हणतात. वरील वस्तूंपैकीं प्रसंगोपात्त जर दूध, तूप व दहीं हे पदार्थ गाईच्या दुधाचे मिळाले नाहींत तर म्हशीच्या दुधाचे घालतात व कार्यभाग चालू करतात. हें पंचगव्य धार्मिक विधीला आरंभ करण्याच्या पूर्वीं संध्येच्या तीन पळ्या घेतात. पंचगव्यसेवनाचा हेतु शरीरशुद्धि व्हावी हा आहे. हें तयार करण्याचें प्रमाण—वाटीभर पंचगव्यांत अर्धी वाटी दूध, डावभर दही, चहाचे दोन चमचे तूप, डावभर गोमूत्र व गोमय (गाईचें शेण) चवली भार. वरील पांचहि पदार्थांचे गुणधर्मः—गोमय—जंतुनाशक, गोमूत्र—अस्थिसंवर्धक, गोदुग्ध—शक्तिवर्धक, गोघृत—अग्निप्रदीपक व गोदधि—शीतवर्धक.

पंचद्रविडः—ब्राह्मणांच्या मुख्य दहा पोटजाती आहेत. त्यांपैकीं पांच पांच जातींचे दोन मुख्य भेद असून पहिल्याला पंचद्रविड व दुसऱ्याला पंचगौड या नांवानें ओळखतात. पंचद्रविड हा वर्ग तैलंग, द्राविड, कर्नाटक, महाराष्ट्र व कोंकण येथील ब्राह्मणांचा बनलेला आहे. कोणी कोणी तेलंगी, द्राविड, महाराष्ट्रीय, कर्नाटकी व गुर्जर या पांच पोटजातींचा समावेश पंचद्रविडांत करतात. पूर्वी या पांचहि जातींत रोटीबेटी व्यवहार होत नसे; पण अलीकडे रोटीव्यव-



पंचमढीः—१ सार्वजनिक बाग. २ पंचमढींतील वनश्रीचा एक देखावा. ३ पंचमढी क्लब.

हार सर्रास चालू झाला असून महाराष्ट्रीय व कर्नाटकीय ब्राह्मणांत बेटीव्यवहार सुद्धां होऊं लागले आहेत. महाराष्ट्रांत कोंकणस्थ, शैव, वैष्णव, माध्यंदिन, देशस्थ, कऱ्हाडे, देवरुखे, सवाशे, वाणस इत्यादि नांवाचे जे ब्राह्मण आहेत त्यांच्यांत रोटीबेटीव्यवहार मोठ्या प्रमाणांत घडून येऊं लागलेला आहे. वरील पोटप्रकारांतील सर्व ब्राह्मणांचा पंचद्रविडांतच समावेश होतो.

पंचमढीः—मध्यप्रांतांतील थंड हवेचें ठिकाण. मध्यप्रांतांतील हुशंगाबाद जिल्ह्यामधल्या सोहागपूर तहसिलींत हें ठिकाण आहे. हें सातपुडा पर्वताच्या डोंगरसपाटीवर असून याची उंची ३५००' पेक्षां अधिक भरते. पंचमढीचें क्षेत्रफळ २३ चौ. मैल होईल. पंचमठी या शब्दाचें 'पंचमढी' हें रूप होय. या ठिकाणीं पांच गुहा अद्यापहि पाहावयास मिळतात. धूपगड, महादेव व चौरागड हीं शिखरें येथून जवळच असलेलीं आढळतील. मे महिन्यांत येथील पारा ८५° असतो. या ठिकाणची ऑक्टोबर महिन्यांतील हवा आनंदकारक असते.

पावसाचें मान सरासरी ७७″ असतें. तेथें लष्करी छावणी आहे. १८८५ त या गांवीं म्युनिसिपालिटी स्थापली गेली. पंचमढीस जी.आय.पी. रेल्वेच्या पिपरिया स्टेशनहून जावें लागतें. स्टेशनपासून ही ३२ मैल दूर आहे. येथील डचेस हा धबधबा, गव्हमेंट हाऊस, क्लब वगैरे ठिकाणें बघण्यासारखीं असून येथील वनश्री सुंदर आहे.

पंचमहाकाव्यें:–महाकाव्याच्या लक्षणाप्रमाणें संस्कृतमध्यें अनेक काव्यें महाकाव्याच्या कक्षेंत येतील. तथापि इतरांना हा मान न मिळतां तो रघुवंश, कुमारसंभव, किरातार्जुनीयम्, शिशुपालवध व नैषधचरितम् या पांचांनाच लाभला आहे. या पांचांपैकीं पहिलीं दोन महाकाव्यें कालिदासाचीं असून किरातार्जुनीयम् हें भारवीचें होय. 'शिशुपालवध' या काव्याचा कर्ता भाट कवि असून नैषधचरितम्‌ची रचना श्रीहर्षानें केली. रघुवंशाची उभारणी रघुराजाच्या कुलवंशाच्या कथाभागावर केली गेली; तर कुमारसंभवाच्या काव्याला शंकराचा थोरला मुलगा षडानन (कार्तिकेय) याच्या जन्मपूर्व प्रसंगाचा आधार घेतला गेला. भारवीनें अर्जुन व शंकर यांच्या विशिष्ट कालांमधला प्रसंग घेऊन किरातार्जुनीयम् या काव्याला जन्म दिला, तर शिशुपालाच्या वधावरच काव्यलेखन करून माघकवीनें स्वतःचें नांव व कृति अजरामर करून ठेवली. तसेंच नळ राजाच्या आयुष्यावर नैषधचरितम् काव्याची मांडणी श्रीहर्षानें केली. अर्थगौरव, पदलालित्य, उपमा या दृष्टीनें हीं पांच महाकाव्यें सर्वांना चांगल्या प्रकारानें परिचित आहेत असें जुनें मत आहे.

पंचमहापातकें:- ब्रह्महत्या, दारू पिणें, सोन्यादिकांची चोरी करणें, गुरुपत्नीगमन व कुसंगति हीं पांच महापातकें होत असें हिंदुधर्मशास्त्र सांगतें. यांतील कुसंगति म्हणजे पहिलीं चार पातकें करणाऱ्यांशीं संबंध ठेवणें. या पांच पातकांपैकीं प्रत्येक पातकासमान असलेलीं दुसरीं पातकें शास्त्रानें सांगितलीं आहेत. आपल्या फायद्याकरितां खोटें बोलणें, गुरुनिंदा करणें व मरणाची शिक्षा होईल अशी चहाडी करणें हीं पातकें ब्रह्महत्येसमान आहेत. वेदनिंदा, वेद विसरणें, खोटी साक्ष देणें, मित्रवध हीं पातकें सुरापानाच्या तोडीचीं आहेत. ठेव गिळंकृत करणें, मनुष्य, जनावर, द्रव्य, भूमि इत्यादिकांची चोरी करणें हीं पातकें सोन्याच्या चोरीसमान समजावींत. सख्खी बहीण, कन्या, चांडाळी, मित्रस्त्री, सून इत्यादिकांशीं समागम करणें हीं पापें गुरुपत्नीगमनासारखीं आहेत.

पंचमहाभूतें:–सृष्टीच्या घटनेस कारणीभूत झालेलीं मुख्य तत्त्वें. हीं मुख्य व पांचच असल्यामुळें या सर्वांस पंचमहाभूतें असें म्हणतात. हीं तत्त्वें किंवा भूतें येणेप्रमाणें–पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश. ही सृष्टी जमीन, पाणी, प्रकाश, वारें व आभाळ यांची बनली आहे. येथें पृथ्वी म्हणजे जमीन, तेज म्हणजे प्रकाश किंवा उजेड, वायु म्हणजे हवा व आकाश म्हणजे पोकळी आणि आप म्हणजे पाणी अशीं व्यवहारांतलीं नांवें आहेत. वरील पांच तत्त्वें एकत्र होऊनच पशु, पक्षी, मनुष्य, वृक्ष, वनस्पति यासारखी सजीव सृष्टि व दगड, लाकूड यांची निर्जीव सृष्टीची घडण झाली आहे.

पंचमहायज्ञ:–यज्ञ म्हणजे स्वार्थत्यागपूर्वक पूजन करणें. सर्व यज्ञांत ब्रह्मयज्ञ, पितृयज्ञ, देवयज्ञ, भूतयज्ञ व मनुष्ययज्ञ हे प्रमुख असल्यामुळें यांस महायज्ञ म्हणतात. ब्रह्मयज्ञ म्हणजे अध्ययन व अध्यापन करून समाजाची एकी करणें होय. पूर्वजांच्यासारखें पराक्रमी होणें व त्यांचें स्मरण करणें हें पितृयज्ञानें घडून येतें. आरोग्य व आनंद यांच्या प्राप्तीसाठीं देवयज्ञ करावयास हवा. मनुष्येतर प्राण्यांविषयीं स्वार्थत्याग करणें याचें नांव भूतयज्ञ, अतिथि, अनाथ, अपंग अशा लोकांना शक्तीप्रमाणें दानधर्म केला तर मनुष्ययज्ञाची सांगता होते. अशाप्रकारें हे पंचमहायज्ञ राष्ट्रोपयोगी आहेत. हे जेथें होतात तेथें उत्कर्ष ठेवलेलाच आहे.

पंचमहाशद्व:–राजालाच अधिकार असलेलीं वाद्यें. सध्यां चौघड्यांत झांज, नगारा, कर्णा, चौघडा व पिपाणी या पांचांचा समावेश होतो. हल्लींदेखील याचा मान राजालाच आहे. पूर्वीं शिंग किंवा कर्णा (शृंग), ताशा (राम्मट), शंख, नगारा (भेरी) व तास किंवा घड्याळ (नान्दी) यांचा पंचमहाशब्दवाद्यांत समावेश होत असे. बाणभट्टानें पटह (नगारा) नान्दी (झांज), कुंज, काहळ व शंख असा त्यांचा उल्लेख केला आहे. बाणाच्या कुंज व काहळ या वाद्यांचा बोध होत नाहीं. तास, शिंग, ताशा व शंख हीं वाद्यें राजाशिवाय अन्य मंडळींना उपयोगांत आणतां येतात. शिंग व ताशा हीं वाद्यें तर आतां गोरगरीबांच्या शुभकार्यांत सर्रास उपयोगांत येऊं लागलेलीं दिसतात. तसेंच तास नि शंख यांचा सार्वत्रिक वापर आरती वगैरे गोष्टींसाठीं होऊं लागलेला आहे.

पंचांगः–तिथि, वार, नक्षत्र, योग नी करण या पांचा-संबंधीं विशेष माहिती असलेलें पुस्तक. आपले सण, व्रत, पुण्यतिथ्या, जयंत्या, यात्रा वगैरे गोष्टी तिथी नक्षत्रावर होत असल्यामुळें पंचांगासंबंधीं माहिती असणें इष्ट आहे. प्रथम तिथि, नक्षत्र, योग, करण व वार म्हणजे काय यासंबंधीं माहिती घेऊन नंतर पंचांगांत त्यांची मांडणी कशी केलेली असते तें पाहूं. आपल्या पंचां-गाची उभारणी चांद्रवर्षावर केली आहे. चंद्राला पृथ्वी-प्रदक्षिणा करण्यास २९॥ (सर्वसाधारण) दिवस लागतात. अशा त्याच्या बारा फेऱ्या झाल्या म्हणजे त्याचें एक वर्ष पुरें होतें. यासच चांद्रवर्ष म्हणतात. त्याला पृथ्वी-प्रदक्षिणा करण्यास जो काळ लागतो त्यास महिना किंवा मास म्हणतात. त्याच्या पृथ्वीप्रदक्षिणेचा जो मार्ग आहे त्याचे तीस समान भाग केले तर त्यांपैकीं एक भाग चालण्यास जी वेळ लागते तीस तिथि समजतात. पृथ्वीभोंवतीं चंद्र नेहमीं एकाच वेगांत फिरत नाहीं; त्यामुळें त्याला पृथ्वीभोंवती प्रदक्षिणा करण्यास केव्हां २४ तास लागतात, कधीं अधिकही लागतात, कधीं कमीही लागतात. त्यामुळें तिथीचे क्षयवृद्धि हे प्रकार सुरू असतात. आदल्या दिवशीं सकाळीं तिथि असून दुसऱ्या दिवशीं सकाळीं जर ती असेल तर तिथीची वृद्धी झाली म्हणतात. याच्या उलट क्षय-तिथी समजावी. सकाळीं सूर्योदयाला जी तिथी असेल ती त्या दिवसाची तिथी होय. या तिथ्या ३० आहेत. या तिथ्यांचे दोन भाग केले आहेत. पहिल्या पंधरा तिथींना–पहिल्या पक्षाला–शुक्लपक्ष व दुसऱ्या पंधरांना कृष्णपक्ष म्हणतात. १ ल्या तिथीला–प्रतिपदा, २रीला द्वितीया, ३रीला तृतीया, ४थीला चतुर्थी, ५वीला पंचमी, ६वीला षष्ठी, ७वीला सप्तमी, ८वीला अष्टमी, ९वीला नवमी, १०वीला दशमी, ११वीला एकादशी, १२वीला द्वादशी, १३वीला त्रयोदशी, १४वीला चतुर्दशी व १५वीला पौर्णिमा म्हणतात. कृष्णपक्षांतील १ ते १४ तिथ्यांना वरीलच नांवें आहेत. फक्त शेवटच्या तिथीला पौर्णिमेच्या ऐवजीं 'अमावास्या' असें नांव आहे. कृष्णपक्षाला वद्य पक्ष असेंही म्हणतात. शुक्ल पक्षांत चंद्राच्या कलांची दरदिवशीं वृद्धी होते तर वद्यपक्षांत त्याच्या कलांचा दिवसेंदिवस क्षय होतो.

वार–एका सूर्योदयापासून दुसरा सूर्योदय होईपर्यंत जो काल त्यास वार म्हणतात. हे वार सात असून त्यांना ग्रहांचीं नांवें दिलीं आहेत. या वारांना रविवार (याला आदितवार असेंहि म्हणतात), सोमवार, मंगळवार (भौमवार असेंही याचें आणखी एक नांव आहे), बुधवार, गुरुवार (कित्येक याला बृहस्पतिवार किंवा बेस्तरवार या नांवानें ओळखतात), शुक्रवार, शनिवार (याचें दुसरें नांव मंदवार), अशीं नांवें आहेत. सोमवाराला पंचांगांत चंद्रवार म्हणतात.

नक्षत्रें–आकाशस्थ ज्योतीपैकीं क्रांतीवृत्तावरील तार-कांचे समूह. हे एकाच ठिकाणीं अचल असतात. म्हणून त्यांना नक्षत्रें म्हणतात. पंचांगांत नक्षत्र म्हणजे सूर्याच्या प्रदक्षिणेच्या मार्गाचा सत्ताविसावा भाग असें मानतात. या सत्तावीस भागांचीं नांवें याप्रमाणें–अश्विनी, भरणी, कृत्तिका, रोहिणी, मृग, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, ज्येष्ठा, मूळ, पूर्वाषाढा, उत्तरा-षाढा, श्रवण, धनिष्ठा, शततारका, पूर्वाभाद्रपदा उत्तरा भाद्रपदा व रेवती. हे सत्तावीस भाग हिंडण्याला पृथ्वीला ३६७ दिवस लागतात व एक भाग पुरा करण्याला १३ किंवा १४ दिवस हवे असतात. चंद्राच्या मार्गांत रोज नवें नक्षत्र येतें. (नक्षत्रें पृष्ठ १०६४ पाहा).

योग–चंद्रसूर्याच्या विवक्षित गतीची बेरीज. उभय-तांची विवक्षित बेरीज, १३ अंश २० कला होण्यास जो काल लागतो त्यास योग म्हणतात. हे योग २७ असून त्यांचीं नांवें:–१ निष्कंभ, २ प्रीति, ३ आयुष्य-मान्, ४ सौभाग्य, ५ शोभन, ६ अतिगंड, ७ सुकर्मा, ८ धृति, ९ शूल, १० गंड, ११ वृद्धि, १२ ध्रुव, १३ व्याघात, १४ हर्षण, १५ वज्र, १६ सिद्धि, १७ व्यतिपात, १८ वरीयन्, १९ परीघ, २० शिव, २१ सिद्धि, २२ साध्य, २३ शुभ, २४ शुक्ल, २५ ब्रह्मा, २६ ऐंद्र व २७ वैधृति. यांपैकीं व्यतिपात व वैधृति हे योग फारच वाईट समजतात.

करणें–तिथीचा अर्धा भाग. एका तिथीच्या कालांत दोन करणें येतात. करण काढण्याची रीत–तिथीच्या घटकांची दुप्पट करून तींत एक कमी करावा. बाकीला सातनें भागून जी बाकी उरेल तेंच करण होय. हे करण ११ आहेत. त्यांचीं नांवें–१ बव, २ बालव, ३ कौलव, ४ तैतिल, ५ गर, ६ वणिज, ७ विष्टि, ८ शकुनी, ९ चतुष्पाद, १० नाग व ११ किंस्तुघ्न हीं होत. या करणांपैकीं शकुनी हें करण नेहमींच वद्य पक्षांतील चतुर्दशीच्या उत्तरार्धांत येतें. इतर कोणत्याही दिवशीं तें नसतें. अमावास्येलाच नाग

व चतुष्पाद हे योग येतात. किंस्तुघ्न हें नेहमींच शुक्र प्रतिपदेच्या पूर्वार्धांत असतें. प्रतिपदेच्या उत्तरार्धांत बव, द्वितीयेला बालव व कौलव, तृतियेला तैतिल व गर याप्रमाणें करणांचीं नेहमीं स्थिति असते.

याशिवाय पंचागांत, पुष्कळ प्रकारचे व्यवहार व धर्मोपयुक्त गोष्टी दिलेल्या असतात. त्या कळण्यासाठीं पंचांग पाहतां येणें ही एक आवश्यक गोष्ट होय. **पंचांग पाहण्याची माहिती**—पहिल्या पानावर संवत्सराचें नांव, शालीवाहन, विक्रम शक, इसवी सन, फसली सन इत्यादि सनांची माहिती असते. तें उघडल्यास पुढें क्रमानें राजावली, घातचक्र, अवकहडाचक्र, नवग्रहांचीं दानें व जप, मुहूर्त, ग्रहणें, संक्रांतिफलें इत्यादि महत्त्वाच्या गोष्टींचा उहापोह केलेला असतो. यानंतर प्रत्येक पक्षाला एकेक याप्रमाणें २४ पृष्ठें पाक्षिक माहितीसाठीं असतात. एक पृष्ठावर एका पंधरवड्याची माहिती. पृष्ठाच्या शिरोभागीं शक, संवत्सर, मास, पक्ष, ऋतु, विक्रम, फसली यांचा नामनिर्देश केला जातो. त्याच्याखालीं उभ्या बावीस व आडव्या १५ घरांचा एक मोठा चौकोन असतो. माहिती आडवी पाहावयाची. पहिल्या घरांत तिथी, दुसऱ्यांत वार, ३ व ४ मध्यें तिथींचीं घटका व पळें, ५, ६, ७ त अनुक्रमें नक्षत्राचें नांव, त्याच्या घटका व पळें; ८, ९, व १० घरांत क्रमानेंच योगाचें नांव, त्याच्या घटका पळें; ११, १२, १३ मधल्या घरांत करणाचें नांव, घटका व पळें याचा नामनिर्देश केलेला असतो. १४ व्यांत दिनमान १५, १६, १७ आणि १८ या घरांत पार्शी, मुसलमानी, फसली सनाच्या महिन्याची व इंग्रजी या महिन्यांतील तारखा नमूदलेल्या असतात. १९ व्या व २० व्या घरांत सूर्याचे उदय व अस्त लिहिलेले असतात. २१ व्यांत चंद्र कोणत्या राशींत आहे याचें विवेचन करून शेवटच्या घरांत कोणाची जयंती, पुण्यतिथी, संकष्टी, यात्रा, प्रदोष, एकादशी, सण, इत्यादि बाबींचा खुलासा केलेला असतो.

यानंतर खालीं पंधरवड्याचें ग्रहमान दाखविणारी कुंडली, मुहूर्त इत्यादि प्रकारची माहिती ग्रथित केलेली असते.


पंचामृत—साहित्य—पाणी, चिंच, मीठ, गूळ, मिरची, काजू, भुईमुगाचे दाणे, भुईमुगाच्या दाण्यांची पूड, तीळ, खोबरें, मोहरी, गोडें तेल व फोडणीचें सामान. **माप**—अच्छेर पाणी, लिंबाएवढी चिंच, तितकाच गूळ, मीठ अदमासें, दाणे, तीळ, काजू, खोबरें हे प्रत्येकीं डावभर, मोहरी एक चहाचा चमचा. फोडणीसाठीं स्वयंपाकाच्या पळीभर तेल. **कृति**—चिंच निवडून भिजत घालावी. ओल्या मिरच्यांचे बारीक तुकडे करावेत. भुईमुगाचे दाणे भिजत घालून सोलावेत. तीळ भाजून घ्यावेत. ओल्या खोबऱ्याचे चिरून बारीक तुकडे करावेत. मोहरी भाजून तिची बारीक पूड करावी. भाजलेल्या दाण्यांची थोडी पूड करावी. नंतर तीळ व दाण्यांची पूड एकत्र बारीक वाटावी. ही सर्व तयारी झाल्यावर मग कल्हईच्या पातेल्यांत तेल टाकून चांगली फोडणी करावी. फोडणींत मिरच्यांचे तुकडे घालावेत. मग चिंच कोळून तें पाणी घालावें व त्याच्यांत वर लिहिलेलें सर्व सामान घालून चांगलें शिजवावें. तिळाची व दाण्याची पूड घातल्यानें पंचामृत चांगलें मिळून येतें. मोहरीची पूड आवडत असल्यास घालावी. हें २–३ दिवस टिकतें. ह्याच्यांत पाण्याऐवजीं नारळाचें दूध घातल्यास तें जास्त रुचकर लागतें.

पंढरपूरः—सोलापूर जिल्ह्यांतील एक पवित्र क्षेत्र व तालुक्याचें गांव. बार्शी लाईट रेल्वेच्या फाट्यावरील एक प्रमुख ठिकाण. याचे उत्तर अक्षांश १७° ४०° व पूर्व रेखांश ७५° २३° आहे. पंढरपूरची लांबीरुंदी अनुक्रमें एक मैल व अर्धा मैल होईल. या गांवची वस्ती ३०।३५ हजार भरेल. या वस्तींत ब्राह्मणवर्ग मोठा असून इतर वर्ग लहान आहेत. येथील उष्णतामान ९०° चे घरांत असून कधीं कधीं तें १०३°–४° पर्यंतहि वाढतें. या ठिकाणीं सर्व वर्षांत साधारणपणें २० इंचापर्यंत पाऊस पडतो. येथें उन्हाळ्यांत उकाडा फारच होतो. पाऊस कमी व यात्रेस येणारे लोक फार यामुळें या गांवांतील घरें तीन तीन मजलीं असून धाब्याचीं असतात. येथें कोरडी व थंड हवा आषाढ ते कार्तिक अखेर असते. त्यामुळें या कालांत पंढरपुरास राहणें सुखकारक वाटतें. गांवांतील चारदोन प्रमुख रस्ते सोडले तर बोळवजाच रस्ते आहेत. गांवच्या पश्चिमेस स्टेशन व पूर्वेस भीमानदी आहे. या नदीला विठोबाचे भक्त चंद्रभागा असें म्हणतात. चंद्रभागा म्हणण्याचें कारण येथें नदीला चंद्रकोरीप्रमाणें वांकण आहे हें होय. नदींत भलें मोठें वाळवंट असून त्यांत यात्रेच्या वेळीं प्रवचनें व भजनें चालतात.

येथून गावांत जाण्यास अकरा घाट असून ते १७५७ पासून १८२६ पर्यंतच्या काळांतील होत. या क्षेत्राची प्रसिद्धी व महत्त्व देवगिरीच्या यादवापासून आतांपर्यंत अखंड टिकलें आहे. गांवांत, अनेक तीर्थें, मठ, देवळें असून त्या सर्वांत प्रमुख देवालय विठोबाचें होय. हें देवालय गांवच्या मध्यावर उंच भागीं आहे. या देवळाची पूर्वपश्चिम लांबी ३५० फूट व दक्षिणोत्तर रुंदी १७० फूट आहे. देवालय भव्य,उंच व शोभिवंत असून गांवाबाहेरून व गांवांतील कोठल्याहि ठिकाणापासून तें दिसतें. या देवळाला पूर्व व उत्तर या दिशांना प्रत्येकीं तीन, पश्चिम व दक्षिण या दिशांना एकेक असे आठ दरवाजे आहेत. येथील मूर्ति विठोबाची असून ती साडेतीन फूट उंचीची व कर कटीवर ठेवून उभी असलेली अशी आहे. या देवाची पूजा अहोरात्र मिळून सहा वेळ होत असते. विठोबाशिवाय पुंडलिकाचें देऊळ, विष्णुपद व गोपाळपूर हीं ठिकाणेंहि महत्त्वाचीं समजतात. येथें बाराहि महिने वारीसाठीं बाहेरून लोक येत असतात. तथापि आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्रीच्या वारीला-विशेषतः आषाढीकार्तिकीच्या यात्रेला–फार लोक येत असतात. विठोबाचें देऊळ, गांवांतील कांहीं मठ व गाडगेबुवांची धर्मशाळा हीं ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत.

पंप:–स्टोव्हचा पंप, पाणी काढण्याचा पंप किंवा फुटबॉलमध्यें हवा भरण्याचा पंप असे अनेक प्रकारचे पंप आपल्या पहाण्यांत व वापरांत नेहमीं येतात. या सर्व पंपांमध्यें तत्त्व एकच आहे. कुठल्याहि पंपांत मुख्य भाग दोन असतात; एक झडप (Valve) व दुसरा भाग दट्या (Piston).

पाणी काढण्याच्या पंपाचा दांडा मागें ओढला कीं पंपांतील हवेचा दाब कमी होतो व झडप वर उचलली जाऊन बाहेरची हवा किंवा पाणी पंपांत शिरतें. हा पंपाचा दांडा (दट्ट्या) पूर्ण वर जाईपर्यंत हवा किंवा पाणी आंत शिरतें, यानंतर पंपाचा दांडा खालीं दाबला कीं पंपांतील हवेवरचा किंवा पाण्यावरचा दाब वाढून पंपाच्या तळाशीं (तोंडाशीं) असलेली झडप उघडते व बंद होते. याच वेळीं पंपाच्या दांड्यांत (दट्ट्यांत) असलेली झडप उघडते व या झडपेमधून त्या झडपेखालची हवा किंवा पाणी वर येतें. नंतर पुन्हां पंपाचा दांडा दाबला किंवा दांड्यांतील झडपेवर आलेल्या हवेचा किंवा पाण्याचा दाब त्यावर पडून ती बंद होते व हीच क्रिया चालू असते तोंपर्यंत पंपाच्या नळींतून पाणी बाहेर पडत राहतें. अशा यासंबंधींचा अगदीं साधा खुलासा आहे. पंपांतील हवा बाहेर पडलेली असते म्हणून आंतील पाण्यावर हवेचा दाब मुळींच राहात नाहीं; पण भोंवतालच्या पाण्यावर हवेचा दाब असतो आणि याच कारणामुळें पाणी पंपांत चढत असतें. साध्या पंपानें पाणी फक्त ३४ फूट उंच चढतें.



अ ब क ड

(अ) पंपांत नुसती हवा आहे. (ब) यांत पंपाचा दांडा खालीं दाबला गेल्यामुळें खालच्या पाण्याच्या दाबामुळें पंपाच्या तळाशीं असलेली झडप उघडून पाणी आंत शिरत आहे (शिरलें आहे). यानंतर पंपाचा दांडा वर उचलण्याच्या क्रियेमुळें पंपांतील पाण्याचा दाब पंपाच्या तळाशीं असलेल्या झडपेवर पडून ती बंद झाली असून (क) याच वेळीं पंपाच्या दांड्यांतील झडप उघडून (खालून वर येणाऱ्या पाण्याच्या दाबामुळें) वर पाणी शिरतें. यानंतर पंपाचा दांडा खालीं दाबला जातो, पंपाच्या दांड्यांतील (आकृतीमधील) झडप वरच्या पाण्याच्या दाबामुळें बंद होते व पंपाचा दांडा खालीं दाबला गेल्यामुळें (ड) दट्या वर सरून त्याच्यांतलि झडपेवरील नळींतलें पाणी नॉझल-(पाणी बाहेर पडणारें तोंड) वाटे बाहेर पडतें. याचप्रमाणें सारखी क्रिया चालू राहते व पाणी अखंड मिळत राहतें.

यापेक्षां अधिक उंचीवर पाणी चढवावयाचें असल्यास त्या कार्यासाठीं स्वतंत्र यांत्रिक रचनेचे पंप तयार केलेले असतात.

प्रत्येक चौरस इंचाच्या पृष्ठभागावर पंधरा पौंडापेक्षां किंचित् अधिक वजन होईल एवढा हवेचा दाब असतो.

प्रकाशः—ज्या एका साधनामुळें आपण वस्तू पाहतों तें साधन म्हणजे प्रकाश होय. हा प्रकाश सूर्यचंद्रादि तार्‍यांपासून जसा मिळतो तसाच इतर अनेक वस्तूंपासून कमीअधिक प्रमाणांत मिळतो. कृत्रिम रीतीनें आपल्याला प्रकाश निर्माण करतां येतो. उदा. दिव्यांतील वीज. ध्वनीप्रमाणें प्रकाश हाहि कंपामुळें (Vibrations) निर्माण होतो. मात्र ध्वनीचे कंप व प्रकाशाचे कंप यांत मुख्य फरक हा आहे कीं ध्वनीमध्यें हवेच्या लहरींनीं ध्वनी पसरला जातो तर प्रकाश हा ईथर(Ether)च्या लहरीमुळें पसरतो. दुसरा फरक हा कीं ध्वनी (नाद) सरळ किंवा वक्र मार्गानें पसरतो पण प्रकाश हा नेहमीं सरळ रेषेंतच पसरतो.

प्रकाश नेहमीं सरळ प्रकाशरेखा—किरणांनीं पसरतो. प्रकाशाचा वेग दर सेकंदास १८६।२८४ मैल इतका आहे. त्या मानानें ध्वनीची गती फारच कमी आहे. ध्वनीचा वेग दर सेकंदास फक्त ११२० फूट (कांहींच्या मतें १०९० फूट) आहे. याच कारणामुळें आकाशांत वीज चमकून गेल्यानंतर मग तिचा गडगडाट आपल्याला ऐकूं येतो.

प्रकाशपरावर्तन—कांहीं वस्तू अशा आहेत कीं त्या इतरांपेक्षां जास्त प्रकाशग्राही आहेत. उदा० पांढर्‍यापेक्षां काळें कापड जास्त प्रकाशग्राही असतें. त्याचप्रमाणें तकतकीत (polished) पदार्थापेक्षां खरबरीत पदार्थ जास्त प्रमाणांत प्रकाशपरावर्तनाची क्रिया करतात. ज्या कोनानें (angle) प्रकाशकिरण एखाद्या वस्तूवर येतात त्याच कोनानें ते परावर्तित होत असतात.

वक्रीभवन (refraction)—दोन निरनिराळ्या दाढ्यींच्या वस्तूंतून प्रकाशकिरण परावृत्त होतांना प्रकाशकिरणांचा मार्ग बदलतो. एखादी काठी स्वच्छ पाण्यांत बुडवून पाहिली तर याचें प्रत्यंतर येईल. प्रकाशकिरण त्रिपार्श्वकांतून (prism) पलीकडे जातांच वक्रीभवनक्रियेमुळें स्वच्छ प्रकाशाचें इंद्रधनुष्यांतील रंगाप्रमाणें जांभळा, पारवा, निळा, हिरवा, पिवळा,नारिंगी आणि लाल या क्रमानें पृथःकरण होतें. यालाच इंग्रजींत Spectrum म्हणतात.

प्रतापराव गुजर (मृत्यु स. १६७४ फेब्रु. २४):—विजापूरकराचा बहलोलखान शिवाजीवर निघाला तेव्हां शिवाजीनें त्यावर प्रतापरावाला रवाना केलें. उंबराणी येथें उभय पक्षांची गांठ पडली. ' उंबराणी ' मिरज व विजापूर यांच्या दरम्यान आहे. लढाई सूर्योदयापासून अस्तमानपर्यंत झाली. दोहींकडील लष्कर बहुत जाया झालें. नबाब (बहलोलखान) याची शिकस्त होऊन तिकोट्यास राहिले. पाण्यावांचून तर बहलोलचा जीव टेकीस आला. म्हणून शिवाजीच्या मुलखास हात लावणार नाहीं असें वचन देऊन तो तिकोट्यास परत गेला. तेथें त्यास विजापूरकडून ताज्या दमाचें कांहीं सैन्य मिळालें. तेव्हां तो प्रतापरावावर पुनः चालून आला आणि नेसरी येथें लढाई होऊन तीमध्यें हा २४ फेब्रुवारी १६७४ मध्यें पडला. एका खिंडींत सहा घोडेस्वारांनिशीं लढत असतां हा मारला गेला. कदाचित् कचाटांत सांपडलेल्या बहलोलला सोडलें म्हणून शिवाजीनें याला दोष दिला असेल व त्यामुळें हा बेहोष होऊन लढला असेल. याला प्रथम कडतोजी असें म्हणत. पण हा मोठ्या योग्यतेस चढल्यानंतर प्रतापराव नांव प्राप्त झालें असावें. याचा एक हिंदु व दुसरा मुसलमान असे दोन वंश आहेत. रायगडच्या युद्धाच्या वेळीं याचा एक वंश बाटलेला दिसतो. याचें वतनगांव भोसरी.

प्रतापसिंह भोसले (इ. स. १७९२ – १८४७):—साताऱ्च्या गादीवरचा शेवटचा राजा. हा साताऱ्च्या छत्रपति घराण्यांतील धाकट्या शाहूचा वडील पुत्र; चतुरसिंग भोसले यानें पेशव्यांच्या ताब्यांतून प्रतापसिंहास सोडविण्याची इंग्रजांकडे खटपट केल्यानें चतुरसिंगास त्रिंबकजीकडून रावबाजीनें पकडून कांगोरीस कैदेंत ठेवलें (स. १८११). तेथें तो स. १८१६ त वारला. पुढें प्रतापसिंहानें व त्याच्या आईनें गुप्त कारस्थानें करून इंग्रजांची मदत मागितली व ती एल्फिन्स्टननें आनंदानें देण्याचें आश्वासन दिलें. या सुमारास रावबाजी व इंग्रज यांच्यांत उघड उघड बेबनाव झाला होता व खडकीच्या लढाईची पूर्वतयारी चालली होती. शेवटीं अष्टी येथें इंग्रजांची व पेशव्यांची लढाई होऊन, बापू गोखले पडले; व पेशवे पुढें निसटले. या प्रसंगीं

अगाऊ सांकेतिक सूचना असल्यानें प्रतापसिंह हा मुद्दामच मराठ्यांच्या लष्करांच्या मागें राहिला होता. पेशवे गेल्यावर स्मिथ यानें याला आपल्या ताब्यांत घेतलें व बोलेसर येथें एल्फिस्टनकडे रवानगी करून दिली. त्यानें प्रतापसिंहास आणलें. तत्पूर्वीच ८ दिवस इंग्रजांनीं सातारा घेतला. मग पुढील स्वरूपाचा जाहीरनामा काढला. "बाजीराव राज्याचे उपयोगी नाहींत. थोडके दिवसांत त्यांचा ठिकाणा नाहीं असें होऊन छत्रपति सातारकर बाजीरावसाहेब यांचे कैदेंत आहेत, त्यांस सोडवून त्यांचें राज्य त्यांजकडे चालेल. ते दौलतीचे खावंद मुखत्यार आहेत. जो मुलुख महाराजांकडे होईल त्यांत न्याय इनसाफ हुकमत व अंमल करतील. गेलें तें राज्य पेशव्यांचें, महाराजांचें राज्य अबाधितच आहे." याप्रमाणें इंग्रजांनीं सर्व मराठी राज्य स्वतःच्या ताब्यांत घेऊन राज्याच्या मालकास फक्त १२ लक्षांचा मुलूख दिला व १४ पेस्व्यांचा एक जहागिरदार बनविलें. ग्रँट डफ याला साताऱ्यास रेसिडेंट म्हणून याच सुमारास नेमण्यांत आलें. प्रतापसिंहानें साताऱ्यास स. १८२२ त एक नवीन राजवाडा बांधलें व यवतेश्वराहून नळ आणून शहरांत ठिकठिकाणीं पाणी खेळविलें (स. १८२७) आणि जलमंदिर राजवाडाहि बांधला (सन १८२९).

पुढें इंग्रज आपल्याला निर्माल्यवत् मानतात व आपल्यावर निरनिराळ्या अपमानकारक नवीन अटी लादतात, हें प्रतापसिंहाच्या लक्षांत येऊन यानें त्यांच्याविरुद्ध खटपट सुरू केली. पुढें मुंबईचा गव्हर्नर कॉरनॅक यानें कांहीं अटी सांगून त्या कबूल करण्यास व माफी मागण्यास सांगितलें, परंतु तें प्रतापसिंहानें ऐकलें नाहीं. त्यामुळें इंग्रजी पलटणें पुण्याहून निघून साताऱ्यास आलीं (ऑगस्ट १८३९). त्यावेळीं बळवंतराव सेनापती यानें इंग्रजांशीं लढण्याची तयारी केली; परंतु प्रतापसिंहानें त्यास मनाई केली. अखेरीस प्रतापसिंहास पदच्युत करून (सप्टेंबर) निंबास नेऊन ठेवलें. स. १८५७ च्या बंडांत याचा संशय घेऊन याला कराचीस नेऊन ठेवलें. प्रतापसिंहानें आपलें राज्य परत मिळविण्याची पुष्कळ खटपट केली. विलायतेस माणसें पाठविलीं, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेर हालअपेष्टांत मराठ्यांच्या शेवटल्या छत्रपतीला मृत्यु आला.

प्रतापसिंह, राणा (१५४०-१५९७):—याचें खरें नांव प्रतापसिंह गुहिलोत. हा मेवाडचा महाराणा दुसरा उदयसिंह याचा पुत्र. ता. ९ मे १५४० ला याचा जन्म झाला. याच्या बापानें प्रतापसिंहाचा अधिकार बाजूला सारून आपल्या धाकट्या मुलास, आपल्यामागें गादीवर बसविण्याचा घाट घातला; पण उदयसिंहाच्या पश्चात् लोकांनीं यासच राज्याभिषेक केला. या राज्याभिषेकामुळें त्याचा धाकटा भाऊ जगमाल नाखूष होऊन अकबरला जाऊन मिळाला. बादशहानें, जहाजपूरचा परगणा, त्यास जहागीर म्हणून दिला व जगमालला आपल्याजवळ ठेवून घेतला. पण तो देवडा सुरताणबरोबर झालेल्या लढाईंत मेला.

बादशहानें राजा मानसिंहाला बरोबर पुष्कळ सैन्य देऊन दिग्विजय करण्यासाठीं बाहेर पाठवून दिलें. यानें उदेपुरांत येऊन महाराण्यास बादशाही सेवा स्वीकारण्याबद्दल पुष्कळ सांगितलें. पण महाराण्यानें या बाबतींत वाटाण्याच्या अक्षता लावल्या. पुढें कांहीं कालानंतर मानसिंगानें एकदां महाराण्याला उदयसागरवर मेजवानी दिली. हिला स्वतः महाराणा हजर न राहतां त्यानें मुलांस पाठविलें. प्रतापसिंहाच्या या कृत्यानें राजा मानसिंगाला आपला अपमान झाल्याप्रमाणें वाटलें व त्याचा सूड घेण्यासाठीं त्यासच पुनः बादशहानें परत पाठविल्यामुळें परत मानसिंह सैन्यासह स्वारी करण्याचे इराद्यानें आला.

१५७६ जूनमध्यें खमणोर येथें दोघांचें घनघोर युद्ध जुंपलें. युद्धाचें ठिकाण हें डोंगराच्या घाटांपाशीं सात कोसांवर आहे. या जागीं दोघांची चांगलीच लढाई झाली. तथापि जय असा कोणालाच मिळाला नाहीं. यामुळें बादशहा फारच क्रुद्ध झाला.

इकडे राण्यानें रजपुतांची संघटणा करून गुजराथ वगैरे बादशाही मुलुखावर छापे घालून बादशहाला त्रास देण्याचें कार्य सारखें चालू ठेवलें. यानंतर बादशहा ससैन्य मेवाडांत येऊन सहा महिने राहिला; पण बादशहाच्या सैन्याचा पाठलाग करून महाराण्यानें बादशहाचा चांगलाच पराभव केला. एकदां मिर्झाखाच्या स्त्रिया एका छाप्यांत याच्या हातांत पडल्या असतां यानें त्यांना बहिणींप्रमाणें मानून त्यांस सन्मानपूर्वक परत धाडल्या. या कारणानें मिर्झाखाच्या व इतरहि लोकांच्या मनावर याचा अतिशय वचक बसला. याशिवाय यानें अनेक पराक्रम केले. राण्यानें लुणा राठोडापासून छप्पन्न प्रांत घेऊन तेथें अखेरीस वसति-

स्थान केलें. तेथील बांधलेला महाल व चांमुंडेचें मंदिर अद्यापहि पाहण्यास मिळतें.

यानंतर अकबरानें शहाबाजखां व जगन्नाथ कछवाह यांजबरोबर सैन्य देऊन त्यांस राण्याचा बंदोबस्त करण्यास सांगितलें; पण त्याचा कांहींहि उपयोग न होतां उभय सरदार निराश होऊन परत निघून गेले.

राण्यानें चितोड व मांडलखेरीज सर्व मेवाड एकाच वर्षांत परत घेतला. सूडाच्या हेतूनें त्यानें आंबेर भागावर स्वारी केली व तिथलें संपन्न असलेलें ' मालपुरें ' हें नगर लुटलें. यानंतरचा त्याचा काल सुखांत गेला. तेवढ्या अवधींत यानें प्रजेला सुख देऊन बरोबरच्या सरदारांना मोठमोठ्या जागा देऊन त्यांचा गौरव केला.

शेवटीं महाराण्यानें आपल्या गादीविषयीं पूज्यभाव बाळगूं अशाबद्दल विश्वासूक लोकांकडून शपथा घेऊन आपला प्राण सुखानें सोडला. चावंड येथें यानें देह ठेवल्यावर त्याच्या शरीरास अग्निसंस्कार बंडोलीच्या ओढ्याच्या कांठीं झाला. तेथें पांढऱ्या दगडाची छत्री बांधलेली आहे.

प्रतापसिंहाला अकरा राण्या व सतरा मुलगे होते. याच्या मृत्यूनें अकबरासारख्या शत्रूलादेखील अतिशय वाईट वाटलें. या स्वातंत्र्यप्रिय राजाबद्दल सर्व लोकांच्या मनांत आदर आहे.

प्रथमोपचारः—आयुष्यांत असे कित्येकदां प्रसंग येतात कीं जेथें अपघातांत अगर विकारांत डॉक्टर उपचार करावयास येईपर्यंत, अडचणींत असलेल्याचा जीव बचावण्यासाठीं अगर त्यास अधिक व्यथा अगर इजा होऊं नये यासाठीं, योग्य इलाज करणें अत्यंत आवश्यक असतें. अशा उपायांना प्रथमोपचार (First aid to the Injured) असें म्हणतात. या उपायांचें ज्ञान प्रत्येकास आवश्यक आहे, व तें करून घेणें प्रत्येकाचें कर्तव्य होय.

प्रथमोपचार करणाऱ्यास मुख्यतः शारीरिक रचनेचे व व्यापारांचें थोडेंबहुत ज्ञान, करावयाच्या उपायांचें ज्ञान व मुख्यतः प्रसंगावधान हे गुण आवश्यक होत. पुष्कळदां उपाय अगदीं साधे व सोपे असतात; पण ते जर माहित नसले व माहीत असूनहि प्रसंगावधानाच्या अभावीं केले गेले नाहींत तर प्राण वांचविण्याची महत्त्वाची संधि गमावली असें होईल. प्रथमोपचारांसंबंधीं कांहीं विशेष बाबी येथें दिल्या आहेत.

अंगास मार लागल्यास—वर जखम झालेली नसते तेव्हां त्यावर स्पिरिट् व पाणी मिसळून लावावें. उदा. स्पिरिट् २ औंस, अमोनियम् क्लोराइड १ औंस, व्हिनिगार ३ औंस व १६ औंस पाणी या मिश्रणांत फडकें बुडवून माराच्या जागीं लावावें व वरचेवर त्या औषधानें ओलें ठेवावें. माराच्या ठिकाणचा काळेनिळेपणा ऊन पाण्यानें शेकल्यानें कमी होतो.

अंगास भाजल्यास—भाजलेल्या ठिकाणच्या भयंकर वेदना कमी करण्यासाठीं डॉक्टर येईपर्यंत कांहीं तरी उपाय करणें जरूर असतें. भाजलेला भाग गार पाण्यांत बुडवून धरावा अगर गार पाण्याची धार भाजलेल्या जागेवर सारखी धरावी. अंगावरील कपडे जरूर तर कातरून काढावेत. पिण्याच्या सोड्याची पूड भाजलेल्या जागीं फेकून वर गार पाण्याची पट्टी लावावी. फोड आलेले असल्यास ते स्वच्छ सुईनें अगर कातरीनें फोडून त्यावर सोडा बायकार्ब वरीलप्रमाणें टाकावा व चुन्याची निवळी + तिळाचें अगर खोबऱ्याचें तेल यांच्या संमिश्रणानें (यासच कॅरन ऑइल म्हणतात) भिजविलेलें फडकें भाजल्या जागीं लावावें. भाजलेली जागा उघडी ठेवूं नये. अंगावरील कपड्यांना आग लागल्यास त्या व्यक्तीस आडवें निजवून लोळवावें व ब्लँकेट, घोंगडें, जाड कोट वगैरेनें आच्छादून ज्वाला विझवाव्यात. लहान ज्वाला असल्यास अगदीं जलदीनें तीवर हातानें चापटी मारूनही विझवितां येतें.

गुदमरून श्वासास प्रतिबंध झाल्यास—घशांत कांहीं अडकलें असल्यास व तें चिमटींत धरण्यासारखें वरच असल्यास तसें धरून काढून टाकावें. अडकलेला जिन्नस बाहेर निघूं न शकल्यास एकाद्या टाकानें रेटून अन्न नलिकेंत ढकलणें चांगलें. पाठीवर जोरानें बुक्की मारल्यासहि घशांत अडकलेला जिन्नस केव्हां केव्हां निघतो. कित्येकदां भाकरी किंवा पावाचे तुकडे कोरडेच खाल्ल्यानें अडकलेला जिन्नस लहान असल्यास निघून जाईल. अगदीं लहान मुलांना उलटें धरून पाठीवर चापटी मारून पाहिल्यास घशांत अडकलेलें बाहेर पडेल. लहानसा दगड अगर नाणें गिळलें असल्यास, कांहीं तरी पिठूळ पदार्थ भात वगैरे खावयास देऊन दोन तासांनीं एरंडेल द्यावें. कॉइन कॅचर म्हणून एक हत्यार आहे त्यानें घशांतलें नाणें डॉक्टर काढूं शकतील.


कापल्यास—जखम कढत पाणी व स्वच्छ साबण यांनीं धुवावी. नंतर कॅर्बोलिक लोशननें शक्य तर

स्वच्छ करावी किंवा टिंक्चर आयोडिन् जखमेस लावावें. तें जवळ नसल्यास मेथिलेटेड स्पिरिट् लावण्यास हरकत नाहीं. नंतर जखमेवर घट्ट पट्टी बांधावी.

जखमेंतून रक्त वाहत असल्यास—धमनी (Vein), शिरा, (Artery) किंवा लहान केशवाहिनी तुटल्यामुळें रक्त वाहतें. धमनीचें रक्त लालभडक असतें व तें नाडीच्या स्पंदनाप्रमाणें थांबून थांबून उडतें. शिरांचें रक्त निळसर असून तें एकसारखें स्पंदरहित वाहात असतें. धमनी तुटून रक्त वाहात असल्यास एकादा लिंटचा तुकडा अथवा हातरुमाल याची घट्ट घडी करून जखमेवर ठेवून बँडेज बांधावें. लहान सहान धमनी तुटल्यास हाच उपाय उपयोगीं पडतो. एवढ्यानें रक्तस्राव बंद न झाल्यास जखमेच्या वर (धमनी तुटली असतां) टूर्निकेट बांधावें. शिर तुटली असल्यास जखमेच्या खालीं टूर्निकेट बांधावें. (टूर्निकेट म्हणजे दोरी, हातरुमाल अगर नळी यांचें वेष्टन करून त्यांत कांठीसारखें कांहीं घालून पीळ देऊन दाब पाडणें) धमनी अगर शिरा या रक्तवाहिनीवर एकादी घट्ट वळी ठेवून वर टूर्निकेट बांधल्यास त्वरित उपयोग होतो. एकाद्याच्या पायाच्या **नागमोडी शिरांतून रक्त वाहूं लागल्यास**—त्यास उताणें निजवून तंगडी वर उचलून जखमेवर घट्ट बांधावें. **नाकांतून रक्तस्राव** होऊं लागतो त्याचें कारण बहुधा नाकपुडीपासून मागें सुमारें अर्धा इंचावर असलेली नाकाच्या पडद्यावरील रक्तवाहिनी फुटणें हें असतें. लहानपणीं पडून वगैरे नाकास इजा झालेली असल्यास ही जागा नेहमींच नाजूक राहते व केव्हां फुटेल याचा नेम नसतो. हा रक्तस्राव बंद करण्यासाठीं ॲड्रेनॅलिन क्लोराइडमध्यें चिंधी भिजवून ती नाकपुडींत गच्च भरावी. निदान १२ तास तें तसेंच ठेवावें व पुनः काढते वेळीं ऊन पाण्यानें भिजवून काढावें. मात्र रक्तदाब वाढून कित्येकदां नाकांतून रक्त वाहतें. तें थांबविण्याचा प्रयत्न न करणें चांगलें. कारण रक्तस्रावानें रक्तदाब कमी होऊन इतर ठिकाणची मेंदूंतील वगैरे शीर तुटण्याचा संभव कमी होतो. **दांत काढल्यानंतर** रक्त फार वाहूं लागल्यास त्या जागीं ॲड्रिनॅलिक्लोराइडमध्यें चिंधी भिजवून दाब द्यावा. **प्रसूतीनंतर रक्तस्राव फार होऊं लागल्यास** बाळंतिणीच्या डोक्याखालच्या उशा वगैरे काढून डोकें खालीं करावें. ओटीपोटावर दोन्ही हातांनीं दाब द्यावा व आंत गर्भाशय घट्ट झालेला हाताला लागत असल्यास तो तसाच घट्ट दाबून धरावा. बाळंतिणीस कोमट पाणी अगर दूध प्यावयास द्यावें. उपजलेल्या **मुलाच्या नाळेंतून रक्त वाहूं लागल्यास** मूळ जेथें नाळ बांधली असेल त्याच्यावरहि घट्ट दोऱ्यानें दोन तीन वेढे देऊन नाळ पुनः बांधावी. **फुफ्फुसांतून अगर पोटांत रक्तस्राव** होऊं लागल्यास आजाऱ्यास पूर्ण विश्रांति देऊन निजवून ठेवावें. बर्फ अगर गार पाणी खाण्यास व पिण्यास द्यावें. कित्येकदां बाहेर कोणत्याही प्रकारें न दिसणारा असा अंतर्गत रक्तस्राव (Internal Bleeding) होत असतो. (तेव्हां रोग्याचें डोकें खालीं, पाय वर राहतील असें त्यास निजवावें) त्याचीं लक्षणें म्हणजे एकदम फिकेपणा येणें, शोष लागणें, धाप लागणें, घेरी येणें वगैरे होतात. ऊन पाण्याच्या पिशव्यांनीं शेक द्यावा.

मूर्च्छा किंवा ग्लानी आल्यास—डोकें खालीं करवून त्यावर गार पाणी मारावें. गळ्यावर कांहीं दाब वगैरे असल्यास तो सैल करावा; तीव्र अमोनिया हुंगावयास द्यावा, व स्पिरिट् ॲमोनाय ॲरोमॅटिक् ३० थेंबपर्यंत पाण्यांतून प्यावयास द्यावें.

बुडालेल्यास—बुडालेल्या मनुष्यास बाहेर काढतांच त्याच्या नाकातोंडांत गेलेलें पाणी, चिखल वगैरे सर्व पुसून बाहेर काढावें. छातीवरील कपडे कापून किंवा फाडून छाती उघडी करावी. तोंडही उघडें करून, तें उघडेंच रहावें म्हणून दातांत एकादी काठी घालून ठेवावी. नंतर त्यास पालथें करून पोटाखालीं हात घालून दोन्ही हातांनीं त्याच्या शरीराचा मध्यभाग उचलावा. म्हणजे तोंडांत व श्वासमार्गांत गेलेलें पाणी सर्व बाहेर पडेल. पाणी बाहेर पडणें थांबतांच त्याचे पोटाखालीं कापडाची एकादी लहानशी वळकटी ठेवावी व कृत्रिम श्वासोच्छ्वास करण्याच्या क्रियेस सुरवात करावी; ती अशी, पाठीच्या बरगड्यांवर आपल्या दोन्ही हातांनीं दाबून आपला शरीरभार त्यावर किंचित्काल पाडावा व लगेच आपण पुनः मागें सरकून भार हलका करावा. दर मिनिटांत १२ वेळ याप्रमाणें हा कृत्रिम श्वासोच्छ्वास करवावा; पाठीवर दाब दिल्यानें फुप्फुसांतून हवा बाहेर पडते; व दाब हलका केल्यानें हवा फुप्फुसांत पुनः शिरते. जीविताची कांहीं आशा दिसत असल्यास १ तासभर किंवा त्याहूनहि जास्त वेळ हा उपाय चालू ठेवला पाहिजे. तसेंच आणखी



१ रक्तस्राव होत असल्यास कोणत्या शिरा दाबाव्या हें या चित्रांत दाखविलें आहे. २ हाताचें बॅन्डेज असें बांधावें. ३ पायाचें हाड मोडल्यास काठी किंवा छत्री बांधून चित्रांत दाखविल्याप्रमाणें बॅन्डेज बांधावें. ४ बोटें मोडल्यास हाताचें बँडेज असें करावें. ५ बुडालेल्या इसमास कृत्रिम श्वासोच्छ्वास असा करवावा. ६ सर्पदंश झाल्यास याप्रमाणें वरील रक्तप्रवाह थांबवावा.

कोणाचें साहाय्य मिळाल्यास, बुडालेल्या माणसाचें सर्वांग चोळून कोरडें करवावें तसेंच ऊन पाण्याच्या पिशवींनीं वगैरे चांगलें शेकावें. मात्र अंग न भाजेल अशी दक्षता घ्यावी. पाणी फार कढत नसावें म्हणजे अंग भाजण्याची भीति नाहीं.

हाड मोडल्यास—आजाऱ्याची हालचाल अशा बेतानें केली पाहिजे कीं साध्या अस्थिभंगाचें (Simple fracture) रूपांतर जखम बाहेर होऊन गंभीर स्वरुपाच्या अस्थिभंगांत (Compound अगर Complicated fracture) न होईल. कारण हाड मोडलेल्या अवयवाची निष्काळजीपणें हालचाल केल्यास मोडलेल्या हाडाचें टोंक कातडी फाडून बाहेर येईल. यासाठीं अस्थिभंगाच्या दोन्ही बाजूंस फळ्या (Splints) बांधून मगच जरूर तेवढी हालचाल करावी.

कुत्रें चावल्यास—तें पिसाळलें असल्यास विशेषतः जखम तावडतोब निर्विष केली पाहिजे. यासाठीं जखमेस कॅर्बोलिक लोशन् (१ : २०) लावावें. नंतर सिल्व्हर नायट्रेटच्या कांडीनें अगर लाल तापविलेल्या तारेनें जखम भाजून काढावी; व नंतर बँडेजनें बांधावें. उत्तेजक पेय किंवा स्पिरिट् ॲमोनाय ॲरोमॅटिकस् १५ थेंब दर २।३ तासांनीं द्यावें. कुत्र्याच्या विषबाधेचीं लक्षणें सुरू होण्यापूर्वीं पाश्चर पद्धतीचीं इंजेक्शनें घ्यावींत म्हणजे विषबाधेचीं लक्षणें होणार नाहींत.

विषारी सापाचा दंश झाल्यास—तावडतोब दंशाच्या जागीं चाकूनें ¼ इंच खोल कापावें व जखम चोखून स्वच्छ करावी अगर रक्त पिळून काढावें. दंशस्थानाच्या वर दोरीनें घट्ट बांधावें. जखमेंत पोटॅशिअम् परमँगनेटचे खडे भरून पाण्याची धार धरावी. शक्तिपात होऊं नये म्हणून ॲड्रेनॅलिन् क्लोराइडचें इन्जेक्शन उपयोगीं पडतें. ॲंटिव्हेनीन सीरपचीं इंजेक्शनें त्वरित देतां आल्यास जीव वांचूं शकेल.

विष पोटांत गेल्यास—बहुधा उलटी आपोआप होऊन विष बाहेर पडून जातें. यासाठीं वांति होण्यास मदत होईल असे उपाय करणें जरूर असतें. बोटें घशांत घालून किंवा पंख घशांत घालून, अगर पुष्कळसें कोमट पाणी प्यावयास देऊन उलटी चांगली होऊं द्यावी. स्टमकट्यूब पोटांत घालून अन्नाशय धुवून काढावा. मिठाचें पाणी प्यावयास दिल्यास, अगर इपेकॅक्युआन् ही पूड २० ग्रेन प्रमाणांत पाण्यांतून दिल्यास, किंवा २० ग्रेन झिंक सल्फेट दिल्यास उलटी होईल. विषबाधेवर उपचार करतांना विशेष लक्षांत ठेवण्याच्या गोष्टी म्हणजेः—१ अन्नाशय रिकामा करणें, २ पोटांत असलेल्या विषास प्रतिविष देऊन त्याचा उपशम करणें, ३ रोग्यास उबदार प्रावरण घालून व शक्ति टिकविण्यासाठीं औषध व विश्रांति देणें, ४ डॉक्टरास बोलावून योग्य उपचार करणें. विष अल्कजातीय असल्यास प्रतिविष म्हणून व्हिनिगर किंवा लेमोनेड प्यावयास द्यावें. विष कडक ॲसिड्—आम्ल—असल्यास चॉक व पाणी किंवा भिंतीचा चुना किंवा अंड्याचा बलक प्यावयास द्यावा. विष गुंगी आणणारें मादक असल्यास, झोंप न येईल असे उपाय सर्व प्रकारें केले पाहिजेत. त्यासाठीं कढत कॉफी द्यावी; त्यास धरून चालवावें अगर अंगावर गार पाणी शिंपडून त्यास जागवावें. कोणतें विष गेलें आहे हें जरी एखाद्या वेळीं निश्चित कळलें नाहीं तर १ ते १॥ पावशेर गोडेल (येशेल, भुईमुगाचें तेल वगैरे) तावडतोब प्यावयास द्यावें. यापेक्षांहि जास्त तेल सशक्त प्रकृतीच्या मनुष्यास द्यावयास हरकत नाहीं. हा गोडेलाचा उपाय फारच गुणकारी आहे व बहुतेक विषांवर हा उतारा लागू पडतो.

प्रदक्षिणाः—गोल फेरी करणें किंवा फिरणें. प्रदक्षिणा ही डावीकडून सुरू होऊन उजवीकडेला आल्यावर पुरी होते. व्यवहारांत प्रदक्षिणा ह्या बहुधा देवांना घालीत असतात. ही घालण्यांत त्या देवाबद्दलचा आपला पूज्यभाव व्यक्त करण्याचाच हेतु असतो. पण सध्यां हेत्वंतर झालेलें दिसतें. आदरभाव प्रगट करण्याच्या ऐवजीं पुण्य लागावें म्हणून त्या पुष्कळजण घालतात. या प्रदक्षिणा कोणी कोणी एकेक, कोणी कोणी तीन तीन, कोणी कोणी यापेक्षां अधिकही घालतात. सर्व देवांना या सारख्या घालीत नाहींत. तर त्यांत फरक आहे. कांहींना वर्तुळाकार घालतात व कांहींना नालाच्या आकाराच्या घालतात. महादेवाची प्रदक्षिणा नालाच्या आकाराची असून इतर देवांची ती वर्तुलाकार असते. आरोग्यदृष्टीनेंही स्त्रियांना वड, पिंपळ किंवा तुळस यांच्याभोंवतीं प्रदक्षिणा घालण्यास सांगतात. या प्रदक्षिणा १२ किंवा १०८ अथवा १००० पर्यंतही असूं शकतात. कांहीं मंडळी पोथीसभोंवतींही प्रदक्षिणा घालतात. पक्षांत भारद्वाजाला कोणी कोणी प्रदक्षिणा घालून त्याजबद्दलचा आपला आदर प्रगटवितात. तसेंच कित्येक माणसांत गुरूलाही ही घातलेली आढळते.

कित्येकजण प्रदक्षिणेला ‘ उजवें ’ म्हणतात. उजवें घालणें म्हणजे प्रदक्षिणा घालणें होय. पशूंत गाईला उजवें घालतात. विणाऱ्या गाईला उजवें घातलें तर पृथ्वीप्रदक्षिणा केल्याचें श्रेय लागतें असें समजतात.

प्रदरः–स्त्रियांना होणाऱ्या या विकारांत योनिमार्गांतून पांढरा स्राव वाहतो व त्याबरोबरच अशक्तपणा, कमरदुखी, ओटीपोटांत व गर्भाशयाच्या आसमंतात् भागीं जडपणा व अस्वस्थता वाटणें व योनिद्वारावरहि किंचित् लाली व सूज येणें इत्यादि लक्षणें संभवतात. हा विकार उद्भवला असतां तज्ज्ञाकडून चांगली तपासणी करून घेऊन योग्य उपचार करणें अगत्याचें आहे. **कारणें**–अति थंडींत काम करणें, अति श्रम करणें, अन्न निःसत्व असणें, संभोगातिरेक अगर स्वसंभोग करणें किंवा गर्भाशयाची कांहीं विकृति असणें हीं कारणें प्रदर होण्यास कारणीभूत होतात. तसेंच परमा हेंहि प्रदराचें एक महत्त्वाचें कारण गणलें पाहिजे. **उपाय**–घरच्या घरीं करण्यासारखा सर्वांत सोपा उपचार म्हणजे सोसेल तितक्या कढत पाण्यानें योनिमार्ग धुऊन काढणें. १२ पॉइंट इतकें कढत पाणी (१२० फॅरेनहाइट डिग्री) घेऊन त्यांत ८ चमचे बोरिक ॲसिड किंवा एक चमचा पोटॅश परमँगनेट टाकावें व चांगलें विरघळूं द्यावें (पोटॅश परमँगॅनेट चमचाभर घेऊन तें प्रथम एक पाइंट टाकून ढवळावें व सर्व विरघळल्यानंतर १२ पॉइंट होईल इतकें पाणी त्यांत घालावें). हा योनि धुण्याचा उपचार रोज केला पाहिजे. त्याचप्रमाणें आठवड्यांतून तीन वेळां कढत पाण्याचा एनिमा घेणेंहि चांगलें.

प्रद्युम्नः–कृष्णास रुक्मिणीपासून झालेला मुलगा. हा सनत्कुमाराचा अंश होय. पूर्वजन्मीं शंकराचे हातून मारला गेलेला हा मदनच होता. याचे हातून शंबरासुराचा मृत्यु असल्यानें शंबरासुरास जेव्हां कळलें कीं, मदन हा रुक्मिणीचे उदरीं प्रद्युम्नरूपानें येणार आहे, तेव्हां शंबरासुरानें प्रद्युम्नास सहावे दिवशींच सूतिकागृहांतून उचलून आणिलें व समुद्रांत फेकून दिलें. तेव्हां याला एका माशानें गिळिलें. परंतु दैवयोगानें प्रद्युम्न त्या माशाच्या पोटांत जिवंत राहिला. पुढें तो मासा एका कोळ्यास सांपडून त्यानें तो शंबरासुरास नजर केला. शंबरानें तो मासा आपल्या मायावती नांवाच्या भार्येजवळ नेऊन दिला. मायावतीनें तो चिरतांच त्यांतून एक दिव्य बालक बाहेर पडलें. त्या बालकास पाहतांच हा कोण असावा, अशी मायावतीस शंका आली. इतक्यांत त्या ठिकाणीं नारद प्रगट होऊन त्यानें ‘ हा साक्षात् मदनच असून प्रद्युम्न रूपानें रुक्मिणीचे उदरीं आला होता व तूं मदनपत्नी रति असल्यामुळें प्रद्युम्नाची भार्या आहेस, म्हणून तूं याची सेवा कर ’ असें सांगितलें. हें ऐकून मायावतीस आनंद झाला व तिनें यास नीट तऱ्हेनें वाढवून बऱ्याच विद्या शिकविल्या. पुढें हा मोठा झाल्यावर यास शंबराचें सर्व कृत्य कळलें. तेव्हां यानें क्रोधानें शंबराशीं लढाई करून त्यास ठार केलें व नंतर भार्येसह हा रुक्मिणीच्या भेटीस गेला. हरिवंशांत मुलगा समुद्रांत न फेकतां मायावतीला पुत्र नसल्यामुळें तिला दिला असें आहे. ब्रह्मवैवर्त पुराणांत वरील कथेहून थोडी भिन्न कथा आहे ती अशीः–शंबरानें प्रद्युम्नास सूतिकागृहांतून उचलून नेलें. परंतु याला समुद्रांत न टाकतां आपल्या मायावती नांवाच्या बायकोजवळ नेऊन दिलें. मायावतीसहि मुलगा नसल्यामुळें तिनें आनंदानें या बालकास वाढविलें. पुढें प्रद्युम्न मोठा झाल्यावर एके दिवशीं सरस्वती मायावतीकडे आली व तिनें तिला सर्व वृत्तांत कळविला. पुढें प्रद्युम्नास शंबराचीं दुष्ट कृत्यें कळल्यावर यानें शंबरास ठार मारलें. प्रद्युम्नास मायावतीशिवाय रुक्मीची मुलगी रुक्मवती ही दुसरी स्त्री होती. त्याचप्रमाणें यानें वज्रनाभाची कन्या प्रभावती हिलाहि हरण करून तिच्याशीं लग्न केलें होतें. यास रुक्मवतीपासून अनिरुद्ध हा पुत्र व प्रभावतीपासून दुसरा एक पुत्र असे दोन पुत्र झाले. यास शतद्युम्न असें नामांतर होतें. यानें वज्रनाभाला मारून त्याची प्रभावती नांवाची कन्या पळवून आणिल्यामुळें वज्रनाभबंधु निकुंभाशीं याचें युद्ध झालें. हा मायावी युद्धांत मोठा कुशल होता. भानु यादवाची कन्या भानुमती निकुंभ दानवानें पळवून नेली, तेव्हां कृष्णार्जुनांसह हा निकुंभाशीं लढण्यास गेला होता. तेथें यानें आपलें मायावी युद्धकौशल्य चांगलें दाखविलें. शेवटीं कृष्णानें निकुंभाला ठार केलें. वैराचें मुख्य कारण हाच होता. हा यादव सैन्यांतील एक महारथी होता. एकदां शाल्व कृष्णाचा सूड उगविण्याकरितां द्वारकेवर चालून आला असतां प्रद्युम्नानें मोठ्या शौर्यानें त्याचा पराभव केला. याचा सारथी सौति हा होता. प्रद्युम्नानें पांडवांच्या अश्वमेधप्रसंगीं त्यांना बरीच मदत केली. हा अश्वरक्षणाकरितां ससैन्य अर्जुनादिकांच्या बरोबर होता. पुढें सर्व यादव

प्रमत्त होऊन भांडत असतां त्या यादवींतच प्रद्युम्न मरण पावला.

प्रमाणः–सत्यज्ञान मिळविण्याचें साधन. नैयायिकांच्या मतें प्रत्यक्ष, अनुमान, उपमान व शब्द अशीं चार प्रमाणें आहेत. वैशेषिक प्रत्यक्ष व अनुमान हीं दोनच प्रमाणें मानतात. सांख्यांच्या मतें प्रत्यक्ष, अनुमान व शब्द हीं तीनच प्रमाणें आहेत. महर्षी दयानंद सरस्वती यांनीं आपल्या सत्यार्थप्रकाश या ग्रंथांत प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, ऐतिह्य, अर्थापत्ति, संभव व अभाव अशीं आठ प्रमाणें सांगितलीं आहेत; या आठ प्रमाणांनीं जें ठरेल तें सत्य व इतर असत्य असें मत त्यांनीं प्रतिपादिलें आहे. नैयायिक म्हणतात कीं त्यांनीं सांगितलेलीं चार प्रमाणें हीं मुख्य असून बाकीचीं चार या मुख्य प्रमाणांहून वेगळीं नाहींत.

प्रत्यक्ष प्रमाण–श्रोत्रादि ज्ञानेंद्रियांचा शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या विषयांशीं अव्यवहित संबंध होऊन व तत्कालींच इंद्रियांचा मनाशीं व आत्म्याशीं संबंध होऊन जें ज्ञान प्राप्त होतें तें 'प्रत्यक्ष' ज्ञान होय. प्रत्यक्ष ज्ञान हें निश्चयात्मक व बिनचूक असतें.

अनुमानप्रमाण–प्रत्यक्षानंतर अप्रत्यक्षाचें ज्ञान होणें हें 'अनुमान'. पदार्थ, तें ओळखण्याची खूण व त्या खुणेची ओळख या तीन गोष्टी एकत्र जुळल्यानंतर अनुमान होतें. कारणावरून कार्य ओळखणें, कार्यावरून कारण ओळखणें व स्थित्यंतरावरून गति ओळखणें असें तीन प्रकारचें अनुमान असतें.

उपमानप्रमाण-पदार्थांच्या सादृश्यानें होणारें ज्ञान.

शब्दप्रमाण–आप्तांचा उपदेश हें शब्दज्ञान. यालाच आप्तवचन म्हणतात. पूर्णविद्वान, धार्मिक, परोपकारी, सत्यवादी, पुरुषार्थी, जितेंद्रिय व आत्मानुभवी असा पुरुष तो आप्त. अशा आप्तानें स्वानुभवजन्य ज्ञानाचा लोककल्याणार्थ केलेला उपदेश तें आप्तवचन. ऐतिह्य म्हणजे इतिहास. हें ज्ञान परंपरेनें होतें, तेंच मत त्याच अर्थानें प्रचलित असतें म्हणून.

अर्थापत्तीनें होणारें ज्ञान शब्दज्ञानांत अंतर्भूत असतें. उदाहरणार्थ 'कारण असलें तरच कार्य होईल' या वचनावरून 'कारणाशिवाय कार्य होणार नाहीं' हा जो अर्थ निघतो त्याला अर्थापत्ति असें म्हणतात.

संभवप्रमाण–जें सृष्टिक्रमाप्रमाणें संभवतें तें. जी गोष्ट संभवनीय असेल तीच मानावी.

अभावप्रमाण–विद्यमान नसणें याचें नांव 'अभाव.' अस्तित्व व नास्तित्व यांचा अवश्य संभव असतो.

प्रमाणें वेगवेगळीं अगर संयुक्त रीतीनें उपयोगांत आणतां येतात. जसें प्रमेय असेल तसें घडतें. उदाहरणार्थ आत्म्याचें अस्तित्व शब्द व अनुमान या प्रमाणांनीं सिद्ध होतें; तीच गोष्ट योगी प्रत्यक्ष प्रमाणांनीं अनुभवितो. स्वार्थाचें अस्तित्व सिद्ध करण्याला शब्दाशिवाय दुसरें प्रमाण नाहीं. धुरावरून अग्नीचें ज्ञान अनुमानानें होतें. तेथें शब्दप्रमाण किंवा प्रत्यक्ष प्रमाण नसतें.

प्रयागः–अलाहाबाद पाहा भाग १ ला पृ. ३०

प्रश्नोपनिषद्ः–प्रश्नोपनिषद हें अथर्वणवेदाच्या मंत्रोपनिषदाचें व्याख्यानात्मक ब्राह्मण आहे. या उपनिषदाच्या नांवावरूनच यांत अनुसरलेली कथनपद्धति प्रश्नोत्तररूप असल्याचें दिसून येतें. या उपनिषदाची सुरवात एका आख्यायिकेनें झालेली आहे. भारद्वाज सुकेशा, शैब्य सत्यकाम, गार्ग्य सौर्यायणी, अश्वलायन कौसल्य, भार्गव वैदर्भी व कात्यायन कबंधी हे सहा ऋषी हातांत समिधा घेऊन शिष्यभावानें भगवान पिप्पलाद नामक आचार्यांकडे गेले. आचार्य पिप्पलादानें त्यांना एक वर्षपर्यंत आपल्याजवळ ब्रह्मचर्यानें श्रद्धापूर्वक राहून गुरूची सेवा करण्यास सांगितलें व त्या मुदतीनंतर त्यांच्यापैकीं प्रत्येकाचें शंकासमाधान करण्याचें आश्वासन दिलें. आचार्यांनीं दिलेल्या एक वर्षाच्या मुदतीनंतर त्या शिष्यांनीं आपापले प्रश्न आचार्यांना विचारून त्यांजकडून शंकासमाधान करून घेतलें. या शिष्यांनीं आचार्यांना विचारलेल्या प्रश्नांना आचार्यांनीं दिलेल्या उत्तरांत प्रश्नोपनिषदाचा सारा विषय आला आहे. पुढें शिष्यांच्या प्रश्नांचा व त्यांना आचार्यांनीं दिलेल्या उत्तरांचा संक्षेपानें विचार केला आहे.

पहिला प्रश्न कात्यायन कबंधी यानें विचारला. तो असा : "भगवन्, या सर्व प्रजा कोणापासून उत्पन्न होतात?" त्यावर पिप्पलाद म्हणाले, "आपल्या प्रजा उत्पन्न करण्याची इच्छा प्रजापतीला होऊन त्यानें तप केलें. तप करून सृष्टिसाधन 'रयि' व 'प्राण' या नांवाचें जोडपें त्यानें निर्माण केलें. आदित्य हाच प्राण व रयिच चंद्रमा. जें मूर्त व अमूर्त आहे, तें सर्व रयिच आहे. रयि म्हणजे भोग्य, प्राण म्हणजे भोक्ता. रयिची देवता चंद्रमा व प्राणाची देवता आदित्य. या जगांत जे लोक इष्ट, पूर्त व दत्त कर्में करितात ते दक्षिणायन मार्गानें

चंद्रलोकास जातात व तेथून या लोकास परत येतात. सगुण ब्रह्माचे उपासक ध्यान करून चित्ताची एकाग्रता मिळवितात व आदित्य लोकास जातात, व तेथून ब्रह्मलोकास जातात. अन्नच प्रजापती आहे. त्यापासून रेत व त्यापासून सर्व प्रजा होतात."

भार्गव वैदर्भीचा प्रश्न : "भगवन्, किती देव प्रजेचें विशेषतः धारण करतात? किती देव प्रकाशित करतात? व त्यांत वरिष्ठ कोण?"

आचार्यांनीं उत्तर दिलें कीं प्राणच प्रजेचें धारण करणारा आहे. तो अग्नीच्या रूपानें प्रकाशक आहे. तो आकाशांतील पंचभूत देवता, कर्मेंद्रिय देवता, ज्ञानेंद्रियाच्या देवता व अंतःकरणाच्या देवता यांच्यामध्यें श्रेष्ठ आहे."

कौसल्य आश्वलायनाचा प्रश्न : "हा प्राण कोणत्या उपादान कारणापासून होतो? या शरीरांत कसा येतो? आपल्या स्वरूपाचे पंचधा विभाग करून शरीरांत कसा राहतो? कोणत्या विशेष वृत्तीनें शरीरांतून निघून जातो? बाह्य जगाचें कसें धारण करतो? व अध्यात्मधारण कसें करतो?"

आचार्यांचें उत्तर "हा प्राण परमात्म्यापासून उत्पन्न झाला आहे. देहामध्यें जशी छाया तसें ब्रह्मामध्यें प्राणतत्त्व. प्राण मनाच्या संकल्पादि कर्मांच्या योगानें स्थूल शरीरांत येतो. हा प्राण इतर प्राणांस त्यांचीं त्यांचीं कामें नेमून देतो. उदात्त वृत्तीनें तो शरीर सोडून जातो. पंचभूतांच्या अभिमानी देवतांच्या रूपानें तो बाह्यजगाचें धारण करतो. चतुःप्रभृती इंद्रियांच्या देवतांच्या रूपानें तो शरीरांतील इंद्रियांवर अनुग्रह करतो. हें त्याचें अध्यात्मधारण.'

सौर्याग्रणी गार्ग्याचा प्रश्न "भगवन्, या शरीररूप पुरुषांत कोणतीं इंद्रियें निजतात; कोणतीं जागतात; यांतील कोणता देव स्वप्नें पाहतो; हें सुख कोणाला होतें; सर्व जग कोणामध्यें लीन होतें?"

उत्तर–"सुषुप्तींत बाह्य दहा इंद्रियें अंतःकरणासह निजतात, पण त्यावेळीं प्राण जागतात. कारण प्राणाचें श्वासादि कार्य दिसतच असतें. स्वप्नांत मनोमय देव स्वप्नास पाहतो. सुषुप्तींत चित्तांत दुःखाचा उदय होत नाहीं. त्यामुळें झोंपेंत जीवाचा स्वप्रकाश अत्यानंदच उरतो. सायंकाळीं पक्षी विश्रान्तीकरितां आपल्या निवासस्थानास जातात त्याप्रमाणें जगत् सुषुप्ति, प्रलय व समाधि या अवस्थांमध्यें आत्म्याच्या ठिकाणीं लीन होते.'

सत्यकामानें 'मरणापर्यंत प्रणवाचें ध्यान करणारा कोणत्या लोकास जातो?' असा प्रश्न विचारला. त्यावर आचार्यांनीं सांगितलें, "जो ओंकार तेंच पर व अपर ब्रह्म आहे. याच आत्मप्राप्तीच्या साधनानें म्हणजेच ओंकाराच्या ध्यानानें ध्यानाच्या प्रकाराप्रमाणें पर किंवा अपर कोणत्या तरी एका ब्रह्मास प्राप्त होतो.

सुकेशा भारद्वाजाचा प्रश्न–"प्राण, श्रद्धा, पंचभूतें इत्यादि सोळा कला असलेला पुरुष कोठें आहे?"

उत्तर–"तो षोडषकलायुक्त पुरुष याच शरीरांतील हृदयकमलाकाशांत आहे. त्या कला त्या पुरुषाच्या आधारानेंच उत्पन्न होऊन त्यांतच लीन होतात. ज्याप्रमाणें समुद्राला मिळणाऱ्या नद्या समुद्ररूप होतात, त्यांचीं मूळचीं नामरूपें नाहींशीं होतात त्याप्रमाणें या प्राणादि षोडष कलांचें नाम व रूप नाश पावतें व त्या पुरुषामध्यें लीन होतात. तो पुरुष हेंच ब्रह्म. मी एवढेंच ब्रह्म जाणतों. अन्य जाणत नाहीं."

प्रल्हादः-हा हिरण्यकशिपु व कयाधु यांचा पुत्र. हिरण्यकशिपु व हिरण्याक्ष हयात असतांनाच देवांशीं युद्ध चालू होतें, त्यावेळीं यांस विश्वरूपदर्शन घडलें. पुढें विष्णूनें यास ठार केलें, म्हणून याची आई अतिशय शोक करूं लागली. तेव्हां तेथें नारद आला व त्यानें तिला 'शोक करूं नकोस, हाच प्रल्हाद म्हणून तुझे उदरीं येईल व परम विष्णुभक्त होईल, तसेंच हा इंद्रत्वासहि जाईल. हे माझें भविष्य गुप्त ठेव.' असें सांगितलें. नारदानें कयाधूस केलेला उपदेश प्रल्हादानें आईचें उदरांत असतांच ऐकला. म्हणून त्यास इतकें ज्ञान प्राप्त झालें होतें. यानें भगवद्भक्तीचें प्रस्थ फारच माजविलें, असें हिरण्यकशिपूस वाटून त्यानें त्याचा छळ आरंभला. तेव्हां यानें नृसिंहाची अतिशय प्रेमानें व भक्तीनें स्तुति केली. त्यामुळें परमेश्वरानें यावर कृपा करून याचे पित्यास ठार केलें व याला कांहीं वर देऊं केले, पण यानें त्याच्या भक्तीखेरीज कांहीं एक मागितलें नाहीं. याला अवधूतानें उपदेश केला होता. यास पृथ्वीदोहनकालीं दैत्यांनीं वत्स केलें होतें. यावरून याचें श्रेष्ठत्व ध्यानांत येतें. याचें विष्णूवर आपल्या प्राणापलिकडे प्रेम होतें. हिरण्यकशिपूनें यास ठार करण्यासाठीं खालील उपायांची योजना केली होती. शेवटीं हा मरावयास तयार झाला; पण भगवदुपासना सोडावयास तयार झाला नाहीं. हत्तीकडून तुडविणें, सर्प डसविणें, कडेलोट करणें, खड्ड्यांत पुरणें, विष पाजणें,

वारुणीपाशानें बांधणें, शस्त्रप्रहार करणें, जाळणें, कृत्या सोडणें, माया सोडणें, संशोषक वायु सोडणें, समुद्राच्या तळाशीं पुरणें इत्यादि उपाय केले पण ते सर्व व्यर्थ गेले. याच्या बापाला ठार मारतांना नृसिंहास आलेला कोप प्रल्हादाच्या पुढें जाण्यानें नाहींसा झाला. यास देवानें वर देऊं केला तरी यानें तो घेतला नाहीं यावरून त्याचा निरिच्छपणा प्रगट होतो. हा पितृभक्तहि होता. यानें नृसिंहाकडून बापासुद्धां एकवीस पिढ्यांचा उद्धार करविला. शेवटीं यास गादीवर बसवून 'षड्रिपूंजा तुजवर पगडा बसणार नाहीं' असा एक वरही दिला. यानें क्षमाशील कसें असावें व कडकपणा केव्हां धरावा याबद्दल चांगलें विवेचन केलें आहे. प्रल्हादानें, वामनाची अवहेलना केल्याबद्दल बळीस राज्यभ्रष्ट होशील म्हणून शाप दिला. पुढें बलीबरोबर हाही सुतलांत राहावयास गेला. यास विरोचन, कुंभ व निकुंभ असे तीन मुलगे असून 'रचना' नांवाची एक मुलगीही होती.

प्राण :–प्राण म्हणजे शरीराचें धारण करणारी शक्ति. शरीरांत प्राण आहेत तोंपर्यंतच इंद्रियादिकांचे व्यापार चालतात. शरीरांतून प्राण निघून गेले कीं तें निश्चेष्ट होतें, त्यालाच आपण मृत शरीर म्हणतों. कितीहि सुंदर शरीर असलें तरी प्राणाच्या अभावीं तें सौंदर्य व्यर्थच होतें. कितीहि सामर्थ्यवान् शरीर असलें तरी त्यांतून प्राण निघून गेले कीं तें सामर्थ्य तात्काल नष्ट होतें. ज्या शक्तीमुळें शरीर जिवंत राहतें व जिच्या अभावीं तें मृत होतें त्या प्राणनामक शक्तीचें कार्य दृश्य असलें तरी ती शक्ति अदृश्यच आहे. कार्यावरूनच त्या शक्तीच्या अस्तित्वाविषयीं अनुमान करतां येतें. प्राण अदृश्य असल्यामुळें त्याचें यथार्थस्वरूप काय आहे हें सांगतां येणें कठीण आहे. उपनिषदांत प्राणाविषयीं ठिकठिकाणीं विवेचन आलें आहे; त्यांत प्राणाची महती वर्णन केली आहे. प्रश्नोपनिषदांत 'आत्मन एष प्राणो जायते' (आत्म्यापासून हा प्राण निर्माण होतो;) देहांत जशी छाया तसें ब्रह्मांत प्राणतत्त्व; तो प्राण मनःसंकल्पादिजन्य कर्मामुळें या शरीरांत येतो असें सांगितलें आहे. यावरून सजीव प्राण्याच्या शरीरांतील चैतन्य म्हणजेच प्राण असें उपनिषदाचें मत दिसतें. याच उपनिषदांत प्राणाचे निरनिराळ्या वृत्तीमुळें पांच प्रकार असल्याचें सांगितलें आहे. प्राण, अपान, समान, उदान व व्यान हे ते पांच प्रकार होत. त्या त्या प्राणांचीं पृथक् स्थानें आहेत. श्वासोच्छ्वास करणाऱ्या प्राणाचें स्थान हृदय, मलविसर्गादि करणाऱ्या अपानाचें गुद, सर्व इंद्रियांना शक्ति देणाऱ्या व्यानाचें शरीर, अंतकाळीं प्रबळ होणाऱ्या उदानाचें कंठ व सर्व शरीराला व्यापून रसरक्तादिकांना सर्व नाड्यांतून वाहविणाऱ्या समानाचें नाभि अशीं या पंचविध प्राणांचीं स्थानें आहेत.

श्वासोच्छ्वासाची क्रिया हें जिवंतपणाचें लक्षण आहे. श्वासोच्छ्वास बंद झाला कीं शरीर मृत होतें. यावरून प्राण वायुस्वरूप असावा असें दिसतें.

प्राणायाम:--प्राणायाम म्हणजे श्वासोच्छ्वासाचें नियंत्रण. पूरक, कुंभक व रेचक असे त्याचे तीन प्रकार आहेत. श्वास आंत घेणें याचें नांव पूरक; आंत घेतलेला श्वास कोंडून ठेवणें याचें नांव कुंभक; व कोंडलेला श्वास सावकाश बाहेर सोडणें हा रेचक.

प्राणायाम वाटेल तेव्हां करूं नये; नियमित वेळीं करावा. व्यायाम घेण्याच्या पूर्वीं एक तास तरी अगोदर करावा. प्रातःसंध्या व सायंसंध्या करते वेळीं प्रत्यहीं प्राणायाम करणें हितावह आहे. प्राणायाम करणाऱ्यानें सिद्धासन अगर पद्मासन घालून एकान्तस्थलीं बसावें; ताठ बसावें, दृष्टी नासाग्र असावी. प्रथम डाव्या नाकपुडीनें श्वास वर ओढावा, वर ओढलेला श्वास कोंडून ठेवावा व कोंडलेला श्वास उजव्या नाकपुडीनें सावकाश बाहेर सोडावा. ज्या नाकपुडीनें श्वास बाहेर सोडावयाचा त्याच नाकपुडीनें पूरक म्हणजे श्वास आंत ओढावयाचा, हें प्राणायामाचें रहस्य होय. पूरक, कुंभक व रेचक यांचें कालाचें प्रमाण १–४–२ हें आहे. पूरकाला जर एक गायत्री मंत्र म्हणण्याइतका काल लागला तर कुंभकाला चार व रेचकाला दोन गायत्रींचा काल लागावा.

प्राणायामाच्या योगानें आपल्याला प्राण वश होतो, मन व इंद्रियें आपल्या स्वाधीन होतात. प्राणायामाच्या योगानें बल व पुरुषार्थ वाढून बुद्धि तीव्र व सूक्ष्म होते व अति कठिण विषयाचें ज्ञान सहज होऊं शकतें. प्राणायामाच्या योगानें वीर्य वाढून तें स्थिर होतें. ज्याप्रमाणें अग्नीमध्यें धातूंचे सर्व मळ जळून जातात, तसेच प्राणायामानें इंद्रियांतील सर्व दोष नाहींसे होऊन तीं निर्मल होतात; मन पवित्र, प्रसन्न व निर्विकारी बनतें.

प्राणी :–जीवनशास्त्राच्या (Biology) परिभाषेंत प्राणी या शब्दाचा अर्थ वनस्पति वगळून अखिल

जीवमात्र असा होतो. पक्षी, मासे वगैरेंपासून सस्तन प्राण्याची पृथगात्मता दाखविण्याकरितां हा शब्द सस्तन प्राणी (Mammals) या अर्थानें व्यवहारांत वापरतात. पण या शब्दाचा हा व्यावहारिक उपयोग अशास्त्रीय आहे.

जीव म्हणजे पुढें दिलेल्या पंचविध स्वरूपाची क्रियाशक्ति असलेले सेंद्रिय पदार्थ-हालचाल (Movement), संवेदना (Sensation), पोषणक्रिया (Nutrition), विकास (Growth) व प्रजोत्पादन (Reproduction). जीवाची हालचाल स्वयंप्रेरणेनें होते, कोणत्याहि बाह्य प्रेरणेनें अथवा बाह्य बलानेंच केवळ त्यांची हालचाल होत नाहीं. जीवांत संवेदना अथवा व्यापक अर्थानें क्षोभनशीलता आढळून येते; त्यांवर बाह्य पदार्थांचा आघात झाला असता शरीराचें संकोचन करून अथवा अन्यप्रकारें जीव आपली क्षोभनशीलता (Irritability) दर्शवितात. जीवांची हालचाल होत असल्यामुळें त्यांच्या शरीराची एकसारखी होणारी झीज भरून काढण्याकरितां त्यांना अन्न अथवा पोषक द्रव्य खावें लागतें; तें पोषक द्रव्य त्यांच्या आंगीं लागून त्यांच्या स्नायूंत शक्ति चढते. अशा प्रकारें पोषक द्रव्यांच्या भक्षणानें जीवाची वाढ होते. जीवाला प्रजोत्पादनाचीं इंद्रियें असतात.

शास्त्रानें जीवसृष्टीचे प्राणी व वनस्पती असे दोन विभाग केलेले आहेत. 'प्राणी' हे प्राणिशास्त्राचा (Zoology) विषय होत व वनस्पती हें वनस्पतीशास्त्राचा (Botany) विषय होत. प्राणी व वनस्पति यांच्यामध्यें महत्त्वाचे बाबतींत रचनासाम्य आढळतें. म्हणून त्यांना एकाच जीववृक्षाच्या दोन भिन्न शाखा असें म्हणतां येईल. दोन्हींच्या बाबतींत स्नायूंचें पोषण पचनक्रियेच्या योगानेंच होतें. परंतु वनस्पती हवेंतील नैट्रोजन व कार्बन डायॉक्साइड पचनीं पाडतात त्यांच्या स्नायूंचें पोषण जमीनींतून त्यांनीं शोषून घेतलेल्या लवणांच्या योगानें होतें. प्राणी हीं रासायनिक मौलें व संयुगें, वनस्पतीकडून त्यांचें सेंद्रिय संयुगांत रूपान्तर झाल्यावरच पचवूं शकतात (assimilate). दुसऱ्या भाषेंत हीच गोष्ट सांगावयाची म्हणजे वनस्पती ह्या मोठ्या अन्नोत्पादक असून प्राणी हे मोठे विध्वंसक (Consumers) आहेत; वनस्पती व प्राणी यांच्या संयुक्त क्रियेमुळें सृष्टींत समतोलता (Equilibrium) राखण्यांत आली आहे.

प्राण्यांच्या शारीरशास्त्रदृष्ट्या असलेल्या भिन्न प्रकारच्या शरीररचनेवरून त्यांचें वर्गीकरण करण्यांत आलें आहे. गाधामासा (Porpoise) माशासारखा दिसतो खरा, पण त्याच्या शरीराच्या आंतररचनेवरून तो मासा नसल्याचें आढळून येतें. त्याच्या शरीराची आंतररचना स्थलचर प्राण्याच्या शरीररचनेप्रमाणेंच असून तो फुफ्फुसांच्या योगानेंच श्वासोच्छ्वास घेतो; त्याचें रक्त उष्ण असतें. त्याची मादी पिलांना अंगावर पाजते. यावरून तो सस्तन प्राणी आहे; मासा नव्हे हें सिद्ध होतें. वांब (Eel) दिसण्यांत सर्पाप्रमाणें आहे; तथापि शरीररचनेच्या दृष्टीनें माशाच्या वर्गांत पडते. तेंच तत्त्व प्राणिसृष्टींतील लहान सहान विभागांस लागू पडतें. दिसण्यांत सारखे दिसणारे प्राणी त्यांच्या शरीराच्या आंतर रचनेंतील फरकामुळें भिन्न वर्गांत पडतील. त्याच्या उलट बाह्यतः अत्यंत विसदृश दिसणाऱ्या प्राण्यांच्या शरीराच्या आंतररचनेंत साम्य आढळून येतें व त्यामुळें ते एकाच वर्गांत पडतात.

प्राणिसृष्टीचे प्रथम भाग पाडले आहेत त्यांना उपसृष्टी (Phyla or sub-kingdoms) म्हणतात. या उपसृष्टीचे पुनः सुमारें १६ भाग पाडले आहेत. त्यांतील प्रत्येकाला वर्ग (Class) म्हणतात. या प्रत्येक वर्गाचे जे भाग पाडले आहेत त्यांपैकीं प्रत्येकाला उपवर्ग (order) म्हणतात. या उपवर्गाचे पुनः भाग पाडले आहेत, त्यांना वंश (family) म्हणतात. वंशाच्या जाति (Genera) व जातीच्या उपजाती (species). असतात. उदाहरणार्थ कार्निव्होरा (carnirvoa) हा जो प्राण्यांचा उपवर्ग (order) आहे त्यांत सर्व मांसभक्षक सस्तन प्राण्यांचा समावेश होतो. या प्रकाराचे मांजरें, कुत्रे, वीझल्स, अस्वलें यांच्यासारखे वंश (family) आहेत. यापैकीं कुत्रा हा एकच वंश घेतला तरी त्याच्या चार जाति आहेत. या जातीपैकीं पहिली Calis ही जात घेतली तर तिच्या ३०।४० उपजाती आहेत. आपले पाळीव कुत्रे या उपजातीपैकींच एका जातीचे होत. या कुत्र्यांना Calis familiaris म्हणतात; यांतील Calis हें नांव जातिनिदर्शक असून Familiaris हें उपजातीचें वैशिष्ट्य दाखविणारें आहे.

प्राणिसृष्टींतील वर्ग उतरत्या क्रमानें:—

(१) **Vertebrates** (Backboned) पृष्ठवंशी—वर्ग १ Mammalia (२) Aves (पक्षी) (३) Reptilia

(सुसरी, सर्प, पाली, कासवें) (४) Amphibia (बेडूक, वगैरे) (५) Pisces (मासे) (६) Cyclostomata (गोल तोंडाचे प्राणी, (७) Caphalochorda (८) Urochorda (९) Hemichorda. (२) **Invertebrates** (Without back-bone). वर्ग तिसरा-(१) Mollusca (गोगलगाई वगैरे) (२) Arthopoda [कोळी, किडे (Insects)] (३) Echinodermata (Star-fishes (मासे) and sea-urchins (समुद्रांतील इतर प्राणी) (४) Annelida (किडे जळवा वगैरे) (५) Coelenterata. वर्ग चौथा **Protoza.**

प्रामिसरी नोटः–एकानें दुसऱ्याच्या नांवें लिहून दिलेली वचनचिठ्ठी. प्रामीसरी नोट हा एक बेचनीय दस्तैवज(Negotiable Instrument) आहे. १८८२च्या नेगोशीयेबल् इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टांत (बेचनीय दस्तैवजांचा कायदा) 'प्रामीसरी नोट' संबंधीं कायदा सांगितला आहे. त्यांत दिलेल्या 'प्रामीसरी नोट' या शब्दांच्या व्याख्येवरून प्रामीसरी नोट अथवा वचनचिठ्ठी कायदेशीर होण्याला पुढील गोष्टींची जरूरी असल्याचें दिसून येतें:—

(१) प्रामिसरी नोट ही वचनचिठ्ठी असल्यामुळें ती लेखीच असली पाहिजे हें उघड आहे; मग हा लेख शाईनें अगर पेन्सिलीनें लिहिलेला असो अगर छापलेला असो.

(२) या चिठींत तो लिहून देणाऱ्यानें ज्याला लिहून दिली त्याला पैसे देण्याचें बिनशर्त वचन दिलेलें असलें पाहिजे. केवळ "मी आपलें १०० रुपये देणें आहे." एवढेंच म्हणून भागणार नाहीं. एवढ्याचा अर्थ 'कर्ज असल्याचें आपणास मान्य आहे' असाच होईल. पण तें फेडण्याचें वचन दिलें असा होत नाहीं; म्हणून 'हे पैसे मी देईन' असें बिनशर्त वचन असलें पाहिजे. याचा अर्थ दुसरी कोणती गोष्ट घडून येण्यावर वचनपूर्ती अवलंबून ठेवतां कामा नये असा होतो. परंतु जी गोष्ट केव्हां ना केव्हां तरी निश्चयानें घडणार पण ती केव्हां घडून येईल हें निश्चयानें सांगतां येत नाहीं अशा गोष्टीवर जर पैसे देण्याचें वचन पूर्ण करणें अवलंबून ठेविलें असेल तर तें वचन बिनशर्त आहे असेंच कायदा मानतो. उदाहरणार्थ "मी 'ब'ला 'क'च्या मृत्यूनंतर दोन महिन्यांनीं एक हजार रुपये देण्याचें वचन देतों" यांत दिलेलें वचन बिनशर्त आहे.

(३) या वचनचिठ्ठीवर ती लिहून देणाऱ्याची सही पाहिजे. ज्याला सही करतां येत नाहीं त्यानें आपला आंगठा उठविला अगर दुसरी खूण केली तरी चालेल. (४) सही करणारी व्यक्ति कोण आहे हें स्पष्टपणें कळून येईल असें निर्दिष्ट झालें असलें पाहिजे. (५) ज्याचे नांवें वचनचिठी लिहून दिली त्याचे नांवहि स्पष्टपणें निर्दिष्ट केलें पाहिजे. (६) वचनचिठींत असलेलें वचन पैसे देण्यासंबंधींच असलें पाहिजे; पैशाऐवजीं दुसरें कांहीं देण्याचें वचन असतां कामा नये; जी रक्कम द्यावयाची ती स्पष्टपणें नमूद असली पाहिजे. अमूक एक रक्कम अमूक व्याजाच्या दरानें, अमूक मुदतीनंतर अमूक हप्त्यांनीं देईन अशा प्रकारचें वचनचिठींत नमूद असेल तर त्यायोगें तिच्या कायदेशीरपणाला बाध येत नाहीं. अमूक एक रक्कम देऊन शिवाय अमूक एक गोष्ट करीन असें वचन प्रामीसरी नोटेंत कायदेशीर रीत्या घालतां येत नाहीं.

प्रार्थनाः–प्रार्थना म्हणजे विनंति अथवा मागणी. विशेषतः परमेश्वराजवळ केलेली विनंति अथवा मागणी अशा अर्थानें हा शब्द वापरतात. मनुष्यमात्रानें नेहमीं ईश्वराची प्रार्थना करावी असा ईश्वर मानणाऱ्या सर्व धर्मांचा आदेश आहे. इस्लामधर्मीय प्रत्यहि नियमितपणें ईशप्रार्थना करतात. ख्रिस्ति धर्मानुयायीहि नित्य प्रार्थना करण्यास चुकत नाहींत. धर्मबुद्धि असणारे हिंदु नित्य संध्योपासना करतात. संध्योपासनेंत गायत्रीमंत्राचा जप करावयाचा असतो. हा मंत्र यजुर्वेदांतील आहे. या मंत्राला महामंत्र म्हणतात. या मंत्राचा अर्थ समजून घेतला असतां त्याला महामंत्र म्हणून दिलेली संज्ञा योग्यच असल्याचें दिसून येतें. 'सर्व चराचर सृष्टीला उत्पन्न करणाऱ्या व सर्व सुखें प्राप्त करून देणाऱ्या परमेश्वराच्या अत्यंत दैदिप्यमान अशा स्वरूपाचें आम्ही ध्यान करतों. तो परमात्मा आमच्या बुद्धीला तेजस्वी व उज्वल करून सत्कर्मप्रवृत्त करो' हा गायत्री मंत्राचा भावार्थ आहे. मानसशास्त्राचा असा सिद्धान्त आहे कीं मनुष्य ज्याप्रमाणें नेहमीं ध्यान करतो त्याप्रमाणें तो होतो. या सिद्धांतानुसार या मंत्राच्या जपानें मनुष्य अत्यंत तेजस्वी होतो.

वर दिलेल्या गायत्री मंत्राच्या उदाहरणानें प्रार्थना करण्याचा उद्देश काय हें समजून येईल. प्रार्थना

केल्यानें मनुष्याची चित्तशुद्धि होते, मनाला शांति व समाधान प्राप्त होतें, संकटकालीं धैर्यानें वागण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें. प्रार्थना केल्यानें आत्मिक बलाची वृद्धि होते व पर्वतप्राय दुःख झालें तरी मनुष्य हतवीर्य होत नाहीं. प्रार्थना केल्यानें तात्काल आपलीं संकटें दूर होतात असें कोणी समजूं नये. परमेश्वराची इच्छा मनुष्यानें पुरुषार्थ करावा अशीच आहे. तो एखाद्या लहरी सुलतानाप्रमाणें एखाद्याला सुदैवी अगर दुर्दैवी करीत नाहीं. मनुष्याची उन्नति वा अवनति होणें त्याच्या स्वतःच्याच हातीं आहे. 'उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्' असा सिद्धान्त आहे. यावरून पुरुषप्रयत्नाविना परमेश्वर कोणाची उन्नति करीत नाहीं हें स्पष्ट होतें. त्याचप्रमाणें आपणावर कोसळणारीं संकटें हींहि ईश्वरानें पाठविलेलीं नसतात. आपल्याच पूर्व-कर्मांचीं तीं फळें असतात. तीं भोगल्याविना सुटका नाहीं. 'अवश्यमेव भोक्तव्यं कृतं कर्म शुभाशुभम्' (केलेल्या कर्मांचीं फलें भोगलींच पाहिजेत.) असें जर आहे तर प्रार्थनेनें तात्काल केलेल्या कर्मांचीं फळें भोगण्यापासून सुटका होते असें समजणें चुकीचें आहे. परंतु प्रार्थनेमुळें मनाला होणारें समाधान व प्राप्त होणारें तेज व धैर्य हे लहानसान फायदे नाहींत. शिवाय आपण करीत असलेल्या पुरुषार्थाला परमेश्वराच्या अधिष्ठानाविना सिद्धि मिळणें कठीण आहे. म्हणून पुरुषार्थाला ईश्वरोपासनेची जोड देणें अवश्य आहे. हा झाला प्रार्थनेचा व्यावहारिक उपयोग. प्रार्थनेचा दुसरा जो उपयोग आहे तो पारमार्थिक. नित्य भक्तियुक्त अंतःकरणानें प्रार्थना केल्यानें ईश्वराविषयीं प्रेम दृढ होतें व अन्तीं भक्त ईश्वरस्वरूप होतो.

पुढें एका वैदिक प्रार्थनेचें भाषान्तर दिलें आहे. 'हे परमेश्वरा! तूं प्रकाशस्वरूप आहेस. कृपा करून माझ्यामध्येंहि प्रकाश उत्पन्न कर. तूं अनंत पराक्रमयुक्त आहेत. कृपा करून माझ्यामध्येंहि पराक्रम करण्याचें सामर्थ्य उत्पन्न कर. तूं अनंत बलयुक्त आहेस. माझ्यामध्येंहि बल स्थापन कर. तूं अनंत बुद्धिसामर्थ्यानें युक्त आहेस; माझ्यामध्येंहि तें सामर्थ्य उत्पन्न कर. तूं दुष्टांवर क्रोध करणारा आहेस तसा मलाहि कर. तूं निंदास्तुति सहन करणारा आहेस. करितां मलाहि तसाच कर.'

प्रार्थना समाजः—मूर्तिपूजा न करणारा व सर्व मनुष्यप्राणी एकाच दर्जाचे होत असें मानणारा हिंदुधर्मांतील एक पंथ. या पंथांतील लोकांना अस्पृश्यता व जातीभेद मान्य नाहीं. तसेंच या पंथीयांना कोणताच धर्मग्रंथ सर्वांशीं मान्य नाहीं. आपल्या पंथाचा प्रचार व प्रसार करण्यासाठीं यांनीं भक्ति व प्रार्थना या गोष्टींवर मुख्यतः भर दिलेला आहे.

हा समाज मुंबईस, प्रथमतः ३१ मार्च १८६७ ला स्थापन झाला. याच्या शाखा त्यांतील सभासदांनीं पंढरपूर, पुणें, इंदूर, अहमदनगर, सातारा व अहमदाबाद या ठिकाणीं काढल्या; पण त्यांपैकीं पुणें, इंदूर, व मुंबई येथील संस्था कांहींशा कार्यक्षम राहून बाकीच्या नष्ट झाल्या. या समाजानें सभासदांच्या शंकांचें निरसन करतां यावें, प्रार्थनासमाजेतरांत आपल्या मतांचा प्रसार व प्रचार करतां यावा म्हणून ४ मे १८७३ ला 'सुबोधपत्रिका' या पत्राला जन्म दिला. हें पत्र सध्यां चालू आहे. समाजांतील लोकांना एकत्र प्रार्थना करण्यास सोईचें व्हावें म्हणून मुंबईला 'प्रार्थनामंदिर' नांवाची इमारत बांधून तींत १८७४ च्या एप्रिलला कार्यदेखील सुरू केलें. मुंबईप्रमाणेंच पुण्यास आणखी एक इमारत बांधून तीस 'हरिमंदिर' असें नांव दिलें. समाजानें पंढरपूर येथें बालहत्याप्रतिबंधक व अनाथबालकाश्रम या संस्था काढल्या. सध्यां त्या तेथें उत्तम प्रकारें कार्य करीत आहेत. याशिवाय ज्ञानप्रसार व्हावा म्हणून मोफत वाचनालयें उघडलीं, रात्रीच्या शाळा काढल्या, महिलामंडळ स्थापिलें, चर्चेसाठीं संगतसभा स्थापिली व यंग थीईस्ट्स युनियन काढिलें.

प्रार्थना समाजानें आपल्या उपयोगासाठीं, केशवस्वामी, शिवदिन केसरी, रंगनाथ, एकनाथ, अमृतराय, कबीर, नानक, तुकाराम इत्यादि साधुसंतांच्या पदांचा संग्रह—'प्रार्थनासंगीत' नांवाचा ग्रंथ—प्रसिद्ध ला. याशिवाय उपासनेच्या वेळीं केलेल्या प्रार्थनांचा संग्रह प्रकाशला. न्या. मू. रानडे, डॉ. रा. गो. भांडारकर, वामन आबाजी मोडक, सर नारायणराव चंदावरकर, विठ्ठल रामजी शिंदे या मंडळींनीं दिलेलीं धर्म व नीति यांवरील व्याख्यानें व लेख यांचीं पुस्तकें काढून शिवाय मनन, बालसंगीत व प्रार्थना समाजाचा इतिहास हींहि पुस्तकें छापून काढलीं.

हा समाज स्थापण्याचा उद्देश व मूलतत्त्वें पुढीलप्रमाणें:—देव एक असून तो निराकार आहे. त्याचें मानसिक भजनपूजन करणें योग्य असून तें पार पाडणें

आपलें कर्तव्य आहे. मूर्तिपूजा करणें हा खरा मार्ग नसून तसें करणें म्हणजे त्याचा (परमेश्वराचा) अपमान करणें होय; आणि असें करण्यानें मनुष्यास नीचत्व येऊन दुराचरणाचा मार्ग पतकरल्याचा दोष येणार आहे. तेव्हां हा असन्मार्ग सुटून सन्मार्गाची लोकांत प्रवृत्ति व्हावी व सर्व संसारांतील धर्मसंबंधीं कृत्यें ह्या मतास अनुसरून व्हावीं असा या समाजाचा उद्देश आहे.

सभासदांपैकीं, न्या. मू. रानडे, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, रावबहादूर शंकर पांडुरंग पंडित, 'राजा शिवाजी' काव्याचे कर्ते महादेव मोरेश्वर कुंटे, सर नारायणराव चंदावरकर व विठ्ठल रामजी शिंदे इ. मंडळी समाजाचे प्रमुख लोक होत.

दर आठवड्याला रविवारीं प्रार्थनामंदिरांत सर्व सभासद एकत्र जमतात. प्रारंभीं संगीत होऊन नंतर प्रार्थना होते. मग धर्म किंवा नीति म्हणजे काय यासंबंधीं प्रवचन होऊन कार्यक्रम पुरा होतो.

प्रीस्टले, जोसेफ (१७३२–१८०४):–हा लीड्स (इंग्लंड) जवळ एका गांवीं जन्मला. धर्मशिक्षण घेतल्यावर बाविसाव्या वर्षी तो प्रागतिक मताचा धर्मोपदेशक झाला. धार्मिक, राजकीय, तात्त्विक व वैज्ञानिक सर्व बाबींत त्याचीं मतें पुढारलेलीं होतीं. त्यावेळचें पुराणमत जें कीं, ज्वलनशील पदार्थांत एक प्रकारचें ज्वलनतत्त्व असतें व ज्वलनक्रियेमुळें तें त्या पदार्थांतून बाहेर पडतें, याचा त्यानें आपल्या हेकेखोरपणानें आमरण त्याग केला नाहीं. परंतु गंमत अशी कीं, ज्वलनक्रिया खरोखर ज्या प्राणवायूच्या योगें चालते, त्याचा शोध प्रथम प्रीस्टलेनेंच लावला, त्याचे गुणधर्म पारखले, तो तयार करण्याची रीति प्रसिद्ध केली व इतर रासायनिक संशोधनही केलें. १७६९ त त्याची व अमेरिकेंतील सुविख्यात थोर पुरुष व शास्त्रज्ञ बेंजामिन फ्रांकलिन याची पॅरीस येथें गांठ पडली. त्यावरून त्याला शास्त्रीय संशोधनाची आवड उत्पन्न झाली. तो कांहींसा निष्काळजी असून स्वतंत्र बुद्धीनें प्रयोग करी. रसायनशास्त्रांत त्यानें कित्येक महत्त्वाचे शोध लावले आहेत. १७७३–७९ या कालांत तो एका इंग्रज सरदाराचा वाङ्मयसहाध्यायी असे. त्यावेळीं त्याला पुष्कळ फुरसत सांपडत असल्यानें त्याचें पुष्कळसें संशोधनकार्य या कालांतच झालें. सदर नोकरी सोडल्यावर पुढें दहा वर्षे तो बर्मिंगहॅम येथें धर्मोपदेशक होता. त्यावेळीं त्यास त्या इंग्रज सरदाराकडून वार्षिक १५० पौंड मिळत व इतर मित्रहि मदत करीत. त्यायोगें त्याचें संशोधनकार्य चाले. पुढें १७९१त फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल त्याचीं अनुकूल मतें बर्मिंगहॅमच्या नागरिकांना पसंत न पडून फ्रेंच राज्यक्रांतीचा १७९१ चा वार्षिक दिन पाळल्याबद्दल लोकक्षोभ होऊन त्याचें राहतें घर जाळण्यांत आलें. पुढें तीन वर्षांनीं तो अमेरिकेस गेला व तेथेंच १८०४ मध्यें वारला.

प्रोटीनः–कार्बन (Carbon); हायड्रोजन, ऑक्सिजन, नायट्रोजन व थोडासा गंधक ज्यांत आहे असें कॉम्प्लेक्स ऑर्गेनिक कॉम्पाऊड (Complex organic compound). प्रोटीन्स म्हणजे सर्व सेंद्रीय सजीव वस्तूंचा (Living organisms) महत्वाचा भाग होय. हें द्रव्य अन्नाचा एक नत्रयुक्त (Nitrogenous) भाग. याचे तीन प्रकार आहेत. सिंपल प्रोटीन्स (Simple Proteins) कान्ज्यूगेटेड प्रोटीन्स (Conjugted Proteins) प्रोटीन हायड्रोलिसीसचा परिणाम प्रोटीन्समध्यें अंड्यांतील पांढरा बलक, ग्लोब्यूलिन (Globulin), फायब्रिन (Fibrin),रक्तामधील अल्बूमिन (Albumin), हाडाचें ओसीन (Ossein), जिलेटिन (Gelatin), (प्राण्याच्या हाडांतील शुद्ध सरस) व कनेक्टिव्ह टिश्यूचा कोलॅजेन; दुधामधील कॅसीन (Casein) व मांसामधील क्रिॲटिन (Creatin) यांचा समावेश होतो. वनस्पती व प्राणी यांच्यांत आढळून येणाऱ्या प्रोटीनचे प्रकार ५० आहेत. या भिन्न प्रकारच्या स्वरूपांत व रासायनिक गुणधर्मांत पुष्कळ फरक आहे.

प्रेतसंस्कारः–प्रेताची विल्हेवाट करण्याची पद्धति व संस्कार. अगदीं प्राचीन काळीं प्रेतें उघड्या हवेंत ठेवीत असत. मृतशरीर पानांनीं अगर मातीनें झांकून जंगलांत ठेवीत असत अथवा टेकडीवर गवताखालीं झाकून अगर न्यू कॅलेडोनियांतील (New Caledonia) पद्धतीप्रमाणें झाडाला टांगून ठेवण्याची पद्धति असे. ऑस्ट्रेलिया व सिरॅम येथील झाडाला टांगून प्रेतसंस्कार करण्याच्या पद्धतीचे पर्यवसान उच्च स्थानावर प्रेतसंस्कार करण्यांत झालें. ही पद्धति मध्य ऑस्ट्रेलियांत डाकोटा व याकूत या लोकांत आहे (Dakota and Yakut). अंदमान व आसाममध्यें विशेष सन्मानानें संस्कार करावयाचा असल्यास या पद्धतीचा अवलंब करण्यांत येतो. न्यासामध्यें

(Nyasa) मृतशरीर दोन काठ्यांच्यामध्यें झोपाळयासारखें टांगण्यांत येतें. हवेमध्यें प्रेत टांगण्याची पद्धति भौगोलिक परिस्थितीमुळें निर्माण झाली असावी. ही पद्धति गोठलेल्या टंड्रामधील (Tundra) सॅमॉइड्स लोकांत आहे. गिलिआकामध्यें (Gilyaka) पुरण्यापूर्वी प्रेतें सुकावींत म्हणून हवेंत टाकण्यांत येतात. हिंस्रपशूंना खाण्याकरतां उघड्या मैदानावर प्रेतें टाकण्याची पद्धति प्राचीन सिथियन लोकांत होती ती झोरोआस्टरनें उचलली. सध्यां पारशांच्या टॉवर ऑफ सायलेन्समध्यें तीच पद्धति पाळण्यांत येते. मृतशरीरावरील मांस पक्ष्यांनीं खाऊन टाकल्यानंतर प्रति सहा महिन्यांनीं मध्यवर्ती खांचेंत हाडें झाडून टाकण्यांत येतात.

गुहेंत प्रेतसंस्कार करण्याची पद्धति (Cave-burial) फार प्राचीन काळची आहे. एकाच वेळीं गुहांचा राहण्याकरितां व प्रेतसंस्काराकरितां उपयोग करण्याच्या पद्धतीमुळें प्रेतसंस्काराकरितां वेगळी जागा डोंगराच्या खबदाडींत राखून ठेवण्यांत येऊं लागली. नीआलिथिक व ब्राँझ युगांत, ब्रिटनमध्यें पूर्वी राहण्याकरितां उपयोगांत आणलेल्या गुहा, प्रेतसंस्काराकरितां उपयोगांत आणल्या गेल्या.

जमिनींत प्रेतें पुरण्याची पद्धति संस्कृतीच्या कोणत्याहि अवस्थेंत आढळते. पुष्कळशा प्राचीन काळच्या पुरण्याच्या पद्धति अद्यापि अस्तित्वात आहेत. प्रेताबरोबर भाला पुरण्याची पद्धति बुशमेन (Bushmen) लोकांत आहे. मसाई लोक दुधानें भरलेला तुंबा (Calabash) पुरतात. हिंदुस्थानांतील कांहीं भागांत पोळी पुरण्याची चाल आहे. ब्रह्मदेशांत स्वयंपाकाचीं भांडीं, ग्रीनलंडमध्यें कुत्रा, कांगो सरदारांच्यांत मणी व गुलाम व फिजी बेटांत आवडत्या बायका प्रेताबरोबर पुरण्यांत येतात. सोमाली व मसाई लोकांमध्यें प्रेत बसवून ठेवण्यांत येऊन त्यावर दगड रचण्यांत येतात बांगो लोकांमध्यें कबरी भोंवती (Cairn) नक्षी केलेले खांब वर्तुलाकार लावण्यांत येतात. काव्हिरोंडो (Kavirondo) लोक डोक्याखेरीज शरीराचा इतर भाग झाकतात तर ॲबिसीनियामधील साहू लोक सर्व शरीर आच्छादून हात तेवढे उघडे ठेवतात. भिन्न भिन्न ठिकाणीं भिन्न प्रकारची शवपेटिका करण्यांत येते. सेरीलोकांत (Seri) शव पेटिकेकरितां कासवाच्या (Turtle) पाठीचा उपयोग करण्यांत येतो. ऑबोंगो (Obongo) पोकळ झाडाचा, बेचूयाना लोक (Bechuana) रेड्याच्या कातड्याचा व ब्राझिलमध्यें झाडाच्या खोडाच्या पोखरून केलेल्या नावेचा उपयोग करतात.

प्रेत नासूं कुजूं नये म्हणून त्यांत मसाला घालण्याची पद्धति (Embalming) इजिप्तमध्यें प्रथम शोधून काढण्यांत आली. ह्या पद्धतीचा प्रसार पश्चिमेकडील गॉंचेस (The Gaunches) पर्यंत व पूर्वेकडील ब्रह्मदेश मॅलेशीयापर्यंत झाला. प्राचीन काळीं पेरु देशांतहि ही पद्धति होती. अप्पर कांगोमध्यें प्रेत थोडेंबहुत भाजण्याची पद्धति आहे. चीनमध्यें प्रेत अग्नीच्या योगानें वाळविण्यांत येतें. हिंदू, ख्रिश्चन व पारशी लोकांच्या प्रेतसंस्काराची माहितीसाठीं 'अंत्यसंस्कार' भाग पहिला पृष्ठ १८५ पाहा.

प्रोबेटः–मृत्युपत्र हा लेख पहा.

प्लॅटिनम् (Platinum):–ही एक महत्त्वाचीं धातु आहे. महत्त्वाच्या मूलद्रव्यांपैकीं हें एक द्रव्य आहे. या धातूच्या अणूचें वजन १९५ असतें. विशिष्ट गुरुत्व (Specific Gravity) २१·५ व द्रवीभवनबिंदु (Melting point) १७७५° सें. असतो. याचा रंग कथिलाप्रमाणें पांढरा अगर पोलादाप्रमाणें करडा असून त्यावर एक प्रकारचें तेज असतें. हा धातू बराच नरम (Ductile) असून सोनें व चांदी यांचे खालोखाल घनवर्धनीय (Malleable) असतो. या धातूचा रस केला असतां तो तांब्याच्या रसापेक्षां अधिक कठीण असतो व साहजिकच ऑक्सिजनचे गुण शोषून घेतो. कोलंबियांतील बार्बाकोस, चोको (Choco) या भागांत प्रथम सांपडला. त्यानंतर बोर्निओमधील उरल पर्वतावर न्यू साऊथ वेल्स, ब्रह्मदेश, जपान, स्पेन, कॅनडा, ब्राझील वगैरे भागांतहि हा धातु असल्याचें आढळून आलें. महायुद्धापूर्वी हा धातु मिळण्याचें मुख्य केंद्र उरल पर्वत होतें.

प्लॅटिनम हा धातु शुद्ध स्वरूपांत सहसा आढळत नाहीं. बहुधा पॅलेडियम् (Palladium), रोडियम् (Rhodium) व ऐंद्र (Iridium) यांसारख्या एक अथवा अधिक धातूंशीं संयोगस्थितींतच हा धातु सांपडतो. या धातूचें शुद्धीकरण करतांना त्यावर अनेक संस्कार करावे लागतात. काळ्या रंगाचा प्लॅटिनम धातु विशेष महत्त्वाचा असतो. त्यांत हायड्रोजन व ऑक्सिजन जास्त प्रमाणांत असतात. गंधकाम्ल (Sulphuric Acid), विद्युत्–दिव्याचे चंबू (Bulbs), वजनें, मापें, मूस (Crucible), अग्निमापक (Pyrometer) वगैरे अनेक महत्त्वाच्या वस्तू या धातूपासून करतात,

प्लेगः–प्लेगच्या विशिष्ट जंतूपासून हा रोग होतो. या जंतूंच्या योगानें प्रथमतः उंदरांत प्लेगची सांथ उद्भवते व उंदीर मरूं लागतात. मेलेल्या उंदरावरील पिसवा त्यास सोडून दुसऱ्या जिवंत उंदराच्या शोधांत फिरत असतां त्यांच्या वाटेंत माणूस आल्यास त्याच्या अंगावर चढून दंश करतात. त्या वेळीं पिसूच्या तोंडातून प्लेगचे रोगजंतू मनुष्याच्या रक्तांत शिरतात व अशा रीतीनें त्यास प्लेग होतो प्लेग हा भयंकर प्राणघातक रोग आहे व याच्या सांथीनें आजपर्यंत गांवेंच्या गांवें व शहरेंच्या शहरें ओस पडत आलीं आहेत. परंतु अलीकडे प्लेग होण्याच्या कारणांचा शोध लागल्यानें व तीं कारणें नाहींशीं करण्याचा सशास्त्र प्रयत्न होत गेल्यानें प्लेगच्या प्रसारास पुष्कळच प्रतिबंध विशेषतः सुधारलेल्या राष्ट्रांत तरी झालेला आहे. इ. स. १६६६ सालीं लंडन शहरांत प्लेगनें कहर केला. त्यानंतर लंडन शहरास मोठी आग लागल्यानें तेथील प्लेग नाहींसा झाला. मुंबई इलाख्यांत प्लेगचा प्रसार बहुतेक या शतकाच्या आरंभापासून झालेला आहे. **लक्षणें**–प्लेगचा जंतु अंगांत शिरल्यानंतर ताबडतोब म्हणजे सुमारें तीन दिवसांत प्लेगचीं लक्षणें दिसूं लागतात. एकदम थंडी वाजून जोरांत ताप भरतो. १०३° ते १०७° अंशापर्यंतहि चढतो. डोकें दुखणें, अंग दुखणें, वांति होणें किंवा जुलाब होणें हीं लक्षणेंहि होतात. डोळे लाल होतात. चेहऱ्यावर भीति व चिंता स्पष्ट दिसतात. ताप जास्त चढल्यास रोगी लगेच मरतो. एरव्हीं, कांखेंत, जांघाडयांत अगर गळयांत गांठीं सुजतात म्हणून प्लेगला ‘ ग्रंथिक सन्निपात ’ असेंहि म्हणतात. हे गांठींचे अवदाणे कित्येकांत फार दुखतात. हळू हळू रोग्याची शक्ति क्षीण होत जाते, भ्रम होतो व रोगी दगावतो. प्लेगच्या लक्षणांवरून त्याचे निरनिराळे प्रकार आढळतात, ते मुख्यतः असेः–

(१) ‘ **ब्युबॉनिक्** ’ प्लेग–हा शेंकडा ७० प्रमाणांत आढळतो. हाच ग्रंथिक सन्निपात होय. (२) ‘ **सेप्टिसेमिक** ’ प्लेग–यांत गांठी फार वाढत नाहींत. व वाढल्या तरी त्यांत पू होत नाहीं. या प्रकारांत मृत्यूचें प्रमाण अतिशय आढळतें. यांत रुधिराभिसरणांतच प्लेगजंतूंची वाढ होते. (३) ‘**अबॉर्टिव्ह**’–या प्रकारांत ताप कमी असतो व गांठी १४ दिवसांत बसतात व बऱ्या होतात. (४) ‘**फल्मिनंट**’–या प्रकारांत ताप अतिशय असतो. गांठी वाढत नाहींत. रक्ताच्या वांत्या होतात व कांहीं तासांतच रोगी मरतो. (५) **न्युमॉनिक प्लेग**–या भयंकर प्रकारांत खोकला व फुप्फुसदाहाचीं लक्षणें असतात. अत्यंत अशक्तता वाटते. ग्रंथी वाढत नाहींत; पण ३ ते ५ दिवसांत रोगी दगावतो. न्युमोनियांत नाडी व श्वासोच्छ्वासाचें प्रमाण २:१ असतें, तसें न्युमॉनिक प्लेगमध्यें नसतें. (६) **अँब्युलंट प्रकार**–यांत सर्वच लक्षणें अगदीं सौम्य असतात. गांठी किंचित् वाढतात व बरेच दिवस तशाच राहतात. रक्त घटतें व रोगी फिका दिसतो व हळूहळू अशक्तपणा येतो.

न्युमॉनिक प्लेगमध्यें मृत्युसंख्या फारच असते. मँचुरियांत ४३००० रोग्यांतले अवघे ३ बरे झाले! शिवाय या प्रकारांत रोग्याच्या खोकण्यानें, श्वासोच्छ्वासानें वगैरे रोगाचा प्रसार होतो व तो अर्थात्च पिसवांच्या दशांनीं होणाऱ्या इतर प्रकारच्या प्रसारापेक्षां ज्यास्त असतो.

प्लेगचे जे रोगी बरे होतात त्यांच्या गांठींत कित्येकदां पू होऊन त्या बरेच दिवस वाहतात.

उपाय–प्रतिबंधक उपाय म्हणजे उंदरांचा नायनाट करणें. याकरितां पिंजरा लावून त्यांत उंदीर पकडावेत व त्यांचा नाश करावा. बेरिअम् सल्फेट या विषारी क्षाराच्या पिठांत मिसळून गोळया कराव्यात. उंदीर या गोळया खाऊन मरतात. मात्र मांजरें, कुत्रीं व इतर कोणी या गोळया खाणार नाहींत याबद्दल फार खबरदारी घ्यावी. घरांत उंदीरच सहसा होणार नाहीं व त्यांस कांहीं खाद्य मिळणार नाहींत अशीं (Ratproof houses) पद्धतशीर घरें बांधणें अगत्याचें आहे.

प्लेगचें व्हॅक्सिन् **इनॉक्युलेशन्** करून घेतल्यास माणसांत ६ महिनेपर्यंत तरी प्लेगप्रतिबंधक शक्ति राहते याचे योगानें प्लेग सहसा होत नाहीं व कदाचित् झाला तरी रोगी दगावण्याचा संभव सर्वांत कमी होतो.

प्लेगची सांथ उद्भवल्यास स्थानत्याग करून जाणे श्रेयस्कर होय.

रोग्यास तज्ञ डॉक्टरच्या सल्ल्यानें उपचार करावेत. अँटीप्लेग सीरम इंजेक्शनें ताबडतोब व भरपूर प्रमाणांत दिल्यास प्लेगचा रोगी बरा होण्याचा संभव वाढतो. गांठींत कॅर्बोलिक ॲसिड अगर आयोडिन यांचें इंजेक्शन देणें वगैरे उपाय कित्येकदां हितावह होतात असें आढळून आलें आहे.

आयुर्वेदिक उपाय—शक्य असल्यास फासणी किंवा जळू किंवा तुमडी लावून गांठींतील दूषित रक्त काढावें व त्यावर लेप किंवा दशांग गुग्गुल किंवा त्रिवा हळकुंड यांचा लेप द्यावा. पोटांत दारुहळद, नागरमोथे, कुटकी, हिरडेदळ, बेहेडेदळ, आवळकांठी, रिंगणमूळ, कडू पडवळ, हळद, कडू निंबाची साल यांचा अष्टमांश काढा करून दोन्ही वेळ द्यावा. त्यांतून सन्निपात कालकूट हे रस द्यावेत. शक्य असलेल्या ठिकाणीं तज्ज्ञांच्या सल्ल्यानें उपचार करावेत.

प्लेटो (खि. पू. ४२९ ते खि. पू. ३४७):—एक महान् ग्रीक तत्त्वज्ञानी. या थोर पुरुषाचा जन्म खि. पू. ४२९ सालीं अथेन्स येथें झाला. कुलीन घराण्यांत जन्मल्यामुळें त्याला लहानपणापासून उदार शिक्षण (Liberal Education) मिळालें. लहानपणीं तो उत्तम खेळाडू होता; त्यास अनेक ऑलिंपिक व इस्थ्मियन् (Olympic and Isthmian) खेळांत बक्षिसें मिळालीं. क्रॅटिलस (Cratylus) नामक एका तत्त्वज्ञान्यापाशीं त्यानें तत्त्वज्ञानाचे प्राथमिक पाठ घेतले. 'या विश्वांत अखिल वस्तू अखंड प्रवाहांत फिरत असतात.' या त्या तत्त्वज्ञानाच्या उपपत्तीचा खोल परिणाम प्लेटोवर झाला होता व त्याची छाया पुढें त्यानें लिहिलेल्या अनेक ग्रंथांत दिसून येते. वयाच्या वीस वर्षांपर्यंत संगीत, चित्रकला, काव्य वगैरे अनेक कलांचा सूक्ष्म अभ्यास त्यानें केला होता. त्यानें एक नाटक (Tetralogy) लिहिण्यासहि घेतलें होतें. अशा वेळीं सॉक्रेटिस या महात्म्याशीं त्याचा परिचय झाला. परिचय होतांच त्यानें नाटकाचें हस्तलिखित चुलींत फेकून दिलें व तत्त्वज्ञानाचा संपूर्ण अभ्यास करण्याचें ठरविलें. प्लेटोचें खरें नांव ॲरिस्टॉक्लेस (Aristocles) होतें; त्याचें रुंद कपाळ व खांदे यावरून सॉक्रेटिसनें त्यास प्लेटो हें नांव दिलें. प्लेटोनें आपल्या गुरुजीजवळ राहून खरी विद्या संपादन केली. गुरुजींचें त्याच्यावर निःसीम प्रेम होतें. खि. पू. ३९९ सालीं सॉक्रेटिस मरण पावला. तोंपर्यंत प्लेटो त्याच्याजवळच राहून तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत होता. आपल्या थोर गुरूच्या अनैसर्गिक मृत्यूनंतर त्याच्या शिकवणुकीचा अखिल विश्वांत प्रचार करून त्यांना अमर करायचें अशी तळमळ साहजिकच प्लेटोच्या अंतःकरणास लागली व त्यानें खरोखरींच आपल्या गुरुजीस अमर केलें आहे.

प्लेटोचे अनेक विषयांवर महत्त्वाचे ग्रंथ आहेत. त्यांचे मुख्यतः तीन भाग पडतात. पहिल्या भागांत Phaedrus, Protagras, Euthyphron यासारखे ग्रंथ येतात. दुसऱ्या भागांत, Politicus, Meno, Gorgias, Symposium यांचा समावेश होतो; व तिसऱ्या भागांतील मुख्य ग्रंथ Republic व Leges हे होत. हे सर्व ग्रंथ संवादरूपानें अगर पत्ररूपानें लिहिले आहेत. हे ग्रंथ जगाच्या वाङ्मयांत चिरकालीन महत्त्वाचे आहेत. तत्त्वचिकित्सेच्या दृष्टीनें त्यांचें महत्त्व जसें आहे तसेंच तत्कालीन तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांचें त्यांत दर्शन असल्यानें हे सर्व ग्रंथ अत्यंत महत्त्वाचे झाले आहेत.

मनुष्याचें मन अंतर्मुख करून त्याला सत्यसंशोधनाकडे प्रवृत्त करणें हा तत्त्वज्ञानाचा मुख्य हेतु असतो असें प्लेटोचें म्हणणें आहे आणि या मतास अनुसरूनच त्यानें संवादाला विशेष महत्त्व दिलें आहे. त्यानें तत्त्वज्ञानाचे मुख्यतः तीन भाग पाडले—नीतिशास्त्र (Ethics), पदार्थ विज्ञानशास्त्र (Physics) व ब्रह्मविद्या (Dialectics). या विश्वांतील अणुरेणू धरून प्रत्येक वस्तु प्रचंड वेगानें फिरणाऱ्या प्रवाहांत भ्रमण करीत आहे; पण या सर्वांमागें कांहीं तरी निश्चल अशी वास्तवता (Reality) असली पाहिजे. या वास्तवतेचेंच रूप, अंशतः आपल्यास सॉक्रेटिस यासारख्या महान् विभूतीमध्यें पहावयास मिळतें, अशी प्लेटोची श्रद्धा होती व सॉक्रेटिसप्रमाणेंच आत्मसंशोधनावर त्याचा भर होता व तें साधण्यासाठीं त्यानें सॉक्रेटिसप्रमाणें प्रश्नोत्तररूपी वादविवादपद्धतीचाच सर्रास अवलंब केला होता.

प्ल्यूरिसी (Pleurisy):—फुप्फुसावरणाच्या पडद्याचा दाह. थंडीमुळें अगर छाती भिजण्यानें हा विकार होतो. त्याचप्रमाणें बरगडी मोडल्यानेंहि हा विकार होऊं शकेल. **लक्षणें**—ज्या बाजूचें फुप्फुसावरण बिघडलें असेल त्या बाजूंत खोल श्वासोच्छ्वासानें अगर खोकल्यानें टोचल्याप्रमाणें किंवा खुपल्याप्रमाणें अतिशय वेदना होणें. ज्या ठिकाणीं अतिशय वेदना होतात त्या जागीं कान लावून ऐकल्यास घर्षणाचा कट्, कट्, कट् असा आवाज ऐकूं येईल. केस चिमटींत घेऊन चुरडले म्हणजे जसा आवाज होतो त्यासारखाच कांहींसा हा प्ल्यूरिसीच्या ठिकाणचा आवाज ऐकूं येतो. नाडी जलद चालते. जिभेवर राब येतो. शोष असतो.

क्षुधा नसते. ताप चढलेला असतो. ११२ दिवसांनंतर श्वासोच्छ्वास करण्यासहि अडचण भासूं लागते; कारण फुप्फुसावरणाच्या पोकळींत द्रव सांठतो. हा द्रव कांहीं कालांतरानें शोषला गेला म्हणजे श्वासोच्छ्वासास फिरून नीट करण्यास प्रतिबंध वाटत नाहीं. जास्त प्रमाणांत हा द्रव झालेला असल्यास शस्त्रक्रियेनें विशेष त्रास न होतां काढतांहि येतो.

उपचार—उबदार खोलींत रोग्यास निजवावें. त्यास जरूरीपेक्षां जास्त बोलूं देऊं नये. जवसाचें पोटीस छातीस बांधावें. आरंभीं दुखण्याच्या जागीं मोहरीची पूड बांधल्यास वेदना असह्य वाटत नाहींत. चिकणपट्टीच्या पट्ट्या छातीवर तिरक्या अशा चिकटवाव्यात. पथ्य दूध, साबू, कांजी हें ठेवावें; ज्वर थांबल्यावर नेहमींचा आहार हळू हळू सुरूं करावा. थंडीपासून जपावें.

आयुर्वेदिक उपाय—जलसंचय अधिक झाला असल्यास तो पाणी काढून नाहींसा करावा. यावर कुळीथ, अडुळसा, रिंगणमूळ, सुंठ यांचा काढा करून त्यांत पोखरमुळाचें चूर्ण घालून तो देत जावा. बरगड्यांत शूल असतो त्याला बरगड्यांवर करंजसाल, देवद्वार, गुग्गुळ यांचा लेप द्यावा. याखेरीज कर्पुरादि चूर्ण, किंवा सीतोपलादि चूर्ण हींहि पोटांत देत जावींत.

प्लँकमॅक्स (१८५८–):—ह्या जर्मन पदार्थविज्ञानशास्त्रज्ञाचा जन्म १८५८ त कील (जर्मनी) येथें झाला. त्याचा बाप गॉरिंजन (कील) विद्यापीठांत राज्यव्यवस्थाशास्त्राचा अध्यापक होता. प्लांकनें बर्लिन व म्यूनिक विद्यापीठांत वास्तवशास्त्राचा अभ्यास विसाव्या वर्षी संपविला. प्रो. कर्शाफ ह्या विख्यात अध्यापकाशीं उष्मयामिकांतील दुसऱ्या नियमासंबंधीं संशोधनात्मक कार्य करून १८७९ त म्यूनिक विद्यापीठाची 'डॉक्टर' पदवी त्यानें मिळविली. १८८५ पासून पुढें कील, बर्लिन वगैरे विद्यापीठांत त्यानें अध्यापन व संशोधनकार्य केलें. १९१२ त तो प्रशियन अकॅडमी ऑफ सायन्सचा आजीव चिटणीस झाला. १९१९ सालीं त्याच्या प्रसिद्ध कणवादाबद्दल त्यास नोबेल पारितोषिक मिळालें. १९३० सालीं त्यास जर्मन शिक्षणक्षेत्रांतील सर्वोच्च बहुमानाच्या जागीं एंपरर विल्यम शास्त्रसंवर्धन संस्थेचा अध्यक्ष नेमण्यांत आलें. त्याच्या कणवादानें आधुनिक शास्त्रीय विचारांत विलक्षण क्रांति केली आहे. आज 'कणवाद' आधुनिक वास्तवशास्त्रांत एक प्रमुख शक्ति गणली जाते. कारण यापूर्वीच्या अभेद्य अणु व क्षिप्त शक्ति (Radiated energy) यांच्यासंबंधाच्या रूढ व मूलभूत सिद्धांतांना त्यामुळें धक्का बसला आहे. कणवादानें क्षिप्त शक्तीचें नवीन रूप दृष्टीस पडलें आहे व वास्तवशास्त्रांतील प्रात्यक्षिक, व त्याची विचारसरणी यांत अपूर्व बदल झाला आहे. प्लांकनें कणवाद प्रथम १९०० सालीं प्रसिद्ध केला. त्यानंतरच्या चौतीस वर्षांच्या कालांत, नील्स भोर सर रुदर फोर्ड, श्रोडिंगर, हाइसेन्बर्ग वगैरे शास्त्रज्ञांनीं त्याची कसोटी सर्वप्रकारें पाहिली व मान्य केलें कीं कणवादानें जुने वैज्ञानिक विचार अजिबात बदलून टाकले आहेत.

फ

फडके, प्रो. नारायण सीताराम(१८९४–):—मराठींतील सुविख्यात कादंबरीकार व चतुरस्र लेखक. प्रो.ना. सी. फडके यांचा जन्म नगर जिल्ह्यांतील कर्जत या खेडेगांवीं ता. ४ ऑगस्ट १८९४ रोजीं झाला. पण त्यांचें मूळचें घराणें मात्र रत्नागिरी जिल्ह्यांतील आगरगुळें या गांवचें आहे. त्यांच्या वडिलांची नोकरी फिरतीची होती, त्यामुळें प्रो. फडके यांचें प्राथमिक शिक्षण निफाड, बार्शी इत्यादि गांवांतून झालें; पण १९०५ च्या सुमारास त्यांच्या वडिलांची बदली पुण्यास झाल्यामुळें त्यांचें पुढील सर्व शिक्षण पुण्यासच झालें. ते १९०९ सालींच मॅट्रिक व्हायचे, परंतु त्या वेळीं वयाची अट युनिव्हर्सिटीनें ठेवली होती; त्यामुळें त्यांना परिक्षेस बसतां आलें नाहीं. ते १९१० सालीं मॅट्रिक व १९१४ सालीं फर्ग्युसन कॉलेजमधून बी. ए. झाले. त्यांचा ऐच्छिक विषय तत्त्वज्ञान हा होता. युनिव्हर्सिटीनें या विषयाकरितां ठेविलेलें पारितोषिक त्यांनीं मिळविलेंच, शिवाय ते आपल्या विषयांत पहिलेहि आले. १९१५ सालीं मे महिन्यांत त्यांचा विवाह झाला. १९१६ सालीं त्यावेळच्या न्यू पूना कॉलेज (हल्लींच्या सर परशुरामभाऊ कॉलेज)मध्यें ते तर्कशास्त्र हा विषय शिकवीत असत. १९१७ सालीं ते तत्त्वज्ञान हा विषय घेऊन एम्. ए. झाले आणि न्यू पूना कॉलेजमध्यें प्रोफेसर म्हणून काम करूं लागले.

त्यांच्या लेखनास १९१२ सालापासून प्रारंभ झाला होता. त्यांची पहिली गोष्ट केरळकोकिळ मासिकांत प्रसिद्ध झाली होती. 'प्रेमाची चूक' या नांवाची एक कादंबरीहि त्यांनीं त्या मासिकांत लिहिली होती. ही

सगळी त्यांच्या उज्जल प्रतिभाविलासाची पूर्वतयारी होती असें म्हटलें तरी चालेल. त्यांची पहिली कादंबरी



प्रो० ना. सी. फडके.

म्हणजे मेरी कॉरेलीच्या 'टेंपोरल पॉवर' या लोकप्रिय कादंबरीवरून लिहिलेली 'अल्ला हो अकबर' (सन १९१७) ही होय. युनिव्हर्सिटीनें ठेवलेलें बक्षिस मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेनें त्यांनीं 'दादाभाई नौरोजी यांचें चरित्र' (सन १९१९) हें पुस्तक लिहिलें आणि बक्षिस मिळविलें.

पण यानंतर त्यांच्या जीवनाचा ओघ एकदम बदलला. स्वातंत्र्याच्या जयघोषानें वातावरण भरून गेलें होतें, त्याचे पडसाद फडक्यांच्या तरुण अंतःकरणांत उठल्यावांचून राहिले नाहींत. देशाभिमानाची अजस्र लाट साऱ्या देशभर उसळली होती, तिच्यांत तेहि सांपडले आणि त्यांनीं कॉलेजांतील आपल्या जागेचा राजिनामा दिला! या काळांत त्यांनीं व त्या वेळचे त्यांचे सहकारी प्रो. द. रा. घारपुरे यांनीं स्वदेशाभिमानानें रसरसलेलीं, भावनोत्कट आणि आवेशयुक्त भाषणें करीत दौरे काढले आणि तरुण महाराष्ट्रांत नवचैतन्य निर्माण केलें. फडक्यांच्या असामान्य वक्तृत्वकलेचा सर्वत्र विलक्षण बोलबाला झाला. या कालांतच त्यांनीं केसरी-मराठा संस्थेंत सहसंपादक म्हणून काम केलें. पण लवकरच त्यांनीं या सर्व चळवळींतून अंग काढून घेतलें आणि पुन्हां शिक्षकाचा पेशा पत्करला.

यानंतरच्या काळांत मात्र ते बरींच वर्षेंपर्यंत कुठेंच स्थिर राहिले नाहींत. दिल्लीला सेंट स्टिफन्स कॉलेजांत ते एक वर्ष राहिले, सिंध–हैद्राबादच्या नॅशनल कॉलेजांत त्यांनीं एक वर्ष काढलें आणि नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजांतहि ते कांहीं काळ राहिले. मात्र जेथें जेथें ते गेले तेथें तेथें ते विद्यार्थी–प्रिय शिक्षक म्हणून गाजले. पण ही भ्रमंति शेवटीं १९२६ सालीं संपली आणि कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांतील जागेवर ते स्थिर झाले.

या भ्रमंतीच्या काळांतहि त्यांचें लेखन अखंडपणें सुरू होतें. पण कोल्हापूरला आल्यानंतर त्यांना जें स्वास्थ्य मिळालें त्यामुळें मराठी साहित्य कितीतरी समृद्ध झालें. १९२६ सालीं त्यांनीं 'रत्नाकर' मासिक सुरू केलें होतें. त्या मासिकाकरितां त्यांनीं 'जादुगार' व 'दौलत' या दोन कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यांपासून त्यांना अर्थलाभ झाला नाहीं तरी लोकप्रिय कादंबरीकार ही बहुमानाची पदवी त्यांना लाभली आणि 'मराठी भाषेचे जादूगार' अशी त्यांची कीर्ति पसरली. यानंतरच्या काळांत त्यांनीं अटकेपार, निरंजन, उद्धार, आशा, प्रवासी, समरभूमि इत्यादि कादंबऱ्या लिहिल्या. येवढेंच नव्हे तर ज्या विषयावर मराठींत ग्रंथ नव्हते त्या विषयावर आपल्या सुबोध, लालित्यपूर्ण भाषेंत ग्रंथ लिहून ते लोकप्रिय करून दाखविले. साहित्यशास्त्राची आणि लेखनकलेची विस्तारपूर्वक चर्चा करणारा 'प्रतिभासाधन' (सन १९३२) हा ग्रंथ शास्त्रीय स्वरूपाचा असूनदेखील लोकप्रिय झाला. त्या ग्रंथाला 'भोजराज प्राईझ'हि मिळालें. 'मानस मंदिर' (सन १९३६), 'सुखाचे संसार' (१९२९) इत्यादि ग्रंथ लिहून मराठी वाङ्मयांत नवीन विचारसरणींचे जिवंत प्रवाह आणून सोडण्याचें कार्यहि त्यांनीं केलें. त्यांची आतांपर्यंतची एकंदर ग्रंथनिष्पत्ति चाळीसच्या पुढें झाली आहे. 'कलेकरितां कला' या मतप्रणालीचे ते निर्भय व कट्टे पुरस्कर्ते आहेत. त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतून उच्च मध्यमवर्गीय कुटुंबांतील स्त्रीपुरुषांचींच चित्रें प्रायः काढलीं असलीं तरी मनुष्यस्वभावाचे अनेक नमुनेहि त्यांनीं रंगविले आहेत. विलासी, उन्मादक वातावरण निर्माण करण्यांत तर त्यांचा हातखंडा आहे. ललितमधुर भाषाशैली हा त्यांच्या सर्वच लेखनाचा विशेष आहे.

फडके, वासुदेव बळवंत (१८४६–१८८३):– १८५७ नंतरच्या कालांतला क्रांतीवादी देशभक्त वासुदेवरावांचा जन्म कल्याणला १८४६ त झाला. यांचें बाळपण व प्राथमिक शिक्षण कल्याणास होऊन इंग्रजीचा दोन तीन इयत्तांचा अभ्यास मुंबई–पुणें येथें झाला. त्यांनीं खासगी अभ्यास करून इंग्रजींत बरीच प्रगति करून घेतली.

शिक्षणानंतर वासुदेवरावांनीं १८८६ पर्यंत मुंबईस व पुढें पुण्यास नोकरी केली. आईच्या अत्यवस्थ स्थितींत साहेबानें रजा न दिल्यामुळें त्यांचें मत युरोपियन लोकांबद्दल दिवसेंदिवस कलुषित होऊं लागलें. तशांतच न्या. मू. रानड्यांचीं स्वदेशी व्यापारावरील व्याख्यानें ऐकून त्यांचा देशाभिमान जागा झाला. याच वेळीं सरकारनें राजकीय धोरणांत जो बदल केला त्यामुळें सरकारविषयींचा द्वेष जास्तच वाढला. यापुढें त्यांनीं नोकरीवर लाथ मारून देशाची परिस्थिति सुशिक्षितांना समजून देण्याकरितां अनेक व्याख्यानें दिलीं पण तीं सारीं फुकट गेलीं. यानंतर त्यांचा पांढरपेशांचा नाद सुटला. रामोशांसारख्या लोकांचें सहाय्य मिळेल म्हणून त्यांच्याशीं फडक्यांनीं दळणवळण वाढविलें मिळाले तेवढे अनुयायी घेऊन त्यांनीं कार्याला आरंभ केला. त्यांना बंड करून इंग्रजांची हिंदुस्थानांतून हकालपट्टी करावयाची होती. बंडाला मोठें माणूसबळ हवें. तें मिळवण्यास पैसा हवा म्हणून वासुदेवरावांनीं दरोड्यांचा मार्ग पतकरला. धामारी, वाल्हें, हर्णें, भागंदरी, सोनापूर व चांदखेड येथें दरोडे घातले; पण यांत त्यांस पुरेसा पैसा मिळाला नाहीं. अर्थात् बंडाला लागणारें मनुष्यबळ कसें मिळणार? बरोबरीच्या साथीदारांस निरोप देऊन ते सल्ल्यासाठीं पुण्यास आले; पण तेथला अनर्थकारक देखावा पाहून आपल्या व मित्रांच्या हिताकरितां ते श्रीशैलाकडे निघून गेले. तेथें कांहीं काल वास्तव्य करून ते पुनः गाणगापुराकडे वळले.या ठिकाणीं स्वतःला पकडण्यास सरकारी लोक येणार अशी बातमी त्यांस मिळतांच ते 'देवरनाथगी' या गांवीं पळून गेले. तेथें हे दमूनभागून व तापानें पछाडल्यामुळें एका देवळांत झोंपले. झोंपेंतच त्यांस मेजर डॅनियल यानें पकडून पुण्यास पाठवून दिलें. २२ ऑक्टोबर १८७९ ला चौकशी सुरू झाली. या खटल्यांत त्यांना सरकारनें जन्मठेपेची शिक्षा देऊन 'एडन'ला नेऊन ठेवलें. येथें चार एक वर्षांतच त्यांचा अंत झाला. वासुदेवरावांचा स्वभाव करारी, निस्पृह, सोशिक व धर्मनिष्ठ होता.

फणसः–फणस हें एक फळझाड असून त्याची लागवड कोंकण भागांतच जास्त आढळते. त्या झाडाचा विस्तारही बराच मोठा असून उंचीस हें झाड ५०।६० फुटांपर्यंत वाढतें. फळें झाडाच्या शेंड्यास इतर फळझाडांप्रमाणें लागत नसून तीं बुंध्यापासून वर फांद्यापर्यंत सबंध आंगाला लगटलेलीं असतात. फळाचा आकार अंडाकृती पण अतीशय मोठा असून कांहीं फळें मनुष्याचें एक ओझें होईइतकीं मोठीं म्हणजे ८० ते १०० पौंडांपर्यंतही असतात. फळ पिकल्यानंतर पिवळट रंगाचें होतें. फळावर सर्व ठिकाणीं ब्रशाप्रमाणें बोथट आंखूड कांटे असतात. एका झाडास १०० पासून २५० पर्यंत फळें येतात.

फणसांत मुख्यतः दोन जाती आहेत. एक कापा व दुसरा बरका. पण झाडावरून किंवा हिरव्या फळावरून जात ओळखतां येत नाहीं. बरक्या फणसांतील गरे सहज अलग करितां येतात, पण काप्या फणसांतील गरे काढण्याकरितां विशेष प्रयास पडतात. बरके गरे फारच लिबलिबीत असतात. त्यामुळें न चावतां ते गिळतां येतात. कापे गरे साधारण घट्ट असून ते खातांना चावावे लागतात. गऱ्यांमध्यें एक जाडसर आठळी असते. फणसाच्या हंगामांत गरीब लोक कित्येक वेळां गऱ्यांवर व आठळ्या भाजून त्यांवर उपजीविका करितात. एक मोठा फणस ५।१० माणसांचें पोट भरूं शकतो; इतके त्यांत गरे मिळतात. हिरव्या फणसाच्या गऱ्याची उत्तम भाजी होते. पिकलेल्या गऱ्यांतील बिया किंवा आठळ्या उष्ण राखेंत भाजून काढल्या म्हणजे त्या खाण्यास रुचकर होतात. त्यांचें पीठही करितात व नंतर त्यापासून अनेक पदार्थ तयार करितां येतात. बरक्या फणसापासून उत्तम फणसपोळी करितात.

फणसपोळी करण्याकरितां बरके गरे चाळणींतून फेसून घेऊन निघालेला रस ताटांत किंवा अशाच उथळ मोठ्या भांड्यांत घालून उन्हांत वाळवितात. ह्यासच फणसपोळी म्हणतात. ही ५।६ महिने किंवा अधिकही काल टिकते. फणसाचें झाड ७५।८० वर्षेंपर्यंत टिकतें.

+ **फणस**–(भाजी प्रकार १ ला) **साहित्य**–कोंवळा फणस, तुरीची डाळ, ओले हरभरे किंवा ओले वाटाणे,

भुईमुगाचे दाणे, मीठ, तिखट, गूळ, हळद, नारळ वगैरे. **कृति**-चांगला कोंवळा फणस घेऊन, तो पावेसकट चिरून त्याच्या फोडी कराव्यात. फोडीच्या अजमासें तुरीची डाळ, भुईमुगाचे दाणे, ओले हरभरे किंवा वाटाणे, हळद हे जिन्नस घालून शिजत ठेवावें. भाजी चांगली मऊ शिजल्यावर अजमासें मीठ, गूळ, तांबडी पूड व ओलें खोबरें घालून मंदाग्निवर शिजत ठेवावी. भाजी निवाल्यावर तिला हिंग-मोहऱ्याची फोडणी द्यावी.

(प्रकार २ रा) **साहित्य**-पहिल्या प्रकाराप्रमाणें घ्यावें. **कृति**-कोंवळ्या गऱ्यांचा फणस घेऊन चिरतांना त्याची पात काढून भाजी बारीक चिरून घ्यावी. भाजीच्या अजमासें वाटाणे, भुईमुगाचे दाणे हळद घालून शिजत ठेवावी. भाजी मऊ शिजल्यावर मीठ, तांबडी पूड, गूळ व ओलें खोबरें घालून शिजवावी व वरीलप्रमाणेंच फोडणी देऊन वाढावी. ह्या भाजीला फणसाची 'साकरभाजी' म्हणतात.

(जून गऱ्यांची) **साहित्य**-वरीलप्रमाणेंच. **कृति**-फणस चिरतांना गरे काढून घ्यावेत. गऱ्याच्या सारख्या पाकळ्या करून घ्याव्यात. गऱ्यांच्या आंतल्या आठळ्या घेऊन त्या फोडाव्यात. आठळ्यांचें वरचें टरफल टाकून द्यावें व मग त्यांचे सारखे तुकडे करावेत. प्रथम बुडते पाणी घालून आठळ्या शिजत ठेवाव्यात व त्याच्या अजमासें, मीठ, हळद व गूळ शिजतांना घालावा. आठळ्या चांगल्या मऊ शिजल्यावर त्यांत अगदीं थोडें पाणी राहिलें म्हणजे त्यांत गऱ्याच्या पाकळ्या टाकाव्यात व त्याला मंदाग्निवर वाफा येऊं द्याव्यात व पुन्हां अजमासें मीठ घालून, भाजी कोरडी झाल्यावर उतरून झांकून ठेवावी व निवाल्यावर मिरच्यांचे तुकडे घालून हिंग-मोहऱ्यांची फोडणी द्यावी. मिरच्यांचे तुकडे चुरून भाजी कालवावी. खोबरेंहि भरपूर घालावें.

(काप) **साहित्य**-कापा व पाडास आलेला फणस, तिखट, मीठ, हिंग, जिरें व खोबऱ्याचें तेल. **कृति**-फणस चिरून आंतील गरे काढून घ्यावेत. गऱ्यांच्या आंतल्या आठळ्या काढाव्यात व गऱ्यांचे लहान लहान तुकडे करावेत. तिखट, मीठ, जिरें व हिंग यांची बारीक पूड करून घ्यावी. कढईत खोबऱ्याचें तेल घालून तें तापल्यावर गऱ्याचे तुकडे तळून घ्यावेत. नंतर त्या तळलेल्या गऱ्यांवर तिखटमिठाची जी पूड करून ठेवलेली असते ती पसरून ते चांगले घोळसावेत. निवाल्यावर डब्यांत घालून ठेवावेत. हे खावयास चांगले लागतात व तीनचार महिने मऊ होत नाहींत.

फणसाचें सांदणें-**साहित्य**-बरक्या गऱ्यांचा रस, पाणी, कण्या, गूळ, दूध, साखर, वेलदोडे. **माप**-वाटीभर गऱ्यांचा रस, अर्धी वाटी पाणी, पाऊण वाटी तांदळाच्या कण्या, लिंबाएवढा गूळ. **कृति**-कण्या तुपावर किंचित् भाजून घ्याव्या. गरे मोदकपात्राच्या चाळणींत घालून फेसावे म्हणजे रस खालीं गळेल. नंतर त्याच्यांत पाणी, गूळ व कण्या घालून करावयाच्या अगोदर दोन तास भिजवून ठेवावें. पीठ सरबरीत होईल असें भिजवावें. मोदकपात्रांत पाणी घालून तें चुलीवर ठेवावें. त्याला चांगलें आधण आलें कीं, तयार केलेलें पीठ वाटींतून अर्धी वाटी होईल इतकें घालावें व मोदकपात्रांत ठेवावें. चांगलें शिजलें कीं खालीं उतरावें. खातांना दूध, साखर व वेलदोडा घालून तयार केलेलें असतें त्याबरोबर खावें.

फणसाची भाजी-**साहित्य**-हिरवा कोंवळा फणस, भुईमुगाचे दाणे, तिखट, मीठ, गूळ, फोडणी. **कृति**-प्रथम भुईमुगाचे दाणे पाण्यांत भिजत घालावेत. फणस चिरतांना त्याची पाव व बाहेरील साल काढून त्याच्या मोठ्या फोडी चिराव्यात व त्या थोडें पाणी घालून उकडत ठेवाव्यात. भुईमुगाचे दाणे सोलून घ्यावेत. वाटाणे निवडावेत. फोडी उकडल्यावर पाट्यावर त्या ठेचून घ्याव्यात. नंतर पातेल्यांत ठेचलेला फणस घालून त्यांत दाणे, तिखट, मीठ, गूळ घालून शिजवाव्या. शिजून झाल्यावर खालीं उतरून ठेवावें. भाजी निवाल्यावर तिला हिंगाची, मिरच्याचे तुकडे घालून, फोडणी द्यावी.

फत्तेपूर सिक्री:-आग्रा शहरापासून २४ मैलांवर हें शहर आहे. हें शहर सन १५६९ सालीं अकबर बादशहानें वसविलें. हें शहर सिक्री नांवाच्या एका खेड्याजवळ वसविलें आहे. ज्या ठिकाणीं बाबर बादशहानें जय मिळविला तेंच हें खेडें होय. सिक्री या खेड्यांत अकबराचे वेळीं शेख सलीम खिस्ती नांवाचा मुसलमान साधू रहात असे. त्याची तपश्चर्या व पावित्र्य याविषयीं फारच ख्याति होती. अकबर बादशहाला त्यावेळीं कोणी मूलबाळ हयात नव्हतें. त्याला आपल्याला मुलगा व्हावा अशी उत्कट इच्छा होती.

शेखसलीमच्या प्रसादानें त्याला मुलगा झाला. सदर मुलगा सुप्रसिद्ध जहांगीर बादशहा हाच होय. जहांगिराचा जन्म सिक्री येथेंच झाला. पुत्रजन्मानें हर्ष पावलेल्या अकबरानें त्या ठिकाणीं एक शहर वसवून तेथें आपली राजधानी करण्याचा निश्चय केला. तेंच हें फत्तेपूर सिक्री शहर होय.

हें शहर त्यांतील भव्य प्रासाद, विस्तीर्ण पटांगणें-प्रचंड मशीद, व इतर मोंगली शिल्पकलेचे नमुने यांविषयीं प्रसिद्ध आहे. पण या सुंदर शहरांत पाण्याचा तुटवडा असल्यामुळें अकबराच्या पश्चात् याच्या स्थापनेनंतर पन्नास वर्षांनीं तें ओस पडलें.

या शहरांतील प्रेक्षणीय स्थळें–विजयाचा मनोरा (Tower of Victory), हा मनोरा अकबरानें खानदेशचें राज्य जिंकल्याचें स्मारक म्हणून बांधला आहे. ही इमारत संगमरवरी दगड व तांबडे वाळूचे दगड यांची बांधली आहे. येथील विशाल मशीद अत्यंत भव्य असून तिची पूर्वपश्चिम लांबी ५४२ फूट व दक्षिण उत्तर रुंदी ४३८ फूट आहे. मशिदीनजीकच शेख सलीम खिस्ति या साधूचें कबरस्थान आहे; या कबरस्थानचें शिल्पकाम इतकें नाजूक व सुंदर आहे, कीं तें पाहतांच आग्रा येथील ताजमहालची आठवण होते. ताजमहाल अर्थातच यानंतरचा. याशिवाय अकबराच्या बायका जोधबाई व मिरीयम यांचीं सुंदर निवासस्थानें, अकबराचें सभागृह व सुंदर क्रीडांगण हीं प्रेक्षणीय आहेत.

फर्ग्युसन, जेम्स (१८७८–१८८६):–शिल्पकलेवरील स्कॉटिश ग्रंथकार. स. १८३४–४२ सालच्या दरम्यानच्या काळांत यानें प्रसिद्ध प्राचीन शिल्पावशेषांबद्दल सुप्रसिद्ध अशा हिंदुस्थानांतील अनेक स्थळीं प्रवास करून पुढें प्रसिद्ध होणाऱ्या आपल्या शिल्पविषयक ग्रंथांकरितां पुष्कळ साहित्य जमविलें. यानें इंग्लंडमधील लोकांच्या मनांत भारतीय शिल्पकलेबद्दल पुष्कळ आवड उत्पन्न केली. स. १८४३ सालीं यानें 'दक्षिण हिंदुस्थानांतील खडकांत खोदलेलीं देवालयें' हा निबंध वाचला. त्यामुळें प्राचीन हिंदु देवालयांतील जुन्या शिल्पकामाची खरी कल्पना व किंमत शिल्पसंशोधकांस कळूं लागली. याचाच परिणाम म्हणून ईस्ट इंडिया कंपनीनें निरनिराळ्या प्रांतांच्या मुख्याधिकाऱ्यांना आपल्या प्रांतांतील अवशेषांची पाहणी, मोजणी वगैरे करण्याकरितां लायक व हुषार माणसें नेमण्याबद्दल शिफारस केली.

प्रवासांत सूक्ष्म निरीक्षण करून जमविलेल्या साहित्याचा 'भारतीय व पौरस्त्य शिल्पकलेचा इतिहास' हा सर्वमान्य ग्रंथ लिहितांना फर्ग्युसन यानें पुष्कळ उपयोग केला. यानें स. १८४८ त 'हिंदुस्थानांतील प्राचीन बौद्धशिल्प' हा लेख प्रसिद्ध केला; व लगेच 'हिंदु प्रिन्सिपल्स ऑफ ब्यूटी इन् आर्ट' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. पुढें यानें 'दि हॅण्डबुक ऑफ आर्किटेक्चर' हा सुप्रसिद्ध ग्रंथ हातांत घेतला. ह्यास केवळ भारतीय नव्हे तर पूर्व किंवा पश्चिम या दोन्ही दिशांकडील देशांमध्यें जो प्राचीन कलेचा स्मारकावशिष्ट भाग दृष्टीस पडे, त्याकडे याचें लक्ष आकर्षिलें जात असे. याचा 'वनस्पती व सर्प यांची जोपासना' हा सर्वमान्य ग्रंथ हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीच्या अखत्यारींत तयार झाला असून तो इंडिया ऑफिसनें स. १८६८ सालीं प्रकाशित केला. १८६९ सालीं फर्ग्युसन यानें 'सेक्रेटरी ऑफ वर्क्स ॲण्ड बिल्डिंग' ही जागा पत्करूनहि आपलें लेखनकार्य शेवटपर्यंत चालू ठेविलें होतें.

फलज्योतिषः–हें शास्त्र फार प्राचीनकाळीं हिंदुस्थानांत उदयास आलें. धर्मक्रिया उक्तकालीं केल्या तरच सफल होतात अशी कल्पना असल्यामुळें वैदिक काळींच आर्यांनीं नाक्षत्र ज्योतिषाची-पद्धति बसविली. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष या सहा वेदांगांत ज्योतिषाची त्यांनीं गणना केली. प्राचीन हिंदु ज्योतिषांनीं या बाबतींत किती परिश्रम केले आहेत हें "भारतीय ज्योतिष शास्त्राचा इतिहास" या पुस्तकांत कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं शेकडों प्राचीन ग्रंथ व ग्रंथकार यांची यादी दिली आहे, त्यावरून दिसून येतें. हिंदूंनीं ग्रीकांपासून राशिभविष्य व यवनांपासून ताजिकपद्धति इत्यादि गोष्टी घेऊन फलज्योतिषशास्त्र समृद्ध केलें. पंचांगसुधारणा कमिटीनें नवें टिळक पंचांग प्रचलित केल्यामुळें पंचांगांत सायन व निरयन असा हल्लीं वाद सुरू आहे. तथापि फलज्योतिष हें अनुभवाचें शास्त्र असल्यानें अनुभवाला येईल तें खरें असें मानून निदान या विषयाचे बाबतींत सामान्य मनुष्यास हा वाद टाळतां येण्यासारखा आहे. कोशाकरितां कांहीं माहिती सूत्ररूपानें पुढें दिली आहे; परंतु यापेक्षां बृहत्पाराशरी किंवा इतर मराठी ग्रंथ जिज्ञासूनें वाचावे म्हणजे अधिक माहिती मिळेल.

प्रेम, मित्रत्व व शत्रुत्व–मित्रत्व अगर शत्रुत्व ही मनुष्याच्या आयुष्यांत अशी एक गोष्ट आहे कीं ती सर्वस्वीं दैवसिद्ध मानावी लागते. आयुष्य हा एक महासागर आहे. त्यांत दैवेच्छेनें दोन माणसें, वहात येणाऱ्या लाकडाच्या ढलप्याप्रमाणें एकत्र येतात व दैवेच्छेची दुसरी लाट आली कीं विभक्त होतात. अनेक कारणांनीं आपला संबंध समाजांतील पुष्कळ माणसांशीं येतो. परिस्थितीमुळें तींच माणसें तेथें कां असावीं हें आपल्या हातीं नाहीं, त्यांच्याशीं मैत्री करणें हें आपल्या हातीं नाहीं तसेंच ती टिकविणेंहि आपल्या हातीं नाहीं ! कृष्णार्जुनांसारखे जिवलग मित्रहि शत्रुत्वानें प्रसंगीं एकमेकांशीं लढतात. तसेंच प्रसंगीं हाडवैरीहि मित्राप्रमाणें उपयोगीं पडतो. तात्पर्य, शत्रुमित्रयोग हा जन्मांतरींच्या कर्मांचें एक प्रकारें फळ होय. मित्रलाभ हें स्वतःच्या सुकृताचें फळ, शत्रुत्व हें दुष्कृताचें फळ. या जगांत कोणालाहि पूर्वकर्मानुसार ज्याचें देणें त्याला द्यावेंच लागतें; व तें देणें फेडावयाचें असतें म्हणूनच 'अकारण मित्रत्व' व 'अकारण शत्रुत्व' असे चमत्कार पहावयास सांपडतात.

मित्रांचा बोध कोणी चतुर्थ स्थानावरून तर कोणी लाभस्थानावरून करितात. 'लाभ' करून देतो तो मित्र, अगर मनाला ज्याच्या संगतीनें 'सुख' होतें तो मित्र अशा वेगवेगळया विचारामुळें हें स्थान भिन्न कल्पिलें आहे व त्या प्रत्येकाला थोडा अर्थहि आहे. उदा. षष्ठाचें षष्ठ स्थान म्हणजे आपल्या शत्रूचा शत्रु तो आपला मित्र हीहि विचारसरणी वावगी नाहीं. चतुर्थापासून चतुर्थ म्हणजे सप्तमस्थान हें पत्नीचें मानलेलें आहे. पत्नि म्हणजे सर्व प्रकारें आपणाला परमसुख देणारा आपला जन्माचा मित्रच नव्हे काय ? सांगण्याचें तात्पर्य इतकेंच, कीं मित्रस्थान कोणचें मानावें हें ज्या विचारसरणीनें व हेतूनें आपण कुंडली पाहात असूं त्याप्रमाणेंच ठरवावें लागेल.

कुंडलींतील षष्ठस्थान हें उघड शत्रूंचें, व्ययस्थान हें गुप्त शत्रूंचें दर्शक व सप्तम स्थान हें ज्याचेबरोबर न्यायाच्या कोर्टांत उघडपणानें भांडण चालू आहे अशा प्रतिस्पर्ध्याचें द्योतक आहे.

संततिविचार–संततीचा विचार पंचमस्थानावरून करतात, याचें कारण तें अष्टम स्थानाचें कर्मस्थान व सप्तम स्थानाचें लाभस्थान आहे हें असावें. स्त्रीलाभाचें खरें सार्थक तिच्यापासून पुत्रलाभ झाल्यानेंच होतें यावरूनहि पंचमस्थानावरून संततीचा कां विचार करतात हें दिसून येतें.

संततीसंबंधीं विचार करतांना पंचमस्थान व त्यांतील ग्रह, पंचमेष व संततीचा मुख्य कारक जो गुरु त्याची कुंडलींतील स्थिति पहावी लागते. तसेंच स्त्री व पुरुष या दोघांच्याहि कुंडल्या लक्षांत घ्याव्या लागतात. पंचमस्थानाला भाग्येशाला अगर गुरूला तरतमभावानें केव्हां व कसें प्राधान्य द्यावयाचें हें दर कुंडलीनुसार वेगळें ठरेल. सामान्यतः इतकें सांगतां येईल कीं पंचमस्थानीं वंध्या राशी असूं नये. त्यांत पापग्रह असूं नयेत. भाग्येश हा अशुभस्थानीं अगर क्रूर ग्रह दुष्ट असूं नये. एकादश स्थानांत शुभग्रह असावेत. गुरु हा सहा, आठ, बारा या त्रिकस्थानीं असूं नये अगर गुरूच्या पंचमांत अगर नवमांत पापग्रह असूं नयेत.

गुरु हा पुत्रकारक ग्रह आहे. पण तो स्त्रीराशींत पडला असेल तर कन्या संतति अधिक होते. गुरु हा शनीनें युक्त असतां फारच थोडी संतति दिसते. कारण शनि हा अत्यंत शीतग्रह असून त्याची पीडा व परिणाम गुरुलाहि भोगावा लागतो. पंचमस्थानीं रविमंगळ असतील तर कांहीं अपत्यांचा मृत्यु होतो. व गुरु जर मंगळ, हर्षल, नेपच्यून यांनीं पीडित असेल तर प्रसंगीं गर्भपातहि होतो. गुरु निर्बल अगर शत्रुराशींत असून पंचमेश बलवान अगर शुभदृष्ट असेल तरीहि संतति होईल. पंचमासमोरील लाभस्थानांत रवि, मंगळ, हर्षलसारखे पापग्रह असतां गर्भपात अगर आकस्मिक संकटाचे योगानें संततीचा नाश झालेला प्रत्ययाला येतो. पंचमस्थानांत रविमंगळासारखे पुरुषग्रह निर्बल असतां व त्यावर शनि अगर राहू यांची दृष्टी असतां कन्यासंतति राहून दत्तकाचा योग येतो असें म्हणतात. तथापि पंचमस्थान हीच जर दृष्टियोग करणाऱ्या पापग्रहाची स्वगृहराशी असेल तर वरील नियमाला कितपत अपवाद उत्पन्न होऊं शकतो हें अनुभवानेंच ठरविलें पाहिजे.

कर्क, वृश्चिक व मीन या बहुप्रसव राशी आहेत. पंचम भावारंभीं मीन राशी असल्यास जुळी संततीहि होते. मेष व सिंह या राशींना संतति थोडी; पण 'एकेनापि सुपुत्रेण सिंही स्वपिति निर्भयम्' या न्यायानें संतति भाग्यशाली व पराक्रमी निपजते.

वृषभ, तूळ, धनु व कुंभ या मध्यमप्रसव आहेत. वृश्चिक व मकर या कुरुप, द्वाड संतति देतात. संततीची संख्या निश्चित सांगणें कठीण असतें; पण अशक्य नाहीं. पंचमस्थानावरून पहिली संतति, सप्तमावरून दुसरी, नवमावरून तिसरी याप्रमाणें एक टाकून पुढच्या स्थानावर पुढील अपत्याचा विचार करतात.

संततियोगासंबंधानें असें निश्चयानें सांगतां येतें कीं संततियोग कुंडलींत असेल तर 'संततिनियमन' निष्फळ होतें. याचा अर्थ असा कीं कुंडलींत संततियोग नसेल तर संततिनियमनाचें एकहि साधन वापरलें नाहीं तरी संतति होण्याची आशा (अगर भीति) नाहीं व याचे उलट कुंडलींतच जबरदस्त संततियोग असेल तर संततिनियमनाचीं साधनें वापरूनहि ऐनवेळीं तीं दगा दिल्याशिवाय राहावयाचीं नाहींत. मरण हें जसें कोणाच्या हातचें नाहीं तसा जन्म हाहि कोणाच्या हातचा नाहीं. स्त्रीपुरुषांचा समागम ही फार तर त्यांनीं त्यांची स्वेच्छा आहे असें म्हणावें.पण गर्भरूपानें त्यांचा समागम 'फलद्रूप'होणें ही परमेश्वराची इच्छा आहे. बालकाला जन्म देणें (प्रसवणें) हें मातेच्या हातीं; पण त्याला 'जन्माला घालणें' ही परमेश्वराधीन गोष्ट आहे. ही गोष्ट बौद्धिक वादविवादाची नाहीं. केवळ अनुभवाची आहे. म्हणून अनुभवाच्या कसोटीला उतरेल तेंच खरें मानलें पाहिजे. चंद्राच्या वृद्धिक्षयाचा स्त्रीच्या रुधिराभिसरणावर परिणाम होतो, अमक्या तारखेस तिच्या रजोदर्शनाचा संभव व त्याच्या अगोदर अमुक दिवसपर्यंत पुरुषसमागम झाला असतां गर्भसंभवाची शक्यता असते हें सिद्ध करण्याकरितां चंद्राच्या रुधिराकर्षणासंबंधीं जो एक तक्ता मेरिआ स्टोप्स बाईनीं आपल्या पुस्तकांत दिला आहे तो नवमतवादी संततिनियमनवाले शिरसाप्रमाण मानतात; तर त्याच चंद्राला इतर ग्रहांबरोबर कुंडलीच्या चौकटींत बसवून जर संततियोगाचे (अगर संतति–नियमनाचेंहि) भाकीत केलें तर तेंहि तितकेंच शास्त्रसिद्ध आहे असें मानण्यास काय हरकत?

(१) शुक्र हा विवाहाचा कारक आहे. म्हणून चंद्र व शुक्र यांच्या दशाकालीं विवाह होऊं शकतो. (२) सप्तमस्थ ग्रहाच्या अंतर्दशाकालीं विवाह होतो. (३) लग्नेश ज्या राशींत असेल त्या राशीच्या स्वामीच्या द्वितीय स्थानीं चंद्र व गुरु गेल्यावर विवाह होतो. पण जन्मकाळीं गुरु व चंद्र यांत शुभयोग असेल तर चंद्रापासून २।५।९ व ११ गोचर गुरु भाग्यकारक असतो. जन्मकुंडलींतच जर गुरुचंद्राचा षडाष्टक योग असेल, अगर ४।१० अगर १२ वा गुरु असेल तर गोचर गुरु भाग्यकारक होणार नाहीं. म्हणजे गुरु अशुभ असतां कदाचित् विवाह झाल्यास अनिष्ट फल मिळेल. (४) विवाहास स्त्रीच्या कुंडलीस गुरुबळ निदान रविबळ लागतें. पुरुष कुंडलीस गुरुबळ असलें तर उत्तमच. निदान रविबळ असावें. गुरु मूळ जन्मकुंडलींत ६।८।१२ या स्थानीं नसावा; याखेरीज इतर स्थानीं गुरुशनीचा नवपंचम योग अगर त्रिकोण होत असल्यास तो फार शुभ योग असतो. (५) सप्तमेश अगर शुक्र यांच्या राशींत गुरु गेल्यावर, अगर सप्तमेश अगर शुक्र यांच्या केंद्रीं चंद्र हा गुरुसह गेल्यावर लग्न जमून येतें. (६) रवि हा दिनवर्षपद्धतीनें चंद्र किंवा गुरु यांच्याबरोबर नवपंचम योग त्रिकोण करतो, तेव्हां अगर दिनवर्षपद्धतीचा चंद्र हा रवि–गुरु–शुक्र अगर सप्तमेश यांच्याबरोबर शुभयोग करीत असतांना विवाह होतो. (७) शुक्र लग्नेश व सप्तमेश यांचे अंशात्मक परस्परांशीं शुभयोग व्हावे लागतात. समसप्तक योग विवाहकारक असतो. विशेषतः वरील ग्रह आपल्या मूळच्या ठिकाणीं समोर अगर त्रिकोणांत गोचरीनें येत असतां विवाहाचा बराच संभव असतो.

राशिविचार–क्रांतिवृत्ताचे जे बारा भाग त्याला राशी म्हणतात. कुंडलींत ग्रहाला जितकें महत्त्व तितकेंच राशीलाहि आहे. या राशींचीं नांवें–१ मेष, २ वृषभ, ३ मिथुन, ४ कर्क, ५ सिंह, ६ कन्या, ७ तूळ, ८ वृश्चिक, ९ धनु, १० मकर, ११ कुंभ, १२ मीन. कुंडलींत राशी फक्त आंकड्यांनीं दर्शवितात. उदा. लग्नीं ९ आंकडा असला कीं धनु लग्न समजावें.

स्थिर, चर, द्विस्वभाव असा राशींचा एक प्रकार आहे. **चरराशी**–मेष, कर्क, तुला, मकर. **स्थिर**–वृषभ, सिंह, वृश्चिक, कुंभ. **द्विस्वभाव**–मिथुन, कन्या, धनु, मीन. **पुरुषराशी**–मेष, मिथुन, सिंह, तूळ, धनु व कुंभ. **स्त्रीराशी**-वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर, मीन.

कुंडली स्त्रीची अगर पुरुषाची आहे हें ओळखणें दुरापास्त असतें. कारण पुरुष स्वभावाच्या स्त्रिया व स्त्रीप्रकृति पुरुष असूं शकतात. तथापि ग्रहसंख्या

पुरुषराशींत अगर विषमराशींत अधिक असल्यास ती पुरुष कुंडली व सम अगर स्त्रीराशींत ग्रहाधिक्य असल्यास स्त्रीकुंडली असें सामान्यतः अनुभवाला येतें. मेष, वृषभ, मिथुन, कन्या या अल्पप्रसव अथवा वंध्या राशी आहेत. पण वृषभ, कर्क, वृश्चिक व मीन या बहुप्रसव राशी आहेत.

आप, तेल, जल, वायु आणि आकाश या पंचमहाभूतांनुसारहि एक वर्गीकरण आहे. **अग्नितत्त्व**–मेष, सिंह, धनु. **पृथ्वीतत्त्व**–वृषभ, कन्या, मकर. **वायुतत्त्व**–मिथुन, तूळ, कुंभ. **जलतत्व**–कर्क, वृश्चिक व मीन. मनुष्यस्वभावालाही हीं तत्त्वें लावून राशीनुसार स्वभावाचा बोध होतो. मिथुन, तूळ, कुंभ या वायुतत्त्वाच्या राशी बौद्धिक लोकांत अधिक आढळतात. तसेंच त्या अगदींच अल्पप्रसवही आहेत. याचें उलट मिथुन, धनु व मीन या राशींत जुळी संततीही निर्माण होते. याचें कारण मिथुन राशीचें शरीर म्हणजे स्त्रीपुरुषयुग्म, धनु म्हणजे अर्धा भाग अश्व व अर्धे शरीर पुरुष व मीन म्हणजे दोन मत्स्य, असें या राशींचें वर्णन आहे.

बारा राशी या कालपुरुषाच्या शरीराचे विभाग असें कल्पून कोणत्या राशीचा शरीराच्या कोणत्या भागावर अंमल असतो हें पुढीलप्रमाणें निश्चित केलेलें आहे:–मेषेचा अंमल मस्तकावर, वृषभेचा मुख व कंठ यांवर, मिथुन–हात खांदे, कर्क–छाती, स्तन, फुप्फुसें, सिंह–काळीज, पाठ व कणा, कन्या–पोट, जठराशय व आंतडीं. तूळ–मकर, मूत्रपिंड, वृश्चिक–स्त्री–पुरुषांचीं गुह्येंद्रियें, धनु–मांड्या, मकर–गुडघे, कुंभ–पोटऱ्या व मीन–पावलें. याचा अर्थ असा–मारकस्थानें अगर सहा आठ, बारा या स्थानांत ज्या राशी असतील त्या जर दुष्टग्रहयोगानें दूषित असतील तर त्या राशींनीं दर्शविलेल्या शरीराच्या भागांत रोग होईल.

ग्रहावरही हें अवलंबून आहे. कारण रवि हा अस्थि, चंद्र–रक्त, मंगळ-मज्जा, बुध–त्वचा, गुरु–मेद, शुक्र–रेत व शनि–शिरा, यांचा कारक आहे. वातपित्तकफात्मकदृष्टीनें मेष, सिंह, धनु या राशी पित्तकारक, वृषभ, कन्या, मकर या कफकारक व कर्क, वृश्चिक, मीन या कफ व वातकारक अशा मिश्र समजतात.

राशीस्वामी–मेष, वृश्चिक यांचा स्वामी मंगळ, वृषभ, तूळ यांचा शुक्र, मिथुन, कन्या यांचा बुध, कर्केचा चंद्र, सिंहेचा रवि, धनु व मीन यांचा गुरु व मकर व कुंभ यांचा शनि मानतात. माधवी वसंत यांनीं 'हर्षल व नेपच्यून' या ग्रहांत हर्षलचा स्वग्रहराशी कुंभ व नेपच्यूनचा मीन मानला आहे. राहूची कन्या व केतूची मीन ही स्वग्रहराशी आहे.

ग्रहांचें शत्रुमित्रत्व–(सोपी रीत)

वर्ग १	चंद्र	मंगळ	गुरु	रवि
वर्ग २	राहू	बुध	शुक्र	शनि

यांत रविसमोरचा शनि शत्रु, शनीच्या रांगेंतले राहू-बुध-शुक्र हे रवीला सम, व रवीच्या रांगेंतले चंद्र-गुरु-मंगळ हे रवीचे मित्र. शुक्र घेतला तर त्याच्या रांगेंतले शनि-बुध-राहू हे त्याचे मित्र, समोरचा गुरु हा शत्रु व बाकीचे गुरूच्या रांगेंतले रवि-मंगळ-चंद्र हे सम अशा रीतीनें हे शत्रु मित्र व समत्व ध्यानांत आणावें.

विवाहकाल केव्हां येतो ?–आपल्या आयुष्यांत दैवाधीन गोष्टी पुष्कळ आहेत; पण त्यांतल्या त्यांत जन्म, मृत्यु व विवाह या पूर्णपणें दैवाधीन आहेत, असें म्हटलें पाहिजे. स्त्रीपुरुषांनीं परस्परसंबंध करणें ही त्यांची 'स्वेच्छा' म्हटली, तरी ती स्वेच्छा गर्भरूपानें फलद्रुप करणें ही गोष्ट ईश्वराच्याच हातची नाहीं काय? बालकाला जन्म देणें हें फक्त आईबापांच्या हातीं; पण त्याला विशिष्ट क्षणीं 'जन्माला घालणें' ही ईश्वराची सत्ता आहे !

विवाह नुसत्या तोंडानें म्हणून होत नाहीं ! विवाह हें 'विधिलिखित' आहे. परमेश्वरानें ज्याची गांठ बांधली असेल, त्याचाच विवाह होऊं शकतो. कोणी कितीही म्हटलें, तरी दैवांत विवाह लिहिला नसला, तर तो कधींही घडून येणार नाहीं आणि याच्या उलट दैवांतच दोघांचा विवाह लिहिला असला, तर त्यांनीं अगर इतर कोणी कितीही 'ना' म्हटलें तरी तो घडून आल्याशिवाय कदापि राहणार नाहीं !

याचेंही कारण ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीनें असें सांगतां येईल कीं, विवाह म्हणजे एक प्रकारें दुसरा जन्मच आहे. जन्म हा जसा दैवाधीन, तसाच विवाह मानला पाहिजे. विवाहानें मनुष्याच्या सर्वच आयुष्याची दिशा

बदलते व निराळ्या आयुष्यक्रमाची वाट तो चालूं लागतो.

सुरवंटापासून फूलपांखरापर्यंत रेशमी किड्याच्या तीन आयुष्यस्थिति किंवा जन्मांतरें आपण पाहतों; विवाह होईपर्यंत मनुष्याचें आयुष्य सुरवंटाच्या चालीनें जमिनीवरून रडतखडत चाललेलें असतें. विवाहानें त्याला प्रतिभेचे पंख फुटतात व आपण पूर्वीपेक्षां वेगळ्या प्रकारचें जीवन अनुभवीत आहों असें मनुष्याच्या निश्चित अनुभवास येतें. स्त्रीची गोष्ट तर विचारूंच नका. व्यवहारतः लग्नानंतर तिचीं जीं स्थित्यंतरें होतात, तीं डोळ्यांनींच दिसतात ! पण लग्नामुळें स्त्री ही पित्याच्या कुटुंबांत मृत होते व पतीच्या कुळांत नव्या देहानें व नव्या नांवानें जन्म घेते, असें शास्त्रकारांनींही मानलें आहे. विवाहामुळें लाभलेले पंख किंवा मनुष्याचें हें जीवनांतर हें त्याचें सुख किंवा भाग्य आहे. स्त्रीचें भाग्य विवाहकालापासूनच उदयाला येतें, असें ज्योतिषशास्त्रांत सांगितलें आहे.

जन्मानें जशीं परस्परांत अनेक नात्यांचीं बंधनें निर्माण होतात तसेंच विवाहानें घडतें. म्हणून विवाहाचें महत्त्व जन्माप्रमाणेंच आहे. एखाद्या घरांत मुलाचा जन्म झाला, म्हणजे तो कोणाचा तरी पुत्र होतो, कोणाचा भाऊ होतो, कोणाचा नातू होतो, कोणाचा भाचा होतो; म्हणजे या जगांत एका जीवानें पाऊल टाकणें ही जशी एकटी एक क्षुल्लक गोष्ट नसून कुटुंबांत अनेक संबंध व स्थित्यंतरें करणारी गोष्ट आहे, तसेंच विवाह हा केवळ दोन व्यक्तींचाच संबंध आहे असें म्हणतां येत नाहीं; दोन घराण्यांचें व त्यांतल्या अनेकविध स्त्रीपुरुषांचें दैव व संबंध केवळ एका विवाहानें परस्परांत निश्चित होत असतात. म्हणूनच विवाह ही परेच्छा आहे असें मानावें लागतें.

ग्रहांची ओळख—सात वारांच्या नांवावरून आपणांला रविचंद्रादि सहा ग्रहांची ओळख लहानपणापासूनच झालेली असते; पण ती ओळख नांवापलीकडे नसते. हळूहळू हें ज्ञान पुष्कळच होऊं लागतें. मनुष्य आस्तिक असो अगर नास्तिक असो, निरभ्र आकाशांत हजारो नक्षत्रदीप तेवत असतां मनुष्याचे मनांत असें कितीदां तरी येऊन जातें कीं केवढें हें सृष्टीचें अपार ऐश्वर्य ! हजारो तेजस्वी तारे यांतून गळून पडतात पण या अनंत रत्नभांडाराला गणती नाहीं कीं तें कधीं कमी होत नाहीं. हें ऐश्वर्य पाहून मनुष्याचा अहंकार नष्ट होतो व त्याची जिज्ञासा जागी होते. मनुष्याचा जिज्ञासा हाच स्वभाव विशेष असल्यानें या पृथ्वीपासून लक्षावधि मैल दूर असणाऱ्या ग्रहांचे त्यानें शोध लावले, इतकेंच नव्हे तर, त्यांचा आकार, व्यास, वजन त्यावरील वातावरण, त्यांचे पृथ्वीवर व मनुष्यमात्रावर घडणारे परिणाम या सर्वांचें ज्ञान करून घेतलें. या एकाच गोष्टीवरून मनुष्यमात्राची शोधकता, दीर्घ चिकाटी व पराक्रम याविषयींहि आदर उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं. कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं ज्योतिर्विलास अथवा रात्रीच्या दोन घटका या मनोरम पुस्तकांत आकाशांतील तारकामय चित्रपटाची अत्यंत उत्कृष्ट ओळख करून दिली आहे.

फलाहार:—शाकाहारांत फलांचा अंतर्भाव प्रामुख्यानें केला पाहिजे. फलांचे आकर्षक विविध रंग व रुचि, स्वाद निर्माण करण्याचा निसर्गाचा मूळ उद्देश म्हणजे त्या त्या झाडाच्या बीजांचा प्रसार पशुपक्षी व इतर प्राणी यांना फलें मोहक वाटून त्यांनीं खाल्ल्यानें स्वाभाविकपणें फलांतील बीज मोकळें होऊन रुजलें जावें हाच असावा असें शास्त्रज्ञांचें मत आहे. कांहीं फळें अन्नासारखींच आहारांत गणलीं जातात व कांहीं फलें रुचि व आस्वाद यांसाठीं सेवन केलीं जातात. फलांमध्यें पोटॅशचे क्षार वनस्पतिज आम्लाच्या संयोगानें बनलेले असे पुष्कळ असतात; त्यामुळेंच अन्नदृष्ट्या फलांचें महत्त्व विशेष आहे. कांहीं आजारांत फलाहारामुळेंच हे आवश्यक क्षार शरीरास मिळतात. फलांत जी साखर असते तिला 'लेव्ह्युलोज्' असें नांव आहे. कांहीं मर्यादेपर्यंत सेवन केली असतां मधुमेहासारख्या विकारांत तिचा उपयोग करावयास हरकत नसते.

फळ पिकूं लागलें म्हणजे त्यांत कांहीं रासायनिक परिपाक घडून येत असतात. अशा वेळीं फळाची वाढ थांबते. फळांत कार्बन शोषला जातो व ऑक्सिजन् टाकला जातो. त्यांतील आम्ल व तुरट द्रव्यें कमी होतात. पिष्टपदार्थाचें साखरेंत रूपांतर होऊन फळास गोडी येते. फळें पिकून गोड झाल्यावरच खावींत म्हणजे कोठ्यास त्रास होत नाहीं. नाहींतर जुलाब व पोटदुखी होण्याचा संभव असतो. फळांमध्यें द्राक्षें, केळीं, आंबे वगैरे विशेष महत्त्वाचीं आहेत. **द्राक्षें** अत्यंत रुचकर व हितकर होत. त्यांत द्राक्ष

शर्करा व पोट्याश कॅल्शिअम्, टार्ट्रेट, मॅलिक ॲसिड् व पुष्कळसा जलांश असतो. अन्नदृष्ट्या द्राक्षें फारच चांगलीं. आजाऱ्यानें साल व बिया टाकून शुद्ध द्राक्षरसाचें सेवन करावें. म्हणजे आंतड्यांस कांहींच त्रास होणार नाहीं. द्राक्षें वाळवून मनुका, बेदाणा वगैरे तयार करतात. त्यांत साखर जास्त प्रमाणांत असते, पण पचनास तीं जरा कठिण असतात. दुधांत कोळून मनुका घेतल्यानें सौम्य रेचकाप्रमाणें उपयोग होतो. **केळीं** आपल्या प्रांतांत पुष्कळच लागवड केलीं जातात व त्यांचा अन्न म्हणून कच्चेपणींहि उपयोग केला जातो.पक्व केळ्यांत शर्करा व इतर पोषक द्रव्यें भरपूर असतात. केळीं वाळवून त्यांचें पीठहि बनवितात व तें पोषक असतें. **आंबा** या फळाचें महत्त्वहि विशेष आहे. अत्यंत स्वादिष्ट व पोषक असे दोन्ही गुण त्यांत आहेत. कच्चेपणीं आंबा आंबट असतांनाहि चटणी, रायतीं, लोणचीं इत्यादि अनेक प्रकारांनीं तो सेवन केला जातो, व पक्वपणीं तर आंबा रावापासून रंकापर्यंत सर्वांच्या उपयोगीं पडतो. आंब्यांत किंचित् सारक गुण आहे. म्हणून जुलाब वगैरे होत असतांना आंबा खाऊं नये. कच्च्या आंब्याच्या फोडी वाळवून त्यांचा आमसोलाप्रमाणें उपयोग होतो.

या फळांशिवाय नारिंगीं, मुसुंबीं, संत्रीं, कलिंगडीं, काकडी, पपई इत्यादि अनेक प्रकारचीं फळें खाण्यांत येतात.

संत्रीं, मुसुंबीं, लिंबें, नारिंगें या जातींच्या फळांत 'सी' व्हिटॅमिन् नांवाचें महत्त्वाचें जीवनसत्त्व जास्त प्रमाणांत असतें. तापांत व स्कर्व्ही नांवाच्या रोगांत यांचा फार उपयोग होतो. इंग्रजींतील An apple a day keeps the doctor away—'रोज १ नारिंग खाणाऱ्यास डॉक्टरची जरूरहि लागणार नाहीं' अशा आशयाची एक म्हण आहे. ही म्हण फळांचें आहारांतील महत्त्व उत्तम रीतीनें पटविते.

नारळ, अक्रोड, बदाम, पिस्ते वगैरे कठिण कवचाचीं फळेंहि अन्नसत्त्वांशाच्या दृष्टीनें उत्कृष्ट असतात. मात्र पचनास जड असतात. त्यांत स्निग्ध द्रव्य पुष्कळ असतें. जवळ जवळ मांसाहाराइतकेच महत्त्वाचे घटक या फळांत आढळतात. पिठुळ पदार्थ अत्यल्प प्रमाणांत असल्यानें मधुमेह विकारांत या फळांचा पुष्कळ उपयोग करतां येतो. नारळाचें पाणी फारच रुचकर, तृषाहारी व शक्तिवर्धक पेय आहे. नारळाचें 'दूध' म्हणून जें खोबऱ्यापासून करतात त्यांतहि अतिशय स्निग्धसत्त्वांश असतो. याशिवाय नारळाच्या खोबऱ्याचा उपयोग आपल्या आहारांतील अनेक जिन्नसांत पुष्कळच केला जातो.

पोपई या फळाचें महत्त्व नायट्रोजनयुक्त पदार्थांच्या पचनकार्यांत विशेष आहे. फळें साखरेच्या पाकांत मुरवून टिकविलीं जातात. त्याचप्रमाणें निर्वात डब्यांतहि तीं टिकवून विकलीं जातात व त्यांचा केव्हांहि उपयोग होऊं शकतो.

वर वर्णन केलेल्या कांहीं फळांपेक्षां इतरहि अनेक जातींचीं फळें त्या त्या ऋतुमानाप्रमाणें उपलब्ध होणारीं, जरूर खावीं.

फल्टन्, रॉबर्ट (इ. स. १७६५ ते १८१५):–एक अमेरिकन एंजिनियर. याचा जन्म पेन्सिल्व्हेनिया येथें झाला. याचें शिक्षण बेताचेंच झालें. अगदीं लहानपणापासून चित्रकार या नात्यानें याचे अंगीं अनेक गुण दिसून आले. लवकरच त्यानें लंडनमध्यें जाऊन बेंजामिन वेस्ट या चित्रकाराच्या हाताखालीं चित्रकला शिकण्यास सुरवात केली.

पुढें लवकरच ही कला निम्मिशिम्मी हस्तगत केल्यावर त्यानें एंजिनियरिंगचा कोर्स घेतला. इ. स. १७९४ सालीं त्यानें अनेक पाटबंधारे बांधण्याच्या पद्धतींत सुधारणा केल्या; इ. स. १७९६ सालीं तो पॅरिसला गेला. तेथें त्याचें लक्ष वाफेच्या यंत्राचा उपयोग नौकायनांतहि करावा या गोष्टीकडे वेधलें. त्याच्या प्रयोगांस इ. स. १८०३ सालीं यश आलें. इ. स. १८०७ सालीं त्यानें अधिक मोठें जहाज तयार केलें. इ. स. १८१५, फेब्रुवारी १५ रोजीं फल्टन ख्रिस्तवासी झाला. नौकानयनांत वाफेच्या एंजिनचा प्रथम उपयोग करण्याचें श्रेय फल्टन यास आहे.

फॅरडे, मायकेल (१८०१–१८६७):–विख्यात इंग्लिश संशोधक. याचा बाप गरीब होता. त्यामुळें बाराव्या वर्षी त्याला एका पुस्तकविक्रेत्याकडे नोकरीस राहावें लागलें. तेथें असतांना त्यानें विद्युत्शास्त्राचीं उपकरणें घरीं तयार करून व दुकानांतील पुस्तकें वाचून अभ्यास केला. पुढें एकविसाव्या वर्षीं एका मित्राच्या मदतीनें त्यास विख्यात शास्त्रज्ञ सर हंप्रे डेव्ही याचीं व्याख्यानें ऐकण्याचा योग आला. त्या व्याख्यानांचीं टिपणें लिहून काढून त्यानें डेव्हीची ओळख करून घेतली व डेव्हीच्या गुणग्राहकतेमुळें तो त्याच्या प्रयोगशाळेंत

मदतनीस झाला. त्यानें त्यास उत्कृष्ट साहाय्य केलें. त्यावरूनच पुढें डेव्ही यानें असे उद्गार काढले कीं, "मी शोधून काढलेली सर्वांत उत्कृष्ट वस्तु म्हणजे फॅरडे होय!" डेव्ही हा मोठा शास्त्रज्ञ असून शास्त्रीय विषयांवर सुबोध व्याख्यानें सुंदर रीतीनें देई. त्याची भाषणपद्धति शिकून फॅरडेही पुढें सुंदर व्याख्यानें देऊं लागला. त्याचें "मेणबत्ती कशी जळते?" हें व्याख्यान आजहि आवडीनें वाचतात. डेव्हीमुळें त्याच्या आयुष्यांत क्रांति झाली. त्याजबरोबर रसायनशास्त्रांत त्यानें बरेच शोध लावले. डेव्हीच्या सेवानिवृत्तीनंतर १८२७ सालीं त्याला डेव्हीच्या जागेवर रॉयल इन्स्टिट्यूशनचा संचालक नेमण्यांत आलें. तेथें तो शेवटपर्यंत होता. इतर पदव्या व अधिकाराच्या जागा त्यानें नाकारल्या. त्या इंग्रजी साम्राज्यवर्धनाच्या धामधुमीच्या काळांत शास्त्रीय संशोधनाकडे शास्त्र्यांचें लक्ष नसे. त्यामुळें व फॅरडे केवळ संशोधक असल्यानें व्यावहारिक उपयुक्ततेच्या दृष्टीनें त्यावेळीं त्यानें आपल्या शोधांचा उपयोग केला नाहीं. त्याचे शोध विद्युत्, लोहचुंबकत्व व रसायन या तिन्ही शास्त्रांतील आहेत. फॅरडे प्रयोग फार काळजीपूर्वक करी. त्यानें आपल्या सर्व प्रयोगांची जंत्री ठेवली. त्यावरून असें दिसतें कीं, त्यानें एकूण १६०४१ प्रयोग केले. त्याच्या लोहचुंबकत्व व विद्युत् यांच्या परस्पर संबंधाच्या शोधामुळें पुढें विद्युत्–तारायंत्रें, टेलिफोन वगैरे लोकोपयोगी सुखसोयींचे शोध लागले व विद्युत्–शास्त्राची गेल्या शतकांत झपाट्यानें प्रगति झाली. डेव्हीबरोबर त्यानें क्लोरिनच्या गुणधर्मांचे शोध (ज्याच्यामुळें कापड रंगविण्याच्या धंद्यांत क्रांति झाली), वायूंचें द्रवीकरण वगैरे शोधांसंबंधीं प्रयोग केले. त्याच्यामुळेंच पाऱ्याचें बाष्पीकरण याचा फोटोग्राफींत उपयोग सिद्ध झाला. त्यानें विद्युद्विच्छेदनाचे सर्व नियम तयार केले, विद्युद्रसायनशास्त्र वाढविलें, कांच सुलभरीतीनें तयार करण्याची कृति बसविली. त्याच्या उत्कृष्ट शोधांमुळें विद्युत्शास्त्र व त्यावरील अवलंबून असलेले उद्योगधंदे आज भरभराटीस आलेले दिसत आहेत. आधुनिक वास्तव व विद्युत्–रसायनशास्त्रांतील प्रगतीचें बीज फॅरडेच्या मूळ शोधांतच आहे. फॅरडे हा दयाळू व उदार अंतःकरणाचा होता. त्याच्या प्रोत्साहनानें तरुण संशोधकांना उमेद येई. त्याचा मृत्यु हॅम्टन् कोर्ट येथें १८६७ त झाला.

फॅरेनहीट, डॅनीयल गॅब्रीयल (१६८६–१७३६):– हा एक जर्मन पदार्थशास्त्रज्ञ होऊन गेला. त्यानें केलेल्या उष्णतामापक यंत्राच्या (थर्मामीटर) योजनेबद्दल तो प्रसिद्ध आहे. त्याचें बहुतेक जीवन इंग्लंड व हॉलंड या देशांतच गेलें; तेथें राहून त्यानें पदार्थविज्ञानशास्त्राचा अभ्यास केला व हवेंतील फेरफारासंबंधीं उपकरणें तयार केलीं. त्यानें उष्णतामापक यंत्राचें स्केल तयार केलें. हें स्केल त्याच्या नांवानें प्रसिद्ध आहे, त्यानें पदार्थविज्ञानशास्त्रांत बरेच बहुमोल शोध लावले. १७२४ सालीं 'रॉयल सोसायटी ऑफ लंडन' या संस्थेचा तो फेलो झाला.

फॅसिझम्:–फॅसिझम् हें महायुद्धानंतर जन्मास आलेलें समाजतत्त्व होय. 'फॅसिझम्' म्हणून कोणतीही एकादी विचारसरणी महायुद्धापूर्वी अस्तित्वांत नव्हती. रशियांत कम्युनिस्ट क्रांति होण्यापूर्वी 'कम्युनिझम्' शास्त्रीय स्वरूपांत पुष्कळ वर्षें अवतरला होता. मार्क्स, प्लेखॅनोव्ह लेनिन वगैरे त्याचे प्रणेते



फॅसिझमचा जनक सिनॉर मुसोलिनी

रशियांतील कम्युनिस्ट क्रांतीपूर्वी कम्युनिस्टप्रचारक म्हणून युरोपांत प्रसिद्धी पावले होते. उलट फॅसिझमचा आद्य प्रणेता इटलीचा हल्लींचा मुख्य प्रधान बेनिटो मुसोलिनी हा १९०४ पासून १९१४ पर्यंत स्वतः सोशॅलिस्ट होता व पुढें आपण फॅसिस्ट होणार अथवा फॅसिझम् म्हणून कांहीं समाजतत्त्व अस्तित्वांत येणार आहे व आपणच त्यास जन्म देणार आहों हें त्याच्या गांवींही नव्हतें.

सोशालिस्ट या नात्यानें मुसोलिनी व्यक्तिस्वातंत्र्यवादी भांडवलशाहीचा विरोधक होता. १८ व्या व १९ व्या शतकांत इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका या देशांत या व्यक्तिवादी भांडवलशाहीचा उदय होऊन तिची भरभराटही खूप झाली. यंत्रें व शास्त्रें यांचे नवे नवे शोध लागून माणसाचें उत्पादनसामर्थ्य या

भांडवलशाहीनें खूपच वाढविलें. पण मानव समाजाचें सुख मात्र सोशॅलिस्टांच्या मतें, या भांडवलशाहीनें वाढविलें नाहीं. धनोत्पादन साधनें थोडथोड्या धनिकांच्या हातीं जाऊन बहुसंख्य जनता या भांडवलवाल्या धनिकांची मजूर झाली व रोजगारीसाठीं या धनिकांवर अवलंबून राहूं लागली; तेव्हां या भांडवलवाल्यांनीं जनतेची अडवणूक करून तिला कमींत कमी मजुरीवर पिळून काढून अफाट नफा मिळविला. मजुरी कमी व बाजारांत माल तर पुष्कळ असे प्रसंग वरचेवर येऊं लागून माल ज्या ज्या वेळीं खपेना त्या त्या वेळीं मजूरवर्गांत बेकारी व नोकरीची अनिश्चिती वाढूं लागली होती. या अनर्थाचें कारण धनोत्पादन साधनावरील भांडवलवाल्यांची खासगी मालकी हें असून ती नष्ट केली पाहिजे असें सोशॅलिस्टांचें मत होतें व अर्थात् मुसोलिनीही या मताचा पुरस्कर्ता होता.

पण १९१४ सालीं सुरूं झालेलें महायुद्ध हें भांडवलशाहीनें—निरनिराळ्या राष्ट्रांतील भांडवलशाही सरकारांनीं—आपलीं साम्राज्यें वाढविण्यासाठीं केलें असून त्यामुळें जगांतील गुलामगिरी वाढणार आहे, यासाठीं या साम्राज्यशाही युद्धांत भाग घेऊं नये असें मत युरोपांतील सोशॅलिस्ट बोलूं लागले. मुसोलिनीस सोशॅलिस्टांची ही विचारसरणी अमान्य होऊन इटालीनें जर्मनीचे विरुद्ध इंग्लंड व फ्रान्सला मदत करावी असें तो प्रतिपादूं लागला. इटालीचा यामुळें फायदा होऊन इटालीस साम्राज्य वाढविण्याची संधि मिळेल, ती इटालीनें घ्यावी असें त्याचें म्हणणें होतें. १९१५ सालीं इटालीनें जर्मनीविरुद्ध इंग्लंडच्या बाजूनें युद्ध पुकारलें. मुसोलिनी सैनिक या नात्यानें स्वतः युद्धांत लढला व जखमी झाला. युद्धानंतर झालेल्या तहांत इंग्लंड व फ्रान्स यांनीं मोठमोठे प्रदेश मिळविले, पण इटालीस फारसें कांहीं मिळालें नाहीं; म्हणून मुसोलिनी चिडला व फ्यूम बंदर, डालमाशिया प्रांत वगैरे जिंकून घेण्याच्या चळवळीस त्यानें पाठिंबा दिला. महायुद्धानंतरच्या काळांत इटालींत आर्थिक हलाखी फार वाढली. यामुळें निरनिराळ्या कारखान्यांतील कामगारांनीं संप व दंगे करून कांहीं कारखानेही ताब्यांत घेतले. यामुळें स्वदेशांत बेबंदशाही माजेल असें वाटून मुसोलिनी संपाविरुद्ध मतप्रचार करूं लागला. रशियांतील बोल्शेव्हिकांच्या सोशॅलिस्ट चळवळीचा हा दुष्परिणाम आहे असें त्याच्या मनानें घेतलें व तेव्हांपासून मुसोलिनी पूर्णपणें सोशॅलिझमच्याविरुद्ध होऊन धनोत्पादन साधनावरील खासगी मालकी संभाळणें अवश्य आहे असेंही तो प्रतिपादूं लागला.

याप्रमाणें सोशॅलिझमचा त्याग करून भांडवलशाहीचा त्यानें स्वीकार केला तरी व्यक्तिस्वातंत्र्याचा तिटकारा त्याचा कायमच राहिला. यामुळें तो सोशॅलिझमप्रमाणें लोकशाहीचाही कट्टा विरोधक बनला. भांडवलशाहींत जें व्यक्तिस्वातंत्र्य असतें त्यामुळें भांडवलदार व सरंजामदार या वर्गांत वैर माजतें. भांडवलदार आपसांत स्पर्धा करतात व भांडवलदार व कामगार यांतही वर्गयुद्ध माजतें. यामुळें देशाची आर्थिक घडी विसकटून अंतःकलहानें राष्ट्र फाटून जातें व दुर्बल होतें. तसेंच सरकार लोकशाहीप्रधान म्हटलें तरी अखेर विशिष्ट गटाच्याच तें हातीं जातें; यामुळें लोकशाही नष्ट केली पाहिजे असें मुसोलिनीनें ठरविलें. तो उत्तम वक्ता व नामांकित लेखक साम्राज्य वाढविण्याच्या आकांक्षा लोकांपुढें बोलूं लागला. मजूरचळवळही दडपून टाकण्याची घोषणा त्यानें केली. यामुळें मध्यम वर्ग व भांडवलदार वर्ग यांचा मुसोलिनीस पाठिंबा मिळाला. १९२१ सालीं मुसोलिनीनें फॅसिस्ट पक्ष स्थापन केला. लोकशाही व प्रजासत्ताक राज्य यांचा धिक्कार करून इटालींतील राजघराण्याचाही त्यानें एका भाषणांत जयजयकार व पुरस्कार केला. यामुळें इटालीचा राजाही मुसोलिनीस अनुकूल झाला. अशी सर्व बाजूंनीं अनुकूलता झाल्यावर राज्यसत्ता काबीज करण्यासाठीं १९२२ च्या २८ आक्टोबर रोजीं मुसोलिनीनें आपल्या अनुयायांसह रोमवर चाल केली. त्यास अटक करावी असें सेनापतीचें म्हणणें होतें. पण राजानें तें न ऐकतां मुसोलिनीस राजवाड्यांत बोलावून त्यास पंतप्रधानकीचीं वस्त्रें दिलीं. मुसोलिनी मुख्य प्रधान होण्यापूर्वी इटालींत लोकशाहीचा कांहींसा देखावा होता. महायुद्धानंतरच्या वर्षांत ही लोकशाही अत्यंत दुर्बल झाली होती. अधिकारावर येतांच मुसोलिनीनें तिला नख लावून तिचा प्राण घेतला. पहिल्या तीनचार वर्षांत मुसोलिनीच्या अंमलास सोशॅलिस्ट व लोकशाहीवाले यांनीं विरोध करण्याची शिकस्त केली. पण सर्व सूक्तासूक्त मार्गांनीं त्यानें हा विरोध हाणून पाडला आणि स्वतास व फॅसिस्ट पक्षास कुलमुखत्यारी मिळविली.

आर्थिक व राजकीय क्षेत्रांत लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्य यांचा गेल्या १६ वर्षांत इटालींत मुसोलिनीनें

पूर्ण अभाव करून टाकला आहे. जिवंत माणसाच्या शरीरास अनेक भिन्न भिन्न अवयव व त्यांचीं अनेक भिन्न भिन्न कार्यें व सामर्थ्यें असलीं तरी शरीर जसें एकजीव असतें व त्याचें ध्येयही एकच एक असतें, निरनिराळ्या अवयवांना वेगवेगळीं ध्येयें नसून सर्वांच्या कार्यांचा मिलाफ जसा एकाच ध्येयाच्या सिद्धींत व्हावयाचा असतो तसेंच राष्ट्र हेंही एक शरीर असून त्यांतील अंगोपांगांना वेगळीं वेगळीं ध्येयें असतां कामा नयेत व सगळ्या राष्ट्राच्या एका ध्येयाच्या सिद्धीसाठींच सर्वांच्या कार्यांचा मिलाफ झाला पाहिजे असें मुसोलिनीचें मत आहे. यासच तो ' कॉर्पोरेट सिस्टिम ' म्हणतो व हाच त्याच्या मतें फॅसिझम् होय. या दृष्टीनें इटालींत स्वतंत्र कामगारसंघ, स्वतंत्र मालकसंघ व त्यांचा वर्गलढा या सर्वांस कायद्यानें बंदी आहे. कामगारसंघ व मालकसंघ आहेत त्यांच्या प्रतिनिधींच्या मिश्र ' कॉर्पोरेशन्स ' असून एकंदर धंद्याचीं धोरणें राष्ट्रीय हितदृष्टीनें व वर्गस्वार्थ विसरून चालविलीं पाहिजेत, असें या ' कॉर्पोरेशन्स 'वर बंधन आहे.

खासगी मालकीचें तत्त्व मात्र संभाळण्यांत येत आहे. राज्यकारभार सर्वस्वीं फॅसिस्ट पक्षाच्या हातीं आहे खरा, पण याचा अर्थ तो बहुमतवाला पक्ष आहे म्हणून तो सत्ताधारी आहे असें नव्हे. तर देशांत एक फॅसिस्ट मतच जगावें असें मुसोलिनीचें मत असून इतर सर्व मतांना दडपून टाकण्यांत येत आहे.

जर्मनींत १९३३ सालीं अधिकारावर आलेला नाझीपक्ष व त्याचा पुढारी हिटलर हेही मुसोलिनीप्रमाणें व्यक्तिस्वातंत्र्याचे व कम्युनिझमचे शत्रु असून फॅसिझमूचेच अनुयायी आहेत. हिटलरच्या नाझी पक्षास ' राष्ट्रीय सोशॅलिस्ट पक्ष ' असें नांव आहे खरें, पण धनोत्पादन साधनें सरकारी मालकीचीं करणें हें जें सोशॅलिझमचें अथवा कम्युनिझमचें प्रमुख लक्षण त्याचा त्याग हिटलरनें आरंभापासूनच केला असल्यानें हिटलरचें राजकारण फॅसिस्टच झालें आहे व तो तसें अभिमानानें म्हणतोही. जर्मनींतही स्वतंत्र वर्गसंघ व लोकशाही मुळींच नसून उलट भांडवलवाल्यांच्याकडे कामगारांचें पुढारीपण सक्तीनें देण्यांत आलें आहे. राजसत्ता नाझीपक्षाच्या हातीं असून सर्व राष्ट्र नाझी करून टाकणें व इतर सर्व पक्ष व मतें दडपून टाकणें हेंच जर्मन नाझींचें म्हणजे जर्मन फॅसिस्टांचें ध्येय आहे.

इटालींत राजा आहे तसा जर्मनींत राजा नाहीं. आणखीही कांहीं बारीक सारीक तपशीलाचे भेद या दोन फॅसिस्ट राजवटींत असून इतर देशांत फॅसिस्ट राजवटी निर्माण झाल्यास देशकालपरिस्थितीप्रमाणें आणखी कांहीं फरक होत जातील. या तपशीलांचा विचार येथें न करतां फॅसिझमूची सर्वसामान्य अशी शास्त्रीय विचारसरणी कोणती एवढ्याच मुद्याचा येथें विचार करावयाचा आहे.

मुसोलिनी व हिटलर यांच्या कर्तृत्वाचें व मताचें जें त्रोटक वृत्त वर दिलें त्याचा हेतु फॅसिस्ट विचारसरणीचा उदय कसा झाला हें दाखविणें हा होय. पण मागें म्हटल्याप्रमाणें फॅसिझम्चा आद्य प्रणेता जो मुसोलिनी त्याला आपण नेमकें काय करणार आहों याची सविकल्प कल्पना पूर्वी नव्हती. परिस्थितींत गरज उत्पन्न होई तसें पाऊल सावधपणें तो टाकीत होता. कोळी जाळें विणतो अथवा मधमाशी मधाचें पोळें बनविते, पण आपल्या कृतीचें सविकल्प ज्ञान त्यांना आहे, आपल्या कृतीची शास्त्रीय उपपत्ति या प्राण्यांना माहीत आहे असें आपण मानीत नाहीं, पण मनुष्य कोळ्याचें जाळें व मधमाशांचें पोवळें यांचें निरीक्षण करून अनेक जाळ्यांच्या अथवा अनेक पोवळ्यांच्या निरनिराळ्या आकृतींत सर्वसाधारण तत्त्वें काय आहेत हें निरीक्षून त्यांची शास्त्रीय उपपत्ति बसवितो. तशीच शास्त्रीय उपपत्ति मुसोलिनीनें कांहीं अंशीं स्वतःच्या घडत असलेल्या आचरणावरून व इतर समाजशास्त्रज्ञांनीं मुसोलिनीच्या व हिटलरच्या आचरणावरून बसविण्याचा प्रयत्न केला आहे. खालीं देण्यांत येत असलेलें फॅसिझमचें शास्त्रीय स्वरूप अशा समाजशास्त्रज्ञांच्या आधारेंच देण्यांत येत आहे.

फॅसिस्टांच्या मतानें, राज्यसंस्थेचें प्रमुख कार्य समाजाची नैतिक धारणा करणें हें आहे. ही नैतिक समाजधारणेची कल्पना तीन तत्त्वांवर आधारलेली आहे. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे; एका शरीराचे अवयव जसे स्वतंत्रपणें जगूं शकत नाहींत, परस्पर सहकार्यानें शरीरधारणा करून शरीरद्वारांच जगूं शकतात तसेंच समाजांतील व्यक्तींचेंही आहे; म्हणून व्यक्तिमात्राचा व्यवहार हा समाजधारणेस अनुकूल व उपकारक झाला पाहिजे, हें फॅसिझमूचें पहिलें नैतिक तत्त्व होय. ईश्वराचें अस्तित्व मानणें व व्यवहारांत व्यक्तिमात्रानें स्वतःच्या इच्छेप्रमाणें न चालतां ईश्वराचे नैतिक



फॅसिझम्चीशिकवण अगदीं लहान मुलांतहि पसरावी म्हणून लष्करी शिक्षणाच्या द्वारें लहान मुलांत हें तत्त्व बाणविण्याची सरकारतर्फेच व्यवस्था होते. या फोटोंत या प्रकारचा एक बालसंघ दाखविला आहे.

सिद्धांत सृष्टींत जे प्रत्ययास येतील तदनुसार व्यक्तिमात्रानें वागलें पाहिजे हें फॅसिझम्चें दुसरें नैतिक तत्त्व होय. पण पहिल्या तत्त्वांत उल्लेखिलेला मानव समाज हा सगळ्या जगांतला मानव समाज नसून एकेक राष्ट्र हा एकेक अलग समाज आहे व व्यक्तिमात्र त्याचा घटक आहे असें म्हटलें असून तो या राष्ट्रीय समाजाचा घटक होय हें फॅसिस्टांचें तिसरें नैतिक तत्त्व आहे. शरीरांतील अनेक घटक नित्य बदलत असतां शरीर व त्यांतील जिवंतपणा जसा एकच एक राहतो तसेंच व्यक्तींच्या अनेक पिढ्या झाल्या तरी राष्ट्र हें एकच एक कायम राहतें असा तिसऱ्या तत्त्वाचा मथितार्थ आहे.

१८ व्या व १९ व्या शतकांतील व्यक्तिवादी विचारसरणीची फॅसिझम् ही प्रतिक्रिया आहे हें वरील तत्त्वत्रयीवरून समजून येईल. समाज ही कांहीं त्यांतील व्यक्तींची (फॅसिस्ट म्हणतात) बेरीज नव्हे. तो त्या अनेक व्यक्तींचा संघ अथवा संघात आहे. त्यांतील प्रत्येक व्यक्ति स्वयंपूर्ण व स्वतंत्रपणें जगणारी नसून सर्वजण परस्परावलंबी असतात. यामुळें प्रत्येक व्यक्तीनें स्वतांच्या स्वार्थापुरता विचार करावा म्हणजे एकंदर समाजाचें सुख आपोआप प्राप्त होईल ही व्यक्तिवाद्यांची विचारसरणी चूक ठरते. उलट प्रत्येक व्यक्ति समाजकल्याणासाठीं जरूर तो कर्तव्याचा भाग उचलेल तर समाजकल्याण साधून त्यांतच व्यक्तिमात्राचें कल्याण आपोआपच साधेल असें फॅसिस्टांचें म्हणणें आहे.

अर्थात् जिवंत शरीराचें रक्षण, पोषण व संवर्धन कसें करावें हें सांगण्यासाठीं ज्याप्रमाणें शरीरशास्त्र असतें त्याप्रमाणें समाजाचें रक्षण, पोषण व संवर्धन करण्यासाठीं समाजशास्त्रही अवतरावें लागतें, व तसें तें अवतरलेंही आहे. समाजजीवनाच्या कार्यासंबंधींची चिकित्सा या शास्त्रांत होत असते. समाजाचें सामर्थ्य कसें वाढेल आणि त्याचें ऐक्य व प्रगति कशी होईल या प्रश्नांची चर्चा या शास्त्रांत होत असते. कोणत्या परिस्थितीचें स्वरूप कोणतें आहे हें या शास्त्रावरून समजून येत असून तदनुसार ध्येयसिद्धीच्या दृष्टीनें कोणतें वर्तन माणसानें करावें हें या शास्त्रावरून समजूं शकतें.

पण इतर सर्व शास्त्रांप्रमाणें समाजशास्त्रही एकांगीच आहे. अमुक समाजस्थितीचे गुण अमुक आहेत

व अमुक प्रकारच्या कृतीस अमुक फलें येतील, एवढेंच समाजशास्त्र सांगूं शकेल. अग्नि हा दाहक आहे हें पदार्थविज्ञानशास्त्र सांगेल. पण त्यानें अन्न शिजवावें कीं लोकांचीं घरें जाळावीं हें सांगण्यास नीतिशास्त्राची जरूरी आहे. तसेंच समाजाच्या अमुक एका वर्तनाचा परिणाम अमुक होईल हें समाजशास्त्र सांगूं शकलें तरी समाजाचें कल्याण करण्यासाठीं व्यक्तिमात्रानें स्वार्थ-त्याग करावा हें नीतिशास्त्रावांचून कोणीच सांगूं शकणार नाहीं. म्हणून नीतिशास्त्र हें समाजघटनेचें आधारभूत तत्त्व होय असें फॅसिस्टांचें म्हणणें आहे.

पण समाजकल्याण कशाला म्हणावें? कोणतें फल समाजहितकारक व कोणतें अहितकारक हें ठरविण्याची फॅसिस्टांची कसोटी कोणती? याचें उत्तर देण्यास नीतिशास्त्रही उपयोगी पडत नाहीं.

व्यक्तिस्वातंत्र्यवाद्यांना हा प्रश्न सोपा होता. ज्या त्या व्यक्तीस आपलें हित कळतें; निदान अनुभवानें अधिकाधिक कळूं लागतें अर्थात् अनेक व्यक्तींची बेरीज म्हणजे व्यक्तिवाद्यांचा जो समाज त्या समाजालाही आपलें हित कोणतें हें समजतें अथवा अनुभवानें समजूं शकतें असें त्यांचें म्हणणें होतें. यामुळें समाजांतील व्यक्तिमात्रानें इतर व्यक्तींना अपायकारक न होईल असें कोणतेंही वर्तन केलें तरी त्यामुळें समाजाचें कल्याण होईलच होईल असें व्यक्तिवादी गृहीत धरीत व ज्यास जसें वाटेल तसें त्यानें वागावें या व्यक्ति-स्वातंत्र्याचा पुरस्कार करीत.

समाजांतील प्रत्येक भिन्न भिन्न व्यक्तीच्या इच्छांची परिणति अखेर समाजहितांत होईल हें शंभर टक्के सत्य नव्हे हें व्यक्तिवाद्यांनाही मान्य आहे. पण परस्पर अविरोधानें व परस्पर सहकार्यानें व्यक्तिव्यक्तींचे व्यवहार जसे अधिकाधिक प्रमाणांत होत जातील तसतसा व्यक्तिहित व समाजहित यांतील विरोधभाव मावळत जातो आणि जेथें तो असेल तेथें व्यक्तिहित बाजूस सारून समाजहितच साधावें असा व्यक्तिमात्राचा स्वभाव बनतो असें व्यक्तिस्वातंत्र्यवाद्यांचें म्हणणें होतें.

पण व्यक्तिहित व समाजहित यांचा अविरोध होण्याइतकी समाजव्यवहाराची प्रगति होण्यास अथवा व्यक्तिमात्रास समाजहित स्वार्थापेक्षां श्रेष्ठ वाटण्याइतकी व्यक्तिमात्राची प्रगति होण्यास पुष्कळ काळ लागेल हें उघड आहे. दरम्यान समाजविकास होत राहिला पाहिजे व त्यासाठीं समाजशासनही होत राहिलें पाहिजे. मग हें समाजशासन कोणत्या तत्त्वावर करावयाचें? शासनसंस्थेस अवश्य असणारी सत्ता कोणीं कोणत्या तत्त्वावर वापरावी? ही सत्ता बहुमतानें वापरावी व व्यक्तिहितास शक्य तों न दुखवितां बहुमतास समाजहित जें वाटेल त्या धोरणानें ती सत्ता वापरावी असें व्यक्तिवाद्यांचें म्हणणें आहे. हें बहुमत वाढतां वाढतां अखेर सर्व मतांत म्हणजे मतैक्यांत त्याचा विकास होईल असा व्यक्तिवाद्यांचा समज आहे.

पण व्यक्तिवाद्यांचा हा समज फॅसिस्टांच्या मतें, अत्यंत चुकीचा आहे. व्यक्तिमात्रास आपलें हित कळतें असें म्हणतांना लहान मुलें व वेडीं माणसें समाजांत पुष्कळच आहेत हें आपण विसरतों. प्रौढ व शहाणीं गणलीं जाणारीं माणसें हीं नेहमींच स्वहित जाणूं शकत नाहींत व त्यांनीं तें जाणलें तरी ते तदनुसार वर्तन करतीलच असें नाहीं. वासनांना बळी पडून मनुष्य अनेकदां स्वहितविरोधी वर्तन करतो व व्यवहार गुंतागुंतीचा झाला असल्यानें सामान्य माणसास त्यापासून आपलें हित कसें करून घ्यावें हें कळूं शकतच नाहीं. या प्रकारच्या अज्ञानास व मोहास व्यक्ति जशी पात्र आहे तसाच समाजही पात्र आहे.

शिवाय व्यक्ति ज्याप्रमाणें स्वहितास सामान्यतः दक्ष असल्याचें आढळून येतें तसा समाज समाजहितास दक्ष असल्याचें दिसून येत नाहीं. व्यक्तीपेक्षां समाजाची शक्ति फारच मोठी असते हें खरें; पण व्यक्तीच्या ठिकाणीं जो वैयक्तिक अहंकार असतो तसा समुदायाच्या ठिकाणीं सामुदायिक अहंकार प्रगट व प्रखरपणें असत नाहीं. विशेष प्रकारच्या सामुदायिक प्रसंगाचे वेळीं समाज जागृत होतो खरा, पण त्यावेळीं तो भयभीत अथवा क्रुद्ध अथवा हर्षभरित होऊन शांत विचाराच्या कोणत्याहि कृत्यास अपात्र असतो, आणि एरवींच्या सर्वसामान्य प्रसंगीं समाज जागृत असतच नाहीं. पुष्कळदां सूक्ष्मपणें समाजाच्या अंगावर येऊं लागलेल्या संकटाबद्दल समाज गाफील राहतो अथवा परिणामकारक कृति त्याच्या हातून होऊं शकत नाहीं. बहुमताचा निर्णय म्हणून आपण म्हणतों तोही कांहीं बलिष्ठ, अतिबुद्धिवान व अतिधनवान माणसांनीं बहुमतास धाक, लालूच अथवा मोह लावून मिळविलेला असतो. सारांश समाजकल्याण कोणतें हें ठरविण्याचें कार्य समाजावर अथवा बहु-

मतावर सोपविलें तरी त्यामुळें चूक होण्याचा संभव फारच फार आहे. मग समाजकल्याण कोणतें हें ठरविण्याचा मार्ग कोणता ?

हें ठरविण्याचें कार्य स्वार्थानें, मोहानें अथवा अज्ञानानें बरबटलेल्या एक अथवा अनेक व्यक्तींवर न सोपवितां अत्यंत निस्वार्थी, निग्रही व सुज्ञ अशा माणसावरच सोपविलें पाहिजे असें फॅसिस्टांचें म्हणणें आहे. अशा माणसाच्या सदसद्विवेकबुद्धीचा संदेश हा ईश्वराचाच संदेश होय असें समजण्यास हरकत नाहीं. अशा माणसावर हलक्या मनोवृत्तीचा पगडा बसणारच नाहीं असें नव्हे; पण विशिष्ट व्यक्तीचे अथवा वर्गाचे हिताचे दृष्टीनें कारभार चालविण्याऐवजीं निस्वार्थी अशा माणसाच्या करवीं एकंदर समाजहितदृष्टीनेंच समाजाचा कारभार चालविला गेला पाहिजे ही विचारसरणी समाजाच्या मनावर बिंबविली गेल्यास जास्तींत जास्त निस्वार्थी माणसास पुढें येण्यास त्यामुळें संधि मिळेल व त्याचा मानसिक अधःपात होतांच अधिक निस्वार्थी माणसें पुढें पुढें येत राहतील. गुणाधिक्यावर सामाजिक जबाबदारीची व सत्तेची वाटणी होणार असल्यामुळें अधिकाधिक गुणाधिक्य प्रगट करणारीं माणसें एका वाटेनें एकसारखीं पुढें येत राहतील व गुणांत उणीं पडणारीं माणसें दुसऱ्या वाटेनें मागें मागें जात राहतील. सर्वश्रेष्ठ जागीं बहुधा सर्वश्रेष्ठ माणसेंच राहतील. एकंदर राज्यसंस्था एकरूप व एकशरीर राहील. त्यांत अंतर्विरोधास जागा राहणार नाहीं.

तेव्हां शासनसंस्था चालविण्यासाठीं लोकोत्तर व्यक्तींची निवड करणें व त्या एक अथवा अनेक व्यक्तींच्या आज्ञा अत्यंत निस्वार्थ बुद्धीनें पार पाडणें हें फॅसिस्टांच्या मतें, समाजाचें कर्तव्य होय. हा गुण समाजाचे अंगीं येण्यास स्वार्थ व हक्क यांच्या संरक्षणाचें शिक्षण समाजास देणें योग्य नसून शील, कर्तव्यनिष्ठा, देशभक्ति, स्वार्थत्याग वगैरे गुण समाजाचे अंगीं बाणविले पाहिजेत. लोकशाही समाजांतील व्यक्तींचें जीवन वैयक्तिक स्वार्थ, बेजबाबदारी यांनीं ग्रासलेलें असतें. त्याऐवजीं स्वार्थत्याग, संयम व समाजहित यांनीं वातावरण व व्यक्तिमात्राचें मन दरवळून गेलें पाहिजे असें फॅसिस्टांचें म्हणणें आहे. इटालींत मुसोलिनी व जर्मनींत हिटलर हीं अशीं लोकोत्तर माणसें सत्तापदावर आलीं असून तेथें त्यांच्या व त्यांच्याच मताच्या कमीअधिक लोकोत्तर माणसांच्या साहाय्यानें राज्यकारभार ते करीत आहेत. लोकशाही तेथें नष्ट झाली असून कोणत्याही विशिष्ट वर्गाचीही सत्ता तेथें नाहीं असें ते मानितात.

व्यक्तिवाद्यांच्या लोकशाहीस म्हणजे राजकीय संघटनेस जसा फॅसिस्टांचा विरोध आहे त्याप्रमाणेंच व्यक्तिवाद्यांच्या आर्थिक संघटनेसही फॅसिस्टांचा विशिष्ट प्रकारचा विरोध आहे. मजुरांनीं आपसांत, भांडवलदारांनीं आपसांत अथवा मजूरांनीं व भांडवलदारांनीं एकमेकांशीं चढाओढ करीत राहावें आणि कोंबड्यांची झुंज प्रेक्षक शांतपणें पहातात त्याप्रमाणें राज्यसंस्थेनें शांतपणें ही चढाओढ पहावी हें फॅसिस्टांना पसंत नाहीं. ही बेबंदशाही अथवा यादवी असून समाजाचें भांडवल व श्रम यांचा हा व्यय समाजाच्या विध्वंसाकडेच होतो असें फॅसिस्टांचें म्हणणें आहे. एका बाजूस संपत्तीचे ढीग वाया चालले असून दुसऱ्या बाजूस दारिद्र्य व बेकारी यांचा कहर उसळला आहे हा या बेबंदशाहीचाच परिणाम होय. मुळींच श्रम न करणारीं अनेक माणसें सुखोपभोगांत लोळत असतां श्रम करून पोट भरूं इच्छिणाऱ्यांना श्रम करण्याची संधि नाहीं आणि सक्तीची उपासमारी भोगावी लागत आहे ही अराजकताच होय. शहरांत माणसांची गर्दी एकसारखी वाढून तेथें दुर्व्यसनें, रोगराई व बेकारी वाढत आहे आणि खेड्यांत शेती करण्यास माणसेंच नाहींत म्हणून शेतीचें उत्पन्न कमी होत आहे; या अवस्थेस काय म्हणावें ? जोंपर्यंत समाजांतील प्रत्येक व्यक्ति अथवा वर्ग स्वतांच्या हिताच्या व फायद्याच्या दृष्टीनेंच आर्थिक व्यवहार पहात आहेत तोंवर समाजांत हे अनर्थ टळणें अशक्य आहे.

व्यक्तिस्वातंत्र्यवाद्यांवर फॅसिस्टांचे आर्थिक बाबतींत जे हे आक्षेप आहेत तेच सोशॅलिस्टांचेही आहेत हें लेखाच्या आरंभीं दाखविलें आहे. पण हे अनर्थ टाळण्याचे सोशॅलिस्टांचे उपाय मात्र फॅसिस्टांना मान्य नाहींत. वरील अनर्थ टाळण्यासाठीं धनोत्पादन साधनांवर खासगी मालकी नसावी आणि धनोत्पादक साधनें सार्वजनिक मालकींत आणून समाजहितदृष्टीनें त्यांचा वापर करावा असें सोशॅलिस्ट म्हणतात. पण व्यक्तिनिष्ठ भांडवलशाहींत अखेर व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट होऊन मूठभर धनिकांच्या आर्थिक हक्कदाऱ्या माजल्या त्याप्रमाणें धनोत्पादन साधनांच्या सामाजिक मालकींतही अखेर आर्थिक हक्कदाऱ्या माजतीलच अशी फॅसिस्टांना भीति

वाटते. जें सर्वांचें काम तें कोणाचेंच काम नव्हे हा सार्वजनिक कामांत येणारा अनुभव या सार्वजनिक मालकींत आल्यावांचून राहणार नाहीं असा फॅसिस्टांचा तर्क आहे. खासगी मालकी व खासगी नफा यांच्या आकर्षणावांचून समाजांत उत्साह, कौशल्य व कर्तृत्व निर्माण होणेंच कठीण आहे. शिवाय त्यांच्या मतें समाजप्रगतीच्या दृष्टीनें धनोत्पादन साधनें खासगी व्यक्तींच्या हातीं आहेत कीं समाजाच्या हातीं आहेत हा मुद्दा महत्त्वाचा नसून देशभक्ति, स्वार्थत्याग, कर्तव्यनिष्ठा वगैरे गुण समाजांतील व्यक्तींच्या अंगीं किती आहेत त्यावर समाजाची प्रगति होणें न होणें अथवा कमीअधिक होणें अवलंबून आहे. जोंवर संकुचित व्यक्तिस्वार्थ हेंच व्यक्तिमात्राचें ध्येय आहे तोंवर धनोत्पादन साधनें सार्वजनिक मालकीचीं झालीं तरी समाजकल्याण होणार नाहीं आणि उलट समाजांत स्वार्थत्याग, देशभक्ति, कर्तव्यनिष्ठा वगैरे गुणांचा प्रसार झाल्यास धनोत्पादन साधनें खासगी मालकींत असलीं तरी त्यांचा वापर सार्वजनिक हितदृष्टीचा करतां येऊन समाजकल्याण साधणें शक्य होईल.

मात्र एका खासगी मालकीखेरीज सर्व इतर प्रकारचें व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट झालें पाहिजे. कामगारांनीं संप करणें, कामगारांना आडवण्यासाठीं भांडवलदारांनीं कारखान्यांना कुलपें ठोकणें, मोठमोठ्या कारखानदारांनीं आपसांत स्पर्धा करणें व लहान कारखानदारांना अजिबात गिळंकृत करणें आणि सर्वांनीं केवळ स्वहितार्थ झटत राहून राष्ट्रहिताबद्दल बेफिकीर राहणें हें अत्यंत घातुक आहे. म्हणून कारखानदारांची आपसांत चढाओढ, कारखान्यांना त्यांनीं टाळे ठोकणें व कामगारांनीं संप करणें या गोष्टी कायद्यानें बंद कराव्या असें फॅसिस्टांना वाटतें. इटालींत व जर्मनींत तसे कायदे करण्यांत आलेही आहेत. तसेंच लहान कारखानदार व लहान शेतकरी यांचेंही रक्षण करणें हें, फॅसिस्टांच्या मतें, राज्यकर्त्यांचें कर्तव्य आहे.

आंतरराष्ट्रीय खुला व्यापार हें व्यक्तिवादी भांडवलशाहीचें एक प्रमुख वैशिष्ट्यच होतें. पण फॅसिस्टांना तें पसंत नाहीं. खुल्या व्यापाराच्या तत्त्वामुळें आधींच आर्थिक बाबतींत बलिष्ठ ठरलेलीं राष्ट्रें आपला माल मागसलेल्या राष्ट्रांवर लादून मागसलेल्या राष्ट्रांतील धंदे धुळीस मिळवितात व त्या राष्ट्रांवर गुलामगिरी लादतात. या गुलामगिरीचा प्रतिकार करण्याचा मार्ग म्हणजे खुल्या व्यापाराचें तत्त्व सोडून देऊन सरहद्दीवर जकाती लादणें व राष्ट्र सर्व प्रकारच्या मालाच्या बाबतींत स्वावलंबी करणें हें, फॅसिस्टांच्या मतें, राष्ट्रीय सरकारचें कर्तव्य आहे.

एकंदरींत माणसाचें जिवंत शरीर जसें एकजूट, एकजीव व स्वयंपूर्ण असतें तसेंच राष्ट्रही एकजूट, एकजीव व स्वयंपूर्ण करणें हें फॅसिस्ट आर्थिक व राजकीय संघटनेचें एकच एक ध्येय आहे.

फॅसिस्टांच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या ध्येयास अनुसरूनच स्त्रीवर्गासंबंधानेंही फॅसिस्टांचें धोरण आंखलेलें आहे व तेंच इटालींत व जर्मनींत आज जारी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या मताप्रमाणें स्त्रीचें स्थान सैपाक–घरांत असून संतति–उत्पादन, संततिसंगोपन आणि पतीच्या, पुत्राच्या व बापाच्या कार्यांत दुय्यमपणानें सहभागी होणें एवढेंच स्त्रीचें कर्तव्य आहे.

लोकसंख्या वाढविण्याचे बाबतींत फॅसिस्टांचा फारच आग्रह आहे. संतति–नियमनाचे उपायास फॅसिस्ट हे कायद्यानें बंदी करतात. वंशशुद्धीवर जर्मन फॅसिस्टांचा विशेष कटाक्ष आहे. जर्मन लोक हे स्वतांस नॉर्डिक अथवा आर्यवंशाचे मानतात. हा वंश शुद्ध राखण्यासाठीं ज्यूंची जर्मनींतून हकालपट्टी होऊन ज्यूंचा तेथें अतोनात छळ झाला. इटालींतही अलीकडे ज्यूविरोधी धोरण सुरू झालें आहे.

फॅसिझम्‌मध्यें धनोत्पादन साधनांची खासगी मालकी आहे, पण व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाही नाहीं हें वर सांगितलेंच. पण त्याबरोबरच फॅसिझम् ही लष्करशाही नव्हे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. इटालींत मुसोलिनीस प्रधानपद देण्याचे बाबतींत इटालियन सेनापतींचा विरोध होताच. हिटलरला लष्करानें पुष्कळ काळ विरोध करून अखेर पाठिंबा दिला असला तरी मुसोलिनी व हिटलर अखिल जनतेचा पाठिंबा वाटेल त्या मार्गांनीं संपादन करून राज्यसत्तेवरील लष्करी खात्याची पक्कड ढिली करीत आहेत. मुसोलिनीस या बाबतींत पुष्कळच यश आलें असून हिटलर आपल्या धोरणास विरोध करणाऱ्या सेनापतींना खटाखट कामावरून काढीत असतो. आपल्या धोरणास विरोध करणाऱ्या ज. श्लीचरसारख्या डोईजड सेनापतीस वाटेंतून काढणें अवघड आहे असें पाहून फॅसिस्टांनीं त्याचा खून करून आपली वाट मोकळी केली. जपानांत धनोत्पादन साधनावर खासगी मालकी

असून तेथें व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाही यांचा अभाव असल्यामुळें जपानांत डायेट नांवाचें पार्लमेंट आहे, पण सर्व अंतिमाधिकार राजाच्या हातीं असून राजा लष्कराचे सल्ल्यानें वागतो. तेथें फॅसिझम् आहे असें मानण्यांत येतें. पण हें सदोष आहे. जपानांत भांडवलदार मध्यमवर्ग व सामान्य जनता यांच्या हातीं सत्ता नसून तेथें लष्कर—आरमार या खात्यांच्या हातीं सत्ता आहे. या दृष्टीनें जपानांत फॅसिझम् आहे असें म्हणण्यापेक्षां तेथें लष्करशाही आहे असें म्हणणें अधिक बिनचूक होईल.

तसेंच अनियंत्रित राजसत्ता म्हणजेही फॅसिझम् नव्हे. इटालींत आनुवंशिक राजा असला तरी तो नामधारी आहे. सत्ता आहे ती लोकोत्तर म्हणून समाजांत पुढारीपद व प्रभुत्व पावलेल्या मुसोलिनीच्या हातीं आहे. त्यास राष्ट्रांत मिळालेलें प्रभुपद आनुवंशिक हक्कानें मिळालेलें नसून जनतेनें त्याच्या लोकोत्तरतेस भुलून त्यास अर्पण केलें आहे. लोकशाही पद्धतीच्या निवडणुकी तेथें होत नाहींत खऱ्या. पण आपल्या धोरणास जनतेचा पाठिंबा मिळविण्यासाठीं मुसोलिनी व हिटलरही आपल्या हस्तकांसह व्यासपीठावर व वृत्तपत्रांतून सरकारची भूमिका जनतेला एकसारखी पटवीत असतो. जनतेस आपलें धोरण मान्य नसेल तर आपला पाडाव होईल ही त्यांस भीति आहे. जनतेंत इतर मतांचा फैलाव करण्यास बंदी आहे खरी. पण जनतेस गाफील व बेफिकीर राहूं न देतां आपल्या धोरणास जनतेचा सक्रिय पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न मुसोलिनी व हिटलर यांनीं अहर्निश केला आहे.

माल भांडवलवाले व मजूर, जमिनदार व शेतकरी, मध्यम वर्ग या सर्वांवर निःपक्षपातबुद्धीनें व राष्ट्राची एकजूट राखून राज्य करण्याचा कितीही अट्टाहास फॅसिस्ट पुढारी करीत असले व आपणांस यश येत आहे अशी त्यांची कितीही प्रामाणिक समजूत असली तरी फॅसिस्ट राज्यसत्तेस भांडवलवाल्यांच्या तंत्रानें वागावें लागतें हें निःसंशय खरें आहे. खासगी मालकीचें फॅसिझम् रक्षण करतो आणि राष्ट्र एकजूट ठेवण्यासाठीं कामगारचळवळी दडपून टाकतो हें पाहूनच भांडवलदार वर्गांनीं फॅसिझमला प्रथम उचलून धरलें व म्हणून त्यास यश आलें. पुढें जर्मनींतील व इटालींतील फॅसिस्ट राज्यकर्ते हिटलर व मुसोलिनी भांडवलवाल्यांचेच हस्तक बनलेले असून त्यांचें साम्राज्यशाही धोरणच पुढें रेटीत आहेत. त्यामुळें चोहोंकडे शस्त्रास्त्रें वाढत असून मागसलेल्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य संकटांत आलें आहे. व्यक्तिनिष्ठ भांडवलशाहींत जी आर्थिक बेबंदशाही माजते असा फॅसिस्टांचा आक्षेप आहे असें मागें सांगितलें तिचें उघड स्वरूप अदृश्य झालें असलें तरी एकीकडे बेकारी व दारिद्र्य आणि दुसरीकडे वाया जाणारी संपत्ति हा विरोध फॅसिझमलाही टाळतां आलेला नाहीं. या दृष्टीनें व्यक्तिनिष्ठ भांडवलशाहीहून भेद दाखविण्यासाठीं फॅसिझमला 'संघटित भांडवलशाही' म्हणणें सयुक्तिक होईल.

फाल्गुनः-हिंदुकालमानपद्धतीप्रमाणें चांद्रमानानें वर्षाचा हा बारावा व शेवटचा महिना आहे. या महिन्यांतील पौर्णिमेस चंद्र फल्गुनी नक्षत्रांत असतो म्हणून यास 'फाल्गुन' असें नांव दिलें आहे. प्राचीनकाळीं नक्षत्रांच्या गतीवरून महिन्यांस नांवें दिलीं नव्हती तेव्हां फाल्गुनास 'तपस्य' असें नांव होतें. हा महिना इंग्रजी मार्च महिन्याचे सुमारास व वसंत ऋतूचें आरंभीं येतो. वसंतागमनामुळें विश्वांतील प्राणिमात्र व वनस्पति यांना टवटवी येऊन, नवें तेज, जीव, चेतना व जोम आलेला असतो. झाडांना पालवी फुटते, आंबा, फणस, जांभूळ आदि वृक्षांना मोहोर येतो, फुलझाडें फुलांनीं बहरतात, पक्षी आनंदानें गातात व नाचतात, मनुष्यप्राण्याचेंहि मन प्रसन्न असतें. म्हणून या महिन्यांत लोक वसंतागमनोत्सव करतात.

हा उत्सव पौर्णिमेचे दिवशीं मुख्यतः व कांहीं ठिकाणीं तत्पूर्वी सात दिवस व तदनंतर पांच दिवस असा करतात. स्थानपरत्वें याला शिमगा, होलिकावंदन किंवा होळी, हुताशनीमहोत्सव, दोलायात्रा, कामदहन अशा निरनिराळ्या संज्ञा आहेत. सर्वांचा हेतु वसंताचा उत्सव करणें हाच दिसतो. महाराष्ट्रांत पौर्णिमेचे दिवशीं होळी, वद्यप्रतिपदेस धूलिवंदन व वद्य पंचमीस रंगपंचमी असा उत्सव साजरा करतात. होळीचे दिवशीं शहरांतून व गांवांतून मुख्य ठिकाणीं व देवालयांपुढें लाकडें शेणी रचून मोठा अग्नि तयार करून लोक त्यास प्रदक्षिणा घालतांना दिसतात. श्रीशंकर तपश्चर्येला बसले असतां मदनानें त्यांस त्रास देण्यास प्रारंभ केल्यानें रागानें शंकरांनीं तृतीय नेत्र उघडून अग्नीच्या ज्वाला बाहेर फेकून तपश्चर्येपासून परावृत्त करणाऱ्या मदनाची राखरांगोळी केली याचें द्योतक म्हणून ही होळी करण्याची चाल पडली आहे असें

कांहीं म्हणतात तें एका अर्थी बरोबर आहे. प्रत्येक मनुष्याचा तृतीय नेत्र जो ज्ञानचक्षु त्याच्या ज्ञानाग्नीनें उच्छृंखल मनोवृत्तींचा समूळ उच्छेद करावयाचा व शीलवर्धन करावयाचें असेंच हा होलिकोत्सव सांगतो. उच्छृंखल मनोवृत्ती अग्नींत दहन करून टाकल्यानें शुद्ध व प्रसन्न झालेल्या मनाला रंजविण्यास धूलिवंदन व रंगपंचमी हें आनंदोत्सव करण्यांत येत असत. या सणांतून होणारे सर्व अनिष्ट प्रकार हे आधाररहित असून अनिष्ट आहेत हें यावरून स्पष्ट होतें.

हिंदुस्थानांत वसंताचे शेवटीं व उन्हाळ्याचे आरंभीं महामारी, वांत्या, देवी इत्यादि भयंकर रोगाच्या सांथी सुरू होतात व मृत्युसंख्येंत वाढ होते. याकरतां आरोग्यविषयक काळजी घ्यावी लागते व हवा शुद्ध राहील असे प्रयत्न करावे लागतात. अग्नीमुळें हवेंतील जंतु नष्ट होऊन हवा शुद्ध होते. होळींतील शेणी, नारळ, तूप व पोळ्या हे सर्व पदार्थ जंतुघ्न आहेत. अशा होळीच्या सभोवतीं प्रदक्षिणा केल्यानें, विशेषत: तरुण मंडळींनीं तसें केल्यानें, श्वासोच्छ्वासाबरोबर होळीचे अग्नींतील धूर, व उष्ण हवा फुफ्फुसांत गेल्यानें शरीर रोगप्रतिबंधक (Immune) बनतें. होळीचे आदले दिवशीं कांहीं लोक उपास करतात. शरीर शुद्ध असावें हाच त्यांतील हेतु असतो. शरीर शुद्ध झाल्यानें योद्ध्यांनीं लढाईस निर्वेधपणें जाण्यास हरकत नाहीं म्हणूनच धूलिवंदन व रंगपंचमीचे आनंदोत्सव अस्तित्वांत आले असावेत. खिस्ती लोकहि विशेष आनंदाचे प्रसंगीं होळी (Bonfire) पेटवितात. अँग्लो सॅक्सन लोक जानेवारीच्या ८ तारखेस दिनमान वाढल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ होळी पेटवीत. मुसलमानांचे मोहरममध्येंहि कत्तल नांवाचा होळीचा समारंभ असतो. या दिवशीं लोक उपास व स्नान करून अग्नीवरून चालत जातात. या सर्वांचा हेतु एकच असावा असें दिसतें.

खिश्चन लोकांचा ईस्टर नांवाचा सणहि याच महिन्यांत येतो. वसंतागमनानें सर्व सृष्टींत नवचैतन्य आलेलें असतें तसेंच पुनरुज्जीवन खाइस्टचें होतें अगर होवो या हेतूनें हा उत्सव ते करतात. 'ईस्टर एग्ज' (Easter eggs) नूतन जीवोत्पत्ती व खाइस्टच्या पुनरुज्जीवनाचीं द्योतक आहेत. गुड् फ्रायडे हा दिवस या वसंतोत्सवांत मुख्य असतो.

माणकेश्वर मल्हारीयात्रा, तुकाराम महाराज पुण्यतिथी, रेणुकायात्रा, एकनाथषष्ठी इत्यादि यात्रा व उत्सवहि या महिन्यांत येतात.

फाळके, धुंडीराज गोविंद (१८७०–):– हिंदी चित्रपटसृष्टीचे जनक व कलावंत. ता. ३० एप्रिल १८७० रोजीं त्रिंबकेश्वर येथें (नाशीक जवळ) जन्म. मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर ते मुंबई येथील जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स्मध्यें दाखल झाले; पुढें बडोदा येथील कलाभुवनमध्यें ललितकलांचा अभ्यास संपविला. १९०९ सालीं त्यांचा शेठ पुरुषोत्तम विश्राम यांच्याशीं परिचय होऊन त्यांच्या साह्यानें Photo-Engarving व Photo-lithography चा अभ्यास करण्याकरितां युरोपला जाण्याची संधी त्यांना मिळाली. परत आल्यावर सांप्रत लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग प्रेस या नांवानें प्रसिद्ध असलेल्या संस्थेला ते मिळाले. तेथें जेमतेम दोन वर्षें काम केल्यावर त्यांनीं तें काम सोडलें व सिनेमाटोग्राफी शिकण्याकरितां युरोपला गेले. १९१२ सालीं युरोपहून परत येतांच चित्रपट काढण्याच्या कार्याला त्यांनीं सुरवात केली. १९१२ च्या अखेरीला त्यांचा 'हरिश्चंद्र' हा पूर्ण लांबीचा चित्रपट बाहेर पडला. १९१३ सालीं 'फाळके फिल्म्स' या चित्रपट निर्माण करणाऱ्या संस्थेची स्थापना केली व १९१७ पर्यंत वीसाहून अधिक चित्रपट काढले. १९१७ सालीं मयाशंकर भट्ट, वामनराव आपटे व इतर कांहीं मंडळी यांच्या साह्यानें त्यांनीं सुप्रसिद्ध हिंदुस्थान सिनेमा फिल्म कंपनीची स्थापना केली. १९१९ पासून १९३१ पर्यंत त्यांनीं बरेच चित्रपट काढले; परंतु त्यांच्या कार्याला मधून मधून खळ पडत असे. १९३१ सालीं त्यांना मयाशंकर भट्ट यांची 'सेतुबंधन' हा चित्रपट काढण्याला मदत झाली. कोल्हापूर सिनेटोनमध्यें त्यांनीं आपला शेवटचा बोलपट 'गंगावतरण' काढला.



श्री. धुं. गो. फाळके

कुशल यंत्रशास्त्रज्ञ व निपुण ट्रिक फोटोग्राफर म्हणून फाळके प्रसिद्ध आहेत. फाळके हे हिंदुस्थानांतील पहिले

दिग्दर्शक, पहिले सिनेमाटोग्राफर, पहिले सिनेलॅबोरेटेरीयन, पहिले कार्टूनिस्ट व पहिले चित्रपटनिर्माते होत.

फॉउच, फर्डिनंड (१८५१–१९२९):–एक सुप्रसिद्ध फ्रेंच सेनापति. याचा जन्म इ. स. १८५१ आक्टोबर २ रोजीं टार्बे (Tarbes) येथें झाला.

फर्डिनंड हा एक अत्यंत अभ्यासु विद्यार्थी होता. बारा वर्षांचा असतांना त्यानें Thiers' History of the Consulate and Empire' या आवडत्या पुस्तकाचें अध्ययन केलें होतें. गुरुजींचें त्याच्यासंबंधीं फार चांगलें मत होतें. त्याचें शिक्षण, प्रारंभीं व्हॅलेंटाइन येथें, नंतर सेंट एटिने व शेवटीं सेंट मायकेल येथील कॉलेजांत झालें. डिग्री घेतल्यानंतर कांहीं दिवस College de S. Clement at Metz या ठिकाणीं नोकरी केली. इ. स. १८७० सालीं फ्रान्स व प्रशिया यांमध्यें युद्ध सुरू झालें. त्यांत फॉउचनें आपलें नांव दाखल केलें.

लढाई संपल्यानंतर तो मेट्झला परतला; व लवकरच फॉन्टेनब्ल्यू (Fountainbleau) येथें तोफखान्याच्या खात्यावर (Artillery) तो एक जबाबदार अधिकारी झाला. यानंतर टार्बे (Tarbes) येथील ४२ व्या तोफखान्याच्या तुकडीवर (Artillery regiment) त्याची नेमणूक झाली. इ. स. १८७८ सालीं १० व्या तुकडीचा तो कप्तान झाला. इ. स. १८९४ सालीं तो लष्करी डावपेचांचा इतिहास व शास्त्र यांवर अधिकृत प्राध्यापक (Professor) झाला.

फॉउचनें त्यावेळीं दिलेलीं व्याख्यानें चिरस्मरणीय झालीं आहेत. त्याची कीर्ति सर्व जगभर पसरली. हीं व्याख्यानें संकलित करून, The Conduct of War व The Principles of War या दोन ग्रंथरूपानें इ. स. १९१८ सालीं मि. एच्. बेलॉक या गृहस्थानें तीं पुन्हां प्रसिद्ध केलीं. या ग्रंथांत सर्वसाधारण मुद्दा चर्चिला आहे तो असा–युद्धकला सोपी आहे असें विधान अनेकांकडून केलें जातें; पण ती कला फारच थोड्या लोकांकडून हस्तगत केली जाते; कारण प्रत्यक्षांत पडलें असतां अनेक गुंतागुंती पुढें उभ्या राहातात व प्रचंड इच्छाशक्ति व तिची अंमलबजावणी करण्यासाठीं लागणारा पोलादी हुकूमबाजपणा सेनापतीच्या अंगीं असल्यावांचून यशप्राप्ति होणार नाहीं.

फॉउचचा भाऊ जेझुइट होता व याचेहि अंगीं धर्मश्रद्धा बरीच होती; यामुळें इ. स. १९०१ सालीं फॉउचचा लष्करी दर्जा थोडा कमी करण्यांत आला. पण इ.स. १९०३ सालीं त्याला संपूर्ण कर्नल, इ.स. १९०५ सालीं ५व्या लष्करी दलाचा (Corps) मुख्य व इ. स. १९०७ मध्यें ब्रिगेडियर (Brigadier) करण्यांत आलें. याच सुमारास क्लेमेंसू (Clemenceau) हा मुख्य प्रधान झाला. त्यानें फॉउचची योग्यता ओळखून त्यास Ecolede Guerre चें आधिपत्य दिलें. या जागेवर तो साडेचार वर्षे होता. या अवधींत त्यानें फ्रान्सचा लष्करी दर्जा बराच वाढविला. त्यानें आपल्या हाताखालीं अनेक चांगले शिष्य तयार केले. इ. स. १९११त तो एका (Division) दलाचा जनरल, इ. स. १९१२ सालीं ८व्या लष्करी दलाचा (Corps) जनरल व इ. स. १९१३ सालीं नॅन्सी येथील २०व्या लष्करी दलाचा (Corps) जनरल झाला.

गेल्या महायुद्धांत (१९१४–१८) फॉउचनें बजावलेली कामगिरी अत्यंत महत्त्वाची आहे. चार आणीबाणीच्या प्रसंगीं, त्यानें आपलीं युद्धविषयक तत्त्वें प्रत्यक्षपणें योजून दोस्तराष्ट्रांस यश मिळवून दिलें; यामुळें तो Generalissimo झाला. हे चार प्रसंग म्हणजे–इ. स. १९१४–फ्रेंचांनीं केलेल्या चढाईंत त्यांचा पराभव झाला व नॅन्सीचें संरक्षण करण्याचा चालविलेला प्रयत्न हा प्रसंग; १९१४ च्या सप्टेंबरमध्यें मर्ने येथील भयंकर समरप्रसंग, त्याच वर्षी आक्टोबरमध्यें ब्रिटिश सैन्यहि मदतीस घेऊन Ypres येथें झालेलें रणकंदन व १९१६, ता. १ जुलई रोजीं सोम (Somme) येथें झालेलें युद्ध. या सर्व प्रसंगीं फॉउचचें लष्करी धोरण अचुक प्रभावी ठरलें.

या सर्व प्रसंगांपेक्षां इ. स. १९१८ सालचा प्रसंग आणीबाणीचा होता. यावेळीं जर्मनी, फ्रेंच व ब्रिटिश सैन्याची फळी फोडून पॅरिसच्या अगदीं जवळ येऊन ठेपला होता. यापूर्वी फॉउच हा कामाच्या दगदगीमुळें थकला असल्यानें त्यावरची रणभूमीवरील बरीचशी जबाबदारी कमी करण्यांत आली होती; तथापि त्यानें दोस्त राष्ट्रांच्या फौजेंत, ताजें व वेचक शिलकी सैन्य राखून ठेवण्याचा आग्रह धरिला; त्याच्या म्हणण्याकडे द्यावें तितकें लक्ष दिलें गेलें नाहीं; त्यामुळें २१ मार्च १९१८ रोजीं जर्मनीनें फ्रान्सवर जोराचा हल्ला चढविला तेव्हां दोस्त राष्ट्रें गडबडून गेलीं. त्यांना फॉउचच्या म्हणण्याची सत्यता यावेळीं चांगलीच पटली. त्यांनीं त्याच्या ताब्यांत लष्कराचीं सर्व सूत्रें ताबडतोब दिलीं व त्यास

मार्शल केलें. त्यानें सैन्याची बिघडलेली घडी चांगल्या तऱ्हेनें सांवरून १५ जुलई १९१८ रोजीं जर्मन सैन्यावर मर्ने येथें उलट हल्ला चढविला; त्यांत त्यास शेवटीं यश येऊन, जर्मनी ११ नोव्हेंबर १९१८ रोजीं प्रेसिडेंट विल्सन यांनीं सुचविलेल्या अटीप्रमाणें युद्ध तहकुबीस तयार झाला. अशा तऱ्हेनें फॉउचच्या जोरकस लष्करी धोरणामुळें जर्मनी वठणीवर आला. ११ नोव्हेंबर १९१८, रोजीं भरलेल्या दोस्त राष्ट्रांच्या परिषदेंत त्याचा गुणगौरव करण्यांत केला.

यानंतर जर्मनीबाबत ज्या ज्या वाटाघाटी झाल्या त्यांत फॉउचचें मत महत्त्वाचें समजण्यांत येई. युद्धाप्रमाणें शांततेच्या वेळींहि त्याचा सल्ला बहुमोल असे.

फॉउचचें मनःस्वास्थ्य बिघडविणारे अनेक प्रसंग आले. त्याचा मुलगा लढाईंत मारला गेला. तथापि त्यानें मनःस्वास्थ्य न बिघडूं देतां आपलें कर्तव्य चालूं ठेवलें.

इ. स. १९२१ सालीं तो अमेरिकेला (United States) शस्त्रसंन्यास परिषदेला (Disarmament Conference) गेला. इ.स. १९२९ फेब्रुवारीमध्यें हा वीर मृत्युशय्येवर पडला असतां निम्याहून अधिक जगांत त्याच्या प्रकृतीसंबंधीं चिंता उत्पन्न झाली. शेवटीं हा वीर २० मार्च रोजीं ख्रिस्तवासी झाला. त्याचें शव नेपोलियन बोनापार्टशेजारीं पुरण्यांत आलें.

फॉक्स, चार्लस जेम्स् (१७४९ ते १८०६):—एक ब्रिटिश मुत्सद्दी. याचा जन्म लंडनमध्यें जानेवारी ४, १७४९ सालीं झाला. याचें शिक्षण वँडस्वर्थ, एटन् व हर्टफोर्ड येथें झालें. त्याचें वाचन विस्तृत होतें. असामान्य बुद्धिमत्ता व प्रचंड उद्योगशीलता या दोन गुणांमुळें तो Scholar झाला. इंग्लिश विदग्ध वाङ्मयांत (Classics) तो पारंगत होताच; पण फ्रेंच व इटालियन भाषांवरहि त्यानें असामान्य प्रभुत्व मिळविलें होतें.

इ. स. १७७५ पासून व्हिग् पक्षाचा पुढारी म्हणून फॉक्स पुढें आला. या वेळ पावेतों त्यानें बर्कशीं मैत्री संपादन केली होती. अमेरिकनांच्या स्वातंत्र्यध्येयास तो अनुकूल होता. नागरिकस्वातंत्र्यावर अधिष्ठित असें त्याचें राजकीय धोरण होतें. लॉर्ड रॉकिंगहॅम यांच्या नेतृत्वाखालीं व्हिग् पक्षास तो मिळाला; तथापि अनेक बाबतींत, आपल्या पक्षापेक्षां त्याचीं मतें अधिक पुढारलेलीं होतीं. पार्लमेंटची अंतरंग सुधारणा व आर्थिक बाबतींत चोख व्यवहार या दोन महत्त्वाच्या गोष्टी साधणें हें त्याच्या पक्षाचें ध्येय होतें.

रोमन कॅथोलिक लोकांवर घातलेलीं नियंत्रणें रद्द करण्यासाठीं त्यानें लेखनद्वारा व भाषणद्वारा चांगलीच खटपट केली. त्याचप्रमाणें आयरिश लोक व गुलाम यांची बाजू त्यानें इंग्लिश जनतेपुढें चांगल्या तऱ्हेनें मांडली.

इ. स. १७८९ सालीं फ्रेंच राज्यक्रांतीसंबंधीं त्यानें अनुकूल असें मत प्रदर्शित केलें. यामुळेंच इ. स. १७९१ सालीं बर्कशीं त्याचा मतभेद होऊन त्यांची मैत्री फिसकटली. इ. स. १७९२ सालीं बहुतेक व्हिग् पक्षीयांचें मत फ्रेंच राज्यक्रांतीस प्रतिकूल झालें; पण फॉक्सचें मत कायमच राहिलें. फ्रान्सविरुद्ध युद्ध करण्याबाबत त्याचें मत प्रतिकूल पडलें; पण त्याचे अनुयायी फारच थोडे होते व इ. स. १७९७ नंतर पार्लमेंटच्या बैठकीस तो क्वचितच हजर राहूं लागला. इ. स. १७९७ सालीं जनतेच्या हातीं सर्वाधिकार असावेत असें त्यानें सार्वजनिक पीठावरून जाहीर केल्यावरून प्रिव्ही कॉन्सिलर्सच्या यादींतून त्याचें नांव वगळण्यांत आलें.

इ. स. १८०२ च्या सुमारास फॉक्स पुन्हां सार्वजनिक जीवनांत पडला. त्यानें फ्रान्सशीं सख्य जोडण्याचा प्रयत्न केला. पण लवकरच त्याला नेपोलियनच्या स्वभावासंबंधीं आपण बांधलेले तर्क चुकीचे आहेत असें प्रत्ययास आलें. याच सुमारास त्याची प्रकृती बिघडली व त्यांतच त्याचा इ. स. १८०६, १३ सप्टेंबर रोजीं अंत झाला.

फॉक्समध्यें सद्गुण व दुर्गुण हे मोठ्या प्रमाणांत सामावलेले होते. जुगाराचा नाद त्यास लहानपणापासून होता; त्यामुळें तो अनेक वेळां दिवाळखोर झाला होता व मित्रांच्या साह्यानेंच तो पुन्हां वर आला. बोलणें व कृति यांमध्यें तफावत असणाऱ्या अनेक व्यक्ति असतात; त्यांपैकीं तो होता. खाजगी भांडणांचा सूड सार्वजनिक जीवनांत घेण्याची त्यास वाईट खोड होती. त्यामुळें विधायक मुत्सद्दी म्हणून तो कधींहि चमकला नाहीं.

त्याच्यांत असामान्य वक्तृत्वशक्ति व वादविवादकुशलता होती. साहित्याशीं त्याचा व्यासंग दांडगा व अव्याहत होता.

दुःखिताकडे त्याची सहानुभूति नैसर्गिक होती. व्हिग पक्षामध्यें त्याचें नांव अनेक कारणांमुळें अमर होऊन राहिलें आहे.

फिडझ्जिराल्ड, एडवर्ड (१८०९–१८८३):– एक इंग्लिश कवि व भाषांतरकार. याच्या वडिलांचें नांव जॉन पर्सेल (Purcell); पण वडिलांनींच एडवर्डच्या जन्मानंतर नऊ वर्षांनीं आपल्या सासऱ्याचें नांव फिडझ्जिराल्ड धारण केलें; त्यामुळें एडवर्ड यासहि फिडझ्जिराल्ड हें आडनांव आलें. इ. स. १९२१ सालीं बेरी सेंट एडमण्डस् येथील शाळेंत त्याचें नांव घालण्यांत आलें; पुढें पांच वर्षांनीं ट्रिनिटी कॉलेज, केंब्रिज, मध्यें त्यानें प्रवेश केला. थॅकरे व स्पेडिंग यांच्याशीं त्याचा दाट परिचय झाला; पुढें टेनिसन् व कार्लाइल यांच्याशींहि त्याचा स्नेहसंबंध जुळला. विश्वविद्यालयीन शिक्षणक्रम संपल्यावर त्यानें कांहीं काळ फ्रान्समध्यें वास्तव्य केलें; इ. स. १८३१ सालीं तो सफोकला (Suffock) परत आला. यानंतर शेवटपर्यंत त्याचें येथेंच मुख्यतः रहाणें असे. ग्रंथ, संगीत व फुलें यांच्या रम्य संगतीचा आस्वाद घेण्यांतच त्याचें आयुष्य निघून गेलें. इ. स. १८५० सालीं स्पॅनिश भाषेचें व १८५३ सालीं पर्शियन भाषेचें अध्ययन त्यानें केलें. इ. स. १८५९ सालीं जगविख्यात कवि उमरखय्याम याच्या रूबायतांचें त्यानें भाषांतर लिहून प्रसिद्ध केलें; तथापि कांहीं काळपर्यंत या भाषांतराकडे कुणाचेंहि विशेष लक्ष गेलें नाहीं. एके दिवशीं इंग्लिश कवियित्री रोझेटी हिचें लक्ष या पुस्तकाकडे सहज गेलें; त्याबरोबर तिनें या पुस्तकांतील अंगभूत गुणाबद्दल धन्योद्गार काढले. पुढें लवकरच इंग्लिश कवि स्विन्सबर्ग यानें तर त्याचा 'जगांतील एक असामान्य कृति' म्हणून गुणगौरव केला. या पुस्तकाची सुधारून काढलेली दुसरी आवृत्ती इ. स. १८६८ मध्यें निघाली, तेव्हांपासून तर त्याची लोकप्रियता वाढत्या प्रमाणांत होत गेली.


फिडझ्जिराल्डनें Euphranor, Six Dramas of Calderon, A Version of the Agamemnon Two Oedipus Tragedies व Readings in Crabbe हीं महत्त्वाचीं पुस्तकेंहि लिहून प्रसिद्ध केलीं. Tennyson's Tiresins to 'Old Fritz' या पुस्तकाच्या प्रसिद्धीकरणानें फिड्झ्जिराल्डच्या लोकप्रियतेंत अधिक भर टाकली; तथापि फिड्झजिराल्ड याला खरी लोकप्रियता मिळाली ती त्याच्या मृत्यूनंतर ५–६ वर्षांनीं डब्ल्यु. राइट् या गृहस्थानें त्याचीं 'पत्रें व वाङ्मयीन अवशेष' (Letters and Literary Remains) प्रसिद्ध केल्यामुळें. इ. स. १८९५ सालीं 'Letters to Fanny Kemble'च्या प्रसिद्धीकरणानेंहि त्याच्या लोकप्रियतेंत भर पडली.

फिड्झ्जिराल्डचा विवाह बर्नार्ड बार्टन नामक कवीच्या लुसी नामक मुलीशीं झाला. आयुष्याचा शेवटचा बहुतेक भाग समुद्रकांठावरच गेल्यानें त्याचें काव्य त्या जीवनास अनुलक्षूनच आहे. विनोदी व मनांतील सूक्ष्मतम भावनांचे हुबेहूब शब्दचित्र रंगविणारा कुशल पत्रलेखक म्हणून तो प्रसिद्ध आहे. त्याच्या पत्रांनीं अनेक स्त्रीपुरुषांचें रंजन झालें आहे. त्याचें काव्य गंभीर, विचारप्रगल्भ व कलेच्या कसोटीस उतरणारें असें आहे.

फिशर, जॉन (१४५९–१५३५):–इंग्लिश प्रेलेट (वरिष्ठ धर्माधिकारी). तो आठव्या हेनरीनें कॅथेराईन ऑफ ॲरगान हिच्यापासून घटस्फोट करण्याच्या अगदीं विरुद्ध होता. त्यानें १५३५ सालीं ॲक्ट ऑफ सक्सेशन बाबत शपथ घेण्याचें नाकारलें म्हणून त्याला लंडनच्या गढींत कारागृहवास घडला. आठव्या हेनरीला चर्चचा अंतिमाधिकारी मानण्याचें त्यानें नाकारल्यावरून त्याचा शिरच्छेद करण्यांत आला. २० मे रोजीं तो कार्डिनल झाला. तो अभिजात वाङ्मयाचा आस्थेवाईक अभ्यासू होता.

फुटबॉलः–हा खेळ खेळण्यास हवा भरलेला चेंडू लागतो. या खेळांत इतर खेळांप्रमाणें दोन बाजू असतात व प्रत्येक बाजूस अकरापेक्षां अधिक लोक नसतात. अटीतटीच्या सामन्याशिवाय इतर सामन्यांत दोन्ही संघांच्या संमतीनें एखाद्या जखमी खेळाडूऐवजीं दुसरा खेळाडू बदली म्हणून घेतां येतो. खेळावयाच्या चेंडूचा परीघ २७ इंचांपेक्षां कमी व २८ इंचांपेक्षां जास्त असतां कामा नये. खेळाला ९० मिनिटांचा वेळ देतात. जो संघनायक उन्हाळी पावसाळी जिंकतो त्यानें प्रथम चेंडू खेळण्यास (Kick-off) कोणास द्यावयाचा व कोणता गोल घ्यावयाचा हें ठरवावयाचें असतें. **क्रीडांगण**–जास्तींत जास्त लांबी १३० यार्ड किंवा कमींत कमी लांबी १०० यार्ड इतकी व जास्तींत जास्त रुंदी १०० यार्ड किंवा कमींत कमी रुंदी ५० यार्ड या प्रमाणांत चौकोन आखावयाचा असतो.

फूटबॉलचें क्रीडांगण



सीमारेषा (Touch line)

ही जागा गोलपासून १२ यार्ड दूर असते.

या क्रीडांगणाच्या सर्व रेषा काटकोनांत काढतात. क्रीडांगणाच्या चार कोपऱ्यांत कमींत कमी पांच फूट उंचीचीं निशाणें रोवावयाचीं असतात.


अ = गोल एरिया ब = पेनल्टी एरिया.

आंतरराष्ट्रिय सामान्यांत या क्रीडांगणाची जास्तींत जास्त लांबी १२० यार्ड व जास्तींत जास्त रुंदी ११० यार्ड व कमींत कमी ७० यार्ड ठेवतात. चेंडूचें खेळाच्या प्रारंभींचें वजन १३ ते १५ औंस प्रमाणभूत मानतात.

मध्यंतरीं विश्रांतीची वेळ नियंत्रकाच्या (रेफरी) परवानगीशिवाय पांच मिनटांपेक्षां अधिक ठेवीत नाहींत. विश्रांतीनंतर दोन्ही संघांनीं क्रीडांगणाची आपली बाजू बदलावयाची असते. गोल झाल्यानंतर ज्या बाजूवर गोल चढला असेल त्या बाजूनें किक मारून चेंडू खेळावयाचा, पण क्रीडांगणाच्या बाजू बदलल्यानंतर ज्या संघानें बाजू बदलण्यापूर्वी किक मारली असेल त्याच्या विरुद्ध संघानें किक मारावयाची. गोल म्हणजे क्रीडांगणाच्या दोन्ही बाजूस मध्यवर्ती २४ फूट लांबीवर दोन उभ्या दांड्या व त्यावर ८ फूट उंचीवर एक आडवा दांडा अशी एक प्रकारची लाकडी चौकट. या चौकटींतून चेंडू गेला कीं एक गोल झाला असें मानावयाचें. चेंडू खेळतांना हातांनीं धरावयाचा, फेकावयाचा किंवा मारावयाचा नाहीं, बाकी पाय, डोकें, खांदा इत्यादी कोणत्याहि अवयवानें उडवावयाचा असतो. गोलशेजारीं असलेल्या गोल-कीपरला चेंडू हातानें धरतां येतो इतकेंच नव्हे तर तो हातांनीं खेळतां येतो. पण हातांनीं इकडे तिकडे नेतां येणार नाहीं. ज्या संघाचे जास्त गोल होतात तो संघ विजयी समजावयाचा.

फुटाण्याची चटणीः–साहित्य–फुटाणे (डाळें), खोबरें, ओल्या मिरच्या, कोथिंबीर, लिंबू , मीठ, साखर. **माप**–एक चिपटें डाळें, सात आठ ओल्या मिरच्या, चहाचे दोन चमचे मीठ, थोडी कोथिंबीर, एक चहाचा चमचा साखर, एक लिंबू. **कृति**–ताजें डाळें निवडून त्याची भरड पूड करावी. त्यांत ओल्या मिरच्या बारीक चिरून, मीठ, कोथिंबीर वगैरे सर्व घालून वर लिंबू पिळून ती पूड सारखी कालवावी. नंतर अर्धा नारळ खवणून घालावा. (सुकें खोबरेंही चालेल.) हवी असल्यास वर तुपाची फोडणी द्यावी.

फुलपांखरूः–ज्यांच्या पंखाला खवले खवले आहेत अशा कीटकांचे जे वर्ग आहेत त्यांतील फुलपांखरू



मूलगंध कुटिविहार, सारनाथ—बनारस

ही एक जात आहे. पतंगदेखील याच वल्कपक्ष जातीं-तला पण तो फुलपांखराहून वेगळा. फुलपांखराच्या मिशा साध्या व आकडेदार असतात तर पतंगाच्या मिशांना मोठाले फाटे असतात; वं त्या पिसाऱ्यासारख्या असतात. त्यांच्या टोकाला सामान्यतः झुबके नसतात.

फुलपांखरू स्वस्थ असलें म्हणजे आपले पंख-उर्ध्व रेषेंत (Vertically) मिटतें; म्हणून फक्त खालचा भागच दिसतो. पतंग सामान्यतः पंखांच्या खालच्या जोडीवर वरची जोडी मिटतो; त्यामुळें त्याचे फक्त पुढच्या बाजूचेच पंख दिसतात. बहुतेक पतंगांचे पंख आंतून कडेनें एका ठिकाणीं आंकडी सारखे झालेले असतात. पण अशी व्यवस्था फुल-पांखराच्या शरीररचनेंत नसते. फुलपांखरें दिवसभर फिरत असतात तर बहुतेक पतंग हे रात्रीं संचार करतात.

फुलपांखरें जगांतील ध्रुवप्रदेशाखेरीज सर्व प्रदेशांत सांपडतात. त्यांच्या पांच जाती आहेत. डोंगराळ भागांत फुलपांखरें विपुल असतात.

सर्व फुलपांखरांचे पंखावर बारीक बारीक खवले अस-तात. त्यांचा वर्ण धातूसारखा असतो कांहीं अपवाद वगळल्यास पंखाचा रंग तेजस्वी असतो. पंखाच्या पृष्ठ-भागांवरील रंग अधिक तेजस्वी असतो. पखांची आंतील बाजू वाळलेल्या पानाच्या रंगाची असते, यामुळें पंख मिटून फुलपांखरू विश्रांती घेत पडलें म्हणजे भोंवता-लच्या परिस्थितीशीं पंखाचा रंग जमतो. पतंगाच्या बाबतींत पंखाची वरची बाजू मळ खपण्यासारखी (Protectively Coloured) असते. कारण पतंग विश्रान्ती घेतांना पंख पसरून घेतो.

फुलपांखरू मुख्यत्वें फुलांतील मधावर आपली उपजी-विका करतें. त्याच्या मुखभागीं रस शोषून घेण्याची एक शुंडा असते. ती उपयोगांत नसते तेव्हां फुलपांखराच्या डोकीखालीं तिचे घट्ट वेटोळें होतें. विषुववृत्ताजवळील प्रदेशांत फुलपांखरांची जी जात आढळते त्या जातींत ह्या रसशोषक शुंडेची सरळ लांबी दहा इंच भरते. फुलपांखरें निरुपद्रवी असतात. एका फुलावरून दुसऱ्या फुलाकडे पुष्पपराग नेण्याला यांचा फार उपयोग होतो. परंतु कीटक स्थितींत (Sarvol condition) यांतील कित्येक जाती झाडाचीं पानें खाऊन उपद्रव करतात.

फुलपांखराच्या आकारांत तें वाढतां वाढतां बरीच स्थित्यंतरें होतात. प्रथम अंडें, नंतर सुरवंट, मग त्या-नंतरची अवस्था (Chrysalis) व तदनंतर संपूर्ण फुलपांखरू. फुलपांखराचें आयुर्मान कांहीं आठवडे अगर महिनेच असतें.

फुले, जोतिराव गोविंदराव (१८२७-१८९०):- सत्यशोधक समाजाचे संस्थापक. यांचें मूळ आडनाव 'गोऱ्हे' पण पुढें फुलें देण्याचें काम (पेशवे दरबारांत) पतकरल्यामुळें यांचें मूळ नांव मागें पडून 'फुले' हेंच नांव रूढ झालें.

जोतिरावांचा जन्म पुण्यास १८२७ मध्यें गोविंदराव व त्यांच्या पत्नि चिमणाबाई यांच्या पोटीं झाला. पुण्यासच यांचें बालपण गेलें. हे सात वर्षांचे झाल्या-वर, वडिलांनीं यांस शाळेंत घातलें. यांचें मराठी शिक्षण थोडेंबहुत झाल्यावर यांना घरच्या बागेच्या कामांकडे लक्ष घालावें लागलें. गोविंदराव फुल्यांच्या बागेजवळ गफारबेग मुनसी या नांवाचे एक सुविद्य गृहस्थ राहत असत. त्यांनीं व लेजीटसाहेब यांनीं जोतिरावांच्या वडीलांस सांगितल्यानें पुनः जोतीरावांना शाळेंत घालण्यांत आलें. यावेळीं म्हणजे १८४१ मध्यें त्यांचें वय १४ वर्षांचें होतें. लहानपणीं हे वडिलांस घरकामांत मदत करीत असत. सकाळच्या वेळीं कसरत करणें, दंडबैठकी काढणें, कुस्ती मारणें वगैरे गोष्टींचें शिक्षण त्यांनीं संपादून स्वतःची शरीरप्रकृती सुदृढ बनविली; तसेंच इंग्रजीचें शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाल्यावर १८४८ मध्यें पुढील शिक्षण घेणें बंद केलें.

शिक्षण आटोपल्यावर एके दिवशीं त्यांस, त्यांच्या एका ब्राह्मण स्नेह्याकडून लग्नास येण्याबद्दल निमंत्रण आलें. निमंत्रणाप्रमाणें ते लग्नास गेले. या लग्नांत वराची मिरवणूक निघाली असतां वराच्या इष्टमित्रां-समवेत त्या मिरवणुकींतून हेहि चालू लागले. पण ही गोष्ट मिरवणुकींतील इतर मंडळींना आवडली नाहीं. या मंडळींना जोतीरावांनीं आपल्याबरोबर चालणें कमीपणाचें असून अपमानस्पद आहे असें वाटलें. त्यामुळें त्यांच्यापैकीं एकानें त्यांस आपल्याबरोबर न चालतां मागून येण्याबद्दल सांगितलें. पण ही गोष्ट जोतीरावांना कमीपणाची व अपमानाची वाटली; इतकेंच नव्हे तर मंडळींच्या या कृत्यानें त्यांच्या काळजाला हात घातल्याप्रमाणें झालें. रागारागानें फुल्यांनीं घरीं प्रयाण केलें व झालेली हकीकत त्यांनीं वडीलांस सांगितली. वडिलांनींही पण आपल्या वेळच्या पेशव्यांच्या राजवटींत आलेले अनुभव सांगून तूं मंडळी-पासून लांब राहत जा असा उपदेश केला. पण त्याचा

जोतिरावांच्या मनावर कांहींही परिणाम न होतां ब्राह्मणेतर वर्गावर होत असलेल्या अन्यायाचें परिमार्जन करण्याचें व्रत या वेळेपासून फुल्यांनीं धारण केलें.

या व्रताचा श्रीगणेशा त्यांनीं, पुण्यास, भिड्यांच्या वाड्यांत १८४८ मध्यें बायकांची शाळा स्थापून केला. या शाळेंत त्यांची बायको व ते यांनीं कांहीं काल काम केलें. पुढें सरकारनेंच मुलींच्या शाळा काढल्यानें फुल्यांनीं आपल्या शाळा सरकारच्या ताब्यांत देऊन टाकल्या.

मुलींच्या शाळा काढून स्त्रीशिक्षणाचा हेतु साध्य होण्याच्या मार्गास लागलेला पाहून पुढें त्यांनीं अस्पृश्योद्धाराकडे लक्ष दिलें. अस्पृश्योद्धार चिरकालीन व सर्वमान्य होण्यासाठीं त्या वर्गांत शिक्षणाचा फैलाव व्हावयास हवा होता. तो व्हावा म्हणून जोतिरावांनीं अस्पृश्यांच्याकरितां नानापेठेमध्यें १८५१ त पहिली शाळा सुरू केली.

आतांपर्यंत स्त्रीशिक्षण व अस्पृश्योद्धार याकरितां त्यांनीं जी कामगिरी केली तिजबद्दल त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर यांनीं जोतिरावांना २०० रु.ची शाल देऊन त्यांचा व त्यांच्या कार्याचा गौरव १८५२ मध्यें केला.

१८७३मध्यें सत्यशोधक समाजाची स्थापना करीपर्यंत त्यांनीं आपल्या मतप्रसारासाठीं अनेक ठिकाणीं चळवळ केली, व्याख्यानें दिलीं, अनेकांना आपल्या इच्छेप्रमाणें वागण्यासाठीं कार्यप्रवृत्त केलें. या कामीं त्यांनीं आपल्या कार्यासंबंधीं कै. श्री. सयाजीराव गायकवाड, कै. श्री. शाहूमहाराज, न्या. मू. रानडे, तत्कालीन निर्भीड लेखक गोपाळराव देशमुख अशासारख्या मंडळींची सहानुभूति मिळविली.

पुढें फुल्यांनीं आपला मतप्रचार अखंड चालावा म्हणून वैयक्तिक प्रयत्नांना समाईक स्वरूप दिलें. हें रूप म्हणजेच २३ सप्टेंबरला स्थापन झालेला 'सत्यशोधक समाज' ही संस्था होय. या संस्थेतर्फे त्यांनीं व त्यांच्या सहकाऱ्यांनीं १८८८पर्यंत कार्य केलें.

त्यांच्या कार्याचा प्रभाव लोकांवर जसजसा पडूं लागला तसतसा त्यांचा अनुयायी वर्ग वाढूं लागला. त्यांचें कार्य लोकमान्य होऊं लागलें. याचें प्रत्यंतर, त्यांना मुंबईला, लोकांनीं ११ मे १८८८ ला सभा भरवून 'महात्मा' पदवी अर्पण केली, यावरून दिसून येतें. यावेळीं त्यांची प्रकृति बिघडून त्यांस अशक्तता आली. पुढें हे १८९० नोव्हेंबर २७ ला मरण पावले.

यांनीं गुलामगिरी, इशारा, आसूड भाग १ ते ४ सत्सार भाग १।२, सार्वजनिक सत्यधर्म, अस्पृश्यांची कैफीयत, तृतीय रत्न नाटक वगैरे पुस्तकें लिहून शिवाय शिवाजीचा पोवाडा, अभंग व इतरहि थोडीबहुत कविता केलेली आहे.

फुलंब्रीकर, कृष्णराव (१८९८–):–उत्कृष्ट गायक. यांचा जन्म १८९८ मध्यें आळंदी येथें झाला.



मास्टर कृष्णराव

वयाच्या दहाव्या वर्षापासूनच नाटक मंडळीशीं संबंध आल्यानें शालेय शिक्षण मराठीपलीकडे गेलें नाहीं. हे नाट्यकला प्रवर्तक मंडळींत असतां 'संत सखू' या नाटकांत विठोबाची भूमिका करीत असत. त्यामुळें त्यांची प्रसिद्धी लहानपणापासूनच झाली. पुढें ते वयाच्या १२ व्या वर्षापासून प्रसिद्ध गवई भास्करबुवा बखले यांच्याकडे गायन शिकण्यास राहिले. यानंतर त्यांचा रिघाव गंधर्व नाटक मंडळींत झाला. तेथें त्यांनीं १८ वर्षें संगीत नट व संगीत दिग्दर्शक या नात्यानें काम केलें. १९३४ पासून ते प्रभात फिल्म कंपनींत संगीत–दिग्दर्शक म्हणून काम करतात. या कंपनींत आतांपर्यंत धर्मात्मा, अमरज्योती, वहाँ, गोपालकृष्ण यांतील संगीताचा सर्व भाग यांनीं सांभाळला आहे. मुख्यतः यांची प्रसिद्धी पूर्वीहून त्यांनीं वंदेमातरम् गीत योग्य, साध्या व सोप्या स्वरांत बसवून दाखविल्यामुळें वाढली. त्यांच्या या कामगिरीबद्दल महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस-कमेटीनें गीताच्या चालीस मान्यता दिली व लोकशाही पक्षानें जरीची शाल देऊन त्यांचा गौरव केला. गायनावर नोटेशनदाखल कांहीं पुस्तकें त्यांनीं लिहिलीं आहेत. तीं–स्वयंवर, सावित्री, कान्होपात्रा, अमृतसिद्धी व याशिवाय स्वतंत्र अशीहि रचना केली आहे. ती मोहनमाळ भाग १ ला व रागसंग्रह हिंदी भाग १ ला. हीं दोन्हीं पुस्तकें सरकारनें टेक्स्ट बुक म्हणून मंजूरलीं

आहेत. यांचें गायनांतील प्राविण्य पाहून श्रीशंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) यांच्याकडून यांस 'संगीतकलानिधि' अशी पदवी देण्यांत आली आहे.

फेअर बँक्स, डग्लस (१८८३–):–हा अमेरिकन नट डेन्व्हर येथें ता. २३ मे १८८३ रोजीं जन्मला. त्याचें प्राथमिक शिक्षण त्याच्या जन्मस्थलींच झालें. पुढें कोलोर्डेरो स्कूल ऑफ माइन्स् या शिक्षणसंस्थेंत खाणी पाडण्याची विद्या (Mining) शिकला. न्यूयॉर्क येथील रंगभूमीवर त्यानें आपलें पहिलें पदार्पण १९०१ सालीं केलें. त्यानंतर तो संयुक्त संस्थानांत नाट्य मंडळा-बरोबर हिंडला. १९१४ सालच्या सुमारास तो चित्रपटक्षेत्रांत शिरला व त्या प्रान्तांत त्यानें मोठें यश मिळविलें. १९१६ पासून त्यानें आपलें स्वतःचेंच चित्रपटोत्पादन मंडळ चालविलें. जुलै ११, १९०७ रोजीं त्यानें अॅना बेथ सली ऑफ प्रॉव्हिडन्स इजशीं विवाह केला. पण १९१८ सालीं या विवाहाचें पर्यवसान घटस्फोटांत झालें. १९२० सालीं त्यानें मेरी पिकफोर्ड हिजशीं विवाह केला व त्याच वर्षी तो सपत्निक इंग्लंडला गेला. १७ वर्षांनंतर हें लग्नहि मोडलें. त्याचे कांहीं यशस्वी चित्रपट–मॉलीकॉडल (Molly Coddle); दि नट् (The nut); थ्री मस्केटीअर्स (Three Musketeers), रॉबिन हुड, थीफ ऑफ बगदाद, ब्लॅक पायरेट, मार्क ऑफ झोरो, गॉशो, आयर्न मास्क हें मूक चित्रपट व रीचिंग फॉर दि मून, प्रायव्हेट लाइफ ऑफ डॉन जुऑन हे बोलपट होत.

फेडरॅलिझम:–फेडरॅलिझम म्हणजे संयुक्त राज्यघटनेचीं तत्त्वें. अमेरिकेंतील संयुक्तसंस्थानांची राज्यघटना संयुक्तच आहे. हीं राज्यघटना संयुक्त राज्यघटनेचा नमुना म्हणून मानण्यांत येते. ही सर्व संस्थानें भौगोलिकदृष्ट्या एकमेकांस चिकटलेलीं असून एकाकाळीं अंतर्बाह्य स्वतंत्रराष्ट्रें होतीं. त्यांनीं आपली उन्नति व्हावी, आपल्या परराष्ट्रीय धोरणांत एकसूत्रीपणा असावा, परचक्रापासून आपलें संरक्षण व्हावें म्हणून एक खंबीर मध्यवर्ती सत्ता निर्माण करून त्या मध्यवर्ती सत्तेला आपले कांहीं बाबतींतले अधिकार दिले. मध्यवर्ती सत्तेकडे अर्थातच परराष्ट्रीय धोरण, सैन्य, आरमार यांसारखीं सर्व संस्थानांना साधारण अशी खातीं सोंपविण्यांत आलीं व स्थानिक महत्त्वाचीं अशीं खातीं ज्या त्या संस्थानाकडे ठेवण्याचें ठरलें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्या त्या संस्थानानें आपली अंतर्गत स्वायत्तता कायम ठेवून आपणच निर्माण केलेल्या मध्यवर्ती सरकाराकडे आपले कांहीं अधिकार सोंपविले. ही घटना अर्थातच संस्थानांनीं आपापसांत राजीखुषीनें करार करूनच अस्तित्वांत आणली आहे. अर्थातच ती रेखीव व काटेकोर (rigid) आहे; तींत लवचीकपणा बिलकूल नाहीं. अमेरिकन संयुक्त संस्थानांच्या या घटनेवरून संयुक्त घटनेचें विविध वैशिष्ट्य दिसून येतें.

(१) या घटनेचें स्वरूपच असें आहे कीं ती लेखगतच असली पाहिजे. त्यांत संयुक्त सरकारचे व त्यांच्या वेगवेगळया घटकांचे अधिकार व कार्यक्षेत्रें यांचा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे. अशा प्रकारच्या घटनेंत सरकार स्थिर व खंबीर रहावें म्हणून ती लेखगतच नव्हे तर कठीण असली पाहिजे; तींत लवचीकपणा असतां कामा नये.

(२) संयुक्त सरकार व त्याचे घटक यांच्यांत अधिकाराविषयीं खटका उडूं नये म्हणून त्यांच्या अधिकाराचे क्षेत्र शक्य तितकें स्पष्टपणें ठरले पाहिजे. ज्या बाबी सर्व संस्थानांना सामान्य आहेत व ज्यांच्या बाबतींत धोरणाची एकसूत्रता असणें अवश्य आहे, त्या बाबींसंबंधीं सत्ता संयुक्त सरकारकडे असली पाहिजे; व संयुक्त सरकारचे घटक असलेल्या प्रान्तांना अंतर्गत बाबीपुरतें पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे.

(३) संयुक्त घटनेंत फेडरल कोर्टाचे स्थान महत्त्वाचें आहे. संयुक्त सरकार व त्याचे घटक स्थानिक सरकारें यांच्या दरम्यान अधिकारासंबंधीं अनेक कटकटी निर्माण होण्याचा संभव असतो, त्या मिटविण्याकरितां व त्या दोघांकडून घटनेअन्वयें मिळालेल्या अधिकाराचें अतिक्रमण होऊं नये म्हणून सतत डोळयांत तेल घालून निरीक्षण करण्याकरितां फेडरल कोर्टाची आवश्यकता आहे.

(४) संयुक्त घटनेनें एक संयुक्त राष्ट्र निर्माण होतें. यांतील घटकांना एकाकाळीं राष्ट्राचा दर्जा असला तरी संयुक्त घटनेंत सामील झाल्यापासून त्या घटकांचें स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्व नाहींसें होतें. त्यांचें राष्ट्रीयत्त्व संयुक्त राष्ट्रांत विलीन होतें. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानचें नागरिकत्व त्यांतील घटक असणाऱ्या विशिष्ट संस्थानचा नागरीक म्हणूनच केवळ एखाद्याला मिळालेलें नसतें. संयुक्त सरकारचे घटकांचे दरम्यान युद्ध सुरू झालें कीं ती यादवी होईल, आंतर-

राष्ट्रीय युद्ध नव्हे. अमेरिकेंतील संस्थानांनीं निर्माण केलेली 'संयुक्त संस्थानें' हें राष्ट्र कमल, व त्यांत सामील झालेलीं संस्थानें हीं त्याच्या पाकळ्या होत.

वर सांगितलेल्या तत्त्वानुसार बनलेली घटना ही संयुक्त घटना अथवा फेडरेशन होय. निरनिराळीं राष्ट्रें आपलें राष्ट्रीयत्व कायम ठेवून राजकीय व आर्थिक सोईसाठीं एकजूट करतात. त्या जुटीला कॉनफेडरेशन म्हणतात. यांत मध्यवर्ती विधिमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायालय या गोष्टी नसतात; कारण मध्यवर्ती अशी सत्ताच नसते. कांहीं राष्ट्रांनीं राजकीय कारणाकरितां ही मैत्री जोडलेली असते इतकेंच.

१९३५ सालच्या पार्लमेंटनें केलेल्या सुधारणाकायद्यानें हिंदुस्थानांत संयुक्त अथवा फेडरल घटना स्थापण्याची योजना केलेली आहे. त्या कायद्यानें ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रान्तांना स्वायत्तता देऊन हिंदी संस्थानें व ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रान्त यांचें संयुक्त सरकार बनविण्याची योजना केलेली आहे; या घटनेअन्वयें अस्तित्वांत येणाऱ्या मध्यवर्ती अथवा संयुक्त सरकारांत द्विदल राज्यपद्धति निर्माण व्हावयाची आहे. ही घटना सर्वस्वीं दोषपूर्ण म्हणून असमाधानकारक आहे असें देशांतील सर्व राजकीय पक्षांचें मत आहे.

ही घटना फेडरल स्वरूपाची असली तरी ते फेडरेशन संपूर्णतया सदोष आहे. त्यांतील प्रमुख दोष येणेप्रमाणें:-(१) ही घटना पूर्णपणें स्वतंत्र अशा वेगवेगळ्या देशांनीं करार करून बनविलेली नसून, ती हिंदुस्थानावर राज्य करणाऱ्या ब्रिटिश पार्लमेंटनें बनविली आहे. (२) संयुक्त घटनेंत सर्वहि घटकांना अंतर्गत स्वायत्तता असते. प्रस्तुत घटना ही स्वायत्त प्रान्त व परतंत्र संस्थानें यांची बनविलेली आहे. संस्थानी प्रजेला या घटनेंत स्थान नाहीं. (३) गव्हर्नरांना खास अधिकार दिल्यामुळें प्राचीन स्वायत्तताहि संपूर्णतः मिळाली असें म्हणतां येत नाहीं. गव्हर्नर आपल्या खास अधिकारांचा उपयोग न करतील तर कांहीं अंशीं प्रान्तांना स्वायत्तता भोगतां येईल. सनदी नोकरांच्या पगारासारख्या कांहीं बाबींवर प्रान्तिक मंत्र्याची हुकमत चालत नाहीं. या दृष्टीनेंहि प्रान्तिक स्वायत्तता दोषपूर्ण आहे. (४) मध्यवर्ती सरकारांत द्विदल राज्यपद्धति निर्माण केल्यामुळें सैन्य, परराष्ट्रीय धोरण वगैरे राखीव बाबीपुरतें देशाला स्वातंत्र्य मुळींच मिळालें नाहीं. सोपीव खात्याबाबतींतही गव्हर्नर जनरलला खास अधिकार देऊन हस्तक्षेप करण्यास वाव दिला आहे. यामुळें देशाला या घटनेनें स्वातंत्र्य मिळेल असें नाहीं. (५) या घटनेंत स्वयंविकासाला वाव नाहीं. (६) फेडरल असेम्ब्लींत मुसलमानांना व संस्था-निकांना त्यांच्या संख्येच्या मानानें प्रमाणाबाहेर जागा दिलेल्या आहेत.

फेफरें:-या विकारांत विशेष कांहीं कारण न दिसतां एकाएकीं अकस्मात् बेशुद्धावस्था येतें व त्यावेळीं सर्व शरीरांत जोराचा कंपहि केव्हां केव्हां चालू असतो. फेफऱ्याची बेशुद्धावस्था जेव्हां अत्यल्प असते तेव्हां त्यास 'फेफरें' म्हणतात, व 'मोठें फेफरें' म्हणजे जोरांत कंप होऊन बेशुद्धपणा येणें.

लक्षणें—मोठ्या फेफऱ्याची जी अवस्था असते ती येण्यापूर्वी अर्धा एक दिवस प्राथमिक चिन्हें म्हणजे कपाळ दुखणें, घेरी येणें, अनुत्साह असणें व वृत्तींतच कांहीं फेरफार होणें. हीं लक्षणें शेंकडा सुमारें ५० रोग्यांत आढळतात. इतरांत हीं पूर्वलक्षणें मुळींच नसतात. कित्येक रोग्यांत फिट् येण्यापूर्वी तात्कालिक इषारावजा कांहीं लक्षणें घडतात. उदाहरणार्थ अंगभर क्षणिक मुंग्या आल्यासारखें वाटणें, डोळ्यापुढें प्रकाश चमकल्यासारखा वाटणें, कानांत कांहीं स्वर ऐकूं येतातसें वाटणें. ह्या फक्त रोग्यासच कळणाऱ्या भावना होत. केव्हां केव्हां दृश्य लक्षणें होतात. तेव्हां एकादाच स्नायु, किंवा हात, पाय वगैरे एकादा अवयव हालूं लागतो, अगर रोगी एकदम पळतो किंवा गरगर फिरतो. केव्हां केव्हां रोग्यास फिट येण्यापूर्वी कांहीं विलक्षण भास होतात. कधीं कधीं पोट दुखणें, मळमळणें वगैरेसारखीं मानसिक वा शारीरिक लक्षणें फेफरें येणार अशी सूचना देतात. नंतर बेशुद्धपणा येतो आणि शरीरांतील सर्व स्नायु एकदम ताठतात व सुमारें ४० सेकंदांनीं सर्व अंग भयंकर हालतें. श्वासास अवरोध होतो व चेहरा निळसर होतो. जीभ दांतांत सांपडून चावली जाते. यासाठीं तात्काळ तोंडांत दांतांच्या दरम्यान कांहीं पदार्थ, चाकूची मूठ, शिसपेन, वगैरेसारखा प्रसंगावधान राखून घातल्यास जिभेस जखम होणार नाहीं. या फिट्नंतर श्वासोच्छ्वास घोरल्यासारखा होतो. मलमूत्र विसर्जन नकळत केव्हां केव्हां घडतें. तोंडांत लाळ व फेस सांठतो. नंतर ग्लानि येऊन गाढ झोंपहि लागते, तींत केव्हां केव्हां ताप १०४°पर्यंत चढलेला असतो. फिट् येऊन गेल्या-

नंतरच्या अवस्थेंत बेसावधपणें रोग्याकडून कांहीं विलक्षण हालचाली व क्रिया घडूं शकतात, उदाहरणार्थ कपडे चढविणें अगर टाकून देऊन नग्न होणें, कांहीं बोलणें किंवा करणें, एकादे वेळेस दुसऱ्यास ठार मारावयास धांवणें किंवा क्वचित् आत्महत्त्या करणें. या गोष्टी करतांना त्यास कांहींच भान नसतें. केव्हां केव्हां फिट्चें वेडांतहि रूपांतर होतें.

हिस्टीरिया फिट्पासून किंवा बतावणी केलेल्या खोट्या फिट्पासून फेफऱ्याची खरी फिट् ओळखून काढावी लागते. हिटेरिया फिट् सावकाश हळूंहळूं येते. फेफरें एकदम येतें. हिस्टेरियांत आरंभीं केव्हां केव्हां रडें येतें. फेफऱ्यांत रोगी एकच भयंकर किंकाळी देतो. हिस्टेरियांत जीभ चावत नाहीं किंवा फिट येतांना शरीरास इजा होत नाहीं. फेफऱ्यांत दोन्हीं होऊं शकतात हिस्टेरियांत बेशुद्धपणा नसतो किंवा अपूर्ण असतो. फेफऱ्यांत हटकून पूर्ण बेशुद्धता असते. फेफऱ्याची फिट् ३।४ मिनिटांवर टिकत नाहीं. हिस्टेरियाची फिट् हळूंहळूं वाढत जाते व अर्धाअर्धा तासहि राहते. फेफऱ्यांत फिट्नंतर गाढ ग्लानी किंवा झोंप येते. हिस्टेरियांत रोगी हंसेल, रडेल, हुंदके देईल किंवा निःशक्त होऊन पडेल. फिट्चें सोंग घेण्यांत मात्र कांहीं कपट असतें. चेहरा निळा होत नाहीं. बेशुद्धता नसते. मलमूत्रविसर्जन होत नाहीं. जीभ चावली जात नाहीं. बुबुळास स्पर्श केला तर डोळा मिटतो. नंतर गाढ निद्रा नसते. या लक्षणांवरून खोटी फिट् कोणती तें ओखतां येईल.

फेफरें येण्यास बहुधा वयाच्या १४ व्या वर्षाच्या आंत सुरवात होते. स्त्री, पुरुष यांना बहुधा सारख्या मानानेंच हा विकार जडतो. विकाराची अनुवंशिकता फार असते. भीति, अपघात, हर्षशोकातिरेक इत्यादिकांमुळें फिट् येण्यास निमित्त घडतें. **उपाय**–चांगल्या तज्ज्ञाच्या सल्ल्यानें उपाययोजना करावी. आमोनिअम ब्रोमाइड रोज २० ते ४० ग्रेन देऊन तें प्रमाण ६० ग्रेनपर्यंत वाढवावें. त्याबरोबर टिंक्चर नक्स व्हॉमिका ५ ते १५ थेंब द्यावें म्हणजे ब्रोमाइड्चे वाईट परिणाम होणार नाहींत. हा उपचार पुष्कळ काळ चालूं ठेवला पाहिजे. रोजच्या क्रमांत नियमितता ठेवावी. कोठा ठराविक दिवसांनीं रेचक घेऊन साफ ठेवावा. फिट्चें स्वरूप भयंकर असल्यास क्लोरोफॉर्म अमाइल नायट्रस वगैरे गुंगीचीं औषधें हुंगावयास देऊन फिट् कमी करणें आवश्यक होतें.

आयुर्वेदिक उपाय–पंचकोल, मिरें, त्रिफळा, बिडलोण, सेंधेलोण, वावडिंग, पिपळी, धणे, जिरें, ओवा या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें व तें ऊन पाण्याबरोबर दिवसांतून तीन वेळ द्यावें. वरील चूर्णाला कल्याणचूर्ण म्हणतात.

फेब्रुवारी:–हा इंग्रजी वर्षाचा दुसरा महिना आहे. प्राचीन रोमन लोक १५ फेब्रुवारी हा 'शुद्धिदिन' (Day of purification) म्हणून पाळीत. २ फेब्रुवारी हा दिवसहि ख्रिस्मसनंतर चाळीसावा दिवस असल्यानें कुमारिका मेरी (Virgin Mary) हिचें प्रीत्यर्थ ख्रिश्चन लोक 'शुद्धिदिन' म्हणून त्या दिवशीं उत्सव करतात. या दिनाला Candlemas Day असेंहि संबोधतात. १४ फेब्रुवारीस 'सेंट व्हॅलेन्टाइनची जयंती' म्हणूनहि उत्सव करतात. या शुद्धिदिनावरून फेब्रुवारीस 'फेब्रुवारी' हें नांव प्राप्त झालें आहे. यांतील मूळ शद्ब 'फेब्रुआ' (Februa) म्हणजे शुद्धिदिनाचा उत्सव (Lupercalia) असा आहे. त्यावरून यास फेब्रुवारी असें म्हणूं लागले.

फेब्रुवारी महिन्याच्या दिवसाचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. मूळ रोमन वर्ष मार्चपासून सुरू होत होतें. तेव्हां वर्षाचे महिने दहाच होते व फेब्रुवारी हा त्यांत महिनाच नव्हता. न्युमा पॉंपीलिअसनें जानेवारी व फेब्रुवारी हे दोन महिने वाढविले. त्यावेळीं फेब्रुवारीचे दिवस २९ होते व तो वर्षाचा शेवटचा महिना होता. ख्रि. स. पू. ४६ या वर्षी ज्युलियस सीझरनें कॅलेंडरची सुधारणा केली व फेब्रुवारीचें दिवस लीप वर्षाला ३० व इतरवर्षी २९ ठरविले. पुढें रोमन बादशहा ऑगस्टस यानें ऑगष्ट हा महिना आपल्या नांवाचा असल्यानें त्याचे दिवस ३१ केले व फेब्रुवारीचे दरवर्षी २८ व लीप वर्षी २९ केले. याप्रमाणें लीपवर्षाचा एक जादा दिवस कॅलेंडरचे मोजणींत येऊं लागल्यानें दरवर्षी सौरमानापेक्षां ११३/४ मिनिटांनीं वर्ष लांबू लागलें व १२८ वर्षांत एक दिवसाची वाढ होऊं लागली. म्हणून इ. स. १५८२ सालीं पोप ग्रेगरीनें पुन्हां सुधारणा करून दर चार वर्षांनीं येणारे वर्ष लीपवर्ष मानून त्यावेळीं फेब्रुवारीचे २९ दिवस धरावे व वर्ष ३६६ दिवसाचें मोजावें असें ठरविलें. पण दर शतकाचें शेवटचें वर्ष लीप असूनहि तें ३६५ च दिवसाचें मानावयाचें व त्यावर्षी फेब्रुवारीचे दिवस २८ च धरावयाचे, व या हिशेबानेंसुद्धां

शिल्लक राहणारा फरक भरून काढण्यासाठीं दर चार शतकांनीं येणारें शेवटचें वर्ष लीपवर्ष मानावयाचें असें ठरविलें. या सुधारणेंप्रमाणें हल्लीं फेब्रुवारीचे दिवस मोजले जातात.

फेब्रुवारी महिन्याचे आरंभीं उत्तरायण होऊन पांच आठवडे पूर्ण झालेले असतात व दिवस हळूंहळूं मोठा होऊं लागतो. यामुळें जानेवारीमध्यें उत्तर गोलार्धांत भासणारी कडक थंडी आतां हळूंहळूं ओसरूं लागते व वसंतऋतूची छाया हळूंहळूं सृष्टीवर पसरूं लागते. वसंतागमनामुळें हवेंतील हिमतुषार वितळूं लागून कांहीं भागांत थोडथोडा पाऊसहि पडतो. इंग्लंड व पश्चिम युरोपांतील शेतकरी या महिन्यास या कारणानें 'ओला महिना' Wet month व "February fill-dyke" या नांवानें संबोधतात. त्यांना तो फार आवडतो. बर्फानें आच्छादलेलीं झाडें व वेली, बर्फ वितळूं लागल्यानें पानाफुलांनीं युक्त होऊं लागतात. या महिन्यांत हिंदूंचा पौष व माघ महिना बहुधा येतो म्हणून त्या महिन्यांतील संक्रांतीसारखे सण व वसंतोत्सवासारखे उत्सव हिंदुलोक करतात. (पौष व माघ पहा).

चार्लस डिकन्स, थॉमस् एडिसन, चार्लस् लँब, गॅलिलिओ, कोपरनिकस, जॉर्ज वॉशिंग्टन, जेम्स रसेल लॉवेल, हेन्री लाँगफेलो इत्यादि शास्त्रज्ञ, कवि, लेखक वगैरे थोरथोर व्यक्तींचा जन्म व राणी व्हिक्टोरियाचें ऑलबर्टशीं लग्न, सुवेज कालव्याचे उद्‌घाटन हे महत्वाचे समारंभ या महिन्यांतच झाले.

फोटोग्राफी:—फोटोग्राफी आजच्या दर्जास येईपर्यंत होऊन गेलेल्या संशोधकांची संख्या सांगणें जवळ जवळ अशक्य आहे. कॅमेऱ्याच्या मूलतत्त्वांचा अगदीं पहिला व पुसट उल्लेख इ. स. १००० मध्यें अरब तत्त्ववेत्ता आल हासन ह्याच्या लिखाणांत सांपडतो. एका रात्रीं कोणा एका प्रश्नासंबंधीं विचार करीत असतांना आल हासनला निजण्यास बराच उशीर झाला. दुसऱ्या दिवशीं सूर्य बराच वर येईपर्यंत तो उठला नव्हता. निजण्याच्या खोलींत सूर्यप्रकाश येऊन त्याची झोपमोड होऊं नये म्हणून त्याच्या घरच्या माणसांनीं खोलीचीं रस्त्याकडील खिडक्यादारें बंद करून ठेविलीं होतीं. एका दारास मात्र एक अगदीं सूक्ष्म छिद्र असल्यानें, बाहेरील वस्तूपासून परावर्तन पावलेलीं प्रकाशकिरणें तेथून आंत शिरत होतीं, आणि त्यामुळें पलिकडील पांढऱ्या भिंतीवर रस्त्यावरील देखाव्याचें हुबेहुब रंगीत उलटें चित्र दिसत होतें. जागा झाल्यावर हा चमत्कार पाहून आल हासन ह्यास मोठें आश्चर्य वाटलें व आपला हा अनुभव त्यानें लिहून ठेवला. (अशा रीतीनें बंद जागेंत वा पेटींत जी प्रतिमा दिसते त्यास कॅमेरा ऑब्स्क्यूरा म्हणतात.) हा अनुभव लिहून ठेवण्यापलीकडे आल हासननें ह्या बाबतींत पुढें कांहीं कार्य केलें नाहीं. पुढील संशोधकांनीं मात्र कॅमेरा आब्स्क्यूऱ्यांत पुष्कळ सुधारणा करून त्याचा प्रत्यक्ष उपयोग करून घेतला.

एखाद्या देखाव्याचें चित्र, तो प्रत्यक्ष पाहून काढण्यापेक्षां, कॅमेरा ऑब्स्क्यूराच्या मागील सपाट पृष्ठभागावर पडलेलें चित्र पाहून काढणें अधिक सोपें असल्यानें, चित्रकारांना त्याचा फार उपयोग झाला. सुप्रसिद्ध इटालियन चित्रकार, गणिती व शास्त्रज्ञ लिओनार्डो डा व्हिन्सी, यानें सोळाव्या शतकांत परस्पेक्टिव्हचीं मूलतत्त्वें ठरवितांना कॅमेरा ऑब्स्क्यूराची मदत घेतली होती. ह्या काळापर्यंत प्रकाशकिरणें आंत घेण्यासाठीं पुढीलभागीं एक सूक्ष्म छिद्रच असल्यानें कॅमेरा ऑब्स्क्यूऱ्यांतील चित्र फार अंधुक दिसे. इ. स. १५६० मध्यें बॅपटिस्टा पोर्टा ह्या दुसऱ्या एका इटालियनानें छिद्राऐवजीं कांचेचें लेन्स वापरल्यानें मागील चित्र पुष्कळच स्पष्ट दिसूं लागलें.

१८०२ सालीं टॉम वेजवुड ह्या इंग्लिश संशोधकानें सिल्व्हर नायट्रेटवरील सूर्यप्रकाशाच्या क्रियेनें वाळलेलीं पानें व फुलपांखरांचे पंख ह्यांचें करून दाखविलेलें चित्रीकरण हीच फोटोग्राफीची अगदीं पहिली व खरी कल्पना आहे. वेजवुडच्या अशा चित्रांतील प्रकाशाचा परिणाम न झालेलें सिल्व्हर नायट्रेटहि पुढें प्रकाशाच्या परिणामानें काळें पडल्यानें चित्र हळूं हळूं दिसेनासें होई. त्यावेळीं त्याच्या या कल्पनेकडे कोणीहि फारसें लक्ष दिलें नाहीं. यानंतर १८१५ सालीं, निपसे ह्या फ्रेंच संशोधकानें, शॅलॉन येथें, सिल्व्हर क्लोराइड लावलेल्या एका पत्र्याच्या तुकड्यावर, कॅमेरा ऑब्स्क्यूऱ्यानें अनेक पदार्थांचें चित्रीकरण केलें. यानंतर ॲशफाल्ट हा पदार्थ प्रकाशाचा परिणाम झाल्यावर अविद्राव्य होतो ह्या तत्त्वावर त्यानें आपल्या पुढील संशोधनाची दिशा ठरविली. लव्हेंडर तेल व ॲशफाल्ट यांचें मिश्रण एका पत्र्याच्या तुकड्यावर लावून, कॅमेरा ऑब्स्क्यूराच्या मागें तो बसवून कितीतरी

तास प्रकाशाचा परिणाम त्यावर होऊं दिल्यानंतर अर्थातच ॲशफाल्टचा कांहीं भाग अविद्राव्य होई. प्रकाशांचा परिणाम न झालेलें म्हणजे चित्रीकरणास आतां अनावश्यक असलेलें ॲशफाल्ट, तो पत्र्याचा तुकडा, लव्हेंडर तेल व पेट्रोलियमच्या मिश्रणांत बुडवल्यावर विरघळून जाई. मग आम्ललेखनानंतर (Acid etching) प्रकाशाचा कमी परिणाम झालेल्या भागांतील धातू योग्य प्रमाणांत खाली गेल्यानें निपसे ह्यास त्या मूळ पत्र्यावरून प्रती छापतां येत असत. येथपर्यंत प्रयोग येईपर्यंत १८२२ साल उजाडलें.

वर लिहिल्याप्रमाणें निपसेचे प्रयोग चालू असतांना, डागुरे ह्या दुसऱ्या फ्रेंच संशोधकाचे प्रयोग, सिल्व्हर आयोडाइड वापरून, पारिस येथें सुरू होते. पण म्हणण्यासारखी प्रगती मात्र नव्हती. डागुरे धंद्यानें चित्रकार असून नाटकाचे पडदे व देखावे रंगविण्यांत फार कुशल होता. फोटोग्राफीच्या त्याच्या ध्यासानें त्याच्या पत्नीनें तर त्यास जवळ जवळ वेडाच ठरविलें होतें. स्वतः केलेले सर्व प्रयोग फुकट गेलेले पाहून शेवटीं १८२६ सालीं त्यानें निपसे ह्यास दोघांनीं आपापले प्रयोग एकमेकांस सांगून पुढील संशोधन जोडीनें करण्याविषयीं पत्रानें विनंति केली. पण या गोष्टीस निपसे यानें २३ वर्षेपर्यंत संमति दिलीच नाहीं. नंतर १८२९ सालीं मात्र त्यानें डागुरेच्या म्हणण्यास संमती दिली. तेव्हां डागुरे त्वरेनें शॅलॉन येथें आला व तेथेंच त्यांचें जोडीनें संशोधन करण्याचें व भागीदारीचें करारपत्र झालें. दोघांनींहि आपापले प्रयोग व अनुभव एकमेकांस सांगितले. पण डागुरेच्या प्रयोगांत म्हणण्यासारखें कांहीं नव्हतेंच. सिल्व्हर आयोडाइड वापरून व प्रयोग करून पाहण्याबद्दल निपसेला डागुरेनें केलेल्या सूचनेपलीकडे ह्या भागीदारींत कांहींच निष्पन्न झालें नाहीं. पुढें १८३३ सालीं वयाच्या ६९ व्या वर्षी निपसे मरण पावला.

डागुरेचे स्वतःचे प्रयोग अजून चालू होतेच. पण वारंवार मिळणाऱ्या अपयशामुळें तो अगदीं निराश मनस्थितींत असतांनाच एक दैवघटित गोष्ट त्याच्या मदतीस आली. कॅमेरा आब्स्क्यूरानें सिल्व्हर आयोडाइड प्लेटवर घेतलेलीं कांहीं चित्रें कुचकामाचीं म्हणून त्यानें एका बंद कपाटांत ठेवलीं होतीं. त्याच कपाटांत असलेली पाऱ्याची एक बाटली न कळत फुटल्यानें पाऱ्याच्या धूपानें सिल्व्हर आयोडाइड प्लेटवरील चित्र त्यावर पाऱ्याचा पातळ थर बसून अगदीं स्पष्ट व सुंदर दिसूं लागलें. इतके दिवसांच्या परिश्रमाचें फळ डागुरे ह्यास अशा प्रकारें मिळालें. अजून प्लेटमध्यें उरलेलें व नको असलेलें सिल्व्हर आयोडाइड नाहींसें करण्याचा मार्ग जरी डागुरे यास सांपडला नव्हता तरी आणखी दोन वर्षांनंतर १८३७ मध्यें साधें मीठ व उष्ण पाण्याच्या मिश्रणांत प्लेट बुडविल्यानें नको असलेलें सिल्व्हर आयोडाइड नाहींसें होतें असें त्यास आढळून आलें. पुढें १८३९ मध्यें सर जॉन हर्षलनें लावलेल्या सोडियम हायपो सल्फाइट (ज्यास आपण हल्लीं नेहमींच्या भाषेंत हायपो म्हणतो) ह्या पदार्थाच्या शोधानंतर, डागुरेनें चित्र कायम करण्यासाठीं त्याचाच उपयोग करण्यास सुरवात केली.

डागुरेच्या चित्रलेखन पद्धतीस **डागुरेओटाइप** हें नांव पडलें व त्यामुळें त्याचा जो बोलबाला झाला त्याला फोटोग्राफीच्या इतिहासांत तुलनाच नाहीं. खुद्द फ्रेंच सरकारनें डागुरे ह्यास मोठें वर्षासन देऊन त्याचा शोध विकत घेतला व सर्व जगासाठीं प्रसिद्ध केला. युरोपमधील राजघराण्यांनीं त्याजवर बहुमानाचा व पदव्यांचा वर्षाव केला.

डागुरेओटाइप पद्धतीनें घेतलेले फोटो जरी फार सुंदर असत तरी सिल्व्हर आयोडाइड प्लेटवर सूर्यप्रकाशाचा हवा तेवढा परिणाम होण्यास फार वेळ लागत असल्यानें फोटो घेतल्या जाणाऱ्या माणसास वीस वीस मिनिटें न हालतां उन्हांत बसतांना जीव नकोसा होई; पण डागुरेओटाइप ही त्यावेळची फॅशन होती व फॅशनसाठीं कोण काय करणार नाहीं?

ह्यापुढील सुधारणा १८४१ सालीं फॉक्स टॅलबॉट ह्या इंग्लिश गृहस्थानें केली. सिल्व्हर आयोडाइडचें मिश्रण कागदावर लावून फोटो घेतल्यास तो अगदीं अंधुक असे; पण तोच कागद जर सिल्व्हर नायट्रेट व गॅलिक ॲसिड ह्यांच्या मिश्रणांत बुडवला तर चित्र अगदीं स्पष्ट होतें असें त्यास अनेक प्रयोगाअंतीं आढळून आलें. ह्या अदृश्य चित्र स्पष्ट करण्याच्या क्रियेलाच आतां आपण डेव्हलपिंग म्हणतों. वरील शोधाशिवाय फॉक्स टॅलबॉटनें पहिल्यानें निगेटिव्ह तयार करून तिजवरून मग पॉझिटिव्ह छापण्याचा आणखी एक महत्त्वाचा शोध लावला. निगेटिव्हमध्यें, फोटो घेतलेल्या वस्तूचे काळे दिसणारे भाग पांढरे असतात व पांढरे दिसणारे काळे असतात.

निगेटिव्हवरून फोटोची प्रत म्हणजे पॉझिटिव्ह छापतांना मात्र काळ्या भागांतून प्रकाश न गेल्यानें पॉझिटिव्हमध्यें पांढरा राहतो व तो पांढऱ्या भागांतून प्रकाश सहज गेल्यानें पॉझिटिव्हमध्यें तो काळा होतो व अशाप्रकारें आंपणास अगदीं यथातथ्य दिसणारा फोटो मिळतो. आजहि आपण हीच निगेटिव्ह पॉझिटिव्ह पद्धतच वापरीत असल्यानें टॅलबॉटचा हा शोध फार महत्त्वाचा आहे. त्यानें ह्या पद्धतीस कॅलोटाइप हें नांव देऊन ती बाजारांत मांडली. ह्याच सुमारास जे. बी. रीड यानें तयार केलेलें प्लेटवर लावण्याचें अधिक प्रकाशग्राही मिश्रण व पेट्झ्वाल ह्याचें नवीन वेगवान पोर्टरेट लेन्स, ह्या दोन नवीन साधनांमुळें फोटोग्राफीचा धंदा जिकडे तिकडे सुरू झाला.

१८५१ पर्यंत म्हणजे सुमारें दहा वर्षें फोटोग्राफी याप्रमाणें चालू असतांना फ्रेडरिक स्कॉट आर्चर ह्या इंग्लिश मूर्तिकारानें लावलेल्या ओल्या कलोडियनच्या शोधामुळें मोठी उलथापालथ होऊन फोटोग्राफीचा पुढील जवळ जवळ तीस वर्षांचा मार्ग निश्चित झाला. शनबाइन ह्या स्विस् रसायनशास्त्रज्ञानें १८४६ मध्यें शोधून काढलेले पायरोक्सिलिन किंवा नायट्रो कॉटन हाच आर्चरच्या ओल्या कलोडियन पद्धतीचा पाया होय. त्यानें पहिल्यानें अल्कोहोल व ईथरच्या मिश्रणांत पायरोक्सिलिन् विरघळवून मग त्यांत आयोडाइड मिसळून तें मिश्रण कांचेवर लावलें. कांहीं वेळानें अल्कोहोल व ईथर उडून गेल्यानें एक पारदर्शक थर कांचेवर राहिला. नंतर ही कांच द्रवस्थितींत असलेल्या सिल्व्हर नायट्रेटमध्यें बुडविल्यावर ती सिल्व्हर आयोडाइडयुक्त झाली. ओली असतांनाच तिजवर फोटो घेऊन, पायरो गॅलिक ॲसिडमध्यें ती डेव्हलप करून हायपोमध्यें कांहीं वेळ बुडविल्यावर तिजवरील चित्र कायम झालें. आर्चरची वेट कलोडियन प्लेट, आजच्या प्लेटसच्या मानानें पाहिलें असतां जरी मुळींच वेगवान नसली तरी तिची प्रकाशग्राहकता (Sensitivity) त्यावेळीं आश्चर्य वाटण्यासारखी होती. त्याच कारणामुळें, अंधारांत प्लेट तयार करण्यासाठीं लागणारा काळा तंबू, ओली असतांनाच तिजवर फोटो घेऊन झाल्याबरोबर डेव्हलपिंगची आवश्यकता वगैरे अनेक गैरसोयी लोकांनीं मुकाट्यानें सहन केल्या. त्यावेळच्या फोटोग्राफरला अर्धा पाऊण मण वजनाचें सामान नेहमीं बरोबर वागवावें लागत असे; कारण ओली कलोडियन प्लेट फोटो घेण्यापूर्वी वाळू दिल्यास तिजमधील रुप्याच्या क्षाराचे स्फटिक पडून ती अगदीं निरुपयोगी होत असे, व ह्या कारणामुळें फोटो घेण्यापूर्वी थोडा वेळच ती तयार करावी लागे.

१८७१ सालीं डॉक्टर मॅडॉक्स यानें शोधून काढलेल्या जिलेटिन इमल्शनमुळें वेट कलोडियन पद्धतीची भानगड व त्रास अजीबात नाहींसा झाला. रुप्याचा क्षार जिलेटिनमध्यें स्फटिक न पडतां वाळतो हें तत्त्व डॉक्टर मॅडॉक्सच्या शोधाचा पाया आहे. सुरवातीस तयार जिलेटिन इमल्शनच वाळलेल्या स्थितींत विकलें जाई व फोटोग्राफर स्वतःच तें कढत पाण्यांत वितळवून कांचेच्या तुकड्यावर लावून जरूरीप्रमाणें प्लेटस् तयार करीत. पुढें १८७७ च्या सुमारास अगदीं तयार वाळलेल्या प्लेटस् (Dry plates) बाजारांत मिळूं लागल्यानें हौशी फोटोग्राफरांचा वर्ग हळूं हळूं वाढूं लागला.

काचेचें वजन व ती फुटण्याची भीती, हें दोन अडथळे, सर्वसाधारण लोकांत फोटोग्राफीचा प्रसार होण्याच्या मार्गांत अजूनही होते. १८८८ च्या सुमारास, कोडाक कंपनीचा संस्थापक जॉर्ज ईस्टमन ह्यानें सेल्युलॉइडचा शोध लावल्यावर रोल फिल्म प्रचारात आली आणि मग सर्व जगभर फोटोग्राफीचा झपाट्यानें प्रसार होऊन "तुम्ही नुसतें बटण दाबा, पुढचें सर्व आम्ही करतो" (You press the button, we do the rest) ही कोडाक कंपनीची सुप्रसिद्ध म्हण जगभर झाली. भर उजेडांत फिल्म भरण्याचा कॅमेरा १८९८ सालीं बाजारांत आला आणि पुढें चारच वर्षांनीं घडी होणारा (Folding) आटोपशीर कॅमेरा तयार झाल्यावर, जगांतील सर्व सुधारलेल्या देशांत फोटोग्राफीचें स्थान अगदीं निश्चित झालें.

जिलेटिन इमल्शन (मिश्रण) पूर्णत्वास पोचल्यावर, संशोधक इतर अवश्य अशा सुधारणांकडे वळले. आतापर्यंतच्या सर्व प्लेटस् फक्त जांभळया व निळ्या रंगाच्या प्रकाशकिरणांच्या बाबतींतच प्रकाशग्राही असल्यानें पदार्थांचे इतर रंग फोटोंत जवळ जवळ काळेंच दिसत. १८७३ सालीं एच्. डब्ल्यू. फोगल ह्या बर्लिन येथील एका संशोधकानें एका विवक्षित रंगद्रव्यांत जिलेटिन इमल्शन प्लेट बुडविली असतां ती हिरव्या रंगाच्या प्रकाशकिरणांच्या बाबतींतही प्रकाशग्राही होते असा शोध लावून ऑर्थोक्रोमॅटिक फोटो-

ग्राफीचा पाया घातला. विसाव्या शतकाच्या सुरवातीस आयसोसायनाइन रंग द्रव्यांचा शोध लागल्यावर सर्व रंगांच्या प्रकाशकिरणांच्या बाबतींत प्रकाशग्राही असें पानक्रोमॅटिक इमल्शन तयार झालें. आज उपलब्ध असलेल्या सर्व रंगीत फोटोग्राफीच्या पद्धती पानक्रोमॅटिक इमल्शनमुळेंच शक्य झाल्या आहेत. क्लार्क मॅक्सवेल ह्या केंब्रिज येथील प्रोफेसरानें १८६१ मध्यें लाल, हिरवा व निळा ह्या तीन रंगाच्या उपयोगानें निसर्गातील कोणत्याही रंगाचा आभास उत्पन्न करतां येईल हें सिद्ध केल्यावर रंगीत फोटोग्राफीकडे संशोधकांचे लक्ष वेधलें. त्यावेळीं पानक्रोमॅटिक इमल्शन अस्तित्वांत नसल्यानें हीं संशोधने फारशीं यशस्वीं झाली नाहींत. लुई ड्यूका डू हरान ह्या फ्रेंच संशोधकानें १८६९ सालीं प्रसिद्ध केलेल्या एका पुस्तकांत, आज चालू असलेल्या बहुतेक सर्व रंगीत फोटोग्राफीच्या पद्धतींचीं मूलतत्त्वें दिलीं आहेत. त्यावेळचीं साधनें फारच तुटपुंजी असल्यानें त्याला स्वतःला मात्र फारसें कार्य करून दाखवितां आलें नाहीं. "अयशस्वी संशोधकासारखा दुर्दैवी प्राणी जगांत कोणीच नसतो" ही म्हण त्याच्या बाबतींत अक्षरशः खरी ठरून लुई ड्यूका डू हरान ह्यास आपल्या आयुष्याचा संधिकाल, अत्यंत गरीबींत फ्रेंच सरकारनें दिलेल्या २५ पौंडाच्या पेन्शनवर काढावा लागला.

विसाव्या शतकाच्या सुरवातींतच फोटोग्राफीच्या मालाचे मोठे कारखाने ठिकठिकाणीं निघाल्यानें, संशोधन व्यक्तिशः कमी प्रमाणांत होऊन, कारखान्यांतील प्रयोग शाळांतच पद्धतशीरपणें सुरू झालें. अमेरिकेंत कोडाक, जर्मनींत आगफा, इंग्लंडमध्यें इलफोर्ड, फ्रान्समध्यें लुमियर वगैरे कंपन्यांचीं संशोधनें मोठ्या प्रमाणांत सुरू झाल्यानें रंगीत फोटोग्राफीहि पुष्कळच यशस्वी झाली आहे. कोडाक्रोम, आगफाकलर, डुफेकलर, ऑटोक्रोम ह्या रंगीत चित्रीकरणाच्या पद्धती आज सर्वश्रुत आहेत. कागदावर रंगीत प्रती छापण्याची एकहि सोपी पद्धत मात्र अजून अस्तित्वांत नाहीं.

थोडक्यांत, फोटोग्राफीचा आजपर्यंतचा इतिहास असा आहे. संशोधकांचीं आणखी किती तरी नांवें स्थलाभावामुळें येथें देतां येणें शक्य नाहीं. फक्त हर्टर व ड्रिफिल्ड ह्या दोघां संशोधकांनीं १८९१ सालीं ड्राय प्लेट इमल्शनच्या गुणधर्मांचें अतिशय कसोशीनें केलेलें निरीक्षण, ह्या गोष्टीचा उल्लेख करणें अवश्य आहे. ह्या दोघांच्या संशोधनामुळें, प्लेटच्या गुणधर्मांची संख्यारूपानें मोजणी करणें शक्य झाल्यानें, पूर्वींच्या केवळ अनुमानाच्या कल्पना ढासळून पडून, फोटोग्राफी पूर्णपणें शास्त्रीय पायावर उभी राहिली. हर्टर व ड्रिफील्ड हीं नांवें फोटोग्राफीच्या इतिहासांत अमर राहतील.

प्रत्यक्ष कॅमेऱ्याच्या रचनेसंबंधीं व कार्यासंबंधींची उत्कृष्ट माहिती व्यावहारिक ज्ञानकोशाच्या पहिल्या भागांत २३४ ते २५१ या पृष्ठांमधून दिलेली आहेच. आतां प्रत्यक्ष फोटोग्राफी कशी करावयाची याविषयीची माहिती पुढें दिली आहे.

कॅमेऱ्याची निवड-सर्वांत महत्त्वाची गोष्ट कॅमेऱ्याची निवड करणें ही होय. बाजारांत अडीच रुपयापासून एक हजार रुपयापर्यंत कॅमेरे मिळतात. प्रत्येक कॅमेऱ्याची कार्यशक्ति, गुण आणि दोष वेगवेगळे. फोटोग्राफी केवळ हौस म्हणून शिकावयाची कीं धंदा हाच हेतु आहे हें आरंभीं पाहिलें पाहिजे व मग आपल्या गरजेनुसार बाजारांत असलेल्या निरनिराळ्या कॅमेऱ्यांची माहिती मागवून शक्य तर प्रत्यक्ष पाहून व अशक्य नसेल तर एखाद्या अनुभविक (धंदेवाईक मात्र नव्हे) माणसाचा सल्ला घेऊन मग कॅमेरा घ्यावा. कॅमेऱ्याची किंमत जितकी अधिक तितकी सोय, घडण, टिकाऊपणा, शटरचे वेग, लेन्सची कार्यक्षमता इत्यादि गुणांची भर पडावयाची हें निश्चित.

फोटो घेणें—कोणत्याहि वस्तूचा फोटो घेण्यापूर्वीं आपण वापरीत असलेल्या कॅमेऱ्याच्या लेन्सची, कॅमेऱ्यांत वापरावयाच्या फिल्मची, प्लेटची किंवा कांचेच्या वेगाची व रंगग्रहण वैशिष्ट्याची (Colour sensitivety) पूर्ण माहिती करून घ्यावी. केवळ्या प्रकाशांत किती एक्स्पोजर द्यावें हें सांगणारे फोटो एक्स्पोजर मीटर्स असेल तर बिनचूक किती एक्स्पोजर द्यावें हें सांगतां येतें, पण तें साधन नसेल तर इतर कोणत्याहि प्रकारच्या, आराखड्यांच्यावर अवलंबून राहण्यापेक्षां स्वतःच्या अनुभवानेंच शहाणें होणें चांगलें असतें. आरंभीं या बाबतींत एखाद्या तज्ञाकडून योग्य सूचना मात्र जरूर घ्याव्यात म्हणजे पुढें स्वतःला निश्चित विचार करायला सोपें जातें, नेहमीं फोटो घेतांना प्रकाश कसा आहे, फिल्मचा व लेन्सचा वेग काय आहे व कोणत्या वेळीं किती एक्स्पोजर दिलें होतें याची नोंद ठेवून निरनिराळ्या ठिकाणीं,

निरनिराळ्या प्रकारचे व निरनिराळ्या वेळीं फोटो घेतले म्हणजे थोड्याच दिवसांत कॅमेऱ्याचें शटर किती वेळ उघडें ठेवावें म्हणजेच एक्स्पोजर किती द्यावें याचा बरोबर अंदाज करतां येईल. संधिकालांत (सकाळीं किंवा संध्याकाळीं) प्रकाश जरी अंधुक वाटत असला तरी तो फोटोच्या दृष्टीनें भरपूर असतो हें लक्षांत ठेवावें. फोटो घेतांना कोणत्याहि प्रकारचे प्रकाशकिरण लेन्सवर पडणार नाहींत याची काळजी घ्यावी. फोकसिंग व्यवस्थित (चित्र स्पष्ट दिसणें) झाल्याशिवाय फोटो घेऊं नये. कोणत्याहि वस्तूचा फोटो घेण्यापूर्वी निरनिराळ्या बाजूनीं व अंतरावरून फोटो घेण्याच्या वस्तूकडे पाहून व कोठून आणि कसा फोटो घेतला असतां तो चांगला दिसेल याचा विचार करून फोटो घ्यावा. सूर्यप्रकाशापेक्षां विजेचा प्रकाश फिल्म्स अधिक लौकर ग्रहण करतात. अर्थात् अशा वेळीं एक्स्पोजर कमी द्यावें. उघड्यावरील (Out-door) फोटो घेतांना जर फोटोंत आकाश येणार असेल तर त्या वेळीं ढग किंवा आकाश उठून दिसण्यासाठीं अथवा इतर विशिष्ट रंगाच्या वस्तू उठून दिसण्यासाठीं फिल्टर्स (Filters)चा उपयोग करतात. कोणतेंहि फिल्टर वापरलें तरी त्या फिल्टरच्या रंगाच्या गर्दपणाच्या प्रमाणांत अधिक एक्स्पोजर द्यावें लागतें. तेव्हां त्यासंबंधींची पूर्ण माहिती करून घ्यावी. याशिवाय पोर्ट्रेट लेन्स, टेलिफोटो लेन्स इ. प्रकारच्या जोड लेन्सचा उपयोग विशिष्ट वेळीं करतां येतो त्यांचीहि माहिती घेऊन जरूर तेव्हां त्यांचा उपयोग करावा.

फोटो घेतल्यानंतरची मुख्य व महत्त्वाची क्रिया म्हणजे घेतलेली निगेटिव्ह डेव्हलप करणें. निगेटिव्ह डेव्हलप करण्यासाठीं कोणतो रसायनें किती प्रमाणांत वापरायचीं वगैरेची माहिती प्रत्येक फिल्मबरोबर मिळते. निरनिराळ्या कारखानदारांच्या निरनिराळ्या सूचना असतात. त्यांतली कोणतीहि अंमलांत आणली तरी हरकत नाहीं; प्रत्येक फिल्म, प्लेट किंवा कांच डेव्हलप करावयास कमी अधिक वेळ लागतो. डेव्हलपिंग पूर्ण काळोखांतच करतात. डेव्हलपिंग करतांना फिल्म कोणत्याहि कारणानें खराब न होण्याची खबरदारी घ्यावी. डेव्हलपिंग झाल्यानंतर स्वच्छ जागेंत फिल्म वाळवून मग तिचें प्रिंटस् आपण नेहमीं पाहतों ते फोटो काढतात. एखाद्या लहान आकाराच्या निगेटिव्हवरून मोठ्या आकाराचा फोटो छापतां येतो. याला एन्लार्जिंग म्हणतात. फोटो छापण्यासाठीं निरनिराळ्या रंगाचे व पृष्ठभागाचे कागद (पेपर्स) मिळतात.

फोफसेपणाः—प्रत्येक व्यक्तीच्या अंगांत थोडाबहुत चर्बीचा सांठा असतो व असावाहि लागतो. हा सांठा प्रमाणाबाहेर अतिरिक्त होऊं लागला म्हणजे फोफसेपणा म्हणतां येईल. परंतु पुष्कळदां फोफसेपणा स्वाभाविकच असल्यामुळें त्याचा अतिरेक झाला असें केव्हां म्हणावें तें कळत नाहीं हेंहि खरें. **कारणें व लक्षणें**—कित्येक जाति, विशेषतः थंड हवेंतल्या, स्वभावतःच अधिक लठ्ठ असतात. व कित्येक उष्णकटिबंधांतल्या जाति स्वाभाविकपणेंच काटक व सडपातळ असतात. लठ्ठपणा किंवा फोफसेपणा हा आनुवंशिक असण्याचा संभव अतिशय असतो. तसेंच वयोमानानुसार व विशिष्ट परिस्थितींत मेद वाढण्याची प्रवृत्ति जास्त आढळते. उदाहरणार्थ—बाल्यावस्थेंत, व्यक्ति वयांत येते तेव्हां, गरोदरपणीं, विटाळ जाण्याच्या कालावस्थेंत, व पुरुषास मध्यम वयांत फोफसेपणा येण्याचा संभव जास्त आढळतो. साधारणपणें पुरुषांपेक्षां स्त्रियांत मेदोवृद्धीची प्रवृत्ति अधिक असते.

साधारणपणें माणसाचा जेवढा आहार असतो, तेवढा सर्व जीवनक्रियेंत उपयोगिला जातो. यामुळें निरोगी मनुष्यांत मेद सांठण्याचें फारसें कारण नसतें. परंतु माणसानें आपला नेहमींचा हालचालीचा व्यवसाय सोडून एकदम बैठा व्यवसाय करण्यास आरंभ केला कीं त्याचें अंग सुटूं लागतें. कारण आहारांत तसा बदल झालेला नसतो. अन्नघटकांपैकीं चर्बी वगैरे स्निग्ध पदार्थ, पिष्टमय पदार्थ आणि शर्करा यांच्यापासून मेद बनतो. अन्नांतील नायट्रोजन्युक्त पदार्थ (प्रोटीन्स) मेदोवृद्धीस कारणीभूत होत नाहींत. व्यायामाचा अभाव आणि आहाराचा अतिरेक हीं मेद होण्याचीं कारणें होत हें सामान्यपणें खरें असलें तरी यासहि अपवाद कमी नाहींत. कित्येक निरोगी लठ्ठ व्यक्तींचा आहार अगदीं कमी असलेला आढळतो, व याचे उलट जास्त आहाराचीहि कित्येक मंडळी अगदीं किडकिडीत असलेलीहि आढळून येतात. अन्नाचा विनियोग व्यक्तीव्यक्तींत निरनिराळा असतो यामुळेंच असें घडतें असें शास्त्रज्ञांचें मत आहे. थायरॉइड् व पिट्युइट्री या

ग्रंथींचा अंतःस्राव कमी झाल्यास मेदोवृद्धि होत असते. थायरॉइड् ग्रंथींचा हा स्राव ज्या विकारांत प्रमाणाबाहेर वाढतो त्या विकारांत रोगी क्षीण बनतो. अ‍ॅड्रीनल् व पायनीअल् या ग्रंथींच्या कांहीं विकारांत, तसेंच मेंदूस आवाळू झालें असतां, व कांहीं वेडांसारख्या मनोविकृतींत फोफसेपणा हें लक्षण उद्भवत असतें. जननेंद्रियग्रंथींचें कार्य व फोफसेपणा यांच्यामध्यें मात्र विरोधी संबंध आहे. जननेंद्रियांचें कार्य जोमदार असल्यास मेदोवृद्धि होण्याची प्रवृत्ति बहुधा नसते व मेदोवृद्धि फार झाल्यास जननेंद्रिय प्रायः नष्टच होते. पुरुषास खची केल्यासहि मेदोवृद्धि घडते. मेद सांठतो तो बाह्यत्वचेच्या खालींच सांठतो असें नव्हे तर इतरहि अंतर्गत अवयवांच्या पेशींत तो सांठत असतो व त्यामुळें त्या अवयवांच्या कार्यास व्यत्यय होऊन विकार उत्पन्न होतात.

मेदोवृद्धीचे परिणाम वयोमानाप्रमाणें भिन्न असू शकतात. लहानपणींच मेद वाढल्यास शरीराचे सर्वच स्नायु अधिक वजन पेलण्याच्या योग्यतेचे असे पुष्ट बनतात. पुष्कळ पहिलवानांत असें आढळून येतें. फोफशा माणसास दम लवकर लागतो, जास्त काम करवत नाहीं, व त्याचें हृदय अशक्त होऊन धडधडतें आणि मेंदूचें कार्य नीट न घडून त्यास प्रायः बुद्धिमांद्य येतें. या सर्वसाधारण नियमास अपवाद असे कित्येक चलाख बुद्धीचे लठ्ठहि असतात हें लक्षांत ठेवलें पाहिजे. संधिवात (Gout) व मधुमेह हे विकार होण्याची प्रवृत्ति फोफशा मनुष्यांत जास्त असते.

उपाय—फोफसेपणावर उपचार करणें पुष्कळच कठीण असतें. अल्पाहार व व्यायामाभाव यांमुळें जेव्हां फोफसेपणा येतो तेव्हां तो बरा करणें शक्य कोटींतलें असतें. अशा व्यक्तींनीं कांहीं काल अगदीं लंघन करून, पुढेंहि विपुल पदार्थ, तूप, चरबी, साखर, बटाटे, वाटाणे, पावटे वगैरे वर्ज्य केले पाहिजेत. हिरव्या भाज्या, टॉमॅटो, चर्बीरहित मांस, कोंबडीं, मासे वगैरे पदार्थ खाण्यास हरकत नाहीं. फक्त २ ते ३ औंस प्रोटीन्स व कांहीं फळें एवढेंच खाणें ठेवावें. पाणी भरपूर घ्यावें. मीठ घेण्याचें प्रमाण कमी करावें, मद्य घेऊं नये.

सोईस्कर व भरपूर होईल असा कोणताहि व्यायाम घेणें हितावह आहे. पण लठ्ठ माणसाची व्यायाम करण्याकडे प्रवृत्ति फार करून नसल्याकारणानें, व्यायाम नियमित व भरपूर घेण्याचे बाबतींत मनाचा दृढ निश्चय पाहिजे. विद्युल्लहरींच्या आघातांनीं व्यायाम कृत्रिमपणें करविण्याचाहि उपाय आहे.

थायरॉईड् ग्रंथींचा अर्क पोटांत औषध म्हणून मेदोवृद्धि कमी करण्यास कांहींसा उपयोगीं पडतो. मात्र हृदयक्रियेवर त्याचे दुष्परिणाम न होतील याबद्दल दक्षता बाळगिली पाहिजे.

आयुर्वेदिक उपाय—त्रिफळेचा काढा व मध मिसळून द्यावा.

फोर्ड, हेन्री (१८६३–):—एक विख्यात अमेरिकन धनाढ्य कारखानदार. याचा जन्म इ. स. १८६३, जुलई ३० रोजीं मिशिगन् (Michigan) येथें झाला. याचें प्राथमिक शिक्षण आसपासच्या शाळेंत झालें. त्याचा बाप एक सुखवस्तु शेतकरी होता. तेव्हां त्यास आपल्यां मुलानेंहि शेतकरीपेशा पत्करावा असें वाटलें; पण हेन्रीला यंत्रशास्त्रासंबंधीं नैसर्गिक आवड होती. त्यानें पंधराव्या वर्षीं शाळा सोडून यंत्रशास्त्राचा अभ्यास करण्यास सुरवात केली. यासंबंधीं तांत्रिक व प्रात्यक्षिक म्हणून जी जी माहिती मिळणें शक्य होतें ती ती सर्व माहिती त्यानें मिळविण्याची खटपट चालविली. प्रथम त्यानें डेट्रॉइट (Detroit) येथें एका यंत्राच्या दुकानांत उमेदवारी केली; एक वर्षानंतर त्याचा संबंध एका इंजिनांचे दुकानाशीं आला. दोन वर्षानंतर शेतावरील वाफेची यंत्रें बसविण्याच्या व तीं दुरुस्त करण्याच्या धंद्यांत तो पडला. उरलेल्या वेळांत त्यानें एक सिलिंडर वाफेचा नांगर (One-cylinder steam tractor) केला; पण तो अव्यवहार्य ठरला.



हेन्री फोर्ड

तो वीस वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या वडिलांनीं त्यास शेतीकडे वळविण्याचा पुन्हां एकदां जोराचा प्रयत्न केला. त्यानें चाळीस एकर जमीन त्याच्या स्वाधीन केली. परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. शेतकीचीं यंत्रें दुरुस्त करित असतां त्यानें एक चिरकामाची गिरणी काढली. इ. स. १८८७ सालीं त्याचा विवाह क्लेरा ब्रायण्ट नामक स्त्रीशीं झाला. चिरकामाच्या गिरणीवर जो नफा मिळाला त्या भांडवलावर त्यानें घर व दुकान बांधलें. या दुकानांत त्यानें आपले विविध प्रयोग सुरू केले.

यानंतर डेट्रॉइट एडिसन कंपनींत एंजिनियर यंत्र शास्त्रकुशल (Machinist) म्हणून तो नोकरीस राहिला.

त्यानें एक लहानशी खोली भाड्यानें घेतली व तेथेंच इ. स. १८९२ सालीं एक गॅसवर चालणारी गाडी (Gasoline buggy) तयार केली. पुढील वर्षी डेट्रॉइट रस्त्यावरून त्यानें काढलेली पहिली मोटर चालूं लागली. ती मोटर त्यानें २०० पौंडाला विकली व त्याच्यापेक्षां अधिक बळकळ नमुना (Model) करण्याच्या मागें तो लागला. इ. स. १८९९ सालीं डेट्रॉइट एडिसन कंपनी सोडून तो डेट्रॉइट ऑटोमोबाइल कंपनीचा मुख्य एंजिनीयर झाला. येथें त्याचा इतर अधिकाऱ्यांशीं लवकरच खटका उडून त्यानें ती नोकरी सोडली व मोटर तयार करण्यांचे बाबतींत संपूर्ण अधिकार आपल्यास असल्याशिवाय नोकरी धरायची नाहीं असा त्यानें दृढ निश्चय केला.

इ. स. १९०३ सालीं त्यानें आधुनिक फोर्ड कंपनीचा पाया घातला. यानंतर निरनिराळे नमुने तयार करून विकल्यानंतर इ. स. १९०९ सालीं त्यानें जगविख्यात टी मॉडेल (T. Model) तयार केलें. तेव्हांपासून १९०९ मे पर्यंत एक कोटी पन्नास लक्ष टी-मॉडेल मोटारी तयार करून विकल्या. इ.स.१९२६ डिसेंबरमध्यें दहा कोटी पौंड खर्च करून ए-मॉडेल मोटारी सुरू केल्या. इ. स. १९३१ एप्रिल मध्यें त्याच्या कारखान्यांत होणाऱ्या मोटारीची निपज दोन कोटींवर गेली.

यानंतरच्या कालांतील विशेष महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे त्यानें सेल्डन पेटंट सूट (Selden Patent Suit) मिळविलें; आठ तासाचा दिवस केला, कंपनीची संपूर्ण मालकी आपल्या कुटुंबाची केली, कामगाराचें सर्वसाधारण किमान वेतन रोजीं ६ शिलिंग (6 $) केलें. इ. स. १९२९ सालीं तर तें ७ होतें.

हेन्री फोर्डचें आजचें निवासस्थान डीअरबॉर्न हें त्याच्या जन्मभूमीपासून फारसें दूर नाहीं. त्यानें Edison Institute of Technology नामक एक संस्था चालविली आहे; त्याचप्रमाणें Greenfield Village नामक एक वसाहत वसवून तेथें अमेरिकन जीवन व उद्योगधंदे यांच्या उत्क्रांतीचा पद्धतशीर अभ्यास विद्यार्थ्यांना करतां यावा अशा सोयी केल्या आहेत. या सोयींचा भरपूर फायदा हजारो विद्यार्थी व विद्यार्थिनी घेत आहेत. जमिनीच्या पैदासीचे नवनवीन उपयोग संशोधिले जावेत म्हणून मिशिगॅन् व जॉर्जिया या भागांतील हजारो एकर जमीनींची लागवड करण्यांत येतें. फोर्ड मोटार कंपनीतर्फें ठिकठिकाणीं मुलांसाठीं व्यापारी शाळा उघडण्यांत आल्या आहेत. डेट्रॉइट येथें फोर्डनें एक मोठें हॉस्पिटल बांधलें आहे. जगांतील मोठ्या हॉस्पिटलपैकीं तें एक आहे.

फौंउंटनपेनः—नव्या कालांतील नवी गरज भागविण्यासाठीं फौंउंटनपेनचा शोध लागला. आज बाजारांत मिळणारी फौंउंटनपेन्स अनदीं निर्दोष अशीं मिळतात. पण २५ वर्षांपूर्वी म्हणजे ज्यावेळीं नुकतींच फौंउंटनपेन्स तयार होत होतीं त्यावेळीं एकदम वाजवीपेक्षां जास्त शाई येणें, लौकर निब (टोक) बिघडणें हे दोष प्रमुख असत. आतां हे दोष पूर्णपणें निघाले आहेत. सतत व सारख्या प्रमाणांत शाई उतरणें हा फौंउंटनपेनचा मुख्य गुण आहे. निब अधिक टिकावें म्हणून निबच्या टोकाला अत्यंत कठीण पदार्थाचा मुलामा देण्याची पद्धत आहे. कांहीं फौंउंटनपेन्सच्या निबला प्लॅटिनम या धातूचा मुलामा देतात. अर्थात् याप्रकारचें फौंउंटनपेन किंमतीनें भारी असावयाचेंच.

फौंउंटनपेनमध्यें शाई भरण्यासाठीं निरनिराळे कारखानदार निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब करतात. कांहीं शाईच्या नळींत (Barrel) निबचा भाग काढून शाई भरतात (ही पद्धत आतां मागें पडली आहे) कांहीं नळींत लंबट रबरी पिशवी ठेवून ती एका दाब पट्टीनें निर्वात करून मग शाईत टोंक बुडवावयाचें, अर्थात दाब निघतांच निबवाटें शाई आंत शिरते व फौंउंटनपेन भरलें जातें. दुसरीं पंपानें (स्करू पंप किंवा पिस्टन पंप) शाई भरण्याची पद्धती. फौंउंटन

पेनच्या नळीसाठीं अलीकडे पारदर्शक सेल्युलाईड वापरीत असल्यामुळें पेनमध्यें शाई किती आहे हें कळतें. फौंउटन पेन्स लहान मोठ्या आकाराची व डौलाची निघत असून बारीक, मध्यम व जाड टोकाचींहि मिळतात.

फ्रँक काप्रा (१८९७—):—विख्यात अमेरिकन चित्रपट–दिग्दर्शक. याचा जन्म सिसिलींतील पालेर्मो या गांवीं १९ मे १८९७ला झाला. वयाच्या सोळाव्या वर्षी ग्रॅज्युएट झाल्यावर कॅलिफोर्नियांतील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेंत इंजीनियरिंगच्या शिक्षणासाठीं त्यानें प्रवेश केला. तेथें शिक्षण घेऊन इंजीनियर होतांच महायुद्ध



फ्रँक काप्रा

कालीं त्याला किनाऱ्याच्या तोफखान्यांत सेकंड लेफ्टनट म्हणून नोकरी करावी लागली. लढाई संपल्यावर यानें कांहीं दिवस इंजिनियरचें काम केलें. पुढें १९२१ सालीं चित्रपट व्यवसायांत पडला. रंगभूमीवरील पूर्वानुभव याला कांहींच नव्हता. तरी पण लौकरच त्याला कोलंबिया कंपनींत छोटे चित्रपट (Screen Snapshots) दिग्दर्शित करावयास मिळाले. पण मूकचित्रपटाच्या कालांत हा दिग्दर्शक म्हणून जगापुढें आला नाहीं. बोलपटाच्या जमान्यांत यानें कमालीचें दिग्दर्शनकौशल्य दाखवून पहिल्या दहा दिग्दर्शकांत जागा पटकाविली आहे. चुटचुटितपणा व गांभीर्य हे दोन्ही गुण याच्या चित्रपटांत दिसून येतात. 'It happened' One Night, किंवा 'Mr. Deeds goes to town' यांसारख्या नर्मविनोदी चित्रपटांत जसा चुटचुटितपणा दिसतो तसेच 'Lost Horizon' यासारख्या चित्रपटांत विषयाचें गांभीर्यहि तो पटवून देऊं शकतो. वरील चित्रपटाखेरीज 'Bitter Tea of General Yeu' व 'You Can't take it with you' हे चित्रपटहि प्रख्यात आहेत. याला १९३५ व १९३७ सालीं त्या त्या वर्षांतील उत्कृष्ट चित्रपटदिद्ग्दर्शनाबद्दल पारितोषिक मिळालें आहे.

फ्रँक–बोरझॅग (१८८९–):—विख्यात् चित्रपट दिग्दर्शक. याचा जन्म सॉल्ट लेक सिटी (युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका) मध्यें ता. २३ एप्रिल १८९८ रोजीं झाला. वयाच्या तेराव्या वर्षीच हा रंगभूमीवर आला. पुढें दोनच वर्षांनंतर म्हणजे १९१३ सालीं हा चित्रपटाच्या धंद्यांत शिरला व लौकरच चित्रपटदिग्दर्शक म्हणून पुढें आला. आज त्याला जगांतील पहिल्या दहा चित्रपटदिग्दर्शकांत स्थान दिलें जातें. 'Humouresque', 'Seventh Heaven', 'Street Angel', 'The River'; 'True Heaven', 'Devil with the Women' 'Bad Girl', 'After Tomorrow' (फॉक्स कंपनीचे) हे मूकपट, व 'Farewell to Arms', 'No Greater Glory', 'Secrets', 'Flirtation Walk', 'Little man, What now?' 'Desire', 'Shipmates Forever'. हे बोलपट दिग्दर्शित केले आहेत. मानवी मनोव्यापार उत्कृष्ट तऱ्हेनें दाखविण्याची त्याची हातोटी व सूचकता हे दोन गुण त्याच्या सर्व चित्रपटांत दिसून येतात.

फ्रँकलिन्, बेंजामिन (१७०६ – ९०):—एक अमेरिकन मुत्सद्दी व शास्त्रज्ञ. याचा जन्म बोस्टन मास (Boston Mass) येथें इ. स. १७०६ सालीं १७ जानेवारीला झाला. इ. स. १७१९ सालीं आपल्या भावाच्या छापखान्यांत तो उमेदवार म्हणून राहिला; पण भावाचें त्याचें न पटल्यामुळें तो इ. स. १७२३ सालीं फिलॅडेल्फीया(Philadelphia)कडे पळून गेला व तेथें तो जुळारी (Compositor) म्हणून काम करूं लागला. तेथें काम करीत असतां सर वुइल्यम कीथ या गव्हर्नरच्या नजरेंत तो येऊन त्यानें त्याची हुषारी ओळखून त्यास इंग्लंडांत जाऊन छापखान्यास लागणारें सर्व साहित्य खरेदी करून परत अमेरिकेंत धंदा उभारण्याचा सल्ला दिला.

या उपदेशानुसार फ्रँकलिन हा इ. स. १७२५ सालीं लंडनमध्यें गेला; तथापि त्यास सर कीथनें सांगितल्याप्रमाणें छापखान्यास लागणारें साहित्य खरेदी करून अमेरिकेंत धंदा थाटणें जुळलें नाहीं. त्याला इंग्लंडमध्येंच जुळारी म्हणून एका छापखान्यांत नोकरीस राहणें भाग पडलें. अठरा महिने इंग्लंडमध्यें

काढल्यानंतर तो फिलाडेल्फियाला परत आला; व लवकरच फार आजारी पडला. त्यांतून उठल्यावर तो तेथें पुन्हां जुळारी म्हणून नोकरीस राहिला.

इ. स. १७२९ सालीं त्यानें Pennsylvania Gazette या नांवाचें एक साप्ताहिक विकत घेतलें. हेंच गॅझेट सध्यांच्या Saturday Evening Post या साप्ताहिकाचें जनक होय. इ. स. १७३१ सालीं त्यानें अमेरिकेंत पहिलें फिरतें वाचनालय (Circulating Liabrary) उघडलें. इ. स. १७३७ सालीं तो पोस्टमास्तर झाला व इ. स. १७३६–५१ या अवधींत सर्व साधारण कायदेमंडळाचा (General Assembly) कारकून झाला व इ. स. १७५४ सालीं Albany Conventionचा एक सभासद झाला.

दरम्यान शास्त्रीय संशोधनांतहि त्यानें बरीच कामगिरी केली होती. इ. स. १७४६ चे सुमारास त्यानें विद्युत्संबंधीं कांहीं गूढ प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आरंभला. या प्रयत्नाचें फळ म्हणजे इ. स. १७४९ सालीं Lightening Conductorचा शोध हें होय. १७४६ ते १७४९ या अवधींत भूकंप, Meteorology, स्टोव्ह,चिमनी (Chimney, Bifocal Glasses)संगीत वाद्यें, Ocean Currents, नौकानयन (Navigation) वगैरे अनेक विषयांचें त्यानें संशोधन चालविलें होतें. प्रक्षुब्ध पाण्यावर (Stormy waters) तेल टाकणें, शेतकी सुधारण्यासाठीं सुधारलेलीं आउतें (Fertilizers) वगैरेसंबंधीं त्यानें केलेले प्रयोग त्याच्या अष्टपैलू बुद्धिमत्तेची साक्ष पटवितात.

इ. सन १७५७ सालीं तो पुन्हां इंग्लंडमध्यें गेला. यावेळीं तो पेन्सिल्व्हानिया वसाहती बाबत ज्या तक्रारी होत्या त्या इंग्लंडच्या सरकारला कळवून न्याय मिळविण्यासाठीं त्यांचा प्रतिनिधी म्हणून गेला. फ्रँक्लिनचें उत्तम स्वागत करण्यांत आलें; राजकीय पुढाऱ्यांशींहि त्याच्या महत्त्वाच्या मुलाखती झाल्या; ऑक्सफर्ड, एडिंबर्ग व सेंट ॲन्ड्रूज येथील विश्वविद्यालयाकडून त्यास पदव्या मिळाल्या. सालीं तो परत अमेरिकेस गेला व परत इ. स. १७६४ सालीं इंग्लंडमध्यें पूर्वीच्याच नात्यानें आला. इ. स. १७६६ सालीं त्यानें लोकसभेमध्यें आपली बाजू पुराव्यानिशीं जोरदारपणानें मांडली. त्याचाच परिणाम होऊन प्रसिद्ध स्टँप ॲक्ट रद्द झाला. इ. स. १७७५ सालीं तो पुन्हां फिलाडेल्फियाला परत आला. इ. स. १७७६ सालीं स्वातंत्र्याचा जाहिरनामा ज्या तीन व्यक्तींनीं तयार केला त्यांत त्याचा समावेश होता. त्याच वर्षी तो पॅरिसला वसाहतीचा कमिशनर म्हणून गेला. त्यानें अमेरिका व फ्रान्स या दोन राष्ट्रांमध्यें एक तह घडवून आणला व तेथेंच तो Plenipotentiary म्हणून राहिला. १८८५ त परत आल्यावर त्यानें राज्यघटना (Constitution) तयार करण्यास मदत केली. इ. स. १७८८ सालापासून त्यानें राजकीय व्यवहारांचा संन्यास घेतला. एप्रिल १७, १७८८ सालीं हा महापुरुष खिस्तवासि झाला.

फ्रँको, जनरल फ्रॅन्सिस्को (१८९२–):– या स्पॅनिश योद्ध्याचा जन्म गॅलिशिया या शेतकीप्रधान प्रदेशांत एका मध्यम स्थितीच्या कुलांत सन १८९२ सालीं झाला. यानें लहान वयांतच लष्करी नोकरी पतकरली. वयाच्या विसाव्या वर्षी लेफ्टनंट, तेविसाव्या वर्षी कॅप्टन, अठ्ठाविसाव्या वर्षी मेजर व बत्तीसाव्या वर्षी स्पॅनिश सैन्याचा जनरल झाला. जनरल या नात्यानें तो कांहीं वर्षे झारागोसा मिलिटरी ॲकेडमीचा प्रमुख होता.

रिपब्लिकच्या कारकीर्दींत जनरल फ्रँको हा चीफ स्टाफच्या हुद्द्यावर होता. ॲस्ट्यूरियन बंडामधील शेतकरी व खाणवाले यांना दडपण्याकरितां पाठविलेल्या सैन्याचा तो अधिपती होता. पीपल्स फ्रंट् गव्हर्मेंटनें त्याला कॅनरी बेटांना १९३६ सालीं पाठविलें. कॅनरी बेटाहून फ्रँको जुलै महिन्यांत विमानानें मोरोक्कोला गेला व त्यानें तेथील हाय कमिशनरला गोळी घालून मारविलें; पुढें त्यानें नवीन स्पेन निर्माण करण्याकरितां बंड सुरू केले.

फ्रॅन्कोला प्रजासत्तावादी म्हणावें तर तो प्रजासत्तावादी नाहीं, एकसत्तावादीही नाहीं; तसा फॉर्लिस्टहि नाहीं, तो वक्ता नाहीं, मुत्सद्दी नाहीं. डी रिव्हेरा व सन्जूर्जो यांचा आदर्श त्यानें आपल्यापुढें ठेविला आहे. विशेषतः सन्जूर्जोपासून त्यानें स्फूर्ति मिळविली. स्पेनमध्यें सैन्याची सत्ता प्रमुख करणें हें त्याचें ध्येय होतें. "मला संघटित स्पेन पाहिजे, लष्करी पेशाचे लोक पाहिजेत. वावदूक राजकारणी नकोत" असें तो म्हणत असे. अभिनव स्पेन निर्माण करण्याकरितां त्यानें सुरू केलेल्या युद्धाचा शेवट त्याला अनुकूल झाला (मे १९३९).

फ्रॅन्सिस, सेंट ऑफ असई (११८१–१२२४):– एक ख्रिश्चन सन्त. याचा जन्म इ. स. ११८१ सालीं फ्रान्समध्यें झाला. याचा बाप पेट्रो हा कापडाचा व्यापारी होता. तो असई येथें व्यापार करीत असे.

तरुणपणीं फ्रॅन्सिस हा अत्यंत रंगेल, गायनप्रिय, खुशालचेंडू व दिलदार होता. कालांतरानें त्यास उपरति होऊन तो विरक्त बनूं लागला.

इ. स. १२०२ सालीं पेरूजीयन्सविरुद्ध जें युद्ध झालें त्या युद्धांत फ्रॅन्सिसला पकडण्यांत आलें व एक वर्षपर्यंत तुरुंगांत डांबण्यांत आलें. या तुरुंगवासाच्या मुदतींत त्याचा रंगेलपणा जसा प्रत्ययास आला त्याचप्रमाणें त्याची आप्तांच्या सहकारी बंद्याबद्दल आत्मीयताहि कळून आली. तुरुंगांत असतां तो सडकून आजारी पडला; त्यामुळें जगाकडे पहाण्याचा त्याचा दृष्टिकोन अजिबात बदलून गेला. त्याला पूर्वीप्रमाणें शेतांचें सौंदर्य व द्राक्षांच्या वेलींची शोभा सुख देईना. असा चमत्कार कां व्हावा याचें कारण शोधण्यासाठीं तो अधिकाधिक अंतर्मुख होऊं लागला. तथापि हा बदल संपूर्णपणें दृगोचर होत नव्हता; याचें कारण उघड आहे. संसारबंधनापासून तो संपूर्णपणें आलिप्त झाला नव्हता. त्यानें युद्धांत पराक्रम गाजवून विजयश्री मिळविण्याचें ध्येय प्रारंभीं डोळ्यासमोर ठेवलें होतें; आणि त्याप्रमाणें ॲप्युला(Apulia)कडे कूचहि केलें होतें; पण इतक्यांत त्यास दैवी साक्षात्कार झाल्यानें त्याचा मार्ग कुंठला. या कारणामुळें त्याच्या रंगेलपणाला एकप्रकारें खो बसून त्यास छांदिष्टपणाची छटा मिळाली. गरिबांसाठीं त्याच्या अंतःकरणांत उत्कट दया उत्पन्न झाली. विशेषतः महारोग्यांच्या बाबतींत त्याचें अंतःकरण तिळतिळ तुटूं लागलें.

फ्रान्सिसच्या आध्यात्मिक जीवनास सुरवात होतांच त्याचा बराच काळ एकांतांत भक्तिपूर्वक प्रार्थना व उपासना करण्यांत जाऊं लागला; आणि सेंट डॅमिनिओच्या चर्चमध्यें तो उपासना करीत असतां त्याला ख्रिस्ताचा साक्षात्कार होऊन, साक्षात् ख्रिस्तदेव त्यास, 'फ्रांन्सिस, ऊठ; माझें पडत चाललेलें घर दुरुस्त कर. "असें गंभीर वाणीनें आज्ञापित असल्याचा दिव्य साक्षात्कार झाला. ख्रिस्ताची ही आज्ञा शब्दशः वंद्य मानून त्यानें आपल्या वडिलांचा उमदा घोडा व त्यावरील उंची जीन वगैरे वस्तू विकून त्या द्रव्याचा उपयोग सेंट डॅमिनिओचें देवालय दुरुस्त करण्याकडे केला. याचा परिणाम, फ्रान्सिस व त्याच्या वडिलांमध्यें कायमचें वितुष्ट येण्यांत झाला व फ्रान्सिस अर्धवट नग्नावस्थेंत घरांतून बाहेर पडला. यावेळेपासून फ्रान्सिसनें परमेश्वरासच 'आपला पिता' म्हणून संबोधण्यास सुरवात केली.

ही गोष्ट इ. स. १२०९ च्या अखेरीस घडली. तेव्हांपासून धार्मिक क्षेत्रांत धर्मवीर (Knight errant) म्हणून तो चमकूं लागला. सेंट डॅमिनिओचें चर्च स्वतःच्या हातांनीं दुरुस्त करणें, महारोग्यांची शुश्रूषा करणें, त्यांच्या समुदायांत स्वतः होऊन जाऊन मिसळणें, रस्त्यावर व सार्वजनिक व्यासपीठावरून व्याख्यानें देणें वगैरे अनेक गोष्टी करण्यांत त्याचा वेळ जाऊं लागला. अनेकांनीं त्याची वेड्यांत गणना केली. शेवटीं, फेब्रुवारी २४, १२०९ रोजीं The gospel for the day (Matt. X-7-10) धार्मिक उताऱ्याचा त्याच्यावर मनावर खोल परिणाम होऊन त्यानें ख्रिस्ताचें अनेक बाबतींत नव्हे सर्व बाबतींत–शब्दशः अनुकरण करण्याचें निश्चित केलें व त्याप्रमाणें ख्रिस्ताचे हुबेहूब अनुकरण करणाऱ्या शिष्यांत त्याचा पहिला नंबर लागला आहे यांत शंका नाहीं.

इ. स. १२१० च्या प्रारंभीं आपल्या अल्पशा अनुयायांसह रोममध्यें प्रवेश करून आपण स्वतः काढलेल्या नवीन धर्मपंथास मान्यता मिळावी अशी तेथील पोप तिसरा इनोसण्ट (Innocent III) यास विनंति केली. यावेळ पावेतों महंत हे व्यक्तिशः दरिद्रीच होते; पण त्यांच्या संघास वर्षासन मिळत असल्याकारणेंान ते दरिद्री नव्हते; पण फ्रांसिसनें काढलल्या नव्या पंथांत व्यक्तिशः दारिद्र्याबरोबर सांघिक दारिद्र्याचेंहि कडक नियंत्रण घालण्यांत आलें होतें. महंतानें दारिद्र्याचें अखंड व्रत स्वीकारून त्यानें आपली उपजिविका शक्य तों श्रम करून व आपद्धर्म म्हणून, भिक्षा मागून केली पाहिजे, असा फ्रान्सिसनें कडक नियम केला. पोपनें प्रारंभीं या नियमास संमती दिली नाहीं; पुढें दिली. फ्रान्सिसच्या महानुभवामुळें त्याच्या अनुययांची संख्या झपाट्यानें वाढली.

तथापि त्याच्या अत्यंत त्यागी व विरक्त धोरणास कंटाळणाऱ्या विरोधकांची संख्याहि हळुंहळूं वाढत चालली. फ्रान्सिसच्या महानुभवाच्या तेजापुढें त्याच्या विरोधकांचें कांहीं काळपर्यंत कांहींच चालेना. पण इतक्यांत त्यांना फ्रान्सिसच्या ठिकाणीं असलेल्या

व्यंगाची जाणीव झाली, त्याचा त्यांनीं भरपूर फायदा घेतला. आपल्या अनुयायांची संख्या वाढविण्याकडेच एकांगी लक्ष पुरविल्यानें आपल्या पंथांत कितपत सच्चे येतात याचा त्यानें विचारच केला नाहीं. या दोषामुळें, त्याच्या गैरहजरींत त्याचेच अनुयायी त्याच्याविरुद्ध कट करूं लागले.

इटलीमध्यें फ्रान्सिसनें अनेक धार्मिक दौरे काढले; त्याप्रमाणें लांब लांबच्या दूर देशांतहि त्यानें जाऊन व्याख्यानें दिलीं. इ. स. १२१२ सालीं पॅलेस्टाइनकडे तो निघाला; पण वादळामुळें त्यास तेथें जातां आलें नाहीं. इ. स. १२१४ सालीं त्यानें स्पेनमध्यें दौरा काढला. इ. स. १२१९ सालीं फ्रान्सकडेहि तो याच कामासाठीं जाण्यास निघाला; पण मध्यंतरीं संकटें असल्यामुळें तो मागें वळला. इ. स. १२१९ सालीं त्याला सीरिया व पॅलेस्टाइनमध्यें जातां आलें व त्यानें त्या ठिकाणीं एक वर्षभर धर्मप्रसार केला.

त्याच्या या गैरहजरीचा फायदा घेऊन त्यांच्या विरोधकांनीं पूर्वीच्या खुशालचेंडू धर्मपंथीयांस मिळून त्यास पोपचीहि संमती मिळविली. ही बातमी ऐकतांच फ्रान्सिस तावडतोब परत आला; त्यानें आपल्याविरुद्ध चाललेली चळवळ थांबविण्याचा खूप प्रयत्न केला; पण त्यांत त्यास यश आलें नाहीं. आपल्यांत संघनेता या दृष्टीनें लागणाऱ्या गुणांची उणीव आहे अशी त्यास खात्री झाली व त्यानें आपल्या ग्रंथाची सूत्रें पेट्रो डी कटनी (Petro dei Cattni) याच्या स्वाधीन करून त्यानें अधिकार-संन्यास केला.

यापुढें त्याच्या पंथांत तंत्राचें (Formalism) फाजील स्तोम माजत गेलें; फ्रन्सिसनें त्याविरुद्ध निषेध फक्त व्यक्त केला; त्याचें शेवटचें आयुष्य इटलीमध्यें धार्मिक व्याख्यानें देण्यांत व खिस्ताची शिकवणूक स्वतः अधिक उत्कंठतेनें आचरण्यांत गेलें. अशाच एका प्रवासांस तो गेला असतांना इ. स. १२२४ सप्टेंबरमध्यें खिस्तवासी झाला.

फ्रान्सः–इंग्लिश भाषेमध्यें अशी एक सुप्रसिद्ध म्हण आहे कीं प्रत्येक मनुष्य दोन देशांवर प्रेम करतो. एक त्याचा स्वतःचा मायदेश व दुसरा फ्रान्स. ही म्हण प्रचलित होण्याचें कारण असें सांगतात कीं फ्रान्समध्यें सौंदर्यदेवता सर्वसाधारण लोकांच्या घरादारांतून सर्रास वावरतांना दिसते. तेथें प्रचलित असलेल्या एका काळीं राजवाड्यांत नांदत असलेली ही सौंदर्यदेवता आज येथें सामान्य लोकांच्या सुखसोईंतून ओतप्रोत विखुरलेली दिसून येते. त्यांच्या अंगावरील पोषाखांत राहत्या घरांत, खेड्यांत व शहरांत ते वाचीत असलेल्या पुस्तकांत, त्यांच्या आचारविचारांत सर्वत्र सौंदर्याचें संपूर्ण साम्राज्य आढळतें. फ्रान्सचें जसें हें एक वैशिष्ट्य तसेंच दुसरें म्हणजे फ्रान्सची लोकशाही. राजसत्ता कायमची नष्ट करून लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापन करणारें फ्रान्स हें युरोपांतील पहिलेंच राष्ट्र होय.

स्थान–फ्रान्स हें मध्ययुरोपांतील राष्ट्रांपैकीं अगदीं पश्चिमेकडील एक राष्ट्र आहे. हें उत्तर अक्षांश ४२° २०' ते ५१° ५' व पश्चिम रेखांश ४° ४२' ते पूर्व रेखांश ७° ३९' यांच्यामध्यें वसलेलें आहे. याच्या दक्षिणेस भूमध्य समुद्र, पश्चिमेस बिस्केचा उपसागर व ॲटलांटिक महासागर व वायव्येस इंग्लिश खाडी व डोव्हरची सामुद्रधुनी हीं असून जमीनीवर दक्षिणेकडे स्पेनचे बाजूस पिरनीज पर्वत, पूर्वेस जर्मनी स्वित्सलॅंड व इटली व ईशान्येस बेल्जिअम हे देश आहेत. उत्तर भागाखेरीज फ्रान्सला चहूंकडून पर्वतांचें अथवा सागरांचें नैसर्गिक संरक्षण मिळालेलें आहे.

आकार व आकारमान-फ्रान्सचा आकार षट्कोनाकृती आहे. वायव्येकडील भूशिरांचा व पूर्वेकडील टोकांचा विचार करतां फ्रान्सचा आकार एखाद्या मांजराच्या पुढील पायाच्या नखें पिंजारलेल्या पंजाप्रमाणें वाटतो. युरोपखंडांतून रशिया वगळल्यास फ्रान्स हा युरोपांतील सर्वांत मोठा देश आहे. याचे क्षेत्रफळ २१२७३६ चौरस मैल असून लोकसंख्या ४१९५०००० (जून १९३७) आहे. फ्रान्स देश मुंबईइलाख्याच्या (सिंध वगळून) जवळ जवळ तिप्पट व इंग्लंड व वेल्सच्या साडेतीनपट आहे म्हटलें तरी चालेल.

किनारा–फ्रान्सचा किनारा विस्तृत असल्यानें त्यांत पुष्कळच विविधता आढळते. ब्रिटनीला किनारा दंतूर व खडकाळ असून तेथील खडकांची भव्यता, सौम्य हवामान, सुंदर हिरवळ व समुद्राचें हिरवट पाणी यामुळें या किनाऱ्यास 'पांचूचा किनारा' (The Coast of Emerald) असें नांव पडलें आहे. ब्रिटनीमधील ब्रेस्टच्या आसपासचा प्रदेश फ्रेंच लोकांच्या दर्यावर्दीपणाविषयीं प्रसिद्ध आहे. येथील लोक धाडसी नावाडी म्हणून प्रसिद्ध आहेत. फ्रेंच खलाशी व कोळी यांची ती मायभूमी आहे. अटलांटिक

महासागर व बिस्केच्या उपसागराकडील किनारा शुभ्र वाळूच्या ढिगांनीं व पाइन वृक्षांनीं इतका युक्त आहे कीं त्यांस ‘ रूपेरी किनारा ’ (The Silver Shore) असें नांव पडलें आहे. हा भाग बराच रुक्ष आहे. यावर रीचफोर्ट, ला रॉशेली, बोर्डे, नँटीस व रोवेन हीं महत्वाचीं बंदरें आहेत. भूमध्य समुद्राकडील किनारा बराच सखल आहे. यांतील अल्बेरीस ते होनचें मुखापर्यंतचा भाग तळ्यांनीं व सरोवरांनीं युक्त असून द्राक्षांच्या मळ्यांनीं व ऑलिव्हच्या अरण्यांनी सुशोभित झालेला आहे. मार्सेली ते मेन्टोनचा दुसरा भाग तेथील नैसर्गिक सौंदर्यामुळें व भूमध्यसमुद्राच्या नीलवर्ण जलाशयामुळें ‘नील किनारा’ (Coast of Azure) व ‘ रिव्हिएरा ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. या किनाऱ्यास मार्सेली व टूलोन हीं फ्रान्सची मुख्य बंदरें असून नाइस्, मेन्टोन व कॅन्नेस हीं सुखवस्तु लोकांचीं सुट्टींतील प्रसिद्ध विश्रांतिस्थळें आहेत.



आइफिल टॉवर, पॅरिस–फ्रान्स.
(याच टॉवरमध्यें ब्रॉडकास्टिंग स्टेशन आहे.) E. N. A.

स्वाभाविक रचना–फ्रान्सचा तीनचतुर्थांशाहून अधिक भाग सपाट व मैदानाचा आहे. सर्वांत उंच भाग दक्षिणेस व आग्नेयेस आहे. दक्षिणभागीं पिरनीज पर्वत असून त्याची सरासरी उंची ९००० फूट आहे. याचें सर्वांत उंच शिखर १०५०० फूट आहे. पूर्व बाजूस दक्षिणभागीं आल्पस्, मध्यभागीं ज्यूरा व उत्तरेस व्हास्जेस हे पर्वत आहेत. आल्पसमधील मॉंट ब्लँक या शिखराची उंची १५७८१ फूट आहे. याच्या दक्षिणेस मौंट सेनिस शिखर असून त्याच्या खिंडींतून बोगद्यांतून इटलीकडे रेल्वे रस्ता काढलेला आहे. आल्पस्च्या पश्चिमेस, आल्पसूला समांतर अशा सेव्हेनीस पर्वताची रांग असून तिनें ऱ्हाइन व ऱ्होन या नद्यांचीं खोरीं बिस्केच्या उपसागरास व इंग्लिश खाडीस मिळणाऱ्या नद्यांच्या खोऱ्यांपासून निराळीं केलीं आहेत. मध्यभाग पठाराचा असून त्यावर ऑव्हरेन नांवाच्या ज्वालामुखी पर्वतांच्या शिखरांची रांग आहे. याच्या पश्चिमेचा व उत्तरेचा सर्व भाग सपाट मैदानाचा असून त्याची सरासरी उंची १००० फूट आहे.

वरील पर्वतांच्या रांगामुळें फ्रान्समध्यें एकूण सात खोरीं बनलीं आहेत. यापैकीं सहा वायव्य बाजूस असून एक म्हणजे ऱ्होनचें खोरें आग्नेयेस आहे. ती सहा खोरीं अशी:– (१) गॅरोन व तिच्या उपनद्यांचें खोरें. (२) लॉरी व तिच्या उपनद्यांचें खोरें. (३) सेनी व तिच्या उपनद्यांचें खोरें. (४) म्यूस व सेंबरचें खोरें. (५) इस्कॉटचें खोरें व (६) मोसेली व तिच्या उपनद्यांचें खोरें. सुमारें दोनशे नद्यांचा उपयोग नौकानयनाकरतां होतो. या सर्वांची लांबी सुमारें ५५०० मैल भरते. नद्यांचे खोऱ्यामुळें फ्रान्स सुपीक झाला असून शेतीप्रधान बनला आहे.

हवामान–मैदानावरील हवामान सम असून उष्णतामानहि अगदीं सौम्य असतें. पर्वतांचे भागावर मात्र उष्णतामान विषम असून पूर्वेकडील पर्वतशिखरें सदोदित बर्फाच्छादित असतात. दक्षिण भागाखेरीज सर्व

भागीं वारे वर्षभर पश्चिम दिशेकडून वहात असल्यानें ते अॅटलांटिक महासागरांवरील बरीच उष्णता व पाऊस आणतात. किनारपट्टया हिवाळ्यांत उबदार व उन्हाळ्यांत समुद्रसान्निध्यामुळें थंड असतात. पठाराचें भाग थंड असून पर्वतावरील हिवाळ्यांतील उन्हाळ्यांतील उष्णतामानांत बरेंच मोठें अंतर असतें. दक्षिणभागीं भूमध्यसामुद्रधुनिक हवा असून भूमध्यसमुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यामुळें येथें हिवाळ्यांत पाऊस पडतो. येथें हिवाळे ओले व उबदार व उन्हाळे कोरडे व थंडगार असतात. ही हवा फळफळावळांचें लागवडीस फार मानवते. सरासरी पाऊस ३० इंच पडतो. पण पश्चिमभागीं व पर्वतांवर याचें प्रमाण ४० इंचापर्यंत जातें तर ईशान्य भागीं दहा इंचावर येतें. सर्वत्र शेतीला पुरेल इतका पाऊस पडतो. पाऊस वर्षभर थोडथोडा पडत असतो.

वनस्पती व प्राणी—फ्रान्सची सुमारें ३६७०० चौ० मैल जमीन अरण्यानें व्यापिली आहे. ही अरण्यें पूर्व, ईशान्य व वॉस्जेस, जूरा, सेव्हेनीज, आल्पस् व पिरनीज या पर्वतांवरून असून त्यांत पाइन, कॉर्क, ओक, चेस्टनट तुती हीं झाडें आढळतात. पश्चिमेकडील ओसाड दलदलीच्या भागांत पाइनचीं झाडें सरकारनें लावलेली असून त्यापासून इमारतीचें व जळाऊ लाकूड व ऱ्हाळ मिळतें. पिरनीजच्या पूर्व भागीं बुचांच्या झाडांची लागवड केली आहे. डोंगरांच्या उतरणीवरून, चुनखडीच्या टेकड्यांवरून ऑलिव्ह व द्राक्षांच्या वेलांची लागवड केलेली आहे. फ्रान्सचा कोणतांच भाग निरुपयोगी नाहीं.

अरण्यांतून लांडगे, अस्वलें व कोल्हे आढळतात. पाळीव जनावरांत गाई, बैल, मेंढरें, बकरीं, डुकरें, गाढव, खेंचरें, घोडे, इत्यादि प्राणी आहेत. कोंबड्या व बदकें सर्वत्र पाळलीं जातात. फ्रान्सला मांसाच्या पुरवठ्याकरतां दुसऱ्या देशावर अवलंबून राहावें लागत नाहीं.

शेती व उत्पन्न—फ्रान्स शेतीप्रधान देश आहे. ८२ टक्के भागावर लागवड केली आहे. यांत शेकडा ६२ इतक्या जमिनीवर शेती, १९ वर जंगलें व अरण्यें, १२ वर गवत, ४ वर द्राक्षें व ३ वर बाकीची शेती अशी विभागणी आहे. नऊदशांश माती सुपीक आहे. म्हणून गहू, सातू, जव, बाजरी हीं तृणधान्यें मुख्यतः काढतात. गव्हाची पैदास रशियाचे खालोखाल होते. शिवाय राजगिरा, मका, बटाटे, वाल, अंबाडी, सण तंबाखू व बीट हींहि पिकें होतात. बीटपासून साखर तयार करतात. गव्हाचे खालोखाल उत्पन्न द्राक्षांचें आहे. यापासून शांपेन, बर्गंडी, बॉर्डो अशी जगप्रसिद्ध दारू गाळतात. दरसाल लाखो पौंडांची दारू परदेशी जाते. दरसाल एक अब्जाहून अधिक गॅलन दारू तयार होते. जगांतील दारूपैकीं ½ दारू फ्रान्समध्यें तयार होते. केळीं, अननस, अॅपल, पीयर्स, चेस्टनट, वॉलनट, अंजीर, नारिंगें, तुती इत्यादि फळेंहि होतात. ऑलिव्हचें तेल काढून त्यापासून साबण तयार करतात. तुतीचे पानांवर रेशमी किडे पोसतात व रेशीम काढतात. हा धंदा ऱ्होनचें खोऱ्यांत व लिऑन या शहरीं विशेष चालतो. फ्रान्समध्यें १५ एकरापेक्षां अधिक मोठीं शेतें नाहींत. शेती जुन्या व आधुनिक सुधारलेल्या अशा दोन्ही पद्धतीनें करतात.

खनिज संपत्ती—अल्सेस, लॉरेन, व्हॅलेन्शियनीज व सेंट एटिनी येथें मुख्य कोळशाच्या खाणी आहेत. यांतून दरसाल साडेचार कोटी टनावर कोळसा निघत असला तरी फ्रान्सला तो पुरत नाहीं. इंग्लंड व बेल्जमहून बराच कोळसा आयात होतो. तरीहि कारखान्यांस कोळसा पुरा पडत नाहीं. फ्रेंच लोक घरांत सर्रास लाकडेंच वापरतात. याच खाणींतून कच्चे लोखंड सांपडतें पण बरेंच लोखंड आयात होतें. याशिवाय शिसें, जस्त, मॅंगेनीज व तांबें यांच्याहि खाणी आहेत. मिठाच्या व संगमरवराच्याहि खाणी आहेत.

उद्योगधंदे व कारखाने—फ्रेंच लोकांचा मुख्य धंदा शेतीचा आहे. त्याचे खालोखाल दारू गाळण्याचा. गुरांची व मेंढरांची जोपासना करणें, कोंबडी व बदकें बाळगणें, फळफळावळाच्या बागा लावणें हेहि धंदे असून उत्तर समुद्र, इंग्लिश खाडी, बिस्केचें उपसागरांत व भूमध्य समुद्रांत हेरिंग, मॅकरेल, साल्मन, सार्डीइन इत्यादि जातीचे मासेहि पकडतात.

कलाकौशल्याच्या व षोकाच्या वस्तू तयार करण्यांत फ्रान्स जगप्रसिद्ध आहे. हातमोजे, अत्तरें, फिती, जरीचें काम, रेशमी कपडे, बुट्टीदार कापड, पडदे इत्यादि वस्तू फ्रान्सइतक्या सुबक दुसऱ्या देशांत होत नाहींत. शिवाय सर्व प्रकारचें सुती, रेशमी व लोकरीचें कापड, लोखंडी व पोलादी सामान, चिनीमाती व

(१)



(२)



(१) फ्रान्स–पॅरिस शहरांतील विजय–स्मारक (The Arc de Triomphe)

E. N. A.

(२) पॅरिस–ऑपेराची इमारत.

भागांत आयरिश लोकांनीं, दक्षिणेस भूमध्यसमुद्रालगत आफ्रिकेंतील लिगुरिअन लोकांनीं व पूर्व भागीं जर्मन लोकांनीं वस्ती केली. यानंतर वायव्य भागांत स्कँडिनेव्हियन व सीन व गॅरोनच्या खोऱ्यांत केल्ट लोकांनीं वस्ती केली. यामुळें फ्रान्समध्यें दोन प्रकारचें लोक आढळतात. वायव्येकडील ट्यूटॉनिक लोक उंच बांध्याचे, अल्प केस असलेले, उभट चेहऱ्याचे व शुभ्र कातडीचे आहेत. पण दक्षिण व नैर्ऋत्येकडील लोक गिड्ड्या बांध्याचे, काळ्याभोर केसांचे व डोळ्यांचे व काळसर रंगाचे आहेत. या दोहोंमध्यें रोटीबेटीव्यवहार झाल्यानें मध्यभागचे लोक वरीलपैकीं एखाद्या विशिष्ट प्रकारांत येत नाहींत. ट्यूटॉनिक लोक सोशिकपणा, धिम्मेपणा, उद्योगप्रियता व काटकसर या गुणांनीं प्रसिद्ध आहेत. दक्षिणभागच्या लॅटिन लोकांत तत्परता, उल्हसितपणा व आनंदी वृत्ती विशेष दिसून येते.

एकंदरींत फ्रेंच लोक रंगेल, ललितकलाप्रिय, कल्पक व सुधारणाप्रिय आहेत. उत्तम शिष्टाचाराविषयीं ते

कांचसामान यांचेही कारखाने आहेत. फ्रेंच मोटारी, विमानें व तोफा सर्वोत्कृष्ट असतात.

लोक व त्यांची राहाणी–फ्रान्स हें राष्ट्र निरनिराळ्या देशांतून निरनिराळ्या वेळीं आलेल्या लोकांचें मिळून बनलेलें आहे. फार प्राचीनकाळीं नैर्ऋत्य

प्रसिद्ध आहेत. बाईसाहेब अथवा रावसाहेब यासारखें बहुमानदर्शक उपपद लावल्यावांचून ते एकमेकांस कधींहि हाका मारीत नाहींत. ओळखीचा माणूस भेटल्यास ते टोपी काढल्यावांचून रहात नाहींत. अनोळखी गृहस्थाची ओळख करून घेण्याची उत्सुकता दाखवितील व एकदां ओळख झाली कीं त्याबरोबर सारखे बोलत राहतील; इतकें कीं ते बडबडे आहेत असेंच वाटेल. फ्रेंच लोक उत्तम, खाद्यपेयें सुंदर व भपकेदार पोषाख (विशेषतः स्त्रियांचे) टोलेजंग सिनेमा, नाटक व उपहारगृहें, व भपकेदार नाच तमाशे यांचे षोकी आहेत. पॅरिस हें शहर थाट, नखरा, चैन, सौंदर्य, ललितकला, चैनीच्या लालुची या बाबतींत सर्व जगाची राजधानी आहे असें म्हणतात.


शहरांतील लोक स्वतंत्र घरांत क्वचितच राहतात. चाळींतून ब्लॉक्स घेऊन राहाणारेच लोक फार. यांतील खोल्या स्वच्छ, फरसबंदीच्या, उंचउंच व पॉलिश केलेल्या लांकडी खिडक्या व दारांनीं युक्त हवेशीर असतात. यांत स्नानगृहें मात्र असत नाहींत. फ्रेंच मुलें 'लायसी' नांवाच्या बोर्डिंग असलेल्या शाळेत जातात. येथील खोल्या म्हणजे सैनिकांच्या बराकीच असतात. मुलें येथील लष्करी शिस्तीला कंटाळतात. मुलांना हें आयुष्य फारसें आवडत नाहीं. मुलांना क्रिकेट, फुटबॉलसारखे खेळहि खेळावयास मिळत नाहींत. फिरावयास जाणें हाच मुख्य व्यायाम ते घेतात. रुंद, सुंदर व उत्तम रस्त्यांबद्दल फ्रान्स प्रसिद्ध आहे.

खेड्यांतील लोक चैनी नाहींत. ते आपल्या शेतांत नेहमीं काबाडकष्ट करतात. फ्रेंच स्त्रिया घरकाम करून, धुणें धुऊन शिवाय आपल्या नवऱ्यास शेतकामांत मदत करण्यास सदा अगदीं तत्पर असतात. शेतकऱ्यांची कुटुंबें आनंदित असतात. फ्रेंच मनुष्य आपला देश सोडून जाण्यास कधींहि तयार होत नाहीं.

फ्रान्समध्यें कांहीं विचित्र चाली आढळतात. वाहनें उजव्या बाजूनें हांकतात. कचऱ्याच्या व मालाच्या गाड्यांना एकापुढें एक असे चार घोडे एकाच रांगेनें तर कधींकधीं एक घोडा पुढें व तीन मागें असे जुंपतात. शेतांस कुंपणांचें ऐवजीं उंच उंच झाडें लावतात. स्त्रीवर्गाचें प्रमाण पुरुष वर्गापेक्षां अधिक आहे. म्हणून लोकसंख्या वाढविण्यांस सरकारास सक्तीचे उपाय योजावे लागतात. स्त्रीपुरुष सर्वच एकमेकांत मिळून मिसळून राहतात, परंतु विवाहास मात्र दिरंगाई लावतात. संसार करावयाचा म्हणजे त्यांस एक आर्थिक संकटच वाटतें. नोकरीचीहि शाश्वती असत नाहीं. उतार वयांत विवाहाविषयीं निरुत्साह यामुळें येथें विवाह बरेच कमी होतात. मुलामुलींच्या लग्नाची आईबाप मुळींच काळजी करीत नाहींत. वधूवर एकमेकांना पसंत करतात व लग्न करतात. लग्नांत विशेष लग्नसोहाळे नसतात. लग्न 'मेअरी'मध्यें जाहिरात लावून दहांदिवसांनंतर, सरकारी अधिकाऱ्यापुढें लावतात.नंतर चर्चमध्यें येऊन धार्मिक विधि उरकतात. न पटणारे नवराबायको घटस्फोट मागून मुक्त होतात. घटस्फोटानंतर स्त्रीला दहा महिन्याचे आंत पुनर्विवाह करतां येत नाहीं. पुरुषास वाटेल तेव्हां करतां येतो. घटस्फोट मिळालेल्या नवराबायकोस पुन्हां लग्न करतां येतें; पण घटस्फोट मात्र पुन्हः कधीहि मिळत नाहीं.

धर्म—बहुसंख्यांकांचा धर्म रोमन कॅथॉलिक आहे. सुमारें दहा लाख लोक प्रॉटेस्टंटहि आहेत. १९०६ पर्यंत पोपशीं व चर्चशीं राजकीय संबंध होता. पण या सालीं त्याची फारकत करण्यांत आली. सर्व धर्मपंथांना सारखेंच वागविण्यांत येतें. सरकार धार्मिक चालीरीतींना महत्व देतें व सहसा त्याविरुद्ध जात नाहीं.

शिक्षण—शिक्षणखातें एका स्वतंत्र मंत्र्याचे हातीं आहे. देशाचे सतरा मोठे भाग केले असून त्यांवर शिक्षण मंडळाचें नियंत्रण असतें. या भागाचेहि उपभाग असून त्यावर इन्स्पेक्टरांची देखरेख असते. शिक्षणसंस्था अत्यंत सुव्यवस्थित आहेत. पांच ते तेरा वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचें व मोफत आहे. मुलें व मुली यांस प्राथमिक शिक्षण निरनिराळें दिलें जातें. दुय्यम शिक्षण सरकारी कॉलेजमधून अगर खासगी शाळा व कॉलेजांतून दिलें जातें. 'लायसी'ची पद्धत इतकीशी चांगली नाहीं. शिस्तीकडे विशेष लक्ष पुरविलेलें असतें. विश्वविद्यालयांतून मुख्यतः वैद्यक, वाङ्मय, शास्त्रें, कायदा व धार्मिक शिक्षण दिलें जातें. देशांत ८१००० प्राथमिक शाळा, ५४६ दुय्यम शिक्षणाच्या शाळा व वीस विश्वविद्यालयें आहेत. येथें 'इन्स्टिटयूट–डी–फ्रान्स' नांवाची एक अत्युच्च दर्जाची शिक्षण–संस्था आहे. तींत पदार्थविज्ञानशास्त्र, भौतिकशास्त्र व वाङ्मय या विषयांचें शिक्षण देतात. याच्या एकूण पांच शाखा आहेत. शास्त्रीय शिक्षणाकडे लोकांची प्रवृत्ती व सरकारचें लक्ष विशेष आहे.





फ्रान्स-(१) लॅयर ली पॉय या शहराचा एक देखावा. डाव्या बाजूच्या उंचवट्यावर सेंट मायकेल डी ॲगिलीचें चर्च आहे. एक हजार वर्षापूर्वीचें हें चर्च आहे. उजव्या बाजूच्या टेकडीवर नॉटर डॅम नांवाचें चर्च आहे. (२) पॅरिस शहरांतील विश्वविख्यात व इतिहासप्रसिद्ध नॉटर डॅम् नांवाचें चर्च.

E. N. A.

राज्यव्यवस्था-फ्रान्समध्यें लोकसत्ताक राज्यपद्धति आहे. फ्रेंच कायदेमंडळाच्या 'सीनेट' व 'चेंबर ऑफ डेप्यूटीज' अशा दोन मुख्य सभा आहेत. या दोन सभा एक अध्यक्ष निवडतात. कायद्यांच्या अंमलबजावणीचें काम अध्यक्ष व त्याचें प्रधानमंडळ यांवर सोंपविलेलें आहे. प्रधानमंडळ कायदेमंडळास जबाबदार असतें व दोघांचें दुमत झाल्यास प्रधानमंडळास राजिनामा द्यावा लागतो. प्रधान हा ज्या त्या खात्याचा मुख्य असतो. अध्यक्षपदाची मुदत सात वर्षांची असते. अध्यक्षास पुन्हां निवडून येण्याचा हक्क असतो. प्रत्येक वयांत आलेल्या स्त्रीपुरुषास मतदानाचा हक्क आहे. मतदारांची विभागणी काऊंटीज अथवा तालुक्यांतून केलेली असून मतदार तालुकानिहाय प्रतिनिधी निवडून देतात. चेंबरमध्यें ६१५ प्रतिनिधी असतात व त्यांची मुदत चार वर्षांची असते. सीनेटमध्यें प्रत्यक्ष निवडणुकीनें ३१४ प्रतिनिधी घेतात व त्यांची मुदत नऊ वर्षांची असते.

स्थानिक कारभाराकरितां देशाचे नव्वद डिपार्टमेंट नांवाचे भाग पाडले असून त्यांवर प्रिफेक्ट नांवाचा अधिकारी असतो. याची नेमणूक अध्यक्षाकडून होते व त्याला मदत करण्यास एक मंडळ दिलेलें असतें. एका डिपार्टमेंटचे चार अरोंडाईजमेंटस्, एका अरोंडाइजमेंटचे आठ कॅंटन्स व कॅंटनचे कम्यून्स असें पोटविभाग आहेत. प्रत्येक कम्यूनमध्यें एक शहर अगर शहर व त्याचे आसपासचा भाग अगर कांहीं

लष्करी शिक्षण सक्तीचें आहे. खडें सैन्य ४८५००० असून त्यापैकीं नाविक दल ७०००० आहे. लढाईचे प्रसंगीं पन्नास लक्ष सैन्य तात्काळ उभा करतां येतें. प्रत्येक मनुष्याला तीन वर्षें सक्तीनें लष्करी शिक्षण घ्यावें लागतें.

प्रसिद्ध आहेत. बाईसाहेब अथवा रावसाहेब यासारखें बहुमानदर्शक उपपद लावल्यावांचून ते एकमेकांस कधींहि हाका मारीत नाहींत. ओळखीचा माणूस भेटल्यास ते टोपी काढल्यावांचून रहात नाहींत. अनोळखी गृहस्थाची ओळख करून घेण्याची उत्सुकता दाखवितील व एकदां ओळख झाली कीं त्याबरोबर सारखे बोलत राहतील; इतकें कीं ते बडबडे आहेत असेंच वाटेल. फ्रेंच लोक उत्तम, खाद्यपेयें सुंदर व भपकेदार पोषाख (विशेषतः स्त्रियांचे) टोलेजंग सिनेमा, नाटक व उपहारगृहें, व भपकेदार नाच तमाशे यांचे षोकी आहेत. पॅरिस हें शहर थाट, नखरा, चैन, सौंदर्य, ललितकला, चैनीच्या लालुची या बाबतींत सर्व जगाची राजधानी आहे असें म्हणतात.


शहरांतील लोक स्वतंत्र घरांत क्वचितच राहतात. चाळींतून ब्लॉक्स घेऊन राहाणारेच लोक फार. यांतील खोल्या स्वच्छ, फरसबंदीच्या, उंचउंच व पॉलिश केलेल्या लांकडी खिडक्या व दारांनीं युक्त हवेशीर असतात. यांत स्नानगृहें मात्र असत नाहींत. फ्रेंच मुलें 'लायसी' नांवाच्या बोर्डिंग असलेल्या शाळेत जातात. येथील खोल्या म्हणजे सैनिकांच्या बराकीच असतात. मुलें येथील लष्करी शिस्तीला कंटाळतात. मुलांना हें आयुष्य फारसें आवडत नाहीं. मुलांना क्रिकेट, फुटबॉलसारखे खेळहि खेळावयास मिळत नाहींत. फिरावयास जाणें हाच मुख्य व्यायाम ते घेतात. रुंद, सुंदर व उत्तम रस्त्यांबद्दल फ्रान्स प्रसिद्ध आहे.

खेड्यांतील लोक चैनी नाहींत. ते आपल्या शेतांत नेहमीं काबाडकष्ट करतात. फ्रेंच स्त्रिया घरकाम करून, धुणें धुऊन शिवाय आपल्या नवऱ्यास शेतकामांत मदत करण्यास सदा अगदीं तत्पर असतात. शेतकऱ्यांची कुटुंबें आनंदित असतात. फ्रेंच मनुष्य आपला देश सोडून जाण्यास कधींहि तयार होत नाहीं.

फ्रान्समध्यें कांहीं विचित्र चाली आढळतात. वाहनें उजव्या बाजूनें हांकतात. कचऱ्याच्या व मालाच्या गाड्यांना एकापुढें एक असे चार घोडे एकाच रांगेनें तर कधींकधीं एक घोडा पुढें व तीन मागें असे जुंपतात. शेतांस कुंपणांचें ऐवजीं उंच उंच झाडें लावतात. स्त्रीवर्गाचें प्रमाण पुरुष वर्गापेक्षां अधिक आहे. म्हणून लोकसंख्या वाढविण्यांस सरकारास सक्तीचे उपाय योजावे लागतात. स्त्रीपुरुष सर्वच एकमेकांत मिळून मिसळून राहतात. परंतु विवाहास मात्र दिरंगाई लावतात. संसार करावयाचा म्हणजे त्यांस एक आर्थिक संकटच वाटतें. नोकरीचीहि शाश्वती असत नाहीं. उतार वयांत विवाहाविषयीं निरुत्साह यामुळें येथें विवाह बरेच कमी होतात. मुलामुलींच्या लग्नाची आईबाप मुळींच काळजी करीत नाहींत. वधूवर एकमेकांना पसंत करतात व लग्न करतात. लग्नांत विशेष लग्नसोहाळे नसतात. लग्न 'मेअरी'मध्यें जाहिरात लावून दहांदिवसांनंतर, सरकारी अधिकाऱ्यापुढें लावतात.नंतर चर्चमध्यें येऊन धार्मिक विधि उरकतात. न पटणारे नवराबायको घटस्फोट मागून मुक्त होतात. घटस्फोटानंतर स्त्रीला दहा महिन्याचे आंत पुनर्विवाह करतां येत नाहीं. पुरुषास वाटेल तेव्हां करतां येतो. घटस्फोट मिळालेल्या नवराबायकोस पुन्हां लग्न करतां येतें; पण घटस्फोट मात्र पुन्हः कधीहि मिळत नाहीं.

धर्म–बहुसंख्यांकांचा धर्म रोमन कॅथॉलिक आहे. सुमारें दहा लाख लोक प्रॉटेस्टंटहि आहेत. १९०६ पर्यंत पोपशीं व चर्चशीं राजकीय संबंध होता. पण या सालीं त्याची फारकत करण्यांत आली. सर्व धर्मपंथांना सारखेंच वागविण्यांत येतें. सरकार धार्मिक चालीरीतींना महत्व देतें व सहसा त्याविरुद्ध जात नाहीं.

शिक्षण–शिक्षणखातें एका स्वतंत्र मंत्र्याचे हातीं आहे. देशाचे सतरा मोठे भाग केले असून त्यांवर शिक्षण मंडळाचें नियंत्रण असतें. या भागाचेहि उपभाग असून त्यावर इन्स्पेक्टरांची देखरेख असते. शिक्षणसंस्था अत्यंत सुव्यवस्थित आहेत. पांच ते तेरा वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचें व मोफत आहे. मुलें व मुली यांस प्राथमिक शिक्षण निरनिराळें दिलें जातें. दुय्यम शिक्षण सरकारी कॉलेजमधून अगर खासगी शाळा व कॉलेजांतून दिलें जातें. 'लायसी'ची पद्धत इतकीशी चांगली नाहीं. शिस्तीकडे विशेष लक्ष पुरविलेलें असतें. विश्वविद्यालयांतून मुख्यतः वैद्यक, वाङ्मय, शास्त्रें, कायदा व धार्मिक शिक्षण दिलें जातें. देशांत ८१००० प्राथमिक शाळा, ५४६ दुय्यम शिक्षणाच्या शाळा व वीस विश्वविद्यालयें आहेत. येथें 'इन्स्टिटयूट–डी–फ्रान्स' नांवाची एक अत्युच्च दर्जाची शिक्षण–संस्था आहे. तींत पदार्थविज्ञानशास्त्र, भौतिकशास्त्र व वाङ्मय या विषयांचें शिक्षण देतात. याच्या एकूण पांच शाखा आहेत. शास्त्रीय शिक्षणाकडे लोकांची प्रवृत्ती व सरकारचें लक्ष विशेष आहे.





फ्रान्स-(१) लॅयर ली पॉय या शहराचा एक देखावा. डाव्या बाजूच्या उंचवट्यावर सेंट मायकेल डी ॲगिलीचें चर्च आहे. एक हजार वर्षांपूर्वीचें हें चर्च आहे. उजव्या बाजूच्या टेकडीवर नॉटर डॅम नांवाचें चर्च आहे. (२) पॅरिस शहरांतील विश्वविख्यात व इतिहासप्रसिद्ध नॉटर डॅम् नांवाचें चर्च.

E. N. A.

राज्यव्यवस्था-फ्रान्समध्यें लोकसत्ताक राज्यपद्धति आहे. फ्रेंच कायदेमंडळाच्या 'सीनेट' व 'चेंबर ऑफ डेप्युटीज' अशा दोन मुख्य सभा आहेत. या दोन सभा एक अध्यक्ष निवडतात. कायद्यांच्या अंमलबजावणीचें काम अध्यक्ष व त्याचें प्रधानमंडळ यांवर सोंपविलेलें आहे. प्रधानमंडळ कायदेमंडळास जबाबदार असतें व दोघांचें दुमत झाल्यास प्रधानमंडळास राजिनामा द्यावा लागतो. प्रधान हा ज्या त्या खात्याचा मुख्य असतो. अध्यक्षपदाची मुदत सात वर्षांची असते. अध्यक्षास पुन्हां निवडून येण्याचा हक्क असतो. प्रत्येक वयांत आलेल्या स्त्रीपुरुषास मतदानाचा हक्क आहे. मतदारांची विभागणी काऊंटीज अथवा तालुक्यांतून केलेली असून मतदार तालुकानिहाय प्रतिनिधी निवडून देतात. चेंबरमध्यें ६१५ प्रतिनिधी असतात व त्यांची मुदत चार वर्षांची असते. सीनेटमध्यें प्रत्यक्ष निवडणुकीनें ३१४ प्रतिनिधी घेतात व त्यांची मुदत नऊ वर्षांची असते.

स्थानिक कारभाराकरितां देशाचे नव्वद डिपार्टमेंट नांवाचे भाग पाडले असून त्यांवर प्रिफेक्ट नांवाचा अधिकारी असतो. याची नेमणूक अध्यक्षाकडून होते व त्याला मदत करण्यास एक मंडळ दिलेलें असतें. एका डिपार्टमेंटचे चार अरोंडाईजमेंटस्, एका अरोडाइजमेंटचे आठ कँटन्स व कँटनचे कम्यून्स असे पोटविभाग आहेत. प्रत्येक कम्यूनमध्यें एक शहर अगर शहर व त्याचे आसपासचा भाग अगर कांहीं

लष्करी शिक्षण सक्तीचें आहे. खडें सैन्य ४८५००० असून त्यापैकीं नाविक दल ७०००० आहे. लढाईचे प्रसंगीं पन्नास लक्ष सैन्य तात्काळ उभा करतां येतें. प्रत्येक मनुष्याला तीन वर्षें सक्तीनें लष्करी शिक्षण द्यावें लागतें.

खेडीं यांचा समावेश असून त्यावर मेयरची देखरेख असते. मेयरची नेमणूक सरकार करतें. पण त्याला मदत करणारें म्युनिसिपल कौन्सिल मात्र रहिवाशीं निवडून देतात. याप्रमाणें राष्ट्रीय सरकारचा स्थानिक सरकारशीं संबंध जोडलेला आहे.

न्याय खात्यांतील सर्वांत मुख्य कोर्ट, 'कोर्ट ऑफ कन्सेशन' नांवाचें पॅरिस येथें आहे. यांत एक अध्यक्ष, तीन विभागांचे तीन अध्यक्ष व पंचेचाळीस न्यायाधीश आहेत. यांच्या खालीं सव्वीस अपील कोर्टें असून त्यांचा अधिकार डिपार्टमेंटवर चालतो. अरोंडाइजमेंटस्‌मधील अव्वलदर्जाचें कोर्टांवरील अपिलें या अपील कोर्टांत चालतात. कँटोन व कम्यून्‌ मधूनहि न्यायनिवाडे केले जातात.

दळणवळण व व्यापार—फ्रान्समधील रेल्वेचा विस्तार फार मोठा असून तो सुव्यवस्थित आहे. देशांत २६३०० मैल लांबीची रेल्वे असून त्याची मालकी व ताबा बराचसा सरकारचा आहे. अव्वल दर्जाचे राष्ट्रीय व लष्करी रस्ते ४८००० मैलांचे असून दुय्यम दर्जाचें ३३०००० मैलाचें आहेत. फरान्सची रस्त्यांची पद्धत व दर्जा सर्व जगांत पहिल्या नंबरचा आहे. पॅरिसहून रेल्वेनें अगर मोटारनें युरोपांतील कोणत्याहि देशाच्या राजधानीस जातां येतें. वैमानिक दळणवळण दक्षिण अमेरिका, उत्तर आफ्रिका व आशियातील फरेंच इंडो-चायनापर्यंत आहे. हें दळणवळण १९३७ सालीं ६५६२९२२ मैलांचें झालें व विमानांनीं ८९०७६ लोकांची वाहतूक केली. टेलिफोन व बिन तारायत्रानें सर्व दळणवळण ठेवतां येतें. देशांत कालवे व नद्या मिळून ७००० मैलांची नाविक वाहतूक होते. सुमारें एकपंचमांश माल कालव्यांतून जातो.

फ्रान्सचा व्यापार मुख्यत्वेंकरून ग्रेट ब्रिटन, फ्रेंच वसाहती व हिंदुस्थान यांजबरोबर चालतो. निर्यात पक्क्या मालाची व आयात कच्च्या मालाची चालते. दरसाल सेहेचाळीस महापद्म फ्रँक्स्‌चा व्यापार परदेशाशीं होतो. १९३८ सालीं ४५९८१०००००० फ्रँक्स्‌चीं आयात व ३०३८६०००००० फ्रँक्सची निर्यात झाली.

भाषा व वाङ्मय—प्रचलित भाषा फ्रेंच आहे. बेल्जिअमच्या बाजूस कांहीं भागांत फ्लेमिश, आग्नेयेस इटालिअन व ब्रिटनीमध्यें ब्रेटन या भाषा बोलतात. केल्टिक व गॉलची लॅटिन भाषा मिळून नवव्या शतकाचे सुमारास फ्रँक्स जी भाषा बोलूं लागलें तीच फ्रेंच भाषा बनली. सोळाव्या शतकांत पहिल्या फ्रॅन्सिस्‌नें फ्रेंच ही राष्ट्रीय भाषा केली. कित्येक शतकेपर्यंत परराष्ट्र शिष्टाईची भाषा म्हणून फ्रेंच भाषेस युरोपांत पहिल्या प्रतीचा मान मिळालेला आहे. बहुतेक सर्व तह फ्रेंच भाषेंत लिहिलेले असतात.

फ्रेंच वाङ्मयास अकराव्या शतकापासून प्रारंभ होतो. त्यापूर्वीचें वाङ्मय लॅटिन भाषेंत आहे. सोळाव्या शतकापर्यंत ऐतिहासिक पद्यवाङ्मय व भावगीतें यांचेंच प्रामुख्य दिसून येतें. 'मिस्टरीज' व 'मिरॅकल्स' हें नाट्यवाङ्मयाचे त्यावेळचे प्रकार होते. 'पुनरुज्जीवनाच्या चळवळीमुळें सोळाव्या शतकांत फ्रेंच वाङ्मयांत एक प्रकारचा नवीन जोम दिसूं लागला. यांत लघुकथा व निबंध यांचा भरणा फार आहे. मॉंटेन या निबंधकारानें अर्वाचीन निबंधांची प्रथा पाडली. चौदाव्या लुईच्या कारकीर्दींत सतराव्या शतकामध्यें फ्रेंच वाङ्मय कळसास जाऊन पोंचलें. या कालांत थिओफिल व्यो, रांका बॉइट्यूरसारखे नाटककार कवी उदयास आले. कॉर्नेली, रेसाइन, मोलीअर, लॉ फोनटेन व फेनेलॉन इत्यादि लेखकांनीं आपल्या कथा, नाटकें, विनोद व निबंध यांनीं सर्व युरोपखंडावर आपला पगडा बसविला. आठराव्या शतकांत या कीर्तींत भरच पडली. व्हॉल्टेअर व रुसो यांनीं सर्व जगास थक्क करून सोडलें. पुढील कालांत ह्यूगो, डयूमास, गिझॉट, बर्गझॉन व रोस्टंड यांनीं सर्व प्रकारच्या वाङ्मयांत भर घातली. प्रचलित कालीं ज्यूल्स सुपरव्हिलीसारखे पौराणिक कवी, ॲलम सारखे निबंधकार, मॉरोइस्‌सारखे चरित्रकार, ड्युहॅमेलसारखे नाटककार फ्रेंच वाङ्मयांत उत्कृष्ट व अव्वल दर्जाच्या पुस्तकांची भर टाकीत आहेत.

त्रोटक इतिहास—प्राचीन—रोमन लोक फ्रान्सला 'गॉल' या नांवानें संबोधत. त्यावेळीं फ्रान्समध्यें निरनिराळ्या भागांत केल्टिक जाती राहात असत. इ. स. पू. सातव्या शतकाचे शेवटीं वायव्य फ्रान्स रोमन लोकांनीं जिंकला होता. पुढें ज्यूलिअस सीझरनें इ. स. पू. ५८—५९ सालांत सर्वच 'गॉल' पादाक्रांत केला व त्यामुळें रोमन भाषा, चालीरीती, धर्म व सुधारणा यांचा फ्रान्सवर इतका पगडा बसला कीं, तो पांचव्या शतकापर्यंत टिकला. या शतकांत सॅलियन फ्रँक्सचा मुख्य क्लोव्हिस्‌ यानें सर्व फ्रान्स पादाक्रांत



फ्रान्स-आलसस परगण्यांतील स्ट्रासवर्ग शहरांतील फ्रेंच तरुणी E. N. A.

करून रोमन लोकांचा संपूर्ण पाडाव व ऱ्होनचें पूर्वेस राज्यविस्तार केला. यानें मेरोव्हिंजियन घराण्याची स्थापना केली. क्लोव्हिसच्या चार मुलांत राज्याविषयीं भांडणें उत्पन्न होऊन, ७५१ मध्यें पिपीन्न हा या घराण्यांतील शेवटचा राजा झाला. यानंतर देश जर्मन राजा शार्लमेन याच्या ताब्यांत गेला. ८८४ सालीं जर्मन राजा चार्लस् यास पदच्युत करून तिसरा चार्लस् गादीवर आला. यावेळीं सरदारांची सत्ता प्रचलित झाल्यानें नॉर्मंडीचा भाग त्यांस नॉर्मन्सनां द्यावा लागला. पांचव्या लुईच्या मरणानंतर ९८७ला कॅपेशिअन घराण्यांपैकीं सर्वांत बलाढ्य सरदार हग् कॅपेट हा राजा झाला. पुढें या घराण्यानें दोनशें वर्षेपर्यंत सरदारांशीं भांडणें करून त्यांचे हक्क नष्ट करण्याचा व राजाची सत्ता सर्वश्रेष्ठ करण्याचा प्रयत्न केला व त्यांत त्यांस बरेंच यश आलें. १३२८ त या घराण्याचा शेवटचा राजा चौथा चार्लस् हा मरण पावला व व्हॅलोइस घराण्यांतील फिलिप गादीवर आला.


मध्ययुगीन-इंग्लंडच्या तिसऱ्या एडवर्डच्या फ्रान्सच्या राज्यावरील हक्कामुळें फ्रान्स व इंग्लंड यांचें वितुष्ट येऊन शंभर वर्षेपर्यंत अनेक युद्धें उभयतांमध्यें झालीं. सातव्या चार्लस्नें कॅलेखेरीज इंग्लिशांचे ताब्यांतील फ्रान्सचा सर्व भाग जिंकला. अकराव्या लुईनें (१४६१-१४८३) सरदारांची सत्ता नष्ट करून एकतंत्री राजसत्ता प्रस्थापित केली. आठव्या चार्लस्नें ब्रिटनी फ्रान्सला जोडला व इटलीवर स्वारी केली. १५१५ मध्यें राजसत्ता व्हॅलोइस् घराण्यांतून अँगूलीम घराण्याकडे गेली व फ्रॅन्सिस राजाचें इटलीच्या बाबतींत जर्मनीच्या राजाशीं वितुष्ट येऊन फ्रॅन्सिसचें बरेंच नुकसान झालें. यानंतरच्या राजांनीं स्त्रियांचें वर्चस्व दरबारांत वाढूं दिल्यानें व स्त्रियांच्या तंत्रानें वागण्यामुळें धार्मिक छळाचा कळस होऊन सेंट बार्थोलोम्यूच्या दिवशीं मोठी कत्तल झाली. चौदावा लुई गादीवर येऊन सूत्रें हातीं घेईतोंपर्यंत राजे पूर्वीच्याच तंत्रानें चाललें. राज्यांत अंधाधुंदी व लांचलुचपत फार वाढली व त्यामुळें लुई खंबीर असूनहि त्याला आपली जमाखर्चाची तोंडमिळवणी करतां आली नाहीं. सोळाव्या लुईलासुद्धां जबर कर बसवून आर्थिक स्थितीची घडी सुरळीत बसवितां आली नाहीं. म्हणून १७८९ सालीं सर्व संस्थानांची प्रतिनिधी सभा बोलावण्यांत आली व सभेनें राज्यकारभार आपल्या

हातीं घेतला. १७९९ मध्यें नेपोलिअन फ्रान्सचा पहिला कॉन्सल झाला. व " कॉन्स्यूलेट राज्यपद्धति " अमलांत आली.

फ्रेंच राज्यक्रांति–जगाच्या इतिहासांत फ्रेंच राज्यक्रांति (इ. स. १७८९) ही एक महत्त्वाची घटना समजण्यांत येते. या क्रांतिकारक घटनेचीं मुख्य तत्त्वें स्वातंत्र्य (Liberty), समता, (Equality) व बंधुभाव (Fraternity) हीं होत. ज्या तत्त्वांसाठीं ही घटना झाली त्या तत्त्वास संपूर्ण हरताळ फासण्यांत येऊन तिचा शेवट लोकशाहींत न होतां झोटिंगशाहींत (Caesarism) झाला. तथापि एवढी मात्र गोष्ट खरी कीं या क्रांतीमुळें पूर्वीची सरंजामपद्धती व वतनदारी संपूर्णपणें नष्ट होऊन लोकांमध्यें राजकीय, आर्थिक व सामाजिक उद्धाराच्या प्रदीर्घ चळवळींचा पाया घालण्यांत आला.

या क्रांतीस सुरवात, १७८९ मे पासून होऊन शेवट १७९५ नोव्हेंबरमध्यें डिरेक्टरीच्या स्थापनेनें झाला. या क्रांतीस अनेक कारणें झालीं; त्यांपैकीं महत्त्वाचीं पुढें दिलीं आहेत:–(१) अर्वाचीन युगाला आरंभ झाल्यावर मुद्रणकला, धर्मस्वातंत्र्य, शास्त्रीय शोध व राष्ट्रीयत्वाची बुद्धि इत्यादि कल्पनांचा प्रभावी उदय युरोपांत होऊन जरी कांहीं शतकें लोटलीं होतीं तरी फ्रान्समध्यें समाजरचना मध्ययुगांच्या धर्तीवरच होतीं. (२) धर्मगुरु व सरदार यांचें सर्व समाजावर पूर्ण वर्चस्व असल्यानें त्यांच्याविरुद्ध समाजामध्यें तीव्र असंतोष माजून राहिला होता. (३) सरदार व धर्मगुरु यांना विशेष हक्क व सवलती असत. त्यांजवरील कर अगदीं हलके असून सामान्य जनतेवर करांचें ओझें इतकें भयंकर असे कीं उत्पन्नापैकीं बिचाऱ्याच्या नशिबीं फक्त एक पंचमांश इतकेंच उत्पन्न राहात असे. (४) बडे लोक आपली शिकारीची हौस पुरविण्यासाठीं जंगलें राखीत; कित्येक बडे अंमलदार कबूतरांचा तांडा पाळीत असत. त्यामुळें गरिबांच्या पिकांची अतोनात नासाडी होत असे. (५) उच्च प्रकारचे धंदे, सैन्याच्या वरिष्ठ दर्जाच्या जागा वगैरे हरएक बाबतींत ठराविक लोकांचीच वर्णी लागत असे. (६) सामान्यजनांपैकीं कोणाहि व्यक्तीस आपली कर्तबगारी दाखवून नांव काढण्याची संधीच मिळत असे. (७) अशाच वेळीं व्हॉल्टेयर, रूसो वगैरे तेजस्वी लेखकांनीं जनतेंत वैचारिकक्रांति घडवून आणली. व्हॉल्टेयरच्या उपहास गर्भ लेखांनीं प्रतिष्ठित रूढींबद्दल आतांपर्यंत वाटणाऱ्या आदराचा पायाच उखडण्यांत आला. Grande Encyclopedia च्या संपादकांनीं, ज्या तत्त्वांवर सामाजिक व राजकीय घटना उभारल्या होत्या त्या तत्त्वांच्या औचित्याबद्दल जबरदस्त शंका प्रदर्शित केल्या होत्या. रूसोनें तर यापुढें जाऊन जनतेच्या इच्छेवरच राजसत्ता अवलंबून असते वगैरे अनेक तत्त्वांची क्रांतिकारक शिकवणूक (Social Contract) वगैरे ग्रंथांतून केली. (२) फ्रान्समध्यें लोकमताची किंमत कवडीमोल होती. लोकप्रतिनिधि–सभेची (States General) बैठक इ.स. १६१४पासून आतांपर्यंत कधींच बोलावण्यांत आली नव्हती. यामुळें लोकांत असंतोष धुमसून राहिला होता. (९) स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या अमेरिकेला साह्य करण्यास फ्रेंच सरकारनें जनतेस उद्देशून काढलेल्या जाहिरनाम्यास जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळाला. त्यामुळें अमेरिकेला स्वातंत्र्य मिळतांच आपल्यालाहि सर्वांगीण स्वातंत्र्याचें खरेखुरे फायदे मिळावेत अशी आकांक्षा फ्रेंचांत साहजीकपणें निर्माण झाली. (१०) सर्व शतकभर सारखीं युद्धें चालविल्यानें फरान्स सरकारचें दिवाळें निघण्याची वेळ आली होती. (११) अशा आणीबाणीच्या प्रसंगीं फरान्सच्या गादीवर सोळावा लुई हा साधासुधा पण कर्तृत्वहीन असा दुबळा राजा होता.

या सर्व कारणांमुळें लोकप्रतिनिधी सभेची बैठक बोलावण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. त्याप्रमाणें ही बैठक १७८९ जूनमध्यें राजानें बोलाविली. पूर्वी तिच्यांत सरदार, धर्मगुरु व सामान्य जनता असे तीन वर्ग असून त्यांच्या सभा निराळ्या भरत. परंतु या सभेंत सामान्य जनांनीं धर्मगुरु व सरदार यांना आपल्याबरोबर एकाच सभेस बसण्यास भाग पाडलें. हे सर्व वर्ग मिळून झालेल्या सभेस ' राष्ट्रीय सभा ' असें नांव देण्यांत आलें. या सभेनें देशाची राजकीय व सामाजिक व्यवस्था लावण्याचें काम जोरानें सुरूं केलें. लोकांनीं पॅरिसजवळील बॅस्टिलचा जुना पुराणा तुरुंग फोडून टाकला.सरदारांच्या व धर्मगुरूंच्या हक्कांवर पद्धतशीर हल्ले चढविले. बॅस्टिलचा तुरुंग हा जुन्या समाजरचनेचा द्योतक होता. तेव्हां त्याच्या नाशाबरोबर जुन्या समाजरचनेच्या नाशाचे नगारे वाजूं लागले असें म्हटलें तरी चालेल. पॅरिसमध्यें व इतर प्रमुख ठिकाणीं स्वतंत्र नगरसभा (Communes) स्थापन



नेपोलियनचें थडगें, पॅरिस–फ्रान्स.

झाल्या व राष्ट्रसंरक्षक पथकें उभारण्यांत आलीं. सरदारांचे व धर्मगुरूंचे सर्व विशेष हक्क रद्द करण्यांत आले. धर्मखात्याकडे चाललेली जमीन राष्ट्राची असें फर्माविण्यांत आलें. फौजदारी कायद्यांत सुधारणा घडवून आणून चौकशीवांचून कैद वगैरे अन्याय ताबडतोब दूर केले. स्वतंत्रता, बंधुभाव व समता या त्रयींचें निदर्शक म्हणून तिरंगी निशाण स्वीकारण्यांत आलें होतें.

अशा रीतीनें फ्रान्समध्यें झटकन ब्रिटिश राज्यपद्धतीच्या धर्तीवर नियंत्रित राजसत्ता प्रस्थापित झाली व तिचा कारभार बिनधोक चालेल असें वाटूं लागलें होतें; पण क्रांतीनंतर पुष्कळ फ्रेंच सरदार व धर्मगुरु जर्मनींत व ऑस्ट्रियांत, प्रशियांत गेले व तेथील राजांना नवीन फ्रेंच सरकारांवर स्वारी करून सोळाव्या लुईच्या हक्कांचें रक्षण करण्यास उद्युक्त करण्याची त्यांनीं जारीनें खटपट चालविली. इकडे लुईनेंहि शत्रूस मिळून पॅरिसवर हल्ला करण्यासाठीं पॅरिसमधून पळून जाण्याचा प्रयत्न केला; पण तो फसला व फ्रेंचांनी त्यास पकडून आणलें (१७९१ जून). पुढें लवकरच ऑस्ट्रिया व प्रशिया यांचीं सैन्यें फ्रान्सवर चाल करून येऊं लागलीं. तेव्हां फ्रेंच क्रांतिकारांनीं सोळाव्या लुईस व त्याच्या मेरी ॲन्टॉयनेट या राणीस कैद केलें (१७९२ ऑगस्ट)व पुढें शत्रूस फितूर असल्याच्या आरोपावरून दोघांसहि थोड्या कालांतरानें फांशी दिलें (इ.स.१७९३). फ्रेंच क्रांतिकारकांनीं निर्भेळ लोकसत्ताक राज्य स्थापलें; पॅरिसमध्यें राजपक्षीयांच्या कत्तली केल्या व जे जे लोक आपल्या देशांतील राजसत्तेविरुद्ध उठण्यास तयार असतील त्यास आपण मदत करण्यास तयार आहोंत असा बंधुत्वाचा जाहीरनामा काढला फ्रेंच जनतेंत त्यावेळीं क्रांतिकारक विचार व कृती यांचा विलक्षण संचार झाला होता. त्यांनीं प्रशियन व ऑस्ट्रियन सैन्याचा पराभव करून त्यास फ्रान्सबाहेर हाकून लाविलें. यावेळीं मुख्य सत्ता जॅकोबिन नांवाच्या एका जहाल पक्षाकडे होती. या पक्षानें देशांत अनेक अत्याचार करून आपली कारकीर्द गाजविली. इ. स. १७९३ एप्रिल ते १७९४ जुलै या काळांत फ्रान्सच्या मुख्य शहरांत दिवसा भर रस्त्यावर चकमकी उडून अनेक स्त्रीपुरुषांचीं डोकीं उडविण्यांत आलीं. हा काळ (Reign of terror) ‘ सोटेशाहीची अमदानी ’ म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. पुढें १७९५ च्या नोव्हेंबरांत फ्रान्समध्यें डिरेक्टरीची स्थापना होऊन देशांत स्थिरस्थावर झालें व सैन्यांत प्रसिद्ध नेपोलियन बोनापार्टचा उदय होऊन फ्रेंच सैन्याचा सर्व जगांत लौकिक होऊं लागला. डिरेक्टरीच्या अंमलांत नेपोलियन इटलीच्या स्वारीवर गेला. इटलीहून तो परत आला

व डिरेक्टरीची पद्धत जाऊन ' कान्स्यूलेट राज्यपद्धति ' अंमलांत आली व नेपोलियन फर्स्ट कॉन्सल झाला.

अर्वाचीन–१८०४ मध्यें नेपोलिअन फ्रान्सचा बादशहा झाला. त्यानें १८१४ पर्यंत राज्य केलें. स्वपराक्रमानें सर्व युरोपावर यानें आपली छाप बसविली. पण रशियाच्या स्वारींत त्यास अपयश आल्यामुळें सर्व राष्ट्रांनीं त्यावर हल्ला केला व त्यांस राज्यपद सोडावें लागलें. अठरावा लुई राज्यारूढ झाला. १८१५ त नेपोलिअननें पुन्हां राज्यपद धारण केलें व १०० दिवसांनंतर त्याचा वाटर्लू येथें पराभव झाला व त्यास सेंट हेलना बेटांत हद्दपार केलें. अठरावा लुई पुन्हां राज्य करूं लागला. तो १८२४ सालीं मरण पावला. राजाचा व प्रधानांचा कारभार लोकांस न आवडून त्यांनीं १८३० सालीं राज्यक्रांती घडवून आणली व लुइ फिलिप राजा झाला. १८४८ मध्यें पुन्हां राज्यक्रांती होऊन लुई नेपोलिअन राजा झाला. १८५२ सालीं त्यानें स्वतःला बादशहाचा किताब घेतला. १८७० त स्पेन देशाच्या गादीच्या वारसाबद्दल फ्रेंचांचें व जर्मनीचें युद्ध झालें व त्यांत फरान्सचा पराभव झाला. तिसऱ्या नेपोलिअनची सत्ता नष्ट झाली व प्रजासत्ताक राज्याची स्थापना झाली; थायर्स हा पहिला प्रेसिडेंट झाला. १८७३ त त्यानें राजीनामा दिला व मॅक मोहन प्रेसिडेंट झाला. १८७५त राज्यघटना ठरविण्यांत येऊन अध्यक्षाची मुदत सात वर्षांची ठरविली. त्याच्या कारकीर्दींत सरकारची बाजू खंबीर झाली. यानंतर सादी कार्नॉटच्या कारकीर्दींत पनामा कालव्याच्या योजनेचा बोजवारा झाल्यानें देशांत खळबळ उडाली. १८९४त त्याचा खून झाला. यानंतर पेरिअर, फेलिक्स फाउरी, इमिल लूबेट, फॅलीरेस व १९१३ सालीं पॉइंकारे असें प्रेसिडेंट झाले. महायुद्धांत जर्मनीनें फरान्सचा बराच भाग उध्वस्त केला. तह झाल्यावर फरान्सला अल्सेस व लॉरेन हे प्रांत, सारच्या कोळशाच्या व मोझेलच्या लोखंडाच्या खाणी व जर्मनीकडून उध्वस्त केलेल्या खाणीबद्दल सार प्रांत नुकसानभरपाईदाखल मिळाला. १९२० सालीं डेशॅनेल, १९२१ला मिलेरांड, १९२४ ला डूमर्ग हे प्रेसिडेंट झाले. १९२५ सालीं फ्रॅंकची किंमत घसरगुंडीला लागली व ती महत्प्रयासानें ३·९३ सेंटवर स्थिर करण्यांत आली. १९३१ ला डूमर अध्यक्ष झाला; पण त्याचा १९३२त खून झाला व अलबर्ट लेब्रन अध्यक्ष झाला. १९३४ला मार्सेल्स येथें युगोस्लाव्हियाचा राजा अलेक्झांडर व फ्रेंच मुख्य प्रधान लुइबार्थू यांचे खून झाले. १९३५मध्यें लावेलनें कर वाढवून जमाखर्चाची तोंड मिळवणी केली. लोकांनीं कराविरुद्ध दंगे केले. पण ते सर्व मिटविण्यांत आले. मॅगिनॉट लाईन पूर्ण करण्यांत आली. सारचे खोऱ्यांतील लोकांनीं जर्मन अधिराज्य पत्करलें. १९३६ सालीं लावेल पुन्हां मुख्य प्रधान निवडून आला. इटलीशीं फरान्सनें जरूर पडल्यास लढण्याची तयारी केली. रशियाशीं चढाई न करण्याचा तह झाला. जर्मन सैन्यानें ऱ्हाइनलॅंडचा ताबा घेतला. लिऑन ब्लूम मुख्य प्रधान झाला. फ्रॅंकची किंमत कायद्यानें ५ सेंट ठरविण्यांत आली. १९३७ सालीं कॅमिली चॉटेंप्स मुख्य प्रधान झाला व फ्रॅंकची कायद्यानें ठरविलेली किंमत मागें घेतली. १९३८ ला एम् ब्लूम पुन्हां मुख्य प्रधान झाला. एप्रिल १९३८ पासून एडॉर्ड दलादिये हे फ्रान्सचे मुख्य प्रधान आहेत. जुलै १९ ते २२ ला इंग्लंडच्या राजाराणीनें फ्रान्सला भेट दिली व इंग्लंड-फरान्स मैत्रीचें संबंध दृढ केले. डिसेंबरमध्यें हेर व्हॉन रिबेंट्रॉप फरान्समध्यें आला व जर्मनीला लढाई नको व त्याची कोणत्याहि प्रांताची मागणी नाहीं असा करार झाला. १९३९ च्या मे मध्यें जर्मनीनें डॅन्झीगची मागणी केली. यामुळें फरान्स व ब्रिटन यांचे संबंध दृढ होऊन जर्मनीच्या विरुद्ध पोलंडला मदत करण्याचें ठरलें. १ सप्टेंबरला जर्मनीनें डॅन्झीग घेतल्याचें व पोलंडविरुद्ध लढाई सुरूं केल्याचें जाहीर केलें. त्यामुळें ब्रिटन व फरान्सहि ३ सप्टेंबरला जर्मनीविरुद्ध लढाईत पडले. फ्रान्सच्या पूर्वसरहद्दीवर जर्मनी, फ्रेंच व इंग्लिश यांच्या सैन्यांत तुंबळ युद्ध चालूं आहे. या युद्धाच्या निकालावरच सध्या फरान्स व जर्मनीचे संबंध व भवितव्य अवलंबून आहे.

फ्रान्स, अनातोल (१८४४–१९२४):–एक विख्यात फ्रेंच लेखक. व्हॉल्टेयर व रेनन् (Renan) या महान् लेखकांचा मानसपुत्र (Spiritual Son). याचें खरें नांव जेकस् (Jacques) अनातोल थिबॉल्ट असें होतें; पण त्यानें टोपण नांव म्हणून फ्रान्स अनातोल हें नांव धारण केलें. याचा जन्म इ. स. १८४४, १६ एप्रिल रोजीं पॅरिसमध्यें झाला. याच्या बापानें पुस्तकांचें दुकान काढलें होतें. या दुकानांत अनेक साहित्यिक जमून चर्चा करीत असत. या चर्चेचा अनातोलच्या मनावर

साहजिकच चांगला परिणाम झाला व त्याला साहित्य-विषयक आवड उत्पन्न झाली.


अनातोल फ्रान्स

तेव्हां अगदीं लहानपणापासून त्यानें साहित्याचा अभ्यास चालविला. इ. सन १८६८ सालीं त्यानें A Story of Alfred de Vigny हें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें. इ. सन १८७३ व १८७६ सालीं काव्याचे दोन ग्रंथ प्रसिद्ध केल्यावर तो गद्यवाङ्मयाकडे अधिक लक्ष घालूं लागला. इ. स. १८७३ सालीं Jocaste et de chat Maigne या नांवाच्या गोष्टी त्यानें लिहून प्रसिद्ध केल्या.

फरान्सनें अनेक कादंबऱ्या, उपहासगर्भ लेख व टीकालेख लिहिले. त्यांपैकीं महात्त्वाचे खालीं देत आहों:—

Le Crime de Sylvestre Bonnard (१८८१), Le Livre de Mon Ami (१८८५), Balthasar (१८८९), Thais (१८९०), Les Opinions de M. Jerome Coignard (१८९३), M. Bergeret a Paris, History of Jenne d' Arc (१९०८). L'lle des Pingouins (१९०८), La Revolte des Anges (१९१४).

त्याच्या अनेक पुस्तकांचें इंग्लिश भाषेंत भाषांतर झालें आहे.

ड्रेकस केसमध्यें झोलानें मांडलेल्या बाजूस याचा पूर्ण पाठिंबा होता. लष्करशाहीविरुद्ध असल्यानें गेल्या महायुद्धांत फ्रान्सनें योजलेल्या धोरणास त्याचा पूर्ण पाठिंबा होता. युद्धविषयक फ्रेंच धोरणांतील ध्येयवादीपणास (Idealism) उचलून धरणारे अनेक लेख त्यानें लिहिले आहेत. त्यापैकीं इ. स. १९२० ऑगस्टमध्यें लिहिलेला लेख सर्वोत्कृष्ट झाला आहे. ही थोर विभूति इ. स. १९२४, १३ आक्टोबर रोजीं ख्रिस्तवासी झाली.

विद्वान्, बहुश्रुत व वास्तववादावर अधिष्ठित अशा या लेखकानें फ्रेंच साहित्यांत महत्त्वाचें स्थान पटकावलें आहे. त्यास कादंबरीकारापेक्षां उपहासगर्भ लेखक (Satirist) असेंच म्हणणें ज्यास्त सयुक्तिक होईल. निःपक्षपाती इतिहासकार म्हणूनहि जग त्यास ओळखते. प्राचीन दंतकथांतूनहि त्यानें ध्वनित केलेला तत्त्वबोध एखाद्या शास्त्रज्ञास साजेल असाच आहे.

फ्रॉइड, प्रो. सिगमंड (१८५६–१९३९):–ऑस्ट्रियन शास्त्रज्ञ. याचा जन्म मेरेव्हियांतील फ्रीबर्ग येथें ता. ६ मे १८५६ रोजीं झाला. यांचें शिक्षण प्रथम व्हिएन्ना येथें झालें; पुढें पॅरिसमध्यें व इतर ठिकाणीं अभ्यास केल्यानंतर त्यांची व्हिएन्ना येथें मज्जातंतूवरील औषधोपचार शास्त्राच्या प्राध्यापकाच्या जागी नेमणूक झाली (Professor of Therapeutics of pneumatic diseases).

फ्रॉइडनें मज्जातंतुविकाराविषयीं असा शोध लावला कीं मनाचे जाणीव असलेले व जाणीव नसलेले असे दोन भाग आहेत; जाणीव असलेलें मन सामाजिक शिकवणुकीला अनुसरून वागण्याचा व सुधारणेनुसार निर्बंध पाळण्याचा प्रयत्न करतें; जाणीव नसलेलें मन पूर्णतः अथवा अंशतः दडपलेल्या मूळच्या प्रवृत्तींना वाव देण्याचा प्रयत्न करतें; या दोन मनांच्या झगड्यामुळें पुष्कळसे मज्जातंतुविकार निर्माण होतात. दडपलेल्या भावनांची मनाला जाणीव होईल असें केल्यानें रोग्याला स्वतःच्या मनांतील झगड्याचें ज्ञान होतें व रोगाची लक्षणें नाहींशीं होतात. याकरितां फ्रॉइडनें मानसिक व्यापारांचें पृथक्करण करण्याची पद्धति शोधून काढली. कोणत्याहि प्रकारच्या वेडाच्या (Fantasy) कारणाचा शोध करतांना या पद्धतीचा उपयोग होतो. ही पद्धती स्वप्नांच्या बाबतींत विशेष उपयोगी पडते. फ्रॉइडच्या मतें स्वप्न म्हणजे दडपलेल्या इच्छांची लटकी (disguised) व सांकेतिक (symbolic) तृप्ति.

फ्रॉइडचे महत्त्वाचे ग्रंथ इंग्रजींत भाषांतरिले आहेत, तें पुढीलप्रमाणें–Selected Papers on Hysteria (गर्भाशयोन्मादावरील निवडक लेख); Interpretation of dreams, Delusion and Dreams, Psychopathalogy of Every-day life; Three Contributions to the Theory of Sex, Totem and Taboo; Beyond the Pleasure Principle; Future of an illusion.

ऑस्ट्रियाची राजकीय परिस्थिति बिघडल्यामुळें जरी त्याला त्रास झाला तरी त्यानें आपलें संशोधन चालू ठेविलें. १९३० सालीं त्याला गोइटे प्राइझ मिळालें. १९३६ सालीं तो रॉयल सोसायटीचा सभासद झाला. त्याच्या Interpretation of Dreams या ग्रंथांत त्याचें बहुतेक संशोधन सामावलें आहे. हिटलरनें आस्ट्रेलिया घेतल्यावर मार्च १९३८ मध्यें तो व्हिएन्ना शहर सोडून लंडनमध्यें येऊन राहिला. तो ता. २४ सप्टेंबर १९३९ रोजीं लंडन येथेंच खिस्तवासी झाला.

फरेड्रिक दि ग्रेट (१७१२–१७८६):–प्रशियाचा राजा. याचा जन्म बर्लिन येथें जानेवारी २४, १७१२ त झाला. पहिला वुइल्यम फरेड्रिकचा हा मुलगा. लहानपणीं यास बापाच्या लष्करी महत्त्वाकांक्षा आवडत नसल्यानें त्यानें आपल्या कवायतशिक्षकाच्या हातावर तुरी देऊन दूर पळ काढला व संगीत, तत्त्वज्ञान यांचा अभ्यास सुरू केला; पण लवकरच त्यास पकडण्यांत आलें. त्याच्यावर दहशत बसावी, म्हणून बापानें कॅटे नांवाच्या एका मनुष्यास त्याच्यासमक्ष फांशी देवविलें व फरेड्रिकलाहि फांशी देण्याची धमकी दिली.

यानंतर फ्रेड्रिकनें विरोध सोडून देऊन बापाशीं नमतें घेतलें. त्याच्या लग्नानंतर दुसरे वर्षी ऱ्हाइन्वर सुरू केलेल्या हल्लयांत तो राजपुत्र युजेन यास जाऊन मिळाला. यानंतर त्यानें व्हॉल्टेयर याच्याशीं पत्रव्यवहार सुरू केला व (Anti-Machiavel) हें पुस्तक प्रसिद्ध केलें. या पुस्तकांत त्यानें 'राजा हा लोकांचा पहिला सेवक' असें वर्णन केलें आहे.

इ. स. १७४० मे ३१ रोजीं, फरेड्रिकचा बाप मृत्युवश झाल्यावर फरेड्रिक हा गादीवर बसला. त्याच वर्षी आस्ट्रियाचा बादशहा सहावा चार्लस हा मरण पावला व त्याची मुलगी मेरिया थेरेसा ही गादीवर बसली. तिनें फरेड्रिकचा सायलेसियावर हक्क असल्याचें नाकबूल केल्यानें लढाई सुरू झाली.

फेड्रिकनें कूच करून ब्रेस्लॉ (Breslaw) हें शहर १७४० डिसेंबरमध्यें घेतलें व १७४१ च्या वसंत ऋतूंत ऑस्ट्रियन सैन्याशीं सामना दिला. मॉलविट्झ येथें १० एप्रिल १७४१ रोजीं जी एक मोठी लढाई झाली तींत ऑट्रियन सैन्यानें फ्रेड्रिकच्या सैन्याचा पराभव करून त्यांस माघार घेण्यास भाग पाडलें; तथापि लवकरच लढाईचा रंग पालटला. फरेड्रिकचा सेनापति मार्शल श्वेरिन (Schwerin) यानें ऑस्ट्रियन सैन्याचा धुव्वा उडविला; त्यामुळें सायलेसिया हा भाग फरेड्रिकच्या हाताखालीं आला; तथापि ऑस्ट्रियन सैन्याचा संपूर्ण पाडाव अद्याप झाला नव्हता. तो पाडाव १७ मे १७४२ रोजीं झाला. यावेळीं त्याच्या सैन्याची डावी फळी संपूर्णपणें पराभूत झाली होती; तेव्हां त्यानें उजव्या फळीच्या साह्यानें शत्रूवर तुटून पडून जय मिळविला. फरेड्रिकचें युद्धविषयक तंत्र असेंच होतें. शत्रूला आपल्या सैन्यापैकीं कांहीं भाग बळी देऊन फुशारू द्यायचें व मग एकदम त्याच्यावर निकरानें हल्ला करून त्याचा धुव्वा उडवायचा.

यानंतर फ्रेड्रिकनें आपल्या स्वामित्वाखालीं असलेल्या प्रदेशांचा उपभोग घेण्याचा व संगीत, साहित्य वगैरे कलांचा मनमुराद अभ्यास करण्याचा निश्चय केला; आपलें सैन्य सुधारण्याचेंहि त्यानें ठरविलें. तो नेहमीं बरोबर पहाटें चार वाजतां उठे व आपला युनिफॉर्म व उंच बूट घालून कामास बसे. सकाळीं नऊ वाजेपर्यंत आपल्या सेक्रेटरीबरोबर काम आटोपल्यावर तो सैन्याचे अधिकारी व इतर सर्वसामान्य मंडळी यांना मुलाखती देई. तो दोनप्रहरीं बारा वाजतां भोजन करी. निरनिराळया राष्ट्रांतील उत्तमोत्तम आचारी आणवून त्यांनीं केलेल्या पक्वान्नांचा तो समाचार घेई; जेवणाच्या शेवटीं शॅंपेन (Champagne) पीत असे. यानंतर चारपर्यंत तो जलदीनें चालत असे व चालत चालतच राजकीय व शैक्षणिक बाबी यांचा विचार करीत असे. बरोबर सहा वाजतां तो संगीत, नृत्य वगैरे कार्यक्रमांनीं युक्त अशा जलशास हजर राहत असे. रात्रीं अकरा वाजतां तो झोपत असे.

मध्यंतरीं ऑस्ट्रियानें युद्ध चालविलेंच होतें; पण फरेड्रिकच्या डावपेचांपुढें व त्याच्या सेनापतींच्या हिकमतीपुढें ऑस्ट्रियनांना हारच खावी लागून इ. स. १७४५च्या नाताळांत तह झाला. त्याअन्वयें सालेसिया हा भाग संपूर्णपणें फरेड्रिकच्या अधिराज्याखालीं आला. इ. स. १७५६च्या पावसाळ्यांत इतिहासप्रसिद्ध सप्तवार्षिक युद्धास (Seven Years' War) सुरवात झाली.

या लढाईच्या शेवटीं प्रशियाची स्थिति काय होती याचें बहारीचें वर्णन लॉर्ड मेकॉलेनें आपल्या निबंधांत केलें आहे. फ्रेड्रिकच्या वयास पन्नास वर्षें होऊन गेलीं होतीं; तथापि त्यानें पूर्वीच्याच जोमानें 'उपकारी सुलतान' (Benevolent Despot) म्हणून आणखी

२३ वर्षें राज्य केलें. त्याच्या राज्यांतील कोणतेंहि एक खातें असें नव्हतें कीं ज्यांत त्यानें ढवळाढवळ केली नाहीं. लहर येतांच तो वाटेल त्या न्यायाधिशाला तुरुंगांत डांबून टाकी, रोमन चर्चसाठी कोणीहि कार्डिनल नेमे, वाटेल त्या सेनापतीला कित्येक आठवडे अटकेंत ठेवी, साग्रसंगीत नाट्यगृहें बांधवून घेई, व लढाईच्या घोड्यांना नांगरास जुंपवी, आणि हें सर्व काव्याचीं पुस्तकें प्रसिद्ध करतांना व राष्ट्र वकिलांना सल्ला देत असतां मधून मधून करीत असे. इ. स. १७७२ सालीं पोलंडची फाळणी करण्याचें पाप त्यानें केलें; त्यामुळें कित्येक वर्षें पोलंड रशियाचाच एक भाग म्हणून राहिला.

हा थोर पुरुष १२ १७८६, ऑगस्ट रोजीं मरण पावला.

फरेडरिक मार्च (१८९८-):—विख्यात सिनेमा नट. याचा जन्म रॅसिन, विस्कोन्सीन येथें ३१ ऑगस्ट १८९८ रोजीं झाला. याचें नांव फरेडरिक मॅकइन्टायर असें आहे. 'असिस्टंट स्टेज मॅनेजर' या नात्यानें त्यानें धंद्यास सुरवात केली. पण पुढें त्यानें नटाचाच पेशा पत्करला. भरपूर सहा फूट उंची, पिंगट व तीक्ष्ण डोळे आणि भरदार शरीरयष्टि यामुळें चित्रपटचालकांचें लक्ष याचेकडे वेधलें. The Dummy ही त्याची पहिली फिल्म (चित्रपट) होय. यानंतर The Sign of The Cross, The Eagle and The Hawk, Dr. Jekyll and Mr. Hyde, Dark Angel, Anna Karenina, A Star is Born या बोलपटांत नायकाचीं कामें करून त्यानें कीर्ति मिळविली.



फ्रेडरिक मार्च

ब

बक्, पर्ल सिडेन स्ट्रिकर (१८९२-):—एक प्रख्यात अमेरिकन कादंबरीकार स्त्री. हिला १९३८ सालीं वाङ्मयाबद्दल नोबेल प्राइज मिळालें. हिचा जन्म हिल्सबरो येथें २६ जून १८९२ मध्यें झाला. हिचा बाप चिनी मिशनरी होता. तिचें बहुतेक बालपण चिंकियांग येथेंच गेलें व इंग्लिश बोलावयास शिकण्यापूर्वी चिनी भाषाच ती प्रथम शिकली. उच्च शिक्षण घेण्यासाठीं ती युनायटेड स्टेटस्‌कडे परतली व इसवी सन १९१४ सालीं रँडॉल्फ मॅकन कॉलेजमधून ग्रॅज्युएट झाली. इ. स. १९२१ ते ३१ पर्यंत नानकिंगच्या विश्वविद्यालयांत तिनें प्राध्यापकाचें काम उत्तम तऱ्हेनें केलें. तिनें १९२१ ते १९३७ या कालांत अव्वल दर्जाच्या कादंबऱ्या लिहून प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांपैकीं महत्त्वाच्या येथें दिल्या आहेत. East wind West wind (१९२१), The Young Revolutionist (१९३१), The Good Earth (१९३१), Sons (१९३२), A House Divided (१९३५), House of Earth (१९३५), The Exile and Fighting Angel(१९३६) व This Proud Heart (१९३७) यांपैकीं 'गुड अर्थ' कादंबरीवरून तयार केलेला त्याच नांवाचा बोलपटही अत्यंत लोकप्रिय झालेला आहे. बक पर्लचें खरें नांव मिसेस रिचर्ड जे. वॉल्श असून बक पर्ल हें लेखनाच्यासाठीं घेतलेलें टोपण नांव होय.

बगळा, बदामी:—हा पक्षी अंगानें पाणबगळ्यापेक्षां मोठा व रंगानें पांढरा सफेत असतो. याची चोंच पिवळी असून याचे पाय काळ्या रंगाचे असतात. अंडीं घालण्याच्या सुमारास याच्या, डोकें, मान व पाठ या अवयवांवरील पिसांचा रंग विटेप्रमाणें तांबडा दिसतो. कित्येक लोक यालाच 'गायबगळा' असें म्हणतात. हें नांव, हा पक्षी, भक्ष्यशोधार्थ गायी—म्हशी सारख्या जनावरांच्या मागून जातो म्हणून पडलें असावें असा तर्क आहे.

गवतांतील, टोळ, किडे, नाकतोडे व जनावरें व डुकरें यांच्या अंगांवरील गोचड्या आणि उवा यांवर हा आपली उपजीविका करतो. हा बगळा आपलें घरटें बहुत करून चिंचेच्या झाडावर काटक्यांचें करतो. यांत मादी फिकटशा हिरव्या, निळ्या किंवा पांढऱ्या रंगाचीं ४।५ अंडीं घालते. याच्या लहान व मोठ्या अशा दोन जाती आहेत.

बटाटे:—(वडे) **साहित्य**—बटाटे, टामेटो, तिखट, मीठ, लिंबू, साखर, ओलें खोबरें, भुईमुगाच्या

दाण्याचें कूट, डाळीचें पीठ, हिरवा आंबा, गोडें तेल, जिऱ्याची पूड. **कृति**–प्रथम सहासात बटाटे उकडून घ्यावेत. नंतर ते सोलून त्यांच्या मानानें तिखट, मीठ, थोडी चवीसाठीं साखर, जिऱ्याची पूड घालून तो गोळा बारीक वाटून ठेवावा. चार टामेटो बारीक चिरून त्याच्यांत अजमासानें हिरव्या मिरच्यांचे तुकडे, मीठ, लिंबू, साखर, दाण्याचें कूट व हिरवा आंबा साल काढून बारीक चिरून घालावा. हें बटाट्याच्या आंत घालावयाचें सारण तयार झालें. नंतर हरभऱ्याच्या डाळीचें पीठ सुमारें अर्धी वाटी घेऊन त्याच्यांत तिखट, मीठ, हळद घालून तें अगदीं पातळ पाणी घालून कालवावें. मग बटाट्याची एक लहानशी गोळी घेऊन त्याची मोदकासारखी पापडी करून त्याच्यांत टामेटोचें तयार केलेलें सारण घालावें व तोंड बंद करावें. नंतर हा वडा डाळीच्या पिठांत बुचकळून तेलांत तळून काढावा. हे वडे खाण्यास फार चांगले लागतात.

(जिलबी)–**साहित्य**–पिवळे व चिकट असलेले बटाटे, तूप, साखर, केशर व लिंबू. **कृति**–बटाटे उकडून सोलून बारीक वाटावेत. नंतर त्याचीं कडबोळीं वळून तीं तुपांत तळून काढावींत. साखरेचा पाक करून त्याच्यांत केशराची पूड व लिंबू पिळावेत. जिलबी-प्रमाणेंच पाक करावा. त्या पाकांत तळलेलीं कडबोळीं बुचकळून काढावींत.

(सबंध बटाट्यांची भाजी) **साहित्य**–बटाटे, मिरची, कोथिंबीर, मीठ, साखर, खोबरें, जिरें व हिंग. **कृति**–लहान लहान बटाटे उकडून घ्यावेत. मिरची, कोथिंबीर वगैरेवरील सर्व जिन्नस एकत्र करून त्यांची बारीक चटणी वाटावी. नंतर बटाट्याचीं सालें काढून तो सबंध बटाटा घ्यावा. त्याला बारीक उलथन्याच्या अगर दाभणाच्या टोकानें पोखरून त्याच्यांत वाटलेली चटणी घालून पोखरून जो बटाट्याचा गोळा निघतो त्यानेंच तोंड बंद करावें. असे सर्व बटाटे भरून झाल्यावर पातेल्यांत तेलाची फोडणी करून त्यांत हे सर्व बटाटे टाकावेत व मंदाग्नीवर लालसर असे तळून काढावेत.

(भाजी प्रकार १ ला)–**साहित्य**–बटाटे, तिखट, मीठ, जिरें, साखर, कोथिंबीर. **कृति**–बटाटे धुऊन उकडावे. नंतर त्याचीं सालें काढून त्याच्या फोडी कराव्यात व त्यावर त्यांच्या अजमासें तिखट, मीठ, वगैरे सर्व पदार्थ घालून ठेवावेत. नंतर तेलाची फोडणी करून त्याच्यावर ह्या फोडी कालवून टाकाव्यांत व मंदाग्नीवर चांगल्या परतवून घ्याव्यांत. खालीं उतरल्यावर कोथिंबीर व ओलें खोबरें घालावें.

(प्रकार २ रा)–**साहित्य**–पहिल्या प्रकारांतीलच. **कृति**–बटाटे धुवून न उकडतां साली काढून पातळ चकत्या कराव्यात. नंतर कढईत हिंग घालून तेलाची फोडणी करून त्याच्यांत चकत्या टाकाव्यात व मंदाग्नीवर परतवून घ्याव्यात. बटाट्याच्या चकत्या मऊ झाल्या कीं मग तिखट, मीठ, जिऱ्याची पूड, साखर हे पदार्थ घालून पुन्हा भाजी परतावी. चांगली झाल्यानंतर खालीं उतरून कोथिंबीर व खोबरें घालावें.

(चॉप्स)–**साहित्य**–बटाटे, तिखट, मीठ, हळद, ओलें खोबरें, कोथिंबीर, जिऱ्याची पूड, साखर, लिंबू, कणीक, डाळीचें पीठ, तेल व हळद. **कृति**–बटाटे उकडून त्याचे अगदीं बारीक काप करावेत. त्याच्या अजमासें तिखट, मीठ वगैरे सामान घालून तें मिसळून तेलावर अगर तुपावर चांगली फोडणी करून ते काप चांगले परतवून घ्यावेत. हें सारण तयार झालेनंतर हरभऱ्याच्या डाळीचें पीठ व कणीक निम्मेनिम घेऊन त्यांत लोणी अगर तेल यांचें मोहन घालून तिखट, मीठ, हळद हे पदार्थ त्यांत घालून पोळीच्या कणके-सारखे भिजवावेत. नंतर त्याच्या लहान लहान पुऱ्या करून त्यांत तयार केलेलें सारण लिंबू पिळून घालावें व त्याला पेढ्यासारखा आकार देऊन तेलांत अगर तुपांत तळून काढावेत.

(चिवडा) **साहित्य**–बटाटे, तिखट, मीठ, जिऱ्यांची पूड, साखर, दाणे, तूप. **कृति** बटाटे धुवून त्याची साल निघेल एवढेंच उकडून घ्यावेत. जास्त उकडूं नयेत. नंतर ते ऊन असतांनाच त्याचीं सालें काढावींत. मग उन्हांत धोतर पसरून मोठ्या खिसणीनें हे बटाटे एके ठिकाणीं गोळा न होऊं देतां निरनिराळ्या जागीं खिसावेत. खीस २।३ दिवसांत चांगला वाळतो. वाळल्यावर डब्यांत भरून ठेवावा. मग कढईत तूप घालून हा खीस थोडा थोडा घालून तळून घ्यावा. तळून झाल्यावर त्याच्या अजमासें, तिखट, मीठ, साखर, जिऱ्याची पूड घालावी. भुईमुगाचे भाजलेले दाणेही थोडे तुपावर परतवून घेऊन मग ह्याच्यांत घालावे. हा चिवडा उपासास चालतो. बटाट्याचा खीस वर्षभर टिकतो.

(पापड)—**साहित्य**—बटाटे, तिखट, मीठ, जिरें, शिंगाड्याचें किंवा केळयांचें पीठ. **कृति**—बटाटे उकडून त्याचीं सालें काढून वाटावेत. नंतर त्याच्यांत त्यांच्या अजमासानें तिखट, मीठ, जिऱ्याची पूड घालून त्याच्यांत शिंगाड्यांचें किंवा केळयांचें पीठ लाटतां येण्यासारखें होईपर्यंत घालून मळावें. त्याच्या सुपारीएवढ्या गोळया करून त्या शिंगाड्याच्या अगर केळयांच्या पिठावर लाटून पापड उन्हांत वाळवावे हे उपासाला चालतात.

(**रस्सा** प्रकार १ ला) **साहित्य**—बटाटे, नारळ, आंबट दहीं, हळद, कांदा, लसूण, आलें, कोथिंबीर, मिरच्या, धणे, जिरें, लवंगा, जायफळ, दालचिनी, हिंग, लिंबें. **माप**—सहा मोठें बटाटे, तीन नारळ, चिमूटभर हळद, दोन कांदे, एक लसणाचा कांदा, पैशाएवढें आलें, थोडी कोथिंबीर, अजमासें मिरच्या, मोठा चमचा भरून धणे, अर्धा चमचा जिरें, दहा बारा लवंगा, वेलदोडे, एक जायफळ, थोडी दालचिनी व दोन लिंबें. **कृति**—बटाटे टोचणीनें टोचून एका बटाट्याच्या आठ ह्याप्रमाणें फोडी कराव्यात. त्या फोडींना थोडें आंबट दहीं व हळद लावावी व त्या फोडी तेलांत परतवून घ्याव्यात. नंतर कांदा, लसूण, आलें, कोथिंबीर व मिरच्या हे सर्व जिन्नस निरनिराळे वाटावेत. धणे, जिरें, लवंगा, वेलदोडे, जायफळ व दालचिनी हे सर्व जिन्नस पाणी घालून बारीक वाटावेत. लिंबाचा रस काढून ठेवावा. नारळाचें दूध काढावें. कल्हईच्या भांड्यांत स्वयंपाकाच्या दोन पळ्या तेल घालून चांगली खमंग फोडणी करावी व त्यांत वाटलेला कांदा लसूण लाल होईपर्यंत परतवून घ्यावा. नंतर त्यांतच वाटलेल्या मिरच्या थोड्या परताव्या व आल्यासह वाटलेला सर्व मसाला घालून सारखें ढवळावें. नंतर त्यांत नारळाचें दूध ओतून लगेच त्या तळलेल्या फोडी, लिंबाचा रस, बेतानें साखरमीठ घालून एक उकळी फुटली कीं उतरावा.

(रस्सा प्रकार २रा)—**साहित्य**—बटाटे, नारळ, टामेटो, धणे, मिरच्या, मीठ, साखर अगर गूळ, थोडी चिंच व तीळ. **माप**—पांच सहा बटाटे, एक नारळ चांगले पिकलेले चार मोठे टामेटो, चहाचे चार चमचे धणे, पिकलेल्या चार मिरच्या, मीठ अजमासें, अर्धा लिंबाएवढी चिंच, तितकाच गूळ किंवा साखर, चार चमचे (चहाचे) तीळ. **कृति**—बटाटे उकडून सालें काढून त्याच्या फोडी कराव्यात. टामेटो चिरून घ्यावेत. तीळ भाजून घ्यावेत व थोडें तेल घालून धणे व मिरच्या परतवून घ्याव्या. खोबरें खवणून घ्यावें. नंतर खोबरें, मिरच्या, धणे, तीळ एकत्र करून बारीक वाटावे. चुलीवर कल्हईचें पातेलें ठेवून त्यांत बटाट्याच्या व टामेटोच्या फोडी घालून एक शेर पाणी घालावें. चिंच कोळून घालून गूळ, मीठ घालावें. नंतर तें सर्व चांगलें शिजवावें. शिजून मिळून आल्यावर त्याला तेलाची अगर तुपाची फोडणी द्यावी.


(कोशिंबीर)—**साहित्य**—बटाटे, कांदा, ओलें खोबरें, ओल्या मिरच्या, मोहरीची पूड, मीठ, साखर, दहीं व तुपाची फोडणी. **कृति**—बटाटे उकडून घ्यावेत. नंतर ते सोलून त्याच्या बारीक फोडी चिराव्यात. कांदा बारिक चिरून घ्यावा. मिरच्या व कोथिंबीर बारीक चिरून घ्यावी. नंतर ते सर्व पदार्थ एकत्र घालून हिंग घालून तुपाची फोडणी द्यावी व नंतर त्याच्यांत दहीं घालून ते कोशिंबीर कालवून वाढण्यास घ्यावी.

(वड्या)—**साहित्य**—बटाटे, साखर, नारळ, वेलदोडे, बदाम, जायफळ, केशर. **माप**—एक शेर बटाटे, अच्छेर साखर, एक नारळ, १५ बदामाचे गर, चहाच्या पाव चमचा जायफळाची पूड व अर्धा चमचा वेलदोड्याची पूड व केशर थोडें **कृति**—बटाटे उकडून त्याचीं सालें काढून ते बारीक वाटावेत. बदाम भिजत घालून त्याचे बारीक काप करावेत. नारळ खवणून घ्यावा. केशराची चांगली बारीक पूड करावी. नंतर बटाटे, खोबरें, साखर एकत्र करून तें एका पातेल्यांत घालून चुलीवर ठेवावें. जाळ फार मोठा असूं नये. नंतर तें एकसारखें घोटत रहावें. वडी बनेल असें वाटलें कीं पातेलें खालीं उतरून त्यांत वरील सर्व मसाला घालून तें एकत्र घोटावें. नंतर थाळ्याला तूप लावून त्याच्यांत तो गोळा चांगला सारखा थापावा. निवाल्यावर वड्या कापाव्यात.

बडीशेपः—पोट फुगल्यावर बडीशेपचें चूर्ण (चार पांच मासे) पाण्यांत कालवून घेतलें तर ताबडतोब उतार पडतो. अग्निमांद्य, अवरोध, पोट फुगणें ह्यांवर रोज रात्रीं एक तोळा बडीशेप खाऊन निजावें. गुण येतो. ह्याचा आमांशावर फार उपयोग होतो. चूर्ण करण्याची रीत—**साहित्य**—पावशेर बडीशेप, दोन तुकडे सुंठ, पांच आवळयांची आवळकाठी व चहाचा चमचा भरून खसखस. **कृति**—पावशेर बडीशेप-

मधल्या निम्म्या बडीशेपा लालसर होईपर्यंत तव्यावर परताव्यात व निम्म्या तशाच ठेवाव्यात. सुंठ, आवळकाठी, खसखस हे सर्व जिन्नस घालून वस्त्रगाळ पूड करावी. पुडीच्या निम्म्यानें पिठीसाखर घालावी. म्हणजे चूर्ण तयार होतें.

बडोदें:—गायकवाड सरकारची राजधानी. हें शहर बी. बी. सी. आय. रेल्वेच्या मुख्य रस्त्यावर आहे. गुजराथींत याला वडोदरा म्हणतात. या शहराचीं पूर्वींचीं नांवें वटपत्रक, वीरावती, चंदनवती व दौलताबाद हीं होत. या गांवाचा इतिहास इ. स. ८१२ पासून सुरू होतो. या ठिकाणीं राष्ट्रकूट, रजपूत, मुसलमान व मराठे यांनीं सत्ता स्थापिली. राष्ट्रकूटांच्या वेळीं या गांवाला 'वटपद्रक' म्हणत असून त्यावेळीं या गांवची लांबीरुंदी एक चौरसमैल होती. या गांवाभोंवतीं मुसलमानांपासून संरक्षण करतां येण्यासाठीं १४ व्या शतकांत रजपुतांनीं किल्ला बांधला. पुढें १५व्या शतकांत मुसलमानांची सत्ता सुरू झाल्यावर येथें कोट व बुरूज उभारले. १६ व्या शतकांत हजेरा नांवाची (अनेक कबरी असलेली) इमारत बांधली. यानंतर येथें (१८व्या शतकांत) मराठ्यांची अधिसत्ता स्थापन झाल्यानें पुढील सर्व सुधारणा गायकवाड सरकारांच्याच राजवटींतील होत असें म्हणावयास हरकत नाहीं. जुन्या सरकारी वाड्यापासून तों कीर्तिमंदिरापर्यंत झालेल्या सर्व इमारती




बडोदें-लक्ष्मीविलास राजवाडा. २. कॉलेजची इमारत. ३. लक्ष्मीविलास राजवाड्यांतील एक चौक. ४. मकरपुरा राजवाडा.

गायकवाड—विशेषतः सयाजीराव गायकवाड—यांच्या अमलांतील होत. बडोदा शहराच्या सुधारणेस खरा प्रारंभ, कै. श्री. तिसरे सयाजीराव १८७५मध्यें गादीवर बसल्यापासूनच झाला. या शहराचा सध्यां आठ चौरस मैल विस्तार असून त्याची लोकसंख्या ११२८६० आहे. गांवांतील प्रमुख रस्ते डांबराचे असून गांवांत हिंदु, जैन, मुसलमान, पारशी, खिस्ती, युरोपियन या लोकांची वस्ती आहे. गांवांतील मांडवी, सेंट्रल लायब्ररी, न्यायमंदिर, सूरसागर; नजरबाग, लक्ष्मीविलास, मकरपुरा हे राजवाडे; पदार्थसंग्रहालय, पशूपक्षीसंग्रहालय, झुलता पूल, कलाभवन, इंदुमतीमहाल, सार्वजनिक बाग, कॉलेज हायस्कूल, हॉस्पिटल; सयाजी-विहार क्लब, खंडेराव मार्केट व कीर्तिमंदिर हीं ठिकाणें पाहाण्यासारखीं आहेत. शहराचे सयाजीनगर, रावपुरा, वगैरेसारखे एकूण तेरा भाग आहेत.

परस्थ माणसाला हें शहर भव्य, शोभिवंत, सुंदर, सुखसोयींनीं युक्त पाहून आनंद वाटतो. त्याचें मन प्रसन्न होतें व आपण होऊनच तो या शहराची परक्याजवळ प्रशंसा करूं लागतो.

बदकः-मनुष्याच्या उदरनिर्वाहास उपयोगीं पडणारा पक्षी. कांहीं लोक याचें मांस व अंडीं खात



बदक

असल्यामुळें बदकांना पाळतात. याच्या अंगाची ठेवण नांवेप्रमाणें असते. पिसें तेलकट व पाय मागच्या बाजूस असून पडद्याचे असतात त्यामुळें हा पाण्यांतून सुखानें विहार करतो. पंखांच्या पुष्कळपणानें व तेलकटपणानें यास पाण्याचा उपसर्ग न होतां शरीरांतील ऊब कायम राहते. पायांचा उपयोग निःशंकपणें ओलाप्रमाणें होतो. कांहीं बदकें पांढऱ्या शुभ्र रंगाचीं असतात. कांहीं काळींही असतात. कांहीं पांढऱ्या रंगावर काळे ठिपके असलेलीं असतात तर कांहीं धड तेवढें पांढरें व मान काळी असलेलीं असतात. याची मान लांब असते. बदकाची चोंच रुंदट, चपटी व मोठी असून तिच्या मदतीनें तें चिखलांतील, डबक्यांतील किंवा गटारांतील किडे व बारीकसारीक इतरही प्राणी पकडतें. हा पक्षी दांत नसल्यामुळें किडे गिळतो. गिळतांना तो मचमच असा आवाज करतो. याचे पिवळ्या रंगाचे नाजूक पाय त्याच्या शरीराच्या मध्यापेक्षां थोडे मागेंच असतात. त्याचा कलही मागेंच. बदकाच्या पायाला धरून उचलल्यास तें निकामी होतें म्हणून त्यास उचलायचेंच झाल्यास मानेला धरून उचलावें. त्याच्या अवजडपणामुळें व पायाच्या आंखूडपणामुळें जमिनीवर त्यास चांगले चालतां येत नाहीं. याची शेपूट आंखूड असते. पाण्यांतील लहान बेडूक, मासे व किडे तसेंच धान्य झाडपाला यांवरही तें जगतें. बदकाची मादी पांच सहा महिने खुडूक बसते व पांच सहा महिने अंडीं घालते. अंडीं उबवण्याचा मादीला फार कंटाळा येतो. म्हणून तिचीं अंडीं कोंबडीकडून उबवावीं लागतात. अंड्यांतून पिलूं एक महिन्यानें बाहेर येतें. प्रथमतः त्याच्या अंगावर पिसें नसतात. पिलाची वाढ पूर्ण होण्यास तीन महिने लागतात. हा पक्षी अतिशय भित्रा आहे. संकटाच्या वेळीं पाण्यांत बुडून हा पळून जातो. पाळलेलें बदकें खुराड्यांत राहतात. पांच सहा बदकांच्या कळपांत एकच नर असतो.

बदामः—हा पदार्थ आपल्या नेहमींच्या खाण्यांतील पदार्थ आहे. ह्याच्या वृक्षाला वातामवृक्ष असें म्हणतात. बदामाचें पिकलेलें फळ मधुर व पौष्टिक आहे. ह्याच वाळलेल्या फळांतील जो गीर तोच जास्त उपयोगी व औषधी आहे. सबंध बदामाचें सार ह्याच गिरांत आहे. बदामाची बी, बिब्बा उततो त्यावर उगाळून लावावी. गुण येतो.

बदामाची खीर—बदामगीर पाण्यांत टाकून त्याचीं सालपटें काढून त्या बिया दुधांत बारीक वाटाव्या व दुधांत कालवाव्या व तें दूध आटवावें. दाट होत आल्यावर त्यांत खडीसाखर व तूप सोडावें व थोडा वेळ शिजवून उतरून ठेवावी. निघाल्यावर खावी. ही खीर शक्तिवर्धक असून मस्तक शूलासदी उपयोगी पडते.

वड्या–साहित्य–बदाम, तूप, साखर, खवा, केशर, वेलदोडे, जायफळ. **माप**–पावशेर बदाम, तितकीच साखर, अर्धा पावशेर खवा, चहाचे सहा चमचे तूप, केशर व वेलदोडे यांची पूड अजमासानें घ्यावी. **कृति**–बदाम खिसावेत अगर वाटावेत. नंतर तो खीस तुपांत भाजावा. साखरेचा पाक करून त्यांत बदामाचा खीस, खवा हें घालून तें मिश्रण चुलीवर घाटावें. वडी बनेल अशी गोळी झाल्यावर त्याच्यांत केशर, वेलदोडा व जायफळ यांची पूड घालावी व तें चांगलें थाळ्याला तूप लावून, घाटून ओतावें. निवाल्यावर वड्या कापाव्यात.

दंतमंजन–बदामाचीं सालें जाळून त्याच्यांत मीठ, कापूर व तुरटी घालून बारीक कुटावें, वस्त्रगाळ पूड करावी. हें दातांना फार चांगलें असतें.

बदामरोटी–साहित्य–बदाम, पिठीसाखर, जायफळ, वेलची, केशर, तूप. **माप**–शेरभर बदाम, शेरभर साखर, एका जायफळाची पूड, चहाचे दोन चमचे वेलदोड्याची पूड, दोन मासे खललेलें केशर, तूप अजमासानें. **कृति**–बदाम भिजत घालून सोलावेत व ते बारीक कुटावेत. नंतर पिठीसाखर, केशर, वेलदोडे व जायफळ यांची पूड व कुटलेल्या बदामाची पूड एकत्र करून मळावें. मळून चांगला गोळा न झाला तर त्याच्यांत ती गोळा होईपर्यंत घालावी व चांगलें मळावें. मग थाळ्यांत तें इंचभर जाड होईल असें थापावें व त्याच्यावर झांकण ठेवून तें मंदाग्नीवर ठेवावें. कांहीं वेळानें रोटी फुगून तयार होते. मग तिचे बरफीसारखे काप करून उपयोगांत आणावेत.

बदामी लेणीं:–हीं विजापूर जिल्ह्यांतील बदामी या तालुक्याच्या गांवाजवळ आहेत म्हणून यांना बदामी लेणीं असें म्हणतात. या ठिकाणीं सदर्न मराठा रेल्वेनें जातां येतें. बदामी येथें हिंदु व जैन लोकांनीं तयार केलेलीं लेणीं आहेत. या लेण्यांपैकीं नृसिंहाची मूर्ति अजूनहि आहे.

बद्धकोष्ठता:–आंतड्यास अगर त्याचे आसपासच्या भागांतील कोणत्याही अवयवास विशेष कोणताहि आजार नसतांना ज्यावेळीं मलविसर्जन नीट होऊं शकत नाहीं,अगर मल अतिशय घट्ट, रुक्ष, खड्यासारखा बनून, पडतो त्यावेळीं अशा असमाधानकारक मलविसर्जनास बद्धकोष्ठता किंवा Constipation असें म्हटलें जातें.

लक्षणें:–मलविसर्जन नीट न घडलें तर होणारीं लक्षणें बहुधा सर्वांच्या परिचयाचींच असतात. प्रथमतः प्रायः डोकें दुखणें, निरुत्साह वाटणें व गळल्यासारखें होणें, आणि नंतर जिभेवर पांढरा राब चढणें, अन्न न पचणें त्वचेवर फिकट पिवळेपणा येणें, रक्त कमी होणें, झोप न येणें व अंगावर पित्त अगर पुरोळ वगैरे उठणें हीं लक्षणें दृष्टोत्पत्तीस येतात. कित्येकांना कोठा साफ न झाला तर थोडा ज्वरहि येतो आणि त्याचें मान १०२° डिग्रीपर्यंत देखील चढूं शकतें. मल घट्ट झाल्यास केव्हां केव्हां जुलाबहि होतात व अशामुळें जुलाब होण्याचें कारण बद्धकोष्ठता हें असूं शकेल याकडे दुर्लक्ष्य होण्याचा संभव असतो. बद्धकोष्ठतेनें मूळव्याधहि होते व मोठ्या आंतड्यांत व्रण व सूज हीं उत्पन्न होऊं शकतात. स्त्रियांना बद्धकोष्ठता असल्यास त्याचें पर्यवसान गर्भाशयाचे विकृतींत होतें. तसेंच बद्धकोष्ठतेमुळें पायांवर नागमोडी शिरा उठणें, पायांवर सूज येणें, 'सायाटिका' नांवानें ओळखला जाणारा, ढुंगणांत मांडींत वगैरे कळ येण्याचा विकार होणें, पायांस बधिरपणा वाटणें इत्यादि परिणाम घडूं शकतात. त्याचप्रमाणें पुष्कळ दिवसांच्या बद्धकोष्ठतेमुळें मोठें आंतडें फुगून जास्तच अशक्त बनतें व मलजन्य विषें रक्तांत शोषलीं जाऊन अपाय करतात.

कारणें–हीं अनेक प्रकारचीं आहेत. उदाहरणार्थ, (अ) अन्नांतील किंवा आहारांतील दोष, (आ) आंतड्याची चलनवलन शक्ति कमजोर असणें, (इ)· पित्त व इतर आंत्ररस जे पचनक्रियेस आवश्यक असतात त्यांत उणेपणा असणें, इत्यादि–यांपैकीं (अ) या पहिल्या प्रकारांत मोडणारीं कारणें म्हणजे आहार बेचव असणें व त्यांत वनस्पतिज द्रव्यें किंवा काष्ठमय भाग अपुरा असणें, आहार आणि अति रुक्ष पाणी कमी घेणें; आहार अगदीं कमी व निःसत्त्व असणें किंवा त्यांत कधीं फेरबदल न करणें, हीं होत.

वेळच्या वेळेस शौचास नियमानें जाण्यास आळस करूं नये. आपणास आतां शौचास चांगलें होईलच होईल असा आशावादयुक्त मानसोपचारहि करावा.

गर्भाशयाचा वगैरे विकार नसेल तर व्यायामहि नियमितपणें करावा. विशेषतः सकाळीं बिछान्यांतून उठण्याचे वेळेस उताणें निजून, हात न टेकतां उठावें व असें १०।१२ वेळां करावें. याच्या योगानें पोटाचे स्नायू कार्यक्षम बनतील. जोर, नमस्कार इ. सारखे

इतरहि कांहीं व्यायाम करावयास हरकत नाहीं. कांहीं विद्युद्उपचारहि हितावह होतात.

पोट घेतानें रगडावें किंवा ७ पौंडपर्यंत वजनाचा गोळा पोटावर घड्याळयाच्या कांट्यांचा गतीप्रमाणें फिरवावा.

औषधें कोणतीं घ्यावींत या दृष्टीनें विचार केल्यास केव्हां केव्हां रात्रीं ॲलोन घेऊन सकाळीं सिडलीझ् पॉवडर घ्यावी. कॅलोमेल वगैरे पाऱ्याचीं औषधें रोज न घेतां फक्त कांहीं खेपा दर आठवड्यास घ्यावींत. पुढील मिश्रण घेणें उत्तमः—

टिंक्चर नक्स व्हॉमिका	५ थेंब
टिंक्चर बेलॅडोना	५ थेंब
टिंक्चर हायोसायॅमस्	१० थेंब
एक्स्ट्रॅक्ट कॅस्कारा साग्राजलिक्विड	४० थेंब

हें औषध दोन महिने घेऊन त्यांत कॅस्काराचें प्रमाण हळूं हळूं कमी करीत गेल्यास बद्धकोष्ठता नाहींशी होईल. मॅग्नेशिआसारखे क्षारहि बद्धकोष्ठता घालवितात. मुलांस १० ते २० थेंब एक्ट्रॅक्ट कॅस्कारा साग्राडा लिक्विड १ चमचा माल्टाइन्मध्यें मिसळून द्यावें म्हणजे चांगलें.

मोठ्या आंतड्यांतच मळ सांठत असल्यास साबण पाण्याचा १–२ पाइंट प्रमाणांत एनिमा घेणें श्रेयस्कर आहे. किंवा ·॥· औंस ग्लिसरीनचा एनिमा पिचकारीनें दिल्यास शौचास साफ होईल. मात्र रोज व वारंवार ग्लिसरीन वापरूं नये. कारण तसें केल्यास गुदद्वारास व त्याचे वरच्या भागास त्रास होतो. केव्हां केव्हां रोज रात्रीं ५ ते १० औंसपर्यंत ऑलिव्ह तेलाचा एनिमा हळूंहळूं द्यावा. हळूहळूं दिल्यास तेल आंत राहतें व सकाळीं शौचास साफ होतें. १–२ आठवड्यांतच शौचास नियमानें आपोआप साफ होऊं लागेल. पुष्कळ दिवसाची बद्धकोष्ठता या उपायानें अगदीं आश्चर्यकारक रीत्या बरी होते हें अनुभवसिद्ध आहे.

आयुर्वेदिक उपाय—आहारांत योग्य बदल व पोटाचे व्यायाम यांनीं बद्धकोष्ठ नाहींसें होतें.

बद्रीनाथः—संयुक्त प्रांतांतील गढवाल जिल्ह्यांत असणारें एक प्रसिद्ध क्षेत्र. हें श्रीनगरपासून माना घाटाच्या रस्त्यावरील डोंगरांत असून येथें बद्रीनाथाचें देऊळ आहे. येथील मूळचें देवालय श्रीशंकराचार्यांनीं बांधिलें अशी आख्यायिका आहे. या ठिकाणीं बर्फ पडत असतें व तें वर्षांतील बराच काळपर्यंत गोठून राहतें. या बर्फामुळें हें देऊळ कित्येक वेळां पडून गेलें होतें. तेथें असणारें सध्यांचें देऊळ अर्वाचीन आहे. देवळाखालीं डोंगरांत तळें आहे. या तळ्यांत ऊन पाण्याच्या झऱ्याचें पाणी जातें. या पवित्र ठिकाणीं पुष्कळ लोक स्नान करितात. येथील पुजारी नंबुद्री ब्राह्मण असतात. मुख्य पुजाऱ्याला रावळ म्हणतात. या देवालयाचें वार्षिक उत्पन्न ७००० रु. आहे. या ठिकाणीं मध्य हिमालयाचें शिखर असून त्याची उंची २३२१० फूट भरते. येथें ‘ भीषणगंगा ’ नदीचा उगम होतो.

बनारसः—हिंदूंचें अत्यंत पुरातन व पवित्र क्षेत्र. हें संयुक्त प्रांतांतील बनारस जिल्ह्याचें मुख्य ठिकाणहि आहे. या क्षेत्राची वसस्ति गंगेच्या कांठीं असून येथील लोकसंख्या २०५,३१५ इतकी भरते. बनारस शहर कलकत्त्यापासून ४७९ मैल व मुंबईपासून ९४१ मैल दूर आहे. या ठिकाणीं बाराहि महिने यात्रा भरत असल्यामुळें येथील लोकसंख्या नेहमीं बदलत असते. ग्रीसमधील ‘ अथेन्स ’ अथवा इटलींतील रोम या शहरांना युरोपांत जें महत्त्व लाधलें आहे, तें महत्त्व आपल्या आर्यावर्तांत, संस्कृतीचें माहेरघर असल्यानें या पुण्यनगराला लाभलें आहे. हें महत्त्व वाढण्याला, वैदिक व बुद्ध या धर्मांचा येथून सर्व भरतखंडभर झालेला प्रसार कारणीभूत झाला. याशिवाय धार्मिक महत्त्व व विद्वानांचा भरणा येथें असल्यानें या ठिकाणीं शंकराचार्य, ज्ञानेश्वर, एकनाथ, कबीर, स्वामी दयानंद, स्वामी विवेकानंद या पंथ व युग प्रवर्तकांनीं आपापल्या कार्यांची महती येथील मंडळींना दाखवून दिली.

या पवित्र नगराला अनेक चळवळी बहुत कालपावेतों पाहाव्या लागल्यानें अनेकांच्या आधिपत्त्याखालीं नांदावें लागलें. त्यांपैकीं खि. पू. शकापूर्वी कोसल व शैशुनाग हे दोन राजवंश होऊन गेले. त्यानंतर मौर्य, शुंग व गुहा यांची राजवट सुरू होती. इ. स. ७ व्या शतकांत येथें हर्षवर्धनाची सत्ता आपलें कार्य करीत होती. इ. स. १२ व्या शतकामध्यें ‘ गहरवार ’ राजांच्या ताब्यांत हें पवित्र क्षेत्र गेलें. गहरवार वंशांतील शेवटचा राजा जयचंद याचा ११२३ मध्यें महंमद घोरीनें पराभव करून या ठिकाणीं लुटालूट केली. १६६९ च्या सप्टेंबरांत येथील विश्वेश्वराचें देऊळ औरंगजेबानें पाडलें. हें क्षेत्र व प्रयाग हीं स्थानें परत हिंदुधर्मीयांच्या ताब्यांत आणण्याबद्दल

पेशवे यांनीं शेवटपर्यंत प्रयत्न केले. पण या कामीं त्यांस कांहीं शेवटपर्यंत यश मिळालें नाहीं. १७७५ मध्यें मुसलमानांच्याकडून हें शहर इंग्रजांच्या ताब्यांत गेलें तें अद्याप त्यांच्याच ताब्यांत आहे.

या ठिकाणीं राज्यकर्ते अनेक होऊन गेल्यामुळें या क्षेत्राला अनेक नांवें प्राप्त झालीं आहेत. या नांवा-पैकीं काशी, वाराणशी व बनारस हीं नांवें प्रचलित असून सर्वांना माहीत आहेत. काशी हें नांव वेदकालीन राष्ट्रावरून पडलें असावें असें कांहींचें मत आहे तर काशी याचा धात्वर्थ (काश) चकाणणें असा असून तें सर्व शहरांत चमकणारें शहर या नात्यानें रूढ झालें असेल असेंहि कांहीं म्हणतात. ख्रिस्ती शकापूर्वी पुष्कळ पाली व संस्कृत ग्रंथांत या क्षेत्राचे उल्लेख केलेले निदर्शनास येतात. काशी हें नांव रूढ होण्या-पूर्वी या नगराचा 'वाराणशी' या नांवानेंच परिचय असावा असें वाटतें. 'वरणा व असि' या दोन नद्यां-मधलें म्हणून 'वाराणशी' हें नांव रूढ झालें. तसेंच हें नगर 'बनार' राजाचें ताब्यांत असल्यामुळें यास 'बनारस' हें नामाभिधान प्राप्त झालें असावें. वेग-वेगळ्या ग्रंथांवरून या क्षेत्राला 'अविमुक्त' 'सुदस्त' 'पुष्पावती' हीं नांवें असल्याचें आढळून येतें. याशिवाय आठराव्या शतकांत दिल्लीच्या महंमदानें याचें नांव महंमदाबाद असें ठेवण्याचा प्रयत्न केला. हें क्षेत्र दिवोदास या राजानें वसविलें अशी दंतकथा प्रच-लित आहे. तसेंच पूर्वीच्या काशीराजाबद्दलहि अनेक दंतकथा ऐकू येतात. सध्यां येथें मनसाराम भुईनहार नांवाच्या वंशांतील राजा आहे. त्यांचें नांव राजा सर प्रभू नारायणसिंग, जी. सी. आय. ई. हें असून त्यांचें उत्पन्न एक लाखाचें आहे. यांना १५ तोफांचा मान असून 'राजा' हा किताब आहे. सध्यांचे महाराज १८८९ मध्यें गादीवर आलेले आहेत. यांचे पूर्वज बनारस प्रांताचा वसूल गोळा करण्याचें काम बना-रसचा सुभेदार रुस्तुमअल्ली यांचेकडे नोकर या नात्यानें करीत.

या शहराची क्षेत्र म्हणून प्रसिद्धी असल्यानें येथें हिंदु देवतांचीं अनेक मंदिरें आहेत. त्यांत विश्वनाथ, अन्नपूर्णा, दुर्गा या देवांचीं देवळें प्रमुख होत. याशिवाय या ठिकाणीं स्नानार्थ गंगेवर जाण्याकरितां पुष्कळ घाट आहेत. त्यांत पंचतीर्थ, असिसंगम, दशाश्वमेध, बरुणसंगम, मणिकर्णिका लालमिश्र, तुलसी, दांडी, स्मशान, केदार, सोमेश्वर, मानस सरोवर हे विशेष प्रसिद्ध आहेत. या सर्वांत दशाश्वमेध व मणिकर्णिका हे दोन घाट फारच प्रसिद्धी पावलेले आहेत. दशाश्वमेध घाटाजवळ दशाश्वमेध व ब्रह्मेश्वर यांचीं देवालयें आहेत.

काशीला मृत्यु आला असतां स्वर्गप्राप्ती होते असें सर्व हिंदु मानतात. येथें गंगेच्या कांठीं हजारो साधु, संन्यासी, बैरागी, ईश्वरचिंतनांत गढलेले असतात. अनेक धर्मकृत्यें या ठिकाणीं करण्याची पद्धत असल्या-मुळें पुष्कळ हिंदु येथें एकसारखे येत असतात. हिंदूंच्या त्रिस्थळीं यात्रेपैकीं हें एक स्थान आहे.

शहरांतील जुन्या इमारती, रस्ते, गल्ल्या, हिंदु-स्थानांतील सर्व भागांतून आलेले हिंदु, अन्नछत्रें, वारंवार होणारे उत्सव इत्यादींमुळें हें शहर नेहमीं गजबजलेलें वाटतें. संयुक्त प्रांतांतील प्रमुख शहर असल्यामुळें या शहराला राजकीय महत्त्वहि आहे. येथें १७९१ त सरकारी बनारस कॉलेज स्थापिलें असून याशिवाय बेझंटबाईनीं १८९८ त स्थापलेलें हिंदु कॉलेज हेंहि आहे. याशिवाय मुलींचें हायस्कूलहि या ठिकाणीं आहे. या शिवाय अनेक शिक्षण संस्था आहेत.


बनारस शहर हिंदूप्रमाणेंच जैनांनाही पवित्र वाटतें. त्यांचा सातवा तीर्थंकर सुपार्श्वनाथ यांचा येथेंच जन्म झाला. गांवांत जैन धर्मियांचींहि पुष्कळ मंदिरें आहेत.

या शहरापासून जवळच हिंदु विश्वविद्यालय आहे. तेथील इमारती पाहण्यासारखा आहेत. बनारसपासून चार मैलांवर सारनाथ हें ठिकाण असून गौतम बुद्धाच्या चरित्राशीं या स्थानाचा संबंध आल्यानें तेंहि बुद्धांच्या यात्रेचें स्थान म्हणून प्रसिद्ध आहे.

बन्यन, जॉन (१६२८–८८):–हा एक इंग्रज ग्रंथ-कार व धर्मोपदेशक होऊन गेला. बेडफोर्ड-शायरमधील एल्स्टो गांवापासून एक मैल अस-लेल्या हॅरोडेन ह्या चिमुकल्या खेड्यांत याचा जन्म झाला. ३० नोव्हेंबर १६२८ रोजीं त्याचा बप्तिस्मा झाला. त्याचें शिक्षण एका पॅरिश (Parish) स्कूलमध्यें झालें. त्यानें आपल्या बापाचा तांबटाचा धंदा केला. इंग्लंडमधील यादवींत त्यानें १६४४–४५ मध्यें भाग घेतला. बहुधा पार्लमेंट पक्षाच्या सैन्यांत त्यानें नोकरी केली असावी. १६४८ सालीं त्याचें लग्न झालें. त्याच्या पत्नीकडून आलेला हुंडा म्हणजे Plain Man's Path-way to Heaven व The

Practise to Piety हे दोन ग्रंथच होत. या ग्रंथांच्या वाचनानें त्याच्या धार्मिक मतांत फरक पडला. अपवित्र भाषा वापरण्याची त्याला मोठी खोड होती. पण प्रयासानें त्यानें ती घालविली. नाचण्याची व घंटा वाजविण्याची जी त्याला संवय होती तीहि त्यानें सोडून दिली.

१६५३ सालीं बेडफोर्डमध्यें एका राजधर्म-विरोधी पंथाला तो मिळाला. १६५७ सालीं



बनारस—१ घाट २ बनारसचे घाट दुसरें दृश्य ३ हिंदु यूनिव्हर्सिटीचा एक भाग ४ रामनगर राजवाडा ५ हनुमान मंदीर.

त्या पंथाचा धर्मोपदेशक झाला. १६६० त अधिकाराविना धर्मोपदेश केल्याच्या अपराधाबद्दल त्याला शिक्षा झाली. धर्मोपदेश करण्याचा आपला हक्क सोडून देण्याचें त्यानें साफ नाकारल्यावरून त्याला बेडफोर्ड येथील कौंन्टी जेलमध्यें पुढील बारा वर्षें काढावीं लागलीं. पहिल्या पांच वर्षांत त्याला बरेंच स्वातंत्र्य देण्यांत आलें. बाकीचीं वर्षें वाचन, लेखन व बूट चढविण्याची कॅनव्हासची फीत करण्यांत घालविली. या फिती विकून तो आपली दुसरी बायको मुलें यांचा निर्वाह करीत असे. तुरुंगांत असतांना त्यानें बायबल व फॉक्सचा हुतात्म्यांचा ग्रंथ (Book of Martyrs) हे ग्रंथ आस्थापूर्वक अभ्यासिले; व Grace Abounding to the Chief of Sinners हा ग्रंथ १६६६ सालीं लिहिला. १६७२ सालीं डिक्लेरेशन ऑफ इंडल्जन्सअन्वयें त्याला सोडण्यांत आलें. नंतर बेलफोर्ड येथील नवीन प्रार्थनामंदिराचा तो पॅस्टर (पालक) झाला.

बन्यनला १६७५ सालीं पुनः कारावास घडला. याच कारावासांत त्यानें आपला Pilgrim's Progres हा ग्रंथ लिहिण्यास सुरवात केली असावी. त्याचे उर्वरित आयुष्य वाचन, लेखन व धार्मिक वादविवाद यांत गेलें. त्यानें सुमारे साठ ग्रंथ लिहिले. रीडिंग येथें एका मुलाच्या वतीनें त्याच्या रागावलेल्या बापाची समजूत करण्याकरितां तो गेला तेथून घोड्यावर बसून परत येत असतां तो वादळांत सांपडला, त्याला थंडी वाजून आली; तो लंडनमधील स्नोहिल येथील एका मित्राच्या घरीं ३१ ऑगस्ट १६८८ रोजीं वारला. बनहिल फील्ड्समध्यें त्याचें शव पुरण्यांत आलें. बेडफोर्ड येथें त्याचा एक पुतळा व दुसरीं स्मारकें आहेत. १९१२ च्या जानेवारींत बन्यनच्या स्मरणार्थ वेस्ट मिनिस्टर ॲबेमध्यें बन्यन विंडो नांवाची खिडकी राखून ठेवण्यांत आली.

त्याच्या ग्रंथांत Pilgrim's Progress हा त्याचा ग्रंथ सर्वोत्कृष्ट आहे. इंग्रजी भाषेंतील विदग्ध (Classical) वाङ्मयांत त्याची गणना होते. त्याची भाषा इतकी उत्तम आहे कीं इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवूं इच्छिणाऱ्यांनीं तिचा नमुना आपल्या नजरेसमोर ठेवावा. या ग्रंथाचा पहिला भाग १६७८ सालीं व दुसरा १६८४ सालीं प्रसिद्ध झाला. दहा वर्षांत सदर ग्रंथाच्या एक लाख प्रती खपल्या. १९१८ सालीं ११४ भाषांत तो प्रसिद्ध झाला. १६८२ सालीं प्रसिद्ध झालेला Holy War हा ग्रंथ मनुष्यांतील पाप व धर्म यांच्यामधील झगड्याचें रूपक आहे. १६६६ सालीं प्रसिद्ध झालेला Grace Abounding हा ग्रंथ आत्मचरित्रात्मक आहे. The Life and Death of Mr. Badman (१६८०) ह्या त्याच्या ग्रंथांत इंग्रजी कादंबरीचा पाया आहे असें मानण्यांत येते.

बभ्रुवाहनः--चित्रांगदेपासून झालेला अर्जुनाचा मुलगा. चित्रांगदेचा बाप मणिपूरचा राजा. याला मुलगा नसल्यामुळें त्यानें बभ्रुवाहनाला लहानपणापासून आपल्याजवळ ठेवून घेतलें होतें. पुढें तो वारल्यावर मणिपूरचा बभ्रुवाहन राजा झाला. याची राजधानी मणलूरपूर ही होती. पांडवांच्या अश्वमेधाचा घोडा फिरत फिरत याच्या राज्यांत आला. तो आपल्या बापाचा असें समजल्यामुळें त्यानें तो घोडा व त्याबरोबर नजराणा देऊन बापाकडे पाठविला. अर्जुनाला त्याच्या. या कृत्याचा राग येऊन त्यानें बभ्रुवाहनाचा धिःकार केला. हा अपमान समजून बभ्रुवाहनानें अर्जुनावर ससैन्य स्वारी केली. या लढाईंत त्यानें अर्जुनाला ठार मारिलें. बापाच्या वधाची वार्ता त्यानें परत गेल्यावर आपल्या आईस सांगितली. ती ऐकून तिला फार वाईट वाटलें व ती स्वतः सती जाण्यास सिद्ध झाली. बभ्रुवाहनाला आपण मातापित्यांच्या मृत्यूस कारणीभूत झालों म्हणून फार वाईट वाटलें. पुढें त्यानें प्रायोपवेशनानें देहत्याग करावयाचें ठरवून त्याप्रमाणें लागलीच त्यानें प्रायोपवेशन सुरू केलें. त्याच्या सावत्र आईच्या (उलुपीच्या) उपदेशाप्रमाणें पुढें चित्रांगदेनें व बभ्रुवाहनानें आपापले बेत रहीत केले. पुढें बापाला सजीव करण्यासाठीं मृतसंजीवक मण्याकरितां त्यानें सर्पांवर चाल केली व तो तेथून मिळविला. पण जाग्याला बापाचें शीर नव्हतें त्यामुळें सारी पंचाईत पडली. यानंतर कृष्णानें आपल्या पुण्यप्रभावानें अर्जुनाला जिवंत केलें. अर्जुनाला जिवंत केलेल्या व त्याच्यावर झालेल्या कथाभागांत थोडासा कांहीं ठिकाणीं वेगळा उल्लेख आहे. तो असा : उलुपीनें सांगितल्यावरून बभ्रुवाहनानें अर्जुनाशीं लढाई केली व तींत तो मेला. चित्रांगदेनें उलुपीला उपरोधी बोलून बेजार केल्यामुळें उलुपीनें स्मरणानें संजीवनी मणी मिळविला व त्याच्या

सहाय्यानें तिनें अर्जुनाला जिवंत केलें. हस्तिनापुरास पांडवांच्या झालेल्या अश्वमेध यज्ञास हा उपस्थित होता.

बरवे, मास्टर मनहर (१९१०-):-एक विख्यात भारतीय संगीत गायक व निष्णात वाद्य-वादनकार. यांचा जन्म मुंबईंतील काळबादेवी या विभागांत झाला. यांचे वडील कुशल गायक व संगीत-संशोधक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनीं कुमार मनहर याला वयाच्या चवथ्या वर्षापासून शिकविण्यास सुरवात केली. वाद्यापासूनच त्याला सुरांची ओळख झाली. संगीतनैपुण्याचीं निसर्गदत्त देणगी व वडिलांनीं घरीं अहोरात्र निर्माण केलेलें सुस्वर नादमय संगीत वातावरण, या सोयींमुळें मास्टर मनहर यांनीं वयाच्या ६-७ वर्षांपर्यंतच संगीत् गायन व वाद्य-वादन यांत अपूर्व प्रगति केली. सौ. सरोजनी नायडू यांनीं "भारतीय संगीताची पताका सर्व हिंदुस्थानभर पुन्हां एकदां उच्च ठिकाणीं फडकत ठेवा व त्यासाठीं सर्व हिंदुस्थानभर दौरा काढून जलसे करा" असा सल्ला दिला. त्याप्रमाणें वयाच्या ६ व्या वर्षापासून मास्टर मनहर बरवे यांच्या दौऱ्यास सुरवात झाली. त्यांचा प्रवास १९१७ ते १९३८ फेब्रुवारीपर्यंत झाला. या अवधींत त्यांनीं हिंदुस्थानांत बारीकसारिक ठिकाणींहि जाऊन आपल्या संगीताची विलक्षण छाप बसविली. मास्टर मनहर हे जेथें जेथें गेले तेथें तेथें त्यांचा मोठ्या प्रमाणांत गुणगौरव करण्यांत आला. संयुक्त प्रांत, मद्रास, बंगाल व पंजाब या ठिकाणीं त्यांचा झालेला सन्मान ज्यांनीं पाहिला असेल त्यांना महात्मा गांधी, जवाहिरलाल नेहरू वगैरे पुढाऱ्यांच्या सन्मान-प्रसंगांची खास आठवण होईल. सिलोन, ब्रह्मदेश व नेपाळ या ठिकाणींहि जाऊन मास्टर मनहर बरवे यांनीं कीर्ति मिळविली. परदेशींहि दौरा काढून भारतीय संगीताची थोरवी पाश्चात्त्यांना पटवून द्यावी अशी मास्टर मनहर यांच्या वडिलांची महत्त्वाकांक्षा होती व त्याप्रमाणें त्यांनीं त्यांना संगीताच्या विविध अंगोपांगांत तरबेज केलें होतें. वडिलांच्या उपदेशानुसार संगीताच्या ललितभागांत उत्तम कौशल्य मिळविल्यानंतर ख्यालासारख्या गंभीर व संथ गायन प्रकारांतहि मास्टर बरवे यांनीं वयाच्या पंधराव्यावर्षी प्रवेश केला व त्यांतहि त्यांनीं बरीच प्रगती केली. गाणारा तंतकार असला म्हणजे तो आपलें गायन त्या अनुरोधानें कसें आकर्षक करूं शकतो याचें प्रत्यंतर मास्टर मनहर बरवे यांच्या गायनांत येतें. त्यांना परदेशी जाण्याची महत्त्वाकांक्षा होती; पण वडिलांच्या मृत्यूमुळें त्यांचे बेत फसले. संगीत विद्यालयें ठिकठिकाणीं काढून या बाबतींत विश्वविद्यालयहि स्थापावें अशी त्यांची महत्त्वाकांक्षा आहे.

बर्ड, रिअर अॅडमिरल रिचर्ड इव्हेलिन (१८८८-):-एक अमेरिकन नौकानयनी, वैमानिक व भूसंशोधक. सतराव्या शतकापासून प्रसिद्धीस पावलेल्या एका नामवंत व्हर्जिनियन कुटुंबांत जन्म. टॉम, डिक व हॅरी या नांवानें मित्र मंडळींत परिचित असलेल्या बंधुत्रयांतील एक. याचा जन्म १८८८ सालीं विंचेस्टर येथें झाला. त्याच्यांतील साहसी वृत्ति व संशोधनप्रियता हे गुण लहानपणापासूनच दिसून आले. सन १९०१ मध्यें वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी तो जगपर्यटनास एकटाच निघाला. जपान, सिलोन, हिंदुस्थान, पोर्ट सय्यद वगैरे ठिकाणीं जाऊन त्यानें आपला जलप्रवास पुरा केला. स्वदेशीं आल्यावर लष्करी शिक्षणाला सुरवात केली. त्याचें उच्च नाविक शिक्षण अॅनॅपोली येथील यू. एस. नेव्हल अॅकॅडेमींत झालें.

१९१६ सालीं छोटा अधिकारी असतांना अजाणतेपणीं एका खिळयावर त्याचा पाय पडून तो अधु झाला. त्यामुळें त्याला सेवानिवृत्त करण्यांत आलें. परंतु लवकरच तो आपलें कार्य करण्यास समर्थ झाल्यानें काँग्रेसच्या विशेष कायद्यानें लेप्टनंट् कमांडरच्या जागीं त्याची नेमणूक करण्यांत आली. युद्ध-नौकानयन खात्यांतील शिक्षणशिबीरासंबंधीं त्यानें १९१७ मध्यें नवी योजना केली. पुढील वर्षी युनायटेड् स्टेट्सच्या आरमाराचा नायक झाला. विमानविद्या तो शिकलाच होता. पण युद्धानंतर त्यानें अत्यंत परिश्रम करून त्या विद्येंत प्राविण्य मिळविलें. ध्रुव प्रदेशावरून व अॅटलँटिकवरून विमानोड्डाण करण्याच्या मोठ्या योजना त्यानें आखल्या. आरमारी खात्यानें अटलांटिक महासागर विमानानें ओलांडण्यास त्याला परवानगी दिली असती तर त्या सागरावरून उड्डाण करणारा पहिला वैमानिक म्हणून त्याचा लौकिक झाला असता. मॅकमिलननें ग्रीनलंडकडे १९२३ सालीं केलेल्या विमानोड्डाणाच्या मोहिमेंत त्यानें पुढाकार घेतला होता. त्या देशाच्या वैराण प्रदेशावरून त्यानें ६००० मैल उड्डाण केलें. या अनुभवामुळें त्याची ध्रुवप्रदेवरून उड्डाण करण्याची इच्छा दुणावली.

कांहीं धनिकांच्या मदतीनें त्यानें ध्रुवप्रदेशावरून उड्डाण करण्याचा आपला बेत १९२६ सालीं तडीस नेला. त्यानें १९२८ सालीं केलेली दक्षिणध्रुवाकडील मोहिम म्हणजे त्याच्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाची कामगिरी असून या मोहिमेंत त्यानें केलेल्या संशोधनानें जगाच्या ज्ञानांत चांगलीच भर पडली. या मोहिमेंत बऱ्याच अज्ञात प्रदेशाचा सुगावा लागला. बर्डनें आपल्या शोधांनीं वैमानिकशास्त्रांत बरीच भर घातली असून त्या शास्त्रांत अलीकडे जी आश्चर्यकारक प्रगती झाली आहे ती त्याच्या शोधामुळेंच. त्यानें केलेल्या कामगिरीबद्दल त्याचा गौरव करून सरकारनें त्याला पदव्या दिल्या.

बर्न्स, रॉबर्ट (१७३५–१७९६):–स्कॉटलंडचा एक राष्ट्रकवि. याचा जन्म २५ जानेवारी १७५९ सालीं आयरशायर येथील अलोवे या ठिकाणीं एका शेतकऱ्याच्या घराण्यांत झाला. याला इंग्लिश, फ्रेंच व लॅटिन भाषांचें ज्ञान लहानपणापासून चांगलें मिळत गेलें. त्याच्या घरीं एका मोलकरणीनें गाऊन दाखविलेलीं गाणीं व सांगितलेल्या अद्भुत गोष्टी ऐकून त्याच्या अंतःकरणांत काव्यप्रतिभा जागृत झाली. वयांत येण्यापूर्वींच अठराव्या शतकांतील काव्यें, शेक्स्पीयरचीं नाटकें व इंग्रजी काव्यांचा संग्रह असे अनेक ग्रंथ त्यानें वाचून आत्मसात् केले होते; त्यामुळें त्याच्या काव्यास कलावंत विद्वत्तेची झांक आली आहे. वयाच्या सोळाव्या वर्षीं Handsome Nell हें काव्य लिहून तो कवि म्हणून ओळखण्यांत येऊं लागला; तथापि पंचविशीनंतरच त्याच्या काव्यांत असामान्य प्रतिभेचे गुण दिसूं लागले.

प्रापंचिक अडचणीमुळें त्याला काव्यनिर्मिति मनाप्रमाणें करतां आली नाहीं. त्याचा प्रवास स्कॉटलंड बाहेर बहुतेक झाला नाहीं म्हटला तरी चालेल. उपजीविकेसाठीं शेतकीचा नांगर हातीं धरण्यापासून हलक्या दर्जाचीं कामें त्यास करावीं लागलीं. त्यानें शेवटीं अबकारी खात्यांतहि नोकरी पत्करली. त्या नोकरीवर असतां त्यानें आपलीं राजकीय मतें व्यक्त केल्यामुळें त्यास नोकरीस मुकावें लागलें व पुढें लवकरच तो ता. २१ जुलई १७९६ रोजीं डमफ्रीज येथें मरण पावला.

बर्न्सची साहित्यनिर्मिती विशेष नसली तरी गुणानें अव्वल दर्जाची आहे. त्याचीं महत्त्वाचीं काव्यें— Scots who hae; Handsome Nell, Address to an Illegitimate Child, Two Herds, Jolly Beggars, Kilmarnock Volume, Tamo' Shanter व Elegy on Captain Mathew Henderson हीं होत. बर्न्सचीं भावगीतें विपुल व विविध प्रकारचीं असून तीं हृदयंगम आहेत. बर्न्सचें काव्य उत्कट भावना, प्रसादशीलता व ओजस्वी विचारसंपदा यांचें जणूं रम्य प्रदर्शन असतें.

बलरामः–वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र. हा शेषाचा अंश. लहानपणीं हा व कृष्ण दोघेहि एकत्रच असत. बालपणांत यानें धेनुकासुर व प्रलंबासुर यांना मारिलें. सांदिपनीजवळ ब्रह्मविद्या व वेदविद्या यांचें शिक्षण बलरामानें घेतलें. हा गदायुद्धांत निपुण होता. बलरामाच्या गदायुद्धनैपुण्याच्या जोरावरच कृष्णाला जरासंधाचा सतरावेळ पराभव करतां आला. हा सासऱ्याच्या आनर्त देशांत फार राहत असे. याच्या बायकोचें नांव रेवती. एकदां हा नंद यशोदेला भेटण्यास गोकुळांत आला व तेथें दोन महिने मुक्काम केला. यानें त्यांच्या इच्छेप्रमाणें यमुनेचा प्रवाह वळविला. सांबाला त्याच्या लग्नाच्या वेळीं सोडीना म्हणून बलरामानें हस्तीनापुरीची ठवण आपल्या नांगरानें बदलून टाकली. कृष्ण व हा यांच्यांत स्यमंतक मण्याबद्दल अल्पकाल वांधें आलें होतें. त्यामुळें कृष्णाची निंदा करून हा रागानें मिथिलेला गेला. तेथें यानें दुर्योधनास गदायुद्ध शिकविलें. भीमही याचाच शिष्य होय. बलराम, कौरवांस मदत करण्याचें कृष्णानें नाकारल्यामुळें त्याचेवर रागावून, तीर्थयात्रेस निघून गेला. सरस्वती, यमुना व गंगा यांच्या कांठचीं तीर्थें करून हा नैमिषारण्यांत आला. या ठिकाणीं पुराणचर्चा चालू होती. तींत हा गेला. सर्वांनीं यास उत्थापन दिलें. पण रोमहर्षणानें तसें केलें नाहीं म्हणून यानें त्याचा शिरच्छेद केला. तसेंच तेथील ऋषींना त्रास देणाऱ्या बल्वलास ठार करून हा तेथून निघून गेला. पुढें यानें हातून घडलेल्या ब्राह्मण हत्येबद्दल प्रायश्चित्त घेतलें. नंतर हा दक्षिण हिंदुस्थानांतील क्षेत्रें करीत करीत कुरुक्षेत्रांत आला. तेथें भीम व दुर्योधन यांचें गदायुद्ध सुरू होतें. त्या युद्धांत भीमानें युद्धनियमांचा भंग करून दुर्योधनाची डावी मांडी फोडली म्हणून यास राग आला व त्या भरांत हा भीमाला मारण्यास धांवला; पण कृष्णानें त्याची समजूत केली.

अनिरुद्धविवाहसमयीं रुक्मी याचा द्युतांतील जय नाकबूल करूं लागला. म्हणून यानें त्यास ठार केलें. बलरामानें सांबाला प्रतिबंध करणाऱ्या (दुर्योधन–कन्या हरणाच्या वेळीं) राजांचा पराभव केला. भीमासही यानें बाहुयुद्धांत जिंकलें. यानें द्विविद वानरास ठार केलें. सर्व यादवांचा नाश झाल्यावर प्रभासक्षेत्रीं यानें योगानें देहत्याग केला. तेव्हां रेवतीनें सहगमन केलें. कृष्णापेक्षां हा तीन महिन्यांनीं मोठा होता. याचें वस्त्र निळें असे. हें व कमलमाला लक्ष्मीनें यास दिली. हा दारू पीत असे. राम, बल, संकर्षण, हली, हलायुध, सीरपाणी, मुसली व मुसलयुध या नांवांनींही बलरामाला ओळखीत असत.


बली:-प्रल्हादाचा नातू. विरोचन व देवी यांच्या पोटीं बलीचा जन्म झाला. हा दैत्यांचा राजा. यानें गुरु शुक्राचार्य यांनीं सुचविल्याप्रमाणें देवांचा पराभव करून स्वर्ग जिंकला व तेथेंच तो राज्यहि करूं लागला. हा राज्य करीत असतां देवांना फार त्रास होई म्हणून देवांनीं उलट खाल्ली पण तींत त्यांचीच हानी फार झाली. पुढें समुद्रमंथनांतून निर्माण झालेल्या अमृतापायीं देवदैत्यांत वांधें आलें व त्यामुळें उभयतांत पुनः रणसंग्राम माजला, या संग्रामांत बलीला ठार व्हावें लागलें व त्याचबरोबर स्वर्गाचें राज्य गमावून बसावें लागलें. शुक्राचार्यांनीं पुनः त्यास सजीव केलें व त्याच्याकरवीं ' विश्वजित यज्ञ ' करविला. यज्ञनारायणानें प्रसन्न होऊन त्यास दोन अक्षय भाते, दिव्य रथ व कवच ह्या वस्तू दिल्या. त्याचप्रमाणें गुरूकडून त्यास शंख मिळाला व प्रल्हादानें न 'सुकणारी माळ' दिली. त्यांच्या जोरावर पुनः यानें स्वर्ग जिंकून पुष्कळ वर्षें राज्य केलें. याच्या राज्यांत देवांना अती पीडा होई. ती नष्ट करण्याबद्दल देवांनीं विष्णूस विनविलें. विष्णूनें त्यांस वामन होऊन तुमची पिडा दूर करीन म्हणून आश्वासन दिलें.

बलीनें शंभर अश्वमेध यज्ञ केले त्यांपैकीं अखेरचा नर्मदेच्या कांठींचा अश्वमेध चालू असतां बटूच्या वेषानें वामन आला. वामनानें त्याच्याकडे तीन पावलें भूमींचें दान मागितलें. बलीनें ती दिली म्हणून उदक सोडलें. लागलीच वामनानें विराट रूप धारण करून दोन पावलांत सारें ब्रम्हांड व्यापलें. तिसरें पाऊल ठेवण्यास जागा नाहीं असें पाहून तो, तें कोठें ठेवूं म्हणून पृच्छा करूं लागला. बलीनें तें आपल्या डोक्यावर ठेवण्यास अनुमति दिली व वचनपूर्ति केली. वामनानें मग त्यास सुतलांत ठेवून टाकलें. हा बलाढ्य असल्यामुळें यास महाबली असें म्हणत. याच्या राजधानीचें नांव महाबलीपूर. यानें तीन लक्ष साठ हजार वर्षें राज्य केलें. यास शंभर पुत्र होते. त्यांपैकीं बाण, कुंभगर्त, दय, भोज व कुंची हे प्रसिद्ध आहेत. पुत्रांशिवाय त्यांस शकुनि व पूतना अशा दोन मुलीहि होत्या.

बहाई पंथः—या पंथाचा संस्थापक सर अबदुल्ला बहा आब्रा हा हिंदी सुधारक. याचा जन्म १८४४ सालीं व मृत्यू १९२१ मध्यें झाला. विश्वबंधुत्व, स्त्रीपुरुषांना समान वागणूक, पुनर्जन्माच्या तत्त्वावर विश्वास व भगवद्गीता, कुराण, बायबल इत्यादि सर्व ग्रंथांबद्दल आदर हें या पंथाचें वैशिष्ट्य होय. या पंथाचे अनुयायी बोहरी लोकांत विशेष आहेत.

बहिरी ससाणा:—शिकारीच्या उपयोगी पक्षी. हा अंगानें कावळ्यापेक्षां बराच मोठा असतो. त्याचे पंख मोठे व शेवटाला टोंकदार असतात. याची पाठ व पंख उदी रंगाचे असून याच्या पिसांचा रंग काळा असतो. बहिरी ससाण्याची शेपूट करडी असून पोट फिकट पिवळसर असतें. हा आपला उदरनिर्वाह कबूतर, पारवे, बदक वगैरे पक्ष्यांवर करतो. बहिरीससाणा हा पक्षी हिंवाळ्यांत आपल्याकडे येतो व उन्हाळ्यांत दुसरीकडे जातो. याच्या दोन तीन जाती आहेत. आपल्याकडचा पक्षी हा नसल्यानें त्याचें घरटें पाहण्यास मिळत नाहीं. हा स्वतःचें घरटें उंचशा झाडावर किंवा इमारतीवर अगर डोंगराच्या कड्यावर जानेवारी फेब्रुवारी महिन्यांत करतो व त्यांत मादी ३।४ अंडीं घालते. अंड्याचा सर्व पृष्ठभाग तांबूस पिंगट ठिपक्यांनीं भरलेला असतो.

बॅटरी:—प्रवाही विद्युत्‌चा एक प्रकार. यांपैकीं आपण खिशांतून जो टार्च (विजेचा दिवा) इकडे तिकडे नेतों त्यास कांहींजण बॅटरीचा दिवा म्हणून ओळखतात. या दिव्याला ज्यामुळें विजेची शक्ती मिळते तीस बॅटरी म्हणतात. या बॅटरीला ड्राय सेल्स (Dry cells) किंवा कोरडे विद्युत्‌घट म्हणतात. एका कार्बनच्या पट्टीभोंवतीं प्लॅस्टर ऑफ पॅरिस, ग्राफाइट व मॅंगेनीज डायॉक्साइड यांचा जाड थर देतात व पुन्हां या थराभोंवतीं झिंक क्लोराइड, नवसागर, कार्बनची पूड व प्लॅस्टर ऑफ पॅरिस यांच्या मिश्रणाचा थर देतात. या सर्वांवर पातळ जस्ताचा पत्रा मढविलेला असतो व



४४ फूट

बॅडमिंटन कोर्ट—अ = हीं शॉर्ट सर्व्हिस लाइन होय. मध्यरेषेपासून ६३/४ फूट अंतरावर क्रीडांगणाच्या दोन्ही भागांस मध्यरेषेला समांतर रेषा (अ) काढतात. ज्यावेळीं एका बाजूनें एक खेळाडू याप्रमाणें खेळ खेळतात (Singles). त्यावेळीं क्रीडांगणाची रुंदी २० फुटांऐवजीं १७ फूटच ठेवतात.

वरून चॉकोलेट रंगाच्या डांबराचा थर देतात. यावर कागदी आवरण चढवून या बॅटरी बाजारांत विक्रीला येतात. यांत वापरलेलीं रासायनिक द्रव्यें कोरडीं झालीं तर वीज उत्पन्न होत नाहीं व दिवा लागत नाहीं.

बॅडमिंटनः-टेनिससारखाच एक इंग्लिश खेळ. एका बाजूस एक किंवा दोन खेळाडू याप्रमाणें हा खेळ खेळला जातो. या खेळासाठीं आकृतींत दाखविल्याप्रमाणें क्रीडांगण (Court) आखतात. चौकोनाच्या बरोबर मध्यावर ५ फूट उंचीवर जाळें लावतात.

हा खेळ खेळण्यासाठीं टेनिसपेक्षां वजनानें हलक्या असलेल्या पण त्यापेक्षां लांब दांड्याच्या (Long handled) रॅकेटनें हा खेळ खेळतात. या खेळांत चेंडूऐवजीं फूल (Shuttle) वापरतात. हें फूल बुचाचें केलेलें असतें. फुलाचें वजन ७३ ते ८५ ग्रेन असतें. बुचाचा व्यास १ ते १३/४ इंच असतो व तें अर्धवर्तुलाकार असतें. फुलाला १४ ते १६ पांढरीं पिसें असात. टेनिसच्या चेंडूपेक्षां हें फूल अधिक वेगानें इकडून तिकडे जातें. शिवाय. फूल हलकें असल्यामुळें वाऱ्यामुळें खेळतांना अडथळा येतो. एवढ्यासाठीं उघड्यावर हा खेळ नेहमीं खेळतां येत नाहीं.

प्रथम खेळ सुरू करतांना (Serving) फूल मारावयाचें तें ' सर्व्हिस लाइन 'च्या आंत उभें राहून खालून मारावयाचें; म्हणजे फूल मारतांना तें प्रथम कमररेषेच्या खालून मारलें पाहिजे व विरुद्ध बाजूच्या तिरकस रेषेंतील क्रीडांगणाच्या अर्ध्या भागांत (Diagonal Court) मध्यें गेलें पाहिजे. या क्रीडांगणाच्या अर्ध्या भागांत असणाऱ्या खेळाडूनेंच तें फूल उलट मारावयाचें असतें. यानंतर दोन्ही बाजूंच्या खेळाडूंनीं जागा बदलून आपल्या कोणत्याहि भागांतून फूल खेळलें तरी हरकत नाहीं. खेळाडूंना फूल न मारतां आल्यामुळें जमिनीवर पडणें, फूल खेळल्यानंतर विरुद्ध बाजूस कोर्टच्या बाहेर जाणें, किंवा खेळाडूच्या अंगाला लागणें यामुळें गुण कमी होतात. या खेळाचे गुणमापन टेनिसप्रमाणें किंवा इतर पद्धतीनें करतात.

बॅप्टिझमः—खिश्चन चर्चसंबंधीं दीक्षा देण्याचा विधी. हा विधी एकवारच करण्यांत येतो. याबाबत रोमन, पौर्वात्य व अँग्लिकन चर्चेस यांचे एकमत आहे. जलसिंचन व योग्य त्या मंत्राचा उच्चार या गोष्टी या विधीला अवश्य आहेत. पौर्वात्य लोक बॅप्टिझम (बातिस्मा) तीन वेळां पाण्यांत अवगाहन करून करतात.

बॅरी, जे एम्. (१८६०–१९३७):–कादंबरीकार व नाटककार जेम्स मॅथ्यू बॅरी याचा जन्म ९ मे १८६० रोजीं फॉर्फर्शायरमधील किरीमूर येथें झाला. त्याच ठिकाणीं त्याचें प्राथमिक शिक्षण झालें. त्याचें पुढील शिक्षण डम्फ्रीज ॲकॅडेमी व एडिंबरो विद्यापीठ येथें झालें (१७७९–८२). याच विद्यापीठाचा तो एम्. ए. झाला. फेब्रुवारी १८८३ पासून १८८४ अखेरपर्यंत बॅरी नॉटिंगहॅम जर्नलमध्यें अग्रलेख लिहीत असे. १८८५ च्या प्रारंभींतो लंडनमध्यें स्थायिक झाला. सेंट जेम्स गॅझेट या नियतकालिकांत त्यानें उत्कृष्ट

लेख लिहिले. सदर नियतकालिकाचा संपादक फ्रेड्रिक ग्रीनवुड यानें त्याला सल्लामसलत देऊन उत्तेजन दिलें. यापुढें डॉ. रॉबर्टसन निकोल याच्या संपादकत्वाखालीं १८८६ सालीं निघालेल्या तेजस्वी व दीर्घजीवि अशा 'ब्रिटिश वीकली'(British weekly)या नियतकालिकानें दि ऑब्झर्व्हर, दी स्पीकर या व इतर नियतकालिकांनीं त्याच्या लेखांचें स्वागत केलें. पुष्कळ वेळां तो गॅव्हिन ओइगलव्ही या टोपण नांवाखालीं (Gavin Oiglvy) लेख लिहित असे. एफ्. डब्ल्यू, रॉबिनसन यांनीं आपण एका वेळीं चालवीत असलेल्या Home Chimes या नियतकालिकांत बॅरीच्या प्रारंभींच्या लेखांना स्थान देऊन आपल्याला उपकृत केलें असें बॅरी म्हणतो.

१८८७ सालीं बॅरीनें आपलें Better Dead नांवाचें पहिलें पुस्तक प्रसिद्ध केलें. यांत त्यानें लंडनमध्यें जीवनार्थ झगडणाऱ्या एका स्कॉट्स लेखकाची नवलकथा औपरोधिक वृत्तीनें सांगितलीं आहे. पुढील वर्षी त्याचीं तीन पुस्तकें प्रसिद्ध झालीं. त्यांतील पहिलें Auld Licht Idylls ह्या पुस्तकामुळें त्याला प्रसिद्धि व लोकप्रियता मिळाली. या ग्रंथानें स्कॉटिश उपन्यास–लेखनाचा कैल्पार्ड स्कूल नांवाचा नवीन सांप्रदाय पाडला. या ग्रंथांत ग्रंथकारानें आपली जन्मभूमि जें किरीमूर हें विणकऱ्यांचें शहर तेथील गरीब लोकांच्या जीवनाचीं चित्रें रेखाटली आहेत. या शब्दचित्रमालिकेला त्यानें ' वस्त्राच्या दशा ' (Thrums) हें अन्वर्थक नांव दिले आहे. या चित्रांत अंतःकरणाची कोमलता व विनोद यांचें मीलन झालें असून भाषा स्पष्ट व जोरदार आहे. हा ग्रंथ ग्रंथकारानें नियतकालिकांत लिहिलेल्या लेखांचा संग्रह आहे. यांतील पहिले दोन तीन लेख सोडून दिले तर त्यापुढील सर्व लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याच्या हेतूनेंच लिहिले असल्यामुळें त्यांत एकसूत्रीपणा आहे. त्याचें दुसरें पुस्तक When a Man's Single ही लंडनमधील वाङ्मयीन जीवनावरील कथा होय. बॅरीच्या एडिंबरो विद्यापीठांतील विद्यार्थी–जीवनांत त्यानें तेथें पाहिलेल्या तेथील मॅसन, ब्लॅकी व रासबेरीप्रभृति थोर व्यक्तींचीं स्वभावचित्रें त्यानें Edimburgh Eleven ग्रंथांत रेखाटलीं आहेत. हीं स्वभावचित्रें उठावदार व रंजक आहेत.

त्याचें नांव वर सांगितलेल्या ग्रंथाच्या योगानें ग्रंथकार म्हणून इंग्रजी बोलणाऱ्या लोकांत प्रसिद्ध झालें. किपलिंग व बॅरी हे दोघे खंदे लेखक वाङ्मयाच्या नव्या युगाचे दूत होत. १८९० सालीं त्यानें आपल्या वेळोवेळच्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांचा संग्रह My Lady Nicotine या नांवानें प्रसिद्ध केला. १८९१ सालीं त्यानें The Little Minister नांवाची आपली पहिली कादंबरी प्रसिद्ध केली. ही कादंबरी Good Words या नियतकालिकांत क्रमशः प्रसिद्ध झाली होती. या कादंबरीला संस्मरणीय यश मिळालें. यांत बॅरीनें कादंबरीलेखनाच्या तंत्राच्या दृष्टीनें कांहीं विशेष कौशल्य दाखविलें आहे असें नाहीं; तथापि त्यांतील विनोद, सहानुभूति व टीकाविषयाचें यथार्थ ज्ञान यावर आधारला असल्यामुळें जातिवंत आहे.

१८९१ पासून बॅरीचें लक्ष काव्यलेखनाकडे वळल्यामुळें त्याच्या कथालेखनांत थोडासा खळ पडला. १८९६ सालीं त्यानें Sentimental Tommy नांवाची आपली कादंबरी प्रकाशित केली. ही कादंबरी विनोद, सहृदयता व व्यक्तिदर्शन या दृष्टीनें उच्च दर्जाची आहे. त्याच वर्षी Margaret Ogilvy या कादंबरीचें प्रकाशन झालें. Tommy and Grirel हा Sentimental Tommy चा उत्तरार्ध १९०० सालीं प्रसिद्ध झाला. १९०२ सालीं The Little White Bird ही विलक्षण नवलकथा प्रसिद्ध झाली. तींत बॅरीच्या नाट्यलेखनांतील यशाचें बीज सांपडतें. १९०६ सालीं Peter Pan in Kensington Gardens प्रसिद्ध झाली. तीनंतर Peter and Wendy ही प्रसिद्ध झाली.

बॅरीनें नाटककार या नात्यानेंहि असामान्य यश मिळविलें. त्याचीं प्रारंभींचीं नाटकें Becky Sharp (१८९१); Jane Annie हीं मुळींच यशस्वीं झालीं नाहींत. त्याचे The Professor's Love Story (२५ जून १८९४) हें नाटक तंत्रदृष्ट्या उत्कृष्ट आहे. ही एक सुखांतिका (Comedy) आहे.

The Little Minister (६ नोव्हेंबर १८९७) या नाटकानें बॅरीला पुष्कळ लोकप्रियता मिळवून दिली. या नाटकांत त्याच्या नाट्यलेखनकौशल्यांत प्रगति झालेली दिसून येते. बॅरी हा यापूर्वीच प्रथितयश कादंबरीकार झाला होता. आतां नाटककार या नात्यानें तो प्रथितशय झाला. यापुढें या परिणत प्रज्ञ सारस्वतानें आपली लेखणी नाट्यलेखनाला विशेषेंकरून वाहिली. लंडनमध्यें त्याचीं चार नाटकें एकाच वेळीं

लागत असत. त्याचीं पुष्कळशीं नाटकें साऱ्या जगांत लोकप्रिय झालेलीं असून त्याच्यापूर्वीं कोणा साहित्यिकाला लेखणीच्या जोरावर मिळाली नसेल इतकी संपत्ति बॅरीला मिळाली. The Wedding Guest (२७ सप्टेंबर १९००) या नाटकाला सामान्य यश लाभलें. पण Quality Street (१७ सप्टेंबर १९०२); Admirable Crichton (४ नोव्हेंबर १९०२) व Little Mary (२४ सप्टेंबर १९०३) हीं तीन नाटकें फारच यशस्वी झालीं; त्यांतल्या त्यांत Admirable Crichton हें नाटक जास्त लोकप्रिय आहे.

१९०४ हें वर्ष बॅरीच्या नाट्यकार या नात्याच्या जीवनांत सुवर्णाक्षरांनीं लिहिण्यासारखें आहे. त्याच सालीं प्रसिद्ध झालेलें In Peter Pan हें नाटक अत्यंत मनोहर आहे. या नाटकाचें लोकांकडून अत्यंत उत्कंठेनें स्वागत झालें. ब्रिटिश रंगभूमीवरील अभिजात नाटकांपैकीं तें एक आहे. हें तरुणांचें नाटक आहे. लहान मुलांना तें मोहून टाकतें, त्यांच्या आईबापांच्या उच्च भावना चेतवितें व ज्याला म्हणून हृदय आहे अशा प्रत्येक व्यक्तीच्या, मग ती पुरुष असो वा स्त्री असो. हृदयाला जाऊन भिडतें.

बॅरीची इतर नाटकें:–

Alice Sit-by-Fire (१९०५), What every woman knows (१९०८); The Will and the Adored one (१९१३); The Twelve Pond Look (१९१३).

चार युद्धकालीन नाटिका—The old lady shows her Medals; The New world; Barbara's Wedding; A well Remembered Voice. या नाटिका कलादृष्ट्या नितांत रम्य आहेत. याशिवाय Dear Brutus (१९१७) हें कलापूर्ण व नितांत सुंदर नाटक आहे.

१८९४ च्या जुलैमध्यें बॅरीनें मेरी अन्सेल या नटीशीं विवाह केला; १९१० सालीं त्यानेंच तिच्यापासून घटस्फोट मिळविला. १९१३ सालीं त्याला बॅरॉनेट करण्यांत आलें. त्याला १९२२ सालीं O. M. मिळाली. त्याच सालीं सेंट अँड्र्यूज युनिव्हर्सिटींत रेक्टर या नात्यानें धैर्य या विषयावर व्याख्यान दिलें. १९२८ सालीं टॉमस हार्डीनंतर 'सोसायटी ऑफ ऑथर्स'चा अध्यक्ष झाला. यानंतर त्यानें एडिंबरो यूनीव्हर्सिटीचा चॅन्सेलर म्हणून काम केलें. १९३६ सालीं The Boy David नांवाची एक चित्रपट कथा लिहिली पण तीमुळें लेखकाच्या कीर्तींत कांहीं विशेष भर पडली नाहीं. १९ जून १९३७ रोजीं हा मरण पावला.

बॅरिमूर, जॉन (१८८२–):—जगप्रसिद्ध अमेरिकन नट. याचा जन्म फिलाडेल्फियामध्यें १५ फेब्रुवारी १८८२ रोजीं झाला. १९०३ मध्यें तो प्रथम रंगभूमीवर आला. 'The Boys of Company B,' 'A Stubborn Cinderalla' व Peter Ibbetsen. या नाटकांतील त्याचें काम नांवाजलेलें आहे. १९२४, २५ मध्यें न्यूयॉर्क व लंडनच्या रंगभूमीवरील 'हॅम्लेट'चें काम त्यानें केलें व दोन्ही ठिकाणीं कमालीची लोकप्रियता संपादन केली. आपला थोरला भाऊ लायोनेल बॅरिमूरबरोबर 'The Jest' मध्यें त्यानें काम केलें (१९२०). त्यांतहि त्यानें आपलें अभिनयकौशल्य उत्तम प्रकारें दाखविलें. भरपूर उंचीचा व देखणा नट म्हणून तो सर्वत्र आवडता आहे.


जॉन बॅरीमूर


अमेरिकेंत रंगभूमीवर येण्यापूर्वीं यानें कार्टूनिस्ट म्हणून काम केलें होतें. मूक चित्रपटांच्या काळांत प्रथम विनोदी चित्रपटांतून काम करून हा पुढें आला व पुढें हॉलिवुडमध्यें पहिल्या प्रतीचा नट झाला. १९३० पूर्वीं पुरुष नटांत सर्वांत जास्त पगार यालाच मिळत असे (दर आठवड्यास १०००० डॉलर). Dr. Jakyll and Mr Hyde या मूकपटांत त्यानें मेकअप् न करतां काम केलें होतें. याशिवाय बोलपटाच्या कालांत Topaze, Grand Hotel, Rasputin and the Mad Monk, Reunion in Vienna इ. नावाजलेले चित्रपट होत. रुबाबदारपणा व नाट्य हे याच्या अभिनयाचे दोन महत्त्वाचे गुण आहेत.

बॅरिमूर, लायोनेल (१८७८–):–विख्यात अमेरिकन नट. जॉन बॅरिमूरचा थोरला भाऊ. याचा जन्म

फिलाडेल्फिया गांवीं २८ एप्रिल १८७८ रोजीं झाला. १८९३ पासून हा रंगभूमीवर आहे. 'The Arizona' 'The Second in Command', 'The Other Girl' या नाटकांतून त्यानें काम केलें आहे. बोलपट सुरू झाल्यानंतर ज्या कांहीं थोड्या नटांना प्रथम बोलपटांत काम मिळालें त्यापैकीं हा प्रमुख आहे. 'The Lion and the Mouse' हा त्याचा पहिला बोलपट होय. यानंतर Rasputin the Mad Monk Grand Hotel इ०. सहजता, व्यक्तित्वदर्शन व आवाजावरील हुकमत हे याचे प्रमुख गुण आहेत. मूक चित्रपटाच्या कालाच्या प्रारंभीं यानें कांहीं लहान सहान चित्रपटांत काम केलें होतें. शिवाय कांहीं चित्रपटहि यानें दिग्दर्शित केले आहेत.

बॅरोग्राफः–बॅरोमीटरचा हा एक प्रकार आहे. या यंत्रांतील कांटा हवेच्या दाबाची रेषा कागदावर (Chart) आपोआप काढतो.

बॅरोमीटरः–टॉरिसेली या इटालियन शास्त्रज्ञानें १६४३ मध्यें वायुभार मोजण्यासाठीं केलेल्या प्रयोगावर



बॅरोमिटर

हें वायुभारमापक यंत्र अथवा बॅरोमीटर आधारलेलें आहे. ३० इंचांपेक्षां अधिक उंचीची कांचेची पोकळ नळी घेऊन तींत पारा भरला व एका पाण्याच्या भांड्यांत ती नळी उपडी केली तर नळींतील पारा उतरून तो पाण्याच्या सपाटीपासून फक्त ३० इंच उंच राहील व त्यावरील नळी मोकळी राहील, ही जी मोकळी जागा असते तिला रिक्तावकाश (Vaccum) म्हणतात. हवेच्या दाबाच्या प्रमाणांत नळींतील पाऱ्याची उंची अवलंबून असते हें यांतील तत्त्व आहे. सोबतच्या चित्रांत हा प्रयोग व एक बॅरोमिटर दाखविला आहे. अधिक माहिती 'वायुभारमापक' या सदराखालीं पाहा.

बाजीराव पेशवे, पहिले (१७००–१७४०):– थोरले बाजीराव पेशवे हे पराक्रमी पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचे चिरंजीव. यांचा जन्म १८ ऑगष्ट १७०० रोजीं झाला. लहानपणापासून वडिलांबरोबर मोहिमांवर जाण्याच्या संवयीमुळें त्यांना व त्यांचे धाकटे बंधु चिमाजी आप्पा यांना युद्धशास्त्राचें जणूं बाळकडूच मिळालें होतें. वडिलांनीं हातीं घेतलेलें काम पुढें चालू ठेवून वडिलांपेक्षांहि थोरल्या बाजीराव पेशव्यांनीं अधिक कामगिरी करून दाखविली आणि सर्व सरदारांमध्यें राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करून त्या भावनेच्या जोरावर चारी दिशेला राज्यविस्तार वाढवून उत्तरेच्या राजकारणांत त्यांनीं शिरकाव करून घेतला या दोन गोष्टींतच त्यांच्या सर्व चरित्राचें सार भरलेलें आहे.

नेक नामदार विन्स्टन चर्चिल यांनीं आपल्या मार्लबरोच्या चरित्रांत तीन गोष्टींचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. (१) मार्लबरोची इतिहासानें मुक्तकंठानें कधींच स्तुति केली नाहीं. (२) लढाया लढतांना त्याला अनेक विघ्नें आलीं असतांनादेखील त्यानें प्रत्येक लढाईंत विजय मिळविला. (३) तो गेल्यानंतर अपजयाला खरी सुरवात झाली. हींच विधानें थोड्याफार प्रमाणांत थोरल्या बाजीरावांनासुद्धां लागू करतां येतील. बाजीराव पेशवे हे आपल्या दराऱ्यानें शत्रूला चळचळा कांपावयास लावणारे व शिवाजीच्या पराक्रमांच्या तोडीचीं अद्भुत कृत्यें करून हिंदवी स्वराज्याची पताका सर्व भरतखंडांत नाचविणारे असें असामान्य सेनानी होते. पण त्यांच्या योग्यतेनुरूप त्यांचीं स्तुतिस्तोत्रें गायलेलीं आपणांला फारशीं आढ-

ळत नाहींत. मार्लबरोप्रमाणें त्यांनींहि अपयश पदरीं कधींच घेतलें नाहीं. वास्तविक शाहूचे कान भरवून त्यांना मागें ओढणारे सरदार, वारंवार पैशाची भासणारी टंचाई व शाहूचा लहरीपणा अशा सारख्या अडचणींना तोंड देऊनसुद्धां त्यांनीं दाभाड्यासारखे स्वकीय शत्रू व निजाम, दिल्लीचे सरदार यांसारखे परकीय शत्रू यांचा पुरा बीमोड केला. पालखेडची लढाई (१७२७), डभईची लढाई (१७३१), दिल्लीवरील चढाई (१७३७), भोपाळचा वेढा (१७३७) बुंदेलखंडावरील मोहीम व औरंगाबादचें युद्ध हे बाजीरावांच्या पराक्रमाचे एकापेक्षां एक उज्ज्वल टप्पे आहेत. मार्लबरोसंबंधानें केलेलें तिसरें विधान बाजीरावाच्या बाबतींत इतके यथार्थतेनें लागू पडण्यासारखे नसले तरी येवढें मात्र खात्रीनें म्हणतां येईल कीं त्याच्याइतक्या लढाया नंतरच्या कोणत्याच पेशव्यांनीं मारल्या नाहींत किंवा त्यांच्याइतके विजय नंतर कोणीच संपादन केले नाहींत. फार काय, बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दींत हिंदवी स्वराज्याचें गाठलेलें अत्युच्च शिखर पुढें कोणत्याच पेशव्याच्या कारकीर्दींत हिंदवी स्वराज्य गांठूं शकलें नाहीं असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत जरी अटकेपार घोडे नाचले तरी एकाएकीं पानपतचा धक्का बसून पेशवाई खिळखिळी झाली. ती सांवरण्यांत थोरल्या माधवरावांचा वेळ गेल्यानें त्यांनाहि तें अत्युच्च शिखर दिसूं शकलें नाहीं आणि नारायणरावांपासून दुहीनें पेशवाईला व पर्यायानें मराठी साम्राज्याला उतरती कळा लागली.

दिल्लीचें राजकारण हस्तगत करण्याची जब्बर महत्त्वाकांक्षा थोरल्या बाजीरावांनीं धरली होती. मोंगल बादशाहीच्या मुळाशींच घाव घातल्यास त्याच्या फांद्या आपोआप खालीं येतील हें त्यांनीं ओळखलें होतें. त्याकरितां अनेक फिरत्या फौजा त्यांनीं तयार ठेविल्या होत्या. नवीन फौज उभारण्याचे कामीं व नवीन नवीन प्रांत जिंकून राज्यविस्तार करण्याचे कामीं होत असलेल्या अवाढव्य कर्जाकडे त्यांनीं भावी परिणामाकडे लक्ष देऊन जाणून बुजून डोळेझांक केली. फार काय, उत्तरेकडील राजकारण हस्तगत करण्याच्या भरांत निजामाकडे व दक्षिणेंतील राजकारणाकडेहि दुर्लक्ष केलें. यावरून दिल्लीचें राजकारण हस्तगत करण्याचें महत्त्व त्यांनीं किती ओळखलें होतें हें दिसून येतें. चिमाजी आप्पासारखा पराक्रमी भाऊ व शिंदे, होळकर, बुंदेले, गायकवाड वगैरेसारखे महान् पराक्रमी सरदार त्यांना हाताशीं घेऊन त्यांनीं वाढविलेल्या साम्राज्यसीमाच त्यांच्या अलौकिक कर्तबगारीची साक्ष देण्यास समर्थ आहेत. अशा अलौकिक सेनानीला जगांतील सुप्रसिद्ध सेनानींमध्यें मानाचें स्थान दिलें तर बिलकुल अस्थानीं होणार नाहीं.

बाजीरावाचें लग्न महादजी कृष्ण जोशी चासकर यांच्या काशीबाई नांवाच्या मुलीबरोबर झालें. बाजीरावाला बाळाजी, रामचंद्र, जनार्दन व रघुनाथ असें चार मुलगे झालें. शिवाय मस्तानी नांवानें ओळखल्या जाणाऱ्या मुसलमान स्त्रीपासून समशेरबहादर नांवाचा मुलगा झाला होता. मस्तानीचें बाजीरावार प्रेम होतें. पण मस्तानीशीं असलेला हा प्रेमसंबंध घरच्या इतर मंडळीस आवडत नव्हता. त्यामुळें बाजीरावांस मनस्ताप फार झाला. नादीरशहाचा बंदोबस्त करण्यासाठीं उत्तरेस निघाले असतांना वाटेंत रावेरला नर्मदेंत आंघोळ करीत असतां यांना बुडून मृत्यू आला. कांहींच्या मतें त्यांनीं आत्महत्या केली. मृत्यू २८-४-१७४०.

बाजीराव रघुनाथ पेशवे (१७७५-१८५१):- दुसरा बाजीराव पेशवा. हा रघुनाथराव दादा पेशव्याचा मुलगा. याचा जन्म १७ जानेवारी १७७५ रोजीं आनंदीबाईच्या पोटीं धारला झाला. याचें वीस एकवीस वर्षांचें आयुष्य कैदेंतच गेलें. सवाई माधवरावाशीं पत्रव्यवहार ठेवून त्याच्या मनांत नाना फडणीसाविषयीं विकल्प व आपणाविषयीं सहानुभूति त्यानें निर्माण केली. पण या गोष्टीचा परिणाम सवाई माधवरावाच्या आत्महत्येंत झाला. नंतर दुसऱ्या बाजीरावाला महत्व आलें. याचा धाकटा भाऊ चिमणाजी याला सवाई माधवरावाच्या बायकोच्या मांडीवर दत्तक देऊन पेशवेपदावर स्थापण्याचा विचार सोडून नानाला त्याच्याशीं संगनमत करणें भाग पडलें. त्यास पेशवाईपद ता. ५-१२-१७९६ त मिळालें. त्याबरोबर नानाचें वर्चस्व कमी झालें. नंतर तो चारच वर्षांत निवर्तला. यापुढें राजकारण पूर्णपणें नासलें.

बाजीराव शिंद्याच्या कह्यांत गेला. त्यामुळें पुण्यांत पेशव्याच्या ऐवजीं शिंद्याचा कारभार सुरू झाला. दौलतराव शिंद्याचा सासरा-सर्जेराव घाडग्यानें पुण्यांत जुलमाचा कहर केला. शिंदे आणि होळकर यांचें भांडण

जोरास लागले. यशवंतराव होळकरानें शिंद्याचा मुलूख मारण्यास सुरवात केली त्याबरोबर शिंद्यास पुणें सोडणें भाग पडलें. होळकराचें पारिपत्य करण्यासाठीं पेशव्यांनीं पाठविलेल्या बापू गोखल्यानें विठोजी होळकरास पकडून पुण्यास दाखल केलें. त्याचा वध हत्तीच्या पायीं देऊन बाजीरावानें (ता. १।५।१८०१) केला. त्यामुळें यशवंतराव होळकर फारच चिडला. त्यानें पुण्यावर यशस्वी चाल केली. (ता. २५।१०।१८०२) तेव्हां घाबरून बाजीराव सिंहगड, सुवर्णदुर्ग या मार्गानें इंग्रजाचे आश्रयास वसईस गेला. तेथें त्यानें कोणाचाही विचार न घेतां वसईचा नादान तह केला. (ता. ३१–१२–१८०२). इंग्रजांचें संरक्षण मिळाल्यानें त्याला स्वास्थ्य लाभलें; पण हा काळ त्यानें ख्यालीखुशालींत घालविला. सन १८१० जून रेसिडेन्ट क्लोज हा बदलला व त्या जागीं एलिफन्स्टन आला त्याबरोबर सर्व गाडें बिघडलें.

बाजीरावानें सरदारांचे सरंजाम जप्त करण्याचा सपाटा चालविला. तेव्हां मध्यें पडून एलिफन्स्टननें त्याला आळा घातला आणि सरदारांचा दुवा घेतला बाजीरावानें सरदारांचीं मनें विनाकारण दुखविलीं. ता. ७–७–१८१२ एलिफस्टननें पंढरपूरला नवा तह केला. त्यामुळें त्याची सरदारांवरील हुकमत पार नाहींशी झाली. एलिफन्स्टननें हा तडाखा दिल्यानें उभयतांचें वैमनस्य वाढतच गेलें. प्रसंगीं उपयोगी पडावा म्हणून कॅ. फोर्डच्या हाताखालीं त्यानें एक कवायती कंपू तयार केला (स. १८१३). पेंढाऱ्यांशीं लढण्यासाठीं म्हणून त्यानें आणखी एक नवीन गोसाव्यांचा बेहडा तयार केला.

स. १८१५ बाजीरावाच्या मुलखाचा वसूल सालीना सव्वा कोट रुपये होता. त्यापैकीं ५० लाख तरी तो शिल्लक टाकी. यावेळीं त्याचेजवळ शिलकेंत ५ कोटींचा ऐवज नगद होता.

इंग्रज व पेशवे यांचे संबंध जास्तच विकोपास गेले ते गंगाधर शास्त्र्याच्या खुनानें. त्याचा खून बाजीरावाच्या सान्निध्यांत ता. २०-७-१८१५ रोजीं झाला. त्याचा फायदा घेऊन एलिफन्स्टननें शिंदे,होळकर, गायकवाड व नागपूरकर भोसले वगैरे सरदारांवरील बाजीरावाचें स्वामित्व अजीबात नष्ट केलें, व त्यांच्याशीं कोणत्याही प्रकारचें दळणवळण ठेवण्यास बंदी केली. (ता. १३-६-१८१७). यानें बाजीराव जास्तच चिडला त्यानें इंग्रजांशीं सामना देण्याचें ठरविलें. पण या बाबतींत बापू गोखल्याशिवाय त्याला कोणीहि अनुमोदन दिलें नाहीं. यावेळीं इंग्रजाशीं सामना देण्यांत बाजीरावानें चूक केली.कारण युरोपांत नेपोलियन बोनापार्टला चीत केल्यामुळें इंग्रजांचा हात रिकामा झाला होता त्यामुळें बाजीरावाला चेचणें त्यांस सोपें गेलें. शिंदे, होळकर,नागपूरकर भोसले,तसेच ब्रम्हदेशाचा बादशहा यांकडून कुमक मिळविण्याचा त्यानें प्रयत्न केला; पण तो सफल होण्यापूर्वीच लढाईस तोंड लागलें. खडकीची व येरवड्याची या लढायांत बाजीरावाचा पराभव झाला. तेव्हां शिंदे होळकरांच्या मदतीनें इंग्रजाशीं तोंड द्यावें म्हणून तो बाहेर पडला. त्यानें घोडदौडी मारण्यास प्रारंभ केला.

दीड महिन्याचे अवधींत त्याचे फौजांचा ४०८ मैलांचा प्रवास झाला. त्यानें पुन्हां आपला मोर्चा पुण्यावर वळविला. ओत्तरचा घाट उतरून जुन्नर खेडावरून तो चाकणास दाखल झाला. घोडनदीहून इंग्रजांची फौज पुण्यास येत होती तिची व बाजीरावाची अकस्मात् गाठ कोरेगांवास पडली. कोरेगाव, गोपाळअष्टी या ठिकाणीं दोन मातबर लढाया झाल्या. त्यांत पेशव्यांचा शूर रणझुंजार बापू गोखला कामास आला. त्यामुळें बाजीरावाचा धीर सुटला. तरी गुप्त रीतीनें बेत ठरवून तो नागपूरच्या बाजूला पळत सुटला. पण तिकडेही कांहीं उपयोग झाला नाहीं. त्याचा शिवणी येथें पूर्ण पराभव झाला. तेव्हां तो बऱ्हाणपूरचे बाजूस अशीरगडचे उत्तरेस धूळकोट येथें गेला. आणि तेथें इंग्रजांनीं त्याला पूर्णपणें गाठलें. येथें त्यानें मालकमला राज्याची सोडचिठी लिहून दिली व कोठें तरी क्षेत्रांत राहाण्याचें कबूल केलें (ता. २-६-१८१८) यानंतर तो ब्रह्मावर्तास बिठूर येथें राहिला. व तेथें १४ जानेवारी १८५१ रोजीं मरण पावला. यानें अकरा लग्ने केलीं; औरस संतती झाली पण टिकली नाहीं. त्यामुळें त्यानें माधव नारायण भट यांचा धोंडू नांवाचा मुलगा दत्तक घेतला. हाच मुलगा १८५७ च्या क्रांतियुद्धांत नानासाहेब पेशवा म्हणून चमकला.

बाणभट्ट (सुमारें ६४८):–संस्कृत महाकवि. हा वात्स्यायनगोत्री ब्राह्मण. कुबेर–पाशुपत-अर्थपति–चित्र–भानु–बाण असा याचा वंशक्रम आहे. याच्या मातेचें नांव राज्यदेवी. याच्या चवदाव्या वर्षाच्या

ळत नाहींत. मार्लबरोप्रमाणें त्यांनींहि अपयश पदरीं कधींच घेतलें नाहीं. वास्तविक शाहूचे कान भरवून त्यांना मागें ओढणारे सरदार, वारंवार पैशाची भासणारी टंचाई व शाहूचा लहरीपणा अशा सारख्या अडचणींना तोंड देऊनसुद्धां त्यांनीं दाभाड्यासारखे स्वकीय शत्रू व निजाम, दिल्लीचे सरदार यांसारखे परकीय शत्रू यांचा पुरा बीमोड केला. पालखेडची लढाई (१७२७), डभईची लढाई (१७३१), दिल्लीवरील चढाई (१७३७), भोपाळचा वेढा (१७३७) बुंदेलखंडावरील मोहीम व औरंगाबादचें युद्ध हे बाजीरावांच्या पराक्रमाचे एकापेक्षां एक उज्ज्वल टप्पे आहेत. मार्लबरोसंबंधानें केलेलें तिसरें विधान बाजीरावाच्या बाबतींत इतके यथार्थतेनें लागू पडण्यासारखे नसले तरी येवढें मात्र खात्रीनें म्हणतां येईल कीं त्याच्याइतक्या लढाया नंतरच्या कोणत्याच पेशव्यांनीं मारल्या नाहींत किंवा त्यांच्याइतके विजय नंतर कोणीच संपादन केले नाहींत. फार काय, बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दींत हिंदवी स्वराज्याचें गाठलेलें अत्युच्च शिखर पुढें कोणत्याच पेशव्याच्या कारकीर्दींत हिंदवी स्वराज्य गांठूं शकलें नाहीं असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत जरी अटकेपार घोडे नाचले तरी एकाएकीं पानपतचा धक्का बसून पेशवाई खिळखिळी झाली. ती सांवरण्यांत थोरल्या माधवरावांचा वेळ गेल्यानें त्यांनाहि तें अत्युच्च शिखर दिसूं शकलें नाहीं आणि नारायणरावांपासून दुहीनें पेशवाईला व पर्यायानें मराठी साम्राज्याला उतरती कळा लागली.

दिल्लीचें राजकारण हस्तगत करण्याची जबर महत्त्वाकांक्षा थोरल्या बाजीरावांनीं धरली होती. मोंगल बादशाहीच्या मुळाशींच घाव घातल्यास त्याच्या फांद्या आपोआप खालीं येतील हें त्यांनीं ओळखलें होतें. त्याकरितां अनेक फिरत्या फौजा त्यांनीं तयार ठेविल्या होत्या. नवीन फौज उभारण्याचे कामीं व नवीन नवीन प्रांत जिंकून राज्यविस्तार करण्याचे कामीं होत असलेल्या अवाढव्य कर्जाकडे त्यांनीं भावी परिणामाकडे लक्ष देऊन जाणून बुजून डोळेझांक केली. फार काय, उत्तरेकडील राजकारण हस्तगत करण्याच्या भरांत निजामाकडे व दक्षिणेंतील राजकारणाकडेहि दुर्लक्ष केलें. यावरून दिल्लीचें राजकारण हस्तगत करण्याचें महत्त्व त्यांनीं किती ओळखलें होतें हें दिसून येतें. चिमाजी आप्पासारखा पराक्रमी भाऊ व शिंदे, होळकर, बुंदेले, गायकवाड वगैरेसारखे महान् पराक्रमी सरदार त्यांना हातांशीं घेऊन त्यांनीं वाढविलेल्या साम्राज्यसीमाच त्यांच्या अलौकिक कर्तबगारीची साक्ष देण्यास समर्थ आहेत. अशा अलौकिक सेनानीला जगांतील सुप्रसिद्ध सेनानींमध्यें मानाचें स्थान दिलें तर बिलकुल अस्थानीं होणार नाहीं.

बाजीरावाचें लग्न महादजी कृष्ण जोशी चासकर यांच्या काशीबाई नांवाच्या मुलीबरोबर झालें. बाजीरावाला बाळाजी, रामचंद्र, जनार्दन व रघुनाथ असें चार मुलगे झाले. शिवाय मस्तानी नांवानें ओळखल्या जाणाऱ्या मुसलमान स्त्रीपासून समशेरबहाद्दर नांवाचा मुलगा झाला होता. मस्तानीचें बाजीरावार प्रेम होतें. पण मस्तानीशीं असलेला हा प्रेमसंबंध घरच्या इतर मंडळीस आवडत नव्हता. त्यामुळें बाजीरावांस मनस्ताप फार झाला. नादीरशहाचा बंदोबस्त करण्यासाठीं उत्तरेस निघाले असतांना वाटेंत रावेरला नर्मदेंत आंघोळ करीत असतां यांना बुडून मृत्यू आला. कांहींच्या मतें त्यांनीं आत्महत्या केली. मृत्यू २८-४-१७४०.

बाजीराव रघुनाथ पेशवे (१७७५–१८५१):– दुसरा बाजीराव पेशवा. हा रघुनाथराव दादा पेशव्याचा मुलगा. याचा जन्म १७ जानेवारी १७७५ रोजीं आनंदीबाईच्या पोटीं धारला झाला. याचें वीस एकवीस वर्षांचें आयुष्य कैदेंतच गेलें. सवाई माधवरावाशीं पत्रव्यवहार ठेवून त्याच्या मनांत नाना फडणीसाविषयीं विकल्प व आपणाविषयीं सहानुभूति त्यानें निर्माण केली. पण या गोष्टीचा परिणाम सवाई माधवरावाच्या आत्महत्येंत झाला. नंतर दुसऱ्या बाजीरावाला महत्व आलें. याचा धाकटा भाऊ चिमणाजी याला सवाई माधवरावाच्या बायकोच्या मांडीवर दत्तक देऊन पेशवेपदावर स्थापण्याचा विचार सोडून नानाला त्याच्याशीं संगनमत करणें भाग पडलें. त्यास पेशवाईपद ता. ५-१२-१७९६ त मिळालें. त्याबरोबर नानाचें वर्चस्व कमी झालें. नंतर तो चारच वर्षांत निवर्तला. यापुढें राजकारण पूर्णपणें नासलें.

बाजीराव शिंद्याच्या कह्यांत गेला. त्यामुळें पुण्यांत पेशव्याच्या ऐवजीं शिंद्याचा कारभार सुरू झाला. दौलतराव शिंद्याचा सासरा–सर्जेराव घाडग्यानें पुण्यांत जुलमाचा कहर केला. शिंदे आणि होळकर यांचें भांडण

जोरास लागले. यशवंतराव होळकरानें शिंद्याचा मुलूख मारण्यास सुरवात केली त्याबरोबर शिंद्यास पुणें सोडणें भाग पडलें. होळकराचें पारिपत्य करण्यासाठीं पेशव्यांनीं पाठविलेल्या बापू गोखल्यानें विठोजी होळकरास पकडून पुण्यास दाखल केलें. त्याचा वध हत्तीच्या पायीं देऊन बाजीरावानें (ता. १।५।१८०१) केला. त्यामुळें यशवंतराव होळकर फारच चिडला. त्यानें पुण्यावर यशस्वी चाल केली. (ता. २५।१०।१८०२) तेव्हां घाबरून बाजीराव सिंहगड, सुवर्णदुर्ग या मार्गानें इंग्रजाचे आश्रयास वसईस गेला. तेथें त्यानें कोणाचाही विचार न घेतां वसईचा नादान तह केला. (ता. ३१–१२–१८०२). इंग्रजांचें संरक्षण मिळाल्यानें त्याला स्वास्थ्य लाभलें; पण हा काळ त्यानें ख्यालीखुशालींत घालविला. सन १८१० जून रेसिडेन्ट क्लोज हा बदलला व त्या जागीं एलिफन्स्टन आला त्याबरोबर सर्व गाडें बिघडलें.

बाजीरावानें सरदारांचे सरंजाम जप्त करण्याचा सपाटा चालविला. तेव्हां मध्यें पडून एलिफन्स्टननें त्याला आळा घातला आणि सरदारांचा दुवा घेतला बाजीरावानें सरदारांचीं मनें विनाकारण दुखविलीं. ता. ७–७–१८१२ एलिफस्टननें पंढरपूरला नवा तह केला. त्यामुळें त्याची सरदारांवरील हुकमत पार नाहींशी झाली. एलिफन्स्टननें हा तडाखा दिल्यानें उभयतांचें वैमनस्य वाढतच गेलें. प्रसंगीं उपयोगी पडावा म्हणून कॅ. फोर्डच्या हाताखालीं त्यानें एक कवायती कंपू तयार केला (स. १८१३). पेंढाऱ्यांशीं लढण्यासाठीं म्हणून त्यानें आणखी एक नवीन गोसाव्यांचा बेहडा तयार केला.

स. १८१५ बाजीरावाच्या मुलखाचा वसूल सालीना सव्वा कोट रुपये होता. त्यापैकीं ५० लाख तरी तो शिल्लक टाकी. यावेळीं त्याचेजवळ शिलकेंत ५ कोटींचा ऐवज नगद होता.

इंग्रज व पेशवे यांचे संबंध जास्तच विकोपास गेले ते गंगाधर शास्त्र्याच्या खुनानें. त्याचा खून बाजीरावाच्या सान्निध्यांत ता. २०-७-१८१५ रोजीं झाला. त्याचा फायदा घेऊन एलिफन्स्टननें शिंदे,होळकर, गायकवाड व नागपूरकर भोसले वगैरे सरदारांवरील बाजीरावाचें स्वामित्व अजीबात नष्ट केलें, व त्यांच्याशीं कोणत्याही प्रकारचें दळणवळण ठेवण्यास बंदी केली. (ता. १३-६-१८१७). यानें बाजीराव जास्तच चिडला त्यानें इंग्रजांशीं सामना देण्याचें ठरविलें. पण या बाबतींत बापू गोखल्याशिवाय त्याला कोणीहि अनुमोदन दिलें नाहीं. यावेळीं इंग्रजाशीं सामना देण्यांत बाजीरावानें चूक केली.कारण युरोपांत नेपोलियन बोनापार्टला चीत केल्यामुळें इंग्रजांचा हात रिकामा झाला होता त्यामुळें बाजीरावाला चेचणें त्यांस सोपें गेलें. शिंदे, होळकर,नागपूरकर भोसले,तसेच ब्रम्हदेशाचा बादशहा यांकडून कुमक मिळविण्याचा त्यानें प्रयत्न केला; पण तो सफल होण्यापूर्वीच लढाईस तोंड लागलें. खडकीची व येरवड्याची या लढायांत बाजीरावाचा पराभव झाला. तेव्हां शिंदे होळकरांच्या मदतीनें इंग्रजाशीं तोंड द्यावें म्हणून तो बाहेर पडला. त्यानें घोडदौडी मारण्यास प्रारंभ केला.

दीड महिन्याचे अवधींत त्याचे फौजांचा ४०८ मैलांचा प्रवास झाला. त्यानें पुन्हां आपला मोर्चा पुण्यावर वळविला. ओत्तरचा घाट उतरून जुन्नर खेडावरून तो चाकणास दाखल झाला. घोडनदीहून इंग्रजांची फौज पुण्यास येत होती तिची व बाजीरावाची अकस्मात् गाठ कोरेगांवास पडली. कोरेगाव, गोपाळअष्टी या ठिकाणीं दोन मातबर लढाया झाल्या. त्यांत पेशव्यांचा शूर रणझुंजार बापू गोखला कामास आला. त्यामुळें बाजीरावाचा धीर सुटला. तरी गुप्त रीतीनें बेत ठरवून तो नागपूरच्या बाजूला पळत सुटला. पण तिकडेही कांहीं उपयोग झाला नाहीं. त्याचा शिवणी येथें पूर्ण पराभव झाला. तेव्हां तो बऱ्हाणपूरचे बाजूस अशीरगडचे उत्तरेस धूळकोट येथें गेला. आणि तेथें इंग्रजांनीं त्याला पूर्णपणें गाठलें. येथें त्यानें मालकमला राज्याची सोडचिठी लिहून दिली व कोठें तरी क्षेत्रांत राहाण्याचें कबूल केलें (ता. २-६-१८१८) यानंतर तो ब्रह्मावर्तास ब्रिठूर येथें राहिला. व तेथें १४ जानेवारी १८५१ रोजीं मरण पावला. यानें अकरा लग्ने केलीं; औरस संतती झाली पण टिकली नाहीं. त्यामुळें त्यानें माधव नारायण भट यांचा धोंडू नांवाचा मुलगा दत्तक घेतला. हाच मुलगा १८५७ च्या क्रांतियुद्धांत नानासाहेब पेशवा म्हणून चमकला.

बाणभट्ट (सुमारें ६४८):–संस्कृत महाकवि. हा वात्स्यायनगोत्री ब्राह्मण. कुबेर–पाशुपत-अर्थपति–चित्र–भानु–बाण असा याचा वंशक्रम आहे. याच्या मातेचें नांव राज्यदेवी. याच्या चवदाव्या वर्षाच्या

आंत याचे आईबाप वारले. नंतर ठाणेश्वरच्या हर्ष-वर्धनाचा (स. ६०६–६४८) यास आश्रय मिळाला असें यानें आपल्या हर्षचरित्रांत लिहिलें आहे.

याचे ग्रंथ–कादंबरी (पूर्वार्ध), हर्षचरित. पुढील ग्रंथ याचेच आहेत किंवा नाहीं याबद्दल मतभेद आहे. पार्वती परिणय नाटक, नागानंद नाटक (याचें नसून धावकाचें असावें असें म्हणतात) चंडिकास्तोत्र. याच्या मुकुटताडितक नाटकाचा निर्देश गुणविनयगणीनें आपल्या नलचंपूच्या टीकेंत केलेला आहे. क्षेमेंद्रानें आपल्या औचित्यविचारचर्चेत कांहीं पद्यांचा विचार बाणाच्या नांवावर घेतलेला आहे. त्यावरून बाणानें एक पद्यमय कादंबरीहि लिहिली होती असें कळतें, पण ती आज उपलब्ध नाहीं.

बाणासुरः–बलीचा मुलगा. हा शंकरभक्त होता. याला अनौपम्या इत्यादि पुष्कळ स्त्रिया होत्या. बाणासुर त्रिपुरांतील शोणितपुरांत रहात असे. हें त्रिपुरांतील एक पुर होय. हीं त्रिपुरें, याच्या बायकांच्या पतिसेवेमुळें आकाशांत संचारत. तशींच तीं अभेद्यहि बनलीं होतीं. देव व ऋषी यांना पुढें पुढें बाणासुराकडून फार त्रास होऊं लागला. तो नष्ट करण्यासाठीं देवांनीं शंकराची विनवणी केली. पुढें शंकरानीं, त्याच्या स्त्रियांचें पतिसेवेकडील लक्ष, नारदाकडून कमी करवलें. त्यामुळें हीं त्रिपुरें निर्बल बनलीं. तसेंच तीं पुरें विद्ध करून अग्नीला तीं जाळण्यास आज्ञा केली. बाणासुराचा अशा संकटग्रस्त कालांतहि आपल्या वरील अढळ विश्वास असणारीं कृत्यें पाहून त्याजवर शंकर प्रसन्न झाले व त्यांनीं त्यास राहण्यास एक शहर, कार्तिक स्वामीच्या जन्मस्थानाचें आधिपत्य देऊन त्यास पुत्रवत् मानेन असा वर दिला. शिवपुराणांत बाणाला आणखी एक वर मिळाला असल्याचा उल्लेख आहे; तो वर असा–' माझेजवळ सर्व परिवारासह राहून माझें रक्षण करावें व मला आनंद द्यावा. ' कार्तिकस्वामीकडून यास अतितेजस्वी ध्वज व मयुरवाहन यांची प्राप्ती झाली. याचा ध्वज माणसासारखें डोकें असलेल्या मोरासारखा होता. शंकरांच्या कृपेच्या जोरावर त्यानें पुष्कळवेळां देवांना जिंकिलें. याला सहस्र बाहु होते. हे बाहू वारंवार युद्धासाठीं स्फुरण पावत. पुढें त्यास प्रतिस्पर्धी राहिला नसल्यामुळें त्यानें शंकरांना ' माझ्या बाहूंचा युद्धकंड केव्हां शमेल? असा प्रश्न विचारला. या प्रश्नाला शंकरांनीं ' ज्यावेळीं तुझा ध्वजभंग होईल तेव्हां ' असें उत्तर दिलें. यानंतर लौकरच इंद्राच्या वज्रानें त्याचा ध्वज मोडला.

यास उषा नांवाची एक रूपवान, एकुलती एक आणि आवडती मुलगी होती. तिच्या बाबतींत अनिरुद्धाशीं बाणासुराला लढावें लागलें. त्यानें या युद्धांत नागपाशानें अनिरुद्धाला बद्ध करून उषेला व त्याला कोंडून ठेविलें. यामुळें यादवांसह श्रीकृष्ण बाणावर चालून आला. कृष्णानें त्याचा पराभव तर केलाच व वर त्याचे दोन हात शिल्लक ठेवून बाकीचे हात छाटून टाकले. शिवपुराणांत व भागवतांत चार हात ठेवून बाकीचे कापून काढले असा उल्लेख आहे. पुढें यानें उषेचा अनिरुद्धाशीं विवाह लावून देऊन त्यांची बोळवण केली. उषेच्या मुलाला बाणानें आपल्या पश्चात् गादीचा वारस ठरविलें.

बानर्जी, सर सुरेंद्रनाथ (१८४८–१९२५):–बंगालमधील राजकारणी पुरुष, उत्तम वक्ता, वृत्तपत्रकार. सुरेंद्रनाथांनीं बी. ए.ची पदवी १८६८त मिळविली. नंतर ते I. C. S. होण्यासाठीं लंडनला गेले. तेथें ते वयाच्या २२व्या वर्षी या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. शिक्षण आटोपून ते परत हिंदुस्थानांत आल्यावर त्यांची नेमणूक सिल्हेट येथें मॅजिस्ट्रेट म्हणून झाली. या जागेवर असतांना त्यांच्याविरुद्ध अँग्लोइंडियनांनीं उत्पन्न केलेल्या प्रकरणांत त्यांना आपल्या नोकरीस बडतर्फ होऊन मुकावें लागलें. या बडतर्फीमुळें त्यांना बॅरिस्टरीचा व्यवसायहि करतां येईना. शेवटीं एका शाळेंत नोकरी पत्करून त्यांनीं आपल्या लोकोपयोगी कार्यास आरंभ केला.

विद्यार्थ्यांच्या सभा स्थापून सुरेंद्रनाथांनीं त्यांना देशभक्तीवर व्याख्यानें ऐकविलीं. विद्यार्थ्यांनीं विशिष्ट मर्यादेपर्यंत राजकारणांत भाग घ्यावा याबद्दल प्रोत्साहन दिलें. तसेंच देशभक्तीचे व राजकारणाच्या तत्त्वज्ञानाचे धडे ते व्याख्यानरूपानें देत. याशिवाय सर्वसामान्य लोकांना आपल्या कार्याचा परिचय करून देण्यासाठीं त्यांनीं १८७९ मध्यें ' बंगाली ' पत्र विकत घेतलें. त्याचे १९१९ पर्यंत, ते संपादक होते. याशिवाय इंडियन असोसिएशनची स्थापना, सिव्हिल सर्व्हिसमध्यें हिंदी लोकांचा प्रवेश व्हावा म्हणून केली. हे १९१७ पर्यंत दुसऱ्या कॉंग्रेसपासून प्रत्येक कॉंग्रे-

सला हजर राहत असत. तसेंच देशांत जागृति होण्यासाठीं यांनीं पुष्कळ ठिकाणीं व्याख्यानें दिलीं.

वरील कामगिरीखेरीज कलकत्ता कार्पोरेशनचीहि सेवा १८७६ पासून १८९९ पर्यंत सुरेंद्रांनीं केली. १८९३ त ते कार्पोरेशनतर्फे बंगालच्या कायदे कौन्सिलमध्यें निवडून आले. १९०५ पासून बंगालची फाळणी रद्द होईपर्यंत निवडणुकीला उभें राहावयाचें नाहीं असें ठरवून ती कायमची रद्दीत होईपर्यंत आपला निश्चय तडीला नेला. १९११ त वंगभंग कायमचा थांबल्यावर ते दोन वर्षांनीं वरिष्ठ कायदेकौन्सिलसाठीं निवडून आले. येथें ते १९१६ पर्यंत सभासद होते. १९१९ च्या सुधारणांना आरंभ झाल्यावर हे बंगाल कौन्सिलचे सभासद होऊन स्थानिक स्वराज्ययंत्री बनले. कलकत्ता कॉर्पोरेशनची घटना व्यापक करून तिला लोकसत्ताक स्वरूप दिलें. हे वेगवेगळ्या कारणाकरितां १८९०, १८९७, १९०९ व १९१९ या सालांत चार वेळ इंग्लंडला जाऊन कामगिरी करून परत आले. प्रागतिक पक्षाच्या १९१८ मध्यें भरलेल्या पहिल्या फेडरेशनचे ते अध्यक्ष होते. १९२५ मध्यें हे मरण पावले. यांनी १८७५–१९२५ पर्यंत शिक्षक, वृत्तपत्रकार, वक्ते, कौन्सिलर आणि कार्पोरेटर या नात्यानें यांनी भारतवर्षाची अनेकांगीं सेवा केली आहे.

बापट, पांडुरंग महादेव (१८८०–):—स्वातंत्र्यवादी स्पष्टवक्ता पुढारी. यांचा जन्म नगर जिल्ह्यांतील 'पारनेर' गांवीं ता. १२ नोव्हेंबर १८८० ला झाला. बापटांचीं पहिलीं सात वर्षें खेळण्यांत गेलीं असून पुढें त्यांनीं १८८७ ते १८९२ पर्यंतच्या काळांत मराठी सहा इयत्ता पुऱ्या केल्या. पुण्याचें न्यू इंग्लिश स्कूल व नगरचें हायस्कूल यांमधून मॅट्रिकपर्यंतचा अभ्यास केला. ते १८९९ मध्यें प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले. पुढील शिक्षणासाठीं त्यांनीं डेक्कन कॉलेजांत नांव घातलें. १९०३ सालांत बापटांनीं बी. ए.ची पदवी मिळविली.

घरच्या मंडळींच्या अनुमतीनें बापटांनीं एम. ए. व एलएल. बी.चा अभ्यास करण्यासाठीं मुंबईस प्रयाण केलें. तेथें ते पदवी घेणेस विश्वविद्यालयाच्या मंदिरांत हजर राहिले त्यावेळीं परदेशीं जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं 'मंगळदास शिष्यवृत्ती' मिळत असल्याचें, त्यांच्या निदर्शनास, त्यांच्या एका स्नेह्यानें आणलें. यानंतर झटपट खटपट करून ती शिष्यवृत्ती मिळवून बापटांनीं १९०४ च्या १९ जुलैला विलायतेस प्रयाण केलें व ५ ऑगस्टला ते तेथें पोहोचले.

पुढें त्यांनीं एडिंबरो येथील हेरिएट–वॉट–कॉलेजमध्यें मेकॅनिकल एंजिनियरिंगचा अभ्यासक्रम सुरू केला. हा अभ्यासक्रम संभाळून बापटांनीं तेथील 'क्वीन्स रायफल्स' या लष्करी तुकडींत प्रवेश मिळवला. दोहोंकडचें शिक्षण एक वर्षभर घेतलें. या मुदतींत तेथील स्नेह्यांच्या आग्रहावरून बापटांनीं हेमंत व्याख्यान मालेंत British rule in India या विषयावर व्याख्यान दिलें. पण यामुळें मुंबई विश्वविद्यालयानें त्यांना मिळत असलेली शिष्यवृत्ती बंद केली. पुढें ते इंडिया हौसचे संचालक श्यामजी कृष्ण वर्मा यांच्याकडे लंडनला गेले.

यानंतर बापटांनीं नॉर्दर्न पॉलिटेक्निक इन्स्टीट्यूटमध्यें औद्योगिक शिक्षण घेण्यासाठीं नांव घातलें. तथापि त्यांचें हिंदी चळवळीकडे पूर्ण लक्ष होतें. त्याच सुमाराला भारतामध्यें वंगभंगाबद्दल जोरांत चळवळ सुरू होती. तशांतच कै. लाला लजपतराय यांना सरकारनें स्थानबद्ध करून ठेवलें. या कारणांनीं बापटांना अतिशय वाईट वाटलें व सरकारचा राग आला. त्यानीं पुढें औद्योगिक शिक्षणापेक्षां करावयाच्या क्रांतीस उपयोगीं पडणारें बॉम्ब गोळ्याचें शिक्षण पैदा केलें व ते १९०८ च्या मार्चअखेर मुंबईस आले.

यानंतर ते कलकत्त्याकडची हालचाल काय आहे हें पाहण्यास तिकडे निघाले. तेथें गेल्यावर बापटांना तेथील लोकांची विचारसरणी पसंत पडली नाहीं व ते आजारी पडले म्हणून महाराष्ट्रांत परत येण्यास निघाले, व पुढें त्यांनीं पुण्यास बिऱ्हाड केलें. पुढें सरकारला क्रांतीकारकांशीं बापटांचा संबंध असल्याचा सुगावा लागला. म्हणून सरकारनें त्यांना पकडण्याची व्यवस्था केली. सरकारच्या कचाट्यांतून निसटण्यासाठीं म्हणून बापट हे अज्ञातवासांत राहूं लागले. या मुदतींत त्यांनीं, केव्हां आचारी म्हणून काम केलें, केव्हां विद्यार्थी म्हणून वावरले, केव्हां शिक्षकाचा व्यवसाय केला. अशा रीतीनें त्यांनीं नानाप्रकारच्या पेशांत दिवस कंठले. शेवटीं एकदांशीं साडेचार वर्षांनीं म्हणजे १९१३ मध्यें त्यांचा अज्ञातवास पुरा झाला.

१९१५पर्यंत ते पारनेरला राहिले व पुढें पुण्यास येऊन राहिले. तेथें असल्या मुदतींतच त्यांनीं

चित्रमय जगत्, मराठा कचेरी व महाराष्ट्र ज्ञानकोश मंडळ येथें १९२१ अखेर नोकरी केली.

श्री. बापटांचा स्वभाव प्रेमळ व अन्यायाचा प्रतिकार करणारा असल्यामुळें या सुमारास मुळशी पेट्यांत धरण बांधण्याची योजना चालू होती, या योजनेनें या पेट्यांतली चोपन्न गांवें देशोधडीला लागणार होतीं. त्या गांवांतील लोकांचा कळवळा येऊन बापटांनीं त्यांची कड घेऊन सत्याग्रहाचा बेत मुक्रर केला. १६-४-२१ला सत्याग्रहास आरंभ झाला. या प्रकरणांत नाना प्रकारचे प्रयत्न करूनही अपयश आलें व त्यांस सत्याग्रहाबद्दल अखेरीस पहिल्यानें तीन वर्षें व दुसऱ्यांदा सात वर्षांची शिक्षा झाली.

मुळशी प्रकरणांतून बापट मोकळे झाल्यावर त्यांच्याकडे महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमेटीचें अध्यक्षस्थान चालून आलें व तें त्यांनीं स्वीकारलें. महाराष्ट्रभर कॉंग्रेसच्या प्रचारासाठीं (परदेशी कापडावर बहिष्कार पडावा म्हणून) ते हिंडत होते. रत्नागिरीला त्यांनीं जें भाषण केलें त्याबद्दल सरकारनें त्यांस सात वर्षांची शिक्षा दिली. शेवटीं शिक्षा संपण्यापूर्वीच बेळगांवच्या बंदिशाळेंतून १९३७ च्या जुलैंत त्यांची कॉंग्रेस सरकारनें सुटका केली.

ही सुटका झाल्यावर बापटांनीं हैद्राबाद सत्याग्रहांत दोन तीन वेळां भाग घेतला. नुकतीच त्यांनीं २३ जुलै १९३२ ला जलसमाधी घेणार म्हणून प्रसिद्ध केलें होतें. पण हा बेत त्यांनीं लोकाग्रहास्तव स्वतःच्या इच्छेविरुद्ध रहित केला. त्यांनीं आतांपर्यंत जें लिखाण केलें त्यांपैकीं प्रमुख ग्रंथ चैतन्यगाथा, मुळशींतले निरोप, सत्याग्रही घोषणा, गीतासेवक, आत्मचरित्र व Holy Songs हे होत. त्यांच्या भाषेंत त्यांची सत्यप्रीति, साधेपणा, कळकळ, देशभक्ती हे गुण उत्तम प्रकारें प्रगटले आहेत. अलीकडे सुभाषचंद्र बोस यांच्या फॉरवर्ड ब्लॉकचे राजकारण त्यांनीं अंगिकारिलें आहे. यांना सेनापति बापट असें उल्लेखतात.

बाबर (१४८३–१५३०):–दिल्लीचा पहिला मोंगल बादशाहा. हा बापाकडून तैमूरलंगाचा व आईकडून चेंगीजखान मोंगलाचा वंशज होता. तैमूरच्या काबूल या राजधानींत यास राज्याभिषेक झाला आणि त्या ठिकाणीं आपला नीट बंदोबस्त करण्याच्या उद्योगास हा लागला. स. १५१९ त बाबरानें हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली. दौलतखान लोदी यानें स. १५२४ त बाबराची मदत मागितली. बाबरास हेंच पाहिजे होतें. हा तात्काळ हिंदुस्थानांत आला, इब्राहिमखानाच्या फौजेबरोबर लढून यानें पंजाब प्रांत घेतला. पुढें बाबरानें जसजशी संधी सांपडेल तसतशा स्वाऱ्या करून हिंदुस्थान काबीज केला. बाबरासारख्या बलिष्ठ माणसास आपल्या देशांत राहूं देऊं नये म्हणून संग राण्यानें युद्धाची तयारी केली. बाबरहि सैन्यानिशीं तयारींतच होता. शिक्री येथें लढाई होऊन संग राण्याचा पराभव झाला (१६ मार्च १५२८). बाबर हा हिंदुस्थान व आशिया यांस जोडणाऱ्या सांखळींतील मध्यवर्ती दुवा होय. बारा वर्षांचा असतांना बाप वारला तेव्हांपासून मरेपर्यंत बाबरानें एकंदर छत्तीस वर्षें राज्य केलें. यानें आपलें चरित्र इत्थंभूत आणि उत्कृष्ट लिहून ठेवलें आहे. हा २६ डिसेंबर १५३० रोजीं मरण पावला.

बाबूराव कृष्णाजी मिस्त्री (पेंटर) (१८९२–):– प्रख्यात चित्रकार व कलादर्शक. सन १८९२ सालीं कोल्हापूर येथें जन्म. त्यांनीं १९१२ सालच्या सुमारास सिनेमाच्या धंद्यांत प्रथम लक्ष घातलें. त्यांचे चुलतबंधू कै. आनंदराव मिस्त्री हे त्यावेळीं लहान लहान चित्रपट करण्याच्या उद्योगाला लागले होते. त्यांच्याजवळच बाबूरावजींनीं चित्रपटकलेचा ओनामा घेतला. दीर्घकालाच्या अभ्यासानंतर त्यांनीं १९१९ सालीं श्रीमती तानीबाई व रा. विनायकराव घोरपडे यांच्या सहाय्यानें सुप्रसिद्ध महाराष्ट्र फिल्म कंपनीची स्थापना केली. या कंपनीनें आपल्या भव्य चित्रपटांमुळें चांगलेंच नांव मिळविलें. बाबूरावजी हे नामवंत चित्रकार आहेत. त्यांच्या बहुतेक चित्रपटांत–विशेषतः मराठ्यांच्या इतिहासांतील तेजस्वी कथानकावरील–त्यांचें कलानैपुण्य दिसून येतें. बोलपटाच्या कालांत त्यांनीं 'उषा', 'सावकारी पाश' व 'प्रतिभा' हे बोलपट



बाबूराव पेंटर

दिग्दर्शित केले. त्यांपैकीं सावकारी पाश हाच बोलपट लोकांस विशेष आवडला आहे. पुराणकालीन व इतिहासकालीन वेषभूषा व सेटिंग्ज यांमध्यें त्यांचा हात कोणी धरूं शकणार नाहीं. चित्रकार म्हणूनहि त्यांची कीर्ती फार मोठी आहे.

बायबलः–खिश्चन धर्मीयांचा धर्मग्रंथ. या ग्रंथाचें भाषांतर जगांतील ४०० भाषांत झालेलें आहे व सर्वांत अधिक प्रती वाटल्या गेल्या आहेत. बायबल हा शब्द लॅटिन भाषेंतील Biblia (बिब्लिया म्हणजे पुस्तकांचा संग्रह) यापासून झाला आहे. बायबलमध्यें 'जुना करार' (Old Testament) व 'नवा करार' (New Testament) असे दोन भाग आहेत. जुन्या करारांत खिस्ताच्या पूर्वीचा ज्यूंचा इतिहास आहे व नव्या करारांत खिस्त व खिस्ती धर्मासंबंधींचीं वचनें वा प्रवचने आहेत.

जुन्या करारांत एकंदर ३९ पुस्तके आहेत व नव्या करारांत एकूण २७ पुस्तकें आहेत. हे दोन्ही करार ग्रीक भाषेंतून प्रारंभीं इंग्रजी व जर्मन भाषांत भाषांतरित होऊन मग इतर भाषांत भाषांतरित झालेले आहेत. जुन्या व नव्या करारांत आलेल्या गोष्टींवरून त्या त्या काळचा बराच इतिहास समजतो. कुराण वाचण्यापूर्वीं बायबल वाचल्यास इस्लाम व खिश्चन धर्मांचें बऱ्याच गोष्टींतील साम्य आढळून येईल. नव्या करारांत खिस्तासंबंधींची माहिती, त्याची शिकवणूक व खिस्तानुयायी साधू संत यांचा व त्यांच्याशीं संबंध आलेल्या इतर गोष्टींचा गोष्टीरूप इतिहास पाहावयास मिळतो. बायबलची भाषा सोपी व चांगली आहे. 'If everything else in our language should perish, The Englsh Bible alone would suffice to show the whole extent of its beauty and power.' असें मेकॉलेनें उद्गार काढले आहेत. हे उद्गार पूर्णपणें कोणाला जरी मान्य झाले नाहींत तरी त्यावरून वाङ्मय या दृष्टीनें इंग्रजांना बायबलची थोरवी किती वाटते हें कळून येईल.

इंग्रजी भाषेंतील पहिली छापील आवृत्ति म्हणजे विल्यम टिंडेलच्या भाषान्तराची होय. पहिल्या जेम्सच्या कारकीर्दीपर्यंत बायबलचीं बरींच भाषान्तरें इंग्रजी भाषेंत झाली. जेम्सच्या कारकीर्दींत बायबलच्या नवीन भाषान्तराची आवश्यकता वाटूं लागली. हॅम्प्टन कोर्ट कॉनफरन्समध्यें नव्या भाषांतरासंबंधीं सूचना राजानें मान्य केली. भाषांतराच्या कार्याकरितां सत्तेचाळीस पंडितांची योजना झाली; त्यांचे सहा गट करण्यांत आले. त्यांनीं केलेलें भाषान्तर तपासण्याकरितां एक मंडळ लंडन येथें नेमण्यांत आलें. याप्रमाणें कार्य होऊन १६११ सालीं ही सुधारलेली आवृत्ति प्रसिद्ध झाली. त्यानंतर अधिक निर्दोष असें भाषांतर करण्याची खटपट होऊन १८८१ सालीं इंग्रजींत नवा करार व १८८५ सालीं जुना करार प्रसिद्ध करण्यांत आला. अमेरिकन पंडितांनीं सुधारणा करून १९०१ सालीं बायबलचें आणखी एक भाषांतर प्रसिद्ध केलें. जर्मन भाषेंतील ल्यूथरनें केलेलें भाषान्तर प्रसिद्ध आहे.

बायरन, जॉर्ज गॉर्डन, सहावा बॅरन (१७८८–१८२४):–हा ब्रिटिश कवि लंडन येथील होलेज (Holles) स्ट्रीट येथें २२ जानेवारी १७८८ सालीं जन्मला. नाटिंग्हॅमशायर मधील न्यूस्टेड ॲबेच्या लॉर्डाचा तो वारस. डलविच, हॅरो व ट्रिनिटी कॉलेज केम्ब्रीज येथें त्याचें शिक्षण झालें. ट्रिनिटी कॉलेजमध्यें त्यानें १८०५ सालीं प्रवेश केला. जन्मापासूनच त्याचा एक पाय कांहींसा लंगडा होता; त्यामुळें त्याच्या मनाला मोठें दुःख होई. त्याची आई मोठी लहरी होती. तिनें त्याचे फारच लाड केले. ती लाड करूं लागली कीं त्या लाडाला मर्यादाच रहात नसे. लाडानें तो शेफारला म्हणजे ती त्याला गुरकावीत असे. लहान वयांतच त्याला प्रेमाची बाधा झाली. त्यानें आपली प्रेमकथा 'Dream' या कवितेंत सांगितली आहे. शाळेंत व कॉलेजांत असतांना तो कवि व खेळाडू म्हणून चमकला.



लॉर्ड बायरन

१८०७ सालीं Hours of Idleness हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. यावर एडिंबरो रिव्हयूमध्यें विस्तृत परीक्षण आलें. परीक्षण फारच तिखट होतें. १८०९ ते १८११ बायरननें स्पेन व तुर्कस्थान येथें प्रवास केला. १८१२ सालीं Childe Harold's Pilgrimage या

काव्याचे प्रारंभींचे कांहीं सर्ग प्रसिद्ध झाले. त्यामुळें त्याची कीर्ति झाली. सदर काव्यावरून हा तरुण एकाकी, सुखाचा वीट आलेला व ज्याची काळजी करणारें कोणी नाहीं असा दिसतो. त्याच्या Giaour and the bride of Abydos (1813) व Cortair and Lara (1814) यांतही तोच दुःखाचा सूर दिसून येतो.


बायरनचा विवाह मिस मिलबँक इच्याशीं १८१५ सालीं झाला. पण हा विवाह सुखावह झाला नाहीं. बायरननें पती या नात्यानें तिच्याशीं गैरवर्तन केलें असा लोकप्रवाद झाल्यामुळें त्याला इंग्लंडबाहेर कायमचें जावें लागलें.

जड अंतःकरणानें, आपल्या अब्रूविषयीं बेफिकीर वृत्तीनें, आपला तिरस्कार करणाऱ्यांविषयीं तितकीच जळजळित द्वेषबुद्धि बाळगून, बायरन युरोपांतील देशांत हिंडला. कवि या नात्यानें त्यानें मिळविलेली कीर्ति या दुःखद घटनेमुळें ओसरली नाहीं. पण त्याच्या मनाला स्वस्थता नव्हती. Childe Harold या काव्याचे चौथा व पांचवा हे सर्ग १८१७ सालीं लिहून संपले व १८१८ सालीं प्रसिद्ध झाले. लोकप्रियता मिळविण्याला उत्सुक असलेल्या, स्वखुषीनें निर्वासित झालेल्या या कवीनें सतत लेखन करून पुढील शोकरसपरिपूर्ण कृति निर्माण केल्या. Cain and Manfred; Sardanapalus, व The Deformed Transformed; Prisoner of Chillong; The Venitian Beppo ! The Lament of Tasso.

बायरननें भावनावश होऊन स्वतःविषयीं मुळींच विचार न करतां १८२३ च्या ग्रीक स्वातंत्र्ययुद्धांत धडाडीनें उडी घेतली. लेपन्टोवर (Lepanto) हल्ला करण्याच्या तयारींत असतां ताप येऊन ता. १९ एप्रिल १८२४ रोजीं तो वारला. त्याचें शव न्यूस्टेड जवळील हकनॅल टोर्कार्ड येथील चर्चमध्यें पुरण्यांत आलें.

बायरनला स्वदेशांतल्यापेक्षां परदेशांतच लोकप्रियता मिळाली.

बायसिकलः–आपण मराठींत बायसिकलला सायकल म्हणतों. बायसिकल म्हणजे दोनचाकी गाडी. १८१६ मध्यें बॅरन फोन ड्राइस या जर्मन गृहस्थानें जें एक 'यंत्र' तयार केलें तीच पहिली सायकल होय. ही सायकल म्हणजे एका दांड्याला दोन चाकें जोडून तयार झालेली गाडी होय. या सायकलीच्या दांड्यावर बसून



१ सीट २ ब्रेक ३ हॅन्डल ४ दिवा ५ व्हॉल्व्ह ६ टायर ७ रिम ८ गतिचक्र ९ पॅडल १० साखळी ११ स्पोक्स १२ पंखा (मडगार्ड) १३ लगेज कॅरियर १४ डायनॅमो १५ पंप १६ हत्यारांची कातडी पिशवी.

जमिनीवर पाय टेकून चाकांना गती देण्यांत येत असे. या सायकलीला 'ड्राइझिन' म्हणत. या सायकलच्या कल्पनेंत कोणी जॉन्सन नांवाच्या इंग्रज गृहस्थानें थोडी सुधारणा करून तिला 'करिक्यूल' (Curricule) किंवा 'चैनी घोडा' (hobby horse) असें नांव दिलें. यानंतर थोडी थोडी सुधारणा होऊन १८६६ मध्यें 'हाडें मोडणारी' सायकल (bone-shaker) तयार झाली. या सायकलीला लाकडी चाकावर घट्ट रबराची धाव बसविली होती. या सायकलीचें दुसरें वैशिष्टय म्हणजे पुढचें चाक मागच्यापेक्षां लहान होतें व बसावयास सीट होती. पण १८८० मध्येंच खरी सोईची व सुखाची पहिली सायकल तयार झाली. यावेळीं दोन्ही चाकें जवळ जवळ सारख्याच व्यासाचीं केलीं होतीं. यानंतर लवकरच पोलादी नळयांची व टयूबमध्यें हवा भरून त्यावर स्वतंत्र टायर बसविण्याची सोय झाली व सायकल चालवितांना हवेमुळें उशी येऊन बसण्यास सुख होऊं लागलें. यामुळें सायकलचा वेगहि वाढला. यानंतर १९ व्या शतकाच्या अखेरीस 'फ्री व्हील'चा शोध लागल्यानें सायकल चालविणें फार सोईचें झालें व सायकल सर्वत्र लोकप्रिय होऊन मोठमोठे कारखाने निघाले. सोबतच्या चित्रांत सायकलच्या निरनिराळ्या भागांना काय म्हणतात तें दिलें आहे.

स्त्रियांना सायकलवर चटकन् बसतां यावें म्हणून सायकलच्या सीटपासून हॅन्डलपर्यंत असणारा आडवा दांडा न ठेवतां तो हॅन्डल पासून वाकवून गतिचक्र व सीट यांना जोडणाऱ्या दांड्याला जोडलेला असतो. शिवाय मागच्या चाकाच्या वरच्या भागीं वस्त्र अडकूं नये म्हणून जाळी केलेली असते.

सायकलला कमिअधिक गति मिळणें हें गतिचक्राच्या व्यासावर अवलंबून असतें. शर्यतीच्या सायकली वजनानें हलक्या व विशिष्ट पद्धतीच्या असतात.

बारसें:—मुलाचें नांव ठेवण्याचा दिवस. हें प्रसूतीच्या दिवसापासून बाराव्या दिवशीं करतात. या दिवशीं बाळंतिणीच्या घरीं गोडधोड करून, आप्तस्नेही यांच्यासह जेवण होतें. ठरलेल्या वेळीं नांव ठेवतात. नांव ठेवतांना तें एक न ठेवतां पांच नांवें ठेवतात. नंतर जें नांव रूढ करावयाचें असतें त्या नांवानें मुलाला त्या मुलाचे आईबाप व पालक हाक मारूं लागतात. नांव ठेवावयाच्या दिवशीं नांव ठेवणाऱ्या बाया बाळंतिणीची ओटी खणा—नारळांनीं भरून मुलास अंगडेंटोपडें देतात. कित्येक स्त्रिया त्याकरितां नुसतें कापड देतात तर कित्येकजणी केवळ पैसे देतात. निकटचे नातेवाईक सोन्याचा किंवा चांदीचा दागिना बाळ—बाळंतिणीला देतात. नांव ठेवून झाल्यावर सर्व बायकांना घुगऱ्या देऊन व कुंकू लावून परत जाण्यास मोकळीक देतात. नामकरणाचा समारंभ कांहीं लोकांत मुलीचा असल्यास बाराव्या दिवशीं व मुलग्याचा तेराव्या दिवशीं पार पाडतात.

बारा क्षार अथवा जीवन-रसायन-चिकित्सा पद्धति (बायोकेमिक):—जर्मनींतील सुप्रसिद्ध विद्वान डॉक्टर वुइल्यम शूझलर हे या नवीन वैद्यक प्रक्रियेचे संस्थापक व प्रवर्तक होत. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत जर्मनीमध्यें वैद्यशास्त्रासंबंधीं जे शोध झाले, त्यांत या वैद्यक प्रक्रियेची गणना केली पाहिजे. ही वैद्यक प्रक्रिया म्हणजे वैद्यशास्त्रांतील एक नवीन शोध आहे. ही वैद्यक प्रक्रिया अगदीं साधी असून शास्त्रीय दृष्टीच्या कसोटीनें अगर गुणाच्या दृष्टीनें यांत कांहींच कमीपणा नाहीं. तादृश्य अपाय होण्याचीहि भीति यांत नसते. त्यामुळें या चिकित्सापद्धतीकडे डॉक्टर, वैद्य अगर सामान्य लोक यांचें लक्ष दिवसेंदिवस जास्त जाऊं लागलें असून तें स्वाभाविकच आहे.

ही चिकित्सापद्धति म्हणजे संबंध वैद्यशास्त्र नव्हे. पोटांत औषध देऊन रोग निवारण करणें हें वैद्यशास्त्राचें जें एक प्रमुख व महत्त्वाचें अंग आहे त्या अंगाचाच फक्त या वैद्यक प्रक्रियेंत विचार केला जातो.

या शास्त्रामध्यें फक्त बाराच औषधें असून या बारा औषधांनींच सर्व रोग (लहान, मोठे; जुने, नवे) बरे करतां येतात असें या शास्त्राच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें असून तें पुष्कळांना खरेंहि वाटणार नाहीं. परंतु मानवी शरीराची रचना लक्षांत घेतां यांत खरें न वाटण्यासारखें किंवा आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं असें आढळून येईल.

आपलें मानवी शरीर हें सेंद्रिय व निरींद्रिय पदार्थांनीं बनलेलें असतें. यापैकीं $\frac{१}{१२}$ भाग निरींद्रिय क्षाराचा बनला असून बाकीचा पाणी व सेंद्रिय पदार्थांचा बनलेला असतो. हें केवळ अनुमान नसून रसायनशास्त्रदृष्ट्या तें सिद्ध झालेलें आहे. पाणी, ॲल्यूमेन (पांढूर) शर्करा. चरबी इत्यादि सेंद्रिय पदार्थ आणि चुना, पोटॅशियम, सोडियम लोह, मॅग्नेशियम वगैरे निरींद्रिय क्षार यांचेच आपल्या शरीरांतील

रक्त व इतर धातु बनलेले असून शरीराच्या प्रत्येक अवयवांतील प्रत्येक पिंडांतील घटकामध्यें हे क्षार योग्य प्रमाणांत असतात, हें सर्वमान्य झालेलें आहे.

सेंद्रिय पदार्थांच्या मानानें निरींद्रिय क्षाराचें प्रमाण शरीरांत अगदींच अल्प असतें हें खरें आहे. परंतु मानवी शरीरांतील प्रत्येक पिंडाचें सजीवत्व व ओजस हें या निरींद्रिय क्षारांच्या आवश्यक प्रमाणावर सर्वस्वीं अवलंबून आहे. चुना, पोटॅशियम वगैरे निरींद्रिय क्षार योग्य प्रमाणांत शरीरांत नसतील तर पाणी व इतर सेंद्रिय पदार्थ सर्वथा निष्क्रिय व निरुपयोगी आहेत. केवळ त्यांचेमुळें शरीरांतील कोणतेंच कार्य होऊं शकत नाहीं. हे जीवनक्षारच शरीरांतील शक्तिदायक, संवर्धक, कर्तृत्ववान व आधारभूत घटक होत. पांढूर (अॅल्यूमेन), शर्करा, स्निग्ध (चरबी) व इतर सेंद्रिय पदार्थ तसेंच पाणी हे निष्क्रिय असून पिंडसंवर्धनाकडे क्षार त्यांचा उपयोग करून घेतात. या क्षारांच्या अभावीं या सेंद्रिय पदार्थांचा स्वतंत्र असा कांहीं उपयोग नाहीं. प्रत्येक क्षाराचें कार्यक्षेत्र स्वतंत्र आहे. प्रत्येक क्षार सेंद्रिय पदार्थांपैकीं कांहीं विशिष्ट पदार्थांशीं संबंध ठेवून शरीराची सुस्थिति राखण्याचें काम आपापल्यापरी स्वतंत्र करीत असतो. शरीराचें स्वास्थ्य राखण्यासाठीं जुने पिंड मरणे व नवें पिंड तयार होणें ही घडामोड शरीरांत सारखी चालत असली पाहिजे. रक्तामध्यें या संवर्धक कर्तृत्ववान क्षारांचा योग्य पुरवठा असल्याशिवाय नवीन पिंड तयार होत नाहींत व नवीन पिंड तयार झाले नाहींत म्हणजे रोगोत्पत्ति होते. क्षाराचें प्रमाण भरपूर असल्यास जुन्या पिंडांचे जागि नवीन पिंड तयार होतात व अशा रीतीनें शरीराची सुस्थितीं राखली जाते.

हे जीवनक्षार मानवी शरीरांत बाराच आहेत असें डॉ. शूझलरच्या वेळीं मानलें जात होतें. म्हणजे मानवी शरीर बारा क्षारांचेंच बनलेलें असतें. या क्षारांतील एक अगर अनेक क्षारांच्या प्रमाणांत कमीपणा आला, उणीव उत्पन्न झाली कीं, रोगोत्पत्ति होते. कमी झालेले हे पिंड क्षार सूक्ष्म प्रमाणांत पोटांत देऊन भरून काढले म्हणजे रोगनिवृत्ति होते म्हणजे रोग बरा करतां येतो. ही विकृत स्थिति निरनिराळ्या स्वरूपानें अगर प्रकारानें शरीराच्या निरनिराळ्या भागांत दृष्टोत्पत्तीस येते व त्या निरनिराळ्या स्वरूपास व भागास अनुसरून त्यास निरनिराळीं रोग निदर्शक नांवें देण्यांत आलीं आहेत. परंतु रोगाच्या नांवावरून काय व खरा त्रास कोठें होतो याचें सम्यक ज्ञान होत नाहीं. मानवी प्राण्यास जितके म्हणून रोग होतात त्याचें मूळ या संवर्धक व कर्तृत्ववान् अशा एक अगर अनेक क्षारांच्या प्रमाणांमध्यें कमीपणा होण्यांतच आहे. शरीरास होणारें दुःख, पीडा अगर इतर भावना हे रक्तांतील (पिंडांतील) कोणत्या तरी निरींद्रिय क्षाराचें प्रमाण कमी झालें आहे याचेंच द्योतक होय. क्षाराचें प्रमाण कमी झालें कीं विकृति उत्पन्न होते व ही विकृति भावनांच्या योगानें दृग्गोचर होते. भावनारूपी हा इषारा लक्षांत घेऊन भावनांच्या स्वरूपावरून कोणता क्षार कमी झाला आहे हें पाहून तो भरून काढण्याची व्यवस्था झाल्यास रोग बरा होतो.

सारांश, शरीरांतील जीवनक्षार योग्य अथवा सम प्रमाणांत असणें यावरच शरीराची निरामय स्थिति, स्वास्थ्य व ताकद अवलंबून असते असा जीवनरसायनशास्त्रज्ञांचा सिद्धांत आहे.

कमी झालेला अगर झालेले क्षार सूक्ष्म प्रमाणांत दिल्यानेंच शरीरांतील कमी झालेले क्षार भरून येतात व रोगनिवृत्ति होते असा या शास्त्रज्ञांचा आणखी एक सिद्धांत आहे.

या चिकित्सापद्धतींत स्थूल व मूल स्वरूपांत औषध दिलें जात नाहीं. हीं औषधें करण्याची विशिष्ट पद्धति असून त्यास प्रभावन पद्धति म्हणतात. या पद्धतीनें तयार केलेलीं औषधेंच या चिकित्सापद्धतींत दिलीं जातात.

बारुआ, कुमार प्रमथेशचंद्र (१९०३–):-- जन्म ऑक्टोबर १९०३ मध्यें आसामांतील गौरपूर येथें झाला. कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत शिक्षण झालें. सन १९२४ मध्यें बी. एस्सी.ची परीक्षा पास झाली. युनिव्हर्सिटीच्या सीनेटचे सभासद होते. १९२६ सालीं इंग्लंडला जाऊन आल्यावर परत येतांच ब्रिटिश डोमीनियन फिल्म कंपनीला मिळाले. पुढें त्यांनीं ती कंपनी सोडली व आसामच्या विधिमंडळाचे (Legislative Council) सभासद निवडून आले. १९२८–२९ मध्यें पुनः युरोपला प्रयाण. पॅरीसमध्यें ललितकलांचा अभ्यास. स्वदेशीं परत आल्यानंतर १९३२ सालीं बारुआ स्टुडिओची स्थापना केली. १९३३–३४त न्यू थिएटर्स लिमिटेड् या कंपनीला मिळाले. सांप्रत बारुआ हे एक विख्यात चित्रपटदिग्दर्शक,

म्हणून ओळखले जातात. देवदास, अधिकार हे त्यांनीं दिग्दर्शित केलेले प्रख्यात चित्रपट होत. ते स्वतः नटहि आहेत.

बालगंधर्व (१८८८–):–संगीत नट. यांचें पूर्ण नांव नारायण श्रीपाद राजहंस. हे नागठाण्याचे.



बालगंधर्व

नारायणरावांचा जन्म पुण्यास २६ जून १८८८ ला झाला. यांनीं १९०३ पर्यंत इंग्रजी दुसरीपर्यंत अनेक ठिकाणीं शिक्षण घेतलें. शिक्षणापेक्षां यांचा गाण्याकडे कल अधिक. गोड गळा, चाहत्या मंडळींचें प्रोत्साहन व प्रयत्न कसून यामुळें बालगंधर्वांची गाण्यांत फारच प्रगति झाली. नारायणरावांचें गाणें लो. टिळकांच्या पुढें झालें. त्यावेळीं त्यांनीं यांच्या गाण्याची गंधर्व म्हणून प्रशंसा केली, व त्यामुळेंच पुढें त्यांना गंधर्व म्हणून लोक ओळखूं लागले. १९०४ मध्यें औषधोपचारासाठीं कोल्हापुरास नारायणराव आले. येथें त्यांच्या आजोबांनीं कै. श्री. बाळामहाराजांची ओळख करून दिली. श्री. बाळामहाराजांच्यामुळें बालगंधर्वांचा कै. छ. शाहूमहाराज यांच्याशीं परिचय झाला. महाराजांना भेटण्यास हे वरचेवर जात. असेच ते एकदां गेले असतां कै. महाराजांना त्यांच्या श्रवणशक्तींत उणेपणा असल्याचा कळला. तो नाहींसा करण्यास त्यांनीं नारायणरावांना, किर्लोस्कर नाटक मंडळींत उतरण्याची सोय करवून, मिरजेस पाठविलें. बालगंधर्वांची या सुमारास बरीच प्रसिद्धि (गाण्याबद्दल) झाली होती. गोरे नांवाचे एक नट मंडळींतून याच वेळीं गेल्यामुळें मंडळीला एका नटाची जरूरी होतीच. म्हणून नारायणरावांकडे त्यांनीं नोकरीस राहण्याविषयीं प्रश्न काढला व त्यांच्या प्रश्नाला व प्रयत्नाला होय नाहीं करतांकरतां एकदांचें यश आलें. तेथें गंधर्वांची गायन, अभिनय वगैरेमध्यें भास्करबुवा बखले व देवल यांच्यामुळें, चांगलीच प्रगति झाली.

१९१३ त 'गंधर्व नाटक मंडळी'ची स्थापना नारायणरावांनीं केली. या मंडळीला १९२१ पर्यंत जवळजवळ दोन लाख रुपये कर्ज झालें होतें. तें त्यांनीं १९२७ पर्यंत फेडलें. त्यांनीं धर्मात्मा व मिराबाई या बोलपटांत मुख्य भूमिका केल्या. त्यांच्या रुक्मिणी, सिंधु, द्रौपदी, भामिनी, वसंतसेना वगैरे भूमिका लोकांच्या स्मरणांत राहण्यासारख्या वठतात. गंधर्वांचे मुख्य गुण, सुरेल व भावप्रधान गायन आणि प्रसंगोचित व पात्रोचित अभिनय हे होत. महाराष्ट्रांत सध्यां स्त्रियांच्या वेषभूषेंत जी क्रांति झालेली दिसते ती होण्यास बव्हंशीं नारायणरावच कारणीभूत झाले. तसेंच आतांच्या पिढींत नटवर्गाबद्दल लोकांत जो आदर दिसतो त्याचें श्रेय नारायणरावांना अंशतः का होईना द्यावें लागेल. याशिवाय त्यांची दानधर्माची कामगिरी नजरेंत भरण्यासारखी आहे. दानापायीं त्यांनीं आतांपर्यंत एक लाखावर व्यय केला. नारायणराव प्रेमळ नि धर्मनिष्ठ असून त्यांचें भजन लोकांना अतिशय आवडतें. सिनेमांत प्रवेश करण्यापूर्वी बालगंधर्वांनीं रंगभूमीचा निरोप घेतला. त्यामुळें त्यांना अनेक ठिकाणीं मानपत्रें दिलीं व त्यांचा गौरव करण्यांत आला. नारायणरावांनीं रंगभूमीची जी ३०।३२ वर्षें सेवा केली ती लोकांनीं ध्यानांत घेऊन १९२९ ला पुण्यास जें नाट्य संमेलन भरलें त्याचे अध्यक्षस्थान त्यांना दिलें. धर्मात्मा व मिराबाई या बोलपटानंतर पुनः आपली नाटक मंडळी सुरू करून पूर्वींच्या आपल्या भूमिका करण्यास त्यांनीं आरंभ केला. आतांच्या स्थितींत नाटक मंडळ्या जगण्यासाठीं व भूमिका योग्य तऱ्हेनें पार पडण्यासाठीं स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनींच केल्या पाहिजेत असें मत त्यांच्याकडून अनेकवार व अनेक ठिकाणीं प्रतिपादलें गेलें. महाराष्ट्रांत गणपतराव जोशी, भोसले, भाऊराव वगैरे जे नामांकित नट होऊन गेले त्यांत त्यांची गणना होत आहे. महाराष्ट्राच्या नाट्यसृष्टींत त्यांनीं आपला एक कालखंड व

पंथ निर्मून ठेवला असें मोठ्या अभिमानानें म्हणतां येईल.

बालझॅक, होनोरे डी (Balzac, Honore de) (१७९९–१८५०) हा फ्रेंच कादंबरीकार २० मे १७९९ रोजीं टूर्स (Tours) येथें जन्मला. त्या वेळीं त्याच्या बापाचें वय त्रेपन वर्षांचें असून तो एका इस्पितळाचा प्रमुख होता. तो मुलांचे फारच लाड करीत असे; पण आईची शिस्त मोठी कडक होती. होन्रोला व्हेनडोम येथील ओरॅटॉरीयन कॉलेजमध्यें घालण्यांत आलें. या कॉलेजांत त्यानें सहा वर्षें घालविलीं पण शैक्षणिक दृष्ट्या हीं वर्षें व्यर्थ गेलीं. पुढें पॅरिसमध्यें त्याचे शिक्षण चालू ठेवण्यांत आले. निरनिराळ्या शिक्षकांच्या हाताखालीं तो शिकला. शेवटीं त्याला एका वकिलाच्या कचेरींत वकिली शिकण्याकरितां ठेवलें. या कायद्याच्या शिक्षणाचा त्यानें आपल्या कादंबरीलेखनांत चांगला उपयोग करून घेतला.

वयांत आल्यावर बालझॅकनें वकील होण्याचें नाकारलें, त्यामुळें त्याच्या आईबापांची निराशा झाली. त्यांचीहि परिस्थिति ओढघस्तीचीच झाली होती. त्यांनीं त्याला जेमतेम पोटाला पुरेल इतके पैसे दिलें. त्यानें पॅरिसमध्यें कसेबसे दिवस काढून साहित्यक्षेत्रांत यश मिळण्याकरितां प्रयत्न केले. त्याच्या प्रारंभींच्या कादंबऱ्या टोपण नांवाखालीं प्रसिद्ध झाल्या. त्यांपैकीं कांहीं त्यानें आपल्यासारख्या इतर होतकरू साहित्यिकांच्या सहाय्यानें लिहिल्या. या कादंबऱ्या त्यानें ३०० पासून १००० रु. पर्यंत किंमतीला विकल्या; पण त्याला यापैकीं कांहीं पैसा मिळाला नाहीं. शेवटीं उपासमार झाल्यामुळें त्याला घरीं परत जावें लागलें. तेथें त्याची बहीण लॉर (Laure) हिच्याशिवाय त्याच्याविषयीं सहानुभूति बाळगणारें कोणी नव्हतें.

दरम्यान मॅडम डी बर्नी या सुसंस्कृत व बुद्धिवान् स्त्रीशीं त्याचा परिचय होऊन तिच्या सहवासाचा त्याच्यावर फारच परिणाम झाला. या स्त्रीनें लहानपणींच क्रान्तीपूर्वी, व्हर्साइल येथील जीवनाचा अनुभव घेतला होता. विवाहानंतर बोर्बोन्स परत आल्यावर पतिसमवेत राजेरजवाड्यांत ती वावरली होती. १८२९ सालीं The Conoans ही चमत्कृतिपूर्ण गोष्ट प्रसिद्ध झाली. या गोष्टीमुळें त्याला कांहींशी लोकप्रियता मिळाली. त्याच वर्षी त्याची Physiology of Marriage नांवाची कादंबरी प्रसिद्ध झाली. तींत आस्था व उपहास यांचा मधुर संगम झाला आहे. ही कादंबरी संसारी लोकांना विशेषतः रिकामटेकड्या बायकांना फारच आवडली.

१८३१ सालीं प्रसिद्ध झालेल्या त्याच्या The Wild Ass's Skin या कादंबरींत वास्तववाद (Realism), दैववाद (Fatalism) व अद्‌भुतता (Romance) यांचा सुंदर संगम झालेला आढळतो. या कादंबरीवरून बालझॅकच्या कादंबरीलेखनाच्या पद्धतींत केवळ सुधारणा झाली नसून त्याच्या लेखनकलेसंबंधींच्या दृष्टींत पूर्ण फरक पडला.

वेगवेगळ्या वेळीं भिन्न भिन्न प्रकारच्या लोकवस्तींत राहून, सर्व प्रकारच्या लोकांत मिसळून बालझॅकनें लोकपरिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केलें. लोकपरिस्थिती, लोकाचार व त्यांचीं संभाषणें यांचें प्रभावी चित्र त्यानें आपल्या कादंबऱ्यांत रेखाटलें आहे. कादंबरीलेखन करितांना संविधानकाचा विकास कोणत्या प्रकारें करावयाचा याची पूर्वकल्पना करण्याची त्याला पात्रता होती. त्याच्या सर्वोत्कृष्ट कलाकृतींत त्याची स्मरणशक्ति, विचार व कल्पना यांची सुंदर गुंफण झालेली दिसून येते. त्याच्या उत्कृष्ट कलाकृति पुढीलप्रमाणें : Eugenie Grandet (1833), Father Goriot (1834), Cesar Birottean (1837), Cousin Betty (1846).

त्याला सामाजिक, राजकीय, तात्त्विक व स्थलवर्णनविषयक विषयान्तर करण्याची संवय असल्यामुळें त्याच्या कलाकृतींत एक मोठा दोष असल्याचें टीकाकार सांगतात. Human Comedy मध्यें त्याच्या आयुष्यांतच घडून आलेल्या अस्वस्थतेच्या कालांतील सामाजिक परिस्थितीचें संपूर्ण चित्र रेखाटलें आहे. आपल्याच जीवनांत आपल्यासमोर घडलेल्या गोष्टींचें यथायोग्य चित्रण फारच थोड्या कलावन्तांनीं केलें आहे. त्याच्या दृष्टीनें त्याच्या कादबंऱ्यांतील व्यक्ति सत्यसृष्टीमधून घेतलेल्या होत्या, विशेषतः स्त्रिया सत्यसृष्टींतल्या.

बालझॅकचें स्थान त्याच्या देशांतील नामवंत साहित्यिकांच्या मालिकेंत फार मोठें आहे; परंतु फ्रेंच ॲकॅडेमी या विद्यामंदीराचा तो केव्हांहि सभासद नव्हता. अनेक वेळां सदर विद्यामंदिराच्या सभासदत्त्वाकरितां त्याचें नांव सुचविण्यांत आलें, परंतु बहुमत त्याच्याविरुद्ध होतें. त्याच्या वतीनें मत देण्याचें नाकारण्याचें कारण सभासदाच्या दर्जाला शोभेल अशी राहणी ठेवण्याइतकी सांपत्तिक स्थिती त्याची नव्हती. या-

संबंधानें आपल्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतो "Since they do not like my honorable poverty, they will have to do without my riches later on".

द्रव्य या अर्थानें संपत्ति मिळणें त्याच्या दैवीं नव्हतें. व्यावहारिक जीवनांत तो तापट होता. अविश्रान्त परिश्रम करूनहि त्याला मनस्वी कर्ज झालें. तारुण्यांत पदार्पण केल्यापासून मुद्रक व प्रकाशक म्हणून यश मिळविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती; या नादापायीं त्यानें आपल्याजवळ होता नव्हता तो पैसा व मॅडम बर्नीचाहि पुष्कळसा पैसा उडविला. विपुल संपत्ति मिळविण्याच्या त्याच्या योजना संख्येनें जितक्या जास्ती तितक्या मूर्खपणाच्या व अव्यवहार्य होत्या. तरी पण या योजना फसल्यामुळें त्याच्या दुर्दम्य उत्साहाचा भंग झाला नाहीं.

बालझॅक हा एक कलावंत होता. त्याला वाङ्मयापेक्षां संगीताची गोडी अधिक होती. तो अत्यंत भावनामय होता. भावनांची उर्मी अथवा आत्मश्लाघेची इच्छा यांना बंधारा घालण्याचा प्रयत्न केला नाहीं. जात्या तो कृपाळु होता. परंतु त्याच्या वाङ्मयीन जीवनाच्या प्रारंभापासून, कादंबरीकार व वृत्तपत्रकार या नात्यानें त्यानें समाज व परिस्थिती यांवर हल्लाच चढविला. Lost Illusions या त्याच्या चटकदार व मर्मभेदक कादंबरींत त्याच्या जीवनाचें स्वरूप व त्याचा प्रत्यक्ष अनुभव यांचें दर्शन होतें. त्याचा स्वभाव अत्यंत भावनामय, तापट व चिडखोर होता. तो कांहींसा लहरी असून त्याच्या वागण्यांत विसंगति असे. स्वारी खुषींत असली कीं पराकोटीच्या आनंदांत असावयाची; पण कोणती मनोवृत्ति केव्हां प्रगटेल याचा नेम नाहीं. त्याची बुद्धिमत्ता जितकी असामान्य, तितका त्याचा ज्योतिषांवर विश्वास होता.

बालझॅकचें वैवाहिक जीवन सुखाचें गेलें नाहीं. पोलिश कौंटेस हॅंस्का (Polish Countess Hanska) ही त्याची पत्नी. विवाहापूर्वीचें सुखाच्या संसाराचें त्याचें मनोराज्य विवाह झाल्यावर पार लयाला गेलें. विवाह झाल्यावर अवघ्या सात महिन्यांनीं ता. १८ ऑगस्ट १८५० रोजीं तो वारला. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या विधवेनें त्याचे ग्रंथांचे हक्क विकून त्याचें कर्ज वारलें.

मरणसमयीं त्याचें वय अवघें एक्कावन होतें. त्यानें मरेपर्यंत अविश्रांत श्रम केले. त्याला आमरण मनःस्वास्थ्य लाभलें नाहीं. व्यक्ति व ग्रंथकार या नात्यानें त्याच्या ठायीं पुष्कळ दोष होते हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. तथापि त्याचा उत्साह दुर्दम्य होता. त्यानें आपल्या उम्या आयुष्यांत निर्माण केलेल्या कलाकृतींत कांहीं अपूर्ण आहेत; पण त्या त्याच्या अचाट कल्पना व उज्वल प्रतिभेच्या निदर्शक होत.

बाल्ड्विन, स्टॅन्ले (१८६७–):—हा ब्रिटिश मुत्सद्दी. आल्फ्रेड बाल्ड्विन नांवाच्या एका बड्या इंजिनिअरिंग फर्मच्या प्रमुखाचा मुलगा. याचा जन्म ३ ऑगस्ट १८६७ रोजीं झाला. त्याचें शिक्षण हॅरो येथें व ट्रिनिटी कॉलेज केंब्रिज येथें झालें. त्यानें आपल्या घराण्याच्या धंद्यांत प्रवेश करून तो वाढविण्याची पुष्कळ खटपट केली. १९०८ सालीं त्याचे वडील वारले. त्यावेळीं बाल्ड्विन्स लिमिटेड या फर्मची ग्रेट ब्रिटनमधील अत्यंत मोठ्या इंजिनिअरिंग फर्ममध्यें गणना होत असे. शिवाय इतर कंपन्यांचा तो डायरेक्टर होता.

त्यानें १९०६ सालीं कॉंझर्व्हेटिव पक्षातर्फे किंडरमिनिस्टर याचा प्रतिस्पर्धी म्हणून निवडणूक लढविली. पण त्याला यश आलें नाहीं. १९०८ सालीं आपल्या बापाच्या पश्चात तो Bewdley तर्फे तो सभासद झाला. औद्योगिक प्रश्नांचें गाढ ज्ञान व व्यावसायिक अनुभव यामुळें त्याच्या पक्षाच्या सल्लागारांत त्याला मानाचें स्थान मिळालें. परंतु त्याच्या खऱ्याखुऱ्या राजकीय प्रगतीला प्रारंभ १९१६ सालीं तो बोनरलॉचा चिटणीस झाला तेव्हांपासूनच होतो.

१९१७ च्या जानेवारींत ज्यूनिअर लॉर्ड ऑफ दि ट्रेझरी या हुद्द्यावर नेमणूक झाली. पुढें त्याच वर्षी जून महिन्यांत जॉइंट फायनॅन्शियल सेक्रेटरी टू दि ट्रेझरी या हुद्द्यावर चढला. १९२० सालीं तो प्रीव्हि कौन्सिलर झाला. १९२१ सालीं बोर्ड ऑफ ट्रेडचा प्रेसिडेंट म्हणून संयुक्त प्रधानमंडळांत शिरला (Coalition Cabinet), लॉइड जॉर्ज यांची कारकीर्द संपताच १९२२ सालीं बाल्ड्विन, बोनरलॉ यांच्या प्रधानमंडळांत चॅन्सेलर आफ दी एक्स्चेकर झाला. १९२३ च्या ऑगस्ट महिन्यापर्यंत त्या हुद्द्यावर होता. बोनरलॉ यांनीं १९२३ मेमध्यें आपल्या जागेचा राजीनामा दिल्यावर बाल्ड्विन मुख्य प्रधान झाला.

राज्यकारभाराचा सूत्रधार म्हणून बाल्डविनला बेकारी, जर्मनीकडून घ्यावयाची नुकसान भरपाई, व

पंथ निर्मून ठेवला असें मोठ्या अभिमानानें म्हणतां येईल.

बालझॅक, होनोरे डी (Balzac, Honore de) (१७९९–१८५०) हा फ्रेंच कादंबरीकार २० मे १७९९ रोजीं टूर्स (Tours) येथें जन्मला. त्या वेळीं त्याच्या बापाचें वय त्रेपन वर्षांचें असून तो एका इस्पितळाचा प्रमुख होता. तो मुलांचे फारच लाड करीत असे; पण आईची शिस्त मोठी कडक होती. होन्रोला व्हेनडोम येथील ओरॅटॉरीयन कॉलेजमध्यें घालण्यांत आलें. या कॉलेजांत त्यानें सहा वर्षें घालविलीं पण शैक्षणिक दृष्ट्या हीं वर्षें व्यर्थ गेलीं. पुढें पॅरिसमध्यें त्याचे शिक्षण चालू ठेवण्यांत आले. निरनिराळया शिक्षकांच्या हाताखालीं तो शिकला. शेवटीं त्याला एका वकिलाच्या कचेरींत वकिली शिकण्याकरितां ठेवलें. या कायद्याच्या शिक्षणाचा त्यानें आपल्या कादंबरीलेखनांत चांगला उपयोग करून घेतला.

वयांत आल्यावर बालझॅकनें वकील होण्याचें नाकारलें, त्यामुळें त्याच्या आईबापांची निराशा झाली. त्यांचीहि परिस्थिती ओढघस्तीचीच झाली होती. त्यांनीं त्याला जेमतेम पोटाला पुरेल इतके पैसे दिलें. त्यानें पॅरिसमध्यें कसेबसे दिवस काढून साहित्यक्षेत्रांत यश मिळण्याकरितां प्रयत्न केले. त्याच्या प्रारंभींच्या कादंबऱ्या टोपण नांवाखालीं प्रसिद्ध झाल्या. त्यांपैकीं कांहीं त्यानें आपल्यासारख्या इतर होतकरू साहित्यिकांच्या सहाय्यानें लिहिल्या. या कादंबऱ्या त्यानें ३०० पासून १००० रु. पर्यंत किंमतीला विकल्या; पण त्याला यापैकीं कांहीं पैसा मिळाला नाहीं. शेवटीं उपासमार झाल्यामुळें त्याला घरीं परत जावें लागलें. तेथें त्याची बहीण लॉर (Laure) हिच्याशिवाय त्याच्याविषयीं सहानुभूति बाळगणारें कोणी नव्हतें.

दरम्यान मॅडम डी बर्नी या सुसंस्कृत व बुद्धिवान् स्त्रीशीं त्याचा परिचय होऊन तिच्या सहवासाचा त्याच्यावर फारच परिणाम झाला. या स्त्रीनें लहानपणींच क्रान्तीपूर्वी, व्हर्साइल येथील जीवनाचा अनुभव घेतला होता. विवाहानंतर बोर्बोन्स परत आल्यावर पतिसमवेत राजेरजवाड्यांत ती वावरली होती. १८२९ सालीं The Conoans ही चमत्कृतिपूर्ण गोष्ट प्रसिद्ध झाली. या गोष्टीमुळें त्याला कांहींशी लोकप्रियता मिळाली. त्याच वर्षी त्याची Physiology of Marriage नांवाची कादंबरी प्रसिद्ध झाली. तींत आस्था व उपहास यांचा मधुर संगम झाला आहे. ही कादंबरी संसारी लोकांना विशेषतः रिकामटेकड्या बायकांना फारच आवडली.

१८३१ सालीं प्रसिद्ध झालेल्या त्याच्या The Wild Ass's Skin या कादंबरींत वास्तववाद (Realism), दैववाद (Fatalism) व अद्‌भुतता (Romance) यांचा सुंदर संगम झालेला आढळतो. या कादंबरीवरून बालझॅकच्या कादंबरीलेखनाच्या पद्धतींत केवळ सुधारणा झाली नसून त्याच्या लेखनकलेसंबंधींच्या दृष्टींत पूर्ण फरक पडला.

वेगवेगळ्या वेळीं भिन्न भिन्न प्रकारच्या लोकवस्तींत राहून, सर्व प्रकारच्या लोकांत मिसळून बालझॅकनें लोकपरिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केलें. लोकपरिस्थिती, लोकाचार व त्यांचीं संभाषणें यांचें प्रभावी चित्र त्यानें आपल्या कादंबऱ्यांत रेखाटलें आहे. कादंबरीलेखन करितांना संविधानकाचा विकास कोणत्या प्रकारें करावयाचा याची पूर्वकल्पना करण्याची त्याला पात्रता होती. त्याच्या सर्वोत्कृष्ट कलाकृतींत त्याची स्मरणशक्ति, विचार व कल्पना यांची सुंदर गुंफण झालेली दिसून येते. त्याच्या उत्कृष्ट कलाकृति पुढीलप्रमाणें : Eugenie Grandet (1833), Father Goriot (1834), Cesar Birottean (1837), Cousin Betty (1846).

त्याला सामाजिक, राजकीय, तात्त्विक व स्थलवर्णनविषयक विषयान्तर करण्याची संवय असल्यामुळें त्याच्या कलाकृतींत एक मोठा दोष असल्याचें टीकाकार सांगतात. Human Comedy मध्यें त्याच्या आयुष्यांतच घडून आलेल्या अस्वस्थतेच्या कालांतील सामाजिक परिस्थितीचें संपूर्ण चित्र रेखाटलें आहे. आपल्याच जीवनांत आपल्यासमोर घडलेल्या गोष्टींचें यथायोग्य चित्रण फारच थोड्या कलावन्तांनीं केलें आहे. त्याच्या दृष्टीनें त्याच्या कादंबऱ्यांतील व्यक्ति सत्यसृष्टीमधून घेतलेल्या होत्या, विशेषतः स्त्रिया सत्यसृष्टींतल्या.

बालझॅकचें स्थान त्याच्या देशांतील नामवंत साहित्यिकांच्या मालिकेंत फार मोठें आहे; परंतु फ्रेंच ॲकॅडेमी या विद्यामंदीराचा तो केव्हांहि सभासद नव्हता. अनेक वेळां सदर विद्यामंदिराच्या सभासदत्त्वाकरितां त्याचें नांव सुचविण्यांत आलें, परंतु बहुमत त्याच्याविरुद्ध होतें. त्याच्या वतीनें मत देण्याचें नाकारण्याचें कारण सभासदाच्या दर्जाला शोभेल अशी राहणी ठेवण्याइतकी सांपत्तिक स्थिती त्याची नव्हती. या-

संबंधानें आपल्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतो "Since they do not like my honorable poverty, they will have to do without my riches later on".

द्रव्य या अर्थानें संपत्ति मिळणें त्याच्या दैवीं नव्हतें. व्यावहारिक जीवनांत तो तापट होता. अविश्रान्त परिश्रम करूनहि त्याला मनस्वी कर्ज झालें. तारुण्यांत पदार्पण केल्यापासून मुद्रक व प्रकाशक म्हणून यश मिळविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती; या नादापायीं त्यानें आपल्याजवळ होता नव्हता तो पैसा व मॅडम बर्नीचाहि पुष्कळसा पैसा उडविला. विपुल संपत्ति मिळविण्याच्या त्याच्या योजना संख्येनें जितक्या जास्ती तितक्या मूर्खपणाच्या व अव्यवहार्य होत्या. तरी पण या योजना फसल्यामुळें त्याच्या दुर्दम्य उत्साहाचा भंग झाला नाहीं.

बालझॅक हा एक कलावंत होता. त्याला वाङ्मयापेक्षां संगीताची गोडी अधिक होती. तो अत्यंत भावनामय होता. भावनांची उर्मी अथवा आत्मश्लाघेची इच्छा यांना बंधारा घालण्याचा प्रयत्न केला नाहीं. जात्या तो कृपाळु होता. परंतु त्याच्या वाङ्मयीन जीवनाच्या प्रारंभापासून, कादंबरीकार व वृत्तपत्रकार या नात्यानें त्यानें समाज व परिस्थिती यांवर हल्लाच चढविला. Lost Illusions या त्याच्या चटकदार व मर्मभेदक कादंबरींत त्याच्या जीवनाचें स्वरूप व त्याचा प्रत्यक्ष अनुभव यांचें दर्शन होतें. त्याचा स्वभाव अत्यंत भावनामय, तापट व चिडखोर होता. तो कांहींसा लहरी असून त्याच्या वागण्यांत विसंगति असे. स्वारी खुषींत असली कीं पराकोटीच्या आनंदांत असावयाची; पण कोणती मनोवृत्ति केव्हां प्रगटेल याचा नेम नाहीं. त्याची बुद्धिमत्ता जितकी असामान्य, तितका त्याचा ज्योतिषांवर विश्वास होता.

बालझॅकचें वैवाहिक जीवन सुखाचें गेलें नाहीं. पोलिश कौंटेस हॅंस्का (Polish Countess Hanska) ही त्याची पत्नी. विवाहापूर्वीचें सुखाच्या संसाराचें त्याचें मनोराज्य विवाह झाल्यावर पार लयाला गेलें. विवाह झाल्यावर अवघ्या सात महिन्यांनीं ता. १८ ऑगस्ट १८५० रोजीं तो वारला. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या विधवेनें त्याचे ग्रंथांचे हक्क विकून त्याचें कर्ज वारलें.

मरणसमयीं त्याचें वय अवघें एक्कावन होतें. त्यानें मरेपर्यंत अविश्रांत श्रम केले. त्याला आमरण मनःस्वास्थ्य लाभलें नाहीं. व्यक्ति व ग्रंथकार या नात्यानें त्याच्या ठायीं पुष्कळ दोष होते हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. तथापि त्याचा उत्साह दुर्दम्य होता. त्यानें आपल्या उभ्या आयुष्यांत निर्माण केलेल्या कलाकृतींत कांहीं अपूर्ण आहेत; पण त्या त्याच्या अचाट कल्पना व उज्वल प्रतिभेच्या निदर्शक होत.

बाल्ड्विन, स्टॅन्ले (१८६७–):—हा ब्रिटिश मुत्सद्दी. आल्फ्रेड बाल्ड्विन नांवाच्या एका बड्या इंजिनिअरिंग फर्मच्या प्रमुखाचा मुलगा. याचा जन्म ३ ऑगस्ट १८६७ रोजीं झाला. त्याचें शिक्षण हॅरो येथें व ट्रिनिटी कॉलेज केंम्ब्रिज येथें झालें. त्यानें आपल्या घराण्याच्या धंद्यांत प्रवेश करून तो वाढविण्याची पुष्कळ खटपट केली. १९०८ सालीं त्याचे वडील वारले. त्यावेळीं बाल्ड्विन्स लिमिटेड या फर्मची ग्रेट ब्रिटनमधील अत्यंत मोठ्या इंजिनिअरिंग फर्ममध्यें गणना होत असे. शिवाय इतर कंपन्यांचा तोडायरेक्टर होता.

त्यानें १९०६ सालीं कॉंझर्व्हेटिव पक्षातर्फे किंडरमिनिस्टर याचा प्रतिस्पर्धी म्हणून निवडणूक लढविली. पण त्याला यश आलें नाहीं. १९०८ सालीं आपल्या बापाच्या पश्चात तो Bewdley तर्फे तो सभासद झाला. औद्योगिक प्रश्नांचें गाढ ज्ञान व व्यावसायिक अनुभव यामुळें त्याच्या पक्षाच्या सल्लागारांत त्याला मानाचें स्थान मिळालें. परंतु त्याच्या खऱ्याखुऱ्या राजकीय प्रगतीला प्रारंभ १९१६ सालीं तोबोनरलॉचा चिटणीस झाला तेव्हांपासूनच होतो.

१९१७ च्या जानेवारींत ज्यूनिअर लॉर्ड ऑफ दि ट्रेझरी या हुद्द्यावर नेमणूक झाली. पुढें त्याच वर्षी जून महिन्यांत जॉइंट फायनॅन्शियल सेक्रेटरी टू दि ट्रेझरी या हुद्द्यावर चढला. १९२० सालीं तो प्रीव्हि कौन्सिलर झाला. १९२१ सालीं बोर्ड ऑफ ट्रेडचा प्रेसिडेंट म्हणून संयुक्त प्रधानमंडळांत शिरला (Coalition Cabinet), लॉइड जॉर्ज यांची कारकीर्द संपताच १९२२ सालीं बाल्ड्विन, बोनरलॉ यांच्या प्रधानमंडळांत चॅन्सेलर आफ दी एक्स्चेकर झाला. १९२३ च्या ऑगस्ट महिन्यापर्यंत त्या हुद्द्यावर होता. बोनरलॉ यांनीं १९२३ मेमध्यें आपल्या जागेचा राजीनामा दिल्यावर बाल्ड्विन मुख्य प्रधान झाला.

राज्यकारभाराचा सूत्रधार म्हणून बाल्डविनला बेकारी, जर्मनीकडून घ्यावयाची नुकसान भरपाई, व

जकातीचे प्रश्न यांसारख्या गंभीर प्रश्नांचा विचार करावा लागला. आयात मालावर संरक्षक जकात बसवावी असें त्यांचें मत होते. आपल्या सूचनांचा अम्मल करण्याकरितां राष्ट्राचा आदेश मिळवावा म्हणून त्यानें राजाला ता. १६ नोव्हेंबर १९२३ रोजीं पार्लमेंट बरखास्त करण्टाचा सल्ला दिला. ६ डिसेंबर रोजीं फेर निवडणुकींत कॉन्झरव्हेटिव पक्ष अल्पसंख्याक झाला.

ता. २१ जानेवारी १९२४ रोजीं पराभव झाल्यामुळें त्याच्या सरकारनें दुसरे दिवशीं राजिनामा दिला. ऑक्टोबर १९२४ च्या निवडणुकींत त्याला २२७ चें बहुमत मिळालें आणि तो मुख्य प्रधान झाला. १९२९ सालीं लिबरल पक्ष अधिकारारूढ झाल्यामुळें त्यानें राजिनामा दिला. त्याच्यानंतर रॅमसे मॅकडोनल्ड मुख्य प्रधान झाला. १९३३ सालीं राष्ट्रीय प्रधानमंडळ होऊन बाल्डविन मुख्य प्रधान झाले. १९३७ सालीं बाल्डविननें सहाव्या जॉर्जच्या राज्यारोहणानंतर राजकारणांतून अंग काढून घेतलें. फेडरेशनचा १९३५चा कायदा यांच्याच कारकीर्दींत झाला आहे.

+ **बासुंदीः–साहित्य**–दूध, साखर, केशर, वेलदोडे, बदाम, बेदाणा. **माप**–शेर दुधाच्या बासुंदीला ½ पावशेर साखर, १० बदाम, ५ वेलची, केशर, बदाम, बेदाणा वगैरे अजमासें घालावेत. **कृति**–दूध कढईत मंद विस्तवावर आटत ठेवावें. तें आटून चांगलें दाट झाल्यावर साखर घालावी व पुन्हां आटवावें. ती चांगली पळीवाढी दाट झाल्यावर तिच्यांत वरील सर्व मसाला घालावा व ती खालीं उतरून ठेवावी.

बाळंतशोपः–हें एक अत्यंत पाचक असें औषध आहे. भूक लागण्याकरितां बाळंतशोप अर्धा तोळा चावून खावी. भूक लागते. मुलास कृमि झाल्यास ह्याची ठिकरी देतात. पोट दुखणें व पोटांत वायु धरणें ह्यांवर रोज रात्रीं ही थोडी निजतेवेळीं खाऊन वर पाणी प्यावें. मुळव्याधीवरही ही खाल्ल्यानें चांगला उपयोग होतो.

ह्याचा मुख्य उपयोग दूध शुद्ध करणें हा होय. प्रसूत झालेल्या बाईनें रोज मूठभर बाळंतशोप बदामाबरोबर चावून खावी व पाणी प्यावें म्हणजे बाळंतिणीची प्रकृति साफ राहून कोणताही विकार होत नाहीं व दूध पुष्कळ सुटतें. हें दूध अपायकारक असत नाहीं.

बाळाजी विश्वनाथ पेशवे (१६६०–१७२०):– पहिला पेशवा. हा श्रीवर्धनाचा राहणारा. याच्या कुटुंबांतील देशमुखी स. १६७० च्या सुमारास जप्त झाल्यावर हा दाभोळ चिपळूणकडे गेला. यास दोन बायका होत्या. पैकीं राधाबाईच्या पोटीं बाळाजीला बाजीराव व चिमाजी हे दोन मुलगे आणि अनुबाई ही मुलगी अशीं तीन अपत्यें झालीं.

बाळाजी १६७९मध्यें वरघाटी आल्यावर प्रथम तो सासवडास अंबाजी पुरंदऱ्याकडे आला. तेथून साताऱ्यास जोशी महादेव कृष्ण याच्यामार्फत शंकराजीपंत सचिवांकडे तो नोकरीस राहिला.याची हुषारी पाहून सेनापति धनाजीनें त्यांस आपल्याकडे घेतलें. १६९९–१७०२ च्या काळांत हा पुण्याचा सरसुभेदार बनला. १७०७त बाळाजी दौलताबादचा सुभेदार झाला. भीमाकाठीं औरंगजेबाची छावणी असतांना यानें बादशहाच्या मुलीकडून शाहू व त्याची आई यांची व्यवस्था १६९५–९९मध्यें उत्तम ठेवविली. याच सुमारास शाहूचें व त्याचें पुढील गोष्टीबद्दल सूतोवाच झालें असलें पाहिजे.

ब्रह्मेंद्रस्वामीनें बाळाजीस शाहूला मिळण्याचा सल्ला दिला व बाळाजीनें मागाहून धनाजीस शाहूकडे ओढलें. खेडच्या लढाईत धनाजी जर नसता तर शाहूचें राजकारण टिकलें नसतें; त्यामुळें शाहूची मर्जी यावर बसली. शाहूच्या अभिषेकापासून धनाजी जाधवाच्या अंतापर्यंत (१७१०) यानें फारशा उलाढाली केल्या नाहींत. धनाजीच्या पश्चात् धनाजीचा मुलगा चंद्रसेन व याच्यांत चुरस लागल्यामुळें चंद्रसेन ताराबाईला मिळाला. पुढें याचा पक्ष शाहूनें घेतला. राज्याचा बंदोबस्त करण्यासाठीं बाळाजीनें असलेली दोन हजार फौज कमी वाटल्यामुळें वाढविली त्याबद्दल शाहूनें यास (१७११ त) सेनाकर्ते ही पदवी दिली व २५ लक्षांचा सरंजामहि दिला.

पुढें यानें ताराबाईस हतप्रभ करण्यासाठीं धाकट्या संभाजीकडून तीस व शिवाजीस वेडा ठरवून कैदेंत बसविलें. या कारणानें (१७१२) शाहूचें आसन स्थिर झालें. १७१३ त बाळाजीनें, कृष्णराव खटावकर हा ताराबाईचें वतीनें बंडाळी करून त्रास देई त्याचा बंदोबस्त केला. तसेंच परशुरामपंताची मुक्तता शाहूजवळ रदबदली करून केली व पुन्हां त्यास प्रतिनिधीपद देवविलें.

दमाजी थोरातानें धामधूम चालविल्यामुळें त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं बाळाजी त्यावर चालून गेला.

पण हा पकडला गेला. तेथें त्याचा अतिशय छळ झाला. अखेरीस १७१३ मध्यें याची दंड भरून सुटका झाली. नंतर यानें चार वर्षांनीं सय्यदाच्या मदतीनें दमाजीचा सपशेल पराभव केला. सचिवाची मुक्तता दमाजीच्या कैदेंतून करविली व त्याबद्दल पुरंदर किल्ला स्वतःसाठीं बाळाजीनें मागून घेतला.


ताराबाईच्या पक्षानें लढणाऱ्या कान्होजी आंग्रे याच्यावर शाहूनें बहिरोपंत पिंगळे यांस पाठविलें. परंतु आंग्र्यानें त्याचा पराभव करून पिंगळ्यास कैदेंत ठेविलें. म्हणून बाळाजीस आंग्र्यावर धाडिलें. बाळाजीनें सामोपचारानें आंग्र्यास शाहूच्या पक्षास वळवून पिंगळ्याची सुटका केली. या कामगिरीबद्दल लोहगड १७१७ मध्यें मिळाला. पुढें शाहूनें मांजरी गांवीं बाळाजीस १६ नोव्हेंबर १७१३त पेशवाईचीं वस्त्रें दिलीं.

बाळाजीनें, ताराबाईच्या वेळचें बादशाही मुलखांत आक्रमण करण्याचें धोरण पुढें चालू ठेवलें. त्यामुळें नवीन पुढें येणाऱ्या पराक्रमी लोकांस कामाला लावणें सोपें झालें. उत्तरेंत फर्रुखसियर बादशाहा व सय्यद बंधु यांच्यांत भांडणें चालू होतीं. तेव्हां बादशहानें सय्यदांच्या विरुद्ध मदत मागितली तेव्हां बाळाजीच्या सांगण्यावरून दाभाडे, सोमवंशी व निंबाळकर इत्यादि सरदारांनीं खानदेशगुजराथेंत धुमाकूळ माजविला, तेव्हां निरुपायानें हुसेनअलीनें मराठ्यांशीं तह करून बादशाहाविरुद्ध कारस्थानें चालविलीं (१८१८). या तहानें शिवाजीच्या स्वराज्याखेरीज आतांपर्यंत जिंकलेला सर्व मुलूख मराठ्यांस मिळाला, आणि चौथाई-सरदेशमुखी सर्व दक्षिणेंत वसूल करण्यास सांपडली. त्यामुळें शाहूचा जम चांगला बसून राज्यव्यवस्था सुरळीत चालू झाली. मराठ्यांचें लक्ष गृहकलहांतून काढून बाहेरच्या उद्योगांत लाविलें. बादशहाचें १५ हजार फौजेनिशीं रक्षण करण्याचें काम पेशव्यांनीं आपल्याकडे घेऊन त्याला आपल्या हातीं आणिलें. या कामगिरीमुळें मराठी राज्यास नवें क्षेत्र व कामगिरी मिळाली.

पुढें सय्यदांचा व बादशहाचा तंटा विकोपास जाऊन त्यांनीं मराठ्यांची मदत मागितली. यानें साताराचा तह पुरा करून घेण्याचे करारावर दिल्लीस प्रयाण केलें. बादशहा घाबरून जाऊन, हुसेन व मराठे माळव्यांत असतांनाच त्यांच्या मागण्या कबूल केल्या. परंतु तहांत कबूल केल्याप्रमाणें शाहूचीं बायका माणसें परत मिळाल्याशिवाय मराठे मागें जाईनात. अखेर हुसेन व मराठे हे १७१२ त दिल्लीस गेले. सय्यदांनीं मराठ्यांचे मदतीनें बादशहा फर्रुख्-सियर यास पदच्युत करून रफिउद्दरजत याला तख्तावर १८ फेब्रुवारी १७१९ ला बसविलें. यानंतर शाहूची मातुश्री व बायकामुलें यांना पेशव्यांच्या हवालीं केलें. तसेंच ठरल्याप्रमाणें चौथाई सरदेशमुखी व स्वराज्य यांच्या सनदाहि बादशाही शिक्कामोर्तब करून मार्चमध्यें हवालीं केल्या. यानंतर हा साताऱ्यास जुलैमध्यें परत आला. दिल्लीच्या चकमकींत नागपूरकर संताजी भोसले व बाळाजीपंत भानू हे दोघे ठार झाले, याबद्दल यानें नुकसानभरपाई घेतली. सय्यदांपासून रोज ५० हजार रुपये खर्चास मिळत. त्यांपैकीं निम्मे शिल्लक टाकून बाळाजीनें ती सर्व शिल्लक सरकारी खजिन्यांत टाकली, व फौजेच्या देण्याचा बोभाटाहि राहूं दिला नाहीं. याप्रमाणें दिल्लीच्या पहिल्या स्वारीपासून मराठ्यांस पुष्कळ फायदा झाला. विशेषतः दिल्लीच्या बादशाहीसहि मदत करूं शकेल अशी एक प्रबळ सत्ता दक्षिणेंत असल्याचें जाहीर झालें, आणि प्रत्येक महत्त्वाच्या राजकारणांत मराठ्यांचा प्रवेश झाला.

यानंतर बाळाजीनें राज्यकारभाराची सर्व व्यवस्था उत्तम प्रकारें लावून दिली. चौथाईवसुलीच्या मुलूखगिरीसाठीं निरनिराळे प्रदेश सरदारांना वांटून दिले. कोणी कोणाच्या प्रांतांत जाऊं नये असें ठरविलें. शिस्त बसविल्यावर बाळाजीनें एकदां इसलामपुराकडे नोव्हेंबरांत स्वारी केली. पुढच्या वर्षी (१७२०मध्यें) थोरल्या बाजीरावाचें लग्न केल्यावर सासवड येथें हा १ एप्रिलला एकाएकीं मरण पावला. सध्यां तेथें याचें वृंदावन आहे.

बॉईल, रॉबर्ट (१६२७–९१):–हा आयरिश पदार्थविज्ञान–शास्त्रज्ञ व रसायनशास्त्रज्ञ १६५४ ते १६६८ पर्यंत ऑक्सफर्ड येथें रहात असे. कॉम्प्रेस्ड–एअर पंप (Compressed-air Pump) व स्वतः शोधून काढलेले वायु आंत न जाईल अशा रीतीनें गच्च बंद केलेले थर्मामीटर यांच्या सहाय्यानें त्यानें अनेक प्रयोग केले आणि १६६२ सालीं एक नियम शोधून काढला. या नियमाला बॉयलच्या नांवावरून बायल्स लॉ असें नांव पडलें आहे. या नियमानें अर्वाचीन रसायन शास्त्राच्या विकासाला नवीन चालना मिळाली. एडम् मॅरिअट(Edme Mariotte)नें स्वतंत्रपणें प्रयोग



बॉम्ब—(वर्तुलांत) **ग** ग्रानाटवेर्फर प्रोजेक्टाइल (जर्मन) बॉम्ब. हा हातानें व लहान तोफेच्या सहाय्यानें फेकतां येतो. **ह**-जर्मन बनावटीचा विमानांतून टाकावयाचा बॉम्ब. हा बॉम्ब १२ ते १५ फूट लांब व ३ ते ४ फूट परीघाचा असतो.

चित्राच्या वरच्या भागांत बॉम्ब टाकणारें विमान (बॉम्बर) दाखविलें असून डाव्या बाजूस मॅग्नेशियम इन्सेंडिअरी बॉम्ब म्हणजे आग लावणारा बॉम्ब दाखविला आहे. १ या भागांत मॅग्नेशियम (Solid Magnesium) असतें व २ऱ्या भागांत थर्माइट (Thermite) ठांसून भरलेलें असतें. ३ या भागास डिटोनेटर म्हणतात. मॅग्नेशियम बॉम्बची लांबी १४ इंच व व्यास १¾ इंच असतो. वजन २ पौंड असतें. या बॉम्बच्या आकृतीशेजारींच कौलरांतून घुसून हा बॉम्ब कसा फुटून उडतो व आग लावतो हें दाखविलें आहे. उजव्या बाजूच्या बॉम्बचें वर्णन बॉम्बवरील लेखांत आलेंच आहे. खालच्या अर्धवर्तुलांत रणांगणावर सैनिक खंदक खोदून त्यांत बसून आपला बचाव कसा करतात हें दाखविलें आहे.

बॉम्बमधील फ्यूजमुळें आघात होतांच स्फोट होतो व पंख्या(Vanes)मुळें तो सरळ जातो. आंतील स्फोटक द्रव्यें शेंकडा ६० इतकीं दाबलेलीं असतात. वरचें आवरण जाड पण हलक्या धातूच्या पत्र्याचें असतें. **व्या. ज्ञा. पृ. १४१२**

करून हाच नियम बाईलनंतर चौदा वर्षांनीं शोधून काढला.

बॉईलची धर्मबुद्धि लहानपणापासून अत्यंत तीव्र होती. ती पुढें केव्हांही कमी झाली नाहीं. त्यानें आपल्या ऑक्सफर्ड येथील वास्तव्यांत पूर्वेकडील देशांत ख्रिश्चन धर्माचा प्रसार व्हावा या हेतूनें ईस्ट इंडिया कंपनीला सनद मिळवून देण्याच्या कामीं आपलें वजन खर्च केलें. त्यानें हिंदी, आयरिश व वेल्श लोकांना बायबल वाचतां यावें म्हणून त्याचीं निरनिराळ्या भाषेंत भाषान्तरें करण्याचा खर्च आपण सोसला. शिवाय तुर्की व मलाया या भाषेंतहि त्याचीं भाषान्तरें करविलीं. त्यानें मृत्युपत्र करून, ख्रिश्चन धर्माचें, आक्षेपकांकडून संरक्षण करण्याकरितां, बॉईल व्याख्यान माला स्थापण्याची व्यवस्था केली.

बॉम्ब:–लोखंडाचा पोकळ चेंडू. बॉम्ब हा स्फोटक द्रव्यांनीं भरलेला असतो व तो आदळून त्याचा स्फोट होऊन त्याच्या शक्तीप्रमाणें जमीन, भिंती, इमारती इत्यादींची भयंकर नासधूस करतो. याच्या स्फोटांत मनुष्य सांपडला तर त्याच्या चिंधड्याच उडायच्या. बॉबमध्यें पुष्कळ प्रकार आहेत. १८ व्या शतकापर्यंत फक्त हातानें फेकण्याचेच बॉम्ब तयार होत असत. त्यांना Hand Grenades म्हणत, व हे बॉम्ब फेकण्याची कामगिरी Grenadier या नांवानें ओळखले जाणाऱ्या विशिष्ट सैनिकांच्या तुकडीसच देण्यांत येत असे. पण १९ व्या शतकांत सर्वच सैनिक बॉम्बफेक करूं लागले. १९१४–१८ च्या महायुद्धांत हातांनीं फेकण्याच्या बॉम्बमध्यें सुधारणा होऊन ते अधिक स्फोटक करण्यांत आले. शिवाय लहान तोफांनीं बॉम्ब दूरवर फेकण्याची सोयहि झाली, विमानांतून फेकावयाच्या मोठ्या बॉम्बचाहि शोध, याच वेळीं लागला. या बॉम्बच्या शोधानेंच 'हवाई हल्लयाची' नवी भीती निर्माण झाली आहे.

१९१८ नंतर २५ वर्षांत आतां इतकी प्रगती झाली आहे कीं विमानांतून बॉम्बच्या माऱ्यानें मोठीं शहरें अल्पावधींत उध्वस्त करतां येतील. बॉम्बचे लहान मोठे आकार असल्यास नवल नाहीं. हे बॉम्ब फेकण्यासाठीं स्वतंत्र प्रकारचीं विमानें तयार करावीं लागतात. बॉम्बमधून अनेक रोगांचे जंतूहि फेकण्याची सोय शास्त्रज्ञांनीं केलेली, मानवीसाम्राज्य उध्वस्त करण्यास तयार असलेल्या बॉम्बचें जनकत्व मानवाच्या बुद्धीकडेच आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.


आतां बॉम्बची विनाशक शक्ति केवढी आहे ती पाहूं. सर्वांत अधिक स्फोटक असलेला बॉम्ब जर जमिनीवर आपटून उडाला तर तो १३½ इंच रुंदीची पक्या विटांची भिंत, किंवा १ फूट कॉन्क्रीटची भिंत क्षणार्धांत उडवून तिच्या ठिकऱ्या करूं शकतो. बॉम्ब आपटलेल्या जागेपासून ५० फूट अंतरावरील इमारत तो सहज पाडूं शकतो. या तऱ्हेच्या एका बॉम्बचें वजन ५०० पौंड असतें. त्याला S. A. P. (Semi-Armour Piercing) बॉम्ब म्हणतात. उघडे खंदक किंवा १५ फूट जाडीची कॉन्क्रीटची भिंत किंवा ६० फूट जाडीचा घट्ट ठेचलेला मातीचा थर या प्रकारच्या बॉम्बच्या स्फोटापासून टिकूं शकतो. दुसराहि ५०० पौंड वजनाचा Contact Bomb नांवाचा बॉम्ब असतो. पण याचें कवच वरीलपेक्षां कमी कठीण असतें. शिवाय कॉन्टॅक्ट बॉम्बपेक्षां S. A. P. बॉम्बचा आपटल्यानंतर किंचित् थोड्या वेळानें स्फोट होतो. याला Delayed action fused असेंहि म्हणतात.

याशिवाय आग लावणारे बॉम्ब आहेत. यांना Incendiary Bomb म्हणतात. साधारण प्रतिकारशक्ति असलेल्या कौलारांतून हा बॉम्ब सहज आंत घुसतो व जमिनीवर आपटून त्याचा स्फोट होतो. स्फोट झाल्यावर ७ ते १० फूट लांबीवरच्या कोणत्याहि ज्वालाग्राही पदार्थास तो सहज आग लावूं शकतो. यापेक्षां थोड्या अधिक अंतरावर असणाऱ्या कापड चोपड किंवा तेल, गवत इ. पदार्थांनाहि तो आग लावूं शकतो. या प्रकारच्या बॉम्बचें वजन साधारणतः दोन पौंड असतें. मोठ्या आकाराचे बॉम्ब फेकणारें विमान (बॉम्बर) या प्रकारचे सुमारें तीन हजार बॉम्ब एकाच वेळीं घेऊन उडूं शकतें.

बिकानेर:–या संस्थानची राजधानी. हें राजपुतान्यांत असून या ठिकाणीं सध्यां राठोड वंशांतील एक रजपूत राजा राज्य करीत आहे. हें शहर, बिका नांवाच्या, सध्यांच्या वंशांतील, एका राजानें वसविलें. त्यामुळें त्यास बिकानेर हें नांव प्राप्त झालें. या नगराची वसाहत एका लहानशा उंचवट्यावर झाली असून याच्या सभोंवतीं तट आहे. या तटाची लांबी (घेर) ४॥ मैल भरते. इथल्या इमारती सुंदर आहेत. येथील किल्ला एका उंच खडकावर असून तो रायसिंगाच्या वेळीं

बांधला गेला असें म्हणतात. कोणी तो बिका राजानें बांधला असेंहि म्हणतात. हा रायसिंग अकबराचा मनसबदार होता. बिकानेरला मुलामुलींच्या शाळा आहेत. येथें १८८९त म्युनिसिपालिटी स्थापली गेली. गांवांत खडीसाखर, शाली, ब्लँकेटें, रजया या वस्तू बनवतात. शहरापासून पांच मैलांवर 'देवी कुंड' या नांवाचा तलाव असून या ठिकाणीं चौदा राजपुरुषांच्या छत्र्या आहेत. या तलावाजवळच एक राजवाडा आहे. येथील दळणवळणासाठीं जोधपूर–बिकानेर ही रेल्वे १९०२मध्यें बांधण्यांत आली.


बिझिक (Bezique):– एक पत्त्याचा खेळ. सामान्यत हा दोन गडीच खेळतात. पत्त्याचे दोन जोड घेऊन त्यांतील दुर्‍या, तिर्‍र्या, चौर्‍र्या, पंचे व छक्के काढून टाकल्यानंतर उरलेलीं पानें चांगलीं पिसायचीं. पिसून झाल्यानंतर ज्याच्यावर डाव आला असेल त्या गड्यानें प्रतिस्पर्ध्याला व स्वतःला प्रथम तीन, नंतर दोन, व शेवटीं तीन अशीं प्रत्येकाच्या हातांत आठ पानें येतील अशा तऱ्हेनें आळीपाळीनें पानें द्यायचीं असतात. सतरावें पान हुकूम (Trumps) समजावयाचें; असतें हें पान टेबलावर तोंड वर करून ठेवतात. उरलेल्या पानांचा ढीग टेबलावरच त्या हुकुमाच्या पानावर ठेवतात.




बिकानेर-स्त्रिया विहीरीचें पाणी काढीत आहेत.

या खेळांत, ज्या रंगाचें पान टाकलें असेल त्या रंगांतील सर्वांत जाडें पान टाकलें असतां आपला 'दस्त' होतो. जाडी पानें अशा क्रमानें असतात. सर्वांत जाडें पान एक्का, त्याखालीं दहा, राजा, राणी, गुलाम, नऊ, आठ व सात. या खेळांत, ढिगांतील सर्व पानें संपून प्रत्येकाच्या हातांत आठ पानें उरेपर्यंत पानाला त्या रंगाचेंच पान टाकायला पाहिजे असें नाहीं; आपल्या हातांत त्या रंगाचें पान असूनहि हुकूमाचें पान टाकून आपणांस दस्त घेतां येतो. प्रत्येक दस्तानंतर दरवेळीं ढिगांतील एक एक पान गड्यांनीं ओढून घ्यायचें असतें; अशा तऱ्हेनें ढीग संपेपर्यंत प्रत्येकाजवळ खेळायला आठ पानें असतात. दस्त झाले कीं तसेच उघडे ठेवायचे असतात; त्यांतील एक्के व दहा यांना मार्क असल्यानें ते शेवटीं काढून घ्यायचे असतात. अशा तऱ्हेनें तो सर्व ढीग संपला कीं, शेवटचे आठ दस्त जरा निराळ्या तऱ्हेनें खेळायचे असतात. ज्या रंगाचें पान विरुद्ध गड्यानें टाकलें असेल त्या रंगाचेंच पान आपल्या हातीं असेल, तर टाकलें पाहिजे.

या खेळांतील साध्य असें आहे–शक्य तितके एक्के व दहा मिळविणें व आपल्या हातांत कांहीं ठराविक पानांच्या जोड्या आणणें. या जोड्या हातीं येतांच त्या ताबडतोब जाहीर केल्या पाहिजेत. त्याचे मार्क खालींदिल्याप्रमाणें आहेत. सात हुकुमाच्या पानाबद्दल १० मार्क, कोणत्याही रंगाच्या राजाराणीस (Marriage) २० मार्क, हुकमाच्या राजा-राणीस (Royal marriage) ४० मार्क, queen of speeds (इस्पिक राणी) व knave of diamonds (चौकट गुलाम)च्या जोडीस (बिझिक) ४० मार्क असतात; पण एकाच खेळांत दोन वेळां त्याच गड्यानें तें बिझिक बोललें असेल असेल तर त्यास ५०० मार्क अधिक मिळतात. (या खेळांत किलावर Clubs किंवा बदाम hearts हुकूम असेल त्यावेळीं इस्पिक राणी व चौकट गुलाम







बिकानेर-१ राजवाडा. २ उंटदळ. ३ एक राजरस्ता.

हें बिझिक समजतात; पण इस्पिक अगर चौकट यापैकीं हुकूम असेल तर किलावर राणी व बदाम गुलाम यांचे बिझिक समजतात.) चार एक्क्याबद्दल १०० मार्क; चार राजांबद्दल ८० मार्क, चार राण्यांबद्दल ६० मार्क, चार गुलामांबद्दल ४० मार्क (ते एका रंगाचे असले तरी हरकत नाहीं.) पांच जाडी हुकूमाबद्दल २५० (याशिवाय रॉयल मॅरेजबद्दल ४० मार्क आहेतच; पण रॉयल मॅरेज सांगण्याचें राहिलें असेल तर मात्र फक्त २५० मार्कच.) दस्तांतील प्रत्येक एक्का अगर दहा याला १० मार्क. दस्तांत दोन एक्के, अगर दोन दहा अगर एक दहा व एक एक्का असेंल तर दस्त ज्याचा झाला त्यास २० मार्क मिळाले असें समजावें. शेवटचा दस्त ज्याचा झाला असेल त्यास १० मार्क मिळतात. एकाच किंमतीच्या पानांच्या दस्तांत ज्यानें पान प्रथम टाकलें त्याचा दस्त समजावा.

१००० मार्क होईपर्यंत हा खेळ खेळायचा असतो. स्कोअर दर्शविणारा एक बिझिक मार्कर असतो.

बिब्याची सुपारी-साहित्य-चिकणी सुपारी, बिब्बे, विड्याचीं पानें, कात, लवंगा, पत्री, जायफळें, खोबरें, चुना, सैंधव, गोडंब्या, तूप. **माप**-एक शेर (मापी) सुपारी, आठ ते दहा बिब्बे, तीस विड्यांचीं पानें, एक तोळा कात, एक छटाक लवंगा, दोन तोळे पत्री, तीन जायफळें, दोन खोबऱ्याचे गोटे, चिंचोक्याएवढा चुना, चवीपुरतें सैंधव, एक पावशेर गोडंब्या, तूप एक पावशेर. **कृति**-अडकित्त्यानें सुपारी बारीक फोडावी. बिब्बेही बारीक फोडून घ्यावे. खोबऱ्याचे व गोडंब्याचे तुकडे करावेत. विड्याचीं पानें, कात, लवंगा वगैरे सर्व मसाला एकत्र बारीक वांटावा व सुपारीला एक

तासभर अगोदर लावून ठेवावा. नंतर तूप घालून बिब्बे तळून घ्यावेत. तूप काळेंभोर झालें म्हणजे बिब्बे तळून झालें असें समजावें. बिब्बे काढून घेऊन त्याच्यांतच खोबऱ्याचे तुकडे घालून ते गवळा रंग होईपर्यंत तळून घ्यावे. मग त्याच्यांतच वरील जिन्नस घालून तें सर्व अगदीं मंदाग्नीं परतवावें. ही सुपारी जवळजवळ बारा तास तरी मंदाग्नीवर परतवावी म्हणजे चांगली कुरकुरीत होते. ही सुपारी बाळंतिणीस देण्याची फार वहिवाट आहे. हिनें दांत चांगले घट्ट होतात व थोडी खाल्ल्यानें पचनक्रियेवर चांगला परिणाम होतो.

बिभीषणः—रावणाचा भाऊ. विश्रवस् व केशिनी यांचा हा पुत्र. यानें उग्र तप करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतलें. ब्रह्मानें याला सद्धर्मी बुद्धी राहील असा वर देऊन आणखी अमरत्व व ब्रह्मास्त्र यांची देणगीहि दिली. याच्या बायकोचें नांव 'महामूर्ति'. हा लंकेंतच रावणाजवळ राहत असे. उभय बंधूंच्या स्वभावभिन्नत्वामुळें त्यांचें एकमेकांशीं कधींच पटलें नाहीं. रावणाला यानें सीता परत करण्याबद्दल पुष्कळ सांगून पाहिलें; पण त्याचा उपयोग झाला नाहीं. सीतेच्या शोधासाठीं मारुती लंकेंत आला होता. त्यास रावणाच्या आज्ञेनें इंद्रजित पकडून ठार मारूं लागला; पण बिभीषणानें रावणास योग्य प्रकारचा सल्ला दिल्यामुळें मारुतीला सोडून दिलें. सीता परत करण्याबद्दलचा आपला उद्देश निष्फळ झालासें पाहून हा युद्धापूर्वी रामाच्या पक्षाला मिळाला. रामाला याच्या सहाय्यामुळें युद्धांत जय मिळविणें सोपें झालें. युद्धांत रामपक्षानें लढून त्यानें पुष्कळ पराक्रम केला. लक्ष्मणाला इंद्रजिताच्या यज्ञाचा विध्वंस बिभीषणाच्या मदतीनें करतां आला. रावणाच्या पश्चात् हा लंकेचा राजा झाला.

बिरबल (१५२८–१५८३):—हा अकबराच्या दरबारांतील कविराय व मंत्री होता. औदार्याबद्दल तसेंच गानकौशल्य व काव्यनैपुण्य यांबद्दल हा फार प्रसिद्ध आहे. धार्मिक मुसलमानांकडून याचा द्वेष केला जात असे. याचें कारण त्यांच्या मतें इस्लामाविषयीं अकबराचें मन दूषित करण्याचा यानें प्रयत्न केला.

याचें मूळचें नांव महेशदास असून हा काल्पीचा कनोजी ब्राह्मण होता. अकबराच्या दरबारीं प्रथम गरिबीनें राहत असे, पण हा चलाख व तीव्र बुद्धीचा म्हणून प्रसिद्ध होता. अकबरानें याला कविराय ही पदवी दिली. आपल्या खास देखरेखीखालचें काम याचेकडे सोंपविलें. इ. स. १५८३ सालीं युसुफझायी लोकांच्याविरुद्ध झैनखान कोका याला मदत करण्यासाठीं अकबरानें याला पाठविलें. पण हा तेथें ठार मारला गेला. अकबराला याच्या मृत्यूबद्दल अतोनात दुःख झालें.

यानें अकबरपूर नांवाचें एक शहर बसविलें होतें व हा तेथेंच राहत असे. 'बिरबलनामा' नांवाचा ग्रंथ यानें लिहिला. त्यांत अकबर व बिरबल यांच्याविषयीं अनेक विनोदी गोष्टी आढळून येतात.

बिलियर्डस्:—हा एक घरांत खेळण्याचा खेळ आहे. या खेळास हस्तिदंती चेंडू व निमुळत्या टोंकाची एक कांठी (Tapering Wand) लागते. हा लांबट चौकोनी व एका पातळींत असलेल्या टेबलवर खेळतात. या टेबलाचा पृष्ठभाग लवचिक अशा पदार्थानें रेखांकित (Line) केलेला असतो. टेबलाचे तीन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारांत चार पॉकेट, दुसऱ्यांत सहा व तिसऱ्यांत शून्य पॉकेट येतात. चार पॉकेट टेबलमध्यें प्रत्येक कोपऱ्यास एक अशीं चार पॉकेटस् असतात. सहा पॉकेट टेबलमध्यें, प्रत्येक लंबट बाजूला जादा एक, मिळून एकूण सहा पॉकेटस् असतात. मध्ययुगीन कालांत, हा खेळ इंग्लंडमध्यें Knight Templarsनीं दुसऱ्या धर्मयुद्धानंतर आणला. हा युरोपांतील अनेक मठांमध्यें (Monasteries) प्रचलित होता. फ्रान्समध्यें, अकराव्या लुईच्या कारकीर्दीत (१४६१) हा खेळ प्रथम आणण्यांत आला. अमेरिकेंत याची सुरवात इ. स. १५६५ सालीं स्पॅनिश लोकांनीं सेंट ऑगस्टाइन् फ्ला येथें आपली वसाहत स्थापन केल्यानंतर केली.

पॉकेटस् असलेल्या टेबलावर पूल (Pool) हा खेळ खेळण्यांत येतो. अमेरिकन पिरॅमिड पूल या खेळास १५ चेंडू (१ ते १५ असें त्यावर अंक लिहिलेले) व एक पांढरा क्यू (Cue) चेंडू असे एकूण सोळा चेंडू लागतात.

बिल्हण (सुमारें १०३०–११००):—हा काश्मीरांतील प्रवरपूर शहराजवळच्या खोनमुख गांवचा राहणारा असून पातंजल महाभाष्यावर टीका लिहिणारा जो ज्येष्ठकलश त्याचा पुत्र होय. हा प्रथम मथुरा, वृंदावन, काशी, सोमनाथपट्टण, सेतुबंध इत्यादि ठिकाणें पाहून व तेथें सन्मान मिळवून नंतर चालुक्यांची राजधानी कल्याणी येथें गेला. तेथील राजा कुंतलेंदु

त्रैलोक्यमल्ल (सहावा विक्रमादित्य) पश्चिम चालुक्य, व त्याचा पुत्र विक्रमांकदेव यांनीं यास पुष्कळ द्रव्य व विद्याधिपति ही पदवी दिली. तेथें यानें 'विक्रमांकदेवचरित' हें महाकाव्य रचिलें. गुर्जर देशचा राजा वीरसिंह याची मुलगी 'शशिलेखा' हिजवर याचें प्रेम जडलें होतें. तें राजास न आवडून त्यानें यास सुळावर चढविण्याचा हुकूम दिला. सुळावर चढविण्यापूर्वीहि यानें शशिलेखेचें स्मरण केलें. तें पाहून राजानें याची शिक्षा माफ करून शशिलेखेशीं याचें लग्न केलें. पुढें दोघांनीं आपला काळ सुखांत घालविला. (विठ्ठल कविकृत बिल्हणचरित्र) यानें चौरीसुरतपंचाशिका हें खंडकाव्य, कर्णसुंदरी नामक नाटिका व रामचरित्र किंवा रामस्तुति हें काव्य लिहिलें.

बिस्किटें:–माप–पावशेर सगीठ, पावशेर लोणी, पावशेर साखर, पांच तोळे आमोनिया, चहाचे दोन चमचे बेकिंग पावडर, चहाचा अर्धा चमचा मीठ. **कृति**–वर दिलेले सर्व जिन्नस एकत्र करून दुधांत बिस्किटें करायच्या पूर्वी २–३ तास भिजवून ठेवावें. नंतर तें चांगलें मळून अगर कुटून त्याची पोळी लाटावी व आपल्याला पाहिजेत त्या आकाराचीं बिस्किटें कापून मग बिस्किटपात्रांत घालून भाजून काढावीत.

बिस्मार्क, जर्मन चॅन्सेलर (१८१५-१८९९):-अर्वाचीन जर्मनीचा निर्माता. ओटो एडवर्ड लिओपोल्ड, प्रिन्स फॉन बिस्मार्क–शानहासेन याचा जन्म लोअर एल्बच्या तटाकीं स्टेंडल जवळील शॉनहासेन या लहान खेडेगावीं ता. १ एप्रिल १८१५ रोजीं झाला. एका गरीब पण जुन्या ब्रान्डेनूबर्ग यूंकेर्सच्या घराण्यांतील वंशज होय. या घराण्यांतील पुष्कळांनीं तलवार धारण केली असून पुष्कळ युद्धांत पडले आहेत. त्यानें गोटिंगेन विद्यापीठांतील आपल्या विद्यार्थीदशेंत केलेल्या अठ्ठावीस द्वंद्वयुद्धांवरून त्याच्या ठिकाणची लढण्याची उपजत आवड त्याच्या युद्धप्रिय पूर्वजाकडून आली होती हें दिसून येते. शिक्षण संपल्यावर प्रशियाच्या सरकारी नोकरींत तो शिरला.

१८५९ सालीं रशियाचें निरीक्षण करण्याकरतां त्याला सेंट पिटर्सबर्ग येथें पाठविण्यांत आलें; हें काम त्यानें उत्कृष्ट रीतीनें केलें. १८६२ सालचे कांहीं महिने त्यानें पॅरिसमध्यें लुई नेपोलियनच्या मनाचा ठाव घेण्यांत घालविले. त्याला पुनः बर्लिनला बोलावून मुख्य प्रधान अथवा अध्यक्ष करण्यांत आलें. ह्या जागेवर तो सतत अठ्ठावीस वर्षें होता. त्यानें अविश्रांत परिश्रम करून पुष्कळसें विधायक कार्य केलें. राज्यकारभाराचा कर्णधार झाल्यापासून थोड्याच दिवसांत त्यानें पुढील उद्गार काढले. "सद्यःकालीन महत्त्वाचे प्रश्न भाषणें करून अथवा बहुमताचे निर्णय घेऊन सोडवितां येणार नाहींत. रक्तपात व शस्त्रें या योगानेंच ते सोडवावयाचे आहेत."

डेन्मार्कशीं युद्ध–यापुढें त्यानें रक्तपात करणारा युद्धप्रिय मनुष्य म्हणून इतिहासांत नांव मिळविलें. आपलें धोरण अंमलांत आणण्याकरितां त्यानें घटनात्मक हक्कासंबंधीं विचार करणाऱ्या प्रशियन चेंबरला बजावलें कीं त्याला आपलें धोरण अंमलांत आणण्याकरितां सैन्याची पुनर्रचना अवश्य असल्यानें त्याकरतां लागणारा पैसा चेंबरनें दिला तर ठीक; नाहीं तर आपण बजेट न मांडतां तो पैसा मिळवूंच मिळवूं. पुढें तो डेन्मार्कविरुद्ध युद्ध पार पाडण्याच्या उद्योगाला लागला. (१८६४). ऑस्ट्रियाच्या मदतीनें त्यानें डेन्मार्कपासून एल्ब नदीवरील दोन परगणे मिळविलें. त्यानंतर त्यानें आस्ट्रियाशीं भांडण उकरून काढलें. १८६६ सालीं ऑस्ट्रियन सत्ता कोनिग्रॅट्झ (Koniggratz) येथें चिरडण्यांत आली व जर्मनीच्या राष्ट्रमंडळांतून ऑस्ट्रियाची हकालपट्टी झाली. प्रशियाची सत्ता जर्मनींत प्रबल झाली. दक्षिणेकडील संस्थानांनीं प्रशियाशीं गुप्त तह करून प्रशियाचें फ्रान्सशीं युद्ध झाल्यास प्रशियास मदत करण्याचें मान्य केलें. त्याच वेळीं उत्तर जर्मनीचें नवीन मंडळ त्यानें निर्माण केलें.

फ्रान्सशीं युद्ध फार दूर नव्हते. चार वर्षांच्या अल्पकालांतच युद्ध होणें अपरिहार्य होतें. बिस्मार्कचाहि असाच भरंवसा होता. फ्रान्सनें कोनिग्रॅट्झच्या लढाईत झालेल्या नुकसानीबद्दल भरपाई मागितली. त्यासाठीं जर्मनीशीं लढाई करण्याकरतां फ्रान्सची तयारी चालली होती. त्याचकरितां जर्मनीच्या हितार्थ युद्ध लवकरच व्हावें म्हणूनच त्यानें सुप्रसिद्ध 'Ems Dispatch' हा खलिता लिहिला. या झगड्याचें पर्यवसान नवीन जर्मन साम्राज्य स्थापन होण्यांत झालें. प्रशियन राजसत्तेच्या स्थापनेच्या १७० व्या वाढदिवशीं जमलेल्या राजे लोकांसमोर बिस्मार्कनें नवीन जर्मन साम्राज्य स्थापन झाल्याचें जाहीर करून त्या

साम्राज्याचा धनी पहिला विल्यम हा डॉयूशर कायसर (Deutscher Kaiser) असल्याची घोषणा केली. युद्धानंतर झालेल्या जर्मन पार्लमेंटच्या पहिल्या अधिवेशनप्रसंगीं त्या कृतज्ञ धन्यानें आपल्या कणखर वृत्तीच्या चॅन्सेलरचा दर्जा काऊंटचा होता तो प्रिन्सचा केला.

जर्मनींत ऐक्य निर्माण करण्याचे कामीं बिस्मार्कचीं आठ वर्षें खर्च झालीं, यापुढें हें ऐक्य दृढ करण्याच्या उद्योगाला तो लागला. परंतु प्राटेस्टंट प्रशिया नव्या जर्मन साम्राज्यांत पुढारी होईल म्हणून जर्मन कॅथॉलिकांमध्यें अस्वस्थता माजली. जर्मनींतील कांहीं संस्थांनांत कॅथॉलिकांचें दृढ मताधिक्य होतें.

बिस्मार्कच्या रक्तपाताच्या धोरणाच्या विरोधकांकडून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न दोनदां झाला. त्याचा धनी वृद्ध जर्मन बादशहा याजवर सोशॅलिस्ट पक्षीयांकडून त्याच्याच राजधानींत दोनदां बंदुकीची गोळी झाडण्यांत आली, एकवार त्याला जबर जखम पण झाली. या पक्षाच्या क्रान्ती करण्याच्या ध्येयाशीं बिस्मार्कला तोंड द्यावें लागलें. त्यानें दडपशाही व सुधारणा असें दुहेरी धोरण स्वीकारलें. सुधारणांच्या बाबतींत त्यानें संरक्षक जकातीचें धोरण स्वीकारलें; त्यामुळें जर्मनींत उद्योगधंदे व शेती यांचा विकास होऊन सुबत्ता वाढूं लागली. मजूर लोकांचें अपघात, दारिद्र्य व म्हातारपण यापासून नुकसान होऊं नये म्हणून विमे उतरण्याची त्यानें तजवीज केली. त्यामुळें बिस्मार्क हा अत्यंत मोठा सोशॅलिस्ट म्हणून ओळखला जातो.

युरोपचा देवदूत—बिस्मार्कचा मुख्य हेतु फ्रान्सला आपला गमावलेला मुलूख परत मिळवितां येऊं नये म्हणून बाजूला काढणें हा होता. रूसो—टर्किश युद्धानंतर स्थिरस्थावर करण्याकरतां बोलावण्यांत आलेल्या बर्लिन कांग्रेसचा तो १८७८ सालीं अध्यक्ष झाला. तेव्हां त्याची सत्ता व वजन ही कळसास पोहोंचली होती. ह्या कांग्रेसमध्यें ठरलेली व्यवस्था रशियाला मुळींच आवडली नाहीं; रशियाशीं पुनः युद्ध होण्याचा संभव दिसूं लागला. जर्मनी व ऑस्ट्रिया यांची दोस्ती झाल्यामुळें रशियाशीं युद्धाचा प्रसंग टळला. या दोस्त राष्ट्रांत इटली सामील झाल्यामुळें दोस्तांचें त्रिकूट बनलें.

बिस्मार्कच्या राजकीय जीवनांत यापुढील महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याचें वसाहतीसंबंधीचें धोरण (१८८४). या धोरणामुळें जर्मनीचें व इंग्लंडचें बासूं लागलें. वर सांगितलेल्या राष्ट्रांच्या त्रिकूटाची दोस्ती टिकविणें व रशियाची समजावणी करणें यांत त्याचें धोरण साठविलें होतें. पण त्याचा नवा धनी दुसरा विल्यम यानें त्याच्या या धोरणाचा धिक्कार केला. १८९० सालीं दुसऱ्या विल्यमनें त्याला कामावरून काढून टाकलें. त्यानें आजपर्यंत स्वदेशाच्या कल्याणार्थ ज्या सत्तेचा उपयोग केला ती सत्ता वापरूं देण्याची त्याच्या नव्या धन्याची इच्छा नव्हती, म्हणूनच तो कामावरून दूर झाला. त्या उभयतांची मनमिळणी झाल्याचें दर्शविण्यांत आलें, पण हा कणखर चॅन्सेलर भग्न हृदय झाला व पुढें तीन वर्षांनीं ता. ३० जुलै १८९८ रोजीं हम्बर्ग जवळील फ्रेडरिक्श्रू येथें वारला.

बीटः—पोर्तुगाल व दक्षिण आफ्रिका या देशांत उगवणारी मुळी. Chenopodiaceae या जातीची ही मुळी आहे. या मुळींत फक्त १२% साखर असून बटाट्याखालोखाल ही पोषक असते. समृद्ध व खोल अशा मातीमध्यें—जीवर नुकतेंच खत पसरलेलें नाहीं--अशा ठिकाणीं हिचें बीजारोपण करण्यांत येतें. बटाटा, वाटाणे किंवा कोबीज या पिकानंतर या मुळीचें बीजारोपण होतें. या पिकाची पहिली पेरणी लवकर करतात, १—३ फूट अंतर असलेल्या रांगा राखून पेरणी करतात. जुलईच्या पंधरा तारखेपर्यंत हें पीक तयार होतें. यानंतर उन्हाळ्याच्या मध्यापर्यंत पुन्हां या पिकाच्या पेरण्या करतां येतात. बर्फ पडूं लागलें असतां हें पीक उपटून काढून वाळूंत सांठवून ठेवावें लागतें.

बीटसाखर—बीटच्या मुळीपासून निघणारी साखर पांढरी शुभ्र असते. ती युरोपमधील अनेक भागांतून तयार होते. या साखरेची लागवड इराण, सैबेरिया, मँचुरिया, नाताळ व युनाटटेड स्टेटस् ऑफ अमेरिकेंतील बार्बाडोस या ठिकाणींहि होते. इ. स. १९३७ सालीं युनायटेड् स्टेटसमध्यें बीट साखरेची निपज १,१८५,००० टन होती व त्याच वर्षी एकूण जगांत २०,३४९००० टनची निपज होती व त्यांपैकीं केवळ बीटपासून ११,९०८,००० टन इतकी होती. युरोपमध्यें ५,०००,००० एकर जमीनींत बीट साखरेची लागवड होते.

साखर कशी तयार करतात ? कारखान्यांत मुळ्या आणल्यानंतर त्या प्रथम स्वच्छ धुतात; नंतर

तुकडे पाडण्याच्या यंत्राच्या साह्यानें मुळ्यांचे बारिक बारिक तुकडे होतात. हे तुकडे Diffuser मध्यें घालून वर गरम पाणी घालतात. या कृतीमुळें त्या तुकड्यांतून साखर खालीं भांड्यांत गळून पडते; वातावरणामुळें तिचा रंग काळा पडतो. या कच्च्या साखरेंत २% चुना घातल्यावर ती शुद्ध होऊन पिवळसर वर्णावर पांढरी स्वच्छ होते. त्यानंतर फिल्टरिंग वगैरे प्रकारांनीं शुद्धीकरण केल्यानंतर गंधकाच्या आम्लाची हिजवर वाफ देतात.

बुधः–मुख्य ग्रहांतील सर्वांत लहान व सूर्याच्या सर्वांत जवळचा ग्रह. याचा व्यास ३००० (कांहींच्या मतें २७०२) मैल असून यांचा आकार चंद्राच्या आकाराच्या तिप्पट आहे. सूर्याच्याभोंवतीं ८८ मध्यम सौर दिनापेक्षां कमी कालांत फिरतो. भ्रमणाचे वेळीं त्याचे सूर्यापासूनचे मध्यम अंतर ३५,३९२,००० मैल असून सूर्याच्या अगदीं नजीक तो असतो तेव्हां त्याचें सूर्यापासून अंतर ३६,०००,००० मैल असतें. त्याचें सूर्यापासूनचें जास्तींत जास्त अंतर ४३,०००,०००मैल असतें. त्याला आपल्या आंसाभोंवतीं परिभ्रमण करण्याला २४ तास १७ मिनिटें व २६ सेकंदें लागतात. त्याचा आकार पृथ्वीच्या आकाराच्या एक सप्तमांश असून दार्ढ्य पृथ्वीच्या दार्ढ्याहून एक दशांश अधिक आहे. तो वसंत ऋतूंत व शरदृऋतूंत सूर्याच्या अगदीं पूर्वेकडे आला म्हणजे सूर्यास्तानंतर व सूर्योदयापूर्वी नुसत्या डोळ्यांना दिसतो. याच्यावरील हवा पृथ्वीवरच्या हवेपेक्षां कमी घन आहे.

बुध (ज्योतिष शास्त्रदृष्ट्या):–सत्प्रवृत्त पण स्वतःचें कर्तृत्त्व नसलेला हा ग्रह आहे. चंद्र म्हणजे मन, बुध म्हणजे मनुष्याची मूळ अमूर्त असलेली बुद्धि; व गुरु म्हणजे ज्ञान होय. रवीच्या जवळपास २५ अंशांत हा ग्रह असतो. तथापि ज्या राशींत अगर इतर ग्रहासमवेत बुध असेल त्यावरून माणसाच्या बुद्धिची परीक्षा करतां येते. कोणी बुधाला स्त्रीग्रह मानतात तर कोणी नपुंसक ग्रह मानतात. याचें कारण जशी संगत मिळेल तसें वागणारा बुध आहे. याचकरितां मिथुन ही द्विस्वभावराशी व कन्या ही उच्च बौद्धिकराशी बुधाचें स्वगृह मानतात. कन्येंत तो १५ अंशांवर उच्चीचा असतो व मीनेंत १५ अंशांवर तो परम नीचीचा असतो. बुधाच्या स्वभावाची माणसें उत्तम लेखक, पंडित, बहुभाष व मार्मिक बोलणारीं असतात परंतु बुधाच्या स्वभावाप्रमाणें ‘ गंगा गये गंगादास, जमना गये जमनादास ’ अशी त्यांची वृत्ति असते. हा सोमपुत्र म्हणजे चंद्राचा मुलगा. पण शनि (सूर्यपुत्र) हा जसा रवीचा शत्रु त्याचप्रमाणें बुध हा चंद्राला शत्रुवत् लेखतो. चंद्र हा बुधाचा मित्र आहे; पण बुध हा चंद्राचा इतका हाडवैरी आहे कीं चंद्राचा मारेकरी जो राहू त्यालाच बुधानें आपला मित्र मानलें आहे. म्हणून बुध व चंद्र हे दोन्ही शुभग्रह असले तरी त्यांची युतिकेंद्र अगर समसप्तक याच्या फलादेशाकरितां हें जन्मसिद्ध शत्रुमित्रत्व नीट विचारांत घेतलें पाहिजे.


बुध हा संतति, शांति, विनय, भक्ति, मति म्हणजे सामान्यतः बुद्धि, मातुल बांधव, ज्ञातिगोत्र, तसेंच गणित वेदांत तत्त्वज्ञान, प्रकाशन व छापखान्याचा धंदा, पत्रलेखन व तृतीयस्थानदर्शक म्हणून छोट्या प्रवासाचा कारक आहे.

बुध हा बुद्धिवान पण चंचल, भित्रा परंतु सावध म्हणून मंगळाबद्दल त्यानें मित्रत्व ठेवलें तरी मंगळ त्याला शत्रू मानतो. कारण “ पानी तेरा रंग कैसा ? जिसमें मिलावे वैसा ” अशीं माणसें मंगळासारख्या करारी माणसाला फार घातक वाटतात. मेषेंतला बुध स्पष्टवक्ता व रागीट, मिथुन कन्येमधला उत्तम पृथःकरणशक्ति असलेला, तूळेंत तुलनात्मक विचार फार करणारा परंतु विलासी व काव्य गायनाचा षोक असलेला, वृषभ मकरेचा अतिशय स्वार्थी व कावेबाज, कुंभ राशींत विशेषतः पंचम स्थानांत अत्यंत शास्त्रीय बुद्धि असणारा असा असतो. कर्क या शत्रुराशींत तसेंच मीनेच्या बुधाचीं वाईट फळें मिळतात. स्वभाव वायफळ व दुष्ट बोलणारा व क्वचित् दारूबाजहि असतो. मज्जातंतू व नर्व्हज सिस्टिम यांवर त्याचा अंमल असतो. व ३२ वर्षे पूर्ण होऊन तेहेतिसावे वर्षी त्याचा उदय होत असल्यानें कुंडलींत ज्या स्थानांचा तो अधिपती असतो त्या स्थानासंबंधीं अकल्पितरीतीनें घडामोड झालेली प्रत्ययाला येते.

बुद्धगयाः–गौतमबुद्धाला ज्ञानप्राप्ती झालेलें ठिकाण. हें ठिकाण म्हणजे बंगालमधील गया जिल्ह्यांतील फल्गू अथवा लीलाजान नदीच्या पश्चिम तीरावरील एक खेडें होय. या गांवीं बुद्धाला ज्ञानाची प्राप्ती झाली म्हणून ह्या खेड्याला ‘ बुद्धगया ’ असें नांव पडलें. याला ‘ महाबोधी ’ असेंहि म्हणतात. ज्या


वृक्षाखालीं बुद्धाला ज्ञान झालें तो वृक्ष येथें 'महा-बोधी' या नावानें ओळखतात. या वृक्षावरून हें दुसरें नांव प्राप्त झालें असावें. अशोकानें येथें भव्य असें बुद्धमंदिर बांधलें. येथील महुरस्तूपावर त्या वेळच्या वृक्षाचें व त्याच्या आसपासच्या प्रदेशाचें स्पष्ट चित्र खोदलें आहे. त्यावरून तत्कालीन स्थितीची पूर्ण कल्पना येते. देवालयाच्या भोंवतालचा कोट अद्यापहि अशोककालीनच आहे. कोटांतील कांहीं खांब येथील महंताच्या मठांत पहाण्यास मिळतात. १८८१ त बंगाल सरकारनें देवळाची दुरुस्ती केली. तथापि देवालय मूळ स्वरूपांतच कायम ठेवलें आहे. बोधी वृक्षाखालीं म्हणजे अश्वत्थ वृक्षाखालीं बुद्धाची मूर्ति आहे. तिची पूजा हिंदूकडून होते. सध्यांचा बोधीवृक्ष मूळ नसून मूळच्या वृक्षाची ती एक शाखा होय. हें स्थान हिंदु व बुद्ध असे उभय जातींच्या लोकांना पूज्य आहे. काशीप्रमाणेंच येथेंहि यात्रेकरू पिंडश्राद्ध वगैरे विधी करितात.

बुद्धिबळें:- हिंदुस्थानांतच फार पुरातन काळीं जन्मलेला एक बौद्धिक खेळ. या खेळास एकंदर ३२ बुद-



बुद्धिबळाचा पट व खेळाचा युरोपियन पद्धतीची मांडणी.


बळें किंवा सोंगट्या लागतात. हा खेळ दोन खेळा-डूंचाच आहे. प्रत्येक खेळाडूस ८ प्यादीं (सर्वांत आकारानें लहान असलेल्या सोंगट्या) व १ वजीर, २ घोडे, २ उंट २ हत्ती याप्रमाणें सात मोहरीं



१. The black King (काळा राजा)
२. The black Queen (काळा वजीर)
३. The black Bishop (काळा उंट)
४. The black knight (काळा घोडा)
५. The black Rook or Castle (काळा हत्ती)
६. The black Pawn (काळें प्यादें)
७. The white Pawn (पांढरें प्यादें)
८. The white rook or Castle (पांढरा हत्ती)
९. The white King (पांढरा राजा)
१०. The white Queen (पांढरा वजीर)
११. Tl e white Bishop (पांढरा उंट)
१२. The white Knight (पांढरा घोडा)

व १ राजा मिळून १६ बुदबळें असतात. बुद्धिबळाच्या खेळाचा पट ६४ चौरस घरांचा असतो.

दोन्ही बाजूस पहिल्या पट्टींतील घरांत अनुक्रमें हत्ती, घोडा, उंट, वजीर, राजा, उंट, घोडा व हत्ती या आठांच्या समोरच्या आठ घरांतून आठ प्यादीं अशी मांडणी करतात. इंग्लिश किंवा युरोपियन पद्धतींत दोन्ही बाजूंची मांडणी याचप्रमाणें असते, पण



बुद्धगया—मुख्य मंदीर

हिंदी पद्धतींत एका बाजूच्या राजासमोर दुसऱ्या बाजूचा वजीर व वजिराच्या समोर राजा एवढा फरक असतो. प्यादीं, मोहरीं व राजा यांच्या चालींत फरक असतो. (१) राजा हा प्रत्येक वेळीं पुढच्या, मागच्या बाजूस किंवा तिरकस एक घरच जाऊं शकतो. शह मिळण्यापूर्वी तेवढा या चालीला अपवाद असून अशा वेळीं तो अडीच घरें घेऊं शकतो. (२) हत्ती फक्त पुढें किंवा मागें अथवा आडवे फक्त एकच घर जातो. (३) उंट नेहमीं तिरकस रेषेंत पुढें किंवा मागें एकच घर घेऊं शकतो. (४) वजीर पुढें, मागें, तिरकस किंवा आडव्या गतींत वाटेल तितकीं घरें (वाटेंत दुसरें बुदबळ नसल्यास) जाऊं शकतो. विरुद्ध पक्षाचें बुदबळ वाटेंत आल्यास त्याला मारून तो त्याची जागा घेतो, पण स्वपक्षाचें बुदबळ वाटेंत आल्यास त्या शेजारच्या घरीं बसतो. (५) सर्व मोहऱ्यांत घोड्याची गती मौजेची आहे. घोडा नेहमीं अडीच घरें जातो. म्हणजे पुढें दोन घरें व दुसऱ्या घराच्या डाव्या किंवा उजव्या बाजूच्या घरांत तो जातो. वाटेंतल्या बुदबळांवरून उडी मारून घोडा आपल्या घरीं जातो. सर्व मोहरीं विरुद्ध पक्षाच्या बुदिबळांना मारूं शकतात व स्वतःच्या पक्षांतील एखाद्या कमजोर झालेल्या मोहऱ्यास जोर देतात, म्हणजे जर स्वपक्षाचें मोहरें किंवा प्यादें मरूं घातलें तर ज्या परपक्षाच्या मोहऱ्यानें हल्ला केला असेल त्यावर तसाच हल्ला करतां येईल इतक्या टप्प्यांत (घरांत) तीं असतात. मोहरीं मेलीं तरी परत जिवंत होतात व खेळांत भाग घेतात. प्याद्यांना फक्त विरुद्ध बाजूकडेच–पुढेंच–एक घर जातां येतें. प्यादें मागें येऊं शकत नाहीं किंवा एकदां मेलें कीं पुन्हां जिवंत होऊं शकत नाहीं. फक्त विरुद्ध पक्षाचें बुदबळ मारण्याच्या वेळीं प्यादें तिरकस जाऊं शकतें. खेळाच्या सुरवातीला हत्ती, राजा, वजीर यांच्यापुढील प्याद्यांना फक्त पहिल्या खेळाला एकदम समोर दोन घरें जातां येतें.

राजाला अडचणींत आणला कीं शह, पण प्रतिपक्ष्याच्या मोहऱ्यानें राजाला अडचणींत आणला कीं परत त्याला सोडविणें वगैरे कल्पनांवर शह, काटशह, नाशह, शहशह हे पेंच व प्रतिपेंच बसविलेले आहेत. याशिवाय मात, बुर्जी, प्यादी, घोडमल्ली इत्यादि खेळाचा शेवट कोणत्या प्रकारानें झाला हें व्यक्त करणारे डाव होत.

हिंदी व इंग्रजी पद्धतींत थोडे फरक आहेत. हिंदुस्थानांतून हा खेळ पश्चिमेकडे सरकत सरकत युरोपांत आतां मानाची जागा पटकावून बसला आहे. आणि दुर्दैवानें खरेखुरें बुद्धिवैभव लागणाऱ्या या खेळाकडे आम्हां हिंदूंचें आतां दुर्लक्ष होऊं लागलें आहे.

सोबत इंग्रजी बुद्धिबळाची मांडणी व त्यांच्यांतील सोंगट्यांचीं नांवें सचित्र दिलीं आहेत. हिंदी पद्धतींत बुदिबळांचे रंग तांबडा व हिरवा असे असतात. तर युरोपीय पद्धतींत काळा आणि पांढरा असे रंग असतात. देशी बुदबळांचा आकारहि साधासुधा असतो. युरोपीयन बुदबळांची माहिती येथें सचित्रच दिली आहे.

बुंदीचे लाडू:–साहित्य–हरभऱ्याच्या डाळीचें पीठ, साखर, तूप व गोडें तेल. **माप**–एक शेर डाळीचें पीठ, एक शेर तूप, सव्वा किंवा दीड शेर साखर व स्वयंपाकाच्या एक पळीभर गोडें तेल. **कृति**–हरभऱ्याच्या डाळीचें पीठ घेऊन त्यांत गोडें तेल घालून तें भजाच्या पिठासारखें तासभर भिजवून ठेवावें. कढईंत तूप घालून तें चांगलें तापल्यावर झाऱ्यावर भिजवलेलें पीठ घेऊन झारा कढईवर आपटावा म्हणजे कळ्या तुपांत पडतात. या कळ्या लालसर होईपर्यंत तुपांत तळाव्या. ह्याप्रमाणें कळ्या पाडून झाल्यावर साखरेचा गोळीबंद पाक करावा व कळ्यावर तयार केलेला पाक घालून लगेच लाडू बांधावेत. लाडू बांधतांना तूप किंवा तांदळाचें पीठ हाताला लावावें.

तिखटमिठाच्या कळ्या करावयाच्या झाल्यास कळ्या घेऊन त्याला अजमासानें, मीठ, तिखट व जिऱ्याची पूड लावून तयार कराव्यात.


बुंदेले, गोविंदपंत (–मृत्यु २२ डिसेंबर १७६०):– सदाशिवराव भाऊ व अबदाली यांमध्यें झालेली पानिपतची लढाई मराठे हरले, त्याचें खापर इतिहासाचार्य राजवाडे यांनीं सर्वस्वी गोविंदपंत बुंदेले यांच्या माथीं फोडलें आहे. 'एका गोविंदपंताच्या कुचराईमुळें सर्व कांहीं' बिघडलें. त्याच्या मनांत भाऊचा पक्का अंत बघावयाचा होता......केलेलीं सर्व पापें झांकण्याची सोय मराठ्यांवर......भयंकर आपत्ति आल्यावांचून लागणार नाहीं......तेव्हां भाऊला मदत न करण्याची व्यवस्था आपल्याकडून होईल तेवढी यानें केली असा त्यांचा भयंकर आरोप आहे. परंतु रियासतकार सरदेसाई प्रभृतींनीं भाऊसाहेबांनीं सांगितलेल्या गोष्टी अशक्य

कोटींतील व गोविंदपंतांच्या आवांख्याबाहेरील होत्या असें प्रतिपादिलें आहे. शिंदे होळकरांच्या नंतर हा एकच मातबर मामलेदार राहिल्यामुळें भाऊसाहेबांनीं सहजच त्याच्यावर भिस्त ठेवली असली तरी पूर्वीच्या दंगलीमुळें माजलेली बेबंदशाही, मराठ्यांबद्दल फैलावलेली अप्रियता व तुच्छतावृत्ति, एकट्या गोविंदपंतांची झालेली ओढाताण आणि आरंभापासूनच झालेल्या मराठेशाहीच्या उत्तरेकडील दुर्लक्षाचे यावेळीं भोगावे लागलेले दुष्परिणाम या सर्वांचा अनिष्ट परिणाम झाला. गोविंदपंतांनीं कुचराई केली नाहींच; पण उलट भाऊंची आज्ञा पाळण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतांनाच तो जिवानिशीं गेला, असें या पक्षाचें समर्थन आहे. श्री. शेजवलकर यांच्या अगदीं अलीकडच्या मताप्रमाणें 'पानिपतची जबाबदारी कोणाहि एका व्यक्तीवर पडत नसून तो एक परिस्थितीच्या चुकीच्या अंदाजाचा परिपाक म्हटला पाहिजे.'

पानिपतसारख्या भयंकर उत्पाताशीं निगडित झाल्याचें भाग्य गोविंदपंताला लाभलें, त्यामुळें इतिहासांत याच्या एकट्याबद्दल जेवढी चर्चा झाली आहे तेवढी दुसऱ्या कोणाहि एका सामान्य व्यक्तीबद्दल बहुधा झालेली नाहीं.

बुंदेले हें बुंदेल खंडाच्या कारभारावर नेमल्यामुळें मिळालेलें नांव. सर्व नांव गोविंद बल्लाळ खेर, कऱ्हाडे ब्राह्मण, मूळ गांव नेवरें, जिल्हा रत्नागिरी. कोंकण सोडून इतरांप्रमाणेंच पेशव्यांच्या आश्रयाला आला. एका स्वारींत धडधडत्या चितेवर भाकरी भाजून घेण्याच्या धाडसामुळें बाजीराव पेशव्यांच्या नजरेस आला अशी आख्यायिका. पुढें बुंदेल खंडाचा कारभार व मामलेदारी. पेशव्यांकडून पालखी व अब्दागीर, १७४९–५० फर्रुकाबाद व इटावा अशा दोन बंदोबस्ताच्या लढाया मारल्या, १७५१ व १७५६. १७५९–६० पासून पानिपत मोहिमेंत बदाऊं व कुंजपुरा वगैरे ठिकाणीं होता. शेवटीं अबदालीची रसद मारण्याची व मराठ्यांकडे रसद पोचविण्याची कामगिरी करीत असतां फसगतीनें शत्रूच्या गोटांत चालत जाऊन हातीं सांपडला व मारला गेला (२२ डिसेंबर १७६०). त्याचें शीर शत्रूनें भाऊसाहेबांकडे पाठविलें.

बुलबुल:–चिमणीपेक्षां आकारानें हा पक्षी मोठा असतो. याचे पंख रुंद व आखूड असतात. बुलबुलची शेपूट दुभागलेली तरी असते किंवा निमुळती तरी असते. तसेंच ती लांबही असते. या पक्षाच्या डोक्या-



सुलतान बुलबुल

वर तुरा असून याचे पाय आखूड असतात. चोंच साधारण लांब असते. हा पक्षी वड, पिंपळ व उंबर यांचीं फळें व कीटक यांवर आपला चरितार्थ चालवितो. बुलबुल आपल्या मादीबरोबरच जन्मभर आयुष्य कंठितो. याचें घरटें झुडपाच्या फांदीवर पेल्यासारखें असून तें गवत, काटक्या, मुळ्या यांचें केलेलें असतें. घरट्यावर कोळ्याचीं जाळीं लावून वर पानें, चिंध्या लटकावलेल्या असतात. मार्च ते सप्टेंबर या महिन्यांत मादी, या घरट्यांत, फिकट किरमिजी किंवा तांबूस रंग असून वर तांबटपिंगट ठिपके असलेलीं २–३ अंडीं घालते. याच्या अंड्यांना व पिलांना, याचें घरटें जमिनीसरशी असल्यामुळें, साप व मांजर यांच्याकडून भय असतें. याची वीण वर्षांतून दोनदां होते.

याच्या जाती दोन आहेत. एकीस लालबुड्या व दुसरीस लालगाल्या म्हणतात. लालबुड्याचें डोकें व त्याचा तुरा हे भाग काळे असतात. पाठीवरचीं सर्व पिसें टोंकाला फिकट रंगाचीं असल्यानें त्याचा पिसारा माशाच्या खवल्याप्रमाणें वाटतो. शेपटाचें शेवट पांढरें असून शेपटीखालील पिसें तांबडीं असतात.

लालगाल्याचा तुरा लांब निमुळता व पुढें कललेला असतो. याच्या डोक्याचा व तुऱ्याचा रंग काळा असून गालावरचीं पिसें पांढरीं झाक असलेल्या तांबड्या रंगाचीं असतात. हनुवटी व छाती हे अवयव पांढरे असून छाती नि पोट यांमध्यें काळा पट्टा असतो. बाकी भाग लालबुड्याप्रमाणेंच असतो.

गाणारी जात—मूळची ही इराणांतली. या जातीचा पक्षी गाण्यांत उत्तम असल्यामुळें कांहीं कांहीं लोक यास ५० ते ४०० रुपयांपर्यंत विकत घेतात. नरच गातो. खाण्यापिण्याची काळजी घेतली तर हा फार वर्षें जगतो. याची लांबी ७।८ इंच असते व याचें शरीर लहान असतें. याच्या पाठीचा रंग पिंगट किंवा करडा किंवा तांबूस असतो. नाकतोडे, वाळवी वगैरे किड्यांवर याची उपजीविका चालते. हा पक्षी जमिनीवरच अंडीं घालतो म्हणून मोठा पिंजरा घेऊन त्याच्या तळाला गवत, पाला पसरावा व वर पिंजऱ्यांत नर मादी ठेवावी म्हणजे मादी अंडीं घालेल.

तुरा असलेला सुलतान बुलबुल नांवाच्या पक्षाची एक जात आहे. या जातीच्या नराच्या शेपटीमधलीं दोन पिसें याच्या अंगाच्या दुपटीपर्यंत वाढतात. पहिल्या वर्षांत हीं नसतात; पण दुसऱ्या वर्षी तीं येतात. हीं पिसें पावसाळ्यांत गळून जाऊन पुन्हां तीं तिसऱ्या वर्षी येतात. उडतांना घारीप्रमाणें याचे पंख वाजतात. मादीचें डोकें व तुरा हे अवयव काळया रंगाचे असतात; तसेंच पोट पांढरें असून बाकी सर्व भाग विटकरी रंगांत असतो. नर मादी लहानपणीं मादीच्या रंगाचेच असतात, पण नराचा रंग पुढें बदलतो. नर दोन वर्षांचा झाल्यावर त्याचें डोकें व तुरा हे भाग काळे राहून बाकीचे सर्व अंग पांढरेंफेक होतें. रंग रूप वगैरेच्या दृष्टीनें हा पक्षी फारच सुंदर दिसतो. आणि म्हणूनच त्याला 'स्वर्गांतील पक्षी' हें दुसरें नांव प्राप्त झालें आहे.

बृहदारण्यकोपनिषद्:—हें वाजसनेयशाखेचें उपनिषद् आहे. यांत मुख्यतः ब्रह्मज्ञान सांगितलें आहे. जगदुत्पत्ति व उपासना वगैरेसंबंधीं विचार मुख्य विषयाच्या आनुषंगानें केला आहे. याचा सारांश पुढें दिला आहे.

या विश्वांत ब्रह्मादिस्तंबपर्यंत आत्माच प्रविष्ट झाला आहे. काष्ठादिकांना जसा अग्नि व्यापून असतो, तसा आत्मा नखाग्रापासून सर्व शरीरभर व्यापलेला आहे. तो हा शरीरस्थ आत्मा अज्ञान्याला दिसत नाहीं.तो पुत्रवित्तादिकाहून अधिक प्रिय आहे. आत्म्याचें ज्ञान झालें म्हणजे सर्व वस्तुमात्रांचें ज्ञान होतें. म्हणून आत्म्याचीच उपासना करणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

आत्म्याची उपासना न करणारा मनुष्य कितीहि मोठीं शास्त्रोक्त कर्में करीत असला तरी त्याचें कर्मफल भोगानंतर क्षीण पावतें. आत्मज्ञानी माणसाचें कर्मफल क्षय पावत नाहीं. त्याला जी जी इच्छा होते ती ती या आत्म्याच्याच योगानें तो पूर्ण करतो. आत्मा नाम, रूप व कर्म यांच्या पलीकडचा आहे. नामरूपात्मक सृष्टीविषयीं विरक्त रहावें. आत्म्यापासूनच, सर्व प्राण, सर्व लोक, सर्व देव व सर्व भूतें उत्पन्न होतात म्हणून आत्म्याचीच उपासना करावी.

ज्याप्रमाणें कोळी स्वतःच्या तंतूनींच वर चढतो, ज्याप्रमाणें अग्नीपासून बारीक ठिणग्या वर उठतात, त्याप्रमाणेंच या आत्म्यापासून, सर्व इंद्रियें, सर्व लोक, सर्व देव, सर्व भूतें उत्पन्न होतात. तो आत्मा सत्याचें सत्य होय. मूर्त व अमूर्त, मर्त्य व मृत्युरहित, स्थिर व चलनात्मक, प्रत्यक्ष परोक्ष अशीं ब्रह्माचीं रूपें आहेत. या ब्रह्माचें वर्णन करणें शक्य नाहीं; म्हणून 'नेति नेति' (कोणत्याहि विशेष धर्मांनें युक्त नाहीं) असा ब्रह्माचा निर्देश करतात. याहून ब्रह्माचा दुसरा निर्देश करतां येत नाहीं.

कोणतीहि वस्तू त्या वस्तूच्या कार्याकरितां प्रिय होत नसते. आपल्याच कार्याकरितां प्रिय होत असते. म्हणून आपण म्हणजे तो आत्मा पाहिला पाहिजे, त्याचें श्रवण केलें पाहिजे, त्याचें मनन केलें पाहिजे, निदिध्यास केला पाहिजे. आत्म्याचें दर्शन, श्रवण, मनन आणि ज्ञान झालें म्हणजे त्या सर्वांचें ज्ञान होते.

हा आत्मा सर्व भूतांचा अधिपति, सर्व भूतांचा राजा आहे. ज्याप्रमाणें रथाच्या नाभीचे व नेमीचे ठिकाणीं सर्व अरा बसविलेल्या असतात. त्याप्रमाणें या आत्म्याचे ठिकाणीं सर्व भूतें, सर्व देव, सर्व प्राण स्थित आहेत. हाच आत्मा सर्वांचा अनुभव घेणारा आहे. हाच सर्व वेदान्ताचा निष्कर्ष होय.

हें सर्व कर्म मृत्यूनें व्याप्त आहे. मृत्यूपासून सुटका आत्मज्ञानानेंच होते, हा आत्मा सर्वव्यापि व अमृत आहे; इतर सर्व विनाश आहे. हा अमृत आत्मा अंतर्यामी आहे. हा अदृष्ट असून द्रष्टा, अश्रुत असून श्रोता, अमत असून मन्ता, अज्ञात असून ज्ञाता आहे. याहून दुसरा कोणी द्रष्टा नाहीं. या आत्म्याला जाणल्यानें मृत्यु जिंकतां येतो. 'हा मी आहे' असें जर मनुष्याला आत्म्याविषयीं ज्ञान होईल तर मग तो कशाकरितां शरीराच्या दुःखानें दुःखी होईल ?

बेअर्ड, जॉन लोजी (१८८९—) टेलिव्हिजनचा संशोधक. एका धर्माधिकाऱ्याचा (Minister) मुलगा.

१९२३ सालीं टेलिव्हिजन अल्पप्रमाणांत कां होईना पण यानें यशस्वी करून दाखविलें. (टेलिव्हिजन पृष्ठ ८५३ पाहा.) १९३६ साली आलेक्झांड्रा पॅलेसमध्यें (लंडन) यानें टेलिव्हिजनचीं यंत्रसामुग्री बसवून ब्रॉडकाटिंगला सुरवात केली. सध्यां बेअर्ड टेलिव्हिजन लि.चा मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम करीत आहे.

बेकन, फ्रॅन्सीस (१५६१–१६२६) हा इंग्रज कायदेपंडित व तत्त्वज्ञ यॉर्कशायर हाऊस लंडन येथें ता. २२ जानेवारी १५६१ रोजीं जन्मला. हा सर निकोलस बेकन यांचा ॲन कुक या द्वितीय पत्नीपासून झालेला मुलगा. त्यानें केंब्रीज विद्यापीठाच्या ट्रिनिटी कॉलेजांत प्रवेश केला (१५७३) व १५७५ सालीं कॉलेज सोडलें. १५७६ सालीं सर ॲमॉस पॉलेट या फ्रान्समधील ब्रिटिश वकिलाकडे त्यानें नोकरी पतकरली. तो पॅरिसला गेला व तेथें तीन वर्षें राहिला. पुढें बाप वारल्यामुळें तो लंडनला परत आला व 'ग्रेज इन'मध्यें कायद्याचा अभ्यास करून १५८२ सालीं तो बॅरिस्टर झाला.

१५९१ च्या सुमारास बेकनचा अर्ल इसेक्स यांच्याशीं परिचय झाला. ॲटॉर्नी जनरल होण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. इसेक्सनें त्याची मागणी उचलून धरली; परंतु बेकनवर राणी इलिझाबेथ हिची कांहीं कारणामुळें इतराजी होऊन सदर जागा सर एडवर्ड कोक यांना मिळाली. १५९७ सालीं बेकनचें लेडी हॅटन नामक एक श्रीमान स्त्रीशीं लग्न होण्याचा संभव दिसूं लागला. पण तो विवाह घडून आला नाहीं. १५९८ सालीं त्याला कर्जाबद्दल अटक झाली. पहिल्या जेम्सनें त्याला सर ही पदवी दिली व राजकीय कारस्थानांत गुंतविला. १६०६ सालीं एलिस बार्नहॅम हिच्याशीं त्यानें विवाह केला. १६०७ सालीं सॉलिसिटर जनरल, १६१३ सालीं ॲटॉर्नी जनरल; १६१६ त प्रिव्हिकौन्सीलर; १६१७ मध्यें लॉर्ड कीपर ऑफ दि ग्रेट सील व १६१८ सालीं लॉर्ड चॅन्सेलर या हुद्द्यावर तो चढला; याच सालीं तो बॅरन व्हेरुलॅम झाला. १६२० सालीं व्हायकौंट सेंट आल्बन्स ही पदवी त्याला देण्यांत आली. १६२१सालीं त्याच्यावर लांच खाण्याच्या आरोपावरून खटला भरण्यांत आला. त्यानें दिलगिरी प्रदर्शित केली; पण बचावकरण्याचें नाकारलें. या खटल्यांत त्याला जबर दंड झाला व कांहीं काल कारागृहवासहि घडला. राजानें त्याचा दंड माफ केला. तो सार्वजनिक जीवनांतून निवृत्त झाला. ता. ९ एप्रिल १६२६ रोजीं त्याचा अंत झाला. त्याचें शव ऑलबन्स येथील सेंट मायकेल्स चर्चमध्यें पुरण्यांत आलें.

बेकनच्या निबंधांची पहिली आवृत्ति १५९७ सालीं प्रसिद्ध झाली. मूळ दहा निबंधाचे १६२५ सालच्या आवृत्तींत अठ्ठावन निबंध झाले. हे निबंध व्यवहारांतील अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयावरील आहेत. १६०५ सालीं प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें The Proficience and Advancement of Learning व Divine and Humane. बेकन हा प्रायोगिक संशोधनाच्या अर्वाचीन सांप्रदायाचा आद्यप्रवर्तक आहे असें आधुनिक शास्त्रज्ञ मानतात. मनुष्य हा निसर्गाचा दास व त्यांतील घडामोडींचा कार्यकारणसंबंध दाखवून विवरण करणारा आहे असें बेकनचें मत होतें. त्यानें स्कोमेनच्या निगमनात्मक विचारपद्धतीविरुद्ध (Deductive Method of reasoning) आपलें मत व्यक्त केलें; त्यानें १६२० सालीं Novum Organum हा ग्रंथ प्रसिद्ध केला. यांत त्यानें नीरीक्षित सृष्टचमत्कार (Phenomena), खऱ्या गोष्टीं यांचा अभ्यास कोणत्या विचारपद्धतीनें केला असतां ज्ञानप्राप्ति होईल याचें विवेचन मार्मिकपणें केलें आहे. "सृष्टींत पुष्कळ गूढ अद्यापिहि आहे. हें मानावयाला पुष्कळ सबळ कारणें आहेत; हीं गूढें उकललीं तर मनुष्याला त्यांचा पुष्कळ उपयोग होणार आहे. ज्ञानगोष्टीशीं या गूढांचा संबंध अथवा सादृश्य असणार नाहीं" असें बेकन म्हणतो. त्याचा New Atlantis हा ग्रंथ Novum Organum पूर्वींच लिहिला होता. पण तो १६२७ सालीं बेकनच्या निधनानंतर प्रसिद्ध झाला.

New Atlantis या ग्रंथांत त्यानें Solomon's House नांवची एक रूपक कथा सांगितली आहे. या कथेचें दुसरें नांव The College of six days work हें आहे. कांहीं गोष्टी निर्माण करण्याकरितां आपल्या ज्ञानाचा उपयोग करणारीं पुष्कळ माणसें नेमावयाचीं होतीं. त्याकरितां तयारी करावयाची होती, भट्टी, परफ्यूम हौस, इंजिन हौस अशासारखी साधनें जमवावयाचीं होतीं. या मंडळीपैकीं कांहींजण परदेशाला जाण्याकरितां जलपर्यटन करणार होतें; कांहीं जण नवीन प्रयोग करून पाहणार होते; बाकीचे मानवी जीवनाला उपयुक्त अशा वस्तू करण्यांत व ज्ञानांत भर टाकण्यांत गुंतणार होते. New Atlantis या ग्रंथांत

टेलीफोनवरील संदेशवाहनाची सोय होणार असल्याची अटकळ केली आहे.

बेकनच्या तात्त्विक विचारसरणीचा पगडा, इव्हेलिन रेन, बॉईल, वालिस व ओल्डन बर्ग इत्यादि तत्कालीन विद्वानांच्या मनांवर बसला होता, म्हणून बेकनच्या बेताला मूर्त स्वरूप देण्याकरतां सर्व उपाय व संधी त्यांनीं उपयोजिली.

बेकनचा De Augmentis Scientiarum हा ग्रंथ १६२३ सालीं प्रसिद्ध झाला. Advancement of Learning) या त्याच्या मूळ ग्रंथांतील विषयाचेंच यांत विस्तृत विवेचन केलें आहे. हा ग्रंथ लिहिण्यांत बेकन १६०५ पासून गढून गेला होता. या ग्रंथाविषयीं बेकन म्हणतो "A book I think will live and be a citizen of the world" (हा ग्रंथ अमर होऊन साऱ्या जगांत वाचला जाईल असा माझा समज आहे.) हा ग्रंथ म्हणजे बेकनच्या (Great Instauration) या पूर्ण झालेल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेसारखाच आहे. Novum Organum हा ग्रंथ सदर पूर्ण ग्रंथाचा दुसरा विभाग आहे; त्यांत प्रचलित मानवी ज्ञानाचा संक्षेपानें विचार करून त्यावर टीका कली आहे.

बेकन, रोजर (१२१४–९४):–आधुनिक शास्त्रज्ञानाचा ओनामा घालणारा, पदार्थविज्ञान व वैद्यक हीं शास्त्रें अवगत असणारा रोजर बेकन याचा जन्म १२१४ त इलचेस्टर येथें झाला. ऑक्सफर्ड व त्या काळांतल्या ज्ञानाचें माहेरघर म्हणून समजल्या जाणाऱ्या पॅरिस शहरीं त्याचें शिक्षण झालें. दृष्टिविषयक नियमांचें ज्ञान असल्यानें त्यानें महत्कारी कांच (Magnifying glass) शोधून काढली. बंदुकीची दारू कशी तयार करावी याची कला त्याला माहीत असून, इंद्रधनुष्याची कारणमीमासाहि त्यानें केली होती. समकालीन विद्वानांचा कोतेपणा व दांभिकपणा सहन न होऊन त्यानें स्वतःच शास्त्राच्या व भाषांच्या अभ्यासाला सुरवात केली. त्यानें एकंदर तीन ग्रंथ लिहिले. "शास्त्रज्ञानाला प्रयोगाची फारच जरूरी आहे. प्रयोगाशिवाय शास्त्रज्ञान लंगडें होय." हें स्वतःचें मत जोरानें पुढें मांडून त्यानें आधुनिक शास्त्रज्ञानाला सुरवात करून दिली. पण प्रयोगांचें महत्त्व जाणणाऱ्या ह्या विद्वान शास्त्रज्ञाला धार्मिक छळ सोसावा लागला. त्यावर जादूटोण्याचा आरोप होऊन त्याला तुरुंगांत टाकण्यांत आलें व त्याला आपले ग्रंथ प्रसिद्ध करण्याची बंदी करण्यांत आली. हे त्याचे ग्रंथ त्याच्या जन्मानंतर ७०० वर्षांनीं प्रसिद्ध झाले. यावरून भौतिकशास्त्राच्या वाढीस धर्म कसा आड आला हें उघड होईल. आधुनिक शास्त्रज्ञानाचें उगमस्थान असलेला रोजर बेकन १२९४ त मरण पावला.

बेचन:–बेचन अनेक प्रकारचें असतें व त्यावर बेरच कायद्याचें वाङ्मय झालें आहे. साधारण मानानें बेचनाचे तीन प्रकार आहेत. ऑर्डर चेकवर अगर दुसऱ्या कोणच्याही हुंडीच्या पाठीवर मालकानें नुसती सही केली असतां त्याला साधें बेचन म्हणतात. नुसत्या सहीनें ऑर्डर चेकचा साधा चेक होतो व तो तदनंतर सहीशिवाय हातोहात फिरूं शकतो. तीच गोष्ट इतर सर्व तऱ्हेच्या हुंड्यांची असते. विशिष्ट बेचन म्हणजे ज्याला ती हुंडी द्यावयाची आहे त्याला तिचा पैसा मिळावा म्हणून तसें घेणेकऱ्याच्या नांवानें शब्द लिहिले पाहिजेत व खालीं मालकानें सही करावी. या प्रकारच्या बेचनांत हुंडी पुन्हां घेणेकऱ्याच्या सहीशिवाय फिरूं शकत नाहीं. हुंडी देतांना त्याजबरोबर तीवरील मालकीहक्क जर बदलावयाचा असेल तर सही केल्याशिवाय तसें होणें शक्य नसतें. बंदी बेचनांत (Restrictive endorsement) मालक घेणेकऱ्याचें नांव लिहून पैसे फक्त त्यालाच द्यावें असें स्पष्ट वाक्य लिहितो. असें वाक्य बेचनांत लिहिलें असल्यास हुंडीचा पुढील मार्ग कुंठित होऊन बँकेकडून घेणेकऱ्याचे पैसे मिळण्यापुरताच त्याचा उपयोग होतो. बनावट बेचन होण्याचा संभव हुंडी चोरीस गेली असल्यास बराच असतो. चोरलेली हुंडी जर नवीन सहीशिवाय फिरणारी नसेल तर चोर बहुधा खऱ्या मालकाची बनावट सही करून तिचा उपयोग करील. चोरानें एकदां हुंडीवर बनावट सही केली कीं तिचें पैशासारखे असणारे गुणधर्म तावडतोब नाहींसे होतात व पुढें ती हुंडी जरी एकाद्या प्रामाणिक माणसाच्या हातांत गेली तरी त्याला तिच्यावर मालकी हक्क मिळत नाहींत. त्याचें कारण असें कीं बनावट सहीनें हुंडीचें हुंडीपण कायद्यानें नाहींसें होतें. सहीची जरुरी नसलेला चेक अगर एकादी त्यासारखी हुंडी चोरीस गेली व ती कोणत्याही शहाजोग माणसाच्या हातीं प्रामाणिकपणें आली तर माल तसें होत नाहीं. त्यांच्यावर चोरीच्या आधीं झालेल्या सह्या खऱ्या असतात. बनावट असत नाहींत.

म्हणून मध्यें झालेल्या चोरीमुळें त्याचे आंगचे गुण-धर्मास कोणताच बाध येत नाहीं. पहिल्या तीन प्रकारच्या बेचनाचे नमुने खालीं दिले आहेत. ते—

बेचन लेखाचे प्रकार-सर्वसाधारण-फक्त सही बेचन देणाराची. विशिष्ट-अमक्यास अगर त्याच्या मागणीप्रमाणें द्या; बंदी-अमक्यासच फक्त द्या; अटीचा-माझा संबंध न मानतां अमक्यास द्या. यापैकीं कोणत्याही शेऱ्यानंतर बेचन देणारानें हुंडीचे पाठीवर शेरा लिहून सही करावयाची असते.

बेझंट, ॲनी (१८४७-१९३३):-नॅशनल होमरूल लीग व थिऑसॉफिकल सोसायटी या संस्थांच्या अध्यक्ष. अनेक विषयांमधील व्याख्यात्री. वुड कुटुंबांत लंडनमध्यें १ आक्टोबर १८४७ ला यांचा जन्म झाला. ॲनी बिझांट यांचा रेव्ह. फ्रँक बिझांट यांच्याशीं १८६७ ला विवाह झाला. ख्रिस्ती धर्मावर यांचा विश्वास नसल्यामुळें नवऱ्याचें व यांचें पटेना. म्हणून १८७३त काडीमोड करून घेऊन त्या स्वतंत्र राहूं लागल्या. यावेळीं आर्थिक टंचाईमुळें त्यांचे अति हाल झाले. पुढें ब्रॅड्‌ला या नास्तिक पुढाऱ्याशीं त्यांची मैत्री जमली. ब्रॅड्‌लांचीं मतें त्यांना पटल्यामुळें त्या १८७४त नॅशनल सेक्युलर सोसायटी या संस्थेच्या सभासद झाल्या. कांहीं वर्षें त्यांनीं ब्रॅड्‌ला यांच्याशीं सहकारितेनें काम केल्यावर त्यांच्या सोसायटीचें व त्यांच्या नास्तिक वादाचें पुढारीपण बिझांटबाईंच्याकडेहि आलें. तें १३।१४ वर्षें त्यांच्याकडेच होतें. सार्वजनिक कामाचें शिक्षण बाईंना ब्रॅड्‌ला यांच्याकडूनच मिळालें. जगाला बिझांटबाई नास्तिकवादाची शिकवण १८८९पर्यंत देत होत्या. यानंतर मॅडॅम ब्लॅव्हॅटस्की यांच्याशीं त्यांचा परिचय झाला. आजपर्यंत ज्या ज्ञानाची तळमळ त्यांना लागली होती तें ज्ञान ब्लॅव्हॅटस्की यांच्याकडून त्यांस मिळूं लागलें. त्यांचें इप्सित प्राप्त होण्याचा रंग दिसूं लागल्यामुळें त्या थिऑसॉफिकल सोसायटीच्या सभासद ९ मे १८८९ पासून झाल्या. पण यामुळें त्यांना अतिशय त्रास सहन करावा लागला. १६ नोव्हेंबर १८९३ ला त्या हिंदुस्थानांत आल्या. १९०७ पासून १९२८ पर्यंत त्या थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष होत्या. यांनीं १८९८ त बनारस सेंट्रल हिंदु कॉलेज स्थापिलें. तसेंच बनारसच्या हिंदु गर्ल्स स्कूलची स्थापना १९०४ मध्यें केली. त्यांना बनारस विश्वविद्यालयाकडून डी. एल्. (ऑनर्स) ची पदवी मिळाली. कलकत्त्यास भरलेल्या कॉंग्रेसच्या त्या १९१७-१८ मध्यें अध्यक्ष होत्या. यांनीं १९०९ मध्यें कृष्णमूर्तींच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. त्या युरोपियन असल्यामुळें त्यांच्या हेतूबद्दल लोकांना जबर शंका येत. अशाच एका शंकेतून कृष्णमूर्तींच्या पायीं त्यांच्यावर १९१२त खटला सुरू झाला. पण त्याचा निकाल अखेर बिझांटबाईंच्यासारखा १९१४ च्या मे मध्यें लागला. थिऑसॉफिकल सोसायटीची चळवळ त्यांनीं साऱ्या जगभर केली. याशिवाय सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादि क्षेत्रांतहि त्यांनीं नांव राहण्यासारखें कार्य केलें. यांनीं लिहिलेल्या प्रमुख अशा पुस्तकांचा आंकडा ३२६ पर्यंत आहे. जागतिक बंधुभाव वाढावा अशी इच्छा करून त्याप्रीत्यर्थ जगभर चळवळ करणाऱ्या या बाईंचा अंत अड्यार येथें २०-९-१९३३ ला झाला.

बेझवाडा:-मद्रास इलाख्यांतील तांदळाच्या निर्मितीचें प्रमुख ठिकाण. हें गांव निजाम स्टे. रेल्वे व सदर्न मराठा रेल्वे यांचें जंक्शन आहे. बेझवाडा कृष्णाकांठीं वसलेला असून तेथें मोठा व्यापार चालतो. या ठिकाणचीं बुद्धलेणीं व हिंदु देवालयें पाहण्यासारखीं आहेत. येथें बरेच जिन प्रेस व तांदळाच्या गिरण्या आहेत. मद्रास प्रांतामधल्या कृष्णा जिल्ह्यांतील एका तालुक्याचें मुख्य ठिकाण असून येथील तांदळाची प्रसिद्धी चोहोंकडे झाली आहे.

बेन्जामीन डिझरॅली, अर्ल ऑफ बीकन्सफील्ड (१८०४-१८८१):-हा सुप्रसिद्ध इंग्रज मुत्सद्दी व कादंबरीकार सन १८०४ मध्यें लंडन शहरीं जन्मला. तो ज्यू घराण्यांतील असून, आयझॅक डिझरॅलीचा वडील मुलगा.

त्याचें शिक्षण प्रथमतः एका खासगी शाळेंत झालें. त्यानें वकीलीचा व्यवसाय करावा या हेतूनें त्याला शिक्षण देण्यास सुरवात केली. पण त्याची वाङ्मयाची आवड पाहून त्याच्या कलाप्रमाणें वाङ्मयाचा अभ्यास करण्याला त्याला मुभा देण्यांत आली. १८२६ सालीं Vivian Grey ही त्याची पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली. त्यानंतर त्यानें इटली, ग्रीस, तुर्कस्थान, सीरीया वगैरे देशांत कांहीं काल प्रवास केला. या प्रवासांतील अनुभवाचा त्यानें ग्रन्थलेखनांत भरपूर उपयोग करून घेतला. त्यानें आपल्या बापाला व बहिणीला लिहिलेल्या पत्रांत आपल्या प्रवासाची माहिती

व त्यांत आपल्याला आलेले अनुभव कथन केलेले आहेत. १८३१ सालीं त्याची The Young Duks हीं कादंबरी प्रसिद्ध झाली. त्यानंतर थोड्या अवधीनें त्यानें पुढील ग्रंथ प्रकाशिले:––Contarini Fleming; Alroy; Henrietta Temple; Vernetia; The Revolutionary Epic (काव्य).

त्याच्या राजकीय मतांत हळू हळू स्थित्यंतरें होत गेलीं. १८३७ सालीं तो हाऊस ऑफ कामन्समध्यें शिरला. त्याच्या पार्लमेंटमधील पहिल्या भाषणाचे वेळीं त्याची हुर्यो झाली; पण त्यानें आपलें भाषण शेवटपर्यंत केलें व सर्वांना, 'एक वेळ अशी येईल कीं माझें भाषण सर्वजण ऐकतील' अशी भविष्यवाणी ऐकविली. पार्लमेंटमध्यें प्रारंभीं त्यानें पीलला मदत केली; परंतु कॉर्न लॉ रद्द करण्याविषयीं पील वचनबद्ध झाल्यावर डिझरॅलीसंरक्षणवाद्यांचा तो पुढारी झाला. याच वेळीं 'तरुण इंग्लंड' या पक्षाचें त्यानें नेतृत्व पतकरिलें. फ्यूडॅलिझमचा (लष्करी नोकरीकरितां जहागिरी देण्याचें तत्त्व) कट्टा पुरस्कार हें या पक्षाचें वैशिष्टय. सन १८४४ व सन १८४५ या सालीं अनुक्रमें प्रसिद्ध झालेल्या त्याच्या Coningsby व Sybil या कादंबऱ्यांत त्याची ही वृत्ति दिसून येते.

१८४७ सालीं Hughendenची बकिंगहॅमशायर परगण्यांतील जाहगीर मिळाल्यावर त्या परगण्यातर्फे तो निवडून आला. १८५२ सालीं तो प्रथमतःच अधिकारारूढ झाला. लॉर्ड डर्बीच्या हाताखालीं त्याची कोशाध्यक्ष्याच्या जागीं नेमणूक झाली. पुढील वर्षी त्याच्या मंत्रिमंडळाचा पराभव झाला. १८५८पर्यंत तो अधिकारारूढ नव्हता. १८५८ सालीं पुनः कोशाध्यक्ष झाला. त्यानें सुधारणांचें बिल आणल्यामुळें मंत्रिमंडळ गडगडलें. पामरस्टन मुख्य प्रधान असतांना डिझरॅली विरोधी पक्षाचा नेता होता. त्या नात्यानें त्यानें आपली कामगिरी मोठ्या धैर्यानें बजावली. ती कोणाच्याहि डोळ्यांत भरण्यासारखी आहे.

१८६६ सालीं लिबरल्सनीं राजीनामा दिला. डर्बी व डिझरॅली अधिकारारूढ झाले. डिझरॅली पुनः चन्सेलर झाला. त्या दोघांनीं Household Suffrage तत्त्वावर एक बिल आणलें. तें बऱ्याचशा विरोधानंतर पास झालें.

१८६८ सालीं तो मुख्य मंत्री झाला. परंतु त्याची ही कारकीर्द अल्पजीवि झाली. १८७४ सालीं पुनः मुख्यमंत्री झाला; यावेळीं हुजूरपक्षाच्या बहुमताचें पाठबळ त्याला मिळालें; तो सहा वर्षे मुख्य मंत्रीपदावर होता. हा सहा वर्षांचा काळ त्याच्या आयुष्यांत अत्यंत महत्त्वाचा आहे; १८७६ सालीं अर्ल ऑफ बीकन्सफील्ड ही पदवी मिळाली व १८७८त बर्लिनच्या तहाच्या बाबतींत त्यानें महत्त्वाची कामगिरी प्रामुख्यानें केली. सुएझच्या कॅनॉलवर ब्रिटिशांची सत्ता यानेंच स्थापिली.


१८८० सालीं पार्लमेंट बरखास्त झाल्यावर नवीन निवडणुकीनंतर पार्लमेंटमध्यें लिबरल्स्चें प्रचंड मताधिक्य झाले; त्यानें राजिनामा दिला. तो १८८१ मध्यें सालीं निधन पावला. मृत्यूपूर्वी थोड्या महिन्यांत त्यानें Endymion ही आपली कादंबरी प्रकाशिली. यावरून या उतार वयांतहि त्याच्या बुद्धीची तीव्रता कमी झाली नव्हती असें दिसून येतें.

बेडन पॉवेल ऑफ गिलवेल, पहिला बॅरन सर राबर्ट स्टिफेनसन स्मिथ (१८५७– :–

या ब्रिटिश योद्ध्याचें शिक्षण चॅर्टर हाऊस स्कूलमध्यें झालें. तो १८७६ झालीं सैन्यांत शिरला व १८९६–९७ च्या मेटेबेल वॉर (Mota bele war) मध्यें त्यानें चांगलें नांव मिळविलें. १८९९ सालीं दक्षिण आफ्रिकेंतील युद्धाला सुरवात झाली; तेव्हां मेफकिंग (Mafeking) येथील वेढ्यांत तो सांपडला. हा वेढा त्यानें सात महिने लढविला. शेवटीं त्याची सुटका झाली. पुढें त्याला दक्षिण आफ्रिकेंतील सर्व शिपायांचा प्रमुख करण्यांत आलें. १९०३ सालीं तो युनायटेड किंगडम मधील घोडदळाचा इन्स्पेक्टर जनरल झाला. अवलोकन व स्काऊटिंग यांतच बेडन पॅविल याची लष्करी योग्यता सामावलेली आहे.

१९०८ सालीं त्यानें ग्रेट ब्रिटनमध्यें बालवीरांची (Boy Scouts) स्थापना केली. तो स्वतः चीफ स्काऊट झाला. बेडन पॉवेल यांना १९०९ सालीं 'सर' ही पदवी देण्यांत आली. १९२१ च्या जानेवारींत त्यांना बॅरोनेट ही पदवी मिळाली. यांची ही बॉयस्काऊटची चळवळ सर्व ब्रिटिश साम्राज्यभर पसरली आहे.

बेडूकः–ड्रॉव ड्रॉव असे आवाज करीत असलेले बेडूक नदीच्या, ओढ्याच्या किंवा विहिरीच्या काठीं पाहावयास मिळतात. पावसाळ्याच्या दिवसांत तर हे बेडूक घरांतहि क्वचित् प्रसंगीं येतात. बेडकाच्या २०० जाती आहेत. या सर्वांचा आकार सारखा असला तरी रंगांत



अंड्यापासून पूर्ण बेडूक बनेपर्यंतची बेडकाची वेगवेगळीं स्थित्यंतरें कशीं होतात हे यांत अंकांनीं दाखविले आहे.

फरक असतो. बेडकाच्या जिभेचा बुडखा तोंडाच्या पुढच्या भागांत असतो व वरच्या जबड्यांत दांत असतात. बेडकाचे मागचे पाय दुमडलेले असतात व उडी मारतांना ते ताणाले म्हणजे लांब होतात. पायांना चार चार बोटे असतात. बेडकाचें खाद्य म्हणजे लहानसान किडे व माशा हें आहे. बेडकाला तोंडानेंच श्वासोच्छ्वास करावा लागतो व त्यासाठीं त्याला वारंवार तोंडाची उघडझांप करावी लागते. त्यानें सारखें तोंड उघडे ठेवलें तर तो गुदमरून मरून जाईल. बेडकाला बरगड्या नसतात.

बेनामी व्यवहारः—बेनामी हा शब्द 'बे' म्हणजे 'विना' व 'नाम' म्हणजे 'नांव' या दोन शब्दांनीं मिळून बनलेला फारशी भाषेंतील सामासिक शब्द आहे. या शब्दाचा अक्षरशः अर्थ नांवाविना असा आहे. आपल्या नांवाचा उपयोग न करतां दुसऱ्याच्या नांवें केलेल्या व्यवहाराला हा शब्द योजितात. एखादा मनुष्य आपल्या पैशानें पण दुसऱ्याच्या नांवानें एखादी मिळकत खरेदी करतो अथवा स्वतःच्या नांवानें खरेदी करून पुढें ती दुसऱ्याच्या नांवें तबदील करून देतो, मात्र असें करण्यांत त्या दुसऱ्या मनुष्याचा फायदा व्हावा असा त्याचा हेतु नसतो, तेव्हां त्या व्यवहाराला बेनामी व्यवहार म्हणतात. ज्याच्या नांवें तो व्यवहार केलेला असतो त्याला "बेनामीदार" म्हणतात. बेनामी व्यवहार हे एका व्यक्तीनें दुसरीच्या नांवें केलेल्या खरेदीच्या व्यवहारापुरते मर्यादित नसतात. स्वतःच्या नांवें मिळकत खरेदी करून दुसऱ्याला ती खोटा मोबदला दाखवून गहाण दिली असतांहि बेनामी व्यवहार होतो.

बेनामी व्यवहार करण्याची प्रथा हिंदु व मुसलमान या दोन जमातींमध्यें पूर्वीपासून आहे. ही प्रथा सुरू होण्याला, कांहीं व्यक्ति व नांवें भाग्यवान असतात व कांहीं भाग्यहीन असतात, म्हणून भाग्यवानाच्या नांवें व्यवहार करावा ही धर्मभोळी समजूत कारणीभूत झाली असावी; अथवा कौटुंबिक बाबी समाजाच्या दृष्टीपासून लपवून ठेवाव्यात ही व्यावहारिक इच्छा या प्रथेच्या बुडाशीं असावी. पुष्कळ वेळां फसविण्याच्या हेतूनेंहि बेनामी व्यवहार केलेले आढळतात.

बेनामी व्यवहार कायद्यानें निषिद्ध मानले नाहींत. उदाहरणार्थ 'अ' नें 'ब'च्या नांवें मिळकत विकत घेतली तर गुन्हा होत नाहीं. इतकेंच नव्हे तर 'ब' जर ती मिळकत आपलीच म्हणूं लागेल तर 'अ' 'ब' वर ती आपल्या मालकीची असल्याचें ठरून मिळावें व मिळकत आपल्या ताब्यांत मिळावी म्हणून दावा आणूं शकेल व त्या दाव्यांत ती मिळकत खरेदी करण्याला 'अ' नें पैसे दिले एवढें सिद्ध झालें म्हणजे 'अ' त्या मिळकतीचा खरा मालक आहे व 'ब' नें

ती मिळकत 'अ'च्या ताब्यांत द्यावी असा हुकूमनामा कोर्ट करील. तात्पर्य काय कीं एखादा व्यवहार बेनामी आहे असें सिद्ध झालें म्हणजे ज्यानें पैसे दिले त्याला मालक मानावयाचें, ज्याच्या नांवें व्यवहार झाला त्याला नव्हे. या ठिकाणीं 'चकाकतें तें सर्व सोनें नव्हे' व 'दिसतें तसें नसतें' या म्हणी बेनामीदाराच्या बाबतींत तंतोतंत लागू पडतात. बेनामीदार हा दिसतो मालकासारखा पण असतो परका.

हा झाला सामान्य नियम. याला कांहीं अपवाद आहेत. पुढें दिलेल्या बाबतींत बेनामीदारालाच खरा मालक मानावयाचें असा कायदा आहेः—

(१) कोर्टाच्या हुकूमनाम्याच्या अन्वयें अथवा सरकारधाऱ्याची थकलेली बाकी वसूल करण्याकरितां विक्रीस निघालेली मिळकत बेनामी खरेदी घेतली, व बेनामीदाराला विक्रयदाखला (Certificate of Sale) मिळाला असतां बेनामीदारावर पैसे देणाऱ्या खऱ्या मालकाचा मिळकतीचा ताबा मिळविण्याकरितां दावा चालूं शकत नाहीं.

(२) एखाद्या बेनामीदारानें आपल्या ताब्यांत बेनामी व्यहारानें आलेली मिळकत दुसऱ्याला खरेदी, गहाण अगर अन्य प्रकारें मोबदला घेऊन खऱ्या मालकाला न कळवितां तबदील करून दिली व ती घेणाऱ्याला ती देणारा केवळ बेनामीदार आहे हें माहीत नसेल तर खरा मालक तो तबदीलीचा व्यवहार रद्द करून घेऊं शकत नाहीं.

(३) धनकोना फसविण्याच्या खास हेतूनें एखादी मिळकत दुसऱ्याच्या नांवें लबाडीनें करून ठेविली असून तो हेतू प्रत्यक्ष तडीस गेलेला असेल तर त्या मिळकतीचा खरा मालक त्या मिळकतीचा ताबा बेनामीदाराकडून परत मिळवूं शकत नाहीं. परंतु धनकोला फसविण्याचा हेतू तडीस गेलेला नसेल तर, खरा मालक त्या मिळकतीचा कबजा बेनामीदाराकडून मिळवूं शकेल.

(४) एखाद्याला आपल्या नांवें मिळकत खरेदी घेण्याला तसें करणें सार्वजनिक धोरणाच्या विरुद्ध होतें म्हणून कायद्यानें मनाई असतां तो दुसऱ्याच्या नांवें एखादी मिळकत घेईल तर त्याला बेनामीदाराकडून ती मिळकत आपल्या ताब्यांत घेतां येणार नाहीं.

बेंद्रे, वासुदेव सीताराम (१८९६–):— इतिहास संशोधक व 'श्रीछत्रपति संभाजीचरित्रकार्यालय लि. पुणें' या संस्थेचें चालक. यांचा जन्म १८९६ त होऊन शिक्षण पेण व मुंबई येथें आटोपलें. यांना रिपोर्टिंगच्या चढाओढींत, (१९१४ व १९१६ च्या), या देशांतून व परदेशांतून अनेक शिफारस पत्रें, रौप्य व सुवर्ण पदकें मिळालीं. शीघ्रध्वनिलेखनांवर यांनीं मराठी शॉर्टहँड व गुजराथी शॉर्टहँड व 'स्टेनॉग्राफी फॉर इंडिया' अशीं तीन पुस्तकें लिहिलीं आहेत. याशिवाय १९१९ पासून यांचें इतिहास संशोधनाचें कार्य चालूं आहेच. साधनचिकित्सा, राजाराम चरितम् व अब्दुल्ला ॲण्ड अबुल हसन कुतुबशहा यांसारखीं पुस्तकें व इतरहि निबंध प्रसिद्धले. 'साधनचिकित्सा' या ग्रंथावरून श्रीशंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनीं त्यास 'इतिहासभूषण' ही पदवी बहाल केली. १९३२ मध्यें 'श्रीछत्रपति संभाजीचरित्रकार्यालय लि. पुणें' संस्थेचें हे कायमचें 'मुख्य संपादक' बनलें. हे डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या कचेरींत नोकरी करतात. सध्यां हे सरकारची शिष्यवृत्ती घेऊन इंडिया ऑफिसांतील ऐतिहासिक कागदपत्रांचा अभ्यास करण्यासाठीं लंडनला गेले आहेत.

बेरिबेरी (Beriberi):—पाण्यांत विरघळणाऱ्या 'बी' व्हिटॅमिन् नामक एका जीवनसत्त्वाचा पुरवठा अन्नांत नसला म्हणजे हा विकार उद्भवतो. या विकाराचें योग्य कारण आतां ठाऊक झाल्यानें त्यास आतां शास्त्रोक्त पद्धतीनें आळा घालण्यांत येत आहे. पूर्वी या विकाराचा प्रसार आशिया खंडांत अनेक जागीं आढळत असे. या विकाराचीं लक्षणें नानाविध असूं शकतात. कित्येक रोग्यांत हात व पाय यांच्या स्नायूंना दुर्बलता येऊन संवेदनाशक्तीहि नाहींशी होत असते. तंगड्यांचे स्नायु बारीक होऊन ते दाबल्यास भयंकर वेदना होतात. पायांची शक्ति नष्ट झाल्यानें चालतांना रोग्याचा तोल जातो आणि थोड्याशा श्रमानेंहि दम लागून त्यास थकवा येतो. हृदयक्रिया फार जलद चालते. आवाज खोल जातो व केव्हांकेव्हां अजिबात बसतोहि.

बेरिबेरीच्या दुसऱ्या प्रकारांत हात, मांड्या व तंगड्या सुजतात; रोग्याच्या श्वसनक्रियेस अडचण असते. हृदय जलद चालतें. पेंढऱ्यांचे स्नायु दाबल्यास फार दुखतात. ताप नसतो. जीभ स्वच्छ असते, पण केव्हां जुलाब तर केव्हां बद्धकोष्ठता हीं आढळतात.

अंगांतील मज्जातंतूच्या दाहामुळेंच बेरिबेरीचीं हीं विविध लक्षणें घडतात. स्नायूंचा ताबा नष्ट होतो, कळा येतात, व रुधिराभिसरणाच्या स्नायूंवरचा ताबा नष्ट झाल्यानें सूजहि उद्भवते.

कारणें–अतिशय शुभ्र केलेले असे कोंडा नसलेले तांदूळ खाण्यांत आल्याने हा विकार होतो. तांदळाच्या वरलें तांबूस वर्णाचें जें पातळ कवच असतें त्यांत 'बी' जीवनद्रव्य असतें. तांदूळ फार भरडल्यानें किंवा फार सडल्यानें हें कवच नाहींसें होतें व अर्थातच 'बी' व्हिटॅमिन्‌चा पुरवठा नष्ट होतो व जीवनास आवश्यक असलेल्या या द्रव्याच्या उणीवेमुळें 'बेरिबेरी' हा विकार उद्भवतो. पावट्यांत व कित्येक भाजीपाल्यांतहि हें जीवनसत्त्व आढळत असल्यानें आहारांत हे जिन्नस असल्यास विकार तितका उद्भवणार नाहीं. आईच्या आहारांत हें जीवन-सत्त्व नसल्यास अंगावर पिणाऱ्या मुलासहि बरोबेरी विकार होत असतो. अशा मुलास झोंप येत नाहीं. तें फार किंचाळतें व बालग्रहाची फीट् येऊन तींतच त्याचा अंत होण्याची भीति असते. **उपाय**–प्रतिबंधक उपाय या दृष्टीनें तांदूळ फार न सडतांच वापरावेत; शुभ्र तांदूळ वापरूं नयेत. तांदूळ फार शुभ्र करण्याची पद्धत अहितकारक अस-ल्यानें अगदीं सोडून दिली पाहिजे. तांदळाच्या तांबुस कोंड्याचें महत्त्व सर्व अज्ञजनांस पटवून दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें इतरहि भाजीपाले, पावटे वगैरे जिन्नस आहारांत उपयोगांत आणावेत.

रोगाचीं लक्षणें दिसूं लागतांच त्यावर उपाय ताबडतोब केला गेला तरच रोग बरा होऊं शकतो. पूर्ण विश्रांति, अंग रगडणें, पायास शेक देणें किंवा गार पाण्यांत व ऊन पाण्यांत क्रमानें पुनः पुनः पाय ठेवणें हे उपाय करावेत. एरंडेल अगर मॅग्नेशिआ-सारखें रेचक देऊन कोठा साफ ठेवणें चांगलें. जीवन-सत्त्वांचा पुरवठा करावा. 'यीस्ट' म्हणून जो पदार्थ मिळतो तो १ ते ४ चमचे घेऊन उकळल्या दुधांत मिसळून रुचकर करून भोजनांतीं घ्यावा. कच्चीं शिजवलेलीं अंडीं, ताजें दूध, पावटे, चणे, चवाळी, लिंबाचा रस व बाजारांत हल्लीं मिळत असलेलीं जीवनतत्त्वें हीं उपयोगांत आणावीत. रोगाचीं लक्षणें नाहींशीं झालीं तरी पुढेंहि बरेच दिवस हें पथ्य चालू ठेवणें आवश्यक असतें.


आयुर्वेदिक उपाय–तांदळाचा कोंडा घालून केलेली भाकरी खावयास घालावी. आहारांत वाटाणे व मांस यांचें प्रमाण अधिक असावें.

बेल, अलेक्झांडर ग्रॅहॅम (१८४७–१९२३):–हा स्कॉटिश–अमेरिकन शास्त्रज्ञ ३ मार्च १८४७ रोजीं एडिंबरो येथें जन्मला. त्याचें शिक्षण हायस्कूल व विद्यापीठ येथें होऊन त्यानें वैद्यक शास्त्रांतील पदवी घेतली. तो अमेरिकेंत स्थायिक झाला व बोस्टन विद्यापीठांत १८७२ सालीं वाचेचें इंद्रियविज्ञानशास्त्र या विषयाचा (Vocal phisiology) प्राध्यापक झाला. बहिऱ्या–मुक्यांच्या शिक्षणाबद्दल त्याला मोठी कळकळ. त्यानें या क्षेत्रांत केलेल्या संशोधनाची प्रसिद्धि बहिऱ्यांच्या प्रश्नाविषयींच्या ज्ञानाचा प्रसार लोकांत व्हावा या हेतूनें व्होल्टा ब्यूरो या संस्थेनें केली. ही संस्था त्यानें टेलिफोनच्या संशोधाबद्दल आपल्याला मिळालेल्या व्होल्टा प्राइझ या बक्षिसाच्या सहाय्यानें स्थापिली. त्याच्याच प्रेरणेवरून बहिऱ्यांना बोलावयास शिकविण्याकरितां १८९० सालीं The American Assocation for Teaching of speech to the Deaf ही संस्था स्थापण्यांत आली. बहिऱ्यांना दृश्यवाणी शिकविण्याच्या कामीं त्यानें आपल्या बापाशीं सहकार्य केलें. त्याच्या बापानें बहिऱ्यांना बोला-वयास शिकविण्याची एक पद्धति शोधून काढली होती. तिचाच उपयोग ते करित असत. बहि-ऱ्यांचा प्रश्न त्याच्या जीवनांतील प्रश्नांत अत्यंत महत्त्वाचा होता. सामन्यतः टेलिफोनचा संशोधक म्हणून तो ओळखला जातो. त्यानें आपल्या संशोधनाचें पेटंट मिळण्याबद्दल ज्या दिवशीं अर्ज केला त्याच दिवशीं एलिशा ग्रे यानेंहि तसलेंच पेटंट मिळण्याकरितां अर्ज केला होता. सदर प्रकरण न्याया-लयांत जाऊन शेवटीं पुष्कळ काळानें पेटंट देण्यांत आलें. सर्व प्रकारच्या शास्त्रांबद्दल त्याला आस्था होती; विशेषतः विमानविद्येची त्याला आवड होती.

बेलफळ:–या फळाचा उपयोग आमांशावर फारच चांगला होतो. काशीकडच्या बाजूस बेलफळें फार मोठीं असून रुचीलाही जास्त गोड असतात. हें फळ नुसतें खावयास चांगलें लागतेंच; पण तिकडच्या बाजूला याचें सरबत करून तें पिण्याचाही प्रघात आहे. **सरबत करण्याची पद्धत**–चार तोळे बेलफळाचा गीर पाण्यांत वाटून तो गाळावा व त्यांत थोडी

साखर घालावी. ह्या सरबतानें एकादा सौम्य जुलाब होऊन कोठा साफ होतो व उष्णता कमी होते.

बेलफळाचें आमांशावर औषध—चांगलें पिकलेलें १ बेलफळ घेऊन तें दुखवून फोफाट्यांत भाजत घालावें. तें भाजल्यावर त्यांतील गर काढून घ्यावा व त्यांत तूप-साखर घालून खाल्ल्यानें आमांश बरा होतो किंवा बेल-फळ वाळवून आंतील गराची पूडही तयार करून ठेव-तात व जरूरीप्रमाणें पूड, तूप, साखर घालून खातात.



ब्रुसेल्सच्या रस्त्यावरील फुलें विकणारी एक माळीण

बेल्जियम्—बेल्जियम् या नांवानें सांप्रत ओळखला जाणारा देश पूर्वी ज्यूलियस सीझरच्या कालीं गॉलचा एक भाग होता. तेथें बेल्जा नांवाच्या जातीचे लोक रहात असत. ही जात मिश्र असून साइयुस् व सिम्ब्रि-यनस् ह्या जाती यांच्या पूर्वज होत. मानवजातिशास्त्र-दृष्ट्या ते शुद्ध गॅलो-रोमन नाहींत. सीझरच्या ताब्यां-तील हा प्रदेश म्हणजे सीन नदीच्या उजव्या किनाऱ्या-पासून ऱ्हाइनचा डावा किनारा व समुद्र यापर्यंतचा प्रदेश. बॉल्ग या सेल्टिक शब्दापासून बेल्जा हें त्या जातीचें नांव पडलें आहे. बॉल्ग म्हणजे रानटी पशूंचें कातडें; म्हणजेच लोकर असलेली कातडी पांघरणारे लोक.


स्थान—हॉलंड, उत्तर समुद्र, फ्रान्स व जर्मन यांचेमध्यें हा देश आहे.


आकारमान—याची जास्तींत जास्त लांबी १६५ मैल व जास्तीत जास्त रुंदी १२० मैल आहे. क्षेत्र-फळ ११७७५ चौ. मैल आहे व लोकसंख्या ८,३३०,९५९ (डिसेंबर १९३६) आहे. हा देश खानदेशाऐवढा आहे. पण अतिशय दाट वस्तीचा आहे. राज्यव्यवस्थेकरितां याचें पुढीलप्रमाणें नऊ विभाग पाडले आहेतः—ॲन्टवर्प, ब्रॅबंट्, ईस्ट फ्लँडर्स, वेस्ट फ्लँडर्स, हायन्मऊट्, लीज, लिम्बर्ग, लुक्सेंबर्ग व नॅमूर. ब्रुसेल्स ही या देशाची राजधानी. ॲन्टवर्प्, घेन्ट् व लीज हीं दुसरीं महत्त्वाचीं शहरें.


स्वाभाविक रचना—पश्चिम विभाग हा इतर भागाहून अधिक मोठा व सुपीक आहे; तो समुद्र-सपाटीहून थोडासा उंच आहे. मध्यभाग व आग्नेये-कडील भाग हेहि सपाट आहेत; परंतु तें पठार सखलच आहे. परंतु दक्षिणेकडील विशेषतः नैर्ऋत्ये-कडील भाग चढउताराचा असून डोंगराळहि आहे. आर्डेन्सची सरासरी उंची ५०० फूट असून त्याचीं जास्तींत जास्त उंच शिखरें २००० फुटांहून थोडीशी जास्त उंच आहेत. हा देश सखल असल्यानें या देशांत बऱ्याच लढाया झाल्या. म्हणूनच या देशास युरोपची रणभूमी (Cock-pit of Europe) असें म्हणतात.


नद्या—देश जलसंपन्न आहे. पण तेथील शेल्ज (Scheldge) व म्यूज (Meuse) या नद्या अंशतः बेल्जियन आहेत; परंतु यांना मिळणाऱ्या नद्या पुष्कळ अंशीं बेल्जममध्येंच आहेत. त्यांत शेल्जला मिळणाऱ्या नद्या विशेष महत्त्वाच्या आहेत. त्या रुपेल, डेंडर् व लाइस (Lys) या होत. रुपेलचे नेथ, डाईल व सेन असे तीन फांटे झालेले आहेत. म्यूजला मिळणाऱ्या नद्या और्थ, सेंब्र, लेस व सेमॉईस या होत. या देशांत पन्नासाहून अधिक कालवे असून त्यांची लांबी १००० मैलाहून अधिक आहे. यांतील पांच काल्व्यांमधून जहाजें जाऊं शकतात. नद्यांच्या पाण्यांत स्वच्छ करण्याचा गुण विशेष असल्यामुळें या देशांतील तागाचें कापड पूर्वीपासून नामांकित आहे. येथील रेल्वेचे रस्ते अत्यंत जुने असून १९२९ सालीं त्यांची एकंदर लांबी ६४६४ मैल होती. कांहीं











बेल्जियम

१. न्यायमंदीर, ब्रुसेल्स. २. म्यूज नदीवरील एक दृश्य (आपल्या इकडच्या प्रमाणेंच नदीवर कपडे धुण्याची चाल त्यांच्यांतहि कशी आहे हें दिसून येईल.) ३. म्यूज नदीच्या खोऱ्यांतील एक रम्य खेडें. ४. हॉटेल डी व्हिलेचा मागचा भाग, ब्रुजेस. ५. आगखो एका खेड्याचें दृश्य (Quai Vent).

अपवाद सोडून बहुतेक रेल्वे सरकारच्या मालकीची आहे.

हवामान–हवा उत्तर फ्रान्सच्या हवेसारखी असून पाऊस उत्तर फ्रान्सांतल्या पेक्षां थोडा अधिक पडतो; पण हालंडांतल्या इतका पाऊस पडत नाहीं. उन्हाळ्यांत इंग्लंडांतल्यापेक्षां हवा उष्ण असते व हिवाळ्यांत थंडी अधिक कडाक्याची असते.

वनस्पति–देशाचा सुमारें एकषष्ठांश भाग अरण्यांनीं व्यापला आहे. त्यांत ओक वृक्ष विपुल असून त्या लाकडाचा इमारतीच्या कामीं उपयोग होतो. शिवाय यांच्या सालीचा कातडी कमावण्याच्या कामीं उपयोग होतो. अनेक टन साल परदेशीं पाठविण्यांत येते.

जमीन व पिकें–जमीन सुपीक असून उत्पन्न चांगलें येतें. फ्लँडर्स मधील जमीन विशेष सुपीक आहे. लिम्बर्ग व लुक्सेंबर्ग या प्रान्तांतील जमीन मोठ्या प्रमाणांत लागवडींत आणण्यांत येऊं लागली आहे. देशाचा सुमारें एकपंचमांश भाग लागवडीखालीं आणला असून देश शेतकीप्रधान आहे. खाणी, व्यापार व उत्पादक धंदे या सर्वांत मिळून जितके लोक गुंतलेले आहेत त्याहून अधिक लोक शेतीच्या व्यवसायांत गुंतले आहेत. गहू, राय व ओट्स हीं मुख्य धान्यें होत. बटाटे, बीट व ताग यांचेंहि पीक होतें.

उद्योगधंदे व कारखाने–बीटरूट्सची लागवड विपुल होत असल्यामुळें पुष्कळसे साखरेचे कारखाने निघाले आहेत. फुलांची मोठ्या प्रमाणांत लागवड हें ह्या देशाचें वैशिष्ट्य आहे. फळांची निपजहि हळू हळू वाढत चालली आहे. आर्डेन्स मधील जंगलाचें फळबागांत रूपान्तर करण्याकडे वाढती प्रवृत्ति आहे; पाईन व फर यांच्या ऐवजीं ॲपल, पीअर व प्लम यांची लागवड करण्यांत येऊं लागली आहे. बेल्जियम जरी कृषिप्रधान देश असला तरी त्याच्या उत्कर्षाला शेतीप्रमाणेंच इतर उद्योगधंदेहि कारणीभूत आहेत. तेथें कोळशाच्या खाणी असून त्यांतून निघणारा कोळसा देशाच्या औद्योगिक गरजा भागून उरतो. बेलजियमची खनिज संपत्ति बहुमोल आहे. ती विशेषतः हाइनाऊट, लीज, नामूर व लुक्सेंबर्ग या प्रांतांत आहे. लोखंड, शिसें, जस्त, कोळसा व मँगेनीज ही बेल्जियमची खनीज संपत्ति होय. विशेषतः लोखंड व दगडी कोळसा हे अतिशय महत्त्वाचे खनिज पदार्थ होत. बेल्जियममध्यें चांगल्या प्रकारच्या पक्क्या मालाची पैदास होते. येथें निर्माण होणाऱ्या जिनसांत ताग, कापूस, लोकर, धातू व कमावलेली कातडी यांच्यापासून होणाऱ्या जिनसांचें प्रमाण मोठें आहे. फ्लँडर्स हें तागाच्या कापडाच्या धंद्याचें केंद्र आहे. हाइनाऊट प्रान्तांतील टौर्नाई इत्यादि शहरांत गालीचे, पडदे व फर्निचर यांचे मोठे कारखाने आहेत. ब्रुसेल्स व ब्रॅबंट प्रान्तांत कापड तयार होतें. ब्रुसेल्सचा व्यापार मोठ्या प्रमाणावर असून वाढता आहे. याप्रमाणें हा देश कारखान्यांविषयीं प्रसिद्ध आहे. कारखान्यांच्या गर्दीमुळें शहरें इतकीं जवळजवळ आहेत कीं, 'हा देश म्हणजे एकच प्रचंड शहर आहे' असें एका प्रवाशानें त्याचें वर्णन केलें आहे. आगगाडींतून प्रवास करतांना कोठेंहि खिडकींतून डोकें बाहेर काढावें तों गिरणी दृष्टीस पडते.

भाषा व वाङ्मयः–वालून लोक फ्रेंच भाषा व फ्लेमिश लोक फ्लेमिश भाषा बोलतात. ही भाषा साधारणतः डच भाषेसारखी आहे. फ्लेमिश लोक इतर जमातीपेक्षां संख्येनें अधिक असून देशांतल्या इतर कोणत्याहि भागापेक्षां लोकसंख्येची वाढ त्यांच्यांत अधिक झपाट्यानें होते. सरकारी नोकरीकरितां दोन्ही भाषांचें ज्ञान आवश्यक आहे.

बेल्जियममधील दोन्ही वंशाच्या लोकांचें अफाट वाङ्मय असून त्यांना आपल्या वाङ्मयाचा यथायोग्य अभिमान आहे. बेल्जियन् क्रान्तीनंतर मोठी वाङ्मयविषयक चळवळ झाली. तींत फ्लेमिश लोक अग्रभागीं होते. हेंड्रिक कॉनशन्स या कादंबरीकारानें अनेक ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. त्याला सर वॉल्टर स्कॉट्पासून स्फूर्ति मिळाली. त्याची 'लायन ऑफ फ्लँडर्स' ही कादंबरी अत्यंत लोकप्रिय आहे. ह्या कादंबरीला फ्लेमिश बायबल मानतात. असें एक घर त्या देशांत नाहीं कीं जेथें ही कादंबरी दिसत नाहीं. कॅरेल लॅजगॅक हा कवि म्हणजे फ्लँडर्सचा बायरन होय. त्याची Odes to Bruges, The Three Sister Cities हीं कवनें लोकप्रिय आहेत. याच्याशिवाय जॅन व्हॅन बीअर्स हा कवि, जॅन थिओडूर रिसविक्, पॉल डी मॉंट, रोझॅली लव्हलिंग व व्हर्जिनी लव्हलिंग या दोन भगिनी, हे कादंबरीकार अशा सारस्वतांनीं एकोणिसाव्या शतकांत फ्लेमिश वाङ्मयांत बहुमोल भर घातली आहे. मॉरिस मॅटरलिंक व एमिली वरहॅरेन

या प्रतिभासंपन्न सारस्वतांनीं फ्लेमिश वाङ्मयाची उज्वल परंपरा राखिली आहे. परंतु त्यांचें लिखाण फ्रेंच भाषेत झालें आहे.

वाल्न लोकांची वाङ्मयविषयक चळवळ थोडी उशीरा सुरू झाली. याचें कारण स्वाभाविकच आहे. एक तर त्यांची भाषा फ्रेंच असल्यामुळें आधींच समृद्ध असलेल्या फ्रेंच वाङ्मयांत भर घालण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाहीं. दुसरें असें कीं त्यांची फ्लेमिश लोकांप्रमाणें आत्मप्रगटीकरणाची प्रवृत्ति नव्हती. फ्लेमिश लोकांच्या राजकीय व वाङ्मयीन क्षेत्रांतील चळवळीपैकीं निम्या; फ्लेमिश लोक व त्यांची भाषा ही मृत नसून जिवंत आहेत हें सिद्ध करण्याकरितां झाल्या. फ्लेमिश लोकांनीं जणूं काय वाल्न लोकांना आव्हान दिलें. "हें पहा आमचें वाङ्मय! तुमचें कुठें आहे?" ह्या आव्हानाचा स्वीकार करूनच कीं काय एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकांत वाल्न्स कवींनीं झपाट्यानें काव्यनिर्मिती केली. ए गिरॉड्, आय गिलकिन्, अलबर्ट मॉकेल व एफ् सेव्हरीन हे पहिल्या प्रतीचे फ्लेमिश कवि आहेत. गद्य लेखकांच्या अग्रभागीं ए. सी. व्हॅन हॅसेट, चायनाय व मॉरीस विलमॉट हे चमकतात. कॅमिल लेमॉनीर व जार्जेस रॉडेंबॅच यांचें वाङ्मय अभिजात वाङ्मयांत मोडतें. अशा प्रकारें बेलजियममधील दोन्ही वंशांनीं अर्वाचीन काळीं प्रचंड प्रमाणावर प्रभावी वाङ्मयनिर्मिती केली.

शिक्षण, धर्म व न्याय–शिक्षण मोफत व सक्तीचें आहे. तात्विक व व्यावहारिक या दोन्ही प्रकारचें शिक्षण दिलें जातें. शाळांचे प्राथमिक, दुय्यम व उच्च असे तीन प्रकार आहेत. धर्माचीं मूलतत्त्वें शाळांत शिकविलीं जातात. याबाबतचा खर्च सरकार व तेथील कम्यून्स (म्युनिसिपालिटी) यांच्याकडून सारख्या प्रमाणांत सोसला जातो. एकंदर कम्यून्स सुमारें २६३२ आहेत. प्रत्येक कम्यूनची निदान एक तरी प्राथमिक शाळा असावी असा कायदा आहे. उच्चशिक्षणाच्या २४ शाळा व १३ कॉलेजें आहेत. लाउव्हेन्, लीज, घेंट व ब्रुसेल्स हीं चार विद्यापीठें आहेत. लाऊव्हेन येथें धर्मशास्त्र व कृषिशास्त्र तर घेन्ट विद्यापीठांत सिव्हिल इन्जिनीयरींग, लीज विद्यापीठांत खाणींचें शास्त्र व इलेक्ट्रिक इन्जिनीयरिंग व ब्रुसेल्स विद्यापीठांत समाजशास्त्र व राजशास्त्र हे विषय प्रामुख्यानें शिकविले जातात. घेन्ट व लीज हीं सरकारी विद्यापीठें असून बाकीचीं दोन स्वतंत्र आहेत. अॅन्टवर्प येथें व्यापारी शिक्षण देणारें एक कॉलेज असून त्या विषयाच्या शिक्षणाच्या बाबत त्याला एका विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. सरकारकडून संगीतादि ललितकलांना उत्तेजन मिळतें. अॅन्टवर्प येथें एक कलामंदिर असून ब्रुसेल्समध्यें एक संगीत शाळा आहे.

देशांतील लोक ख्रिस्ती धर्माचे असून त्यांत रोमन कॅथॉलिक बहुसंख्याक आहेत. परंतु धार्मिक बाबतींत पूर्णपणें सहिष्णुता दाखविली जाते. कायद्यांचा क्रमवार संग्रह १८३५ सालीं करण्यांत आला. त्यांची रचना कोड ऑफ नेपोलियनच्या धर्तीवर आहे.

इतिहास–बेलगे नांवाच्या लोकांनीं वसाहत केल्यामुळें त्यांच्या नांवावरून या देशाला बेल्जियम हें नांव पडलें आहे. रोमन लोकांनीं बेल्जियम घेतल्यापासून १६ व्या शतकाच्या पहिल्या कांहीं वर्षांत हा देश निरनिराळ्या राष्ट्रांच्या अधिपत्याखालीं नांदला. पांचव्या चार्लसच्या वेळीं बेल्जियम स्पेनच्या राज्यांत मोडत होता. दुसऱ्या फिलिपच्या वेळीं चालू असलेल्या धर्मयुद्धांत नेदर्लंडस् नांवानें सध्यां ओळखला जाणारा प्रांत स्वतंत्र झाला. यानंतर लौकरच बेल्जियमपैकीं राहिलेला भाग ऑस्ट्रियाच्या ताब्यांत गेला; पण १७४४ मध्यें फ्रान्सनें हा प्रदेश जिंकला; पण लौकरच अॅक्स डी चॅपेल येथील तहाअन्वयें हा प्रान्त पुन्हां ऑस्ट्रियाला मिळाला. नेपोलियनच्या वेळीं बेल्जियमचे फ्रान्सशीं घनदाट संबंध होते. पुढें व्हिएन्ना परिषदेच्या वेळीं (१८१५मध्यें) बेल्जियम व नेदर्लंडस्चा प्रदेश एक करण्यांत आला; पण १८३० मध्यें बेल्जियमनें बंड करूनच आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. १८३१ मध्यें या स्वातंत्र्याला युरोपमधील इतर राष्ट्रांनीं मान्यता दिली व तेव्हांपासून बेल्जियम हें स्वतंत्र पण तटस्थ राष्ट्र म्हणून युरोपच्या इतिहासांत मानण्यांत येत आहे.

१८६५ मध्यें लिओपोल्ड (दुसरा) या राजानें राज्यविस्तार करण्याचें धोरण स्वीकारलें व इंटरनॅशनल आफ्रिकन असोसिएशनचें नेतेपद स्वीकारून कांगो फ्री स्टेट हा आफ्रिकेंतील भाग आपल्या राज्याला जोडला. १९०९ मध्यें लिओपोल्डच्या जागीं पहिला आल्बर्ट राजा झाला. याच्या कारकीर्दीतच १९१४ मध्यें युरोपांतील महायुद्ध सुरू झालें. या युद्धांत वायव्ये

कडील सरहद्द स्वतः राजानें स्वतःच्या देखरेखेखालीं जर्मनीच्या सर्व हल्यांना तोंड देऊन यशस्वी रीतीनें संभाळली. मात्र युद्धकालांत राजधानी ब्रुसेल्सहून हावर या फ्रान्समधील शहरांत न्यावी लागली होती.

महायुद्धांत जर्मनीकडून बेल्जियमला अनेक प्रकारें त्रास व नुकसान सोसावें लागलें, फूट पाडण्याचे प्रयत्नहि झाले, पण या सर्व अडचणींतून संयुक्त बेल्जियम यशस्वी रीतीनें तावून सुलाखून निघून १९१८मध्यें बेल्जियम स्वतंत्र राष्ट्र म्हणून पुन्हां नांदूं लागलें. अल्बर्टच्या आधिपत्याखालीं बेल्जियमनें आपला सर्व बाजूंनीं उत्कर्ष करून घेतला. १९३४ मध्यें आल्बर्ट डोंगरावर चढत असतां घसरून पडला व मरण पावला. त्यानंतर आल्बर्टचा थोरला मुलगा लिओपोल्ड राजा झाला आहे. चालूं असलेल्या युद्धांतहि बेल्जियमला जर्मनीपासून धोका आहे व येणाऱ्या संकटाला तोंड देण्याची तयारीहि बेल्जियमनें केली आहे.

बेल्जियमची लष्करी तयारी पुढीलप्रमाणें आहे:– ४६४१ सैन्याधिकारी व सुमारें ७०,००० खडें सैन्य. १५ महिन्यांचें सक्तीचें लष्करी शिक्षण घ्यावें लागतें व १८ महिने घोडदळांत नोकरी करावी लागते. थोड्या अवधींत सहा लाख सैन्य उभें करतां येतें.

बेशुद्ध होणें:–थोडा किंवा जास्त वेळ टिकणारा बेशुद्धपणा येण्याचीं कारणें अनेकविध असूं शकतील. रुधिराभिसरण व हृदयक्रिया यांमध्यें बिघाड झाल्यास किंचित् काल टिकणारी बेशुद्धावस्था येत असते. तीस Syncope असें आंग्लवैद्यकांत म्हणतात. पुन्हां सावधपणा येतो तो हळूं हळूं येतो.

म्हातारपणीं रक्तवाहिन्या टणक झाल्याकारणानें वारंवार बेशुद्धपणा येऊं शकतो. चालतांना अगर उभें राहतांना तोल जाण्याचें वार्धक्यांत हें कारण असतें.

कित्येक विकारांत घेरी येत असते.

जास्त वेळ टिकणारी बेशुद्धावस्था विशेषतः पुढील कारणांनीं येऊं शकेल:—१ डोक्यास अपाय होणें. २ मेंदूंतील शीर फुटणें किंवा मेंदू बिघडून मऊ होणें किंवा मेंदूचे इतर विकार (फेफरें, सूज, क्षय वगैरे) होणें. ३ मद्यपान. ४ अफू खाणें. ५ यूरीमिआ (लघवींतून बाहेर टाकलें जाणारें 'यूरिआ' नांवाचें विषारी द्रव्य रक्तांत सांचल्यानें) ६ मधुमेह. ७ कांहीं यकृत्‌संबंधीं विकार. ८ सूर्यताप किंवा इतर उष्ण वातावरणानें. **उपाय**–वरील कारणें लक्षांत घेऊन योग्य असे उपाय करणें जरुर आहे. कारण कोणत्याही कारणानें आलेला बेशुद्धपणा भयंकरच समजला पाहिजे. डोक्यास अपाय झाल्यास तज्ज्ञ शस्त्रवैद्याकडून वेळींच उपचार करावा लागेल. मेंदूचें 'ट्यूमर' (विस्फोट) असल्यास प्राणघातकच ठरतें. अफू वगैरे मादक पदार्थ किती सेवन केला गेला आहे यावर बरें होणें न होणें अवलंबून आहे. 'यूरीमिआ' योग्य उपायांनीं बरा होऊं शकेल. मात्र मूत्रपिंड सुस्थितींत असले पाहिजेत. मधुमेहाचा बेशुद्धपणा बहुधा प्राणघातक ठरतो. डोक्याची कवटी फुटली असतां किंवा मेंदूच्या इतर कांहीं विकारांत 'लंबर पंक्चर' (कमरेच्या मणक्यांच्या दरम्यान सुई टोंचून मेंदूंतील कांहीं पाणी काढणेचा उपाय) केल्यास बेशुद्धावस्था थोडा वेळ तरी नाहींशी होते. मादक पदार्थ पोटांत गेले असल्यास वांतिकारक औषध भरपूर दिलें पाहिजे, किंवा 'अॅपोमॉर्फिन्' $\frac{1}{10}$ ग्रेन इंजेक्शन उत्कृष्ट उपयोगी पडतें. अफूच्या विषांत, कोठा वरचेवर स्टमक पंपनें धुवून काढावा. कॉफी, स्ट्रिक्नीन वगैरेचा उपयोग उत्तेजक म्हणून चांगला होतो. रक्तांत विषसंचय झाल्यास (यूरिमिआ वगैरेंत) रेचक व स्वेदक उपाय करावेत, शीर तोडून रक्त कांहीं औंस वाहूं देऊन विषाचें प्रमाण कमी करतां येतें. तसेंच मिठाच्या पाण्याचीं इंजेक्शनें शिरेंत दिल्यानेंहि चांगला उपयोग होतो.

आयुर्वेदिक उपाय–ही बेशुद्धी एखाद्या व्याधीची नसल्यास ती सामान्य उपचारानें नष्ट होते. लवंगांचें अंजन करावें व मिऱ्याची पूड नाकांत फुंकावी किंवा कांदा फोडून हुंगावयास द्यावा.

बेहेरे, नारायण केशव M. A, B. Sc, L. T. (१८९०–):–नागपूर विद्यापीठांत मराठी भाषेला महत्त्वाचें स्थान मिळवून देणारा प्रमुख साहित्यिक. १८९० ला नागपुरास यांचा जन्म झाला असून त्यांचें शिक्षणहि तेथेंच पुरें झालें. श्री. नारायणरावांनीं १८५७ च्या क्रांतीवर लेख लिहिल्याबद्दल व भगतसिंगादि हुतात्म्यांवर 'सप्तर्षी' ही कविता रचल्याबद्दल सरकारनें त्यांस १९३२ मध्यें बडतर्फ केलें.

नागपूर विद्यापीठ स्थापलें गेलें तेव्हांपासून ते आतांपर्यंत नागपूर विद्यापीठाचे पदवीधरांतर्फे निवडून आलेले सन्मान्य सदस्य होत. नागपूर विद्यापीठ व मध्यप्रांताचें हायस्कूल बोर्ड या दोन्ही संस्थांत ते मराठी

भाषा विषयाचें प्रमुख आहेत. सरकारनें बडतर्फ केल्यानंतर त्यांस हा मान मिळाला. यांच्या दीर्घ परिश्रमानेंच शाळाखात्यांत मातृभाषेला परीक्षेचें व शिक्षणाचें माध्यम म्हणून १९२४ मध्यें महत्त्वाचें स्थान लाभलें. मराठीला हें स्थान नागपूर विद्यापीठांत इतिहास—तत्त्वज्ञान इत्यादि विषयांच्या बरोबरीचें आहे. विद्यापीठांतील ही महत्त्वाची कामगिरी करून दाखवून



ना. के. बेहेरे

त्यांनीं वाङ्मयक्षेत्रांतहि नांव घेण्यासारखें कार्य केलें आहे. आतांपर्यंत श्री. नारायणरावांनीं गद्यपद्यात्मक अशीं अनेक पुस्तकें लिहिलीं असून तींत पुढील पुस्तकें प्रमुख होत. मोत्यांची माळ (काव्यसंग्रह), १८५७चें क्रांतियुद्ध (इतिहास), पहिले बाजीराव पेशवे (चरित्र) व ध्येयाकडे. (कादंबरी) प्रस्तुत पुस्तकांवरूनच त्यांच्या व्यासंगाची, कल्पकतेची आणि स्वदेशाभिमानाची जाणीव चटकन होते. पुणें व नागपूर येथें भरलेल्या कवि व शारदोपासक संमेलनांचीं अध्यक्षस्थानें मंडित करण्याचा मान यांस मिळाला आहे. हे कर्ते सुधारक असून मध्यप्रांतांतील विविध सार्वजनिक चळवळींत प्रामुख्यानें भाग घेत असतात.

बोडस, गणेश गोविन्द (१८८१—):— विनोदी नट. यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यांतील 'शेवगांव' या गांवीं १८८१ त झाला. मराठी सहा इयत्ता व इंग्रजी दोन इयत्तांपर्यंत शिक्षण झाल्यावर यांचें शिक्षण बंद झालें. यांनीं वयाच्या पंधराव्या वर्षी रंगभूमीवर पदार्पण केलें. नाट्यव्यवसायांत यांचीं सदतीस वर्षें गेलीं. या कालांत त्यांनीं नाटक मंडळयांतून मुख्य नट व अभिनयशिक्षक या नात्यानें काम केलें. संशयकल्लोळमधील फाल्गुनराव, एकच प्यालयांतील सुधाकर व मानापमान यांतील लक्ष्मीधर वगैरे भूमिकांनीं त्यांचें नांव नाट्यसृष्टींत कायमचें राहिलें आहे. यांचें अभिनय—कौशल्य पाहून यांस 'नटवर्य' या पदवीनें किल्येक लोक ओळखतात. सध्यां म्हातारपणामुळें मिरज मळयापैकीं बोरगांव या गांवीं हे शेती करून असतात.

बोरिक ॲसिडः—Borax चें ॲसिड आम्ल. हें इ. स. १७०२ सालीं डब्ल्यु. होमबर्ग या शास्त्रज्ञानें प्रथम तयार केलें व त्यास Sal Sedativarm असें नांव दिलें. बॅरन नांवाच्या शास्त्रज्ञानें मात्र १७४७ सालीं या क्षाराचे खरें स्वरूप स्पष्ट केलें व Lavoisierian प्रद्धतीप्रमाणें त्यास Boracic or Boric Acid नांव प्राप्त झालें. इ. स. १८१५ सालीं टस्कनी येथें तें तयार करण्याचा कारखाना उभारण्यांत आला; तथापि १८२८ सालीं वाफेच्या फवाऱ्यांचा योग्य उपयोग करून घेऊन त्यावर आधारलेली पद्धत शोधून काढण्यांत आली; तेव्हांपासून बोरिक ॲसिडचे कारखानें यशस्वी होत आले आहेत.

कॅलिफोर्नियामधील नैसर्गिक Borax पासूनहि बोरिक ॲसिड तयार करतात. नैसर्गिक Borax कढत हायड्रोक्लोरिक ॲसिडमध्यें विरघळतात; त्यामुळें बोरिक ॲसिड वेगळें होतें; त्यानंतर कढत पाण्यांतून या ॲसिडचे पुन्हां खडे बनविण्यांत येतात. डोळे स्वच्छ धुवून ते साफ करण्यासाठीं बोरिक ॲसिडचा उपयोग करण्यांत येतो. Surgery मध्यें सौम्य Antiseptic म्हणून याचा उपयोग होतो. दूध, मांस व मासळी बराच वेळ रहावी म्हणूनहि याचा उपयोग होतो. पुष्कळ औद्योगिक धंद्यांत, उदाहरणार्थ Metal enamelling, Porcelain glazing, Optical glass making, जनावरांचीं कातडीं राखण्यासाठीं याचा उपयोग होतो. अल्कली व धातू यांच्याशीं संयोग होतांच याचे क्षार तयार होतात.

बोलपूरः—शांतिनिकेतन व विश्वभारति या संस्थांचें ठिकाण. हें बंगाल प्रांतांतील बिरभुम जिल्ह्याच्या एका पोट भागाचें प्रमुख गांव आहे. ईस्ट इंडियन रेल्वेवर हौऱ्यापासून ९५ मैलांवर हें गांव असून येथें व्यापार चांगला चालतो. या गांवाचा परिचय मुख्यतः कवीन्द्र रवीन्द्रनाथ टागोर यांनीं स्थापन केलेल्या संस्थांनीं अखिल हिंदुस्थानास व जगास झाला आहे.

बोल्शेव्हिझम्—व्यावहारिक ज्ञानकोशाच्या पहिल्या भागांत (पृष्ठें २०९ ते २१७) 'कम्युनिझम्' या विषयावर निबंध आला आहे. त्यांत बोल्शेव्हिझम हा शब्द कम्युनिझम या अर्थानें वापरतात असें म्हटलें आहे. रशियांतील

सोशल डेमोक्रॅटिक पक्ष कार्ल मार्क्सच्या कम्युनिस्ट मताचा अनुयायी होता. या पक्षांत १९०३ सालीं फूट होऊन 'बोल्शेव्हिक' व 'मेन्शेव्हिक' अशीं दोन शकलें झालीं. यांपैकीं बोल्शेव्हिक पक्षानें १९१७च्या आक्टोबरांत रशियांत कामगारक्रांती करून 'कामगारसत्ता' स्थापन केली. कार्ल मार्क्सच्या कम्युनिस्ट मताप्रमाणें बोल्शेव्हिकांनीं ही क्रांती केल्यामुळें या क्रांतीस 'बोल्शेव्हिक क्रांती' अथवा 'कम्युनिस्ट क्रांती' म्हणतात. अर्थातच कम्युनिझमचें जें तत्त्वज्ञान आहे त्यालाहि बोल्शेव्हिझम म्हणण्याचा प्रघात आहे. पण बोल्शेव्हिझम या शब्दांत कम्युनिझमच्या तत्त्वज्ञानाहून पुष्कळच अधिक अर्थ अंतर्भूत केला जातो. रशियन बोल्शेव्हिक पक्षानें १९१७ सालीं रशियांत राज्यक्रांती केल्यानंतर गेल्या वीस वर्षांत जें समाजक्रांतीचें कार्य केलें तें १९१७ च्या राज्यक्रांतीपेक्षांहि अधिक मोठें व महत्त्वाचें असून रशियांतील ही समाजक्रांती आज प्रामुख्यानें बोल्शेव्हिझम् शब्दानें ओळखतात. वास्तविक बोल्शेव्हिक अशा नांवाचा पक्ष सध्यां अस्तित्वांतही नाहीं. बोल्शेव्हिक पक्षानें राज्यक्रांती केल्यानंतर कम्युनिस्ट पक्ष स्थापन केला व त्याच्या नेतृत्वाखालींच रशियन सरकारनेंहि समाजक्रांती केली. तथापि राज्यक्रांती करणारा पक्ष हा बोल्शेव्हिक पक्ष असल्यानें रशियन सरकारनें पुढें केलेली सर्व आर्थिक व सामाजिक क्रांती बोल्शेव्हिजम या नांवानेंच जगभर ओळखली जाते. म्हणून बोल्शेव्हिझम् या मथळ्याखालीं १९१७ च्या राज्यक्रांतीनंतर करण्यांत आलेल्या आर्थिक व सामाजिक क्रांतीची माहिती देत आहे. या राज्यक्रांतीच्या नंतरच्या काळांतील रशियन राज्याचें नांव 'यूनियन ऑफ सोव्हिअट सोशॅलिस्ट रिपब्लिक्स' (यू. एस्. एस्. आर्.) असें आहे.

धर्म आणि नीति—कार्ल मार्क्सच्या मताप्रमाणें धर्मभावना व धर्मसंस्था यांचा उपयोग इतिहासकालांत हजारों वर्षें वरिष्ठ वर्गांनीं बहुसंख्य समाजाची पिळवणूक करण्याकरितां व त्यासाठीं त्यावर वर्चस्व गाजविण्याकरितांच केला आहे. जनतेस पारलौकिक सुखाची लालूच दाखवून वरिष्ठ वर्गांनीं कनिष्ठ वर्गास आपल्यापुढें नमविलें आहे. शारीरिक अथवा मानसिक दुःखाचा अतिरेक झाला म्हणजे अफू मनुष्य खाऊं लागतो. धर्मभावना व धर्मसंस्था यांचा उपयोगहि याच प्रकारें दुःखाचा विसर पडावा व तें सुसह्य वाटावें याचसाठीं आजवर करण्यांत आला आहे. म्हणूनच 'धर्म हा जनतेस अफूसारखा आहे' असें मार्क्स म्हणतो. 'जो शरीरानें कष्ट करतो व सर्व आयुष्यभर दरिद्री राहतो त्याला ऐहिक जीवनाचे बाबतींत धीर व अप्रतिकार हीं तत्त्वें धर्म शिकवितो व या ऐहिक सद्गुणांचें बक्षीस परलोकांत मिळेल अशी आशा लावतो' असें लेनिननें म्हटलें आहे.

झार बादशाहाच्या अमदानींत रशियन ऑर्थोडॉक्स चर्चला सरकारकडून दरसाल पांच कोटी रूबल (सुमारें १ रुपया=१रूबल) मिळत. १९०५ सालीं रशियन चर्चकडे साडेचौऱ्याहत्तर लक्ष एकर जमीन होती. अनेक चर्चेस व मोनॅस्टरीजजवळ पैसा विपुल असून सोनें व रत्नेंहीं त्यांच्याजवळ पुष्कळ होतीं. चर्चही संस्था सरकारी असल्यानें तिला राजकीय सामर्थ्यही फार होतें. धर्माच्या नांवानें प्रजेस हांक दिली कीं झारच्या गुलामगिरीस प्रजा निमुटपणें मान देत असे. म्हणून हातीं सत्ता येतांच ही धर्मसंस्था व जनतेवरील धार्मिक वर्चस्व उखडून काढण्याचा निश्चय बोल्शेव्हिकांनीं केला होता. १९१७ च्या आक्टोबरमध्यें 'सोव्हिअट' सरकार स्थापन केल्यावर २३ जानेवारी १९१८ रोजीं एक हुकूम काढून या सरकारनें चर्च आणि राज्यसंस्था हीं पृथक आहेत असें जाहीर केलें, धर्ममंदिराच्या सर्व मिळकती जप्त करून सरकारजमा केल्या, सार्वजनिक शाळा व इतर सार्वजनिक संस्था यांतून धर्मप्रचारास व धर्मशिक्षणास बंदी केली आणि त्याबरोबरच कोणीही कोणताहि धर्म पाळावा व त्याचा प्रचार करावा अशी मुभा दिली. पुढें १३ जून १९२१ रोजीं एक हुकूम काढून १८ वर्षांखालील इसमास कोणताही धर्म शिकविण्यास बंदी केली. १९२९ च्या एका हुकुमामुळें १८ वर्षांवरील कोणत्याही धर्माच्या वीस माणसांना धार्मिक संस्था स्थापन करून प्रार्थनेसाठीं सरकारकडून प्रार्थनामंदिर मागून घेतां येतें. मात्र या संस्थेस संस्था या नात्यानें माल मिळकत करण्याचा, करारमदार करण्याचा, धार्मिक कृत्यें करण्याचा अथवा सहकारी संस्था चालविण्याचाही अधिकार नाहीं. या संस्थेमार्फत विद्यार्थी, स्त्रिया, पुरुष अथवा मुलें यांच्या सभा भरवितां येत नाहींत. धर्मगुरूंना मतदानाचा हक्क नाहीं व त्यांना सहकारी संस्थांचे सभासद होता येत

नाहीं. कोणत्याही धर्माच्या अनुयायाला कम्युनिस्ट पक्षाचा सभासद होतां येत नाहीं.

शाळांतून शिक्षणास बंदी आहे, इतकेंच नव्हे तर धर्म हा खोटा व मानवहितविघातक आहे असें मुलांना पटेल अशा प्रकारें इतिहास व भौतिक शास्त्रें यांचें शिक्षण दिलें जातें. गुलामगिरी, सरंजामशाही, भांडवलशाही, झारशाही वगैरे समाजव्यवस्थांची व राज्यसंस्थांची माहिती देणारीं पुस्तकें, चित्रें, नकाशे संग्रहालयांत ठेवून धर्मसंस्थेनें मानवजातीच्या पिळवणुकीस कसें सहाय्य केलें आहे ही गोष्ट या प्रदर्शनांच्या द्वारां विद्यार्थ्यांस शिकविली जाते. तसेंच विद्यार्थ्यांसाठीं मोठमोठ्या पंडितांची धर्माविरुद्ध व्याख्यानेंही करविलीं जातात. या सर्व कारणांमुळें रशियांत धर्मसंस्था पाणी न मिळाल्यानें वाळून जाणाऱ्या वेलीप्रमाणें मरून चालली आहे. खिस्ती धर्म व त्याच्या निरनिराळ्या शाखा, महंमदी, बुद्ध वगैरे इतर धर्म व ज्यू धर्म वगैरे अनेक धर्म रशियांत होते. सगळ्यांचीच आतां धूळदाण झाली आहे.

अर्थात् धर्म नष्ट झाला तरी समाजधारणास कांहीं तरी नीति म्हणून अवश्य असतेच व सोव्हिअट रशियांत नवीन समाजघटनेंत अशी नीति आहेच. पण नीतीसंबंधींच्या जुन्या कल्पना बदलल्या आहेत. श्रम न करतां जगणें ही कांहीं धार्मिक दृष्टीनें अनीति मानली गेली नसती. पण सोव्हिअट राज्यांत विनाश्रम जगणें हें बेकायदाच नव्हे तर अनीतिकारकही मानलें जात असून श्रम करून पोट भरणें व समाजाच्या संपत्तींत भर घालणें म्हणजे उच्च नीतिमत्तेचें लक्षण मानलें जातें.

विवाह-संस्था व कुटुंबव्यवस्था—वैवाहिक व कौटुंबिक बाबतींत बोल्शेव्हिकांनीं जी क्रांती केली तिनें जगाचें लक्ष विशेष प्रकारें रशियन क्रांतीकडे खेचलें आहे. झारच्या अमलाखालील रशियांत विवाहसंस्कार हा धार्मिक संस्कार होता. १९१७ च्या डिसेंबरांत सरकारनें एक हुकूम काढून विवाह हा धार्मिक संस्कार नव्हे असें जाहीर केलें व विवाह रजिष्टर कचेरींत नोंदले जावेत असें ठरविलें. १९१८ च्या एका कायद्यान्वयें, पति व पत्नि यांचे हक्क समान आहेत, एक पक्ष कोठेंहि राहिला अथवा एक जागा सोडून गेला तरी दुसऱ्या पक्षानें पहिल्याजवळ राहिलेंच पाहिजे असें बंधन नाहीं. प्रत्येकानें उद्योगधंदा कोणताहि करावा, आपलें नांव वगैरे विवाहानंतर कोणीहि कोणतेंहि ठेवावें, विवाह नोंदलेले असोत अगर नसोत, त्यांस धार्मिक स्वरूप नाहीं व उभयतांच्या कोणत्याही हक्कांत त्यामुळें अधिक उणेपणा येत नाहीं, औरस व अनौरस संतति हा भेद सरकार मानीत नाहीं. सर्व मुलांना सारखेंच संरक्षण व दर्जा मिळविण्याचा हक्क आहे वगैरे गोष्टी ठरविण्यांत आल्या. १९२७ च्या एका कायद्यानें विवाह व घटस्फोट याबाबत व्यक्तिमात्रास पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें असून मुलांच्या संरक्षणाची जबाबदारी मात्र कायद्यानें स्त्री पुरुषांवर टाकलेली आहे. विवाहाची नोंद सक्तीची नसली तरी विवाहाच्या पुराव्याच्या बाबतींत या नोंदीचा उपयोग फार होतो. सरकारी नोंद असली कीं विवाहाचा तो पुरावा ठरतो. पण नोंद नसल्यास समागम, इतर लोकांची माहिती, पत्रव्यवहार इतर दस्तैवज, मुलांचा सांभाळ वगैरेवरून अमुक स्त्रीपुरुष विवाहित आहेत कीं नाहींत हें ठरविलें जातें. मुलांच्या संरक्षणाची जबाबदारी नेमकी आईबापांवरच पडावी या दृष्टीनें विवाहाच्या पुराव्याचें महत्त्व आहे. विवाह रजिष्टर कचेरींत अथवा वधुवरांपैकीं कोणाच्याही घरीं नोंदतां येतो. तसेंच पतिपत्नींपैकीं कोणासही दुसऱ्याची संमति न घेतां अथवा त्या दुसऱ्यास बातमीहि न सांगतां रजिष्टर कचेरींत घटस्फोट नोंदतां येतो. विवाह झाल्यामुळें दुसऱ्या पक्षासंबंधानें कोणताही नवा आर्थिक हक्क अथवा कर्तव्य निर्माण होत नाहीं. विवाहनोंदणीस प्रत्येकास १८ वें वर्ष लागलेलें असलें पाहिजे.

विवाहानें परस्परांसंबंधानें नवे आर्थिक हक्क अथवा कर्तव्यें निर्माण होत नाहींत असें वर म्हटलें; पण यास कांहीं अपवाद आहेत. उदा० एका पक्षास चरितार्थप्राप्ति करणें अशक्य झाल्यास दुसऱ्या पक्षास निदान सहा महिने त्याचें पोषण करावें लागतें.

मुलांची काळजी सरकारमार्फत घेण्याचा प्रघात ही सोव्हिअट राज्यव्यवस्थेची एक फार महत्त्वाची घटना आहे. स्त्रियांनीं स्वचरितार्थासाठीं स्वतः कष्ट करणें व त्यासाठीं कारखान्यांत नोकऱ्या करणें अवश्य झाल्यामुळें सरकारला मुलांच्या जोपासनेसाठींही विशेष दक्षता घ्यावी लागते. यासाठीं प्रत्येक कारखान्यास लागून क्रेशेस्, नर्सरीज् व किंडर गार्टन शाळा खूप मोठ्या प्रमाणांत काढण्यांत आलेल्या आहेत. स्त्रिया कारखान्यांत कामावर गेल्या म्हणजे मुलें या संस्थांच्या हवालीं करण्यांत येतात. बाळंतपणासाठीं स्त्रियांना पूर्ण पगारी रजा मिळते. शारीरिक कष्ट करणाऱ्या स्त्रियांना

बाळंत होण्यापूर्वी व नंतर दोन दोन महिने अथवा एकूण चार महिने पगारी रजा मिळते. बौद्धिक व्यवसायांतील गरोदर स्त्रियांस याप्रमाणेंच ३ महिन्यांची रजा मिळते. मूल अंगावर पीत असलेल्या काळांत जेवणाच्या सुटीखेरीज दर ३॥ तासांनीं अर्धा तास मूल पाजण्यासाठीं सुटी मिळते.

मुलांना अथवा वारसांना आपोआप आनुवंशिक मिळकत मिळणें कायद्यानें रशियांत बंद करण्यांत आलें आहे. १९१८ सालीं दत्तक घेण्याचा हक्क बंद करण्यांत आला होता, पण अनाथ मुलांचें रक्षण परभारें होण्याची सोय व्हावी म्हणून दत्तक पद्धति पुन्हां मंजूर करण्यांत आली. सर्व मुलांचें रक्षण करतां येण्याइतकें सामर्थ्य वाढलें म्हणजे ही दत्तक पद्धति पुन्हा बंद होणें शक्य आहे.

अवैवाहिक संबंधापासून मूल झाल्यास मुलाचा बाप कोण हें स्त्रीकडून सांगून घेण्यांत येतें. मग एक महिन्यांत नोटीस काढून त्या पुरुषास जाब विचारण्यांत येतो. त्यानें आपण बाप असल्याचें अमान्य केल्यास १ वर्षांत त्यानें तसा पुरावा दिला पाहिजे. गर्भधारणा झालेल्या काळांत अनेक पुरुषांशीं सदर स्त्रीचा संबंध असल्यास त्या सर्वांवर मुलाच्या पोषणाची जबाबदारी टाकण्यांत येते. घटस्फोटानंतर मुलें आई-जवळ असल्यास त्यांना बापाला आर्थिक मदत करावी लागते. मूल एकच असेल तर बापाच्या मिळकतीचा एक तृतियांश मुलाच्या पोषणासाठीं आईस मिळतो. पण दोन किंवा अधिक मुलें असतील तर बापाच्या एक-द्वितीयांशाहून अधिक मिळकत त्यानें मुलांसाठीं द्यावी अशी सक्ती नाहीं. आई—बाप अथवा पालक मुलांचें योग्य पालन करीत नसल्यास मुलें त्यांच्यापासून काढून सरकारचे ताब्यांत घेतलीं जातात. (विवाह, घटस्फोट व मुलांचें पोषण यासंबंधानें बोल्शेव्हिकांनीं जी ही नवी व्यवस्था केली आहे तींत मधून मधून पुन्हा पालट करण्यांत येतो. उदा० घटस्फोटाचें स्वातंत्र्य अलीकडे थोडेसें मर्यादित करण्यांत आलें आहे.)

वैवाहिक जीवनांत वरीलप्रमाणें क्रांति झाल्यामुळें जुन्या पद्धतीची कुटुंबसंस्था विस्कटल्यासारखी झालीच आहे. पण सामुदायिक स्वैपाकघरांच्या नव्या पद्धतीनें जुनी कुटुंबव्यवस्था मोडण्यास विशेषच मदत झाली आहे. स्त्रिया व पुरुष या उभयतांचाहि बहुतेक वेळ कारखान्यांत जात असल्यानें त्यांना स्वतः स्वैपाक करणें शक्य नसतें. म्हणून स्त्रिया, पुरुष व मुलें खानावळींत जातात. या खानावळी ह्या मोठमोठ्या कारखान्यांसारख्या आहेत. त्या सरकारी असून त्यांत नफेबाजी नसल्यानें घरांतल्यापेक्षां खानावळींतलें अन्न स्वस्त पडतें. सरकारी वैद्यशास्त्रज्ञ अन्न आरोग्यकारक आहे कीं नाहीं याची तपासणी करतात. मजुरांच्या मोठमोठ्या चाळींना लागूनच या खानावळी असतात. यामुळें स्त्रीपुरुषांना घरांत स्वैपाकसाहित्य संभाळावें न लागून राहत्या जागेचा वापर निजण्या-बसण्यास व लिहिण्यावाचण्यास खेळण्यास वगैरे अधिक चांगल्याप्रकारें करतां येतो. याशिवाय वाचनालयें, क्रीडांगणें, करमणूकगृहें, क्लब्स वगैरे अनेक स्थळीं समाजांतील स्त्रीपुरुष सरमिसळपणें एकत्र येत असल्यानें कुटुंब म्हणजे घरकुल हा समज आज रशियांत फारसा उरलेला नाहीं. मुलांचा वेळ क्रेश, नर्सरी, किंडरगार्टन, शाळा, कॉलेजें व मुलांच्या इतर संस्था यांतच पुष्कळसा जातो. त्यामुळें मुलें व स्त्रीपुरुष झोंपण्यासाठीं, गप्पागोष्टींसाठीं अथवा विसाव्यासाठीं आपापल्या बिऱ्हाडीं जमतात तेव्हां व तेवढ्यापुरतेंच कौटुंबिक जीवन त्यांस अनुभवावयास मिळतें. अर्थात् नात्यामुळें उत्पन्न होणारें प्रेम अनुभवतां येणें आणि सहवास व परस्पर सेवा यापासून मिळणारें सुख अनुभवतां येणें हें कौटुंबिक जीवनाचें वैशिष्ट्यच या पद्धतींत ही अनुभवतां येऊं शकतें.

शिक्षण—समाजांतील आर्थिक घटक हें स्थान कुटुंबसंस्थेस रशियांत राहिलेलें नाहीं हें वरील माहिती-वरून दिसून येईल. याचप्रमाणें मुलांच्या शिक्षणाचें कार्यहि आईबाप अथवा पालक यांजकडून काढून सोव्हिअट सरकारनें तें आपल्या हातीं पूर्णपणें घेतलें आहे. इतर सर्व देशांत शिक्षणाच्या सोयी सरकार करतें तथापि कोणी कोणतें शिक्षण घ्यावें हें त्या त्या विद्यार्थ्यांचे पालकांनीं ठरवावयाचें असतें व त्या शिक्षणाचा खर्चहि पालकांनींच करावयाचा असतो; पण रशियांत ही जबाबदारी सरकारनें घेतली आहे. सर्व समाजाला कम्युनिझमला अनुकूल असेंच शिक्षण दिलें जातें व भावी समाजव्यवस्थेसाठीं ज्या निर-निराळ्या प्रकारचे नागरिक हवे असतात ते विद्यमान शिक्षण संस्थांतून विद्यार्थ्यांची कुवत व समाजाची गरज या दोहोंचा विचार करून तयार केले जातात.

हा सरकारी शिक्षणक्रम अगदीं बालवयापासून सुरू होतो. ३ वर्षांपासून ७ वर्षांपर्यंत मुलें नर्सरींत व

किंडरगार्टन शाळांत शिक्षण घेतात. या काळांत अगदीं मोकळेपणें हालचाल करणें, चांगल्या संवयी लावणें आणि शिक्षकांच्या देखरेखीखालीं खेळ खेळून आरोग्य संपादणें या गोष्टी केल्या जातात. मुलांच्या आया कारखान्यांत असल्या म्हणजे त्यावेळीं मुलें नर्सरींत असतात. तेथें तीं खातात, पितात, झोपतात. तेथें त्यांना हत्यारानें लाकूड काम करणें, चिखलाचीं चित्रें करणें व दुसरे असेंच हस्तव्यवसाय शिकविले जातात. या मुदतींत त्यांना शेवटीं शेवटीं अक्षरें लिहिणें, वाचणें व अंक शिकवितात. या काळांत लोकशाही कारभाराचेंहि शिक्षण देतात. उदा० किंडरगार्टन शाळेंत ४ वर्षांच्या मुलांची एक आरोग्य व स्वच्छता कमेटी नेमलेली असते. त्या कार्याचें महत्त्व व पद्धति त्यांना सांगून त्यांचेकडून आरोग्य व स्वच्छता प्रत्यक्ष करून घेण्यांत येते. तसेंच क्रांतीचा वाढदिवस साजरा करण्यासाठीं जी कवाईत वगैरे करावी लागते ती मुलांचेकडून करून घेऊन क्रांतीचें महत्त्व इतक्या लहानपणीं मुलांचे मनावर बिंबविलें जातें.

८ वर्षांपासून ११ वर्षांपर्यंत ४ इयत्तांत प्राथमिक शिक्षण दिलें जातें. लिहिणें, वाचणें, व्याकरण, गणित इत्यादि पुस्तकी शिक्षण, भोंवतालच्या परिस्थितीचें ज्ञान आणि शास्त्रीय विषयांचें प्राथमिक ज्ञान यांचें शिक्षण प्राथमिक शाळेंत दिलें जातें.

१२ व्या वर्षापासून १४ व्या वर्षाअखेरपर्यंत दुय्यम शिक्षण देतात. त्यांत भौतिक व सामाजिक शास्त्रें, इतिहास, गणित व व्यावहारिक अभ्यास शिकविला जातो. भौतिक शास्त्रें शिकवितांना धर्मसमजुती किती चुकीच्या आहेत हें सांगून विद्यार्थ्यांचें ठिकाणीं आधिभौतिक दृष्टिकोन बाणविला जातो. इतिहास शिकवितांना वर्गयुद्ध इतिहासांत कसकसें चालत आलें आहे हें सांगून समाजशास्त्र शिकवितांना माणसांची सामुदायिक राहणी हीच कशी व्यक्तीच्या व समाजाच्या उत्कर्षाला पोषक आहे हें सांगितलें जातें.

यापुढील शिक्षणक्रम १५ ते १७ वर्ष अखेर चालतो. १८ वे वर्षी स्त्री पुरुषांना धंद्याला लागावें लागत असल्यानें १५–१७ या वयांत ज्याला जो धंदा करावा असें वाटत असेल त्याचें विशिष्ट शिक्षण त्याला मिळतें. प्रत्येक शाळेस एकादें वर्क शॉप असून तें एकाद्या कारखान्यास जोडलेलें असतें. यामुळें मुलांना हातानें स्वतांच्या धंद्याचें शिक्षण मिळून एकंदर कारखाना व देशाचें उत्पादनकार्य कसें चालतें याची कल्पना येते. एकंदर राष्ट्रीय जीवन सर्वांगांनीं कसें चालतें हेंही शाळेच्या या काळांत शिकविण्यांत येतें.

३ ते ७ वर्षांच्या काळांत मुलांचे शिक्षक बदलत नाहींत; यामुळें मुलांना शिक्षकशिक्षकिणीबद्दल अगदीं नात्याचा घरोबा वाटून तीं आनंदी राहतात. पुढें मात्र प्रत्येक विषयाचा तज्ज्ञ शिक्षक तेवढाच विषय शिकवितो. मुलांच्या शिक्षणांत विविधता व करमणूक राहावी यासाठीं शाळेंत नाटकें, संगीत, खेळ, शिवणें व इतर अनेक कला शिकविल्या जातात. रासायनिक व इतर शास्त्रांच्या प्रयोगशाळा असतात. मुलांना निरनिराळीं प्रेक्षणीय स्थळें वगैरे पाहावयास नेऊन त्यावर चर्चा केल्या जातात व त्यांजकडून निबंध लिहून घेतले जातात. निदान दोन परकी भाषा—मुख्यतः जर्मन व इंग्लिश—शिकविल्या जातात. शिक्षणाचा दर्जा स्थानपरत्वें कमीअधिक आहे. मॉस्कोंतील विद्यार्थी जितके पुढें गेलेले आहेत तितके इतर दूर-दूरच्या मागसलेल्या प्रदेशांतील गेलेले नाहींत.

रशियांतील विद्यापीठें हीं अधिकाधिक प्रमाणांत भौतिक शास्त्रांनाच महत्त्व देऊं लागलीं असून सर्व भौतिक व सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासांत ग्रंथ पढण्यापेक्षां अवलोकन, संशोधन व प्रत्यक्ष प्रयोग यांना महत्त्व देण्यांत येत आहे. ग्रंथसंग्रहहि या विद्यापीठांतून मोठा ठेवण्यांत येतो. कीव्ह येथील विद्यापीठांत निरनिराळ्या शास्त्रांवरील ५० लक्ष ग्रंथ ठेवण्यांत आले आहेत. विद्यापीठांतील उच्च शिक्षण बौद्धिक पात्रता असणाऱ्या कोणालाहि मिळावें अशी सरकारची योजना आहे. विद्यापीठांत विशिष्ट विषयांत पारंगत होण्याचें शिक्षण दिलें जातें. शिक्षणास गुरूंचें नियंत्रण व मार्गदर्शन मिळतें; पण परीक्षा अजीबात बंद करण्यांत आल्या आहेत. शेती, एंजिनियरिंग वगैरेचें शिक्षण प्रत्यक्ष कारखान्यांत, इमारत कामावर अथवा शेतींत काम करूनच घ्यावें लागतें. कित्येक हजार एकर जमिनीचा तुकडा घेऊन त्यावर विद्यापीठांतील शेकडों विद्यार्थ्यांकरवीं चांगली किफायतशीर शेती करून घेतली जाते. सर्व प्रकारचें वैद्यकीय शिक्षण फारच कसोशीनें दिलें जातें; पण वकिलीचा धंदा जवळ जवळ बंदच करण्यांत आला असून कायदे अगदींच सोपे करण्यांत आले आहेत. यामुळें जनांना

कायद्याचें फारसें ज्ञान द्यावें लागत नसून कायद्याच्या शाळा, कॉलेजांची पूर्ण हेळसांड करण्यांत आली आहे.

राज्यक्रांति झाल्यानंतर शिक्षणाची पुनर्घटना जेव्हां करण्यांत आली तेव्हां सर्व विद्यापीठें व उच्च शिक्षणाच्या इतर संस्था शिक्षणखात्याकडे देण्यांत आल्या होत्या. सर्व प्राध्यापकांच्या नेमणुका सरकारच्या शिक्षणखात्याच्या कौन्सिलामार्फत होत. पण १९३० सालीं शिक्षणाच्या सर्व वरिष्ठ संस्था सरकारच्या निरनिराळ्या खात्याकडे देण्यांत आल्या. याच पद्धतीनुसार आतां वैद्यकीय शिक्षणाच्या सर्व उच्च शाखा सरकारी आरोग्य खात्यास जोडण्यांत आल्या आहेत. विजेची एंजिनियरिंग शिक्षणाची संस्था सरकारी वीज धंदेखात्यास जोडण्यांत आली आहे. शेती शिक्षण–संस्था शेती खात्यास जोडण्यांत आली आहे.

'इन्स्टिट्यूट ऑफ रेड प्रोफेसर्स' ही मास्कोंतील संस्था रशियांतील सर्वांत उच्च शिक्षणाची संस्था होय. तिचे 'भौतिक शास्त्रविभाग' व 'सामाजिक शास्त्रविभाग' असे दोन भाग करण्यांत आले आहेत. पहिल्या विभागांतील विद्यार्थी कम्युनिस्ट असलाच पाहिजे असें नाहीं. या भागांत रसायन, पदार्थविज्ञान यंत्र, वीज वगैरे सर्व प्रकारच्या भौतिक शास्त्रांचा अभ्यास केला जातो. दुसऱ्या विभागांत अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, कायदा, तत्त्वज्ञान, वाङ्मय वगैरे सामाजिक शास्त्रांचा अभ्यास केला जातो. या शाखेंतील विद्यार्थी मतानें कम्युनिस्ट असावाच लागतो. विद्यार्थ्यांना शिक्षणाचा खर्च अन्नवस्त्र व थोडासा पगारही मिळतो. ४ वर्षें येथें अभ्यास केल्यानंतर या सर्वांच्या सरकारतर्फे तज्ज्ञ प्रोफेसर म्हणून नेमणुका होतात. सरकार कम्युनिस्ट मताचें असून कम्युनिस्ट पक्षाखेरीज दुसरा कोणताही पक्ष कायदेशीर नाहीं व सर्व समाजच कम्युनिस्ट मताचा करणें हें सरकारचें ध्येय आहे.

कामगार–संघटना व उत्पादनाची वाढ—भांडवलशाही समाजव्यवस्थेंत कामगारसंघटना या वर्गयुद्ध चालविण्यासाठीं अवश्य असतात. पण रशियांत भांडवलशाही नाहींशी झाली असूनही कामगार–संघटना कायम ठेवल्या आहेत याचें सकृद्दर्शनीं आश्चर्य वाटतें. पण या कामगार–संघटनांमार्फत कामगारांच्या हक्कांचें रक्षण करणें व त्यांची कर्तबगारी वाढवून देशांतील उत्पादन वाढविणें हीं कार्यें करून घेतलीं जातात. प्रत्येक कारखान्याचा एक कामगारसंघ असतो. त्यांतील सर्व कामगारांकडून कमिटी निवडली जाते. एका शहरांतील अशा अनेक कारखान्यांतील कमिट्यांतून स्थानिक कमिटी निवडली जाते. याप्रमाणें चढत चढत अखिल रशियांतील सर्व कामगार संघांचें एकीकरण मॉस्कोंतील 'सेंट्रल कौन्सिल ऑफ ट्रेड् यूनिअन्स' या संस्थेंत झालें आहे. कारखान्यांचे कारभार सरकारी ट्रस्टमार्फत चालविले जातात. हा कारभार वाईट प्रकारें चालल्यास अथवा इतर कोणत्याही प्रकारें कामगारांवर अन्याय झाल्यास कामगार–संघामार्फत कामगारांना दाद लावून घेतां येते. या कामगार–संघटनांना संप करण्याचा हक्कही राखून ठेवण्यांत आला आहे. पण एकंदर राज्यसंस्थेंत कामगारवर्गाचें प्राबल्य मोठें असल्यानें संप वगैरे करण्याची पाळी कामगारवर्गास येत नाहीं.

कारखाने चालविणाऱ्या 'ट्रस्ट'बरोबर कामगारसंघ हे सालोसाल सामुदायिक रीत्या मजुरीचे करार करतात. धनोत्पादनाचा वेग वाढविणें अत्यवश्य असल्यानें सर्व कामगारांना सारखे पगार न देतां त्यांच्यांत विषमता राखण्यांत आली आहे. विशेष कार्यक्षम कामगारांना अधिक पगार देण्यांत येतो, आणि अधिक पगाराची लालूच ठेवून कामगारांना आपली कार्यक्षमता वाढविण्यासाठीं उत्तेजन दिलें जातें. तथापि कमींत कमी पगार दिला जातो तो त्याचाहि सर्व चरितार्थ चांगला चालेल इतका दिला जातो. शिवाय म्युनिसिपल सुखसोयी, सामाजिक सुखसोयीचीं, आरोग्याचीं व करमणुकीचीं साधनें, घरें, शिक्षण, आरोग्य या सर्व गोष्टी जवळ जवळ मोफत अथवा फार थोड्या खर्चांत पुरविल्या जातात. उदा० एकाद्या कामगाराचें कुटुंब जेवढें मोठें असेल तेवढी मोठी जागा त्यास राहण्यासाठीं दिली जाते. पण त्याला केवढीही जागा दिली तरी त्याच्या मिळकतीच्या एकदशांशाहून अधिक घरभाडें त्याला आकारलें जात नाहीं. कामगारांचा कामाचा वेग वाढविण्यासाठीं कांहीं कामें जितकें काम अधिक तितका रोजगार अधिक या तत्त्वावरही दिलीं जातात. संशोधनासारख्या विशेष बुद्धिकौशल्याच्या अथवा विशेष धाडसाच्या कामाबद्दल बक्षिसें दिलीं जातात. कामगारसंघटनामार्फत धंद्यासंबंधींचें विशेष शिक्षण देणाऱ्या शाळा चालविण्यांत येतात. विशेष होतकरू कामगारांना एंजिनियरिंगसारखें शिक्षण देण्यासाठीं परदेशीं पाठविलें जातें. कारखान्यांच्या हल्लींच्या डायरेक्टरां-

पैकीं कित्येकजण अगदीं सामान्य कामगारांतून आपल्या गुणांनीं मोठे झालेले आहेत.

उत्पादनाचा वेग वाढविणें व नवीन कम्युनिस्ट नागरिकांची पिढी उत्तम प्रकारची तयार करणें हीं ध्येयें सरकारनें विशेष प्रामुख्यानें डोळयापुढें ठेवलीं असल्यानें पहिल्या १० वर्षांत वृद्धांना पेन्शनें देण्याच्या योजना सोव्हिअट सरकारनें मुळींच आंखल्या नाहींत. १९२८ सालीं फक्त कापड गिरण्यांतील कामगारांपुरती वार्धक्याच्या पेन्शनाची योजना आंखण्यांत आली. तेव्हांपासून मात्र आतां सर्व औद्योगिक शाखांत या योजना समाविष्ट केल्या जात आहेत. कमींत कमी १५ वर्षें नोकरी झाली असेल व ५५ वर्षें वय झालें असेल अशांना अखेर पगाराच्या एकद्वितीयांशापासून दोन तृतीयांशापर्यंत पेन्शन मिळूं शकतें. पण काम करण्याची शक्ति ज्यांना असेल त्यांना पेन्शनीची सक्ती नाहीं. आजारीपणाचे, अपघाताचे विमे वगैरेसाठीं कामगार संघटना फंड साठवीत असतात. १९२४ सालीं हा फंड ४२॥ कोटी होता. १९३३ सालीं तो सव्वा चारशेंहे कोटीवर गेला.

आर्थिक पुनर्घटनेचे प्रयोग—१९१७ च्या राज्यक्रांतिनंतर पुढील ३ वर्षें बोल्शेव्हिक सरकारला विलक्षण संकटाचीं गेलीं. भांडवलदार, सरदार व सेनापति वगैरे वर्गांनीं इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, जपान वगैरे राष्ट्रांची मदत घेऊन रशियांत यादवी माजविली. एका बाजूनें या यादवीस तोंड देत असतां रशियन सरकार शहरांतून मोठमोठे कारखाने उभारून औद्योगिक उत्पादन वाढवीत होतें. सरंजामदार वर्ग व चर्च संस्था यांच्या जमिनी सोव्हिअट सरकारनें सरकारी मालकीच्या करून त्या शेतकऱ्यांना वहिवाटीस दिल्या. शेंकडो वर्षांत अशा प्रकारें केवळ स्वतांसाठीं जमिनी कसण्यास न मिळालेल्या शेतकऱ्यांना या जमिनी मिळतांच साहजिकच अतिशय हर्ष झाला. पण बोल्शेव्हिक सरकारनें यावेळीं एक हुकूम काढून शेतकऱ्यांनीं स्वतांच्या गरजेपुरतेंच धान्य ठेवून घ्यावें व बाकीचें सर्व कारखान्यांतील मजुरांना व लढणाऱ्या सैनिकांना खाण्यास हवें म्हणून सरकारास ठराविक दरानें विकावें असें फर्माविलें. हा ठराविक दरही अगदींच कमी ठेवण्यांत आला होता. यामुळें शेतकऱ्यांस शेतीच्या उत्पादनास हुरुप राहिला नाहीं. शेतकरी स्वतांच्या गरजेपुरतेंच पीक लावून बाकीच्या शेतीची हेळसांड करूं लागले. यामुळें लोखंड, कापूस, धान्य वगैरे पदार्थांचें उत्पादन युद्धपूर्व काळच्या विसाव्या हिश्शापर्यंत घटलें. यामुळें दुष्काळ, रोगराई वगैरेंचा कहर उसळून ५० लक्षांहून अधिक माणसें ठार झालीं. या काळांत सर्व कारखाने राष्ट्रीय मालकीचे करण्यांत आले. खासगी व्यापार अजिबात बंद करण्यांत आला. चलन इतकें प्रचंड प्रमाणांत फुगविण्यांत आलें कीं आंतरराष्ट्रीय बाजारांत त्यास कवडीचीही किंमत राहिली नाहीं. हा प्रयोग वर सांगितलेल्या 'कम्युनिस्ट अवस्थे'सारखाच कांहींसा झाला. पण तो कायमचा तसाच चालू देण्यांत आला नाहीं. यादवी चालू असल्यानें देशांतील सर्व धन व बळ सरकारच्या हातीं असलें पाहिजे या हेतूनेंच हा प्रयोग अवलंबिला होता. याला 'वॉर कम्युनिझम' असें इतिहासांत म्हटलें जातें. हा प्रयोग सर्वस्वीं फसला व १९२१ पासून बोल्शेव्हिक सरकानें नव्या धोरणाचा अवलंब केला.

हें नवें धोरण 'नवें आर्थिक धोरण' ('न्यू इकॉनॉमिक पॉलिसी=एन्. ई. पी.=नेप) या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे. या धोरणाअन्वयें स्वदेशी अथवा विदेशी धंदेवाल्यांना खासगी धंदे उभारण्यास पुन्हां परवानगी देण्यांत आली. खासगी व्यापारास मुभा देऊन त्यास उत्तेजन देण्यांत येऊं लागलें. खासगी धंदे, शेती व व्यापार यांची भरभराट होण्यासाठीं अवश्य म्हणून चलन—व्यवस्थेची पुनर्घटना करण्यांत आली. १९२१ मध्यें रशियन सरकारी बँक सुरू करण्यांत आली. इतर अनेक बँका ताबडतोब उघडण्यांत आल्या आणि शेती व खासगी आणि सरकारी धंदे यांना या बँकांमार्फत कर्जें देण्यांत येऊं लागलीं.

हें 'नवें आर्थिक धोरण' आठ वर्षेंपर्यंत अमलांत होतें. लेनिन हा १९१७ च्या क्रांतींतील प्रमुख पुढारी १९२४ सालीं वारला. मरणापूर्वीं दोन वर्षें त्याचें जें शेवटचें भाषण झालें त्यांत त्यानें "हें नवें धोरण म्हणजे पिच्छेहाट आहे" हें कबूल करून "पुढें मोठी उडी घ्यावयाची असल्यानें वेग मिळविण्यासाठीं यावेळीं मागें सरकावें लागत आहे" असें या धोरणाचें समर्थन केलें होतें. या नव्या धोरणाच्या काळांत शेतकऱ्यांना धान्य साठविण्यास व त्यांना योग्य वाटणाऱ्या भावानें विकण्यास मोकळीक देण्यांत आली. पण सरकारनें जमिनीची मालकी मात्र कधींच सोडली

नाहीं. विदेशीयांना नवीन धंद्यांसाठीं देण्यांत आलेल्या सवलती लवकरच कांहींशा आखडण्यांत आल्या. खुद्द रशियन धंदेवाल्यांना फारच थोड्या सवलती देण्यांत आल्या. खाजगी धंदेवाल्यांच्या नफेबाजीस आळा घालण्यासाठीं त्यावर भारी कर लादण्यांत आले. तसेंच योग्य मालाच्या उत्पादनापुरतीच खासगी धंदेवाल्यांना मुभा देण्यांत आली. यंत्रें वगैरे उत्पादक माल करण्याचें काम खाजगी धंदेवाल्यांकडे देण्यांत आलें नाहीं. सरकारी दुकानें व व्यापार आणि कामकरी-शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांचीं दुकानें व व्यापार जसजसा वाढूं लागला तसतसे खाजगी व्यापारावर भारी कर लादून तो व्यापार नष्ट करण्यांत आला. 'वॉर कम्युनिझम्'मुळें जी सर्व आर्थिक घडी विसकटून गेली होती ती मात्र या 'नव्या आर्थिक धोरणा'नें चांगल्या प्रकारें बसविली. शेती, उद्योगधंदे व व्यापार यांची सर्व बाजूंनीं चांगल्या प्रकारें वाढ झाली. ही गरज संपल्यावर १९२८ अखेर हें 'नवें आर्थिक धोरण' रद्द करण्यांत आलें.

आंखीव आर्थिक योजना–१९२८ अखेर रशियांत आर्थिक उत्पादनाची व राष्ट्रीय पुनर्घटनेची एक 'पंचवार्षिक योजना' आंखण्यांत आली. या 'आंखीव योजनेनें बोल्शेव्हिक रशियाची जगभर फार प्रसिद्धी झाली. या वेळेपासून पुनर्घटनेच्या योजना आंखून त्या तडीस नेणें सोशॅलिस्ट समाजरचनेचें वैशिष्ट्य म्हणून गणलें जातें. रशियाच्या प्रचंड भूक्षेत्रांत नैसर्गिक धन विपुल होतें. पण झारच्या अमलांत त्याचा उपसा व उपयोग मुळींच झाला नाहीं. तो करून रशियाचें उत्पादन प्रचंड प्रमाणांत वाढविल्याशिवाय रशियाची सोशॅलिस्ट समाजरचना जगूं शकणार नाहीं ही गोष्ट लेनिनला आरंभापासून पटली होती. या उत्पादनाच्या कार्यासाठीं विजेची शक्ति प्रचंड प्रमाणावर उत्पन्न करून तिच्या सहाय्यानें उत्पादन वाढवावें असें योजून लेनिननें १९२० सालीं त्यासाठीं एक कमिशन नेमलें होतें. लेनिनच्या मृत्यूनंतर त्याच्या जागीं आलेला स्टॅलिन यानें खाणी, कारखाने यांसाठीं लागणारा कच्चा माल, उत्पत्तीचा वेग, उत्पन्न मालाचे प्रकार, मजुरांची उत्पादनशक्ति यासंबंधानें आंकडेवार माहिती मिळवून योजना आंखण्याची पूर्वतयारी करण्याचे हुकूम सोडले. यासाठीं 'गॉसप्लॅन' नांवाची एक संस्थाही स्थापण्यांत आली. सर्व राष्ट्रासाठीं आर्थिक उत्पादनाची योजना आंखण्याचें काम या संस्थेकडे देण्यांत आलें होतें. या संस्थेनें सुप्रसिद्ध अशी 'पहिली पंचवार्षिक योजना' आंखली. तिचे हेतू पुढीलप्रमाणें होते. (१) रशियांत मोठ्या प्रमाणावरील उत्पादन पुष्कळ वाढवून जगांतील भांडवलशाही राष्ट्रांकडून भावी काळांत होणाऱ्या हल्यापासून रशियाचें रक्षण करण्याची सिद्धता करणें. (२) लहान प्रमाणावरील खाजगी शेती बंद करून मोठ्या प्रमाणावरील सामुदायिक शेती सुरूं करणें व तीसाठीं प्रचंड प्रमाणावर यंत्रें व शास्त्रीय उपकरणें, खतें वगैरेंचा उपयोग करणें. (४) शिक्षण वाढवून शेतकऱ्यांची व कामकऱ्यांची बौद्धिक कार्यक्षमता वाढविणें. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठीं जनतेंत फार मोठ्या प्रमाणावर मतप्रसार करण्यांत आला. या कार्यक्रमासाठीं भांडवलाची विशेष गरज होती; पण जगांतील राष्ट्रें रशियास कर्जें देण्यास तयार नव्हतीं. म्हणून कामकरी शेतकऱ्यांकडून लहान लहान रकमा कर्जाऊ घेऊन सरकारनें भांडवल उभें केलें. कोणी आठवड्याची, कोणी महिन्याची मिळकत सरकारला कर्जासाठीं देऊन भांडवलाची भरती केली. 'रशिया आर्थिक उत्पादनांत मागासलेला असून जगांतील भांडवलशाही राष्ट्रें या सोशॅलिस्ट राष्ट्रास बुडवूं पहात आहेत. नवीन सोशॅलिस्ट सरकारचा पराभव होऊन पुन्हां भांडवलशाही व झारशाही यांचा जुलूम सुरू होईल' असा इषारा बोल्शेव्हिक वक्ते कामगारांना देत. यामुळें सोशॅलिस्ट सरकारच्या रक्षणासाठीं कामगार सर्व प्रकारच्या स्वार्थत्यागास तयार झाले. उत्पन्न होणारें धन आपलेंच आहे अशी खात्री हें सरकार सोशॅलिस्ट असल्यानें जनतेस पटविणें सोपें होतें. यामुळें शेतकरी, कामकरी चढाओढीनें काम करीत. ही पंचवार्षिक योजना पार पाडण्यासाठीं विदेशी तज्ज्ञ आणण्यांत आले. त्यांना पगार भरपूर देण्यांत येई. या पंचवार्षिक योजनेंत कित्येक प्रचंड कामें पार पाडलीं गेलीं. ड्निप्रोस्टोई येथें एक नदी आडवून विजेचें मोठें पॉवर हाऊस बांधण्यांत आलें. उरल पर्वतांत दोन लक्ष कामगारांची वसाहत होईल एवढें प्रचंड शहर वसविण्यांत आलें आणि दीड हजार मैलांवरील खाणींतून कोळसा आणून उरल पर्वतांतील लोखंडाच्या साह्यानें तेथें प्रचंड पोलादी कारखाना उभारण्यांत आला. दरसाल हजारों ट्रॅक्टर बनविणारा एक कार-

खाना स्टॅलिनग्राड येथें सुरू करण्यांत आला. ट्रॅन्स-कॉकेशियांतील तेलाच्या खाणी लहान लहान धंदे-वाल्यांच्या हातीं होत्या. त्या सर्व खाणी एकत्र करून तेल काढण्याचा धंदा प्रचंड प्रमाणावर सुरू करण्यांत आला. कास्पियन समुद्राकांठच्या बाकू या बंदरांतून काळ्या समुद्राकांठच्या बाटुम बंदरापर्यंत सहाशें मैल नळ टाकून काळ्या समुद्रांतील आरमारास व रशि-याच्या अंतर्भागास तेल पोचविण्याची व्यवस्था कर-ण्यांत आली. बाकू येथें अनादि काळापासून खोपटांतून गचाळपणें राहणाऱ्या स्त्रीपुरुषांना सुंदर उद्यानें, क्रीडां-गणें, शाळा, ग्रंथालयें, स्वच्छ घरें व स्वच्छ अन्न अशी राहणी मिळूं लागली. ही पंच वार्षिक योजना ५ वर्षांऐवजीं ४ वर्षांतच पार पडली. या योजनेच्या यशाची जी माहिती वेळोवेळीं प्रसिद्ध होई ती थोडीशी अत्युक्त असे. प्रसिद्धिपत्रकांत सांगितल्याइतका माल मापांत भरे तरी गुणांत कमी भरे. कामगार सर्वत्र नवखे असल्यानें माल कमी निर्माण होई. तथापि ४ वर्षांत योजना पार पाडून रशियानें उत्पादनाचा जो वेग वाढविला त्यामुळें जगांतील इतर राष्ट्रें चकित झालीं. या पंचवार्षिक योजनेंत व्यापाराचीही अतिशय प्रगति झाली. लहान लहान खाजगी व्यापाऱ्यांच्या हातचा व्यापार काढून घेऊन सरकारनें त्यास सामुदायिक स्वरूप दिलें. यासाठीं सरकारनें ३ मार्गांचा अवलंब केला. (१) गिऱ्हाइकांच्या सहकारी संस्था होत्या. त्यांचा व्यवहार या पंचवार्षिक योजनेंत दुप्पट होऊन शेकडा ५५ टक्के माल विक्रीच्या संस्थामार्फत विक्री होऊं लागली. (२) सरकारी मालकीच्या दुकानांची पांचपट वाढ करण्यांत आली. (३) कारखान्यांत कामगारांना लागणारा माल तेथेंच वखारींत सांठविण्यांत आला व तो कामगारांना परवाना तिकिटें देऊन वाटण्यांत येऊं लागला. या उपायांनीं किरकोळ मालविक्री कर-णारा व्यापारी नाहींसा झाला.

मिळकतींत व वागणुकींत विषमता पुष्कळच होती खरी. पण त्या विषमतेंतही समता साधण्याचा प्रयत्न केला गेला. विदेशी तज्ज्ञांना मोठे पगार असत. त्यांच्यासाठीं निवडक चांगल्या मालाचीं दुकानें व विदेशी चलन मिळण्यासाठीं पेढ्या असत. याचा हेतु विदेशांत रशियाची पत वाढविणें व रशियाच्या योजना पार पाडण्यासाठीं तज्ज्ञांची अधिकाधिक मदत मिळ-विणें हा होता. रशियन जनतेपैकीं शारीरिक कष्ट करणाऱ्यांना शिधा व मजुरी पुष्कळ मिळे. कामगार संघांच्या सभासदांना दुकानांत स्वस्त व सवलतीनें माल मिळे. बौद्धिक व वेठ्या कामाचें वेतन कमी असे. 'नवीन आर्थिक धोरणा'चे काळांत गब्बर झालेल्यांना जीवित असह्य करण्यांत येऊं लागलें. त्यांना सोव्हिअट्सच्या निवडणुकींत मताधिकार नव्हता. सवलतीच्या भावाच्या दुकानांत त्यांना स्वस्त भाव देण्यांत येत नसे.

सामुदायिक शेती हें या पंचवार्षिक योजनेचें वैशिष्ट्य होतें. 'नवीन आर्थिक धोरणा'मुळें खाजगी शेती कर-णाऱ्या शेतकऱ्यांची संख्या फार वाढली. १९२७ सालीं लहान शेतांची संख्या अडीच कोटींवर गेली. ही लहान शेती बंद करून प्रचंड शेती उभारण्याचें धोरण सर-कारनें अवलंबिलें. या प्रचंड शेतीचे अनेक प्रकार कर-ण्यांत आले. 'सोव्हकॉझ' हा पहिला प्रकार. हीं सरकारी मालकीचीं प्रचंड शेतें असत व त्यांवर सरकारी यंत्रें घेऊन मजूर राबत. 'कोल्क हॉज' हा दुसरा प्रकार. यांत खासगी मालक असलेले शेतकरी जमीन, हत्यारें व जनावरें यांचा सहकार्यानें उपयोग करून नफा वाटून घेत. यामुळें यांत्रिक व शास्त्रीय उपकरणें व उपाय वापरतां येऊन शेतीचें उत्पन्न वाढत गेलें. कोल्कहॉजचा कारभार व्यवस्थित करण्यासाठीं कम्युनिस्ट पक्षाचे सभासद व्यवस्थापक मंडळांत घेण्यांत येत. या सहकारी शेतींत खाजगी शेतकऱ्यांना खेचण्यासाठीं सरकारला जबरदस्तीचे उपाय योजावे लागले. 'नवीन आर्थिक धोरणांत' गब्बर झालेला 'कुलक' शेतकरी वर्ग यावेळीं सरकारवर चवताळून उठला. त्यामुळें पुन्हा यादवी माजणार अशीही भीति वाटूं लागली. लक्षावधि गुरें व उभीं पिकें कापून काढून सरकारला दुष्काळांत कोंडण्याचा या कुलकांनीं प्रयत्न केला. पण सरकारपुढें अखेर त्यांचा पराभव झाला. पुढें सामुदायिक शेतींत आल्यावर सिनेमा, बागा, शाळा, बालकगृहें, क्रीडां-गणें, आरोग्यकारक सोयी या सर्वांचा अनुभव चाख-ण्यास मिळूं लागल्यानें कामगारांप्रमाणें शेतकरीही सरकारी धोरणास अनुकूल झाले. यांतूनही ज्या कित्येक 'कुलक' शेतकऱ्यांनीं सरकारला विरोध केला त्यांना वनवासांत पाठविण्यांत आलें.

सरकार व जनता यांनीं एकंदरीनें हा पंचवार्षिक कार्यक्रम इतक्या उत्साहानें रेटला कीं तो वर म्हटल्या-प्रमाणें पांच ऐवजीं चार वर्षांतच यथासांग पार पडला.

१९३२ अखेर हा कार्यक्रम सुरू झाल्याला चार वर्षें पुरीं झालीं. या मुदतींत हा सर्व कार्यक्रम पूर्ण कसा झाला याचा अवहाल स्टॅलिननें ७ जानेवारी १९३३ रोजीं कम्युनिस्ट पक्षाच्या सभेंत वाचून दाखविला. या मुदतींत भांडवलशाही स्वरूपाचे उद्योगधंदे रशियांतून अगदीं नामशेष होऊन ते सोशालिस्ट स्वरूपाचे झाले. पांच वर्षांसाठीं म्हणून आखण्यांत आलेला औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा कार्यक्रम सुमारें ९४ टक्के यशस्वी झाला. औद्योगिक उत्पन्नाची वाढ १९१३ च्या तिप्पट व १९२८ च्या दुप्पट झाली. लोखंड पोलादासारख्या धंद्यांत आंखीव योजनेच्या १०८ टक्के यश आलें. कामगारांची बेकारी आणि रोजगाराची अनिश्चिती अजीबात नाहींशी झाली. लोखंड पोलादासारख्या धंद्यांत १९२८ च्या दुप्पट कामगार झाले. आंखीव कार्यक्रमापेक्षां ही वाढ ५७ टक्के अधिक होती. १९३२ सालीं राष्ट्रीय उत्पन्न ४५ शें हे कोटि रुबल्स झालें. १९२८ च्या उत्पन्नापेक्षां ही वाढ ८५ टक्के अधिक होती. लोखंड-पोलादाच्या कारखान्यांतील कामगारांचा पगार १९२८ पेक्षां १९३२ सालीं ६७ टक्क्यांनीं अधिक वाढला. आंखीव योजनेंत याबाबत १८ टक्के अधिक यश आलें. सोशल इन्शुअरन्सची रक्कम तिप्पट झाली. या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या एकंदर यशासंबंधीं स्टॅलिन म्हणतो—"सोव्हिअट रशियांत समाजवादी घटनेस अवश्य असणारा आर्थिक पाया घातला गेला असून त्यामुळें एकाच देशांत समाजवादी घटना स्थापन होणें आतां शक्य झालें आहे......पंचवार्षिक कार्यक्रमानें सिद्ध केलें आहे तें हें कीं, आर्थिक संकटास न जुमानतां व सर्व अडचणींस तोंड देऊन यशस्वी होणारी आर्थिक घटना भांडवलशाहींत शक्य नसून सोव्हिअट आर्थिक घटनेंतच ही गोष्ट घडून येणें शक्य आहे."

१९३३ ते १९३७ या काळांत दुसरी पंचवार्षिक योजना अशाच यशस्वितेनें पार पाडली गेली. या काळांत भोग्य संपत्तीची वाढ तिप्पट प्रमाणांत व यांत्रिक सामुग्रीचें उत्पादन साडेतीनपट प्रमाणांत करण्यांत आलें. बाजारभाव उतरविण्यांत येऊन तद्वारां मजूरीची वाढ करण्यांत आली. सरकारी व सहकारी दुकानें वाढविण्यांत आलीं. शिवाय आंखीव योजनेव्यतिरिक्त मोठमोठ्या कालव्यांचीं कामें पार पाडण्यांत आलीं असून नव्या नव्या कालव्यांचीं कामें नित्य सुरू केलीं जात आहेत.

शेतीची लागवड करतांना जमिनीचा मगदूर व हवापाणी या दृष्टीनें योग्य अशीं पिकें लावण्याच्या योजना आंखल्या जात आहेत. मध्य आशियांत व कॉकेशस पर्वताच्या आसपास कापसाचें पीक खूप करण्यांत येत आहे. १९३० सालीं क्रिमिया डागेस्टान, लोअरव्होल्गा, युक्रेन या भागांतही कापसाचें पीक वाढविण्यांत आलें. कॉकेशस विभागांत चहा, लिंबें, संत्रें वगैरेंचीं चांगली लागवड होऊं शकते असें दिसून आल्यामुळें तेथें मक्याचे पीक कमी करून हीं पिकें लावण्यांत येतात. मका सर्व रशियाभर पिकतो. १९१७ च्या राज्यक्रांतीनंतरच्या २० वर्षांत लोकसंख्या दोन कोटींहून अधिक वाढली. यामुळें व मॉस्को, खार्कोव, बाकू, स्टॅलिनग्रॅड वगैरे शहरांत उद्योगधंदे प्रचंड प्रमाणांत वाढविण्यांत आल्यामुळें शहरांतील लोकसंख्या अडीच कोटींवरून चार कोटींवर गेली. युरोप अमेरिकेंतल्याप्रमाणें प्रचंड शहरांची वाढ झाल्यास लोकांचें आरोग्य बिघडतें. म्हणून नवीन शहरांची व वसाहत करतांना ती ५ लाखांहून अधिक होऊं नये अशी आतां काळजी घेण्यांत येत आहे. यांत्रिक व सामुदायिक शेतीमुळें शेतकऱ्यांचीं ही आतां शहरें वसूं लागलीं आहेत. शहरापासून दूरदूर अंतरावरील शेतांत कामासाठीं मोटारींनीं जाण्याच्या सोयी झाल्या असल्यानें क्षुद्र खेडीं नाहींशीं होत असून मोठीं खेडीं अथवा लहान शहरें शेतकऱ्यांना राहण्यास मिळत आहेत. यामुळें खेड्यांतील मोकळ्या हवेचा व शहरांतील आधुनिक सुखसोईचा असा उभयविध फायदा शेतकरी जनतेस मिळूं लागला आहे.

१९२९ पासूनच्या नऊ दहा वर्षांत जगभर बेकारी व आर्थिक अनर्थ उत्पन्न झाले असतां रशियांतील बेकारी पार नष्ट झाली, राष्ट्रांतील उत्पादन वाढलें आणि व्यक्तिमात्राची सुबत्ताही वाढली आहे. यामुळें या अभिनव आर्थिक प्रयोगाकडे जगाचें लक्ष मोठ्या उत्सुकतेनें लागून राहिलें आहे.

बोस, देवकीकुमार (१८९८–   ):—ग्रंथकार व दिग्दर्शक. जन्म ता. २५ नोव्हेंबर १८९८ रोजीं अकलपौष (बरद्वान जिल्हा) येथें. त्यांच्या शिक्षणाला सुरवात जन्मगांवच्या ताल्या पंतोजीच्या शाळेंत झाली. पुढें कलकत्ता येथें अभ्यास करून मॅट्रिकची परीक्षा

पास झाले. त्यानंतर उच्च शिक्षणार्थ विद्यासागर कालेजांत प्रवेश केला.

आपल्या जिल्ह्यांतील कॉंग्रेसच्या चळवळींत आत्मीयतेनें भाग घेण्यास त्यांनीं सुरवात केली. त्यांनीं बंगाली भाषेंत 'शक्ति' या नांवाचें एक नियतकालिक चालविलें. वृत्तपत्रव्यवसायाबरोबरच कथालेखनासहि सुरवात केली. ते हौसेखातर केलेल्या नाटकांत मोठ्या आस्थेनें भाग घेत असत. या प्रसंगानें त्यांची श्रीयुत् धीरेन् गांगुली यांच्यांशीं ओळख झाली. गांगुली हे त्यावेळीं ब्रिटिश डोमिनियन फिल्म कंपनी लिमिटेड् या कंपनीची जुळवाजुळव करण्यांत गुंतले होते. त्यांनीं या कंपनीच्या पहिल्याच चित्रपटाकरितां बोस यांची Flesh of Flesh ही कथा निवडली. त्यांत बोस यांनीं प्रमुख पुरुषभूमिका घेतली. याच कंपनीचा 'अंध ईश्वर' हा दुसरा चित्रपट होय. याचें दिग्दर्शन यांनीं केलें. त्यानंतर त्यांनीं चित्रपटव्यवसायांत पुढेंच पाऊल टाकलें. दिग्दर्शक या नात्यानें त्यांनीं अनेक कंपन्यांत काम केलें. युनायटेड पिक्चर्स कॉर्पोरेशन (१९३०); बारुआ पिक्चर्स (१९३१); न्यू थिएटर्स (१९३२-३३); ईस्ट इंडिया (१९३४); मुंबईची जयवंत (१९३५); ईस्ट इंडिया (१९३६); व न्यू थिएटर्स (१९३७). बंगाली भाषेतील 'चंडिदास' व 'सुन्हेरा संसार' व बंगाली व हिंदीमधील 'विद्यापती' या बोलपटामुळें प्रमुख भारतीय दिग्दर्शकांत त्यांना स्थान मिळालें आहे. त्यांच्या कल्पनेची भरारी अत्युच्च व भव्य आहे. ते धाडसी कल्पक असून त्यांच्या कल्पना जितक्या प्रशस्त तितकीच त्यांची मांडणी मनाला थक्क करून सोडणारी आहे.

बोस, नितिन (१९०१–):—जन्म कलकत्ता शहरांत १९०१ सालीं झाला. हे कलकत्ता युनिव्हर्सिटीचे अंडरग्रॅज्युएट असून प्रथम त्यांनीं 'दी इंटरनॅशनल न्यूज रील्स ऑफ अमेरिका' या संस्थेंत काम केलें. तेथें त्यांनीं कॅमेरा वापरण्याची विद्या हस्तगत केली. सन १९२५ च्या सुमारास त्यांनीं चित्रपटाच्या चित्रपटाच्या धंद्यांत पदार्पण केलें. त्यांनीं १९३० पर्यंत इंटरनॅशनल, ईस्टर्न, आर्यन, आरोरा वगैरे वेगवेगळ्या फिल्मकंपनींत सिनेमाटोग्राफर म्हणून काम केलें. १९३० सालीं श्रीयुत बी. एन्. सरकार यांना मिळाले; तेव्हांपासून ते न्यू थिएटर्समध्येंच आहेत. हिंदी 'चंडिदास' बोलपटाचें दिग्दर्शन यांनींच केलें. तेव्हांपासूनच दिग्दर्शक म्हणून ते प्रकाशांत आले. चित्रपटाचे कामीं कॅमेऱ्याचें कोणते कार्य आहे याची त्यांना पूर्ण कल्पना असून त्यांचें कॅमेऱ्यावर इतकें प्रभुत्व आहे कीं ते त्या यंत्राकडून आपले विचार संपूर्ण स्पष्टतेनें व्यक्तवूं शकतात. दुष्मन व प्रेसिडेंट हे प्रख्यात बोलपट यांनींच दिग्दर्शित केलें आहेत.

बोस, सर जगदीश चंद्र (१८५८–१९३७):—हे एक हिंदी शास्त्रज्ञ होऊन गेले. यांचा जन्म नोव्हेंबर ३०, १८५८ रोजीं डाक्क्यानजीक विक्रमपूर येथें झाला. त्यांचें शिक्षण कलकत्ता येथें व ख्राइस्टस् कॉलेज केम्ब्रिज येथें झालें. त्यांनीं कलकत्ता येथें बोस संशोधन संस्था स्थापिली. वृक्षांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं कोणत्याहि प्रकारें इजा न पोहोंचतां लावतां यावें म्हणून त्यांना बधिर करण्याची, त्याचप्रमाणें त्यांची लवकर वाढ व्हावी म्हणून त्यांना चेतना देण्याची पद्धति त्यांनीं शोधून काढली. त्यांनीं क्रेस्कोग्राफ नांवाचें उपकरण शोधून काढलें. हें क्रेस्कोग्राफ यंत्र वनस्पती–जीवनांतील हालचालींचें सूक्ष्मदर्शन करवितें व त्यायोगानें वनस्पती–जीवनांतील विकासाची नोंद करणें सोईचें झालें आहे. यांना १९१७ सालीं सर ही पदवी देण्यांत आली. हे कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत पदार्थविज्ञानशास्त्राचे प्राध्यापक म्हणून १९१५ पर्यंत होते. ते २४ नोव्हेंबर १९३७ रोजीं वारले.

बोस, सुभाषचंद्र (१८९७–):—पूर्ण स्वातंत्र्यवादी बंगाली पुढारी. बाबूजींचें बाल्य कटकलाच गेलें. तेथील हायस्कूलमधून १९१३ मध्यें त्यांची मॅट्रिक परीक्षा पास झाली. पुढील शिक्षणास ते कलकत्त्यास आले. तेथील प्रेसिडेन्सी कॉलेजांत नांव दाखल केलें. इंटरमध्यें असतांना त्यांचें व त्यांच्या एका प्रोफेसरचें हिंदी विद्यार्थ्यांचा अपमान केल्याबद्दल भांडण झालें. म्हणून त्यांस तें कॉलेज सोडावें लागलें. पुढें त्यांनीं सर अशुतोष मुकर्जी यांच्या मदतीनें स्कॉटिश चर्चेस कॉलेजांत नांव दाखल केलें. याच कॉलेजांतून १९१८ वर्षीं पहिल्या वर्गांत पास



सुभाषचंद्र बोस

होऊन बाबूजींनी बी. ए.ची पदवी घेतली. पुढील शिक्षणासाठीं १९१९ला ते विलायतेला गेले. १९२० मध्यें त्यांनीं आय्. सी. एस. व केंब्रीज युनिव्हर्सिटीच्या बी. ए.ची अशा दोन पदव्या मिळविल्या.

१९२१ मध्यें म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळीचा परिणाम सुभाषबाबूंच्या मनावर होऊन त्यांनीं आपल्या नोकरीचा राजीनामा दिला व देशबंधु दास यांचे अनुयायी झाले. त्यावेळीं निघालेल्या बंगाल राष्ट्रीय कॉलेजचें प्रिन्सिपॉल त्यांस करण्यांत आलें. त्या पदावर असतांनाच त्यांनीं स्वयंसेवकदलाची कामगिरी आरंभिली. ही चळवळ जोरांत नसते असें पाहून सरकारनें सुभाषांना अटक करून सहा महिन्यांची शिक्षा ठोठावली. तुरुंगांतून सुटल्यावर १९२२ मध्यें 'फॉरवर्ड'चें संपादकत्व बाबूजींच्याकडे चालत आलें. हें काम सहा महिने केल्यावर त्यांस त्याचा कंटाळा आला व आपल्या संपादकत्वाचा राजिनामा दिला. १९२४ मध्यें कलकत्ता कॉर्पोरेशनचे चीफ ऑफिसरचें काम ५।६ महिने चोख केलें व त्याबद्दल सर्वांनीं त्यांची वाहवा केली.


सर्व बंगालभर स्वराज्य पक्षाचें वजन वाढलेलें होतें. तें हाणून पाडण्यासाठीं सरकारनें 'बंगाल ऑर्डिनन्स' जारी केला. त्याच्या आधारें सुभाषना सरकारनें पुन्हां २४ आक्टोबर १९२४ ला अटक करून ब्रह्मदेशांत सीमापार केलें. तेथें ते रक्तक्षयानें फार आजारी पडल्यामुळें १६ मे १९२७ ला त्यांचा बंदिवास संपला.

यानंतर त्यांच्याकडे ऑल इंडिया काँग्रेस कमेटीचें चिटणीसपद, नेहरू रिपोर्ट कमेटीचें सभासदत्व व कलकत्ता काँग्रेसच्या प्रसंगीं स्वयंसेवक दलाचे सर सेनापतित्व १९२७ पासून १९२८ अखेरच्या मधल्या कालांत आलें. १९२९ च्या लाहोर काँग्रेसमध्यें प्रतिस्पर्धी राज्ययंत्र स्थापन करण्याबद्दल त्यांनीं फार खटपट केली.

१९३०—३१ पर्यंत त्यांस संपूर्ण स्वातंत्र्यदिन साजरा केला म्हणून सरकारच्या प्रतिबंधांत राहावें लागलें. यानंतर ३१ सालांत कराची, मथुरा, कलकत्ता व पुणें या ठिकाणीं भरलेल्या परिषदांचीं अध्यक्षस्थानें मंडित केली.

सुभाषचंद्र बोस हे तारीख २ जानेवारी १९३२ ला, मुंबईहून वर्किंग कमिटीची बैठक आटोपून परत कलकत्त्याकडे जात असतां कल्याण स्टेशनवर १८१८च्या तिसऱ्या रेग्युलेशनखालीं त्यांस अटक करून सरकारनें त्यांची रवानगी मद्रासच्या बंदीशाळेंत केली. तेथें बोसना क्षयरोगानें पछाडल्यामुळें व सरकारनेंही परवानगी दिल्या कारणानें बोसबाबूंनीं प्रकृतिस्वास्थासाठीं युरोपला १९३३ च्या फेब्रुवारींत प्रयाण केलें. मध्यंतरीं वडिलांच्या भेटीसाठीं म्हणून ते हिंदुस्थानांत आले होते. तो काल सोडला तर १९३६च्या फेब्रुवारीअखेर ते परदेशांतच होते. तेथून ते १९३६च्या लखनौ काँग्रेसला हजर राहण्यास हिंदुस्थानांत आले पण सरकारनें पुनः त्यांस अटक केली. पुनः त्यांची प्रकृति बिघडली. यावेळीं सरकारनें त्यांची बिनशर्त सुटका केली. प्रकृतीसाठीं १९ नोव्हेंबर १९३७ला युरोपची यात्रा केली. तेथें त्यांचें चांगलें स्वागत झालें. त्यांची आजपर्यंतची कामगिरी ध्यानांत घेऊन लोकांनीं त्यांना हरिपुरा काँग्रेसचें अध्यक्षस्थान १९३८च्या १८ फेब्रुवारीला दिलें. यापुढें तर त्यांच्या लोकप्रियतेचा पारा इतका वर चढला कीं गेल्या त्रिपुरा काँग्रेसचेंहि अध्यक्षपद प्रचंड बहुमतानें त्यांच्याकडे आलें. नुकताच म. गांधी व बोस यांच्या विचारांत व कार्यक्रमांत मतभेद झाल्यामुळें सुभाषचंद्रांनीं आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला असून (मे १९३९) काँग्रेसांतर्गत पुरोगामी गट स्थापन केला आहे.

बंकिमचंद्र (१८३८—१८९३):—वंदेमातरम् गीताचे जनक व बंगालचे साहित्यसम्राट. यांच्या वडिलांचें नांव यादवचंद्र. २७ जून १८३८ ला यादवचंद्रांना मुलगा झाला. हाच मुलगा पुढें बंकिमचंद्र नांवानें प्रसिद्धीस आला. बंकिमचंद्रांचीं पहिलीं पांच वर्षें मेदिनीपुर येथें गेलीं. यांनीं वयाच्या सातव्या वर्षीं प्राथमिक बंगाली शिक्षण पुरें करून इंग्रजी शिक्षणास आरंभ केला. यांनीं तत्कालीन हायस्कूलचा अभ्यासक्रम वयाच्या ११ व्या वर्षापर्यंत पार पाडून हुगळी कॉलेजांत नांव घातलें व तिथलीहि परीक्षा दिली. यानंतर येथें पहिल्यानेंच सुरू झालेल्या बी. ए.च्या परीक्षेस वयाच्या विसाव्या वर्षीं बसून ते तींत चांगल्या प्रकारें उत्तीर्ण झाले. लागलीच सरकारनें त्यांस 'यशोरा' येथें डेप्युटी मॅजिस्ट्रेट म्हणून नेमलें. पुढें पुढें हे असिस्टंट सेक्रेटरी (सेक्रेटरीएटमधले) झाले. यापूर्वीं या जागेवर कोणाहि हिंदी माणसाची नेमणूक झाली नव्हती. यांचीच त्या जागीं पहिल्यांदा योजना झाली. त्यावेळीं यांच्यावर सुप्रसिद्ध टीकाकार मेकॉलेसाहेब हे वरिष्ठ होते. त्यांचें व बंकिमबाबूंचें



बिकानेर येथील सर्वसामान्य लोक


पटलें नाहीं. या कारणानें चिडून जाऊन त्यावेळच्या इंग्रज अधिकाऱ्यांनीं पुनः त्यांस डेप्युटी मॅजिस्ट्रेट नेमलें. नोकरीच्या मुदतींत जरी कांहीं युरोपियन अधिकारी त्यांच्यावर नाखूष होते तरी पण त्यांची कामगिरी चोख व वक्तशीर असल्यामुळें नोकरींत असतांना त्यांना फारसा त्रास झाला नाहीं. यांची कामगिरी पाहून सरकारनें त्यांस रावबहादूर व सी. आय. इ. अशा दोन पदव्या बहाल केल्या. नोकरी संभाळून त्यांनीं संस्कृत भाषेचा अभ्यास केला. वेगवेगळ्या विषयांचें वाचन चालू ठेवलें व मासिकांना लेख दिले. आरंभीं त्यांनीं इंग्रजीमध्यें लेखन केलें. पण बंगालींत त्यावेळीं कसल्याच प्रकारचें वाङ्मय तयार झालेलें नव्हतें. तेव्हां यापुढें बंगालींत वाङ्मय निर्माण करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. या कार्यासाठीं प्रथम त्यांनीं ' वंगदर्शन ' व ' प्रचार ' हीं दोन मासिकें काढून लोकांची अभिरुचि सुधारण्याचा प्रयत्न केला. यानंतर बंकिमबाबूंनीं दुर्गेशनंदिनीपासून कमलाकांताचें दप्तरपर्यंत १५ कादंबऱ्या लिहिल्या. तसेंच विविध प्रबंध, लोकरहस्य, विज्ञानरहस्य, कृष्णचरित्र व धर्मतत्त्व हीं पुस्तकें लिहिलीं. यांपैकीं लोकरहस्य पुस्तकांत विनोदी लेख असून बाकीच्यांत निबंध आहेत. मराठींत जसा विष्णुशास्त्री चिपळूणकर यांना अग्रपूजेचा मान मिळतो तसाच त्यांस बंगालींत मिळतो. सर्व हिंदुस्थानांत ' वंदेमातरम् ' या राष्ट्रगीतामुळें त्यांचें नांव अजरामर झालें आहे. या बंगाली साहित्यिकाचा मृत्यु १८९३ मध्यें झाला.

बंगलोर:—म्हैसूर संस्थानची राजधानी. या शहराचें खरें नांव ' बेंगळूरू ' असें आहे. ' बेंगळूरू ' शब्दाचा अर्थ पावट्यांचें नगर असा होतो. (बेंगळू = पावटे व ऊरू = गांव, नगर, शहर). हें हिंदुस्थानी सैन्याच्या बंगलोर ब्रिगेडचें मुख्य ठिकाण आहे. आगगाडीच्या रस्त्यानें हें शहर मद्रासहून २१९ मैल व मुंबईपासून ६९२ मैल दूर आहे. या नगराचे दोन भाग असून त्यांपैकीं एक शहर हा होय; व दुसरा कॅण्टोनमेंट (सिव्हिल स्टेशन). यांपैकीं शहराचा भाग संस्थानच्या आधिपत्त्याखालीं असून दुसरा ब्रिटिशांच्या अमलाखालीं आहे. या शहराची वाढ १८९८पासून पुष्कळच झाली. १८९२ पासून या शहराला म्युनिसिपालिटी मिळाली. येथील लोकसंख्या आठ लाख भरते.

१५३७ मध्यें हें नगर, येलहंकचा संस्थानिक कैंपे गौडा यानें वसविलें. या ठिकाणचा किल्ला प्रथम मातीचा होता, तो हैदरअल्लीनें १७६१ त पाडवून दगडी बांधला. हल्लीं तट पाडून ठिकठिकाणीं रस्ते केलेले आहेत. तटाचा बहुतेक भाग जमिनदोस्त केलेला दिसतो. राजवाडा, सार्वजनिक कचेऱ्या, लालबाग, सेंट्रल कॉलेज व टाटाची इन्स्टिट्यूट या बंगलोरच्या प्रेक्षणीय इमारती होत. शहराच्या पश्चिमेला सुताच्या व कापडाच्या गिरण्या असून शिवाय तेल, साबण, विटा वगैरे तयार करण्याचे कारखाने आहेत. दक्षिणेकडे रेशमी किड्यांची जोपासना करण्याचें शेत असून नैऋत्येकडे दारूचा कारखाना आहे. स्टेशनजवळ लोखंडी ओत काम व एंजिन यांचे कारखाने आहेत.

या गांवाला पाण्याचा पुरवठा अर्कावती नदीच्या हेसरघट्ट तळ्यापासून होतो. नवीन वसाहतीची मांडणी, इमारती, बागा इत्यादींमुळें हें शहर पाहण्यास प्रवाश्यांची नेहमीच गर्दी होते.


बंदा (मृत्यु सन १७१६):—शीख धर्मगुरु गोविंदसिंगाचा तोतया. गोविंदसिंगाच्या मृत्यूनंतर सुमारें दोन वर्षांनीं एक तोतया उत्पन्न होऊन आपण गोविंदसिंगच आहोंत असें प्रतिपादूं लागला व तोच तोतया ' बंदा ' या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध झाला. यावेळीं दिल्लीस बहादुरशाहा राज्य करीत होता. हा तोतया मूळचा कोण होता हें शेवटपर्यंत कोणासहि समजलें नाहीं. यानें प्रथम आपण गोविंदसिंगच आहों असें सांगून, पत्रक प्रसिद्ध केलें व त्यांत ' गुरु गोविंदसिंग जंबियाचे वारानें मृत्यु पावले, परंतु मरतांना त्यांनीं असें सांगितलें कीं लौकरच मी पुन्हां जिवंत होऊन शिखांचें राज्य प्रस्थापित करतों. म्हणून मी जिवंत होऊन स्वातंत्र्याचा झेंडा उभारतांच, सर्व शीख लोकांनीं या झेंड्याखालीं जमावें व परलोकीं मुक्ति प्राप्त करून घ्यावी. ' हें आज्ञापत्र त्यानें सर्व शिखांत पसरविलें. तें आज्ञापत्र पाहतांच, सर्वत्र धर्मजागृति होऊन, याच्या झेंड्याखालीं दिल्लीपासून तीस मैल असलेल्या खरखोडा गांवीं पांचशें अनुयायी जमले, व नंतर अनुयायांची संख्या वाढत जाऊन हा चाळीस हजार शीखांसह सरहिंदवर चालून गेला व तेथील सरदार वझीरखान मारला जाऊन, शिखांच्या ताब्यांत सरहिंद आलें. पूर्वीं सरहिंद येथें मुसलमानांनीं मुसलमानेतरांवर जितके अत्याचार केले होते तितक्यांची बंद्याच्या शीख शिष्यांनीं सव्याज फेड



निरनिराळ्या वेळीं बंदूक कशी धरून उडवितात हें या आकृतीवरून दिसून येईल.

केली. पण यांत विशेष हा होता कीं, मुसलमानांच्या मशिदी शिखांकडून न पाडतां मुसलमानांकडूनच पाडविल्या. यावेळीं मुसलमान लोक इतके घाबरून गेले होते कीं, त्यांनीं आपला धर्म सोडून नांवें बदलून शीख धर्माचीहि दिक्षा घेतली होती. पुढें यास कांहीं लढायांत अपयश आलें. तरीहि, यानें चिकाटीनें आपला उपक्रम चालू ठेवला व मुखसिलसपूर येथें किल्ला बांधून त्यास लोहगड असें नांव दिलें व तेथें स्वतःस राज्याभिषेक करवून घेऊन ‘सच्चा पादशहा’ हें नांव धारण केलें. पण पुढें याचा हा धुमाकूळ फार दिवस न चालून शेवटीं स. १७१६ मध्यें अबदुस्सपदखानानें याला पकडून ठेविलें व बजाविलें कीं, ‘जर तूं मुसलमान होत असलास तर तुला जीवदान मिळेल. नाहीं तर तुझा प्राण घेतला जाईल.’ तेव्हां यानें मुसलमान होण्याचें नाकारून आपण मरणास तयार आहोंत असें सांगितलें. शेवटीं खानानें याचा अत्यंत क्रूरपणानें वध केला.

बंदूकः—बंदुकीचा शोध १४९८ मध्यें जर्मनींत लागला. मात्र सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धापासूनच बंदुकीचा उपयोग युद्धांत होऊं लागला. एक गोळी झाडणारी बंदुक व जोडगोळी झाडणारी बंदुक असे बंदुकींत दोन प्रकार आहेत. दारू ठासून भरून मग ती उडवावयाची या अगदीं पहिल्या प्रकारापासून आज काडतुसें झाडण्यापर्यंत बंदुकींत प्रगती झालेली आहे. पूर्वी निरनिराळ्या राष्ट्रांत होणाऱ्या बंदुकींचे निरनिराळे आकार असत. पण अलीकडे मात्र सर्वत्र सारखेच आकार आढळतात. पिस्तुलाची गोळी जशी स्वतः-भोंवतीं गरगर फिरत जाते त्याचप्रमाणें बंदुकीचीहि



भरीव काडतूस

क–१ टोंक २ गोळी ३ काडतूस (Cartridge) ४ काडतुसाचें बूड (Base).

ख–१. टोंक २. शिसें ९ गोळीवरचें पोलादी कवच ३. दारू ४. काडतुसाचें आवरण ५. काडतुसाचें बूड ६. टोपण ७. प्रहारबिंदु ८. स्फोटक बिंदु (The detonator.)

पोकळ काडतूस

ग–तुसतें धातूच्या पत्र्याचें काडतूस.

घ–१–५. कागदी गोळी २. दारू ३–६. काडतुसाचें बाह्य कवच ४. प्रहारबिंदु (Percussion cap).

जाते. पिस्तुल व बंदूक यांची रचना जवळ जवळ सारखीच असते. बंदुकीच्या गोळीचा वेग दर सेकंदास २९०० फूट म्हणजे अर्ध्या मैलापेक्षां थोडा अधिकच असतो. बंदुकीचें वजन १५ पौंडाच्या आसपास असतें. 'ब्राऊनिंग रायफल' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या बंदुकींतून १ मिनिटास ४० गोळ्या झाडतां येतात. पिस्तूल खांद्यासमोर शरीराशीं काटकोनांत हात ठेवून झाडतात. तर बंदुक खांद्याचा आधार घेऊन खांद्याच्या सरळ रेषेंत झाडतात. सोबत दाखविलेल्या चित्रांत निरनिराळ्या प्रकारांनीं बंदूक झाडतांना सैनिक कोणत्या पवित्र्यांत बंदुक धरतात हें दाखविलें आहे. बंदुकीच्या काडतुसांत भरीव काडतुसें (Live Cartridges) व पोकळ काडतुसें (Blank Cartridges) असे दोन प्रकार आहेत. पोकळ काडतुसांचा उपयोग नुसत्या नेमबाजीचें 'प्रॅक्टिस' करण्याकडे करतात.

ब्रह्मगुप्त (५९८ – ६२८):–अबू पर्वताजवळील भिनमाळ नांवाच्या गांवीं इ. स. ५९८ मध्यें ब्रह्मगुप्त जन्मला. त्यानें तिसाव्या वर्षी चापवंशांतील व्याघ्रमुख राजाच्या कारकीर्दींत 'ब्राह्म–स्फुट–सिद्धांत' हा ग्रंथ लिहिला, आणि त्यानंतर ३७ वर्षांनीं खंडखाद्य नांवाचा दुसरा ग्रंथ रचला. यानें आर्यभट्टास अनेक ठिकाणीं दूषणें देऊन मंगळादि ग्रहांचें गणित आर्यभट्टाच्या ग्रंथावरून चुकतें व माझ्या ग्रंथावरून बरोबर जुळतें असें म्हटलें आहें. यावरून नवीन पंचांगाच्या प्रसारास येणारी संक्रांतीची अडचण ब्रह्मगुप्ताच्या वेळीं भासूं लागली होती असें दिसतें. एकंदरींत या वेळेपासून वेधावरून येणाऱ्या आंकड्यानुसार मूलांक बदलण्याची प्रवृत्ति कमी झाली व आमच्या ज्योतिष्यांचें लक्ष आंकडेमोडीकडे व बीजगणिताची वाढ करण्याकडे लागलें. नऊ आंकड्यांच्या भरतीस 'शून्य' हा आंकडा लिहिण्याची कल्पना ब्रह्मगुप्ताच्या सुमारास भारतीय ज्योतिष्यांना सुचली; आणि त्यामुळें दशमानपद्धतीनें संख्यालेखन व बेरीज-वजाबाकी वगैरे कृत्यें लेखी पद्धतीनें झपाट्यानें व बिनचूक पद्धतीनें करणें शक्य झालें. या शून्य लेखनाच्या एका शोधानें अंकगणिताची प्रगति हिंदुस्थानांत शेंदोनशें वर्षांत फारच वेगानें झाली. ती इतकी कीं येथील गणितज्ञांची कीर्ति परदेशांत पोंचून तेथून हिंदी पंडितांना आदरपूर्वक निमंत्रणें आलीं. अशाच प्रकारचें निमंत्रण बगदादच्या अल मनसूर नांवाच्या खलीफाकडून हिंदी ज्योतिष्याकडे आलें व त्याप्रमाणें एका ज्योतिष्यानें तेथें आपला ग्रंथ नेऊन त्याचा प्रसार केला. खलीफानें त्या ग्रंथाचें भाषांतर इ. स. ७७३ मध्यें आरबी भाषेंत करविलें. हा ग्रंथ सिंदहिंद नांवानें तिकडे रूढ होता. अरबांचें इटालींतील लोकांशीं व्यापारी दळणवळण असल्यामुळें हिंदी अंकगणितपद्धतीचा परिचय इटालियनांना अरबांमार्फत झाला. इ. स. १२०२च्या सुमारास एका इटालियन व्यापारी कारकुनाच्या मुलानें या हिंदी पद्धतीचा चांगला अभ्यास करून लॅटिन भाषेंत अंकगणिताचा विषय प्रथम ग्रंथरूपानें मांडला. तथापि तेथील धर्मगुरूंनीं ही हिशेबाची पद्धति धर्मबाह्य आहे असें म्हणून तिला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. परंतु व्यवहाराच्या दृष्टीनें सोईस्कर असल्यामुळें धर्मगुरुंच्या निषेधास न जुमानतां ती अंकपद्धति युरोपांतील लोकांनीं उचलली. तेव्हांपासून युरोपांत गणिताच्या वाढीस वेधाची जोड मिळाली आणि त्यांतच न्यूटनसारखा कल्पक मनुष्य तेथें निपजला. यामुळें युरोपांत ज्योतिषशास्त्र फारच पुढें गेलें. पण हिंदुस्थानांतील लोकांचें लक्ष केवळ आंकडेमोडींत गुंतून राहिलें व वेधाकडे दुर्लक्ष झालें; ती स्थिति अद्याप कायम आहे.

ब्रह्मपुत्रा:–आशियांतील मोठी नदी. उगम तिबेटांत. हिमालय पर्वताच्या दक्षिण बाजूकडून आणि नंतर पश्चिमेकडे वाहत जाऊन हिंदुस्थानांत गंगेच्या मुखापासून मागें ९० मैलांवर, ती गंगेला मिळते. हिचा उगम कोठें आहे हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. पण तो, समुद्रसपाटीपासून १६,००० फूट उंचीवर डोंगराळ प्रदेशांत असला पाहिजे. हिच्या आरंभींच्या भागाला साम्पो हें नांव असून नंतर ती डोंगरांमधून वाहते. या प्रवाहाला 'डी हाँग' हें नांव आहे. नंतर तिला डिबाँग व लोहित हे प्रवाह मिळाल्यावर तिच्या पुढील भाग 'ब्रह्मपुत्रा' या नांवानें प्रसिद्धी पावला. हिची पूर्ण लांबी १८०० मैल भरते. हिच्यांतून समुद्रापासून आंत ८०० मैलापावेतों जहाजें नेतां येतात. ती सुपीक दरींतून वाहत असल्यानें तिच्या कांठीं भात, चहा, जूट यांचें पीक येतें. तिच्यावर कोठेंही पूल नाहीं हें तिचें वैशिष्ट्य. उतारू होड्या अगर तराफे यांचे मदतीनें तिच्यांतून पलिकडे जातात.

ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर (१६४९–१७४५):–हे सत्पुरुष आठराव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेले. स्वामींचें पूर्वाश्रमीचें नांव विष्णु व राहणें वऱ्हाडांत गणपतीच्या राजुरीनजीक. जन्म इ. स. १६४९ च्या सुमारास झाला. वयाच्या बाराव्या वर्षी मातापितर निवर्तल्यानंतर विष्णूनें घोर ईश्वराराधना आरंभिली व एक तपानंतर काशीस सद्गुरूंच्या आग्रहासाठीं जाऊन राहिला. परमहंसदीक्षा व ब्रह्मेंद्रस्वामी हें संन्यासाश्रमीचें नामाभिदान प्राप्त करून घेतलें. नंतर उत्तर आणि दक्षिण मानसयात्रा करून हे स्वामी इ. स. १६८० च्या सुमारास कोकणांत चिपळुणाजवळ पेढें गांवीं गुप्तपणें मठ स्थापून राहिले.

हा काळ मराठ्यांच्या इतिहासांत अतिशय संकटांचा आणि धामधुमीचा होता. तेव्हां स्वामी राजकीय परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन करीत, हळूंहळूं आपला प्रभाव कोंकणचें हबशी सरकार आणि जनता यांवर पाडीत योग्य संधीची वाट पाहात राहिले. हबशी सरकारचा एक अधिकारी (भावी पेशवा) श्रीवर्धनकर बाळाजी विश्वनाथ भट यावर स्वामींची पूर्ण मर्जी बसली व त्याच्या उत्कर्षाची काळजी स्वामी वाहूं लागले. हा शिष्यहि तसाच निष्ठावंत होता. परशुरामक्षेत्रीं भार्गवाचें मोठें देवस्थान स्थापण्यासाठीं १७०७ च्या आगेमागें स्वामींनीं सर्वत्र संचार सुरू केला व बरेंच द्रव्य संपादन केलें. यावेळीं शाहू–ताराबाई यांमध्यें राज्यप्राप्तीसाठीं युद्ध सुरू होतें. स्वामींनीं शाहूमहाराजांकडे विजयसूचक प्रसाद पाठवून त्याला आपला भक्त बनविलें. स्वामींच्या कृपेनें आपल्याला राजैश्वर्य लाभलें असा शाहूचा ग्रह होऊन तो व त्याच्या सर्व राण्या स्वामींना अखेरपर्यंत मान देत असत. अर्थात् सर्व सरदारहि स्वामींचे निस्सीम भक्त बनले.

स्वामींची प्राप्ति यामुळें साहाजिकच वाढली. या द्रव्याचा विनियोग, सत्कार्यासाठीं मोठ्या राजकारणी पुरुषांना कर्जाऊ रकमा देण्यांत आणि नवीन देवस्थानें; तलाव, विहिरी इ. बांधण्यांत ते खर्च करीत. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व बाळाजी बाजीराव यांना पेशवेपदप्राप्ति स्वामींच्या शिफारसीमुळें झाली असें म्हणणें अगदींच खोटें नाहीं. शाहूचा कोणा सरदारावर रोष झाला असतां, स्वामी दूर करीत. हबशी सरकारवरहि स्वामींचें चांगलें वजन होतें; व इंग्रजांशींहि ते संधान बांधूं शकत. या वजनाचा फायदा ते मराठ्यांची सत्ता दृढमूल करण्याकरितांच घेत.


हबशांच्या त्रासामुळें स्वामींनीं कोंकण सोडलें व सातारा प्रांतीं आले (१७२६) व तेथें धावडशीस अखेरपर्यंत राहिले. देशावर आल्यानंतर स्वामींचें लक्ष बाजी–चिमाजी या रामलक्ष्मणाच्या जोडीवर सतत होतें. त्यांना ते पराक्रम करण्यास स्फूर्ति देत व पैसेहि देत. घरच्या माणसांप्रमाणें ते सर्व राजेरजवाडे व सरदार दरकदार यांचा त्यांच्या बायकामुलांसह समाचार घेत. कर्जाऊ रकमा वसूल करण्यांत ते मोठे खाष्ट वाटत; पण त्या रकमेचा विनियोग धार्मिक कृत्यांत आणि राजकारणांतच करीत. स्वतः स्वामी अगदीं त्यागी आणि सदाचारी होते. तेव्हां स्वतःच्या चैनीसाठीं ते सावकारी करीत असा त्यांच्यावर आरोप करणें पाप होईल. आपल्या घोर तपश्चर्येमुळें आणि निःस्पृह जाज्वल्य वर्तनामुळें स्वामींची सर्वत्र कदर असे व त्यांच्या भीतीनें पुष्कळदां राजकारणांतली गुंतागुंत चटदिशीं सुटे. वसईच्या मोहिमेंत त्यांचें बरेंच अंग होतेंसें दिसतें. सर्व मराठेशाहीच्या इतिहासांत अत्यंत थोर, पराक्रमी आणि राज्यसंस्थापक पुरुषांना आशीर्वाद अनुग्रह देणारे साधुसंत लाभत व सकल ऐश्वर्याचें श्रेय या सत्पुरुषांना देण्यांत येई, असें आपण पाहातों. याच नियमानें पहिल्या भट पेशव्यांचे गुरु ब्रह्मेंद्रस्वामी असें यथार्थ म्हणतां येईल. स्वामींनीं १७४५ त समाधि घेतली. त्यांची गादी धावडशी येथें अद्याप चालू आहे.

ब्राऊनिंग, एलिझाबेथ बॅरेट (१८०६–१८६१):– ही ब्रिटिश कवयित्रि डरहॅम जवळील फॉक्सहो हॉल येथें ६ मार्च १८०६ रोजीं जन्मली. तिचें बालपण होपएंड (हरफोर्डशायर) येथें गेलें. तेथें तिनें पोप, बायरन आणि कोलरिज यांच्या ग्रंथांचा आवडीनें अभ्यास केला; ग्रीक वाङ्मयाचें परिशीलन केलें, प्लेटोचे ग्रंथ वाचले व नाटकांचाहि आस्वाद घेतला. तिनें आपल्या वयाच्या चौदाव्या वर्षीच मॅरॅथॉनच्या लढाईवर एक चतुष्कांडात्मक महाकाव्य लिहिलें; यावरून बालवयांतच तिची काव्यशक्ति जागृत झाल्याचें दिसून येतें. Prometheus Bound या ग्रंथाचें तिनें १८३३ सालीं प्रसिद्ध केलेलें भाषान्तर तिचें पांडित्य दर्शवितें. पंधरा वर्षांची असतांनाच ती घोड्यावरून पडली व पुष्कळ वर्षें अशक्तच राहिली. १८४४ सालीं

तिच्या काव्याचें प्रकाशन झालें. हें प्रकाशन व्हिक्टोरीयन वाङ्मयांत अत्यंत महत्त्वाचें मानलें जातें. या काव्यसंग्रहांत A Drama of Exile व Cry of the Children यांचा समावेश होतो.

१२ सप्टेंबर १८४६ रोजीं तिच्या राबर्ट ब्राऊनिंगशीं झालेल्या प्रीतिविवाहानें तिला नवजीवन प्राप्त झालें. तिच्या बापानें याबद्दल तिला मुळींच क्षमा केली नाहीं हें एकच वैगुण्य तिच्या सुखांत होतें. ब्राऊनिंगचें तिच्याशीं विवाहापूर्वीचें प्रियाराधन चालू असतां " Sonnets from the Portuguese " या कविता लिहिण्याची स्फूर्ति झाली. हीं सुनीतकें तिच्या विवाहानंतर प्रसिद्ध झालीं. तीं स्वतंत्र कृति आहेत. त्यांची गणना तिच्या उत्कृष्ट काव्यांत होते. तीं १८४७ सालीं खासगीरीतीनें छापण्यांत आलीं होतीं; पण १८५० पर्यंत कवयित्रीच्या नांवावर प्रसिद्ध झालीं नाहींत. त्यानंतर Casa Guidi Windows (१८५१) Metrical Romance; आणि Aurora Leigh (१८५७) आणि Last Poems (१८६२). आर. एच. होर्न व इतर मंडळी यांजबरोबर तिनें चॉसरच्या आधुनिकीकरणाचे कामीं सहकार्य केलें (१८४१). २९ जून १८६१ रोजीं ती फ्लॉरेन्स येथील Casa Guidi येथें वारलीं. फ्लॉरेन्स येथील इंग्लिश स्मशानभूमींत तिचें शव पुरण्यांत आलें.

ब्राऊनिंग, रॉबर्ट (१८१२–८९):–हा ब्रिटिश कवि कम्बरवेल येथें ७ मे १८१२ रोजीं जन्मला. त्याचा बाप व आजा हे उभयता बँक ऑफ इंग्लंडमध्यें कारकून होते. त्याच्या बापाचें नांव रॉबर्ट ब्राऊनिंग असेंच होतें. त्याच्या बापानें डंडी येथील वीडमॅन नांवाच्या स्त्रीशीं विवाह केला होता. या जोडप्याला चरित्रनायक रॉबर्टशिवाय आणखी सरियाना नांवाची कन्या होती ती मुलगी १९०३ पर्यंत हयात होती. रॉबर्टला पॅक्हॅम येथील एका शाळेंत घालण्यांत आलें. पण त्याचें शिक्षण मुख्यतः त्याच्या बापाच्या ग्रंथालयांत व एका खासगी शिक्षकाजवळच झालें. मिल्टनप्रमाणें त्याला संगीताची आवड होती. मिल्टनप्रमाणेंच काव्यलेखन हा आपल्या जीविताचा व्यवसाय करण्याचें त्यानें लहान वयांतच ठरविलें होतें.



रॉबर्ट ब्राऊनिंग

जीवनांतील उत्तम गोष्टींचें अवलोकन करणें व आपल्या मनाच्या सर्व शक्तींचा विकास करणें हें ध्येय त्यानें आपल्या दृष्टीसमोर ठेवलें होतें. याच हेतूनें त्यानें १८३४ सालीं रशियाला व १८३८ सालीं इटलीला भेट दिली. इटलींतील प्रवासानें ब्राऊनिंगचा त्या देशाशीं दीर्घकालीन व जिव्हाळ्याचा संबंध आला. याचा परिणाम त्याच्या वाङ्मयकार्यावर झाला. त्यानें कवितालेखनाला यापूर्वींच सुरवात केली होती. Pauline (१८३३); Paracelsus (१८३५) व Strafford (१८३७) असे त्याचे काव्यग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यानंतर त्याचीं बरीचशीं नाटकें प्रसिद्ध झालीं. त्यांत The beautiful Pippa Passes (१८४१) व Bells and Pomegranates हा नाट्यप्रवेशांचा संग्रह; (नाटक म्हणण्यापेक्षां नाट्यप्रवेशांचा संग्रह हें नांव या पुस्तकाला योग्य दिसतें.) King Victor and King Charles (१८४२), By the Return of the Druses व A Blot on the 'Scutcheon' (१८४३) (हीं दोन्हीं नाटकें प्रत्येकीं पांच दिवसांत लिहिलीं असें सांगतात); Colombe's Birthday (१८४४) हें ब्राऊनिंगचें अत्यंत मनोरम नाटक आहे. रंगभूमीकरितां ब्राऊनिंगनें लिहिलेलें हें शेवटचें नाटक होय. Bells and Pomgranates मधील Luria व A Soul's Tragedy ही १८४६ सालचीं नाटकें मुद्दाम अभ्यासाकरितां लिहिलीं आहेत. ब्राऊनिंगचा रंगभूमीसंबंधींचा अनुभव मात्र सुखकारक नाहीं. A blot on the 'Scutcheon या नाटकानें एका मित्राचा गैरसमज झाला; व Colombe's Birthday यानें एकाच्या मित्रत्वाला त्याला मुकावें लागलें.

याच कालांत ब्राऊनिंगनें नाटकाशिवाय कांहीं काव्येंहि लिहिलीं. Sordello (१८४०) व नाट्यगीतें त्यानें लिहिलीं. इलिझाबेथ बॅरेट या कवयित्रीशीं त्याचा परिचय झाला. तिच्याशीं १८४६ च्या सप्टेंबरमध्यें लग्न केलें. हें जोडपें Florence येथें स्थायिक झालें. तो आपल्या पत्नीच्या निधनापर्यंत Casa Guidi येथेंच

रहात होता. ती १८६१ सालीं वारली. तिच्या निधनानें ब्राऊनिंगचा इटलिशीं जडलेला दीर्घकालीन संबंध संपला. ब्राऊनिंग येथें कांहीं काल राहिला. १८७८ पर्यंत तो इटलीला परतला नाहीं. त्याचे शेवटचे दिवस व्हेनीस येथें त्याच्या मुलाच्या घरीं गेले. तेथें तो १२ डिसेंबर १८८९ रोजीं वारला-त्याचें शव वेस्ट मिनिस्टर ॲबेमधील कवींच्या कोप. ऱ्यांत पुरण्यांत आलें. त्याचें इटलीविषयींचे गाढ ज्ञान त्याच्या उत्कृष्ट कवितावरून दिसून येतें. ब्राऊनिंगचे प्राचीन इटालियन कलेविषयींचें ज्ञान रस्किन-पेक्षां अधिक होतें असें डॉन्टे रोझेटी म्हणतो.

पत्नीच्या निधनानंतर ब्राऊनिंग लंडनमध्यें राहिला. तेथील साहित्यिकांच्या मालिकेंत त्यानें हलके हलके मानाचें स्थान मिळविलें. त्याला कीर्ति उशीरां मिळाली ही गोष्ट खरी असली तरी व्हिक्टोरियाकालीन कवींच्या-मध्यें तो टेनिसनच्या तोडीचा आहे असें मानण्यांत येऊं लागलें. कित्येकांच्या मतें ब्राऊनिंग हा टेनि-सनच्यापेक्षां श्रेष्ठ दर्जाचा कवि होता.

ब्राऊनिंगच्या विवाहानंतरचीं बावीस वर्षें म्हणजे त्याच्या आयुष्यांतील मध्य काल होय. हा काल त्याच्या आयुष्यांत अत्यंत महत्त्वाचा आहे. १८४६ पूर्वीं केलेल्या त्याच्या लिखाणांत बरेचसें उत्कृष्ट असलें तरी त्यांत कमी अधिक प्रमाणांत प्रयोगात्मक असलेलें लिखाण थोडें नाहीं. The Ring and the Book या ग्रंथानंतर ब्राऊनिंग हा कलावन्तापेक्षां तत्त्वज्ञ म्हणून झळकूं लागला. त्याचे पुढें दिलेले ग्रंथ अप्रतिम आहेत. : Christmas Eve and Easter Day (१८५०); Men and Women (१८५५); Dramatis Personae (१८६४) व The Ring and the Book (१८६९); यादींतील शेवटला ग्रंथ सर्वो-त्कृष्ट होय. यानंतर ब्राऊनिंग वीस वर्षें जगला व शेवटपर्यंत त्यानें आपलें लेखनकार्य केलें. त्याचा Asolando हा ग्रंथ त्याच्या मृत्यूच्या दिवशींच प्रसिद्ध झाला हा विचित्र योगायोग होय. सुप्रसिद्ध Epilogue हें ब्राऊनिंगचें शेवटचें लिखाण होय.

ब्राऊनिंगनें आपल्या आयुष्याच्या शेवटच्या वीस वर्षांत लिहिलेले ग्रंथ त्याच्या योग्यतेस साजेसेच होते. तथापि तत्पूर्वीच्या वीस वर्षांतील ग्रंथांच्या दर्जाहून या ग्रंथांचा दर्जा कमी होता यांत शंका नाहीं.

Balanstion's Adventure (१८७१) व Aristophane's Aplogy (१८७५) हे ग्रीक नाटककारांच्या कृतीवर आधारलेले ग्रंथ मनोरम आहेत; पण ब्राऊ-निंगच्या अव्वल दर्जाच्या कृतींत त्यांना कोणीहि स्थान देणार नाहीं. ब्राऊनिंगच्या काव्याचा साकल्यानें विचार केला असतां ब्राऊनिंग अर्वाचीन श्रेष्ठ कवींमधील एक आहे हें निःसंशय ठरतें.


ब्राझिलः—दक्षिण अमेरिकेंतील एक देश. या देशानें दक्षिण अमेरिकेचा निम्म्याहून अधिक प्रदेश व्यापिला आहे. हा जगांतील अत्यंत विस्तीर्ण देशांपैकीं एक देश आहे. या देशाची जास्तींत जास्त पूर्वपश्चिम लांबी २६३० मैल व जास्तींत जास्त दक्षिणोत्तर रुंदी २५४० मैल आहे. याचें क्षेत्र ३३ लाख चौरस मैल आहे. याच्या पूर्व, आग्नेय व ईशान्य या दिशांस ॲटलांटिक समुद्र, उत्तरेस फ्रेंच, डच व ब्रिटिश ग्वायेना व व्हेनिझ्यूएला, पश्चिमेस व नैर्ऋत्येस इक्वॉ-डर (Equador), पेरू, बोलिव्हिया पेरॉग्वे, अर्जेटा-इनचें लोकसत्ताक राज्य, यूरुग्वेहीं आहेत.

स्वाभाविक रचना—या विशाल देशाच्या स्वाभा-विक रचनेसंबंधीं कल्पना करतां येणें अशक्य आहे. ही भूमि सुजला व सुफला आहे. जगांतील अत्यंत मोठीं अशीं स्वाभाविक (Virgin) जंगलें ब्राझिल-मध्यें आहेत. हा देश मुख्यतः उष्णकटिबंधांत आहे; तथापि अमेझॉनच्या खोऱ्याच्या दक्षिणेकडील पठार समशीतोष्ण आहे. या देशांतील अंतर्गत जलमार्ग साठ हजार मैलांपेक्षां अधिक आहे. या देशांतील मुख्य नदी अमेझॉन ही आहे. या नदीला मिळणाऱ्या नद्यां-पैकीं बारा मोठ्या असून त्यांची लांबी युरोपांतील नद्यांच्या लांबीपेक्षांही अधिक आहे.

नदीचें खोरें जंगलमय आहे. हें जंगल पूर्वपश्चिम २००७ मैल लांब आहे. या जंगलाच्या अन्तर्यामाची जास्तीत जास्त रुंदी १००० मैल आहे. ॲटलांटिक-शेजारीं या जंगलाची रुंदी ३०० मैलच भरते. येथें विविध प्रकारचे अनेक वृक्ष आहेत. त्यांची उंची मात्र फारच कमी आहे. झाडी घनदाट असून दुर्भेद्य आहे. या अरण्यांत जावयाचें असल्यास अमेझॉन नदी,, तिला मिळणाऱ्या इतर नद्या, प्रबाह यांतून होडीनें जावें लागतें. या अरण्यांतील विपुल पर्णभारानें लवलेल्या घनदाट वृक्षराजींतून सूर्यकिरणांना रिघाव मिळत नसल्यामुळें तेथें दाट काळोख असतो. येथें

सूर्यप्रकाश मिळत नसला तरी सूर्याची उष्णता भरपूर मिळते. येथें विपुल प्राणी सांपडतात. टॅपीर (दक्षिण अमेरिकेंतील एक रानडुकर) व जाग्यावर (एक चित्ता) हे तेथील मोठ्यांत मोठे सस्तन प्राणी असून अनेक प्रकारचें भयानक सर्प तेथें आढळतात. अमेझॉनच्या पाण्यांत मगरी, कांसवें, मासे इत्यादि जलचर विपुल आहेत. अमेझॉनच्या जंगलांत पन्नास जातीचीं वानरें तेथील झाडांच्या फांद्यावर किचकिचत असलेलीं दिसतात; नानाविध पक्षी इतस्ततः स्वैरविहार करीत असलेले आढळून येतात; कोठें सुंदर व शोभिवंत पिसाऱ्याचे पक्षी भराऱ्या मारतांना दिसतात. तर कोठें क्रौंचपक्षी व बगळे संचार करीत असलेले दिसून येतात. याशिवाय साठ जातींचे गुणगुणणारे चिमुकले पक्षी तेथें आहेत. मोठ्या आकाराचीं सुंदर फुलपांखरें किती तरी आहेत. बहुविध प्रकारचे कीटक इतके आहेत कीं त्यांची गणनाच करतां येत नाहीं. येथील झुडपांत नानाविध रंगाचीं फुलझाडें आढळून येतात.

अमेझॉन नदी व तिला मिळणाऱ्या मुख्य नद्या यांच्या कांठावर पुष्कळ खेडीं व शहरें आहेत. रिवो निग्रो या नदीच्या कांठावरील मॅनास (Manaos) हें ब्राझिलच्या मोठ्या बंदरांपैकीं एक आहे. हें समुद्रापासून ९०० मैल लांब आहे. तरी तेथें नदीच्या द्वारा लिव्हरपूलहून आगबोटी येतात. जहाजें जाण्याजोग्या लहानमोठ्या खाड्यांच्या कांठीं इंडियनांच्या अज्ञात अशा रानटी जातींची वस्ति आहे. या जाती आपलें प्राचीन काळापासूनचें साधें जीवन कंठीत असून त्यांना युरोपीयन सुधारणांचे वारेंही नाहीं. या अफाट अरण्याच्या पुष्कळशा भागांत मनुष्याचा प्रवेश अद्याप व्हावयाचा आहे. येथील विपुल वृक्ष, जलाशय यांचा उपयोग अद्याप करून घेण्यांत आलेला नाहीं.



ब्राझिल-(१) बाहिया बंदरांतील एक दृश्य. (२) रियो डी जेनिरो शहराचें विहंगम दृश्य. शहराच्या मागें दिसणाऱ्या डोंगरास Sugar Loaf Mountain असें नांव आहे. E. N. A.

ब्राझिलमधील पठार—हा दक्षिण अमेरिकेचा वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. येथें नद्यांच्या प्रवाहाचे डोंगरांमुळें अनेक धबधबे बनले आहेत. येथील नद्या जहाजें

जाण्याइतक्या मोठ्या आहेत. तथापि या धबधब्यां-मुळें त्यांचा जलमार्ग म्हणून उपयोग होणें दुष्कर झालें आहे. अमेझॉन नदीचा मुख्य भाग जलमार्गाच्या दृष्टीनें अटलांटिकचा भाग मानतां येईल. या मुख्य प्रवाहाला मिळणाऱ्या नद्यांतून धबधब्याच्या पायथ्या-पर्यंत जहाजें जाऊं शकतात. पण या धबधब्यावरील प्रवाहाच्या भागांतून मध्यब्राझीलपर्यंत जलमार्ग आहेत.

ब्राझिलमधील सखल प्रदेश जर कोणता असेल तर तो अमेझॉनचें खोरें व अटलांटिकच्या किनाऱ्यावरील पट्टी एवढाच. देशाच्या दोनपंचमांश भागाची समुद्र-सपाटीपासूनची उंची १००० फूट आहे. पठाराची सर्वसाधारण उंची २००० फूट आहे. पठाराचे डोंग-राळ प्रदेशामुळें भाग झाले आहेत. यांत तीन वेग-वेगळ्या डोंगरांच्या रांगा आहेत; पण त्यांची उंची जेमतेम ६००० फूट होईल. कांहीं भागांत खोल दऱ्या तर कांहीं ठिकाणीं डोंगर असल्यामुळें त्याच्या पृष्ठ-भागांत व सुपीकपणांत वैचित्र्य निर्माण झालें आहे. डोंगराच्या उतरणीवरचा भाग कोठें अरण्यांनीं व्याप-लेला, तर कोठें उघडा बोडका असा दिसतो. येथें उजाड भागहि बराच आहे; तथापि हें पठार व विशेषतः पॅराना नदीच्या पाण्यानें संपन्न झालेला त्याचा दक्षिणेकडील भाग मेंढ्या पाळण्याच्या धंद्याला योग्य असाच आहे. गोऱ्या लोकांना वसाहत करण्यास योग्य अशीहि जागा येथें आहे. येथें वर्षभर उन्हाळा असलेला प्रदेशहि आहे; पण हा उन्हाळा कडक नसून पुरेसा पाऊसहि पडतो. वर्षभर गवत उगवतें, व कांहीं नद्यांच्या कांठीं तर त्यांना येणारा बेताचाच पूर गवताच्या वाढीला उपकारच ठरतो. पठाराच्या दक्षिणेकडील भाग विशेष रम्य व सुखकारक आहे. येथें येऊन वसाहत करणाऱ्या युरोपीयनांना येथील समशीतोष्ण हवा व बदलते ऋतू यांमुळें आपण स्वदेशां-तच आहों असें वाटूं लागतें, व त्यांना येथें कार्यक्षेत्रहि भरपूर मिळतें. पठार व अटलांटिक यांच्यामधील समुद्रकांठची पट्टी दोन हजार मैल लांब असून तींतून पुष्कळ लहान लहान नद्या पूर्वेकडे गेल्या आहेत; एकंदरींत ही समुद्रकांठची पट्टी अत्यंत सुपीक असून उष्णकटिबंधांत तयार होणारें सर्वप्रकारचें पीक येथें होतें. पूर्वीं साखर येथें उत्पन्न होणाऱ्या पदार्थांत मुख्य होती, हल्लींहि उत्तरेकडील प्रदेशांत साखरेचें पीक मुख्य आहे. तंबाखू, कॅकाओ, कापूस, नारळ, नानाविध फळें, भाजीपाला हीं पिकेंहि होतात. या समुद्रकांठच्या पट्टींत अनेक बंदरें आहेत. या बंदरांत व्यापार व उद्योगधंदे मोठ्या प्रमाणांत असून त्यांची दिवसेंदिवस प्रगती होत आहे. या बंदरांत कांहीं मोठीं शहरें असून तीं युरोपीय संस्कृतीचीं पीठें आहेत. अटलांटिकपासून सतत वाहणाऱ्या व्यापारी वाऱ्यांच्या योगानें तेथील उष्ण हवा सौम्य होते.

ब्राझिल येथील नद्यांचे पांच वेगवेगळे गट करतां येतीलः—(१) अमेझॉन व तिला मिळणाऱ्या नद्या, (२) रिव्हर प्लेट सिस्टीम, (३) अलटांटिकला मिळ-णाऱ्या अमेझॉनच्या उत्तरेकडील लहान लहान नद्या, (४) पठारांतून उत्तरेकडे वाहून समुद्राला मिळणाऱ्या नद्या, (५) समुद्रकांठच्या पट्टींतून पूर्वेकडे वाहून अटलांटिकला मिळणाऱ्या नद्या.

ब्राझिलचें मुख्य उत्पन्न तेथील जमिनींत होणाऱ्या पिकांपासून येतें ही गोष्ट खरी आहे. तथापि तेथील खनिज संपत्तिही कमी नाहीं. हा देश सोनें व हिरे यांविषयीं प्रसिद्ध आहे. याशिवाय मॅंगेनीज, दगडी कोळसा, पेट्रोलियम्, लोखंड व मोनाटिझा विपुल आहेत.

लोक व भाषा—ब्राझिलमधील रहिवाशांत तेथील वसाहतवाले हे सांस्कृतिक दृष्ट्या श्रेष्ठ असून त्यांची भाषा पोर्तुगीज आहे. ऐतिहासिक दृष्ट्या हे वसाहत-वाले पोर्तुगीज आहेत. परंतु तेथील मूळ वसाहत-वाल्यांचा तद्देशीय लोकांशीं व तेथें आणलेल्या निग्रो वसाहतवाल्यांशीं शरीरसंबंध होऊन वर्णसंकर मोठ्या प्रमाणांत झाला आहे. येथील वस्तींत निग्रो व अर्ध-निग्रो यांचें प्रमाण बरेंच असून त्यांची वस्ती समुद्र-कांठच्या पट्टींत विशेषतः बंदरांतून आहे.

रिओ ग्रँडी डो सल व सँटा कॅथारिना येथील जर्मन वसाहतवाल्यांनीं दक्षिणेकडच्या भागाच्या प्रगतीकरितां पुष्कळ कार्य केलें. या वसाहती १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत वसल्या; परंतु त्यांनीं आपल्या पितृभूची भाषा व चालीरीति ह्या कायम ठेवल्या. १९१३ सालीं शहरांत राहणाऱ्या जर्मन भाषा बोल-णाऱ्यांची संख्या ४००,००० होती. त्यांनीं जर्मन भाषेच्या शाळा काढल्या, वर्तमानपत्रें चालविलीं, चर्चेस बांधिलीं, फार काय, कोर्टाचे हुकूमनामेदेखील जर्मन भाषेंतच होऊं लागले. परंतु महायुद्ध उद्भ-

वतांच ब्राझिलच्या सत्ताधाऱ्यांचे डोळे खाडकन उघडले. त्यांना या परकीयांना आत्मसात करण्याची व पोर्तुगीज भाषा वापरण्याची सक्ती करण्याची आवश्यकता भासूं लागली.

या देशांतील मूळ रहिवाशांची संख्या किती आहे हें सांगतां येत नाहीं. तद्देशीयांच्या लहान लहान जाती असून त्या इतस्ततः विखुरल्या आहेत. यांतील कांहींचा मानवजाति–शास्त्रज्ञांनीं अभ्यास करून वर्णन केलें आहे. कित्येक जाती अमेझॉनला मिळणाऱ्या नद्यांच्या कांठच्या अरण्यांत आपलें प्राचीन काळापासूनचें रानटी जीवन कंठीत आहेत.

अरण्याच्या अंतर्भागीं राहणाऱ्या तद्देशीयांच्या रानटी जीवनापासून तों राजधानीचें शहर व इतर शहरें येथील विलासी, भपकेदार व महागाईच्या राहणीपर्यंत सर्व प्रकारच्या संस्कृतीचें दर्शन ब्राझिलमध्यें होतें. येथें जीवन सुखमय करणाऱ्या सर्व प्रकारच्या आधुनिक सुखसोयी सिद्ध आहेत. नागरिकांच्या बौद्धिक व कलात्मक गरजा भागविणारीं नाटकगृहें, ऑपेरा हाऊसेस व वर्तमानपत्रें आहेत. ब्राझीलमध्यें राष्ट्रीय वाङ्मयाची निपज झपाट्यानें होऊं लागली आहे. कृषिजीवन व मेंढपाळाचें जीवन यावरील कविता व कादंबऱ्या यांचें स्थान या वाङ्मयांत मोठें आहे. शिवाय मानववंशशास्त्र, सृष्टिविज्ञान व देशाचा राजकीय इतिहास या विषयांवर बरेच ग्रंथ आहेत.

राज्यव्यवस्था, शिक्षण वगैरे–ब्राझिलची राज्यघटना लोकसत्ताक असून संयुक्त स्वरूपाची आहे. या घटनेचे संयुक्त संस्थानांच्या (अमेरिका) राज्यघटनेशीं सामान्यतः साम्य असलें तरी दोहोंत महत्वाचा फरक आहे. ब्राझिलमधील संस्थानांना निर्यात मालावर जकात बसविण्याचा अधिकार आहे. देशांत वीस संस्थानें असून प्रत्येक संस्थान आपला गव्हर्नर व विधिमंडळ यांची निवड करतें. याशिवाय फेडरल डिस्ट्रिक्ट नांवाचा जिल्हा आहे, त्यांतच राजधानी आहे. संयुक्त सरकारच्या कार्यकारीमंडळाकडे राष्ट्रीय संरक्षण, कायदा, सुव्यवस्था व पोस्टखातें हीं खातीं आहेत. संयुक्त सरकारचा कारभार अध्यक्षाच्या हातीं असतो. त्याची दर चार वर्षांनीं प्रत्यक्ष मतदानपद्धतीनें निवडणूक होते. चेंबर ऑफ डेप्यूटीजमध्यें २१२ सभासद असून त्यांची दर तीन वर्षांनीं निवडणूक होते. सीनेटर्स ६३ असून त्यांत प्रत्येक संस्थानांतर्फे ३ व फेडरल जिल्ह्यातर्फे ३ असे सभासद नऊ वर्षांच्या मुदतीनें निवडले जातात. त्यांतील एकतृतीयांश दर तीन वर्षांनीं निवृत्त होतात. धर्म व राजकारण यांची फारकत करण्यांत आली असून सर्व धर्मांना समान रीतीनें वागविण्यांत येतें.



ब्राझील–अमेझॉन नदीच्या उत्तरतीरावर व वायव्य प्रदेशांत राहणाऱ्या तेथील मूळच्या लोकांपैकीं (Tukano Indians) एका मनुष्याचा हा फोटो आहे. ही वेषभूषा म्हणजे लढाईची तयारी होय. E. N. A.

प्राथमिक शिक्षणाकडे पुष्कळ लक्ष देण्यांत येतें, तथापि बहुतेक लोक निरक्षर आहेत. प्रत्येक संस्थानांतील शिक्षणविषयक कायदा वेगळा आहे. या देशांत विद्यापीठें नाहींत. परंतु वैद्यक, कायदा यांचें शिक्षण देणाऱ्या संस्था असून त्यांच्या शाखा ठिकठिकाणीं आहेत. त्यांना पदवी देण्याचा अधिकार आहे.

व्यापार, उद्योगधंदे, वाहतुकीचीं साधनें– येथील मार्गांत जलमार्ग मुख्य होय. रल्वेचे लहान लहान रस्ते आहेत. देशांतील निरनिराळ्या शहरांपासून वेगवेगळ्या बंदरांपर्यंत रेल्वेचे रस्ते गेले आहेत. परंतु दक्षिणेकडून संस्थानांत रेल्वे रस्त्यांचे जाळेंच पसरलें आहे; त्यामुळें राजधानीच्या शहरापासून अगदीं दक्षिणेकडील शहरापर्यंत व बंदरापर्यंत रेल्वेनें जातां येतें.

रबर व कॉफी यांची पैदास मोठ्या प्रमाणांत होते. या दोन जिनसांची निर्यात विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत मोठ्या प्रमाणांत होत असे. परंतु ईस्ट इंडीजमध्यें रबराची कृत्रिम लागवड प्रचंड प्रमाणांत केली गेल्यामुळें ब्राझिलच्या या निर्यात व्यापारास मंदीचे दिवस आले. महायुद्धापूर्वी जगाला लागणाऱ्या कॉफीपैकीं दोनपंचमांश कॉफी एकटा ब्राझिल देश पुरवीत होता. परंतु महायुद्धाच्या काळीं परदेशीं कॉफी नेण्याकरितां जहाजें मिळण्याची अडचण निर्माण झाल्यामुळें कॉफीच्या धंद्यास ओहोटी लागली. कॉफीचा धंदा जरी बसला, तरी त्यायोगानें देशाच्या आर्थिक जीवनावर चांगला परिणाम झाला. ब्राझिलच्या लोकांचे लक्ष मांसाचें व इतर खाण्याचे पदार्थ करण्याच्या धंद्याकडे वळलें. ब्राझील देशांतून हे पदार्थ निर्यात होऊं लागले. ब्राझिलमध्यें कापड विणण्याचा धंदाहि मोठ्या प्रमाणांत चालतो. कोको, साखर, कमावलेलीं कातडीं, तंबाखू वगैरे जिन्नसहि तयार होतात.

ब्राझिल देश विस्तीर्ण, त्याच्यावर निसर्गाची कृपा मोठी, परंतु त्याच्या विस्ताराच्या व नैसर्गिक संपत्तीच्या मानानें त्याची आर्थिक उन्नति झाली नाहीं. याचीं कारणें अपुरी लोकसंख्या, तीमुळें उद्भवणारा मजुरांचा तुटवडा व शहरांत दाटी करून राहण्याची प्रवृत्ति हीं होत. परंतु ब्राझिलनें आपल्या अडचणी ओळखून त्यांचें निवारण करण्याचे उपायहि कांहीं अंशीं ओळखले आहेत. ब्राझीलमध्यें अर्थोत्पादनाचीं साधनें विविध व विपुल आहेत. ब्राझिलसंबंधीं लक्षांत ठेवण्यासारखा विशेष हा कीं त्यांतील नद्या व पर्वत यांनीं त्याच्या निसर्गसंपदेंत एका अर्थानें भर घातली खरी पण दुसऱ्या दृष्टीनें पाहतां अर्थोत्पत्तीच्या मार्गांत अडचण निर्माण केली आहे असें दिसून येतें; कारण या नद्या व पर्वत यांच्या विशिष्ट भौगोलिक रचनेमुळें त्यांचा फायदा करून घेण्यास भगीरथ प्रयत्नांची अवश्यकता आहे.

इतिहास–ब्राझिलचा शोध कोलंबसाचा एक सहकारी व्हिन्सेंट यानेझ् पिंझॉन यानें लावला. त्याच्या पुढील वर्षींच पोर्तुगालतर्फे पेड्रो कॅब्रल यानें हा देश ताब्यांत घेतला. ब्राझिलचा पहिला गव्हर्नर थोम डी सॉसा हा होय. तो १५४९ सालीं या देशांत आला. त्यानें बाहिया हें शहर वसविलें व तेथें आपली सरकारी कचेरी ठेवली. पोर्तुगालचें सिंहासन दुसऱ्या फिलिफनें बळकावतांच ब्राझिलची स्थिती केविलवाणी झाली. ब्राझिलला कोणी वाली राहिला नसल्यामुळें इंग्रज, फ्रेंच व डच यांनीं ब्राझिलमध्यें आपला पाय शिरकावण्याकरितां विश्वप्रयत्न केले. यांपैकीं डच लोक मोठें चिवट त्यांनीं ब्राझिलचा भाग पोर्तुगालबरोबर वाटूनहि घेतला. परंतु डच गव्हर्नरांनीं केलेल्या छळामुळें तेथील पोर्तुगीज प्रजा खवळली व तिनें डच सत्तेविरुद्ध बंड पुकारलें. घनघोर संग्राम होऊन १६५४ सालीं डचांचा पराभव झाला व ब्राझिलवर पोर्तुगीजांचा एकछत्री अम्मल बसला. १६९८ सालीं सोन्याच्या खाणी व १७२८मध्यें हिऱ्याच्या खाणी सांपडल्यामुळें पोर्तुगीजांना ब्राझिलची भूमि ही कामधेनु वाटली असल्यास नवल नाहीं. पोर्तुगीज सरकारनें या देशांतील अज्ञात प्रदेशाचें संशोधन करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. १८०७ सालीं फ्रेंचांनीं पोर्तुगालवर स्वारी करतांच पोर्तुगालचा सहावा जॉन आपले अधिकारी व ब्राझिलमध्यें राहूं इच्छिणारे इतर पोर्तुगीज नागरिक यांच्यासह ब्राझिलला आला. त्यानें १८१३ सालीं ब्राझिलला ब्रॉझिलचें राज्य ही संज्ञा देऊन आपण पोर्तुगाल व ब्राझिलचा राजा हें पद धारण केलें. १८२१ सालीं तो पोर्तुगालला परत गेला. तेथें त्याला आढळून आलें कीं ब्राझिलियन लोकांना पोर्तुगीज लोकांच्या बरोबरीनें नागरिकत्वाचे व राजकीय हक्क देण्यास पोर्तुगाल येथील दरबार तयार नव्हता. यामुळें ब्राझिलमध्यें अशांतता माजली.



ब्राझिलमधील दोन इंडियन स्त्रिया E. N. A.

राजपुत्र डॉम पेड्रो याला ब्राझिलला स्वातंत्र्य मिळवून देण्यास बद्धपरिकर झालेल्या पक्षाचें नेतृत्त्व घ्यावें लागलें. १८२२ सालीं नॅशनल असेंब्लीनें ब्राझिलदेश पोर्तुगालपासून स्वतंत्र केल्याचें व डॉम पेड्रो हा ब्राझिलचा सनदशीर बादशहा झाल्याचें जाहीर केलें. १८६४ सालीं ब्राझिल व पॅराग्वे यांच्या दरम्यान युद्ध जुंपलें. या युद्धाचा शेवट १८७० सालीं झाला. या युद्धांत या देशाचें मनुष्यबळ व द्रव्यबळ बरेंच खर्च झालें; पण ब्राझिलच्या सामर्थ्याचा प्रत्यय आला. १८५३ सालीं बाहेरून गुलाम आणण्यास कायद्यानें प्रतिबंध करण्यांत आला. १८७१ सालीं गुलामांची हळू हळू मुक्तता करण्याविषयींचा कायदा झाला. १८८८ सालीं गुलामगिरी संपूर्णपणें नष्ट करण्यांत आली. १८८९ सालीं क्रान्ति होऊन दुसरा डॉन पेड्रो याला पदच्युत करण्यांत आलें. ब्राझिलचें राज्य युनायटेड स्टेटस् ऑफ ब्राझिल या नांवानें लोकसत्ताक राज्य झाल्याचें जाहीर करण्यांत आलें. १९१४ च्या महायुद्धांत ब्राझिलनें दोस्त राष्ट्रांबद्दल आपुलकी दाखविली, जर्मनीचा संबंध १९१७ सालीं तोडला व युद्ध जाहीर केलें.

ब्राह्मणग्रंथः–श्रौतवाङ्मयाचा एक भाग. ब्राह्मण म्हणजे यज्ञकर्मांतील एखाद्या मुद्द्यावरील विद्वान् याज्ञिकानें केलेलें विवेचन. यज्ञक्रिया हा ब्राह्मणग्रंथांचा विषय. कोणत्या वेळीं कोणते मंत्र म्हणावयाचे हें त्यांत सांगितलेलें आहे. ब्राह्मणग्रंथांत वेगवेगळे संस्कार, विधी व मंत्र यांचें विवेचन केलेलें आहे. प्रत्येक वेदाचीं ब्राह्मणें आहेत. ब्राह्मणग्रंथ पुष्कळ होते; परंतु त्यांतील बरेच कालाच्या भक्ष्यस्थानीं पडले आहेत. सांप्रत सात ब्राह्मणग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यापैकीं 'ऐत्तरेय' व 'कौषितकी' हीं दोन ब्राह्मणें ऋग्वेदाचीं, तैत्तिरीय व शतपथ हीं दोन यजुर्वेदाचीं, पंचविंश व षड्विंश हीं दोन सामवेदाचीं व गोपथ हें अथर्ववेदाचें. (१) ऐत्तरेय ब्राह्मण या ब्राह्मणांत सोमयाग, अग्निहोत्र व राजसूय यज्ञ यांचें वर्णन आहे. (२) कौषितकी ब्राह्मणांत अग्निहोत्र, ऋतुयाग, सोमयाग इत्यादि विषय आहेत. (३) तैत्तिरीय ब्राह्मणांत पुरुषमेधाचें वर्णन आहे. शतपथ ब्राह्मणांत एकंदर १०० अध्याय आहेत; म्हणून याला शतपथ हें नांव मिळालें. यांत अश्वमेध, पुरुषमेध, सर्वमेध, स्वाध्याय, उत्तरक्रिया इत्यादि विषय आहेत. पंचविंश ब्राह्मण-तांड्य ब्राह्मण म्हणून प्रसिद्ध आहे. यांत व्रात्यस्तोमविधीचें वर्णन असून जुन्या कथा आहेत. षड्विंशब्राह्मण यांत तांड्यब्राह्मणांतील विषय असून शकुनापशकुनांचें वर्णन आहे. गोपथ ब्राह्मणांत ऐत्तरेय पंचविंश, शतपथ यांतील पुष्कळसे विषय आहेत; शिवाय गर्भाधानादि संस्कार, पाकयज्ञ इत्यादि विषय यांत आहेत.

ब्राह्मीः–ही एक उपयुक्त वनस्पति असून हिचा पाला फेफरें येणाऱ्या मुलांस व बोबडें बोलणाऱ्या मुलांस खावयास देतात. ब्राम्हीचा रस साखरेंतून घेतला असतां लघवीस साफ होतें. रक्तशुद्धीवरहि चांगलाच परिणाम ही वनस्पति करूं शकते.

तेल–साहित्य–ब्राम्हीचा पाला, खोबऱ्याचें ताजें तेल, पाचूचा पाला, थोडीं एरंडाचीं व कापसाचीं पानें, वासासाठीं वाळा. **कृति**–ब्राम्हीचा पाला स्वच्छ धुवून घ्यावा. नंतर त्याचीं व पाचू, एरंड व कापूस ह्यांचीं पानें एकत्र करून तें सर्व बारीक वाटून त्याचा रस काढावा. जेवढा रस निघेल तेवढेंच खोबऱ्याचें तेल घालावें. नंतर तें मिश्रण चुलीवर ठेवावें व खालीं मंदाग्नी असावा. नुसतें तेल उरलें कीं खालीं उतरावें. निवाल्यावर बाटलींत भरून ठेवावें. एरंड व कापूस

ह्यांच्या पानांचा रसही थंड असतो म्हणून तो घाल-तात. पाचूचा व वाळ्याचा वास चांगला येत असल्या-मुळें त्याच्या उपयोगानें तेलाला सुवासिक गंध येतो.

ब्राह्मोसमाजः—या समाजाचा संस्थापक राजा राम-मोहन राय बंगाल्यांत इ. स. १८७४ सालीं जन्मला. लहान वयांतच त्यानें पर्शियन, अरबी, उर्दू भाषांचा काळजीपूर्वक अभ्यास केला. बौद्ध धर्माकडे त्याचें विशेष लक्ष वेधून तो आपल्या वयाच्या पंधराव्या वर्षी तिबेटांत गेला व तेथून इ. स. १८०३ सालीं परत आल्यावर त्यानें ईस्ट इंडिया कंपनीची नोकरी पत-करली; परंतु ती त्यास लवकरच सोडावी लागली. त्यानें इ. स. १८२८ सालीं ब्राह्मोसमाजाची स्थापना केली. त्याची बुद्धि तर्कप्रधान असल्यामुळें त्याचा खिस्ती व हिंदु धर्मांतील कोणत्याच पौराणिक नवल-कथांवर विश्वास नसे, यामुळें त्यास दोन्ही धर्मांचा रोष सहन करावा लागला. मूर्तिपूजा करावयाची नाहीं, एका निर्गुण, निराकार परमेश्वराची प्रार्थना करावयाची, दुसऱ्या धर्मांचीं निंदा करावयाची नाहीं, हीं ब्राह्मो-समाजाचीं मुख्य तत्त्वें आहेत. इ. स. १८३३ त राजा राममोहन राय ब्रिस्टल (इंग्लंड) येथें मरण पावला. त्याचें त्या ठिकाणीं स्मारक केलें आहे. त्याच्या पश्चात् ह्या समाजाच्या दोन शाखा झाल्या. केशवचंद्रसेन यांच्या मनावर खिस्ती धर्मांचा पगडा बसून त्यांनीं इ. स. १८६८ त आपला निराळा पंथ काढला. तेव्हां मूळ शाखेस 'आदि ब्राह्मोसमाज' हें नांव पडलें. या पंथांचे प्रमुख देवेंद्रनाथ टागोर हे होते. हल्लीं बंगाल-मधील सुशिक्षितांतून ब्राह्मोसमाजाचे थोडे अनुयायी दृष्टीस पडतात. परंतु त्यांच्यामध्यें पूर्वीचा उत्साह दृष्टीस पडत नाहीं.

ब्रॉंझः—कथिल व तांबें या धातूंच्या मिश्रणानें तयार झालेली धातू म्हणजे ब्रॉंझ् ही होय. तंत्रदृष्ट्या हें अत्यंत महत्त्वाचें मिश्रण आहे. ऐतिहासिक दृष्ट्याहि हें मह-त्त्वाचें आहे; मानवानें बुद्ध्या, आपल्या उपयोगासाठीं म्हणून दोन धातूंचें केलेलें पहिलें मिश्रण केलें तें हें होय. ब्रॉंझ् हें तांबें अगर पितळ या दोहोंपेक्षां अधिक कठिण व टिकाऊ असतें. तें अधिक बळकटहि असतें.

प्राचीन हिंदु, ईजिप्शीयन, यूट्रस्कन, ग्रीक व रोमन या लोकांनीं ब्रॉंझ् धातूच्या बनावट (Fabrications) वस्तू करण्यामध्यें मोठें कौशल्य संपादन केलें होतें; याच-प्रमाणें, चाकू, कुऱ्हाडी, हातोडे, तरवारी, खंजीर, करवत वगैरे ब्रॉंझ धातूचीं तयार केलेलीं अनेक प्राचीन हत्यारें भूपृष्ठाच्या कांहीं भागांत विशेषतः स्मशानभूमींत सांपडतात, यावरून प्राचीन लोकांनीं या कलेंत मोठेंच कौशल्य संपादन केलें होतें यावद्दल शंका राहत नाहीं; तथापि प्राचीन लोकांना कथिल कोठून मिळालें या प्रश्नाचें उत्तर मिळत नाहींच.

इंजिनियरिंगमध्यें ब्रॉंझचा मोठ्या प्रमाणांत उप-योग केला जातो. यंत्राचें बेअरिंग, पंप, पंपाच्या दांड्या, बॉयलर माऊंटिंग, झडपा (Valves) तोट्या, नळ्या, बोल्ट वगैरे अनेक वस्तू ब्रॉंझच्या करतात व कलाक्षेत्रांत या धातूचा उपयोग पुतळे व शोभेच्या वस्तू बनवितांना करतात; तसेंच याचीं घरगुती कारणा-साठीं शोभेचीं भांडीं तयार करतां येतात. या धातूचा एक अत्यंत उपयोगी गुण म्हणजे या धातूनें बनविलेल्या वस्तूचा पृष्ठभाग अत्यंत तुळतुळीत व टिकाऊ करतां येतो. ब्रॉंझ धातूचीं नाणींहि आहेत. या धातूचा नाण्या-साठीं उपयोग फार प्राचीन काळापासून करण्यांत आला आहे.

ब्रिजेस, रॉबर्ट (१८४४–१९३०)—हा ब्रिटिश डॉक्टर व राजकवि (Poet Laureate) होऊन गेला. जन्म २३ आक्टोबर १८४४ रोजीं झाला. हा वाल्मरच्या व सेंट निकोलस कोर्ट, थॅनेट येथील आय. टी. ब्रिजेसचा मुलगा. त्याचें शिक्षण ईटन व कार्पस खिस्ती कॉलेज ऑक्सफर्ड येथें झालें. पुढें त्यानें सेंट बार्थोलोम्यूज, लंडन येथें वैद्यकीचा अभ्यास केला; नंतर ग्रेट आर-मॉंड स्ट्रीटमधील चिल्ड्रनन्स हास्पिटल् व ग्रेट नॉर्दन हॉस्पिटल्मध्यें १८८२ सालापर्यंत नोकरी केली. तो १८३२ सालीं सेवानिवृत्त झाला.

त्याच्या कवितांचीं कांहीं पुस्तकें वुर्सेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड येथील मि. डॅनियल यांनीं खासगी रीतीनें छापलीं होतीं. १८९० सालीं Shorter Poems व Achilles in Scyros हीं दोन छोटीं पुस्तकें नेहमींच्या मार्गानें प्रसिद्ध झाली. त्याच्या Eden ह्या संगीत संतकथेचें गायन बर्मिंगहॅम येथें प्रो. स्टॅनफोर्ड यानें केलें. यापुढें त्याचा वाचकवर्ग हळूं हळूं वाढूं लागला. १९१३ सालीं त्याला राजकवि करण्यांत आलें. त्याच्या काव्यांतील अनन्यसाधारण गंभीरता व त्याची उच्च दर्जाची कला यामुळें त्याला सामान्य लोकांत मान्यता मिळाली नाहीं; तथापि चांगल्या कलाकृतीच्या सर्व चाहत्यांकडून आधुनिक कवींतील अत्यंत अभिजात,

श्रेष्ठ कलावन्त असा पंडित कवि म्हणून त्यानें मान्यता मिळविली आहे. १८९३ सालीं प्रसिद्ध झालेल्या Milton's Prosody या ग्रंथांत इंग्लिश छंदोरचनेवर यानें सांगोपांग विवेचन केलें आहे. त्याच्या समग्र कवितांचा संग्रह १८९८–१९०५ मध्यें प्रसिद्ध झाला.


ब्रूटस, मार्कस ज्यूनीयस (इ.सनापूर्वी ८५–४२):– हा सीझरचा खून करणारापैकीं एक. त्याचा चुलता यंगर कॅटो याजकडून प्रजासत्ताक उमरावांच्या (Republican Aristocracy) सत्तेचें तत्त्व तो शिकला. हें तत्त्व त्याच्या मनावर चांगलें बिंबलें होतें; म्हणून त्यानें यादवीच्या वेळीं सीझरविरुद्ध पाम्पेचा पक्ष घेतला. फॉर्सलसच्या लढाईनंतर सीझरनें त्याला क्षमा केली व सिसल्पाइन गॉलचा गव्हर्नर केलें व पुनः बढती देण्याचें वचन दिलें. पण ब्रूटस हा रिपब्लिकन असल्यामुळें कॅसिअसनें त्याला वळवून सीझरविरुद्ध कटांत सामील करून घेतलें. असें सांगतात कीं ब्रूटसनें घाव घालताच सीझर मरतां मरतां म्हणाला, " ब्रूटस, तूंही उलटलास ! " ब्रूटस आणि कॅसिअस यांनीं अन्टोनी व ऑक्टेव्हीयन याजविरुद्ध फिलिपी येथें सैन्य नेलें (४२ इ. सनापूर्वी) सैन्याचा पराभव होतांच ब्रूटसनें आत्महत्या केली.

ब्लॅव्हॅटस्की, हेलेना पेट्रोव्हना (१८३१–१८९१):– थिऑसाफिकल सोसायटीची संस्थापिका हिचा जन्म रशियांत एकॅटर इनोस्लाव्ह येथें ३१ जुलै १८३१ रोजीं झाला. ही कर्नल पेटर हॅन याची कन्या. हिनें आपल्या वयाच्या सतराव्या वर्षी आपल्याहून वयानें बऱ्याच मोठ्या अशा निसेफोर ब्लॅव्हॅटस्की नांवाच्या कॉकेशियामधील एका अधिकाऱ्याशीं विवाह केला; पण लवकरच ती पतीपासून विभक्त झाली. तिनें लिहून ठेविलेल्या आपल्या हकीगतीवरून पुढील वीस वर्षें तिनें कॅनडा, मेक्सिको, टेक्सास येथें प्रवास करण्यांत घालविलीं. याच कालांत तिनें तिबेटांत प्रवेश मिळविण्याचा दोनदां प्रयत्न केला. १८७० सालीं संयुक्त संस्थानांत अध्यात्मवादी म्हणून प्रसिद्धीला आली. तेथें नागरिकत्वाचे हक्क मिळवून ती सात वर्षें राहिली. कर्नल आलकॉटच्या सहाय्यानें तिनें १७ नोव्हेंबर १८७५ रोजीं थिऑसाफिकल सोसायटीची स्थापना केली. कर्नल आलकॉट हा त्या संस्थेचा अध्यक्ष होता. त्या संस्थेचें मुखपत्र The Theosophist याचें संपादन त्यानें केलें.

पौर्वात्त्य वाङ्मयाचें पुष्कळसें ज्ञान भाषांतरद्वारा मिळवून गुप्त विद्येवर तिनें पुष्कळ विस्तृत लिखाण केलें. तिबेटांतील महात्म्याकडून आपल्याला स्फूर्ति झाली असें ती आपल्या अनुयायांना सांगत असे. १८७७ सालीं Isis unveiled आणि १८८८ सालीं The Secret Doctrine असे दोन ग्रंथ प्रसिद्ध केले. हे दोन्ही ग्रंथ संकलनाच्या स्वरूपाचे असून ते ज्या ग्रंथांच्या आधारानें लिहिले त्यांचें ऋण तिनें उल्लेखिलें नाहीं. हिंदुस्थानांत आणखी प्रवास करून ती लंडन येथें राहण्यास गेली; तेथें ता. ८ मे १८९१ रोजीं सेंट जॉन्स वूड येथें वारली.

ब्लॉक तयार करणें:–पुस्तकांतून किंवा वर्तमानपत्रांतून आपण जीं चित्रें छापलेलीं पाहतों तीं चित्रें त्या चित्राच्या ब्लॉकची छपाई असते. जस्ताच्या पत्र्यावर आपल्याला जें चित्र छापावयाचें असेल त्या चित्राची निगेटिव्ह घेऊन ती छापतात व डेव्हलप करतात. नंतर हा जस्ती पत्रा त्याच्या आकाराच्या लाकडी फळीवर बसवितात व मग त्याची छपाई होते.

मूळ चित्रापेक्षां कमी किंवा मोठ्या आकाराचे ब्लॉक करतां येतात. रेखाचित्रांची निगेटिव्ह घेतांना ती निगेटिव्ह ज्या आकाराचा ब्लॉक हवा असेल त्या आकाराची घेतात. पण फोटो किंवा रेखाचित्राव्यतिरिक्त इतर प्रकारच्या चित्रांचा ब्लॉक करावयाचा झाला तर निगेटिव्हच्यापुढें स्क्रीन–जाळी– ठेवतात. या स्क्रीनच्या रेषा ८५ (lines) ते २०० पर्यंत असतात. स्क्रीन घातल्यानंतर निगेटिव्ह घेऊन ती जस्ताच्या किंवा खूप छपाई करावयाची असेल व ब्लॉक्स बरेच दिवस टिकावेत अशी इच्छा असेल तर तांब्याच्या पत्र्यावर छापतात. रेखाचित्रावरून केलेल्या ब्लॉक्सना ' लाइन ब्लॉक ' व इतरांना ' हाफ्टोन ' ब्लॉक म्हणतात. स्क्रीनमुळें पत्र्यावर नुसते ठिपके येतात व अशा या ठिपक्यांचेंच चित्र तयार होतें. एकापेक्षां अधिक रंगांत चित्र छापावयाचें असल्यास जितक्या रंगांत चित्र छापावयाचें तितके निरनिराळे ब्लॉक्स करून ते त्या त्या रंगांत छापतात. रंगीत चित्रांचे ब्लॉक्स करण्यापूर्वी त्या त्या रंगाची निगेटिव्ह निरनिराळीं फिल्टर्स वापरून घेतात. पिवळा, निळा व तांबडा या तीन रंगांतील ब्लॉक्स रंगीत कामासाठीं विशेषेंकरून





आ. १



पूर्ण काळा "हाफटोन" पूर्ण पांढरा

आ. २

आकृति नं. १ मोठी केलेली आकृति नं. २ मध्यें दाखविली आहे. आकृति नं. २ अदमासें ८ फूट अंतरावरून पाहिली असतां, हें प्रत्यक्ष ध्यानांत येईल.

करतात. यांना 'थ्री कलर' ब्लॉक्स म्हणतात. निरनिराळ्या बारा रंगांचे निरनिराळे ब्लॉक्स करून छापलेलीं चित्रेंहि क्वचित पाहावयास मिळतात. जितके रंग अधिक तितकी वास्तवता अधिक. सोबतच्या चित्रांवरून हाफ्टोन ब्लॉक्समध्यें ठिपके कसे असतात हें दिसून येईल.

ब्लेक, रॉबर्ट (१५९९-१६५७):-हा एक इंग्लिश ॲडमिरल होऊन गेला. पार्लमेंटच्या सैन्यांतील तो एक रिसालदार होता. १८४४-४५ मध्यें टॉंटॉन जिंकण्यांत व त्याचें संरक्षण करण्यांत त्यानें नांव मिळविलें. टॉंटॉन त्यानें एक वर्षभर ताब्यांत ठेवलें. १६४९ सालीं ब्लेकला कॉमन वेल्थच्या आरमाराचा अधिपती करण्यांत आलें. राजाच्या आरमाराचें आधिपत्य प्रिन्स रुपर्टकडे होतें. ब्लेकनें त्याला भूमध्य समुद्रांत हाकलून त्याच्या बऱ्याचशा जहाजांचा नाश केला. डच युद्धाच्या वेळीं आरमाराचें आधिपत्य याच्याकडेच होतें (१६५२-५४). या युद्धांत त्यानें डी विट, डी रुयटर व व्हॅन ट्रॉम्प या धुरंधर डच अडमिरलांना आपलें पाणी दाखविलें. त्याच्या यशाचें श्रेय कांहीं अंशीं सर हॅरी वेन यांच्या कुशल संघटनेला व व्यवस्थेला दिलें पाहिजे. १६५५ सालीं लढाऊ जहाजांच्या एका काफिल्याचें आधिपत्य स्वीकारून त्यानें पोर्टो फॅरिना ट्यूनिस येथें मूरिश आरामाराचा नाश केला.

१६५७ सालीं स्पॅनिश आरमाराच्या एका काफिल्याचा पूर्ण नाश करून त्यानें आपल्या पराक्रमावर कळस चढविला.

ब्लेक, विल्यम (१७५७-१८२८):-हा एक गूढवादी कवि व कलावन्त लंडनमधील एका मोजे विकणाऱ्या व्यापाऱ्याचा मुलगा. याचा जन्म १७५७ सालीं झाला. त्याच्या वयाच्या चौदाव्या वर्षी त्याला एका खोदीव काम करणाऱ्याकडे शिकाऊ उमेदवार म्हणून ठेवण्यांत आलें. ही उमेदवारी संपल्यावर तो कांहीं काल रॉयल ॲकेडमींत विद्यार्थी होता. कित्येक वर्षे पुस्तकविक्रयांच्या करितां खोदीव काम करून त्यानें आपली उपजीविका चालविली. १७८२ सालीं कॅथेरिन बाऊचर या एका निरक्षर मुलीशीं त्यानें विवाह केला. तिला त्यानें लिहिणें वाचणें शिकविलें. त्याच्या सहवासांत ती खोदीव कामही शिकली. पतीनें केलेल्या खोदीव कामांत तिनें साह्य केलें. त्यांचें परस्परांवर अतिशय प्रेम होतें. ब्लेक हा गूढवादी. नेहमीं मनोराज्य करण्यांत, कल्पना साम्राज्यांत मग्न. त्याच्याशीं देवदूत भाषण करावयाचे, त्याच्या दृष्टीपुढें निरनिराळे देखावे दिसावयाचे. तो उत्तम कलावन्त होता; पण नेहमीं कल्पनाविलासांत दंग होत असल्यामुळे व्यवहाराला पारखा झाला होता. त्याची पत्नी अत्यंत प्रेमळ असून पतीला देवाप्रमाणें पूज्य मानत असे. घरांत अठराविश्वें दारिद्र्य असूनहि तिनें मोठ्या धैर्यानें संसारशकट हाकला व पतीला सुखी केलें. त्यांचें वैवाहिक जीवन खरोखरींच आदर्श होतें.

१७८३ सालीं त्यानें Poetical Sketches नांवाचें आपलें कवितांचें पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांत चित्रें नव्हतीं. त्याचें पुढील पुस्तक Songs of Innocence हें कोणीहि प्रकाशक प्रकाशनार्थ घेईना. म्हणून त्यानें आपल्या कविता छापण्याची नवीपद्धति शोधून काढली. त्यानें तांब्याच्या पत्र्यावर आपल्या कविता लिहिल्यासभोंवतीं वेलबुट्टया काढल्या व या पत्र्याच्या साह्यानें आपल्या सर्व कविता छापल्या. यापुढील

आपल्या कविता त्यानें याच पद्धतीनें छापल्या. त्याचीं कांहीं सुप्रसिद्ध काव्यें Gates of Paradise, Book of Thel; Marriage of Heaven and Hell; Songs of Experience; Book of Urizen; Song of Los इत्यादि आहेत.

भ

भगदत्तः—प्राग्ज्योतिष देशाचा राजा भौमासुर व भूमि यांचा हा मुलगा. इंद्राचीं कवचकुंडलें याच्या बापानें हरण केलीं; त्यामुळें याच्या बापाला व सात भावांना कृष्णानें ठार मारिलें; यालाहि या प्रसंगीं मृत्यु यावयाचा पण भूमीनें कृष्णाजवळ याच्या प्राणांची याचना केल्यामुळें हा वांचला.

बापाच्या मागून हा प्राग्ज्योतिष देशाचा राजा झाला. याच्या राजधानीचें नांव ' प्राग्ज्योतिषपुर ' असें होतें. भगदत्ताला चीन, किरात इ. देशांचा आश्रय असे. पांडवांच्या राजसूय यज्ञाच्या वेळीं भगदत्ताचा पराभव झाल्यामुळें त्यास पांडवांना बरीचशीं संपत्ति द्यावी लागली. कर्णदिग्विजयाच्या वेळी याचा कर्णाकडून पराभव झाला. भारतीय युद्धांत हा कौरवांच्याकडे होता. या युद्धांत त्याला भीम व अर्जुन यांच्याबरोबर लढावें लागलें. म्हातारपणामुळें याला आपल्या लांब पापण्या तोलत नसत. म्हणून हा पापण्यांना पट्टा लावून भारतीय युद्धांत याच्या पापण्यांचा पट्टा तोडून यास अर्जुनानें मार्गशीर्ष वद्य दशमीस ठार मारलें. भगदत्त गजयुद्धांत निपुण होता. हा पंडूचा मित्र होय.

याला कृतप्रज्ञ व वज्रदत्त असे दोन मुलगे होते. यांपैकीं कृतप्रज्ञ नकुलाबरोबर लढत असतां मेला. प्राग्ज्योतिषपूर म्हणजे सध्यांचा आसाम देश होय. आसामांत सध्यांहि पुष्कळ हत्ती आहेत.

भगवद्गीताः—हा तत्त्वज्ञानात्मक, नीतिशास्त्रात्मक असा अत्यंत तेजस्वी व फार उच्च संस्कृत ग्रंथ आहे. जगांत तत्त्वज्ञानविषयक जे अनेक ग्रंथ आहेत त्यांमध्यें या ग्रंथाचा अनुक्रम पुष्कळच वर लागेल. पाश्चात्य लोकांना संस्कृत विद्येची अभिरुचि जशी शाकुंतल नाटकानें लावली तशीच श्रीमत्‌भगवद्गीतेनें पौर्वात्य तत्त्वज्ञानाची गोडी तिकडील आधुनिक विद्वानांना लावली.

भगवद्गीता हा महाभारतांतील एक तत्त्वचर्चेचा प्रसंग आहे. उपनिषदामध्यें जशी गंभीर तत्त्वचर्चा आहे तशीच गीतेमध्यें आहे. महाभारत हा ग्रंथ वैविध्यपूर्ण आणि वैचित्र्ययुक्त अशा विश्वाचें व मानवी आयुष्याचें प्रगल्भ विवेचन करणारा ग्रंथ आहे. महाभारतकालीं जी सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक अशी परिस्थिती होती तिचें परिणत फल गीतेच्या तत्त्वज्ञानाच्या रूपानें बाहेर पडलेलें आहे. ऋग्वेदसंहितेपासून तों भारतीय युद्धापर्यंतचा काल जवळ जवळ दोन हजार वर्षें असावा. त्याहि कालांतील दिव्य विचार गीतेमध्यें प्रगट झाले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. गीतेंतील तत्त्वज्ञानाचें स्वरूप काय आहे व भारतीय तत्त्वज्ञानांत, किंबहुना जागतिक तत्त्वज्ञानांत गीतेचें स्थान कोणतें, याचें विवेचन पुढें क्रमप्राप्त येईलच. प्रथम गीतेच्या कालाविषयीं थोडी माहिती देतों.

सर्व जगांत ऋग्वेदसंहिता ही अत्यंत प्राचीन असून तिचा काल विद्वानांच्या मतें खिस्तपूर्व पांच हजार किंवा त्याहि मागें असा आहे. ऋग्वेद संहितेनंतर बऱ्याच वर्षांनीं महाभारताचा काल येतो. भगवद्गीतेच्या कालाविषयीं चर्चा अनेक पाश्चात्य व भारतीय विद्वानांनीं केलेली आहे. त्यामध्यें कै. डॉ. भांडारकर, तेलंग, चिंतामणराव वैद्य, दीक्षित, इत्यादि प्रमुख होत. लोकमान्य टिळकांनीं आपल्या गीतारहस्य ग्रंथांतील परिशिष्टामध्यें हल्लींच्या गीतेचा काल ठरविला असून सांप्रतची भगवद्गीता खिस्त शकापूर्वी सुमारें पांचशें वर्षें अस्तित्वांत आली होती असा त्यांनीं निर्णय दिलेला आहे. त्यानंतर अलीकडे श्री. मोडक, श्री. लेले, श्री. दप्तरी, कै. श्री. केतकर आणि केसरीचे संपादक श्री. करंदीकर यांनींहि भगवद्गीतेच्या कालाविषयीं पुष्कळच उहापोह केलेला आहे.

पाश्चात्य विद्वानांची प्रवृत्ति वैदिक वाङ्मय व गीता यांचा काल शक्य तितका अलीकडे आणण्याची आहे. तर भारतीय विद्वानांची प्रवृत्ति वस्तुस्थिति सप्रमाण मांडण्याकडे आहे. कालनिर्णय ठरवितांना जे आधार त्यांना ग्राह्य वाटले त्यांवरच त्यांची भिस्त आहे. विद्वत्कुलशेखर कै. भारताचार्य वैद्य यांनीं शकपूर्व ३१८० हा भारतीय युद्धाचा काल ठरविला होता; पण तो ज्योतिर्गणितानें भारतांतील वचनांशीं जमत नाहीं असें श्री. ज. स. करंदीकरांचें म्हणणें आहे. श्री. करंदीकर व श्री. दप्तरी यांच्यामध्यें हा वाद कांहीं दिवस चाललेला होता. तो वाद उज्जयनीच्या माधव

कॉलेजचे प्रिन्सिपाल श्री. गो. स. आपटे यांच्यापुढें लवादपंच या नात्यानें चालला. श्री. आपटे यांनीं दप्तरींच्या बाजूनें निकाल न देतां श्री. करंदीकरांच्या बाजूनें दिला व भारतीय युध्द शकपूर्व २०१९या वर्षीं घडलें असें ठरविलें. श्री. करंदीकरांनीं गेल्या जानेवारींत केसरीमध्यें पुन्हां यासंबंधानें उहापोह केला व तो मुख्यतः फलज्योतिषदृष्ट्या केलेला आहे. महाभारतांत शकपूर्व २००९ मार्गशीर्ष शुद्ध ११ रोजीं जी ग्रहस्थिति होती, महाभारतांतील इतर वचनें निरनिराळ्या ग्रहांच्या स्थितीचें जें वर्णन करतात, त्यांचें सूक्ष्मदृष्ट्या त्यांनीं परीक्षण केलें आहे; आणि शकपूर्व २००९ हा भगवद्गीतेचा निश्चित काल त्यांनीं ठरविला आहे. शकपूर्व २००९ म्हणजे खिस्तपूर्व १९३१ वर्षें हा भारतीय युद्धाचा म्हणजे गीतेचा काल ठरला. त्याच्याहि पूर्वीं दोन हजार वर्षें ऋग्वेदसंहितेचा काल आहे. भारतीय युद्ध मार्गशीर्ष शु. ११ रोजीं शकपूर्व २००९ चालू झालें. अलीकडे गीताजयंति या दिवशींच पाळतात. तात्पर्य गीतेच्या कालाचा विचार हा थोडक्यांत असा आहे.

सांप्रतची गीता अठरा अध्यायांची व सातशें श्लोकांची आहे. मद्रासकडील शुद्धधर्म महामंडळानें जी गीता प्रकाशित केली आहे तींत अठरांपेक्षां अधिक अध्याय असून श्लोकहि सातशेंपेक्षां अधिक आहेत. कांहीं ठिकाणीं संशोधनानें आढळलेले अधिक श्लोक तर कांहीं ठिकाणीं आढळलेले कमी श्लोक यांची वजावाट करतां प्रस्तुत लोकांच्या हातीं जो गीताग्रंथ आहे त्यांत कृष्णार्जुन संवादांतील सार आलेलें आहे असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

दोन्ही बाजूचीं सैन्यें युद्धास सुसज्ज झालेलीं, अठरा अक्षौहणी म्हणजे प्रचंड सेनासागर युद्धास उभा ठाकलेला (अठरा अक्षोहणीमध्यें ३९३६६० रथ, तितकेच हत्ती, ११८०९८० अश्व व १९६८३०० पायदळ होतें) अशा वेळीं हा सातशें श्लोकांचा अठरा अध्यायांचा ग्रंथ सांगितला असेल हें मुळींच शक्य नाहीं. युद्धाचे वेळीं अर्जुनाची विषण्णता, धर्मसंमूढता, दिङ्मूढता घालविण्याकरितां प्रश्नोत्तररूपानें हा संवाद झालेला असावा. तोच पुढें व्यासांनीं महाभारतांत श्लोकबद्ध करून मांडला आहे. महाभारताचा विकास-सुद्धां मूळ 'जय,' नामक ग्रंथ नंतर 'भारत,' व त्याचे पुढें महाभारत अशा स्वरूपानें झालेला आहे. मूळ महाभारताचें स्वरूपहि फारसें विस्तृत नसावें. अनेक कथा, उपकथा, आख्यानें आणि सामाजिक जीवनांतील विविध विषयांची चर्चा हीसुद्धां महा-भारतांत मागाहून आलेली असावी. गीतेच्या अठरा अध्यायांचा विस्तार गीतेला सर्वमान्य स्वरूप आण-ण्याचें दृष्टीनें झालेला दिसतो. गीता सांगण्याचा प्रसंग, गीतापूर्वकालची स्थिति, श्रीकृष्णार्जुनाचें सख्य हा सर्व प्रसंग ध्यानांत घेतल्यास संक्षिप्त व तात्पर्यस्वरू-पांत अर्जुनाच्या प्रश्नांचीं उत्तरें श्रीकृष्णानें दिलेलीं असावींत.

जय नामेऽति हासोऽयं श्रोतव्यो विजिगीषुणा।
हा जय नामक ग्रंथ विजिगिषूनें ऐकावा. जय ग्रंथांत जयाचा म्हणजे अर्जुनाचा इतिहास आहे. त्यावरून मूळ गीता पांच अध्यायांच्या अखेर समाप्त झाली असावी असें मला वाटतें नि अनेक विद्वानांनाहि तसें वाटतें. सहाव्या अध्यायापासून जे विषय गीतेंत आलेले आहेत ते तत्कालीन लोकांत जीं निरनिराळीं मतमतांतरें होतीं आणि जे तत्त्वज्ञानाचे विविध पंथ होते त्या सर्वांचें संकलन करण्याच्या उद्देशानें रचलेले आहेत. समाजांतील सर्व तत्त्वविचारप्रवाहांचें संक-लन करून त्याच्या कोंदणांत गीतेंतील तत्त्वज्ञानरूपी हिऱ्याचा खडा कसा खुलून दिसतो, इतर मतांपेक्षां गीतेचें तत्त्वज्ञान कसें श्रेष्ठ आहे, हें दाखविण्याकरितां निरनिराळ्या अध्यायांची आवश्यकताहि होती.

गीतेच्या पहिल्या अध्यायामध्यें अर्जुनानें युद्ध न करण्याचीं स्वजनवध, कुलक्षय, पाप, संसार, बंधन इत्यादि अनेक कारणें दिलेलीं आहेत. त्या सर्वांचें निरसन करून युद्ध करणें हें शात्रधर्मोचित आहे, समष्टिदृष्ट्या तुला युद्ध अपरिहार्य आहे, एवढें श्रीकृष्णानें अर्जुनाला पटवून दिल्यानंतर मुख्य गीतेचा विषय 'कर्मयोगो विशिष्यते' या सिद्धांतानेंच संप-लेला आहे. सारांश रणांगणावर अठरा अध्याय गीता सांगितली नाहीं, ती श्लोकबद्ध सांगितली नाहीं, थोड-क्यांत प्रश्नोत्तररूपानें कृष्णार्जुनांचें झालेलें संभाषण पुढें व्यासांनीं श्लोकबद्ध करून मांडलें.

भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानाचें स्वरूप पाहाण्यापूर्वीं तत्त्वज्ञान म्हणजे काय, तें कसें उत्पन्न होतें याचाहि थोडा विचार अवश्य आहे. कोणतेंहि तत्त्वज्ञान हें परिस्थितिसापेक्ष असतें. परिस्थितिनिरपेक्ष तत्त्वज्ञान असूं शकत नाहीं. भगवान् बुद्ध, खाइस्ट व पैगंबर

हे ज्या काळांत जन्मले त्या कालपूर्वीच्या विचारांचें परिणत फल त्यांच्या तोंडून बाहेर पडलें. भक्तिप्रधान भाषेंत शिकविता धनी परमेश्वर ही जी भाषा बोलत असत, त्या ठिकाणीं अलीकडे परिस्थिति माणसाला बोलवते, परिस्थितिसापेक्षच विचार तत्त्ववेत्ता प्रगट करतो असें सिद्ध झालेलें आहे. हाच नियम गीतेला लागू आहे.

मानव समाजाची प्रगति, वासना, यंत्रणा व साधना म्हणजे इच्छा, शरीर व कर्म या त्रयीनें होते. प्रथम कर्म करावयाची इच्छा, नंतर तें कर्म ज्याचे द्वारां करावयाचें त्याची निर्मिती आणि नंतर कल्पिलेल्या कर्माची सिद्धि, असा हा क्रम आहे. समाजाकडून विचारपूर्वक व विकारयुक्त अशीहि कर्में घडतात. या कर्मांचीं शास्त्रदृष्ट्या छाननी करून सिद्धांत सांगण्याचें काम इतिहास करतो; आणि हा सर्व प्रपंच म्हणजे काय, तो आला कोठून, जातो कोठें, त्याचें होणार काय असा विचार तत्त्वज्ञान करतें. तत्त्वज्ञानाची पद्धति व उपपत्ति अनेक असल्या तरी त्या सर्व संशयग्रस्त आहेत. म्हणजे समाधानकारक उपपत्ति एकहि नाहीं. मात्र असें कांहीं तत्त्वज्ञान असलें म्हणजे बरें वाटतें व त्यावर त्या काळच्या लोकांचा विश्वास बसतो.

तत्त्वज्ञान हें समाजांतील ज्ञानसंपादनाच्या विविध प्रयत्नांचें फल होय तत्त्वज्ञान हें त्या त्या समाजाच्या जीवितयात्रेचें स्पष्टीकरण करतें. तत्त्वज्ञान हें भवसागरांतील समाजरूपी नौकेचें होकायंत्र आहे. या होकायंत्राप्रमाणें समाजाच्या गतीची दिशा ठरते. धार्मिक, नैतिक, राजकीय, आर्थिक इतिहास तत्त्वज्ञानावरून सांगता येतो. तत्त्वज्ञानामुळें क्रांति होते. किंवा क्रांतीमुळेंहि तत्त्वज्ञान बदलतें. तत्त्वज्ञानावरून इतिहास सांगता येतो, किंवा इतिहासावरून तत्त्वज्ञान शोधता येतें.

ज्ञान, इच्छा व प्रयत्न अशा परंपरेनें समाजांत प्रयत्न चालतात. समाजाचें ज्ञान तर्कशुद्ध पद्धतीनें मांडलें कीं त्याला शास्त्र म्हणतात. सर्व शास्त्रांचे निष्कर्षभूत सिद्धांत म्हणजे तत्त्वज्ञान होय !

प्रवर्तक व निवर्तक असे तत्त्वज्ञानाचे दोन भेद आहेत. औपनिषद् तत्त्वज्ञान हें पूर्ण परिणत विचाराचें फल आहे. धर्म, नीति, व्यवहार परमार्थ किंबहुना सर्व मानवी प्रवृत्तींना धरून तें तत्त्वज्ञान आहे व त्यांतूनच गीता उत्पन्न झालेली आहे.

गीतातत्त्वज्ञान हें गीतेनंतर झालेल्या भाष्यावरून व टीकेवरून न पाहतां गीतापूर्वकालीन वाङ्मयावरून पारखलें पाहिजे. भारतीय आर्यांनीं जेव्हां भारतवर्षांत संस्कृति निर्माण केली, तेव्हां त्यांची वृत्ति आक्रमणशील व जयिष्णु होती. त्या वृत्तीचें तत्त्वज्ञान गीतेंत आहे. तुष्टि, पुष्टि व हृष्टि या भावना आर्यांमध्यें खेळत होत्या. अर्थात् त्या दृष्टीनेंच त्यांनीं धर्म, नीति, व्यवहार व परमार्थ या संबंधाचें तत्त्वज्ञान सांगितलेलें आहे. गीतापूर्ववाङ्मयामध्यें गीतेच्या तत्त्वज्ञानाचा उगम आहे. जगत् आनंदमय आहे, कर्तव्याकरितां जन्म आहे, शेकडो वर्षें जगावें, उपभोगावें, राज्य करावें अशा आकांक्षा व्यक्तविल्या आहेत. म्हणूनच भगवद्गीतेंत कर्म, बुद्धि, धृति, तप, दान, सात्त्विकबुद्धि, शुध्दबुध्दि यांचें महत्त्व फार सांगितलें आहे. अर्थात् त्या दृष्टीनें गीतेचा उपक्रम उपसंहार पाहून तें तत्त्वज्ञान प्रवर्तक का निवर्तक हें ठरविलें पाहिजे.

समाज आला कोठून व जातो कोठें या बिकट प्रश्नाचें उत्तर तत्त्वज्ञानच देतें. तत्त्वज्ञान हें गंभीर स्वरानें व शहाण्या मुद्रेनें पृथ्वीतलांतील भिकार बाजार कोठें आहे हें सांगतें. भिकार बाजारांतील भोळीभाबडी व भोंदू माणसें तें भाविकपणानें ऐकतात. जसें ज्याचें तत्त्वज्ञान तसा त्याचा प्रपंच हा सिद्धांत आहे. विवक्षितकाळीं कोणताहि समाज घ्या, त्यांत कोणतें तत्त्वज्ञान नांदत आहे एवढें कळलें म्हणजे त्याचें चरित्र कोणत्या प्रकारचें आहे व कोणत्या स्वरूपाचें होईल याचें स्थूल अनुमान बांधता येतें.

तात्विक कल्पनांचा व मानव समाजाच्या चरित्राचा बिंबप्रतिबिंबरूप संबंध आहे. ऋग्वेदांतील निरनिराळीं सूक्तें व त्यांतील शत्रुनाशाच्या प्रार्थना पाहिल्या म्हणजे तत्कालिन समाज हा भोगप्राप्ति व शत्रुनाश यांच्यामागें होता असें दिसतें. त्यानंतर बुद्धतत्त्वज्ञान उत्पन्न झालें. त्यांत भूतदया, निर्वाण, संन्यस्त वृत्ति, अप्रतिकार वगैरे तत्त्वें होतीं. दुष्टावरहि दया करावी, मरणोत्तर शून्यप्राप्ति होते अशी खात्री जेथें झाली तेथें शकयवनकिरातादि रानटी, बुभुक्षु लोकांनीं सुसंस्कृत लोकांवर राज्य करावें व या सुसंस्कृत लोकांनीं भिक्षु बनून प्रपंचाचा चुथडा करावा हें ओघानेंच येतें.

श्रीमत् भगवद्गीतेंत कर्मसंन्यासाचा व क्लैब्याचा अवलंब करण्याचा निषेध केला आहे. भूतदया म्हणजे शांति नव्हे. कौशल्याचें कर्म करून दुष्टदंडन करावें हें गीतेंतील तत्त्वज्ञान. या सिद्धांताचें प्रतिबिंब समाजाच्या मनावर पडलें म्हणूनच शकयवनादि म्लेंच्छांना हांकून लावून शातवाहनादि हिंदु राजांनीं आपलीं राज्यें स्थापिलीं. चालुक्याच्या वेळचे मराठे अपमानाचें उट्टें प्राण देऊन व घेऊन करीत, असें चिनी प्रवासी व्हांग संग लिहितो. डॉ. भांडारकर दख्खनच्या इतिहासांत त्याबद्दल असें लिहितात कीं:— If any one insults them they will risk their lives to wipe out that insult.

गीतेच्या तत्त्वज्ञानाचें स्पष्ट स्वरूप पुढील चार प्रश्नांच्या उत्तरांत आहे:— (१) कर्म म्हणजे काय? (२) तें कां केलें पाहिजे? (३) कोणतें कर्म करावें, कोणतें न करावें? (४) व तें कसें करावें? गीतापूर्वकालचा समाज हा विजिगिषु, प्रवृत्तिपर व आक्रमणशील असा होता. अर्थात् अशा समाजाचें कर्म हें नित्य, नैमित्तिक, काम्य आणि प्रायश्चित्त एवढ्यांत कधींच गुरफटून राहाणें शक्य नाहीं. म्हणून गीतेनें कर्म म्हणजे प्राणिमात्राची होणारी यच्चयावत् हालचाल अशी व्यापक व्याख्या ठरविली आहे. यामध्यें श्वासोच्छ्वास करणें, जिवंत राहणें, मरणें हींसुद्धां कर्मेंच होत. सर्व जग हा कर्माचा विपाक आहे. शरीर हें कर्मफल आहे. जगत् ही कर्मभूमि आहे. म्हणून मनुष्यानें कर्म केलें पाहिजे, असें गीतेचें उत्तर आहे.

कर्म कां केलें पाहिजे या संबंधानें गीतेंतील तिसऱ्या अध्यायामध्यें फार मार्मिक व युक्तीला पटणारीं अशीं प्रमाणें दिलीं आहेत. तीं अशीं:-(१) कोणीहि मनुष्य क्षणभरसुद्धां कर्माशिवाय राहूं शकत नाहीं. (२) शरीराचा व्यापारहि कर्माशिवाय चालणार नाहीं. (३) कर्माचा सर्वथा त्याग देहधारी माणसास शक्य नाहीं. (४) हें सृष्टिचक्र यज्ञमूलक आहे, तें चालण्यास प्रत्येकानें आपापलें कर्म केलें पाहिजे. स्वतः कांहीं न करतां जो दुसऱ्याच्या कर्माचा उपभोग घेतो, तो चोर होय! (५) ज्ञानीसुद्धां लोकसंग्रहार्थ सामान्य जनांचा बुद्धिभेद होऊं नये म्हणून अनासक्त बुद्धीनें कर्म करतो. मग इतरांनीं तर तें अवश्य केलें पाहिजे. (६) एकाद्यानें कर्म न केलें तर ती उणीव भरून काढण्याकरितां कुणाला तरी तें कर्म करावें लागतेंच. त्यामुळें लोकांना त्रास होतो. (७) ईश्वर स्वतः आळस देण्यापुरताहि न थांबतां कर्मामध्येंच निमग्न असतो. ईश्वर जर तसें न करील तर जग बुडेल. मनुष्यावरहि त्याच्या शक्तीच्या मानानें हें जगत्चक्र चालविण्याची जबाबदारी आहे, म्हणून त्यानेंहि कर्म केलेंच पाहिजे.

मनुष्यानें कोणतें कर्म करावें व कोणतें न करावें याबद्दलचें गीतेचें उत्तर मार्मिक आहे. गीता म्हणते, 'आपल्या स्वभावानें नियत केलेलें कर्म करावें, म्हणजे आपले जे संस्कार, जो स्वभाव व जी परिस्थिति असेल त्याचा विचार करून समाजाच्या धारणपोषणाकरितां जीं अनेक कर्में आवश्यक असतात त्यांतील जें कर्म उत्तम नि कौशल्यानें करतां येईल तें समष्टिहितार्थ करावें.

कर्म कसें करावें या प्रश्नाचें उत्तर आसक्ति व अहंकारनिरहित कर्म करावें असें आहे. 'कर्मण्येवाधिकारस्ते' या अ. २ श्लो. ४७ मध्यें या प्रश्नाचें सुंदर विवेचन आहे. कर्म करणें ही माणसाच्या हातांतील गोष्ट आहे, पण अमुकच फल मिळणें व तें अमुक दिवसांत मिळणें हें मुळींच शक्य नाहीं. कर्माचें फल कर्मपरिपाकदृष्ट्या जें व्हावयाचें तें मिळतच असतें. कर्मसृष्टीचे ज्ञात व अज्ञात व्यापार मनुष्याला समजत नसतात. त्यांशीं मनुष्यप्रयत्नाचा संयोग झाला म्हणजे कर्माच्या नियमानें कर्माची हाव न ठेवली तरी जें फल मिळावयाचें तें मिळतेंच. म्हणून फलाशा ही दुःखकारक आहे. फलाबद्दल हावरेपणा न ठेवतां यथाधिकार व्यवहारसिध्यर्थ या अनादि कर्मप्रवाहांत जें कर्म आपल्या वाट्यास आलेलें असेल तें लहान मोठें कर्म शांतपणें करावें. उत्तमांत उत्तम यत्न करून कर्मविपाकानें जरी वाईटांत वाईट फल आलें तरी तेंहि घेण्याची मनाची तयारी ठेवावी.

अनासक्तीनें कर्म कसें करतां येतें याविषयीं गीतेमध्यें ईश्वराचाच दृष्टांत दिलेला आहे. ईश्वर जसा निष्काम कर्म करतो तसेंच मनुष्यानें करावें, व्यष्टि-समष्टि, ईश्वर, निसर्ग अशा शब्दांनींहि गीतेंतील विषय मांडलेला आहे. व्यष्टि ही अल्प शक्तिमान तिच्या मानानें समष्टि ही अधिक शक्तिमान्, व्यष्टि ही समष्टीची घटक असते व समष्टीची प्रतिनिधि असते. समाज हा निधि व व्यक्ति हा प्रतिनिधि म्हणून आपण निमित्तमात्र आहोंत या भावनेनें कर्म करावें, सात्विक कर्त्याचें लक्षण अंगीं बाणवावें, धैर्यानें व उत्साहानें अहंपणा सोडून फलाची अपेक्षा न ठेवतां सतत चिकाटीनें कर्म करावें, असें कर्म करणें हीच ईश्वराची

पूजा, हीच ईश्वराची आराधना असा गीतेचा सिद्धांत आहे. आत्म्याचें अमरत्व, देहाचें नश्वरत्व, ईश्वराचें अस्तित्व व सर्वव्यापकत्व, पुनर्जन्म, चैतन्याचा विकास म्हणजेच हें जग, सर्वत्र चैतन्याची दृष्टि ठेवून अखंड कर्म करून उपासना करावी वगैरे अनेक महत्त्वाचे व तात्त्विक विषय गीतेमध्यें आलेले आहेत. त्या विवेचनाकरितां मोठमोठे ग्रंथहि झालेले आहेत. असो !

भारतीय तत्त्वज्ञानांत गीतेचें स्थान फारच उच्च आहे. किंबहुना जगाच्याहि तत्त्वज्ञानांत गीतेचें स्थान फारच वरचें आहे. सृष्टीच्या बुडाशीं जें आदितत्त्व आहे त्याचा पत्ता अद्याप कोणालाहि लागलेला नसला तथापि त्यासंबंधाचें तर्कशुध्द विवेचन गीतेइतकें अन्यत्र आढळत नाहीं. जगाचें कोडें कसें सोडवावें, कर्म करून त्याच्या बंधनांतून कसें सुटावें, अहंकार व आसक्तिविरहित कर्म करून आत्मोन्नति कशी साधावी आणि आयुष्याचें परमध्येय जें परमशांति तें संपादन करून शांतिस्वरूपांत शेवटीं कसें लीन व्हावें, याचें विवेचन जगांतील तत्त्वज्ञानविषयक ग्रन्थांमध्यें जें आढळतें त्यापेक्षां गीतेंतील विवेचन फारच बुद्धिग्राह्य आहे, असें डॉ. बेझंट, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी आणि अनेक प्राश्चात्य विद्वान् यांचें मत आहे. गीतेनें देहाव्यतिरिक्त आत्मा, सर्वनियामक ईश्वर, पुनर्जन्म, कर्मफलप्रक्रिया इत्यादि सिद्धांत मान्य केलेले आहेत. त्यांची स्थिति अशी आहे कीं एक सिद्धांत पटला कीं त्यापुढें क्रमानें इतर सर्व पटतात व मान्य करावे लागतात. प्रत्येक जीवाला म्हणजे माणसाला ब्रह्म अथवा ईश्वर होण्याचा अधिकार, पात्रता आणि शक्ति असून चित्तशुद्धि करून घेऊन हृदयस्थ परमेश्वराच्या प्रसादानें प्रत्येकानें स्वतः आपला उद्धार करून घ्यावा असें गीतेचें स्वावलंबी व बुद्धिवादी तत्त्वज्ञान आहे.

भारतीय तत्त्वज्ञानांत उपनिषदांच्या बरोबरीनें गीतेला मान आहे. प्रसिद्ध अशा चार आचार्यांचीं आणि मोठमोठ्या पंडितांचीं गीतेवर भाष्यें व टीका आहेत. कोणत्याहि संप्रदायाला गीतेवांचून पूर्णता नाहीं. उपनिषद्पूर्व वैदिक वाङ्मय आणि वैदिक संस्कृति यांचें गीता हें परिणत फल आहे. गीताकालीं संस्कृतिस्थापना, समाज–संस्थापना, ऐहिक सुखोपभोग, बुद्धिप्र... यांचा प्रभाव दाखविण्याच्या आकांक्षा होत्या. गीताकालीं समाज गतिशील होता. निवृत्तिपरता, दुःखवाद, सहिष्णुता इत्यादि भावना गीतेंत नाहींत. तो सर्व विषय बुद्धोत्तर कालांत आलेला आहे. गीता कर्म करण्याचा अट्टाहासानें उपदेश करीत आहे. असा खणखणीत उपदेश भारतीय तत्त्वज्ञानांत नाहीं म्हटला तरी चालेल. गीतेंत सात्विक सुखवाद आहे. शुद्ध बुद्धीनें सतत कर्म करण्याचा उपदेश आहे. सृष्टीचें विविध ज्ञान, सत्कला, ममता, प्रेम, सौंदर्याची अभिरुचि, ऐश्वर्य, शारीरिक मानसिक सुख हीं सर्व आवश्यक आहेत, असें गीता म्हणते. जगांत आनंद आहे, मनुष्य कर्म करण्याकरितां जन्मलेला आहे, कर्म करण्यांत व त्याचें फळ भोगण्यांतहि आनंद आहे, म्हणून गृहस्थाश्रम, समाजसंस्था व संस्कृतीचीं विविध अंगें आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद, अर्थशास्त्र, वास्तुविद्या, शिल्पकला इत्यादि सर्वांची आवश्यकता गीतेच्या तत्त्वज्ञानानें समर्थनीय ठरते. भारतीय तत्त्वज्ञानावर बुद्धोत्तर कालांत जी दुःखवादाची छाप पडलेली आहे तिचा मागमूसहि गीतेंत नाहीं. बुद्धोत्तर कालीन तत्त्वज्ञान हें सहिष्णु आहे; तर गीतेचें तत्त्वज्ञान जयिष्णु आहे. सतत कर्म करण्याचा उपदेश गीतेचा आहे, तर कर्मसंन्यासाचें निरूपण बुद्धोत्तरकालीन तत्त्वज्ञानांत आहे. गीतेंतील तत्त्वज्ञान प्रवर्तक आहे तर बुद्धोत्तरकालीन तत्त्वज्ञान निवर्तक आहे. निवर्तक तत्त्वज्ञान रूढ झालें म्हणजे घर बसतें व मठाच्या उठाठेवी सुरू होतात. जाति, सभा, समाज यांचे ऐवजीं भिक्षुसंघ व गोसाव्या बैराग्यांचे तांडे उत्पन्न होतात. गृहस्थाश्रम दुःखपूर्ण व अनास्थेचा होतो. प्रपंचाला भरभराट येत नाहीं व परमार्थहि तेजस्वी होत नाहीं. दांभिक संन्यासी आणि निष्प्रभ व पौरुषहीन गृहस्थ समाजांत वावरूं लागतात. विद्या व कला निस्तेज होतात. ब्रह्मविद्येचा केवळ शाब्दिक काथ्याकूट सुरू होतो. मठस्थापनेकरितांच कर्मयोगाला महत्त्व येतें.

प्रवर्तक तत्त्वज्ञानानें सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, पराक्रम यांचा उत्कर्ष होऊन समाज बलवान् होतो. अध्यात्मिक व आधिभौतिक जीवनांची अखंडता आणि समन्वय हेच प्रपंचाच्या उत्कर्षाचें लक्षण होय ! लोकांना स्वर्ग-मोक्ष मिळावा एवढाच उद्देश जर तत्त्वज्ञान ठेवील तर जीविताची व संस्कृति व समाज यांची वाट काय? म्हणून गीता परलोकसापेक्ष धर्मा-

नुशासन करीत नाहीं. समाजाच्या ऐहिक कल्याणांतच व्यक्तीचा परमार्थ सिद्ध व्हावा असा गीतेचा हेतु आहे. राजसंस्था, समाजसंस्था जेव्हां न्याययुक्त व कर्तव्ययुक्त असतात तेव्हां तो समाजच स्वर्ग बनतो. अधर्म, दुःख, दैन्य हीं सर्व मनुष्यकृतीचीं फळें आहेत. माणसानें व्यक्ति, कुटुंब व समाजसंबद्ध कर्तव्यें चोखपणें पार पाडलीं तर या जगांत पूर्ण सौख्य नांदेल. गीता ही दुःखवादी, दैववादी, निवृत्तिवादी नसून आनंदवादी आणि कर्मवादी आहे. गीतेचा आनंदवाद हा काल्पनिक नसून तो सत्यसृष्टींत धृत्युत्साहसमन्वित असा अनुभवण्यास मिळतो.

श्रीशंकराचार्य, कै. वा. टिळक व महात्मा गांधी यांचे गीतेच्या तत्त्वज्ञानासंबंधानें कसे दृष्टिकोन आहेत हें पाहणेंहि आवश्यक आहे. कोणताहि तत्त्ववेत्ता अगर कोणताहि विद्वान् ज्या परिस्थितींतून वर येतो तिचे संस्कार त्याजवर कसे दृढ झालेले असतात याचें प्रत्यंतर वरील तिघांच्या ग्रंथांवरून येते. शंकराचार्य, टिळक व गांधी हे तिघे आस्तिक आहेत. जगाचें मूलतत्त्व दिक्कालाद्यनवच्छिन्न, शाश्वत, स्थिर व आनंदमय आहे हें या तिघांना मान्य आहे. जगत् हें परिवर्तनशील अर्थात् पालटणारें म्हणून तें मिथ्या आहे असें या तिघांनाहि मान्य आहे. श्रीशंकराचार्यांच्या काळांत बौद्ध संन्याशांचें वर्चस्व फार होतें. बौद्ध संन्याशांना वैदिक संन्याशांची तोडीस तोड देण्याकरितां शंकराचार्यांनीं वैदिक यतिवर्ग उत्पन्न केला आणि दुःखनिर्वाणाच्या जागीं ब्रह्मनिर्वाण आणून बसविलें. सर्व कर्मांचा स्वरूपतः न्यास, ज्ञानानंतर कर्माचा असंभव, ज्ञानी हा प्रारब्धकर्मवशात् कदाचित् कर्म करील; पण त्याजवर कसलेंहि बंधन नाहीं व तें बंधन कोण घालणार असा शंकराचार्यांचा कोटिक्रम आहे. तात्त्विक दृष्ट्या आचार्यांचें विवेचन हें तर्ककर्कश माणसालाहि गप्प बसविणारें आहे.

शंकराचार्य व टिळक या उभयतांच्या कालांत फारच अंतर आहे. कोणाच्याहि ग्रंथाच्या अभ्यासाच्या ज्या निरनिराळ्या पद्धति अलीकडे अवगत होत आहेत; त्या सर्व दृष्टीनें गीतेचा अभ्यास टिळकांनीं केला. गीता पूर्वकालांत, वैदिक वाङ्मयाच्या निर्मितीच्या कालांत नि आर्यसंस्कृतीच्या प्रारंभींच्या पाळण्यापर्यंत टिळकांनीं प्रवेश केला आणि तेथूनच धागेदोरे जोडीत जोडीत वैचित्र्य व वैविध्ययुक्त मानवी जीवनाचें स्वरूप ज्या महाभारतांत आहे तेथपर्यंत ते आले. गीता हा महाभारतांतील एक विशेष प्रसंग या दृष्टीनें गीतेची भूमिका त्यांनीं निश्चित केली आणि आधुनिक चिकित्सक दृष्टीनें गीतेमध्यें संन्यासमार्ग नसून कर्ममार्ग आहे, ज्ञानोत्तरसुद्धां ज्ञान्यानें लोकसंग्रहार्थ आमरण निष्काम बुद्धीनें कर्म केलेंच पाहिजे, असें सिद्ध केलें. गीतेचा प्रतिपाद्य विषय उपक्रमउपसंहारादिकांवरून कर्मयोग हा असून, संन्यासयोग नाहीं असें टिळकांनीं जन्मभर आचरलेल्या स्वतःच्या कर्मयोगावरूनहि सांगितलें. श्रीशंकराचार्य यांचें चरित्रहि टिळकांपेक्षां अधिक कर्मयोगयुक्त आहे. अवघ्या बत्तीस वर्षांच्या वयांत ज्यानें त्या कालांत अखिल भरतखंड हालविले तो कांहीं सामान्य कर्मयोगी नव्हता. टिळक व आचार्य दोघेहि कर्मयोगी परंतु शंकराचार्यांचा सिद्धांत टिळकांपेक्षां निराळा आहे व त्याचें कारण भिन्नभिन्न परिस्थिति हें होय!

महात्मा गांधींचा अनासक्तियोग हा एक टिप्पणवजा छोटा ग्रंथ आहे. गांधीजी स्वतः म्हणतात कीं मला संस्कृत येत नाहीं व मी टिळकांप्रमाणें विद्वान नाहीं. तथापि अनासक्तियोगांतील टिपणें फारच मार्मिक व महत्त्वाचीं आहेत. गांधीजी हे मोठे आस्तिक, ईश्वरनिष्ठ असून गीता बुद्धीनें समजून घेण्यापेक्षां अंतःकरणानें व कृतीनें समजून घ्यावी असें ते म्हणतात. जन्मभर त्यांनीं जी गीता आचरली, आचरण्यापूर्वी जी ऐकली व विचारानें मनांत बसविली, तिजवरून गांधीजी म्हणतात कीं यंत्राप्रमाणें अहंकार सोडून, आसक्ति सोडून समाजधारणेकरितां जें लहानमोठें कर्म उत्तम करतां येईल तें करण्यांतच मनुष्याची उन्नति आहे. गांधीजी गीतेचें तत्त्वज्ञान, सृष्टीचें कोडें, आत्मा, परमात्मा, पुनर्जन्मादि तात्त्विकविषयांच्या चर्चेंत मुळींच पडत नाहींत. ईश्वराच्या स्वरूपाचा त्यांच्या ठिकाणीं निश्चय आहे. ईश्वर जसा अखंड कर्म करतो, निसर्ग जसें अखंड कर्मयुक्त आहे, तशा अखंड कर्मांतच खरा आनंद, खरें सुख व खरी शांति आहे, असें गांधीजींचें मत आहे.

भगीरथः–दिलीपाचा मुलगा, हिमालय पर्वतावर, पूर्वजांच्या उद्धारासाठीं, यानें गंगेची आराधना सुरू केली. कांहीं काल गेल्यावर त्याची चाललेली एकनिष्ठ आराधना पाहून गंगा प्रसन्न झाली व तिनें त्याच्या पितरांचा उद्धार करण्याचें कबूल केलें. नंतर तिनें, आपला प्रवाह भूतलावर एकटे शंकरच आवरूं शकतील, तर त्या गोष्टीसाठीं आधीं शंकरांना तूं प्रसन्न

करून घे म्हणून सुचविलें. पुढें भगीरथानें शंकराच्यासाठीं घोर तप आरंभलें. शंकरांनींहि त्याची एकनिष्ठा पाहून भगीरथाचा मनोरथ पूर्ण करण्याचें आश्वासन प्रसन्न होऊन दिलें. यानंतर गंगेचा प्रवाह शंकरांच्या सहाय्यानें पृथ्वीवर आणविला व तिच्या मदतीनें त्यानें ६०,००० सगर पुत्रांचा उद्धार करून आपल्या वडिलांची इच्छा तृप्त केली. याच्या या अचाट कृत्यामुळें गंगेचें 'भागीरथी' हें आणखी एक नांव रूढ झालें. भगीरथानें गंगेला पुष्कळ घाट बांधले. त्यानें ३०६०० वर्षें राज्य केलें. हा शिवभक्त होता. दानशील व धार्मिक म्हणून याची कीर्ती चोहोंकडे पसरली होती. याच्या यज्ञाला देव येत. याला नत व श्रुत असे दोन मुलगे होते. या दोन मुलांपैकीं श्रुत हा गादीवर बसला.

भडोच:–भडोच जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. हें नर्मदेच्या कांठीं असून येथें बी. बी. सी. आय. रेल्वेचें स्टेशन आहे. यास पूर्वी भृगुकच्छ भरूकच्छ, व सुखाबाद या नांवानें अनुक्रमें पुराणकालीं, प्राचीनकालीं व औरंगजेब बादशहाच्या वेळीं ओळखीत असत. या शहरासंबंधींचे उल्लेख भागवत, बृहत्संहितादि ग्रंथांत आहेत.

हें शहर इ. स. ४३०–८०० पर्यंत राज्य करणाऱ्या वंशानें, राष्ट्रकूटानें, अहमदाबादच्या सुलतानानें, दिल्लीच्या मोगल बादशहांनीं, मराठ्यांनीं व इंग्रजांनीं कांहीं काल ताब्यांत ठेवलें होतें. १६६० त येथील तटबंदी औरंगजेबानें पाडली; पण मराठ्यांच्या दुसऱ्या हल्ल्याच्या वेळीं येथील तट त्यानें पुनः बांधविला. १८०३ पासून हें शहर ब्रिटिशांच्या ताब्यांत आलें. येथें ब्रिटिशांनीं १६१६ मध्यें व डचांनीं १६२० त आपापल्या वखारी घातल्या. या शहराची १५३६ व १५४६ मध्यें पोर्तुगीजांनीं लूट केली. तशीच १६७५ व १६८६ त मराठ्यांनींहि हें शहर लुटलें. येथें १५८२ सालीं म्युनिसिपालिटी सुरू झाली. या शहराचें महत्त्व मुंबईमुळें सध्यां कमी झालें आहे. येथील कापूस, मोहाचीं फुलें, गहूं यांची प्रसिद्धी चांगली आहे. भडोचची पूर्वीची प्रसिद्धी पश्चिम किनाऱ्यावरील एक प्रमुख बंदर म्हणून झाली होती. येथूनच आशियाच्या बंदरांशीं व्यापार चाले. सध्यां येथील व्यापार दक्षिणेकडे मुंबई व उत्तरेस मांडवी बंदरापर्यंत चालतो. येथील कापसाचा व्यापार व गिरण्या याबद्दल हें शहर प्रसिद्ध आहे.

भरत:–दुष्यंत व शकुंतला यांचा हा मुलगा. याला दमन किंवा सर्वदमन याहि नांवानें ओळखतात. याचा जन्म कण्वाश्रमांत झाला. तेथेंच कण्वानें तीन वर्षेंपावेतों त्याचें पालन पोषण केलें. पुढें हा दुष्यंताकडे राहण्यास आल्यावर तेथें यास यौवराज्याभिषेक झाला. मोठा झाल्यावर तो राज्यावर बसला. यानें गंगातीरीं ५५ व यमुनातीरीं ७८ असे अश्वमेध केले. मष्णार देशांत यानें शंभरकोटी एकशे हत्ती सालंकार असें दान दिलें. हा स्वतःच्या रथाला तेहेतीशे घोडे जुंपून लोकांना आश्चर्यचकित करी. मष्णार देश नसून कर्म आहे, व हत्ती दान न देतां यानें गाई दिल्या. अश्वमेधांच्या संख्येंतहि कित्येकांचा मतभेद आहे. हा सम्राट होता. यानें दिग्विजय करून शक, म्लेंच्छ व दानव यांचा पराभव केला व देवस्त्रियांची त्यांच्या बंदींतून सुटका केली. सत्तावीस हजार वर्षें राज्य केलें. यास विदर्भ कुलांतील तीन स्त्रिया होत्या. त्यांना मुलगे झाले; पण ते वाईट निघाले तर भरत आपला त्याग करील म्हणून त्यांनीं ते मारून टाकले. शेवटीं यानें पुत्रासाठीं मरुत्स्तोम यज्ञ केला. तेव्हां मरुतांनीं यास बृहस्पतिपुत्र 'भरद्वाज' नांवाचा पुत्र दत्तक दिला. त्याचें नांव 'वितथ' असून हा भरताच्या पश्चात् गादीवर बसला. याचा पुरोहित कण्व होता. याला सुनंदा, काशेयी, सार्वसेनी ही बायको होती. याच्या नांवावरूनच (हिंदुस्थानचें) भरतखंड हें नांव पडलें होतें.

भवभूति (७००–७५०) संस्कृतांतील महाकवि. याचे ग्रंथ–१ महावीरचरित, २ मालतीमाधव, ३ उत्तररामचरित, ४ गुणरत्न (१३ श्लोक अपूर्ण). पहिलीं तीनहि नाटकें आहेत. पहिलें अर्धें राहिलेलें दुसऱ्यानें पुरें केलें आहे. दुसरें नाटक दहा अंकी असून कल्पित कथेवर रचलेलें दिसतें. पहिलें व तिसरें मिळून समग्र रामचरित्र गायिलेलें दिसतें. यांचें उत्तर–रामचरित हें नाटक करुणरसाबद्दल विशेष प्रसिद्ध आहे.

हा विदर्भांतील पद्मपूरचा राहणारा. कुलनाम उदुंबर. काश्यपगोत्री तैत्तिरीयशाखी ब्राह्मण. भट्टगोपाल–नीलकंठ–श्रीकंठ (भवभूति) असा याचा वंश आहे. माता जातुकर्णी. गुरूचें नांव ज्ञाननिधि. याचें पद्मपूर चांद्याजवळील नसून मंदसोरजवळचें असावें, असें कांहीं लोक म्हणतात. कनोजच्या यशोवर्मन्च्या पदरीं वाक्पतिराज नांवाचा कवि होता आणि त्यानें

यशोवर्म्याचें गुणवर्णन करणारें "गौडवहो" नांवाचें काव्य लिहिलें आहे. त्यांत त्याचा निर्देश आहे. कुमारिल भट्टाचा भवभूति शिष्य होता, व मीमांसावार्तिकावर टीका लिहिणारा अंबेक व हा एकच होय, असें डॉ. भांडारकर 'मालतीमाधव'च्या प्रस्तावनेंत म्हणतात.

भस्मः—धार्मिक बुद्धीनें मंत्र म्हणून अंगास लावावयाची राख. स्मार्त, गोसावी, शैव व वीरशैव या वर्गांतील लोक हें लावतात. यालाच लिंगायतांत विभूति असें म्हणतात. स्मार्त, शैव व वीरशैव या वर्गांतील लोक हे दोन्ही हातांचीं मनगटें, हातांच्या पोटऱ्या व दंड या ठिकाणीं उजव्या हाताला डाव्या हातानें व डाव्या हाताला उजव्या हातानें लावतात. याशिवाय छाती, पाठ, बगला, डोकें, कपाळ गळा या जागींहि तें लावतात. गोसावी लोक सर्वांगास भस्म लावतात. असें लावण्याचा हेतु हा असतो कीं ते नेहमींच लंगोटीशिवाय विवस्त्र असतात. त्यामुळें वारा, थंडी यापासून त्यांच्या शरीरास त्रास होतो; तो टाळण्यासाठीं भस्म सर्वांगास चर्चून घेतात.

प्रथम डाव्या हातांत भस्म घेऊन त्यावर थोडेसें पाणी घालून दोन्ही हातांनीं तें चोळतात व नंतर लावतात. भस्मासाठीं यज्ञकुंडांतील राख अगर गाईच्या शेणाचे गोळे करून ते वाळवतात व जाळून त्यांचें भस्म करतात. विभूतीचे आयते गोळेहि दुकानांतून विकत मिळतात.

भस्म प्रथम मंत्र म्हणून नंतर मंत्रांत निर्देशिल्याप्रमाणें त्या त्या ठिकाणीं अंगाला लावावयाचें असतें.

भस्मासुरः—शिवाच्या भस्मांतील एका खड्यापासून उत्पन्न झालेला एक असुर. 'ज्याच्या मस्तकीं हा हात ठेवील तो तत्काळ भस्मीभूत होईल' असा शंकराचा यास वर असल्यानें हा फार उन्मत्त होऊन सर्व प्राणिमात्रांस पीडा देई. तेव्हां विष्णूनें मोहिनीचें रूप घेऊन नर्तनकौशल्यानें त्यास आपल्याप्रमाणेंच नाचावयास लाविलें. पूर्ण मोहित झाल्यानें नाचतांना आपल्या डोक्यावर त्यानें हात ठेवला; तत्काळ तो स्वतःच मरण पावला अशी कथा आहे.

भाऊबीजः—कार्तिक शुद्ध द्वितीयेस म्हणजे यमद्वितीयेच्या दिवशीं हा सण येतो. आपल्या भावाला तेल लावून व स्वतः आंघोळ घालून (शक्य तर स्वतःच्या घरीं बोलावून) त्याला सुग्रास मेजवानी या दिवशीं बहीण देत असते. स्नानानंतर जेवणाचे वेळीं किंवा संध्याकाळीं भावाला ओवाळते व भाऊ ओवाळणी म्हणून बहिणीला आपल्या ऐपतीप्रमाणें देणगी देत असतो. भावा—बहिणींतील प्रेम व्यक्त करण्याचा हा दिवस असल्यानें व नरकचतुर्दशीव व दिवाळी-पाडव्यानंतरचा पहिलाच दिवस असल्यानें दिवाळींतच सामावलेला आहे.

भाऊसाहेब पेशवे (सदाशिवराव भाऊ) (१७३०--१७६१):—सुप्रसिद्ध पानिपतच्या तिसऱ्या (१७६१) लढाईतील मराठ्यांचे सरसेनापती. हा वसईचा वीर चिमाजी आप्पा यांचा मुलगा. याचा जन्म ३ ऑगस्ट १७३० झाला. याच्या बायकांचीं नांवें उमाबाई व पार्वतीबाई. पेशव्यांच्या प्रथेप्रमाणें भाऊसाहेबांच्या मातुःश्री राधाबाई यांचें शिक्षण व अल्प वयांत साताऱ्याकडील वगैरे राजकाराचें वळण. कर्नाटकावर स्वारी १७४६, बहादुर भेंडा घेतला १७४७, यमाजी शिवदेवाचें बंड मोडण्यासाठीं सांगोल्यावर स्वारी १७५०. पेशव्यांचा दिवाण १७५० पासून अखेरपर्यंत व पेशव्यांच्या धोरणाचा दक्षिणेकडील मुखत्यार (१७५१–५८). उदगीरच्या लढाईंत मुख्य व तदनंतर पानिपत मोहिमेचा. सूत्रधार नानासाहेब पेशव्यांकडून तहावर मोहीम थांबवूं नये आम्ही माघापर्यंत येतों अशीं पत्रें आल्यामुळें किंवा मध्यंतरीं अडविलीं जाऊन कांहींच बातमी न मिळाल्यामुळें वाट पाहत असतांना मध्येंच निकराचा प्रसंग आला व युद्ध द्यावें लागलें. त्यांतच भाऊ विश्वासरावाच्या मृत्यूनें बेभान होऊन गर्दींत मिसळला व मृत्यु पावला, ता. १४ जानेवारी १७६१. त्यानंतर बरींच वर्षें त्याच्या तोतयाची हुल्लड उठे व पार्वतीबाई त्यावर विश्वास ठेवून वागे.

भाऊनें बहुतांशीं उत्तरेकडील मुत्सद्यांच्या व स्वतःच्याहि इच्छेनें अंगिकारलेल्या या मोहिमेंत मराठ्यांना फार मोठें अपयश आलें. याचा परिणाम भाऊसाहेबांच्या कर्तृत्वाच्या अंदाजावर निष्कारण झाला आहे; पण खरें पाहिलें तर भव्यकल्पना, अफाट कर्तृत्व, अकुतोभय वृत्ति, बुद्धिमत्ता, तडफ, निरलसता, कारभारातील बारकाई, दूरदर्शी माणसांची परीक्षा, दृढ निश्चय, शौर्य इत्यादि पराक्रमदर्शक नानाविध गुणांमध्यें भाऊसाहेबांशीं बरोबरी करील असा थोरल्या माधवरावाशिवाय पेशवाईत कोणी झालेला दिसत नाहीं. नानासाहेब

पेशव्यांचा दिवाण म्हणजे कारभारी म्हणून दहा वर्षांची त्याची दक्षिणेंतील म्हणजे कर्नाटक व निजाम या बाजूकडील कामगिरी बाजीरावाच्या जोडीला झालेल्या चिमाजी आप्पाच्या कारभाराइतकीच महत्त्वाची आहे. उत्तरेकडील राघो भरारीची कारकीर्द त्या मानानें अव्यवस्थेची, कर्जाची व मराठ्यांच्या राजकारणाची घडी विसकटणारी झाल्यामुळेंच उदगीरच्या निजामा-वरील मोठ्या विजयानंतर (३ फेब्रुवारी १७६०) लगेच पटदुराहून परिपूर्ण चर्चा होऊन १४ मार्च १७६० रोजीं पानिपतच्या मोहिमेवर भाऊ निघाले. यांचा कामाचा उरक फार मोठा होता. जातां जातांच पत्रव्यवहारानें त्यानीं उत्तरेकडील घडी बसविण्यास सुरवात केली व थकलेला वसूल उगवून मोहिमेचा अवाढव्य खर्च चालीस लावला. सरदार—दरक-दारांना जरबेंत आणून एकमुखी शिस्त लावली. स्वकीयांत आत्मविश्वास उत्पन्न करून दिल्ली, कुंजपुरा हस्तगत केला. दिल्लीचें तख्त फोडण्याचें धाडस केलें व धडाडीनें अब्दालीच्या तोंडचें पाणी पळविलें. पूर्वींच्या दहा वर्षांत माजलेली अंदाधुंदी, वसुलींतील थकबाकी, रजपुतादिकांतील अप्रियता तो पांचसहा धामधुमीच्या महिन्यांत सुधारूं शकला नाहीं हा त्याचा दोष नव्हे. अब्दाली हा राज्यसंस्थापक या दृष्टीनें अफगाणांचा शिवाजी, नद्यांच्या मुलखांतील म्हणून उताराच्या धाडसांतील दर्दी, प्रतिस्पर्धि मिळाला व भाऊचा अंदाज चुकवून मध्यें यमुना उतरून आड आला हा योगायोगच म्हटला पाहिजे. हें युद्ध हिंदी व परकी लोक यांमधील होय असा व्यापक विचार बोलून दाखविण्याइतका भाऊंचा कयास विस्तीर्ण होता. एवढेंच नव्हे तर पूर्वींच्या अव्यवस्थेमुळें तह करूनच यावेळीं गप बसणें भाग आहे असें नाना-साहेबाला आधींच कळविण्याइतकी त्याची मुत्सद्देगिरी दूरदर्शीपणाची होती. परंतु दक्षिणेकडील निर्णया-प्रमाणें अपेक्षित कुमकेची मुदत भरण्यापूर्वींच पेंच जबर पडल्यामुळें हा मानी व करारी वीर टेकीस आला आणि मराठे ठाणबंद लढूं शकत नाहींत हा मोठा आक्षेप शेवटीं आपल्या जीविताचीहि किंमत देऊन धुवून काढूं शकला. भाऊचें कर्तृत्व त्याचा रणभूमि-वरील मृत्यु व बहुतांशीं त्यामुळेंच मोडलेलें पानिपतचें झुंज यावरूनच न अजमावतां तें भाऊच्या पराक्रमा-मुळें आणि धडकीमुळें खात्री पावलेला अब्दाली किंवा त्याच्या विजयामुळें उत्तेजन मिळालेला दुसरा कोणीहि सरहद्दीवरील शत्रु मराठ्यांच्या फिरून वाटेस गेला नाहीं, यावरूनच अजमावलें पाहिजे. बदलत्या काळा-प्रमाणें तोफखान्याचें महत्त्व जाणून इब्राहिमखान गार्द्यांची योजना करणें आणि आणीबाणीची वेळ जाणून जोराचा हल्ला चढवून पडलेल्या चकडबंद गराड्यांतून वाट काढण्याचें धोरण पतकरणें या दोनच गोष्टी भाऊंच्या उत्कृष्ट सेनापतित्वाची खात्री पटवितात.

भागवतधर्मः-भागवतधर्माचा उदय ख्रिस्तापूर्वीं सुमारें १४०० वर्षें म्हणजे बुद्धापूर्वीं सात आठशें वर्षें झालेला आहे. महाभारतांतील नारायणीयाख्यानांत भागवत-धर्माचे आद्यप्रवर्तक नर व नारायण हे दोन ऋषी होत असें सांगितलें आहे. या ऋषींच्या सांगण्यावरूनच नारद ऋषी श्वेतद्वीपास गेल्यावर तेथें स्वतः भगवंतांनीं नारदांना या धर्माचा प्रथम उपदेश केला असा नारायणीयाख्यानांतच उल्लेख आहे. मेरु पर्वताच्या उत्तरेस असलेल्या श्वेतद्वीपांत भगवान राहातात असें भागवतांत वर्णन आहे. महाभारतांतील नारायणी-योपाख्यानांत भागवतधर्माचा औपनिषदिक ब्रह्मज्ञान व सांख्य क्षराक्षर या दोहोंशीं मेळ घातला असून चार वेद व सांख्य व योग या पांचांचाहि त्यांत समावेश होतो म्हणून त्यास पांचरात्रधर्म म्हटलें आहे. या धर्मास सात्वत व नारायणीय अशीं दुसरीं दोन नांवें आहेत. या धर्माचे मूळ प्रवर्तक नारायण ऋषी यांच्या नांवावरून त्याला नारायणीय धर्म असें नांव पडलें. श्रीकृष्णांनीं तो धर्म सांगितला म्हणून श्रीकृष्ण ज्या सात्वत ज्ञातींत जन्मले त्या ज्ञातीच्या नांवावरून या धर्माचें सात्वत हें नांव पडलें.

भागवतधर्म वासुदेवभक्तिपर आहे. ज्ञानाशिवाय मोक्ष नाहीं हें ज्ञानपर उपनिषदांतील तत्त्व त्यानंतरच्या वासुदेवभक्तिपर भागवत धर्मानें मान्य केलें आहे. वासुदेवाच्या भक्तीनें परमेश्वराचें ज्ञान होतें व तें झाल्यावर भगवद्भक्तानें परमेश्वराप्रमाणें जगाच्या धारणपोषणार्थ प्रयत्न केला पाहिजे हें श्रीकृष्णाच्या उपदेशाचें सार आहे. येथें हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं भक्तीचें धर्मतत्त्व भागवतधर्मानेंच प्रथम प्रवृत्त केलें असें नाहीं. भक्तीचा इतर सर्व धर्मांगांशीं मेळ घालून देणें हाहि भागवत धर्माचा विशेष नव्हे. भाग-वत धर्म प्रवृत्त होण्यापूर्वींहि रुद्राची अथवा विष्णूची कोणत्या तरी स्वरूपांत भक्ति सुरूं होतीच. तत्पूर्वींच्या

रुद्रादि उपास्यांच्या ऐवजीं वासुदेव हें उपास्य भागवत धर्मांत स्वीकारण्यांत आलें ही गोष्ट खोटी नाहीं; तथापि भक्ति कोणाहि दैवताची केली तरी ती एका भगवंतास पोंचते, रुद्र व भगवान् यांत भेद नाहीं असें नारायणीयाख्यानांतहि सांगितलें आहे. भागवतधर्म वासुदेवभक्तिपर असला तरी नुसती वासुदेव भक्ति हें भागवत धर्माचें लक्षण नव्हे. भागवत धर्मानें शुद्ध निवृत्तीपेक्षां निष्काम कर्मपर प्रवृत्तिमार्ग अधिक श्रेयस्कर ठरविला, केवळ ज्ञानाशींच नव्हे तर भक्तीशींहि कर्माची सांगड घालून दिली हें त्याचें वैदिक धर्माच्या इतिहासांतील महत्त्वाचें कार्य होय. यावरून मूळ भागवतधर्म प्रवृत्तीपर होता हें दिसून येतें. नारायणीयाख्यानांत " प्रवृत्ति लक्षणश्चैव धर्मोनारायणात्मकः," असें म्हटलें आहे. नरनारायण ऋषि कर्मयोगी होते. स्वतः श्रीकृष्ण तर कर्मयोग्यांचे राजेच. महाभारतानंतर झालेल्या भागवत पुराणांत भागवत धर्माचें निवृत्तीपर वर्णन आहे. भागवतापासून वैराग्यपर वासुदेवभक्ति श्रेष्ठ मानूं लागले.

महाराष्ट्रांत प्रचलित असलेला भागवत धर्म वैराग्यपरच आहे. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम हे प्रमुख भागवद्धर्मीय संत होत. या. व इतर महाराष्ट्रीय संतांनीं भागवतधर्मावर अफाट व तेजस्वी वाङ्मय निर्माण केलें आहे. ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी या नांवानें प्रसिद्ध असलेली भागवद्गीतेवरील मराठी टीका, एकनाथी भागवत म्हणून प्रसिद्ध असलेली भागवताच्या एकादश स्कंधावरील टीका व तुकोबांचा गाथा हें महाराष्ट्रांतील अत्यंत ओजस्वी असे भागवतधर्मीय ग्रंथ होत. पैठण, आळंदी, पंढरपूर हीं भागवतधर्माचीं प्रमुख महाराष्ट्रीय पीठें होत.

भांडारकर, डॉ. रामकृष्ण गोपाळ (१८३७–१९२५):—महाराष्ट्रीय पंडित व पुराणवस्तुसंशोधक. यांचा जन्म मालवण येथें ६ जुल १८३७ ला झाला. मालवण व राजापूर या दोन ठिकाणीं मराठी शिक्षण करून भांडारकरांनीं १८४७ ला रत्नागिरीस इंग्रजी शिकण्याला आरंभ केला. १८५३ त पुढील शिक्षणासाठीं त्यांनीं मुंबईस प्रयाण केलें. त्या वेळचा शिक्षणक्रम १८५८ पर्यंत यांच्याकडून पुरा केला गेला. त्यांना १८५९ त फेलोशिप मिळावी. मुंबईहून १८६० त त्यांची डेक्कन कॉलेजांत बदली झाली. बी. ए. व एम्. ए. या दोन पदव्या त्यांनीं अनुक्रमें १८६२ आणि १८६३ मध्यें मिळविल्या. यांची नेमणूक रत्नागिरीस हेड मास्तर म्हणून झाल्यामुळें त्यांस १८६५–६८ पर्यंत तेथें राहावें लागलें. एल्फीन्स्टन कॉलेजांतील डॉ. बूलर हे रजेवर गेल्यामुळें त्यांच्या जागीं मुंबईस डॉ. भांडारकरांचा वर्ग संस्कृतचे प्रोफेसर म्हणून झाला. तेथें १८७२ पावेतों त्यांनीं काम केलें. १८७३ तें १८८२ पर्यंत मदतनीस प्रोफेसर म्हणून मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजांत काम केलें. याच कालांत ते सिंडीकेटचे मेंबरहि होते. पुढें १८९३ पर्यंत स्वतंत्रपणें संस्कृत अध्यापक म्हणून डेक्कन कॉलेजांत काम करून त्यांनीं पेन्शन घेतलें. १८६६ पासून १९०८ पर्यंत ते मुंबई युनिव्हर्सिटीचे संस्कृतचे परीक्षक होते. शेवटीं शेवटीं ते केवळ एम. ए. चेच परीक्षक असत.

त्यांच्या या शैक्षणिक कार्यावांचून पुराण वस्तुसंशोधक म्हणूनहि त्यांची फार प्रसिद्धी आहे. या कार्याकडे त्यांचें लक्ष १८७० पासून गेलें. १८७९ मध्यें सरकारनें त्यांस पुरातन संस्कृत लेखांच्या संशोधनाचें काम सांगितलें व तें त्यांनीं उत्तमपणें पार पाडलें. त्यांच्या या कामगिरीमुळें परदेशांत डॉ. भांडारकरांची कीर्ति पसरली व त्या कारणानें त्यांस ' गॉटिंजन ' या जर्मन युनिव्हर्सिटीनें १८८५ त Ph. D ही पदवी दिली. काठेवाड संस्थानिकांचे प्रतिनिधी म्हणून व्हीएन्ना येथें भरलेल्या परिषदेला(Congress of Orientalists) १८८६ मध्यें सरकारनें त्यांस पाठविलें. त्यांची कामगिरी लक्षांत घेऊन त्यांना सरकारनें १८९१ त C. I. E व १९११ त K. C. I. E. या पदव्या दिल्या. १८९३ त त्यांस मुंबई युनिव्हर्सिटीचे व्हाईस चॅन्सेलर होण्याचा मान मिळाला. मुंबई व एडिंबरो या दोन युनिव्हर्सिट्यांकडून त्यांना L. L. D. ची पदवी मिळाली. १९०८त कलकत्ता युनिव्हर्सिटीनेंही Ph. D. ही पदवी रामकृष्णपंतांना देऊन त्यांचा गौरव केला. याशिवाय परदेशांतील अनेक संस्थांनीं त्यांस सभासद करून घेतलें. या सर्वांपेक्षां आपल्या लोकांनीं पुण्यास ६।७।१९१७ला त्यांच्या स्मरणार्थ ' भांडारकर प्राच्य विद्यासंशोधन मंडळ ' ही जी संस्था सुरू केली त्यामुळें डॉ. भांडारकरांना अतिशय संतोष झाला व आपल्या कार्याचें महत्त्व लोकांनीं जाणलें याविषयीं त्यांना मुळींच संशय राहिला नाहीं. याच वेळीं त्यांच्या गौरवार्थ प्रार्थना समाजानेंही त्यांना मानपत्र दिलें.

डॉ. भांडारकरांनीं ग्रंथरूपानेंही आपलें कार्य नांव निघण्यासारखें करून ठेवलें आहे. त्यांनीं १८७६ त

मालतीमाधवावर चिकित्सक टीका केली. याशिवाय शैव व वैष्णव पंथांचा इतिहास, An Early History of the Deccan हे ग्रंथ त्यांच्या कार्याचा, परिश्रमाचा व विद्वत्तेचा चांगलाच परिचय करून देतात. वेगवेगळ्या मासिकांतील त्यांचे लेख एकत्रित केले तर ते चांगलीं चार पुस्तकें तयार होतील एवढे आहेत. प्रार्थना समाजानें त्यांचीं वेगवेगळ्या वेळीं झालेलीं व्याख्यानें व सुबोध पत्रिकेंत आलेले लेख व प्रार्थना यांचें एक स्वतंत्र पुस्तक छापलें आहे.

त्यांची ही त्रिविध प्रकारची कामगिरी लक्षांत घेतल्यावर त्यांच्या ठिकाणीं असलेली कार्यनिष्ठा, सत्यप्रेम, उदार अंतःकरण, शोधक वृत्ती, दीर्घायुष्य हे गुण सहज दिसून येऊन त्यांच्याबद्दलचा मनांतील आदर दुणावतो असें म्हणण्यास कसलाही प्रत्यवाय नाहीं. या पुण्य पुरुषाचा अंत १९२५ च्या २४ ऑगस्टला झाला.

भाडेचिठ्ठी:–दुसऱ्याची स्थावर मिळकत ठराविक मुदतीपर्यंत अगर चिरंतर कालपर्यंत भाड्यानें घेतल्याबद्दल भाडेकऱ्यानें ती ज्याचेकडून घेतली त्याला लिहून दिलेला कागद. यांत भाड्यानें घेतलेल्या मिळकतीचें स्पष्ट वर्णन, ज्या मुदतीपर्यंत भाड्यानें घेतली ती मुदत, भाडेकऱ्यानें किती भाडें द्यावयाचें व केव्हां द्यावयाचें यासंबंधीं शर्ती नमूद कराव्या लागतात. याशिवाय भाड्यानें घेतलेल्या मिळकतीच्या उपयोगासंबंधीं मालक व भाडेकरी यांच्या दरम्यान ठरलेला करार त्यांत नमूद करणें अवश्य आहे.

भाडेचिठ्ठी एक वर्षापेक्षां अधिक मुदतीची असेल तर ती रजिस्टर्ड केली पाहिजे. भाडेकऱ्यानें मालकाला लिहून दिलेली भाडेचिठ्ठी मालकाकडे राहते. त्यामुळें भाडेकऱ्याजवळ भाडेचिठ्ठींत नमूद केलेल्या करारासंबंधीं लेखी पुरावा रहात नाहीं. म्हणून मालकानें भाडेकऱ्याला सर्व शर्ती नमूद करून कागद लिहून देणें कायद्यानें आवश्यक केलें आहे; त्यामुळें करारांतील कोणत्या शर्ती मालकावर बंधनकारक रहातात याविषयीं लेखी पुरावा भाडेकऱ्याजवळ राहतो.

भाद्रपद:–हिंदु कालमापनपद्धतीप्रमाणें चांद्रमानानें हा वर्षाचा सहावा महिना आहे. या महिन्याच्या पौर्णिमेस चंद्र भाद्रपदा नक्षत्रानें युक्त असतो म्हणून यास 'भाद्रपद' असें नांव पडलें आहे. प्राचीन काळीं चांद्रमानपद्धतीपूर्वी यास 'नभस्य' असें नांव होतें. हा महिना साधारणतः इंग्रजी सप्टेंबर महिन्याचे वेळीं येतो व या महिन्यांत शरद् ऋतू असतो. उत्तर हिंदुस्थानांत यावेळीं ऐन पावसाळा असला तरी महाराष्ट्रांत व दक्षिणेंत बरसात संपत आलेली असते. हस्तनक्षत्राचे वळवाचें चैत्रमासाप्रमाणें पाऊस या महिन्यांत पडतात. दिवसरात्र या महिन्यांत–२३ सप्टेंबरला–सारखीं होतात. सर्व वातावरण समशीतोष्ण होऊन मन प्रसन्न होतें. शेतांतील सर्व खरीप धान्यें–भात, जोंधळा, नाचणा, वरी इत्यादि–हीं या महिन्यांत संपूर्ण पोसून कापणीस येतात. सर्व सृष्टि समृद्ध दिसते. सर्व लोकांचीं मनें सुप्रसन्न व आनंदित असतात.

भाद्रपद मासांतील अनेक व्रतें व उत्सवामुळें त्यांचें महत्त्व श्रावणमासाचे खालोखाल मानलें जातें. या महिन्यांत एकान्नव्रत केल्यास त्यायोगें धन, धान्य व आरोग्य प्राप्त होतें असें शास्त्र आहे. भाद्रपद शुक्ल १स शिवाप्रीत्यर्थ मौनव्रत पाळतात, शुक्ल ३स वराहजयंतीचा उत्सव करतात व पौर्णिमेस पोळा हा गुरांप्रीत्यर्थ उत्सव करतात. गणेशचतुर्थी, ज्येष्ठागौरी, वामनद्वादशी हे सण, व हरितालिका, ऋषिपंचमी, श्रीमहालक्ष्मीव्रत, अनंतव्रत हीं व्रतें याच महिन्यांत येतात. हरितालिकेचें व्रत कुमारिका व सुवासिनी भाद्रपद शुक्ल ४स पार्वती व शिवलिंगाची पूजा करून, उपवास करून, कथा श्रवण करून व रात्रौ जागरण करून साजरें करतात. दर महिन्याच्या शुक्ल ४स सिद्धिविनायकी म्हणतात. भाद्रपद शुक्ल ४ ही महासिद्धिविनायकी मानून त्या दिवशीं चंद्रोदयीं गणपतीची स्थापना करून, पूजाअर्चा, नैवेद्य व आरती करून चार पांच दिवस उत्सव करतात. यायोगें सर्व संकटांचा परिहार होतो असें भाविक लोक समजतात. चिंचवड, मोरगांव, पारोळें, रंजनगांव पुळें येथील श्रीगणपतीचीं देवालयें प्रसिद्ध असून येथें हे उत्सव मोठ्या प्रमाणांत होतात. बुधगांव, सांगली, जमखंडी व कुरुंदवाड येथील राजघराण्यांचें श्रीगणपती हें कुलदैवत असून, या संस्थानांतूनहि गणेशोत्सव फार मोठ्या प्रमाणांत होतो.

भाद्रपद शुक्ल ५ स स्त्रिया ऋषिपंचमीचें व्रत करतात. या दिवशीं काश्यप, अत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि व वसिष्ठ या सप्तऋषींची पूजा स्त्रिया करतात व तिच्यामुळें रजोदर्शनकालीं घडलेलें पाप धुऊन जातें असें त्या मानितात. बैलांनीं कष्ट करून

रुद्रादि उपास्यांच्या ऐवजीं वासुदेव हें उपास्य भागवत धर्मांत स्वीकारण्यांत आलें ही गोष्ट खोटी नाहीं; तथापि भक्ति कोणाहि दैवताची केली तरी ती एका भगवंतास पोंचते, रुद्र व भगवान् यांत भेद नाहीं असें नारायणीयाख्यानांतहि सांगितलें आहे. भागवतधर्म वासुदेवभक्तिपर असला तरी नुसती वासुदेव भक्ति हें भागवत धर्माचें लक्षण नव्हे. भागवत धर्मानें शुद्ध निवृत्तीपेक्षां निष्काम कर्मपर प्रवृत्तिमार्ग अधिक श्रेयस्कर ठरविला, केवळ ज्ञानाशींच नव्हे तर भक्तीशींहि कर्माची सांगड घालून दिली हें त्याचें वैदिक धर्माच्या इतिहासांतील महत्त्वाचें कार्य होय. यावरून मूळ भागवतधर्म प्रवृत्तीपर होता हें दिसून येतें. नारायणीयाख्यानांत "प्रवृत्ति लक्षणश्चैव धर्मोनारायणात्मकः," असें म्हटलें आहे. नरनारायण ऋषि कर्मयोगी होते. स्वतः श्रीकृष्ण तर कर्मयोग्यांचे राजेच. महाभारतानंतर झालेल्या भागवत पुराणांत भागवत धर्माचें निवृत्तीपर वर्णन आहे. भागवतापासून वैराग्यपर वासुदेवभक्ति श्रेष्ठ मानूं लागले.

महाराष्ट्रांत प्रचलित असलेला भागवत धर्म वैराग्यपरच आहे. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम हे प्रमुख भागवद्धर्मीय संत होत. या व इतर महाराष्ट्रीय संतांनीं भागवतधर्मावर अफाट व तेजस्वी वाङ्मय निर्माण केलें आहे. ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी या नांवानें प्रसिद्ध असलेली भागवद्गीतेवरील मराठी टीका, एकनाथी भागवत म्हणून प्रसिद्ध असलेली भागवताच्या एकादश स्कंधावरील टीका व तुकोबांचा गाथा हें महाराष्ट्रांतील अत्यंत ओजस्वी असे भागवतधर्मीय ग्रंथ होत. पैठण, आळंदी, पंढरपूर हीं भागवतधर्माचीं प्रमुख महाराष्ट्रीय पीठें होत.

भांडारकर, डॉ. रामकृष्ण गोपाळ (१८३७–१९२५):–महाराष्ट्रीय पंडित व पुराणवस्तुसंशोधक. यांचा जन्म मालवण येथें ६ जुल १८३७ ला झाला. मालवण व राजापूर या दोन ठिकाणीं मराठी शिक्षण करून भांडारकरांनीं १८४७ ला रत्नागिरीस इंग्रजी शिकण्याला आरंभ केला. १८५३ त पुढील शिक्षणासाठीं त्यांनीं मुंबईस प्रयाण केलें. त्या वेळचा शिक्षणक्रम १८५८ पर्यंत यांच्याकडून पुरा केला गेला. त्यांना १८५९ त फेलोशिप मिळाली. मुंबईहून १८६० त त्यांची डेक्कन कॉलेजांत बदली झाली. बी. ए. व एम्. ए. या दोन पदव्या त्यांनीं अनुक्रमें १८६२ आणि १८६३ मध्यें मिळविल्या. यांची नेमणूक रत्नागिरीस हेड मास्तर म्हणून झाल्यामुळें त्यांस १८६५–६८ पर्यंत तेथें राहावें लागलें. एल्फीन्स्टन कॉलेजांतील डॉ. बूलर हे रजेवर गेल्यामुळें त्यांच्या जागीं मुंबईस डॉ. भांडारकरांचा वर्ग संस्कृतचे प्रोफेसर म्हणून झाला. तेथें १८७२ पावेतों त्यांनीं काम केलें. १८७३ तें १८८२ पर्यंत मदतनीस प्रोफेसर म्हणून मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजांत काम केलें. याच काळांत ते सिंडीकेटचे मेंबरहि होते. पुढें १८९३ पर्यंत स्वतंत्रपणें संस्कृत अध्यापक म्हणून डेक्कन कॉलेजांत काम करून त्यांनीं पेन्शन घेतलें. १८६६ पासून १९०८ पर्यंत ते मुंबई युनिव्हर्सिटीचे संस्कृतचे परीक्षक होते. शेवटीं शेवटीं ते केवळ एम. ए. चेच परीक्षक असत.

त्यांच्या या शैक्षणिक कार्यावांचून पुराण वस्तुसंशोधक म्हणूनहि त्यांची फार प्रसिद्धी आहे. या कार्याकडे त्यांचें लक्ष १८७० पासून गेलें. १८७९ मध्यें सरकारनें त्यांस पुरातन संस्कृत लेखांच्या संशोधनाचें काम सांगितलें व तें त्यांनीं उत्तमपणें पार पाडलें. त्यांच्या या कामगिरीमुळें परदेशांत डॉ. भांडारकरांची कीर्ति पसरली व त्या कारणानें त्यांस 'गॉटिंजन' या जर्मन युनिव्हर्सिटीनें १८८५ त Ph. D ही पदवी दिली. काठेवाड संस्थानिकांचे प्रतिनिधी म्हणून व्हीएन्ना येथें भरलेल्या परिषदेला (Congress of Orientalists) १८८६ मध्यें सरकारनें त्यांस पाठविलें. त्यांची कामगिरी लक्षांत घेऊन त्यांना सरकारनें १८९१ त C. I. E व १९११ त K. C. I. E. या पदव्या दिल्या. १८९३ त त्यांस मुंबई युनिव्हर्सिटीचे व्हाईस चॅन्सेलर होण्याचा मान मिळाला. मुंबई व एडिंबरो या दोन युनिव्हर्सिट्यांकडून त्यांना L. L. D. ची पदवी मिळाली. १९०८त कलकत्ता युनिव्हर्सिटीनेंही Ph. D. ही पदवी रामकृष्णपंतांना देऊन त्यांचा गौरव केला. याशिवाय परदेशांतील अनेक संस्थांनीं त्यांस सभासद करून घेतलें. या सर्वांपेक्षां आपल्या लोकांनीं पुण्यास ६।७।१९१७ला त्यांच्या स्मरणार्थ 'भांडारकर प्राच्य विद्यासंशोधन मंडळ' ही जी संस्था सुरू केली त्यामुळें डॉ. भांडारकरांना अतिशय संतोष झाला व आपल्या कार्याचें महत्त्व लोकांनीं जाणलें याविषयीं त्यांना मुळींच संशय राहिला नाहीं. याच वेळीं त्यांच्या गौरवार्थ प्रार्थना समाजानेंही त्यांना मानपत्र दिलें.

डॉ. भांडारकरांनीं ग्रंथरूपानेंही आपलें कार्य नांव निघण्यासारखें करून ठेवलें आहे. त्यांनीं १८७६ त

मालतीमाधवावर चिकित्सक टीका केली. याशिवाय शैव व वैष्णव पंथांचा इतिहास, An Early History of the Deccan हे ग्रंथ त्यांच्या कार्याचा, परिश्रमाचा व विद्वत्तेचा चांगलाच परिचय करून देतात. वेगवेगळ्या मासिकांतील त्यांचे लेख एकत्रित केले तर ते चांगलीं चार पुस्तकें तयार होतील एवढे आहेत. प्रार्थना समाजानें त्यांचीं वेगवेगळ्या वेळीं झालेलीं व्याख्यानें व सुबोध पत्रिकेंत आलेले लेख व प्रार्थना यांचें एक स्वतंत्र पुस्तक छापलें आहे.

त्यांची ही त्रिविध प्रकारची कामगिरी लक्षांत घेतल्यावर त्यांच्या ठिकाणीं असलेली कार्यनिष्ठा, सत्यप्रेम, उदार अंतःकरण, शोधक वृत्ती, दीर्घायुष्य हे गुण सहज दिसून येऊन त्यांच्याबद्दलचा मनांतील आदर दुणावतो असें म्हणण्यास कसलाही प्रत्यवाय नाहीं. या पुण्य पुरुषाचा अंत १९२५ च्या २४ ऑगस्टला झाला.

भाडेचिठ्ठीः–दुसऱ्याची स्थावर मिळकत ठराविक मुदतीपर्यंत अगर चिरंतर कालपर्यंत भाड्यानें घेतल्याबद्दल भाडेकऱ्यानें ती ज्याचेकडून घेतली त्याला लिहून दिलेला कागद. यांत भाड्यानें घेतलेल्या मिळकतीचें स्पष्ट वर्णन, ज्या मुदतीपर्यंत भाड्यानें घेतली ती मुदत, भाडेकऱ्यानें किती भाडें द्यावयाचें व केव्हां द्यावयाचें यासंबंधीं शर्ती नमूद कराव्या लागतात. याशिवाय भाड्यानें घेतलेल्या मिळकतीच्या उपयोगासंबंधीं मालक व भाडेकरी यांच्या दरम्यान ठरलेला करार त्यांत नमूद करणें अवश्य आहे.

भाडेचिठ्ठी एक वर्षापेक्षां अधिक मुदतीची असेल तर ती रजिस्टर्ड केली पाहिजे. भाडेकऱ्यानें मालकाला लिहून दिलेली भाडेचिठ्ठी मालकाकडे राहते. त्यामुळें भाडेकऱ्याजवळ भाडेचिठ्ठींत नमूद केलेल्या करारासंबंधीं लेखी पुरावा रहात नाहीं. म्हणून मालकानें भाडेकऱ्याला सर्व शर्ती नमूद करून कागद लिहून देणें कायद्यानें आवश्यक केलें आहे; त्यामुळें करारांतील कोणत्या शर्ती मालकावर बंधनकारक रहातात याविषयीं लेखी पुरावा भाडेकऱ्याजवळ राहतो.

भाद्रपदः–हिंदु कालमापनपद्धतीप्रमाणें चांद्रमानानें हा वर्षाचा सहावा महिना आहे. या महिन्याच्या पौर्णिमेस चंद्र भाद्रपदा नक्षत्रानें युक्त असतो म्हणून यास 'भाद्रपद' असें नांव पडलें आहे. प्राचीन कालीं चांद्रमानपद्धतीपूर्वी यास 'नभस्य' असें नांव होतें. हा महिना साधारणतः इंग्रजी सप्टेंबर महिन्याचे वेळीं येतो व या महिन्यांत शारद् ऋतु असतो. उत्तर हिंदुस्थानांत यावेळीं ऐन पावसाळा असला तरी महाराष्ट्रांत व दक्षिणेंत बरसात संपत आलेली असते. हस्तनक्षत्राचे वळवाचें चैत्रमासाप्रमाणें पाऊस यामहिन्यांत पडतात. दिवसरात्र या महिन्यांत–२३ सप्टेंबरला–सारखीं होतात. सर्व वातावरण समशीतोष्ण होऊन मन प्रसन्न होतें. शेतांतील सर्व खरीप धान्यें–भात, जोंधळा, नाचणा, वरी इत्यादि–हीं या महिन्यांत संपूर्ण पोसून कापणीस येतात. सर्व सृष्टि समृद्ध दिसते. सर्व लोकांचीं मनें सुप्रसन्न व आनंदित असतात.

भाद्रपद मासांतील अनेक व्रतें व उत्सवामुळें त्यांचें महत्त्व श्रावणमासाचे खालोखाल मानलें जातें. या महिन्यांत एकान्नव्रत केल्यास त्यायोगें धन, धान्य व आरोग्य प्राप्त होतें असें शास्त्र आहे. भाद्रपद शुक्ल १स शिवाप्रीत्यर्थ मौनव्रत पाळतात, शुक्ल ३स वराहजयंतीचा उत्सव करतात व पौर्णिमेस पोळा हा गुरांप्रीत्यर्थ उत्सव करतात. गणेशचतुर्थी, ज्येष्ठागौरी, वामनद्वादशी हे सण, व हरितालिका, ऋषिपंचमी, श्रीमहालक्ष्मीव्रत, अनंतव्रत हीं व्रतें याच महिन्यांत येतात. हरितालिकेचें व्रत कुमारिका व सुवासिनी भाद्रपद शुक्ल ४स पार्वती व शिवलिंगाची पूजा करून, उपवास करून, कथा श्रवण करून व रात्रौ जागरण करून साजरें करतात. दर महिन्याच्या शुक्ल ४स सिद्धिविनायकी म्हणतात. भाद्रपद शुक्ल ४ ही महासिद्धिविनायकी मानून त्या दिवशीं चंद्रोदयीं गणपतीची स्थापना करून, पूजाअर्चा, नैवेद्य व आरती करून चार पांच दिवस उत्सव करतात. यायोगें सर्व संकटांचा परिहार होतो असें भाविक लोक समजतात. चिंचवड, मोरगांव, पारोळें, रंजनगांव पुळें येथील श्रीगणपतीचीं देवालयें प्रसिद्ध असून येथें हे उत्सव मोठ्या प्रमाणांत होतात. बुधगांव, सांगली, जमखंडी व कुरुंदवाड येथील राजघराण्यांचें श्रीगणपती हें कुलदैवत असून, या संस्थानांतूनहि गणेशोत्सव फार मोठ्या प्रमाणांत होतो.

भाद्रपद शुक्ल ५ स स्त्रिया ऋषिपंचमीचें व्रत करतात. या दिवशीं काश्यप, अत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि व वसिष्ठ या सप्तऋषींची पूजा स्त्रिया करतात व तिच्यामुळें रजोदर्शनकालीं घडलेलें पाप धुऊन जातें असें त्या मानितात. बैलांनीं कष्ट करून

तयार झालेला जिन्नस या दिवशीं स्त्रिया सेवन करीत नाहींत. इंग्लंडांत ज्याप्रमाणें All Saints Day नांवाचा दिवस सज्जनांच्या आठवणीसाठीं पाळतात त्याप्रमाणेंच ऋषिपंचमीचा दिवस प्राचीन व अर्वाचीन काळीं आपल्या इकडे पाळत आले आहेत.

भाद्रपद शुक्ल पक्षांतील अनुराधा नक्षत्रावर गौरीचें आवाहन करून, ज्येष्ठा नक्षत्रावर पूजन व मूळ नक्षत्रावर विसर्जन करण्याचा सांप्रदाय महाराष्ट्रांत व दक्षिण हिंदुस्थानांत असून त्यास ज्येष्ठागौरी अथवा महालक्ष्मी उत्सव हें नांव दिलेलें आहे. गणपतीस्थापनेनंतर दोन तीन दिवसांतच गौरी वाजतगाजत आणून बसवितात, त्यांची पूजा करतात, नैवेद्य दाखवितात व गणपतीबरोबर त्यांचें विसर्जन करतात. महालक्ष्मीच्या पूजनानें आपण अखंड सौभाग्यवती होतों असें स्त्रियांस वाटतें. गौरीपूजनाचे प्रकार स्थानपरत्वें भिन्न भिन्न आहेत.

दशावतारांतील पांचवा जो वामन त्याच्या नांवानें भाद्रपद शुक्ल द्वादशी पाळली जाते. शुक्ल चतुर्दशीस अनंतव्रत कुलाचार असेल तर अगर संकल्प केला असेल तर आचरितात. अनंत हा परमेश्वर असून सर्व चराचर पदार्थांचा नाश झाला तरी शेवटीं जें शेष अथवा शिल्लक राहील त्या कालरूपी शेषाच्या ठिकाणीं परमेश्वराचें अधिष्ठान आहे त्याच्याच कृपाप्रसादानें सर्व जग चाललें आहे व ज्यांच्यांत उत्तम गुण दृष्टोत्पत्तीस येत नाहींत त्यांच्यांत अनंत अथवा ईश्वर बाणलेला नाहीं अशी अनंतव्रताची शिकवण आहे. अशा परमसमर्थ अनंताची आठवण सदोदित व्हावी म्हणून हिंदुधर्मानें मानलेलीं. चौदा भुवनें ग्रंथीरूपानें ग्रथित करून तें सूत्र या दिवशीं हातीं बांधण्याची चाल आहे.

भाद्रपद महिन्याचा कृष्णपक्ष पितृकार्यास अत्यंत योग्य आहे असें शास्त्रकारांनीं ठरविलें असून यावेळीं म्हणजे सूर्य कन्या राशींत असतांना, पितर यमलोक सोडून मृत्युलोकीं आपल्या कुटुंबीय लोकांच्या घरीं वास करण्यासाठीं येतात अशी समजूत प्रचलित आहे. यास पितृपक्ष अथवा महालयपक्ष असेंहि नांव आहे. हा यामुळें अत्यंत पवित्र मानला जातो. यापैकीं भाद्रपद वद्य नवमी ही सौभाग्यानें मृत झालेल्या स्त्रियांप्रीत्यर्थ अविधवा नवमी म्हणून पाळतात. वद्य १४ घात चतुर्दशी किंवा घायाळ चतुर्दशी म्हणून ओळखली जाते. या दिवशीं अपघातानें मृत्यु पावलेल्यांचें वद्य ११ स संन्याश्यांचें व १३ स शस्त्रानें मेलेल्यांचें श्राद्ध करतात. सर्वपित्री अमावास्या ही सर्व पितरांप्रीत्यर्थ पाळण्याची श्राद्धतिथि आहे. या शिवाय भागवत सप्ताह, रामकृष्णपरमहंस पुण्यदिन, उमामहेश्वरव्रत, नांदीश्राद्ध, ब्रह्मानंद पुण्यतिथि हे सण व उत्सवहि या महिन्यांत येतात. याप्रमाणें भाद्रपद हा हिंदूंचा व्रतवैकल्यांनीं संपूर्ण भरलेला व महत्त्वाचा महिना आहे.

भारतीय तत्त्वज्ञानः- तत्त्वज्ञान या विषयावरील लेखांत तत्वज्ञान या शब्दाचा अर्थ काय, त्यांत कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो, हें शास्त्र आहे किंवा नाहीं, त्याचा उपयोग काय वगैरे गोष्टींची चर्चा साकल्यानें करण्यांत आली आहे. यामुळें त्याची पुनरुक्ति करण्याची जरुरी नाहीं. येथें भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे काय एवढेंच आपणांस पाहणें आहे. भारतीय तत्त्वज्ञान या शब्दसमूहाचा विचार करूं लागलों असतां प्रथमतः असें वाटणें संभवनीय आहे कीं, तत्त्वज्ञान म्हणजे तत्त्व-सत्य वस्तु तिचें ज्ञान. मग त्यांत प्रांतवार अथवा देशवार भेदाला जागा कसली? इंग्लंडचें अंकगणित वेगळें व हिंदुस्थानचें वेगळें असें झालें आहे काय? सत्य कांहीं काळ मानवी दृष्टीच्या आड लपलेलें असेल. पण एकदां तें उघडकीस आलें म्हणजे तें संपूर्ण जगाच्या मालकीचें होतें व मग त्यांत हें अमक्या देशाचें, तें तमक्या देशाचें असा भेद राहातच नाहीं; व असला भेद जेथें राहूं शकत नाहीं तीच गोष्ट शास्त्र या नांवानें संबोधण्यास योग्य होय. तत्त्वज्ञान हें शास्त्र आहे, अर्थात् त्यांत प्रांतवार अथवा गांववार भेद असणें संभवनीय नाहीं. असा आक्षेप भारतीय या शब्द समूहाचा आपण विचार करूं लागलों कीं प्रारंभींच उत्पन्न होतो.

पण याविषयीं इतकें लक्षांत ठेवलें कीं पुरें, कीं हा आक्षेप तत्त्वज्ञानाच्या स्वरूपाच्या अज्ञानामुळें उत्पन्न होतो. भिंगांतून येणारे सूर्यकिरण ज्याप्रमाणें ज्या भिंगांतून ते जात असतात त्या भिंगाच्या रंगानें वेढले जाऊन त्याच्यासारखे दिसू लागतात, अथवा एकाच तळ्यांतून निघणाऱ्या नद्या ज्या प्रांतांतून वाहतात त्या प्रांताचे जमिनीचे गुणधर्म त्यांत मिसळल्यानें त्यांचें पाणी वेगवेगळया गुणधर्मानें युक्त होतें, तसेंच भारतीय, शार्मण्यदेशीय आंग्ल पंडित हे वेगवेगळया परिस्थितींत वावरत असल्यानें त्यांच्या तत्त्वज्ञानांत वेगवेगळया छटा दिसून येतात. देशादेशांतील तत्त्व-

ज्ञानाच्या मांडणींत फरक दिसेल यांत काय नवल आहे ? व्यक्तिव्यक्तीच्या मांडणींतहि फरक दिसून येतो. अर्थात् भारतीय तत्त्वज्ञानाचा विचार करणें याचा अर्थ तत्त्वज्ञान हें भारत देशांत निर्माण झाल्यामुळें त्यास जे विशिष्ट गुण प्राप्त झाले त्यांचा विचार करणें होय.

परकीय पंडितांना भारतीय तत्त्वज्ञानांत दिसलेले विशेष अथवा दोष

भारतीय तत्त्वज्ञानाचे यथार्थ विशेषगुण सांगण्यापूर्वी पाश्चात्य पंडित या तत्त्वज्ञानाकडे कोणच्या दृष्टीनें पहात होते अथवा अजूनहि पहातात तें पाहूं. पाश्चात्य आंग्ल पंडितांनीं ज्यावेळीं भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास सुरू केला त्यावेळेस दुर्दैवानें भारतवर्ष हें ब्रिटिश साम्राज्यांत एक भाग होऊन बसलें होतें. जित राष्ट्राचें तत्त्वज्ञान असल्या भावनेनें या तत्त्वज्ञानाकडे पाहण्याची दृष्टि जर आरंभीं आरंभींच्या पाश्चात्य पंडितांत दिसून आली, तर त्यांत कांहीं अस्वाभाविक आहे असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. पण या भावनेचा परिणाम असा झाला कीं, त्या पंडितांना आमच्या तत्त्वज्ञानांत नसलेले दोष दिसून आले. उदाहरणार्थः भारतीय तत्त्वज्ञान हें निराशावादी (Pessimistic) आहे, ' सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ' असें शिकविणारें आहे, असा त्याचा एक विशेष असें त्यांना आढळून आलें. संपूर्ण तत्त्वज्ञानावर हा आक्षेप उगीचच आणलेला आहे. भारतीय तत्त्वज्ञानांतील एकाददुसरें दर्शन निराशावादी म्हणतां येईल. बौद्ध दर्शनाबाबतच हें म्हणणें खरें आहे. बाकीचीं दर्शनें जगांत दुःख आहे या विचारापासून आपल्या चर्चेस आरंभ करतात हें खरें, पण दुःखाचा नाश होऊं शकत नाहीं, जगांत सुख नाहीं, तेव्हां जग सोडून जाण्याची पहिली संधी गांठा असा निष्कर्ष मात्र ते काढीत नाहींत. उलट जगांत दुःख आहे पण त्याचा विचारानें नाश करतां येतो व मृत्युलोकीं मनुष्य सुखी होऊं शकतो, ' अज्ञानाला जगांत दुःख, सज्ञानाला जग सुखानें भरलें आहे ' असा सांगण्याकडे बहुतेक दर्शनांचा कल आहे. शिवाय कोणीही दर्शनकार, जगांत दुःख फार आहे अर्थात् सुख पाहिजे असेल तर ' मरा ' असा उपदेश करीत नाहीं. तात्पर्य हें तत्त्वज्ञान निराशावादी आहे हा याचा विशेष नाहीं. याचा विशेष असा आहे कीं, बहुतेक दर्शनें दुःखाची निवृत्ति व्हावी या विचारापासून आपल्या चर्चेस आरंभ करतात.

दुसरा विशेष या पंडितांना दिसून आला तो हा कीं, तत्त्वज्ञान म्हणजे कोणचाहि ग्रंथ अथवा व्यक्ति यांच्या मतास श्रद्धाळूपणानें न अनुसरतां स्वतंत्रपणानें मानवी बुद्धीनें केलेली जगताच्या मूल तत्त्वांची चर्चा पाश्चात्य देशांत तत्त्वज्ञान याचा हा जो रूढ अर्थ आहे त्या अर्थानें हा शब्द वापरल्यास भारतवर्षांत तत्त्वज्ञान सांपडेलच कीं नाहीं याची वानवा आहे. हिंदुस्थानांत भोळ्या धार्मिक कल्पना रूढ आहेत. वेदप्रामाण्य कबूल करूनच आमची बहुतेक चर्चा सुरू असते व यामुळें चिकित्सेच्या कसावर घासून ज्यांची धार पारखून घेतली असलेलीं प्रमेयें हिंदुस्थानांत नाहींतच म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानांत स्वतंत्र बुद्धीस वाव नाहीं. वेद व शास्त्रें यांच्या अर्थांची चर्चा करणें येवढेंच या देशांतील लोकांचें काम आहे. कारण येथील लोकांनीं आपली बुद्धि वेद व शास्त्रें यांना विकून टाकली आहे असें या लोकांचे म्हणणें आहे. पण हाहि विशेष खरा नव्हे. कारण एक तर हिंदुस्थानांत वेदाचें प्रामाण्य न मानतां स्वतंत्रपणें मूल तत्त्वांचीं विचार करणारीं बौद्धजैनादिकांचीं दर्शनें आहेतच. नवीन प्रार्थनासमाज, ब्रह्मसमाज वगैरे वेदप्रामाण्य मानीत नाहींत. शिवाय जीं दर्शनें वेदाचें प्रामाण्य मानतात त्यांतसुद्धां वेदांचा अर्थ लावण्यासंबंधानें इतकी स्वतंत्रता आहे कीं, वेदप्रामाण्य मानणें या एक ठोकळ समजुतीवेक्षां त्यांत कांहींच साम्य नाहीं.वेदांचें प्रामाण्य मानूनहि एक दर्शन ईश्वराचें अस्तित्व मानतें, तर एक मानीत नाहीं व लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, ईश्वराचें अस्तित्व मानणें असें म्हणणाऱ्यास त्याचा ' नास्तिक ' दर्शन म्हणून भारतीय तत्त्वज्ञानी त्याग करीत नाहींत. भारतीय तत्त्वज्ञ हे बेडरपणानें आपलीं मतें मांडतात. याविषयीं प्रो. मॅक्स्फुल्लर यांचे उद्गार मननीय आहेत.

" They never equivocate or hide their opinions where they are likely to be unpopular. Kapila for instance, the author or hero etonymus of the Taniblya philosophy, confesses openly that his system is atheistic, an-isora .... but inspite of that, his system was treated as legitimate by his contemporaries because it was reasoned out completely ... " (Preface ix)

येवढी गोष्ट खरी कीं, आस्तिक दर्शनाची व्याख्या वेदप्रामाण्य माननारे अशी झाल्यानें येथील विचार मांडण्याची जी पद्धत आहे तिला एक विशिष्ट प्रकारचें वळण लागलें. थोडाबहुत तत्त्वज्ञानाचा स्वैर संचार कमी झाला. येन्हवीं बुद्धीच्या स्वातंत्र्याची हानि होऊन फार नुकसान झालें असें म्हणतां येत नाहीं.

पाश्चात्य देशांत स्वतंत्र बुद्धीस वाव असल्यामुळें आज जितकीं मतें उपलब्ध झालीं आहेत तशीं मत-मतांतरें आमच्याकडेहि आहेत. ब्रॅडलेप्रमाणें ब्रह्मवादी शंकराचार्य आहेत. सगुण ईश्वर मानून नाना पुरुष माननारे वॅार्डसारखे रामानुज आहेत. मॅक्टागार्टच्या-प्रमाणें नाना पुरुष माननारे सांख्य आहेत. परमाणु-वादीप्रमाणें नैय्यादिक आहेत. तात्पर्य तत्वज्ञानाच्या वाढीच्या दृष्टीनें यामुळें मोठी हानि झाली आहे असें म्हणतां येईल असें वाटत नाहीं.

आक्षेप तिसराः—भारतीय तत्त्वज्ञान म्हणून एक-जिनसी तत्त्वज्ञान कोठून असणार? आपणांस ग्रीक तत्त्वज्ञान, आंग्ल तत्त्वज्ञान, इत्यादि शब्दप्रयोग करतां येणें शक्य आहे. कारण ग्रीक भाषा बोलणारांचें तत्त्वज्ञान, आंग्ल भाषा बोलणारांचें तत्त्वज्ञान असा त्या त्या पदांचा अर्थ करतां येईल. पण भरतखंड हें इतकें मोठें आहे कीं, त्यांतील व्यवहार वेगवेगळ्या छपन्न भाषांतून होत आहेत. वेगवेगळे मानववंश या ठिकाणीं वाढीस लागलेले आहेत; अशा स्थितींत भारतीय तत्त्व-ज्ञान म्हणून एकच तत्त्वज्ञान कसें मांडतां येईल? व असला शब्दप्रयोग तरी कसा करतां येईल?

यावर पहिलें असें उत्तर देतां येईल कीं, भाषा भिन्न, वंश भिन्न, तरी पण या देशांतील विचारांची हीच मौज आहे, अथवा हेंच वैशिष्ट्य आहे कीं, याच्या बुडाशीं एक सामान्य कल्पनासमूह आपणांस दिसून येतो. दुसरी गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी अशी आहे कीं, आज आपणास एका भाषेची अडचण पडते. पण अजूनही विसाव्या शतकांत ज्या काळांत संस्कृत भाषा मृत झाली म्हणतात त्या काळांतहि पंडित लोक संस्कृतांत बोलतात, वादविवाद करतात. मग हजारों वर्षांपूर्वी संस्कृतचा प्रचार सर्वत्र होता यांत शंका घेण्याचें कारणच नाहीं. धर्म, तत्त्वज्ञान व शास्त्रें यांची संस्कृत हीच भाषा होती. वेद, उपनिषदें हे ग्रंथ आसेतु हिमालय सारखेच मान्य आहेत. पूर्वी तत्त्वज्ञानाचा झरा जिवंतपणें वाहात होता तेव्हां संस्कृत भाषा सर्वत्र बोलली जात असे यांत संशयच नाहीं. अर्थात् भाषा भिन्न म्हणून भारतीय तत्त्वज्ञान हा शब्दप्रयोगच सार्थ होणार नाहीं हें म्हणणें अर्थात्च चुकीचें आहे.

भारतीय तत्वज्ञानाचे विशेष—आतांपर्यंत परकीय पंडितांनीं भारतीय तत्त्वज्ञानाचे विशेष म्हणून जे मानले त्यांची चर्चा केली. आतां पाश्चात्य तत्त्व-ज्ञानाच्या इतिहासाशीं आपल्या तत्त्वज्ञानाच्या इति-हासाची तुलना केली असतां आपल्या तत्त्वज्ञानाचे जे विशेष गुण आढळतात ते पाहूं.

(१) भारतीय तत्त्वज्ञानाचा पहिला विशेष असा आहे कीं, पाश्चात्य देशांत तत्त्वज्ञान हें तदितर म्हणजे धर्म अथवा भौतिक शास्त्रें यांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी शास्त्राचा भाग अथवा पाठपुरावा करतांना दिसतें. स्वतंत्र रीतीनें आपल्या पायावर उभारलेलें तत्त्वज्ञान पाश्चात्य देशांत अगदीं अलीकडे आढळून येत आहे. तरी तत्संबंधींसुद्धां पेरीसारखे अमेरिकन लेखक आक्षेप घेतच आहेत. पाश्चात्य देशांत तत्त्वज्ञान हें कधीं धर्माचा दास तर कधीं भौतिक शास्त्राचा दास होऊन राहिलेलें आढळतें. आर्यावर्तांत मात्र तशी स्थिति नाहीं. येथें तत्त्वज्ञान हें धर्म अथवा भौतिक शास्त्र यांच्याकडे तोंड करून ते काय म्हणतील याचा विचार करीत राहिलें नाहीं म्हणूनच उपनिषदासारखे स्वतंत्र विचाराचे ग्रंथ हिंदुस्थानांत निर्माण झाले. त्यांतील विचारस्वातंत्र्याचें गमक म्हणून एकच सांगणें पुरें कीं, बुद्धिप्रामाण्यवादी, प्रार्थनासमाजिस्ट अथवा केशवचंद्रसेनासारखे ब्राह्मो ह्या सर्वांनाही उपनिषद्ग्रंथ सारखेच मान्य आहेत. तात्पर्य, आमच्याकडे तत्त्वज्ञानानें आपलें तत्त्वशोधनाचें काम सोडून धर्म, नीति अथवा भौतिकशास्त्री यांच्याशीं गोडीगुलाबी लावून त्यांना खूष करण्याचा प्रयत्न करून आपलें स्वातंत्र्य टाकलें नाहीं.

(२) या तत्त्वज्ञानाचा दुसरा विशेष असा आहे कीं, पाश्चात्य तत्त्वज्ञान हें मानवी जीवनाचा विचारच करीत नाहीं, त्याची व प्रत्यक्ष जीवनाची फारकत झाली आहे असा जो आक्षेप पाश्चात्य तत्त्वज्ञाना-विरुद्ध घेतला जातो तसा आक्षेप भारतीय तत्त्वज्ञाना-संबंधानें घेतां येणार नाहीं. भारतीय तत्त्वज्ञान हें नुसती बुद्धीची कसरत दाखविण्याकरतां निर्माण झालें नाहीं. तें तत्त्वज्ञान मानवी जीवनांतील जे अनेक

महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांचीं उत्तरें काढण्याकरतां निर्माण झालें आहे. असा कोण आहे कीं, ज्याला दुःखाचा अनुभव नाहीं अथवा असून जो दुखःनाशाचा प्रयत्न करीत नाहीं? भारतीय तत्त्वज्ञानांतील बहुतेक दर्शनें दुःखनाश व आनंदप्राप्तीकरतां निर्माण झालेलीं आहेत. त्यांनीं एतदर्थ जीं साधनें सांगितलीं त्यांत मतभेद असतील, पण सर्वांना मोक्ष—दुःखनाश—हवा ही गोष्ट निर्विवाद आहे. या तत्त्वज्ञानाचा जात्याच कल अनुभवाकडे विशेष आहे. नुसत्या कल्पनेनें अथवा तर्कानें त्याचें समाधान होत नाहीं.

(३) या तत्त्वज्ञानाचा तिसरा विशेष असा सांगतां येईल कीं प्रत्यक्ष अनुभवाप्रमाणें भारतीय तत्त्वज्ञानाचा कल सामान्यतः समन्वयाकडे आहे. पाश्चिमात्य तत्वज्ञान हें पृथक्करणाकडे झुकतें. आमच्याकडे केवळ शुद्धद्वैती असे दर्शनकार थोडेच सांपडतील. या नाहीं तर त्या दरवाजानें अद्वैताचा अंगिकार केला नाहीं अशीं दर्शनें फारच थोडीं!

(४) चौथा विशेष असा कीं, पाश्चात्य देशांत तत्त्वज्ञान व धर्म यांचें युद्ध कित्येक शतकें चाललेलें आपल्याला आढळून येतें. पण भारतवर्षांत तत्त्वज्ञान व धर्म यांचा झगडा आढळून येत नाहीं. त्याचें कारण जणूं काय प्रथमपासूनच प्रत्येकानें आपलें क्षेत्र ठरवून घेतलेलें आहे.

(५) या तत्त्वज्ञानाचा पांचवा विशेष असा सांगतां येईल कीं, यांत फार विविधता व विपुलता आहे. तसेंच हें तत्त्वज्ञान तांतडीच्या पायावर उभारलेल्या भिंतीसारखें नाहीं. हें अनुभवाच्या भरभक्कम पायावर उभारलेलें आहे. यांतहि पाश्चात्य तत्त्वज्ञानाप्रमाणें तार्किक आक्षेप समाधानपद्धतीचें अवलंबन केलेलें असतें.

(६) या तत्त्वज्ञानाचा विशेष असा आहे कीं इकडील सर्व दर्शनें प्रमाणांच्या विचारापासूनच विचारास आरंभ करतात. प्रमाणांच्या विचाराचें महत्त्व कांटनें लोकांपुढें मांडलें. पण आमच्याकडे कांटच्या काळाच्या पूर्वीं शेकडो वर्षें तें मान्य झालेलें होतें.

(७) याची बहुतेक वाढ भाष्य, टीका, उपटीकारूपानें झाली आहे. अलिकडे अलिकडे मात्र स्वतंत्र ग्रंथरूपानें मत मांडण्याच्या पद्धतीचा अंगीकार केलेला आढळून येतो.

सामान्य कल्पना—मागें असें म्हटलें आहे कीं मानस सरोवरांतून ज्याप्रमाणें वेगवेगळ्या गंगा ब्रह्मपुत्रा इत्यादि नद्या निघतात तशा हिंदुस्थानांतील लोकसमजुतीच्या मानससरोवरांतून वेगवेगळे तत्त्वज्ञानाचे प्रवाह उत्पन्न झाले आहेत. यामुळें आपणांस वेगवेगळ्या दर्शनांतून एक कल्पनासमूह सर्वसामान्य असलेला आढळून येतो. तो कल्पनासमूह पुढील प्रमाणेंः—(१) संसार (पुनर्जन्म). (२) कर्म. (३) मोक्ष. (४) आत्म्याचें अमरत्व. (५) गुण.

(१) आस्तिक नास्तिक सर्व दर्शनांतून ज्या कल्पना सामान्यपणें आढळून येतात त्यांत संसाराच्या कल्पनेचा प्रामुख्यानें उल्लेख करणें अवश्य आहे. मात्र संसार हा शब्द मराठींत ज्या अर्थानें वापरला जातो त्या अर्थानें शास्त्रीय परिभाषेंत वापरला जात नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे. व्यवहारांत संसार म्हणजे बायकामुलें घरदार असा अर्थ समजतात. पण शास्त्रांत संसार याचा अर्थ-संसरण—वारंवार जन्माला येणें व मरणें—असा आहे. गीतेनें फारच सुंदर दृष्टांत देऊन ही कल्पना मांडली आहे. कपडा जुना झाला म्हणजे जसा मनुष्य टाकून देतो, व दुसरा घालतो, तसेंच एक शरीर टाकून जीवात्मा दुसरें शरीर घेतो, ही कल्पना आस्तिक दर्शनांत सांपडते. येवढेंच नव्हे तर बौद्ध व जैन यांसारखीं वेदप्रमाण न मानणारीं जीं दर्शनें आहेत त्यांतसुद्धां ही कल्पना आढळून येते. पुनर्जन्म मुळींच मानीत नाहीं असें एक चार्वाक दर्शनच होय.

अगदीं अलिकडे वेदांत ही कल्पना नाहीं, बौद्धदर्शनांत क्रियासातत्य आहे असें दर्शविण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. पण तो प्रयत्न सर्व पंडितांना पटेल असा झाला आहे असें वाटत नाहीं.

(२) नुसता जन्म मानून काम भागत नाहीं. त्या जन्माची व्यवस्था लावणें हें अवश्य आहे. आमच्याकडे जग हें वेगवेगळ्या दैवी अथवा पाशवी शक्तींचें खेळ खेळण्याचें क्रिडांगण आहे. यांत काय हवें तें होईल अशी कल्पना कधींच रूढ नव्हती. जगाच्या बुडाशीं नियम अथवा कायदा आहे व सर्व त्या नियमाप्रमाणें चाललें आहे. दंड अथवा नियम हा देवालाहि चुकत नाहीं असा आमचा सिद्धांत आहे. हें निरपवाद दंडाचें स्वरूप ‘कर्माच्या’ कायद्याच्या रूपानें व्यक्त केलेलें आपणांस आढळून येतें. जो जसें कर्म करतो

तसा त्याला फलभोग होतो. पेरावें तसें उगवतें. आमचीं शास्त्रें 'यथा कर्म यथा श्रुतम्' असा सिद्धांत काढतात. मी जर कर्म केलें नाहीं, तर मला त्याचें फळ काय म्हणून भोगावयास लागावें ?

या सिद्धान्ताच्या मर्माकडे लक्ष पुरवणें थोडें अवश्य आहे. कित्येकांची कल्पना कर्माचा सिद्धांत मानणें म्हणजे दैववाद मानणें, प्रयत्नाला मूठमाती देणें असा आहे; पण हें खरें नव्हे. कारण कर्म सिध्दांत हा स्वयंनिर्णयवाद (Self-determinism) मानणारा आहे. आज जें मी भोगतों तें माझ्या मागच्या कर्माचें फल. पण पुढें बरें व्हावें असें वाटत असेल तर माझी क्रिया, माझें ज्ञान सुधारणें अवश्य आहे. जो कर्ता तोच भोक्ता. मनुष्य भोगाला बांधला आहे. इच्छा अथवा कर्म या बाबतींत तो स्वतंत्र आहे. संस्कारानें वासना बदलते. इच्छेनें क्रिया बदलते. पण भोग मात्र ठरलेला आहे असा हा थोडक्यांत कर्माचा सिद्धांत आहे.

(३) या दोन कल्पनेबरोबरच सर्वमान्य कल्पना म्हणजे मोक्षाची होय. आमचीं दर्शनें मोक्षाकरतां मार्ग सुचवणारीं आहेत. मोक्ष शद्बच असा आहे कीं त्याचा अर्थ करणें झाल्यास 'कशापासून' असा प्रश्न उत्पन्न होतोच. संसारांतून मुक्ति हें त्याचें 'स्वरूप'. पण या मोक्षाच्या स्वरूपासंबंधानें वेगवेगळ्या दर्शनकारांचीं मतें मात्र वेगवेगळीं आहेत. मोक्षाचें साधन तत्त्वज्ञान म्हणून समजलें जातें पण प्रत्येक दर्शनाची कल्पना दुसऱ्याशीं तंतोतंत मिळणारी आहेच असें मात्र नाहीं.

(४) देहच आत्मा असें एक चार्वाक मानतात. बाकी सर्व दर्शनकार देहातिरिक्त आत्मा मानणारे आहेत. भारतीय दर्शनकार आत्म्याचें अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां त्याचें अमरत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात.

आत्मा आहे हें प्रमेय इतकें हाडीमासीं खिळलें आहे कीं भारतीय पंडित, हवा जशी मनुष्य सहज श्वासोश्वासाबरोबर आंत घेतो तसे स्वाभाविक रीत्या हें तत्त्व ग्रहण करतात.

(५) पाश्चात्य देशांत न आढळणारी पण आमच्या सर्व दर्शनांतून आढळून येणारी दुसरी कल्पना म्हणजे गुणांची. गुण हे तीन आहेत. त्यांचीं नांवें सत्व, रज, तम अशीं आहेत व विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे हे गुण विशेषणाच्या स्वरूपाचे नसून पदार्थांच्या स्वरूपाचे मानले जातात व जगताचे ते उत्पादन–कारण समजले जातात.

यांच्या जोडीला डॉ. दासगुप्त हे आणखी एक कल्पना सर्व दर्शनांना मान्य आहे म्हणून मानतात. ती म्हणजे मोक्षाच्या साधनाच्या बाबतींत योगावर जोर. पण हा विशेष सर्व दर्शनें मान्य करतीलच असें म्हणतां येत नाहीं.

इतिहास–भारतीय तत्त्वज्ञान हें अतिशय जुनें आहे हें सर्वसंमत आहे. जगांत जुन्यांतले जुने म्हणून जे विद्यमान ग्रंथ आहेत ते वेदग्रंथ हा निर्णय आज सर्वमान्य होऊन बसला आहे. वेदग्रंथ हे भारतीय तत्त्वज्ञानाचे आद्य ग्रंथ आहेत. अर्वाचीन भारतीय व भारताबाहेरील पंडित वेदाचा काल–संहितेचा काल–इसवी सन पूर्वी ५००० तें ६००० वर्षें मानतात. पण या बाबतींत ऐकमत्य नाहीं. कित्येक युरोपियन पंडित तो अगदीं अलीकडे अडीच तीन हजार वर्षांपूर्वीपावेतोंहि आणून ठेवतात. आमच्याकडील जुन्या दर्शनकारांचीं मतें पाहिलीं तर त्यांतही एक मत नाहीं. चार्वाकासारखे वेद पौरुषेय म्हणजे मनुष्यांनीं–त्यांतही स्वार्थी मनुष्यांनीं–केलेले असें समजतात. आस्तिक दर्शनकारांतहि याबद्दल एकमत नाहीं. नैय्यायिक वेद पौरुषेय मानतात. शंकराचार्य वेद ईश्वरापासून झाले असें मानतात. पूर्वमीमांसक मात्र वेदांतील शब्दच नित्य आहेत असें मानतात. एका दृष्टीनें हल्लींसुद्धां उपनिषदें अपौरुषेय मानणारे पंडित आहेत. पण ते अपौरुषेय याचा अर्थ 'अतिमानुष प्रेरणेनें केलेले ग्रंथ' असा करतात.

वेद हे या तत्त्वज्ञानाचे मूळ ग्रंथ मानून या तत्त्वज्ञानाच्या इतिहासाकडे पाहिलें असतां या तत्त्वज्ञानाचे खालीलप्रमाणें खंड करणें शक्य आहे:—

(१) पहिला खंड–वेदकाल (उपनिषद्पूर्व काल–संहिता व ब्राह्मण यांचा व दुसरा उपनिषत्काल).

(२) दुसरा खंड–महाभारत, भगवद्गीता.

(३) तिसरा खंड–बुद्ध, त्याचे अनुयायी व महावीर (जैन)

(४) चवथा खंड–सूत्रें.

(५) पांचवा खंड–भाष्यकार–शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य व निंबार्काचार्य.

षट्दर्शनसार दर्शक पत्रक.

	५ बंधहेतु	६ बंध	७ मोक्ष	८ मोक्षसाधन	९ अधिकारी	१० प्रकट-कर्ता आचार्य	११ प्रधान-कांड	१२ वाद (वाद)	१३ आत्म-परिणाम संख्या	१४ प्रमाण	१५ ख्याति	१६ सत्ता	१७ उपयोग
द	निषिद्ध कर्म	नरकादि दुःख-संबंध	स्वर्गप्राप्ति	वेदविहित कर्म	कर्म फलासक्त	जैमिनी	कर्मकांड	आरंभ वाद	विभु नाना	षट् (६)	अख्याति	जीवजगत् परमार्थ सत्ता	चित्तशुद्धि
	अविद्या	अविद्यातत्कार्य	अविद्यातत्कार्य निवृत्ति पूर्वक परमानंद ब्रह्म प्राप्ति	ब्रह्मात्मैक्यज्ञान	मलविक्षेप दोष-रहित चतुष्टय साधनसंपन्न	वेदव्यास	ज्ञानकांड	विवर्त वाद	विभु एक	षट् (६)	अनिर्वच-नीय	परमार्थ रूपात्म सत्ता व्याव-हारिक प्रगति भासिक सत्ता	तत्त्वज्ञानपूर्वक मोक्ष
- त् ड	अज्ञान	एकविंशति दुःख	एकविंशति दुःखध्वंस	इतर भिन्नात्म ज्ञान	दुःख निहासु-कुतर्की	गौतम	ज्ञानकांड	आरंभवाद	विभु नाना	प्रत्यक्ष अनुमान उपमान शद्ब	अन्यथा	जीवजगत् परमार्थ सत्ता	मनन
र	अज्ञान	एक विंशति दुःख	एकविंशति दुःखध्वंस	इतर भिन्नात्म ज्ञान	दुःख निहासु-कुतर्ती	कणाद	ज्ञानकांड	आरंभ वाद	विभु नाना	प्रत्यक्ष अनुमान (२)	अन्यथा	जीवजगत् परमार्थ सत्ता	मनन
न	अविवेक	अध्यात्मादि त्रिविध दुःख	त्रिविध दुःख-ध्वंस	प्रकृति पुरुष-विवेक	संदिग्ध विरक्त	कपिल	ज्ञानकांड	परिणाम वाद	विभु नाना	प्रत्यक्ष अनुमान शद्ब (३)	अख्याति	जीवजगत् परमार्थ सत्ता	'त्वं' पदार्थ-शोधन
र्गा	अविविक	प्रकृति पुरुष संयोगजन्य अविद्यादि पंचक्लेश	प्रकृति पुरुष संयोगाभाव-पूर्वक अवि-द्यादि पंचक्लेश-निवृत्ति	निर्विकल्प समाधिपूर्वक विवेक	विक्षिप्त चित्र-वान्	पतंजली	उपासना-कांड	परिणाम वाद	विभु नाना	प्रत्यक्ष अनुमान शद्ब (३)	अख्याति	जीवजगत् परमार्थ सत्ता	चित्तैकाग्र्य

(६) सहावा खंड–भाष्यकारांच्या ग्रंथावरील टीकाकार.

(७) सातवा खंड–भक्तिमूलक तत्त्वज्ञान-प्राकृतांतील.

(८) आठवा खंड–अर्वाचीन–ब्राह्मो, आर्य, देव, प्रार्थनासमाज इ.

हा जो कालानुक्रम दिला आहे त्यांत थोडा फरक होणें शक्य आहे. बुद्ध, सूत्रकार वगैरेंचा काल निश्चित नसल्यानें कालानुक्रम अनिश्चित राहणारच. भारतवर्षाची संस्कृती अत्यंत प्राचीन असल्यानें व संस्कृत भाषेची वाढ फार पुरातन कालींच पुरी झाल्यानें कोणचा ग्रंथ केव्हां झाला, अथवा कोणता ग्रंथकार कोणच्या शतकांत झाला हें निश्चित रीतीनें ठरविणें फारच कठीण होऊन बसलें आहे. या अडचणीला भर म्हणून आणखीहि एक अडचण आहे. ती ही कीं, आमच्याकडील जुने ग्रंथकार आपल्या ग्रंथांत आपली माहिती फार काय आपला कालहि देत नाहींत. या कारणांमुळें भारतीय दर्शनांचा कालानुक्रम ठरविणें हें फारच कठीण काम आहे. वर दिलेला अनुक्रम डॉ. राधाकृष्णन्, डॉ. दासगुप्त, प्रो. हिरियण्णा वगैरे अर्वाचीन तत्त्वज्ञांस मान्य आहे. भारतीय तत्त्वज्ञानाची थोडक्यांत कल्पना, विषयदृश्य त्यांतील विभागणी करून देतां येण्यासारखी आहे. ती देण्यापूर्वी कांहीं विशिष्ट शब्दांचे अर्थ दिले आहेत ते ध्यानांत ठेवावे.

भारतीय संस्कृती वेदमूलक आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असे चार वेद आहेत. प्रत्येकांत अनेक शाखा आहेत; व प्रत्येक शाखाग्रंथाचे संहिता, ब्राह्मण व आरण्यक अथवा उपनिषद् असे भाग करतां येतात. हे सर्व ज्या कालीं झाले त्याकालीं लेखनकला ज्ञात नसल्यानें ते मुखोद्गतच राहात, व नवी आवृत्ती नवा शिष्य जेव्हां तयार होईल तेव्हांच पुरी होत असे. यामुळें सबंध ग्रंथ लक्षांत ठेवण्यास कठीण म्हणून त्याचें सार थोडक्यांत सांगण्याकडे प्रवृत्ती होऊं लागली व हें सार मांडतांना स्वाभाविकच मतास सुव्यवस्थितपणा व सुटसुटीतपणा आणण्याचा प्रयत्न केला गेला. या प्रयत्नांतूनच सूत्रें निर्माण झालीं. वेद हे अपौरुषेय असे मानल्यानें त्यांचें प्रामाण्य मानणें, आपलें मत त्यांत आहे असें दाखविण्याकडे स्वाभाविक रीत्या प्रवृत्ति होऊं लागली व यामुळें तत्त्वज्ञानाचा विचार करणारीं शास्त्रें अथवा दर्शनें यांत दोन भेद झाले. एक प्रामाण्य मानणारे म्हणजे आस्तिक व दुसरा न मानणारे म्हणजे नास्तिक. हे दर्शनभेद खालील वर्गीकरणांत दिसून येतील:–

दर्शनें

आस्तिक	नास्तिक
पूर्वमीमांसा	चार्वाक
वेदान्त–(शंकर, रामानुज, मध्व, वल्लभ, निंबार्क)	माध्यमिकादि बौद्ध दर्शनें
न्याय	जैन
वैशेषिक	
सांख्य	
योग	
व इतर शैव व वैष्णव मतें	

यांतील सहा प्रमुख आस्तिक दर्शनांच्या मताचा तक्ता सोबत दिला आहे. त्यावरून या तत्त्वज्ञानाचा भरीवपणा कळून येणारा आहे.

बौद्ध, जैन दर्शनें हीं महत्त्वाचीं दर्शनें आहेत.

मध्ययुगांत भारतदेशांत भक्तिमार्गाचा पुरस्कार करणारे मोठमोठे आचार्य झाल्यानें त्याकाळीं भक्ति–तत्त्वज्ञानाचा मोठा पगडा या देशांतील लोकांच्या मनावर बसला. व त्याच सुमारास एतद्देशीय भाषांचा प्रचार सुरू झाल्यानें देशी भाषांतून तत्त्वज्ञान निर्माण होऊं लागलें. प्रथम प्रथम अर्थातच त्याचें स्वरूप संस्कृतांतील भांडार आपल्या भाषेंत आणून सोडणें येवढेंच होतें. पण पुढें पुढें हा काळ बदलला व देशी भाषेंत स्वतंत्र तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ निर्माण होऊं लागले. पण एकंदरींत हे सर्व जुन्या वळणावरचेच यांत शंका नाहीं.

या ओघास कलाटणी अगदीं अर्वाचीन काळांत मिळाली; व त्यास कारण इंग्रजी राज्यकर्त्यांचा व भारतीयांचा आलेला संबंध. या संबंधानें नवीन युगास प्रारंभ झाला. प्रथम प्रथम लोक परदेशीय लोकांच्या भौतिक शास्त्रांच्या वाढीनें दिपून गेल्यानें, आपला धर्म, आपलें तत्त्वज्ञान, आपली भाषा हीं सर्व त्याज्य असें मानण्याकडे सुशिक्षितांचा कल होऊन बसला. या काळांत धर्मांतरहि बऱ्याच प्रमाणांत झालें. या काळांतील तत्त्वज्ञानाची चळवळ म्हणजे पाश्चात्य ग्रंथांचे भाषांतर करणें होय. पण हाहि काळ फार दिवस

टिकला नाहीं. देशांतील सूज्ञ लोकांनीं आपल्या आचार-विचारावर आलेला धुरळा झाडण्याचा पुनश्च प्रयत्न केला. नवीन खिश्चन तत्त्वज्ञान व भौतिक शास्त्रें यांच्या अभ्यासाचा यांच्या बुद्धीवर परिणाम झाल्यामुळें यांचा कल बुद्धिप्रामाण्याकडे स्वाभाविक झुकला; पण त्या मंडळींनीं बुद्धिप्रामाण्य मानलें तरी पुनश्च उपनिषदें, गीता व एतद्देशीय भक्तमंडळी यांच्याकडेंच धांव घेतली, व बुद्धीस पटणारे यांतून भाग उचलले व वेगवेगळे समाज अथवा पंथ काढले. आर्यसमाज, ब्राह्मोसमाज, देवसमाज, रामकृष्ण मिशन, थिऑसफी, प्रार्थनासमाज हे वेगवेगळे समाज अशाच स्वरूपाचे आहेत. त्या त्या काळीं सुशिक्षित लोकांचीं मनें भारतीय तत्त्वज्ञानाकडे खेचून ठेवण्यांत यांचा फार उपयोग झाला.

मध्यंतरींचा काळ असा होता कीं पाश्चात्य लोक आमच्या तत्त्वज्ञानासंबंधानें लिहित व तें आम्हीं वाचून आमच्या तत्त्वज्ञानाची कल्पना करीत होतों. तो काळ बदलेला आहे. आमचेच लोक दोन्ही तत्त्वज्ञानांचा अभ्यास करून तत्त्वज्ञानावर ग्रंथ लिहीत आहेत. अगदीं अलिकडे टागोर, बाबू अरविंद घोष, टिळक, गांधी, डॉ. राधाकृष्णन्, प्रो. रानडे इत्यादि तत्त्वज्ञ आपलें तत्त्वज्ञान मांडीत आहेत. त्यांच्यावर पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या वाचनाचा जरी परिणाम झालेला दिसत असला तरी हें सर्व उपनिषदें, गीता यांच्या सिद्धान्तावर उभें राहून आपलें तत्त्वज्ञान मांडत आहेत यांत शंका नाहीं.

भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास म्हणजे कमींत कमी सहा हजार वर्षांची कथा आहे. कांहीं वेळां आपल्याला यांत असें दिसतें कीं ही तत्त्वज्ञानगंगा मोठ्या वेगानें व सहस्रमुखानें धांवत आहे तर कांहीं वेळां, जणुं काय हिचा झराच आटला आहे! पण लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, तो झरा कधीं आटत नाहीं; नुसता आटल्यासारखा दिसतो. फिनिक्स पक्षाप्रमाणें हें तत्त्वज्ञान अमरच आहे.

दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे भारतीय तत्त्वज्ञान म्हटलें कीं तें जग म्हणजे माया, खोटें यापलिकडे सांगणारें नाहीं हा समज अजिबात खोटा आहे. खुद्द मायावादी शंकाराचार्यसुद्धां अडाणी लोक समजतात तशा अर्थानें जगत् मिथ्या समजत नाहींत. पण ही गोष्ट सोडून दिली तरीसुद्धां इतर वेदांती आचार्य, इतर दर्शनकार यांच्या मतांचा विचार करणें अवश्य आहे. यांत अद्वैत, द्वैत, द्वैताद्वैत सर्व आहे. ईश्वर मानणारे, न मानणारे मानल्यास तो निर्गुण, सगुण मानणारे, जीव एक, अनेक मानणारे, जगत् सत्य, मिथ्या मानणारे—असे सर्व प्रकारचे लोक आहेत. भारतीय तत्त्वज्ञान हें अशा मतवैचित्र्यानें भरलेलें असल्यानें त्यावर एकाच तत्त्वज्ञानाचा छाप मारणें योग्य होणार नाहीं.

तिसरी गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे व ती ही कीं यांत अलिकडचा काळ सोडून दिला तर त्यांत फारशी वाढ दिसत नाहीं. तें खुरटलेलें दिसतें. वस्तुस्थिति अशी आहे कीं हें तत्त्वज्ञान अत्यंत पुरातन कालापासून अस्तित्वांत असल्यानें व तत्त्वचिकित्सा करणारे हे निर्विकार बुद्धीनें व अनुभवाकडे नजर देऊन चिकित्सा करित असल्यानें यामध्यें तत्त्वज्ञानाच्या विविध अंगांचा विचार होऊन बसला आहे; व भारतीयांच्या सुदैवानें उपनिषदें, सूत्रें व गीता हे ग्रंथ अशा रीतीचे आहेत कीं कोणी कसाही तत्त्वज्ञानी असला तरी यांच्याबाहेर तो फारसा जाऊं शकत नाहीं.

एक काल असा होता कीं हिंदुस्थानांत विचारांत घेण्यासारखें तत्त्वज्ञानच नाहीं असें पाश्चात्य व त्यांचे आपल्याकडील अंधभक्त म्हणत असत. पण तो काल बदलला आहे. हा बदल होण्यास स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, डॉ. राधाकृष्णन्, डॉ. दासगुप्त यांच्यासारखे लोक कारणीभूत आहेत. हे लोक परदेशांत गेले, परकीय भाषेंत त्यांनीं ग्रंथ लिहिले. शेवटच्या दोन विद्यमान तत्त्वज्ञांनीं तर भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासावर दोन मोठे ग्रंथ लिहिले. यामुळें तिकडच्या लोकांना आतां यथार्थ कल्पना आली आहे व प्रो. मॅक्समुल्लरनीं जें लिहिलें होतें कीं तत्त्वज्ञानाचा अभ्यास प्लेटो, कान्ट यांचे ग्रंथ वाचल्याशिवाय जसा अपुरा समजला जातो तशी गोष्ट भारतीय तत्त्वज्ञानासंबंधानेंहि समजली पाहिजे; ती गोष्ट आज खरी होऊन राहिली आहे. पाश्चात्य ग्रंथकार, अमेरिकेंतील प्रसिद्ध तत्त्वज्ञानी वुईल्यम जेम्स, राईस, फ्रेंच तत्त्वज्ञ बर्गसॉन, रोमा रोलां हे आपल्या ग्रंथांत भारतीय तत्त्वज्ञानाचा उल्लेख करूं लागले आहेत. 'आपुलेंचि रत्न थितें। घेणें पारखियाचेनि हातें' या न्यायानें आपण भारतवासियांनींच तौलनिक दृष्ट्या त्याचा अभ्यास करून त्याची पारख करून घेणें अवश्य आहे एवढेंच.

भौतिक शास्त्रांत पाश्चात्यांच्या पहाण्याची जशी भारतवासियांना जरूरी आहे तशी तत्त्वज्ञानाच्या बाबतींत दुसरीकडे पाहण्याची त्यांना फारशी गरज नाहीं.

भारतीय तत्त्वज्ञान व पाश्चात्य तत्त्वज्ञान यांतील ठळक फरक (हे फरक दाखवितांना द्विरुक्तीचा दोष पत्करूनही विषयाचें महत्त्व राखलें आहे.):–(१) भारतीय तत्त्वज्ञान व पाश्चात्य तत्त्वज्ञान यांच्या इतिहासकडे पाहिलें तर दोहोंत पहिला ठळक फरक असा दिसतो कीं भारतीय तत्त्वज्ञान हें फार जुनें. त्याचा आरंभ कमींत कमी सहा हजार वर्षांपूर्वीचा त्याच्याशीं तुलना करतां पाश्चात्य तत्त्वज्ञान हें अर्वाचीन; याचा आरंभ सरासरीं अडीच हजार वर्षांपूर्वीचा आहे.

(२) या दोहोंतील दुसरा ठळक फरक म्हणजे भारतीय तत्त्वज्ञान हें मिटलेल्या मुठीप्रमाणें आहे व पाश्चात्य तत्त्वज्ञान हें उघड्या मुठीप्रमाणें आहे. या म्हणण्याचा अर्थ असा आहे कीं भारतीय तत्त्वज्ञानाच्या उगमाजवळच्या उपनिषदासारख्या ग्रंथांतून सांगितलेले निष्कर्ष त्या द्रष्ट्यांनीं कसे काढले, ते विचाराच्या कोणत्या कोणत्या पायऱ्या चढत गेले हें आपणांसमोर आज स्पष्ट नाहीं. त्यांच्या विचारांचे 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म' अथवा 'तत्त्वमसि'सारखे निष्कर्ष आपल्या डोळ्यांसमोर आहेत. उलट ग्रीक तत्त्वज्ञ थेलीस, सॉक्रेटीस इत्यादि तत्त्ववेत्त्यांच्या विचाराचा विकास कसा झाला, त्यांच्या मनावर कोणकोणचे कसे परिणाम झाले हें आपल्याला स्पष्ट ठरवितां येतें. यास कारण भारतीय तत्त्वज्ञान अतिशय जुनाट आहे, लिहिण्याची कला निघण्यापूर्वीचें आहे हें आहे; व यामुळेंच हा फरक आहे. अर्थातच भारतांतील अगदीं अर्वाचीन तत्त्वज्ञान्यास हा दृष्टांत लागू पडणार नाहीं हें निराळें सांगावयास नको.

(३) तिसरा फरक असा कीं पाश्चात्य देशांत तत्त्वज्ञान हें तदितर कोणत्या ना कोणत्या तरी शास्त्राचा भाग बनलेलें अथवा पाठपुरावा करतांना दिसतें. स्वतंत्र रीतीनें आपल्या पायावर उभारलेलें तत्त्वज्ञान, पाश्चात्य देशांत अगदीं अलीकडे आढळून येते आहे. तरी तत्संबंधींसुद्धां पेरीसारखे अमेरिकन लेखक आक्षेप घेतच आहेत. पाश्चात्य देशांत तत्त्वज्ञान हें कधीं धर्माचा दास तर कधीं भौतिक शास्त्राचा दास होऊन राहिलेलें आढळतें. आर्यावर्तात मात्र तशी स्थिती नाहीं. येथें तत्त्वज्ञान हें धर्म अथवा भौतिक शास्त्र यांच्याकडे तोंड करून तें काय म्हणेल याचा विचार करीत राहिलें नाहीं. म्हणेल उपनिषदासारखे स्वतंत्र विचाराचे ग्रंथ हिंदुस्थानांत निर्माण झाले. त्यांतील विचारस्वातंत्र्याचें गमक म्हणून एकच सांगणें पुरें कीं बुद्धिप्रामाण्यवादी प्रार्थनासमाजिस्ट अथवा केशवचंद्रसेनासारखे ब्राह्मो ह्या सर्वांनाही उपनिषद्ग्रंथ सारखेच मान्य आहेत. तात्पर्य, आमच्याकडे तत्त्वज्ञानानें आपलें तत्त्वशोधनाचें काम सोडून धर्म, नीति, अथवा भौतिकशास्त्रें यांच्याशीं गोडीगुलाबी लावून त्यांना खूष करण्याचा प्रयत्न करून आपलें स्वातंत्र्य गमाविलें नाहीं.

(४) चौथा फरक असा कीं पाश्चात्य तत्त्वज्ञान हें मानवी जीवनाचा विचारच करीत नाहीं त्याची व प्रत्यक्ष जीवनाची फारकत झाली आहे. असा पाश्चात्य तत्त्वज्ञानाविरुध्द आक्षेप जो कधीं कधीं घेतला जातो तसा भारतीय तत्त्वज्ञानासंबंधानें घेतां येणार नाहीं. भारतीय तत्त्वज्ञान हें नुसती बुध्दीची कसरत दाखविण्याकरतां निर्माण झालेलें नाहीं. ते मानवी जीवनांतील जे अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांची उत्तरें काढण्याकरतां निर्माण झालें आहे. असा कोण आहे कीं ज्याला दुःखाचा अनुभव नाहीं, अथवा असून जो दुःखनाशाचा प्रयत्न करीत नाहीं! भारतीय तत्त्वज्ञानांतील बहुतेक दर्शनें दुःखनाश व आनंद प्राप्तीकरतां निर्माण झालेलीं आहेत. त्यांनीं एतदर्थ जीं साधनें सांगितलीं त्यांत मतभेद असेल. पण सर्वांना मोक्ष–दुःखनाश–हवा ही गोष्ट निर्विवाद आहे.

(५) पांचवा फरक असा आहे कीं तत्त्वसंशोधनाचे बाबतींत भारतीय तत्त्वज्ञानाचा कल तर्कपटु बुद्धीपेक्षां प्रतिभेकडे (Intution) अधिक आहे. पण एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिंजे कीं ही प्रतिभा बुद्धीचीच वाढ आहे. भारतीय तत्त्वज्ञान्यांचा असा प्रतिभेकडे कल असण्याचें कारण असें कीं ते मुख्यतः अनुभवावर जोर देतात व बुद्धि म्हणजे अनुभव मिळविण्याचा एक मार्ग आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा कल तार्किक बुद्धीकडे आहे. पण अलिकडे तिकडेहि ब्रॅडले, बर्गसॉन सारखे लोक Intution कडेच वळूं लागले आहेत. आपल्याइकडील तत्त्वज्ञान्यांनीं हजारों वर्षांपूर्वी काढलेल्या निष्कर्षासारखें निष्कर्ष पाश्चात्यतत्त्वज्ञ आतां काढीत आहेत. त्यांची पद्धत मात्र अधिक

आधिभौतिक (Objective) आहे. आमची आधिक अध्यात्मिक (Subjective) आहे; यामुळें आमच्याकडे अध्यात्म वाढलें. पण आधिभौतिक शास्त्रें वाढीला लागलीं नाहींत, व अध्यात्मांतील या पद्धतीनें होणारा विचार फार झाला नाहीं.

(६) सहावा फरक असा सांगतां येईल कीं भारतीय तत्त्वज्ञानाचा कल सामान्यतः समन्वयाकडे (Synthesis) आहे. पाश्चिमात्य तत्त्वज्ञान हें पृथक्करणाकडे (analysis) झुकतें. आमच्याकडे केवळ शुद्धद्वैती असे दर्शनकार थोडेच सांपडतील. या नाहीं तर त्या दरवाजानें अद्वैताचा अंगिकार केला नाहीं अशीं दर्शनें फारच थोडीं!

आणखीहि कांहीं गौण फरक सांगतां येण्यासारखे आहेत–

(१) पाश्चात्य देशांत तत्त्वज्ञान व धर्म यांचें युद्ध कित्येक शतकें चाललेलें आपल्यास आढळून येतें. पण भारतवर्षांत तत्त्वज्ञान व धर्म यांचा झगडा आढळून येत नाहीं. त्याचें कारण जणूं काय प्रत्येकानें प्रथमपासूनच आपलें क्षेत्र ठरवून घेतलेलें आहे.

(२) भारतीय तत्त्वज्ञानाची बहुतेक वाढ भाष्य, टीका, उपटीकारूपानें झाली आहे. अलिकडे अलिकडे मात्र स्वतंत्र ग्रंथरूपानें मत मांडण्याच्या पद्धतीचा अंगीकार केलेला आढळून येतो. पाश्चात्य देशांत मधलाकाळ (Medieval Period) सोडून दिला तर अशी पद्धत फारशी अवलंबिलेली दिसत नाहीं.

भारद्वाजः– हिंदूंना पवित्र वाटणारा पक्षी. याचें दुसरें नांव कुक्कुटकुंभा असें आहे. हें नांव तो कुक्कुट कुक्कुट असा ओरडतो त्यावरूनच पडलें असावें असें वाटतें. हा पक्षी एकटा असा कधींच हिंडत नाहीं. नेहमीं जोडप्यानें फिरतो. यांचा कळप नसतो. डोकें व शपूट काळी असून पंख तांबड्या उदी रंगाचे असतात. डोळे तांबडे लाल असतात. भारद्वाज किड्यांवर जगतो. याच्या अंगाचा आकार कावळ्याएवढा असून शेपूट लांबडी व शोभिवंत असते. दाट फांद्यावर, हा आपलें घरटें कावळ्यासारखेंच काटकुड्या व झाडपाल्याच्या सहाय्यानें करतो. त्यांत याची मादी दर वेळेला ४।६ अंडीं घालते. पुष्कळ लोक गुढीपाडव्याला याचें दर्शन घेतात व यास नमस्कार करतात.

भारवि (स. ५७५):–हा धारानगरीचा रहिवासी. याच्या बापाचें नांव श्रीधर व आईचें नांव सुशीला. याचें लग्न भडोचच्या चंद्रकीर्ति नांवाच्या गृहस्थाच्या रसिका नांवाच्या मुलीबरोबर झालें होतें. याचा बाप विद्वान् होता. पण त्यालाहि यानें आपल्या विद्वत्तेनें मागें टाकलें. पण हा गर्विष्ठ असल्यानें याची प्रगति खुंटली होती. तेव्हां त्यानें गर्वपरिहार होण्याकरितां याला सहा महिने सासुरवाडीस राहावयास पाठविलें. तेथें चार दिवस सन्मान झाल्यावर याच्याकडे गाई रानांत नेण्याचें काम आलें. हा रानांत गेल्यावर गुरें चरावयास लावून झाडाच्या पानांवर काव्यानें श्लोक लिहिण्याचें काम करी. ते श्लोक म्हणजे किरातार्जुनीय काव्य होय.

किरातार्जुनीय काव्यांतील 'सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदम्।' (२.३०) हा श्लोक गहाण ठेवून याच्या बायकोनें पैसे आणल्याची एक आख्यायिका आहे. तसेंच तो श्लोक वाचल्यानें अनेक अनर्थ टळल्याच्याहि आख्यायिका आहेत.

याचा उल्लेख स. ६३४ मधील अय्याहोळे येथील शिलालेखांत आहे. तेथें याला प्रसिद्ध कवि म्हटलें आहे.

भावे, विष्णु अमृत (१८१९–१९०१):–आद्य महाराष्ट्रीय नाटककार. यांचे वडील श्रीमंत आप्पासाहेब सांगलीकर यांच्याकडे नोकरीस होते. वडिलांच्यामुळेंच यांचा श्रीमंतांशीं परिचय झाला होता. १८४२च्या सुमारास सांगलीस एक कानडी नाटक मंडळी येऊन आपले खेळ करीत होती. तिचे खेळ पाहून मराठींतही अशींच नाटकें झालीं तर बरें असें श्रीमंतांनीं उद्‍गार काढले. रा. भाव्यांना पदें रचण्याचा नाद लहानपणापासून होताच. लागलीच भाव्यांनीं एक 'सीतास्वयंवर' नाटक लिहून १८४३ मध्यें त्याचा श्रीमंतांच्यापुढें प्रयोगदेखील करून दाखविला. पुढें यांस श्रीमंतांचा आश्रय मिळाला. भाव्यांनीं दहा एक प्रयोग तयार केले. श्री. आप्पासाहेब वारल्यानंतर भाव्यांनीं आपली नाटक मंडळी पुणें, मुंबई इकडे नेली. तेथील लोकांनीं त्यांच्या गुणाचें कौतुक केलें. हा नाटकाचा व्यवसाय १८५१ पासून १८६१ पर्यंत चालला. यानंतर नाटकाचा पेशा सोडून भाव्यांनीं 'कळसूत्री बाहुल्यांचा' खेळ तयार केला. याहि कल्पनेचें स्वागत लोकांनीं उत्तम प्रकारचें केलें. पुढें यांनीं एंजिनियरिंग खात्यांत नोकरी पतकरली. १९०१ मध्यें हे मरण पावले. यांनींच प्रथम सभ्य करमणुकी-

साठीं नाटकाचा उपयोग करण्याची दिशा दाखविली. यांचे सर्व कथाभाग पौराणिकच होते.

भाषाशास्त्र आणि मराठीः-भाषा ही समाजाचा आदर्श म्हणून मानतात त्यामुळें एक प्रकारें तें समाजाचें शास्त्र आहे. समाजामध्यें विचारविकाराचें भावनाबुद्धीचें जें चलनवलन होतें, जी खळबळ होते तें सर्व चलनवलन भाषेमध्यें प्रतिबिंबित होतें म्हणूनच तिला समाजाचा आदर्श म्हणतात. भाषा हें विचारविकारांच्या आविष्काराचें उत्तम साधन असल्यामुळें विचारविकार हे जसें व्यक्तीपासून अलग राहूं शकत नाहींत तसेंच आविष्काराचें जें साधन ती भाषा त्या व्यक्तीपासून अलग राहूं शकत नाहीं. जी व्यक्तीची गोष्ट तीच व्यक्तींनीं बनलेल्या समाजाची. भाषाशास्त्र हें एक प्रकारचें समाजशास्त्र असल्यामुळें इतर समाजशास्त्रांप्रमाणें त्याचा दर्जा असणारच व इतर शास्त्राप्रमाणें त्यांतहि जिवंतपणा असणारच. इतर शास्त्रें जशीं वाढतीं शास्त्रें आहेत तसें भाषाशास्त्रहि वाढतें शास्त्र आहे.

आपल्या इकडे भाषाशास्त्रीय प्रयत्न फार पूर्वींपासून झाले आहेत व आजहि होत आहेत. वेदांचा अभ्यास सांग करण्याची जसजशी जरुरी भासूं लागली तसतशी प्रातिशाख्यांची व वेदांगांची प्रवृत्ति सुरू झाली. सर्व वेदांगांमध्यें निरुक्त व व्याकरण ह्या वेदांगांना महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें. ब्राह्मण, उपनिषद् व आरण्यकें ह्या ग्रंथांतहि व्युत्पत्तिविषयक प्रयत्न त्या त्या ऋषींनीं केलेले आढळतात. प्रतिशाख्यें, निरुक्तें व व्याकरणें ह्यांच्या जोडीला शिक्षाग्रंथहि निर्माण झाले. अशा रीतीनें वैदिक वाङ्मयाचा व वेदकालीन भाषेचा अभ्यास चांगल्या शास्त्रीय अशा भरभक्कम पायावर घातला गेला. वेदकालीन भाषासूरींनीं घालून दिलेली भाषाशास्त्राची परंपरा पुढें अभिजात संस्कृत वाङ्मयाच्या कालांत कांहीं नाणावलेल्या भाषाशास्त्रकारांनीं चांगल्या उत्तम तऱ्हेनें चालविली. पाणिनि, कात्यायन, पतंजली ह्यांचे भाषाशास्त्रीय प्रयत्न विशेष उल्लेखनीय होत. पाश्चात्य राष्ट्रांतील विद्वानांची भाषाशास्त्रीय जागृति ही बऱ्याच अंशीं पाणिनीय संशोधनाचें फल आहे अशी कबूली तेच विद्वान् मोठ्या प्रामाणिकपणानें देतात. संस्कृत भाषेंतील ही भाषाशास्त्रीय परंपरा प्राकृत भाषांच्या बाबतहि तितक्याच बुद्धिप्रकर्षानें जरी नाहीं तरी तितक्याच आस्थेनें चालविलेली दिसते. वररुचि, कच्चायन, चण्ड, हेमचंद्र, लक्ष्मीधर ह्या प्राकृतभाषा जाणकारांचे प्रयत्न त्या दृष्टीनें उल्लेखनीय होत. मराठी भाषेच्याबाबत ब्लेक, टर्नर कोनौ हे पाश्चात्य विद्वान आणि भाण्डारकर, भागवत, वैद्य गुणे, इत्यादि प्राच्य विद्वानांनीं प्रयत्न केले आहेत. सध्यांहि भाषाशास्त्राच्या सर्व अंगोपांगांचा अभ्यास व त्यासंबंधीं लेखन बरेंच आस्थापूर्वक चाललेलें दिसतें.

पाश्चात्य देशांत ह्या विषयासंबंधीं झालेली जागृति फार अलीकडील आहे. आपल्याइतकें पुराणत्व त्यांना लाभलें नाहीं. जुन्या ख्रिस्ती धर्मग्रंथांत व कांहीं काव्यग्रंथांत भाषेसंबंधीं कांहीं विचार असले तरी ते भाविकपणाचे द्योतक आहेत. त्यांत शास्त्रदृष्टि नाहीं. अभ्यासाला खरा आरंभ अठराव्या शतकांत झाला व तो जॉन गानफ्राइट हर्डर ह्यानें 'भाषेची उत्पत्ति' हा ग्रंथ लिहून केला (इ. स. १७७२). पुढें बर्लीन विद्यापीठाच्या वतीनें जेनिश् ह्यानें भाषाशास्त्राच्या अभ्यासाचा पुरस्कार केला. एकोणिसाव्या शतकांत ह्या अभ्यासाला एक उत्तम वळण लागून त्याची वाढहि फार त्वरित झाली. ह्या सर्वाला मूळ कारण मात्र 'संस्कृत भाषेंतील त्यांचें संशोधन' हें होय. संस्कृत भाषेचा, तिच्या निरनिराळ्या स्वरूपांत जसा अधिक अधिक अभ्यास होऊं लागला तसतसा भाषाशास्त्राला 'शास्त्र' ही संज्ञा देण्यास योग्य आहे असें ठरलें व पाणिनीची अष्टाध्यायी, यास्काचार्यांचें निरुक्त, पतंजलीचें महाभाष्य इत्यादि महनीय ग्रंथांच्या परिशीलनानें भाषाशास्त्रांतील प्रमेयें निश्चित होऊं लागलीं. श्लेगेल, रास्मस रास्क, जेकब ग्रिम्, फ्रान्झ बाप्प, हम्बोल्ट, रॅप्प, मॅक्समुल्लर, व्हिटने, साइस, ब्रुगमान्, मेय्ये, विण्डिश्, ग्रियरसन्, ब्लोक इत्यादि विद्वानांनीं भाषाशास्त्राच्या विकासास मदत केली व अशा रीतीनें भाषाशास्त्राची महती इतर शास्त्रांच्या बरोबरीनें प्रस्थापित केली.

भाषाशास्त्रांत भाषेची उत्पत्ति, जगांतील भाषांचें वर्गीकरण, त्यांचा वंशवृक्ष, उच्चारप्रक्रिया, प्रत्ययप्रक्रिया, शब्दार्थप्रक्रिया, प्रयोगप्रक्रिया, उपभाषांची उत्पत्ति, उपभाषांचे प्रकार इत्यादि गोष्टींचा विचार येतो. आपल्या हिंदुस्थानांतील भाषांच्या दृष्टीनें आणखी कांहीं मुद्दे विचारांत घ्यावे लागतात. पूर्ववेदिक भाषा, संस्कृत भाषा, प्राकृत, अपभ्रंश व

वर्तमानकालीन बोली व त्यांचा परस्पर संबंध ह्या गोष्टी विचारांत घेतल्याखेरीज मराठीच्या दृष्टीनें भाषाशास्त्राचें विवेचन पूर्ण होणार नाहीं. ह्याशिवाय भाषाशास्त्र आणि इतर इतिहास, समाज, धर्म, मानस, जीव, शारीर इत्यादि शास्त्रें ह्यांचा परस्पर संबंध हाहि पहावा लागतो. कारण ह्या सर्व शास्त्रांची उभारणी भाषेवर झालेली आहे हे आपणास विसरतां येत नाहीं.

भाषेची उत्पत्ति ही एक प्रकारच्या भाविक प्रकारानें जुन्या धर्मग्रंथांत सांगितली आहे. आपल्याइकडील धर्मग्रंथांत उत्पत्तिकाण्डांत विश्वांतील यच्चावत् वस्तु उत्पन्न करतांना "स ऐच्छत बहु स्याम्" पुष्कळ होण्याची त्यानें इच्छा केली असें वर्णन आहे. सर्व वस्तूंच्या अगोदर भाषेची उत्पत्ति झाली आणि तिनें सर्व वस्तूंना नामधेयें दिलीं असें ऋग्वेदांत वर्णन आहे. खिस्ती धर्मग्रंथांतहि अशीच उपपत्ती दिली आहे. ईश्वरानें सर्वांगपरिपूर्ण अशी भाषा मानवाच्या उपयोगासाठीं त्याच्या स्वाधीन केली. त्यानें 'प्रकाश असूं दे' म्हटलें आणि प्रकाश उत्पन्न झाला. "भाषा असूं दे" असें म्हटलें आणि भाषा झाली अशा तऱ्हेचा भाविकपणा ह्या धर्मग्रंथांत दिसून येतो. खऱ्या शास्त्रीय दृष्ट्या ही उपपत्ति पटून कोणाचें समाधान होणें शक्य नाहीं, तेव्हां ही अलंकारिक व श्रद्धामय उपपत्ति सोडून दुसरी उपपत्ति शोधणें भाग आहे. भाषेच्या उपपत्तिसंबंधीं निरनिराळे सिद्धांत पाश्चात्य भाषाकोविदांनीं मांडले आहेत. त्यांपैकीं महत्त्वाचा सिद्धांत म्हटला म्हणजे भाषेची उत्पत्ति व वाढ "अनुकरण" ह्या मानवी जातिक वृत्तीवरून झाली आहे हा होय. हा सिद्धांत डॉ. गायगर ह्या भाषापण्डितानें मांडला. कुत्रा, मांजर, कावळा इत्यादि परिचित प्राण्यांचें स्वरानुकरण करूनच त्यांना नामाभिधान देण्याची प्रवृत्ति लहान मुलांच्या भाषेंत आपण पाहातों. हीच प्रवृत्ति आद्यभाषेच्या मुळाशीं असली पाहिजे. हम्मा, भोभो, कुकु, कावकाव, म्यँवम्यँव इत्यादि शब्दांवरून किंवा ध्वनींवरून आपणांस त्या त्या प्राण्यांची कल्पना येते. ताडकन् मारणें, टारकन् फाडणें, सुळकन् जाणें, मुळुंमुळुं रडणें, झुळझुळ वहाणें, झिमझिम पडणें, सपाटणें, झपाटणें, ठोकणें, बोंबलणें, झंझाळणें, मुसमुसणें, फुणफुणणें, तणतणणें, भणभणणें ह्या सर्व क्रियांच्या व क्रियादर्शक शब्दांच्या मुळाशीं त्या त्या क्रियेचा ध्वनिच आहे व ह्यांत 'ध्वनि–अनुकरण' हाच सिद्धांत प्रभावी आहे. ह्या सिद्धांताला मॅक्समुल्लरनें Bow-wow Theory असें नांव दिलें. भाषेंतील सर्वच शब्द ह्या अनुकरणाच्या तत्त्वावर बनले असें म्हणतां येत नाहीं. बरेच शब्द असे आहेत कीं त्यांची उपपत्ति वरील सिद्धांतानें लागत नाहीं. म्हणून भाषेच्या स्पष्टीकरणार्थ दुसरा एक सिद्धांत मांडला गेला. त्याला Pooh-Pooh सिद्धांत असें म्हणतात. भाषेंतील शद्ब भावना दर्शिवतात. म्हणून ते त्या दृष्टीनें उद्गारवाचक ठरतात. शि! शी! छे छे! अबब, अरेरे, आला, आला, लांडगा! लांडगा! इत्यादि शद्ब भावनाप्रधान उद्गारवाचक आहेत, अशा रीतीनें शब्दांची उपपत्ति लावतां येते. म्हणून भाषेच्या उत्पत्तीचें व वाढीचें कारण ही भावनाप्रधान शब्द उत्पन्न करण्याची मानवी शक्ति आहे, हा दुसरा सिद्धांत. परंतु ह्याहि सिद्धांताला कांहीं अपवाद आढळले. त्यानेंहि समाधानकारक उपपत्ति लागेना म्हणून तिसरा एक सिद्धांत प्रस्थापित केला गेला. त्याला "Ding Dong" सिद्धांत असें म्हणतात. शब्दाचा नाद आणि त्याचा अर्थ ह्या दोहोंमध्यें एक तऱ्हेचा ममत्वाचा संबंध असतो. दोन्ही एकमेकाचे पूरक असतात. हा सिद्धांत मॅक्समुल्लरनें स्थापिला. ह्याशिवाय चौथा एक सिद्धांत लुडविग् न्वार ह्या भाषाशास्त्रज्ञानें मांडला. त्याला yo-he-yo सिद्धांत असें म्हणतात. आद्यमानवांच्या संघानें आपल्या श्रमविनोदनासाठीं जीं कांहीं गाणीं म्हटलीं व त्या गाण्यांत जी त्यांनीं स्वरमालिका योजिली तिच्यापासून मूळ भाषा उत्पन्न झाली असें ह्या सिद्धांताचें मर्म आहे. भाषेची उत्पत्ति प्रेममूल आहे हा पांचवा सिद्धांत जेस्परसन् ह्यानें मांडला आहे. प्रेमाच्या मोहक प्रसंगांत असतांना आपल्या प्रेमाची पूर्तता करण्यासाठीं आद्यमानवाला भाषेसारख्या साधनाची जरूरी लागली असावी व त्या साधनाचा उपयोग त्यानें आपल्या प्रेमपात्राच्या आराधनासाठीं केला असावा. गायनाच्या अथवा गुणगुणण्याच्या स्वरूपांत भाषा प्रथम उद्भवली असावी. ह्याशिवाय आणखी एक सहावा सिद्धांत आहे. क्रीडासक्ति ही एक जातिक वृत्ति आहे. ह्या क्रीडासक्तीच्या जोरावर आद्यमानवानें भाषा निर्माण केली असावी. मुलांमध्यें जन्मतःच बेसुमार कार्यशक्ति असते व तिच्याच जोरावर मुलांची सर्वांगीण वाढ

होते. तसेंच समाजांतील ह्या Superfluous energy—कार्यशक्तीच्या—जोरावर त्याच्या ध्वनिसामर्थ्याचा आरंभ आणि विकास झाला असावा व त्यामुळेंच भाषेचा आरंभ व विकास झाला असावा.

ह्या वरीलपैकीं कोणत्याहि एका सिद्धांताच्या आधारावर भाषेच्या उत्पत्तीची कारणमीमांसा करतां येणें कठीण आहे. कोठें ना कोठें तरी अपवाद येऊन तो सिद्धांत बाधित होतो. ह्या सर्व सिद्धांतांचें एकीकरण करून जर मीमांसा केली तर भाषेची उत्पत्ति तेव्हांच स्पष्ट होते. अशा रीतीनें भाषा निर्माण झाल्यानंतर तिचा विकास होऊन तिला निरनिराळीं स्वरूपें प्राप्त झालीं. तिचा संसार वाढल्यानंतर साहजिकच त्या सर्वांचें वर्गीकरण करणें जरूर भासूं लागलें.

पृथ्वीच्या पाठीवर प्रचलित असलेल्या भाषांचें वर्गीकरण दोन प्रकारांनीं करतां येतें. एक त्या त्या भाषेंतील शब्दाच्या व्युत्पत्तिसाम्यावरून (Genealogical) व दुसेंर भाषांतील अन्वित शब्दांच्या संबंधावरून (Morphological) एकाच मूळ शब्दापासून निघालेले शब्द ज्या निरनिराळ्या भाषांत आढळून येतात त्या सर्वांचा एक गट होतो व त्यामध्यें नंतर आजी, आई, मुलगी, नात असा परात्पर संबंध दाखवितां येतो. सर्वनामें, संख्याविशेषणें, अन्वयें, प्रत्यय इत्यादि शब्दांच्या व्युत्पत्तीच्या साहाय्यानेंच हा संबंध दाखवितां येतो. अशा प्रकारच्या व्युत्पत्तिसंबंधाच्या आधारावर जगांतील भाषांचे सहा भाग केले आहेत. १ आर्यन, २ सेमिटिक, ३ ट्यूरेनियन, ४ मंगोलियन, ५ द्रवीडियन आणि ६ इतर मिश्र. अशा सहा मुख्य कुळी समजतात. प्रत्येक कुळींतील भाषांच्या कांहीं ठराविक सामान्य खुणा अशा कांहीं आढळतात. धात्वनुवृत्ति, स्वभावानुवृत्ति, व्याकरणनियमबद्धता, वचनत्रय, विभक्तिसप्तक वगैरे वगैरे सामान्य खुणा सर्व आर्योद्भव भाषांत सांपडतात. त्र्यक्षरी धातु ही सामान्य खूण सेमिटिक भाषांची आहे.

भाषांचा दुसरा प्रकार वाक्यांतील अन्वित शब्दांच्या संबंधावरून करतात. शब्दांतील प्रकृति व प्रत्यय ह्या दोहोंतील परस्पर संबंध, त्यांचें एकरूपत्व किंवा भिन्नरूपत्व ह्यांकडे आपणास दृष्टि ठेवावी लागते. ह्या वर्गीकरणानें भाषेचे सहा प्रकार पडतात. हे प्रकार पुढीलप्रमाणें आहेत. (१) अप्रत्ययी भाषा. उदा० चिनी व इतर मंगोली भाषा. ह्या भाषांत एकच शब्द वाक्यांत निरनिराळें कार्य करतो. कधीं कर्ता तर कधीं क्रियापद कधीं विशेषण तर कधीं क्रियाविशेषण असे संबंध दाखवितो. मात्र हे संबंध दाखवितांना तो शब्द आपलें स्थान बदलतो. (२) भाषेचा दुसरा प्रकार चिकट्या किंवा शब्दनिगडित भाषा हा होय. ह्या प्रकारांत वाक्यांतील निरनिराळे अर्थदर्शक शब्द एकमेकांपुढें ठेवतात किंवा एकमेकाला चिकटवितात. 'तुर्की भाषा' ह्या प्रकाराचें उत्तम उदाहरण आहे. (३) तिसरा प्रकार प्रत्ययी भाषा. शब्दनिगडित भाषेपासून प्रत्ययी भाषा उत्पन्न होते. ती त्याच्यानंतरची अवस्था आहे. संस्कृत, ग्रीक, लॅटिन, अवेस्ता वगैरे भाषा ह्या प्रकारांत येतात. (४) चौथा प्रकार पृथक्करणात्मक भाषांचा. ह्या भाषांत विभक्तिप्रत्यय वापरण्याची प्रवृत्ति कमी होऊन त्याऐवजीं शब्दयोगी अव्ययें वापरतात. वाक्यांतील शब्दांचे संबंध अव्ययांच्या द्वारां दाखविण्याकडे रोख असतो. ह्या चार प्रकारांशिवाय आणखी जे दोन प्रकार आहेत ते विशेष महत्त्वाचे नाहींत. त्यांना आगमप्रधान आणि उपसर्गप्रधान अशीं नांवें आहे.

भाषेंत जे निरनिराळे फरक पडत जातात ते फरक दोन स्थळीं होतात. एक शब्दाचें बाह्यस्वरूप व दुसेंरं अन्तःस्वरूप. शब्दाच्या बाह्यस्वरूपांत फरक म्हणजे त्याच्या उच्चारांत फरक व अन्तःस्वरूपांत फरक म्हणजे त्याच्या अर्थांत फरक. पहिल्या प्रकारच्या फरकाला स्वरप्रक्रिया म्हणतात. दुसऱ्या फरकाला शब्दार्थप्रक्रिया म्हणतात. अशी द्विविध प्रक्रिया सारखी होत असते; म्हणूनच भाषेचें स्वरूप सारखें बदलत जातें. उच्चारासंबंधीं बेफिकीरी, आळस, अनुकरण, आघात, हवामान, देशपरिस्थिति, मुखांतील इंद्रियाचा बिघाड, भिन्न भिन्न संस्कृतीच्या लोकांचें मिश्रण, धर्मक्रांति, राज्यक्रांति, लोकक्रांति, मेंदूंतील विकृति इत्यादि निरनिराळ्या कारणांनीं भाषेंतील शब्दांच्या उच्चारांत फरक पडत जातो. उच्चारप्रक्रियेचीं हीं निरनिराळीं कारणें होत. उच्चारप्रक्रिया किंवा वर्णप्रक्रिया ह्यांत पुष्कळ प्रकार आहेत. अन्त्यलोप, उपधालोप, आदिलोप हे तीन लोपाचे प्रकार. तसेच अन्त्यागम, मध्यागम, आद्यागम हे तीन आगमाचे प्रकार. पश्चात्—पश्चा, यावत्—जाव—जिम्—जेव्हां, पुनर्—पुण—पुन्हां हीं अन्त्यलोपाचीं उदाहरणें होत. वान्दर, कम्बर, ह्यांत मध्य आगम

झाला आहे. ह्याशिवाय गुण, वृद्धि, संप्रसारण, सान्निध्यपरिणाम, पूर्ववर्णपरिणति, स्वरभक्ति, विश्लेष, वर्णव्यत्यास इत्यादि वर्णप्रक्रियेचे प्रकार आहेत.

शब्दाच्या उच्चारांत ज्याप्रमाणें कालपरत्वें फरक होतात त्याप्रमाणें शब्दाच्या अर्थांतहि फरक होतात. उपाध्याय शब्दाचा उच्चार एकेकाळीं ‘उवज्झाअ’ असा होऊं लागला. पुढें कालांतरानें त्याचाच उच्चार ‘ओज्झाअ’ असा होऊं लागला. आणखी कांहीं काल गेल्यावर ‘ओझा’ असा, पुढें कांहीं कालानें ‘झा’ असा, व पुढें कालानें ‘वझे’ असा झाला व त्या त्या कालांतील उच्चाराचे अवशेष आपणास सांपडतात. हा झाला उच्चारांतील फरक. आतां त्याच्या अर्थांतहि फरक पडत गेल्याचें दिसतें. पहिल्याचा अर्थ ‘जवळ बसून शिकविणारा,’ पुढें तो अर्थ बदलून घरचीं धार्मिक कृत्यें करणारा असा अर्थ झाला. तोहि जाऊन ‘भट, भिक्षुक’ असा अर्थ झाला. ओझा, झा, वझे ह्यांचे मूळ अर्थ पार नाहींसे होऊन तीं नुसतीं आडनांवें होऊन बसलीं आहेत. अर्थामध्यें असा बदल सारखा होत असतो. ह्याचीं कारणेंहि निरनिराळीं आहेत.

शब्दाच्या तीन शक्ति असतातः—१ अभिधा, २ लक्षणा, ३ व्यंजना. ह्या तीन शक्तींमुळें शब्दाला तीन अर्थ प्राप्त होतात. अभिधा शक्तीमुळें वाच्यार्थ, लक्षणा शक्तीमुळें लक्ष्यार्थ आणि व्यञ्जना शक्तीमुळें व्यंग्यार्थ प्राप्त होतो. शब्दाचा वर उघड, उत्तान रीतीनें होणारा जो अर्थ तो वाच्यार्थ वाच्यार्थाच्या जवळचाच पण भिन्न असा जो अर्थ लक्ष्यार्थ आणि बोलणाऱ्याच्या भावनेप्रमाणें, बोलण्याच्या रोखाप्रमाणें किंवा ऐकणाऱ्याच्या भिन्नवृत्तीप्रमाणें जो अर्थ ऐकणारा सूचित करून घेतो तो व्यंग्यार्थ होय. ह्या तीन वृत्तींच्या प्रभावानें शब्दांच्या अर्थांत सारखा बदल होत असतो. ह्या तीन वृत्तीपैकीं लक्षणावृत्ति सर्वांत अधिक प्रभावी आहे. भाषेतील शब्दांचें वैभव जें वाढतें तें लक्षणावृत्तीच्या प्रभावामुळेंच. लक्षणेमुळें भाषेची अपरंपार वाढ होते. लक्षणेमुळें अतिशयोक्ति किंवा वक्रोक्ति उत्पन्न होते, त्यामुळेंच निरनिराळ्या अलंकारांची निर्मिति होते; व त्यामुळेंच निरनिराळ्या रसांची निष्पत्ति होते. अभिधा व व्यञ्जना ह्या दोन शक्तीहि आपापल्या परीनें रस व अलंकार ह्यांच्या निर्मितीस साह्य करतातच. परंतु त्यांतल्या त्यांत लक्षणेचें क्षेत्र अधिक व तिचा प्रवाहहि अधिक असतो. अशा रीतीनें अर्थांत फरक पडला म्हणजे त्यांत निरनिराळ्या छटा उत्पन्न होतात. अर्थाचें सामान्यीकरण व विशेषीकरण त्यामुळेंच निर्माण होतें. अर्थविस्तार, अर्थभ्रंश, अर्थगौरव, ग्राम्यतापरिहार, निरर्थकता, अकारणगौरव, साम्याभास, अपरिचितार्थ, अर्थप्रशस्ति असे प्रकार उत्पन्न होतात व त्यांच्या सहाय्यानें निरनिराळ्या छटा दर्शविल्या जातात. गोसावी (गोस्वामिन्—गाईचा धनी, परंतु बैरागी, संन्यासी), सोनें (सुवर्ण—पैसा अडका, दागदागिने) कुंकू संपलें किंवा बांगडी फुटली असतांना वाढली म्हणणें, तारांबळ (तारा + बल) त्रेधा (तीनदां,—गडबड, धांदल); बाष्कळ (बाष्कल शाखा—वात्रट, चावट), धूर्त (कावेबाज—शहाणा) वगैरे शब्दांचे जे निरनिराळे अर्थ झालेले दिसतात ते वर सांगितलेल्या निरनिराळ्या वृत्तीमुळें तयार होतात; शब्दांत त्या त्या काळाच्या धर्मकल्पना, इतिहास, सामाजिक आचारविचार इत्यादि गोष्टी निविष्ट झालेल्या असतात. निर्वाण, मोक्ष, घाशीरामी, फाकडा, ढालगज, घायाळ चतुर्दशी, घटस्फोट, काडी मोडणें, गौड. बंगाल, घनघोर, खडाजंगी, लाजाहोम, सप्तपदी वगैरे शब्द त्या त्या गोष्टींचे निदर्शक आहेत. अशीं उदाहरणें किती तरी देतां येतील. भाषा ही मंदाकिनी आहे. तिच्या प्रवाहांत निरनिराळे नवे शब्द येतात, त्यांना निरनिराळे अर्थ प्राप्त होतात. निरनिराळे जुने शब्द व त्यांचे जुने अर्थ नाहींसे होतात. भाषेमध्यें अशा रीतीनें सारखी क्रांति—उत्क्रांति चाललेली असते व ह्यामुळेंच भाषेमध्यें कालाच्या ओघांत निरनिराळे प्रकार उत्पन्न होतात.

भाषेंतील शब्दांत शब्दप्रयोगांत, वाक्यप्रयोगांत असे प्रकार होतात म्हणून तिला निरनिराळीं रूपें प्राप्त होतात. हे प्रकार दोन दृष्टीनें होतात. एक प्रांतिक भेद व दुसरा कालिक भेद. मराठी भाषेच्या दृष्टीनें जर पाहिलें तर तिच्यांत असे दोन प्रकार झाले आहेत. छत्तिसगडी, नागपुरी, वऱ्हाडी, खानदेशी, अहिराणी, गंगेरी, बागलाणी, पुणेरी, कोल्हापुरी, उत्तरकोंकणी, राजापुरी, चित्पावनी, कऱ्हाडी, मालवणी, गोवें, कारवारी इत्यादि भेद हे प्रांतिक भेद होत. यादवकालीन, बहामनीकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन, आंग्लकालीन, अर्वाचीन इत्यादि भेद हे कालिक भेद होत. प्रांतभाषा, कालभाषा, गणभाषा-

लिङ्गभाषा, वयभाषा इत्यादि प्रकार भाषेमध्यें झालेले आढळतात त्याचींहि वर दिलेलीं कारणेंच होत. वर दिलेले प्रांतिक व कालिक भेद एका मराठी भाषेचेच फक्त दिले आहेत. इतर कोणत्याहि भाषेतच्या बाबतींत असे भेद असतातच. जुनी आर्यांची आर्यभाषा घेतली तर तिचे भारतीय, झेन्दअवेस्ता, ग्रीक, लॅटिन, गॉथिक, लिथ्यूनियन. असे प्रांतिक भेद पडतात. ह्या प्रांतिक भेदांचे पुनः कालिक भेद पडतात. पहिली आर्य भारतीय भाषा घेतली तर पूर्ववैदिक, वैदिक, ब्राह्मण, औपनिषदीय, सौत्र, पाणिनीय संस्कृत, लौकिक संस्कृत, पाली, पैशाची, शौरसेनी, मागधी, अर्धमागधी; माहाराष्ट्री, अपभ्रंश असे काल आणि प्रांत ह्या दोन्ही दृष्टींनें त्या भाषेचे भेद झालेले नमूद आहेत व त्यामध्यें लौकिक व वाङ्मयीन व्यवहार झाल्याचे दाखले इतिहासांत आढळतात. भाषेंतील जे मुख्य दोन घटक—शब्द व त्याचा अर्थ—ह्यामध्यें फरक झाल्यानें प्रांतनिष्ठ व कालनिष्ठ भेद कसे पडत जातात हें खालीं दिलेल्या रूपांतरित वाक्यांवरून अधिक स्पष्ट होईल.

१ पूर्ववैदिक—सागरूह वपरय् तर्णं धरतय्तले रत्नानय गालयतय्.

२ संस्कृत—सागरः उपरि तृणं धरति तले रत्नानि गालयति.

३ पालि—सागरो ऊपरि तिणं धरेति तले रतनानि गालेति.

४ प्राकृत—साअरो अवरि तणं धरइ तले रअणाणि घालइ.

५ अपभ्रंश—सायरु उवरि तणु धरइ तलि रयणइं घल्लइ.

६ मराठी—सागर वर तण धरतो तळीं रत्नें घालितो.

एकच वाक्य सहा निरनिराळ्या अवस्थांमधून नेलें आहे. हीं सहा रूपांतरें होण्यास कमींतकमी पांचसहा हजारांवर वर्षें लागलीं असावींत.

आपली मराठी भाषा ही आर्य भारतीय भाषांच्या कुळींतील आहे. तिच्या पूर्वींच्या अवस्था वर दिल्याच आहेत. अपभ्रंश भाषांच्या काळानंतर मराठी वगैरे अर्वाचीन प्रांतभाषांची प्रवृत्ति झाली. मराठी भाषा ज्या प्रांतांत बोलली जाते तो महाराष्ट्राचा प्रांत उत्तरेकडील लोकांनीं वसविला, गोंड, भिल्ल, नाग, द्रविडी जाती असे कांहीं मनुष्यसमाज महाराष्ट्रांत वसलेले होते. परंतु उत्तरेकडील निरनिराळ्या प्रांतांतून निरनिराळे मानवपुंज निरनिराळ्या कारणांमुळें दक्षिणेंत आले आणि वस्ती करून राहिले. ते येतांना अर्थातच आपल्या भाषा घेऊन आले. मराठी भाषेचें व्याकरण सूक्ष्म रीतीनें तपासून पाहिलें म्हणजे त्यांत निरनिराळ्या प्राकृत भाषांचे अवशेष सांपडतात. त्यांतल्या मुख्य अपभ्रंश आणि माहाराष्ट्री ह्या दोन भाषांचे अवशेष अधिक आहेत. तेव्हां मराठीच्या उत्पत्तिसंबंधानें असें म्हणतां येईल कीं मराठी ही कोणत्याहि एका प्राकृत भाषेपासून उत्पन्न झाली नसून निरनिराळ्या प्राकृतपासून—विशेषतः माहाराष्ट्री व अपभ्रंश ह्या दोन्ही भाषांपासून—उत्पन्न झाली.

आतां ही मराठीची उत्पत्ति केव्हां झाली असावी ? ह्याचेंहि उत्तर दोन्ही बाजूंनीं निश्चित करणें योग्य आहे. महाराष्ट्री किंवा अपभ्रंश ह्याचा लोप होण्यास केव्हां आरंभ झाला ही एक बाजू आणि मराठींतील जुन्यांतील जुना लेख कोणत्या काळांत लिहिला गेला ही दुसरी बाजू. प्रथम दुसऱ्या दृष्टीनें पाहूं. मराठींतील पहिला ग्रंथ जो ज्ञानेश्वरी त्याचा काल निश्चित आहे, आणि तो इ. स. १२९० आहे. ह्याच्याहि पूर्वींचें मानभावी वाङ्मय उपलब्ध आहे, परंतु अद्याप त्याची कालनिश्चिति विद्वानांना मान्य नाहीं. ज्ञानेश्वरीच्या पूर्वींचे कांहीं शिलालेख उपलब्ध आहेत. मुख्य शिलालेख त्यांच्या कालनिर्देशासह पुढें देतों. उनकेश्वर (इ. स. १२८९) सासवडपूर (इ. स. १२८५), पंढरपूर (इ. स. १२७३), नेवासें (इ. स. १२३९), पाटण (इ. स. १२०६), परळ (इ. स. ११८७), श्रवणबेळगोळ (इ. स. ९८३) अशा तऱ्हेनें मागें जात जात आपण ज्ञानेश्वरीच्या मागें तीनशेंसात वर्षें मराठीच्या उत्पत्तीच्याबाबत जाऊं शकतों. श्रवणबेळगोळ येथील शिलालेखांत दोनच मराठी ओळी आहेत. त्या पुढीलप्रमाणें आहेतः—श्रीचावुण्डराजें करवियलें। गंगराजे सुत्ताले करवियले॥ ह्याच्यापूर्वींचे कांहीं शिलालेखांत मराठी शब्द आढळतात. असे शिलालेख इ. स. ६८० पर्यंतच्या काळांतील आहेत. सातव्या शतकांतील एका ग्रंथांत मराठा व त्यांची भाषा ह्याचें वर्णन दिलेलें आहे. “ दढमढह सामलंगे सहिरे अहिमाणकलहसीले यदिण्णले गहिल्ले उल्लविरे तत्थ महरट्ठे ”

ह्या सर्व पुराव्यावरून मराठी भाषा सातव्या शतकांत उत्पन्न झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. तिच्या पूर्वीच्या प्राकृत भाषांच्या काळावरूनहि हाच काळ निश्चित होतो. पूर्वीच्या अवस्था—माहाराष्ट्री व अपभ्रंश—ह्यांचा अवनतीचा काळहि इ. स. ७०० पर्यंत विद्वान् लोकांनीं ठरविला आहे.

मराठी भाषेंतील स्वर, व्यंजनें, शब्द, प्रयोग, वाक्यें इत्यादि घटकांच्या रचनेंत माहाराष्ट्री, अपभ्रंश, संस्कृत इत्यादि भाषांचा भाग बराच आहे. मराठींतील अनुच्चारित अनुस्वार, आघात, तालव्य, दन्त्यतालव्यवर्ण, नरमावलेलीं मूर्धन्यें, हकारमिश्र परसवर्ण, निभृत 'अ,' सामान्यरूप, विभक्तिप्रतिरूपक अव्ययें, सप्रत्यय व अप्रत्यय द्वितीया, संयुक्त-क्रियापदें, 'लप्रत्यय' कर्मणी वगैरे प्रयोग, इत्यादि बाबी उल्लेखनीय आहेत. ह्या तर मराठी भाषेच्या मुख्य खुणा आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.

मराठी भाषेचें प्राचीनत्व, तिचें अभिजातत्व, शब्दांचें वैभव, अलंकारांचें ऐश्वर्य, रसांचें प्राचुर्य, शब्दांचें व उच्चारांचें काठिण्य, अर्थाचें प्रसारकत्व इत्यादि गोष्टी जगांतील कोणत्याहि संपन्न भाषेच्या बरोबरी करण्यास समर्थ ठरतील. तिचें सामर्थ्य वाढविण्याचे प्रयत्न प्राचीन व मध्ययुगीन कालांतील नामवंत व प्रतिभावंत लेखकांनीं केले आहेत. सध्यांच्या अर्वाचीन कालांतहि तिचे सुपुत्र तिचें सामर्थ्य व ऐश्वर्य वाढविण्याचे प्रयत्न करीत आहेत व त्या त्यांच्या प्रयत्नास यशहि चांगलें येत आहे. तिचा भावी काल मोठा ऊर्जस्वल आहे.

भास (ख्रि.पू.४५०–३७०)—संस्कृत भाषेंतील अत्यंत जुना नाटककार. याचीं एकंदर १३ नाटकें आहेत. तीं प्रथम १९०९–१० सालीं उपलब्ध झालीं. तीं येणेप्रमाणें—(१) मध्यम व्यायोग, (५) पंचरात्र, (३) दूतवाक्य, (४)-दूत घटोत्कच, (५) कर्णभार, (६) ऊरुभंग, (७) प्रतिमा, (८) अभिषेक, (९) बालचरित, (१०) प्रतिज्ञायौगंधरायण, (११) स्वप्नवासवदत्त, (१२) अविमारक आणि (१३) चारुदत्त.

यांपैकीं पहिलीं सहा महाभारतावर रचिलीं आहेत. प्रतिमा व अभिषेक हीं रामायणावर रचलेलीं आहेत. बालचरित हें हरिवंशावर रचलेलें आहे. प्रतिज्ञायौगंधरायण व स्वप्नवासवदत्त हीं वत्सराज व वासवदत्ता यांच्या ऐतिहासिक गोष्टींवर रचलेलीं आहेत. त्यांतील उदयन, प्रद्योत, दर्शक हे ऐतिहासिक आहेत. अविमारक व चारुदत्त हीं कशावर रचलेलीं आहेत हें निश्चितपणें सांगतां येणार नाहीं. उपलब्ध असलेल्या कोठल्याहि हस्तलेखांत नाटककाराचें नांव आढळत नाहीं; परंतु ह्या नाटकांचा खोल अभ्यास केल्यावर असें दिसून येतें कीं, तीं सर्व एकाच माणसानें व महामहोपाध्याय गणपती शास्त्री यांचे म्हणण्याप्रमाणें, महाकवि कालिदास याच्या स्तुतीस पात्र झालेल्या भासानेंच लिहिलीं आहेत.

भासाची नाट्यलेखनपद्धति सामान्य नाटकांत दिसून येणाऱ्या पद्धतींहून कांहीं बाबतींत निराळी असल्याचें दिसून येतें. बाणभट्टानें म्हटल्याप्रमाणें याच्या सर्व नाटकांत सूत्रधार अगदीं पहिल्या प्रथम प्रवेश करतो. याच्या मध्यम व्यायोग या नाटकांत तर नांदीचाही पत्ता नाहीं. याचें अपूर्ण स्थितींत राहिलेलें चारुदत्त नाटक खेरीज करून याच्या इतर सर्व नाटकांत "नांद्यन्ते ततः प्रविशति सूत्रधारः" हें वाक्य दृष्टीस पडतें. ग्रंथकाराच्या नांवाचा कोठेंहि उल्लेख केलेला नाहीं. नाटकाचा शेवट ठराविक पद्धतीनें केलेला आहे. "तुम्हांला संतुष्ट करण्यास मी आणखी काय करावें?" हा नेहमींचाच ठराविक मंत्र बहुतेक सर्वत्र शेवटीं आढळतो.बहुतेक सर्व नाटकांचें भरतवाक्य 'इमामपि महीं कृत्स्नां राजसिंहः प्रशास्तु नः'। असेंच किंचित् फरक करून आहे. नाटकांत आर्षप्रयोग बऱ्याच ठिकाणीं आढळतात. नाटकांत 'प्रस्तावना' ऐवजीं 'स्थापना' हा शब्द आढळतो.

भासानें आपलें स्वप्नवासवदत्ता हें नाटक अग्नींत टाकलें असतांहि जळलें नाहीं, अशा तऱ्हेची आख्यायिका राजशेखर कवीनें आपल्या एका पद्यांत दिली आहे.

हा मगध देशांतील असून विष्णूचा उपासक होता.

भास्कराचार्य (जन्म स. १११४):—विख्यात ज्योतिषि-पिता व गुरु महेश्वर. गांव सह्य पर्वताजवळील 'विजलविड' बेदरपेक्षां हें बीडच असण्याचा संभव दिसतो.

ग्रंथ—सिद्धांतशिरोमणी (लेखनकाल ११५०) २ करणकुतूहल (ले. का. ११८३), ३ वासना भाष्य (सिद्धांतशिरोमणीच्या ग्रहगणित व गोलाध्याय यांवरील स्वकृत टीका, ले. का. ११८३).

खानदेशांत चाळिसगांवच्या नैर्ऋत्येस १० मैलांवर पाटण म्हणून खेडें आहे. त्यांत भवानीच्या देवळावर

एक शिलालेख आहे. भास्कराचार्यांचा नातू चंगदेव हा देवगिरीच्या सिंघण यादवाचा ज्योतिषी होता. चंगदेवानें भास्कराचार्यांच्या व वंशांतील इतर लोकांच्या ग्रंथांच्या अध्ययनासाठीं पाटण येथें मठस्थापना केली. त्याला सिंघणाचा मांडलिक सोइदेव निकुंभ व त्याचा भाऊ हेमाडी यांनीं नेमणूक दिली. नंतर चंगदेवानें वरील शिलालेख लिहिला. त्यांत भास्कराचार्यांचा वंश पुढीलप्रमाणें दिला आहे:—त्रिविक्रम—क्रम—भास्करभट्ट—गोविंद—प्रभाकर—मनोरथ —महेश्वर—भास्कर—लक्ष्मीधर-चंगदेव. भास्कराचार्यांपासून पूर्वीचा सहावा पुरुष भास्कर हा भोजराजाचा विद्यापति होता. लक्ष्मीधर हा जैत्रपाल यादवाचा ज्योतिषी होता. (स. १०४२)

सिद्धांतशिरोमणीचे लीलावती, बीजगणित, ग्रहगणित व गोल असे चार भाग असून प्रत्येक भाग म्हणजे गणिताच्या शाखेवरचा एक स्वतंत्र ग्रंथच आहे. लीलावतींत अंकगणित आहे. बीज गणितांत वर्गसमीकरणापर्यंतचा विषय आहे आणि गोलाध्यायांत गोलीय त्रिकोणमितीचें विवेचन आहे. याच्या ग्रंथांत सर्व विवेचन इतकें पद्धतशीर आहे कीं, त्याच्या अध्ययनानें गणिताच्या चारहि शाखांतलीं उदाहरणें सोडविण्याची सोय त्या वेळच्या विद्यार्थ्यांची झाली. यामुळें भास्कराचार्यांच्या या ग्रंथाचा प्रसार सर्व हिंदुस्थानभर झाला व इतर ग्रंथ मागें पडले. ब्रह्मगुप्तास भास्कराचार्य आपला गुरु मानतो. पण सिद्धांतशिरोमणीच्या सोइस्कर पद्धतीनें ब्रह्मसिद्धांताचें देखील अध्ययन लोकांना नकोसें झालें. भास्कराचार्यांच्या ग्रंथांत सोप्या रीती व कांहीं नवीन शोध आहेत.

भास्कर रघुनाथ पेशवे (सन १७६२–१८४२):— राघोबादादांचा हा थोरला मुलगा. याचा जन्म शके १८६४ त झाला. हा तरुण असतांनाच यास दादांनीं प्रारंभींच प्रतिनिधीपद देऊन राजेबहाद्दर याचा मुतालिक केलें. परंतु याच सुमारास उपजत वैराग्य असलेल्या अशा ह्या पुरुषानें पुण्यांतून पोबारा केला. पुढें हा भटकत भटकत ' हाथरस ' या गांवीं आला. तेथें यास गुरूपदेश झाला. तपश्चर्येच्या शेवटीं यानें हाथरस येथेंच आपलें मुख्य राहण्याचें ठिकाण मुक्रर केलें; व शेवटीं तेथेंच वयाच्या ८० वे वर्षी यानें आपली इहलोकींची यात्रा संपविली.

यानें हिंदी भाषेंत बरींच काव्यें केलीं आहेत. यानें ' घटना रामायण ' या नांवाचा एक संपूर्ण ग्रंथ व ' पद्यसागर ' नांवाचा एक अपूर्ण ग्रंथ असे दोन ग्रंथ लिहिले.

यानें आपल्या आत्मचरित्रांत असें सांगितलें आहे कीं, तुळसीदासाचें अर्धवट राहिलेलें काम पुरें करण्याकरितांच आपला जन्म झाला आहे. म्हणूनच यानें सवाई तुळसीदास स्वतःस म्हणवून तुळसीदासाचे मागील ग्रंथ पूर्ण लिहिण्याचें महत्त्वाचें कार्य पुरें केलें.

भिडे, विद्याधर वामन (१८६१–१९३६):— कोशकार, कवि, कादंबरीकार, प्रबंधकार व बहुभाषा कोविद. यांची प्रसिद्धी वाङ्मयसेवक या नात्यानेंच झालेली आहे. या प्रसिद्धीला आरंभ त्यांच्या ' राघवीय परीवाह ' या संस्कृत महाकाव्याच्या धर्तीवर लिहिलेल्या पुस्तकापासून झाला. या काव्यानंतर त्यांनीं मंदारमंजरी, गजेंद्रमोक्ष, रथरूपक, जीवजागृति, आनंदाची मूर्ति, कमळीची सुटका आणि पिलाजी व शिवाजी हीं काव्यें निर्माण केलीं.

काव्याप्रमाणेंच त्यांनीं अर्थालंकाराचें निरूपण, साहित्यकौमुदी, मराठी भाषेचे वाक्प्रचार आणि म्हणी, मराठी शद्बांचें उद्घाटन, मराठी म्हणीविषयीं चार शद्ब, निबंधलेखन आणि अनुवाद हे प्रबंध लिहून साहित्याच्या वेगवेगळ्या शाखेवर उत्तम ग्रंथनिर्मिती केली. यानंतर त्यांची दृष्टी कादंबरीच्या क्षेत्राकडे वळली. विद्याधरपंतांनीं 'कोरलाईचा किल्लेदार', 'मुरारी', 'केंजळगडचा कबजा', 'पण तिसरा कोण'? 'गणवंतगडचा' गडकरी', ' प्रपितामहाच्या पदावर ', ' अंब्राजीरावाची साडेसाती', 'सवाईराव' या कादंबऱ्या लिहिल्या.

त्यांनीं आपल्या आयुष्याच्या अखेरीस केलेली महत्त्वाची कामगिरी म्हणजे मराठीचा सरस्वतीकोश हा. या कोशाप्रमाणेंच संस्कृत–इंग्रजी कोश हाहि त्यांनीं केलेला आहे.

यांच्या काव्याची भाषा, ओघवती, प्रौढ, अलंकारिक व शुद्ध आहे. कादंबऱ्यांची उभारणी रहस्यावर केली असून त्या सर्वांची भाषा मनोरंजक व जिज्ञासावर्धक आहे.

या साहित्यसेवकानें ४० वर्षेपर्यंत शिक्षकाचें काम केलें. हे स्वदेशीचे चहाते असून कॉंग्रेसचे एक निष्ठावंत अभिमानी होत. यांना मराठी, शीख, संस्कृत, कानडी, बंगाली, गुजराथी, फ्रेंच, पाली व पर्शियन

या भाषा उत्तम अवगत होत्या. काळीज बंद पडून २५–१–१९३६ ला यांचा अंत झाला.

भिसे, डॉ. शंकर आबाजी (१८६७–१९३५):– हिंदी शास्त्रज्ञ. जाहिरातीचें व आपोआप वजन करणारें यंत्र, भिसो टाईप, फ्री व्हील, पिठाचें यंत्र, आटोमिडन यांचे शोधक. जन्म २९।४।१८६७. यांची मॅट्रिकची परीक्षा १८८८ त उतरली. यांनीं मुंबईस १८८९ पासून १८९८ पर्यंत सरकारी नोकरी केली. पुढें हे १८९९ मध्यें इंग्लंडला गेले. यापूर्वी १८९४ त त्यांस मुंबई उद्योगवृद्धि संस्थेचें शास्त्रीय संशोधनाबद्दल मानपत्र व सुवर्णपदक मिळालें. १८९७ त यांना पिठाचें यंत्र शोधल्याबद्दल इंग्लंडांतील चढाओढीचें पहिलें बक्षिस, मिळालें. तसेंच याच वर्षी वाचण्याच्या प्रयोगाबद्दल शंकररावांना बडोद्याचे कै. सयाजीराव गायकवाड यांनीं हिऱ्याची अंगठी दिली. लंडनमधल्या अर्लस् कोर्ट एक्झिबिशननें १९०१ मध्यें 'जाहिरातीचें मशीन'-बद्दल सुवर्णपदक दिलें. टाईप तयार करण्याचें यंत्र पूर्णत्वास आणलें म्हणून १९०८ त त्यांना लंडनच्या तज्ज्ञांनीं 'हिंदुस्थानचे एडिसन' ही पदवी बहाल केली. १९१० या वर्षी 'टाटा भिसे' कंपनीची स्थापना झाली. १९१४ सालीं पृथक (सिंगल) टाइप पाडणारें मशीन बनविलें व आटोमिडनचा शोध लावला. यांनीं १९१६ पासून अमेरिकेंत वास्तव्य करून तेथेंच टाइप कास्टिंग मशीनची १९२० मध्यें स्थापना केली. तसेंच आटोमिडन कंपनीहि याच वेळीं सुरू केली. १९२७ त वयाच्या साठाव्या वर्षी निरनिराळ्या संस्थांनीं यांचा सन्मान केला व न्यू यॉर्क येथें त्यांस मानपत्र दिलें.

त्यांच्या पदव्या एफ. एस. सी; ए. एस. ए.; एम्. एस्. (लंडन). यांना, इंग्लंडांत असतांना, कै. दादाभाई नौरोजी यांनीं, वेळोवेळीं चांगलीच मदत केली. हे नौरोजींना वडिलांसमान मान देत व नौरोजी हे शंकररावांना पुत्रवत् समजत. इंग्लंडांत नौरोजी असतांना शंकरराव भिसे हे रविवारच्या भोजनाला त्यांच्याकडेच असत. यामुळें उभयतांचा दाट परिचय झाला. १९०६मध्यें दादाभाई कॉंग्रेसचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यासाठीं हिंदुस्थानांत आले. त्यावेळीं शास्त्रज्ञ भिशांनीं त्यांच्या अध्यक्षीय भाषणाची सर्व तयारी व इतर सिद्धता करून दिली. या तयारीसाठीं कॅनडा व ऑस्ट्रेलिया या दोन देशांच्या राजकारणाचा अभ्यास त्यांस करावा लागला. या अभ्यासाचा परिपाक म्हणजे त्यांच्या (दादाभाईंच्या) भाषणांत 'स्वराज्य हें माझें ध्येय आहे' ही झालेली नोंद होय. या भाषणाचा प्रतिध्वनि म्हणून इंग्लंडच्या वृत्तपत्रांमधून त्यांजवर, कलकत्ता कॉंग्रेस झाल्यावर, तीन आठवड्यांनीं शब्दांचे बॉंबगोळे उडविण्यांत आले. याशिवाय यांनीं जागतिक शांततेकरितां १९२७पासून प्रयत्न केले. त्यांनीं योग तत्त्वज्ञान यांकडेदेखील लक्ष पुरविलें होतें. मनकवडेपणाची कलाहि म्हणजे (अकथित परविचारकथन) शंकररावांना अवगत होती. याचमुळें त्यांचा व ना. गोखल्यांचा स्नेह झाला व वाढला. ना. गोखल्यांनीं सर आर. जे. टाटा, यांच्याशीं भिसे यांचा परिचय करून दिला. हिंदुस्थानांत भिसे आल्यानंतर त्यांना इकडील लोकांनीं १८९७ त मानपत्र व सोन्याचें बहुमोल घड्याळ देऊन त्यांचा गौरव केला. या शास्त्रज्ञाचा अंत अमेरिकेंतील न्यूयॉर्क शहरीं ७–४–१९३५ रोजीं झाला.

भीम:—धर्माचा धाकटा भाऊ. पंडु व कुंती यांचा हा मुलगा. जन्मापासूनच याची प्रकृति दणकट तशीच शक्ति प्रचंड होती. बालपण आईबाप व भीष्म यांच्याकडे गेलें. याचें शिक्षण द्रोण, कृप व बलराम यांच्याजवळ झालें. यानंतर त्याचीं द्रौपदी व हिडिंबा यांच्याशीं लग्नें झालीं.

शिक्षण व शक्ति या बाबतींत हा दुर्योधनापेक्षां वरचढ असल्यामुळें दुर्योधनानें उत्पन्न केलेल्या लाक्षागृह, जलविहार या प्रकरणांत त्यास फार त्रास सोसावा लागला. राजसूय यज्ञाच्या आरंभीं यानें जरासंधाला ठार मारून व पूर्वेकडील अनेक राजांचा पराभव करून पुष्कळ कारभार गोळा केला. राजसूय यज्ञांत याच्याकडे पाकशालाधिपतित्व होतें.

द्यूतामध्यें पांडव हरल्यावर, दुर्योधनानें द्रौपदीची विटंबना केली. तीमुळें चिडून जाऊन यानें दुर्योधन-दुःशासन यांच्या वधाची प्रतिज्ञा केली.

वनवासांत असतांना याला आपल्या बळाबद्दल फार गर्व झाला होता. तो मारुतीरायांनीं नाहींसा करून त्यास आपलें दर्शन दिलें. धर्मानें, एकदां यास पाणी आणण्यास गेलेले भाऊ परत कां आले नाहींत याची चौकशी करण्यास पाठविलें. त्यावेळीं हा तेथील पाणी घेऊन येत असतांना यक्षाच्या शापानें मरून पडला. तसेंच हा एकदां शिकारीस गेला असतां त्यास

एका अजगरानें वेटाळून टाकलें त्यामुळें त्यास कांहीं करतां येईना. या दोन्ही प्रसंगीं यक्षाला व अजगराला समर्पक उत्तरें धर्माकडून मिळाल्यामुळें भीमाची सुटका झाली. भीमानें बकासुर, हिडिंब, किर्मिर या राक्षसांनाहि यापूर्वी ठार केलें होतें.

अज्ञातवास कंठतांना हा विराटाच्या पदरीं आचारी व मल्ल म्हणून नोकरीस राहिला. तिथें असतांना जीमूत, कीचक व अनुकीचक यांना त्यानें ठार केलें.

भारतीय युद्धांत दुर्योधनदुःशासनादि कौरव शत-बंधूंना यानें कंठस्नान घातलें. पुढें याजवर धृतराष्ट्र व गांधारी यांचें गंडांतर आलें; पण तें कृष्णाच्या मद-तीनें टळलें.

सर्व पांडवांत द्रौपदीची भिस्त याच्यावर फार. तिचा अपमान, विटंबना ज्यानें ज्यानें केली त्या सर्वांना यानें देहांत शासन केलें.

बंधूसह यानें पुष्कळ वर्षें राज्योपभोग घेतल्यावर त्यांच्यासह हा वनांत गेला. तेथें हा मरून पडला. यावेळीं त्याचें वय १०७ वर्षांचें होतें. याचें शरीर भव्य व बळकट असून त्याची अंगकांती सोन्यासारखी होती. याच्या ध्वजावर सिंह असून रथाचे घोडे अस्वली रंगाचे होतें. याचें मुख्य आयुद्ध गदा. ती मयानें यास दिली. भीमाला घटोत्कच, सुतसोम व शर्वचात या नांवाचे तीन मुलगे होते.

भीमाः—महाराष्ट्रांतली एक नदी. सह्याद्रि पर्वतांत भीमाशंकराजवळ ही उगम पावून पुणें, सोलापूर, विजापूर या जिल्ह्यांतून वहात जाऊन निजामच्या राज्यांत शिरते. ही रायचूरपासून १६ मैलांवर असा णाऱ्या 'कृष्णा' स्टेशनजवळ कृष्णा नदीला मिळते. आरंभींचा हिचा सुमारें चाळीस मैलांचा प्रवाह एका दरींतून जातो. मुळा मुठा या नद्या हिला रांजण गांवाजवळ मिळतात. या ठिकाणींच 'घोडनदी' व तिचा संगम होतो. अहमदनगरजवळ भीमेला 'माण' व 'सिना' मिळतात. तसेंच टेंभुर्णीजवळ निरा नदी मिळते. हिच्या कांठीं पंढरपूर हें प्रसिद्ध क्षेत्र आहे. या क्षेत्रांत भीमेला 'चंद्रभागा' या नांवानें ओळखतात. या नांवाशिवाय तिची भीमरथा व भीमरथी हीं आणखी दोन नांवें प्रचलित आहेत. हिची एकंदर लांबी १७५ मैल भरते.

भीमाशंकरः—पुणें जिल्ह्यांतील एक प्रसिद्ध क्षेत्र. या क्षेत्राच्या ठिकाणीं असणाऱ्या गांवाचें नांव भोवरगिरी असून तें खेड तालुक्यांत आहे. येथें एक किल्ला असून त्याला गांवाच्याच नांवानें प्रसिद्धी मिळाली आहे. नाना फडणीसांनीं बांधलेलें एक देऊळ येथें आहे. येथें भीमा नदी उगम पावल्यामुळें या गांवाला क्षेत्रत्व प्राप्त झालेलें आहे. माघ मासांतील शिवरात्रीला येथें यात्रा भरते. सह्याद्रि पर्वताचें जें शिखर या ठिकाणीं आहे त्याची उंची ३४४८ फूट आहे. शिवाय हें एक सह्याद्रि पर्वतावरील थंड हवेचें ठिकाण होय.

भीष्मः—कौरवपांडवांचे आजोबा, इक्ष्वाकु कुलांतील शंतनू राजाला गंगेपासून झालेला मुलगा. याचा जन्म अष्टवसूंच्या अंशांपासून झाला. याला देवव्रत, गांगेय अशीं आणखी दुसरीं नांवें होतीं. भीष्माचें बालपण आईकडेच गेलें; त्यामुळें त्याच्या शिक्षणाची व्यवस्था आईनें केली. वेदशास्त्राचें अध्ययन वसिष्ठा-जवळ घेऊन यानें परशुरामाजवळ शस्त्रास्त्रविद्या संपा-दिली. अस्त्र व शस्त्रशास्त्र पारंगत बनल्यावर याला गंगेनें शंतनू राजाच्या स्वाधीन केलें.

युवराजपद मिळालें तेव्हां भीष्म ३६ वर्षांचा होता. यानें बापासाठीं आजन्म ब्रह्मचर्य व्रत घेतलें. या व्रतामुळेंच त्याचें देवव्रत हें नांव मागें पडून भीष्म या नांवानें तो सर्वांच्या परिचयाचा झाला. बापाच्या अंतकाळीं याच्यावर भावांच्या पालनपोषणाची व राज्यरक्षणाची जबाबदारी पडली. पुढें यानें भावाच्या लग्नासाठीं काशीराजाच्या अंबा, अंबिका व अंबालिका या मुलींचें हरण केलें. अंबिका व अंबालिका यांच्याशीं भावाचें लग्न करून टाकलें. अंबेच्या बाबतींत भीष्माला प्रत्यक्ष गुरूशींदेखील दोन हात करावे लागले. पंडूच्या पश्चात् कौरवपांडवांची कौटुंबिक व्यवस्था भीष्माला पाहावी लागली. त्यांच्या शिक्षणासाठीं भीष्मानें द्रोणाचार्यांची योजना केली. कौरवपांडव मोठे झाल्यावर त्यांच्यांत द्वेषभाव वाढून गृहकलह माजण्याचा रंग दिसूं लागला. तो नष्ट व्हावा म्हणून उभयतांना भीष्मानें निमेनिम राज्य वाटून दिलें. पुढें पांडवांनीं स्वपराक्रमानें आपलें वैभव व कीर्ति वाढविली. त्यांचें वैभव कौरवांना पाहवलें नाहीं. त्यांनीं कपटद्यूत खेळून पांडवांची संपत्ति हरण केली व त्यांचा छळ आरंभला. द्यूतांत 'द्रौपदी हरली काय?' या द्रौपदीच्या प्रश्नाचें उत्तर देणें भीष्मास कठीण होऊन बसलें.

भीष्मानें कौरवांना पांडवांशीं सख्य जोडण्याबद्दल अनेकवार सांगून पाहिलें; पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. शेवटीं अज्ञातवासानंतर कौरवपांडवांत भारतीय युद्ध झालें. या युद्धांत कौरवांचा पहिला सेनापति भीष्म होता. यांनीं या युद्धांत अभेद्य, गारुड हे व्यूह रचिले. त्याचप्रमाणें कृष्णाला हातीं शस्त्र घेणार नाहीं ही प्रतिज्ञा भीष्मानें आपल्या पराक्रमानें मोडणें भाग पाडलें. कौरवांच्याकरितां केलेला पराक्रम पांडवांच्या नाशाला कारणीभूत होत आहे हें पाहून त्यानें आपणहूनच शिखंडीला पुढें करून अर्जुनानें आपल्यावर बाणांचा मारा करावा असा उपाय सुचवला. या उपायानें अर्जुनाकडून बाणबद्ध झाल्यामुळें त्यास हातचीं शस्त्रें खालीं ठेवावीं लागलीं. यानें दहा दिवस युद्ध केलें. प्राणोत्क्रमणापर्यंत यांनीं जो उपदेश पांडवांना केला तो 'भीष्मगीता' या नांवानें प्रसिद्ध आहे. उत्तरायण सुरू झाल्यावर माघ शु॥ ८ मीस यानें प्राण सोडला. हा वीर आपल्या अंगच्या ब्रह्मचर्य, पितृभक्ति, प्रतिज्ञापालन, ईश्वरभक्ति व शौर्य या गुणांनीं सर्वांच्या नजरेंत चांगला भरतो व त्यामुळेंच सर्व भूमंडळावर आदरास पात्र झाला आहे.

भीष्माष्टमीः-ही माघ शुद्ध अष्टमीला पडते. या दिवशीं भीष्म मरण पावले म्हणून ह्या अष्टमीला भीष्माष्टमी म्हणतात. पुराणांत या दिवशीं सर्वांनीं जीवत् पितृकांनींसुद्धां त्यांच्या तृप्तीसाठीं तर्पण करावें असें सांगितलें आहे व त्याप्रमाणें हें करण्याचा प्रघातहि पुष्कळ ठिकाणीं अद्यापि पाहण्यास मिळतो. भीष्म ब्रह्मचारी असल्यानें त्यांना कोणी तर्पण करण्याला राहणार नाहीं म्हणून ही सार्वजनिक चाल पडली असली पाहिजे असें कित्येकांस वाटतें.

भुईमूगः—याचे दाणे खाण्यास तर चांगले लागतातच पण त्यांचा औषध ह्या दृष्टीनेंही चांगला उपयोग होतो. याचे दाणे सारक आहेत. हे फार खाऊं नयेत व अनशपोटींही खाऊं नयेत. अवरोध होत असेल तर हे दाणे रोज रात्रीं २–३ तोळे निजतांना चांगले चावून खाऊन निजावें म्हणजे सकाळीं शौचास साफ होतें. मूळव्याधीवर हे देशी दाणे अजमासें दोन तोळे भोजनोत्तर खाऊन वर पाणी प्यावें. पुष्कळ दिवस असें केलें म्हणजे खडा मोडून शौच्यास साफ होतें व मूळव्याध बरी होते. लहान मुलांना रिकेट्स झालें असतां भुईमुगाचे दाणे भाजून ते वाटून त्यांत साखर घालून दिवसांतून एक तोळाभर द्यावें. खाल्लेलें अन्न पचन होऊन शौचास साफ होतें. त्याचा चांगला उपयोग होत आहे असें वाटलें कीं ह्याचें प्रमाण थोडें थोडें वाढवून २–२॥ तोळ्यापर्यंत वाढवावें. मुलांना बाळसें येऊन रिकेट्स कमी होतात. गरीब लोकांना लोणी मिळणें शक्य नसतें. त्यांनीं त्याऐवजीं दाण्याचा उपयोग करावा. गरीब लोकांचें दाण्याचें तेल म्हणजे 'कॉडलिव्हर' आहे. अशक्त मुलांच्या अंगास हें तेल चोळल्यानें शरीराचें पोषण होऊन शक्ति वाढते. बदामापेक्षां हे दाणे स्वस्त असून ह्याचा उपयोगही बदामापेक्षां जास्त होतो. बदामानें अवरोध धरतो. दाण्यानें शौचास साफ होतें.


उसळ-साहित्य—देशी बारीक दाणे, तिखट, मीठ, गूळ. **कृति**—प्रथम पाण्यांत दाणे भिजत घालावेत. नंतर ते सोलून किंवा तसेंच शिजत ठेवावेत. चांगले मऊ शिजल्यावर त्यांच्या मानानें तिखट, मीठ व गूळ घालावा व पुन्हां ती शिजवावी.

लाडू-साहित्य—भाजलेल्या दाण्याचे कूट, पिठी साखर, तूप, वेलदोडे. **कृति**— दाण्याचे कूट घेऊन त्याच्यापेक्षां थोडी कमी पिठी साखर घ्यावी. त्यांत तूप, लाडू वळावयास येईल इतकें घालून वेलचीची पूड घालावी नंतर तें सारखें कालवून वळावेत.

आमटी—साहित्य—दाणे, नारळ, चिंच, गूळ, मीठ, जिरें, मिरच्या, कोथिंबीर. **कृति**—दाणे भाजून सोलून घ्यावेत. नारळ खवणून घ्यावा. चिंच भिजत घालावी. नंतर दाणे बारीक कुटावेत. खोबरें, मिरच्या, मीठ, जिरें व निम्में दाण्याचें कूट हे जिन्नस पाट्यावर चांगले बारीक वाटावेत; नंतर चुलीवर पातेल्यांत आधण ठेवून दाण्याचें कूट घालावें. वाटलेला गोळा चिंचेच्या कोळांत घालून कालवून तो सर्व पातेल्यांत ओतावा. ही आमटी मंदाग्नीवर चांगली शिजूं द्यावी. हवी असल्यास तुपाची फोडणी द्यावी.

गुडदाणी—साहित्य—भुईमुगाचे भाजलेले सबंध दाणे, तूप, गूळ व वेलची. **कृति**—दाण्याच्या मानानें गूळ घेऊन त्यांत थोडें तूप घालून त्याचा पाक साधारण गोळी होईपर्यंत करावा. नंतरं खालीं उतरून त्यांत दाणे व वेलचीची पूड घालावी व नंतर तें सारखें घाटावें. थाळ्याला• तूप लावून त्याच्यांत थापावें. निवाल्यावर वड्या कापाव्या.

भुवनेश्वरः—हें शिल्पकलेच्या दृष्टीनें अप्रतिम अशा हिंदु मंदिरांविषयीं प्रसिद्ध असलेलें स्थान ओरिसा




राजाराणी मंदिर—भुवनेश्वर

प्रान्तांत आहे. भुवनेश्वर हें नांवाप्रमाणेंच शिवाचें नगर आहे. कारण तेथील बहुतेक सर्व देवळें शिव या एकाच देवतेचीं आहेत. साऱ्या भुवनेश्वर क्षेत्रांत बिंदुसागर तलावावरील वासुदेवमंदिर हें एकच विष्णुमंदिर आहे. येथील लिंगराज मंदिराखेरीज इतर सर्व मंदिरांत अहिंदूंना प्रवेश मिळतो. लिंगराजाच्या दर्शनानें व बिंदुसागर तीर्थातील स्नानानें पुनीत होण्याकरितां भाविक हिंदु या क्षेत्राची यात्रा करीत असल्यास नवल नाहीं; विधर्मीय लोकहि या क्षेत्राची यात्रा धार्मिक बुद्धीनें नसली तरी तेथील शिल्पकलेचें वैभव पाहण्याकरितां व त्या अभ्यासाकरितां करतात. लॉर्ड कर्झननें या स्थानाची यात्रा करून तेथील कलावस्तूंच्या सौंदर्यदर्शनानें आपल्या डोळ्याचें पारणें फेडलें. फर्ग्युसननेंहि तेथें जाऊन तेथील शिल्पाचा मोठ्या आस्थेनें अभ्यास केला आहे.

भुवनेश्वर येथील सुंदर हिंदु मंदिराचा उदय होण्यास कारण बौद्धधर्माचा वाढतां प्रसार हेंच होय. बौद्धांनीं काशीक्षेत्रांत जाऊन धर्मप्रसारास सुरवात केल्यामुळें त्या धर्माच्या प्रसारास आळा घालून धर्माला पूर्वीचें स्थान मिळवून देण्याचें कार्य ओरिसाच्या केसरी राजांपैकीं पहिल्या राजानें हातीं घेतलें. त्यानें भुवनेश्वर येथें आपली राजधानी करून तेथून धर्माच्या पुनरुज्जीवनाचें कार्य करण्याचा निश्चय केला. त्यामुळें देवालयें बांधण्याची एक लाटच उसळली व भुवनेश्वर येथें एकाहून एक सुंदर अशीं अनेक देवालयें बांधण्यांत आलीं.

भुवनेश्वर येथील देवालयांत लिंगराजाचें देवालय हें प्रमुख होय. या मुख्य मंदिराभोंवतीं दुसरीं पासष्ठ मंदिरें आहेत; यांत पार्वतीमंदिर, मुक्तेश्वरमंदिर, परशुरामेश्वर, राजाराणीमंदिर हीं मंदिरें विशेष प्रेक्षणीय आहेत. लिंगराजाच्या देवळांत त्रिभुवनेश्वराची मूर्ति आहे; ती Granite दगडाची बनवलेली असून तीवर ब्रह्मा, विष्णु व महेश यांच्या प्रतिमा खोदलेल्या आहेत. या देवळाचे उपाहारशाला, नृत्यशाला, सभामंडप व मनोरा असे चार मोठे भाग आहेत. मनोरा १८० फूट उंच असून शिल्पदृष्ट्या पहिल्या प्रतीचा आहे. त्याच्या बांधकामीं चुन्याचा उपयोग केलेला नाहीं. पार्वतीमंदिर भव्य व शोभिवंत आहे. लिंगराजाचें देऊळ सुंदर असलें तरी त्यासभोंवतालच्या इतर देवालयांच्या सौंदर्याला त्यामुळें गौणत्व येत नाहीं. प्रत्येक देऊळ शिल्पदृष्ट्या आपापल्यापरी सुरेखच आहे. मुक्तेश्वराचें देऊळ हें ओरिसाच्या शिल्पकलेंतील रत्न आहे. त्याचें कोरीव काम रेखीव व स्पष्ट आहे. त्यावर वेगवेगळ्या ठिकाणीं एका सिंहारूढ वीररमणीची आकृति कोरलेली दिसते. ही वीररमणी हातांत खड्ग घेऊन रिकिबींत पाय ठेवून मोठ्या दिमाखानें सिंहावर बसलेली दाखविली आहे. तिचें शरीर निरोगी व सुंदर दाखविलें असून तें व्यायाममंदिरांत आदर्श म्हणून ठेवण्यासारखें आहे. फर्ग्यूसनच्या मतें लिंगराजमंदिर व मुक्तेश्वरमंदिर हीं दोन्ही मंदिरें दोन भिन्न शिल्पाचे नमुने आहेत; परंतु ते परस्परविरोधी नसून पूरक आहेत. मुक्तेश्वरमंदिर सिद्धारण्यनामक अरण्यांत वसलेलें आहे. मंदिराचें प्रवेशद्वार भव्य असून त्याचें शिल्प खरोखरींच बारकाईनें अभ्यासण्यासारखें आहे. त्यावर कोरलेलें शिवतांडवाचें चित्र पाहून दगडावर भाव निर्माण करणाऱ्या कारागिरांविषयीं कौतुक वाटल्याशिवाय रहात नाहीं. परशुरामेश्वराचें देऊळ तेथील अत्यंत जुन्या मंदिरांतील एक असून तें इसवी सनाच्या पांचव्या किंवा सहाव्या शतकांत बांधलें असावें. त्यावर लिंगराजाच्या मंदिरावर जसा केसरीराजाचा ध्वज सिंह धीरोदात्त स्वरूपांत कोरलेला आढळून येतो तसा कोरलेला नाहीं. उलट पक्षीं या मंदिराच्या भिंतीवर वनराज शिकाऱ्याच्या भाल्याला बळी पडलेला दाखविला आहे. पार्वती, कार्तिकेय, गणेश यांच्या प्रतिमाहि मंदिरावर कोरलेल्या आहेत; परंतु गजवदनाला गजाच्या मुखाऐवजीं मनुष्याचें मुख कारागिरानें दिलें आहे. राजाराणीचें देऊळ हिरव्यागार उघड्या मैनादावर आहे. त्यावर नवग्रह कोरलेले आहेत. राजाराणी हें नांव पिवळ्या रंगाच्या राजाराणी नांवाच्या दगडाचा त्याच्या बांधकामीं उपयोग केला असल्यामुळें पडलें असावें. याच्या बांधकामीं चुन्याचा उपयोग केलेला नाहीं. त्याचें शिल्प कसें तरी घाईनें पाहण्यासारखें नसून अभ्यसनीय आहे. ब्रह्मेश्वराचें देऊळ नवव्या शतकांत बांधलेलें असावें. त्यावर निरनिराळ्या प्राण्यांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. त्यांत केसरीराजाचें विजयचिन्ह केसरी हत्तीवर पाय देत असलेला दाखविलेला आहे.

भुवनेश्वराच्या आसपासदेखील प्रेक्षणीय स्थळें आहेत. तेथून पांच मैलांवर धौली येथें अश्वत्थामा खडकावर सम्राट् अशोकानें इसवी सनापूर्वीच्या तिसऱ्या




क्वेट्टा येथील भूकंप (१) भूकंपामुळें झालेला इमारतींचा चक्काचूर (२) दहा फूट खचलेली जमीन

शतकांत बुद्धाचीं तत्त्वें खोदविलीं आहेत. उदयगिरी व खंडगिरी येथील कोरीव लेणीं प्रेक्षणीय आहेत.

भुवनेश्वरचा प्रवास कलकत्ता–मद्रास मार्गावर कलकत्त्यापासून नऊ तासांचा आहे. तें जगन्नाथपुरीच्या मार्गावर आहे.

भूकंपः–भूपृष्ठामध्यें अथवा भूपृष्ठाखालीं जमिनीमध्यें हालचाल झाल्यानें जमीन कंपायमान अथवा हादरल्यासारखी होते त्यास भूकंप अथवा धरणीकंप म्हणतात. सर्वसाधारणतः भूकंपाचे, शास्त्रज्ञ तीन प्रकार करतात. संथ पाण्यामध्यें दगड टाकला असतां जशा वर्तुलाकार लहरी उत्पन्न होतात तशाच भूकंपाच्या लहरी मूळ ठिकाणाहून निघून चोहोंकडे पसरतात हा पहिला प्रकार (Wave movement). पाण्यावरील लहरी चोहोंकडे वर्तुलाकार व नियमित पसरतात, पण भूकंपाच्या लहरी मार्गांत आलेल्या एखाद्या खडकाच्या थरामुळें अडथळा होऊन अनियमित होतात व त्यांचा वर्तुलाकारहि नष्ट होतो. या लहरींचा वेग फार मोठा म्हणजे कधीं कधीं मिनिटास तीस ते चाळीस मैलांचा असतो. तसेंच या लहरी व त्यामुळें उत्पन्न झालेला कंप विलग विलग वाळू अगर वाळूमिश्रित खडकांच्या भागापेक्षां कठीण व लवचिक खडकांतून अधिक वेगानें पसरतो. दुसरा प्रकार ऊर्ध्वगतीचा आहे (Vertical movement). एखाद्या खाणींतील आकस्मिक स्फोटाप्रमाणें पृथ्वीच्या कवचाचा स्फोट होऊन धूळ, माती व खडक वर फेकले जातात व त्यामुळें त्यावेळीं धक्के बसतात. तिसऱ्या प्रकारचे भूकंप पृथ्वीच्या कवचास घड्या अथवा वळकट्या पडल्यानें उत्पन्न होतात (Circular or twisting movement). या प्रकारच्या भूकंपांचे परिणाम सर्वांत अधिक हानिकारक असतात. सुदैवानें ते अगदीं क्वचित् व फारच लहान क्षेत्रफळावर घडून येतात.

भूकंपाचीं कारणें–भूकंपांचीं खरीं कारणें शास्त्रज्ञांसहि अद्याप तितकीशीं चांगलीं समजलेलीं नाहींत. ते मुख्यतः दोन कारणें देऊं शकतात. पहिलें कारण ज्वालामुखीचा स्फोट. ज्या प्रदेशांत ज्वालामुखी आहेत त्या प्रदेशांत अथवा जेथें ते कांहीं काळ सुप्त राहून वारंवार जागे होतात तेथें ज्वालामुखीचा स्फोट होण्यापूर्वी अगर कित्येक वेळीं तो झाल्यानंतरहि भूकंपाचे धक्के बसतात. पृथ्वीच्या गर्भांतील कढत रस बाहेर येण्यास धडपड करूं लागतो. पृथ्वीवर कवच अधु अथवा निःशक्त (faulty) असल्यास त्यास फोडून हा रस ज्वालामुखीचे रूपानें बाहेर पडतो. पण जेथें कवच घट्ट असतें व त्यावरील दाब कमी झालेला नसतो तेथें रस बाहेर पडूं शकत नाहीं व त्यामुळें भूकंपाचे धक्के बसतात. (भाग २ रा पान ७९१ पहा.) दुसरें कारण असें, पृथ्वीची उष्णता दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. यामुळें तिचे भाग आकुंचन पावतात. पृष्ठभाग अथवा भूगर्भ आकुंचन पावूं लागला कीं त्यामुळें उत्पन्न झालेल्या वेगामुळें (Force of Contraction) पृथ्वीचे कांहीं भाग खचतात तर कांहीं भाग वर येतात. यामुळें गर्भांतील खडकांवरचा दाब कमी होतो. ते खडक तापतात, वितळतात व हालूं लागतात. त्यामुळें भूकंप होतात. भाग जेथें वर जातात तेथें अगर त्याचे आसपास भूकवच हादरतें, फाटतें अगर खचतें. त्यास भेगा



सिस्मोग्राफ (Seismograph)—भूकंप नोंदणारें यंत्र.

१ नळकांड्यावर साफ बसविलेला कागद (हें नळकांडें ठराविक वेगानें स्वतःभोंवतीं सारखें फिरतें.)

२ कंपरेखा उमटविणारी पेन्सिल. ही पेन्सिल ३ आकड्यानें दाखविलेल्या चौकटीला जोडलेली असते.

३ ही चौकट (Steady body) जमिनींत घट्ट रोवलेल्या खांबाला घट्ट बसविलेली असते. ही चौकट पृथ्वीचा पृष्ठभाग हादरतांनाही स्थिर राहण्याचीच व्यवस्था केलेली असते.

४ भूकंपाचे धक्के अशा रेखांनीं सिस्मोग्राफ नळकांड्यावरील कागदावर रेखतें.

पडून त्यांतून समुद्राचें पाणी आंत शिरतें. भूगर्भांतील उष्णतेमुळें हें पाणी तापून त्याची वाफ होते व तिच्या नैसर्गिक वेगामुळें ती वर येऊं लागली असतां स्फोट होऊन धरणीकंप होतात.

भूकंपाचे परिणाम—धरणीकंपाचे वेळीं बहुधा गाडीच्या चाकांनीं होणाऱ्या गुडगुड आवाजाप्रमाणें किंवा तोफेच्या कडकडाटाप्रमाणें आवाज होतो. धरणी कंपाचा धक्का जेव्हां अगदीं लहान असतो तेव्हां जमीन थोडीशी हादरल्यासारखी होते. घरांतील भांडीं, तसबिरा, बाटल्या कोलमडून खालीं पडतात. पण धक्का मोठा असेल तर जमीन दुभंगते, तिला भेगा किंवा घळी पडतात व त्यांत शहरें, जलप्रवाह, लहान-मोठीं बेटें गडप होतात. कांहीं ठिकाणीं घळी नाहींशा होतात, नवीन झरे उत्पन्न होतात व समुद्रांत बेटें वर येतात. धरणीकंप समुद्रांत झाल्यास समुद्राचा क्षोभ होऊन मोठमोठ्या लाटा उत्पन्न होतात. समुद्राचें पाणी प्रथम किनाऱ्यापासून समुद्राकडे जोरानें जातें व नंतर समुद्राकडून जोरानें प्रचंड लाटा किनाऱ्यावर लांबपर्यंत जातात. किनाऱ्यावरील जहाजें यामुळें कित्येकदां किनाऱ्यापासून एक मैल आंत जमिनीवर येऊन पडतात. लिस्बनच्या (१७५५) धरणीकंपाचे वेळीं सहा फूट उंचीच्या लाटा शहरांत आल्या होत्या. १८१९ च्या कच्छ येथील धरणीकंपामुळें सुमारें २००० चौ. मैल जमीन १२ ते १५ फूट खचली व पाणी आंत शिरल्यानें अंतःसमुद्र तयार झाला. १९०६च्या सॅन फ्रॅन्सिस्कोच्या व १९३० च्या जपानच्या धरणीकंपामुळें शहरांचें, घरांचें व मालमत्तेचें अतोनात नुकसान झालें. १९३४–३५ च्या बिहार प्रांतांतील व क्वेट्टा भागांतील धरणीकंपामुळें शहरांचे भाग जमीनदोस्त झाले व लाखो रुपयांची हानी झाली. एकंदरींत धरणीकंप हानीकारक असले तरी ते ज्या कारणामुळें होतात तीं कारणेंच नाहींशीं झाल्यास त्यायोगें उत्पन्न झालेल्या व होणाऱ्या उपयुक्त गोष्टींसहि आपण पारखे होऊं. वर आलेल्या भागांत उपयुक्त धातू सांपडतात. भाग वर आले नाहींत तर पर्वत उत्पन्न होणार नाहींत व पर्वत नसतील तर सर्व जमीन सपाट राहिल्यानें पाऊस पडणार नाहीं, अरण्यें उत्पन्न होणार नाहींत, नद्या उत्पन्न होणार नाहींत व या सर्वांचे अभावीं पृथ्वीवरील जीवन कष्टमय होईल अथवा नष्टहि होईल.

भूकंपाचीं ठिकाणें—भूकंपाची खोली भूपृष्ठापासून फार खोल असत नाहीं. भूकंप सपाट मैदानावर होत नाहींत. जमिनीस जेथें फार मोठा उतार असतो, तसेंच समुद्राचे लगत, घड्या पडून झालेल्या पर्वतांचे पायथ्याशीं ते विशेष करून होतात. कुराईल बेटें, जपान, ईस्ट इंडीज बेटें, न्यूझीलंड, उत्तर व दक्षिण अमेरिकेचे पॅसिफिक किनारे या भागांत धरणीकंप नेहमीं होतात. जपानमध्यें तर असा एकहि दिवस जात नाहीं कीं, ज्या दिवशीं धरणीकंप होत नाहीं. इटलीपासून पूर्वेस हिमालयाच्या पायथ्यानें ब्रह्मदेशापर्यंत असलेल्या पर्वतांच्या पाणथ्यानेंहि धरणीकंप वारंवार होतात. हिंदुस्थानांत वायव्येकडील प्रदेशांत व आसामांत भूकंपाचे नेहमीं लहान मोठे धक्के बसतात. वरील दोन रांगांच्या ठिकाणांचें कवच अधु असल्यानें हे धरणीकंप होतात.

सिस्मोग्राफ—पृथ्वीच्या पृष्ठभागाबर हादरे बसण्याच्या संभाव्य जागेपासून दूर अंतरावर हें यंत्र

बसवितात. भूकंप झाल्यानंतर बसलेल्या हादऱ्यामुळें रेखांकित खुणा तयार होतात. अशा निरनिराळ्या तीन ठिकाणच्या सिस्मोग्राफवरील आलेखांवरून शास्त्रज्ञ (Seismologist) भूकंप कुठें, केव्हां व कोणत्या स्वरूपाचा झाला हें शोधून काढतात. १८५७ मध्यें हें शास्त्र उदयाला आलें. आजपर्यंतचे प्रख्यात भूकंप कुठें व केव्हां झाले हें खालीं दिलें आहे.

स्थान	वर्ष
पॉम्पी	७९
लिस्बन	१५३१ व १७५५
नेपोलिटन	१८५७
क्राकाटोआ	१८८३
मार्टिनिक	१९०२
सॅन फ्रॅन्सिस्को	१९०६
मेसिना	१९०८
उत्तर व मध्य इटली	१९२०
टोकियो व याकोहामा	१९२३
न्यूझीलंड (नेपियर)	१९३१
कॅलिफोर्निया	१९३३
क्वेट्टा	१९३५

भूषण (१६१४–१७१६):—एक सुप्रसिद्ध कवि. याचा पिता रत्नाकर हा काश्यपगोत्री असून कान्यकुब्ज ब्राह्मण होता. याचें गांव यमुनेच्या उत्तर तीरावरील त्रिविक्रमपूर (तिकमनपूर) होय. मतिराम व चिंतामणी असे याला दोन भाऊ होते. शिवसिंहसरोजमध्यें जटाशंकर नांवाचा तिसरा भाऊ दिला आहे. यांच्या क्रमाबद्दल मतभेद आहे. भूषणाचा जन्म (स.१६१४) मध्यें झाला. हा १७४० पर्यंत जिवन्त असल्याचा पुरावा मिळतो. याचें आडनांव त्रिपाठी असून त्याचा अपभ्रंश तिवारी असा आहे. याला एकंदर तेरा आश्रयदाते होते; ते पुढीलप्रमाणें (१) चित्रकूटचा सोलंकी रुद्रसाहि हृदयराम (हृदयशाहि किंवा हरिहरशाह), (२) रेवानरेश अवधूतसिंह. (३) छत्रपति शाहू, सातारा, (४) कमाऊँ नरेश ज्ञानचंद्र, (५) बाजीराव पेशवा,(६) (चिंतामणि) चिमाजीअप्पा पेशवे, (७) महाराज छत्रसाल बुंदेले, (८) रावराजा बुधसिंह बुंदीनरेश, (९) जयपूरनरेश सवाई जयसिंह, (१०) जहांदरशहा दिल्ली नरेश, (११) भगवंतसिंह खीची असोथरनरेश, (१२) अनिरुद्धसिंह पौरच्चनरेश, (१३) फतहशाहि.

या सर्वांचा काळ निश्चित आहे. बाराव्याचा काळ अज्ञात आहे. यांपैकीं एकहि छत्रपति शिवाजीच्या वेळचा नसून सर्व नंतरचे आहेत. शिवाजी महाराज स्वर्गवासी झाले तेव्हां यांपैकीं फक्त छत्रसाल तीस वर्षांचा हयात होता. यावरून हा सुप्रसिद्ध कवि शिवाजीच्या वेळीं नव्हता ही गोष्ट उघड होते. यानें लिहिलेली शिवबावनी, शिवाजीच्यानंतर शिवाजीचें हिंदुधर्माच्या उद्धाराचें कार्य पाहून आदरानें लिहिली आहे. बावनींत बाजीरावच्या वेळच्या सिरोजप्रकरणाचा निर्देशहि आहे (४६).

याचे ग्रंथ-शिवराजभूषण, भूषणहजारा, भूषणउल्हास, दूषणउल्हास. हिंदी साहित्यसंमेलनानें भूषण ग्रंथावलींत याचें सर्व वाङ्मय प्रसिद्ध केलें आहे. प्रसिद्ध दोहाकार वृंद व शीतल कवि याचे वंशधर म्हणवितात.

भेंडी:— अनुवार्षिक सरळ वाढणारें भाजीचें एक झाड. हें चांगलें वाढल्यास पुरुष उंचीच्याही वर जातें. फळें म्हणजे भेंड्या ६ ते १० इंच लांब असून निरनिराळ्या आकाराच्या असतात. गुळगुळीत व कांहीं तंतुमय केसाळ असतात.

ह्या पिकास समशीतोष्ण हवा चांगली मानवते. अति कडक उन्हाळ्यांत किंवा थंडींत पीक चांगलें येत नाहीं. कोंकणभागांत पावसाळीं ह्याचें पीक चांगलें येतें. थंडीच्या दिवसांत ह्याची वाढ खुंटते.

बहुतेक सर्व ठिकाणीं भेंड्याची लागवड केली जाते. मुंबई प्रांतांत भेंडीखालीं एकंदर ५००० एकर क्षेत्र आहे; त्यांपैकीं खानदेशांत ४० टक्के लागवड होते.

भेंडीस जमीन चांगल्यापैकीं सकस लागते; आणि अशा जमिनींतच उत्तम पीक येतें. ज्या जमिनींत उष्णता भरपूर आहे व सेंद्रिय पदार्थही मुबलक आहेत तेथें झाडें जोरदार वाढून उत्पन्न पुष्कळ मिळतें.

बहुतेक ठिकाणीं मुख्य पीक म्हणून सहसा कोणी भेंडीची लागवड करीत नाहीं. मिश्र पीक म्हणूनच याची लागवड केली जाते. पालेभाजी, मिरची, वांगीं, अननस यांमध्यें भेंडीची लागवड करितात. बी २ ते २॥ फूट अंतरावर पावसाळी लागणीच्या वेळीं पेरतात. उन्हाळ्यांतील लागण साधारण १॥ ते २ फुटांवर करितात. भेंडीचीं रोपें तयार न करितां कायम जागींच बीं पेरतात. एका ठिकाणीं २ बीं पेरतात.

भेंडीमध्यें हळवी व महान अशा दोन जाती आहेत. हळवीं झाडें दीड महिन्यांनीं लागास येतात. महान जातीस दोन महिन्यांनीं फुलें येऊं लागतात. भेंडी कोंवळी असतांनाच ती काढली पाहिजे. जून भेंडीस भाव येत नाहीं. कोंवळया भेंडीचा शेंडा चटकन् मोडतो पण तीच जून झाल्यास तो न मोडतां फक्त लवतो. तोडा एक दिवस आड केल्यास जून भेंडी निघणार नाहीं. बियांकरितां झाडावर लांब, रसरशीत व मोठ्या भेंड्या ठेवाव्या व त्या वाळल्या-नंतर काढून तशाच पुढील हंगामाकरितां बियाणा-करितां ठेवाव्या. भेंडीचें बी ४ वर्षेपर्यंतही चांगलें राहतें. तें रुजण्यास कमी पडत नाहीं.

कांहीं लोक भेंड्या कोणत्या पानापासून फुल-तात ह्यावरून त्यांची जात ठरवितात. जसे सातपानी, नऊपानी, कातर–पानी, ढोबळ–पानी इत्यादि. सात-पानी जात सातव्या पानापासून व नऊ–पानी नवव्या पानापासून फुलूं लागते; म्हणजे सातव्या व नवव्या पानाच्या बगलेंत फुलें येण्यास सुरवात होते. ढोबळ-पानी ही उशिरां येणारी जात आहे. झाड चांगलें व जोरदार झाल्यास, प्रत्येक झाडास ६० पासून ७५ पर्यंतही भेंड्या निघूं शकतात.

भेंडी–भाजी प्रकार १ ला–(ताकांतली)– **साहित्य**–कोंवळ्या भेंड्या, मिरच्या, मीठ, साखर, भुईमुगाच्या दाण्याचें कूट, ताक, कोथिंबीर, तूप, फोडणीचें सामान. **कृति**–भेंड्या धुवूनपुसून कोरड्या करून मग चिराव्यात. नंतर मिरच्यांचे तुकडे घालून तुपाची फोडणी करावी व त्यांत चिरलेल्या भेंड्या घालाव्या. ती भाजी चांगली परतवून घेऊन त्यांत मीठ, साखर, दाण्याचें कूट व ताक घालून पुन्हां शिजवावी. चांगली शिजून आली कीं खालीं उतरून ठेवावी.

(प्रकार २ रा) **साहित्य**-भेंड्या, मिरची, कोथिं-बीर, साखर, ओलें खोबरें, लिंबू. **कृति**-ताकांतल्या भाजीप्रमाणेंच फक्त ह्याच्यांत ताक व दाण्याचें कूट घालावयाचें नाहीं. तेलाच्या फोडणीवर खूप वेळ परतवून ही भाजी करावी. खालीं उतरल्यावर मग थोडा लिंबू पिळावा.

(प्रकार ३ रा) **साहित्य**–भेंडी, चिंच, गूळ, मीठ, तिखट, तीळ, कोथिंबीर, ओलें खोबरें. **कृति**–भेंड्या धुवून पुसून मग चिराव्यात. ओल्या भेंड्या चिरल्या तर भाजी बुळबुळीत होते. मग पातेल्यांत तेलाची फोडणी करून त्याच्यांत भेंड्यांच्या मानानें चिंच कोळून घालावी. पाण्याला उकळी फुटली कीं त्यामध्यें भेंड्या घालाव्यात मग तीळ भाजून घ्यावेत. खोबरें खवणून घ्यावें. नंतर तीळ, खोबरें व कोथिंबीर एकत्र बारीक वाटावी व तो गोळा भेंड्यांत घालून त्याच्यांत चिंचेएवढा गूळ व हवें असेल तेवढें मीठ व तिखट घालून भाजी शिजवावी. चांगली शिजून मऊ झाल्यावर खालीं उतरावी.

(लोणचें) **साहित्य**–भेंडी, मेथी, लिंबू, साखर, मीठ व मिरची. **कृति**–भेंड्यांचे लांब लांब तुकडे चिरावेत. नंतर तेलांत थोडी मेथी परतवून घ्यावी व त्याची पूड करावी. मिरच्यांचे तुकडे करावेत. खोबरें खवणून घ्यावें. मग पातेल्यांत फोडणी करून त्याच्यांत भेंड्या व मिरच्या टाकाव्यात. भेंड्या मऊ झाल्या कीं त्याच्या अजमासें मीठ, मेथीची पूड व खोबरें घालावें. शिजल्यानंतर खालीं उतरून लिंबू पिळावा.

भोपटकर, लक्ष्मण बळवंत (१८८०–):– ग्रंथकार व वर्तमानपत्रकार, सिनियर अॅडव्होकेट, फेड-रल कोर्ट, दिल्ली. यांचा जन्म १८८० च्या मे १० ला झाला. यांनीं १९०४ मध्यें एम्. ए. ची व १९०७ त एल्एल्. बी.ची अशी पदवी घेतली. भाला, लोक-संग्रह, लोकमान्य या पत्रांच्या संपादकाचें कार्य भोपट-करांनीं वेगवेगळया वेळीं १९०५ ते १९२४ च्या मधल्या काळांत कांहीं वेळ केलें. १९२४ मध्यें पुण्यास लॉ कॉलेज स्थापन केलें. ही संस्था सुरू करणाऱ्यापैकीं हे एक प्रमुख होत. सध्यां हे या कॉलेजचे व्हाईस–प्रिन्सिपॉल आहेत. यांनीं आतांपर्यंत स्वराज्य-मीमांसा, मृत्यूच्या मांडीवर, कुस्ती, दांडपट्टा, माझी व्यायामपद्धति, स्त्रियांचे व्यायाम हीं मराठी व कांहीं इंग्रजीं पुस्तकें लिहिलीं. १९३०, १९३२ या वर्षी सत्याग्रहांत तुरुंगवास भोगला. याशिवाय हिंदुसभेतर्फे हैद्राबाद संस्थानांत सत्याग्रहार्थ गेल्याबद्दल १९३९ चे एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यांत औरंगाबादेस अटक झाली व नंतर जुलैंत तात्पुरती व ऑागस्टमध्यें बिनशर्त मुक्तता झाली. पुण्याचें गोगटेप्रकरण, सोन्यामारुती प्रकरण व हिंदुमुसलमानांचे दंगे यांमध्यें त्यांनीं विशेष लक्ष घातलें आहे.

पुण्यांतील अस्पृश्यतानिवारक मंडळ, लोकशाही स्वराज्यपक्ष, पुणें, महाराष्ट्र मंडळ वगैरे संस्थांचे हे कोठें सभासद, कोठें अध्यक्ष, कोठें कार्याध्यक्ष आहेत. केसरी–मराठा संस्थेचे हे एक विश्वस्त आहेत.

म

मकर संक्रांतः–हिंदूंचा महत्त्वाचा सण. या दिवसापासून सूर्य मकरवृत्त ओलांडून कर्कवृत्ताकडे जाऊं लागतो. अर्थात् विषुववृत्ताच्या उत्तरेकडील प्रदेशांत या दिवसापासून उष्णतेचें प्रमाण वाढूं लागतें आणि म्हणूनच या दिवसाला सणाचें महत्त्व प्राप्त झालें आहे. हा सण १४ जानेवारीचे आसपास येतो. विशेष माहिती 'पौष' (पृष्ठ १३०६) या सदराखालीं पाहा.

मक्षिका-भक्षकः–चंचल स्वभावाचा व मोठी नि मधुर शीळ घालणारा पक्षी. चिमणीएवढ्या या पक्ष्याच्या कपाळावरील केस नाकपुड्यांपर्यंत, क्वचित् चोंचीपर्यंत लांब असतात. लांब केस हीच याची खूण. पन्नासपर्यंत या पक्ष्याच्या जाती आपल्या देशांत पाहावयास मिळतात. याचा वरील भागाचा रंग काळा वा पिंगट असून याच्या डोक्यापासून मानेपर्यंत असलेला रुंद पट्टा कपाळापासून निघतो. मक्षिकाभक्षकाचा गळा ठिपकेदार असून कपाळ, पंख, शेपूट व पोट हे अवयव पांढऱ्या रंगाचे असतात. या पक्ष्याची या फांदीवरून त्या फांदीवर एकसारखी हालचाल सुरू असते. हालचालीच्या वेळीं याच्या शेपटीचा पिसारा पसरलेला असतो. एखाद्या झाडाच्या फांदीवर किंवा तारेवर उडणाऱ्या कीटकाची वाट पाहत हा बसतो व कीटक उडाला कीं हा तो पटकन पकडतो. कीटकावरच हा पक्षी जगतो. उन्हाळा व पावसाळा यांच्या संधिकाळांत पेरू, आंबा या वृक्षांच्या खालच्या फांदीवर पेल्याप्रमाणें पण गवताचें कोळ्याच्या जाळीनें मढविलेलें घरटें हा बांधतो व त्यांत दुधासारख्या पांढऱ्या रंगाचीं तीन अंडीं मादी घालते. अंड्यांच्या रुंद शेवटांकडे पिंगट ठिपके असतात. याचें चित्र 'पक्षी' या लेखाच्या आरंभीं दिलें आहे.

मक्काः–अरबस्तानांतील एक शहर, प्राचीन काळचें मकोराबा (Macoraba). सांप्रत तें शहर हेजाझची (Hejaz) राजधानी आहे. तें जेडाच्या पूर्वेला ७० मैलांवर आहे. महंमदाची जन्मभूमि असल्यामुळें अखिल मुसलमानांचें तें मुख्य पवित्र क्षेत्र झालें आहे. तें एका अरुंद दरींत वसलें असून त्याच्या भोंवतालीं टेकड्या आहेत. त्यांतील पुष्कळशीं घरें दगडाचीं असल्यामुळें त्याला एक प्रकारची शोभा दिसते. या शहरांत सर्वांचें लक्ष वेधून घेणारी गोष्ट म्हणजे एल हराम ही प्रचंड मशीद होय. या मशीदींतच काबा दगड असून त्याच्या भोंवतालीं ३०,००० भक्त एकाच वेळीं बसूं शकतील इतकी मोकळी जागा आहे.

एका काळीं मक्का हें व्यापाराची पेठ होतें. पण पुढें तेथें येणाऱ्या यात्रेकरूंना आठवणी सांगणें एवढेंच व्यापारविषयक कार्य राहिलें. सर्व मुसलमानेतरांना या पवित्र शहरांत जाण्यास मज्जाव असला तरी त्या शहराला पुष्कळ ख्रिश्चन प्रवाशांनीं भेट दिली असून सर आर. बर्टन हा त्यांतील एक आहे. त्यानें १८५५ सालीं या शहराच्या आपल्या यात्रेचें वर्णन लिहून ठेविलें आहे. महायुद्धाचे काळीं हुसेन इब्न अली या ग्रँड शेरीफनें तुर्कांच्या विरुद्ध बंड पुकारून १९१६ सालीं त्यांच्याकडून मक्का शहर काबीज केलें. १९२४ च्या ऑक्टोबर महिन्यांत नेज्डच्या सुलतानाला राजा हुसेन याजवर विजय मिळाल्यामुळें मक्का वहिबी लोकांच्या ताब्यांत गेलें. राजा अली आपला बाप हुसेन याच्या पदच्युतीनंतर गादीवर आला. त्यानें पूर्वींच मक्का सोडून जेडा ही आपली राजधानी केली होती. १९२५ च्या डिसेंबरांत तो वहिबी सुलतान इब्नसौदला शरण गेला. त्यानें आपण राजा असल्याचें मक्केंत १९२६ च्या जानेवारींत जाहीर केलें. मक्केची लोकसंख्या ७,०००० आहे. पण हज्जच्या (Haja) वेळीं अथवा यात्रेच्या वेळीं ती १५०,००० अथवा अधिक होते.

मतदानपद्धतिः–सार्वजनिक संस्थांत कार्य करण्याकरितां सामान्यतः गुप्त मतदानपद्धतीचा अवलंब करण्यांत येतो. उमेदवारांच्या वैयक्तिक वजनाची मतदारांना भीति वाटूं नये व लांचलुचपतीचा संभव टळावा म्हणून या पद्धतीचा अवलंब करण्यांत येतो. पूर्वीं मत देतांना लहान गोलकांचा (balls) उपयोग करण्यांत येत असे; यावरून बॅलट हें नांव पडलें. खासगी मंडळाच्या निवडणुकींत अद्यापहि हीच पद्धत योजण्यांत येते. एक काळा गोलक अथवा काळ्या गोलकांची विशिष्ट संख्या वगळलेला उमेदवार दर्शविते. या गुप्त मतदान पद्धतीचा दुसरा प्रकार असाः–उमेदवारांचीं नांवें मतपत्रिकेवर वर्णानुक्रमानें छापण्यांत येतात. मत-



मथुरा–विष्णु घाट

दारानें आपणाला ज्या उमेदवाराला मत द्यावयाचें आहे त्याच्या नांवापुढें × अशी खूण करावयाची असते. हें खुणा करण्याचें काम पोलिंग स्टेशनवरील एका खासगी खोलींत करण्यांत येतें. मतपत्रिकेची घडी करून मतदार ती मतपत्रिकांच्या पेटींत टाकतो. मतें मोजेपर्यंत त्या पेटीकडे कोणीं जावयाचें नसतें. उमेदवारांना पडलेलीं मतें सारखीं असतील तर सरकारी रीत्या छाननी (Scrutiny) होते. अशी छाननी करतांनाच मतपत्रिकेवरील मतदाराच्या रजिस्ट्रेशन नंबरवर पेन्सिलीची खूण करण्यांत येते.

कंपनीच्या सभा, म्युनिसिपालिटीच्या सभा वगैरेतून हात वर करून मतें देण्याची पद्धत आहे.


मत्स्येंद्रनाथ (समाधी सुमारें १२१०):–हा आदिनाथ सांप्रदायाचा प्रवर्तक असून विष्णूचा अवतार समजला जातो. गोरखनाथ याचाच शिष्य होय. हा विक्रम शकापूर्वी सुमारें चारशें वर्षे होऊन गेला. याचा जन्म मत्स्यीच्या पोटीं झाला असून यास बद्रिकाश्रमीं दत्तानें योगमार्गाचा उपदेश केला. यानें सातारा जिल्ह्यांत मत्स्येंद्रगड येथें चैत्र वद्य ५ ला समाधि घेतली. यानें योगमार्गावर 'मत्स्येंद्रसंहिता' नामक ग्रंथ लिहून हटयोग व शाबरी मंत्रतंत्रविद्येचा प्रसार केला. याचा नेपाळांत यात्रोत्सव सात दिवस साजरा होतो (नाथलीलामृत २, भक्तविजय २९).

नाथांच्या बाह्य वेषाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलेलें आढळून येतें.

शैली शृंगी कंथा झोली विभूत लगाया तनमो
कोटि चंद्रका तेज झुलत है चली आपने गतमो।

मथुरा:–हिंदूंचें पवित्र क्षेत्र. भगवान श्रीकृष्णाच्या जन्मामुळें पुनित झालेलें हें प्राचीन शहर दिल्लीपासून ८९ मैलावर व आग्र्याहून ३३ मैलांवर यमुनानदीच्या पश्चिम तीरावर वसलें आहे. तेथें बी. बी. अँड सी. आय. व जी. आय. पी. रेल्वे यांचें जंक्शन आहे.

येथें पुष्कळ सुंदर देवालयें असून त्यांचें बांधकाम अप्रतिम आहे. तीं हिंदी शिल्पकलेचे नमुने म्हणून



मथुरा:—१. यमुनेच्या कांठीं
२. एक साधु पुरुष
३. सतीचा मनोरा.

मानलीं गेलीं असून प्रेक्षणीय आहेत. त्यांत द्वारकाधीश, देवकी, श्रीनाथजी, मथुरेशजी, गोवर्धनजी, केशवदेव वगैरे प्रमुख आहेत. जुने वाडे व म्यूझियम पाहाण्यासारखी आहेत.

येथें फाल्गुन महिन्यांत होळी पौर्णिमेदिवशीं, श्रावण महिन्यांत हिंदोला व जन्माष्टमी, अश्विन व कार्तिक महिन्यांत दीपमालिका व यमद्वितीया असे उत्सव होतात. श्रीकृष्ण हें हिंदूंचें एक महत्वाचें दैवत असल्यामुळें व कृष्णाच्या बाललीला पराक्रम याच ठिकाणीं गाजल्यामुळें हें स्थान सर्व हिंदूंना अत्यंत पवित्र वाटतें. या शहरांत यात्रेकरूंची नेहमीं गर्दी असते. यमुनेचें विशाल वाळवंट, कांठचीं मंदिरें व घाट, व सतत चाललेला यमुनेचा व कृष्णाचा घोष यामुळें भाविक हिंदूंचें अंतःकरण उचंबळून येतें.

मद्रास:–हें हिंदुस्थानांतील तिसरें मोठें शहर. याची लोकसंख्या ६४७,२३० आहे. येथें शिल्पकलेच्या दृष्टीनें सुंदर इमारती, किल्ल्यांसारखीं ऐतिहासिक स्थळें, सरकारी कचेऱ्या व व्यापारी पेढ्या पाहण्यासारख्या आहेत.

जॉर्ज टाऊन ही येथील व्यापारपेठ; हिचें क्षेत्र एक चौरस मैल असून लोकवस्ती दाट आहे. येथें बँका, कस्टम्स हाऊस, हायकोर्ट व व्यापाऱ्यांच्या कचेऱ्या आहेत; यापैकीं कांहीं इमारती भव्य असून समुद्राभिमुख आहेत.

जॉर्ज टाऊनच्या दक्षिणेस लगतच न्यायमंदिरें व दीपस्तंभ हीं आहेत. यांच्या दक्षिणेस फोर्ट सेंट् जॉर्ज हा किल्ला आहे.

माऊंट रोड हा मद्रासेंतील मुख्य रस्ता फोर्ट-पासून सेंट टॉमस माऊंटपर्यंत गेलेला आहे. पुष्कळशीं महत्त्वाचीं दुकानें याच रस्त्यावर आहेत. गव्हमेंट हाऊस याच रस्त्यावर किल्ल्यापासून एक मैलाच्या अंतरावर आहे; हें एका विस्तीर्ण विहारभूमींत (Park) आहे; येथें प्रतिवर्षी हिंवाळ्यांतील कांहीं दिवस मद्रासचा गव्हर्नर राहतो. गव्हमेंट हाऊसचे नजीकच एक मेजवानी देण्याचा स्वतंत्र दिवाणखाना (बँक्वेटिंग हॉल) आहे.

शहराच्या दक्षिणेकडील समुद्रकिनाऱ्याला मरिना म्हणतात. फोर्टकडून तिकडे जाण्याकरितां पूल ओलांडावा लागतो. या किनाऱ्यावर पुष्कळशा सुंदर इमारती आहेत. त्यांत सन १८७९ सालीं बांधलेलें मद्रास युनिव्हर्सिटीचें सीनेट हाऊस, बोर्ड ऑफ रेव्हिन्यूचें ऑफीस असलेला चीपॉक पॅलेस; प्रेसिडेन्सी कॉलेज व क्वीन मेरीज कॉलेज फॉर वुइमेन, या इमारती प्रमुख होत. पन्थेयॉन रोडवर गव्हमेंट म्यूझियम, व्हिक्टोरीया मेमोरियल हॉल, स्त्रियांचें व मुलांचें रुग्णालय या संस्था आहेत.

सेंट जॉर्जेस कॅथेड्रल, रोमन कॅथॉलिक कॅथेड्रल, सेंट मेरीज कॅथेड्रल हीं प्रमुख चर्चेस आहेत. सेंट मेरीज चर्च हें मद्रासचें इतिहासप्रसिद्ध चर्च आहे. हें सन १६३० सालीं बांधून संपलें. हें हिंदुस्थानांतील पहिलें इंग्लिश चर्च व मद्रास इलाख्यांतील सर्वांत जुनें प्रॉटेस्टंट चर्च होय.

मद्रास अँड सदर्न मराठा रेल्वेचें शेवटलें स्टेशन सेंट्रल स्टेशन हें येथें आहे. हें शहराच्या केंद्रस्थानीं आहे. मद्रास अँड सदर्न मराठा कंपनीचीं ऑफिसें सेंट्रल स्टेशन नजीकच्या पार्कटाऊनमध्यें आहेत.

मदुराः—मदुरा हें हिंदूंचें पवित्र क्षेत्र मद्रास शहरापासून ३०९ मैलांवर साऊथ इंडियन रेल्वेच्या मीटर गॉज फाट्यावर आहे. येथें त्रिचनापल्ली जंक्शनवरून जावें लागतें. येथें पुष्कळ मंदिरें व प्रासाद आहेत. हीं मंदिरें सुप्रसिद्ध तिरुमल नाइक यांनीं व त्यांच्या वंशजांनीं सोळाव्या व सतराव्या शतकांत बांधलीं. त्यांत मीनाक्षीचें मंदिर, वसन्त मंडप व सुब्रह्मण्याचें मंदिर हीं प्रमुख होत. मीनाक्षीचें मंदिर शहराच्या मध्यभागीं असून तें मीनाक्षी व सुंदरेश्वर या देवतांचें आहे. वसन्तमंडप मीनाक्षीच्या मंदिरासमोर असून हा तिरुमल नाईकानें देवाचें उन्हाळ्यांतील निवासस्थान म्हणून बांधिला. म्हणून तो तिरुमल नाइकाचा सभामंडप म्हणून ओळखला जातो. सुब्रह्मण्याचें मंदिर मदुरा शहरापासून सहा मैलांवर तिरुपरान कुनराम या टेकडीवर आहे. सुब्रह्मण्यम् हा शंकराचा मुलगा; हाच कार्तिकेय होय.

मदुरा येथील उत्सव मोठ्या प्रमाणावर होतात. यांत चैत्र महिन्यांत होणारा मीनाक्षी व सुंदरेश्वर यांच्या विवाहाचा सोहळा प्रमुख होय; हा सोहळा बारा दिवस चालतो. याशिवाय प्रतिमासीं सुब्रह्मण्यमूच्या देवळांत क्रिथिकाई उत्सव होतो.

मधः—मध हा अत्यंत औषधी जिन्नस असून त्याचा डॉक्टर व वैद्य लोक निरनिराळ्या रोगांवर उपयोग करतात. कफ झाला असल्यास व त्यामुळें तोंडास चिकटा येत असल्यास आल्याचा रस व मध वरचेवर चाटावा. आजारांत ज्यावेळीं जीभ घाण होते त्यावेळीं नुसत्या मधाचा 'ग्लिसरीन बोऱ्याक्स' सारखा उपयोग करतात. त्यानें जीभ स्वच्छ होते. तोंड आलें असतां मध व पाणी ह्यांचें मिश्रण करून त्याच्या वरचेवर गुळण्या कराव्या. व्रणास मधाची पट्टी वैद्यलोक लावतात. मध व पाणी रोज सकाळीं प्यालें असतां शौचास साफ होतें. हा खाण्यानें भूकही वाढते.

मधमाशाः—कातड्यासारखे पंख असलेल्या चार पंखाच्या चावऱ्या कीटकांच्या ज्या अनेक जाती आहेत त्यांतील एक जात. कीटकस्थितींतील आपल्या अपत्यांच्या संगोपनार्थ उपयोगी अशा अन्नाचा भरपूर सांठा त्या करून ठेवतात. मधमाशांच्या या गुणाचें गान सर्व काळच्या कवींनीं व नीतिशास्त्रवेत्त्यांनीं केलें आहे. मधमाशा समाजोपयुक्त आहेत. मधमाशीमुळें आम्हांला मध व मेण हीं मिळतात.

मधाच्या पोळ्यांत तीन प्रकारचे प्राणी राहातात. त्यांतील राणीमाशी ही एकटीच बहुप्रसव मादी असते. तिच्यामुळेंच मधमाशांच्या जमातीची संतती वाढते. ती आकारानें इतर मधमाशांहून मोठी असते; तिचे पंख आखुड असतात, खालचा पोट वगैरे भाग पिवळा असतो. कामकरी माशांना जसें मेण बाहेर टाकण्याचें द्वार असतें तसें राणीमाशीला नसतें. त्याचप्रमाणें तिला कामकरी माशांप्रमाणें परागकोश नसतो.

नराचें काम राणीमाशीला गाभविणें एवढेंच आहे. नर काम करीत नाहींत. पण कामकरी माशा पुरवितील त्या मधावर आपली उपजीविका करतात. चांगल्या हवेंत ते फुलांत झोपलेले असतात; त्यांचा आकार काम-



मद्रास.

१. सेंट्रल स्टेशन २. एक रस्ता ३. माउंट रोड ४. हायकोर्ट ५. जनरल पोस्ट ऑफिस.

कऱ्यांच्या आकाराहून मोठा असतो; बांधा जड, डोळे मोठे असून नांगी नसते. त्यांचें जीवितकार्य संपलें कीं कामकरी माशा त्यांना शरदृतूंत ठार मारतात अथवा पोळ्यांतून हाकलतात.

कामकरी माशांचाच मोठा भरणा मधमाशांच्या जमातींत असतो. त्या वंध्या असतात. त्यांच्यावरच पोळ्यांतील सर्व कामाची जबाबदारी असते. त्यांचें आयुर्मान सरासरीनें सहा आठवडे असतें. पण हिवाळ्यांत ज्या सुस्त पडून राहतात त्यांचें आयुर्मान थोडें अधिक असतें. राणीमाशी सामान्यतः तीन ऋतूपर्यंत जगते.

मधुभक्षकः—मधावर जगणारा पक्षी. चिमणीपेक्षां जरा लहान असलेल्या या प्राण्याची चोंच लांब, किंचित्



मधुभक्षक

बांकडी व टोकाला सुईप्रमाणें तीक्ष्ण असते. याची जीभ लांब व नळीप्रमाणेंच असून याचे पाय लांब असतात. उंच भराऱ्या मारण्यास उपयोगीं असे याचे जरी पंख असले तरी पण ते साधारणच असतात. मधुभक्षक पक्ष्याच्या जोडप्यापैकीं नर डोक्यापासून पायापर्यंत गडद जांभळा रंग असलेला, तर मादी वरून पिंगट व खालून पिवळया रंगाची असते. याच्याकडे सहज दृष्टिक्षेप केला तरीदेखील रंगारूपानें सुंदर पक्ष्यांतच याची गणना करावयास कोणी ना म्हणणार नाहीं. याचा आवाज सुंदर तर आहे; हा पक्षी जानेवारीपासून जुलैपर्यंतच्या कालांत फार सुंदर गातो. फूल लहान व नाजूक असेल तर त्यावर घिरट्या घालीत घालीत त्यांतील मध खातो. तसेंच जर फूल मोठें दिसलें तर हा त्याला भोंक पाडून त्यामधून आपला मध मिळवितो. मधाविना हा पक्षी कांहींच खात नाहीं आणि म्हणूनच त्याचें नांवदेखील सार्थच पडलें असें म्हणावें लागतें. सातभाईप्रमाणेंच याची मादी झाडाच्या खालीं घरटें करते व त्यांत एप्रिल मेमध्यें दोनतीन पांढरीं अंडीं घालते. घरटें बांधण्यापासून अंडीं उबवण्यापर्यंतचीं सारीं कामें मादीच करते.

मधुमेह:—या विकारांत अन्नांतील पिष्टमय व शर्करा हे घटक (ज्यांना 'कार्बोहायड्रेट्स' म्हणतात) पचून त्यांचा योग्य विनियोग होण्याची क्रिया बिघडते व न पचलेली शर्करा रक्तांत सांठते. रक्ताचा विशिष्ट 'अल्क'पणा त्यामुळें कमी होतो; इतका कीं तें जवळ जवळ 'आम्ल' बनून मधुमेहांत शेवटीं बेशुद्धपणा येऊन मृत्यु घडतो. रक्तांतील साखर जास्त वाढूं नये यासाठीं ती मूत्रांतून शक्य तितकी बाहेर टाकून देण्याचा प्रयत्न निसर्गाकडून केला जातो. ही लघवींतील साखर हेंच मधुमेहाचें—डायाबीटिस्चें—प्रमुख लक्षण होय.

निरोगी स्थितींत रक्तांतील सर्व साखरेचा विनियोग उष्णता व शक्ति निर्माण करण्याकडे होत असतो व हें कार्य ज्या विशिष्ट द्रव्याकडून केलें जातें तें द्रव्य पोटांतील 'पॅंक्रिआज्' (स्वादुपिंड) या ग्रंथींचा अंतःस्राव होय असें शास्त्रज्ञांनीं शोधाअंतीं निश्चित केलें आहे. म्हणून हा रासायनिक स्वरूपाचा, शर्करापाचक अंतःस्राव जेव्हां कमी पडतो तेव्हां मधुमेह होतो, असें म्हणतां येईल. हा अंतःस्राव प्रथम १९२२ सालीं टॉरंटो युनिव्हर्सिटीचे डॉक्टर्स बॅंटिंग व बेस्ट् यांनीं पॅंक्रिआज् ग्रंथीपासून विभक्त करून दाखविला व त्या द्रव्यास 'इन्शुलिन्' हें नांव दिलें. हें 'इन्शुलिन्' इंजेक्शननें अंगांत घातल्यास रक्तांतील व लघवींतील शर्करा कमी करतां येते. अशा प्रकारें इन्शुलियन् इंजेक्शन जितके दिवस चालू ठेवावें तितके दिवस मधुमेहास प्रतिबंध करतां येतो. मात्र इंजेक्शनें थांबवितांच रक्तांत व लघवींत पुनः शर्करा येऊं लागते. स्वादुपिंड ग्रंथी वाळवून तिच्या वड्या केलेल्या मिळतात त्यांतहि इन्शुलिन् असतें व त्या पोटांत घेऊनहि मधुमेहास प्रतिबंध होतो.

मधुमेह हा पचनशक्तीचा विकार असल्यानें आहारांतील पिष्टमय पदार्थांचें प्रमाण नियंत्रित करणें आवश्यक असतें. रक्तांतील 'आम्ल' गुण कमी व्हावा व कमींत कमी किती पिष्टमय पदार्थ पचूं शकतो हें कळावें म्हणून आजाऱ्यास फक्त हिरवा भाजीपाला उकळून शिजवून व कांहीं तसाच असा तीन दिवस देणेंत यावा. पाणी मात्र वाटेल तेवढें पिण्यास द्यावें. लघवींतील साखर जर या आहारानें तीन दिवसांत कमी झाली नाहीं तर आणखी कांहीं दिवस, तसें होईपर्यंत तो चालू ठेवावा. नंतर आहारांत भात किंवा बटाटे फक्त अर्धा किंवा एकच औंस इतक्या प्रमाणांत देऊन लघवींत साखर येते कीं काय पहावें व तशी न

आल्यास पिष्टमय पदार्थांचें प्रमाण थोडें थोडें वाढवावें. इतकें कीं त्याहून जास्त घेतल्यास लगेच लघवींत साखर येऊं लागते. त्यावेळीं पिष्टमय पदार्थांचें प्रमाण ½ करावें व तेंच १ आठवडाभर चालू ठेवावें व पुन्हां प्रमाण किंचित् वाढवून पहावें. या मुदतींत भाजीपाला वाटेल तेवढा देणेस हरकत नाहीं. पुनः साखर येऊं लागतांच प्रमाण पुनः ½ करावें. अशा प्रकारें साखर न येऊं देतां किती पिठूळ पदार्थ पचतो त्याची मर्यादा कळते व त्या मर्यादेंतच आहार ठेवावा. अंडीं, दहीं, साय काढलेलें दूध, थोडें लोणी, थोडी चपाती, द्विदल धान्यें, भुईमुगाचे दाणे हे जिन्नस आहारांत थोडथोडे घेणेस हरकत नाहीं. गोड पदार्थ किंवा गोड फळें देतां कामा नयेत. मांसानें रक्ताम्लता वाढण्याचा संभव असल्यानें तें देऊं नये. मद्य व तंबाकू हेंहि वर्ज्य समजावें. आठवड्यांतून एक दिवस उपास करावाच. कोठाहि नियमित साफ ठेवावा.

अशा प्रकारें वर्ष दोन वर्षें पथ्य चालू ठेवल्यास स्वादुपिंडाची शक्ति पुनः येण्याचा संभव असतो. स्वादुपिंडाची अंतःस्रावनिर्मितीची शक्ति पुनः येण्यासारखी नसल्यास मात्र हें पथ्य कायमचें चालू ठेवणें भाग आहे; व त्याच वेळीं स्वादुपिंडाच्या अर्काच्या वड्या पोटांत घेणें किंवा इंजेक्शननें इन्सुलिन् घेणें हेंहि चालू ठेवणें आवश्यक असतें.

आयुर्वेदिक उपाय—बेलाच्या झाडाचीं पानें काढून त्यांच्या शिरा काढून टाकाव्या. नंतर तीं पानें धुऊन ठेंचून त्यांचा रस काढावा. तो तुपाच्या वाटीभर घेऊन त्यांत हरभऱ्याच्या डाळीइतकी जिऱ्याची पूड व चहाचा चमचाभर मध घालून मग रस घ्यावा. असें सकाळ संध्याकाळ करावें.

मध्वाचार्य (जन्म स. ११९९—बदरिकाश्रमप्रमाण स. १२७८):—द्वैतमताचे प्रख्यात आचार्य. यांचा पिता—मध्यगेह व माता वेदवती. जन्मस्थल—उडुपीजवळ (पाजकक्षेत्र). सध्यां तें स्थळ बेल्ली या नांवानें प्रसिद्ध आहे. यांचे गुरु अच्युत—प्रेक्षाचार्य होत. यांनीं अध्ययन संपविल्यावर गृहस्थाश्रम न स्वीकारतां एकदमच संन्यास घेतलेला दिसतो. यांनीं हिंदुस्थानांत अनेक वेळां प्रवास करून आपल्या वैष्णव मताचा प्रचार केला.

मध्व असा स्वतंत्र शब्द संस्कृतांत नाहीं. पण यांच्या नांवामुळेंच त्याला संस्कृतांत स्थान प्राप्त झालें आहे. यांच्या मतें स्वतंत्र व अस्वतंत्र अशीं दोन तत्त्वें आहेत. भगवान् विष्णु हा स्वतंत्र असून तो सर्व सद्गुणांनीं मंडित व दोषरहित आहे; तदितर सर्व अस्वतंत्र आहेत. जीवेश्वर भेद, जडेश्वर भेद, जीवजीव भेद, जीवजड भेद, जडाजड भेद असे पांच प्रकारचे भेद यानें मानले आहेत.

सच्चिदानंदस्वरूपी परमात्मा हा या सर्व जगाचें मूळ कारण असून तो अंतर्यामीं स्वरूपानें सर्व वस्तूंमध्यें राहतो. तो केवळ सुखाचाच तेवढा उपभोग घेतो, दुःखाचा त्याला स्पर्शदेखील होत नाहीं. परमात्मा व जीव यांमध्यें मोक्षावस्थेंतदेखील कधींच अभेद होत नाहीं. जो दिसतो तो केवळ भ्रम होय. मोक्षावस्थेमध्यें जीवाला मुळींच दुःख होत नाहीं. या अवस्थेमध्यें त्याला क्रीडादि अनेक प्रकारचीं सुखें उपभोगितां येतात. पण परमात्म्याची जीं लक्ष्मी, श्रीवत्स व जगदुत्पादक शक्ति हीं तीन वैभवें तीं मात्र जीवाला प्राप्त करून घेतां येत नाहींत. सर्व जीवांना सारखीच मुक्तावस्था मिळत नाहीं. जीव हा ज्ञाता आहे तरी त्याचें ज्ञान मर्यादित आहे. मोक्षप्राप्तीसाठीं जीवानें परमात्म्याची अंकन (विष्णुचिन्हें अंगावर डागून घेणें), नामकरण व भजन या तीन प्रकारांनीं सेवा केली पाहिजे. श्रीविष्णूच्या ज्ञानाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि साधनानें मोक्षाची प्राप्ती होत नाहीं. जीव हा सांश व निरंश आहे. या जगाची उत्पत्ति नित्य परमाणूपासून होते. सर्व गुणांनीं युक्त अशा विष्णूच्या ज्ञानानें आपलीं सांसारिक दुःखें नाहींशीं करून जीवानें श्रीविष्णूच्या समीप आनंदानें वास करणें हाच मोक्ष होय. जग हें पारमार्थिक दृष्ट्या सत्य आहे, असें यांचें मत होतें.

भक्तिमार्गाच्या विष्णु—लक्ष्मी—ब्रह्म—वायु या चार संप्रदायांपैकीं हा एक संप्रदाय आहे. या पंथांत विष्णूच्या खालोखाल वायूला महत्त्व समजलें आहे. रामाचा जसा हनुमान तसा कृष्णाचा वायुपुत्र भीम (अर्जुन नव्हे) हा सखा होय. मध्वांच्या धर्मग्रंथांतून महाभारतांत वर्णिलेलीं भीमाचीं अनेक अचाट कृत्यें सोडून त्यानें मणिमत् राक्षसाला मारिलें (वनपर्व) हें एवढेंच त्याचें कृत्य महत्त्वाचें गणिलें आहे. यांचे ग्रंथ—

१ गीताभाष्य, २ ब्रह्मसूत्रभाष्य, ३ अणुभाष्य, ४ अनुव्याख्यान, ५ प्रमाणलक्षण, ६ कथालक्षण, ७ उपाधिखंडन, ८ मायावादखंडन, ९ प्रपंच मिथ्यात्वानुमानखंडन, १० तत्त्वसंख्यान, ११ तत्त्वविवेक, १२ तत्त्वोद्योत,

१३ कर्मनिर्णय, १४ विष्णु तत्त्वनिर्णय, १५ ऋगभाष्य (पहिल्या चार अध्यायांवर), १६ दशोपनिषद् भाष्य, १७ गीतातात्पर्य निर्णय, १८ भारततात्पर्य निर्णय, १९ भागवततात्पर्य निर्णय, २० संन्यायविवृत्ति, २१ नरसिंह नखस्तोत्र, २२ द्वादशस्तोत्र, २३ कृष्णामृत महार्णवम्, २४ सदाचारस्मृति, २५ तंत्रसार, २६ यतिप्रणवकल्प, २७ जयंती निर्णय, २८ यमकभारत. हे सर्व ग्रंथ संस्कृतांत आहेत.

मनुका:–बी असलेलीं व वाळलेलीं द्राक्षें म्हणजे मनुका. हीं औषधी व पुष्टिदायक आहेत. शौचास साफ होत नसेल तर रात्रीं निजतांना मूठभर चावून खावून वर पाणी पिऊन निजावें म्हणजे शौचास साफ होतें. खोकला येत असून तो नीट सुटत नसल्यास नेहमीं तोंडांत मनुका धराव्यात. कफ सुटतो. घशाशीं खवखवून खोकला येत असल्यास तोंडांत मनुका, कात व खडीसाखर हे पदार्थ धरावेत. चांगला गुण येतो असा अनुभव आहे. क्षयी माणसानें शक्ति येण्यासाठीं मनुका खाव्या. ह्यांचें सार आजारी माणसास देतात.

सार करण्याची रीत–प्रथम मनुका पाण्यांत भिजत घालाव्या. अर्ध्या तासानें त्या चांगल्या कोळून त्याचें पाणी घ्यावें. नंतर त्याच्या रुचीपुरतें सैंधव, जिरें व थोडी मिरपूड लावावी. हें सार अपायकारक नसून तोंडाला रुचि आणणारें आहे.

मनुष्य:–मनुष्य हा प्राणीसृष्टींतील अत्यंत इंद्रियसंपन्न प्राणी. मनुष्यप्राण्याची इतर प्राण्यांपासून पृथगात्मकता दाखविण्याचे आजवर अनेक प्रयत्न शास्त्रज्ञांकडून झाले. गोरिला, चिंपन्झी, ओरांग या वानरांचे मानवाशीं शारीरदृष्ट्या साम्य असल्याचें आधुनिक शास्त्रज्ञांना आढळून आलें आहे. परंतु बुद्धि या ईश्वरदत्त देणगीच्या बाबतींत वानरांतील सर्वश्रेष्ठ जातहि मनुष्याची बरोबरी करूं शकत नाहीं; या बाबतींत मनुष्य वानराहून वेगळा आहे; याशिवाय पुढील बाबतींत मनुष्याचा वानराहून वेगळेपणा आहे. मनुष्य आपल्या पायावर ताठ उभा राहून चालतो; हातांचा उपयोग चालण्याच्या कामीं करीत नाहीं; त्यांचा उपयोग फक्त वस्तू घेणें व धरून ठेवणें एवढ्याच बाबतींत करतो. त्याच्या तोंडाचीं हाडें पुढें आलेलीं नसतात, तीं डोकीच्या खालीं असतात. त्याच्या मेंदूची शक्ति दुसऱ्या कोणत्याहि प्राण्याच्यापेक्षां जास्त आहे; त्याच्या मेंदूच्या पृष्ठभागावर अनेक वळ्या आहेत. त्याचे दांत एकमेकास लागून असतात. शरीराच्या मर्यादित भागावरच केस असतात. याखेरीज दुसरे बारीक सारीक भेद आहेत.

मनुष्याला युक्तिवाद करण्याची शक्ति असून त्याला बरें व वाईट, न्याय्य व अन्याय्य यांतील भेद समजतो. तो स्पष्टपणें बोलून आपलें मनोगत व्यक्त करूं शकतो. ही शक्ति दुसऱ्या कोणत्याहि प्राण्यांना नाहीं.

मनुष्यप्राण्याची उत्पत्ति कशी झाली व तो पृथ्वीचे निरनिराळे भाग व्यापून कसा राहिला या प्रश्नांचा कोणालाहि निर्णय करतां आला नाहीं. डार्विनची अशी श्रद्धा होती कीं एकाकाळीं अस्तित्वांत असलेल्या व आज नामशेष झालेल्या मानवसदृश वानरापासून मानव उत्क्रान्त झालेला आहे व आज अस्तित्वांत असलेले सर्व मानववंश मूळ एकाच वंशांतील होत. वॅलेसचा डार्विनच्या तत्त्वावर अंशतः विश्वास आहे; पण त्याचें म्हणणें असें कीं विधात्यानें मानवाला सर्वश्रेष्ठ व सर्वांवर अधिकार चालविणारी बुद्धिमत्ता दिली आहे. दुसऱ्या थोर शास्त्रज्ञांचें मत असें कीं मानववंश हा स्वतंत्रपणें उत्पन्न झाला आहे; अमूक एका वंशापासून त्याची उत्पत्ती झालेली नाहीं; त्याचें मन अगर आत्मा ही अतिमानुष शक्तीकडून निर्माण झालीं हें वॅलेसचें म्हणणें खोटें आहे.

मनुस्मृति:–या सुप्रसिद्ध ग्रंथाच्या निर्मितीचा काल इसवी सनापूर्वींचें दुसरें शतक व इसवी सनानंतरचें दुसरें शतक यांच्या दरम्यान असावा असें विद्वानांनीं निश्चित केलें आहे. ह्या ग्रंथाचा कर्ता कोण हें सांगणें अशक्य आहे; कारण मनु या नांवाच्या व्यक्ति अनेक असल्यामुळें कोणत्या मनूनें तो लिहिला हा प्रश्न उद्भवतो. ऋग्वेदांत मनु हा मानव जातीचा मूळ पुरुष असल्याचा उल्लेख आहे. एक वैदिक कवि प्रार्थना करितो कीं मनुप्रणीत प्राचीन मार्गापासून आम्ही च्युत होऊं नये. मानव जातीचा मूळ पुरुष स्वायंभुव मनु हा प्रचलित मनुस्मृतीचा कर्ता नव्हे. वरील वैदिक प्रार्थनेंत उल्लेखिलेल्या मनूकडेही या ग्रंथाचें कर्तृत्व देतां येत नाहीं असें संशोधकांनीं ठरविलें आहे. मनुस्मृतींत तीन वेदांचा उल्लेख असून अथर्व वेदाचा अथर्वांगीरसी श्रुति असा निर्देश केला आहे. यावरून मनुस्मृति हा ग्रंथ वेदकालानंतरचा हें उघड आहे. या ग्रंथाच्या कर्त्यानें आपलें नांव ग्रंथांत प्रगट केलें नसल्यामुळें मनुष्यजातीचा आदिपुरुष भगवान्

स्वायंभुव मनु हाच या ग्रंथाचा कर्ता असा सामान्यतः लोकांचा समज आहे. पण तो समज चुकीचा असल्याचें अर्वाचीन संशोधकांनीं सिद्ध केलें आहे. मानव धर्मसूत्रें या अतिप्राचीन धर्मग्रंथाच्या आधारानें मनुस्मृति तयार झाली हें मतहि चुकीचें आहे, असें प्रो. पां. वा. काणे या सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय पंडितानें आपल्या धर्मशास्त्राच्या इतिहासांत साधार प्रतिपादिलें आहे.

मनुस्मृतीचा कर्ता कोणी का असेना हा ग्रंथ सर्व स्मृतिग्रंथांत अग्रगण्य आहे यांत शंका नाहीं. यांत व्यवहारज्ञान ओतप्रोत भरलें आहे. यांतील तत्त्वज्ञान व नीति अत्यंत उच्च आहे. त्यांत सांगितलेले कांहीं आचार सांप्रतच्या परिस्थितींत योग्य वाटत नसले तरी त्यायोगें त्या ग्रंथाचें महत्त्व मुळींच कमी होत नाहीं. कोणत्याहि स्मृतिग्रंथाची योग्यता ठरवितांना तो ज्या कालांत रचला गेला त्या कालाला योग्य असा आचार त्यांत सांगितला आहे कीं नाहीं याचा विचार करावा लागतो. मनुस्मृतींत सांगितलेला आचार व प्रतिपादिलेलीं नीतितत्त्वें तत्कालीन समाजाच्या गरजा लक्षांत घेऊन समाजाची धारणा व्हावी या हेतूनेंच प्रतिपादिलीं आहेत यांत शंका नाहीं. प्राचीन काळच्या समाजाचीं अभ्युदय व निःश्रेयस हीं दोन्ही साधावींत या हेतूनें ज्यांत आचार सांगितला आहे असा आदर्श ग्रंथ म्हणून या ग्रंथाची योग्यता मोठी आहे हे निर्विवाद; म्हणून या दृष्टीनें तरी त्या ग्रंथाचें महत्त्व आपण मानलें पाहिजे. परंतु येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं या ग्रंथाची थोरवी त्याच्या ऐतिहासिक योग्यतेवरच केवळ आधारलेली नाहीं. त्यांतील कित्येक आचार व नीतितत्त्वें आजच्या समाजालाहि प्राचीन काळाइतकींच उपकारक ठरतात हें त्याचें अभिनंदनीय वैशिष्ट्य होय. या ग्रंथाची थोरवी नीत्शेप्रभृति पाश्चात्य पंडितांनींहि मान्य केली आहे.

प्रचलित मनुस्मृतीचे बारा अध्याय असून तिची भाषा साधी व ओघवती आहे. यांतील पहिल्या सहा अध्यायांत चातुर्वर्ण्याचे धर्म, आठ प्रकारचे विवाह, ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे आश्रम, त्या त्या अश्रमाचे धर्म, स्त्रीपुरुषांचे परस्पर संबंध, त्यांचे हक्क व कर्तव्यें इत्यादि विषय आलेले आहेत. सातव्या अध्यायांत राजधर्म सांगितला असून आठव्यांत न्यायदान व कायदा या विषयांचें विवेचन आहे. यांत दिवाणी व फौजदारी कायदा, देणेंघेणें, खतेंपत्रें इत्यादि संबंधीं नियम, सीमावाद निर्णय, साक्षीदार, वारस या विषयांचा परामर्ष घेतला आहे. नवव्या अध्यायांत पतिपत्नींची नैर्बंधिक कर्तव्यें, स्त्रीधन, वारसा इत्यादिविषय आले आहेत. दहाव्यापासून बाराव्या अध्यायापर्यंत पातकें व त्यांचीं प्रायश्चित्तें, कर्मांचा परिणाम, क्षेत्रज्ञ, भूतात्मा, जीव, नरकयातना, सत्त्व, रज, तम, हे त्रिगुण, निःश्रेयस वगैरे विषयांचें विवेचन आहे.

मम्मट (सुमारें ११००):–महाभाष्यप्रदीपकार मम्मट हा मोठा पढिक विद्वान् असून याचें वाचनहि फार विस्तृत होतें असें दिसतें. याचा व्याकरणशास्त्राचा गहन व्यासंग होता. महाभाष्य व वाक्यप्रदीप या ग्रंथांतील वचनें यानें उद्धृत केलीं असून यानें उपमेचे विभाग व्याकरणशास्त्राच्या दृष्टीनें केले आहेत. विभावनेच्या व्याख्येंत क्रिया शब्दहेतु या अर्थानें योजिला आहे. शब्दांच्या जात्यादि संकेतासंबंधानें विवेचन करतांना वैयाकरणांच्या मतांचा अनुवाद केला आहे व वैयाकरण म्हणजेच पंडित असें समीकरण ठरविलें आहे. 'शब्दव्यापारविचार' नांवाचा याचा दुसरा एक ग्रंथ असून तो निर्णयसागरांत अभिधावृत्तिमातृकेबरोबर छापला आहे. या ग्रंथांत काव्यप्रकाशाच्या दुसऱ्या उल्लासांतील अभिधा व लक्षण या शब्दवृत्तींचा विचार अधिक सविस्तर केलेला आहे. सन्मानदर्शक राजानक हें विशेषण याच्या नांवामागें लावण्यांत येतें. हा सगळ्या भारतवर्षांत अत्यंत लोकप्रिय असा साहित्यग्रंथकार झालेला आहे, ही गोष्ट काव्यप्रकाशावरील टीकांच्या प्रचंड संख्येवरून दिसून येते. आजवर काव्यप्रकाशावरील सुमारें सत्तर टीका उपलब्ध झाल्या आहेत. (पां. वा. काणे यांचा साहित्यशास्त्राचा इतिहास.)

मम्मटाच्या हातून काव्यप्रकाश पुरा झाला नाहीं. यानें परिकरालंकारापर्यंतच काव्यप्रकाश रचलेला असून पुढील काव्यप्रकाश अल्लट नांवाच्या कवीनें रचला आहे, असें काव्यप्रकाशावरील माणिक्यचंद्र, सरस्वतीतीर्थ, सोमेश्वर इत्यादि टीकाकारांचें म्हणणें आहे. त्यांत आनंद कवीनीं आपल्या निदर्शना नांवाच्या टीकेंत पुढीलप्रमाणें म्हटलें आहेः 'कृतः श्रीमम्मटचार्यवर्यैः परिकरावधिः। प्रबन्धः पूरितः शेषो विधायाल्लटसूरिणा।" यावरून काव्यप्रकाश हा ग्रंथ यानें

आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धांत रचण्यास प्रारंभ केला असावा.

मलिकंबर (१५४६–१६२६):—अहमदनगरच्या निजामशाहींतील प्रसिद्ध दिवाण. हा हबशी गुलाम असून, याला मीर कासीमनें विकत घेतलें. पुढें हा अहमदनगर येथील चंगीझखानाजवळ गुलाम म्हणून राहिला. हा आपल्या धन्यास नेहमीं खूष ठेवून स्वत: थोडक्यांत समाधान मानीत असे. पुढें हा इब्राहीम आदिलशाहाचे नोकरीस राहिला. पण त्याच्या हाताखालीं गुलामगिरीची वृत्ति सोडून हा राजकारणांत भाग घेऊं लागला व नंतर हा निजामशाहींत गेला. तेथें यानें चांगली कामगिरी केल्यामुळें याला २५० घोड्यांवरील अधिकाऱ्याची जागा मिळाली. पुढें ज्यावेळेस मोगलांनीं अहमदनगरचें राज्य बुडविण्यासाठीं अहमदनगरवर स्वारी केली, त्यावेळेस यानें आपल्या शौर्याच्या व अकलेच्या जोरावर मोगल सरदारांस पळवून लाविलें. अशा प्रकारें हा विजयी झाल्यानंतर सर्व सरदार यास येऊन मिळाले. यावेळीं याच्याजवळ ७००० सैन्य चांगल्या प्रकारचें होतें. पुढें यानें राज्यावर राजा पाहिजे म्हणून बुऱ्हाणशाहाचा नातू शाह अली यास आणून गादीवर बसविलें. दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाशीं दोस्ती राखण्यासाठीं आपल्या मुलाचें (फत्तेखान) लग्न याकूब नांवाच्या त्याच्या गुलामाच्या मुलीशीं केलें. सन १६१४त जहांगीराचा सरदार खानखानानें अहमदनगरच्या सैन्याचा पराभव केला, तेव्हां यानें त्याच्याशीं तह केला. पण पुढें त्यानें आपला गेलेला मुलूख परत मिळविला. यानें मोगल सैन्यावर शहाजी भोसल्याच्या मदतीनें भातवडी येथें फार मोठा जय मिळविला (स. १६२४). त्यामुळें याची कीर्ति चोहोंकडे पसरली गेली; व ह्यामुळेंच याचें वाढतें वर्चस्व सहन न होऊन दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाशीं याचा विरोध आला. पण यानें कशाचीहि पर्वा न करतां आपलें राज्य वाढविण्याचा उद्योग जारीनें सुरू केला. पुढें हा लवकरच मरण पावला (स. १६२६). याच्याच हाताखालीं लुखजी जाधव व शहाजी भोसले उदयास आले.

मल्लीनाथ (सुमारें १४५०):—हा सुप्रसिद्ध टीकाकार पंधराव्या शतकांत झाला असावा. याची टीका खालील ग्रंथांवर आढळते—रघुवंश, किरात, माघ, नैषधीयचरित, मेघदूत, विद्याधरप्रणीत एकावली (टीकानाम तरल). वरदराजकृत तार्किकरक्षेवर मल्लीनाथाची टीका आहे.

मल्हारराव होळकर (१६९३–१७६६):—इंदूर राज्याचा संस्थापक. हा जातीनें धनगर असून पुणें जिल्ह्यांतील ‘होळ’गांवचा (नीरेच्या कांठीं) राहणारा. याचा जन्म ५ एप्रिल १६९३ ला झाला. लहानपणीं बाप वारल्यावर हा आपल्या खानदेशांतील तळोदें या मामाच्या गांवीं राहिला. याची पत्नी गौतमा ही याची मामेबहीण होती.

हा प्रथम बढवाणीकरांकडे चाकरीस होता. नंतर बांड्यांच्या लष्करांत मामा बारगळांच्या वतीनें काम करी. तेथून बाजीरावानें यास आपणाकडे घेतलें.

हा बाजीराव पेशव्याकडे साधारण शिपाई म्हणून लागला आणि पुढें वाढत जाऊन माळव्यांतील चौथाई व सरदेशमुखी गोळा करण्याचें काम पवार व शिंदे यांच्याबरोबर याचेकडे १७२५ मध्यें सोपविण्यांत आलें. मोकासाबाबतींत थोडीशी रक्कम याला १७२८ त तोडून देण्यांत आली.

शिंदे होळकरांची चुरस राणोजीच्या वेळेपासूनच होती. ‘मल्हारराव व राणबा एके जागीं राहात नाहींत.’ असा उल्लेख १७४५ पूर्वीच्या कागदांत आहे. ईश्वरसिंग व माधोसिंग यांच्या प्रकरणांत ती १७४६ मध्यें उघड झाली. पेशव्यांचीहि सत्ता यावर चालत नसे. यानंतर यानें जोधपूरच्या रामसिंगाचें प्रकरण मिटविलें.

दिल्लीच्या सफदरजंग वजीरानें बोलावल्यावरून हा, शिंदे व बादशाही सैन्य यांनीं अन्तर्वेदींत बहादूरखान रोहिल्याचा पूर्ण पराभव २० मार्चला केला. अहमदखान बंगष प्रयागाकडे पळाला होता. तो फरुखाबादेकडे आला. त्यालाहि यानें १९ एप्रिल १७५१ त पिटाळून लावलें.

त्याबद्दल वजीरानें यास तीन कोट रुपये व पंचवीस लक्षांचा मुलुख अंतर्वेदींत देऊं केला. रोहिल्यावर मिळविलेल्या ह्या अपूर्व जयानें मराठ्यांची इभ्रत वाढली व दिल्लींत मराठ्यांचा वचक बसला. तथापि रोहिल्यांचा पुरा मोड झाला नव्हता. पावसाळा संपल्यानंतर पुन्हां लढाईस सुरवात झाली व मार्चमध्यें तह झाला. ९ मार्चास रोहिल्यापासून आठ लाख रुपये घेऊन त्यांचा निम्मा मुलुख मराठ्यांस देण्यांत आला व काशीची सनदहि वजीरानें दिली. १७५३ च्या

जानेवारींतल्या मालकीच्या तहाचे वेळीं हा हजर होता. कुंभेरीला वेढा पडून त्यांत याचा पुत्र खंडेराव मारला गेला. त्यामुळें हा चिडून इरेला पेटला तेव्हां सर्वांनाच त्रास झाला. 'सुरजमल्लाचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन, नाहींतर प्राणत्याग करीन' अशी यानें प्रतिज्ञा केली होती असें भाऊसाहेबाचा बखरकार म्हणतो. मीर शहाबुद्दीनविरुद्ध बादशहा व वजीर हे जाटास मदत करतात असें समजतांच यानें अहमदशाहास कैदेंत टाकून दुसऱ्या आलमगिरास ता. ३ जून १७५४ ला गादीवर बसविलें.

यावेळीं उत्तर हिंदुस्थानांतील प्रमुख राजकारणें याच्या तंत्रानें चालत असत.

यानें गाजीच्या मीर शहाबुद्दीन नांवाच्या मुलास जातीविरुद्ध मदत करून जाटाच्या मदतीस आलेल्या दिल्लीच्या बादशहाचा १७५४ त पराभव केला. तथापि पेशव्यांनीं उत्तर हिंदुस्थानच्या कारभारांत ढवळाढवळ करणें यास पसंत नव्हतें. त्यामुळें पेशव्याविरुद्ध नजीबासारखीं माणसें राखण्याचा यानें प्रयत्न केला. दत्ताजी शिंदे अब्दालीशीं लढत असतां यानें येण्यास उशीर केला. त्यामुळें दत्ताजी पडला. पुढें यानें गंगाधर यशवन्त चंद्रचूडाच्या प्रमुखत्वाखालीं अब्दालीशीं धांवपळीचें युद्ध करण्याचा प्रयत्न केला. पण याला त्यांत यश आलें नाहीं. खुद्द पानपतच्या युद्धाच्या वेळीं भाऊसाहेबांशीं पटत नव्हतें तरी हा त्यांना साहाय्य करीत होता. शेवटीं पळांत हा निघून आला त्यामुळें पुष्कळ लोक वांचले. सदाशिवरावाचीं बायकामुलें सुरक्षित घेऊन जाण्याचें काम याच्यावर सोपविलें होतें असें 'होळकरांची थैली' या सवाई माधवरावाच्या वेळीं लिहिलेल्या बखरींत म्हटलें आहे. १७६६ च्या राघोबाच्या उत्तरेकडील मोहिमेत यानें भाग घेतला होता.

हा व उदाजी यांची बाजीरावावर फारच छाप होती. बाजीराव चिमाजीलाहि यांची मर्जी सांभाळण्याविषयीं लिही. पण बाजीरावानंतर पेशव्यांचें लक्ष आक्रमणापेक्षां सत्तेचें केंद्रीकरण करण्याकडे लागलें. तेव्हां मल्हाररावांसारखीं स्वतःच्या कर्तबगारीवर पुढें आलेलीं माणसें त्यांना जुमानीनात. आणि त्याचें स्वतः सुरक्षित राहण्याचें धोरण त्यांना स्वार्थीपणाचें दिसूं लागलें. वास्तविक मुख्य सत्तेबद्दल आदर ठेवून स्वतःचेंहि आसन स्थिर करण्याकडे याचें धोरण होतें.

हा जाटाच्या पारिपत्याकरितां अलमपुरास (दतिया) आला आणि तेथें यानें वैशाख शु॥ ११ स (मंगळवार) दोनप्रहरीं देह ठेवला. या दिवशीं इंग्रजी तारीख २०–५–१७६६ ही होती. मृत्युसमयीं याचें वय ७३ वर्षांचें होतें. हरकूबाई मागें राहिली. गौतमाबाई आधींच वारली होती. द्वारकाबाई व बजाबाई यांनीं सहगमन केलें. क्रियेस दीडदोन लक्ष रुपये खर्च व्हावयाचा होता असा निर्देश आहे. यास गौतमाबाईपासून खंडेराव नांवाचा एक मुलगा झाला, तो कुंभेरी वेढ्यांत ता. १७–३–१७५४ त गोळी लागून मरण पावला. उदाबाई व सीताबाई अशा दोघी मुली मल्हाररावास असून उदाबाईचें सासर वाघमारे यांजकडे होतें. तुकोजी होळकर यांचा नातलग होता. त्यास यानें हाताखालीं ठेवून वाढविलें. हा तुकोजीच अहल्याबाईच्या वेळच्या मुलुखगिरींत प्रमुख होता.

मलेरिया:—रक्तांतील तांबड्या पेशींत शिरणाऱ्या जंतूमुळें जे ज्वर येतात त्या सर्वांस मलेरिया हेंच सर्वसाधारण नांव आहे. याच आजारास प्रांतपरत्वें अनेक नांवें प्राप्त झालीं आहेत. उदाहरणार्थ—Ague, Marsh fever, Remittent fever, Intermittent fever, Jungle fever, Coast fever वगैरे.

इ. स. १८८० सालीं लॅव्हॅरन् या शास्त्रज्ञानें केलेलें संशोधन व सर पॅट्रिक मॅन्सन् यानें १८९४ सालीं बांधलेलें अनुमान या दोन्ही गोष्टींनीं संशोधनाचें एक नवीन दालन खुलें केलें. जर एक प्रकारचे डांस, मानवी मलेरिया जंतूप्रमाणें असलेल्या जंतूंनीं दूषित झालेल्या पक्ष्यांच्या रक्तावर पोसण्यांत आले तर ते जंतु त्या कीटकाच्या पोटांत जाऊन अशा एका विशिष्ट स्थितीप्रत जाऊन पोचतात कीं त्यामुळें त्या कीटकानें (डांसानें) इतर पक्ष्यांचा चावा घेतांच त्या पक्ष्याच्या रक्तांत ते जंतू तात्काळ जातात. या बाबतींत, मानवी जंतूसंबंधीं पूर्ण संशोधन ग्रॅसि या शास्त्रज्ञानें केलें व बिग्नमि व मार्शियाफॅवा या शास्त्रज्ञांनीं त्यांचेंच पूर्ण समर्थन केलें.

इ. स. १९०० सालीं ओस्टिया येथें मलेरियासंबंधीं चालविलेले प्रयोग अत्यंत महत्त्वाचे ठरले.

मलेरियासंबंधीं काढलेलीं सर्व अनुमानें व गृहीत कृत्यें (Hypotheses) सिद्ध झालीं. त्यावर्षी तीन महिने-पर्यंत डॉ. सँबोन व डॉ. लो व त्यांचे नोकर हे मलेरिया झालेल्या भागांतच राहिले; पण त्यांनीं मलेरियाच्या डांसापासून रक्षण व्हावें यासाठीं दारांना व खिडक्यांना तारांची भक्कम जाळी करून घेतली. दिवसा ते आजूबाजूला वाटेल त्या दिशेला स्वैरपणें फिरत व संध्याकाळ होतांच घरीं परत येऊन व सकाळपर्यंत घराबाहेर पडत नसत. याखेरीज कोणतेंच नियंत्रण त्यांनीं स्वतःवर लादून घेतलें नव्हतें. यामुळें त्यांचे शेजारी इटालियन्स यांना जरी मलेरियाची बाधा झाली तरी डांसापासून सुरक्षित केलेल्या घरामध्यें रहाणाऱ्यांना मलेरियाची बाधा मुळींच झाली नाहीं.

मलेरियाची वाढ विशिष्ट भूक्षेत्रांत होण्यास पुढील कारणें संभवतात—(१) मलेरियाचे जंतू वाहणाऱ्या डांसांची वाढ होण्यास त्या ठिकाणीं अनुकूल परिस्थिति असणें (२) डांसांचे ठिकाणीं मलेरियाचे जंतू वाढीस लागण्याची सुस्थिति असणें (३) व मलेरियाची अगोदरच बाधा झालेलीं अशीं कांहीं माणसें असणें. सामान्यतः विषुववृत्तावर (Equator) मलेरियास अनुकूल अशी परिस्थिति असल्यानें तेथें या रोगाचा फैलाव सर्वांत जास्त आहे. तेथपासून दक्षिण व उत्तर या भागाकडे या रोगाचें प्रमाण कमी कमी होत आलें आहे.

मलेरियाचा फैलाव कालमानाप्रमाणें बदलत गेल्याचें आढळून येतें. पूर्वी Quartan fever हा इंग्लंडमध्यें सर्वसामान्य होऊन बसला होता. गेल्या महायुद्धापासून इंग्लंडमध्यें मलेरिया जवळजवळ नाहींच असें म्हटलें तरी चालेल. आफ्रिका, आशिया, ऑस्ट्रेलेशिया, पोलिनेसिया व मध्य अमेरिका या भागांत तो मोठ्या प्रमाणांत आहे. मलेरियाचा फैलाव संयुक्त संस्थानें (अमेरिका) या भागांत अनेक ठिकाणीं आहे; विशेषतः आग्नेय दिशेस जास्त प्रमाणांत आहे. पॅसिफिक किनाऱ्यावर मात्र मलेरियाची बाधा मुळींच नाहीं. मलेरियाचा उपद्रव रशिया, इटली, सर्व्हिया, हिंदुस्थान, टर्की व ग्रीस या देशांतहि आहे.

खालीं दिलेल्या जंतूपैकीं कोणत्याहि एका जंतूचा प्रवेश मनुष्याच्या रक्तांत झाला कीं त्यास मलेरिया होतो ही गोष्ट आतां शास्त्रसिद्ध झालेली आहे. Plasmodium Malariae, Plasmodium vivax or Laverania Malariae, त्याचप्रमाणें डांसाच्या मादीडांसाच्या चाव्यानेंच मलेरियाचे जंतू मनुष्याच्या शरीरांत प्रविष्ट होतात ही गोष्टही प्रयोगसिद्ध झाली आहे.

मलेरिया ज्यास झाला आहे त्याच्या रक्तांत ज्या प्रकारचा जंतू असेल त्यावर ज्वराचा प्रकार अवलंबून असतो. या प्रत्येक जंतूमागें इतिहास व आनुवंशिक पराक्रम परीवर्तनक्रम असतो, उदाहरणार्थ, Plasmodium Malariae या जंतूमुळें Quartan ज्वर येतो. यांत रोग्यास ताप ७२ तासांनीं येत रहातो; Plasmodium Vivax या ज्वरांत tertian ज्वर येऊन ताप दर ४८ तासांनीं येत रहातो.

Subtertian प्रकारच्या जंतूपासून येणारा ज्वर ४८ किंवा ४८ पेक्षां कमी तासांनीं येतो. या प्रकारचा ज्वर कित्येक प्रसंगीं दर ८ तासांनींहि येत रहातो. त्याच अगर त्याच प्रकारचा जंतू एकापेक्षां अधिक वेळां चावला असतां या मुदतींत विषमता येऊन रोग बळावतो. **लक्षणें**—मलेरियाच्या तापांत पुढें दिलेलीं लक्षणें होतात. डोकें, पाठ व सांधे यांस कळा लागतात; डोळ्यांपुढें अंधेरी येऊन भोंवळ येते. हीं लक्षणें प्रत्यक्ष ताप येण्याच्या पूर्वीचीं होत. प्रत्यक्ष तापाच्या तीन अवस्था सांगतां येतील. पहिली अवस्था थंडीची. या अवस्थेंत अंगावर सडकून कांटा उभारतो, दांतहि थंडीमुळें वाजूं लागतात. दुसरी अवस्था तापाची. रोग्यास सडकून ताप चढतो. तिसरी अवस्था घामाची. अंगास सपाटून ताप येऊन पाद निवतो व एक प्रकारची हुशारी वाटते. यानंतर तापाची पुन्हां येणारी पाळी जंतूच्या एकंदर स्वरूपावर अवलंबून असते. दरम्यानच्या अवधींत या जंतूची संख्या तांबड्या पेशींत (Red Corpuscles) वाढत जाते. सर रेनॉल्ड रॉस् या शास्त्रज्ञानें, मलेरिया होण्यास १५०,०००,००० तरी जंतू आवश्यक आहेत असें लिहिलें आहे. हा प्रत्येक जंतू रक्तांतील तांबडी पेशी नाश करून टाकतो; यामुळें मलेरिया बळावल्यास रक्तक्षय हा रोग होतो असें म्हणतात त्याचें कारण उघड आहे.

मलेरियावर अनेक औषधें निघालीं आहेत; पण कोयनेल हेंच त्यावर रामबाण औषध आहे.

मलेरियाविरुद्ध पद्धतशीर चळवळ करायची म्हणजे डांसाची उत्पत्ति दलदलीच्या ठिकाणीं होते; तीं स्थानें

पाणी व घाण काढून टाकून कोरडीं ठणठणीत राखणें, कोठेंहि पाणी झिरपूं न देणें, विहिरी, हौद वगैरेंना तारांचें वेष्टण घालणें; विहिरीच्या पाण्यांत मासे सोडणें, घरीं मच्छरदाण्या वापरणें वगैरे.

आयुर्वेदिक उपाय—कडू पडवळ, ज्येष्ठमध, कुटकी, नागरमोथे, हिरडेदळ यांचा काढा मध मिसळून घेत जावा किंवा क्विनाईनचें सेवन करावें.

मशीनगनः—आपोआप काडतुसें भरून गोळ्या उडविणारी बंदूक. साध्या बंदुकीला (Rifle) ज्याप्रमाणें गोळी उडविण्यासाठीं नळी असते त्याचप्रमाणें गोळ्या उडविण्यासाठीं मशीनगनमध्यें अनेक नळ्या (barrels) असत. मशीनगनमधील गोळ्यांचा पल्ला (Range) रायफलइतका किंवा तोफांच्या इतका नसल्यामुळें अगदीं जवळच्या अंतरावरच्या लढाईंतच यांचा उपयोग होतो.

मशीनगन शोधून काढण्याचा मान फ्रेंचाना जातो. प्रशियाच्या विरुद्ध झालेल्या लढाईंत त्यांनीं प्रथम मशीनगनचा उपयोग केला. यानंतर मशीनगनच्या यांत्रिक बाबतींत सुधारणा होऊन आज हें शस्त्र पूर्णावस्थेस गेलें आहे.

बंदुकीप्रमाणेंच मशीनगनच्या निरनिराळ्या राष्ट्रांतील कारखानदारांनीं निरनिराळीं नांवे दिलीं आहेत. पैकीं मॅक्झिम (१८८७), हॉचूकिस् (१९१०), व्हिकर्स (१९१४) या विशेष प्रख्यात आहेत. मॅक्झिम प्रथम १८८७ च्या युद्धांत उपयोगांत आली. तीहून सुधारलेले दुसरे दोन प्रकारवर दिलेच आहेत. १८७१ मध्यें गार्डनर नांवाची मशीनगन तयार झाली होती. तिला १,२ किंवा ५ नळ्या (barrels) असत व दर मिनिटास ३५७ गोळ्या तींतून सुटत असत. मशीनगन एकट्या माणसाला चटकन् उचलतां यावी म्हणून तिचें वजन कमी करण्याकडे प्रथम लक्ष देण्यांत आलें. व्हिकर्स मशीनगनचें वजन २८ पौंड होतें.

यानंतर अलीकडे हें वजनहि कमी करण्यांत आलें आहे. शिवाय सर्व भाग हवे त्यावेळीं अगदीं स्वतंत्रपणें निखळून दुसरे लगेच बसवितां येतील अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. अलीकडे तयार झालेल्या बहुतेक सर्व मशीनगन्समध्यें एकच नळी ठेवतात व तींतून दर मिनिटास ४०० ते ६०० गोळ्या सुटतात. एकदां गोळी झाडली कीं मुद्दामहून थांबविल्याशिवाय आपोआप सारख्या गोळ्या उडत राहतात. एक गोळी उडून तींतून निर्माण होणारा गॅस दुसरी गोळी उडवितो व याप्रमानें सतत क्रिया चालू राहते. काडतुसांचे पट्टे काडतुसे भरण्याच्या फटींत लावून ठेवले कीं मग गोळी भरण्याचें काम आपोआप होतें. मशीनगनमधून एकसारख्या २५० फैरी झाडतां येतात. सैनिकाला फक्त नेम धरून मशीनगनचें तोंड फिरवण्याचें व यंत्ररचनेवर लक्ष ठेवण्याचें एवढेंच काम राहतें. १९२१ मध्यें जे. एम्. ब्राउनिंग या अमेरिकन गृहस्थानें आणखी सुधारणा करून त्यापूर्वींच्या सर्व मशीनगन्सच्या दुप्पट अंतराचा वेध घेणारी व दर मिनिटास ७०० गोळ्या झाडणारी मशीनगन तयार केली व तिचे लष्करी परीक्षेंत यशस्वी प्रयोग झाले. बॉम्ब फेकणाऱ्या मशीनगन्सचाहि अलीकडे शोध लागला असून एक ते अडीच पौंड वजनाचे गोळे (shells) किंवा बॉम्ब यांतून फेकले जातात.

मसूरीः—हिंदुस्थानांत जीं कांहीं महत्त्वाचीं थंड हवेचीं ठिकाणें आहेत त्यांपैकीं हें एक आहे. हें ठिकाण संयुक्त प्रांतांतील डेहराडून जिल्ह्यांत, हिमालयाच्या पायथ्याशीं समुद्रसपाटीवर ६००० ते ७५०० फूट उंचीवर वसलेलें आहे. या ठिकाणास इ. स. १८२६ पासून महत्त्व आलें. इ. स. १९०० पर्यंत येथें सहारणपूरहून गाडीमार्गानें लोक येत असत; पण 'हरिद्वार-डेहरा' रेल्वे झाल्यापासून लोकांची रहदारी वाढली आहे.

मस्कती हलवाः—साहित्य—रवा, बदाम, पिस्ते, वेलदोडे, गुलाब-पाणी, तूप, साखर. **माप**—दीड शेर रवा, पाऊण शेर बदाम, पावशेर पिस्ते, पाऊण तोळा वेलची, तोळाभर गुलाब-पाणी, एक शेर साखर. **कृति**—पाऊण शेर पाण्यांत रवा रात्रीं भिजत घालावा. सकाळीं पातेलीला खादीचें फडकें बांधून पाण्याचा हात घेऊन रवा श्रीखंडाप्रमाणें छानावा व कल्हईच्या पातेलींत घालून पांच मिनिटें चुलीवर ठेवून घाटून त्यांत साखर, वेलचीची पूड, सोललेले बदाम सबंध घालून घाटावा. घाटतांना थोडें थोडें तूप घालून सर्व तूप संपवावें. हलवा जाड होत आला कीं, गुलाब-पाणी घालावें. गोळा झाला कीं ताटाला तूप लावून दोन बोटें जाड थापावा. वरून पिस्ते घालावे. वाटल्यास केशरहि घालावें.

मसालाः—साहित्य—धणे, जिरें, शहाजिरें, हिंग, दालचिनी, तीळ, खोबरें, लवंगा, हळकुंडें, मिरच्या, मीठ. **माप**—एक चिपटें धणे, दोन वाट्या खोबरें, अर्धी वाटी जिरें, चहाचा चमचा शहाजिरें, चहाचे

दोन चमचे लवंगा, दीड तोळा हिंग, दालचिनीचे बोटाएवढे चार तुकडे, एक कोळवें तीळ, चार हळकुंडें, लाल रंग असलेल्या पांच मिरच्या, डावभर मीठ. **कृति**:-प्रथम सर्व जिन्नस निवडून घ्यावेत. नंतर तीळ, जिरें व शहाजिरें भाजून घ्यावें. मग कढईत तेल घालून उरलेले सर्व जिन्नस तळून घ्यावेत व प्रत्येकीं निरनिराळीं बारीक पूड करून घ्यावी. सर्व जिन्नस एकत्र मिसळून ठेवावे. हा मसाला सहा महिनेसुद्धां टिकतो.

महंमद पैगंबर (५७१–६३२):–मुसलमानी धर्माचा संस्थापक. याचा जन्म २२ एप्रिल ५७१ रोजीं मक्केस झाला. त्याचा बाप कुरेश जातीचा होता. पैगंबर आईच्या पोटीं असतांनाच वडील वारले. आईहि यांच्या वयाच्या सहाव्या वर्षी मरण पावली. नंतर थोडे दिवस त्यांच्या आजोबांनीं व आजोबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या आबू तालीब नांवाच्या चुलत्यानें त्यांचें पालन-पोषण केलें. पैगंबरांनीं वयाच्या बाराव्या वर्षी चुलत्या-बरोबर सिरियांत प्रवास केला होता.

नंतर महंमद पैगंबरांनीं उपजीविकेसाठीं खदीजाबी नांवाच्या एका श्रीमान् विधवेकडे मुनिमाची नोकरी धरली व पुढें वयाच्या पंचविसाव्या वर्षी तिच्याशीं त्यांनीं लग्न केलें. खदीजाबीपासून फातमाबी या नांवाची एक मुलगी झाली, हिचेंच पुढें अलीशीं लग्न झालें. करबलाच्या रणांगणावर धर्माकरितां लढणारे सय्यद हसन व हुसेन हे या जोडप्याचेच मुलगे होत.

खदीजाबीशीं लग्न झाल्याबरोबर पैगंबरांची सांपत्तिक स्थिति चांगलीच सुधारली व वयाच्या चाळीस वर्षां-पर्यंत चांगल्या प्रकारें व्यापार करून त्यांनीं समाजांत चांगली मानमान्यताहि मिळविली. वयाच्या चाळी-साव्या वर्षी पैगंबरांना गॅब्रियल नांवाच्या देवदूतानें आपणांस नवा धर्म सांगितला असें सांगितलें आहे. या नवीन धर्माला मिळालेला पहिला अनुयायी म्हणजे त्यांची खदीजाबी ही स्त्री होय. त्यानंतर अबूबकर हा मित्र, अली व झीद नांवाचा एक गुलाम हे नंतर या नवीन धर्मांत समाविष्ट झाले.

आपल्या धर्माच्या प्रसारार्थ जेव्हां त्यांनीं सुरवात केली त्यावेळीं पैगंबरांच्या छळास प्रारंभ झाला. स्वतः पैगंबरापेक्षां त्यांच्या अनुयायांचाच छळ अधिक झाला. मक्केसारख्या पवित्र स्थळांत रक्तपात होणें चांगलें नव्हे असें तेथील कुरेशांना वाटत असल्यामुळें मिळ-कतीची जप्ती व सामाजिक बहिष्कार या उपायांचा अवलंब करण्यांत आला होता. पुढें महंमदांना जसे अनुयायी मिळत गेले तसे लोक अधिक चिडून त्यांनीं महंमद पैगंबरांचा खून करण्याचें ठर-विलें. तेव्हां पैगंबर व अबू बकर या दोघांनीं मक्के-हून पळ काढला. ही गोष्ट ६२२ सालीं झाली. मुसलमान लोक या सालीं नवीन युगाला प्रारंभ झाला असें मानतात व तेव्हांपासून ते आपल्या शकाचा आरंभ समजतात. मक्केहून पळाल्यानंतर त्यांनीं मदिना गांठली. मदिनेच्या लोकांनीं त्यांचें उत्साहानें स्वागत केलें व नवीन धर्माचा स्वीकार केला. पुढें पैगंबरांचे अनुयायी व मक्केचे लोक या दोघांमध्यें युद्धें सुरू झालीं व ६२९ मध्यें पैगंबरांचा पूर्ण जय होऊन त्यांनीं मक्केंतील लोकांबरोबर तह करून काबाचें श्रेष्ठत्व मान्य केलें. अर्थात् मक्केंतील लोकांनींहि मुसलमानी धर्म स्वीकारला व पैगंबर मक्केचे धनी व जेते म्हणून मक्केस गेले. मक्का शहर काबीज केल्या-पासून पैगंबरांची सत्ता उत्तरोत्तर वाढत गेली व ६३२ सालीं मृत्यु येण्यापूर्वी ते सर्व अरबस्तानाचे धनी बनले. हे ८ जून ६३२ रोजीं स्वर्गवासी झाले.

त्यांच्या वयाच्या पन्नासाव्या वर्षी त्यांची पत्नि खदीजाबी निर्वतली. ती असेपर्यंत ते तिच्याशीं एक-निष्ठपणें राहिले. पण तिच्या पश्चात् त्यांनीं अनेक स्त्रियांशीं लग्नें केलीं. त्या स्त्रियांपैकीं कांहीं अत्यंत तरुण होत्या. कैक वेळां त्यांचे प्रेमसंबंध अशा प्रकारचे असत कीं चिकित्सक अनुयायांनीं पैगंबरांच्या या कृतींचा विपर्यास करूं नये म्हणून कुराणांत याबद्दल खुलासा केला आहे.

गोड वाणी, आकर्षक विचार, दूर दृष्टी, तत्कालीन देशाची परिस्थिती व दृढनिश्चय हे गुण महंमद पैगंबरांच्या अंगीं होते. तसेच आपल्या नव्या धर्माची शिकवण अत्यंत मर्यादित व आदर्श आचरणाची ठर-वून दिल्यामुळें व स्वर्ग नरकाच्या भडक कल्पना सांगितल्यामुळें तत्कालीन अरबांवर त्यांचा तात्काल परिणाम झाला. (मुसलमानी धर्म हा लेख पाहा.)

कुराण हा महंमद पैगंबरांच्या वचनांचा संग्रह होय. हीं वचनें प्रसंगविशेषीं जशीं त्यांच्या मुखांतून निघालीं तशीं तीं त्यांच्या शिष्यांनीं टिपून ठेवलीं होतीं. पैगं-बरांच्या मृत्यूनंतर हीं सर्व वचनें एकत्रित केलीं गेलीं. हा ग्रंथ म्हणजे 'पवित्र कुराण' होय. कुराणांतील हीं

सर्व वचनें म्हणजे पैगंबरांच्या शेवटच्या तेवीस वर्षांत प्रगट केलेलें तत्त्वज्ञान होय. पैगंबरांच्या उत्तर आयुष्यांत घडलेल्या गोष्टींच्या क्रमाबद्दल भिन्न भिन्न आख्यायिका आहेत. याशिवाय त्यांचीं भोजनसंभाषणें व संबयी हीं दंतकथात्मक पुस्तकेंहि आहेत.

मधुर भाषा, वादविवादपटुता, प्रचलित परिस्थितीचें अवलोकन, स्वतःच्या मताविषयींची खात्री इत्यादि धर्मसंस्थापकाला लागणारे आवश्यक गुण त्यांच्या अंगीं होते. शिवाय आकर्षक शरीरबांधा व राजकारणी डावपेच करण्याची शक्ति अंगीं असल्यामुळें त्यांना आपल्या धर्माला झपाट्यानें अनुयायी मिळवितां आले.

महादजी शिंदे (१७२७–१७९४):–प्रसिद्ध मराठा वीर व मुत्सद्दी. हा राणोजीला चिमाबाई नांवाच्या रजपूत बाईच्या पोटीं झालेला मुलगा. राणोजीच्या पश्चात् हा पेशव्यांच्या खासगी पागेंत असल्यामुळें आणि स्वाऱ्यांवरहि जात असल्यामुळें युद्धकलेचें व मुत्सद्दीपणाचें यास शिक्षण मिळालें होतें.

यानें प्रथम तळेगांव उंबरीच्या लढाईंत शौर्य गाजवून नांव मिळविलें. यानंतर औरंगाबाद (१७५१), साखरखर्डा (१७५६) व पंजाबकडील (१७५९) मोहिमांत हा हजर होता. निजामाला मिळालेल्या जानोजी भोसल्यास शह देऊन यानें परत आणलें. सदाशिवरावाबरोबर हा पानपतावर गेला होता, पण शेवटीं पळांतून हा सुरक्षित आला. वाटेंत एका पठाणानें डाव्या पायावर वार करून यास कायमचें लंगडें केलें, पण राणाखान नांवाच्या शिपायानें याला शेवटपर्यंत निभावून १७६१ मध्यें आणलें.

गोहदच्या जाटावर राघोबानें स्वारी केली. तींत प्रथम शिंद्याच्या दौलतीतर्फे मुख्य म्हणून यानें १७६६–६७ मध्यें भाग घेतला. नंतर याला १७६८च्या नोव्हेंबर १८ ला सरदारीचीं वस्त्रें मिळालीं.

केदारजी व मानाजी फाकडे शिंद्यांची सरदारी आपणांस मिळावी असा प्रयत्न करीत होते.

विसाजी कृष्णानंतर दिल्लीकडे पुनः लक्ष देण्याची नाना महादजींच्या मनांत कल्पना आली आणि त्यांना बंगालकडे मोर्चा वळवावा असेंहि १७७९ त वाटलें, पण १७ मे १७८२ च्या सालबाईच्या तहानंतर इंग्रजाविरुद्ध आपणहून कुरापत काढणें याला बरें वाटेना. यापूर्वी यानें १७८१ च्या आक्टोबर १३ ला स्वतंत्रपणें इंग्रजांशीं तह केला होताच. दिल्लीच्या बादशाहीवर इंग्रज, मराठे व जाठ हे लक्ष ठेवून होते. दिल्लींत इंग्रजांना योग्य तऱ्हेचा पाठिंबा नव्हता. मीर्झा नजबखान मेल्यावर अधिकारासाठीं भांडणाऱ्या हमदानी व मीर्झा शफींनीं यास समक्ष भेटून याला बादशाहीची व्यवस्था लावण्याविषयीं ९ जुलै १८७२ला सांगितलें.

पण मीर्झा शफीचा मुहम्मदबेग हमदानीनें १७८३त सप्टेंबर २३ ला खून केला. तसेंच अफरासियाबखान हा मराठ्यांची मदत घेतो म्हणून हमदानीचा भाऊ जैतुल आबिद्दीनखानानें त्याचाहि खून केला. सारांश, मराठ्यांची मदत घेणाऱ्याचा विरुद्ध पक्षांनीं खून करण्याचा सपाटा सुरू केला.

यांनींहि डिभाईच्या हाताखालीं सैन्याची तयारी सुरू करून आग्र्यास बादशहाची भेट १७८४ च्या जुलैंत घेतली. बादशहांनीं पेशव्यांना वकील मुतलकी आणि याला मीरबक्षीगिरी १७८४ त दिली. नंतर यानें जयपूरचा प्रतापसिंह कच्छवाह व रणजितसिंह जाठ यांचा हलुहळू बंदोबस्त केला. पुढें यास दरबार भरवून मीरबक्षीगिरीचीं वस्त्रें देण्याचा समारंभ १७८५ मे १ ला झाला. यानंतर शीख व मुसलमान एक झाले आणि त्यांना शहाजादा जवानबख्त सामील झाला. पाटीलबावाजवळ पुरेसें सैन्य नव्हतें. मराठी अधिकारी मिजासींत राहतात म्हणून यानें सर्व अधिकारी हिंदुस्थानी नेमले. जुना कारभारी माधव गंगाधरला कारभारांतून काढलें आणि जिवबादादा बक्षीलाहि तुरुंग दाखविला. नौबतराय बक्षीला सैन्याची बक्षीगिरी दिली; आणि जयपूर–जोधपूरकरांवर खंडणीकरितां स्वारी केली. तेव्हां एकंदर लोकमत त्याच्याविरुद्ध होऊन सैन्यहि फितुर झालें.

लालसोट येथें जयपूर–जोधपूरवाले आणि मुसलमान हे एकत्र होऊन यास विरोध करण्याकरितां उभे राहिले. खंडेराव हरी, अंबाजी इंगळे, शिवाजी विठ्ठल व धारराव शिंदे वगैरेंनीं जोरानें तोंड दिलें. हमदानी मेला, पण याचे हिंदुस्थानी अधिकारी फितुर झाल्यामुळें लढाईंत १७८७ मध्यें अपयश आलें. याच वेळीं दिल्ली व बादशहा ताब्यांत घेऊन गुलामकादरनें कहर केला. दिल्लीच्या बादशहाच्या संरक्षणाकरितां ठेवलेला लाडोजी देशमुख भयानें बादशहास न विचारतां रातोरात पळ काढला. महादजीला वेळेवर मदत

कोणाकडूनहि झाली नाहीं. यानें उज्जयनीच्या स्वतःच्या वाड्यांतील रुपें काढून सात लक्ष रुपये उभे केले आणि संकटकाल वारला. हळुहळू यानें मथुरावृंदावन ताब्यांत घेतलें व शेवटीं लखबादादांनीं गुलामकादरचाहि १७८८त मेमध्यें पूर्ण समाचार घेतला.

रजपुतांनीं शेवटपर्यंत याला विरोध करण्याची कमाल केली. त्यांनीं शाहाजादा अहसनबख्त यास दिल्लीच्या गादीवर बसवून यास विरोध करण्याचें ठरविलें, आणि दोन्ही सैन्यांच्या पाटणजवळ दोन लढाया झाल्या. पहिल्या लढाईंत निकाल लागला नाहीं म्हणून दुसरी लढाई झाली. या लढाईमध्यें मराठ्यांचा चांगलाच जय झाला. त्यामुळें रजपूत पूर्ण ताब्यांत आले आणि इस्माईलबेगचाहि निकाल लागला, तेव्हां हा निर्वेध झाला. याच्या या कृत्यांनीं मराठ्यांचें राज्य यानें परमोच्च बिंदूला नेऊन पोचविलें.

मथुरा शहर याचें फार आवडतें शहर होतें. उत्तरेंतील सात वर्षांचा याचा काल बहुतेक मथुरेच्या छावणींत गेला. मथुरावृंदावनच्या सनदा बादशहानें यास १७९०च्या ऑगस्टमध्यें दिल्या. सबंध हिंदुस्थानांत गोवधबंदीचें फर्मानहि बादशहाकडून यापूर्वीच यानें ४।९।१७९०मध्यें मिळविलें होतें. काशी व काशीविश्वेश्वर मंदिर यांची व्यवस्था मात्र याला करतां आली नाहीं. नंतर हा दक्षिणेकडे परत फिरला. बीड येथें मनसुरशाहा गुरूचें दर्शन घेऊन ५ मेला तुळजापुरास आला. तेथें भोपे कदमाच्या मुलीशीं लग्न केलें आणि ११ जून रोजीं पुण्यास संगमावर दाखल झाला. ता. ११ जून १७९२ पासून ता. १२।२।१७९४ पर्यंत पुण्यास मुक्काम झाला. पैकीं पहिलें एक वर्ष काय तें कामांत गेलें व पुढें ८ महिने आजारीपणांत गेले. दिल्लीच्या कारभाराप्रमाणें पुण्याचा कारभारहि आपल्या ताब्यांत असावा अशी याची इच्छा असणें स्वाभाविक होतें. पण त्याकरितां हीन दर्जाचें कारस्थान करण्याचा किंवा लष्करी सामर्थ्याचा उपयोग करण्याचा यानें कधीं प्रयत्न केला नाहीं. द्रव्यबळाचाहि उपयोग करण्याची इच्छा नव्हती. आपली महत्त्वाकांक्षा राजहिताच्या आड हा केव्हांहि येऊं देत नसे. आपणच फक्त राजहित करणारे आणि इतरांच्याजवळ ती भावना नाहीं अशी प्रौढीची वागणूकहि हा करीत नसे. त्यामुळें पुण्याच्या दरबारांत याचें सारखें वजन वाढत चाललें. पण मराठी राज्याच्या दुर्दैवानें हा लवकरच नवज्वरानें वानवडीस मृत्यु पावला. (१७९४) मृत्युसमयीं याचें वय ६७ वर्षांचें होतें.

यास अकरा लग्नें करूनहि पुत्रसंतति नव्हती. फक्त लाडोजी शितोळे यास दिलेली बाळाबाई ही एकच मुलगी होती.

याची बीडचा मुसलमान साधु मनसूर व उज्जयनीच्या दत्तनाथ या दोन साधूंवर श्रद्धा असे.

हा मध्यम उंचीचा काळासावळा गृहस्थ असून कृष्णभक्त होता. याचे कांहीं अभंग, पदें, व ज्ञानेश्वरीदासी नांवाचा ग्रंथ आहे. याच्यावेळीं उज्जयनी ही शिंद्याची राजधानी होती. ग्वाल्हेर येथें लष्कर असे. पानिपतच्या पराजयानें मराठ्यांची उत्तरेंत गेलेली कीर्ती महादजीच्या पराक्रमानेंच परत आली हें विसरतां कामा नये

महानंदा:—ही वेश्या असून मोठी शिवभक्त होती. हिच्यापाशीं एक माकड व कोंबडा होता. त्यांना ही रुद्राक्षांनीं भूषित करी. ही शिवभजनांत मग्न असे, तेव्हां तेहि हिच्याबरोबर नृत्य करीत असत. एकदां वैश्याचें रूप घेऊन शंकर स्वतः हिची परीक्षा करण्याकरितां आला. वैश्याजवळ एक रत्नकंकण होतें, तें पाहून महानन्देस वाटलें कीं, तें आपणांस असावें. वैश्यानें हिला 'मूल्य देशील का ?' म्हणून विचारिलें असतां हिनें त्याच्या मोबदल्यांत तीन दिवस त्याच्याजवळ पतिव्रतानें राहण्याचें कबूल केलें. वैश्यानें ही गोष्ट मान्य करून आपलें रत्नमय लिंग तिच्याजवळ ठेवावयास दिलें. परंतु रात्रीं आग लागून तें लिंग जळून गेलें, तेव्हां वैश्यानें जीव देण्याची तयारी केली व त्याप्रमाणें त्यानें देहत्याग केला. महानन्दाहि आपली तीन दिवसांची प्रतिज्ञा लक्षांत घेऊन सहगमन करण्यास उद्युक्त झाली असतां शंकर प्रगट होऊन हिचें त्यानें निवारण केलें व हिच्या इच्छेप्रमाणें सर्व लोकांसह हिला मुक्त केलें.

महानुभाव पंथ व वाङ्मय:—वारकरी, रामदासी अशा अनेक पंथांप्रमाणें 'महानुभाव' हा हिंदुधर्मांतीलच एक प्रमुख पंथ आहे. महाराष्ट्रांतील सर्वसाधारण जनसमूहांत प्रस्तुत पंथ 'मानभाव' या नांवानें ओळखला जातो. एकनाथ कालापासून महाराष्ट्रीय वाङ्मयांत व लौकिक समाजांत 'मानभाव' हेंच नांव विशेष प्रसिद्ध असलेलें आढळतें. महात्मा पंथ, अच्युत पंथ, जयकृष्णी पंथ, भटमार्ग, परमार्ग इत्यादि नांवां

नींही हा पंथ ओळखला जात होता. तथापि पंथ-संस्थापक चक्रधर याला ‘ परमार्ग ’ हेंच नांव अभिप्रेत असावें असें वाटतें. (पहा लोकशिक्षण ऑक्टो. १९३७).

प्रस्तुत पंथाचा संस्थापक चक्रधर हा होय. चक्रधर हा मूळचा गुजराथचा. तेराव्या शतकांत गुजराथेंतील त्रिमल्लदेव नांवाच्या राजाचा प्रधान जो विशाळदेव त्याचा हा मुलगा. ह्याचें मूळचें नांव हरिपाळदेव. रामटेकच्या यात्रेच्या मिषानें हरिपाळदेव ऋद्धपुरास (उमरावती, जिल्हा वऱ्हाड) आला. तेथें गोविंदप्रभु नामक एका विरक्त पुरुषाचा उपदेश घेऊन तो कांहीं काळ तपश्चर्या करीत व नंतर लोकांना उपदेश करीत महाराष्ट्रांतच राहिला. गोविंदप्रभूनें त्याचें नांव चक्रधर असें ठेवलें. शके ११९४ च्या सुमारास चक्रधरानें बद्रिकेदाराकडे प्रयाण करून आपला अवतार समाप्त केला अशी महानुभाव पंथीयांची समजूत आहे. पण शके ११९८ मध्यें देवगिरीचा राजा रामदेवराय व त्याचा प्रधान हेमाद्रि यांच्याकडून चक्रधराचा खून झाला, असें लीलाचरित्राच्या कांहीं पोथ्यांवरून खात्री-पूर्वक सिद्ध करतां येतें. याच चक्रधरानें महानुभाव पंथ स्थापन केला. प्रस्तुत चक्रधर, त्याचा गुरु गोविंद-प्रभु, या गोविंदप्रभूचा गुरु द्वारावतीकार चक्रपाणी व श्रीदत्तात्रय आणि श्रीकृष्ण हे महानुभावांचे पंचकृष्ण म्हणून प्रसिद्ध आहेत. श्री. चांदोरकर यांनीं महानु-भावांच्या पंचकृष्णांसंबंधीं भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकामध्यें लिहिलेल्या लेखास महानु-भावीय ग्रंथांत यत्किंचित्सुद्धां आधार नाहीं. मानभाव हे मांगिणीपासून जन्माला आलेले आहेत अशी प्रच-लित असलेली समजूतदेखील खोडसाळपणाची वाटते.

चक्रधरानें हा नवीन पंथ जाणूनबुजून ‘ स्थापन ’ केला असें मात्र म्हणतां येत नाहीं. महाराष्ट्रांत निर-निराळ्या ठिकाणीं भ्रमण करीत असतांना या विरक्त पुरुषानें आपल्याला पटत असलेल्या कांहीं तत्त्वांचा सगळ्यांना उपदेश केला. तो उपदेश त्यांना मान्य झाला तसे कांहीं भक्त त्याच्या भोंवतीं गोळा झाले. या भक्तसमूहांमध्यें चक्रधर स्वतःलाच परमेश्वर म्हण-वून घेत असे. म्हणून त्याच्या भक्तांची त्याच्या ठिकाणीं आत्यंतिक श्रद्धा जडली. निरनिराळ्या ठिकाणीं अनेकविध लोक चक्रधराच्या दर्शनास येऊं लागले. हा ईश्वरच आहे असें समजल्यावर त्याचें शिष्यत्व पत्करूं लागले व अशा रीतीनें चक्रधराचा शिष्यसंभार व अनुयायीवर्ग वाढूं लागला. हाच महानुभाव पंथाचा आरंभ होय. एखाद्या विशिष्ट पंथाची ‘ स्थापना ’ करण्याच्या हेतूनें चक्रधरानें लोकांना उपदेश केला असें नाहीं; तर त्याच्या उपदेशामुळें पंथ अनायासें स्थापन झाला असें म्हणणें अधिक योग्य होईल. तत्का-लीन समाजरचनेंतील व्यंगें काढून टाकण्यासाठीं अथवा चातुर्वर्ण्यव्यवस्थेवर आघात करण्यासाठीं किंवा आश्रम-व्यवस्था नष्ट करण्यासाठीं चक्रधरानें आपला उपदेश केलेला दिसत नाहीं. त्याचा उपदेश ईश्वरप्राप्तिविषयक होता. त्यावेळच्या समाजांत नानाविध देवतांची उपासना फार वाढली होती. क्षुद्र देवतांच्या भजनपूजनांतच सामान्य जनसमूह कृतकृत्यता मानीत असे. चक्रधरास ही क्षुद्र देवतांची उपासना मान्य नव्हती. देवता ह्या सर्व दृष्टींनीं परब्रह्म परमेश्वरापेक्षां कमी प्रतीच्या असल्या-मुळें त्यांच्या उपासनेनें जन्ममरणाच्या बंधनांतून मनुष्य सुटूं शकणार नाहीं असें त्यास वाटत होतें. म्हणून इंद्र चंद्र सूर्यादि देवतांची उपासना न करतां एका परब्रह्म परमेश्वराचीच काय ती उपासना करावी असा उपदेश तो करीत असे. देवतांच्या भक्तीनें फार झालें तर स्वर्गादि क्षुद्र सुखें प्राप्त होतील, पण अक्षय्य असें परब्रह्म सुख प्राप्त होऊं शकणार नाहीं. मग जन्माला येऊन मुक्तीसाठीं भक्ती करायचीच तर ती देवतांची कशाला करायची? आरंभापासूनच परमे-श्वराची भक्ति करणें इष्ट होय असें तो सांगत असे. त्यामुळें चक्रधर हा देवताभक्तीचा विरोधक आहे, असें इतर पंथीयांस वाटून ते त्याचा व त्याच्या अनुयायांचा द्वेष करूं लागले. त्यांतही चक्रधर खुद्द स्वतःलाच परमेश्वराचा अवतार म्हणवीत असे या गोष्टीची भर पडली. म्हणून चक्रधराचा अनुयायी-वर्ग जसा वाढूं लागला तसे त्याचे द्वेष्टेही वाढूं लागले. मोक्षप्राप्तीचें साधन केवळ पुरुषांनाच नाहीं, तर स्त्रियांनाही शक्य आहे असा त्याचा उपदेश असल्यामुळें त्याच्या पंथांत स्त्रियाही येत. त्यांनासुद्धां तो संन्यासदीक्षा देत असे. ही गोष्टसुद्धां त्यावेळच्या सनातन्यांस रुचणें शक्य नव्हतें. तसेंच चक्रधराचा उपदेश हा जिवाशिवाच्या अद्वैताचा नसून द्वैताचा असल्यामुळेंही त्यावेळच्या अद्वैतमार्गानुयायी पंथीयांना चक्रधर व त्याचा पंथ पाखंडी वाटत होता. या अनेक कारणांनीं महानुभाव पंथाचा जन्म झाल्यापासूनच

महाराष्ट्रांत त्याचा निंदकवर्गही निर्माण झाला. पुढें महानुभावांनीं कृष्णवस्त्र परिधान केल्यामुळें व कित्येकदां आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठीं त्यावेळच्या मुसलमान बादशाहांचें साह्य घेतल्यामुळें ही निंदा व हा द्वेष इतका पराकोटीला जाऊन पोहोंचला कीं त्यामुळें महानुभावांचें दर्शन अशुभ मानण्यांत येऊं लागलें. व त्यांच्या उत्पत्तीविषयीं भलभलत्या कथा रचण्यांत येऊं लागल्या. ह्या सर्व प्रश्नांचा विचार महानुभाव पंथांतील एक प्रमुख आधुनिक विद्वान श्री. बाळकृष्णशास्त्री ह्यांनीं 'महानुभाव पंथावरील आक्षेप व त्यांचें निरसन' या आपल्या पुस्तिकेंत केलेला आहे. जिज्ञासूंनीं तिकडे लक्ष द्यावें.

महानुभावीयांची समाजव्यवस्था सनातनीयांप्रमाणेंच आहे. संन्यासी व गृहस्थाश्रमी असे यांचे दोन प्रमुख भेद आज अस्तित्वांत आहेत. संन्यासी अर्थात् वर्णव्यवस्थेच्या पलीकडे गेलेले असतात; पण गृहस्थाश्रमी महानुभावांचे सगळे व्यवहार इतर लोकांच्या व्यवहाराप्रमाणेंच होतात. इतरपंथीय समाज व महानुभावीय गृहस्थाश्रमी समाज यांच्यामधें रोटीबेटीव्यवहार चालू असलेले आढळतात. लग्नकार्यें सनातनी पद्धतीप्रमाणें ब्राह्मण भटजीच्या हातूनच होतात. ब्राह्मणापासून तों शूद्रातिशूद्रापर्यंत सर्व वर्णांचे व सर्व जातींचे लोक महानुभाव पंथाचे अनुयायी आहेत. तेव्हां अर्थात् सनातनी पंथाहून हा निराळा पंथ आहे असें मानण्याचें कांहींएक कारण दिसत नाहीं. वर्णव्यवस्था व आश्रमव्यवस्था त्यांच्यांत अस्तित्वांत आहेतच. आर्यसंस्कृतीच्या या दोन्ही प्रमुख घटकांविरुद्ध चक्रधरानें बंड केल्याचें मुळींच आढळून येत नाहीं. वेदांनाही चक्रधराचा विरोध नव्हता. महानुभाव पंथाचे अनुयायी चक्रधरालाच परमेश्वराचा अवतार मानीत असल्यामुळें त्याच्या मुखांतून बाहेर पडलेल्या शब्दांनाच ते धर्मवचनाचें महत्त्व देतात. अर्थात् वेद तसे (चक्रधरमुखोक्ति) नसल्यामुळें इतर लोक ज्या दृष्टीनें वेद प्रमाण मानतात त्या दृष्टीनें महानुभाव मानीत नाहींत. चक्रधराच्या वचनांत वेदविरोधित्व आपणांस आढळत नाहीं. त्यावरून हा पंथ वेदविरोधी नाहीं असें म्हणतां येतें. तथापि तत्त्वनिर्णयाच्या बाबतींत अखेरचा शब्द म्हणजे वेदांचा असें ज्याप्रमाणें वैदिक लोक मानतात त्याप्रमाणें चक्रधराच्या वचनांनाच ह्या अखेरच्या शब्दांचें महत्त्व महानुभावीय देतात. म्हणूनच पंथीय जनता चक्रधराच्या मुखांतून बाहेर पडलेल्या वचनांना 'श्रुति' असें संबोधतात. आचारविचारासंबंधींची अशीं कांहीं वचनें चक्रधराच्या शिष्यांनीं निवडून 'सूत्रपाठ' तयार केलेला आहे. हा सूत्रपाठच महानुभावीयांचा प्रमुख धर्मग्रंथ होय. श्रीमद्भगवद्गीता ही श्रीकृष्णोक्ति असल्याचें चक्रधरानें म्हटलें असल्यामुळें अर्थात् चक्रधराच्या सूत्रपाठाप्रमाणेंच भगवद्गीतेलाही ते प्रमाण मानतात. तथापि प्रमुख धर्मग्रंथ म्हटला म्हणजे सूत्रपाठ होय यांत शंका नाहीं. या सूत्रपाठांत चक्रधराचें तत्त्वज्ञान साररूपानें अंतर्भूत झालेलें आढळतें. त्याचें विशदीकरण पुढें चक्रधराच्या अनुयायांनीं निरनिराळे ग्रंथ लिहून केलें. या तत्त्वज्ञानाला अनेक दृष्टींनीं महत्त्व आहे. महाराष्ट्रांत आज जे निरनिराळे पंथ अस्तित्वांत आहेत त्यांपैकीं महानुभावांनींच काय तें आपलें तत्त्वज्ञान अतिशय पद्धतशीर रीतीनें लिहून ठेवलेलें आढळतें, हा यांचा एक विशेष होय. द्वैतमताचा महाराष्ट्र समाजांत तरी प्रथम विशेष नेटानें पुरस्कार करणारा चक्रधरच असल्यामुळेंही त्याच्या तत्त्वज्ञानाला महत्त्व प्राप्त झालेलें आहे. शिवाय, सृष्टिरचना, संहार, उद्धरण इत्यादि प्रश्नांविषयीं महानुभावीय पंडितांनीं केलेलें विवेचन लक्षांत घेण्यासारखें आहे. चक्रधरानें महाराष्ट्रीयांना दिलेली ही वैचारिक देणगी लक्षांत घेतां चक्रधराचे व त्याच्या देणगीची आस्थापूर्वक जोपासना करणाऱ्या महानुभावांचे कोण ऋणी होणार नाहीं ?

या वैचारिक देणगीप्रमाणेंच महानुभाव पंथानें महाराष्ट्राला जी वाङ्मयाची देणगी अर्पण केलेली आहे तीहि महत्त्वाची आहे. चक्रधराचें तत्त्वज्ञान अगदींच अभिनव असें नसल्यामुळें त्याचें तितकेंसें महत्त्व महाराष्ट्राला कदाचित् वाटणार नाहीं. पण त्यानें मराठी भाषेला व मराठी वाङ्मयाला जें प्रत्यक्षाप्रत्यक्ष अपूर्व महत्त्व प्राप्त करून दिलेलें आहे तें मात्र कोणालाहि कौतुकानें व आनंदानें मान डोलवायला लावील यांत शंका नाहीं. चक्रधर जरी जन्मानें गुजराथी होता तरी महाराष्ट्रांत आल्यानंतर त्यानें महाराष्ट्राला व मराठी भाषेला आपलें सर्वस्व अर्पण केलें. 'महाराष्ट्रदेशीं असावें' म्हणून आपल्या अनुयायांना त्यानें आज्ञा केली. आपला उपदेश सर्वसामान्य जनतेच्या मराठी भाषेंतूनच केला. चक्रधर स्वतः नेहमीं मरा-

ठींतूनच बोलत असल्यामुळें मराठी भाषेला महानुभावीयांच्या दृष्टीनें देववाणीचें महत्त्व प्राप्त झालें. आपली धर्मभाषा म्हणून मराठीकडे अतिशय अभिमानानें बोट दाखवणारे आज फक्त महानुभावीयच आढळतात. इतर सर्व पंथीयांची दृष्टि देववाणी म्हणून संस्कृत भाषेकडे असते तर महानुभावीयांची मराठी भाषेकडे असते. या पंथाचा जसाजसा व जिथें जिथें प्रसार होत गेला तसातसा व तिथें तिथें मराठी भाषेचाहि प्रसार होत गेला. म्हणूनच आज पंजाब, काबूल कंदाहारकडेदेखील मराठी भाषेची पताका फडकत असलेली दिसते. कारण, तेथील भाविक महानुभाव आपले पूजापाठ मराठींतूनच चालवतात व जन्मभाषा निराळी असली तरी धर्मभाषा म्हणून मराठीचा आस्थापूर्वक अभ्यास करतात. हें मराठीचें वैभव कुणाला मोहित करणार नाहीं ?

मराठी भाषेच्या या वैभवाबरोबरच तिचें वाङ्मयवैभवसुद्धां महानुभावांनीं बरेंच वाढविलेलें आहे. गद्यपद्य ग्रंथांचीं नानाविध लेणीं मराठी शारदेच्या अंगावर त्यांनीं घातलेलीं आहेत. चक्रधर, गोविंदप्रभू, चक्रपाणी यांचीं चरित्रें विस्तृत रीतीनें चक्रधराच्या मृत्यूनंतर लौकरच माहींभटाकडून संकलित केलीं गेलीं. यांत चक्रधराचें चरित्र—लीलाचरित्र—हें अतिशय महत्त्वाचें होय. मराठी वाङ्मयांतील हा पहिला गद्यग्रंथ मानायला हरकत नाहीं. भाषारचनेच्या व वर्णनशैलीच्या दृष्टीनें यांतील गद्य मनोहर आहे. प्राचीन मराठीमध्यें गद्यग्रंथाची उणीव आपणांस फार आढळते; पण महानुभावांनीं निर्माण केलेल्या व आतां उपलब्ध झालेल्या या चरित्रग्रंथामुळें व तत्त्वज्ञानावरील ग्रंथांमुळें ही स्वतंत्र गद्यग्रंथांची उणीव भरून निघालेली आहे. महानुभावांच्या तत्त्वज्ञानविषयक सर्व ग्रंथांचीं बीजें आपणांस या लीलाचरित्रांतच आढळतात. त्यांचा प्रमुख ग्रंथ 'सूत्रपाठ' म्हणजे लीलाचरित्रांतून केसोबासानें निवडून काढलेल्या चक्रधराच्या सूत्रमय वचनांची संहिता होय. सूत्रपाठांतील पहिलीं नऊ प्रकरणें केसोबासाचीं असून बाकीचीं म्हणजे आचार, आचारमालिका इत्यादि प्रकरणें रामेश्वरबास, परशरामबास व कवीश्वरबास ह्यांनीं संकलित केलेलीं आहेत. हा सूत्रपाठ केंद्रस्थानीं कल्पून अनेक स्पष्टीकरणात्मक ग्रंथांची रचना झालेली आढळते. प्रत्येक सूत्र कोणत्या लीलेंत आलेलें आहे, कोणत्या संबंधांत आलेले आहे हें दाखवणारे 'लापणिक' ग्रंथ व सूत्रावर पदानुक्रमें टीका करणारे स्थळग्रंथ अनेक निर्माण झालेले आहेत. प्रत्येक सूत्र कोणत्या प्रसंगीं व कोणत्या हेतूनें सांगितलेलें आहे याचें विवरण करणारा ग्रंथ 'हेतुस्थळ' होय. याचप्रमाणें सूत्राच्या स्पष्टीकरणात्मक ग्रंथ म्हणजे गुजर शिवबास व सिद्धांते हरिबास यांनीं तयार केलेले तीन स्थळ हे ग्रंथ होत. सूत्रपाठाचा एक भाग जो 'दृष्टान्तपाठ' त्याच्याही अनुरोधानें अशीच लापणिकादि ग्रंथांची रचना झालेली आहे. ह्या सगळ्यांचीं उदाहरणें या ठिकाणीं देणें अशक्य आहे. येथें 'पंचवार्तिक' या ग्रंथाचा उल्लेख करणें अवश्य वाटतें. सूत्रपाठांतील वचनांमधील शब्दांचे व्याकरणसंबंध स्पष्ट करून दाखविण्याच्या हेतूनें भीष्माचार्य नांवाच्या लेखकानें हा व्याकरणात्मक ग्रंथ लिहिला आहे. सारांश माहींभटानें संकलित केलेले 'चरित्रग्रंथ' त्यांतून केसोबासादिकांनीं वचनें निवडून तयार केलेला 'सूत्रपाठ' व या सूत्रांचे संबंध, हेतु आणि पदपदान्वयासहित स्पष्टीकरणात्मक टीका हे महानुभावांचे प्रमुख गद्यग्रंथ होत. यांत प्रामुख्यानें आख्यायिकावजा चरित्रात्मक ग्रंथ, तत्त्वज्ञानाचे ग्रंथ व व्याकरणग्रंथ यांचा समावेश होतो. याशिवाय महानुभावांच्या कांहीं प्रमुख काव्यग्रंथांवर टीपाग्रंथसुद्धां निर्माण झालेले आहेत. यांत कठीण शब्दांचे अर्थ व ओव्यांचे अर्थ स्पष्ट करून दाखविलेले आहेत. यावरून महानुभावांच्या गद्यग्रंथांची विविधता लक्षांत येईल.

वर 'गद्य' शब्द ज्या अर्थानें वापरला त्या अर्थानें महानुभावांनीं मात्र त्याचा वापर केलेला आढळत नाहीं. महानुभावीयांत 'गद्य' म्हणजे निर्यमक रचना असा अर्थ होतो. याच दृष्टीनें हयग्रीवाचार्यांच्या निर्यमक श्लोककाव्याला 'गद्यराजस्तोत्र' असें नांव दिलेलें आढळतें. भास्करभट्ट बोरीकरानें लिहिलेल्या निर्यमक श्लोकांच्या संहितेलाहि 'गद्यचाळिशी' असें नांव आहे. या दोन्ही ठिकाणीं 'गद्य' शब्दाचा अर्थ निर्यमक पद्य असा दिसून येतो. महानुभाव पंडितांचा गद्य शब्दाचा हा अर्थ मोठा लक्षांत ठेवण्यासारखा आहे. असो.

गद्य ग्रंथाप्रमाणेंच महानुभावांनीं केलेली पद्यरचना अथवा काव्यरचनाहि विविध प्रकारची व श्रेष्ठ प्रतीची आहे. महानुभावपंथीयांत प्रसिद्ध असलेलीं सात प्रमुख

काव्यें 'साती ग्रंथ' या नांवानें ओळखलीं जातात. त्यांत नरेंद्राचें 'रुक्मिणीस्वयंवर,' भास्करभट्ट बोरीकराचा 'शिशुपाल वध' व 'उद्धवगीता,' दामोदर पंडिताचें 'वच्छहरण,' नारोबास नाहाळिये याचें 'ऋद्धिपुरवर्णन,' पंडित विसोबासाचा 'ज्ञानप्रबोध' आणि रवळोबासाचें 'सह्याद्रिवर्णन' यांचा समावेश होतो. यांतील नरेंद्राचें 'रुक्मिणीस्वयंवर' हेंच काय तें काव्य पूर्णपणें ज्ञानेश्वरकालीन आहे. बाकीचीं सगळीं काव्यें ज्ञानेश्वरोत्तर कालीन असल्याचें असंदिग्धपणें दाखवितां येतें. पण कालाचा प्रश्न इथें विशेष महत्त्वाचा नाहीं. या सर्व काव्यांतून कवित्वाचें व रसिकत्वाचें जें भव्य प्रदर्शन आहे तें अधिक महत्त्वाचें आहे. हीं सर्व काव्यें ओवी छंदांत लिहिलेलीं आहेत. त्यांची रचना अतिशय डौलदार व वर्णनशैली घोटीव अशी आहे. उद्धवगीता व ज्ञानप्रबोध हीं काव्यें तत्त्वज्ञानात्मक असून बाकीचीं कथात्मक आहेत. ऋद्धिपुरवर्णन व सह्याद्रिवर्णन हीं पूर्णपणें कथात्मक काव्यें आहेत असें मात्र म्हणतां येत नाहीं. तथापि तीं केवळ वर्णनात्मक नाहींत हें लक्षांत घ्यावें. उद्धवगीता व ज्ञानप्रबोध हीं जरी तत्त्वज्ञानात्मक आहेत तरी त्यांत साहित्याचा प्रकर्ष मोठ्या प्रमाणांत आढळून येतो. केवळ कवित्वाच्या आणि रसिकत्वाच्या दृष्टीनें नरेंद्राचें रुक्मिणीस्वयंवर सर्वश्रेष्ठ असून बोरीकराचें शिशुपालवध गुणानुक्रमें दुसरें येईल. ह्या दोन्ही काव्यांत कल्पनांचें वैभव, भावनांचा ओलावा व काव्यालंकारांचा उत्कर्ष अत्यंत मोठ्या प्रमाणांत आढळून येतो. ऋद्धिपुरवर्णन हें प्रदीर्घ भावगीताचें एक सुंदर उदाहरण आहे. परमेश्वराचें निवासस्थान जें ऋद्धिपुर व त्यांतील निरनिराळीं स्थळें दृष्टीस पडल्याबरोबर कवीचें अंतःकरण सद्गदित होऊन त्याच्या मुखावाटें जो भावनांचा कल्लोळ बाहेर पडला तो ऋद्धिपुरवर्णनांत भावपूर्ण रीतीनें वर्णन केलेला आढळतो.

वरील 'साती ग्रंथा'व्यतिरिक्त महदंबेचें 'धवळे', केसोबासाचा 'मूर्तिप्रकाश', हयग्रीवबासाचें 'गद्यराजस्तोत्र', संतोषमुनी कृष्णदासाचें 'रुक्मिणीस्वयंवर' वगैरे अनेक काव्यें प्रसिद्ध आहेत, तीं आपापल्यापरीनें सुंदरच आहेत. कवि कृष्णमुनीचें 'रुक्मिणीस्वयंवर' व ओंकार मुनीचें 'लक्ष्मणास्वयंवर' हीं काव्यें अनेक वृत्तांत रचलेलीं आहेत. यांत चार अक्षरीं वृत्तापासून तों सव्वीस अक्षरीं वृत्तापर्यंत अनेक वृत्तें कवीनीं मोठ्या कौशल्यानें योजलेलीं आढळतात. महदंबेच्या धवळ्यांचा छंद तर अगदींच स्वतंत्र आहे! काव्यदृष्ट्या धवळ्यांचें महत्त्व विशेष नाहीं, पण मराठींतील एका स्वतंत्र छंदांत तें लिहिलेलें असल्यामुळें तें महत्त्वाचें वाटतें. शिवाय तें एका स्त्रीनें लिहिलेलें असल्यामुळेंहि त्याला महत्त्व आहे हें सांगायला नकोच. असो.

महानुभावीयांनीं निर्माण केलेली वाङ्मयसंपत्ति अशी विविध स्वरूपाची आहे. तींत चरित्रात्मक ग्रंथ आहेत, सूत्रात्मक रचना आहे. स्पष्टीकरणात्मक टीका आहेत, तत्त्वज्ञानात्मक प्रमेयें आहेत, निर्यमक श्लोकरचना आहे, श्रीकृष्णगुणवर्णनपर कथात्मक काव्यें आहेत, वर्णनात्मक भावगीतें आहेत, अनेक वृत्तांचें वैभव दर्शविणारींही काव्यें आहेत. असें अनेक प्रकारचें सर्वांगसुंदर वाङ्मय निर्माण करणारा व तें आस्थापूर्वक जोपासून ठेवणारा महानुभाव पंथ, प्राचीन वाङ्मयसेवकांच्या व मराठी भाषाभिमान्यांच्या कौतुकाचा विषय व्हावा यांत आश्चर्य तें काय?

महाबळेश्वरः—हें मुंबई इलाख्यांतील प्रमुख थंड हवेचें ठिकाण आहे. सातारा जिल्ह्यांतील जावळी तालुक्यांत हें ठिकाण मोडतें. याची उंची समुद्रसपाटीपासून ४५०० ते ४७०० फूट इतकी आहे. या ठिकाणाकडे जावयास महाड, पुणें व वाठार असे तीन मार्ग आहेत. हें ठिकाण अद्यावत् सुखसोयींनीं युक्त असल्यानें पावसाळ्याखेरीज इतर ऋतूंत व विशेषतः उन्हाळ्यांत येथें सुखवस्तु लोकांची गर्दी खूप असते. मुंबईच्या गव्हर्नरचें ऑफिस एप्रिल ते जूनपर्यंत येथें ठेवीत असत.

या ठिकाणची निसर्गशोभा अत्यंत प्रेक्षणीय असते. येथील मुख्य प्रेक्षणीय स्थळें म्हणजे आर्थरसीट, एल्फिन्स्टन, सिडने, बॉबे, फॉकलंड, सासून हीं होत.

येथील डोंगराळ प्रदेशांतहि अनेक प्रेक्षणीय स्थळें आहेत. त्यांत प्रतापगड, कमळगड, मकरंदगड, जुन्या महाबळेश्वराचा कृष्णेचा उगम वगैरे होत. येथें ४३८५ फूट उंचीचें देवालय असून त्यास पुण्यक्षेत्राचें महत्त्व आहे.

महारोग (Leprosy):—'बॅसिलस् लेप्री' नांवाच्या एका विशिष्ट जंतूमुळें हा रोग उद्भवतो. महारोगाचे जंतु साधारणपणें क्षयाच्या जंतूप्रमाणेंच असतात. रोग्याच्या अंगावर जे व्रण असतात त्यांत, तसेंच

रोग्याच्या शेंबडांत हे जंतु विपुल आढळतात. **कारणें**–माशासारखें कांहीं विशिष्ट पदार्थ खाल्ल्यानें हा रोग जडतो अशी समजूत आहे ती भ्रामक आहे. त्याचप्रमाणें इतर कोणत्या प्राण्यापासून हा रोग मनुष्यांत पसरतो असें नसून, एका रोग्यापासून संसर्गानेंच हा रोग दुसऱ्या मनुष्यास जडतो. कदाचित् अंगावरील उवा, ढेकूण, डांस इत्यादि कीटक रोग्यास दंश करून दूषित होतात व तशा स्थितींत दुसऱ्या मनुष्यास चावून त्यांत रोगजंतू घालतात असें असणें अधिक संभवनीय आहे. कारण एकाद्यास महारोग जडला म्हणजे त्याच्या सान्निध्यांतील कुटुंबीयांतहि हा रोग पछाडतो असें दिसून येतें. म्हणून रोग्यांचा संसर्गच बाधक समजला पाहिजे. बाकी हेंहि खरें आहे कीं बहुधा अति गलिच्छ राहणीच्या व अस्वच्छ संवयींच्या माणसांस हा रोग जडण्याचा विशेष संभव असतो. **लक्षणें**–महारोग्याचे दोन प्रकार आढळतात. आरंभीं वरचेवर ताप येऊन डोकें दुखणें व सर्वांग ठणकणें हीं लक्षणें असतात. किंवा अंगावर कांहीं भाग गार वाटणें, कांहीं भाग बधिर वाटणें किंवा सर्वांगास अगर हात, पाय वगैरे एकाद्याच भागास खूप घाम सुटणें हींहि लक्षणें उद्भवतात. नंतर चेहऱ्यावर व हातापायांवर गांठीं उठतात. या ग्रंथि कपाळ, नाक, कान, ओठ या भागांवर विशेष असतात. दाढी, मिशा, भुंवया यांचे केस झडतात व नंतर भुंवया नाक, बोटें हात, पाय इत्यादि अवयव कुजूं लागून झडतात.

महारोगाच्या दुसऱ्या प्रकारांत मज्जातंतूंवर विशेष परिणाम घडत असतो व त्यामुळें संवेदनाशक्ति नष्ट होते. परंतु ही शक्ति नाहींशी होण्यापूर्वी कांहीं काल हातापायांतून भयंकर कळा किंवा दाह उद्भवल्याचें आढळतें. त्यानंतर त्वचेवर कांहीं डाग दिसूं लागतात. हे डाग प्रारंभीं लालसर असले तरी लवकर पांढुरके होतात व त्यांचें स्पर्शज्ञान नष्ट होतें, केस गळतात, त्वचा सुरकुततें किंवा खवल्याप्रमाणें खडबडीत होते. हळुहळू हातापायांचे स्नायूहि निःशक्त होतात. बोटें वगैरे अवयवहि सडूं लागतात. **उपाय**–महारोग्याची वर्दी म्युनिसिपल आरोग्य खात्यास ताबडतोब दिली पाहिजे. महारोग्यासाठीं स्वतंत्र व इतर वस्तीपासून दूर अंतरावर इस्पितळें बांधलेलीं असतात. त्यांमध्यें या रोगावर व्यवस्थित उपचार होऊं शकतो. रोगाचीं लक्षणें दिसूं लागतांच उपाय सुरूं केल्यास रोग बरा होण्याचा जास्त संभव असतो. यासाठीं रोगाचें निदान लवकर होणें अगत्याचें आहे.

शालमोग्रा तेलाचा व या तेलापासून काढलेल्या गायनोकार्डेट किंवा हिडनोकार्पेट क्षारांच्या इंजेक्शनांचा उपयोग पुष्कळ होतो; मात्र हे उपाय पुष्कळ वर्षेंहि चालूं ठेवावे लागतात. पूर्वी हा रोग अगदीं असाध्य गणला जात असे. हल्लींच्या शास्त्रीय शोधांच्या या उपायांपासून रोग बरा होण्याचा संभव वाढला आहे. म्हणून तज्ज्ञांचे सल्ल्यानें उपाय करणें जरूर आहे.

महावीर–जैनधर्माचा संस्थापक व त्या जैन धर्मांतील २४ वा तीर्थंकर. चांगल्या थोर क्षत्रिय कुलांत खि. पू. ५९९ च्या सुमारास (चैत्र शुद्ध १३ स) वैशाली येथें याचा जन्म झाला. नांव वर्धमान असें ठेविलें. वडील सिद्धार्थ व आई त्रिशला. वैशालीचा राजा चेतक हा वर्धमानाचा मामा व मगधाचा राजा बिंबसार हा त्याच्या मामेबहिणीचा नवरा. याप्रमाणें राजकुलाशीं त्याचा निकट संबंध होता. वर्धमानाला नंदिवर्धन नांवाचा एक भाऊ व सुदर्शना म्हणून एक बहीण होती. यशोदा नामक स्त्रीशीं वर्धमानानें चांगला सुखानें संसार केला. पण पुढें त्याला उपरति होऊन सर्व स्वजनांच्या संमतीनें त्यानें संन्यास घेतला व बारा वर्षें बंगाल प्रांतभर हिंडून कडकडीत तपाचरण केलें. तेव्हां त्याला 'जिन' पदाची प्राप्ति झाली. त्याला सिद्ध, सर्वज्ञ, अर्हत इ. अभिधानें मिळून तो उच्च कोटीला पोंचला.

याप्रमाणें महावीरांनीं आपला उद्धार करून घेऊन, जुन्या धर्मांतूनच आपल्या नवीन धर्माचीं तत्त्वें निवडलीं व उपदेशास प्रारंभ केला. सुमारें १४००० शिष्य मिळविले. या जैनधर्मांत आत्म्याला परमोच्च स्थान आहे. याखेरीज दुसरा परमेश्वर नाहीं. प्रत्येक चराचर वस्तूस जीव आहे. देह मारून, अहिंसा आणि तपाचरण यायोगें आत्म्याची उन्नति प्रत्येकानें करून घ्यावयाची आहे. श्वेतांबर आणि दिगंबर असे दोन प्रमुख पंथ या धर्माचे आहेत.

तीस वर्षें धर्मोपदेश करून खि. पू. ५७७ च्या सुमारास (आश्विन अमावास्येस) महावीर निर्वाणाप्रत पावले.

महाशिवरात्र:–माघ वद्य चतुर्दशीस महाशिवरात्र म्हणतात. स्मार्त हिंदु या दिवशीं शंकराची आराधना

करितात. सर्व स्मार्त हिंदु या दिवशीं उपवास करतात. भगवान शंकराची आराधना शुचिर्भूत शरीरानें व मनानें केल्यास सर्व पापें नाश होऊन कैलासप्राप्ती होते असें या दिवसाचें महात्म्य आहे. त्र्यंबकेश्वर, गोकर्ण महाबळेश्वर, बनारस, भुवनेश्वर इत्यादि ठिकाणीं मोठ्या यात्रा व उत्सव चालतात. नेपाळांत पशुपतेश्वराच्या यात्रेकरतां यावेळीं सर्व हिंदूंना अनिर्बंध प्रवेश मिळतो.

मॅकडोनल्ड, जेम्स रॅम्से (१८६६–१९३७):– ब्रिटिश मुत्सद्दी. हिंदुस्थानच्या राजकारणाशीं या मुत्सद्याचा पुष्कळच संबंध आला आहे. यांचा जन्म १२ आक्टोबर १८६६ रोजीं लॉसीमाउथ (स्कॉटलंड) येथें झाला. अल्प शिक्षणानंतर त्यांनीं शिक्षकाचा व्यवसाय पत्करला. १९०० सालीं ते मजूर पक्षाचे (Labour Party) चिटणीस झाले. हें काम त्यांनीं १९११ पर्यंत केलें. १९११ मध्यें मजूरपक्षाचे पुढारी म्हणून त्यांची निवड झाली. १९१४ मध्यें ब्रिटिश मजूरपक्षामधून स्वतंत्र मजूरपक्ष फुटून बाहेर पडला. या पक्षाचे पुढारी व अध्यक्ष मॅकडोनल्डहि बाहेर पडले. महायुद्धाविरुद्ध यांचीं मतें होतीं. १९०६ मध्यें अॅबरव्हॉनशायरतर्फे ते पार्लमेंटमध्यें प्रथम निवडून आले. १९१२ मध्यें विरोधी पक्षाचें नेतृत्व त्यांनीं स्वीकारलें. २१ जानेवारी १९२४ रोजीं स्टॅन्ले बाल्डविन यांच्या सरकारचा पराभव झाला व मजूरपक्ष अधिकारारूढ झाला. यावेळीं रॅम्से मॅकडोनल्ड प्रथम मुख्य प्रधान झाले. पण त्याच वर्षी नोव्हेंबरमध्यें त्यांना प्रधानकीचा राजीनामा द्यावा लागला. पुन्हां १९२९ च्या निवडणुकींत मजूरपक्ष अधिकारारूढ झाला व मॅकडोनल्ड मुख्य प्रधान झाले. जागतिक शांतता नांदावी म्हणून यांनीं खूप खटपट केली. कॅनडा व अमेरिका या राष्ट्रांना भेटी देऊन विचारविनिमय केला. सरकारी रीत्या अमेरिकेस (U. S. A.) भेट देणारे हेच पहिले ब्रिटिश मुख्य प्रधान होत.



रॅम्से मॅक्डोनल्ड

१९३१ मध्यें आर्थिक प्रश्नावर मजूरपक्ष फुटला व मजूरपक्षाचें मंत्रिमंडळ मोडलें. ऑक्टोबर १९३१ मध्यें सीहॅमतर्फे पार्लमेंटमध्यें पुन्हां निवडून येऊन त्यांनीं राष्ट्रीय प्रधानमंडळ बनविलें व त्याचे ते मुख्य प्रधान झाले. १९३२ च्या लॉसेन परिषदेचे व १९३३ च्या जागतिक आर्थिक परिषदेचे ते अध्यक्ष होते. १९३३ मध्यें यांनीं प्रेसिडेंट रूझवेल्ट यांना भेटून पुन्हां विचार विनिमय केला. १९३५ च्या जूनमध्यें प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें मुख्य प्रधानकीचा राजीनामा देऊन कौन्सिलच्या लॉर्ड प्रेसिडेंटची जागा स्वीकारली. १९३५ च्या निवडणुकींत त्यांचा पराजय झाला, पण फेब्रुवारी १९३५ मध्यें एका पोटनिवडणुकींत स्कॉटिश विद्यापीठांतर्फे निवडून आले व त्यांना पुन्हां प्रधानमंडळांत जागा मिळाली. पण मे १९३७ मध्यें बाल्डविनबरोबरच यांनींहि राजीनामा दिला. राज्यारोहणाचे वेळीं यांना सरदारी देऊं केली असतां त्यांनीं ती नाकारली.

यानंतर प्रकृतीला आराम वाटावा म्हणून दक्षिण अमेरिकेस जाऊन विश्रांती घेण्याचें ठरवून आपली मुलगी शेला हिच्यासह ते प्रवासास निघाले; पण अमेरिकेस पोंचण्यापूर्वी बोटीवरच ९ नोव्हेंबर १९३७ रोजीं ते मृत्युवश झाले. तेथून त्यांचें प्रेत आणून त्यांच्या जन्मस्थळीं पुरण्यांत आलें.

हिंदुस्थानचे कैवारी म्हणून त्यांचा अनेक हिंदी पुढाऱ्यांनीं उल्लेख केलेला आहे. हिंदुस्थानचे राजकीय भवितव्य ठरविण्यासाठीं ज्या तीन गोलमेज परिषदा लंडन येथें झाल्या त्या यांच्याच कारकीर्दींत. पुण्याचा करार व जातिनिर्णयहि यांच्याच कारकीर्दींत मिळाला. दुर्दैवानें मजूरपक्षाच्या हातीं सत्ता राहिली नाहीं व मॅक्डोनल्ड यांना हातीं सत्ता राखण्यासाठीं इतर पक्षीय सभासदांच्या आहारीं जावें लागलें व अर्थातच मॅकडोनल्ड यांच्या हिंदुस्थानविषयींच्या सहानुभूतीचें पूर्ण फळ हिंदुस्थानच्या पदरांत न पडतां उलट त्याला फाटे फुटले; पण त्याबद्दल मॅकडोनल्ड यांना दोष देण्यांत अर्थ नाहीं.

त्यांचे पुढील ग्रंथ वाचनीय आहेत :–Socialism and Society (१९०५), Labour and Empire (१९०७), Parliament and Revolution (१९१९),

The Awakeniug of India (१९१३) व The Government of India.

मॅक्समुल्लर (१८२३–१९००):–एक प्रसिद्ध अँग्लो-जर्मन भाषाशास्त्रज्ञ व संस्कृतज्ञ. याचा बाप उत्कृष्ट वीणाकाव्य करणारा कवि म्हणून प्रसिद्ध होता. मॅक्स-मुल्लरचा ओढा प्रारंभापासून धर्म, भारतीय तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र या विषयांकडे होता. इ. स. १८४१ सालीं तो प्रवेश परीक्षा झाल्यानंतर लायप्झिक विश्वविद्यालयां-तील प्रो. ब्रोकेअस व बर्लिन येथील विश्वविद्यालयांतील बॉप व शेलिंग तसेंच पॅरिसमधील बर्नफू इत्यादि अनेक पंडितांनीं भाषाशास्त्र, तुलनात्मक धर्म, भारतीय तत्त्वज्ञान वगैरे विषयांचा खोल अभ्यास करण्याबद्दल त्यास प्रोत्साहन दिलें. इ. स. १८४० सालीं मॅक्समुल्लर ऑक्सफोर्ड येथें येऊन कायमपणें राहिला.

इ. स. १८५० सालीं त्याला अर्वाचीन युरोपीय भाषांचा अध्यापक म्हणून नेमण्यांत आलें. इ. स. १८५६ सालीं तो बोडलियन लायब्ररीचा व्यवस्थापक झाला व त्याच वर्षी एम्. ए.ची पदवी त्याला देण्यांत येऊन तो खाइस्ट चर्च या संस्थेचा एक सन्मान्य सभासद झाला. १८७२ सालीं स्ट्रासबर्गच्या विद्या-लयांत त्याचीं व्याख्यानें झालीं; तीं अत्यंत महत्त्वाचीं आहेत. इ. स. १८९२ सालीं त्याला ओरिएण्टल कॉंग्रेसचा अध्यक्ष करण्यांत आलें. इ. स. १८९६ सालीं तो प्रिव्ही कौन्सिलर झाला व लवकरच १९०० सालीं आक्टोबर २९ तारखेस खिस्तवासी झाला.

मॅक्समुल्लरच्या आयुष्यांत, तुलनात्मक भाषाशास्त्र, जगांतील धर्मांचा तुलनात्मक अभ्यास व संस्कृत भाषेचा सूक्ष्म अभ्यास, तसेंच ऋग्वेदसंहितेचें संपादन या गोष्टी त्याच्या महत्त्वाच्या कामगिरीची साक्ष पट-वून देतात.

मॅक्समुल्लरनें अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचें वर्गीकरण खालीं दिल्याप्रमाणें आहे:–(१) Chips from a German Workshop. (२) चरित्रात्मक निबंध. (३) India; What can it teach us? (४) प्राचीन संस्कृत वाङ्मयांचा इतिहास. (५) षड्दर्शनें. (६) Physical Religion. (७) Anthropological Religion. (८) Phychological Religion. (९) Introduction to the Science of Religion. (१०) The sacred Books of the East. हे होत. हे सर्व ग्रंथ मॅक्समुल्लरच्या असामान्य बुद्धिवैभवाचे व अगाध विद्वत्तेचे जिवंत स्मारक होत.

मॅक्स्विनी, टेरेन्स जेम्स (१८८०–१९२०)–आयलँडमधील ' सिन फेन ' पक्षाचा पुढारी, कवि व नाटककार. याचा जन्म कॉर्क येथें २८ मार्च १८८० ला झाला. तेथेंच यांचें खिस्ती बंधूंच्या शाळेंत १८९४ पर्यंत शिक्षण झालें. यानंतर त्यानें शिक्षण बंद करून नोकरी धरली. ती संभाळूनच १९०७ मध्यें टेरेन्सनें बी. ए. ची पदवी मिळविली. विश्वविद्यालयाचें शिक्षण व नोकरी चालू असतांनाच त्याचें काव्य, नाट्यशास्त्र व वाङ्मयाच्या विविधांगां-वरील ग्रंथांचें वाचन व मनन चालू होतें. या उद्यो-गाचा उपयोग त्यास तर झालाच पण त्याच्यामुळें आयरिश वाङ्मयांतहि उत्तम भर पडली. टेरेन्सचा "स्वातंत्र्य–संगीत" हा काव्यसंग्रह १९०७ मध्यें बाहेर पडला. यानंतर 'कूलचा अखेरचा संग्राम' 'व्यवहाराचा बुरखा,' 'क्रांतिकारक' इत्यादि-सारख्या चार उत्तम नाटकांना त्यानें जन्म दिला. याखेरीज त्यानें 'स्वतंत्र्याचीं मूलभूत तत्त्वें' या नांवाची एक उत्तम लेखमाला गुंफली.

त्याच्या या वाङ्मयकार्याबरोबरच इतर प्रकारचेंहि देशोपयोगी कार्य चालू होतेंच. हें करण्यासाठीं त्यानें प्रथम 'वुल्फ टोन मंडळ' या मंडळाशीं संबंध जोडला. पण तेथील परिस्थिति पूरक नाहीं असें पाहतांच टेरेन्सनें आपला संबंध तोडून 'तरुण आयलँड' या संस्थेशीं जोडला. पुढें त्यानें भाषिक उन्नतीसाठीं 'मातृभाषा-सेवक वाङ्मयमंडळ' सहकाऱ्यांच्या मदतीनें स्थापिलें. त्याचप्रमाणें आपल्या मतांचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून त्यानें १९१४ मध्यें 'फिअराना फेल' नांवाचें वर्तमानपत्र सुरू केलें. हें पत्र अकरा अंक निघून बंद पडलें. १९१५ च्या जुलैला अधिक देशकार्य करतां येण्यासाठीं मॅक्स्विनीनें आपल्या नोकरीचा राजि-नामा दिला. १९१६ च्या जानेवारीपासून १९१८ मे पर्यंतच्या मधल्या काळांत त्यास अनेक वेळां सरकारचा पाहुणचार घ्यावा लागला. १९१८ च्या झालेल्या निवडणुकींत हा तुरुंगांत असूनहि निवडून आला. तसेंच त्याचा मित्र टॉमस कर्टिन याचा खून झाल्या-नंतर ३० मार्च १९२० ला कॉर्कचा नगराध्यक्ष बनला. तसेंच यानें स्वयंसेवकांची चळवळ चांगली नांवारूपास आणून तिला शिस्त लावून

दिली व ती लोकप्रिय करून दाखविली. अंगच्या गुणांमुळें व कामाचा उरक दांडगा असल्यानें हा साऱ्या लोकांचा आवडता पुढारी बनला. हा सिन फेन पक्षाचा कट्टा अभिमानी असून पूर्ण प्रजासत्ताक राज्याचा आग्रही होता. टेरेन्सची स्वयंसेवकांची चळवळ व त्याची वाढती लोकप्रियता सरकारला दिवसेंदिवस असह्य होऊं लागली. म्हणून याला एका खटल्याचें काम पाहत असतां इंग्रज सरकारनें १२ ऑगस्ट १९२० ला कैद करून व राजद्रोहाचा आरोप त्याजवर ठेवून दोन वर्षांची शिक्षा दिली. पण टेरेन्सनें ७४ दिवसांचें खडतर प्रायोपवेशन करून देहत्याग केला व कृतीनें शिक्षेचा फोलपणा जगाच्या निदर्शनास आणला. मेल्यानंतर याचें शव आयर्लंडमध्यें आणून तें पुरलें.

मॅगपी (Magpie):–कावळयाच्या जातीचा हा एक पक्षी आहे. त्याचा तुरा काळ्या लुसलुशीत लवीचा असतो; त्यावर किंचित् हिरव्या व निळ्या रंगाची मजेदार छटा असते; पंखाच्या आंतील भाग पांढरा असतो. त्याची शेंपूट लांब खवचे पडलेली अशी असते. हा मोठा उमदा पक्षी असतो. तो गोगलगायी व किडे यांवर जगतो. याचें घरटें चिखल व काट-कुट्यांचें असून त्यास वरून एक घुमट व एका बाजूला प्रवेशद्वार असतें. घरट्याचा एकंदर आकार मोठाच असतो. या पक्षाच्या जाती पश्चिम व उत्तर अमेरिकेंत ठिकठिकाणीं अलास्कापासून मेक्सिकोपर्यंत सांपडतात. युरोप व आशियांतहि या जाती सांपडतात; पण त्यांत थोडा फरक आहे.

मङ्गेनीज्:–हा एक मूळधातु आहे. त्याचें अणु-वजन ६४·९ व दार्ढ्य ७·१३ ते ८ पर्यंत असतें. त्याचा द्रवबिंदु १२०७° सेंटीग्रेड असतो. हा धातु शुद्ध स्वरूपांत असतां कठीण असतो. याचा रंग पांढरा, त्यास थोडी तांबडी छटा व Cast iron प्रमाणें पुष्कळ वेळां दिसतो. तो ठिसूळ असतो. त्याच्या-वर चांगली झिलई देतां येते; पण लवकरच हवेमुळें त्यावर ठिपके पडतात, नेहमींच्या उष्णता-मानांतहि त्याचें पाण्यांत पृथक्करण होतें. पाणी उष्ण असलें तर हें पृथक्करण अधिक जलदीनें होतें. हा धातू थंड असतांहि ॲसिडमध्यें विरघळतो.

Pyrolusite हा खनिज पदार्थ म्हणजे मँगेनीजचा Oxide. तो प्राचीन लोकांस बहुधा माहीत असावा; यालाच मॅग्नेशिया असें नांव प्लिनी या शास्त्र-ज्ञानें ठेवलें. कित्येक शतकें त्यास कच्चें लोखंड असें मानण्यांत येत असे; याचा उपयोग कांच तयार करतांना त्यावर हिरव्या छटा येऊं नयेत म्हणून होई. अठराव्या शतकापर्यंत त्यांत लोखंडाचे फक्त अल्पांश आहेत हें कुणास माहीत नव्हतें. इ. स. १७७४ सालीं जे. सी. गॅन् या स्वीडिश रसायन–शास्त्र-ज्ञानें प्रथम त्याचें पृथक्करण केलें. इ. स. १८०८ सालीं त्यास प्रथम मँगेनीज असें नांव देण्यांत आलें. मँगे-नीजचे एकूण पांच प्रकार आहेत.

या सर्व कच्च्या धातूंत थोडें रुपें व शिसें असूं शकतें. कांच तयार करतांना यापैकीं बऱ्याच धातूंचा उपयोग तसाच करण्यांत येतो. उदाहरणार्थ–अंबर रंग तयार करतांना, चिनीमातीचीं भांडीं, कौलें व विटा यांना रंग देतांना यांचा उपयोग होतो. सूत व इतर पदार्थ धुवट करण्यासाठीं या पदार्थांचा चांग-लाच उपयोग होतो.

ही धातू थोड्या प्रमाणांत खनिज पाण्यांत व Cereal व कांहीं भाजीपाला व वनस्पती यांत अस-ल्याचेंहि आढळून आलें आहे.

मॅङ्गेनीजच्या Oxideच्या सहा जाती आहेत. या सर्वांत महत्त्वाची म्हणजे Dioxide किंवा मॅङ्गेनीजची काळी ऑक्साइड. काळा ऑक्साइड मँगेनेट व सोडियम परमँगेनेट यांपासून मॅङ्गेनीज क्षार तयार करण्यांत येतात. याऐवजीं हिरवा व तांबडा जंतुनाशक द्रव पदार्थ तयार करणारा पोटॅशियम पदार्थ वापरला तरी चालतो. मॅङ्गेनीजची एक महत्त्वाची कसोटी म्हणजे मांसाच्या रंगाचा सल्फाइड तयार होणें. हा सल्फाइड ॲसिडमध्यें तात्काळ विरघळून जातो; त्याचप्रमाणें दुसरी कसोटी म्हणजे हिरव्या मँगेनेटची व गडद तांबड्या परमँगेटची निपज होणें ही होय.

निर्भेळ धातू म्हणून तशीच कोणत्याही कलेच्या कामांत योजत नाहींत. मिश्रधातु म्हणून तिचा उपयोग मोठ्या प्रमाणांत केला जातो. अनेक प्रकारचें पोलाद, जर्मन सिल्व्हर, मॅङ्गेनीज ब्राँझ व पितळ हीं तयार करतांना या मिश्रधातूचा उपयोग होतो. Spiegeleisen Ferro-manganese हे दोन महत्त्वाचे मिश्रधातू होत. याशिवाय हेन्स्लरनें केलेला एक मिश्रधातू महत्त्वाचा आहे. हा तांबें, ॲल्युमिनियम व मॅङ्गेनीज यांचा तयार केलेला

असतो. वर सांगितलेल्या उपयोगाशिवाय, कोरडे विद्युत्घट तयार करण्याकडेही यांचा उपयोग होतो. एके काळीं क्लोरिन तयार करण्याचे कामींहि याचा उपयोग करण्यांत आला होता. कच्ची मॅङ्गेनीज रशिया, हिंदुस्थान, ब्राझिल, जर्मनी, स्वीडन, इटली, स्पेन, जपान, क्यूबा, कोस्टा, रिकापनामा व युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका या भागांत सांपडते.


मॅचिआव्हेली, निकोलो डी बर्नर्डो डी (१४६९–१५२७):–हा एक इटालियन ग्रंथकार व मुत्सद्दी. एका जुन्या टस्कन कुटुंबांतील कायदे पंडिताचा मुलगा. याचा जन्म फ्लॉरेन्स येथें ता. ३ मे १४६९ रोजीं झाला. त्यानें आपलें शिक्षण मुख्यतः खासगी रीतीनें मिळविलें. १४९८ मध्यें मेडिसीच्या उच्चाटनानंतर व फ्लॉरेन्सच्या लोकसत्ताक राज्याच्या स्थापनेनंतर चार वर्षांनीं तो 'टेन'चा सेक्रेटरी झाला. 'टेन' ही एक युद्धविषयक काम पाहणाऱ्या व अंतर्गत राज्यव्यवस्था पाहणाऱ्या अधिकारी मंडळाची चॅन्सरी (कचेरी) होय. प्राचीन रोमविषयींच्या प्रेमामुळें तो आपलें काम मोठ्या उत्साहानें करीत असे. कित्येक वेळां त्याजवर राजकीय कार्यें सोपविण्यांत आलीं होतीं. या जागेवर तो **१५१२** मध्यें मेडिसी परत येईपर्यंत होता. त्यानंतर त्याचा आश्रयदाता गॉनफॅलानियर सोडेरिनी हा अधिकारभ्रष्ट झाल्यामुळें तो स्वतः पेचांत आला. बोस्कोली व कॅपोनी यांनीं प्रजासत्ताक राज्याची पुन्हां स्थापना करण्याकरितां केलेल्या प्रयत्नांत सामील झाल्याबद्दल मचिआव्हेलीला तुरुंगवास घडला. पुष्कळ छळ करून लवकरच त्याला सोडून देण्यांत आलें.

मेडिसीच्या अधिपत्याखालीं कोणत्या का प्रकारचें होईना लोकसत्ताक राज्य बनवतां येईल अशा विश्वासानें मेडिसीला सहाय्य देण्याचा आपला हेतु त्यानें प्रगट केला. पण त्याला कोणतेंहि महत्त्वाचें काम सांगण्यांत आलें नाहीं. फ्लॉरेन्सपासून सात मैलांवर असणाऱ्या सॅन कॅसियानो नजीकच्या आपल्या उद्यानगृहांत रहावयास गेला. तेथें त्यानें Il Principe (The principle) व Discorsi नामक ग्रंथ लिहिले. १५२० मध्यें त्यानें Arte della Guerra (Art of war) हा ग्रंथ लिहिला. त्याच वर्षी फ्लॉरेन्सचा इतिहास लिहिण्याचें काम त्याजवर Giulio de' Medici (त्यानंतर जो पोप क्लेमंट सातवा झाला) यानें सोपविलें. त्यानें बरींच आनंदपर्यवसायी नाटकें लिहिलीं. त्याचें La Mandragola हें तत्कालिन समाजस्थितीचें निदर्शक नाटक इटालीयन रंगभूमीवर फार गाजलें. मेडिसीचें फ्लॉरेन्समधून उच्चाटन झालें. मॅचिऑव्हेलीची पुनः नोकरी मिळण्याच्या बाबतींत निराशा झाली. तो २२ जून १५२७ रोजीं मरण पावला. त्याच्या पाठीमागें मॅरिटा कार्सिनी नांवाच्या पत्नीपासून झालेले त्याचे चार मुलगे व एक मुलगी असा परिवार होता. त्याचें शव Santo Croce येथें पुरण्यांत आलें. १७८७ सालीं त्याच्या स्मरणार्थ एक छत्री उभारण्यांत आली.

Prince आणि Discourses या दोन ग्रंथांमुळें त्याची फार कीर्ति झाली. या दोन ग्रंथांचे विषय अनुक्रमें मुख्याधिकार(Principalities) व लोकसत्ताक राज्य हे होत. आपल्या मुख्य विषयाचें प्रतिपादन त्यानें तत्कालिन राज्यकर्त्यांचा उल्लेख करून दाखले देऊन केलें आहे. सरकार राखावयाचें व तें राखण्याकरतां सूक्तासूक्त उपाय अमलांत आणावयाचे असें तत्त्व त्यानें प्रतिपादलें. राज्यकारभारांत नीतिमत्तेला स्थान नाहीं, सिंहाचें शौर्य व कोल्ह्याचा कावेबाजपणा हे दोन्ही गुण राज्यकर्त्यांचे अंगीं असले पाहिजेत असें त्याचें मत होतें. जग होतें तसेंच आहे; मानवी प्राण्यांत बरावाईट फरक पडत नाहीं असें त्यानें प्रतिपादिलें.

चार शतकेंपर्यंत मॅचिआव्हेलीच्या नांवाचा पुष्कळ अंशीं गैरसमजामुळें शिवीसारखा उपयोग करण्यांत आला. एकट्या इलिझाबेथकालीन वाङ्मयांतच त्याचा शेकडों ठिकाणीं सैतानाशीं संबंध जोडण्यांत आला आहे. Prince हा ग्रंथ ग्रंथकारानें प्रसिद्ध केला नसल्यामुळें त्याचा पाठ विवाद्य होऊन बसला आहे. परंतु सदर ग्रंथाच्या सुलभ व काटेकोर लेखनशैलीसंबंधानें टीकाकारांचें एकमत आहे.

मॅजिक लॅन्टर्नः–पारदर्शक चित्र पडद्यावर मोठ्या प्रमाणांत दाखविण्याचें यंत्र. या यंत्राचे पुढीलप्रमाणें महत्वाचे भाग असतात. १ बाहेरची पेटी. ही पेटी लाकडाची किंवा धातूच्या पत्र्याची असते व तींत बाहेरून मुळींच प्रकाश आंत शिरूं शकत नाहीं. २ प्रकाश (प्रकाशज्योत). हा प्रकाश आणखी प्रखर व्हावा म्हणून प्रकाशज्योतीमागें अंतर्वक्र आरसा (Concave mirror) बसविलेला असतो. ३ (कन्डेन्सर) प्रकाशसंचायक. ४ पारदर्शक चित्र किंवा स्लाइड व ५ चित्र मोठें करणारी कांच (Magnifying glass) किंवा महत्कारी कांच. संचायकाचें (ही कांचच असते)



जादूचा दिवा (Magic Lantern)

भ = अंतर्वक्र आरसा, ल = संचायक (कन्डेन्सर) अ – ब = स्लाइड, क = महत्कारी कांच (चित्र मोठें करणारी लेन्स). फ = फोकसिंग स्क्रू.


कार्य सर्व प्रकाशकिरण एकत्रित करून पुढच्या चित्रावर फेकण्याचें असतें. चित्रामधून जाणारे प्रकाशकिरण महत्कारी कांचेमधून उलटे होऊन समोरच्या पडद्यावर पडतात; म्हणून स्लाइड नेहमीं उलटी ठेवावी लागते.

एखाद्या विषयाच्या अभ्यासासाठीं म्हणून शाळा-कॉलेजांतून किंवा व्याख्यानांतून मॅजिक लॅन्टर्नचा फार चांगला उपयोग होतो.

मॅझिनी, जोसेफ (१८०५–१८७२):–या इटालियन देशभक्ताचा जन्म ता. २५ जून १८०५ रोजीं जेनोआमध्यें झाला. त्याचा बाप वैद्य असून विद्यापीठांत प्राध्यापकहि होता. वैद्य होण्याच्या हेतूनें त्यानें अभ्यासास सुरवात केली; परंतु हा मार्ग मध्येंच सोडून त्यानें आपली दृष्टी कायद्याच्या अभ्यासाकडे वळविली व १८२६ सालीं त्या विषयाची त्यानें पदवी घेतली. त्यानें वकिलीच्या धंद्यास सुरवातहि केली. परंतु स्वदेशप्रेम व वाङ्मयाची आवड यामुळें त्याच्या आयुष्यास निराळेंच वळण लागलें. तो वाङ्मयावर व राजकीय विषयांवर नियतकालिकांत लेख लिहूं लागला. त्या लेखांत प्रतिपादिलेल्या उदार मतामुळें ते छापणारी पत्रें सत्ताधाऱ्यांच्या दडपशाहीला बळी पडूं लागलीं. तो कार्बोनरी संस्थेला मिळाला. त्या संस्थेच्या अराजक कार्यांत भाग घेतल्याच्या आरोपावरून त्याला अटक करून सॅव्होना येथें ठेवण्यांत आलें. १८३२ सालीं त्याची तुरुंगांतून सुटका झाली; पण मार्सेलिस येथें त्याला हद्दपार करण्यांत आलें. त्याच्या गुप्त राजकारणाला भिऊन फ्रेंच सरकारनें त्याला स्वित्झर्लंड् येथें जावयास लावलें. त्यापुढील पांच वर्षें त्यानें विविध प्रकारच्या क्रान्तीकारक चळवळींची योजना व त्याप्रीत्यर्थ संघटना करण्यांत घालविलीं; पण त्याचे ते प्रयत्न फसले. १८३७ सालीं स्विस सत्ताधाऱ्यांनीं त्याला स्वित्झर्लंडमधून हाकलल्यावरून तो आसऱ्याकरितां लंडनला गेला.

१८४८च्या क्रान्तीच्या समयीं तो इटलीला परत गेला. कांहीं काल त्यानें गॅरिबाल्डीच्या हाताखालीं काम केलें व पोपनें रोमहून पलायन केल्यानंतर तेथील अल्पजीवि लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष झाला. पुढें त्यानें बंड करण्याच्या वेगवेगळ्या योजना चालूंच ठेविल्या. गॅरिबाल्डीला सिसिलीच्या मोहिमेंत जें यश मिळालें त्याचें बरेचसें श्रेय मॅझिनीला आहे. इटालीचें संयोगीकरण राजसत्तेखालीं झाल्यानंतर त्याचें कार्य संपलें. त्यानें केलेल्या लोकसत्ताक राज्याच्या योजनेप्रमाणें इटलीचें एकीकरण घडून आलें नाहीं, म्हणून त्याची निराशा झाली. त्याचें उत्तर आयुष्य लंडन व ल्यूगॅनो येथेंच बहुतांशीं गेलें. मॅझिनीला इंग्रजी व फ्रेंच भाषा चांगल्या प्रकारें येत होत्या. तो १८७२ सालीं मृत्यु पावला.

माकड:–सस्तन जातींतील दोन हात, दोन पाय असलेला प्राणी. माकडें आपण वारंवार पाहतों. झाडांच्या फांद्यावरून उड्या मारतांना किंवा गांवांतील छपरा–छपरांवरून उड्या मारीत भक्ष्य शोधीत माकडें हिंडतांना आपल्याला पुष्कळ वेळां दिसतात. यांना वानर (वांदर) हेंहि एक नांव आहे. वानरांच्या शरीराची ठेवण मनुष्याच्या शरीराच्या ठेवणीशीं बरीच संबंधित आहे व मनुष्य म्हणजे उत्क्रांतितत्त्वानुसार वानराची झालेली वाढच असें एक मत प्रचलित आहे; आणि म्हणूनच माकडांना मनुष्याचे पूर्वज मानतात. हिंदूंच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें मानवांचा मूळ पुरुष मनू हा होय. पण वानरांपैकीं वाली, सुग्रीव व हनुमान हीं नांवें आपल्या पूर्ण परिचयाचीं आहेत. या वानरांची मनुष्याच्या बुद्धीइतकीच वाढ झालेली होती व त्यांची मानवाप्रमाणेंच राज्यें होतीं अशा कथा रामायणांत सांपडतात. हे वानर मनुष्यांच्याच आवाजासारखे आवाज काढून मनुष्यांचीच भाषा बोलत व मनुष्यांचींच आयुधें युद्धांत वापरीत हीं गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. तेव्हां त्यांचें एवढें हें विलक्षण साम्य (शेपूट सोडून) पाहूनच त्यांना वा–नर=वानर



१ लाल तोंडाच्या माकडाची एक जात. २ काळ्या तोंडाच्या वानराची एक जात. ३ वांदर ४ बबून (लाल तोंड व पांढरे केस). ५ मांडरिल (तोंडाभोंवतीं लाल केंस, लाल तोंड व निळेंकाळें नाक). ६ चिंपनीझ. ७ ओरँग ओटांग.

म्हणजे पशू वा नर या अर्थानें वानर हें नांव रूढ झालें असावें असें कांहीं म्हणतात.

माकडांपैकीं कांहीं जाती केवळ शाकाहारी आहेत तर कांहीं मांसाहारीहि आहेत. कांहींची शेपूट लांब असते तर गोरिला वानराला शेपूटच नसते. आपल्या इकडे दिसणाऱ्या माकडांची उंची साधारण तीन फुटापर्यंत असते तर आफ्रिकेंतील गोरिलासारख्या माकडांची उंची जवळ जवळ मनुष्याइतकीच असते. करडा, पांढरा, बांडा व काळा या रंगांची लव असलेली माकडें आढळतात. माकडें चीत्कार करीत इकडून तिकडे उड्या मारतात. हा एक निरुपद्रवी प्राणी आहे तसाच तो विशेष उपयोगी आहे असेंहि नाहीं. युरोपांत माकडांच्या कातड्यांचा अल्प प्रमाणांत व्यापार चालतो. एखाद्या प्राणिसंग्रहालयांत जाऊन माकडांच्या निरनिराळ्या जाती जरूर पाहाव्या.

माकड व वानर यांत एक महत्वाचा फरक आहे तो असा कीं माकडाची शेपूट आखुड असून तोंड लाल असतें. तर वानराची (वांदर) शेपूट लांब असते व तोंड काळें असतें.

माघः—हिंदूंच्या कालमानपद्धतीप्रमाणें येणारा वर्षातील हा अकरावा महिना आहे. हा महिना इंग्रजी फेब्रुवारी महिन्याच्या सुमारास व वसंतऋतूचे आरंभीं येतो. या महिन्यांतील शुक्ल पौर्णिमा ही मघा नक्षत्रानें युक्त असते म्हणून यास ‘ माघ ’ असें म्हणतात. वेदकालीं या महिन्यास ‘ तपस् ’ असें नांव होतें. या महिन्यांत तीर्थाचे ठिकाणीं स्नान केलें असतां पुण्य प्राप्त होतें म्हणून प्रयागसारख्या क्षेत्राच्या ठिकाणीं स्त्री व पुरुष क्षौर करून स्नानें करतात. स्त्रिया वेणीदान करतात. या महिन्यापासून विवाहादि मंगलकार्यास चातुर्मास्यानंतर सुरवात होते. मंगलकार्यास हा महिना शुभ मानला आहे. माघ शुक्ल पंचमीला वसंतपंचमी व सप्तमीला रथसप्तमी हे उत्सव करतात. माघ वद्य नवमीस दासनवमी नांवाचा श्रीसमर्थ रामदास स्वामींचा जयंत्युत्सव करतात. माघांतील श्रेष्ठ उत्सव म्हटला म्हणजे शिवरात्र हा होय.

माघ महिन्यांत उत्तरायणाबरोबर वसंतकालाचा आरंभ होतो. वसंतकाल हा सर्व ऋतूंत अत्यंत उत्साहवर्धक ऋतु असून सृष्टिदेवता यावेळीं सुरमणीय स्वरूप धारण करते, कोकिलादि पक्षी गाऊं लागतात, सर्वत्र नवचैतन्य संपूर्ण भरून राहतें. हा ऋतु रति व मदन यांचा ऋतु आहे असेंहि मानण्यांत येतें. रोमन लोकहि वसंतपंचमीचा उत्सव वसंताचे प्रीत्यर्थ करीत. हिंदु लोक या दिवशीं लक्ष्मी व विष्णु यांची पूजा व

उत्सव करतात. रथसप्तमीचा उत्सव सूर्यदेवाप्रीत्यर्थ करतात. सूर्याकडून मानवी सुखास साह्यभूत अशा गोष्टी घडून येत असल्यामुळें सूर्यास प्राक्कालीं देव मानूं लागले व सूर्योपासना सुरू झाली. ती हिंदुस्थानांतच न थांबतां इराण, एशिया मायनर, रोम व ग्रीस या देशांपर्यंत जाऊन पोहोंचली होती. सूर्यनारायणाची स्वारी या दिवशीं सात घोडे जुंपलेल्या नवीन रथांतून आकाशमार्गानें जावयास निघते म्हणून यास रथसप्तमी म्हणतात व या दिवशीं पाटावर रथ काढून त्यांत सूर्याची मूर्ती काढून त्याची पूजा करतात.

प्रत्येक महिन्याच्या वद्य १४ स शिवरात्र असें मानतात. पण माघ वद्य १४ ची शिवरात्र विशेष महत्त्वाची गणली जात असल्यामुळें तिला महाशिवरात्र मानून त्या दिवशीं शिवाचे भक्त व शैवपंथी उपास करतात. शिवरात्रीस अनेक ठिकाणीं यात्रा भरतात. श्रीकृष्णसरस्वती जन्मदिन, सज्जनगड–परळी यात्रा, रेंवणसिद्ध यात्रा, गोकर्ण यात्रा इत्यादि यात्रा व उत्सवहि येतात.

मांजर:–सर्व जगभर आढळून येणारा प्राणी. प्राण्यांतील कार्निव्होरा या जातींतील प्राणी. याच्या चार



मांजर

पायाला असलेल्या तीक्ष्ण नख्या त्याला जरूर त्यावेळीं कासवाच्या पायाप्रमाणें बाहेर काढतां येतात. याच्या पायाचे तळवे अगदीं मऊ असल्यामुळें मांजराची चाल ऐकूं येत नाहीं. मांजर रागावलें कीं शेपूट पिंजारतें. यावेळीं तें कानहि टवकारतें व उग्र रूप धारण करतें. मांजराला अडचणींत गांठून त्यावर हल्ला केल्यास मांजर उलटून मनुष्यावर धांवून येतें व प्रसंगीं प्राणघातक हल्लाहि करतें. उंदरांचा त्रास वाचविण्यासाठीं मांजरें सर्वत्र पाळतात. मांजर शाकाहारी व मांसाहारीहि आहे. मांजरानें साप मारल्याचींहि अनेक उदाहरणें आहेत. मांजरी विते तेव्हां तिला सहापर्यंत पिलें होतात. मांजराचे केस अगदीं मऊ असतात. मांजराला मिशा असतात. मांजराला पुढच्या दांतांच्या तीन जोड्या प्रत्येक जबड्यांत असतात, सुळे लांब व तीक्ष्ण असतात. याशिवाय दाढाहि असतात. मांजर आपलें अन्न न चघळतां गिळतें. जीभ खरबरीत असते. ध्रुव प्रदेशाखेरीज मांजर सर्वत्र आढळतें. अलीकडे ध्रुव प्रदेशांतहि जगूं शकेल अशी मांजराची जात तयार करण्यांत आली आहे. मांजराचे रंग निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे आहेत. कांहीं मांजरांच्या अंगावर वाघासारखे पट्टे असतात. कांहींवर चित्त्यासारखे ठिपके असतात. कांहींची लव शुभ्र, पिंगट, काळी व निळी असते. वाघ, चित्ता, सिंह, पूमा वगैरे हिंस्र पशू मांजराच्याच जातीचे आहेत. कोटाच्या खिशांत राहील एवढ्या आकाराच्या मांजरापासून दोन फूट लांब व फूटभर उंच एवढा मांजराचा आकार असतो. रानमांजर पाळीव मांजरापेक्षां दिसतांना व स्वभावतःच क्रूर व शरीरानें मोठें असतें. रानमांजर नेहमीं अरण्यांत किंवा पाणथळीला रानावनांतून राहतें. मांजर झाडावर चढूं शकतें. शिवाय कितीहि उंचीवरून पडलें तरी चारी पायावर उभें राहतें. उंदराचा त्रास वाचविण्यासाठीं अमेरिकेंत मोठमोठ्या कचेऱ्यांतून मांजरें पाळतात. युरोपांत व अमेरिकेंत कांहीं ठिकाणीं म्युनिसिपालिट्यांतर्फे मांजरें पाळून नागरिकांना तीं पुरवतात.

माटे, प्रो. श्रीपाद महादेव, एम्. ए. (१८८६–):– महाराष्ट्रीय विद्वान संपादक व अध्यापक. १८८६ मध्यें यांचा जन्म झाला. न्यू इंग्लिश स्कूल, सातारा व फर्ग्युसन कॉलेजमध्यें एम्. ए. पर्यंत शिक्षण झालें. आरंभीं न्यू इंग्लिश स्कूल पुणें येथें शिक्षक. नंतर नूतन मराठी विद्यालय येथें शिक्षक व पुढें सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें प्रोफेसर म्हणून नेमणूक.

१९०७ पासून लेखनास सुरवात. १९१४ पर्यंत काळ, देशसेवक व केरळ–कोकीळमध्यें लेखन. नंतर 'केसरी'मधून समाज–विचार–माला व अस्पृश्य–

विचार–माला अशा दोन माला गुंफल्या. १९३० पासून केसरीप्रबोध, केळकर ग्रंथ, महाराष्ट्र सांवत्सरिक भाग १,२ व ३; विज्ञान-बोध या ग्रंथांचें संपादन. पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ, अस्पृश्यांचा प्रश्न व परशुरामचरित्र हे दोन स्वतंत्र ग्रंथ लिहिले आहेत. अस्पृश्यांच्या प्रश्नाचा यांनीं सूक्ष्म अभ्यास केलेला असून त्याविषयीं लेख लिहून, शाळा चालवून, व्याख्यानें देऊन व परिषदा भरवून बरेंच कार्य केलें आहे.


प्रो. श्री. म. माटे

मार्मिक विचारसरणीचे उत्कृष्ट व्याख्याते म्हणून बुद्धिजीवि वर्गांत ते ओळखले जातात. सामाजिक, वाङ्मयीन व प्रसंगविशिष्ट व्याख्यानें देऊन त्यांनीं अनेक वेळीं आपल्या बुद्धीची चमक दाखविली आहे. त्यांनीं संपादन केलेले ग्रंथ त्यांच्या संपादनकौशल्याचीं प्रतीकेंच आहेत.

माडखोलकर, गजानन त्र्यंबक (१९००–):– महाराष्ट्रीय टीकाकार व कादंबरीकार. जन्म २८ डिसेंबर १९०० रोजीं मुंबईस झाला. शिक्षण मॅट्रिकपर्यंतच झालें. वयाच्या विसाव्या वर्षींच 'आधुनिक कवि पंचक' हें पुस्तक लिहिलें (१९२०). या पुस्तकामुळें कै. श्री. कृ. कोल्हटकरांशीं यांची ओळख झाली. व ती अखेरपर्यंत टिकली. रा. कोल्हटकरांच्या वाङ्मयाचा व विचारसरणीचा त्यांच्यावर बराच परिणाम झाला आहे तो यामुळें. यानंतर लौकरच त्यांनीं 'विष्णु कृष्ण चिपळूणकर' हा प्रबंध लिहिला. या त्यांच्या लेखामुळेंच श्री. न. चिं. केळकर यांनीं रा. माडखोलकरांची भेट घेऊन केसरी ऑफिसमध्यें बोलाविलें. परंतु इतर लिखाण होणार नाहीं म्हणून त्यांनीं नकार दिला. श्री. न. चिं. केळकर यांच्या बडोदा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणापैकीं काव्यासंबंधींचा भाग रा. माडखोलकरांनीं लिहिला होता. मुंबईस असतांना त्यांनीं आयर्लंडमधील सिन फेन चळवळीवर लेख लिहिले. नंतर ते पुण्यासच ज्ञानप्रकाश कचेरींत दाखल झाले. ज्ञानप्रकाशांत ते 'काव्यशास्त्र-विनोद' हें सदर संपादित असत. ज्ञानप्रकाश कचेरींत असतांना त्यांनीं खूप वाचन केलें व आज त्यांच्या अंगीं दिसणाऱ्या विद्वत्तेची ग्रांथिक तयारी त्यांनीं येथें केली असें म्हणतात. पण स्वभावतःच माडखोलकर जहाल राजकारण वृत्तीचे असल्यामुळें तीन वर्षें पुरीं होण्यापूर्वींच ज्ञानप्रकाश कचेरी सोडून ते नागपुरास गेले व तेथें 'महाराष्ट्र' पत्राच्या संपादक मंडळांत दाखल झाले (१९२५). याच वर्षी त्यांचें लग्नहि नागपुरास झालें व रा. माडखोलकर नागपुरास स्थायिक झाले. पुण्यास असतांना ते रविकिरण मंडळाचे सदस्य झाले.


ग. त्र्यं. माडखोलकर

मुक्तात्मा (१९३३) ही त्यांची पहिली कादंबरी. तींत राजकारणाला स्थान असल्यामुळें व कोमल, मधुर व भावपूर्ण लेखनपद्धतीमुळें व स्पष्ट व्यक्तिदर्शनामुळें कादंबरीकार म्हणून माडखोलकरांना किर्ति मिळाली. या कादंबरीनंतर भंगलेलें देऊळ (१९३४), शाप (१९३६) व कांता (१९३९) या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. पैकीं कांता या कादंबरींत पुन्हां राजकारणाला स्थान मिळालें असून गांधींच्या तत्त्वज्ञानासंबंधीं त्यांतील संवाद त्यांच्या उत्कृष्ट लेखनशैलीचे व तत्त्वग्राही दृष्टीचे द्योतक आहेत.

त्यांनीं अनेक लघुकथाहि लिहिल्या असून 'शुक्राचें चांदणें,' हा त्यांचा कथासंग्रहहि प्रसिद्ध झाला आहे. याशिवाय आधुनिक कविपंचक, विष्णु कृष्ण चिपळूणकर, विलापिका, वाङ्मयविलास व स्वैर विचार या पुस्तकांतून त्यांचे अनेक निबंध, टीका इ. संकलित केलेले आहेत. सध्यां त्यांची 'दुहेरी जीवन' ही कादंबरी क्रमशः प्रसिद्ध होत आहे.

त्यांच्या वाङ्मयांतून डोकावणारें राजकारण हें केवळ वाङ्मयनिर्मितीचा एक भाग म्हणून आलेलें नाहीं. डांगे, पर्वते व जोगळेकर या कम्युनिस्ट पुढाऱ्यांशीं

मुंबईस असतांना त्यांची दाट मैत्री होती व त्यांचे राजकारणासंबंधीं खूप वादविवाद होत असत. मुंबई सोडल्यानंतर तर वृत्तपत्रांशीं संबंध जुळल्यामुळें राजकारण त्यांना कायमचेंच चिकटलें.

पोटाचा व्यवसाय म्हणून जरी ते वृत्तपत्राच्या व्यवसायांत असले व वारंवार राजकारणाशीं जरी त्यांचा संबंध येत असला तरी वृत्तपत्रामधूनहि त्यांनीं साहित्याची कामगिरी केली आहे. वृत्तपत्राकडे अभिप्रायार्थ येणाऱ्या असंख्य व विविध विषयांवरील पुस्तकांवर अभ्यासू परीक्षणें देऊन आपल्या पत्राचें वैशिष्ट्य त्यांनीं सदैव राखलें आहे. त्याशिवाय साहित्यांत वारंवार निर्माण होणाऱ्या प्रश्नावर स्वतंत्र विचार लेखरूपानेंहि त्यांनीं अनेक वेळां व्यक्त केले आहेत. ते स्वतः कवि, टीकाकार, लघुकथालेखक, कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध आहेत. आणि म्हणूनच त्यांच्या टीकांना व परीक्षणांना साहित्यिकांत विशेष मान दिला जातो.

माथेरानः—मुंबई इलाख्यांतील एक थंड हवेचें ठिकाण कुलाबा जिल्ह्यांतील कर्जत तालुक्यांत आहे. नेरळ स्टेशनवरून लाइट रेल्वेनें माथेरानला जातां येतें. या ठिकाणचें वैशिष्ट्य हें कीं या ठिकाणच्या सभोंवार दाट अरण्य आहे; त्यामुळें हें ठिकाण नितांत रम्य दिसतें. उन्हाळ्यांत येथें मुंबईचे अनेक सुखवस्तु लोक, विशेषतः पारशी मोठ्या प्रमाणांत येतात.

माधवराव बल्लाळ पेशवे (१७४५–१७७२):—माधवरावांची माता गोपिकाबाई व पिता बाळाजी. जन्म १६ फेब्रुवारी १७४५. हे पेशवाईतील म्हणजे महाराष्ट्र साम्राज्यांतील चवथे पेशवे म्हणजे मुख्य प्रधान होत. ह्यांची राजवट अवघी ११। वर्षांचीच आणि तीहि वयाच्या १७ व्या वर्षापासून म्हणजे लहान वय असतांच झाली. पण अशी कर्तुकीची झाली कीं ती पाहून कोणासहि कौतुक, आनंद व अभिमानच वाटावा. माधवरावांस राजकारणाचे धडे अनेक प्रसंगानें प्रधानपदानवर येण्यापूर्वीच मिळाले होते व जात्या तो बुद्धिमान होता. कोल्हापूर दत्तकप्रकरणीं वाटाघाट करण्यासाठीं माधवरावच साताऱ्यास ताराबाईकडे गेला होता. पानिपतप्रसंगामुळें पिता नानासाहेब ह्यांचा मृत्यु झाल्यावर अर्थात् पानिपतच्या धक्क्यामुळें उद्भवलेल्या कठीण व क्षीण परिस्थितींत माधवरावास पेशवाई मिळाली (१९ जुलै १७६१).

माधवरावांच्या कारकीर्दीतील मुख्यतः पांच गोष्टी लक्ष्यांत घेण्याजोग्या आहेत. (१) दक्षिणेंतील महाराष्ट्र साम्राज्याचा नवीन व ताज्या दमाचा चिवट शत्रु जो हैदरअल्ली त्याचा पराभव व बंदोबस्त करणें, (२) उत्तरेकडे पानिपतच्या पराभवानें मराठ्यांचा दाब उडाल्यामुळें तिकडील जाठ, रोहिले, प्रवासी, रांगडे ह्यांनीं चालविलेली बंडाळी मोडून दिल्लीची सत्ता स्वाधीन व सुरक्षित ठेवणें, (३) शेजारचा व कायमचा शत्रू जो निजाम त्याच्या उठावणी बंद पाडणें, (४) घरांतील व दरबारांतील रुष्ट आणि असंतुष्ट आप्तमित्र सरदारांना राज्याविरुद्ध वागूं न देतां राज्यकारभारांत सुधारणा करून खजिना व शस्त्रास्त्रें यांची सिद्धता राखणें, (५) राजकीय व सामाजिक व्यवहारांत प्रगतीपर धोरण आंखण्याचा यत्न करणें.

पानिपतपराभवामुळें मराठे पुनः तत्काल बल धरून उभे राहतील व आपल्याशीं झुंजण्यास येऊन विजयी होतील असें हैदर, निजाम, जाठ, रोहिले ह्यांना मुळींच वाटलें नाहीं. म्हणून ह्या सर्वांनीं आपापल्या भोंवतालच्या प्रांतांत धुंद माजवून मराठ्यांचीं ठाणीं हस्तगत करण्यास प्रारंभ केला. हैदर व निजाम ह्यांनीं तर महाराष्ट्र साम्राज्याचा मुलुख जिंकीत महाराष्ट्रांत व व पुणें राजधानीवरच हल्ला करण्याचा रोख धरून चाल केली. हैदरानें इंग्रज, निजाम, करवीरकर ह्यांस मिळवून घेऊन मराठी राज्य नष्ट करण्याचीच कंबर बांधली होती. पण करवीरकरच्या बाजूस विठ्ठल शिवदेव यास पाठविल्यामुळें, निजामास सहा लक्ष रुपये देऊन सहाय्यास पाचारण केलें तरी राक्षसभुवनवर त्यास दिलेल्या समजुतीमुळें हे दोघे जागच्या जागींच राहिले. इंग्रजकंपनीकडूनहि हैदरास मदत देण्याचें धैर्य ह्या वेळीं झालें नाहीं. पेशव्यांनीं मात्र चार वेळां लागोपाठ व एकट्यानींच म्हणजे जानोजी भोसले नागपूरकर आले नाहींत तरी किंवा निजामाचें सहाय्यावर न विसंबतां पुरंदरे, मेहेंदळे, पलांडे, पटवर्धन, मुरारराव घोरपडे,धुळप, पेठे, शिंदे, एकबोटे इ. सरदारांच्याकरवीं हैदराचा ठिकठिकाणीं पराभव करून ५१ लक्षांच्यावर खंडणी वसूल केली. बंकापूर इत्यादि ठिकाणीं कोंडमारा करून अशी त्याची फटफजीति केली कीं त्या महत्वाकांक्षी, मानी व शूर अल्लीस तोंड दाखविण्यास लज्जाच वाटली. दक्षिणेकडील पेशव्यांच्या ह्या स्वाऱ्यांतील पराक्रमामुळें शिदनूर, हरपनहळी इ. ठाणीं गोळी न

वाजवितांच ठाणदारांनीं सोडून दिलीं. धारवाड, रट्टेहळी, दोड्डु म्हणजे थोरले बाळापूर, अनेवाडी, बंकापूर, बेदनूर, मतगिरी, शिरे, गहवाल, कोंचनगुड इ. अनेक ठिकाणीं, किल्ले,गढ्या येथें मराठे सरदारांनीं असा विजयी पराक्रम केला कीं ते ते संग्राम हे युद्धशास्त्रांतील अभ्यासाचेच विषय व्हावे. हैदरावरील ह्या चारहि स्वाऱ्या माधवरावाच्या कारकीर्दीतील सरदारांनीं शौर्य, त्वरा, एकजूट, निष्ठा इत्यादि वीरोचित गुणांची खाण म्हणूनच उल्लेखिण्याजोग्या झाल्या. ह्या स्वाऱ्या (१) १७६२ फे. ते जून; (२) १७६४ जाने. ते १७६५ जून (३) १७६६ ऑक्टो. ते १७६७ जून; (४) १७६९ नोव्हें. ते १७७० मे ह्या कालांत झाल्या. पांचवी स्वारी १७७० ऑक्टो.१९ ते १७७१ डिसें. २४ अशी अल्पकाळच झाली. कारण माधवराव आजारी झाले.

माधवरावांच्या युद्धकार्यांतील प्रमुख कार्य जें हैदरावरील स्वाऱ्या तें सांगितल्यानंतर त्यांचें त्यांतीलच दुसरें मुख्य सांगण्याजोगें कृत्य म्हणजे निजामाचा पराभव हें होय. निजामाशीं हीं युद्धें, एक छोटें व दुसरें मोठें, अशीं दोन झालीं. पैकीं पहिलें व छोटें युद्ध माधवराव गादीवर आले त्याच महिन्यांत किंबहुना त्याचे आधींच निजामाकडून सुरूं झालें होतें. ह्या दोन्ही युद्धांत निजामास मराठ्यांकडील गेलेल्या सरदारांची मदत होती. अर्थात् ह्या सरदारांना परत आपलेकडे आणणें व मग त्यांशीं जशास तसें ह्या न्यायानें लढून पराभूत करणें ही कामगिरी माधवराव, राघोबादादा आणि सखारामपंतादि प्रमुख मुत्सद्यांनीं फार उत्तम प्रकारें केली. निजामअल्लीनें पानपतच्या पराभवाची वार्ता ऐकतांच रामचंद्र जाधवाकरवीं अक्कलकोटकरांचे १९ परगणे घेऊन पेशव्यांचा नळदुर्ग किल्लाहि घेतला. हें पाहतांच माधवरावांनीं दादांना वडीलकी देऊन आंबेड, पैठण, नगर, चांभारगोंदें येथें लढाया दिल्या व शेवटीं यवत येथें असतां निजामाचा असा कोंडमारा केला कीं, त्यास तहच करणें भाग पडलें. दुसरें व मोठें युद्ध राक्षसभुवनजवळील मादलमोहीचें. ह्या युद्धांत निजामकडे गमाजी यमाजी, जानोजी भोसले, गोपाळराव पटवर्धन ही मंडळी गेली होती. त्यांपैकीं गमाजीनें साताऱ्यावर, रामचंद्रराव जाधवानें रहिमतपूर फलटणकडे आणि विठ्ठल सुंदर हा निजामाचा दिवाण व स्वतः निजामअल्ली ह्यांनीं सासवड, शिरवळ व पुणें ह्यांवरच हल्ला केला. तिकडे राघोबादादा स्वतः माधवराव, शिंदे होळकर, ह्यांनीं निजामाच्या प्रांतांत व जानोजीच्या मुलखांत निजामाचाच कित्ता गिरविला. म्हणजे लूटमार व जाळपोळ करून निजामादि मंडळीस उस्से जादा पायबंद दिला, अर्थात् निजाम विठ्ठल सुंदरासह परत फिरले. इतक्यांत जानोजीस व्यंकट मोरेश्वर व रामचंद्र बल्लाळ ह्यांजमार्फत, यवनाकडे जातां ही काय गोष्ट इ. महाराष्ट्रराज्याविषयीं हितवाद सांगून परावृत्त केलें. निजामाच्या धाकट्या भावासहि निजामापासून दूर केलें. अशांत निजामावर गोदावरी उतरतांना अचानक व बेजरब मारा असा केला कीं निजामाच्या सैन्याची वाताहत झाली, विठ्ठल सुंदर दिवाणाचें डोकेंच कापलें, खंदारचा राजा विनायकरावहि ठार झाला. अखेरीस ८१॥। लाखाचा मुलुख निजामाकडून घेऊन तह केला व हें युद्ध संपलें. ह्या युद्धाचा काल १७६१ ऑगस्ट ते डिसेंबर; व १७६३ फे. ते १७६३ ऑगस्ट १० असा आहे.

तिसरी माधवरावांच्या कारकीर्दीतील कथनीय गोष्ट म्हणजे उत्तरेकडील बंदोबस्त करणें व दिल्लीची सत्ता आपल्या हातीं घेणें. पानिपत येथें झालेल्या मराठ्यांच्या पराभवामुळें निजाम, हैदर हे दूरदूरचेहि शत्रू जर मराठ्यांविरुद्ध शस्त्र पाजळून उठले तर प्रत्यक्ष पानपतनजीकचे रोहिले,जाठ, इत्यादि कां न उठतील ! ह्यांनींहि लगेच दंग्याला प्रारंभ केला. पण माधवरावांनींहि तत्काल आपले सरदार पाठवून तो दंगा बंद करण्याची योजना केली. ह्या बंडाळींत सदाशिवरावभाऊंच्या तोतयानेंहि बरीच भर घातली. त्यालाहि धरून कैद केलें. तिकडे अबदलीकडील सरदारहि मधून मधून येत. अंतर्वेदी प्रांतांतील ठाणीं घेण्याचे कामगिरीवर बापुराव कान्हेरे यांस ससैन्य पाठविलें. बुंदेलखंडांत बाळाजी व गंगाधर ह्या उभयता बंधूंनीं आपले कारभारी चांदोरकर ह्यांजमार्फत सागर, गुलसराई, जालवण येथें ठीक जम बसविला व बंडखोरांचा पाडाव केला. नजीरखान व सुरजमल्ल ह्यांचीं भांडणेंही ह्यावेळीं मराठ्यांच्या पथ्यावरच पडलीं. अबदली व शीख ह्यांमध्येंहि कलह लागल्यामुळें मराठ्यांविरुद्ध दोघांचेंहि लक्ष नव्हतें. उलट त्यांचें दिल्ली लाहोरकडे तुमची सत्ता स्थापित करा असेंच म्हणणें होतें; माधोसिंगांनीं तर ५० लक्ष रु. देतों जाठांचा पराभव करा असेंच पेशव्यांकडे बोलणें लाविलें; मग

इकडील दोनतीन प्रकरणांतून माधवराव जरा मोकळा होतांच त्यानें शिंदे, होळकर, रामचंद्र गणेश, विसाजीपंत, यशवंतराव पवार, ह्यांस रवाना केलें व स्वतः राघोबादादाही निघाले. दादांनीं गोहदकडे स्वारी केली, होळकरांनीं ढवळपुराजवळ शिखांचा बंदोबस्त केला, केदारजी व महादजी शिंदे यांनींहि बुंदीकोटा, उदेपूरकडे स्वाऱ्या करून खंडणी वसूल केली. बादशहा फरुकाबादेहून नयीगंज येथें होता त्याजकडे महादजी शिंदे, विसाजी कृष्ण व तुकोजी होळकर हे गेले. व दहा लक्ष प्रतिवर्षी खंड घेण्याचा करार करून त्यास ह्या मराठे सरदारांनीं दिल्लीस आणून तख्तनशीन केलें. मग रोहिल्यांवरील मराठ्यांची मोहीम दुप्पट जोरानें चालू झाली. जाबितखान व बंगश ह्यांचाहि पराभव केला. ह्या उत्तरेकडील स्वारींत मराठ्यांना यश आलें तरी त्यांच्यांतील परस्पर धुसफूस व परधार्जिणेपणाहि दृष्टोत्पत्तीस आला. उत्तरेकडे माधवरावास जातां आलें असतें तर बरें झालें असतें असें वाटणें हा माधवरावांच्या दक्षिणेकडील कामगिरीचा गौरवच होय. उत्तरेकडील स्वाऱ्यांतील १७६५ एप्रिल ९ कोडसें लढाई, १७६६ जानेवारी २६ गोहद स्वारी, १७६७ मार्च २० भेलसे स्वाधीन, १७६८ जून ९ आपाजी मैसलची कामगिरी, १७६९ सर्व वर्ष व २१ फेब्रुवारी १७७१ दिल्लीवर मराठ्यांचें निशाण लागतें हे काल प्रमुख आहेत.


माधवरावांच्या कारभारांतील चौथी लक्ष्यांत घेण्याजोगी गोष्ट म्हणजे घरांतील व दरबारांतील व्यवस्था करणें. घरांतील व्यवस्था करणें म्हणजे चुलते राघोबादादा, गोपिकाबाई यांचेमधील तेढीचा राजकारणास बाधक होऊं न देणें. गोपिकाबाईनें माधवराव कर्नाटकांत असतां दादा पुणें सोडून रुष्ट होऊन जात असतां जरी थांबविलें होतें, तरी माधवराव परत आल्यावर माधवराव आपलें सर्व ऐकेलच असें दिसून न आल्यामुळें ती नाशकास जाऊन राहिली व दादांना प्रथम नम्रपणें वडीलकी व कारभारांत प्रमुखपणा देऊनहि नीट राज्यैकनिष्ठतेचा व योग्य कारभार चालत नाहीं हें पाहतांच त्यांस बंदोबस्तानें जवळच ठेवलें. दादा दहा लक्ष जहागीर मागत होता ती देणें राज्यकारभाराच्या दृष्टीनें सोयीचें व हिताचें नव्हतें. बरें, दादा घरीं राहतील तर त्यांचे खेळ चालूच राहणार. अखेर त्यांस बंदोबस्तांत ठेवणेंच प्राप्त झालें. ह्या कामीं झालेल्या घोडनदीचे व धोडपचे युद्धाचा शेवट परस्पर भिन्न असा झाला. दरबारच्या व्यवस्थेंतील मुख्य गोष्ट म्हणजे सरदारांमधील वितुष्टें व त्यांजकडे शत्रूंच्या फितुरी, हालचाली चालत त्यांस आळा घालणें ही होय. बाबूजी नाईक बारामतीकर, हे हैदराकडे कारस्थान करीत होते त्यांचा सरंजाम जप्त केला. सखाराम बापूनीं साताऱ्याचा किल्लेदार राणोजी शिंदे यांस फितुरीबद्दल पत्र पाठविलें व त्याचा परस्पर बंदोबस्त केला. गणेश संभाजी हे सुजाउद्दौल्याचेच नोकर होऊन मुलखांत लुटालूट करीत. जाधव, दाभाडे इत्यादि मंडळीहि शत्रूच्या कारस्थानास बळी पडून राज्यास धोका आणीत. ह्या सर्वांचा बंदोबस्त कोणाची जहागीर जप्त करून, कोणास द्रव्यदंड देऊन, कोणास सामानें, कोणास देहदंड करून केला. प्रतिनिधींचा वाईप्रांतीं व आपसांत दंगा चालू होता तोहि बंद केला; खजिना रिता व स्वारीलढाईचीं कामें तर करावयाचीं झाल्यास पैसा पाहिजे, त्यासाठीं सर्व सरंजामदारांवर चौथाईची कर्जपट्टी घातली. राज्यांत वेठबिगारीच्या निमित्तानें गरीब रयतेवर जुलूम होत असे तो, ती बिगारमाफी सक्तीनें करून बंद केला. नागोठणें, नाशीक, पुणें, बागलकोट, शिवरी, धुळें येथें बाण, तोफा, गरनाळा, गोळे व दोन्ही प्रकारची (बाण व बंदुका व तोफांना लागणारी) दारू तयार करण्याचे कारखाने नवे सुरू केले. महाराष्ट्रसाम्राज्याशीं सदाच फटकून वागणारे नागपूरकर भोसले यांजवर स्वतंत्रपणें स्वारी करून त्यांस समजुतींत आणिले. जो जानोजी स्वतःच उठून निजामाकडे जातो तोच पुढें हैदराकडून बोलावणें आलें असतांहि त्या वकिलास स्वच्छ नकार देऊन परत लावतो. जानोजीवरील स्वारी १७६९ ऑक्टोबर १७ ते १७६६ मे १४.

माधवरावांच्या कारभाराचा तात्विक दृष्ट्या विशेष पाहूं गेल्यास हितप्रद होतील अशा पुढील गोष्टी निदर्शनास येतात, व त्याच सदैव ध्यानांत ठेवून वागणें इष्ट आहे. द्विजांपैकीं ब्राह्मणवर्गानें आपलें ब्रह्मकर्म सोडून राज्यकारभाराचें काम ज्याअर्थी स्वीकृत केलें आहे त्याअर्थी ‘आपली स्नानसंध्या म्हणजे राज्याचा—दौलतीचा सांभाळ करणें हीच होय’ हें मानलें पाहिजे. अर्थात् ह्यासाठीं न्यायनिष्ठुर होणें हें क्रमप्राप्तच आलें. ‘आज्ञाभंग’ हा सत्ताधाऱ्यांचा अस्त्रवध होय. म्हणून कोणी खावंदगिरीस अमर्यादा केली, बेबदल होऊन वर्तले, तर हीच आटीनें आट पडोन मार्ग पडतो व


बोज राहात नाहीं. म्हणून प्रसंगीं जरब देणें भाग आहे. एका ज्ञातींतील आणखी पोटभेद हे असतां कामा नये व तें शास्त्रसंमतहि नाहीं. हा माध्यंदीन, हा आभीर ब्राह्मण, खानदेशी ब्राह्मण असल्या भेदाचा निरास केला पाहिजे. राज्यकारभाराचें दप्तर राजवाड्यांतच राहून तेथेंच लिहिलें पाहिजे. आपापल्या घरीं राहून लिहिणें व दप्तर ठेवणें हें माधवरावानें बंद करण्याबद्दल आज्ञापत्रें काढलीं होतीं. सरंजामदार म्हणजे सैन्याचीं पथकें बाळगणारे सरदार. ह्यांस त्या-साठीं जहागीर किती, त्याचें उत्पन्न येतें किती व त्यांनीं पदरीं फौज बाळगिली किती, ह्या चौकशीचें काम सुरू केलें होतें. वर्तमान घडीपेक्षां आपल्या मागें आपणांस काय म्हणतील म्हणजे अपकीर्तीचें भय पोटीं बाळगून तेजस्वीपणाची आणि न्यायाचीच वागणूक करावी हें माधवरावांनीं धाकट्या भावास—नारायणरावास—'अख-बारनिवीस काय म्हणतील' ह्या दूरदेशी सूचक वाक्यानें सांगितलें आहे. निग्रहाप्रमाणें अनुग्रहही किंबहुना निग्र-हापेक्षां अधिकच माधवानें केला आहे. अशा प्रकारें आपल्या परीनें 'सरकार ताजें राखून व धन्य' म्हणवून घेऊन ही माधवरावाची कारकीर्द १८ नोव्हें. १७७२ ह्या दिवशीं समाप्त झाली. माधवरावाचें निधन थेऊर (जि. पुणें) येथें झालें. त्यांची पत्नी (लग्न ९।१२।१६७५ रोजीं शिवाजीराव जोशी यांच्या कन्येशीं झालें) रमाबाई सती गेली.

मानवी शरीरः—मानव हा उत्क्रांतिवादाच्या तत्त्वा-प्रमाणें सर्व प्राण्यांत श्रेष्ठ प्राणी आहे. विधात्याची सर्वच सृष्टि आश्चर्यमय असली तरी तींतहि मनुष्य-निर्मिति ही विधात्याच्या परमोच्च कौशल्याची द्योतक म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. मनुष्याचें आरोग्य जर उत्तम स्थितींत ठेवावयाचें असेल तर शरीररचनेचें ज्ञान असणें अत्यावश्यक आहे. शारीरशास्त्र (Anatomy) व इंद्रियविज्ञानशास्त्र (Physiology) हीं शास्त्रें शरीररचनेचा व शरीरव्यापारांचा सर्व आधुनिक साध-नांनीं अभ्यास करून विद्वान् चिकित्सक शास्त्रज्ञांनीं सविस्तर वर्णिलीं आहेत. हीं शास्त्रें म्हणजे आधुनिक वैद्यकाचा पाया असून शास्त्रज्ञांच्या शोधांनीं त्यांत नित्य नवी भर पडत आहे.

मानवी शरीराचे मुख्य भाग केवळ बाह्यतःच दिसतात ते म्हणजे डोकें, धड व हातपाय हे होत. धडामध्यें एक मोठी पोकळी असून तींत शरीराचे बहुतेक सर्व महत्त्वाचे अवयव व्यवस्थितपणें ठेवलेले आहेत. या धडाच्या पोकळीचे, उरोदपटल नामक (Diaphragm) स्नायूच्या आडव्या पडद्यानें वरचा




मानवी शरीराच्या निरनिराळ्या अवयवांचीं नांवें:—१ हनुवटी. २ तोंड. ३ नाक. ४ डोळा. ५ कपाळ. ६ केस ७ कानशील. ८ डोक्याचा मागचा भाग. ९ कान. १० कानाचा चापा (कानाच्या पाळीचा खालचा भाग). ११ जबड्याचें हाड. १२ गळा. १३ बाहू (१३, १६, १९ व ३१ मिळून हात). १४ काख. १५ कोंपर, १६ मुंढा हात (कोंपर व मनगट यांमधील हाताचा भाग). १७ ढुंगण. १८ जांघ. १९ आंगठा व हाताचीं बोटें. २० मांडी. २१ लवण. २२ पाऊल व गुडगा यांच्या मधला भाग. २३ पाऊल. २४ पायाचा आंगठा व पायाचीं बोटें. २५ खांदा. २६ छाती. २७ स्तन. २८ कमर. २९ बेंबी. ३० पोट. ३१ हाताचा पंजा. ३२ पाय. ३३ पिंढरी किंवा पोटरी. ३४ टांच. ३५ पायाची धूर. २१ च्या पुढें जो वर्तुळाकार भाग दाखविला आहे तो 'गुडघा' व पायाच्या धुरीमागें (३५) जो फुगीर भाग आहे त्यास 'घोटा' म्हणतात.




१ कंठमणी. २ श्वासनलिका. ३ मानेची धमनी. ४ बरगडी. ५ मुख्य धमनी. ६ धमनीची कमान. ७ फुप्फुस. ८ छाती व पोट यांमधील पडदा. ९ मूत्रपिंड १० मोठी (धोंड) शीर. ११ मलाशय. १२ कंठनाळ. १३ कंठग्रंथी. १४ फुप्फुसाग्र. १५ फुप्फुसधमनी. १६ हृदय. १७ हृदयाग्र. १८ अन्ननलिका. १९ वृकोर्ध्वपेशी. २० मूत्रनलिका. २१ अधोगामी महाधमनी. २२ मूत्राशय.

व खालचा असे दोन विभाग झाले असून वरच्या विभागास ऊर किंवा छाती म्हणतात व खालच्या विभागास उदर म्हणतात. छातींत मधें एक हृदय व डावें उजवे बाजूस एक एक फुप्फुस अशीं दोन फुप्फुसें असून शिवाय श्वासनलिका व तिच्या मागें अन्ननलिका अशीं आहेत. उदराच्या पोकळींत यकृत्, जठर, प्लीहा, स्वादुपिंड (Pancreas) लहान आंतडें व मोठें आंतडें असून या पोकळीच्या मागें दोन मूत्रपिंडग्रंथी आहेत.


शरीरांतील प्रत्येक अवयवास विशिष्ट कार्य करावयाचें असतें. निरनिराळे अवयव तें विशिष्ट कार्य एकजुटीनें व इतर अवयवांच्या कार्यांत अडथळा न आणतां करीत असतात. असें कार्य करणाऱ्या अवयवांची एक संस्था (System) समजली जाते. उदाहरणार्थ तोंड, दांत, अन्ननलिका, जठर, लहान–मोठें आंतडें, स्वादुपिंड इ. अवयव अन्न पचनाचें कार्य करीत असतात म्हणून त्यांना पचनसंस्थेंतील अवयव म्हणतात. नाक, घसा, श्वासनलिका, फुप्फुसें हे अवयव शरीरास शुद्ध हवा पुरविण्याचें व कार्बन डायॉक्सॉइड् हा विषारी वायु टाकून देण्याचें कार्य करीत असतात. म्हणून या अवयवांना **श्वासोच्छ्वास संस्था** म्हटलें जातें. हृदय-रोहिणी, केशवाहिन्या व नीला या रक्तवाहिन्या, हे अवयव शरीरांतील सर्व विभागांत रक्त खेळवितात म्हणून त्यांस **रुधिराभिसरण संस्थेंत** गणलें आहे. शरीरांतील विषारी पदार्थ बाहेर टाकण्याचें कार्य ज्या अवयवांकडून केलें जातें ते अवयव म्हणजे फुप्फुसें, मूत्रपिंड, स्वेदग्रंथी व मोठें आंतडें हे **उत्सर्जक संस्था** (Excretory Organs) या नांवानें संबोधले जातात. त्याचप्रमाणें डोक्यांत असलेला मेंदु, पृष्ठवंशांत असलेला मज्जारज्जु (Spinal Cord) व सर्व शरीरभर पसरलेल्या व सर्व विभागांवर नियंत्रण चालविणाऱ्या मज्जाशाखा यांची गणना **मज्जासंस्थेंत** (Nervous System) होते. याशिवाय हाडें हीं शरीराला आकार




धडांतील अवयवः–चित्र १ उरोऽस्थि २ उजवें फुप्फुस. ३–४ बरगडी. ५ यकृत. ६ मोठें आंतडें, चढता भाग (Ascending colon). ७आंत्रपुच्छ (Appendix) ८ जत्रु. ९ डावें फुप्फुस. १० हृदय. ११ जठर. १२ प्लीहा. १३ मोठें आंतडें, आडवा भाग (Transverse colon.) १४ लहान आंतडें. १५ मोठें आंतडें, उतरता भाग (Descending Colon). १६ सिग्मॉइड् कोलन्. १७ मूत्राशय.




तोंडांतील अंतर्भाग चित्र १ वरला ओठ. २ पुढले (छेदक) दांत (Incisors) ३ टाळा व पडजभिचें मूळ. ४ घशाच्या बाजूचा भाग. ५ पडजीभ (Uvula) ६ घसा. ७ जभि. ८ मेणकी (Tonsil). ९ दाढा. १० सुळ्याचा दांत (Canine tooth).



फुप्फुसांचें कार्य कसें चालतें हें वरील चित्रांत दाखविलें आहे.




१ कपाल-धमनी. २ कपालनीला. ३ ग्रीवारोहिणी. ४ ग्रीवानीला. ५ अधोजत्रुनीला (Clavicular Vein). ६ उर्ध्वमहाधमनी ७ अधोमहानीला (Interior Vena Cava) ८ कानशीलाची धमनी. ९ महारोहिणीची कमान. १० फुप्फुसनीला. ११ भुजरोहिणी. १२ ऊरुनीला. १३ ऊरुरोहिणी २४ नळीची नीला १५ नळीची धमनी.



(या आकृतींतील नांवें पान १५३४ मध्यें पाहा.)

१ मोठा मेंदु. ७ लहान मेंदु. २ कानशील-नील. ३ भुजतंतुजाल. ४ कुल्ला, मांडी व पायाची पोटरी यांमधून जाणारी मोठी मज्जातंतु. ५ मांडीच्या हाडाचे मज्जातंतु. ६ नळीचे मज्जातंतु. ८ मानेचे मज्जातंतु. ९ छातीचे मज्जातंतु १० अंगुष्ठमज्जा (त्याखालीं हाताचे मज्जातंतु). १२ पृष्ठवंशरज्जु. १३ पायाचे मज्जातंतु.



१ खालचा जबडा. २ शंखास्थि ३ पार्श्वास्थि. ४ कपालास्थि. ५ कपोलास्थि. ६ वरच्या जबड्याचें हाड. ७ पृष्ठवंश. ८ अक्षक (Collar-bone) ९ उरोस्थि. १० भुजास्थि. ११ उरोस्थीस जोडलेल्या बरगड्या. १२ इतर बरगड्या. १३-१४ अग्रबाहूचीं मुंढ्या हाताचीं हाडें. १५-२६ कुल्यांचीं हाडें. १६ मांडीचें हाड. १७ गुडघ्याची वाटी १८ गुडघ्याचा सांधा. १९-२० पोटऱ्यांचीं हाडें. २१ घोट्याचें हाड. २२ बरगड्या. २३ कमरेचें हाड. २४ माकडहाडाच्या वरचे त्रिकोनी हाड किंवा त्रिकास्थि. २५ माकडहाड. २७ टाचेचें हाड.

(पृष्ठ १५३२ वरून पुढें चालू)

व आधार देणारीं असून **अस्थिसंस्थेंत** त्यांची गणना होते व शरीराची हालचाल करणारे सर्व स्नायु मिळून **स्नायुसंस्था** वर्णिली आहे. तसेंच जननेंद्रियांची संस्था स्त्री व पुरुष यांमध्यें निरनिराळ्या विशिष्ट स्वरूपांत असते.

शरीरांतील सर्व अवयवांची रचना व घडण अशी असते कीं, त्याकडे योजिलेलें कार्य योग्य प्रकारें पार पाडिलें जावें. कित्येक नाजुक अवयव व इंद्रियें अशीं व्यवस्थित ठेविलीं गेलीं आहेत कीं अपायापासून त्यांचें नीट संरक्षण व्हावें. मेंदूच्या भोंवतीं कवटीची किंवा डोळ्यासाटीं खोबणीची (Orbit) योजना, या दृष्टीनें उदाहरण म्हणून म्हणतां येईल. पायांची योजना गतीसाटीं व हातांची योजना संकटांचा प्रतिकार करण्यासाठीं, किंवा भक्ष्य तोंडांत घालण्यासाठीं व इतरहि सर्व प्रकारचें बारीक सारीक काम करण्यासाठीं उपयुक्त अशी आहे. मनुष्याचा मेंदु हा त्याच्या शरीराच्या मानानें इतर कोणत्याही प्राण्याच्या मेंदूपेक्षां मोठा असतो; व त्यांत बुद्धि, विचारशक्ति व कल्पकता हे गुण विशेष असल्यामुळें मानवाचें इतर प्राण्यांहून वैशिष्ट्य आहे.

शरीर हें ज्या पेशिजालांचें बनलें आहे त्यांचे मुख्यतः चार प्रकार आहेत. ते असेः-१ सगळ्यांत साध्या घर्तीचें पेशीजाल (Epithelial Cells). २ संयोजक पेशीजाल (Connective tissue). ३ स्नायु पेशीजाल (muscular tissue). ४ मज्जा पेशीजाल (Nervous tissue).

प्रत्येक जिवंत पेशीमध्यें 'प्रोटोप्लाझम्' किंवा आद्यद्रव नामक एक जिवंत पदार्थ असतो. त्या पदार्थास हालचालीची शक्ति असते. पेशीच्या मध्यभागीं केंद्रबिंदु (Necleus) असतो. जिवंतपणाचे द्योतक गुणधर्म म्हणजे हालचाल करण्याची शक्ति, अन्न आत्मसात् करण्याची शक्ति, वर्धनशक्ति, जननशक्ति व उत्सर्जनशक्ति हे होत. शरीरामध्यें जीवनव्यापार सुरू असतांना अनेक घडामोडी सुरू असतात. निकामी झालेल्या पेशींचा नाश व त्यांच्या जागीं नव पेशींची उत्पत्ति हीं सारखीं सुरू असतात. या घडामोडीस चयापचय किंवा Metabolism असें म्हणतात.

शरीराचें शास्त्रीय रासायनिक पृथक्करण केल्यास जीं मूलभूत तत्त्वें आढळतात, तीं येणेंप्रमाणेः-कार्बन्, नायट्रोजन्, हायड्रोजन्, ऑक्सिजन्, गंधक, फॉस्फ-

रस्, फ्लोरिन्, क्लोरिन्, आयोडिन्, सिलिकॉन्, सोडियम्, पोटॅशियम्, कॅल्शियम्, मॅग्नेशियम्, लिथिअम, लोह व अगदीं सूक्ष्मप्रमाणांत मँगेनीज्, ताम्र, व शिसें हे धातु आढळतात. हीं बहुतेक द्रव्यें शरीरांत स्वतंत्र अवस्थेंत नसून, संयुक्त स्थितींत असतात.

शरीराची तुलना एकाद्या इंजिनसारख्या यंत्राशीं नेहमीं करण्यांत येते. इंजिनचे सर्व भाग व्यवस्थित व सुस्थितींत असतील तर इंजिनचें कार्य चांगलें चालेल. तसेंच शरीराचेंहि आहे. इंजिनमध्यें कांहीं बिघाड झाल्यास त्याची अंतर्गत रचना ज्यास पूर्णपणें अवगत असेल असाच इंजिनियर तें दुरुस्त करूं शकेल. शरीरयंत्रांत कांहीं बिघाड झाल्यास शरीररचनेची उत्तम माहिती असल्याखेरीज व शरीरव्यापारांचें ज्ञान असल्यावांचून शरीरांतील विकृतीवर योग्य उपाय होऊं शकणार नाहींत. मानवी शरीराची स्थूल व सूक्ष्म माहिती शास्त्रज्ञांना पुष्कळ झालेली असली, तरी शरीरांतील जीवनव्यापारांचें ज्ञान पूर्णावस्थेस पोचलें आहे असें म्हणतां येणार नाहीं. शास्त्रज्ञांचे प्रयत्न त्या दृष्टीनें सुरूं आहेत. परंतु अज्ञात असें क्षेत्रहि अद्याप पुष्कळच आहे. अवयवांच्या रचनेवरून कांहीं कल्पना बसविल्या जातात व अनुभवानें किंवा प्रयोगानें त्या पडताळून पहाण्यांत येतात व अशाच रीतीनें ज्ञानांत भर पडत जाते.

मानवी शरीरयंत्र जर सुस्थितींत व आरोग्यांत ठेवावयाचें असेल तर पुढील सहा नियम लक्षांत वागविले पाहिजेत:—

१. शरीराला योग्य अन्न व पाणी मिळालें पाहिजे.


२. शरीराला भरपूर सूर्यप्रकाश व स्वच्छ हवा मिळाली पाहिजे.

३. शरीरांत निर्माण होणारे टाकाऊ व विषारी पदार्थ त्वरित विसर्जन केले गेले पाहिजेत. ते शरीरांत सांठून राहतां नयेत.

४. शरीराचें संरक्षण उष्मा किंवा थंडी यांपासून नीट केलें पाहिजे.

५. शरीराला नियमितपणें दररोज योग्य व्यायाम व भरपूर विश्रांति मिळाली पाहिजे.

६. शरीरांत बाहेरून कोणतेंहि विष अगर रोगजंतु यांचा प्रवेश होणार नाहीं याबद्दल पूर्ण दक्षता बाळगली पाहिजे. हे नियम जर उत्तमपणें पाळले गेले तर आपलें शरीर आपणांस सुस्थितींत व आरोग्यांत दीर्घकाल ठेवतां येईल. पण यांपैकीं कोणत्याही नियमांचें उल्लंघन घडल्यास लागलीच अगर थोड्या फार कालावधीनें आजार हा आल्यावांचून राहाणार नाहीं हें निःसंशय. यासाठीं आपल्या शरीराच्या रचनेचें व व्यापारांचें ज्ञान करून घेणें व त्या ज्ञानाचा आपल्या जीवनांत उपयोग करून घेऊन जीवन निरामय व सुखमय करणें कसें अगत्याचें आहे तें कळून येईल.



डोकें व मान यांचा उभा छेद (चित्र):-१ मेंदूचे गोलार्ध जोडणारा भाग (कॉर्पस कॅलोसम्). २ मोठा मेंदु (Cerebrum) ३ कवटीचें हाड. ४ पिट्युइटरी ग्रंथि. ५ विहंगास्थींतील पोकळी. ६ कपालास्थींतील पोकळी. ७ नाकाचा अंतर्भाग (Turbinate bone). ८ जिभेचे स्नायु. ९ श्वासनलिका–ध्वनियंत्र (Larynx). १० लहान मेंदु (Cerebellum) ११ मज्जासेतु (Pous). १२ लंब मज्जा (Medulla oblongata). १३ पृष्ठवंशरज्जू (Spinal cord). १४ अन्ननलिका. १५ श्वासनलिका.